Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एस्. एस्. सी. च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

भारताचा सांस्कृतिक इतिहास

लेखक
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.

१९५२

किंमत—साडेतीन रुपये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या...... ४१५
२२

पञ्जिका संख्या...... २६०१३

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

२६०९२

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED 1973
Initial

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

प्राचीन भारतीय प्रवासी जावा बेटास जात आहेत.



[जावा बेटांतील बोरोबुदूरच्या गॅलरींतून खोदलेल्या चित्रावरून

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एस्. एस्. सी. च्या नव्या अभ्यासक्रमानुसार

भारताचा सांस्कृतिक इतिहास

लेखक

प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्. ए.

इतिहासाचे प्राध्यापक, स. प. कॉलेज, पुणें.

महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास, हिंदुस्थानची शासनपद्धति, व नागरिकशास्त्र या पुस्तकांचे कर्ते.

साहाय्यक

प्रा. शं. दा. चितळे, एम्.ए., बी.टी.

'इतिहास कसा शिकवावा' या पुस्तकाचे कर्ते

अध्यापक 'महाराष्ट्र विद्यालय' पुणें २.

शके १८७३] [सन १९५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशक
शं. बा. चितळे, एम्. ए., बी. टी.,
व्यवस्थापक, अ. वि. गृह प्रकाशन,
६२४ सदाशिव, पुणें २.

पुनर्मुद्रण १ लें

मुद्रक
द. बा. गांगल, एम. एससी.,
व्यवस्थापक, लोकसंग्रह छापखाना
६२४ सदाशिव, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

इतिहास म्हणजे आत्मदर्शन. भारताचा सांस्कृतिक इतिहास म्हणजे भारताचें संपूर्ण यथातथ्य दर्शन घडविण्याचा यत्न होय. स्वातंत्र्याच्या उदय-कालीं हें जितक्या यशस्वी रीतीनें करतां येईल, तितकीं आपलीं पुढलीं पावलें सहेतुकतेनें पडण्यास मोठें साहाय्य होईल.

एस्. एस्. सी. साठीं तयार केलेल्या नव्या अभ्यासक्रमांत जुन्या अभ्यास-क्रमाहून फरक आहे. तो नुसता तपशिलाचा फरक नाहीं, तर दृष्टिकोनांत फरक आहे. स्वदेशाचा इतिहास हा जागतिक इतिहासाचा एक भाग असल्यानें भारतीय जीवनांतील स्थित्यंतरें जागतिक घडामोडींच्या पार्श्वभूमी-वर रेखाटलीं जावीं अशी हा अभ्यासक्रम आंखणारांची अपेक्षा दिसते. इतिहास म्हणजे नुसती राजांची नांवनिशी व त्यांनीं केलेल्या लढाया हें आतां जुनें झालें. देशाच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक सर्वांगीण जीवनाचा इतिहास हवा हें सर्वमान्य झालेलें विधान आहे. पण हें सर्व पटलें तरी जुनी चाकोरी सुटत नव्हती. ती लेखकांना व शिक्षकांना सोडावयास निक्षून सांगण्याचा उद्देश येथें स्पष्ट दिसून येतो.

पहांटे खिडकीवाटे घरांत सूर्याचे किरण पडतात. त्यांत अनेक धूलिकण स्वैरतेनें हालचाल करतांना दिसतात. मानवी जीवनाची चाल तशी स्वैर व निर्हेतुक नाहीं. परिस्थितीनुरूप बुद्धीस सुचेल तसा कांहींतरी उद्देश मनांत धरून मनुष्य पिढी दरपिढीस पुढें पाऊल टाकतो. त्यांत कोठें चुकतें तर कोठें अपेक्षेबाहेर यश मिळतें. कधीं पावलें झपझप पडतात, तर कधीं अगदीं मंदगतीनें प्रगति होते. उण्यापुऱ्या पांच हजार वर्षांच्या प्रदीर्घ ऐतिहासिक कालांतील भारतीयांच्या जीवनांतील सहेतुकतेची विस्तृत उपपत्ति लावणें हें इतिहास लेखकाचें काम आहे. या देशांत अनेक वंश, धर्मपंथ व भाषा आहेत. त्यांनीं प्रसंगीं एकमेकांशीं संघर्ष केला तसें सहकार्यही केलें. या सहकार्याचा व सहविचाराचा वेळींच शोध घेतल्यास इतिहासांतील विधायक भागावर योग्य तो भर दिल्यासारखें होईल. नवीन अभ्यासक्रमांत ही दृष्टि आढळून येते.

वर सांगितलेले हेतु साध्य करण्याचा हें क्रमिक पुस्तक हा एक नम्र प्रयत्न आहे. नवीन अभ्यासक्रमांच्या कलमांत कांहींसा कालविपर्यास झालेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसतो. उदाहरणार्थ, युरोपांतील सरंजामशाही इसवी सनाच्या आठव्या नवव्या शतकांत उदय पावली. युरोपांतील या काळास 'मध्ययुग' म्हणतात. तसेंच इस्लामचा उदय, त्यांची सिंधवरील स्वारी या सर्व गोष्टी इ. स. १२०० पूर्वीच्या आहेत हें लक्षांत घेऊन त्या सर्वांचा व समकालीन आशिया व युरोपमधील घडामोडींचा मीं त्या भागांत समावेश केला आहे. 'भारतीयांचा बाह्यजगांत विस्तार' या विषयाकडे आतांपर्यंत अक्षम्य दुर्लक्ष झालें होतें. हे सर्व विषय आतां मुद्दाम नव्यानें लिहिण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां अभ्यासक्रम बदलला हें एकपरीनें बरें झालें असें वाटलें.

इ. स. १७५० पूर्वीच्या दोन हजार वर्षांत घडल्या नसतील एवढ्या घडामोडी गेल्या दोनशें वर्षांत राजकीय व शास्त्रीय जगांत घडल्या. जग पार बदलून गेलें! युरोप झपाट्यानें पुढें गेलें! जपानही त्याच वळणावर जाऊं लागलें. परंतु सर्वांनाच साम्राज्यवादाची प्राणांतिक ठेंच लागली. एवढ्यांत चीन भारतादि पूर्वेकडील देश जागृत झाले असून, त्यांच्या चुका लक्षांत घेऊन ते आपला मार्ग चोखाळत आहेत. या घडामोडींचा ढोबळ परिचय मुलांना असला पाहिजे. या हेतूनें ओद्योगिक क्रांति, लोकशाहीचा विकास, स्वातंत्र्याचीं आन्दोलनें हे विषय नवीनच अभ्यासक्रमांत प्रविष्ट केले आहेत.

शिक्षकांनीं आतां इतिहास शिकवितांना नुसत्या जुन्या वाचनावर विसंबून चालणार नाहीं. हें पुस्तक शिकवितांना प्रा. मुजुमदारादींचें 'अॅडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया', श्री.पणिक्कर–भारताचे चीनमधील वकील–यांचें 'ए सर्व्हे ऑफ इंडियन हिस्ट्री' हीं पुस्तकें भारताच्या इतिहासासाठीं व एच्.जी. वेल्स यांचें 'ए शॉर्ट हिस्ट्री ऑफ दि वर्ल्ड' हें जागतिक घडामोडींच्या समालोचनासाठीं, अशीं निदान तीन पुस्तकें अवश्य वाचलीं पाहिजेत.

प्रस्तुत पुस्तक लिहीत असतांना इतिहास अध्यापनपद्धतींत सुपरिचित असलेले माझे मित्र प्रा. शं. दा. चितळे यांनीं साह्य केलें आहे. स्वतःचें पुस्तक असावें इतक्या तादात्म्यानें त्यांनीं ही मदत केली. या दृष्टीनें साहाय्यक म्हणून त्यांचा मुखपृष्ठावर मीं मुद्दाम उल्लेख केला आहे. तसेंच प्रा. गायधनी स. प. कॉलेज, पुणें व प्रा. संगवे कर्नाटक कॉलेज, धारवाड यांनीं वेळोवेळीं केलेल्या साह्याचाही येथें साभार उल्लेख करणें उचित होईल.

दत्तजयंति, १२–१२–५१
'स्वातंत्र्य' पुणें ४.

रा. वि. ओतुरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

भारताचा सांस्कृतिक इतिहास

उपोद्घात : सांस्कृतिक इतिहासाचें स्वरूप व प्रयोजन. १–३

प्रस्तावना खंड

भाग १ ला—मानवाचा उदय. ४–१५
भाग २ रा—जग व हिंदुस्थान. १६–२६
भाग ३ रा—देश व लोक. २७–३७

खंड पहिला

अतिप्राचीन काल (इ. स. पू. ३०००–इ. स. पू. ३२१)

भाग १ ला.-वेदपूर्वकाल : मोहेंजोदरो संस्कृति. ३८–४१
भाग २ रा—वेदकाल : आर्यांची पहिली वसाहत. ४२–४६
भाग ३ रा—आर्यांचा गंगेच्या कांठीं प्रसार. ४७–५३
भाग ४ था—आर्यसंस्कृतीचा देशभर प्रसार. ५४–६३
भाग ५ वा—बौद्ध व जैनधर्मांचा उदय. ६४–७२

खंड २ रा

प्राचीन युग (इ. स. पू. ३२१ इ. स. १२०५)

भाग ६ वा—स्वराज्याचें साम्राज्य बनलें. ७३–८५

इ. स. पू. ३२१ ते २३२

भाग ७ वा—जागतिक घडामोडी–ग्रीक-रोमन संस्कृति ८६–९०
भाग ८ वा—मौर्य साम्राज्योत्तर भारतीय घडामोडी ९१–१०५
भाग ९ वा—गुप्त-हर्षांचें सुवर्णयुग. १०६–१२२
भाग १० वा–उत्तरेकडील छोटीं राज्यें :
राजपुतांचा उदय १२३–१३३
भाग ११ वा–वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन १३४–१३८
भाग १२ वा–दक्षिणेकडील राज्यें : चालुक्य, राष्ट्रकूट, चोल इ. १३९–१५१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १३ वा–युरोपांतील अंधारयुगाचीं हजार वर्षें १५१–१६०
भाग १४ वा–भारताचा बाह्यजगांतील विस्तार १६१–१६६
भाग १५ वा–जागृत आशियाची तोंडओळख १६७–१७४
भाग १६ वा–राजपूत मुसलमानांच्या चकमकी १७५–१८८
भाग १७ वा–प्राचीन भारतीय संस्कृतीचें स्वरूप १८९–२००

उत्तरार्ध

खंड ३ रा मध्ययुग (इ. स. १२०५ ते १८१८)

भाग १८ वा––सुलतानशाहीचा उदय २०१–२०९
भाग १९ वा––सुलतानशाहीचा शेवट २०९–२१५
भाग २० वा––सुलतानशाही काळांतील स्वतंत्र राज्यें २१६–२३२
भाग २१ वा––सुलतानशाही काळांतील भारताचें स्वरूप २३२–२३७
भाग २२ वा––मायबोलींतून झालेली धर्मजागृति २३८–२४४
भाग २३ वा––युरोपियन व्यापाऱ्यांचें भारतांत आगमन २४५–२५१
भाग २४ वा––मोगल राज्याची स्थापना २५२–२६०
भाग २५ वा––मोगल सम्राट् अकबर २६१–२७२
भाग २६ वा––मोगल बादशाहीची अखेर २७२–२८१
भाग २७ वा––मोगल अंमलाखालील भारत २८२–२९०
भाग २८ वा––मराठी राज्याचा उदय २९१–३०४
भाग २९ वा––मराठी साम्राज्याचा उदयास्त ३०५–३२१
भाग ३० वा––मराठी राज्याचें सांस्कृतिक स्वरूप ३२२–३२९
भाग ३१ वा––भारतांत इंग्रजी सत्तेची स्थापना ३३०–३४५

खंड ४ था अर्वाचीन युग (इ. स. १८१८ ते १९५०)

भाग ३२ वा––ब्रिटिश साम्राज्यसत्तेची वाढ ३४९–३६१
भाग ३३ वा––भारतीय मन्वन्तराचीं पूर्वचिन्हें ३६२–३७०
भाग ३४ वा––सनदशीर चळवळीस प्रारंभ ३७८–३९८
भाग ३५ वा––सनदशीर चळवळीस प्रारंभ (चालू) ३९०–४००

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३६ वा—यांत्रिक युगाचा उदय व औद्योगिक क्रान्ति ४०१–४१४
भाग ३७ वा—आधुनिक लोकशाहीचा विकास ४१४–४२९
भाग ३८ वा—विसाव्या शतकांतील साम्राज्यवाद व लोकशाही यांचें द्वंद्व ४२९–४३९
भाग ३९ वा—स्वातंत्र्याचीं आंदोलनें ४४०–४४८
भाग ४० वा—भारतीय स्वातंत्र्याचा लढा ४४८–४५६
भाग ४१ वा—भारतीय स्वातंत्र्याची सिद्धता ४५६–४६३
भाग ४२ वा—आधुनिक भारतांतील धार्मिक, सामाजिक स्थिति व विचार प्रवाह ४६४–४७४
भाग ४३ वा—गेल्या शंभर वर्षांतील लोकजीवन ४७४–४८०

निवडक चित्रें

१. प्राचीन भारतीय प्रवासी जावा बेटास जात आहेत प्रारंभी
२. जीवाची उत्क्रांति ५
३. इजिप्तमधील एका जुनाट थडग्यांतील मृतदेह १७
४. इजिप्त येथील मनोरे व नरमुखी सिंह १८
५. हम्मुरबी व सूर्यदेवता २६
६. मोहेंजोदरो उत्खननांतील अवशेष ४०
७. गांधार येथील बुद्धाचा पूर्णाकृति पुतळा ६५
८. अशोककालीन सारनाथ येथील स्तंभ ८०
९. सांची येथील प्रवेशद्वार ८२
१०. कार्ले येथील कोरीव लेणीं १००
११. अजंठा : पद्मपाणी बुद्ध १०२
१२. मृत्युशय्येवर पडलेली राजस्त्री १०४
१३. हर्षाची मुद्रा ११५
१४. नालंदा विद्यापीठाचे अवशेष १२२
१५. वेरूळ येथील कैलास मंदिर १४२
१६. युरोपांतील मध्ययुगीन किल्ला १६०
१७. राजपूत चित्रकलेचा नमुना १९२
१८. बुद्ध प्रवचन करीत आहे ,,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. चितोडचा कीर्तिस्तंभ २१७
२०. श्रीविरूपाक्ष देवालय (विजयनगर) २२९
२१. मोगलकालीन प्रवासाचें वाहन २८७
२२. हारग्रीव्हचा चरखा व यंत्रानें विणणें ४०४
२३. स्टीफन्सनचें रॉकेट ४०५
२४. बास्तिलच्या तुरुंगावर हल्ला ४२२
२५. आजचें कलकत्ता शहर : ट्रॅक्टरनें शेती करण्याचा प्रयोग ४७२

नकाशे

१. प्राचीन जागृत जग २१
२. प्राचीन भारतवर्ष ५५
३. हिंदुस्थानचा वायव्य सरहद्दीवरील प्रदेश ९३
४. प्राचीन राज्यें ९६
५. गुप्तांचें साम्राज्य १०८
६. भारताचा समुद्रमार्गें शोध १५८
७. बहमनी राज्यें २२३
८. मोगल साम्राज्य २६२
९. महाराष्ट्राचा नकाशा ३०४
१०. शिवाजीचें व शाहूचें राज्य ३०६
११. कर्नाटकांतील लढाया ३३२
१२. बंगाल, बिहार व सं. प्रांत ३३७
१३. ब्रह्मदेश ३५२
१४. अफगाणिस्थान व वायव्य सरहद्दीवरील प्रांत ३५५
१५. ब्रिटिश अंमल–हिंदुस्थान ३६८
१६. ब्रिटिश साम्राज्याची वाढ ३७२
१७. अमेरिकेंतील तेरा संयुक्त संस्थानें ४२०
१८. द्विखंड भारत ४५६

आलेख

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाची प्रगति
१. हिंदुधर्म व बौद्धधर्म यांचा चढ–उतार १३६
२. मराठेशाहीचा विकास ३२१
३. तीनसत्तांचे समकालीन उत्कर्षापकर्ष ३७७
४. इंग्लंडातील लोकसत्तेची वाढ ४२६
५. तीन सत्तांचे उत्कर्षापकर्ष ४४०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९५३ पासून होणाऱ्या एस. एस. सी. परीक्षेचा इतिहासाचा नवा अभ्यासक्रम*

कालखंड पहिला (इ. स. ३२० पर्यंत)

१. प्रास्ताविक :—हिंदुस्थानचीं जुनीं नांवें–भारत, अजनाभ इ.(२७) प्राचीन इतिहासाचीं साधनें आणि आधार (३४) सुधारणांचा आरंभ (१६–१७)—पहिला ग्रीक विजता–डायोनिशस (५८–५९) जलप्रलयाची कथा–भारतीय, बाबिलोनियाची व बायबलमधील इ. (२५ व ५३), आर्यांचें मूळ ठिकाण (३८–३९), नद्यांच्या खोऱ्यांतील सुधारणा (१६–२५)

२. आर्य आणि द्रविड :—मोहेंजोदरो, सिंधूच्या खोऱ्यांतील सुधारणा (३८–४१), हिटाइट, सुमेरियन, आसिरियन, इराणी लोकांशीं आलेला संबंध (१९–२४)

३. वेदकाल :—वाङ्मय, शासनपद्धति, संस्कृति, सामाजिक चालीरीति, उत्तर भारतांत आर्यांचा प्रसार (४२–४६) ब्राह्मणें–उपनिषिदें (५०–५१)

४. धर्मपंथ :बौद्धधर्म (६५–६९) जैन धर्म (६९–७२) आणि भक्तिपंथ (११९ व १९१), रामायण आणि महाभारत (४७–५०)

५. मौर्यांचें अधिराज्य :—मौर्यांचें साम्राज्य—चंद्रगुप्त, अशोक, कौटिल्याचें अर्थशास्त्र, मौर्य-शासन-पद्धति (७३ ते ८५), ग्रीक व रोमनांचा प्रभाव (८६ ते ९०)

६. ब्राह्मणधर्माचें पुनरुज्जीवन :—मनुस्मृति (१०३व१०५), पुष्यमित्र (९२), विक्रमसंवत् (११०), शककालगणना (९७), आणि रुद्रदामन् (९९)

कालखंड दुसरा (इ. स. ३२१ ते इ. स. १२०५)

१. गुप्तराजे :—समुद्रगुप्त, चंद्रगुप्त आणि कुमारगुप्त (१०६ ते १११)

२. वाङ्मय (११८, ११९) आणि पुराणें (९१) :—विशाल भारतांत संस्कृतीचा प्रसार (१६१–१६५), संस्कृत साहित्याचें सुवर्णयुग (११८ ते १२१)

३. हर्षवर्धन (१११–११७) :— बाण (१११ व ११९) पुलकेशी (११४ व १४०)

---

* कंसांतील आंकडे पुस्तकांतील पृष्ठांचे आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. उत्तर भारतांतील स्वतंत्र छोटीं राज्यें :—(१२३-१३२)
दक्षिणेकडील राज्यें (१३९-१५०), परकीय चिनी प्रवासी-(११०, ११४, ११६) विद्यापीठांची स्थापना, नालंदा इ. (११६, १९८)

५. या कालखंडांतील :—शिल्प, कला, इ. प्रगति; पर्यालोचन. (१८९-२००)

कालखंड तिसरा (इ. स. १२०५ ते इ. स. १८१८)

१. पाश्चिमात्य जगांतील मध्ययुगाचीं वैशिष्ट्यें :— सरंजामी पद्धति व शिलेदारी (१५१ ते १५५), धार्मिक असहिष्णुता आणि धर्मछळ (१५४-१५६), राजपुतांचा स्वभाव, त्यांची सरंजामी पद्धति आणि संस्कृति यांचे गुणविशेष (१२४ ते १२६)

२. मध्य आशियांतील राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिति चंगीझखान, कुब्लाईखान, मार्कोपोलोचीं पर्यटनें (१७०-१७३), इस्लामचा उदय (१६७-१७०), अरब लोकांचें सिंध प्रांतावर आक्रमण-त्याचे परिणाम (१७५-१७६)

३. दिल्लीच्या सुलतानशाहीचा उदय आणि प्रसार (भाग १८) गझनीचा महमद (१७७-१८०) बाल्बन (२०३) अलाउद्दीन खिलजी (२०४-२०७), मुहंमद तुघ्लुख (२०९-२११) फिरुझ तुघ्लुख (२१२-२१३) सुलतानशाहींतील राज्यव्यवस्था (२३३-२३४) आणि या काळांतील आर्थिक (२३४) सामाजिक (२३५) आणि सांस्कृतिक (२३६-३७) परिस्थिति.

४. सुलतानशाहीचा पडता काळ (भाग २०)—प्रांतिक राजघराण्यांचा उदय (२१६-२२१), दक्षिणेकडे विजयनगर आणि बहमनी राज्यांचे उदयास्त (२२१-२२८), तेथील कला, शिल्प आणि व्यापार (२२४, २२८-२३०, २३२-२३७).

५. युरोप आणि भारत यांमधील प्राचीन व्यापारी रस्ते (२४५), जलमार्गाचा शोध (१५७, २४४-२४७), कोलंबस (१५८), युरोपांतील धर्मसुधारणा आणि नवयुग (१५४-१५८), भारतांतील युरोपीयाशीं व्यापारी संबंध (२४८-२५१).

६. धार्मिक सुधारणेच्या चळवळी (भाग २२)-भक्तिपंथ (१९१-९२, २३८), ज्ञानेश्वर (१४४-१४५) तुकाराम (२९२-२९३), नानक (२४०) कबीर (२३९) नरसिंह मेहता (२४१) आणि चैतन्य (२३९-४०), बसव (१४३), मध्व, (१४६), रामानुज (१४६-४७) . (२३८-२४४).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. मोगल साम्राज्याची स्थापना (भाग २४), शूर बाबर (२५३-५५), शेरशाहाची राज्यव्यवस्था (२५७-२५९), थोर अकबर (२६२-२७१), इमारती बांधणारा शहाजहान (२७४-२७६), औरंगजेब (२७६ २८१), शीखांचा उदय (२८५-२८७), मोगल साम्राज्याच्या अस्ताचीं कारणें (२८८-८९), मोगल राज्यांतील आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिति (२८२-२८८).

८. मराठे-उदय (२८९-२९१) शिवाजी (२९१-३०३), आणि राजाराम, (३०२-३०३), विस्तार (३०७) पहिला बाजीराव (३०७-३१०) आणि पहिला माधवराव, (३१३-३१४), मराठ मंडळ (३११); मराठी सत्तेचा पाडाव, (३१७-३१९), अन्तर्गत कलह (३१४-३१५), मराठ्यांची शासन पद्धत (३२३-३२५), त्यांच्या अंमलाखालील लोकजीवन (३२५-३२९).

९. भारतांत युरोपियन राष्ट्रांची व्यापार आणि सत्तेसाठीं चढाओढ—क्लाईव्ह, (३३१, ३३५-३३८), डुप्ले (३३०-३३४), वॉरन हेस्टिंग्ज (३३९-३४०), हैदर (३१४), आणि टिपू (३४१), भारतांत ब्रिटिश सत्तेची वाढ (३४०-३४३), तैनाती फौजेची पद्धति (३४२), ब्रिटिशांची राज्यव्यवस्था आणि धोरणें (३४३-३४४).

कालखंड चौथा (इ. स. १८१८ ते इ. स. १९५०)

१. भारतांत ब्रिटिश सत्तेचें दृढीकरण—सरहद्दीबाबत धोरण (३५१-३५६), रणजितसिंगाच्या पुढारीपणाखालीं शीख (३५७-५८), लॉर्ड डलहौसी आणि त्याचें प्रदेश खालसा करण्याचें धोरण (३५९-३६०, ३६८-३७०), १८५७ चा क्षोभ (३७१-३७६), ब्रिटिश राजाकडे सत्ता सुपूर्द, राणीचा जाहीरनामा (३७६-७७).

२. भारतांत बादशाही अंमल, राज्यव्यवस्थेंत पद्धतशीरपणा व सुधारणा (३६२-३६८, ३७८, ३८०), या दृष्टीनें विशेषतः लॉर्ड मेयो, (३८१-३८२), लॉर्ड रिपन, (३८४-३८६), लॉर्ड कर्झन (३९०-३९३), लॉर्ड मिंटो (३९३-३९६), आणि लॉर्ड चेम्सफोर्ड (३९८-४००) यांनीं केलेलें कार्य.

३. औद्योगिक क्रांति आणि यंत्रयुग—पश्चिमेकडे औद्योगिक क्रान्ति आणि तिचीं लक्षणें (४०१-४०६), जपानचें औद्योगिक सामर्थ्य, (४०८-९), स्वदेशी चळवळ, (४०९), भारतांत उद्योगाचा विकास (४१०),

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दळणवळणाची वाढ, जल-विद्युतशक्तीचें उत्पादन (४११), कापड, लोखंड, पोलाद, ताग इ. सारखे मोठे उद्योगधंदे (४०९-४१२), मजूर चळवळ (४१२), घरगुती धंद्यांचें पुनरुज्जीवन (४१२-४१३).

४. पश्चिमेकडील लोकशाहीचा विकास---लोकसभांची जननी पार्लमेंट (४१५), मॅग्ना चार्टा (४१६), व्यक्ति संरक्षणाचा कायदा (४१८), १६८९ ची राज्यक्रांति (४१८-४१९), अमेरिकन स्वातंत्र्य (४१९-४२१), फरेंच राज्यक्रांति (४२१-४२४), इंग्लंडांतील सुधारणेची चळवळ [इ. स. १८३२-१९२८] (४२४-४२८).

५. जागतिक युद्धें—पहिलें व दुसरें (४२९-४३०), लोकशाही वि. साम्राज्यवाद (४३४-४३५), राष्ट्रसंघ (४३३-४३४), सोव्हिएट लोकशाहीचा उदय (४३५-४३६), फॅसिझमची वाढ (४३४-४३५).

६. स्वातंत्र्याचें आंदोलन—इटलींतील स्वातंत्र्याच्या चळवळी (४४०-४४१), आयर्लंड (४४१-४४५), चीन इ. (४४५-४४८) भारतांतील चळवळ, राष्ट्रीय महासभा (३८६,४४८-४५०) वंगभंग (३९२) होमरूलची चळवळ (४५०), असहकारितेची चळवळ (४५१-४५५), पूर्ण स्वराज्याची मागणी (४५१-४५२), प्रांतांतून लोकतंत्रात्मक प्रधानमंडळांची स्थापना [इ. स. १९३७] (४५६-४५७), चले जावची चळवळ (४५७-४५८), खंडित भारत (४५९-६०). भारतीय गणतंत्र राज्याचें उद्घाटन इ. स. १९५० (४६२).

७. सामाजिक आणि धार्मिक चळवळी—(भाग ४२), सती (३६४-३६५), विधवा पुनर्विवाह (४७०-४७१), अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न (४७१-७२, ७६), परदेशी मिशनऱ्यांच्या चळवळी (३६७), ब्राह्मोसमाज (४६४-४६५), प्रार्थना समाज (४६५-६६), थिऑसफी (४६७), आर्य समाज (४६६-४६७), रामकृष्ण मिशन (४६७-४६८).

८. या कालखंडांतील लोकजीवन—शिक्षण (४७७-४७८), कला (४७६-४८०), वाङ्मय (४७८-४७९), चालीरीति (४७५, ४७६, ४७९).

टीप :—(१) यांत उल्लेखलेल्या जागतिक घडामोडींकडे त्या काळांतील भारतीय इतिहासाची पार्श्वभूमि म्हणून पहावें.

(२) इ. स. १९१८-५० या अगदीं अलीकडील कालखंडांतील मुख्य घटनांची सर्व सामान्य माहिती विद्यार्थ्यांनीं अभ्यासावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवडक वाचनीय ग्रंथ

Civilization of Ancient India	R. C. Dutt
Ancient India Since Alexander's Campaign	V. A. Smith
Oxford History of India	V. A. Smith
Cambridge History of India	Rapson
History of Aryan Rule in India	Havell
Prehistoric Ancient and Hindu India	R. D. Banerji
History and Culture of the Indian People	
Vol.I. Vedic Age Vol.II Age of Imperial Unity	*Editor* R. C. Majumdar
Glimpses of World History	Jawaharlal Nehru
Foundations of Indian Civics	S. V. Puntambekar
A Survey of Indian History	K. M. Panikkar
Advanced History of India	Majumdar, Dutt and Raichaudhari

यांपैकी हॅवेल, बानर्जी व पणिक्कर यांचे ग्रंथ विशेष वाचनीय आहेत. हॅवेलचा दृष्टिकोन, बानर्जींचें संशोधन व पणिक्करांचें समालोचन वाखाणण्यासारखें आहे.

महाभारताचा उपसंहार	चिं. वि. वैद्य
मध्ययुगीन भारत भाग १, २ व ३	चिं. वि. वैद्य
कौटिलीय अर्थशास्त्र (मराठी भाषांतर)	करंदीकर व हिवरगांवकर
भारतीय चित्रकला	बा. मा. दाभाडे
राजपूत संस्कृति	ह. वा. देशपांडे
राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास	ह. वा. देशपांडे
अजंठा	बाळासाहेब पंत
प्राचीन भारतीय विद्यापीठें	ना. गो. तवकर
इतिहास कसा शिकवावा	शं. दा. चितळे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Mediaeval India	by Lanepoole
History of India	by Taylor
मुसलमानी रियासत भाग १ व २	श्री. गो. स. सरदेसाई
Babar	by Dr. Rushbrook Williams
Sher Shah	by Qanungo
Akbar	by V. A. Smith
Aurangzeb	by Prof. J. Sarkar
Later Moguls Vol. I & II	by Irvine and Sarkar
मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ ते २१	कै. वि. का. राजवाडे
मराठी रियासत भाग १ ला	श्री. गो. स. सरदेसाई
मध्यविभाग भाग १, २, ३ व ४	,, ,,
उत्तरविभाग भाग १ व २	,, ,,
ब्रिटिश रियासत भाग १ ला	श्री. गो. स. सरदेसाई
British Dominions in India	by L[illegible]
History of India	by Marshman
शिवचरित्र निबंधावलि	शिवचरित्र कार्यालय
शिवाजी निबंधावलि भाग १ व २	,, ,,
Shivaji	by Prof. Sarkar
,,	by Dr. Balkrishna
History of the Marathas	by Grant Duff
ऐतिहासिक लेखसंग्रह १ ते १२	कै. वा. वा. खरे
मराठे व इंग्रज	कै. न. चिं. केळकर
Making in of Modern India	Prop. S. R. Sharma
Rise of British Power in India	by P. Robert
Rise of Christian Power in India	by Major B. D. Basu
Books of Confessions	by Torrens
महाराष्ट्र सांवत्सरिक	प्रा. श्री. म. माटे
Short History of the World	by H. G. Wells
हिंदुस्थानचा साधनरूप इतिहास	चितळे–ओतुरकर
जगाचा इतिहास	रा. ना. नातु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारताचा सांस्कृतिक इतिहास

↓

स्वतंत्र भारताच्या तरुण पिढीस समर्पण

—लेखक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाची प्रगति. [स्थूल आलेख]

इ. सन १८५५ ते १९५०



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आलेखाचें स्पष्टीकरण

जनतेचें आंदोलन

१८५७ गेलेलें राज्य मिळविण्याचा अयशस्वी यत्न.
१८७६ दुष्काळामुळें दंगे.
१८७९ वासुदेव बळवंत फडके यांचें बंड.
१८८२ इल्बर्ट बिलाविरुद्ध चळवळ.
१८८५ राष्ट्रीय सभेची स्थापना.
१८९२ विलायतेंत हिंदी गाऱ्हाण्यांची वकिली.
१८९६ रँडचा खून.
१९०४ स्वदेशी, बहिष्कार, इत्यादि चळवळींचा जोर.
१९०६ 'स्वराज्य' चा पुरस्कार.
१९१० प्रेस अॅक्ट.
१९१६ होमरूलची चळवळ.
१९२० असहकाराची चळवळ.
१९२७ सायमन कमिशनवर बहिष्कार.
१९३० कायदेभंगाची पहिली मोहीम.
१९३२ कायदेभंगाची दुसरी मोहीम.
१९४२ चलेजावचें आन्दोलन.
१९४२–४५ नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें स्वातंत्र्ययुद्ध.
१९४७ **स्वातंत्र्यप्राप्ति.**

सरकारी घटनात्मक कायदे

१८६१ कायदेमंडळांत बिनसरकारी सभासद.
१८९२ कायदेमंडळांत लोकनियुक्तांची अप्रत्यक्ष व अनौपचारिक निवड.
१९०९ प्रांतिक कायदेमंडळांत बिनसरकारी सभासदांचें बहुमत. जातवार मतदार संघ.
१९१७ द्विदल राज्यपद्धतीचा प्रयोग. कायदेमंडळांतून लोकनियुक्तांचें बहुमत.
१९३५ संयुक्त राज्यघटना : प्रांतिक स्वायत्तता.
१९४७ हिंदी स्वातंत्र्याचा पार्लमेंटांत कायदा, देशाची फाळणी.
१९५० **भारत सार्वभौम लोकसत्ताक गणराज्य.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारताचा
सांस्कृतिक इतिहास

उपोद्घात

सांस्कृतिक इतिहासाचें स्वरूप व प्रयोजन

१. **व्याख्या** :—इतिहास हा शब्द इति + ह + आस या तीन संस्कृत शब्दांचा बनलेला आहे. 'इति' म्हणजे असें, 'ह' ला कांहीं विशेष अर्थ नाहीं, 'आस' हा अस् धातूचा भूतकाळ, हयाचा अर्थ 'झालें'; अर्थात् इतिहास म्हणजे गतकालची हकीकत किंवा मानवी जीवनाची कथा. यांतच आपल्या पूर्वजांच्या लहानथोर कृत्यांचें वर्णन येतें. आपले पूर्वज कसे होते व त्यांनीं कोणकोणते पराक्रम केले हें जाणण्याची प्रत्येकास स्वाभाविक इच्छा असते. पूर्वजांच्या पराक्रमाचें स्मरण हें प्रत्येक मनुष्यास स्फूर्तिदायक होतें; हें लक्षांत घेऊन एका ग्रंथकारानें लिहिलें आहे कीं, "ज्या राष्ट्रास गतकाल नाहीं त्याचा भविष्यकालीं उदय होण्याची आशाच नको." मात्र हें वर्णन शक्य तितकें बिनचूक पाहिजे. त्यांत अत्युक्ति किंवा अल्पोक्ति हयांपैकीं एकही दोष बिलकुल असतां कामा नये. जेथें प्रत्यक्ष हकीकत निःसंदेह पुराव्यानिशीं मिळूं शकते, तेथें काल्पनिक वर्णनास थारा देतां कामा नये. हया नियमास कमीअधिक सोडून लिहिलेला इतिहास तितक्या प्रमाणांत इतिहास म्हणून न राहतां ऐतिहासिक कादंबरींत जमा होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्याखेरीज आपण आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं, वर्तमानकाळांत घडत असणाऱ्या गोष्टी ह्या एकदम आकाशांतून पडल्या-प्रमाणें घडत नाहींत. अनेक वर्षें, किंबहुना अनेक शतकें, त्यांचा बनाव बनत असतो. आजचा हिंदु समाजच घ्या. त्यांतील वर्णभेद, चालीरीति, ग्रामसंस्था, कुटुंबव्यवस्था, मनोभूमिका हीं सर्व गेल्या अनेक शतकांच्या स्थित्यंतरांतून आजच्या स्थितिप्रत प्राप्त झालेलीं आहेत. त्यासंबंधींचें योग्य ज्ञान व त्यांतील दोषांचें बिनचूक निदान होण्याला भूतकालीन गोष्टींचें सूक्ष्म पृथक्करण करणें अवश्य आहे. म्हणून इतिहासांत गतगोष्टींचें वर्णन देतांना तें केवळ मनोरंजक किंवा स्फूर्तिदायक असून भागणार नाहीं. त्यांत गुणदोष-विवेचनात्मक भागही आला पाहिजे व निरनिराळ्या कालांतील गोष्टींची घडण कशी घडत गेली हेंही त्यांत सांगितलें पाहिजे. अशा रीतीनें केलेलें गत-कालाचें यथातथ्य वर्णन हें भविष्यकालांतही अनेक प्रकारांनीं मार्गदर्शक होऊं शकेल. कारण गतगोष्टींचें सिंहावलोकन आणि आपल्या व इतरांच्या अनुभवावरून शहाणें होणें हें फक्त मनुष्यालाच शक्य आहे. पण त्यासाठीं इतिहासांतील गतगोष्टींचें जें वर्णन हवें तें: (१) बिनचूक, (२) मनोरंजक, (३) स्फूर्तिदायक, (४) गुणदोषविवेचनात्मक, व (५) विकासविवेचनात्मक असें असलें पाहिजे.

२. संस्कृति :—प्रस्तुत पुस्तकास 'भारताचा सांस्कृतिक इतिहास' हें नांव आहे. ह्यांतील 'सांस्कृतिक' शब्दाचा अर्थ लक्षांत घेणें जरूर आहे. पूर्वी इतिहास हा मुख्यत: राजे लोकांच्या लढाया, त्यांनीं केलेले तह व सुधारणा यांनीं भरलेला असे. पण हा केवळ राजकीय इतिहास होय. इतिहास हा लोकांच्या सामाजिक स्थितीचा, त्यांनीं स्थापन केलेल्या संस्थांचा, धर्माचा, त्यांच्या साहित्य, स्थापत्य, कला इत्यादींचा असा सर्वांगीण असला पाहिजे. केवळ राजकीय भागावरच अवास्तव भर न देतां समाजाच्या सर्वांगीण जीवनाचें समालोचन करणारा, त्यांत होणारीं स्थित्यंतरें उकलून दाख-विणारा—अशा इतिहासास सांस्कृतिक इतिहास म्हणावें. संस्कृति शब्दाची व्याख्या करणें बरेंच अवघड आहे. परंतु पिढ्यान् पिढ्यांच्या ज्ञानाचे व अनु-भवाचे मनावर झालेले संस्कार अशी संस्कृति या शब्दाची स्थूल व्याख्या करतां येईल. संस्कृतीस प्रादेशिक अधिष्ठान असतें. संस्कृति व सुधारणा यांत फरक आहे. निसर्गावरील वाढतें प्रभुत्व, बुद्धीचा विविध बाजूंनीं होणारा विकास व तद्द्वारां प्राप्त झालेलें कौशल्य यांच्यामुळें मनुष्यांत सुधारणा होते; परंतु तेवढ्यानें तो सुसंस्कृत होतोच असें नाहीं. परंतु या सर्वांचा मनावर परि-णाम होऊन स्वातंत्र्याची ओढ, व्यक्तिमत्वाबद्दल आदर, अंतिम हिताहिता-बद्दल विचार करण्याची पात्रता व परहितासाठीं त्याग करून त्यांत आनंद

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानण्याची तयारी ही ज्या समाजांत अधिकाधिक उत्पन्न होईल तो समाज सुसंस्कृत झाला असें समजावें. नित्याच्या व्यवहारांत सुधारणा व संस्कृति यांत हा वर सांगितलेला भेद नेहमींच काळजीपूर्वक पाळला जातो असें नाहीं. म्हणून सांस्कृतिक इतिहासांत सुधारणा व संस्कृति या उभयतांच्या प्रगतीचा अंतर्भाव करण्यास हरकत नाहीं.

३. सांस्कृतिक इतिहासाचें प्रयोजन :—सांस्कृतिक इतिहासांत समाजाच्या जीवनाचें संपूर्ण चित्र पहावयास सांपडतें. नुकताच इंग्रजी अंमलाचा शेवट झाला. दीडशें वर्षांच्या गुलामगिरीचें नष्टचर्य संपलें. आपण आपल्या समाजाची नवी घडी बसविण्यास सिद्ध झालों. 'आपल्या इतिहासांतील एक कालखंड संपला व लवकरच आपण नव्या युगास सुरुवात करूं' असे अर्थपूर्ण उद्गार भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं घटना समितीच्या सुरुवातीस काढले. ही नव्या युगांतील पुनर्घटना करणारास भारताच्या गतकालीन सांस्कृतिक इतिहासांत कांहीं उपयुक्त साधनें सांपडतील. भारतीय इतिहासाची परंपरा उणीपुरी पांच हजार वर्षांची आहे. खुद्द मानवजातीचा ज्ञात इतिहासही याहून फारसा प्राचीन नाहीं. या प्रदीर्घ कालांतील भारतीय जीवनाचे विशेष लक्षांत घेणारास या रचनात्मक कार्यास आवश्यक असें कांहीं साहित्य लाभेल व त्यास गतेतिहासांतील खांचखळग्यांचेंही ज्ञान होईल. इतिहासानें स्वभाव बनतो व बनत जातो. देश म्हणजे नुसता पृथ्वीचा एक तुकडा नव्हे किंवा अकस्मात् एकत्र आलेल्या मानवांचा समूह नव्हे. भारतीय संस्कृतीच्या ज्ञानानें एकमेकांस आपलेपणाची ओळख पटेल. त्याचबरोबर आपणांस जागतिक घडामोडींचें तुलनात्मक ज्ञानही झाल्यास भावी विश्वरचनेंत आपलें कार्य कोणतें व तें करण्यास आपण कितपत समर्थ आहों हें लक्षांत येईल.

प्रश्न

१. इतिहास कां शिकावा ? २. सांस्कृतिक इतिहास म्हणजे काय ?

अभ्यास

'आपल्या इतिहासांतील एक कालखंड संपला व लवकरच आपण नवयुगास सुरुवात करूं' याचा अर्थ शिक्षकांकडून समजून घ्या. (वाचा :—हिंदुस्थानचा साधनरूप इतिहास, पृ. ३५७)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावनाखंड : भाग १ ला

मानवाचा उदय

१. प्रारंभ :—इतिहास म्हणजे गतगोष्टींचें वर्णन हें मागें सांगितलें आहे. या गतगोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठीं कालाच्या धाग्याला धरून कल्पनेच्या साह्यानें जातां येईल तितकें मागें जाऊन तेथून इतिहास-कथनास प्रारंभ केला तर विश्वाच्या विशालत्वांत व कालाच्या अनंतत्वांत आपलें सापेक्ष स्थान कळून येईल. पण त्यासाठीं खगोलशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र अशा शास्त्रांची आपणांस मदत घ्यावी लागेल. कारण इतक्या पूर्वकालांत शब्दगत पुरावा उपलब्ध असणें शक्य नाहीं. अशा स्थितींत आकाशांतील तेजोगोलांच्या हालचाली, उत्खननांत आढळलेले भूगर्भांतील थर, व प्राण्यांच्या हाडांचे सांगाडे यांच्या साह्यानें गतकालाच्या घडणीसंबंधानें अनुमानें बांधावीं लागतात. एकंदर कालाचे इतिहासकाल व इतिहासपूर्वकाल असे दोन भाग केलें तर इतिहासकालास शब्दगत पुराव्याच्या उपलब्धीपासून प्रारंभ होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

२. जीवाची उत्पत्ति :—विश्वाच्या उत्पत्तीपासून हिंदुस्थानच्या इतिहासांच्या प्रारंभापर्यंतची इतिहासपूर्वकालांतील अद्‌भुतरम्य हकीकत अभ्यासकांसही अस्पष्टपणेंच जुळवितां येते. तिचा सारांश असा कीं, फार प्राचीन काळीं म्हणजे सुमारें २०० कोटी वर्षांपूर्वी सूर्याच्या परिभ्रमणांत त्याचा एक अगदीं लहानसा तुकडा वेगळा झाला तोच पृथ्वी होय. या पृथ्वीचा व्यास स्थूल मानानें ८,००० मैलांचा आहे. सूर्याचा व्यास ८ लक्ष ६६ हजार मैलांचा असून तो पृथ्वीपासून ९३० लक्ष मैल दूर आहे. सूर्य व पृथ्वी यांच्या आकाराचें व त्यांच्यामधील अंतराचें परस्पर प्रमाण असें कीं, पृथ्वीचा व्यास १ इंचाचा धरला तर सूर्याचा ९ फूट धरावा लागेल व याच प्रमाणांत सूर्य पृथ्वीपासून सुमारें ३२३ यार्ड दूर आहे असें म्हणतां येईल. पृथ्वी सूर्यापासून अलग झाल्यावर पहिल्या १६० ते १७० कोटी वर्षांत अतिउष्णतेमुळें पृथ्वीवर जिवाची उत्पत्ति होऊं शकली नाहीं. या ‘अचेतन’ कालांत पृथ्वी हलके हलके थंड होत गेल्यावर, सूर्यप्रकाशानें उबलेल्या पाणथळ सावलीच्या जागेंत जिवाची उत्पत्ति झाली. हा सचेतन युगाचा प्रारंभींचा सुळसुळीत, लिबलिबीत, तकतकीत, पातळ पापुद्रा असलेला ‘आदिजीव’ सूक्ष्म आकाराचा असावा. तेव्हांपासून आजपर्यंतच्या ३० कोटी वर्षांत भिन्न भिन्न परिस्थितींत अनेक अवस्थान्तरें होत होत पृथ्वीवर लक्षावधि प्रकारचे प्राणी उत्क्रान्त झाले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. उत्क्रान्ति :—शास्त्रज्ञ या सचेतन युगाचे तीन भाग पाडतात. पहिल्या भागांत वर सांगितलेल्या आदिजिवांचें अवस्थान्तर होऊन पाणी व जमीन यांच्या सीमाप्रदेशावर जगूं शकणारा भूजलजीवी प्राणी उत्क्रान्त झाला. याचा अर्थ पूर्वीचा आदिजीव नाहींसा झाला असें नव्हे; तर ज्याच्या उत्क्रान्तीला निसर्गाची मदत झाली त्याचें अवस्थान्तर झालें; बाकीचे प्रथमावस्थेंतच राहिले असा होय. यापुढील काळांत सरपटणारे व अंडीं घालणारे प्राणी यांची वाढ झाली. पाण्यांतील शेवाळांतून वनस्पतींची व वृक्षांची वाढ झाली व



जेथें पाणी आटल्यामुळें सलग पृष्ठभाग राहिला नाहीं तेथें टुणकन् उडी मारून दुसऱ्या जागीं जाणारे व उडणारे पक्षी यांचाही उदय झाला. अशा स्थितींतही
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लक्षावधि वर्षें गेल्यावर कणा व हाडें असणारे सस्तन जीव उत्क्रान्त झाले, व पृथ्वीस तिचें विद्यमान् स्वरूप प्राप्त झालें. हाच सचेतन युगाचा अलीकडचा काळ होय. पृथ्वीच्या पोटांत सांपडणाऱ्या सांगाड्यांना या अस्थिमय जिवाचा इतिहास तेवढा चुकतमाकत सांगतां येतो. याच्या पूर्वींचा वर सांगितलेला जीवविकास शास्त्रज्ञांनीं केवळ अनुमानानें तर्किलेला आहे.*

४. मानवाचा आद्य पूर्वज :—प्रारंभींचा सस्तन प्राणी हा मानवाचा आद्य पूर्वज. अगदीं प्रारंभीं तो कसा होता कोणीं सांगावें? सस्तन प्राण्याचीं मुख्य लक्षणें: त्यांनीं पिलांस अंगावर पाजणें, त्यांच्यावरील प्रेमासाठीं त्याग करण्याची तयारी, स्वसंरक्षणासाठीं जथा करून राहण्याची प्रवृत्ति, कांहीं शिकविलें तर तें ग्रहण करण्याची पात्रता, अनुकरण करण्याची प्रवृत्ति, कांहीं संकट आलें तर तें आपल्या सहकाऱ्यांना ओरडून, हुंगून, कान टवकारून कळविण्याची इच्छा हीं होत. या प्राणिवर्गांत माकडाची उत्पत्ति झाली. माणूस हें माकडाचें उत्क्रान्त स्वरूप होय असें डार्विन म्हणतो. माकडाला संस्कृतांत वा-नर शब्द आहे. यावरून वा-नर शब्द ज्या प्राचीन पूर्वजांनीं रचला त्यांनाही माकड व माणूस यांचें साम्य प्रतीत झालें असलें पाहिजे हें उघड आहे. पण एवढ्यावरून माकड व माणूस यांत लावलेली उत्क्रान्तीची सांखळी ही त्यांना परिचित होती असें अनुमान करणें मात्र घाईचें होईल. पशु व मनुष्य यांत मुख्य भेद मनुष्याला बोलतां येतें, विस्तव तयार करतां येतो, तो दोन पायांवर उभा राहतो हें कोणासही सांगतां येईल. पण मार्व्हिन याच्या मतें हे भेद मूल-

* अचेतन युगापासून सचेतन युगाच्या शेवटच्या भागास प्रारंभ होईपर्यंत पृथ्वीवर तीन वेळां प्रलयकाल झाले. अखेरचा चौथा प्रलयकाल ५०,००० वर्षांपूर्वीं आला; तेव्हां पृथ्वीवर मानवसदृश प्राणी विद्यमान् होता. एका प्रलयकालापासून दुसऱ्यापर्यंतच्या कालाला हिमयुग ही संज्ञा आहे. दर हिमयुगाच्या अखेरीस ध्रुवबिंदूजवळ गोठलेलें बर्फ वितळून त्याचे पर्वतप्राय लोंढे वाहत येऊन त्यांत सर्व साफ धुऊन गेलें. या प्रलयकालांत किती तरी जीवजिवाणू नाश पावले; पण कांहीं तसल्या प्रतिकूल परिस्थितींतही तगूं शकले. पृथ्वीवर आज दिसणारें पांच खंडांचें स्वरूप हें अनेक रूपान्तरांनीं तयार झालेलें आहे. म्हणतात कीं, एके काळीं हिमालयासारखा पर्वत समुद्रांत बुडालेला होता. हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकापासून ऑस्ट्रेलियापर्यंत सलग जमीन होती. दक्षिण अमेरिकेचा पूर्वेकडे पुढें आलेला अर्धवर्तुळाकार भूभाग हा आफ्रिकेच्या पश्चिमेला मध्यावर असलेल्या पोकळींत चिकटून राहिलेला होता. ग्रेट ब्रिटनसुद्धां बहुतेक सर्व उत्तर यूरोपचा भाग बर्फव्याप्त होता. या अद्भुतांतून आजचें दिसणारे भूतलाचें स्वरूप उत्क्रान्त झालें, त्यास आज ५०,००० वर वर्षें झालीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्राही नाहींत. कोणत्याही कारणानें असो, मनुष्याला हाताच्या पंजाची जशी मूठ वळवितां येते किंवा आंगठा कोणत्याही बोटासमोर आणतां येतो तसें इतर प्राण्यांना करतां येत नाहीं. या हस्तविकासांत पशूपासून मनुष्यांत जो झपाटयानें बदल होत गेला त्याचें बीज आहे असें म्हणतात.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर यूरोपांत भूगर्भशास्त्राकडे विद्वानांचें विशेष लक्ष वेधलें, व तन्निमित्त ठिकठिकाणीं उत्खनन सुरू झालें. तेव्हां पहिल्या थरांत अलीकडील भूतकालांत वावरणाऱ्या प्राण्यांचे सांगाडे सांपडले. उत्क्रान्तीचा दुवा जुळत गेला तसे आणखी अनेक ठिकाणीं उत्खनन सुरू झालें व त्याहून खालच्या थरांत दूरच्या भूतकालांत वावरणाऱ्या प्राण्यांचा शोध लागला. या सांगडयांच्या साहाय्यानें शास्त्रज्ञांनीं माकड व माणूस यांच्यामधील प्राण्यांची सांखळी लावण्याचा बराच यशस्वी यत्न केला आहे.

५. वानरापासून नरापर्यंत :—जर्मनींत हायडेल्बर्ग गांवीं उत्खनन चालू असतां एक सांगाडा आढळला, तो सुमारें पांच लक्ष वर्षांपूर्वी वावरणाऱ्या मानवसदृश माकडाचा असावा. असेच सांगाडे इंग्लंडमध्यें ससेक्स परगण्यांत व जावा बेटांतही आढळले. त्याचा जबडा रुंदट होता. त्यास माणसाप्रमाणें हनुवटीही नव्हती व तो चालतांना माकडाप्रमाणेंच चार पायांवर चाले. पण त्यास मानवसदृश म्हणण्याचें कारण असें कीं, त्याचा जबडा इतर माकडांच्या जबडयाहून बराच लहान होता. दगड हें त्याचें शस्त्र होय. अशाच प्रकारच्या उत्खननांत जर्मनींत नीअँडर्थल येथें व ऑस्ट्रेलियाच्या दक्षिणेस टॅस्मेनिया येथें जे सांगाडे सांपडले ते शास्त्रज्ञांच्या मतें ६०,००० वर्षांपूर्वी वावरणाऱ्या अधिक उत्क्रान्त कोटींतील मानवसदृश प्राण्यांचे असावेत. या नीअँडर्थल प्राण्याचें डोकें मोठें होतें, उंची सरासरी पांच फूट तीन इंच

हायडेल्बर्ग प्राणी — नीअँडर्थल प्राणी — क्रोमॅग्नॉन प्राणी : आद्य मानव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होती, जबडा मनुष्याच्या इतका लहान नव्हे, पण हायडेलबर्ग प्राण्याच्या जबड्या-एवढाही नव्हे असा मध्यम होता. त्यास उभें राहतां येत नसावें व त्यानें काढलेल्या आवाजास शब्दाचें स्वरूपही प्राप्त झालेलें नसावें. त्यास विस्तव तयार करतां येत नव्हता; पण विस्तवाचा उपयोग मात्र माहीत होता. लांबुळका दगड पाहून तो तें अस्त्र म्हणून वापरी.



नीअँडर्थल कुटुंब

नीअँडर्थलच्या पुढें मानवाशीं अधिक साम्य असणारा दुवा फ्रान्समधील क्रोमॅग्नॉन गांवीं सांपडलेल्या अवशेषांवरून जुळविलेला आहे. याचा काळ ३०,००० वर्षांपासूनचा असावा.* या प्राण्यास उभें राहणें, मागें वळून पाहणें, हाताचा आंगठा फिरवून मूठ वळविणें, चित्रें काढणें, विस्तव पेटवणें, प्राणी मारून मांस भाजून खाणें, लांबुळका दगड न सांपडेल तर तो मुद्दाम तसा छिनून घेणें, इतकेंच नव्हे; तर फेंकून मारण्याजोगें अस्त्र—भाला—तयार करणें व तो वापरणें, येथपर्यंत त्याची मजल गेलेली होती. या क्रोमॅग्नॉन प्राण्याला आद्य मानव ही संज्ञा योग्य होईल.‡

*असेच अवशेष ग्रिमॅल्डी या गांवींही सांपडले. या दोहोंचा तुलनात्मक अभ्यास करून शास्त्रज्ञांनीं ते एकाच काळचे पण भिन्न वंशाचे असावेत असें ठरविलें आहे.

‡ नीअँडर्थल व क्रोमॅग्नॉन प्राणी ज्या प्रकाराचीं दगडाचीं हत्यारें वापरीत होते त्या प्रकारचीं हत्यारें हिंदुस्थानांतही मद्रासकडे बल्लारी कडप्पा या भागांत व मुंबईकडे कांदिवली विभागांत पुराणवस्तुसंशोधनखात्यामार्फत चाललेल्या उत्खननांत सांपडलीं आहेत. तीं मुंबईस प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम्‌मध्यें पाहावयास मिळतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



क्रमांक १. प्राचीन अश्मयुगांतील (पॅलिऑलिथिक) हत्यार
क्रमांक २. नूतन अश्मयुगांतील (निऑलिथिक) हत्यार
क्रमांक ३. ४. धातुयुगांतील हत्यारें

६. **समालोचन** :—अशा रीतीनें पृथ्वीच्या उत्पत्तीपासून आद्य मानवाच्या अवतारापर्यंत आपण जी मजल मारली तिचें पुढीलप्रमाणें स्थूल टिपण करतां येईल.

विश्व—(यांत पृथ्वी, चंद्र, सूर्य, तारे यांचा समावेश होतो.)
पृथ्वी—(काल २०० कोटी वर्षें.)
अचेतन काल—१७० कोटी वर्षें + **सचेतन काळ** ३० कोटी वर्षें.
सचेतन काल—

पहिलें हिमयुग	लिवलिवीत आदिजीव / भूजलजीवी प्राणी
दुसरें हिमयुग	सरपटणारे प्राणी, पक्षी व वनस्पति.
तिसरें हिमयुग	सस्तन अस्थिमय प्राणी : वानर हायडेल्बर्ग प्राणी. (काल ५ लक्ष वर्षें)
चौथें हिमयुग	नीअँडर्थल प्राणी (काल ६० हजार वर्षें) / क्रोमॅग्नॉन प्राणी (काल ३० हजार वर्षें)

(यांत गणलेल्या काळासंबंधीं बराच मतभेद आहे. लेखकांनीं मुख्यतः एच. जी. वेल्सकृत 'शॉर्ट हिस्ट्री ऑफ दि वर्ल्ड' या ग्रंथास प्रमाण मानलें आहे.)

७. **अश्मयुग** :—वर सांगितलेले हायडेल्बर्ग, नीअँडथल व क्रोमॅग्नॉन प्राणी मुख्यतः दगडाच्या शस्त्रांनींच आपले व्यवहार करीत असल्यामुळें ते ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काळांत वावरले त्यास शास्त्रज्ञ 'अश्मयुग' हें नांव देतात व त्या अश्मयुगाचे अतिप्राचीन, प्राचीन व अलीकडील असे तीन भाग करतात. इंग्रजींत या भागास एऑलिथिक, पॅलिऑलिथिक व निऑलिथिक अशीं नांवें आहेत. पैकीं हायडेल्बर्ग प्राणी एऑलिथिक युगांतील असून त्याच्या पुढले दोन नीॲंडर्थल व क्रोमॅग्नॉन हे पॅलिऑलिथिक युगांतील होत. निऑलिथिक म्हणजे नूतन अश्मयुगांत मनुष्यास प्रथम जनावरें पाळणें व नंतर जमीन नांगरणें हें माहीत झालें. शास्त्रज्ञांच्या मतें हा काल १५ ते २० हजार वर्षांपूर्वीचा होय. अवघ्या शंभर वर्षांपूर्वी टॅस्मेनिया बेटांत अशा प्रकारचे नूतन अश्मयुगीन मानव राहात असल्याचें आढळून आलें होतें.

८. **मनुष्याच्या तीन अवस्था** :—क्रोमॅग्नॉन प्राण्यास आपण 'आद्य मानव' असें म्हटलें आहे. हा प्रारंभीं अगदीं 'रानटी' अवस्थेंत भटकत राहिला. रानावनांतून हिंडणें, कंदमुळें भक्षण करणें, दगडानें, हाडकानें किंवा लांकडानें मारतां येण्याजोग्या प्राण्यांचा वध करून त्यांवर निर्वाह करणें हेंच त्याचें जीवन. यापुढील पायरी म्हणजे 'पशुपालनावस्था' होय. ह्या अवस्थेंत मनुष्यास गाय, म्हैस, बैल इत्यादि पाळण्याजोग्या पशूंचा उपयोग माहीत झाला. तरी या अवस्थेंत मनुष्यें घरें बांधून स्थिर रहात नसत. गाईगुरांचीं खिल्लारें बरोबर बाळगून ते वारंवार स्थलान्तर करीत असत. ह्याच्या पुढच्या अवस्थेंत मनुष्यें एके जागीं राहूं लागलीं. जवळ सुपीकशी जमीन पाहून व बाजूला दुथडी वाहणारी नदी पाहून लोक घरें बांधूं लागले व जमीन नांगरूं लागले ही 'स्थायिक' अवस्था होय. सर्वच मानववंश ह्या अवस्थांतून एकदम पालटत गेले असें नव्हे. साधनांच्या अनुकूलतेनुरूप निरनिराळ्या जमातींची कमीअधिक प्रगति झाली.

९. **धर्मकल्पनेचा उदय** :—आद्य मानव हा रानटी अवस्थेंतून स्थायिक अवस्थेपर्यंत कसा पोहोंचला याचें वर दिलेलें हें चित्र फारच त्रोटक आहे. भाषेचा उदय, मृत्यूची जाणीव, धर्माची कल्पना, कार्यकारणभावाचा संबंध हे सर्व मानवी व्यवहारांत कसे आले यासंबंधीं शास्त्रज्ञांनीं मोठें मनोरंजक दिग्दर्शन केलें आहे. आज मनुष्याला झोंपेंत स्वप्न पडतें तशीं तीं आद्य मानवास पडत असतीलच. आद्य मानवास मृत्यु व झोंप यांतील फरक लवकर उमगून आला नसेल. जागेपणीं डोळ्याला न दिसणारा प्राणी, त्याचाच मृत आजोबा किंवा पणजोबा, स्वप्नांत मात्र दिसतो, कांहीं तरी पुटपुटतो, पण तें कळत नाहीं. हें ध्यानांत आल्यावर त्या पूर्वजाबद्दल आद्य मानवाच्या मनांत आदरयुक्त भीति उत्पन्न झाली. गडगडणारे मेघ, लकाकणाऱ्या विजा, तळपणारा सूर्य, मुसळधार वृष्टि, अंधारी रात्र, असंख्य तारे या सर्वांकडे पाहण्याची त्याची दृष्टि भावनापूर्ण व भयचकित अशी असली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिजे. मानवी कर्तृत्वाच्या प्रारंभकालीं निसर्गपूजा व पितृपूजा या स्वरूपांत धर्म प्रकट झाला तो असा. ज्याच्याबद्दल भीति वाटते त्याला त्यागपूर्वक प्रसन्न करण्याची बुद्धि असते. आजारीपणासारखीं संकटें अदृष्टाच्या कोपामुळें येतात, असें वाटून कांहीं त्यागानें व समर्पणानें अदृष्टास संतुष्ट करावें, असें मनुष्यास वाटूं लागलें. त्यागांतून यागाचा जन्म झाला, यागाचें तंत्र बनलें व त्या तंत्राची माहिती असणारे ते पुरोहित व उपाध्याय बनले. अनिष्ट ग्रहाची ब्राह्मणांकडून शांति करून घेण्याच्या चालीचा असा कांहीं उगम असावा असें वाटतें. पुरोहित हाच त्या काळचा रोग बरे करणारा वैद्य व निसर्गाचे प्रकोप आपल्या बुद्धीनें उकलून सांगणारा शास्त्रज्ञ होता.

१०. **प्रगतीचीं पहिलीं पावलें:**—माणसानें प्रथम लेखनाचा प्रयत्न केला तो चित्रें काढून. या चित्र-लिपींतून संकेत लिपि व संकेत लिपींतून ध्वनि-लेखन व त्यांतूनच पुढें सुटे वर्ण किंवा अक्षरें अशी वाढ होत गेली. माणसानें अंतर मोजण्यासाठीं प्रथम आपल्या हाताचा उपयोग केला. वस्तु मोजण्या-साठीं बोटांचा किंवा खड्यांचा उपयोग केला. दूरचें अंतर मोजण्यास आपल्या आरोळीचा पल्ला (क्रुश्–ओरडणें, यावरून 'कोस') कोठवर जातो तें पाहिलें, व नंतर हाताचें व कोसाचें कोष्टक बसविलें. चंद्राच्या नियमित वृद्धिक्षया-वरून चांद्रमासांचा त्यास प्रत्यय आला व ठराविक येणाऱ्या उन्हाळ्या-पावसाळ्यावरून ऋतूंचें ज्ञान झालें. डोंगरांतील गुहा पाहून त्या धर्तीवर दगडालांकडाच्या साह्यानें रचना केली तेंच त्याचें घर झालें. लांकडाचा गोल ओंडका कापीत कापीत लहान केला, त्याचें चाक झालें. पावसाळ्यानंतर ठिकठिकाणीं निरनिराळीं रोपें व कणसें उगवलेलीं पाहून माणसानें प्रथम तीं कापून, कच्चीं किंवा भाजून खाण्यास सुरुवात केली. कालान्तरानें पडलेल्या धान्यकणाचा व उगवलेल्या कणसाचा संबंध ध्यानांत आला. पावसानें तो सहज वाहून जाऊं नये म्हणून त्यास पुरून ठेवलें. पुरण्यासाठीं उकरावें लागलें. उकरण्यासाठीं कुदळीप्रमाणें बांक असलेल्या काठीचा प्रथम उपयोग केला; व त्यावरून सुचतां सुचतां नांगराची कल्पना सुचली.

आद्य मानवानें अशा रीतीनें जे निसर्गावर प्रथम प्रथम विजय मिळविले त्यांचें ज्ञान करून घेण्यासाठीं शास्त्रज्ञांनीं असे जे अनेक तर्क लढविले आहेत ते कोठवर सांगावे? पृथ्वीच्या कानाकोपऱ्यांत लपून राहिलेल्या रानटी लोकांच्या चालीरीतींचें निरीक्षण व संशोधन करतां करतां यांतले कांहीं तर्क खरे ठरतील तर कांहीं खोटे ठरतील व जगाच्या इतिहासाचें पहिलें पान संशोधनानें दुरुस्त करून फिरून लिहावें लागेल. जें घडलें तें घडलेंच; पण तें कसें घडलें यासंबंधीं उपलब्ध पुराव्यावरून जेथें तर्क करावा लागतो तेथें मतभेदास सुरुवात होते व नवीन पुराव्यामुळें जुन्या पुराव्यावर आधा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रलेलीं विधानें कोलमडून पडतात. इतिहास बदलतो असें जें म्हणतात, तें या अर्थानें हें लक्षांत ठेवावयास पाहिजे. असो.

११. **धातूंचा उपयोग** :—नूतन अश्मयुगांत मनुष्य स्थायिक अवस्थेंत येऊन पोहोंचल्यावर तेथून त्याच्या प्रगतीचीं पावलें झपाट्यानें पुढें पडूं लागलीं. भाषेचा उदय झाल्यामुळें माणसाला आपले विचार एकमेकांस कळवितां आले, लेखनकलेमुळें त्याचा पुढील पिढ्यांना उपयोग होऊं लागला व मनुष्य एकमेकांच्या अनुभवानें व मागील अनुभवानें अधिकाधिक आक्रमणशील व यत्नवादी होत चालला. कळूं लागलें तसें त्यास अधिकाधिक कळून घेण्याची हौस उत्पन्न झाली, व घडूं लागलें तसें त्यास अधिकाधिक घडवून आणण्याची आकांक्षा उत्पन्न झाली. नूतन अश्मयुगाचीं दहा हजार वर्षें गेल्यावर मनुष्यास धातूंचा उपयोग माहीत झाला. पहिली माहीत झालेली धातु तांबें, दुसरी ब्राँझ व तिसरी लोखंड ही होय. ब्राँझ ही धातु तांबें व कथील यांच्या मिश्रणानें मनुष्यानें बनविली. दगडापेक्षां धातूला हवा तो आकार लवकर देतां येतो, कारण ती वांकवितां येते. लोखंडापेक्षां तांबें हें जमिनींत अधिक शुद्ध स्थितींत व फार प्रयास न करतां वापरण्याजोग्या स्थितींत सांपडतें, म्हणून मनुष्यानें त्याचा प्रथम उपयोग केला असावा; पण तांबें मऊ व कमी टिकाऊ असतें. तांबें व कथील यांच्या मिश्रणानें बनलेली ब्राँझ धातु ही अधिक टणक असते व लोखंड हें सर्वांत खणखणीत व टिकाऊ असतें; म्हणून त्याचा शोध लागल्यावर मनुष्य तेंच शुद्ध करून घेऊन अधिकाधिक वापरूं लागला. ब्राँझ धातूचा उपयोग मनुष्यास पांच हजार वर्षांपूर्वी माहीत झाला असावा व लोखंडाचा उपयोग माहीत होऊन ३००० वर्षें झालीं असावीं असें अभ्यासकांचें मत आहे. इसवी सनापूर्वीच्या सहाशें वर्षांत प्राचीन ग्रीस भरभराटींत असतां तेथें या मिश्र धातूचा बराच उपयोग केलेला आढळतो. इसवी सनाच्या प्रारंभीं बायबलची रचना झाली, त्यांत प्रारंभींच्या भागांत तांबें, ब्राँझ यांचे ४४ उल्लेख आहेत, पण लोखंडाचा उल्लेख फक्त १३ ठिकाणीं आहे. यावरून बायबलच्या रचना-कालांत लोखंड हें दुसऱ्या दोन धातूंपेक्षां अधिक दुर्मिळ असावें असा तर्क सुचतो. निरनिराळ्या धातूंच्या उपयोगावरून अश्मयुगानंतरच्या कालाचे ताम्रयुग, ब्राँझयुग व लोहयुग असे भाग पाडले जातात.*

---

*लोहयुग ३००० वर्षांपूर्वीं म्हणजे इसवी सनापूर्वी १००० वर्षें सुरू झालें असावें असें वर सुचविलें आहे. परंतु हिंदुस्थानांत द्राविडांना लोखंडाचा उपयोग आर्यांच्या आगमनापूर्वीच म्हणजे इ. स. पू. निदान २००० वर्षें माहीत होता असें दिसतें (प्रस्तावना खंड भाग ३ कलम ८ पहा). तसेंच ऋग्वेदांतही लोखंडाचा (संस्कृत शब्द 'अयस') उल्लेख आहे. यावरून वर दिलेले सर्व काळ अगदीं स्थूल मानानें घेतले पाहिजेत असें म्हणावें लागतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. मानववंशभेद :—आद्य मानवाच्या शोधाबरोबरच अभ्यासकास वंशभेदाचाही उगम सांपडला हें वर सांगितलेंच आहे (कलम ५ पहा.) मनुष्यांतील वंशभेदाइतकी वादग्रस्त व वाद-रणें माजविणारी गोष्ट क्वचितच असेल. वंशभेद हे जन्मजात, कीं परिस्थितीवरून उत्पन्न झाले ? मनुष्याचा मगदूर हा जन्मजात गुणावर अवलंबून आहे कीं परिस्थित्यनुरूप तो खुंटत किंवा वाढत गेला ? या विषयावर मनुष्य लिहूं-बोलूं लागला म्हणजे शास्त्रज्ञ-देखील पूर्वग्रह, संस्कार व अंगीं खिळलेल्या वृत्ती यांच्या छापेंतून सुटत नाहीं.



नीग्रो मंगोलियन आर्य

लिवलिवीत मांशापासून अस्थिमय माकडापर्यंत व चतुष्पाद हायडेल्बर्गपासून द्विपाद क्रोमॅग्नॉनपर्यंत झालेली वाढ उत्क्रान्तिनुरूप झाली असें मानणारा शास्त्रज्ञ काळ्या वर्णाचा, जाड ओंठाचा, राठ केंसांचा, रटरटीत अंग-ठेवणीचा पण बंदुकीच्या आवाजाला बुजणारा, आफ्रिकेंत आढळणारा नीग्रो पाहिल्यावर, त्याची स्वतःच्या गोऱ्या कातडीशीं, मऊ केंसांशीं, प्रमाणशीर बांध्याशीं, पातळ ओंठाशीं व मिळविलेल्या शहाणपणाशीं तुलना करून म्हणतो 'छे ! हा नीग्रो जन्मजातच मजपेक्षां भिन्न व माझ्याहून हलक्या प्रतीचा मनुष्य असला पाहिजे.' त्याच्या मतें नीग्रोपेक्षां पूर्व आशियांत आढळणारा गोबऱ्या गालाचा, बारीक डोळ्यांचा, बसक्या नाकाचा, बुटका, पीतवर्णी मंगोलियन हा अधिक श्रेष्ठ व त्या मंगोलियनाहून देखील शबलवर्णी, बांधेसूद, रेखीव व ठसठशीत अवयव असलेला सुमेरियन व द्रविडवंशी मनुष्य हा अधिक गुणवान होय. पण चार हजार वर्षांपूर्वी कॉकेशस पर्वताच्या पायथ्यापासून पश्चिमेस यूरोपांत व पूर्वेस हिंदुस्थानांत ऋग्वेदकालीं येऊन पोहोंचलेल्या श्वेतवर्णीय आर्यांची मात्र या कुणालाच सर यावयाची नाहीं ! या तुलनात्मक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोजमापणींत रक्तवर्णीय अमेरिकनांस परवां परवांपर्यंत स्थानच नव्हतें; पण अलीकडे त्याची माहिती मिळाल्यावर वंशशास्त्रज्ञ त्यास कृष्णवर्णीय नीग्रोपेक्षां वरचें किंवा त्याच्याशीं समान असें स्थान देऊं लागले आहेत. मनुष्याचे गुण हे जन्मजात असोत वा नसोत; पण वंशभेदावर बसविलेले व तथाकथित शास्त्रीय सिद्धान्तांनीं दृढ केलेले मानवी श्रेष्ठकनिष्ठपणाचे सिद्धान्त दोन कारणांमुळें लटपटूं लागले आहेत. एक तर जमातींच्या भ्रमन्तींत वंशावंशाचें एवढें बेमालूम मिश्रण झालें आहे कीं, शुद्ध आर्य किंवा द्रविड वंशाचा इसम आतां शोधूं गेल्यास सांपडणें कठिण झालें आहे. दुसरें असें कीं, हरएक जमातीस आतां आपल्या स्वतंत्र व्यक्तित्वाची एवढी जाणीव झाली आहे कीं, कोणतीही जमात दुसरीचें जन्मजात गुणश्रेष्ठत्व कबूल करून खालीं मान घालून दिवस काढील हें यापुढें संभवत नाहीं. जें एकास साधलें तें दुसऱ्यास साधलेंच पाहिजे हा विश्वास सर्वत्र उत्पन्न झाला आहे तो जमेस धरला पाहिजे. म्हणजे भविष्यकाळांतील जागतिक शांततावादी पुनर्घटना वंश-श्रेष्ठकनिष्ठतेपेक्षां मानवी मूलभूत ऐक्याच्या जाणिवेवर अधिक यशस्वी रीतीनें उभारतां येईल.

१३. **जमातींची भ्रमन्ती :**—भविष्यकाळांत कांहींही होवो, भूतकाळांत मनुष्याच्या जमाती आपल्या उगमस्थानीं चिकटून राहिल्याचें इतिहास सांगत नाहीं. एका भटक्या टोळीनें भक्ष्यशोधार्थ दरीडोंगरांतून मैदानी मुलुखांत यावें व नदी-समुद्राच्या किनाऱ्यांशीं नगरें वसवून सुखासीन बनलेल्या जमातीस पिटून काढावें असें इतिहासांत अनेकदां झालें. इंग्लंडच्या इतिहासांत रोमन लोकांनीं मूळच्या केल्ट लोकांवर मात केली व नंतर आलेल्या डॅनिश व अँग्लो सॅक्सनांपुढें केल्ट व रोमन लोकांस नमावें लागलें. हिंदुस्थानच्या इतिहासांत मूळच्या रानटी लोकांस द्राविडांपुढें हार खावी लागली, व द्राविडांस आर्यांना जागा करून द्यावी लागली. या सुखासीन आर्यांवर, व संमिश्र वर्णीयांवरही शक, हूण, मंगोलियन, मुसलमान यांनीं अनेक स्वाऱ्या केल्या. गेल्या हजार वर्षांत मात्र रानटी लोकांचा सुधारलेल्या सुखासीन स्थानिक लोकांवर हल्ला आला असें झालें नाहीं; पण तेवढ्यानें युद्ध थांबलें असें नाहीं. आतां सुखासीन सुधारलेले लोक आपापसांतच लढून नाश पावत आहेत. एवढ्यावरून भविष्यकाळांत सर्वनाश किंवा एखादा प्रलयकाळ जवळ येणार असें घाबरटपणानें भविष्य वर्तविण्याची जरुरी नाहीं. कदाचित् वेळींच डोळे उघडून मनुष्यास शांततेच्या पायावर जागतिक पुनर्घटना करण्याचीही बुद्धि होईल. कारण विधायक व विध्वंसक अशा उभयविध करामतींत आजच्या सुधारलेल्या मनुष्यानें रानटी मनुष्यास मागें टाकलें आहे.

* * * *

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथपर्यंत पृथ्वीच्या उत्पत्तीपासून जमातींच्या भ्रमन्तीपर्यंतच्या घडामोडींचें थोडक्यांत समालोचन केलें. असाच एक मानवांचा जथा इ. स. पूर्वी २००० वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत आला व त्यांनीं पंजाबांत सप्तसिंधूच्या कांठीं वसाहत केली. तेच आर्य होत. यांच्या आगमनाचे हिंदुस्थानावर चिरकालीन परिणाम झाले. म्हणून हिंदुस्थानच्या इतिहासास येथूनच प्रारंभ करण्याची पद्धत असे. परंतु आर्यांच्या पूर्वी हिंदुस्थानांत आलेल्या टोळ्या व त्यांनीं आर्यपूर्व हिंदुस्थानांत आणलेली मोहेंजोदरो संस्कृति यांचा प्राचीन भारतीय जीवनांतील महत्त्वाचा भाग नुकताच उपलब्ध झाला आहे. त्या सर्वांचें वर्णन पुढें प्रसंगोपात्त येईल.

प्रश्न

१. इतिहास बदलतो याचा अर्थ काय? २. लहानपणीं तुम्हांस देव, आकाश, तारे यांच्याबद्दल काय वाटत होतें तें आठवा. ३. मानवाचे वंश व त्यांचीं प्रमुख लक्षणें सांगा. ४. मनुष्यास घराची, चाकाची व नांगराची कल्पना कशी सुचली असावी?

अभ्यास

(१) वाचा—प्रा. माटे संपादित 'विज्ञानबोध' मधील लेख :— १. 'पृथ्वीच्या इतिहासावरील माहिती' लेखक : प्रा. केळकर व २. 'मानवशास्त्र' लेखक : डॉ. इरावती कर्वे. (२) मुंबईस प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममधील पुराणवस्तु-विभागांत ठेवलेलीं अश्म, ताम्र व लोह युगांतील आयुधें व उपकरणें पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावनाखंड : भाग २ रा

जग व हिंदुस्थान

१. सुपीक प्रदेशांतील वसाहती :—मागील भागांत पृथ्वीच्या उत्पत्तीपासून जमातीच्या भ्रमन्तीपर्यंतच्या घडामोडींचें थोडक्यांत समालोचन केलें. मनुष्य शेती करूं लागल्यावर एकेका प्रदेशांत मानवांचे जथे स्थायिक होऊं लागले. येथून मनुष्याच्या प्रादेशिक इतिहासास सुरुवात झाली. नदीसमुद्र-कांठच्या सुपीक प्रदेशांत शेती करणें सुलभ असल्यानें मनुष्याच्या पहिल्या पहिल्या वसाहती अशा प्रदेशांत सांपडतात. हेमिटिक वंशानें ईजिप्तमध्यें नाईल नदीचे कांठीं वसाहत केली. सेमिटिक व सुमेरियन वंशानें बाबिलोनियांत ग्रीस-युफ्रेटिसचे कांठीं तळ दिला. आर्यांनीं पंजाबांत सिंधूच्या खोऱ्यांत वास्तव्य केलें; व तुराणी वंश चीनांत होआंगहोच्या काठीं स्थिर झाला. या गोष्टीस कमी अधिक्र प्रमाणांत चार हजार वष होऊन गेलीं. आर्यलोकांची टोळी फक्त पंजाबाकडेच आली असें नाहीं. इ. स. पूर्वी सहाव्या व सातव्या शत-कांत इराणांत उदयास आलेले मीड व पारशी लोक हे आर्यच होते. त्यांच्यांत सायरस व दारियस हे मोठे पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांनीं पश्चिमेस भूमध्यसमुद्रापर्यंत राज्यविस्तार करून ग्रीकांचा पराभव केला. आर्य-लोकांची आणखी एक टोळी यूरोपांत गेली व तेथें तिच्या अनेक शाखा व उपशाखा निरनिराळ्या प्रदेशांत पसरल्या. सोळाव्या शतकाच्या अखेरीस प्रथम हिंदुस्थानांत आलेले इंग्रज लोक हे मूळ आर्य किंवा तत्सम यूरो-भारतीय वंशाचे होत असें मानववंशशास्त्रज्ञांचें मत आहे. या सर्वांचें मूळ वसतिस्थान कोठलें याबद्दल जाणत्या लोकांत मतभेद आहेत. कोणी त्यांचें वसतिस्थान उत्तरध्रुवानजीकच्या प्रदेशांत होतें असें मानतात, तर कोणी सर्वच मानव जातीचा प्रसार मध्यआशियांतील पामीरच्या डोंगरा-पासून, तर कोणी कॉकेशस पर्वताच्या पायथ्यापासून झाला असें म्हणतात. तें कसेंही असो. रानांत गुरें चरत असतां, तीं चरत चरत सर्व रानभर पांगतात तशी मानवजात निर्वाहाच्या साधनांच्या शोधांत सर्व जगभर पसरली व ठिकठिकाणचे सुपीक प्रदेश पाहून तेथें स्थायिक झाली. एके ठिकाणीं स्थिर झाल्यावर त्यांनीं तेथें राज्यें स्थापिलीं व क्वचित् राज्य-लोभानें शेजाऱ्यांवर आक्रमण केलें. त्यांत ज्या कुणास विजय मिळाला त्यांनीं आपल्या राज्याचें साम्राज्य बनविलें. कालांतरानें त्यांच्यांत फाटा-फूट होऊन तें मोडकळीस आलें. असा मानवाचा इतिहास उन्नति-अवनतीच्या हेलकाव्यांनीं भरलेला आहे. परंतु मनुष्याच्या अंगीं मागील अनुभवानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शहाणें होण्याची पात्रता असल्यानें या हेलकाव्यांतूनही त्याची प्रगतीच झालेली आहे. अशा उन्नति-अवनतींच्या हेलकाव्याची मीमांसा करणें व प्रगतीच्या पावलांचा शोध घेणें हें इतिहासाचें काम आहे. प्रस्तुत प्रकरणांत मानवी इतिहासाच्या प्रभातकालीं भारतीय आर्यांप्रमाणेंच इतरत्र वास्तव्य व पराक्रम करून राहणाऱ्या विविध मानवसमूहाचें त्रोटक समालोचन करावयाचें आहे.

प्रचंड मनोरे करणारे इजिप्तचे लोक

२. मिसर संस्कृति* :—आर्य लोक हिंदुस्थानांत येऊन स्थिर होण्यापूर्वी दीड-हजार वर्षें हेमिटिक वंशाचे लोक इजिप्तमध्यें नाईल नदीच्या कांठीं स्थिरावले. मेम्फिस ही त्यांची राजधानी होती. त्यांच्या राजास फारोह असें म्हणत. हे लोक मृताचा देह काळजीपूर्वक रक्षण करीत. मृतदेहावर कापडाचें वेष्टन घालावें, जंतुनाशक द्रव्यें पसरावीं व तें शव घट्ट काळजीपूर्वक गुंडाळून ठेवावें हें एक आपलें परमकर्तव्य आहे असें त्यांना वाटत असावें.§ सामान्य लोक नुसतें शवाचें रक्षण करीत, पण राजेलोक एवढ्यावर संतुष्ट नसत. ते लोक त्रिशंकु आकाराचे प्रचंड मनोरे बांधून त्यांत शव सुरक्षित ठवीत. त्यावर बाहेरच्या भिंतीवर अनेक चित्रें काढीत. एका चित्रांत कोणी देवदूत हातांत तराजू घेऊन एका तागडींत पांखराचें पीस टाकून त्याच्या साह्यानें मानवाच्या पापपुण्याचें मोजमाप करीत आहे असें दाखविलें आहे. पीस असलेलें पारडें वर गेलें व पापपुण्यसंचयाचें खालीं आलें तर समजावें कीं अजून पुरता पापक्षय झालेला नाहीं. मृत्यूनंतरही मानवाचें जीवन चालूच रहातें. त्याला प्रसंगीं अन्नपाणी, औषधें, धार्मिक पुस्तकें इतकेंच काय पण मनोरंजक गोष्टींचीं पुस्तकेंही लागतात, असा प्राचीन इजिप्शियन लोकांचा विश्वास होता.



इजिप्तमधील एका जुनाट थडग्यांतील मृत देह. भोंवतीं मृताच्या उपयोगासाठीं खाद्यपेयांनीं भरलेलीं भांडीं

*प्राचीन इजिप्त हा मिसर नांवानें प्रसिद्ध आहे.

§ अशा प्रकारच्या संरक्षित शवास इंग्रजींत 'ममी' असें म्हणतात. हैद्राबाद येथील पुराणवस्तुसंग्रहालयांत व इतरत्रही अशा प्रकारची ममी पहावयास मिळते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. मूर्तिमंत प्रचंडपणा :—हे मनोरे किती प्रचंड होते याची आज सहसा कल्पना येणार नाहीं. यांपैकीं एक ४८१ फूट उंच आहे व पायथ्यापैकीं एका बाजूची लांबी ७५५ फूट आहे. आजकालचें एखादें तिमजली घर फार तर ५० फूट उंचीचें असतें, यावरून ४८१ फूट म्हणजे किती उंच याची कांहींशी कल्पना येईल. या मनोऱ्यानें १३ एकर जमीन व्यापली आहे व तो बांधण्यास प्रत्येकी २½ टन वजनाचे २३ लक्ष दगड लागले. हा मनोरा पुरा करण्यासाठीं एक लक्ष माणसें २० वर्षें झटत होतीं असें म्हणतात. असा हा एकच मनोरा नाहीं. इजिप्तची संस्कृति म्हणजे मूर्तिमंत प्रचंडपणा होय; आणि त्यास बिनचूकपणाची जोड होती. तेथील इमारतींच्या तळचा चौरस मोजल्यास समोरच्या दोन बाजू अगदीं इंचन् इंच सारख्या भरतात. इतकें शास्त्रशुद्ध काम त्या वेळीं कसें करीत हें एक गूढ आश्चर्यच आहे. या मनोऱ्यांखेरीज नरमुखी सिंहाची एक प्रचंड शिलामूर्ति तेथें आहे. तिची लांबी १६० फूट व उंची ७० फूट असून डोक्यापासून नाकाच्या शेंडा-



इजिप्त येथील मनोरे व नरमुखी सिंह

पर्यंतची लांबी ३३ फूट व रुंदी १३ फूट आहे. मूर्तीचा विस्तार एवढा असूनही तत्कालीन कारागिरास तिच्या मुद्रेवर मर्दानीपणाचें तेज निर्माण करण्याचें कसब साधलें आहे. मेंफिसच्या दक्षिणेस असलेलें कणक येथील देवालयही असेंच प्रचंड आहे. त्यांतील सभागृहच ३३८ फूट लांब व १७८ फूट रुंद आहे. प्राचीन मानवाची ही प्रचंड कामगिरी कित्येक शतकें अज्ञातच राहिली होती. इ. स. १७९८ सालीं नेपोलियन इजिप्तच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वारीवर निघाला तेव्हां तेथील प्रचंड मनोरे पाहून तो थक्क झाला. सायंकाळीं पश्चिमेकडे तोंड करून त्या सूर्यास्ताच्या पार्श्वभूमीवर ते मनोरे पहात असतां नेपोलियन म्हणाला 'हे मनोरे मनोरम तर खरेच, पण त्यांच्या मागें क्षणोक्षणीं रंग पालटणारा सर्यास्ताचा देखावा त्याहूनही मनोरम व चिंतनीय आहे!' या नेपोलियनच्या स्वारींतील एका शिपायास नाईल नदीच्या मुखाजवळ एक शिलालेख आढळून आला. तो चित्रलिपींत लिहिलेला होता. कित्येक वर्षें तो कुणास वाचतां येईना. अखेरीस इ. स. १८२२ सालीं एका फ्रेंच संशोधकानें त्याचें गूढ जगास उकलून दाखविलें, तेव्हांपासून प्राचीन मिसरदेशच्या चित्रलिपींत असलेलें एक अज्ञात दालन खुलें झालें. इतक्या पूर्वीच्या काळांत कागद लोकांस माहीत नव्हता. तृणांकुरांनीं विणलेली एक लांबच लांब पट्टी असे. त्यावर टोंकदार काडीचा उपयोग करून तत्कालीन लेखन होत असे.

४. **मिसरचे राजे :**—प्राचीन मिसर संस्कृतीबद्दल पुष्कळच मनोरंजक माहिती उपलब्ध झाल्यानें पांच हजार वर्षांपूर्वीची मानवाच्या कर्तृत्वाची करामत कळून आली व इतिहासाचे पूर्वीचे सिद्धान्त पुनः तपासून घ्यावे लागले. या काळांत इजिप्त देशांत हटशेपसूट नांवाची राणी, थथमोस नांवाचा एक नेपोलियनसदृश पराक्रमी राजा, आमेनहॉटेप नांवाचा एक तत्त्व-चिंतन करणारा व परमेश्वर एकच आहे, देव अनेक नाहींत असें निर्धारानें सांगणारा राजा अशीं कर्तीं माणसें होऊन गेलीं. नंतरच्या काळांत इजिप्तवर असीरियन, पर्शियन, रोमन व अरबी लोकांच्या स्वाऱ्या झाल्या. एकोणिसाव्या शतकांत तो कांहीं काळ ब्रिटिश साम्राज्यांत आला व आतां तो स्वतंत्रतेच्या मार्गावर आहे. आज तेथील प्राचीन मिसर संस्कृतीचे अवशेष नष्टप्राय झाले आहेत. आजची इजिप्तची संस्कृति ही इस्लामी संस्कृति होय.

इष्टिका-लेखन करणारे बाबिलोनियन

५. **बाबिलोनियाचा राजा हम्मुरबी :**—इजिप्तशीं समकालीन व कदाचित् त्याहूनही प्राचीन अशी दुसरी एक संस्कृति पश्चिम आशियांत तैग्रिस व युफ्रेटिस नद्यांचे कांठीं उदय पावत होती. या दोन नद्यांच्या काठचा प्रदेश सुपीक व जमीन लोण्यासारखी मऊ आहे. त्याच्या विटा करून त्यावर तेथील लोक कोन लिपींत आपलें लेखन करीत. ∧ ∨ < > अशा प्रकारचे कोन एकत्र जोडून त्या चिन्हांतून तयार झालेल्या लिपीस कोन-लिपि असें म्हणतात. हे लोक सुमेरियन वंशाचे होत. स्थानपरत्वें संस्कृतींत आलेली भिन्नता वेगळी दाखविण्यासाठीं येथील संस्कृतीस बाबिलोनियन संस्कृति म्हणतात. या प्रदेशांत इ. स. पू. १९४८ ते इ. स. पू. १९०५ या काळांत हम्मुराबी नांवाचा एक मोठा कर्तबगार राजा होऊन गेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्य हें राजाच्या लहरीवर न चालतां कायद्यावर आधारलेलें असलें पाहिजे हें त्यास उमगलें. हे कायदे त्यास सूर्यापासून प्राप्त झाले असा तत्कालीन लोकांचा विश्वास होता (पृ. २६ पहा). त्या कायद्यांच्या आधारावर तो आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळीं ज्या सूचना पाठवी त्यांपैकीं कांहीं उपलब्ध आहेत. युफ्रेटिसवर पूल तयार करावा, कालवा खोदून पाणी पाटानें वाहून कृषि सजल करावी, वस्तूंचे भाव नियंत्रित करावे, लग्न व काडीमोड या विधींबाबत निर्बंध निर्माण करावे, सारांश, प्रजेच्या कल्याणाची अहर्निश चिंता करावी असें वाटून त्याप्रमाणें वर्तन करणाऱ्या या प्राचीन राजाची माहिती उपलब्ध झाल्यानें मोठी मौज वाटते. सर्व लोकांनीं लिहिण्यावाचण्यास शिकावें असा याचा मोठा आग्रह. 'ज्याला लिहितां वाचतां येईल तो सूर्याप्रमाणें प्रकाशमान होईल' हें त्याचें आवडतें वाक्य तो वारंवार बोलून दाखवी. अशा या राजाच्या कारकीर्दींत बाबिलोनियाच्या संस्कृतीची उभारणी झाली. खुद्द बाबिलोनिया ही राजधानीही यानेंच स्थापन केली.

६. **असीरियन लढवय्ये** :—हम्मुरबीच्या मृत्यूनंतर सुमारें दीडदोनशें वर्षांनीं तैग्रिस नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांतून असीरियन लोक या प्रदेशावर चाल करून आले. येथें त्यांचें वरींच शतकें वास्तव्य होतें. कारण इ. स. पू. च्या ८ व्या शतकांत त्यांनीं निनेव्हा येथें आपली राजधानी स्थापन केली. असीरियन लोक वंशानें सेमिटिक होत. ते मोठे लढवय्ये असत, चिलखतानें मढविलेल्या रथांत बसून शत्रूशीं लढाई करण्यांत ते मोठे वाकबगार असल्याचें आढळून येतें. यांनीं पश्चिमेस भूमध्य समुद्रापर्यंतचा प्रदेश जिंकून साम्राज्य स्थापन केलें. पण तें टिकवून ठेवण्यासाठीं आवश्यक ती घटना त्यांना निर्माण करतां आली नाहीं. यांच्यांत असुरबनिपाल नांवाचा एक मोठा राजा इ. स. पू. ६६८–६२६ या काळांत होऊन गेला. त्यानें २२००० इष्टिकांचा मोठा ग्रंथसंग्रह तयार केला. जगाच्या इतिहासांत ज्ञात असा हा पहिलाच ग्रंथसंग्रह होय. कालांतरानें असीरियाचें साम्राज्यही मोडकळीस आलें. कारण त्या अवाढव्य प्रदेशांत जे विविध लोक एकत्र आले त्यांच्यांत साम्राज्याबद्दल निष्ठा उत्पन्न झाली नाहीं. अनुकूल संधि प्राप्त होतांच त्यांच्यांत फाटाफुटीस सुरुवात झाली. अशा काळांत इ. स. पू. ६१२ चे सुमारास फिरून सुमेरियन लोकांनीं डोकें वर काढलें. हे सुमेरियन लोक लढवय्ये नाहींत, पण राज्यकारभारांत सुधारणा करण्यांत मोठे वाकबगार व वृत्तीनें मोठे चिवट दिसतात. हिंदुस्थानांत मोहेंजोदारो येथील लो सुमेरियन संस्कृतीचेच होत. दक्षिण हिंदुस्थानातील द्राविड समाज हा सुमेरियनांचीच एक शाखा होय असें तज्ज्ञांचें मत आहे. असो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. खाल्डिया :—बाबिलोनियांत सुमेरियन लोकांनीं पुनः स्थापन केलेलें वर्चस्व फार काळ टिकलें नाहीं. या काळांतील राज्य हें खाल्डियाचें राज्य म्हणून प्रसिद्ध आहे. खाल्डियन लोकांनीं खगोल शास्त्राचा खूप अभ्यास केला. गुरु, शुक्र, शनि, बृहस्पति यांची त्यांना माहिती होती. इतकेंच नव्हे तर, पृथ्वीच्या सूर्यभ्रमणाचें एक वर्ष म्हणजे ३६५ दिवस ६ तास १५ मिनिटें व ४१ सेकंद एवढा काळ होय इतकें बिनचूक गणित त्यांना माहीत होतें. नबूरिमन्न हा तत्कालीन प्रसिद्ध ज्योतिषी होय. पण त्याच्या नांवापलीकडे अधिक विशेष माहिती परिचित ग्रंथांतून आढळत नाहीं. इ. स. पू. ५३९ त पर्शियाचा राजा सायरस यानें खाल्डियावर स्वारी करून



बाबिलोनियन साम्राज्याचा शेवट केला. त्यानंतर अलीकडे गेल्या हजार वर्षांच्या काळांत इस्लामी संस्कृतीचा स्वीकार केलेलीं लहान मोठीं राज्यें तेथें स्थापन झालीं आहेत व तीं आपलें स्वातंत्र्य कसेंबसें संभाळून आहेत.

आशियांतील पहिले साम्राज्यसंस्थापक—इराणी

८. झरतुष्ट्र :—इंग्रजी इतिहासांतून इराणी हे पर्शियन या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांच्यांत फार प्राचीन काळीं म्हणजे अंदाजें इ. स. पू. १००० चे सुमारास झरतुष्ट्र नांवाचा एक पुरुष होऊन गेला. तो प्राचीन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इराणी–पारशी–धर्माचा संस्थापक होय. या जगांत पाप व पुण्य, दुष्ट व सज्जन यांचा झगडा सतत चालू आहे. या झगडयांत मानवानें सज्जनांचा पक्ष घेऊन त्यांचा जय होईल यासाठीं यत्न केला पाहिजे. हा हेतु साध्य होण्यासाठीं मानवानें ज्ञान मिळवावें, दुष्टांचें परिवर्तन करावें, शत्रूंना मित्र बनवावें असा सतत यत्न केला पाहिजे हें त्याच्या उपदेशाचें सार होय. सूर्य व अग्नि यांची उपासना त्यांच्या धर्मांत प्रामुख्यानें सांगितलेली आहे. हे लोक वंशानें आर्य होत. हिंदुस्थानांत, मुख्यतः मुंबई इलाख्यांत, आढळून येणारे पारशी लोक हे प्राचीन इराणी संस्कृतीचे खरे वारसदार होत. हे आपणास झरतुष्ट्राचे अनुयायी म्हणवितात. त्याच्या सर्व उक्तींचा संग्रह ज्या ग्रंथांत केला आहे त्यास झेंदावेस्ता असें म्हणतात. तो यांचा धर्मग्रंथ होय. त्याचें वेदाशीं असलेलें साम्य सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

९. **इराणी साम्राज्य** :––या प्राचीन इराणी लोकांनीं आशियांत पहिलें मोठें साम्राज्य मिळविण्याचा व तदनुरूप मोठी संघटना निर्माण करण्याचा मान मिळविला. त्यांच्यांत इ. स. पू. ५५०–५२९ पर्यंत सायरस, इ. स. पू. ५२१–४८५ पर्यंत दारियस व इ. स. पू. ४८५–४६५ पर्यंत झर्गिस असे एकाहून एक फार पराक्रमी राजे होऊन गेले व त्यांनीं पूर्वेस सिंधपासून पश्चिमेस ग्रीसपर्यंतचा प्रदेश आपल्या अमलाखालीं आणला. या साम्राज्याचा कारभार नीट चालावा म्हणून त्यांनीं राज्यांची प्रांतवार विभागणी केली व त्यावर सत्रप नांवाचे अधिकारी नेमले. येथील राजे जरुरीप्रमाणें आपल्या राजधानीचें स्थलांतर करीत. सुसा, बाबिलोनिया, एकबाटना, सार्डिस हीं शहरें त्यांच्या राजधान्यांचीं नांवें म्हणून प्रसिद्ध आहेत. राज्याचे सुभेदार स्वतंत्र होऊं नयेत म्हणून हे मोठे दक्ष असत. त्यांनीं उभ्या राज्यांतील लष्करी संघटना केंद्रित केलेली होती व या लष्करी अधिकाऱ्यांचा सत्रपांवर वचक असे. सर्व राज्यांत उत्तम रस्ते बांधून टपालाची ने–आण करण्याची व्यवस्था त्यांनीं केली होती. ते मोठे हौशी व विलासी असल्यानें त्यांनीं आपले राजवाडे विविध ठिकाणच्या विलास साधनांनीं सजविले होते.

महत्त्वाकांक्षी राजांची राज्यविस्ताराची भूक एकसारखी वाढत जाते.* तसेंच इराणी राजांचें झालें. दारियस या राजानें ग्रीकांवर स्वारी केली. तेथील अ‍ॅथेन्स व स्पार्टा येथील लोक स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ जीवावर उदार होऊन लढले. त्या प्रसंगीं मॅरेथॉन व थर्मापिली येथें घनघोर युद्धें झालीं. असो. अखेर ग्रीकांनीं इराण्यांस नामोहरम करून त्यांना परत इराणांत पिटाळून लावलें. इतकेंच नव्हे तर इ. स. पू.च्या चौथ्या शतकांत ग्रीसच्या उत्तरेकडील मॅसिडोनि-

* या नियमास भरतखंडांतील सम्राट् अशोक एवढा एकच काय तो अपवाद आहे असें एच. जी. वेल्स याचें म्हणणें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचा शिकंदर बादशाह यानें खुद्द इराणवर स्वारी करून तो देश तर पादाक्रान्त केलाच; पण स्वारी करीत करीत तो थेट हिंदुस्थानकडे आला. तेथें पौरव राजाशीं त्याचें मोठें युद्ध झालें. त्यांत पौरवाचाही पराभव झाला. शिकंदर हिंदुस्थानांत पुढें गेला नाहीं. तेथून लवकरच तो परत निघाला. याची विस्तृत हकीकत पुढें हिंदुस्थानच्या इतिहासांत योग्य ठिकाणीं आलेली आहे.

प्राचीन परंपरेचा चीन

१०. **चीनची प्रचंड भिंत** :—येथपर्यंत मिसर, बाबिलोनिया व इराण या प्रदेशांत उदय पावलेल्या संस्कृतींचें वर्णन केलें. यांखेरीज अतिपूर्वेस आपली परंपरा अत्रुटित राखणारा असा चीन हा भारताप्रमाणेंच फार प्राचीन देश आहे. चीन आकारानें भारताच्या दुपटीहून अधिक मोठा असून त्याची लोकसंख्या ४३ कोटी आहे. सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी या देशांत कॉन्फ्यूशियस नांवाचा एक पुरुष होऊन गेला. (इ. स. पू. ५५१ ते ४७८) हा चीनमधील प्रमुख धर्मसंस्थापक होय. 'जगाची सुधारणा करण्यास धावण्याऐवजीं अगोदर स्वतःस सुधारा म्हणजे सर्व कांहीं यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें आपोआप सुधारेल' अशी त्याची शिकवण होती. कॉन्फ्यूशियसखेरीज लाओत्से हा दुसरा धर्मसंस्थापक होय. त्यानें संन्यासवृत्ति व साधेपणा यांची शिकवण चीनला दिली. पुढें इ. स. च्या दुसऱ्या शतकांत या देशांत बौद्ध धर्माचा प्रसार होऊन तोच आज चिनी लोकांचा राष्ट्रीय धर्म होऊन बसला आहे; पण चिनी लोकांत धर्मविषयक भांडणें अगर युद्धें कधींच झालीं नाहींत. नवरा ख्रिश्चन तर बायको बौद्ध असा प्रकार चीनमध्यें अनेक ठिकाणीं आढळतो. इ. स. पू. च्या तिसऱ्या शतकांत शी व्हांग टी म्हणून चीनचा राजा (इ. स. पू. २४६–२०९) होऊन गेला. त्यानें उत्तरेकडून येणाऱ्या हूण लोकांचा त्रास चुकवावा म्हणून तिकडील सरहद्दीवर एक प्रचंड भिंत बांधली. ही भिंत १८०० मैल लांब, २२ फूट उंच व २० फूट रुंद आहे! पण इतकें करूनही हूणांचा त्रास चुकला नाहीं. अखेर खंडणी देऊन त्यांना वाटेस लावावें लागलें. चिनी लोक स्वभावानें शांत वृत्तीचे व सोशिक आहेत. त्यांच्यांत लेखक, शेतकरी, कारागीर व व्यापारी असे चार वर्ग आहेत. क्षत्रिय वर्ग तिकडे नाहींच. चीननें कागद, छपाई व बंदुकीची दारू या तीन गोष्टींचा शोध लावल्यानें जगावर चीनचे थोर उपकार झाले आहेत. रेशीमही मूळ चीनमधूनच सर्वत्र फैलावलें. चीननें अनेक राज्यें व राज्यक्रान्त्या पाहिल्या; पण त्या सर्वांस तोंड देऊन चीन स्वतंत्र राहिला.

विविध संस्कृतींचे त्रोटक उल्लेख

११. **लढवय्ये हिटाईट** :—पश्चिमेस नाईल नदी व पूर्वेस युफ्रेटिस यांच्या दरम्यान अरबस्तानच्या उत्तरेकडील प्रदेशांत प्राचीन काळीं हिटाइट, फिनि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शियन व हिब्रू या लोकांनीं भूमध्य समुद्राच्या पूर्वकिनाऱ्यावर वसाहती केल्याचें इतिहासांत नमूद आहे. हे सर्व सेमिटिक वंशाचे लोक होत. पैकीं हिटाईट इ. स. पू. १३ व्या शतकांत उदयास आले व त्यांनीं पश्चिमेस इजिप्त व पूर्वेस असीरिया येथील लोकांशीं युद्धें केलीं, व आपलें साम्राज्य स्थापन केलें. लोखंडाच्या हत्यारांचा उपयोग करणें यांना प्रथम परिचित झाल्यामुळें त्या श्रेष्ठ हत्यारांनीं लढून त्यांनीं शत्रूंवर विजय संपादन केला. पुढें असीरियन लोकांनीं इ. स. पू. ८ व्या शतकांत त्यांचा पराभव केला.

१२. फिनिशियनांची व्यापारी संस्कृति :—फिनिशियन लोकही याच काळांत उदयास आले. हे लोक व्यापारांत फार प्रसिद्ध होते. त्यांनीं भूमध्य समुद्रांत दूरवर सफरी केल्या. इतकेंच नव्हे तर इसवी सनाच्या सातव्या शतकांत पूर्व आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्यानें दक्षिणेकडे जात जात त्यांनीं त्या खंडाच्या दक्षिण टोंकास न कळत वळसा घातला. वाऱ्याची दिशा बदलली व रोज सूर्य त्यांच्या डाव्या हाताला उगवे तो उजव्या अंगाला उगवूं लागला; तेव्हां त्यांना कळलें कीं आपण आफ्रिकेच्या दक्षिणेस प्रदक्षिणा घालून उत्तरेस जात आहोंत ! मूळाक्षरांची लिपि व ती लेखनपद्धति प्रथम यांनींच शोधून काढली.

१३. धर्माभिमानी ज्यू :—हिब्रू लोकांचा इतिहास फार प्राचीन आहे. इ. स. पू. २००० वर्षांच्या काळांत आब्राहामनें पॅलेस्टाइनमध्यें वसाहत केली. तेथून ते कांहीं काळ इजिप्तमध्यें गेले; परंतु इ. स. पू. च्या सोळाव्या-सतराव्या शतकांत त्यांना फारोहाच्या जुलुमामुळें परतावें लागलें. मोझेस हा त्यांचा पुढारी होय. परत येत असतांना पॅलेस्टाइनमध्यें सिनाई पर्वतावर मोझेसला परमेश्वरानें दहा आज्ञा दिल्या, असें बायबलच्या जुन्या करारांत (Old Testament) नमूद आहे. इ. स. पू. च्या दहाव्या शतकांत त्यांच्यांत डेव्हिड नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें जेरुसलेम शहराची स्थापना केली व आपलें राज्य भरभराटीस आणलें. येथील लोक इतिहासांत ज्यू म्हणून प्रसिद्ध आहेत.

१४. येशू ख्रिस्त :—ज्यू लोकांस स्वास्थ्य असें कधींच लाभलें नाहीं. इ. स. पू. च्या सातव्या शतकांत बाबिलोनियन राजानें त्यांना बंदिवान करून आपल्या देशांत नेलें. तेथून सायरस या इराणी राजानें त्यांची सुटका केली. इसवी सनाच्या प्रारंभीं यांच्यावर रोमन लोकांचा अंमल होता. ज्यू लोक मोठे धर्माभिमानी असत व ते स्वतःस परमेश्वराचे लाडके व इतरांहून श्रेष्ठ असें समजत. येशू ख्रिस्तानें त्यांच्या या समजुतीस जोराचा धक्का दिला. "परमेश्वरास सर्व सारखे; तुम्ही त्यास शरण जा व प्राणिमात्रावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रेम करा" या प्रेममय संदेशाचा तो प्रचार करीत राहिला. त्यानें छळाची पर्वा केली नाहीं. यामुळें येशू सर्वत्र प्रिय झाला. ही त्याची लोकप्रियता न साहून ज्यू लोकांनीं त्याच्यावर आरोप केले व त्यास जेरुसलेम येथें दोषी ठरवून सुळावर चढविलें. हा छळ ख्रिस्तानें मोठ्या शांतपणें सहन केला. ख्रिस्ताच्या झालेल्या छळामुळें लोक त्यावर अधिकच प्रेम करूं लागले व त्याचे अनुयायी बनले. अशा रीतीनें ख्रिस्ती धर्माची स्थापना झाली. ज्यू व ख्रिस्ती यांच्यामध्यें पुढें कित्येक शतकें हाडवैर होतें. विशेषतः त्यांच्या सावकारी पेशामुळें ते सर्वत्र अधिकच अप्रिय झाले. पुढें इस्लामचा उदय झाल्यावर त्यांनीं ज्यू लोकांचा छळ केला. तेव्हां ज्यू हे ख्रिश्चन लोकांच्या सहानुभूतीस पात्र झाले. अलीकडे या सहानुभूतीचें निमित्त करून ख्रिस्ती लोक मध्य आशियांत आपलें वर्चस्व स्थापन करण्याचा यत्न करीत असल्यानें त्यांचा मुसलमानांशीं सतत झगडा सुरू आहे.

१५. **जलप्रलयाची कथा** :—बायबल हा ख्रिस्ती लोकांचा पवित्र ग्रंथ होय. त्याचे जुना करार व नवा करार असे दोन भाग आहेत. जुन्या करारांत ज्यू लोकांची हकीकत आलेली असून नव्या करारांत ख्रिस्ताचें चरित्र व त्याचीं वचनें ग्रथित केलेलीं आहेत.. जुन्या करारांत इतर धर्मांतील पुराणांप्रमाणें सृष्टीची उत्पत्ति कशी झाली तें सांगितलें आहे. सृष्टीच्या प्रारंभकालीं मोठा जलप्रलय होऊन सर्व भूप्रदेश पाण्याखालीं बुडून गेला. त्या वेळीं नोहा या देवदूतानें एक जहाज घेऊन त्यांत प्रत्येक प्राण्याचें एक एक जोडपें घेऊन त्यांचे जीव वांचविले. पुढें जलप्रलय ओसरल्यावर सर्वत्र स्थिरस्थावर झालें व सृष्टीची पुनः मांडामांड झाली असें वर्णन आहे. बाबिलोनियाच्या प्रदेशांत अशा प्रकारचा जलप्रलय इ. स. पू. २७०० वर्षें म्हणजे सुमारें साडेचार-पांच हजार वर्षांपूर्वीं झाला असें लिओनाड वूली या उत्खननशास्त्रज्ञाचें मत आहे. नोहाचें वर्णन कदाचित् या प्रसंगाच्या पुसट स्मृतीस अनुलक्षून असावें.

१६. **समारोप** :—येथवर प्राचीन जगांतील विविध संस्कृतींचें वर्णन दिलें. येथून पुढील भागांत भारतीयांचा इतिहास सांगावयाचा; म्हणजे विविध संस्कृतींच्या तुलनात्मक पार्श्वभूमीवर भारतीयांचें कर्तृत्व सापेक्षतेनें कळून येईल व विश्वकुटुम्बांतील भारताचें स्थान त्या योगें अधिक यथार्थतेनें स्पष्ट होईल.

प्रश्न

१. मिसर संस्कृतींतील विशेष गोष्टी सांगा. २. हम्मुरबीची माहिती द्या. ३. चिनी संस्कृतीनें मानवास कोणत्या देणग्या दिल्या ? ४. टीपा लिहा :—(१) झरतुष्ट्र, (२) नोहा, (३) हिटाईट, (४) असीरियन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(१). कारणें सांगा : (अ) प्राचीन काळीं माणसांनीं नद्यांच्या कांठीं वसाहती केल्या. (आ) प्राचीन मानवाची प्रचंड कामगिरी म्हणजे 'पिरॅमिड' होत. (२). वाचा :—प्राचीन काळांतील लिप्यांच्या माहिती-साठीं नातूकृत 'जगाचा इतिहास' प्रकरण ७ पाहा.

ऐतिहासिक उतारा

[सोबतच्या चित्रांत सिंहासनावर बसलेली सूर्यदेवता हात जोडून उभ्या असलेल्या हम्मुरबीस प्रसन्न होऊन कायद्यांचा कागद देत आहे. ही आकृति एका आठ फूट उंचीच्या उभट शिलाखंडावर वरच्या बाजूस कोरली असून खालच्या बाजूस कायद्याचा मजकूर कोरलेला आहे. इ. स. १९०१ सालीं हा दगड एका संशोधकास सुसा (इराण) येथें उपलब्ध झाला. नमुन्यादाखल पुढील कायदे वाचा :]


हम्मुरबी व सूर्यदेवता

'जो न्यायाधीशास किंवा साक्षीदारांस लांच देईल, त्यास कडक शासन होईल.'

'जो शेतकरी बांधांचें रक्षण करणार नाहीं व आपल्या शेतांतलें पाणी दुसऱ्याच्या शेतांत वाहूं देऊन त्याच्या पिकाचें नुकसान करील त्याला पिकाची नुकसान-भरपाई करावी लागेल.'

जर एखादें नवीन बांधलेलें घर पडलें व त्यामुळें घरमालकाचा मुलगा मरण पावला तर ज्या इंजिनियरनें तें घर बांधलें असेल त्याच्या मुलास मृत्यूचें शासन मिळेल.

'जो पुत्र आपल्या बापास मारील त्याचे हात कापले जातील'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावनाखंड : भाग ३ रा

देश व लोक

१. हिंदुस्थानचें प्राचीनत्व :—आपल्या देशास 'हिंदुस्थान', 'भरतखंड', किंवा 'आर्यावर्त' हीं नांवें दिलेलीं आढळतात. सिंधु नदीच्या पूर्वेकडे राहणाऱ्या लोकांस पश्चिमेकडील लोकांनीं हिंदु हें नांव दिलें असावें; म्हणून त्यांच्या देशास हिंदुस्थान हें नांव पडलें. भरतखंड हें नांव, दुष्यंताचा पराक्रमी पुत्र भरत या देशाचा राजा होऊन गेला असें पुराणांत वर्णन आहे, त्याच्या नांवावरून पडलें असावें.* आर्यावर्त हें नांव पडण्याचें कारण, आर्यांनीं आपल्या संस्कृतीचा प्रसार सर्व देशभर करून हा देश आपल्या पराक्रमानें व्यापून टाकला हें होय. सामान्यतः आर्यावर्त हें नांव उत्तर हिंदुस्थानास लावण्याचा प्रघात आहे.† या नांवांपैकीं हिंदुस्थान या नांवानें आज हा देश सर्वत्र ओळखला जातो. इ. स. १९४७ सालीं सिंध, बलुचिस्तान, पश्चिम पंजाब व पूर्व बंगाल हे हिंदुस्थानचे भाग 'पाकिस्तान' या नांवानें स्वतंत्र झाले. पाकिस्तानखेरीज राहिलेल्या हिंदुस्थानास घटनेनें 'इंडिया' किंवा 'भारत' हें नांव दिलें आहे.

हिंदुस्थान हा देश फार प्राचीन आहे. सुमारें चार हजारांहून अधिक वर्षांपूर्वींही या देशांतील लोक सुधारलेले असल्याचा पुरावा सांपडतो. ज्या वेळीं यूरोप खंडांतील लोक कातडीं पांघरून राहात व कंदमुळांवर निर्वाह करीत त्या वेळीं आपले पूर्वज घरेंदारें बांधून व शेतें नांगरून राहात होते, ही गोष्ट अभिमान बाळगण्याजोगी आहे.

---

*याखेरीज पुराणांत आणखी एका भरताचा उल्लेख आहे. हा ऋषभदेवाचा मुलगा. त्याच्या नांवावरून या देशास भारत हें नांव पडलें असें भागवत पंचमस्कंध अध्याय ४ श्लोक ९ मध्यें सांगितलें आहे. या दोन भरतांपैकीं कोणत्या भरतावरून या देशास 'भारत' हें नांव पडलें हें ठरविण्यास भागवताचा काल कोणता व हा श्लोक भागवताच्या मूळ प्रतींत आहे कीं तो प्रक्षिप्त आहे याची छाननी करावी लागेल.

† प्राचीन पुराण ग्रंथांतून या देशास 'अजनाभ' हें नांव दिलेलें आढळतें. वरील टीपेंत उल्लेखिलेला ऋषभदेव या प्रदेशावर राज्य करीत असल्याचें भागवताच्या चौथ्या अध्यायांत तिसऱ्या श्लोकांत नमूद आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भौगोलिक वर्णन

२. स्वाभाविक मर्यादा :—या देशाच्या मर्यादा फार स्वाभाविक आहेत. उत्तरेस हिमालय पर्वत, पूर्वेस बंगालचा उपसागर, दक्षिणेस हिंदी महासागर व पश्चिमेस अरबी समुद्र आहे. वायव्येकडे मात्र भारताची सरहद्द असावी तितकी निश्चित नाहीं. कारण आज ज्यास आपण अफगाणिस्थान म्हणतों तें प्राचीन काळापासून आर्यावर्तांतच मोडत असावें. (कौरवांची आई 'गांधारी' ही गांधार देशाच्या राजाची कन्या. गांधार म्हणजे अफगाणिस्थानांतील हल्लींचें कंदाहार.) वायव्येकडे डोंगरांची ओळ पसरलेली आहे. परंतु त्यांतून हिंदुस्थानांत येण्याजोगे असे अनेक मार्ग आहेत. याच वाटेनें फार प्राचीन काळापासून अनेक लोक हिंदुस्थानांत आले व पुढें मुसलमानांच्या स्वाऱ्याही याच दिशेकडून झाल्या. पाकिस्तानच्या निर्मितीमुळें भारताची वायव्य सरहद्द पंजाबांतील रावीनदीपर्यंत अलीकडे आली आहे. पूर्व, पश्चिम व दक्षिण या तिन्ही बाजूंनीं हिंदुस्थान समुद्रवलयांकित असल्यामुळें प्राचीन काळीं समुद्रमार्गानें हिंदुस्थानचें इतर देशांशीं दळणवळण चालू होतें. तरी त्या मार्गानें शत्रूचा हल्ला येण्याची विशेष धास्ती नव्हती. म्हणून या बाजूनें परदेशांशीं सोईपुरता संबंध ठेवून सुरक्षित राहणें प्राचीन काळीं या देशास शक्य झालें. आशिया खंडाच्या नकाशांत हिंदुस्थानचें द्वीपकल्प त्याच्या स्वाभाविक मर्यादेमुळें अलग दिसून येतें. या बाबतींत यूरोप खंडांतील इटलीची या देशाशीं तुलना करतां येईल. या अलगपणामुळें भारताचा इतर भागांशीं संबंध तुटला नाहीं; पण त्या अलगपणामुळें या देशास इतर देशांहून अगदीं भिन्न अशा स्वतःच्या विशिष्ट संस्कृतीची वाढ करतां आली यांत शंका नाहीं.

३. क्षेत्रफळ, समुद्रकिनारा, इत्यादि :—भारताची दक्षिणोत्तर लांबी काश्मीर ते केप कामोरीन सुमारें २००० मैल असून पूर्व-पश्चिम रुंदी पाकिस्तानच्या ताब्यांतील दोनशेंवीस मैल रुंदीचा पूर्वबंगाल वजा जातां सुमारें १६०० मैल आहे. भारताचें क्षेत्रफळ १२,२०,०९९ चौरस मैल असून क्षेत्रफळाच्या दृष्टीनें तुलना केल्यास हा देश रशियाखेरीज करून जवळजवळ सबंध यूरोपखंडाएवढा आहे. भारताचा एकंदर समुद्रकिनारा ३००० मैल लांब असून उत्तरेकडे डोंगरी सरहद्दीची लांबी जवळजवळ त्याच्या निम्यानें येईल. एवढा मोठा समुद्रकिनारा जवळजवळ सलग असल्यामुळें भारतास सोयीचीं अशीं बंदरें फार नाहींत. कांहीं ठिकाणीं नद्यांच्या मुखांजवळ असलेलीं पूर्वींचीं बंदरें दिवसेंदिवस निरुपयोगी होत चाललीं आहेत. कारण नदीच्या वेगानें वाहून येणारा गाळ मुखाजवळ सांचलेला असल्यामुळें मोठ्या जहाजांच्या वाहतुकीस तीं मुखें निरुपयोगी झालेलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. उदाहरणार्थ, सतराव्या शतकांत सुरत जितकें सोयीचें बंदर होतें तितकें तें आज नाहीं. भारताची आजची लोकसंख्या सुमारें ३२ कोटी आहे. पृथ्वीवरील लोकसंख्येच्या सुमारें एकषष्ठांश लोकसंख्या भारतांत आहे.

४. विविधता :—एवढ्या मोठ्या अफाट विस्ताराच्या व लोकसंख्येच्या देशांत सर्वच दृष्टींनीं फार मोठ्या प्रमाणावर विविधता दिसून येते. पृथ्वीवरील पर्वतांच्या अत्युच्च शिखरापासून समुद्रसपाटीशीं समान्तर असणाऱ्या जमिनीपर्यंत सर्व कमीअधिक उंचीचीं ठिकाणें, बर्फ पडण्याजोग्या कडक थंडीपासून भाजून काढणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत सर्व प्रकारचें हवामान, सुपीक व नापीक जमिनी, विपुल खनिज संपत्ति, घनदाट अरण्यें व गजबजलेलीं गांवें, वालुकामय मैदानें, व हिरवींगार शेतें, निरनिराळ्या वर्णांचे, वंशांचे, जातींचे, धर्मांचे व बहुविध भाषा बोलणारे लोक ह्या सर्वांचा समुदाय पाहिल्यावर हिंदुस्थान देशाचें यूरोपशीं असणारें साम्य अधिकच मनांत भरतें. एवढा मोठा देश अर्वाचीन काळच्या दळणवळणाच्या साधनसामुग्रीच्या अभावीं प्राचीन काळीं फार वेळ एकछत्री अमलाखालीं राहूं शकला नाहीं यांत आश्चर्य नाहीं. यूरोपांतही त्या काळीं मोठमोठीं साम्राज्यें फार वेळ टिकूं शकलीं नाहींत.

५. विभाग :—हिंदुस्थानच्या मध्यभागीं पूर्वेपासून पश्चिमेकडे एकसारखी विंध्य पर्वताची ओळ गेलेली आहे. त्यामुळें देशाचे दोन स्वाभाविक विभाग झालेले आहेत. उत्तरेकडील भागास 'हिंदुस्थान' असें म्हणतात व दक्षिणेकडील भागास 'दक्षिण हिंदुस्थान' किंवा 'दक्षिण' असें म्हणतात. ह्या दोन विभागांचा प्राचीन काळीं एकमेकांशीं क्वचितच संबंध येत असे. उत्तर हिंदुस्थानचे, सिंधु व गंगा या नद्यांच्या सपाटीवरील प्रदेश, त्यांच्या एका बाजूस राजपुतान्याचें वाळवंट व दुसऱ्या बाजूस हिमालयाचे डोंगर व मध्यंतरीं दोन मैदानांना जोडणारी एक सुपीक प्रदेशाची अरुंद पट्टी असे भाग पडतात. प्राचीन काळीं आर्य लोक पंजाबांतून सरळ दक्षिणेंत न जातां गंगेच्या कांठीं वस्ती करण्यास कां गेले व गंगेच्या कांठींच मोठमोठीं साम्राज्यें कां उदय पावलीं याचें कारण वरील भूगोलाचें स्वरूप लक्षांत घेतल्यास कळून येतें. तसेंच प्राचीन काळांतील बहुतेक महत्त्वाच्या लढाया दिल्लीजवळच्या अरुंद पट्टींतच कां झाल्या तेंही यामुळें लक्षांत येतें. दक्षिण हिंदुस्थानचेही तुंगभद्रेच्या उत्तरेकडील प्रदेश व दक्षिणेकडील प्रदेश असे स्वाभाविक भाग पडतात; या भागांत झालेलीं बरींच युद्धें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दुआबांत झालेलीं आढळून येतील.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन भारतांतील प्रमुख समाज

६. द्राविड :—फार प्राचीन काळापासून मध्यआशियांतील कॉकेशस पर्वताच्या आसपासच्या प्रदेशांतून अनेक लोकांच्या टोळचा हिंदुस्थानांत येत आहेत. सुमारें चार हजार वर्षांपूर्वी आर्य या देशांत आले. परंतु आर्यांच्याही पूर्वी भारतांत द्राविड लोकांची वस्ती होती. आर्यांच्या आगमनानंतर तत्कालीन भारतांत आर्य, आर्यसंस्कृतीचा स्वीकार करणारे आर्येतर, द्राविड व अनार्य असे चार ठळक समाज वास करीत असले पाहिजेत. यांपैकीं रानटी लोकांच्या समाजास अनार्य हें नांव दिलें जातें. अनार्यांना कुटुंब-व्यवस्था माहीत होती कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे. द्राविड व आर्य लोकांच्या प्रसाराबरोबर त्यांनीं दरीडोंगराचा आश्रय केला एवढें मात्र खरें. द्राविड लोक मात्र सुसंस्कृत होते. पूर्वकालीन द्राविड हे शिकारी वृत्तीचे लोक असून त्यांच्यांत मातृसत्ताक पद्धति अस्तित्वांत होती. स्त्रिया मुलें सांभाळीत व पुरुष शिकारीसाठीं व निर्वाहासाठीं इतस्ततः संचार करीत. हे सर्व एकत्र राहात. त्यांची मालमत्ता त्यांच्या सामायिक मालकीची असे. कालांतरानें स्त्रियाही कंदमुळें जमा करूं लागल्या. पुढें बहुधा आर्यऋषींच्या शिकवणुकीवरून या पूर्वकालीन द्राविडांना जमीन नांगरणें माहीत होऊं लागलें. या द्राविडांचे जथे सामायिकपणानें ठिकठिकाणीं राहात असत. हिंदुस्थानांतील बरींच खेडीं अशा रीतीनें निर्माण झालीं आहेत. अशा प्रकारच्या समाजरचनेंत मुलांना बापापेक्षां आईचीच अधिक ओळख असे व त्यांचें आईवर अधिक प्रेम असे. जेव्हां जमिनींतून खाद्य पदार्थ निर्माण होऊन त्यायोगें सर्वांचें पोषण होऊं लागलें तेव्हां जमीन ही त्यांची 'मातृभूमि' झाली.

७. असुर :—निर्वाहासाठीं भटकून आल्यावर पुरुष आपल्या भूमीस परत येत. तेथें त्यांच्यांत आनंदोत्सव होत. स्त्रीपुरुष मोकळेपणानें एकत्र मिसळत. कित्येक वेळां त्यांना झाडाखालीं एकत्र जमून सामुदायिक प्रश्नांचा विचार करावा लागे. या वेळीं वयांत आलेलीं सर्व मुलें त्यांच्याजवळ बसत, यामुळें त्यांस शिक्षण मिळे. अशा मुलांना पुरुष लहान लहान शिकारी-साठींही नेत असत. अशा सामुदायिक जीवनांत सामान्यांचें रक्षण व निर्वाह होई; पण महत्त्वाकांक्षी व कर्तबगार माणसांच्या कर्तृत्वाची कुचंबणा होई. तो त्यांच्यांतून फुटून निघे, आपल्यासारखे कांहीं भोंवतीं जमवी, मूळ संघांतील बायकामुलें पळवी व स्वतःच्या नेतृत्वाखालीं निराळी वसाहत स्थापन करी. आपणास विजय मिळावा म्हणून तो देवीची प्रार्थना करी, तिला 'दुर्गा' म्हणत. विरोधी लोकांचे बळी घेऊन त्यांच्या रक्तानें तिला संतुष्ट करी. 'राजा', 'राज्य', इत्यादि कल्पना, स्त्रियांवर निर्बंध घालणारी विवाहसंस्था, व व्यक्तिगत खाजगी मालमत्तेची कल्पना ही अशा बंडखोरांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जथ्यांत प्रथम निर्माण झाली असावी असें म्हणतात. यशस्वी बंडखोर राजा बने व जबरीनें पळविलेली स्त्री एकाच व्यक्तीची स्त्री म्हणून राही. मूळचे द्राविड शांत वृत्तीचे; परंतु आर्यांना स्वतःच्या वर्चस्वासाठीं ज्यांच्याशीं दोन हात करावे लागले ते हे धाडसी लोक होत. यांच्या भयंकर वृत्तीमुळें आर्यांनीं यांना 'असुर' किंवा 'राक्षस' हें नांव दिलें असलें पाहिजे.

८. **द्राविड संस्कृति** :—द्राविड लोकांची संस्कृति आर्यांच्या संस्कृतीहून भिन्न होती हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कृषिविद्या त्यांनीं आर्यांपासून उचलली असावी हें वर सांगितलेंच आहे. द्राविड लोक मृतांचीं शरीरें ते बसल्या स्थितींत पुरीत असत. पुढें आर्यांच्या सहवासानें ते प्रेतदहन करूं लागल्यावर मृताची रक्षा मृत्तिकाकुंभांत बंद करून ठेवीत व त्याजवळ मृताचीं शस्त्रास्त्रें व त्याच्या आवडत्या वस्तू ठेवीत. हे मृत्तिकाकुंभ द्राविड लोक घरांत पूजेसाठीं ठेवून देत. आर्यांच्या आगमनापूर्वीही त्यांना ब्राँझ व तांबें या धातूंचा उपयोग माहीत होता. मानवी प्रगतीच्या प्राथमिक अवस्थेंत या धातूंचा उपयोग मनुष्य करीत असे. नंतरच्या काळांत लोखंडाचा उपयोग मनुष्यास माहीत व शक्य झाला. त्यानंतर सोनेंरुपें उपयोगांत आलें. आर्यांचें आगमन होण्यापूर्वींचे द्राविड या सर्व धातूंचा वापर करण्यास शिकले होते. त्यांनीं भांड्यांवर किंवा हत्यारांवर कोरलेली सुंदर नक्षी त्यांच्या प्रगल्भावस्थेची साक्ष देते. नदीस धरण बांधून पाणी अडविणें व कोरड्या टापूस पाण्याचा पुरवठा करणें, जलप्रवासासाठीं नौका तयार करणें, आणि मातीचीं निरनिराळ्या प्रकाराचीं सुंदर भांडीं करणें हें त्यांस माहीत होतें.

त्यांची वस्ती आज विंध्याद्रीच्या दक्षिणेस व विशेषतः तुंगभद्रेच्या दक्षिणेस आहे. तेलुगू, कानडी, मल्याळी, तामीळ, वगैरे भाषा ह्या द्राविड लोकांच्याच होत. हे द्राविड लोक बाहेरून भारतांत आले, कीं ते मूळचेच येथील राहणारे ह्याबद्दल बराच मतभेद आहे. बलुचिस्थानांत बोलल्या जाणाऱ्या ब्राहुइ भाषेंत द्राविड भाषेंतील शब्दसमूहांचा व वाक्प्रचारांचा क्वचित् उपयोग होतो. या पुराव्यावरून द्राविड लोक मध्यआशियांतून बलुचिस्थानच्या मार्गानें ह्या देशांत आले असें कांहीं लोक मानतात. मोहेंजोदरोच्या संशोधनानें तर या सिद्धान्तास अधिकच बळकटी आली आहे. उलट इतरांचें म्हणणें असें कीं, द्राविड लोक मूळचे येथील राहणारे असून ते एके काळीं बलुचिस्थानपर्यंत पसरले असावेत; परंतु पुढें आर्यांच्या आगमनामुळें ते हटत हटत दक्षिणेकडे गेले असावेत. कसेंही असो; द्राविड लोक आर्यांच्या पूर्वीं या देशांत होते व त्यांची संस्कृति आर्यांच्या संस्कृतीहून भिन्न, परंतु बऱ्याच उच्च दर्जाची होती यांत शंका नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. आर्य संस्कृति :—द्राविड लोकांचें वर दिलेलें वर्णन वाचणारांची खात्री होईल कीं, आर्य हिंदुस्थानांत आले तेव्हांदेखील हिंदुस्थान हा सर्वस्वीं रानटी लोकांचा देश नव्हता. आर्यांना व त्यांच्या संस्कृतीला आर्येतरांवर आपलें वचस्व प्रस्थापित करतां आलें हें मात्र निर्विवाद होय. आर्यांत पितृसत्ताक कुटुंबपद्धति रूढ होती. जमीन व गुरेंढोरें ज्याच्या त्याच्या खाजगी मालकीचीं असत. प्रत्येक खेडेगांवांत फक्त एक सामयिक मालकीचें क्षेत्र असे. तें गुरांच्या वनचराईसाठीं राखून ठवण्यांत येई. आर्यांच्या शासनसंस्था, निर्वाहाचीं साधनें व धर्मकल्पना द्राविडांपेक्षां प्रगत होत्या. द्राविडांतील बंडखोरांनीं जबरदस्तीसाठीं निर्माण केलेल्या राजा व राज्य या संस्था त्यांना सामान्य व्यवहारासाठीं वापरणें माहीत होतें. आर्यांचा मुख्य गणाधिप किल्ल्यांत राहात असे; तेथें तो गणांच्या सभा बोलावी, विचारविनिमयानें निर्बंध (कायदे) निर्माण करी व ते अमलांत आणी. गहूं, बाजरी, गळिताचीं धान्यें इ. अनेक प्रकारच्या धान्यांचा शोध त्यांना लागलेला होता. शत्रूचें निर्दालन करणारी दुर्गा या द्राविडी परमेश्वरी कल्पनेपेक्षां आर्यांची परमेश्वराविषयींची कल्पना चराचर व्यापून राहणारा अशी होती. अशा प्रकारचे आर्य व वर वर्णिलेल्या संस्कृतीचे द्राविड यांच्या कमीअधिक संमिश्रणानें उत्पन्न झालेल्या राहणीस, विचारसरणीस, धर्मकल्पनांस व संस्कृतीस 'हिंदु' हें नांव मिळालेलें आहे.

१०. आर्यांची भाषा :—इ. स. पूर्वी २००० वर्षांच्या सुमारास जे आर्य लोक या देशांत आले, ते व यूरोपांत वसाहत करण्यास गेलेले आर्यन् लोक हे एकाच वंशांतील असावेत असा कांहींचा समज आहे. कारण त्यांच्या भाषेंतील व वेदकालीन आर्यांच्या संस्कृत भाषेंतील कांहीं महत्त्वाच्या शब्दांत विलक्षणच साम्य आहे. उदाहरणार्थ, संस्कृत पितृ व लॅटिन पेटर, तसेंच मातृ–मेटर, केंद्र–सेंटर हे शब्द एकमेकांशीं अगदीं संबद्ध दिसतात. झरतुष्ट्र-कालीन इराणी भाषा व प्राचीन आर्यांची भाषा यांच्यामध्यें नुसत्या शब्दांतच नव्हे तर ऋचांतूनहि सारखेपणा आढळतो. अशा प्रकारचें शब्द-साम्य द्राविडवर्गीय भाषांचें भारताबाहेरील भाषांशीं दाखवितां येत नाहीं* परंतु केवळ भाषेचा सारखेपणा हा त्यांचा उपयोग करणाऱ्या लोकांच्या वंशांचें अभिन्नत्व सिद्ध करण्यास पुरेसा नाहीं. आजही भिन्न भिन्न वंशांचे लोक इंग्रजी किंवा मराठी भाषा बोलतात; परंतु यावरून फार तर इतकेंच अनुमान निघेल कीं, एकमेकांशीं सदृश भाषा बोलणाऱ्या लोकांचे पूर्वज पूर्वी केव्हां तरी अगदीं एकमेकांजवळ राहात असले पाहिजेत.

---

* या विधानास फक्त वर सांगितलेली बलुचिस्थानांतील ब्राहुइ भाषा मात्र अपवाद आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. भारतीय भाषा व लिपि :––वंशविषयक प्रश्नाचा निर्णय कसाहि होवो आर्यांच्या भाषेचा प्रभाव भारतांत सर्वत्र पडत गेला हें निर्विवाद आहे. भारतांतील विद्यमान चौदा भाषांचे मुख्यत: तीन वर्ग पडतात. त्यांतील संस्कृत व संस्कृतोद्भव भाषेचा पहिला वर्ग फार मोठा आहे. यांत आसामी, बंगाली, गुजराथी, हिंदी, काश्मिरी, मराठी, उडिया, पंजाबी व मूळची संस्कृत अशा नऊ भाषा मोडतात. दुसरा वर्ग द्राविड भाषिकांचा होय. यांत कन्नड, तेलुगु, तामिळ, मल्याळम् अशा चार भाषांचा समावेश होतो. परंतु या भाषा बोलणाऱ्या लोकांनाही धर्मग्रंथ समजून घेण्यासाठीं संस्कृतचें ज्ञान मिळवावें लागतें. तिसरा वर्ग उर्दू भाषिकांचा होय. ही भाषा बऱ्याच अंशीं हिंदी भाषेसारखी आहे, तरी तिच्यांत अरबी व फारसी शब्दांचें फार मोठें मिश्रण आहे. संस्कृत भाषा ज्या देवनागरी लिपींत लिहिली जाते ती अत्यंत शास्त्रशुद्ध आहे. हिंदी, मराठी व काश्मिरी या भाषांसाठीं तीच लिपि वापरली जाते. बंगाली व गुजराथी बव्हंशीं त्याच वळणावर आहेत. द्राविड भाषांची लेखनपद्धति मात्र अगदीं भिन्न आहे; परंतु सर्वांची वर्णमाला एकच आहे. इतकेंच काय, पण देवनागरी लिपि व द्राविड लिप्या या सर्व मूळ ब्राह्मी लिपींतून रूपान्तरित झाल्या असाव्या असें विद्वानांचें अनुमान आहे. भारताच्या बाहेर ब्रह्मी, तिबेटी व कांबोजी भाषांनींही भारतीय वर्णमालेचा स्वीकार केला. उर्दू भाषेची लिपि व वर्णमाला या दोन्हीही मात्र देवनागरीहून संपूर्णतया भिन्न आहेत.

१२. इतर :––द्राविड व आर्य लोकांखेरीज भिल्ल, संथाळ, कोळी, किरात इत्यादि आयुधोपजीवी रानटी लोकांचे संघ इतिहासपूर्वकालापासून या देशांतील निरनिराळ्या भागांत वस्ती करून होते. ते हल्लीं डोंगरांच्या आश्रयानें दऱ्याखोऱ्यांतून राहतात. त्यांनाच ग्रंथकारांनीं 'अनार्य' ही संज्ञा दिलेली आहे. हल्लीं त्यांना 'आदिद्रविड' असेंही म्हणतात. ह्यांच्याशिवाय इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकापासून पार्थियन, शक, कुशान, हूण इ. लोकांच्या टोळ्या इसवी सनाच्या पांचव्या सहाव्या शतकापर्यंत भिन्न भिन्न कालीं येथें आल्या व हिंदु संस्कृतींत समाविष्ट झाल्या. पुढें आठव्या शतकांत इराणांत राहणारे झरतुष्ट्राच्या पंथाचे पारसिक किंवा पार्शी इ. स. ७१७ त येथें आले. ते मूळचे तेथील राहणारे असें म्हणतात. यानंतर लवकरच मुसलमानांचा या देशांत प्रवेश झाला. सोळाव्या शतकांत पोर्तुगीजांचा प्रवेश झाल्यापासून या देशांत ख्रिस्ती लोकांचेंही आगमन होऊं लागलें. परंतु आजमितीसही हिंदु संस्कृतीच्या लोकांची संख्या हिंद्वेतरांहून फारच मोठी आहे. एकंदर ३२ कोटी लोकसंख्येंत सुमारें २४ कोटी हिंदु, ४ कोटी मुसलमान व बाकीचे इतर धर्मांचे व पंथांचे लोक आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. हिंदुस्थान देश कीं राष्ट्र ? :—हिंदुस्थानांत अतिप्राचीन कालापासून अनार्य व द्राविड लोक राहात असत; पुढें आर्य आले, त्यांच्यामागून पार्थियन, शक, कुशान व हूण लोक आले. हे सर्व भिन्न भिन्न वंशांचे होते व ते भिन्न भिन्न भाषाही बोलत. परंतु असें असलें तरी प्राचीन काळीं हिंदुस्थान देश हा एक भिन्न लोकांचा समुदाय होता असें मानण्याचें कारण नाहीं. एवढ्या अफाट देशांत हे भेद असावयाचेच. ह्या विविधतेच्या बुडाशीं त्या वेळीं हिंदु संस्कृतीचें ऐक्य होतें. अलीकडील काळांत हिंद्वेतरांचें आगमन होऊन त्यांचें एकंदर लोकसंख्येंतील प्रमाण एकसारखें वाढत आहे. परंतु त्याबरोबरच नुकत्याच संपलेल्या इंग्रजी अमलाखालीं या देशांत राष्ट्रीय भावनेचा उदय व फैलाव सर्वत्र झालेला आहे व त्याच्या जोडीस अनेक धर्म व भिन्न भिन्न वंश यांना सामावून घेणारें प्रादेशिक संस्कृतीचें अधिष्ठान दिवसेंदिवस बळकट होत आहे. म्हणून आजही हिंदुस्थान हें प्राचीन कालाप्रमाणेंच पण निराळ्या कारणानें एक राष्ट्र आहे यांत शंका नाहीं.

१४. इतिहासाचीं साधनें :—हिंदुस्थान देशाच्या प्राचीन काळचा इतिहास आयता तयार नाहीं. मानवी कृत्यांचें वर्णन लिहून ठेवावें ही गोष्ट त्या काळीं बहुधा आवडत नसावी. परतु ह्या वृत्तीमुळें इतिहासज्ञांस आज फार अडचण भासत आहे. अनेक आनुषंगिक साधनांनीं कशीबशी इतिहासाची जुळणी करावी लागत आहे; व नवीन नवीन उपलब्ध होणाऱ्या साधनांमुळें पूर्वीचीं काढलेलीं अनुमानें व जुळविलेले कथानकांचे संबंध पुन: दुरुस्त करून घ्यावे लागत आहेत. मुसलमानी इतिहासकारांनीं मात्र मुसलमानी राजांच्या तवारिखा ऊर्फ इतिहास लिहून ठेवण्यांत बरीच दक्षता बाळगिलेली आहे. मागील इतिहास जुळवितांना पुढील साधनें उपयोगीं पडतात.

(१) वैदिक वाङ्मय, रामायण व महाभारत यांसारखीं काव्यें व पुराणें, यांत अनेक राजांच्या वंशावळी व देशांचे उल्लेख आलेले आहेत. परंतु ह्यांतील ऐतिहासिक भाग प्रत्यंतर पुराव्याच्या अभावीं ओळखून घेतां येणें कठिण आहे. यांतील वर्णनावरून हें वाङ्मय ज्या काळीं निर्माण झालें त्या काळच्या समाजस्थितीवर बराच प्रकाश पडतो.

(२) पाणिनि, पतंजलि यांचे व्याकरणावरील ग्रंथ, बाणाचें हर्षचरित, विल्हणाचें विक्रमांकचरित, चंदभाटाचें पृथ्वीराजरासो, कल्हणाची काश्मीरच्या राजपुरुषांची हकीकत सांगणारी राजतरंगिणी, मोगलांच्या तवारिखा, बदाउनी, खाफीखान वगैरेंचे इतिहास, गोविंद परमानंदाचें शिवभारत, पेशव्यांच्या बखरी असे थोडेसे ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांचा इतिहासास उपयोग होतो. परंतु इ. स. च्या सातव्या शतकाच्या पूर्वीचीं साधनें दुर्मिळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. शिवाय वर सांगितलेल्या बहुतेक चरित्र-ग्रंथांतून नायकाची अवास्तव स्तुतीच असल्यानें ग्रंथांचें ऐतिहासिक महत्त्व कमी झालें आहे. इतिहास-ग्रंथांतूनही कित्येक वेळां एकदेशीय हकीकत आल्यानें ती प्रत्यंतर पुराव्यानें पारखून घेतली पाहिजे.

(३) शिलालेख, नाणीं, ठिकठिकाणीं उभारलेले स्तूप, मनोरे, कोरीव कामें हीं सर्व पुराव्याच्या दृष्टीनें अधिक विश्वसनीय मानलीं जातात. अशोकाच्या गिरिलेखांवरून त्याच्या राज्याची मर्यादा ठरवितां येते. समुद्रगुप्ताच्या नाण्यांच्या साह्यानें त्याचा निश्चित काल व कांहीं कृत्यें यांचा उलगडा होतो. शिलालेखांच्या भाषेवरून त्यांतील मजकुराचा काल ठरवितां येतो. वर दिलेल्या साधनांखेरीज मराठ्यांच्या इतिहासाची जुळणी करतांना शकावल्या, अस्सल पत्रें व सनदापत्रें यांचाही विशेष उपयोग होतो. ह्या सर्व गोष्टींचें महत्त्व लक्षांत घेऊन सरकारनें ऐतिहासिक दप्तरखातें (Archives) व पुराणवस्तुसंशोधनखातें (Archaeological Department) हीं खातीं स्थापन केलेलीं आहेत; व त्यामार्फत जुन्या दप्तराचें रक्षण व प्राचीन वस्तूंचें संशोधन चालू आहे. भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, भारत इतिहाससंशोधक मंडळ, सत्कार्योत्तेजक सभा, इत्यादि खाजगी संस्थाही इतिहाससंशोधनाचें कार्य आस्थापूर्वक करीत आहेत.

(४) परकीय देशांच्या समकालीन इतिहासांतील उल्लेख, परकीय प्रवाशांनीं लिहिलेलीं प्रवासवर्णनें व त्यांनीं येथून आपल्या देशास लिहिलेलीं पत्रें यांचाही विशेष उपयोग होतो. परंतु त्यांच्या वर्णनांतील सत्यांश काळजीपूर्वक पारखून घेतला पाहिजे. कित्येक वेळां हीं वर्णनें फुगवून लिहिलेलीं असतात. वर्णन अधिक मनोरंजक व्हावें किंवा आपल्या मार्गांतील अडचणी दुसऱ्यास अधिकच कठिण दिसाव्या किंवा आपली फजिती छपवावी, हे हेतू त्या वर्णनांत असण्याचा संभव आहे. तरीदेखील हीं वर्णनें प्राचीन काळचा इतिहास जुळविण्यास बहुमोल आहेत. मेगॅस्थिनीस, फाहैन, ह्यूएनत्संग, अल्बरुनी, मँडलस्लो, सर टॉमस रो, हॉकिन्स वगैरे, ग्रीक, चिनी, बौद्धधर्मीय, मुसलमान, युरोपियन व इंग्रज प्रवाशांचीं वृत्तें आज उपलब्ध आहेत.

वर दिलेल्यांपैकीं अनेक स्वतंत्र व अस्सल साधनांची जेथें एकवाक्यता होईल ती गोष्ट निर्विवाद प्रस्थापित झाली असें समजावें. इतर बाबतींत पुराव्याच्या विश्वसनीयतेच्या दर्जावर हकीकतीची विश्वसनीयता अवलंबून राहणार हें उघड आहे. ह्या सर्व भानगडींमुळें हिंदुस्थानच्या इतिहासाची जुळणी करणें मोठें परिश्रमाचें व चिकित्सेचें काम होऊन बसलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५. पुस्तकाचें स्वरूप व कालखंड :—या पुस्तकांत हिंदुस्थान देशाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें वर्णन द्यावयाचें आहे. त्याच्या सोईकरितां पुढीलप्रमाणें कालखंड पाडले आहेत.

खंड १ ला :—अतिप्राचीन युग इ. स. पू. ३००० ते इ. स. पू. ३२१
शिकंदराचे स्वारीपर्यंत (हिंदु राज्यें)

खंड २ रा :—प्राचीन युग इ. स. पू. ३२१ ते इ. स. १२०५
(हिंदु साम्राज्यें)

खंड ३ रा :—मध्ययुग इ. स. १२०५ ते इ. स. १८१८
मुसलमान, विजयनगर संस्कृति, मराठे व शीख इत्यादींचे उदयास्त

विभाग १ ला :—इ. स. १२०५ ते इ. स. १५२६
इस्लामचा राजपूत-विजयनगरशीं संघर्ष

विभाग २ रा :—इ. स. १५२६ ते इ. स. १७०७
मोगलांचा अंमल व मराठ्यांचा उदय

विभाग ३ रा :—इ. स. १७०७ ते इ. स. १८१८
मोगलांचा अपकर्ष, मराठ्यांचा उत्कर्षापकर्ष व ब्रिटिश राजसत्तेचा उदय

खंड ४ था :—अर्वाचीन युग* इ. स. १८१८ ते आजपर्यंत.

प्रश्न

१. 'भरतखंड', 'आर्यावर्त' 'अजनाभ' या नांवांवर टिपणें लिहा. २. दिल्ली ही प्राचीन कालापासून भारताची राजधानी असण्याचें कारण काय असावें? ३. 'आर्य हिंदुस्थानांत आले तेव्हांदेखील हिंदुस्थान हा सर्वस्वीं रानटी लोकांचा देश नव्हता.' सिद्ध करा. ४. 'देश' व 'राष्ट्र' यांतील फरक काय? ५. असुर व अनार्य यांवर टिपणें लिहा. ६. द्राविड लोकांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे?

* युरोपच्या इतिहासांत पंधराव्या शतकाचे अखेरीस अमेरिका खंडाचा शोध लागला, बुद्धिवादानें धर्मभोळेपणावर कडाडून हल्ला चढविला व सरंजामशाहीचा शेवट झाला, तेव्हांपासून अर्वाचीन युगास सुरुवात झाली असें मानतात तें बरोबर आहे; पण हिंदुस्थानांत सरंजामशाही अठराव्या शतकाचे अखेरपर्यंत रेंगाळत राहिली व बुद्धिवादाचा उदयही इंग्रजी अमलांतच जाणवला. यामुळें या देशाच्या इतिहासांत अर्वाचीन युगाचा उदय दोन शतकांनीं पुढें ढकलावा लागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(१) तुमच्या गांवांतील इतिहासप्रसिद्ध स्थलांची व घराण्यांची नोंद करा. (२) पुराणग्रंथांची माहिती मिळवा. (३) गतकालीन इतिहास कसा तयार होतो?

उपयुक्त माहिती

भारताच्या प्राचीन भौगोलिक सीमा

उत्तरम् यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।
वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र संततिः ।।

—(विष्णुपुराण, अ. ३, श्लो. १)

समुद्राच्या उत्तरेस व हिमालय पर्वताच्या दक्षिणेस जो देश आहे, त्यास भारत असें नांव आहे. कारण त्या प्रदेशांत भरताचे वंशज राहतात.

[वरील श्लोकावरून भारताच्या या मर्यादा बऱ्याच प्राचीन असल्याचें लक्षांत येतें; कारण विष्णुपुराण गुप्तकालाहून अलीकडचें नाहीं.]

* * * *

भारतीय वर्णमालेचा भाषावार नमुना

नागरी	अ	उ	क	का	कि
गुजराथी	અ	ઉ	ક	કા	કિ
गुरुमुखी	ਅ	ਉ	ਕ	ਕਾ	ਕਿ
बंगाली	অ	উ	ক	কা	কি
उडिया	ଅ	ଉ	କ	କା	କି
तेलगु	అ	ఉ	క	కా	కి
कानडी	ಅ	ಉ	ಕ	ಕಾ	ಕಿ
तामिळ	அ	உ	க	கா	கி
ल्याळी	അ	ഉ	ക	കാ	കി

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंड १ ला

अतिप्राचीन युग

(इ. स. पू. अजमासें ३००० ते इ. स. पू. ३२१)

भाग १ ला

वेदपूर्वकाल : मोहेंजोदरो संस्कृति

(इ. स. पूर्वी अजमासें ३०००)

१. साडेचार हजार वर्षांची प्राचीन भारतीय परंपरा :—इ. स. १९२२ सालीं भारतीय इतिहासांत क्रान्ति घडवून आणणारी एक गोष्ट घडली. सिंध व पंजाब प्रान्तांत बौद्ध संस्कृतीचे सुमारें दोनअडीच हजार वर्षांपूर्वीचे कांहीं अवशेष सांपडतील या कल्पनेनें संशोधन चालू असतां श्री. आर. डी. बानर्जी यांना सिंध प्रान्तांत लारखाना शहरापासून २५ मैलांवर सिंधूच्या खोऱ्यांत मोहेंजोदरो येथें खोदकाम करतां करतां सुमारें साडेचार ते पांच हजार वर्षांपूर्वीचे अवशेष सांपडले. त्यांत चित्रलिपींत लिहिलेले कांहीं प्राचीन शिक्के व मुद्रा होत्या. अधिक संशोधन करतां हे सुमेरी संस्कृतीचे निदर्शक होत असें निश्चित झालें. मोहेंजोदरोप्रमाणेंच पंजाबांत मोंटगोमेरी जिल्ह्यांत हराप्पा येथेंही असेच अवशेष सिंधूचे कांठीं उत्खनन करीत असतां उपलब्ध झाले.* या संशोधनानें भारतीय इतिहास एकदम हजार दीड-हजार वर्षें आणखीं मागें गेला. पूर्वी वेदकालापासून म्हणजे स्थूल मानानें इ. स. पू. २००० वर्षांपासून भारतीय इतिहासास सुरुवात करीत. आतां वेदपूर्वकालीन भारतीय जीवनाचें चित्र रेखाटणें शक्य झालें आहे व भारतीय संस्कृति ही निदान इजिप्त व बाबिलोनियन संस्कृतीइतकी प्राचीन आहे असें म्हणतां येतें. अर्वाचीन यूरोपियन संस्कृतीस ग्रीसच्या उदयापासून सुरुवात होते. ग्रीसचा उदय इ. स. पू च्या सातव्या शतकांत झाला. अर्थात् भारतीय संस्कृति ही युरोपियन संस्कृतीपेक्षां निदान दोन हजार वर्षांनीं प्राचीन आहे हें सिद्ध झालें.

---

* हीं दोन्ही ठिकाणें आतां पाकिस्तानांत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. जमिनीच्या पोटांत सांपडलेलें शहर :—मोहेंजोदरो हा सिंधी भाषेंतील शब्द असून त्याचा अर्थ मृतांचें टेंकाड असा आहे. या गांवाजवळ जमिनीच्या खालीं ठिकठिकाणीं २० ते ७० फूट खोल खणल्यावर तेथें संपन्न व सुसंस्कृत लोक राहात असलेल्या मोठमोठ्या शहरांचे अवशेष सांपडले. जे अवशेष चांगल्या अवस्थेंत आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें कीं, हीं शहरें बरींच मोठीं असावींत. त्यांत शेती व व्यापार फारच मोठ्या प्रमाणावर चालत असावा. तेथील रस्त्यांची रुंदी ३३ फूट होती. कांहीं वाडे असे भव्य असावेत कीं, ज्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी केलेल्या होत्या. मजबूत विटांच्या उंच उंच भिंती, चौक, पक्कीं बांधलेलीं गटारें, पाण्याचे नळ आदींचे अवशेष अजूनदेखील आढळतात. सिंधु नदीला येणाऱ्या पुराच्या भीतीमुळें तेथील बहुतेक घरांस फक्त एकच मजला असलेला आढळतो. प्रत्येक घर दुसऱ्यापासून अलग असून त्याला रस्त्याच्या बाजूनें खिडक्या नसत. घरांचे खांब चौकोनी असून त्यांवर विशेष नक्षी काढलेली नसे. मोहेंजोदरोकालीं नगरपालिकेसारखी एखादी संस्था अस्तित्वांत असली पाहिजे असा तर्क करण्यास जागा आहे. कारण प्रत्येक घराचें गटार सार्वजनिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटाराशीं व्यवस्थित जोडलेलें आढळतें. सर्व घरें अगदीं संकल्पित नगररचना करून आंखून बांधावीं अशीं एका ओळींत आढळतात. इतकेंच काय, पण रस्त्यावर रात्रीच्या वेळीं उजेड मिळावा म्हणून दिव्याचे खांबही आढळतात! सिंधचें हवामान त्या काळीं आजच्याप्रमाणें उष्ण व कोरडें नसावें; कारण दाट जंगलांत आढळून येणाऱ्या प्राण्यांची तेथें हालचाल असल्याचा स्पष्ट पुरावा आढळतो व तत्कालीन विटा भट्टींत भाजलेल्या आहेत, उन्हांत सहज वाळविलेल्या नाहींत.

३. मोहेंजोदरो येथील नागरी संस्कृति :—मोहेंजोदरो गांवांत दाढी असलेल्या मनुष्याच्या दोन मूर्ती, निळ्या रंगाच्या कांचेच्या बांगड्या, नाणीं, चाकू, नांगराचे फाळ, जीर्ण गहूं, बाजरी व खजूर, द्यूत खेळण्याचे फांसे, पाषाणाच्या उत्तम अंगठ्या आणि कांहीं मोहरा सांपडल्या आहेत. तेथें तांब्याचीं भांडींही असून त्यांत जडजवाहीर ठेवलेलें आहे. या सर्व गोष्टींवरून असें दिसतें कीं, या शहरांतील लोक शेती करीत, चांदीसोन्याचे अलंकार वापरीत, द्यूत, शिकार, कोंबड्यांची झुंज अशा प्रकारचे खेळ खेळत, रुबाबदार दाढी ठेवीत, कपडे म्हणून अंगावर शाल घेत व रोजच्या व्यवहारांत मुख्यतः तांब्याच्या भांड्यांचा उपयोग करीत. स्त्रिया नृत्य करीत, अंगावर खूप दागदागिने घालीत, आणि मुलांसाठीं मातीचा बैलगाडा, बाहुल्या अशीं हरएक प्रकारचीं खेळणीं आणवीत; या सर्व गोष्टींवरून त्यांचें राहाणीचें मान एकंदरीत उच्च असावें असें वाटतें. लोखंडाचा उपयोग मात्र या लोकांस माहीत नसावा. तसेंच यांना लढाई करण्याचा शोक होता असें दिसत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



मोहेंजोदरो उत्खननांतील अवशेष: सांडपाणी वाहून नेण्याची योजना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. कारण येथील उत्खननांत सुरी चाकू सारखीं लहान हत्यारें सांपडलीं तरी ढाल, तलवारी किंवा धनुष्यबाण आढळून येत नाहींत. इतक्या व्यवस्थित रीतीनें बांधलेल्या शहरास भोंवतीं तटबंदी नाहीं. तसेंच राजा, शिपाईप्यादे, लष्कर अशा कांहीं राज्याच्या कसल्याच खाणाखुणा येथें आढळत नाहींत. मात्र एवढ्यावरून तत्कालीं राज्यसंस्था अस्तिवांत नव्हती असा तर्क करणें योग्य होणार नाहीं. गहूं, ज्वारी इत्यादि धान्यें व मासे यांवर ते निर्वाह करीत. गाय, बैल, गाढव व वाघ हीं जनावरें त्यांना माहीत होतीं; पण घोडा, उंट व सिंह यांच्याशीं त्यांचा परिचय नसावा. त्यांनीं मातीच्या भांड्यावर काढलेल्या चित्राकृतीवरून त्यांचे तत्कालीन बाबिलोनिया या प्रदेशांतील सुमेरियन लोकांशीं संबंध असावेत असा तर्क वाहतो.

४ त्यांची धर्मकल्पना:—त्रिनेत्र पशुपति (शंकर), दुर्गा (शक्तीची देवता), लिंग, वृक्ष, सर्प, यांची ते पूजा करीत. परमेश्वर एक आहे या सिद्धान्तापर्यंत ते जाऊन पोहोंचले नव्हते. मोठीं सार्वजनिक स्नानगृहें हा मोहेंजोदरो संस्कृतीचा एक महत्त्वाचा विशेष आहे. अशीं स्नानगृहें आज विसाव्या शतकांतही आपल्या देशांत उपलब्ध नाहींत. कदाचित् मोहेंजोदरोकालीं सामुदायिक स्नान हा श्रावणीसारखा महत्त्वाचा धार्मिक विधि असला पाहिजे. एकंदरींत मोहेंजोदरोकालीन लोक शांतवृत्तीचे होते. ते क्षात्रवृत्तीचे नसावेत. त्यांचीं राहाणी सुसंस्कृत होती; पण त्यांच्या धर्मविषयक कल्पना आर्यांच्या मानानें प्राथमिक अवस्थेंतील असाव्या असें अनुमान निघतें.

प्रश्न

१. मोहेंजोदरोकालीन शहराचें वर्णन करा. २. मोहेंजोदरो उत्खननानें भारतीय इतिहासांत कोणती क्रान्ति घडून आली? तत्कालीन धर्म, पोषाख व खेळ यांवर टिपणें लिहा.

अभ्यास

अशाच प्रकारचें उत्खनन कऱ्हाड येथें भा. इ. सं. मंडळामार्फत झालेलें आहे त्याची माहिती मिळवा. सिंधुसंस्कृति (स्वाध्याय माला) हें पुस्तक वाचा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २ रा

वेदकाल : आर्यांची पहिली वसाहत

(इ. स. पू. अजमासें २००० ते इ. स. पू. १४००)

१. आर्य लोक :—आर्यांची हिंदुस्थानांत प्रथम वस्ती केव्हां झाली, ह्याबद्दल निश्चित एकमत नाहीं; पण कोणाच्याही मतानें तो काळ इ. स. पू. २००० म्हणजे आज सुमारें चार हजार वर्षांहून अलीकडे येत नाहीं. ते बाहेरून वायव्येकडून आले, कीं ते प्रथमपासूनच हिंदुस्थानांत आहेत, ह्याबद्दलही कांहींसा वाद आहे; तरी ते वायव्येकडून हिंदुस्थानांत आले असेंच बहुतेक विद्वान् मानतात. सारांश, कमींत कमी चार हजार वर्षांपूर्वीं आर्यांनीं सिंधु † व तिला मिळणाऱ्या पांचसहा नद्यांचा सुपीक प्रदेश पाहून तेथें वस्ती केली यांत शंका नाहीं. ऋग्वेदांत कुभा (काबूल) नदीचाही उल्लेख सांपडतो.

२. आर्यांचा ग्रंथ :—आर्य लोक संस्कृत भाषा बोलत. संस्कृत ही जगांतील सर्वांत प्राचीन भाषा होय. आर्यांची संगतवार माहिती कोठेंच उपलब्ध नाहीं; परंतु ती मिळण्याचें एकच साधन आहे. तें म्हणजे तत्कालीन ऋग्वेद हा ग्रंथ होय. ऋग्वेदाचीं १० मंडलें असून त्यांत एकंदर १०२८ सूक्तें आहेत. सामान्यतः एक छंदोबद्ध वाक्य म्हणजे एक ऋचा होते व अशा प्रकारच्या अनेक ऋचा एकत्र झाल्यावर त्यास 'सूक्त' असें म्हणतात. ऋग्वेदाची रचना कोणा एकाच ऋषीनें केलेली नसून निरनिराळ्या काळच्या भिन्न भिन्न लोकांनीं सृष्टिदेवतांस व पंचमहाभूतांस केलेल्या प्रार्थना त्यांत ग्रथित झालेल्या आहेत. त्यांपैकीं बऱ्याच प्रार्थना सर्व देवांचा राजा जो इंद्र त्यास उद्देशून केलेल्या आहेत. अग्नि, वरुण, इत्यादि इतर देवतांच्याही प्रार्थना त्यांत आहेत. ठिकठिकाणीं इंद्रानें केलेल्या पराक्रमाचें वर्णन आहे. देवतांस उद्देशून केलेल्या

---

† कालान्तरानें नद्यांचे प्रवाहमार्ग सरकतात. एक सतलज नदी गेल्या चार हजार वर्षांत ऐंशी मैल सरकली असावी असा तर्क आहे. म्हणून पूर्वींचा व हल्लींचा प्रदेश ओळखतांना सावधगिरी राखणें जरूर आहे. 'आर्य' शब्द अर् ह्या संस्कृत धातूपासून निघालेला असावा. त्याचा अर्थ नांगरणें. ह्यावरून एक अनुमान निघतें कीं, नवीन लोकांनीं बाजूच्या लोकांहून स्वतःस ओळखण्याकरितां 'आर्य' हें नांव घेतलें असावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रार्थनांचें स्वरूपही बहुविध आहे. शत्रूचा नाश व्हावा, मृतास उत्तम गति मिळावी, विवाहित वधूस सुपुत्र व्हावे, पापाचा नाश व्हावा, सद्बुद्धि व धन प्राप्त व्हावें, शेतांत उत्तम पीक यावें, अमरत्व म्हणजे ब्रह्मस्वरूप प्राप्त व्हावें असे इहपारलौकिक उद्देश त्या प्रार्थनांतून आढळून येतात. त्यांपैकीं दहाव्या मंडळांतील शेवटची म्हणजे ऋग्वेदाच्या अखेरची प्रार्थना पुढील-प्रमाणें आहे :—

"हे लोकहो, तुम्ही एकविचाराचे व्हा. तसेंच एकविचारें बोला. तसेंच "तुमचीं मनें निश्चित ज्ञान प्राप्त करोत. ज्याप्रमाणें पूर्वींचे लोक एकविचारानें "आपलीं कामें पार पाडीत, त्याप्रमाणें तुम्ही आपलीं कार्यें एकमतानें करा.

"आपल्या सर्वांची प्रार्थना एक असावी, आपल्या विचारांचें स्थान एक "असावें, आपलीं मनें एकाच विचारानें भरलेलीं असोत. तसेंच आपणां "सर्वांचें ज्ञानही एकसारखें असो. मी तुम्हांला हें एकच उत्कृष्ट रहस्य सांगतों "कीं, आपण एकाच सामग्रीनें देवतांचें पूजन करूं. तुमचा अभिप्राय एकसारखा "असावा. तुमचीं अंतःकरणें एकसारखीं असावीं. तुमचें मन एक असावें, कीं "जेणेंकरून तुमच्या संघशक्तीची बळकटी होईल."

एकंदरीनें पाहतां सृष्टींतील पंचमहाभूतांच्या प्रचंड स्वरूपाचें आविष्करण पाहून आद्यमानवाच्या मनांत प्रथम उत्पन्न झालेल्या भावनांचें प्रतिबिंब ऋग्वेदांत उत्कृष्ट पाहावयास सांपडतें. ह्या ग्रंथावरून आपणांस त्यांच्या इहपारलौकिक समतोल जीवनाची व जीवनविषयक प्रयत्नवादी दृष्टि-कोनाची चांगली कल्पना येते.

३. आर्यांची कामगिरी :—आर्य पंजाबांत आले त्या वेळीं तेथें रानटी लोक राहात होते. त्यांस आर्य 'दस्यु' किंवा 'दास' म्हणत असत. आर्यांनीं आपल्या श्रेष्ठतर गुणप्रभावानें त्यांस दऱ्याखोऱ्यांतून हांकून दिलें. परशत्रूचा याप्रमाणें मोड झाल्यावर, पुढील काळांत आर्यांत आपापसांत झालेल्या युद्धाचा उल्लेख सांपडतो. दहा राजे एकत्र होऊन त्यांनीं सरस्वतीच्या* कांठीं राज्य करणाऱ्या सुदास नांवाच्या राजावर हल्ला केला, त्यास 'दाशराज्ञ' युद्ध म्हणतात. ह्यांत दहाही राजांचा मोड होऊन सुदास विजयी झाला. परंतु युद्धाच्या वर्णनाचें किंवा राजांच्या नांवनिशीचें आपणांस फारसें महत्त्व नाहीं. आपण मुख्यतः तत्कालीन समाजस्थिति पाहिली पाहिजे; कारण त्यावरून आपणांस त्या कालाचें खरें मर्म कळून येईल.

४. तत्कालीन समाजस्थिति :—(अ) उद्योगधंदे—आर्य हे स्थायिक अवस्थेंतील होते, म्हणून ते शेतें नांगरून व घरें बांधून राहात हें तर सिद्धच

*हल्लीं ही नदी [illegible] नाहींशी झालेली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. शेतीच्या उन्नतीकरितां त्यांनीं विहिरी व पाटबंधारे बांधले. आर्य लोक गहूं व बाजरी पिकवीत. तांदुळाचा उल्लेख सांपडत नाहीं. तसेंच ते सोमवल्लीचा रस काढून पीत. वस्त्रप्रावरणांतही त्यांची बरीच प्रगति झालेली होती. सूत कातणें व विणणें त्यांस माहीत होतें. कारण ऋग्वेदांतील एका ऋचेचा पुढीलप्रमाणें अर्थ आहे : " विणकर ज्याप्रमाणें उभ्या व आडव्या धाग्यांनीं पट विणतो त्याप्रमाणें परमेश्वर दिवस व रात्र ह्यांच्या साहाय्यानें काल उभारतो." गाड्या, रथ, इ. वाहनें ते उपयोगांत आणीत. ते धनुष्यबाण किंवा ढालतलवार घेऊन लढत. सोन्यारुप्याचे दागिने वापरीत, व 'निष्क' ह्या सोन्याच्या नाण्यानें ते देवघेवीचा व्यवहार करीत.

(आ) **समाजरचना**—आर्यांत जातिभेद नव्हता. बालविवाहाची पद्धत नव्हती. स्त्रियांना गोषांत, अज्ञानांत व दास्यत्वांत ठेवण्याची चाल नव्हती. यज्ञसमारंभ व लग्नसमारंभ मोठ्या थाटानें साजरे होत. त्या प्रसंगांचीं वर्णनें ऋग्वेदांतून अवश्यमेव वाचण्यासारखीं आहेत. मृतांचीं शरीरें दहन करण्यासंबंधीं व पुरण्यासंबंधीं ऋग्वेदांत उल्लेख सांपडतो.

(इ) **राजकीय संस्था**—ऋग्वेदांत निरनिराळ्या राजांचा उल्लेख आहे. हे भव्य राजवाड्यांत रहात. गाई, घोडे, वस्त्र, सोनें यांचें दान करीत. बृहस्पतीस व ब्राह्मणास मान देत, सभा व समिति बोलावून त्यांचा सल्ला घेत. या वर्णनांवरून त्यांचें राजेपण प्रत्ययास येतें. ते नुसते एखाद्या जमातीचे नायक नव्हते, राजे होते. स्थायिक झालेल्या अनेक वसाहतींच्या मुख्यास सम्राट् म्हणत. प्रतिष्ठित प्रमुखांच्या 'सभा' होत. 'समिति' ही सामान्य लोकांसाठीं असे; त्यांत सर्वांचा समावेश होई. राजे वंशपरंपरागत असत. परंतु आपत् प्रसंगीं समितीकडून त्यांची निवडणूक होत असे. जबाबदार राज्यपद्धतीची अर्वाचीन कल्पना त्या वेळीं माहीत नव्हती, परंतु समितीशीं मतभेद होणें ही एक मोठी आपत्ति होय असें राजाला वाटत असे. तत्त्वतः राजाचा कारभार अनियंत्रित असे; परंतु धर्मकल्पनांचें अनुल्लंघ्य बंधन, सभेकडून मिळणारा सल्ला व समितींत होणारी चर्चा या त्रयीमुळें त्याच्या अधिकारावर खरेंखुरें नियंत्रण पडे. खेरीज ग्रामपंचायतीच्या कारभारामुळें राजसत्ता विकेन्द्रित होई व त्यायोगें लोकांस खरेंखुरें 'स्व-राज्य' अनुभविण्यास मिळे.

(ई) **धर्म**—आर्यांचा धर्म फार मननीय आहे. त्या धर्माची छाप लौकरच तत्कालीन सर्व लोकांवर पडली व त्यांनीं त्याचा स्वीकार केला. सृष्टींतील पंचमहाभूतांचें खरें स्वरूप किंवा कार्यकारणभाव कळण्यापूर्वीं त्यांच्यासंबंधीं दैवी भावना जागृत झाली व त्या प्रत्येक शक्तीला त्यांनीं भक्तिभावानें नमस्कार केला. इंद्र, वरुण, सूर्य, अग्नि, व आकाश ह्या सर्वांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्य देवता मानीत व प्रसंगानुसार त्या त्या देवतांची भक्तिभावानें प्रार्थना करीत. यम व यमलोक ह्यावर त्यांचा विश्वास होता. पुनर्जन्मावर विश्वास व आत्म्याचें अमरत्व, देहाचा नश्वरपणा व परलोकाबद्दलची कल्पना हीं सर्व आर्यकालीं दिसून येतात; पण त्या देवतांच्या भिन्नत्वावरून आर्यांना देव एक आहे हें माहीत नव्हतें असें मानणें चुकीचें होईल. ग्रीक किंवा रोमन लोकांप्रमाणेंच आर्यांच्या देवता भिन्न असल्या तरी मूळ देव एक आहे व इतर देवता ह्या त्याचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत ह्या तत्त्वावर आर्यांचा दृढ भरंवसा होता. मात्र ही परमेश्वरासंबंधींची कल्पना प्रारंभापासूनची नसून ऋग्वेदकालाच्या अखेरीस उदय पावली व उपनिषत्कालीं ती दृढमूल झाली असें वाटतें. हें परमेश्वराचें स्वरूप लक्षांत आल्यामुळें आर्य पुढें निरनिराळ्या धर्मपंथांशीं अत्यंत सहिष्णुतेनें वागले, ही मोठ्या अभिमानाची गोष्ट होय.

५. **शेवट** :—आर्यांच्या नंतर हिंदुस्थानांत पुष्कळ लोक आले; पण आर्यांची व त्यांच्या संस्कृतीची जी छाप हिंदुस्थानावर पडली तशी कोणाचीही पडली नाहीं. त्या कालीं सर्वच बाजूंनीं ते पुढें गेलेले होते. ज्या काळीं इंग्लंड, फ्रान्ससारखीं विद्यमान पाश्चिमात्य राष्ट्रें जन्मासही आलीं नव्हतीं व त्या प्रदेशांतील लोक अगदीं प्राथमिक रानटी अवस्थेंत होते त्या काळीं भारतांत वसाहत करणारे आर्य घरेंदारें बांधून राहात. या प्रगत प्राचीन परंपरेचा भारतीयांस अभिमान वाटला पाहिजे.

प्रश्न

१. मोहेंजोदरो संस्कृति व वेदकालीन संस्कृति यांतील साम्य व विरोध सांगा. २. तुम्ही वेदकालांतील एक विद्यार्थी आहांत अशी कल्पना करून तुमची दिनचर्या लिहा. ३. हिंदूंचे देव तेहतीस कोटी आहेत; हिंदु देव एक आहे असें मानतात. या वाक्यांची संगति लावा. ४. ऋग्वेदकालीं राजांवर कांहीं बंधनें होतीं काय ?

अभ्यास

(१) 'ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास' लेखक : श्री. चिं. ग. काशीकर हें पुस्तक वाचा. (२) पढिक ब्राह्मण वेदमंत्र म्हणतांना ऐका. (३) कांहीं वेदमंत्रांचा अर्थ समजून घ्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूर्याची प्रार्थना व सूर्यास्ताचें वर्णन

[ऋग्वेद मंडळ दुसरें–सूक्त ३८ मधील कांहीं भाग पुढें दिला आहे.]

लोकांना प्रेरणा देणें हेंच काम असलेला जगन्नायक सवितृदेव लोकांना प्रेरणा देण्याकरितां प्रत्यहीं उगवत आहे. तो यज्ञ करणाराचें कल्याण करतो.

सविता जात असतां जेव्हां तेजोविहीन होतो तेव्हां वाटसरू आपला प्रवास थांबवितो......

सूर्यास्त झाला म्हणजे दूर गेलेला विजयेच्छु वीर परत येतो. बाहेर फिरणाऱ्या सर्वांचें मन घराकडे लागतें. काम करणारा अर्धें काम टाकून घरीं येतो.......सर्व पशू आणि पक्षी आपल्या स्थानीं जातात.

त्या सवितृदेवाला मी नमस्कार करून (आत्म) कल्याणासाठीं बोलावितों.

संपत्ति आणि पशू प्राप्त व्हावेत म्हणून आम्ही सवितृदेवाचे आवडतें व्हावें (अशी प्रार्थना आहे).

हे सवित्या! आम्हाला तूं दिलेलें कमनीय धन द्युलोक, अन्तरिक्ष आणि पृथ्वीपासून येवो.

प्रश्न

१. सूर्याचा मानवास उपयोग काय? २. आर्यांनीं त्यापाशीं काय मागणें मागितलें आहे? ३. सूर्यास्त झाला म्हणजे लोकांची काय स्थिति होते?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३ रा

आर्यांचा गंगेच्या कांठीं प्रसार

(इ. स. पू. १४०० ते इ. स. पू. ८००)

१. **आर्यांच्या वसाहती** :—आर्य लोक पराक्रमी असल्यानें त्यांच्या पराक्रमास पंजाब प्रांत लहान पडूं लागला. तेव्हां तेथून ते वसाहत करण्यासाठीं आग्नेय दिशेस वळले. गंगा-यमुना कांठचा सुपीक व रम्य प्रदेश पाहून तेथील रानटी लोकांस आपल्या पराक्रमाच्या जोरावर त्यांनीं हांकून दिलें व आपण तेथें वसाहत केली. त्यांच्यांतील कुरु वंशानें हस्तिनापूर, पांचालांनीं पूर्वेस कंपिल्य, कोसलांनीं अयोध्या, व विदेहांनीं बिहार हे प्रदेश व्यापून टाकले. ह्या सर्वांची माहिती आपणांस महाभारत व रामायण या ग्रंथांवरून बरीचशी मिळते.

२. **महाकाव्यांचें महत्त्व** :—रामायणांतील राम हा दशावतारांपैकीं विष्णूचा सातवा अवतार व महाभारतांतील कृष्ण हा आठवा अवतार होय. तेव्हां रामायणांत महाभारतापेक्षां प्राचीन कालाचें वर्णन सांपडतें. मात्र रामायण हें काव्य महाभारताच्या आधीं रचलें गेलें कीं मागाहून हें निश्चित सांगणें कठिण आहे. रामायणाची रचना महाभारतानंतरची असावी असा कांहीं विद्वानांचा तर्क आहे. रामायणकालांत आर्यांचें हिंदुस्थानभर वसाहती करण्याचें काम हलकें हलकें चालू होतें, हें रामायणांत दंडकारण्यांत राहणाऱ्या अनेक ऋषींच्या आश्रमांचा जो उल्लेख आहे त्यावरून सिद्ध होतें. भारतकालांत हें काम बहुधा पुरें झालें असावें. रामायणांतील रामाचें चित्र म्हणजे एक आदर्शभूत राजा, मायाळू बंधु, कर्तव्यनिष्ठ पुत्र, प्रेमळ पति व तेजस्वी वीर ह्यांच्या गुणसमुच्चयाचें चित्र होय. राम हा एकवचनी, एकबाणी व एकपत्नी पुरुष होता. महाभारतांत प्रसंगांची विविधता व बौद्धिक प्रगतीचें चित्र अधिक मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांत कृष्णाचें राजकारणपटुत्व, अर्जुनाचें धनुर्विद्येंतील कौशल्य, युधिष्ठिराची धर्मनिष्ठा, भीष्माचा करारीपणा व कडकडीत ब्रह्मचर्य, कर्णाचें औदार्य व द्रौपदीनें आपल्या पतींच्या संकटांत दाखविलेलें चातुर्य, निष्ठा व कृष्णभक्ति हे गुण पाहावयास सांपडतात. दोन्ही ग्रंथांवरून त्या त्या काळांतील लोकांचेंही वर्णन पाहावयास सांपडतें. रामायणांत दशरथाचा स्त्रीलंपटपणा, वालीचा वध, रावणाचा जुलूम व महाभारतांत द्यूताचें व्यसन व भाऊबंदकीचे परि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

णाम इत्यादि गोष्टी दिसून येतात. सारांश, समाजांतील आबालवृद्धांच्या मनावर उच्च विचारांचा ठसा उमटविणारे सत्कृत्यांचे परिणाम व पापांचा शेवट स्पष्ट दाखविणारे, समाजांतील बहुविध व्यक्तींस एकाच संस्कृतीचें बाळकडू पाजणारे व त्यांच्या मनाला करमणूक व बोध देणारे असे ग्रंथ समाजांत हवे असतात; तसेच हे ग्रंथ आहेत यांत शंका नाहीं. त्यांतील कित्येक प्रसंग काल्पनिक असतील; परंतु त्या कल्पनेच्या बुडाशीं उच्च विचारांची मनोभूमिका असते हें विसरतां कामा नये. रानटी व मागासलेल्या समाजांत असे ग्रंथ निर्माण होणें शक्य नाहीं. महाभारत व रामायण ह्या दोन्ही महाकाव्यांतील ऐतिहासिक सत्य शोधून काढणें कठिण आहे. परंतु ह्या दोन्ही ग्रंथांत विशेषतः महाभारतांत, व्यावहारिक शहाणपणा शिकविणारे प्रसंग व संवाद इतके आहेत कीं, त्यांवरून 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं' म्हणजे सर्व जगांतील शहाणपण ह्या ग्रंथांत सांपडूं शकेल अशी म्हण पडलेली आहे. तत्कालीन समाजस्थिति समजण्यास तर या ग्रंथांइतके दुसरे महत्त्वाचे ग्रंथ कोणतेही नाहींत. वेदांचें ज्ञान असणारे हिंदु आजमितीसही थोडेच सांपडतील; परंतु रामायण, महाभारत माहीत नाहीं असा हिंदु सांपडणें कठिण.

३. महाकाव्यांचें स्वरूप :—महाभारतांत सामान्यतः एक लक्ष श्लोक आहेत. व्यासानें लिहिलेलें मूळ महाभारत लहान असून त्यास 'जय' असें नांव होतें. पुढें त्यांत भर पडून त्याचें भारत झालें व नंतर सौतीनें त्यांत आणखी भर घातल्यावर त्याचें महाभारत झालें. महाभारताचें आजचें स्वरूप त्या ग्रंथास इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत प्राप्त झालें असा कांहीं विद्वानांचा तर्क आहे. तरी त्यांतील निदान सुमारें नऊ हजार श्लोक बुद्धकालीन आहेत यांत शंका नाहीं. अर्वाचीन कालांत ज्ञानकोशाकडे पाहण्याची आपली जी दृष्टि आहे त्या दृष्टीनें या महाकाव्यांकडे प्राचीन लोक पाहात असावेत. ज्ञानकोशांत ज्याप्रमाणें पिढी दर पिढीस सुधारणा व वाढ होत जाते, तशी या महाकाव्यांतून कालांतरानें होत गेली असा कित्येक विद्वानांचा तर्क आहे. या सर्व कारणांनीं भारताचा कालही अनिश्चित आहे. तरी कोणाच्याही मतें तो इ. स. पू. १३००* ह्याहून अलीकडे येऊं शकत नाहीं.

४. श्रीमद्भगवद्गीता :—महाभारतांतील युद्धप्रसंगीं अर्जुनास स्वजनांशीं लढावें कीं नाहीं याबद्दल भ्रम उत्पन्न होऊन त्यानें हातांतील धनुष्यबाण टाकून दिले व अशा रीतीनें राज्य मिळविण्यापेक्षां अरण्यवास बरा असें

* कै. चिंतामणराव वैद्य ह्यांनीं भारतीय युद्धाचा काल इ. स. पू. ३१०१ हा ठरविला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो म्हणूं लागला. तेव्हां श्रीकृष्णानें त्यास उपदेश करून कोठल्याही परिस्थितींत फलासक्ति न ठेवतां आपापलें कर्म करीत राहणें यांत पाप नाहीं असें समजावून सांगितलें व त्याचा भ्रम दूर केला. तीच प्रसिद्ध भगवद्गीता होय. भगवद्गीतेच्या एकंदर अठरा अध्यायांत सातशें श्लोक आहेत. वेद व उपनिषदें यांतील तत्त्वज्ञानाचें सार या ग्रंथांत आणिलें आहे. हाच हिंदूंचा धर्मग्रंथ होय. मुसलमानांचें जसें कुराण, ख्रिस्ती लोकांचें जसें बायबल तशी हिंदूंची भगवद्गीता होय.

५. **लोकस्थिति** :—गंगेच्या कांठचे आर्य पंजाबांतील आर्यांपेक्षां पुष्कळच सुधारलेले होते. तेथील लोकांचीं राज्येंही जास्त विस्तृत व वैभवशाली होतीं. त्यांचे यज्ञसमारंभ मोठ्या थाटानें साजरे होत. त्यांच्या दरबारीं पुष्कळ विद्वान् ब्राह्मण असत. मिथिलेचा राजा जनक याच्याजवळ यजुर्वेदाचा कर्ता याज्ञवल्क्य हा ब्राह्मण होता व श्रीरामचंद्राजवळ वसिष्ठ असे. धार्मिक व इतर बाबतींत राजे यांचा सल्ला घेत. विद्यार्थीवर्ग एखाद्या विद्वान् गुरूच्या गृहीं राहून, पडल्यास सेवावृत्तीही पत्करून, विद्यार्जनाचें काम करी व बारा वर्षें अध्ययन झाल्यावर गुरुदक्षिणा देऊन गुरूजवळ गृहस्थाश्रम घेण्याची परवानगी मागे. वेळोवेळीं विद्वानांच्या परिषदा भरवून निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा व वादविवाद चालत व विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, त्यांत गार्गी, मैत्रेयी यांसारख्या स्त्रियाही प्रामुख्यानें भाग घेत असत. एकंदर आयुष्यक्रम चार आश्रमांत विभागलेला असे. ब्रह्मचर्याश्रमांत अध्ययन करावें, गृहस्थाश्रमांत द्रव्यार्जन करावें, वानप्रस्थाश्रमांत लोकसेवा करावी व आपल्या अंगच्या गुणांचा उपयोग स्वतःच्या संसारापेक्षां समाजाच्या हितासाठीं करावा व संन्यासाश्रमांत ईशचिंतन करावें अशी तत्कालीन व्यक्तिमात्राच्या आयुष्यक्रमाची सामान्य रूपरेखा असे.

६. **चातुर्वर्ण्य** :—चातुर्वर्ण्याचा उदय हें तत्कालीन समाजाचें दुसरें लक्षण होय. कालांतरानें एकाच व्यक्तीस धर्मकार्य, द्रव्यार्जन व संरक्षण हे सर्व व्यवसाय करणें अशक्य झाल्यामुळें श्रमविभागाच्या तत्त्वास अनुसरून चातुर्वर्ण्याचा उदय झाला. अध्ययन, अध्यापन व धर्माधिकार हीं कृत्यें करणाऱ्या वर्गास ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त झाली. तसेंच लढवय्ये राजे व राष्ट्राचें संरक्षण करणारे यांस क्षत्रिय म्हणूं लागले, व इतर शेतकी व व्यापारादि व्यवहार करणारांस वैश्य हें नांव मिळालें. कालान्तरानें आर्य व अनार्य*

---

*आर्यांनीं अनार्यांना त्यांचा नाश न करितां आपल्या समाजव्यवस्थेंत सामील करून घेतलें ही गोष्ट तुलनात्मक दृष्टीनें आर्यांच्या थोर मनाची

४ (पुढील पृष्ठावर पहा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांचा तंटा कमी होऊन अनार्यांनीं आर्यांची सेवावृत्ति पत्करली व आर्यांनींही त्यांना आपल्या समाजसंस्थेंत शूद्र म्हणून सामील केलें. भगवद्गीतेंत 'चातुर्वर्ण्यम् मया सृष्टं गुणकर्मविभागश:' असें म्हटलें आहे. याचा अर्थ गुण व कर्म यांच्या कसोटीवर समाजांत चार वर्णांची उभारणी मजकडून (देवाकडून) झाली आहे.' देवानें उत्पन्न केलें याचाच अर्थ स्वाभाविक उत्पत्ति झाली. प्रत्येक मनुष्याच्या अंगीं असलेला गुण व त्याचा नित्याच्या व्यवसायांत तो करीत असलेला उपयोग यांवर चातुर्वर्ण्याची स्वाभाविक उभारणी होते. चातुर्वर्ण्य हें प्रारंभीं तरी जन्मावर अवलंबून नव्हतें हें यावरून स्पष्ट आहे. सुमारें तीन हजार वर्षांपूर्वीं उत्पन्न झालेली ही संस्था आजतागायत टिकून राहिली आहे व इतर अनेक समाज नामशेष झाले असतांही हिंदु समाज टिकवून धरण्याचें श्रेय ह्या संस्थेस आहे. हे चार वर्ण व वर सांगितलेले चार आश्रम या दोहोंमुळें समाजाची उभी व आडवी वर्गवारी झाली, व व्यक्तीचें समाजांतील स्थान निश्चित झालें. दीर्घ कालान्तरानें या व्यवस्थेंत कांहीं दोष उत्पन्न झाले आहेत व त्यांचें निर्मूलन करणें आज अवश्यही आहे. कदाचित् आजच्या काळांत शुद्ध चातुर्वर्ण्याचें पुनरुज्जीवन शक्य नसेल; परंतु असें असलें तरी प्राचीन चातुर्वर्ण्यसंस्थापकांस दोष देतां येत नाहीं. चातुर्वर्ण्य ह्या शब्दांतील वर्ण हा शब्द 'व्यवसाय' या अर्थीं वापरलेला असावा. चातुर्वर्ण्याचा रंगाशीं किंवा भिन्न भिन्न वंशांशीं संबंध दिसत नाहीं. एक शूद्र सोडून बाकीचे त्रैवर्णिक आर्यच होते.

७. धार्मिक उत्क्रान्ति :—ह्या कालांत झालेली धार्मिक उत्क्रान्ति अत्यंत मननीय आहे. सृष्टिदेवतांची अनन्यभावानें प्रार्थना करणारे आर्य या कालांत यज्ञयागानें त्यांना प्रसन्न करूं लागले. "या यज्ञचक्रानें तुम्ही देवांना संतुष्ट करा व तेही तुम्हांला संतुष्ट करोत, परस्परांना सुख देऊन दोघेही परम कल्याण पावा." (भगवद्गीता, अध्याय ३ रा, श्लोक ११ वा) अशी कांहींशी देवघेवीची बुद्धि उत्पन्न झाली. सृष्टिदेवतांविषयीं आद्य मानवांना आदर व आश्चर्य वाटे; यापुढें भीतीचा प्रादुर्भाव झाला व तिच्या निवारणासाठीं मंत्रतंत्रादि उपचार सुचूं लागले. यज्ञ हें देवांना संतुष्ट करण्याचें साधन आहे हें लक्षांत घेऊन ते बिनचूक करावे म्हणून त्यांच्या विधींतील बारीक-

---

(मागील पृष्ठावरून चालू)

खात्री पटविते. सतराव्या व अठराव्या शतकांत अमेरिकेंत व आफ्रिकेंत वसाहतीस गेलेल्या पाश्चिमात्यांनीं रेड इंडियन्स व नीग्रो लोकांचा निर्दयतेनें नाश केला व आज तीनशें वर्षांनंतरही त्या लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला असतांही त्यांना ख्रिस्ती समाजांत बरोबरीचा दर्जा नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारीक गोष्टी त्यांनीं नियमबद्ध केल्या. यामुळें कालान्तरानें मूळ ऋग्वेदास यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद अशा आणखी तीन वेदांची जोड मिळाली. यज्ञांतील विधीचें वर्णन करणाऱ्या ऋचा याज्ञवल्क्यानें एकत्र केल्यावर त्यांस 'यजुर्वेद' हें नांव प्राप्त झालें. यज्ञप्रसंगीं गाऊन म्हणण्याजोग्या ऋचांस 'सामवेद' हें नांव मिळालें व भीतीचें किंवा संकटांचें निवारण करण्यासाठीं उच्चारलेल्या ऋचांचा संग्रह अथर्ववेदांत झाला. या चारही वेदांतील भाग वर्णोच्चारादींचे नियम पाळून स्वरयुक्त म्हणणें ही त्यांची 'संहिता' होय. संहित म्हणजे एकत्र केलेलें. यापुढील काळांत 'ब्राह्मणें,' 'आरण्यकें' व 'उपनिषदें' लिहिलीं गेलीं. यज्ञाचे मंत्र व विधि यांचें स्पष्टीकरण करणाऱ्या टीकेस 'ब्राह्मण' म्हणतात; आरण्यकांत यज्ञक्रियेपेक्षां तपश्चर्येवर व आत्मानुभूतीवर विशेष जोर दिलेला आहे. अरण्यांत शांतपणें बसून स्फुरलेलीं तीं आरण्यकें होत. परंतु या दोहोंपेक्षांही महत्त्वाचा ग्रंथ म्हटला म्हणजे 'उपनिषद्' हा होय. वेदकालीं आद्य मानवांनीं सृष्टींतील पंचमहाभूतांची नुसती भक्तिभावानें प्रार्थना केली. त्यानंतर सृष्टिदेवतांस प्रसन्न राखणाऱ्या यज्ञाचा उदय झाला. नंतरच्या काळांत आर्य अंतर्मुख बनले, व उपनिषत्कालांत आर्य सृष्टिदेवतांबद्दलच्या आदर, आश्चर्य, भीति, इत्यादि भावनांच्या पलीकडे जाऊन त्याबद्दल तत्त्वशोधक विचार करूं लागले; तेव्हां त्यांना या पंचमहाभूतांच्या बुडाशीं असलेल्या जगन्नियंत्याचें स्वरूप स्पष्टपणें कळून आलें. ह्या तत्त्वज्ञानाचें नितान्त सुंदर विवेचन उपनिषदांत पाहावयास सांपडतें. उदाहरणार्थ, केनोपनिषदांतील पुढील उतारा (१.६.७) पहा.

यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥१॥
यच्छ्रोत्रेण न श्रृणोति येन श्रोत्रमिदं श्रुतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥२॥

अर्थ :—'जें डोळ्यांनीं दिसत नाहीं परंतु ज्याच्या योगानें डोळ्यांना पाहण्याचें सामर्थ्य येतें तेंच ब्रह्म असें तूं जाण. लोक ज्याची ब्रह्म म्हणून उपासना करतात तें ब्रह्म नव्हे. जें कानाला ऐकूं येत नाहीं, परंतु ज्याच्या योगानें कानाला ऐकण्याचें सामर्थ्य येतें तेंच ब्रह्म इ.'

गुरूजवळ बसून समजलेलीं (उप + नि + सद् = बसणें) तीं 'उपनिषदें' होत. वेद, ब्राह्मण, आरण्यकें व उपनिषदें यांचा अशा रीतीनें यथाक्रम विकास झाला. त्या सर्वांस 'श्रुति' अशी संज्ञा आहे. तत्कालीन ऋषि हे यांतील मंत्रांचे 'कर्ते' नसून 'द्रष्टे' आहेत व वेद हे अपौरुषेय आहेत असा हिंदूंचा विश्वास आहे. याचा अर्थ बहुधा इतकाच असावा कीं, आर्य ऋषी तात्त्विक प्रश्नांवर एकाग्र चित्तानें विचार करीत ध्यानस्थ बसले असतां ते मंत्र त्यांच्या तोंडून सहजासहजीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रयत्नांवांचून प्रकट झाले. उपनिषत्कालीन आर्य हे वेदकालीन आर्यांप्रमाणें भाविक प्रार्थना करीत नसून तात्त्विक विचारांत व गूढ संशोधनांत निमग्न असत असें दिसतें. जगांतील अत्युच्च तत्त्वज्ञान उपनिषदांत पाहावयास सांपडतें. तें वाचून जर्मन पंडित शोपेनहायर यानें 'उपनिषदें हीं माझ्या जिवाची तळमळ शांत करण्यास कारणीभूत झालीं' असे उद्‌गार काढले.

परंतु अशा रीतीनें, धर्मग्रंथांचा विस्तार झाला असला तरी, एकंदरींत आचारप्रधान धर्मास थोडेसें निराळें वळण लागलें असें म्हणावें लागतें. उच्च तात्त्विक विचार हे थोड्या लोकांपुरते असतात. धार्मिक विधि बहुजन समाजांत दृढमूल होतात. त्यामुळें या विधीचें कालान्तरानें इतकें महत्त्व वाढलें कीं, मूळ भावनेचा लोप होऊन कर्मठपणा मात्र शिल्लक राहिला! यज्ञयागादि कृत्यांतच धर्म सांठवलेला आहे अशी सामान्य लोकांची कल्पना होऊं लागली.

८. इतर शास्त्रें :—समाज व धर्म ह्या शास्त्रांखेरीज गणित, व्याकरण, ज्योतिष वगैरे शास्त्रांचाही त्या काळीं निःसंशय उदय झालेला होता; परंतु ह्या सर्व शास्त्रांस आर्य लोक वैदिक धर्माचीं उपांगें म्हणून मानीत असत. यज्ञाची वेळ अचूक ठरवितां यावी म्हणून आकाशांतील नक्षत्रांची पाहणी करून आर्यांनीं कालगणना सुरू केली. यज्ञमंडल बरोबर काढतां यावें म्हणून भूमितीचा उदय झाला. वेदांतील ऋचा स्पष्ट म्हणतां याव्यात म्हणून व्याकरण व वर्णोच्चारादींचे नियम तयार झाले. दशांशाची पद्धति ही मूळ आर्यांचीच. अरब ती आर्यांपासून शिकले. त्यांनीं ती ग्रीक लोकांस शिकविली. तेथून तिचा युरोपांत प्रसार झाला.

९. समालोचन :—एकंदरीनें पाहतां या कालांतील आर्यांचें राष्ट्र हें वर्धिष्णु राष्ट्र होतें. पराक्रमी लोक हे नेहमीं आपल्या राज्याचा विस्तार जगभर पसरवीत असावयाचेच. या तत्त्वास आर्य तरी कसे अपवाद सांपडतील ? यापुढील काळांत आर्यसंस्कृतीचा सर्व भारतवर्षभर कसा प्रसार झाला तें पुढील भागांत पाहावयास मिळेल.

प्रश्न

१. 'महाभारत हा आर्यांचा ज्ञानकोशच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं' या वाक्याचें सटीक विवेचन करा. २. चार वेदांची उत्पत्ति कशी झाली ? 'वेद अपौरुषेय आहेत' या वाक्याचा अर्थ काय ? ३. चातुर्वर्ण्य व चार आश्रम यांवर टिपणें लिहा. ४. ब्राह्मण, उपनिषद, आरण्यक, संहिता, श्रुति या शब्दांचे अर्थ सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(१) कै. चिं. वि. वैद्य यांचें 'महाभारताचा उपसंहार' हें पुस्तक वाचा. (२) पृ. ४७ वर 'कृष्णाचें राजकारणपटुत्व' पासून पृ. ४८ वर 'पापांचा शेवट स्पष्ट दाखविणारें' येथपर्यंत उल्लेखिलेल्या गुणदोषांचे प्रसंग समजावून घ्या. (३) कै. न. चिं. केळकर कृत 'सुरस भारत कथा' (अ. वि. गृह प्रकाशन, पुणें), कै. आपटेकृत 'बालरामायण' हीं पुस्तकें वाचा.

माहितीसाठी

"पृथ्वीचें ब्रह्म म्हणून पालन करीन"

[प्राचीन राज्यपद्धतीप्रमाणें प्रत्येक राजाला सिंहासनारूढ होतांना प्रतिज्ञा घ्यावी लागे. पृथुराजाला कोणती प्रतिज्ञा घ्यावी लागली याचा उल्लेख महाभारतांत शांतिपर्व अध्याय ५९ मध्यें (श्लोक १०३–१०७) आला आहे.] पृथूला सांगितलें जातें कीं

"प्रिय आणि अप्रिय भावना व व्यक्तिगत मनोविकार हे टाकून देऊन यच्चयावत् प्राणीमात्राशीं समबुद्धीनें वागलें पाहिजे. काम, क्रोध, लोभ, मान या भावना बाजूस ठेवून 'प्रजारक्षण' करणें हेंच तुझें कर्तव्य होय. शाश्वत धर्माचें स्वरूप ध्यानांत घेऊन जो कोणी आपल्या कर्तव्यापासून विचलित होईल त्याचा स्वतःच्या बाहुबलानें तूं निग्रह केला पाहिजेस. तूं मनानें, वाणीनें व कर्मानें या पृथ्वीला ब्रह्म समजून तिचें सतत पालन करीन अशी प्रतिज्ञा कर. दण्डनीतीच्या आधारानें नित्यधर्माचें निःशंक मनानें परिपालन करण्याची तूं प्रतिज्ञा कर."

जलप्रलयाची भारतीय कथा

ही कथा प्रथम शतपथ ब्राह्मण या ग्रंथांत आलेली आहे : मनू संध्या करीत असतां त्याच्या हातांत एक मासा आला. त्यानें मनूस आपले प्राण रक्षण करून सोडून देण्याची विनंति केली. दयाळू मनूनें त्यास सोडून दिलें. तेव्हां माशानें त्यास एक नाव तयार करावयास सांगितलें. लवकरच जलप्रलय झाला, तेव्हां मनू त्या नावेंत बसला व माशानें मनूची नौका उत्तरेकडील पर्वताच्या कडेला लावली. तेथपासून सृष्टीच्या उत्पत्तीस पुनः प्रारंभ झाला. बायबलमधील जलप्रलयाच्या कथेचें (पृ. २५) या कथेशीं बरेंच साम्य आहे. पण शतपथ ब्राह्मण बायबलच्या जुन्या करराहून अधिक प्राचीन आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ४ था

आर्यसंस्कृतीचा देशभर प्रसार

(इ. स. पू. ८०० ते इ. स. पू. ३२०)

१. **राज्यविस्तार** :—अतिप्राचीन कालाच्या या चौथ्या विभागांत आपणांस सर्व भारतभर स्थापन झालेल्या राज्यांचीं नांवें मिळतात. कारण मगध (बिहार), अंग (पश्चिम बंगाल), वंग (पूर्व बंगाल), कलिंग (ओरिसा), अवंति (माळवा), सौराष्ट्र (काठेवाड), आंध्र (दक्षिण भारताचा मध्यभाग), चोल (कारोमांडेल), चेर (मलबार), पांडच (मदुरा), इत्यादि राष्ट्रांचा तत्कालीन इतिहासग्रंथांत उल्लेख सांपडतो. या सर्व राज्यांची, विशेषतः दक्षिणेंतील राज्यांची, संगतवार माहिती आपणांस विशेष उपलब्ध नाहीं. मधून मधून अंधारांत चमकणाऱ्या काजव्याप्रमाणें कांहीं प्रामुख्यानें माहीत असलेल्या गोष्टींवरून तत्कालीन स्थितीवर प्रकाश पडतो. तेवढयावरून देखील आपणांस अंदाज बांधतां येतो कीं, हीं राज्यें हल्लींच्या यूरोपियन राष्ट्रांहून फारशीं लहान नव्हतीं. कलिंगाच्या राजाजवळ साठ हजार व आंध्राच्या पदरीं एक लाख पायदळ होतें यावरून त्यांच्या ऐश्वर्याची कांहींशी कल्पना येईल.

२. **'आर्य' कीं 'हिंदु' ?** :—हीं सर्व राज्यें आर्यांनींच स्थापिलीं असें दिसत नाहीं. संस्कृतीचा प्रसार करण्यास कांहीं धाडशी आर्य दक्षिणेंत आले व त्यांची छाप तेथील लोकांवर पडून त्यांनीं त्या संस्कृतीचा स्वीकार केला. म्हणून या राज्यांस आर्यांचीं राज्यें म्हणण्यापेक्षां 'हिंदूंचीं राज्यें' हें व्यापक नांव देणें जास्त योग्य होईल. ह्या संस्कृतीच्या प्रसाराबरोबर संस्कृतीचें मूळचें शुद्ध स्वरूप राहणें शक्य नव्हतें, कारण जेव्हां दोन भिन्न समाज एकत्र येऊन त्यांचें संघटन सुरू होतें, तेव्हां एकमेकांचे एकमेकांवर परिणाम झाल्याखेरीज राहात नाहींत. श्रेष्ठ संस्कृति कनिष्ठ संस्कृतीवर मात करते हें खरें असलें तरी कनिष्ठ संस्कृतीचें सर्वस्वीं उच्चाटन होत नाहीं. कित्येकदां संस्कृतीचा प्रसार यशस्वी करून दाखविण्यासाठीं त्या संस्कृतीच्या प्रसारकांस थोडेसें समावेशक धोरण स्वीकारून आपल्या संस्कृतीशीं अविरोधक अशा दुसऱ्या संस्कृतींतील कित्येक गोष्टी समाविष्ट करून घ्याव्या लागतात व त्यामुळें मूळ संस्कृतीचें शुद्ध स्वरूप टिकत नाहीं. म्हणून ह्यापुढें आपण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृतीच्या प्रसाराचें वर्णन करतांना 'आर्यसंस्कृति' असा शब्द न वापरतां 'हिंदु संस्कृति' हें अधिक व्यापक नांव स्वीकारलें पाहिजे.

३. मगध:—वर दिलेल्या राज्यांपैकीं मगधचा विशेष प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे. महाभारतकालीं जरासंध हा मगध देशाचा राजा होता. त्यानंतर झालेल्या एकंदर सत्तावीस राजांची नांवनिशी मात्र आपणांस उपलब्ध आहे. इ. स. पू. सातव्या शतकांत शिशुनाग हा मगध देशाचा राजा झाला. म्हणून पुढें या राजघराण्यास शिशुनागाचें घराणें हें नांव पडलें. शिशुनागांचा पांचवा राजा बिंबिसार (इ. स. पू. ५८२ ते ५५४) मगध देशावर राज्य करीत असतां* प्रसिद्ध बौद्धधर्मसंस्थापक महात्मा गौतम बुद्ध व जैनधर्मसंस्थापक महावीर वर्धमान यांनीं आपापल्या धर्मप्रसारास सुरुवात केलेली होती. बिंबिसारचा मुलगा अजातशत्रु (इ. स. पू. ५५४ ते ५२७) यानें या दोघांचाही मोठा सन्मान केला. अजातशत्रूचा मुलगा दर्शक (इ. स. पू. ५२७ ते ५०३) हा मगध देशावर राज्य करीत असतां इराणचा राजा दारियस यानें आपला सरदार स्कायलॅक्स यास हिंदुस्थानवर स्वारी करण्यास पाठविलें व त्यानें पंजाब ते सिंधपर्यंतची वायव्य सरहद्द इराणच्या राज्यास जोडली. परंतु दारियसचा अंमल तेथें फार दिवस टिकूं शकला नाहीं.

४. नंद:—अजातशत्रूनंतर शिशुनागांच्या वंशांत दर्शक, उदय, नंदिन, इत्यादि राजे झाले व इ. स. पू. ४१३ सालीं शिशुनागांचें घराणें बुडालें व त्याच्या जागीं नंद राजे राज्य करूं लागले. त्यानंतर नव्वद वर्षांत नंद घराण्याचे नऊ राजे झाले. शेवटीं चंद्रगुप्तानें कौटिल्य ऊर्फ चाणक्य या प्रसिद्ध मुत्सद्द्याच्या मदतीनें इ. स. पू. ३२१ सालीं मगध देशावर स्वारी केली, तेथील धनानंद नांवाच्या राजास ठार मारून नंदांना धुळीस मिळविलें व आपण मगध देशाचा राजा झाला. पुढें इ. स. पू. ३१५ पर्यंत बहुतेक उत्तर भारत काबीज करून त्यानें भारतांत मोठें साम्राज्य स्थापन केलें. ऐतिहासिक कालांतील हें पहिलें मोठें साम्राज्य होय. नंदाबरोबरच भारताच्या इतिहासांतील अतिप्राचीन कालाचा शेवट झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

५. अलेक्झांडरची स्वारी:—नंदांचा शेवटचा राजा महापद्मानंद राज्य करीत असतां मॅसिडोनियाचा पराक्रमी राजा अलेक्झांडर ऊर्फ शिकंदर यानें

*महाभारतकालीन जरासंधापासून बिंबिसारापर्यंत एकूण तेहतीस राजे होतात. या हिशेबानें जरासंध हा बिंबिसारापूर्वी ७-८शें वर्षें तरी झाला असला पाहिजे. महाभारताचा काल इ. स. पू. १३०० हा या विचारसरणीवर आधारलेला दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतावर स्वारी केली. इ. स. पू. ३२९ सालीं तो काबूलपर्यंत आला. परंतु पुढें येण्याऐवजीं तो परत गेला. पुनः दोन वर्षांनीं म्हणजे इ. स. पू. ३२७ च्या उन्हाळ्यांत तो भारताच्या वायव्य सरहद्दीपलीकडे आला. त्याचें सैन्य अजमासें पंचवीस ते तीस हजारांचें होतें व यांत मुख्यतः घोडे-स्वारांचा भरणा होता. सिंधु नदी ओलांडण्यापूर्वी त्यानें तिकडच्या डोंगराळ मुलुखांतील टोळ्यांचा बंदोबस्त केला. कारण त्यांना पाठीवर ठेवून भारतांत शिरल्यास आपल्या देशाशीं दळणवळण तुटण्याची त्याला धास्ती वाटत होती.

यानंतर पुढील वर्षीच्या उन्हाळ्यांत त्यानें अटक शहराच्या उत्तरेस १६ मैलांवर ओहिंड गांवाजवळ सिंधु नदी ओलांडली व तो तक्षशिलेच्या* राज्यांत आला. पंजाबांत त्या वेळीं अनेक लहान लहान राज्यें होतीं व तेथील राजांचें एकमेकांशीं वैर होतें. तक्षिलेचा राजा अंभी याचें त्याच्या शेजारीं झेलम व जिनाब ह्या नद्यांमधील प्रदेशावर राज्य करणाऱ्या पौरव (पोरस) राजाशीं वांकडे होतें. तेव्हां अंभीनें अलेक्झांडरशीं युद्ध करण्याऐवजीं त्याचा सत्कार केला व त्यास पौरवाबरोबर लढण्यासाठीं पांच हजार स्वारांची मदत केली. तक्षिला येथें अलेक्झांडरनें मुक्काम केला व तेथून आसपासच्या राजांना शरण येण्याबद्दल निरोप पाठविले. तक्षिला हें शहर त्या कालीं भरभराटींत असून वेदविद्येचें आगर होतें. तक्षिलेजवळच्या अरण्यांत अनेक योगी योगसाधन करीत बसले आहेत असें ऐकून अलेक्झांडरनें आपल्या सरदारांमार्फत त्यांची चौकशी केली व त्यांची विद्या अवगत करून घेण्याची इच्छा दर्शविली. त्यासाठीं त्यानें त्यांच्यापैकीं एकास आपल्याबरोबर येण्यास विनंति केली. परंतु साधूंनीं त्याच्या निरोपाकडे दुर्लक्ष केलें. पण एकजण मात्र मोठ्या कष्टानें त्याजबरोबर येण्यास तयार झाला. परंतु अलेक्झांडर भारतांत असेपर्यंतच तो त्याजबरोबर होता; अलेक्झांडर स्वदेशीं जाऊं लागतांच त्यानें चिता रचून प्राण दिला व अलेक्झांडरबरोबरच जगाचाही निरोप घेतला. असो. अलेक्झांडर तक्षिलेहून पूर्वेकडे निघाला व पौरव राजा शरण येत नाहीं असें पाहून त्यानें त्याजवर अंभीच्या मदतीनें स्वारी करण्याचें ठरविलें. पौरव मोठ्या तयारीनिशीं आपल्या सरहद्दीवर झेलमच्या (हिला तत्कालीन पाश्चिमात्य ग्रंथकार हिडॅस्पिस म्हण-

---

*तक्षशिला किंवा तक्षिला हें शहर हल्लींच्या रावळपिंडीच्या वायव्येस सुमारें दहा मैलांवर आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वी पुराणवस्तुसंशोधन खात्यातर्फे संशोधन चालू असतां जमीन उकरतांना तक्षिला नगरीचे बरेच अवशेष तेथें सांपडले होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तात.) डाव्या तीरावर येऊन बसला. अलेक्झांडर उजव्या तीरावर होता. दोघांच्या मध्यें झेलम नदी असून तिला पूर आलेला होता. पुष्कळ दिवस दोन्ही सैन्यें समोरासमोर होतीं. पुढें एके दिवशीं अलेक्झांडरनें नदीच्या उगमाच्या बाजूनें वीस मैल जाऊन तेथें नदीस उतार आहे हें पाहिलें व तेथून आपलें सैन्य नदीच्या डाव्या तीरावर आणलें. अशा रीतीनें दोन्ही सैन्यें एकाच तीरावर समोरासमोर आलीं. पौरवाजवळ कांहीं हत्ती होते, परंतु अलेक्झांडरच्या घोडेस्वारांची संख्या त्याच्या घोडेस्वारांहून अधिक होती. दोन्ही सैन्यांची निकराची लढाई झाली. तींत अलेक्झांडरचा जय झाला. युद्धानंतर पौरवानें अलेक्झांडरचें स्वामित्व कबूल केल्यावर अलेक्झांडरनें त्याचें राज्य खालसा न करतां त्यास परत दिलें.

पुढें अलेक्झांडर आणखी पूर्वेकडे सरकला व सतलजपर्यंत पंजाबांतील सर्व नद्या त्यानें ओलांडल्या. मगध देशाची कीर्ति त्याच्या कानांवर गेली होती व तिकडे जाण्याचें त्याच्या मनांतही होतें. गंगेच्या कांठचीं राज्यें पंजाबांतील राज्यांपेक्षां मोठीं होतीं. मगधाचें राज्य तर त्या काळीं विशेष जोरदार होतें. तेव्हां अलेक्झांडर त्याच्याशीं लढण्यास आला असता तर बहुधा त्याची डाळ शिजली नसती. तो अगोदरच आपल्या देशापासून तीन हजार मैलांवर आलेला होता. त्याला स्वारीवर निघून अडीच वर्षें झालीं होतीं. त्याच्या राज्यांत बंड उपस्थित होण्याचा संभव होता. कंदाहारमध्यें बंड उद्भवल्याची बातमीही आली होती. हवा अतिशय उष्ण होती. शिवाय सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सैनिक विथरले व ते त्याजबरोबर पुढें येण्यास तयार होईनात. तेव्हां त्यानें परत फिरण्याचें ठरविलें (इ. स. पू. ३२५). जातांना तो आल्या मार्गानें न जातां जलमार्गानें झेलम नदींतून दक्षिणेस सिंधूपर्यंत, तेथून तिच्या मुखापर्यंत व पुढें समुद्रमार्गानें किनाऱ्या किनाऱ्यानें इराणच्या आखातापर्यंत गेला. अलेक्झांडर इ. स. पू. ३२३ सालीं जून महिन्यांत बाबिलोन येथें आपल्या वयाच्या बत्तिसाव्या वर्षी मरण पावला.

६. त्याच्या स्वारीसंबंधीं सामान्य विचार :—शिकंदरची स्वारी हा आशिया व यूरोप ह्यांच्या इतिहासास जोडणारा पहिला नक्की माहीत असलेला दुवा होय.* ह्या स्वारीचें ग्रीक इतिहासकारांनीं जें तपशीलवार

***डायोनिशस :** भारतावर स्वारी करणारा अलेक्झांडर हा पहिलाच ग्रीक राजा नव्हे. भारताच्या सरहद्दीवर हिंदुकुशच्या पायथ्याशीं निसा नांवाच्या गांवीं अलेक्झांडर येऊन पोहोंचला असतां तेथील लोकांनीं त्यास सांगितलें कीं, 'आम्ही तुमचेच भाऊबंद आहोंत. फार प्राचीन काळीं डायोनिशस या

(पुढील पृष्ठावर पहा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्णन लिहून ठेविलें आहे त्या माहितीवाचून ह्या कालांतील इतिहास जुळविणें अतिशय कठिण झालें असतें. पाश्चिमात्य इतिहासकार या स्वारीस फार महत्त्व देतात. परंतु पुढील काळांत झालेल्या तैमूरलंगाच्या किंवा नादीरशहाच्या स्वाऱ्या यांहून ह्या स्वारीस अधिक महत्त्व नाहीं. ह्या स्वारींत अलेक्झांडरच्या ग्रीक शिपायांनीं ठिकठिकाणीं जी प्राणहानि केली त्यावरून तर ह्या स्वारीचें पुढें झालेल्या इस्लामधर्मीयांच्या स्वाऱ्यांशीं दाखविलेलें साम्य अधिकच अनुरूप ठरतें. अलेक्झांडरनें पौरवाचा पराभव केला खरा, परंतु पौरव हा तत्कालीन चक्रवर्ती किंवा सर्वांत प्रबळ राजा नव्हता. अले-

---

(मागील पृष्ठावरून चालू)

ग्रीक राजानें भारतावर स्वारी केली, त्याच्याबरोबर आमचे पूर्वज येथें आले व स्थायिक झाले.' निसा गांवच्या लोकांनीं युद्धाची आपत्ति टाळण्यासाठीं ही नातें जोडण्याची शक्कल लढविली असावी असें कित्येकांस वाटेल; पण प्राचीन ग्रीक पुराणांतून डायोनिशसनें भारतावर स्वारी केल्याचें वर्णन आहे. डायोनिशसनें विजय संपादन केल्यावर येथें आपला एक प्रतिनिधि नेमला. तेव्हांपासून चंद्रगुप्त मौर्यापर्यंतच्या (इ. स. पू. ३२१) ६४५१ वर्षांच्या प्रदीर्घ कालांत भारतांत एकंदर १५३ राजे होऊन गेले. चंद्रगुप्ताच्या दरबारीं आलेल्या मेगॅस्थिनीसला ही राजांची याद पाटलिपुत्र येथें देण्यांत आली होती असें नमूद आहे. पण ती यादी आज मात्र कोठेंच उपलब्ध नाहीं.

ग्रीक पुराणांनीं वर्णिलेल्या या डायोनिशसचा धागादोरा भारतीय पुराणांत कोठें तरी लावण्याचा यत्न अनेक विद्वानांनीं चालविलेला आहे, पण त्यांत त्यांना म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं. कित्येकांच्या मतें डायोनिशस म्हणजे शिव, तर कुणाच्या मतें डायोनिशस म्हणजे दक्ष राजा होय. कोणी म्हणतात कीं, तो वैवस्वत मनु होय. अलीकडे प्रा. र. दा. करमरकर यांनीं डायोनिशस हा दुसरा तिसरा कोणी नसून तो देव नहुष होय असें प्रतिपादन केलें आहे. त्यांच्या मतें देव नहुष हें डायोनिशस या ग्रीक शब्दाचें संस्कृत रूपांतर होय. वायुपुराणांत नहुष हा वैवस्वत मनूचा मुलगा होय असें म्हटलें आहे. अशा रीतीनें ग्रीक व भारतीय पुराणावर आधारलेल्या माहितीच्या आधारें संशोधक इतिहासाच्या अज्ञात दालनावर नित्य नवा प्रकाश टाकीत असले तरी त्यांस अजून निश्चित स्वरूप प्राप्त झालें नाहीं. अलेक्झांडरच्या फार पूर्वी कदाचित् कित्येक शतकेंही डायोनिशस भारतावर चाल करून आला होता या ग्रीक पौराणिक कथेंत बरेंच तथ्य असावें असें मानण्याचा अलीकडील विद्वानांचा कल आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्झांडर पुढें चाल करून न गेल्यानें त्याची विजयपरंपरा अबाधित राहिली एवढें मात्र खरें! तक्षिलेच्या अंभी राजानें अलेक्झांडरचा मार्ग सुगम केला व याच प्रकरणाची पुनरावृत्ति भारताच्या इतिहासांत अनेक वेळां पाहावयास सांपडते! अलेक्झांडर परत फिरल्यावर अवघ्या पांच वर्षांत त्यानें जिंकलेले प्रांत स्वतंत्र झाले. त्याच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं त्याचा सेनापति सेल्यूकस याचा सम्राट् चंद्रगुप्तानें पराभव केला व जणूं काय पौरवाच्या पराभवानें झालेल्या मानहानीचा वचपा भरून काढला. एकंदरींत पाहतां अलेक्झांडरच्या विजयाचा सेल्यूकसच्या पराभवानें संक्षेप उडतो व त्यावरून तत्कालीन भारतीय राजे हे यूरोपियन राजांशीं युद्धांत तुल्यबल होते असें अनुमान काढावेसें वाटतें.

७. समाजस्थिति :—अलेक्झांडरच्या स्वारीचें वर्णन झाल्यावर आपण तत्कालीन समाजस्थितीकडे वळूं. तत्कालीन समाजस्थितीचें मुख्य लक्षण म्हणजे आर्यांचे आर्येतरांशीं होऊं लागलेलें वाढतें दळणवळण होय. संस्कृति-प्रसारार्थ हिंदुस्थानभर गेलेल्या आर्यांना तेथील इतर लोकांशीं संबंध ठेवणें भाग पडलें व त्यांनीं आर्यसंस्कृतीचा स्वीकार केल्यावर त्यांच्यांत शरीरसंबंधही झाले. ह्यामुळें समाजनियमनांत अनेक भानगडीचे प्रश्न उत्पन्न झाले. शुद्ध आर्य रक्ताचे लोक आपणांस इतरांहून श्रेष्ठ समजत व आपले व्यवहार इतरांहून अलग ठेवीत. रक्ताच्या शुद्धाशुद्धतेच्या कमीअधिक प्रमाणावर त्या त्या व्यक्तीचा श्रेष्ठकनिष्ठपणा ठरूं लागला. समाजनियमनांत विषमता उत्पन्न झाली व एकमेकांपासून भिन्न असे जातिबंद वर्ग समाजांत निर्माण झाले. धंद्यानें ठरून जाणाऱ्या आजच्या अनेकविध जाती व उपजाती त्या कालीं उत्पन्न झाल्या नव्हत्या हें खरें; परंतु पूर्वीं जें केवळ गुणकर्मावरून समाजाचें वर्गीकरण होई त्यांत रक्ताच्या शुद्धाशुद्धतेमुळें होणाऱ्या जाति-भेदाची भर पडली. चातुर्वर्ण्यावर जातिभेदाचें पुट चढलें!

८. आर्थिक जीवन :—आर्यांचा सर्व देशभर प्रसार होत असतां देशाची सांपत्तिक स्थिति एकसारखी सुधारत होती व त्यांचें आर्थिक जीवन अधिकाधिक सुसंघटित होत होतें. नुसती शेती किंवा गोधन एवढ्यावरच लोकांचा चरितार्थ चालत नसे. निर्वाहाच्या साधनांत विविधता उत्पन्न झाली व श्रमविभागाच्या तत्त्वावर त्यांची विभागणी झाली. लोहार, कुंभार, सुतार, सोनार, माळी असे अठरा पगड लोक आपापले धंदे करूं लागले. या प्रत्येक धंदेवाल्यांची एक सभा असे. तींतून पंच व सरपंच यांची निवड होई, व ते त्या धंद्याचें नियमन करीत. कोणत्याही धंद्यांत उमेदवार म्हणून शिरण्याचे कांहीं नियम ठरलेले असत व आपापल्या धंद्यावर उपजीविका करणारास धंद्याचे नियम पाळावे लागत. कोणीं वाईट माल पुरवला तर सभेकडे तक्रार होई. कित्येक मोठ्या शहरांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या धंदेवाल्यांच्या पेठा बनत. अशा रीतीनें लोहार आळी, शिंपी आळी, तांबट आळी व नंतरच्या काळांत कागदीपुरा असे नगरविभाग निर्माण झाले. नुसत्या धंद्यांतच नव्हे तर व्यापारांतही अशा प्रकारचें सामुदायिक नियंत्रण असे. व्यापाऱ्यांच्या मुख्यास श्रेष्ठी म्हणत. त्यावरूनच शेटजी हा शब्द निघाला आहे. या व्यापाऱ्यांचा परदेशाशीं व्यापार चाले. एकएका जहाजांत शंभर माणसें बसून जात व तीं नजीकच्या लंका, जावा वगैरे प्रदेशांशीं व्यापार व्यवहार करून परत येत. धंदेवाइकांच्या सभा व व्यापारीसभा यांनीं केलेल्या नियमास राजे लोक मान देत. एखादा तंटा राजे लोकांकडे निर्णयास आल्यास तद्विषयक पंचायतीचा त्यासंबंधीं काय निर्णय आहे याचा राजा अगोदर शोध घेई व पंचांच्या निकालास मान्यता देण्याकडे त्याचा बहुवंशीं कल असे. अशा रीतीनें पंचायतव्यवस्था लोकमान्यता व राजमान्यता पावलेली असल्यामुळें तिच्या द्वारें समाज कसा संघटित राहात असेल याची सहज कल्पना येण्यासारखी आहे. कालांतरानें हे सर्व धंदेवाईक आजच्या अर्थानें जातिबद्ध होत गेले.

९. धर्म :—वेद व त्यांवरील टीका ह्यांचा विस्तार फार झाला. छापण्याची कला माहीत नसल्यानें सर्व विद्या मुखोद्गत करण्याकडे जुन्या काळीं भर असे. म्हणून या कालांत 'सूत्रां'चा उदय झाला, व त्यांच्या साहाय्यानें मोठमोठे मंत्र थोडक्या शब्दांत ध्यानात ठेवणें सोपें झालें, विद्यार्थिदशेंत या सूत्रांचें शिक्षण मिळत असे. अखिल विद्या गुरुमुखानें श्रवण करून मुखोद्गत करण्याची पद्धत असे. हीच परंपरा आजपर्यंत अबाधित चालू राहिल्यानें आज अडीच हजार वर्षें ह्या विद्येचें अनेक स्थित्यंतरांतून रक्षण झालें आहे. ज्या सूत्रांमध्यें तत्त्वज्ञानविषयक माहितीचा समावेश झाला आहे तीं 'वेदान्त सूत्रें' होत. ह्यांखेरीज सूत्रें तीन प्रकारचीं आहेत : (१) यज्ञादिक कृत्यां-संबंधींचीं तीं 'श्रौतसूत्रें' होत, (२) श्राद्धादि गृहकृत्यांबद्दलचीं तीं 'गृह्य-सूत्रें' व (३) समाजनियमन करणाऱ्या कायद्यास 'धर्मसूत्रें' अशा संज्ञा असत. धर्मसूत्रांवरून तत्कालीन कायद्यांचा जो बोध होतो तो वर समाज-स्थितिबद्दलच्या काढलेल्या अनुमानांस धरूनच आहे. ब्राह्मणांस फार मान असे. शूद्रानें वरिष्ठ जातीचा अपमान केल्यास त्यास कडक शिक्षा होई. आर्यांच्याकरितां असलेल्या कायद्यांहून आर्येतरांस लागू असलेले कायदे जास्त कडक असत.* सती जाण्याची चाल नव्हती. विवाहाचे ब्राह्म, गांधर्व, आसुर व राक्षस इत्यादि प्रकार रूढ होते. ब्राह्मविधींत वधूचा पिता

* सुधारलेल्या देशांतही जेते हे जितांच्याकरितां व मागासलेल्या लोकां-करितां निराळे कडक कायदे करतात. तात्त्विक दृष्ट्या याचें अर्थातच समर्थन करतां येणें शक्य नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुरूप वराची निवड करून त्यास आपली कन्या अर्पण करतो, गांधर्वविधींत स्त्रीपुरुषांच्या परस्परसंमतीनें विवाह होतो, आसुरविवाहांत पुरुष वधूच्या पालकास द्रव्य देऊन तिच्याशीं लग्न लावतो व राक्षसविवाहांत वधूचें बलात्कारानें हरण केलें जातें. या सर्वांत ब्राह्मविवाह श्रेष्ठ मानला जात असे; परंतु इतर विवाहही रूढ असत. पुनर्विवाहास ठराविक परिस्थितींत परवानगी असे. यावरून हें उघड दिसतें कीं, निरनिराळ्या समाजाच्या विवाहपद्धती त्या त्या समाजापुरत्या हिंदु संस्कृतींत समाविष्ट करून घेतलेल्या होत्या. व्याजाचा दर शेंकडा १५ टक्के होता. दत्तक घेण्याची परवानगी होती. वारसाचे नियम ठरवून दिलेले असत.

१०. इतर शास्त्रें :—धर्माचीं उपांगें म्हणून असलेल्या इतर शास्त्रांत त्या कालीं बरीच प्रगति झालेली होती. आद्य व्याकरणकर्ता व अष्टाध्यायी या ग्रंथाचा कर्ता पाणिनि हा इ. स. पू. सातव्या किंवा आठव्या शतकांतील होय. आर्यवैद्यकास प्रमाणभूत असा चरकग्रंथही या वेळींच तयार झालेला होता. शिकंदरास आपल्या पदरीं एक वैद्य बाळगणें जरूर पडलें, असें वर्णन आहे. तात्त्विक विचारासंबंधीं तर आश्चर्यकारक प्रगति झालेली होती. सांख्य, योग, न्याय व मीमांसा इत्यादि निरनिराळ्या मतांचे ग्रंथ त्या काळीं तयार झाले होते.

११. समालोचन :—(१) वरील सर्व शास्त्रांची वाढ ही आर्यांच्या शोधक बुद्धीची साक्ष पटविते, (२) या शास्त्रांना धर्माचीं उपांगें मानणाऱ्या आर्यांचो निरहंकारबुद्धि अभिमानास्पद वाटते, व (३) बहुतांशीं शांततेच्या मार्गानें आर्यसंस्कृतीचा झालेला आसेतुहिमाचल प्रसार जगाच्या इतिहासांत बिनतोड दिसतो. तो सर्वस्वीं निर्दोष नव्हता हें वरील विवेचनावरून लक्षांत येईलच. हे दोष काढून टाकण्याचें कार्य कोणीं केलें तें आपण पुढील भागांत पाहूं.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

१. अलेक्झांडरच्या भारतावरील स्वारीचें वर्णन करून ती महत्त्वाची कां मानतात तें सांगा. २. "इ. स. पूर्वी ८०० ते इ. स. ३२० या काळांतील अनेक शास्त्रांतील आर्यांची प्रगति पाहिली असतां आर्यांच्या बुद्धीची साक्ष पटते" हें विधान सिद्ध करा. ३. चातुर्वर्ण्य व जातिभेद यांतील फरक सांगा. ४. पंचायत सभेचें महत्त्व सांगा. ५. हिंदूंत विवाहाचे विविध प्रकार रूढ झाले याचें रहस्य सांगा. ६. वेदांइतके प्राचीन ग्रंथ यूरोपांत कां उपलब्ध नाहींत त्याचीं संभवनीय कारणें सांगा.

अभ्यास

(१) 'पाश्चात्य पुरुषश्रेठ' लेखक : प्रा. श्री. म. माटे यांतील शिकंदरचें चरित्र वाचा. (२) पौरवाच्या पराभवानंतर त्याची व शिकंदराची भेट झाली या प्रसंगाचें रेखाचित्र काढा. (३) "तक्षिलेच्या अंभी राजानें अलेक्झांडरला पौरवाच्या विरुद्ध मदत केली; याच प्रकाराची पुनरावृत्ति भारताच्या इतिहासांत अनेक वेळां पाहावयास सांपडते." याचा अर्थ स्पष्ट करा. (४) शिकंदराप्रमाणें अल्प वयांत कीर्ति करून मृत्यु पावलेल्या हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन थोर पुरुषांची नोंद करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ५ वा

बौद्ध व जैन धर्मांचा उदय

(इ. स. पूर्वी ६ वें शतक)

१. **बौद्ध धर्माच्या उदयाचीं कारणें**:—मागील भागांत सांगितल्या-प्रमाणें आर्यसंस्कृतीच्या वाढत्या प्रसाराबरोबरच तिच्यांत दोष उत्पन्न झाले. या जगांत चांगल्यावाइटाचें बेमालूम मिश्रण झालेलें आढळतें. सूक्ष्म दोष कालान्तरानें बळावत जातात. आर्यांनीं आर्येतरांना आपणांमध्यें समाविष्ट करून घेतलें व दिवसेंदिवस हा संमिश्रणाचा प्रकार वाढत्या प्रमाणावर होत गेला. धर्मासंबंधीं होणारे यज्ञयाग कालांतरानें इतके वाढले कीं, यज्ञाच्या निमित्तानें अनेक पशूंचा वध होऊं लागला व कर्मठपणाचें स्तोम माजून मूळ धर्मतत्त्वांचा लोप होऊं लागला. यज्ञानें मोक्ष मिळतो अशी समजूत झाल्या-मुळें स्वतःच्या आचरणांतील ढिलाईची पर्वा न करितां यज्ञविषयक कृत्यांतच लोक अधिकाधिक गुरफटूं लागले व दिवसेंदिवस वाढत चाललेल्या या कृत्रिमतेमुळें खऱ्या विचारवंतांचें समाधान होईना. यावर उपाय म्हणून उपनिषद्कारांनीं तपश्चर्येचा व तत्त्वचिंतनाचा मार्ग दर्शविला. परंतु उप-निषदांतील तत्त्वज्ञानानें विद्वानांची तहान भागली तरी तें सामान्य जनतेच्या आटोक्याबाहेरचें होतें. सामान्य जनतेस यज्ञाचें कर्मकांड असमाधानकारक वाटे व उच्च तत्त्वज्ञान अगम्य वाटे. अशा स्थितींत एकाद्या मधल्या व सुगम अशा विचारसरणीची समाजास भूक होती.

सारांश, जातिजातींतील विभाग, त्यांच्या नियमनांतील विषमता, मूळ धर्मतत्त्वांचा लोप, आचारांचा कृत्रिमपणा व तत्त्वचिंतनाची गूढता या सर्व दोषांमुळें बहुजनसमाज एक प्रकारच्या घुटमळणाऱ्या अवस्थेंत असतां महात्मा गौतम बुद्धाचा जन्म झाला. किंबहुना या दोषांचें निराकरण करणें हेंच त्याच्या आयुष्याचें कार्य होय.

२. **गौतमाचें चरित्र**:—नेपाळच्या दक्षिण सरहद्दीवरील प्रदेशांत शाक्य नांवाचे लोक वस्ती करून राहात असत. त्यांच्या पूर्वेस लिच्छवी लोकांचें व पलीकडे मगधांचें राज्य असून पश्चिमेस कोसल देश होता. शाक्यांची राजधानी कपिलवस्तु ही होती. तेथें शुद्धोदन नांवाचा त्यांचा नायक राज्य करीत असतां त्यास इ. स. पू. ५६३ सालीं एक पुत्र झाला. तोच गौतम बुद्ध होय. याचें मूळचें नांव सिद्धार्थ. हा आपल्या बापाचा एकुलता एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलगा होता. सिद्धार्थ मोठा होत चालला, तेव्हां त्याच्या बापानें त्यास उत्तम प्रकारें शिक्षण दिलें व तो धनुर्विद्येंत प्रवीण झाला. तो सोळा वर्षांचा असतांना धनुर्विद्येंतील आपल्या कौशल्यानें त्यानें एक कठिण पण जिंकला, तेव्हां त्याचें लग्न यशोधरा नांवाच्या राजकन्येशीं झालें. पुढें त्यास राहुल नांवाचा एक पुत्र झाला. अशा रीतीनें राजैश्वर्याचे सुखोपभोग अनुभविणारा सिद्धार्थ वास्तविक ख्यालीखुशालींत दंग असावयाचा, पण सिद्धार्थाचें मन ऐहिक बाबतींत फारसें रमलें नाहीं. तो सगळीकडे बारकाईनें पाहून विचार करीत असे. यज्ञानें मोक्ष कसा मिळेल ? यज्ञांत होणारी हत्या देवास आवडते काय ? समाजनियमनांतील अन्याय देवास संमत आहे काय ? वगैरे गोष्टींचा तो रात्रंदिवस विचार करी व समाधान न झाल्यानें त्याची याबद्दल तळमळ वाढूं लागली. शेवटीं असें सांगतात कीं, एके दिवशीं एका तरुणाचें प्रेत व एका महारोग्याची दशा पाहून आयुष्य हें नश्वर आहे असें ठरवून त्यानें संसारसुखावर लाथ मारली व अरण्याचा रस्ता धरला. परंतु या दंतकथेवजा तात्कालिक कारणानें त्याच्या अंतःकरणांत वैराग्य बाणलें असें मानण्यापेक्षां तो दीर्घ विचारांचा परिपाक

गांधार (कंदाहार) येथील बुद्धाचा पूर्णाकृति पुतळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होय असें मानणेंच अधिक सयुक्तिक होईल. अरण्यांतील एकान्तवासांत त्यानें सहा वर्षें अध्ययनांत व तपश्चर्येंत घालविलीं, तरी त्याची तळमळ शांत होईना. शेवटीं तो गयेस आल्यावर एका झाडाखालीं शांतपणें चिंतन करीत बसला असतां एकाएकीं त्यास दिव्य ज्ञान प्राप्त होऊन त्याची तळमळ शांत झाली. ज्या वृक्षाखालीं बसून सिद्धार्थाला दिव्य ज्ञान झालें त्यास 'बोधिवृक्ष' असें म्हणतात. त्याच्या खाणाखुणा अद्याप बुद्धगयेस कायम आहेत व त्यामुळें बुद्धगया हें जगांतील सर्व बौद्धधर्मीयांचें यात्रेचें पवित्र ठिकाण होऊन बसलें आहे. ह्याच बोधिवृक्षाची एक फांदी अशोकाची कन्या संघमित्रा हिनें बौद्ध धर्माच्या प्रसारार्थ सिंहलद्वीपांत (सीलोन) अनुराधापूर येथें लाविली.

३. उपदेश :—आत्यंतिक मोक्ष किंवा निर्वाण हें कोणत्याही बाह्योपचारांनीं साध्य होणारें नसून शुद्धाचरण, दया, प्रेम, परोपकार व अहिंसा यांवर अवलंबून आहे; व सर्व धार्मिक कृत्यांपेक्षां सद्वर्तन हेंच जास्त श्रेष्ठ आहे असें बुद्धास कळून आलें. स्वतःच्या अंतःकरणांत बिंबलेलें हें तत्त्व तो लोकांस शिकवूं लागला. त्याच्या उपदेशाचें सूत्र असें कीं (१) जीवित दुःखमय आहे, (२) त्या दुःखाला कारण आहे, (३) दुःखाचा शेवट झाला पाहिजे, (४) यासाठीं योग्य मार्ग शोधला पाहिजे. लोभ किंवा आसक्ति हें दुःखाचें मूळ होय, तिचें निर्मूलन झाल्यास दुःख निःशेष होईल. तत्कालीन परंपरागत धर्मकल्पना त्याच्या बुद्धीस पटेनात. यज्ञयागादि कृत्यानें मोक्षप्राप्ति होणार नाहीं, वेद हे अपौरुषेय नाहींत, म्हणून त्यांतील प्रत्येक वाक्य प्रमाण मानण्याचें कारण नाहीं व ब्राह्मणांना इतर वर्णांहून धार्मिक बाबतींत श्रेष्ठपणा देण्याचें कारण नाहीं, अशा अनेक मुद्यांवर त्यानें तत्कालीन धर्मकल्पनांवर हल्ला चढविला व स्वतः संन्यास घेऊन इतरांसही ती दीक्षा देण्यास सुरुवात केली. त्याच्या उपदेशाचा लोकांवर बराच परिणाम होऊन ते त्यास 'बुद्ध' म्हणजे ज्ञाता व महात्मा म्हणूं लागले व भराभर त्याच्या पंथांत शिरूं लागले. त्याच्या पंथांत तीन पायऱ्यांनीं प्रवेश होत असे. प्रथम गृहस्थाश्रमी राहून 'उपासक' व्हावयाचें, नंतर भिक्षुगतिक ह्या मधल्या अवस्थेंत कांहीं काळ गेल्यावर संन्यास घेऊन भिक्षु बनावयाचें. 'अर्हत्' हीच मोक्षाच्या बरोबरीची बौद्ध धर्मांतील अत्युच्च पदवी होय. बौद्ध धर्म हा निरीश्वरवादी आहे. बुद्धानें आपल्या धर्माचा प्रसार करतांना तीन गोष्टींवर विशेष जोर दिला :—(१) त्यानें स्त्रियांना बुद्धसंघांत भिक्षुणी म्हणून प्रवेश करण्याची परवानगी दिली, व अशा रीतीनें त्यांना वाटल्यास जन्मभर संन्यस्त वृत्तीनें व स्वतंत्रतेनें राहण्याचा मार्ग खुला केला, (२) तसेंच आपल्या पंथांत प्रवेश करणाऱ्यांच्या वर्णाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उच्चनीच भाव टाकून समतेची स्थापना केली, व (३) धार्मिक तत्त्वाची शिकवण संस्कृतसारख्या अवघड व थोड्याच लोकांस समजत असलेल्या भाषेंतून करण्याऐवजीं तत्कालीन जानपद भाषा जी पाली तिच्या द्वारें करण्यास सुरुवात केली. ह्यामुळें त्याच्या शिकवणुकीचा झपाट्यानें प्रसार झाला. त्यानें आपल्या अनुयायांना संन्यस्त वृत्तीनें राहून संघ बनविण्याचा उपदेश केला. अशा रीतीनें धर्मप्रसाराच्या कामीं संन्यासी भिक्षूंची संस्था अस्तित्वांत आणण्यांत त्याचें चातुर्य दिसून येतें. प्रत्येक अनुयायानें बुद्ध, धर्म व संघ या त्रयीवर दृढ विश्वास ठेवावयाचा असा त्याचा कडक दंडक असे. अक्रोधानें क्रोध जिंकावा, असाधूस (दुष्टास) साधुत्वानें जिंकावें, इतकेंच काय, पण आपलें वाईट इच्छिणाराचेंहि भलें करावें अशी त्याची शिकवण आहे. येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीचें या उपदेशाशीं बरेंच साम्य आहे. प्रत्येकानें आपलें शील उच्च ठेवावें, संन्यस्त वृत्तीनें राहावें व तात्त्विक विषयाचें चिंतन करावें हें बुद्धाच्या शिकवणुकीचें सार होय. ह्या त्रयीस बौद्ध धर्म वाङमयांत शील, समाधि व प्रज्ञा अशा संज्ञा आहेत. स्वमतप्रचारार्थ बुद्ध ठिकठिकाणीं हिंडला, परंतु हिंदूंनीं त्याच्या भिन्न मतांबद्दल त्याचा कधींही छळ केला नाहीं. उलट मगधाचा राजा अजातशत्रु ह्यानें तर त्याचा सन्मानच केला हें मागें सांगितलेंच आहे. भारताच्या इतिहासांत इ. स. पूर्वी सहाव्या शतकांत दिसून येणारी ही धार्मिक सहिष्णुता यूरोपच्या इतिहासांत इसवी सनाच्या सोळाव्या शतकांतही दिसून येत नाहीं. या बाबतींत यूरोप बावीसशें वर्षांनीं भारताच्या मागें होतें. आज बौद्ध धर्म हिंदु धर्माहून स्वतंत्र असला तरी, स्वतः गौतमाच्या मनांत नवीन धर्मस्थापनेपेक्षां हिंदुधर्मसुधारणेचाच हेतु प्रमुख होता असें दिसतें. कारण त्याच्या धर्मांतही इंद्र, वरुण इत्यादि देवता आहेतच. तो इ. स. पू. ४८३ सालीं आपल्या वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यु पावला.* भगवान् कृष्ण, येशू ख्रिस्त किंवा मुहंमद पैगंबर अशा पृथ्वीवरील थोर महात्म्यांत त्याची गणना केली पाहिजे.

४. **बौद्ध धर्मग्रंथ** :––त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या अनुयायांनीं राजगृह येथें आपली एक मोठी सभा बोलावून बुद्धाच्या सर्व उपदेशांचा संग्रह केला. त्या संग्रहास 'त्रिपिटक' हें नांव आहे. याचे धम्म, विनय, व अभिधम्म असे तीन भाग

---

*कित्येकांच्या मतें इ. स. पू. ५४३ हें त्याच्या मृत्यूचें वर्ष होय; व त्यावरून गौतमाचा जन्म इ. स. पू. ६२३ सालीं झाला असला पाहिजे असें ते समजतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. धम्मपदांत बुद्धानें केलेला उपदेश आहे, विनयामध्यें भिक्षूंच्या आचरणाचे नियम सांगितलेले आहेत, आणि अभिधम्मांत बौद्ध तत्त्वज्ञान ग्रथित केलेलें आहे. याखेरीज जातक कथांचा संग्रहही बौद्ध धर्मग्रंथांत समाविष्ट केला जातो. या कथा एकूण ५४० आहेत व त्यांचें स्वरूप पंचतंत्र-इसापनीतीसारखें मोठें मनोरंजक असल्यानें त्यांतील उपदेश सामान्य लोकांच्या मनावर चटकन् ठसतो. जातक म्हणजे जन्मासंबंधीं. गौतमाला 'बोधिसत्व' पद प्राप्त होण्यापूर्वीं एकूण ५४७ जन्मांतून जावें लागलें असें त्यांत म्हटलें आहे. या कथा निरनिराळ्या काळीं रचल्या गेल्या व नंतर कोणी त्यांचा एकत्र संग्रह केला असावा असा अंदाज आहे. या कथांत बौद्ध व बौद्धेतर साहित्याचें मिश्रण आहे. कारण बौद्ध व बौद्धेतर इतकें कडक वेगळेंपण त्या काळीं कथा-साहित्यांत नसावें. या कथांतून तत्कालीन म्हणजे सामान्यतः दोन हजार वर्षांपूर्वींच्या भारतीयांच्या लोकजीवनाची चांगली माहिती मिळते.

५. बौद्धधर्माचा प्रसार :—बुद्धाच्या मृत्यूनंतर लौकरच हिंदु धर्मापासून बौद्धधर्मीयांची फारकत झाली व बौद्ध धर्माचा मोठ्या झपाट्यानें प्रसार झाला. ते आपली शिकवण बहुजनसमाजास कळणाऱ्या साध्या गोष्टींच्या रूपानें करीत. त्यामुळें ती अधिक परिणामकारक होई. कर्मठपणास व सामाजिक विषमतेस कंटाळलेल्या लोकांना बौद्ध धर्माचीं साधीं व सदाचरणावर जोर देणारीं तत्त्वें पटूं लागलीं. शिवाय शुद्ध आर्यांच्या श्रेष्ठत्वाविरुद्ध बंड करण्यास बौद्ध धर्माचा राजरोज स्वीकार करण्यासारखें दुसरें कोणतें सुलभ साधन आर्येतरांना उपलब्ध असणार ? तशांत बौद्ध भिक्षूंनीं संन्यस्त वृत्तीनें त्याचा प्रचार केल्यामळें बौद्धांच्या धर्मतत्त्वांस स्वार्थत्यागाचें तेज चढलें. शिवाय अशोकादिकांनीं मनावर घेतल्यामुळें बौद्ध धर्मास भरपूर राजाश्रय मिळाला. इतकीं कारणें असल्यावर हा धर्मप्रचार झपाट्यानें झाल्यास नवल तें कोणतें ? वेळोवेळीं बौद्ध लोक आपली धर्मपरिषद बोलावून वादग्रस्त प्रश्नांचा उलगडा करून घेत. बुद्धाच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनीं धर्मपरिषदेचें दुसरें अधिवेशन झालें व पुढें अशोकानें आपल्या कारकीर्दीत परिषद बोलावली तें तिचें तिसरें अधिवेशन होय. त्यानंतरच्या काळांत बौद्ध धर्म भारतांतच काय, पण साऱ्या आशिया खंडांतील मोठा धर्म बनला. ग्रीक राजा मिलिंद व कुशान राजा कनिष्क यांनींही त्याचा स्वीकार केला.

६. भावी प्रतिक्रियेचें स्वरूप :—परंतु बौद्ध धर्माचा यशोदुंदुभि एकीकडे अशा रीतीनें दुमदुमत असतां दुसरीकडे प्रतिक्रियेस सुरुवात झाली. त्यांच्यांत फूट पडून अनेक पक्ष उत्पन्न झाले व धर्मपरिषदेंत त्यांची एकवाक्यता होईना. कनिष्कांच्या काळीं म्हणजे इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांच्यांत महायान व हीनयान हे पंथ उत्पन्न झाले. महायान पंथाच्या लोकांनीं बुद्धाच्या मूर्तीची स्थापना करून त्याची पूजा करण्यास प्रारंभ केला व बहुतेक लोकांनीं जानपद भाषेचा त्याग करून संस्कृत भाषेचा आश्रय केला. त्याच सुमारास हिंदुधर्मीयांनीं बौद्ध धर्मांतील गुणदोषांचें मार्मिक निरीक्षण करून आपल्या धर्माच्या पुनरुज्जीवनाचें कार्य हातीं घेतलें. बौद्ध धर्मांतील सद्वर्तन, भूतदया व अहिंसा यांचा त्यांनीं स्वीकार केला, समानतेचें तत्त्व मान्य केलें, भक्तीवर जोर दिला, कर्मठपणा काढून टाकला, पण त्याबरोबरच बौद्ध धर्मांतील निरीश्वरवाद व निवृत्तिप्रियता यांचा त्याग केला. वेदांविषयीं पूज्यबुद्धि जागृत करून पूर्वपरंपरेशीं नवीन जुळणी करून घेतली. 'भक्तिप्रधान निष्काम कर्मयोग' ह्या प्रवृत्तिपर भागवत धर्माची स्थापना केली. ह्या भागवत धर्माचा उदय इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांत होऊन त्याचाही बौद्ध धर्माप्रमाणेंच प्रसार होत होता. उत्तरेस तक्षशीलेपासून दक्षिणेस महाराष्ट्रापर्यंत त्याचा प्रसार झाला. एवढेंच नव्हे, तर भारताच्या पलीकडे अर्मीनियातही त्याचा प्रवेश झाला. कालांतरानें मूर्तिपूजेचा प्रसार वाढून मूळच्या प्रवृत्तिपर भागवत धर्माचें तेजस्वी स्वरूप पालटत गेलें; तरी हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाचें कार्य अखंड चालू राहिलें. ह्यामुळें बुद्धाच्या जन्मभूमींत म्हणजे भारतांत बौद्ध धर्माचा आज फारसा प्रचार नाहीं. परंतु भारताच्या उत्तरेस व दक्षिणेस असलेल्या तिबेट, चीन, जपान, ब्रह्मदेश, सीलोन इत्यादि देशांत त्या धर्माचा येथूनच प्रसार झाला. पैकीं सीलोनकडे असलेली बौद्धधर्मीय परंपरा जास्त प्राचीन व विश्वसनीय आहे. बौद्ध धर्माचें शुद्ध स्वरूप तिकडेच सांपडण्याचा अधिक संभव आहे.

७. महावीर वर्धमान :—जैन धर्माचा संस्थापक महावीर वर्धमान होय असें सामान्यत: सर्व लोक समजतात. परंतु जैनांच्या मतें ऋषभदेव* हा त्यांचा पहिला तीर्थंकर (संस्थापक) होय. त्याच्यापासून वर्धमानापर्यंत एकामागून एक असे चोवीस 'तीर्थंकर' होऊन गेले व त्यांनीं जैन धर्माची परंपरा राखिली. त्यांपैकीं भगवान पार्श्वनाथापासून महावीरास स्फूर्ति प्राप्त झाली. पार्श्वनाथ हा ऐतिहासिक पुरुष असला तरी त्याचा काल अनिश्चित— कित्येकांच्या मतें इ. स. पू. ७०० असा—आहे. वर्धमानास लोक त्याच्या आचरणावरून 'जिन' असें म्हणूं लागले; म्हणून वर्धमानासच जैन धर्माचा संस्थापक असें मानून चालण्यास हरकत नाहीं. वर्धमान हा गौतमाचा समकालीन असून त्याचा जन्म इ. स. पू. ५४० सालीं गंगेच्या उत्तरेस वैशाली प्रांतांत कुंदग्राम येथें लिच्छवी सरदाराच्या कुळांत झाला. विदेह,

*कैलाशचंद्रशास्त्री कृत 'जैनधर्म' पृ. १० पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंग, मगध येथील राजघराण्यांशीं त्याचा आप्तसंबंध असल्यानें त्याचें मत-प्रचाराचें कार्य अधिक सुलभ झालें. गौतमाप्रमाणेंच त्यानेंही ऐहिक सुखाचा त्याग करून बारा वर्षें घोर तपश्चर्या केली तेव्हां त्यास 'केवल' ज्ञान प्राप्त झालें व नंतर तो लोकांत प्रकट झाला. यावरून लोक त्यास 'महावीर' किंवा वर सांगितल्याप्रमाणें 'जिन' (म्हणजे जिंकणारा, इंद्रियें ताब्यांत ठेवणारा) असें म्हणूं लागले; व त्यावरून त्याच्या धर्मास व अनुयायांस 'जैन' हें नांव मिळालें. वर्धमान आपल्या वयाच्या ७२ व्या वर्षी मरण पावला (इ. स. पू. ४६८).

८. जैन धर्मांतील तत्त्वें :—संसार दुःखमय आहे, प्रत्येकाचें कर्म हें त्या दुःखाचें कारण आहे, प्रत्येकाला आपल्या कर्माचें फळ भोगल्यावांचून सुटका नाहीं, म्हणून कर्मसंन्यास हा त्यांतून सुटकेचा एकच मार्ग होय. यासाठीं जीवास कदाचित् अनेक जन्मांतून जावें लागेल. कर्मसंन्यास साध्य होण्यास प्रत्येकानें सम्यक् दृष्टि, सम्यक् ज्ञान व सम्यक् आचार या त्रयीचा अवलंब करावा. जैनधर्म हा आत्मवादी आहे. जैनांच्या मतें ईश्वर म्हणजे दुसरें तिसरें कोणी नसून तो मानवी आत्म्याच्या सुप्त सामर्थ्याचा आत्यंतिक विकास होय; आणि तपश्चर्या व देहदंड हीं त्याचीं साधनें होत. जीव दुःखमय असल्यानें शरीर झिजवून दुःखमय जीविताचा शेवट करून घेणें हें जैन धर्मास संमत आहे. या प्रकारास 'सल्लेखना' असें नांव आहे; पण सल्लेखना म्हणजे वैतागाच्या भरांत केलेली आत्महत्या नव्हे हें नीट लक्षांत ठेवलें पाहिजे.

९. बौद्ध व जैन धर्मांतील साम्य :—बौद्ध धर्माप्रमाणेंच जैन धर्मही तत्कालीन धार्मिक कृत्रिमपणा व वर्णव्यवहारांतील विषमता यांचा निषेध करण्यास उत्पन्न झालेला असल्यानें दोन्ही धर्मांत मोठें साम्य आहे. निरीश्वरवाद, कर्मठपणाचा निषेध, वर्णाच्या श्रेष्ठकनिष्ठपणाविरुद्ध बंड, वेदांचें अपौरुषेयत्व नाकबूल करणें, आणि अहिंसा, संन्यास व सद्वर्तन या त्रयीवर जोर देणें या गोष्टी दोन्ही धर्मांत सारख्याच आढळतात. बौद्ध धर्माप्रमाणें जैन धर्मही स्त्रियांना मोक्षप्राप्तीसाठीं संन्यस्त वृत्तीनें राहण्याची संधि देतो.

१०. उभय धर्मांतील महत्त्वाचे फरक :—जैन व बौद्ध या धर्मांत वरीलप्रमाणें साम्य असलें, तरी त्यांच्यांत मुख्यतः तीन बाबतींत फरक आहे. (१) जैनधर्म हा आत्मवादी आहे, बौद्ध हे आत्म्याचें निराळें अस्तित्व मानीत नाहींत. (२) जैनांनीं मोक्षप्राप्तीसाठीं संन्यासाची व कडक तपश्चर्येची आवश्यकता प्रतिपादिली. बौद्ध भिक्षु संन्यस्त वृत्तीनें राहणारे असले तरी हा संन्यस्त वृत्तीचा अतिरेक बौद्धधर्मास मान्य नाहीं. एका टोंकास सांसारिक सुखभोग व दुसऱ्या टोंकास तपश्चर्या व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देहदंड यांच्या मधला शुद्धाचरण, दया, परोपकार यांनीं युक्त अशा मार्गावर बौद्धधर्म भर देतो. (३) तिसरी गोष्ट म्हणजे जैनधर्मांत अहिंसेची व्याप्ति अतिशय विस्तृत केली आहे. प्रत्येकानें मनानें, वाणीनें व शरीरानें कृत, कारित व अनुमोदित हिंसेपासून परावृत्त व्हावें. याचा अर्थ हिंसा करूं नये, करवूं नये व कोणीं केल्यास त्यास संमति देऊं नये. अशा प्रकारच्या अहिंसेचें शब्दशः पालन करणें फारच कठीण आहे हें जाणून जैनधर्मानें तें फक्त श्रमणांना (जैन साधु) लागू केलें आहे. श्रावकांनीं (गृहस्थाश्रमी) त्यांत आवश्यक ते किमान अपवाद करण्यास जैनधर्म अनुमति देतो. अहिंसेचें हें अतिव्याप्त स्वरूप इतर कोणत्याही धर्मांत आढळत नाहीं. कालांतरानें बौद्ध धर्म हा विश्वधर्म झाला. परंतु जैन धर्माची त्याच्याइतकी वाढ कधींच झाली नाहीं. बौद्धधर्मीयांप्रमाणें जैनांच्यामध्यें स्वमतप्रसाराचा उत्साह आढळून येत नाहीं. भारताबाहेर बहुधा जैन धर्माचा प्रसार नाहीं. आज भारतांतून बौद्ध धर्माचें उच्चाटन झालेलें दिसतें, पण जैन धर्म मात्र भारतांत कायम आहे. इ. स. पूर्वी चौथ्या शतकांत जैन धर्माचा दक्षिणेंत प्रसार झाला. मौर्य सम्राट् चंद्रगुप्त यानें जैन धर्माचा स्वीकार केला असें जैन दंतकथेंत लिहिलेलें आढळतें; परंतु त्यास फारसा आधार नाहीं. कालांतरानें त्यांच्यांत श्वेतांबर व दिगंबर हे पंथ उत्पन्न झाले. परंतु त्यामुळें जैन धर्माच्या प्रसारास विशेष हरकत आली नाहीं.

प्रश्न

१. महात्मा गौतम बुद्धाचें चरित्र आणि त्याची शिकवण यांची माहिती द्या. हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचा ऱ्हास कां झाला ? २. बौद्ध व जैन हिंदुधर्मीयांस जवळचे वाटतात याचीं कारणें सांगा. ३. महावीर वर्धमान यानें स्थापिलेल्या जैन धर्माचीं मुख्य तत्त्वें कोणतीं ? ४. बौद्ध व जैन या धर्मांतील साम्य-विरोध सांगा.

अभ्यास

(१) श्री. गो. ग. तळवलकर कृत 'आशियाचे धर्मदीप' यांतील 'भगवान् बुद्ध' हें प्रकरण वाचा. (२) जगांतील प्रमुख धर्म, त्यांचे संस्थापक व त्यांच्या अनुयायांची संख्या यांची नोंद करा. (३) धर्मपरिषद बोलावून धर्मसुधारणा घडविण्याची पद्धत कितपत इष्ट वाटते ? आजच्या काळांत ती अंमलांत आणण्यास काय अडचणी आहेत ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

बुद्धाची शिकवण

सर्व पापस्य अकरणं, कुशलस्य उपसंपदा ।
सचित्त पर्योपदमनं एनं बुद्धस्य शासनम् ।।

अर्थ : कोणतेंही पाप न करणें, चांगल्या कर्मांचा संचय करणें, मनाचें नेहमीं संयमन करणें ही बुद्धाची शिकवण होय.

झाडूवाला भिक्षु झाला
(सुनीत भिक्षूचें आत्मवृत्त)

" मी अगदीं हलक्या कुळांत जन्माला आलों. मी अगदीं गरीब आणि गरजू होतों. मी जें काम करीत होतों तेंही अगदीं हलक्या प्रतीचें होतें. तें काम म्हणजे वाळलेला पाचोळा झाडणें हें होय, यामुळें लोक माझा तिरस्कार करीत, मला हिणवीत. मगधांतील प्रमुख शहरांत भिक्षूंच्या मेळाव्यांत मीं बुद्धाला पाहिलें. माझ्या डोक्यावरचें ओझें मीं टाकून दिलें आणि त्याला नमस्कार करण्यासाठीं धांवत गेलों. दया येऊन तो श्रेष्ठ पुरुष थांबला. त्याच्या चरणावर डोकें ठेवलें आणि त्या श्रेष्ठ पुरुषाची प्रार्थना केली कीं "भिक्षु म्हणून माझा तुम्ही स्वीकार करा". तेव्हां मला तो उदारधी स्वामी म्हणाला "ये, हे भिक्षु इकडे ये ! " हीच माझी भिक्षेची दीक्षा होय.

—एन्शंट इंडिया, रमेशचंद्र दत्तकृत भाग ४, पृ. ११०–१११

अतिप्राचीन कालखंडाची समाप्ति

भारत देशाच्या इतिहासांतील अतिप्राचीन कालखंडाची माहिती या ठिकाणीं संपली. इतिहास हा कालमर्यादित आहे. परंतु 'कालाची अनिश्चितता' हेंच अतिप्राचीन कालाच्या इतिहासाचें मुख्य लक्षण आहे. भारतीय युद्धाचा काल कै. रमेशचंद्र दत्त इ. स. पूर्वीं १३०० पर्यंत पुढें ओढतात, तर कै. चितामणराव वैद्य इ. स. पूर्वीं ३१०१ पर्यंत मागें नेतात. कै. दत्त गौतम बुद्धाचा मृत्यु इ. स. पूर्वीं ४७७ त झाला असें लिहितात, तर व्हिन्सेंट स्मिथ पुढें आलेल्या पुराव्यावरून इ. स. पूर्वीं ५४३ हें वर्ष देतात. ह्या कालांतील माहिती देतांनाही हीच अनिश्चितता पदोपदीं नडते. येथें प्रत्यक्षापेक्षां अनुमानावरच भिस्त ठेवावी लागते व हीं अनुमानें इतर देशांच्या समकालीन इतिहासावरून नीट पारखून घेतां येत नाहींत. अतिप्राचीन काल प्राचीन कालापासून निराळा काढण्याचें याहून दुसरें महत्त्वाचें कारण नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंड २ रा

प्राचीन युग

(इ. स. पू. ३२१ ते इ. स. १२०५)

शिकंदराच्या स्वारीपासून मुसलमानांच्या राज्यस्थापनेपर्यंत

भाग ६ वा

स्वराज्याचें साम्राज्य बनलें

(इ. स. पू. ३२१ ते इ. स. पू. २३२)

१. **प्रास्ताविक**:—मौर्य घराण्याची स्थापना ही हिंदुस्थानच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं महत्त्वाची गोष्ट होय. हिंदुस्थानच्या इतिहासास या काळापासून बरीच निश्चितता येते. हिंदुस्थानचा बाह्य जगाशीं संबंध वाढतो व त्यामुळें एकमेकांस बौद्धिक व व्यावहारिक फायदा होतो. हिंदुस्थानांतील बऱ्याच मोठ्या भागावर प्रथमच एकछत्री साम्राज्याची स्थापना होऊन निरनिराळ्या प्रांतांचा एकमेकांशीं अधिक निकट संबंध येतो; व मेगॅस्थिनीस याचे लेख, कौटिल्याचें अर्थशास्त्र, अशोकाचे शिलालेख अशा प्रकारचीं समकालीन ऐतिहासिक साधनें या कालांतील राजकीय घडामोडींवर अधिक स्पष्ट प्रकाश पाडतात. यामुळें या कालांतील व्यक्तींचें व गोष्टींचें वर्णन करतांना तें अधिक भरीवपणानें व ठळक रीतीनें करतां येतें.

२. **मौर्य घराण्याची स्थापना**:—चंद्रगुप्त हा इ. स. पू. ३२१ चे सुमारास नंदांना धुळीस मिळवून मगध देशाचा राजा झाला. ह्या राज्यक्रांतीच्या बुडाशीं 'आर्य चाणक्य' नांवाचा एक बुद्धिमान् ब्राह्मण होता. ह्याचें मूळचें नांव विष्णुगुप्त असून 'चाणक्य' हें त्याचें नांव चणक नांवाच्या गांवावरून पडलें असावें. 'कौटिलीय अर्थशास्त्र' नांवाचा ग्रंथ ह्यानेंच रचिला. ह्या ग्रंथांत राजनीतीचें मार्मिक विवेचन आहे. ह्यांतील राजनीतीच्या कुटिलपणामुळें 'कौटिल्य' हें नांव त्याच्या शत्रूंनीं त्यांस दिलें असलें पाहिजे. तो आपल्या ग्रंथांतून स्वतःस 'कौटल्य' म्हणजे 'कुटल गोत्री' असें म्हणवितो. 'कौटल्य' व 'कौटिल्य' ह्या शब्दांतील सारखेपणामुळें त्याचें कौटिल्य हें नांव विशेष कायम झालें. कौटिल्य ऊर्फ चाणक्य नंदराजाचे पदरीं होता. चाणक्य हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्मठ ब्राह्मण व नंद राजे बौद्ध धर्मास अनुकूल, अशी स्थिति असल्यानें एक दिवस नंदराजाकडून आर्य चाणक्याचा भर दरबारांत अपमान झाला. त्याबरोबर त्यानें प्रतिज्ञा केली कीं, "नंदांचें राज्य धुळीस मिळवून त्यांचा मी उच्छेद करीन तरच नांवाचा चाणक्य." लौकरच तो ह्या उद्योगास लागला. त्या वेळीं चंद्रगुप्त हा नंदांच्या पदरीं सेनापति होता. त्याला हाताशीं धरून चाणक्यानें क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला. चंद्रगुप्त नंदवंशांतील पण दासीपुत्र होता. ह्याच्या आईचें नांव मुरा असें होतें म्हणून पुढें त्याच्या घराण्यास 'मौर्य' असें नांव पडलें. कोणी म्हणतात कीं, तो शाक्य वंशांतील 'मुरी' नांवाच्या जातींत जन्मला होता. कसेंही असो, तो नंदांच्या दरबारीं असतां असंतुष्ट होण्यास त्यास कांहीं कारण घडलें हें खरें. चाणक्य व चंद्रगुप्त यांचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला व दोघांसही हद्दपार व्हावें लागलें. त्यांनीं नंतर शिकंदराकडे संधान बांधण्याचा प्रयत्न केला, परंतु तो जमला नाहीं; तेवढ्यानें निराश न होतां तें अनुकूल प्रसंगाची वाट पहात बसले. शिकंदराची स्वारी पंजाबांत होऊन गेल्यावर चंद्रगुप्तानें पौरव आदिकरून पंजाबच्या राजांशीं सख्य केलें व त्यांच्या मदतीनें मागें सांगितल्याप्रमाणें मगधावर स्वारी करून धनानंदाचा पराभव केला, त्यास ठार मारलें व आपण राज्यावर बसला. ही राज्यक्रांति घडवून आणण्यांत चाणक्याचें प्रमुख अंग होतें हें खरें, परंतु स्वतः चंद्रगुप्त हाही मोठा पराक्रमी पुरुष होता. ऐतिहासिक कालांतील पहिलें मोठें साम्राज्य स्थापन करण्याचा मान चंद्रगुप्तासच आहे. चंद्रगुप्ताच्या पराक्रमाचा चाणक्याच्या मुत्सद्दीपणाशीं योग्य असा संयोग झाला व साम्राज्य उदयास आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्राचीन कालांतील चाणक्य-चंद्रगुप्ताच्या जोडीप्रमाणें मध्यकालांत विद्यारण्य व हरिहर यांनीं विजयनगरचें साम्राज्य उभारलें व नंतर तीनशें वर्षांनीं रामदास व शिवाजी या उभयतांनीं मराठी राज्याचा उपक्रम केला. असो.

३. **मौर्यांचें साम्राज्य** :—चंद्रगुप्तानें राज्यावर आल्यावर त्याचा विस्तार करण्यास झपाट्यानें सुरुवात केली. शिकंदराचें पंजाबवर स्थापन झालेलें वर्चस्व झुगारून द्यावें असा त्यानें विचार केला व लौकरच पंजाब प्रांत आपल्या राज्यास जोडला. ह्यानंतरच्या कालांत चंद्रगुप्तानें पश्चिमेस सिंधपासून ते पूर्वेस बंगालपर्यंत सर्व उत्तर हिंदुस्थान काबीज केलें. ह्याच सुमारास अलेक्झांडरचा पराक्रमी सेनापति सेल्यूकस हा सिंधपलीकडील देशावर आपला अंमल बसवून पुढें येण्याचा विचार करीत होता. त्याचें व चंद्रगुप्ताचें युद्ध होऊन सेल्यूकसचा पराभव झाला. या विजयानें चंद्रगुप्तास सेल्यूकसच्या ताब्यांतील काबूल, कंदाहार, बलुचिस्तान हे प्रांत मिळाले. पुढें सेल्यूकसनें त्याला आपली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलगी देऊन त्याच्याशीं सख्य जोडलें व त्याच्या दरबारीं मेगॅस्थिनीस नांवाचा आपला वकील पाठविला.

४. मौर्यांची राज्यव्यवस्था :—चंद्रगुप्ताच्या काळच्या लोकस्थितीची विश्वसनीय हकीकत उपलब्ध आहे. मेगॅस्थिनीसनें त्याच्या राज्याचें वर्णन केलेलें आहे व त्यास तत्कालीन अर्थशास्त्रासारख्या ग्रंथावरून दुजोरा मिळतो. त्या वेळेस पाटलीपुत्र हें शहर गंगा व शोण ह्या नद्यांचे चिमटचांत वसलेलें होतें. शहराभोंवतीं एक खंदक व मजबूत तट असून त्यास एकूण ६४ दरवाजे होते. शहराची व्यवस्था पाहण्यास हल्लींच्या म्युनिसिपालिटीप्रमाणें तीस जणांचें एक मंडळ असून त्याच्या सहा पोटकमिटचा केलेल्या होत्या व त्यांच्याकडे करवसुली, जन्ममृत्यूची नोंद, उद्योगधंद्यांचें नियंत्रण व संरक्षण इत्यादि कामें दिलेलीं होतीं. मुख्य लोकवस्ती हिरव्यागार शेतांत अंतरा-अंतरावर वसलेल्या खेडेगांवांतून पसरलेली असे. सरकारदेणें देऊन टाकल्यावर हीं खेडीं आपली बहुतेक व्यवस्था स्वतंत्रपणें पंचांमार्फत पाहात असत. पंचांची नेमणूक हल्लींच्या पद्धतीप्रमाणें चढाओढीच्या निवडणुकीनें होत नसे. ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध अशा गृहस्थांचा त्यांत आपोआप समावेश होई. त्या काळच्या ह्या ग्रामसंस्था म्हणजे लहान लहान चिमुकलीं राज्येंच होत. राजांचीं आपापसांत युद्धें चालू असतां हीं खेडीं आपले व्यवहार निर्भयपणें पाहात असत. राज्यामागून राज्यें गेलीं तरी हीं चिमुकलीं राज्यें इंग्रज सरकारच्या अमदानीपर्यंत कायम होतीं.

पांच खेड्यांवरील अधिकाऱ्यास 'गोप' म्हणत असत व त्याच्यावर 'स्थानिक', 'रज्जुक' असे अधिकारी असून ते सर्व 'समाहर्तृ' ह्या खाजगी कारभाऱ्याच्या ताब्यांत असत. खाजगी कारभाऱ्याकडे आजच्या गृहमंत्र्याचें व फडणविसाचें काम असे. वसूलाचें उत्पन्न मुख्यतः जमिनीवरील कर, आयात-निर्यात मालावरील जकाती, व्यापारधंदे करणाऱ्यांवर नियंत्रणाकरितां बसविलेले कर (लायसेन्स), रस्तेपट्टी व बेवारशी मालमत्ता ह्या बाबीं-पासून होत असे. खर्चाच्या बाबी मुख्यतः लष्कर, राजदरबार, रस्ते व कालवे ह्या असत.

५. लष्करव्यवस्था :—लष्कराचे हत्तीखाना, घोडदळ व पायदळ असे तीन विभाग असत; व सैनिकांतही आसामीदार व पगारदार असे विभाग असत. ह्यांखेरीज शिबंदी व वाहतूक करणारे ह्यांचें भरपूर साह्य असे. सैन्याची आघाडी, पिछाडी, मध्यभाग, दोन्ही बाजू, शिलकी फौज व छावणी यांसंबंधीं नियम ठरवून दिलेले असत. चंद्रगुप्ताच्या पदरीं आठ हजार रथ, नऊ हजार हत्ती, तीस हजार घोडेस्वार व सहा लक्ष पायदळ होतें. ह्या चतुरंग सेनेच्या अवाढव्य पसाऱ्यावरून चंद्रगुप्ताच्या सामर्थ्याची कांहींशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कल्पना येईल. चंद्रगुप्ताच्या राज्यव्यवस्थेंत लष्करी खात्याचें विशेष प्राबल्य होतें यांत शंका नाहीं.

६. **अर्थशास्त्राचा परिचय** :—कौटिल्याच्या ग्रंथावरून राजनीतीचा विशेष बोध घेण्यासारखा आहे; म्हणून त्यांतील कांहीं निवडक उतारे देतों:

"वस्तीशून्य झालेल्या जुन्या जागीं किंवा नव्याच ठिकाणीं राजानें नवीन गांवें वसवावींत, तेथें वसाहत करण्याला परदेशचे लोक आणावेत किंवा आपल्याच राज्यांतील दाट वस्तीच्या भागांतून गर्दी कमी करण्यासाठीं फाजील लोकसंख्या नवीन गांवीं पाठवून द्यावी. गांवाचें क्षेत्रफळ एक ते दोन कोस असावें. गांवांतील घरांची संख्या १०० ते ५०० असावी. त्यांत शेतकरी व शूद्र यांचा भरणा अधिक असावा. तीं गांवें संकटप्रसंगीं परस्परांना साह्य करूं शकतील इतक्या बेताच्या अंतरावर असावींत. गांवाच्या सीमेवर नदी, टेकडी, जंगल, दरी, सेतु किंवा वड, पिंपळ, शमी, बोरी वगैरे झाडें यांची खूण असावी." (अधिकरण दुसरें, अध्याय २२ वा.)

"हेरांनीं मंत्र्यादिकांच्या जवळ त्यांची अबदागिरी, पिकदाणी, विंझण, पादत्राण, आसन, वाहन इत्यादि धारण करण्याचे निमित्तानें राहावें, (निरनिराळ्या) हेरांना परस्परांची माहिती नसावी...व त्यांची एकवाक्यता झाल्यासच त्या बातमीवर विश्वास ठेवावा."

"सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांनीं करावयाचें काम, त्यांतलें झालेलें काम, शिल्लक राहिलेलें काम, जमाखर्च, शिल्लक, कामाची वेळ, वहिवाट व स्वरूप हें सर्व वहींत नोंदून ठेवावें. उत्तम, मध्यम व कनिष्ठ कामावर त्या त्या लायकीचे अधिकारी नेमावेत...थोडासा अपराध असल्यास क्षमा करावी. थोडादेखील नफा करून दाखविल्यास गौरव करावा आणि जो अधिकारी मोठाच उपकार करील त्यास बढती द्यावी."

वरील सर्व वर्णनावरून व उताऱ्यांवरून तत्कालीन राज्यकर्त्यांची सावधगिरी व दूरदृष्टि आणि राज्यव्यवस्थेचें चोख व खातेवंद स्वरूप लक्षांत येईल. साकल्यानें विचार केल्यास मौर्यांच्या राज्यपद्धतीचें आधुनिक कालांतील लष्करी नोकरशाहीशीं साम्य आढळून येतें.

७. **बिंदुसार** :—चंद्रगुप्त इ. स. पू. २९८ सालीं मृत्यु पावला.* त्याच्या

---

* 'चंद्रगुप्ताचा जैनधर्माकडे ओढा होता. त्याच्या कारकीर्दीचे अखेरीस राज्यांत मोठा दुष्काळ पडला, तो सुमारें बारा वर्षें टिकला, त्या वेळीं चंद्रगुप्तास विरक्ति प्राप्त होऊन तो राज्याची जबाबदारी आपल्या पुत्रावर सोपवून जैनधर्म गुरु भद्रबाहु याचेबरोबर दक्षिणेस गेला असें कित्येकांचें

(पुढील पृष्ठावर चालू)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागून त्याचा मुलगा बिंदुसार हा गादीवर बसला. ह्यानें आपल्या राज्याची हद्द दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत वाढविली. हा राज्यविस्तार निरनिराळीं राज्यें सर करून होत नसे. फक्त ठिकठिकाणचे राजे दिग्विजय करणाऱ्या राजांचें अधिराज्य कबूल करीत. बिंदुसारानंतर इ. स. पू. २७३ सालीं त्याचा मुलगा अशोक हा गादीवर बसला.

८. धर्मनिष्ठ सम्राट् अशोक (इ. स. पूर्वी २७३ ते २३२):—पृथ्वीवरील अत्यंत थोर, सात्त्विक व प्रजेच्या कल्याणाविषयीं तळमळणाऱ्या राजांमध्यें सम्राट् अशोकाची गणना केली पाहिजे. तरवार गाजवून दिग्विजय करणारे व आपलें नांव मागें ठेवणारे राजे इतिहासांत पुष्कळ आढळतात. परंतु स्वतःस प्रजेचा चाकर समजून तिचें इहपारलौकिक कल्याण साधणारे व जगामध्यें सत्य, न्याय व नीति यांचा प्रसार करणें हेंच आपल्या आयुष्याचें ध्येय समजून त्याकरितां अविश्रांत झटणारे राजे फारच क्वचित् सांपडतात. भारताच्या इतिहासांत अत्यंत मोठे सम्राट दोन. एक अशोक व दुसरा मोगल बादशाह अकबर (इ. स. १५५६–१६०५). ह्या दोघांतही साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीनें व अंगच्या थोरवीनें अशोकच अकबरापेक्षां सरस ठरेल; कारण अकबराचें राज्य दक्षिणेंत अहमदनगरपर्यंत

धर्मनिष्ठ सम्राट् अशोक

वाढत गेलें, परंतु अशोकाचा अंमल म्हैसूरपर्यंत पसरला होता. तसेंच अशोकाच्या अंगीं बाणलेली धर्मवृत्ति ही अकबराच्या वृत्तीप्रमाणें चंचल नव्हती किंवा तिच्या बुडाशीं कसलाही राजकीय हेतु नव्हता. प्राचीन इतिहासाच्या साधनांच्या मानानें त्याच्या कारकीर्दीचीं विश्वसनीय साधनें

(मागील पृष्ठावरून चालू)

म्हणणें आहे व त्यास म्हैसूर प्रांतांतील श्रवणबेळगोळनजीक चंद्रगिरी पर्वतावरील शिलालेखाचा आधार देतात. परंतु त्या शिलालेखांतील चंद्रगुप्त हा पहिलाच चंद्रगुप्त कीं अशोकाचा नातु संप्रति (हाही चंद्रगुप्त नांवानें ज्ञात आहे) याबद्दल वराच संशय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरींच उपलब्ध आहेत. तीं म्हणजे बौद्धधर्मीयांचे पाली भाषेंतील धर्मग्रंथ व विशेषत: त्यानें कोरून ठेवलेले शिलालेख हीं होत.

९. कलिंगावर स्वारी :—राज्यावर येण्यापूर्वींच अशोकाची कर्तबगारी दिसून आली. बिंदुसाराच्या कारकीर्दींत तक्षशीला येथें बंड उपस्थित झालें असतां तें मोडण्याचें काम त्याजकडे आलें. तेव्हां अशोकानें आपल्या चातुर्यानें तेथील प्रजेचा विश्वास संपादन केला व रक्तपातावांचून तें बंड मोडलें. नंतर त्याची उज्जयिनीकडे राजप्रतिनिधि म्हणून नेमणूक झाली. पुढें बिंदुसार मृत्यु पावल्यावर त्यानें आपला थोरला भाऊ सुसीम यास बाजूस सारून आपण गादी बळकावली असें म्हणतात. नंतर चार वर्षांनीं इ. स. पूर्वी २६९ सालीं त्यानें स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. अशोक गादीवर येण्यापूर्वींच मौर्यांच्या राज्याचा विस्तार बराच वाढलेला होता. अशोकानें इ. स. पूर्वी २६२ सालीं गोदावरी व महानदी यांच्या मुखांजवळ असलेल्या कलिंग प्रांतावर स्वारी करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला. ह्या स्वारींत दीड लाख लोक कैद झाले, एक लाख ठार झाले व त्यांहूनही अधिक, युद्धानंतर अनेक कारणांनीं मृत्यु पावले. ही प्राणहानि पाहून अशोकाच्या मनाला मोठा पश्चात्ताप झाला. त्याला आपल्या साम्राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षेचा व निरपराधी लोकांच्या रक्तपातानें मिळविलेल्या विजयाचा व वैभवाचा अत्यंत वीट आला. तेव्हांपासून अतःपर निष्कारण युद्ध करणार नाहीं असा त्यानें मनाशीं निर्धार केला व तो पुढील आयुष्यभर अक्षरशः पाळला. स्वतःजवळ सामर्थ्य असून, व एकसारखे विजय मिळत असतांही आत्मसंयमन करून दिग्विजय रोखून धरणारा अशोक हा पृथ्वीवर एकटाच राजा होय.

१०. त्याचीं लोकोपयोगी कृत्यें :—अशोक एवढ्यावरच थांबला नाहीं. त्यानें आपली मानसिक तळमळ थांबविण्यासाठीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला. दिवसेंदिवस अहिंसा, भूतदया व परोपकार इत्यादि बौद्ध धर्मांतील सामान्य नीतीतत्त्वांचा त्याच्या मनावर पगडा बसला. त्यानें राज्यांतील शिकार बंद केली. राजवाड्याच्या पाकशाळेंत होणाऱ्या हिंसेचें नियमन केलें व तो कपिलवस्तु, गया, सारनाथ इत्यादि बौद्धांच्या पवित्र ठिकाणीं तीर्थयात्रा करण्यास गेला. पुढें उपगुप्त नांवाच्या महान् बौद्ध साधूची व त्याची गांठ पडली व तेव्हांपासून अशोकानें त्यास आपला गुरु केलें. ह्यापुढील सर्व आयुष्य त्यानें धर्मप्रसार व लोकोपयोगी कृत्यें करण्यांत घालविलें. त्याचें वर्णन त्यानें कोरून ठेवलेल्या सातव्या स्तंभलेखांत पुढीलप्रमाणें आढळतें.

"देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा म्हणतो—" माझ्या मनांत असा विचार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आला कीं, लोकांना धर्म ऐकवावा...म्हणजे लोक तो ऐकून त्याप्रमाणें आचरण करतील. या उद्देशानें....माझे पुरुष नांवाचे जे अधिकारी पुष्कळशा लोकांचेवर नेमले गेले आहेत ते माझ्या उपदेशाचा प्रचार करतील. ....याच उद्देशानें मीं धर्मस्तंभ उभारले, धर्ममहामात्रांची नेमणूक केली व धर्माची घोषणा केली."

"....सडकांवरून मनुष्यें व पशु यांना छाया देण्यासाठीं आंब्याचीं झाडें लावलीं. अर्ध्या अर्ध्या कोसाच्या अंतरावर विहिरी खोदविल्या. धर्मशाळा बांधल्या व जागजागीं पशूंसाठीं आणि माणसांसाठीं पाणपोया घातल्या. पण या सुखसोयी म्हणजे क्षुद्र गोष्टी होत. पूर्वीच्या राजांनीं व मींही विविध प्रकारांनीं लोकांना सुखी केलें आहे, पण मी ही (सुखसोय) अशाकरितां केली आहे कीं, लोकांनीं धर्माचरण करावें."

११. **ठिकठिकाणचीं भव्य कामें** :—अशा प्रकारचे लेख रस्त्यांवरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना कळावे म्हणून मुद्दाम तीर्थयात्रेच्या वाटेवर अलंकार-विरहित सोप्या भाषेंत कोरून ठेवले आहेत. विशेषत: त्याच्या चौदा आज्ञा म्हणून प्रसिद्ध असलेले गिरिलेख देशाच्या चारी भागांत आढळतात. उदाहरणार्थ, पेशावरजवळ शहाबाझगढी येथें, ठाणें जिल्ह्यांत सोपारा गांवीं, काठेवाड जिल्ह्यांत गिरनार या ठिकाणीं, ओरिसा प्रांतांत जगन्नाथपुरी-नजीक धौली या गांवीं व दक्षिणेस गंजम जिल्ह्यांत जौगडा येथें ह्या आज्ञा पाहावयास सांपडतात. आतांपर्यंत अशोकाचे एकंदर चौतीस शिलालेख उपलब्ध झालेले आहेत. ते डोंगर, गुहा किंवा खडक पाहून त्यांवर कोरलेले आहेत. जेथें खडक मिळाले नाहींत तेथें भव्य स्तंभ उभारलेले आहेत. त्यांपैकीं अयोध्या प्रांतांतील एक स्तंभ सुमारें ५० फूट उंच असून एकसारखा चिरेबंद आहे. त्या स्तंभाचें वजन अजमासें ५० टन तरी भरेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. दोन हजार वर्षांपूर्वी आजकालचीं यांत्रिक साधनें उपलब्ध नसतांना हे चिरेबंद दगड खाणींतून काढून त्या त्या जागीं नेऊन कसे उभारण्यांत आले हें एक गूढच आहे. यावरून तत्कालीन स्थापत्यशास्त्राच्या प्रगतीची कल्पना येते. हे स्तंभ इतके अवजड असूनही त्यांचें काम ओबड-धोबड नाहीं. खेरीज, हे स्तंभ इतके घोटीव व गुळगुळीत आहेत कीं, त्यांत तोंड पाहून घ्यावें. तसेंच त्यांच्यावरील खोदकामाची कुशलता व प्रमाणशीर-पणा पाहण्यासारखा आहे. सारनाथजवळ (हें ठिकाण काशीजवळ आहे) असलेल्या स्तंभाच्या तळचा भाग घंटेसारखा असून त्याला कमळाच्या पाकळ्यांचा आकार आणलेला आहे. मधल्या बाजूस एक वाटोळा दगड आडवा ठेवला आहे, व त्यावर दर्शनी मध्यभागीं एक चक्र असून बाजूस पुष्ट बैलाचें चित्र आहे. वाटोळ्या दगडावर चारी दिशांस अजस्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अशोककालीन सारनाथ येथील स्तंभ : तळाचा भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आकाराचे चार सिंह एकमेकांस मागल्या बाजूनें चिकटून उभे आहेत. सर जॉन मार्शल या शिल्पशास्त्रज्ञानें या स्तंभाची फारच स्तुति केली आहे. हें अशोकचिन्ह सर्वसंग्राहक, गतिमान, गोधनाधिष्ठित आणि सार्वभौम राजसत्तेचें निदर्शक असल्यानें स्वतंत्र भारतानें 'राजमुद्रा' म्हणून त्याचा स्वीकार केला; व स्वत:पुढें प्राचीन अशोकाचा आदर्श ठेवल्याचें सूचित केलें ! ह्या स्तंभाप्रमाणेंच अशोकानें जागजागीं मोठमोठे स्तूप उभारले आहेत. ह्या सर्व स्तूपांत सांची येथील स्तूप फार प्रख्यात आहे. हा अर्धवर्तुलाकार स्तूप एका विस्तृत गच्चीवर मध्यें. दांडी नसलेल्या छत्रीप्रमाणें उभारण्यांत आलेला असून त्याची उंची ५४ फूट आहे. पुढें अशोकाचा नातु संप्रति यानें आजीवकांना राहण्यासाठीं डोंगरांतून गुहा तयार केल्या व भिक्षूंना राहण्यासाठीं पाटलीपुत्र नगराजवळ अशोकाराम व कुक्कुटाराम नांवाचे दोन भव्य मठ बांधले. अशोकाच्या कारकीर्दींत काठेवाड येथील तुशास्प नांवाच्या पारसिक (इराणी) प्रांताधिकाऱ्यानें गिरनार पर्वताजवळ नद्यांचे प्रवाह अडवून सुदर्शन नांवाचा एक मोठा तलाव बांधिला व तेथून निर्जल प्रदेशांत कालव्यांनीं पाणी नेण्याची व्यवस्था केली. काश्मीरचें श्रीनगर व नेपाळांतील देवपाटण हीं शहरें अशोकानेंच वसविलीं.

१२. **त्याच्या शिलालेखांसंबंधीं सामान्य विचार** :—अशोकाच्या शिलालेखांचे गिरिलेख, स्तंभलेख व गुहालेख असे तीन भाग करतां येतील. ह्या लेखांतून त्यानें सामान्य लोकांस आज्ञा व अधिकाऱ्यांस सूचना केलेल्या आहेत. अशोकाच्या शिलालेखांत दिलेल्या आज्ञांची बहुतेक 'देवांचा प्रिय प्रियदर्शी राजा असें सांगतो कीं,' ह्या ठराविक वाक्यानें सुरुवात होते. ह्या वाक्यावरून त्याची परमेश्वरनिष्ठा दिसून येते. यांतील प्रियदर्शी हें खुद्द अशोकाचें नांव आहे. ह्या बहुतेक लेखांतून एखाद्या विशिष्ट धर्मपंथाचा उपदेश करण्याऐवजीं मानवी धर्माच्या सामान्य नीतितत्त्वांचा पुरस्कार केला आहे. धर्माचें आचरण व्हावें म्हणून त्यानें धर्ममहामात्र म्हणून स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली. एवढ्यानेंच त्याची धर्मप्रसाराची तळमळ थांबली नाहीं, तर त्यानें देशोदेशीं आपले दूत पाठवून पश्चिमेस सीरिया, इजिप्त व बॅक्ट्रियापासून ते उत्तरेकडे चीन व नेपाळ आणि दक्षिणेस सिंहलद्वीप (सीलोन) पर्यंत धर्माचा प्रसार केला. सिंहलद्वीपास तर त्यानें खुद्द आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना पाठविलें.

१३. **त्याची बौद्धधर्मासंबंधीं कामगिरी** :—अशोकानें बौद्ध धर्माकरितां अतोनात श्रम केले. आपल्या शिलालेखांतून त्यानें क्वचित् बौद्ध धर्माचा पुरस्कार केला आहे व बौद्धधर्मीयांनीं कोणकोणते ग्रंथ वाचावेत त्याचीं नांवेंही सांगितलीं आहेत. पण एका भाब्रू येथील शिलालेखाखेरीज असले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांची येथील स्तूपांच्या आवाराचें पूर्वेकडील भव्य नक्षीदार प्रवेशद्वार



या प्रवेशद्वाराच्या उभ्या आडव्या शिला-स्तंभांवर एकेका चौकटींतून बुद्धाच्या जीवनांतील प्रसंग सुबक रीतीनें कोरले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्ध धर्माचा प्रत्यक्ष पुरस्कार सांगणारे लेख उपलब्ध नाहींत. अशोक स्वत: बौद्धधर्मीय असला तरी इतर धर्मांवर त्याची समदृष्टि होती व निरनिराळ्या धर्मांच्या लोकांनीं नेहमीं एकत्र यावें असें त्यानें आपल्या एका आज्ञेंत स्पष्ट सांगितलें आहे. अशोकानें बौद्ध धर्मांत उत्पन्न झालेल्या अनेक वादग्रस्त प्रश्नांचा निकाल करून घेण्याकरितां धर्मपरिषद बोलावली, हें तिचें तिसरें अधिवेशन होय. हें अधिवेशन नऊ महिने चाललें. तेथें अनेक शंकांचें निरसन झालें.

१४. **योग्यता व मृत्यु** :—हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत आपल्या थोर कृत्यांनीं एकदम नजरेंत भरणारी व विपुल ऐतिहासिक साधनांमुळें अर्वाचीन लोकांस ढोबळ रीतीनें माहीत असलेली व्यक्ति म्हणजे अशोक ही होय. अशोकासारख्या व्यक्ती जगामध्यें क्वचितच निर्माण होतात. त्याच्या भूतदयेची मजल इतकी पुढें गेली कीं, त्यानें मनुष्यांकरितां दवाखाने तर काढलेच, परंतु पशूंना औषधोपचार व्हावे म्हणून त्यांच्याकरितांही दवाखाने काढले. औषधींची वाण पडूं नये म्हणून त्या दृष्टीनें त्यानें वनस्पतींचे बागबगीचे लाविले. आपल्या प्रजेची स्थिति प्रत्यक्ष कळावी म्हणून तो स्वत: राज्यांतून हिंडत असे. माझी प्रजा ही माझीं मुलें आहेत असें तो म्हणे, व 'मी दरबारांत, भोजनगृहांत, शयनगृहांत किंवा कोठेंही असलों तरी प्रतिवेदकांनीं (हेरांनीं) येऊन प्रजेच्या संबंधींची हकीकत सांगण्यास हरकत नाहीं' असें त्यांना त्यानें बजावलें होतें. प्रजेच्या शिक्षणाची तो काळजी घेत असे. नालंदा येथील महाविद्यालय त्यानेंच बांधलें. त्यानें कोरलेले शिलालेख येणाऱ्या जाणाऱ्यानें वाचावेत अशा जागीं कोरले. यावरून भारतांत त्या वेळीं साक्षरतेचा प्रसार बराच झाला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशोक इ. स. पूर्वी २३२ सालीं मृत्यु पावला.

१५. **त्याच्या राजसत्तेचें स्वरूप** :—अशोकानें आपल्या राज्याचे चार विभाग केले होते. उज्जयिनी (माळवा), तोसली (कलिंग), सुवर्णगिरी (म्हैसूर) व तक्षशीला (पंजाब) हीं त्यांचीं मुख्य शहरें होत. ह्या प्रत्येक विभागावर एक एक राजप्रतिनिधि (सुभेदार) असे. कांहीं प्रांत राजपुत्रांच्या हाताखालीं दिलेले असत. एवढें मोठें साम्राज्य अनियंत्रित एकतंत्री राजसत्तेखालीं राहणें शक्यच नव्हतें. अधिकारविभागणी करणें आवश्यक असे. मुख्य राजा किंवा प्रांतिक प्रतिनिधि यांच्या सत्तेवर दुसऱ्या कोणाचेंही बंधन नसे. पण 'अनियंत्रित राज्यसत्ता' या शब्दानें त्या राजसत्तेचें बरोबर वर्णन करतां यावयाचें नाहीं. राजाला वाटेल ते कायदे करण्याची मुभा नव्हती. प्रस्थापित धर्म, चालीरीती व पद्धति ह्या प्राचीन कालापासून चालत आलेल्या असत. त्यांत फेरफार करण्यापूर्वीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्माधिकाऱ्यांची व धर्मपरिषदेची संमति घ्यावी लागे. त्यांची संमति किंवा त्यांचे ठराव झुगारून देण्यास राजे लोक सहसा धजत नसत. यांशिवाय जातपंचायत, गोतपंचायत, ग्रामपंचायत आपापल्या पुरते कायदे करीत. ते अंमलांत आणण्याचें काम राजसत्तेकडे असे. सर्व भारताकरितां मध्यवर्ती प्रतिनिधिक कायदेमंडळ असे व त्यांत राज्यांतल्या निरनिराळ्या विभागांतील प्रतिनिधी येत, परंतु त्यांची निवडणूक होत नसावी व राजावर त्यांचा कायदेशीर दाबही नव्हता. ह्या मंडळास मंत्रिपरिषद असें म्हणत. राजा बहुधा आपल्या प्रधानांची निवड त्यांच्यांतून करी. सारांश, खरोखर पाहिलें तर राजाची सत्ता अनियंत्रितच होती, परंतु ती हातांत असणाऱ्या राजाला प्रत्यक्ष व्यवहारांत प्रजेच्या कलाकडे दुर्लक्ष करून चालत नसे.

१६. **प्रांतिक राज्यव्यवस्था** :—ह्या मध्यवर्ती राजसत्तेच्या हाताखालीं प्रांतोप्रांतीं 'रज्जुक' नांवाचे अधिकारी असत. त्यांच्यासंबंधानें अशोकानें म्हटलें आहे कीं, "स्वकार्यकुशल अशा विश्वासू दाईवर मुलांच्या संगोपनाचा भार सोंपवून आईबाप जसे निश्चित राहतात, त्याप्रमाणें मीं आपल्या प्रजेच्या संवर्धनाचें कार्य विश्वासूक रज्जुक अधिकाऱ्यांवर सोंपविलें आहे." रज्जुकांच्या हाताखालीं 'आदेशिक' नांवाचे अधिकारी असत. प्रत्येक खात्यावरील अधिकाऱ्यास 'महामात्र' असें म्हणत असत व ज्या खात्यावर त्याची नेमणूक झाली असेल त्या खात्याचें नांव त्याच्या हुद्द्याला जोडण्यांत येई. जसें, धर्ममहामात्र, अंतमहामात्र (राज्यसीमारक्षक), महामात्रनगरव्यवहारक इ. राज्यकारभार चालविण्याऱ्या कामगारांना 'पुरुष' अशी संज्ञा असे, व जिल्ह्याच्या मुख्यास 'स्थानिक' म्हणत. ह्यांखेरीज प्रत्येक गांवीं आपापला कारभार पाहण्यास वर सांगितल्याप्रमाणें एक ग्रामपंचायत असे.

सारांश, तत्कालीन राजे धर्मसभेची आज्ञा झुगारीत नसत व लोक जो आपला गांवकीचा कारभार पाहात त्यांत सहसा हात घालीत नसत. त्यामुळें राजांची सत्ता दिसायला अनियंत्रित, पण खरोखर मर्यादित असे.

१७. **समारोप** :—अशोकाची कारकीर्द हा प्राचीन राजसत्तेचा उत्कर्षकाल होता. इतकी सहिष्णु, सर्वसंग्राहक, गतिमान व प्राणिमात्रसुखप्रधान वृत्ति भारतीय इतिहासांतही पूर्वी किंवा नंतरच्या काळांत केव्हांही दिसून येत नाहीं. इतर देशांच्या इतिहासांत मानवी कर्तृत्व बहुविध अन्य प्रकारांनीं प्रकटलें. परंतु अशोककालीन भारतानें काळाच्या वाळवंटांत आपलीं पावलें स्पष्ट उमटविलेलीं आहेत यांत शंका नाहीं. इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकापासून तिसऱ्या शतकापर्यंतच्या तीनशें वर्षांच्या काळांत भारतांत बौद्ध व जैन धर्मांचा प्रसार, सामाजिक विषमते-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विरुद्ध आन्दोलन, सुसंघटित साम्राज्याची निर्मिति व त्या साम्राज्यास शांततावादी वळण देण्याचा अशोकाचा यत्न या गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात. या खंडप्राय विस्तृत देशांतील विविध समाजांचें एकमेकांशीं घडून आलेलें साहचर्य व संघर्ष यांतून ऐनजिनसी भारतीय समाजाची निर्मिति घडून येत होती. या निर्मितीस मौर्यांच्या एकछत्री साम्राज्याचें मोठें साहच झालें.

प्रश्न

१. चंद्रगुप्त मौर्याची राज्यव्यवस्था वर्णन करा. २ 'जागतिक इतिहासाची रूपरेखा' या ग्रंथाचा कर्ता सुप्रसिद्ध एच. जी. वेल्स यानें अशोकास जगांतील सर्वांत थोर राजा असें म्हटलें आहे त्याचें स्पष्टीकरण करा. ३. 'अशोकचिन्ह व अशोककालीन शिल्प' या विषयावर टिपण लिहा. ४. चंद्रगुप्त-चाणक्य, विद्यारण्य-हरिहर, रामदास-शिवाजी यांनीं स्वतंत्र राज्याची स्थापना केली. आजकालचीं राज्यें स्थापन होण्यास अशा जोडयांची कितपत आवश्यकता आहे ?

अभ्यास

(१) वा. गो. आपटेकृत अशोकचरित्र, न. चिं. केळकरकृत 'चंद्रगुप्त' नाटक व वालचंद शाहकृत 'सम्राट् अशोक' ही कादंबरी वाचा. (२) इतिहास, कादंबरी व नाटक यांतील भेद लक्षांत घ्या. (३) अशोकाचे शिलालेख असलेलीं गांवें नकाशावर पहा. (४) 'मौर्यकालीन राजांचीं कर्तव्यें' या विषयावर छोटा निबंध लिहा.

माहितीसाठीं

रथचक्राची कल्पना :—अशोकास रथचक्राची कल्पना पुढील सूक्तावरून सुचली असावी असें श्री. स. ह. गोडबोले यांचें म्हणणें आहे

'यस्मिन् ऋचः सामयजूंषि।
यस्मिन् प्रतिष्ठिता रथनाभा विवाराः।
यस्मिञ्चित्तं सर्वमेतं प्रजानां। तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥

शुक्ल यजुर्वेद संहिता, अ. ३४, सूक्त ५ वें.

अर्थ :—रथनाभीमध्यें (म्हणजे चाकाच्या कण्यांत) ज्याप्रमाणें आरे (Spokes) बसविलेले असतात, त्याप्रमाणें ज्या मनांत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेदादि वेद जडविलेले आहेत, म्हणजे ज्याच्या मनामध्यें सर्व सद्धर्म केंद्रित आहेत, तसेंच सूत्रामध्यें ज्याप्रमाणें मणी ओवतात त्याप्रमाणें ज्याच्या ठायीं सर्व प्रजांचें चित्त ओवलें गेलें आहे, तें माझें, म्हणजे शास्त्याचें मन, सदोदित सत्संकल्प करणारें असो! म्हणजे विवेकी, न्यायी व लोकानुराधन करणारें असो!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ७ वा

जागतिक घडामोडी : ग्रीक व रोमन संस्कृति

१. ग्रीसचा उदय :—भारतांत बुद्ध व महावीर यांच्या उदयामुळें उत्पन्न झालेलें धार्मिक आन्दोलन चालू असतां पश्चिमेस ग्रीसचा उदय होत होता. जगाच्या इतिहासांत ग्रीसला फार महत्त्व आहे. कारण या ग्रीक संस्कृतीच्या पायावर पुढें आधुनिक युरोपची निर्मिति झाली व यूरोपच्या इतिहासास वेगळें वळण लागलें. ग्रीसमध्यें त्या काळीं एकछत्री राज्य नव्हतें. स्पार्टा, अथेन्स, थीब्ज अशीं लहान लहान स्वायत्त नगरराज्यें होतीं. त्यांचीं आपापसांत यादवी युद्धें होत. पण सर्वांच्यामध्यें आपण एकाच संस्कृतीचे असल्याची भावना होती. अपोलो हा त्यांचा देव व होमर हा त्यांचा महा-कवि होता. प्रसंगीं युद्ध चालू असलें तरी चतुर्वार्षिक ऑलिंपिक सामन्याचे वेळीं एक महिनाभर वैरभाव स्थगित ठेवून सर्व ग्रीकांनीं या सामन्यांत खेळाडू वृत्तीनें भाग घ्यावयाचा अशी त्यांची परंपरा असे.

२. स्पार्टा :—या ग्रीक नगरराज्यांपैकीं स्पार्टा हें आपल्या कडक लष्करी शिस्तीसाठीं प्रसिद्ध होतें. इ. स. पू. च्या आठव्या शतकांत त्यांच्यांत लाय-करगस नांवाचा पुरुष होऊन गेला. त्यानें ठरवून दिलें कीं, मुलांना वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सामुदायिक राहाणीचें व लष्करी शिस्तीचें शिक्षण द्यावयाचें. पुरुषांनीं वयाच्या तीस वर्षेपर्यंत व स्त्रियांनीं वीस वर्षेपर्यंत लग्न करावयाचें नाहीं. सर्वांनीं मैदानी खेळ खेळावयाचे. कुणाचा गुन्हा उघडकीस आल्यास त्यास कडक शासन द्यावयाचें. त्या काळच्या स्पार्टन स्त्रियाही इतक्या शूर असत कीं, त्यांचें वर्णन वाचून भारतांतील राजपूत वीरांगनांची आठवण होते. पूर्वेकडील इराणी साम्राज्यास ज्या ग्रीक बहादुरांनीं तोंड देऊन आपल्या मायभूमीचें रक्षण केलें त्यांत स्पार्टन योद्धे प्रमुख होते.

३ अथेन्स :—अथेन्सच्या जीवनास स्पार्टाहून वेगळें वळण होतें. तेथें आदर्श लोकशाही राज्यघटना उदयास आली. लोकसभा, शिष्टसभा व लोकनियुक्त मंत्रिमंडळ यांच्या साहाय्यानें तेथील राज्यकारभार चाले. लोकसभेची चर्चा मोकळ्या जागेंत रात्ररात्र चाले. वयांत आलेल्या सर्वांस त्यांत भाग घेण्याची मोकळीक होती. इ. स. पू. च्या पांचव्या शतकांत पेरिक्लिस या पुरुषानें ग्रीक लोकशाहीचा उत्कर्ष करून दाखविला. आपलें राज्य म्हणजे आपलें कुटुंब, त्यांत कांहीं कमी पडल्यास तो आपला कमीपणा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यावर येणारें संकट तें आपलें संकट, ही भावना तेथें निर्माण झाली. संकटकाळीं राज्यकर्ते प्रजेवर जादा कर बसवून तो सक्तीनें वसूल करून घेण्याची वेळ येण्यापूर्वीच लोक हरएक प्रकारचा त्याग करण्यास अहमहमिकेनें पुढें येत. अथेन्सच्या उत्कर्षांत आनंद मानावा, आपल्या अंगांत असेल तो गुण अथेन्सच्या वैभवार्थ खर्चीं घालावा व अथेन्स सर्वांगांनीं नटवावें, असें अथेन्स शहरांत त्या काळीं स्वातंत्र्याचें व उत्साहाचें वातावरण नांदत होतें.

४. **ग्रीक संस्कृतीचा बहुमोल ठेवा**:—अथेन्सच्या निर्भय व स्वतंत्र वातावरणांत मानवी जीवनाची अनेकविध अंगांनीं उन्नति झाली. काव्य, इतिहास, तत्त्वज्ञान, राजकारण, शिल्प, चित्रकला व भौतिक शास्त्रें या ज्ञानाच्या विविध शाखांचा उदय झाला. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल् या तत्त्वज्ञांनीं भारतीय व्यास पाराशरांची आठवण करून दिली. सॉक्रेटिसनें (इ. स. पू. ४६९–३९९) रस्त्यारस्त्यानें हिंडून लोकांस प्रश्नांवर प्रश्न विचारून त्यांची चिकित्साबुद्धि जागृत केली व 'आत्मस्वरूपाची नीट ओळख करून घ्या' असा मानवास चिरंतन संदेश दिला. प्लेटो व ॲरिस्टॉटल् यांचे तत्त्वज्ञान व साहित्य यावरील ग्रंथ आजही विद्यापीठांतून अभ्यासिले जातात. मागील भागांत सांगितलेला ॲलेक्झांडर हा ॲरिस्टॉटलचा शिष्य होय. या तत्त्वज्ञांखेरीज डेमॉस्थिनीस हा वक्ता, हिरोडोटस व थ्यूसिडायडिस हे इतिहासकार, होमर व पिंडार हे कवि, फिडियस हा शिल्पकार, प्राक्सिटेलिस हा चित्रकार हे सर्व ग्रीस देशांत निरनिराळ्या काळीं उदयास आले. होमरचें इलियड हें महाकाव्य रामायणाची आठवण करून देतें. परंतु रामायणांतील शान्तरस व सात्त्विकभाव यांचा परिपोष इलियडमध्यें नाहीं. तें काव्य अद्भुत व वीररसानें नटलेलें आहे. तत्कालीन ग्रीक शिल्पकारांनीं केलेले पुतळे ठोसर, रेखीव व भव्य आहेत, पण इजिप्त येथील आकृतींप्रमाणें अगडबंब नाहींत. प्राक्सिटेलिस या चित्रकारानें काढलेलें द्राक्षवेलीचें चित्र एवढें हुबेहूब होतें कीं, पक्षी तेथील फळावर झडप घालण्यास येत असें सांगतात!



सॉक्रेटिस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. अलेक्झांड्रियाचें विद्यापीठ :—मॅसिडोनियाचा राजा अॅलेक्झांडर यानें हीं लोकशाही राज्यें धुळीस मिळवून साम्राज्य निर्माण केलें. परंतु त्याच्या मृत्यूनंतर त्या साम्राज्याचे तुकडे होऊन, इजिप्त येथें टॉलेमी राजांच्या अमलाखालीं अलेक्झांड्रिया शहरीं विद्यापीठ स्थापन होऊन तेथें ग्रीक विद्या व कला यांची उपासना चालूच राहिली. प्रसिद्ध भूमितिकार युक्लिड, पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ आर्किमीडिझ व पृथ्वीच्या व्यासाचें गणित करून तो ८००० मैल असें सांगणारा एरटोस्थेनीस हे सर्व या विद्यापीठाचे संशोधक होत. असें सांगतात कीं, येथें हीरो या शास्त्रज्ञानें आपल्या प्रयोगशाळेंत प्रत्यक्ष वाफेच्या एंजिनाचा शोध लावला. परंतु त्याच्या प्रयोगास कुशल कारागिराची जोड न मिळाल्यानें हें एंजिन मोठ्या प्रमाणावर तयार होऊं शकलें नाहीं. यामुळें बाष्पशक्तीचा मानवी जीवनास होणारा उपयोग अठराव्या शतकापर्यंत मानवास अज्ञातच राहिला ! असो.

६. रोमचा उदय :—इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत ग्रीसला उतरती कळा लागली व रोम उदयास आलें. रोमन लोकांनीं ग्रीसची संस्कृति आत्मसात् करून त्यांत थोडीबहुत भर घातली व तिचा पश्चिमेस ग्रेट ब्रिटनपासून पूर्वेस एशियामायनरपर्यंत प्रसार केला. रोमन लोकांत उच्चवर्गीय व सामान्य लोक यांच्यांत वाद होऊन ते वर्दळीवर येत. तेव्हां त्यांनीं सर्वांवर नियंत्रण बसेल असे कांहीं कायदे केले व ते सर्वांना माहीत व्हावे म्हणून बारा टेबलां-वर खोदून ठेवले. यांस 'बारा टेबलांचे कायदे' असें म्हणतात. या कायद्यांत पुढें अनेक दुरुस्त्या झाल्या, पण रोमन लोकांनीं अनेक संकटांतही कायद्याचें पावित्र्य कायम राखलें. यामुळें रोमन राज्यांतील प्रजेच्या जीवितास शाश्वति प्राप्त झाली व नागरिकांस कायद्याअन्वयें हक्क प्राप्त होऊन हुरूप वाढूं लागला. रोमच्या शेजारीं असलेल्या प्रदेशांतून रोममधील शाश्वत जीवनाची कीर्ति पसरली व त्यांनीं रोमन राज्यांत सामील होण्याची आपली खुषी दर्श-विली. रोमच्या प्रारंभ काळीं रोमनें आपला राज्यविस्तार तर-वारीच्या बळावर केला नाहीं. आदर्श राज्यघटनेच्या आकर्षणानें शेजारचे प्रदेश रोममध्यें सामील झाले. राज्यविस्ताराचा हा प्रकार जगाच्या इति-हासांत बिनजोड वाटतो.

७. ज्यूलियस सीझर :—इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकांत रोममध्यें ज्यूलियस सीझर नांवाचा प्रख्यात सेनापति होऊन गेला. त्यानें ग्रेट ब्रिटन जिंकलें व पुढें तो रोमचा सर्वसत्ताधारी (इ. स. पू. '५९–४४) झाला. पण त्यानें लोकशाहीचा बाह्य देखावा मात्र कायम ठेवला. त्याच्या या कृत्याविरुद्ध प्रतिक्रिया होऊन रोमच्या भररस्त्यावर सीझरचा खून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला. सीझर मेला, पण सीझरशाही रोमच्या मानगुटीस बसली ती बसलीच !



ज्यूलियस सीझर

पुढील पांच शतकांत रोमचा प्रचंड विस्तार झाला, पण रोमन लोकशाहीचें रोमन साम्राज्यांत रूपांतर झालें. पूर्वेस चीनमध्यें या वेळीं वू टी हा सम्राट उदयास आला. त्यानें पूर्वेस कोरियापासून पश्चिमेस कास्पियन समुद्रापर्यंतचा प्रदेश आपल्या ताब्यांत आणला होता. या काळांत रोम व चीन यांच्यामध्यें दळणवळण चालू असल्याचा पुरावा उपलब्ध आहे.

८. **रानटी टोळ्यांची धाड** :—इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून पांचव्या शतकापर्यंत या काळांत रोममध्यें कांहीं कर्तृत्ववान बादशाह होऊन गेले. मार्कस ऑरेलिअस (इ. स. १६१–१८०) या साधुवृत्तीच्या बादशाहाचें अशोकाशीं बरेंच साम्य आहे. तसेंच कॉन्स्टंटाइन बादशाहानें (इ. स. ३२४–३३७) ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास मोठें उत्तेजन दिलें. या रोमन सम्राटाखेरीज रोमच्या इतिहासांत सिसेरोसारखा वक्ता, होरेस व व्हर्जिलसारखे कवि, आणि लिव्ही व टॅसिटससारखे इतिहासकार होऊन गेले. त्यांचीं नांवें द्यावीं तितकीं थोडींच आहेत. पण कांहीं झालें तरी ग्रीसमधील बहुविध विद्योपासनेची सर रोमला येणार नाहीं. इसवी सनाच्या पांचव्या शतकांत गॉथ, व्हेंडॉल व स्लाव्ह या रानटी टोळ्यांनीं यूरोपभर धुमाकूळ घातला व रोमन साम्राज्य धुळीस मिळविलें. असाच कांहींसा प्रकार भारताच्या इतिहासांत एकदां इ. स. पू. च्या दुसऱ्या शतकांत शक कुशाणांनीं व इ. स. च्या पांचव्या शतकांत हूणांनीं केला व तत्कालीन साम्राज्यें धुळीस मिळविलीं. त्याची हकीकत पुढें योग्य ठिकाणीं येईलच.

९. **ग्रीस–रोमचा सांस्कृतिक ठेवा** :—इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकापासून इसवी सनाच्या पांचव्या शतकाचे अखेरीपर्यंतचें युरोप खंडांतील घडामोडींचें हें धावतें समालोचन वाचणाराच्या हें लक्षांत येईल कीं, स्वातंत्र्यप्रेम, नागरिकांचे हक्क, शास्त्रीय दृष्टि, कायद्यावर आधारलेली राज्यरचना हे ग्रीक व रोमन संस्कृतीचे विशेष लक्षांत भरण्यासारखे आहेत. फार प्राचीन काळापासून ग्रीक-भारतीयांचे एकमेकांशीं निकट संबंध आलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. अॅलेक्झांडरनंतर दोन शतकें भारताच्या वायव्य सरहद्दीपलीकडे ग्रीकांचीं लहान लहान राज्यें होतीं. त्यांच्यांतील कित्येकांनीं बौद्धधर्मास मोठें उत्तेजन दिलें, ग्रीक कारागिरांनीं बुद्धाच्या मूर्ती कोरल्या व त्याच्या जीवनांतील प्रसंग चित्रित केले. यांतूनच पुढें इंडो-ग्रीक किंवा गांधार चित्रकलेचा उदय झाला. ग्रीक-भारतीयांच्या या सांस्कृतिक देवघेवी-कडे अलीकडे विद्वानांचें विशेष लक्ष लागलें आहे. पण एकंदरींत पाहातां सरहद्दीवरील सामान्य दळणवळणापलीकडे या देवघेवीस फारसें महत्त्व नाहीं, कालाच्या ओघांत उभयतांचें जीवन वेगवेगळ्या दिशेनें व तऱ्हेनें वहात व विकास पावत गेलें, असें आपणांस दिसून येतें. प्राचीन भारतीय संस्कृतीचीं कांहीं वैशिष्टयें आपणांस गेल्या भागांत दिसून आलीं. यापुढील भागांत तिच्या इतर अंगांची ओळख पटेल व त्या योगानें भारतीय संस्कृतीचें स्वरूप अधिक स्पष्टपणें अभ्यासकाच्या नजरेसमोर येईल. जगाच्या इतर भागांतील समकालीन घडामोडींचें तुलनात्मक ज्ञान व्हावें यासाठीं या भागांत त्यांचें त्रोटक समालोचन केलेलें आहे.

प्रश्न

१. अथेन्सच्या लोकशाहीस आदर्श लोकशाही कां म्हणत ? २. ग्रीसच्या उन्नतीचें रहस्य सांगा. ३. रोमचा विकास कसा झाला ? ४. 'सीझर मेला, पण सीझरशाही.........बसलीच' यावर टिपण करा.

अभ्यास

ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला ? (कै. शि. म. परांजपे) या पुस्तकाची 'महान् राष्ट्र ग्रीस' ही श्री. शं. दा. चितळे यांची प्रस्तावना वाचा.

माहितीसाठीं

सोलोनचे कायदे

इ. स. पू. ५९४ सालीं सोलोन हा अॅथेन्सचा प्रमुख म्हणून निवडला गेला. त्यानें राज्यसुधारणेसाठीं पुढील कायदे केले : (१) ज्या योगें नागरिकांचें स्वातंत्र्य धोक्यांत येईल अशीं शेतजमिनीवरील गहाणखतें व कर्जें रद्द समजावीं. (२) कर्जासाठीं गुलाम म्हणून राहिलेल्यांची गुलामगिरी रद्द व्हावी. (३) उच्चवर्गीयांची खाजगी मालकीची जमीन कायद्यानें मर्यादित असावी. (४) संकटप्रसंगीं जो नागरिक केवळ बघ्याचें काम करील त्याचे नागरिकत्वाचे हक्क जातील; कारण तटस्थ लोकांना हक्क देणें अनिष्ट होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ८ वा

मौर्य साम्राज्योत्तर भारतीय घडामोडी

(इ. स. पू. २३२ ते इ. स. ३२०)

१. **साम्राज्योत्तर कालाचें स्वरूप** :—अशोकाच्या मृत्यूनंतर लौकरच त्याचें साम्राज्य मोडकळीस आलें व दूरदूरचे प्रांत स्वतंत्र झाले. अशोकाच्या मृत्यूपासून ते गुप्तघराण्याच्या स्थापनेपर्यंतचा (म्हणजे इ. स. पू. २३२ पासून इ. स. ३२०) हा काळ हिंदुस्थानच्या इतिहासांत बराच गुंतागुंतीचा असून त्या काळच्या माहितीचीं साधनेंही अल्प आहेत. त्यांपैकीं पुराणें व नाणीं हीं मुख्य आहेत. पैकीं पुराणांत ऐतिहासिक सत्य व कात्पनिक भाग यांचें इतकें मिश्रण झालें आहे कीं, त्यांतून ऐतिहासिक भाग वेगळा काढणें महत्प्रयासाचें होऊन बसलें आहे. पुराण म्हणजे प्राचीन कथा. उपनिषदांत व बौद्धग्रंथांत पुराणास 'पांचवा वेद' ही अन्वर्थक संज्ञा दिलेली आहे. कारण, सामान्य मनुष्यास धर्माचें आकलन होण्यास चार वेदांपेक्षांही सुलभ कथांनीं युक्त अशा पुराणांचाच अधिक उपयोग होतो. सृष्टीची उत्पत्ति व गतकालीन कर्त्या पुरुषांचे वृत्तान्त यासंबंधींची सामान्य लोकांची उत्सुकता पुरी करण्यासाठीं पुराणांचा उदय झाला. परंतु कालांतरानें धर्मोपदेशकांनीं इहलोकाची नश्वरता व धर्माचें श्रेष्ठत्व लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं त्यांचा उपयोग केला. खेरीज, वेळोवेळीं त्यांत भरही पडत गेली. अशा रीतीनें अठरा पुराणें बनत बनत त्यांना आजचें स्वरूप प्राप्त झालें आहे. या पुराणांतून अनेक राजघराण्यांच्या वंशावळी दिलेल्या आहेत. परंतु त्यांनीं दिलेली कालगणना विश्वसनीय वाटत नाहीं. म्हणून पुराणांतील हकीकतीस ज्या ठिकाणीं नाण्यांच्या साधनानें किंवा समकालीन ग्रंथकारांच्या प्रासंगिक उल्लेखावरून बळकटी मिळते तेथें ती हकीकत विश्वसनीय मानून चालतात. अशा रीतीनें ह्या साडेपांचशें वर्षांच्या इतिहासाची जुळणी केली असतां त्यांत मुख्य दोन गोष्टी डोळ्यापुढें उभ्या राहतात. त्या म्हणजे परकीयांच्या स्वाऱ्या व आंध्रांचें साम्राज्य ह्या होत. त्यांपैकीं प्रथम आपण परकीयांच्या स्वाऱ्यांचा विचार करूं.

२. **मगधाच्या राज्याचे तुकडे** :—इ. स. पूर्वी सुमारें १९० सालीं बॅक्ट्रियाचा* ग्रीक राजा डेमिट्रियस यानें हिंदुकुश पर्वत ओलांडून मौर्यांचा

---

* बॅक्ट्रिया म्हणजे हिंदुकुश पर्वत व ऑक्सस नदी ह्यांमधील प्रदेश. नकाशा पृ. ९३ पाहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेवटचा राजा बृहद्रथ (हा अशोकापासून सातवा राजा होय) ह्याचा पराभव केला आणि काबूलच्या आसपास बऱ्याच मोठ्या प्रदेशावर त्यानें आपला अंमल बसविला. ह्याच्या पूर्वी म्हणजे इ. स. पूर्वी २२० सालीं आंध्रांनीं गोदावरीच्या दक्षिणेकडील प्रदेशांत स्वतंत्र राज्याची स्थापना केली व त्याच सुमारास कलिंग प्रांतही स्वतंत्र झाला असावा. कारण कलिंग (ओरिसा) प्रांतांतील उदयगिरी पर्वतावरील हाथिगुंफा येथील इ. स. पूर्वी १५० सालच्या शिलालेखांत त्या प्रांतावर खारवेल नांवाचा राजा राज्य करीत होता व तो त्या राजांच्या वंशावळींतील चौथा राजा होय अशा अर्थाचा उल्लेख आहे. या खारवेलानें दक्षिणेस आंध्रांचा पराभव करून तेथें कांहीं वेळ अंमल बसविला व इ. स. पूर्वी १७१ सालीं खुद्द मगधाचें राज्यही आपल्या वर्चस्वाखालीं आणिलें अशी माहिती मिळते. असो. अशा रीतीनें मगधाच्या साम्राज्याचे तुकडे होत असतां बृहद्रथाचा सेनापति पुष्यमित्र यानें बृहद्रथास ठार मारून आपण पाटलीपुत्राची गादी बळकावली व तेथें शुंग घराण्याची स्थापना केली (इ. स. पूर्वी १८५).

३. मिनॅन्डर ऊर्फ मिलिंद राजा :— सरहद्दीवर राज्य स्थापन करणाऱ्या ग्रीक राजांनीं या राज्यक्रांतीचा पुरता फायदा घेतला. तेथील राजा मिनॅन्डर ऊर्फ मिलिंद यानें अयोध्या प्रांतापर्यंत चाल करून साकेत शहर काबीज केलें; व राजपुतान्यांत चितोडजवळचें मध्यमिका ऊर्फ नागरी शहर काबीज केलें. मिलिंद राजाचा अंमल त्या वेळीं भडोचपर्यंत पसरला होता. मिलिंद पंजाबांत सियालकोट येथें राहात असे. यानें बौद्ध धर्म स्वीकारला होता. बौद्ध वाङ्मयांत 'मिलिंदाचे प्रश्न' म्हणून तात्त्विक प्रश्न फार प्रसिद्ध आहेत. कालिदासाच्या मालविकाग्निमित्रांत, तसेंच भाष्यकार पतंजलीच्या ग्रंथांत, गार्गी संहितेंत व पुराणांतून ह्या मिलिंदाच्या स्वारीचे व साकेताच्या वेढ्याचे उल्लेख आढळतात. त्या बहुतेक ठिकाणीं ग्रीकांना यवन ही संज्ञा आहे. यवन म्हणजे ग्रीसच्या दक्षिणेस जीं अयोनियन बेटें आहेत तेथील रहिवासी असा अर्थ असावा. काबूलच्या भागांतील हें यवनांचें राज्य सुमारें दोन शतकें टिकून होतें. पुढें इसवी सनाच्या पहिल्या शतकांत इ. स. २५ सालीं कुशाण लोकांची स्वारी होऊन तें राज्य लयास गेलें.

४. पुष्यमित्राचें शुंग घराणें :— वर सांगितलेली ही उत्तर हिंदुस्थानांतील मिलिंदाची विजयपरंपरा फार वेळ टिकली नाहीं. कारण काबूल प्रांतांत बंड उत्पन्न झाल्यामुळें त्यास घाईघाईनें स्वदेशीं परत जावें लागलें. इकडे पुष्यमित्रानेंही मगधांत थोडें स्थिरस्थावर होतांच वायव्येस सिंधु नदीपर्यंत सैन्य पाठवून मिलिंदाचा पराभव केला व त्या बाजूचें आपलें गेलेलें बहुतेक साम्राज्य परत मिळविलें. हा दिग्विजय जाहीर करण्यासाठीं पुष्यमित्रानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोठा अश्वमेध यज्ञ केला. पुष्यमित्र मोठा शिवभक्त होता. त्यानें अशोकाच्या वेळेपासून मागें पडलेल्या हिंदु धर्मास उत्तेजन दिलें. पुष्यमित्रानें एकंदर छत्तीस वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा मुलगा अग्निमित्र हा गादीवर बसला. हाच कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकांतील नायक होय. शुंग घराण्यांत एकंदर दहा राजे झाले. यांच्या वंशांत भागभद्र हा एक पुरुष होऊन गेला. तो विदिशा (मध्यहिंदुस्थानांतील भेलसा) येथें राज्य करीत असतां हेलिओडोरस हा ग्रीक (यवन) गृहस्थ तक्षशिलेच्या बॅक्ट्रियन राजाकडून तेथें वकील म्हणून आला व कैक वर्षें राहिला (इ. स. पू. १५५). त्या वेळीं त्यास वैष्णव धर्माची आवड उत्पन्न होऊन त्यानें विदिशा येथें एक गरुडध्वज स्तंभ उभारला व त्यावर लिहून ठेवलें कीं, 'इंद्रियदमन, त्याग व सद्‌वर्तन यांचें आचरण केलें असतां मनुष्य स्वर्गास पोहोंचतो. हा गरुडध्वज स्तंभ अद्याप भेलसा येथें प्राचीन ग्रीक–भारतीय सांस्कृतिक संबंधाची साक्ष देत उभा आहे. असो. शुंगांचा शेवटचा राजा देवभूमि हा दुर्व्यसनी होता. त्यास त्याचा मंत्री वासुदेव यानें ठार मारून आपण राज्य बळकाविलें (इ. स. पूर्वी ७३), व मगधाच्या गादीवर कण्व घराण्याची स्थापना केली.

५. कण्व घराणें (इ. स. पूर्वी ७३–२७) :—हें घराणें ब्राह्मण होतें. या घराण्यांतील चार राजांनीं ४५ वर्षें राज्य केलें. ह्या वेळीं कुशाणांच्या स्वाऱ्यांमुळें मगधांची सत्ता अगदींच संपुष्टांत आली होती. कण्वांचा चौथा राजा सुशर्मा हा राज्य करीत असतां आंध्रांनीं स्वारी करून कण्व घराण्याचा शेवट केला.

६. शकांच्या स्वाऱ्या :—मगधांच्या राज्यांत ह्या घडामोडी चालू असतां मध्य आशियांत व हिंदुस्थानच्या वायव्येस आणखी एक क्रांति घडून आली. तिचे हिंदुस्थानवर फार मोठे परिणाम झाले. बॅक्ट्रियाच्या उत्तरेस ऑक्सस व जक्सार्टिस या नद्यांमधील प्रदेशांत सिथियन किंवा शक नांवाचे रानटी लोक राहात असत. त्याच्या पूर्वेस चीनमध्यें युएची नांवाचे लोक असत व त्याच्याही पलीकडे हूणांची वस्ती असे. इ. स. पूर्वीच्या दोन शतकांत हूण, युएची अथवा कुशाण, शक व यवन (ग्रीक) हे एकमेकांस आपल्या देशांतून खो देत हिंदुस्थानकडे घुसले; म्हणजे हूणांनीं कुशानांना, कुशानांनीं शकांना आपापल्या देशांतून उठाविलें; तेव्हां शकांनीं बॅक्ट्रिया प्रांत आक्रमण केला (इ. स. पूर्वी १२०). म्हणून बॅक्ट्रियांतील ग्रीक लोकांनीं हिंदुकुशाच्या पलीकडील काबूलच्या आपल्या राज्याचा आश्रय केला. इकडे शकांनीं बॅक्ट्रियाच्या दक्षिणेस पार्थियाच्या राज्यांत घुसून तेथें सीस्तान किंवा शकस्तान प्रांतांत त्यांचेच भाईबंद फार प्राचीन काळापासून राहात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असत त्यांच्याशीं सख्य केलें व तेथून ते बलुचिस्तानांतून बोलन घाटानें सिंध व पंजाब प्रांतांत शिरले. या पुढील काळांत भारताच्या पश्चिमोत्तर भागांत, तक्षशिला, उज्जयिनी, मथुरा व काठेवाड ह्या प्रांतांत शकांचीं लहान लहान राज्यें पसरलीं. तेथील राजे आपणांस सत्रप–क्षत्रप किंवा महाक्षत्रप म्हणवीत असत. ह्या भागांत शकांचा अंमल इसवी सनाच्या पांचव्या शतकापर्यंत चालू होता. आंध्रांच्या विरोधामुळें शकांचें मोठें साम्राज्य भारतांत प्रस्थापित होऊं शकलें नाहीं. उत्तरेस कुशाण, पूर्वेस गुप्त व दक्षिणेस आंध्र इत्यादि राज्यकर्त्यांशीं शकांना लढावें लागलें; त्यामुळें त्यांची सत्ता पुढें टिकून राहिली नाहीं.

७. **कुशाणांच्या स्वाऱ्या** :––हूणांच्या त्रासानें युएची लोकांनीं जक्सार्टिस व ऑक्सस या नद्यांमधील प्रदेशांत वास्तव्य केलें हें मागें सांगितलेंच आहे. तेथेंही हूणांनीं त्यांचा पाठलाग केला. तेव्हां युएची लोकांनीं शकांना बॅक्ट्रियांतून हुसकून लावून आपण तेथें प्रबळ झाले. सुमारें एक शतकापर्यंत युएची हे बॅक्ट्रियांत वास्तव्य करून होते. युएची लोकांतील कुशाणांच्या टोळीनें कॅडफिसेस राजाच्या नेतृत्वाखालीं हिंदुकुश पर्वत ओलांडून काबूल प्रांतावर स्वारी केली व ग्रीक लोकांचा पराभव केला. पुढें त्याचा मुलगा दुसरा कॅडफिसेस यानें तर भारतांत काशीपर्यंत मुलूख जिंकला.

८. **कनिष्काचें साम्राज्य** :––दुसऱ्या कॅडफिसेसच्या मागून इ. स. १२० सालीं कनिष्क हा कुशाणांचा राजा झाला. त्यानें पुरुषपुर ऊर्फ पेशावर हें शहर आपल्या राजधानीचें ठाणें केलें. कनिष्काचें साम्राज्य फार मोठें होतें. काश्मीर, सिंध, काबूल, यांखेरीज काशगर, चासकंद, खोतान इत्यादि काश्मीरच्या उत्तरेकडील चीनचे प्रांत हे सर्व त्याचे ताब्यांत होते. पूर्वेस काशी व दक्षिणेस विंध्य पर्वतापर्यंत त्याचें राज्य पसरलें होतें. पार्थियन व शक सत्रपांचीं लहान लहान राज्येंही त्याच्या अधिकाराखालीं आलीं होतीं. अशोकानंतर नांव घेण्याजोगें मोठें साम्राज्य कनिष्काचेंच होतें; परंतु त्याचा बराच मोठा भाग भारताबाहेरच्या प्रदेशांत होता.

९. **बौद्ध धर्मास उत्तेजन** :––कनिष्क हा केवळ साम्राज्यसंस्थापकच होता असें नाहीं तर तो विद्येचा चाहता व बौद्ध धर्माचा पुरस्कर्ता होता. मौर्यांचा शेवट झाल्यापासून बौद्ध धर्माचा मोठा आश्रय तुटल्यासारखा झाला होता, परंतु कनिष्कानें त्याची जागा भरून काढली; व बौद्ध धर्माचा प्रसार करण्याची खटपट केली. विद्वानांच्या परिषदा बोलावून तो बौद्ध ग्रंथांवर चर्चा करवीत असे व या चर्चेचे अहवाल तो ताम्रपटावर खोदवून ठेवी. कांहीं वर्षांपूर्वीं पुराणवस्तुसंशोधन खात्यामार्फत पेशावरकडे उत्खननाचें काम चालू होतें, तेव्हां यासंबंधीं बरीच माहिती उपलब्ध झाली. प्रसिद्ध बौद्ध तत्त्व-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



या नकाशांत दाखविलेलीं अशोक व कनिष्क यांचीं साम्राज्यें समकालीन नाहींत. अशोकाच्या साम्राज्याची सीमा-रेषा कनिष्काचे हद्दींतून गेलेली दिसेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्ञानी व कवि अश्वघोष हा कनिष्काचे पदरीं होता. ह्याचा 'बुद्धचरितम्' हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. कनिष्कानें ग्रीक कारागिरांस आपल्या पदरीं बाळगलें व त्यांना बुद्धाची मूर्ति तयार करण्यास आज्ञा दिली. कनिष्क कल्पना देणार व ग्रीक कारागीर ती सत्य सृष्टीत उतरविणार. दोघेही एतद्देशीय नव्हते. अशा स्थितींत त्यांनीं तयार केलेली बुद्धाची मूर्ति बऱ्याच अंशीं ग्रीक देवता अपोलो इच्या वळणावर गेलेली असल्यास नवल नाहीं. या ग्रीक कारागिरांनीं जातक कथेंतील अनेक प्रसंग भिंतीवर चितारलेले आहेत. त्यांत भारतीय व ग्रीक कला-कल्पनांचा मिलाफ झाला आहे. हा चित्रकलेचा सांप्रदाय 'इन्डो-ग्रीक' किंवा 'गांधार' सांप्रदाय या नांवानें प्रसिद्ध आहे. कारण या धर्तीचीं बरींच चित्रें गांधार प्रांतांत सांपडतात. असो. कनिष्क बहुधा १६२ सालीं मृत्यु पावला असावा.

१०. **कुशाण सत्तेचा शेवट** :—त्याच्या मृत्यूनंतर कुशाणांचें राज्य* इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत (इ. स. २२०) टिकून राहिलें आणि काश्मीर प्रांतांत त्यांचा अमल इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत होता. परंतु राजपुतान्यांत उदय पावलेल्या यौधेय नांवाच्या जमातीनें इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांतच उत्तर हिंदुस्थानच्या बहुतेक भागांतून कुशाणांच्या परकीय अंमलाचें उच्चाटन केलें. या कामीं मालवांनीं त्यांना साहय केलें. परंतु या उभय जमातींनीं येथें एकछत्री राज्य स्थापन केलें नाहीं. तें काम बुंदेलखंडांत उदय पावलेल्या भारशिवांनीं केलें. भारशिव हे शिवभक्त होते; व त्यांनीं साम्राज्यस्थापनेचें निदर्शक म्हणून दहा अश्वमेध यज्ञ केले. वीरसेन हा त्यांच्या वंशांतील एक पराक्रमी राजा होऊन गेला.

११. **पार्थियन लोकांच्या स्वाऱ्या** :—इसवी सनापूर्वी २५० च्या सुमारास पार्थियांत† पार्थियन राज्याची स्थापना झाली. त्यांचा राजा पहिला मिथ्रिडेट्स (इ. स. पूर्वी १७१ ते १३८) यानें सिंधुनदीपर्यंत स्वारी केली. पुढील काळांत पार्थियन व शक हे पार्थियांत व हिंदुस्थानच्या सरहद्दीवर शेजारीं शेजारीं राहूं लागले. सिंध प्रांताच्या दक्षिण भागांत पार्थियन लोकांचा अंमल होता. पार्थियन व शक राजांचे शरीरसंबंध देखील झालेले असावेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत गोंडोफर्निस नांवाचा

---

*दक्षिणेंत 'शालिवाहन शक' म्हणून प्रसिद्ध असलेला शक कुशाण राजांनी सुरू केला असावा व शालिवाहनाच्या पराक्रमामुळें ती कालगणना पुढें त्याच्या नांवानें सुरू झाली असावी. शालिवाहन शक इ. स. ७८ पासून सुरू होतो.

†पार्थिया म्हणजे बॅक्ट्रियाच्या नैर्ऋत्येकडील प्रदेश होय. नकाशा प. ९३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्थियन राजा बलुचिस्थान, सिंध वगैरे प्रांतांवर राज्य करीत होता. त्याच्या दरबारीं ख्रिश्चन मिशनरी सेंट थॉमस हा पाठविण्यांत आलेला होता; व त्याच्या उपदेशावरून गोंडोफर्निसनें ख्रिश्चन धर्म स्वीकारला. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत पार्थियन राज्य कुशाण साम्राज्यांत अंतर्भूत झालें. या पार्थियन लोकांचा दक्षिणेंतील पल्लव राजांशीं संबंध जोडण्यांत येतो तो चुकीचा आहे.

१२. **आंध्रांचें राज्य**:—याप्रमाणें भारताच्या पश्चिमोत्तर भागांत यवन, शक, कुशाण व पार्थियन इत्यादि परकीयांनीं स्वाऱ्या करून धुमाकूळ माजवून दिला असतां, दक्षिणेस आंध्रांची सत्ता प्रबळ झाली. आंध्रांची गणना आर्यवंशांत केली जात नाहीं; परंतु ते रानटी नव्हते. त्यांचें राज्य नर्मदेच्या दक्षिणेकडे गोदावरी व कृष्णा यांच्या मधल्या प्रदेशांत विशेषतः पूर्वेकडील भागावर पसरलेलें होतें. कलिंगाचें राज्य त्यांच्या उत्तर सरहद्दीवर होतें. गोदा-कृष्णेच्या पट्टयांत आंध्र फार प्राचीन कालापासून असावेत. कारण त्यांचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलेल्या एका दंतकथेंत आलेला आढळतो, व ऐतरेय ब्राह्मणाचा काल सुमारें इ. स. पूर्वी ८०० वर्षें असा मानतात. चंद्रगुप्ताच्या काळीं म्हणजे इ. स. पूर्वी चौथ्या शतकाच्या अखेरीस आंध्रांचें राज्य मोठें प्रबळ असून त्यांच्याजवळ एक लक्ष पायदळ, दोन हजार घोडेस्वार व एक हजार हत्ती होते, असें रोमन इतिहासकार प्लीनी याचें म्हणणें आहे. त्यास ही माहिती मेगॅस्थिनीसकडूनच मिळाली असावी. अशोकाच्या कारकीर्दींत बहुधा आंध्रांचें राज्य त्याच्या साम्राज्यांत मोडत असावें. परंतु त्याच्या मृत्यूनंतर शातवाहन घराण्यांतील सिमूक राजानें मौर्य साम्राज्याची सत्ता झुगारून दिली व आंध्रांचें स्वातंत्र्य प्रस्थापित केलें. शातवाहनांना शातवाहन, शालिवाहन किंवा शातकर्णी असेंही म्हणतात. शातवाहन किंवा शालिवाहन हा कोणी एक राजा नसून तें घराणें आहे. या घराण्यांत पुष्कळ व्यक्ती होऊन गेल्या. शातवाहनांची वस्ती प्रथम कृष्णेच्या मुखाशीं धनकटक येथें होती. पण पुढें त्यांनीं पश्चिमेकडे नाशिकपर्यंत आपला अंमल बसविल्यावर गोदावरीच्या कांठचें प्रतिष्ठान किंवा पैठण हें शहर आपली राजधानी केलें.

१३. **पुलुमायी शालिवाहन**:—शातवाहनांच्या अंमलाखालीं आंध्रांची सत्ता एकसारखी वाढत चालली व त्यांनीं उत्तरेकडे नजर टाकली. इसवी सनाच्या पूर्वी २७ सालीं त्यांनीं कण्व घराण्याचा शेवटचा राजा सुशर्मा यास पदच्युत करून मगधाचें राज्य बळकाविलें. त्या देशावरील त्यांचें राज्य पुढें सुमारें ३०० वर्षेंपर्यंत टिकलें. आंध्रांच्या हातीं साम्राज्यसत्ता आल्यावर परकीय स्वाऱ्यांची लाट थोपवून धरण्याचें अवघड कार्य त्यांना करावें लागलें. शकांची सत्ता हिंदुस्थानच्या पश्चिमोत्तर भागांत वाढत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालली. त्यांनीं पंजाब, राजपुताना, माळवा, काठेवाड व गुजराथ हे प्रदेश आक्रमण करून नर्मदा नदी ओलांडली व आंध्रांच्या मुलुखांतील नाशिक शहरही काबीज केलें. शकांच्या पुंडाईनें मुलूख उध्वस्त झाला, धर्मबंधनें मोडलीं गेलीं व सर्वत्र अव्यवस्था माजली. सुदैवानें ह्या वेळीं शातवाहन घराण्यांत एक पराक्रमी पुरुष निर्माण झाला व तो म्हणजे गौतमीपुत्र शालिवाहन हा होय. तो इ. स. १०६ सालीं गादीवर आला. त्यानें शकांचा पराभव करून त्यांना नर्मदापार घालवून दिलें; इतकेंच नव्हे तर काठेवाड, माळवा, राजपुताना ह्या खुद्द शकांच्या प्रांतांत जाऊन तेथेंही त्यांचा पाठलाग केला. ह्या शकांच्या पराभवामुळें पुन: सर्वत्र स्थिरस्थावर झालेलें पाहून शालिवाहनाची आई गौतमी हिला फार आनंद झाला, असें कार्ल्याच्या कोरीव लेण्यांतील शिलालेखांवरून दिसून येतें. गौतमीपुत्र शालिवाहनानें २५ वर्षें राज्य केल्यावर इ. स. १३० सालीं त्याचा मुलगा राज्यावर आला. तोच प्रसिद्ध शककर्ता पुलुमायी शालिवाहन होय. त्यानें इ. स. १५८ पर्यंत राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींत आंध्रांचीं शकांशीं बरींच युद्धें झालीं. माळवा प्रांतांतील उज्जयिनीचा शकराजा रुद्रदामन् यानें ठिकठिकाणच्या शकांचें ऐक्य घडवून आणलें व आंध्रांना पुन: नर्मदापार रेटीत नेलें. रुद्रदामन् यानें आपली मुलगी दक्षमित्रा पुलुमायीला दिली होती. परंतु या शरीरसंबंधामुळें शक व आंध्र राजांत घडून आलेलें सख्य फार वेळ टिकलें नाहीं. रुद्रदामननें दक्षिणेंत स्वारी केली, परंतु शालिवाहनानें त्याची डाळ शिजूं दिली नाहीं. तेव्हां रुद्रदामनला हात हालवीत परत जावें लागलें. मात्र रुद्रदामन् पराक्रमी असल्यामुळें त्याचें उच्चाटन शालिवाहनाच्या हातून झालें नाहीं. या शक-आंध्रांच्या झगडयांत व नंतरच्या काळांतील मुसलमान-मराठे यांच्या झगडयांत अनेक दृष्टींनीं साम्य दिसून येतें.

१४. आंध्रांचें कार्य :—शकांचा पराभव झाल्यावर शालिवाहनांचा अंमल नर्मदेच्या दक्षिणेस पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंत पसरला. त्यांच्या कारकीर्दींत बौद्ध व हिंदु धर्मांचा प्रसार चालू होता. बौद्धांनीं कार्लें, अजिंठा, वेरूळ, पांडव लेणें (नाशिकजवळ), इ. ठिकाणीं डोंगरांतून मोठमोठे विहार व स्तूप खोदले. आंध्रांनीं विद्वानांना आश्रय दिला. हिंदुस्थानच्या इतिहासांत आंध्रांची कामगिरी फार महत्त्वाची आहे. शकांसारख्या परकीय सत्ताधीशांची लाट थोपवून धरण्याचें मुख्य श्रेय आंध्र राजांसच दिलें पाहिजे. आंध्र हे आंध्रभृत्य ह्या नांवानेंही ओळखले जातात. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत आंध्रांच्या राज्याचीं तीन शकलें झालीं व त्यावर आभीर, कदंब व इक्ष्वाकू हे राज्य करूं लागले. अशा रीतीनें आंध्रांची दक्षिणेंतील सत्ता इ. स. ४३० पर्यंत टिकून होती. परंतु आंध्रांचा वरावरा इति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



कार्ले येथील कोरीव लेणी : चैत्याचा आंतील भाग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्रास अद्याप अज्ञातच असल्यामुळें त्यांच्या संबंधींच्या हकीकतींत अजून बरीच अनिश्चितता आहे.

१५. **स्थापत्य, शिल्प व चित्रकला:**—कार्ले, अजंठा व वेरूळ हीं तीनही ठिकाणें मुख्यत: या काळांतील मध्ययुगीन कलेचीं दक्षिणेंतील प्रेक्षणीय स्थळें होत. कार्लें येथील कोरीव लेणीं, अजंठा येथील रंगीत चित्रकला, व वेरूळ येथील शिल्प यांच्यासंबंधीं स्तुतिपर उद्‌गार अनेक भारतीय व परदेशस्थ रसिकांनीं काढलेले आहेत. कार्लें येथील डोंगरांत एवढा मोठा कमानदार महाल खोदलेला आहे कीं, त्यांत हजार माणसें सहज बसूं शकतील. त्या महालाच्या दोन्ही बाजूस सुमारें चाळीस फूट उंचीचे भव्य नक्षीदार खांब असून मधोमध स्तूपाची स्थापना केली आहे. (चित्र पृ. १००) या महालाच्या प्रवेशद्वाराच्या वरच्या बाजूस घोड्याच्या नालाप्रमाणें एक कमान असून त्यावाटे येणारा सूर्यप्रकाश थेट स्तूपावर पडतो. येथें बुद्ध भिक्षु प्रार्थनेस जमत असले पाहिजेत. या बुद्ध भिक्षूंस राहण्यासाठीं नजीकच अनेक खोल्या खोदलेल्या आहेत. त्यास विहार म्हणतात. स्तूप हे पूजार्ह अशा मृतांचे अवशेष पुरून ठेवल्याचें निदर्शक होय. हीं कोरीव लेणीं इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत किंवा नंतर लवकरच कोरलीं गेलीं असावींत. गोमांतकांतील वैजयन्ती शहरच्या एका दानशूर श्रेष्ठीनें (व्यापाऱ्यानें) बुद्ध भिक्षूंना हीं तयार करून दिलीं असें म्हणतात.

अजंठा येथील रंगीत चित्रकलेचा काल सामान्यत: इ. सनाचें चौथें किंवा पांचवें शतक समजतात. परंतु खरोखर पाहतां येथील गुहा इ. स. पू. तिसऱ्या शतकापासून इ. सनाच्या सातव्या शतकापर्यन्त हजार वर्षांच्या काळांत निरनिराळ्या काळीं खोदल्या गेल्या. कमींत कमी बाराशें वर्षांपूर्वीं काढलेल्या या चित्रांचे रंग अजूनही तुकतुकीत दिसतात. त्यांतील पद्मपाणी बुद्धाचें चित्र अतिशय प्रेक्षणीय आहे. या चित्रांवरून तत्कालीन वेषभूषा, वस्त्रें नेसण्याची पद्धति, एकंदर रहाणी यांची बरीच कल्पना येते. अजंठा येथील चित्रकला बौद्ध वळणाची आहे.

वेरूळ येथील शिल्पकलेचा कांहीं भाग बराच अलीकडचा म्हणजे इ. सनाच्या आठव्या नवव्या शतकांतील असावा. तेथील कैलासमंदिर हा शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. हें मंदिर मालखेड येथील राष्ट्रकूटांचा राजा कृष्ण यानें बांधलें. येथील कांहीं गुहा खोदण्याचें काम जैनधर्मीयांनीं केल्याचें दिसून येतें.

१६. **वाकाटकांचा उदय :**—इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत सुमारें २८४ सालीं विदर्भांत वाकाटकांचा उदय झाला. त्यांनीं विंध्यपर्वताच्या उत्तर व दक्षिणेकडील प्रदेशावर आपलें वर्चस्व राखलें. यावरून ते इति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हासांत ' विंध्यशक्ति ' या नांवानें प्रसिद्ध आहेत. शक-कुशाणांच्या परकीय अंमलांनीं उध्वस्त झालेल्या समाजांची घडी पुन: नीट बसवून सनातन धर्माची स्थापना करण्याचें कार्य ज्या सत्ताधीशांनीं केलें, त्यांत वाकाटकांचा



अजंठा : पद्मपाणी बुद्ध

भाग फार मोठा आहे. त्यांचा राजा प्रवरसेन यानें आपल्या राज्याचा उत्तर हिंदुस्थानभर विस्तार केला, पण तो फार काळ टिकला नाहीं. त्याचा मुलगा सर्वसेन यानें वाशीम येथें वाकाटकांची दुसरी एक शाखा स्थापन केली. तिचा अंमल पुढें कर्नाटकापर्यंत पसरला. आंध्रांच्या-नंतर महाराष्ट्रावर वाकाटकांचा अंमल होता. वऱ्हाड व महाराष्ट्र या भागावरील वाकाटकांचें राज्य इतकें सुस्थिर होतें कीं, चौथ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शतकांत समुद्रगुप्तानें केलेल्या दक्षिण दिग्विजयांत तो त्यांच्या वाटेस गेला नाहीं. गुप्त वाकाटक घराण्यांत पुढें शरीरसंबंध झाले. समुद्रगुप्ताचा वंशज दुसरा चंद्रगुप्त यानें वाकाटक राजकन्येशीं लग्न केलें व वाकाटक नृपति दुसरा रुद्रसेन यास गुप्त घराण्यांतील प्रभावती गुप्ता ही दिलेली होती. रुद्रसेन लवकरच मृत्यु पावला. त्याच्या पश्चात् प्रभावती गुप्ता हिनें आपल्या अल्पवयी मुलाच्या नांवानें मोठ्या हुषारीनें राज्यकारभार चालविला. प्रभावती गुप्ताचा मुलगा दुसरा प्रवरसेन यानें (इ. स. ४१०–४४५) सेतुबंध हें प्राकृत काव्य लिहिलें आहे. तो मोठा विष्णुभक्त होता. त्याने प्रवरपुर (वर्धा जिल्ह्यांतील पवनार ?) येथें आपली राजधानी स्थापिली. वाकाटकांची पहिली राजधानी हल्लींच्या रामटेक-नजीक नंदोवर्धन येथें होती. वाकाटकांची सत्ता इसवी सनाच्या सहाव्या शतकांत संपुष्टांत आली.

१७. धार्मिक समालोचन :—कालाच्या अनिश्चिततेंतून व राजांच्या नांव-निशींतून याप्रमाणें कशीबशी वाट काढल्यावर तत्कालीन धार्मिक स्थित्यंतरा-कडे लक्ष देणें जरूर आहे. परकीयांच्या स्वाऱ्यांनीं संस्कृतीच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाचे परिणाम झाले नाहींत. बाहेरून येथें कायम वस्ती करून राहणाऱ्या शुक, कुशाण, इ. लोकांनीं हिंदु किंवा बौद्ध धर्माचा स्वीकार केला व ते येथील समाजांत विलीन झाले हा एतद्देशीय संस्कृतीचा मोठा विजय होय. कनिष्कासारख्या कुशाण राजांनीं बौद्ध धर्माच्या प्रसारास मदत केली. शुंग व कण्व राजांनीं हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाची खटपट केली. बौद्ध धर्माच्या सहवासानें हिंदु धर्मांत महत्त्वाचे फेरफार झाले. जुना कर्मठपणा व यज्ञयाग हे मागें पडले. बौद्धांचे विहार पाहून हिंदूंनीं देवळें बांधण्याचा उपक्रम सुरू केला; व त्या देवळांतून ब्रह्मा, विष्णु, महेश ह्या विश्वाच्या उत्पादक, संरक्षक व संहारक देवतांची पूजा होऊं लागली. मूळ बौद्ध धर्मांत मूर्तिपूजा नाहीं. परंतु कनिष्काच्या काळचे महायान पंथाचे बौद्ध विहारांतून बुद्धाची मूर्ति स्थापित असत. ह्यामुळें मूर्तिपूजा अस्तित्वांत आली व तिचा हिंदु धर्मांतही प्रवेश झाला. बद्धपूर्वकालीन आर्यधर्मांत मूर्तिपूजा नव्हती. सारांश, अशोकानंतरच्या काळांत बौद्ध व हिंदु धर्मांची जोडी सर्व देशभर आपापल्यापरी धर्मप्रसाराचें कार्य करीत होती. राज्यकर्त्यांच्या कलाप्रमाणें कधीं एका, तर कधीं दुसऱ्या धर्मास उत्तेजन मिळे. परंतु दोघांत भांडणें होत नव्हतीं.

१८. मनुस्मृति :—प्रख्यात मनुस्मृति नांवाचा ग्रंथ याच कालांत तयार झाला. मनुस्मृति ही मूळ भृगु ऋषींनीं लिहिलेली असून तींत मागाहून पुष्कळ भर पडल्यासारखी वाटते. इ. स. च्या दुसऱ्या शतकांत तिला आजचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
पुस्तकालय

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वरूप प्राप्त झालें असें वेबरचें मत आहे. मनुस्मृतीचें मूळचें स्वरूप कोणतें हें ठरविणें कठिण आहे. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें वर्णाचा उच्चनीच भाव व रक्ताची शुद्धाशुद्धता यांचें महत्त्व नाहींसें झालें, त्यांचें पुनरुज्जीवन व्हावें असा मनुस्मृतीचा प्रयत्न दिसतो. मनुस्मृतींत दिसून येणारें हिंदु धर्माचें स्वरूप प्रागतिक नाहीं. कित्येक वेळां समाज प्रगमनशील असतो, तर कित्येक वेळां बाह्य आपत्तींस तोंड देऊन स्वतःचें आपापल्या कल्पनेप्रमाणें शुद्ध स्वरूप कायम राखण्यासाठीं कडक निर्बंध निर्माण करावे लागतात. मनुस्मृति हा अशा संरक्षक कालांत तयार झालेला धर्मग्रंथ होय. तत्कालीन कल्पनेप्रमाणें समाजांतील निरनिराळ्या वर्गांचीं कर्तव्यें या ग्रंथांत विशद करून सांगितलेलीं आहेत. वर्णाश्रमाचें महत्त्व वर्णिलेलें आहे. बौद्ध धर्माची अवनति सुरू होऊन हिंदु धर्म फिरून उदयास येत असतां मनुस्मृतीस विशेष महत्त्व आलें व तो हिंदूंचा प्रमाण ग्रंथ होऊन बसला. मनुस्मृति ही वर्णसंकराविरुद्ध व वर्णाश्रमधर्माच्या पुनरुज्जीवनार्थ झालेली प्रतिक्रिया होय. तिच्यांत निर्दिष्ट केलेलीं बंधनें सर्व कालास लागू पडतील अशीं असणें शक्य नाहीं.

१९. इतर प्रगति :—पाराशर व गर्ग ऋषींनीं ज्योतिष शास्त्रावर जे उत्तम ग्रंथ लिहिले, त्यावरून तत्कालीन ग्रीक लोकांनीं त्या शास्त्रांत केलेल्या प्रगतीची त्यांना पूर्ण माहिती होती असें दिसतें. पाणिनीच्या अष्टाध्यायीस वार्तिकाची जोड देणारा कात्यायन व कात्यायनाच्या सूत्रांचें स्पष्टीकरण करणारा पंतजलि हे इ. स. पू. अनुक्रमें चौथ्या व दुसऱ्या शतकांत होऊन गेले.* चंद्रगुप्ताच्या वेळीं व पुढेंही भारताचा व्यापार भरभराटींत असून इराण, अरबस्तान, एशियामायनर, रोमन साम्राज्य व चीन इत्यादि परकीय देशांशीं हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांचें दळणवळण असे. मलमलीचें कापड, रेशीम, मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत हे जिन्नस हिंदुस्थानांतून एतद्देशीय जहाजांमधून रोमन साम्राज्याकडे रवाना होत असत. सारांश, चंद्रगुप्त, अशोक, कनिष्क, शालिवाहन यांसारख्या पराक्रमी राजांनीं येथें साम्राज्य स्थापन करून देश भरभराटीस आणला, निरनिराळ्या धार्मिक व भौतिक सुधारणा केल्या, शिल्पकलेस उत्तेजन दिलें, सुंदर व भव्य इमारती बांधल्या. या सर्व गोष्टींमुळें परकीयांनीं हिंदुस्थानास दिलेलें 'सुवर्णभूमि' हें नांव शोभूं लागलें.

*पाणिनी, कात्यायन व पतंजलि यांच्या ग्रंथावरून 'सिद्धांतकौमुदी' या संस्कृत व्याकरण ग्रंथाची रचना भट्टोजी दीक्षित यानें इ. स. १६३० चे सुमारास केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

मृत्युशय्येवर पडलेली राजस्त्री : अजंठा येथील चित्रकलेचा एक उत्कृष्ट नमुना [मागें पहा]

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मृत्युशय्येवरील राजस्त्री (मागील चित्राचा खुलासा)

कोणी राजा राज्य आपल्या स्त्रीवर सोंपवून बौद्ध भिक्षु झाला. त्याची राणी विरहानें खंगून मरणाच्या पंथास लागली आहे. तिच्या थोरल्या मुलीनें तिला सांवरून धरली आहे. धाकटी मुलगी आपली आई आतां थोड्या घटकांची सोबतीण आहे, अशा दुःखित चेहेऱ्यानें तिजकडे पहात आहे. मरणसमयीं पतीचें दर्शन नाहीं तें नाहीं, निदान त्याच्या राजमुकुटाचें तरी दर्शन घ्यावें या हेतूनें दोन सेवकांकडून तो राजमुकुट आणविला आहे. पण त्याकडे पहावयास पापणी उघडण्याचें देखील तिला आतां सामर्थ्य राहिलें नाहीं. कोणी दासी विंझणानें मंद असा वारा घालीत आहे. वर गच्चीवर वैद्यबुवा कांहीं औषधाचा घट घेऊन जात आहेत. त्यास कोणी 'कांहीं उपाय आहे का' म्हणून विचारीत आहे. वैद्यही 'फार तर दोन घटकांची सोबतीण' अशा अर्थाचा हात करीत आहे.

श्रीमंत बाळासाहेब पंतकृत 'अजंठा' पृ. ५४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

१. 'शकांसारख्या परकीय सत्ताधीशांची लाट थोपवून धरण्याचें मुख्य श्रेय आंध्र राजांसच दिलें पाहिजे.' आंध्रांप्रमाणेंच पुढील काळांत स्वाऱ्या करणाऱ्या परकीयांस नेटानें विरोध करणारांचीं उदाहरणें द्या.
२. बौद्ध धर्माचा हिंदु धर्मावर काय परिणाम झाला तें थोडक्यांत सांगा.
३. कालिदास कवीचा काळ इ. स. पू. च्या दुसऱ्या शतकाचे मागें जात नाहीं, तें कां? या भागांत दिलेला पुरावा उल्लेखून कारणें सांगा.
४. टिपणें लिहा : कनिष्क, गांधार चित्रकला, पुलुमायी शालिवाहन, कार्लें, अजंठा, वाकाटक घराणें, मनुस्मृति.

अभ्यास

(१) वायव्य सरहद्दीवरील नकाशा नीट पाहून त्यांत बॅक्ट्रिया, पार्थिया वगैरे देशांचें स्थान निश्चित करा. (२) अस्पृष्टांचा प्रश्न : लेखक प्रा. श्री. म. माटे या ग्रंथाची १६६ ते १९५ हीं पृष्ठें वाचा. (३) हिंदुस्थानास प्राचीन काळीं 'सुवर्णभूमि' हें नांव होतें तें कितपत यथार्थ होतें?

माहितीसाठीं

मनुस्मृतींतील स्त्रीस्वातंत्र्याचा विरोध, बालविवाहाचा पुरस्कार, असवर्ण विवाहास नापसंती, मजूर व कारागीर यांच्या कामासंबंधीं दर्शविलेला हलकेपणा, अतिशूद्रांची अस्पृश्यता, जन्मावरून जातिनिर्णय या सर्व गोष्टींनीं मनुस्मृति हल्लींच्या काळीं कित्येकांच्या निषेधास पात्र झाली आहे यांत अस्वाभाविक असें कांहीं नाहीं. पण त्याबरोबरच त्या ग्रंथांत असलेल्या सुंदर वचनांचाही विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ, सहज निवडलेले पुढील श्लोक पहा.

(१) **यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।**
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ।। अ. ३, **श्लो ५६**

अर्थ :—जेथें स्त्रियांस मान मिळतो तेथें देवतांना राहणें आवडतें, परंतु जेथें त्यांना मान मिळत नाहीं तेथें सर्व खटपटी व्यर्थ जातात.

(२) **स्वराष्ट्रे न्यायवृत्तः स्याद्भृशदण्डश्च शत्रुषु ।**
सुहृत्स्वजिह्मः स्निग्धेषु ब्राह्मणेषु क्षमान्वितः ।। अ. ७, श्लोक ३२

अर्थ :—राजानें स्वतःच्या राज्यांत न्यायानें वागावें, शत्रूंना कडक शासन करावें, प्रियमित्रांशीं सरळपणानें वागावें व ब्राह्मणांशीं क्षमाशील असावें.

(३) **अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ।**
एतं सामासिकं धर्मं चातुर्वर्ण्येऽब्रवीन्मनुः ।। अ. १०, श्लोक ६३

अर्थ :—अहिंसा, सत्य, चौर्य न करणें, शुद्धता व इंद्रियदमन करणें हे धर्माचे पंचविध प्रकार चारी वर्णांस लागू आहेत असें मनु म्हणतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ९ वा
गुप्त-हर्षांचें सुवर्णयुग
(इ. स. ३२० ते इ. स. ६४७)

१. गुप्त घराण्याची स्थापना:—अशोकाच्या मृत्यूपासून ते गुप्त घराण्याच्या स्थापनेपर्यंत हिंदुस्थानांत पूर्व-दक्षिण भागांत आंध्रांचा व पश्चिमोत्तर भागांत शक व कुशाण लोकांचा अंमल होता. आंध्रांनीं मगध देशावर इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत राज्य केलें. त्यानंतर आंध्रांच्या जागीं गुप्तांचा अंमल कसा सुरू झाला हें कळत नाहीं. आंध्रांचा अंमल तेथून उठल्यावर बहुधा नेपाळच्या दक्षिणेस राहणारे लिच्छवी सरदार तेथें प्रबळ झाले असावेत. गुप्तांचा राजा पहिला चंद्रगुप्त यानें त्या घराण्यांतील स्त्रीशीं लग्न केलें होतें व लिच्छवींचें पाठबळ मिळेल हें पाहून तो इ. स. ३२० सालीं पाटलीपुत्राच्या गादीवर बसला; व स्वतः महाराज ही पदवी त्यानें धारण केली. येथपासून ते हर्षाच्या मृत्यूपर्यंतचा (इ. स. ६४७) सुमारें तीनशें वर्षांचा काळ हिंदुस्थानांत भरभराटीचा गेला. यामुळें या काळास 'सुवर्णयुग' असें म्हणतात.

२. चक्रवर्ती समुद्रगुप्त (इ. स. ३३०–३७५) :—पहिल्या चंद्रगुप्तानें इ. स. ३३० पर्यंत राज्य केलें. त्यानंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त यानें मगधाचें साम्राज्य फिरून उदयास आणिलें. अशोकानंतर नांव घेण्यासारखा चक्रवर्ती समुद्रगुप्त हा होय. अशोकास धर्मप्रसाराची आवड, तर समुद्रगुप्तास राज्यप्रसाराची आवड; एक चंद्रप्रकाशाप्रमाणें शीतल, तर दुसरा आपल्या प्रखर क्षात्रतेजानें तळपणारा; असे हिंदुस्थानच्या इतिहासांत भिन्न प्रकृतीचे पण आपापल्यापरी असामान्य कर्तृत्वाचे राजे होऊन गेले. समुद्रगुप्ताचेही शिलालेख उपलब्ध आहेत व योगायोग हा कीं, ज्या शिलेवर अशोकानें आपल्या धर्मप्रसाराचा शांततामय संदेश लिहून ठेविला त्याच्याच खालीं सहा शतकांनीं समुद्रगुप्तानें आपल्या दिग्विजयाचें वर्णन लिहून ठेविलें. शिलालेखांखेरीज समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीची माहिती देणारीं त्याचीं नाणीं उपलब्ध आहेत. एका नाण्यावर गरुडचिन्हांकित निशाण आहे, दुसऱ्यावर अश्वमेधांतील घोड्याचें चित्र आहे व तिसऱ्यावर तो हातांत वीणा घेऊन बसला आहे असें दाखविलें आहे. या तिन्ही नाण्यांवरून समुद्रगुप्त हा बौद्ध धर्मीय नसून भगवद्गीतेंतील भागवत धर्माप्रमाणें जयिष्णु व प्रवृत्तिपर होता. त्यानें दिग्विजय झाल्यावर पुष्यमित्र शुंगाप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्वमेध यज्ञ केला असावा व त्यास पराक्रमाप्रमाणेंच विद्येची, गायनवादनाची व ललितकलेची आवड होती अशीं अनुमानें सुचतात.



अश्वमेधांतील घोडयाचें चित्र दर्शविणारें
नाणें व त्याची मागील बाजू

समुद्रगुप्ताच्या दरबारीं असलेल्या हरिषेण कवीनें केलेलें प्रशस्तीपर संस्कृत काव्य अलाहाबाद येथील स्तंभावर कोरलेलें आहे त्यावरून व इतर शिलालेखांवरून त्याच्या पराक्रमाचें चतुर्विध स्वरूप लक्षांत येतें. कांहीं राजांना त्यानें जिंकलें पण त्यांचें स्वातंत्र्य त्यांस परत दिलें. महाकांतार (ओरिसा) देशाचा व्याघ्रराजा, पिष्टपूरचा (गोदावरीच्या मुखाजवळ) महेंद्र, देवराष्ट्राचा कुबेर, इत्यादि दक्षिणेकडील कांची (कांजीवरम) पर्यंतचे बारा राजे या यादींत आहेत. उत्तरेकडील राजांचा त्यानें समूळ उच्छेद केला. पूर्व-पश्चिम सरहद्दीवरील राजांना त्यानें मांडलिक केलें व कांहीं रानटी टोळयांच्या नायकांस त्यानें आपले सेवक केलें. वायव्य सरहद्दीवर शाही, शहानुशाही, देवपुत्र व मुरुंड इत्यादि नांवें धारण करणाऱ्या राजांचा त्यानें बंदोबस्त केला. पैकीं शाही व शहानुशाही ह्या राजा व राजाधिराज ह्या अर्थाच्या इराणी पदव्या असून त्या कुशाण राजे लावीत असत. त्यांचें साम्राज्य ह्या काळांत मोडलेलें असून त्या जागीं लहान लहान राज्यें अस्तित्वांत आलेलीं होतीं. देवपुत्र ही चिनी पदवीही कुशाण राजांचीच होती. शकांचा अंमल पंजाब, राजपुताना, माळवा ह्या बाजूस होता व मुरुंड ही परकी टोळी असावी. एकंदरींत समुद्रगुप्ताच्या प्रत्यक्ष अंमलाखालीं नक्की कोणते प्रांत होते हें निश्चित सांगतां येत नसलें तरी पश्चिमेस काबूलपासून पूर्वेस आसामपर्यंत व उत्तरेस नेपाळपासून दक्षिणेस कांजीवरम्‌पर्यंत सर्व देश त्याच्या अधिराज्याखालीं मोडत असेल यांत शंका नाहीं. सीलोनचा राजा मेघवर्मा त्याच्याशीं स्नेहभावानें राही. त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देशांतील अनेक बौद्ध यात्रेकरू बुद्धगयेस येत. तेथें त्यांची गैरसोय होत असे ती दूर व्हावी म्हणून व त्यांच्याकरितां बुद्धगयेस एक स्वतंत्र धर्मशाळा बांधण्यास परवानगी मिळावी म्हणून मेघवर्म्यानें समुद्रगुप्ताकडे आपला वकील पाठविला. तेव्हां समुद्रगुप्तानें आनंदानें ती गोष्ट कबूल केली.

अशा रीतीनें मांडलिक राजांचें राज्य हरण न करतां त्यांना एकाच धोरणानें एकत्र राखून ठेवणारा व आपल्या साम्राज्याभोंवतीं मित्रराजांचें राजमंडळ निर्माण करणारा हा दिग्विजयी व सुसंस्कृत सम्राट् इ. स. ३७५ सालीं मरण पावला. त्याला चंद्रप्रकाश, बालादित्य अशीं नांवें दिलेलीं आढळतात. क्वचित् त्याला 'विक्रमादित्य' असेंही म्हटलें आहे. पाश्चिमात्य इतिहासकारांनीं त्यास ' प्राचीन भारताचा नेपोलिअन ' अशी पदवी दिली आहे.

३. **विक्रमादित्य** (इ. स. ३७५–४१३) :—त्याच्या मागून त्याचा मुलगा दुसरा चंद्रगुप्त हा गादीवर आला. त्यानें विक्रमादित्य* हें नांव धारण केलें. चंद्रगुप्तास पंजाब व बंगाल हे दोन प्रांत आपल्या ताब्यांत आणण्यास त्या प्रांतांवर स्वाऱ्या कराव्या लागल्या असें दिल्ली येथील एका मोठ्या लोहस्तंभावरील लेखावरून दिसून येतें. यांशिवाय चंद्रगुप्तानें वाकाटकांशीं सख्यत्व जोडून माळवा प्रांतांतील क्षत्रपांचा पराभव केला व त्यांचें मुख्य शहर जें उज्जयिनी तेथें आपली राजधानी स्थापिली. पुढें त्यानें गुजराथ, काठेवाड हे प्रांतही आपल्या अंमलाखालीं आणले. चंद्रगुप्तानें सुवर्ण व रौप्य चलन उपयोगांत आणून व्यापारास उत्तेजन दिलें. उज्जयिनी शहर त्या काळीं मोठें भरभराटींत होतें. परदेशांतील माल समुद्रमार्गानें खंबायतचे आखातांत येई व तेथून तो उज्जयिनीकडे रवाना होई. उज्जयिनीहून उत्तर हिंदुस्थानांत निरनिराळ्या दिशेनें रस्ते फुटलेले असत, म्हणून तें शहर व्यापाराचें केंद्र होतें. पूर्वीं हिंदुस्थानांत रेखांश उज्जयिनीपासून मोजीत असत. चंद्रगुप्त (विक्रमादित्य) हा विष्णुभक्त असून त्यास 'परमभागवत' हें नांव दिलेलें आढळतें. शकांसारख्या परकीयांचा पराभव व हिंदुधर्माचें पुनरुत्थान हें त्याचें जीवितकार्य होतें. पौराणिक हिंदुधर्माची व्याप्ति वाढवून त्यांत बुद्धाची शिकवण सामावून घेऊन हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्याचें कार्य यानें घडवून आणलें. विक्रमादित्य मोठा न्यायी होता व त्याच्या न्यायचातुर्याच्या अनेक दंतकथा 'सिंहासनबत्तिसी" यासारख्या लोकप्रिय ग्रंथांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. कालिदास आदिकरून नऊ विद्वान् रत्नें याच्या दरबारीं होतीं असें म्हणतात. परंतु

---

* हेंच नांव पुढें त्याचा नातू स्कंदगुप्त व माळव्याचा राजा यशोधर्म यांनीं धारण केलें असल्यानें संस्कृत वाङ्मयांतून विक्रमादित्याबद्दल प्रसिद्ध असलेल्या सर्व गोष्टींचा संबंध चंद्रगुप्ताशीं लावतांना काळजी घेणें जरूर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे सर्व पुरुष समकालीन नसल्यानें ही नवरत्नांची हकीकत मागाहून प्रचलित झालेली असावी. विक्रमादित्यानें इ. स. ४१३ पर्यंत राज्य केलें. इ. स. पूर्वी ५७ पासून हिंदुस्थानांत सुरू झालेल्या कालगणनेस पुढें त्याचें नांव मिळालें व हल्लीं ती 'विक्रमसंवत्' या नांवानें प्रसिद्ध आहे.‡

४. फाहिएनचें वर्णन :—फाहिएन नांवाचा चिनी यात्रेकरू विक्रमादित्याच्या कारकीर्दींत इ. स. ४०५–११ या वर्षांत बौद्ध धर्माचीं पवित्र स्थळें पाहण्याच्या उद्देशानें येऊन गेला. त्यानें लिहून ठेविलेल्या हकीकतीवरून असें दिसतें कीं, उत्तर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं बौद्ध व हिंदु धर्माचे अनुयायी स्नेहभावानें राहात असत. त्याच्या ग्रंथांतून गौतम बुद्धाच्या रथाच्या मिरवणुकीचें वर्णन वाचावयास मिळतें. यावरून त्या काळीं बौद्ध व हिंदु धर्मांत मूर्तिपूजेचा प्रसार कसा झाला होता हें कळून येतें. याखेरीज सामान्य स्थितीचें वर्णन देतांना तो लिहितो कीं :

"लोक सुस्थितींत आहेत व त्यांच्यावर डोईपट्टीसारखे जुलमी कर नाहींत. त्यांना राज्यांतून इकडून तिकडे जाण्याची पूर्ण मुभा आहे. राजानें गुन्हेगारांस दिलेल्या शिक्षा सौम्य तऱ्हेच्या असतात. राज्यांत लोक प्राण्यांचा वध करीत नाहींत, मद्य पीत नाहींत व लसूण-कांदेही खात नाहींत. ह्या राज्यांत गरीबांस फुकट औषध मिळावें म्हणून दवाखाने काढलेले आहेत. तेथून पुष्कळ आजारी मनुष्यें बरीं होऊन जातात."

—दत्त यांच्या पुस्तकांतील उताऱ्यावरून.

५. हुणांच्या स्वाऱ्या :—चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या मागून त्याचा मुलगा कुमारगुप्त हा गादीवर बसला. यानेंही दिग्विजय करून अश्वमेध यज्ञ केला. ही अश्वमेध यज्ञाची आवड हिंदु धर्माच्या वाढत्या वर्चस्वाचा पुरावा होय. कुमारगुप्त इ. स. ४५५ त मरण पावला; व नंतर त्याचा मुलगा स्कंदगुप्त हा गादीवर बसला. यानें इ. स. ४८० पर्यंत राज्य केलें. याच्या कारकीर्दींत वायव्येकडून मध्य आशियांतील हूण लोक येऊन त्यांनीं हिंदुस्थानवर स्वारी करण्यास सुरुवात केली. स्कंदगुप्तानें मोठ्या शौर्यानें हुणांचा हल्ला परतवून लावला. परंतु त्याच्या पश्चात् हुणांच्या टोळीचा नायक तोरमाण यानें गुप्तांचा पराभव करून इ. स. ४९९ त त्यांचें उज्जयिनीचें राज्य बळकाविलें. हुणांचा अंमल येथें फार दिवस टिकला

‡ हल्लीं उत्तर हिंदुस्थानांत विक्रमसंवत् व दक्षिण हिंदुस्थानांत शालिवाहन शक चालू आहे. इसवी सनांत ५७ मिळविले कीं विक्रमसंवत् येतो व ७८ वजा केले कीं, शालिवाहन शक येतो. शक कालगणना चैत्र शु. १ पासून होते व संवताची कार्तिक शु. १ पासून होते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. माळव्याचा पराक्रमी राजा यशोधर्म यानें इ. स. ५२८ सालीं निरनिराळ्या राजांचा एक संघ बनवून तोरमाणाचा मुलगा मिहिरकुल याचा मुलतानजवळ कोरूर येथें पराभव केला. पुढें मिहिरकुलानें कुशाणास हांकून देऊन काश्मीरचें राज्य बळकाविलें. परंतु हेंही राज्य त्यास फार दिवस लाभलें नाहीं. हुणांच्या हल्ल्यांनीं गुप्तांच्या साम्राज्याचीं शकलें झालीं. परंतु हुणांना उत्तर हिंदुस्थानांत आपलें वर्चस्व प्रस्थापित करतां आलें नाहीं. गुप्तांच्या एकछत्री अमलाऐवजीं ठिकठिकाणीं अनेक सत्ताधीश इसवी सनाच्या सहाव्या शतकांत तेथें राज्य करूं लागले. गंगा-यमुनेच्या प्रदेशांत मौखरींचें राज्य झालें; मगधांत गुप्तांचा अंमल चालूच होता; सौराष्ट्र* हें वल्लभी राजांच्या अंमलाखालीं इ. स. ४८० त स्वतंत्र झालें; व माळव्यांतही स्वतंत्र राज्याची स्थापना झाली. ह्या सर्वांची स्वतंत्र हकीकत देण्याइतकी माहिती उपलब्ध नाहीं. इ. स. च्या सहाव्या शतकाच्या इतिहासावर त्रोटक प्रकाश टाकणारे कांहीं कोरीव लेख उपलब्ध आहेत, परंतु त्यांची सुसंगत जुळणी करणें कठिण असल्यानें इ. स. ६०० पर्यंतची हकीकत येथेंच पुरी झाली असें मानावें लागतें.

६. **दानशूर सम्राट् हर्षवर्धन (इ.स. ६०६–६४७)** :—इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थानांत दुसरा सम्राट उदयास आला. तो ठाणेश्वराचा हर्षवर्धन ऊर्फ शिलादित्य होय. हर्ष समुद्रगुप्ताप्रमाणें रणशूर व अशोकाप्रमाणें दानशूर होता. दातृत्वाच्या गुणांत तर त्यानें अशोकासही लाजविलें असें म्हणण्यास हरकत नाहीं, समुद्रगुप्तानें केलेलीं युद्धें चढाईच्या स्वरूपाचीं होतीं. परंतु हर्षानें मारलेल्या लढाया राज्यास उपद्रव देणाऱ्यांना शासन करून त्यांचा त्रास कायमचा बंद पडावा या उद्देशानें केलेल्या होत्या. आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभीं त्यानें शत्रूंचा बदोबस्त केल्यावर तो पुन: लढाईच्या भानगडींत फारसा पडला नाहीं. त्याच्या कारकीर्दीची हकीकत दोन स्वतंत्र व विश्वसनीय साधनांमुळें चांगली उपलब्ध आहे. त्याच्या पदरीं बाणभट्ट म्हणून विद्वान् पंडित होता. त्यानें 'हर्षचरित' नामक ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ उपमा अलंकारांनीं खेचून भरलेला असला तरी त्यांतून ऐतिहासिक विधानांची निवड करण्यास अडचण पडत नाहीं. तसेंच 'ह्युएनत्संग' ऊर्फ 'युअन च्वंग' हा चिनी बौद्धधर्मीय प्रवासी इ. स. ६३० पासून इ. स. ६४३ पर्यंत हिंदुस्थानांत फिरत होता. तो पुष्कळ दिवस हर्षाच्या दरबारीं होता. त्यानें स्वदेशीं गेल्यावर आपल्या प्रवासाचें इतिवृत्त लिहून ठेविलें आहे.

---

*सौराष्ट्र पुढें इ. स. ७७० पर्यंत त्यांच्या ताब्यांत होतें. पुढें तेथें राजपुतांनीं आपला अंमल बसविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं दोन्ही साधनें कांहीशीं एकमेकांस पूरक आहेत. हर्षचरितावरून राजाचें खाजगी चरित्र, राजवाड्यांतील चालीरीती वगैरेंचा बोध होतो व ह्युएन-त्संगाचें प्रवासवृत्त तत्कालीन राजकीय व धार्मिक चळवळी समजण्यास उपयोगी पडतें. ह्यांखेरीज हर्षकालीन किरकोळ शिलालेख व नाणींही उपलब्ध आहेत.

७. **राज्यप्राप्ति** :—हर्षाचें वर्धन घराणें वैश्यवर्णीय होतें. त्याचा बाप प्रभाकरवर्धन याची कारकीर्द बहुधा इ. स. ५८३–६०६ पर्यंत झाली असावी. याची बायको यशोवती ही पश्चिम माळव्याचा राजा यशोधर्म याची मुलगी असून तिला राज्यवर्धन व हर्षवर्धन असे दोन पुत्र आणि राज्यश्री नांवाची कन्या अशीं तीन अपत्यें झालीं. राज्यश्री वयांत आल्यावर तिचें लग्न कनोजचा राजा गृहवर्मा मौखरी याच्याशीं झालें. राज्यवर्धन मोठा झाल्यावर प्रभाकरवर्धनानें त्यास हुणांवर स्वारी करण्यास पाठविलें. तेव्हां हर्षही त्याजबरोबर गेला. मागें प्रभाकरवर्धन आजारी पडला म्हणून हर्ष घाई-घाईनें परत आला. राज्यवर्धनही हुणांचा बंदोबस्त करून परत येत होताच, परंतु तो येऊन पोहोंचण्यापूर्वींच प्रभाकरवर्धन मृत्यु पावला व राणी यशोवती सती गेली. नंतर राज्यवर्धन राज्यारूढ झाला. इतक्यांत त्यास बातमी कळली कीं, पूर्व माळव्याचा राजा देवगुप्त यानें कनोज काबीज करून गृहवर्म्यास ठार मारलें व राज्यश्रीस बंदिवासांत टाकिलें. तें ऐकतांच राज्यवर्धन आपलें सैन्य घेऊन देवगुप्तावर चाल करून गेला व त्यानें त्याचा पराभवही केला. परंतु दुर्दैवानें असें झालें कीं, गौड देशाचा राजा शशांक यानें राज्यवर्धनास विश्वासघात करून ठार मारिलें. ही बातमी ठाणेश्वरच्या राजधानींत समजतांच एकच हाहाःकार उडाला. या लागोपाठ कोसळलेल्या आपत्तींमुळें भांबावून गेलेला हर्ष राज्यवर्धनाच्या मागून राज्यावर बसण्यास तयार होईना; परतु तसें केल्यावांचून त्यास गत्यंतर नव्हतें. गृहवर्म्याच्या मृत्यूनें कनोजचीही गादी रिकामी झाली, तेव्हां त्यावर कोणीं बसावें हा प्रश्न पडला. त्या वेळीं कनोजच्या मंत्रिपरिषदेनें हर्षास कनोजचें राज्य चालविण्याविषयीं विनंति केली. ती हर्षानें मोठ्या नाखुषीनें स्वीकारली. अशा रीतीनें हर्षाच्या अंमलाखालीं ठाणेश्वर व कनोज हीं राज्यें एक झालीं व हर्ष कनोज येथेंच राहूं लागला.

८. **राज्यश्रीचा शोध** :—परंतु हर्षास स्वस्थ बसणें शक्य नव्हतें. गौड राजाचा सूड घेणें व राज्यश्रीस सोडवून आणणें हीं त्याचीं आवश्यक कर्तव्यें होतीं. परंतु त्याबरोबरच शत्रूंना चांगलें शासन केल्याशिवाय राज्यावर होणाऱ्या हल्ल्यांचा पुरता बंदोबस्त होणें शक्य नव्हतें, म्हणून तो दिग्विजयास निघाला. वाटेंत हर्षास बातमी समजली कीं, राज्यश्री ही तुरुंगांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निसटून विंध्याद्रीच्या अरण्यांत पळून गेली. तेव्हां हर्षास दिग्विजयाचा मार्ग सोडून अगोदर तिच्या शोधार्थ जाणें भाग पडलें. त्याप्रमाणें तो आपल्या अनुयायांसह विंध्याद्रीच्या अरण्यांत हिंडत असतां त्याची व दिवाकरमित्र नांवाच्या बौद्ध साधूची गांठ पडली. त्याच्या मदतीनें हर्षानें तिचा शोध केला. तों ती अगदीं ऐन वेळीं हातीं लागली. कारण ती सती जाण्याच्या अगदीं तयारींत होती; व थोडी वेळ चुकती तर राज्यश्री हातची गेली असती. हर्षानें तिचें सांत्वन केलें व तिला सती जाण्यापासून परावृत्त केलें. तरी तिनें सर्वसंगपरित्याग करून दिवाकरमित्राजवळ राहून बौद्ध भिक्षुणीचा मार्ग स्वीकारण्याचें ठरविलें. परंतु हर्षानें पुनः तिचें समाधान करून सांगितलें कीं, ज्या शत्रूंनीं विश्वासघातानें दोन्ही घराण्यांतील पुरुषांना ठार मारिलें, त्यांचा नायनाट केल्याशिवाय स्वस्थ बसणें योग्य नाहीं.. म्हणून आपणांस प्रथम त्या उद्योगास लागलें पाहिजे. त्यानंतर आपण दोघेही बौद्धसंघांत सामील होऊं. ह्या उत्तरावरून तिनें भिक्षुणी बनण्याचा आपला बेत तूर्त रहीत केला.

९. दिग्विजय :—ही कामगिरी आटोपल्यावर हर्ष दिग्विजयास निघाला. ह्या दिग्विजयांत त्यानें कसकशा लढाया जिंकल्या तें कळण्यास साधनें उपलब्ध नाहींत. शिवाय त्या काळांतील पद्धतीप्रमाणें जिंकलेल्या राजानें जिंकणाऱ्याचें अधिराज्य मान्य केल्यावर त्याचें राज्य खालसा होत नसे. तसेंच राज्याच्या सरहद्दीवरील स्नेहसंबंध असणारे राजे मध्यवर्ती राजाचे मांडलिकच असत असें नाहीं. यामुळें हर्षाच्या साम्राज्याची मर्यादा फक्त ढोबळ रीतीनें ठरवितां येते. पण एवढें मात्र खरें कीं, प्रभाकरवर्धनाच्या मृत्यूसमयीं शत्रू चहूंकडून उठले होते. हूण त्रास देत होते, गौड व माळवा या पूर्वपश्चिम प्रांतांतील राजे एकत्र होऊन त्यांनीं कनोज घशाखालीं घातलें होतें व ठाणेश्वराचा घास गिळण्याचा संकल्प पुरा करीत आणला होता. अशा वेळीं हर्षानें एकामागून एक सर्व शत्रूंना पराभूत करून पंजाब, सिंध, वलभी (काठेवाड), नेपाळ इत्यादि प्रदेशांत आपला अंमल बसविला. त्यानें गौड राजा शशांक यास एकदां पूर्वेकडे रेटीत नेलें तें पुनः पश्चिमेकडे येऊं दिलें नाहीं व कामरूप (आसाम) च्या कुमार राजाशीं सख्य जोडून तिकडेही त्याची प्रगति कुंठित केली. अशा रीतीनें सर्व उत्तर हिंदुस्थान अवघ्या सहा वर्षांत निःशत्रु करून तो दक्षिणेकडे वळला. तेथें मात्र त्याची विजयपरंपरा थांबली. कारण चालुक्यांचा राजा दुसरा पुलकेशी यानें आपल्या पराक्रमानें दक्षिणेस त्याच्या तोलाचें साम्राज्य निर्माण केलें होतें. हर्ष रेवा (नर्मदा) नदी उतरून त्याजवर चाल करून आला असतां पुलकेशीनें त्याचा पराभव करून त्यास परतवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लाविलें. पुलकेशीला हा विजय मिळण्याचें मुख्य कारण म्हणजे त्याचे लोक मोठे शूर होते. वर सांगितलेला चिनी प्रवासी ह्युएनत्सग हा एक वेळ त्याच्या दरबारीं गेला होता. महाराष्ट्रास 'महाराष्ट्र' हें नांव प्रथम त्याच्याच ग्रंथांत सांपडतें. तेथील लोकांविषयीचे त्याचे उद्गार वाचनीय आहेत. तो म्हणतो : " मराठे आपल्या उपकारकर्त्यांशीं कृतज्ञतेनें वागतात. पण शत्रूचा नायनाट केल्याखेरीज कधीं रहावयाचे नाहींत. त्यांचा कोणीं अपमान केल्यास प्राणाचीही पर्वा न करतां सूड घेतील; परंतु त्याबरोबरच दुःखितांना मदत करतांना त्यांना आपल्या श्रमाचें भान रहावयाचें नाहीं. " असो. एकंदरींत तत्कालीन हिंदुस्थान हें हर्ष व पुलकेशी या दोन अनुक्रमें उत्तर व दक्षिण प्रांतांच्या चक्रवर्ती राजांच्या अंमलाखालीं होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या सहा वर्षांत दिग्विजय आटोपल्यावर हर्ष एक लाख शिपायी व साठ हजार हत्ती पदरीं बाळगून राहूं लागला. या त्याच्या वाढलेल्या लष्करी सामर्थ्यामुळें राज्यावर होणारे भुरटे हल्ले थांबले व पुढें त्यास लढाईचें फारसें कारणही पडलें नाहीं.

१०. बौद्ध धर्मास उत्तेजन :— यापुढील बहुतेक आयुष्य त्यानें बौद्ध धर्माच्या प्रसारांत घालविलें. तो आरंभापासूनच बौद्धधर्मीय नसावा, कारण तो दिग्विजयास निघाला तेव्हां त्यानें भक्तिपूर्वक 'नीललोहिता'चें (शंकराचें) स्मरण केलें असें वर्णन आहे. पूर्ववयांतच एकाहून एक संकटें आल्यानें त्याच्या मनांत वैराग्य उत्पन्न झालें व दिवाकरमित्राच्या सहवासामुळें त्याच्या मनांत बौद्ध धर्माची प्रेरणा झाली असावी. चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा त्या वेळीं बुद्धाच्या कर्मभूमीस भेट देण्यासाठीं व जुन्या बौद्ध ग्रंथांचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं हिंदुस्थानांत आला होता. तो हर्षाच्या दरबारीं आला असतां हर्षानें कनोज येथें एक मोठी परिषद भरविली. त्यानें अशोकाप्रमाणें आपल्या राज्यांत प्राणिहत्या बंद केली व बौद्ध भिक्षूंसाठीं गंगेच्या कांठीं विहार स्थापन करून ठिकठिकाणीं शंभर फूट उंचीचे मनोरे उभे केले. बौद्ध भिक्षूंनीं प्रतिवर्षी एकवीस दिवस एकत्र राहून विचारविनिमय करावा म्हणून तो त्यांच्यासाठीं सर्व सोयी करून देत असे.

११. हर्षाचें दातृत्व :— परंतु बौद्ध धर्माखेरीज इतर धर्माची त्यानें हेळसांड केली नाहीं. तो आपल्या कारकीर्दीत दर पांच वर्षांनीं प्रयाग येथें एक मोठी यात्रा* भरवून दानधर्म करीत असे. त्या प्रसंगीं समा-

* हा समारंभ उत्तर हिंदुस्थानांत अद्याप चालू असून यास 'कुंभमेळा' असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रंभास सुरुवात करतांना बुद्धाच्या मूर्तीबरोबरच आदित्य (सूर्य) आणि ईश्वर (शिव) या मूर्तींचीही मिरवणूक काढून त्यांची स्थापना करवीत असे व दानधर्म करतांना बौद्ध भिक्षूंबरोबरच ब्राह्मणांस, श्रमणांस, निर्ग्रंथी लोकांस, इतकेंच नव्हे तर नास्तिकांसही उदार हस्तानें दान देत असे. ह्या ठिकाणीं तो आपली पंचवार्षिक शिल्लक खलास करून टाकी. एकदां तर त्यानें आपल्या सर्वस्वाचें दान केल्यावर त्याच्याजवळ स्वतःचें असें पांघरण्यास वस्त्रदेखील राहिलें नाहीं. तेव्हां त्यानें आपली बहीण राज्यश्री हिच्याजवळून पांघरावयास एक भगवें वस्त्र मागून घेतलें! अशा रीतीनें निष्कांचन होण्यांत हर्षास मोठा आनंद होई. आपल्या पराक्रमानें साम्राज्यवैभव कमावून उदार मनानें त्यावर उदक सोडणारा हर्षासारखा राजा जगांतील कोणत्या देशाच्या इतिहासांत सांपडेल बरें ?

स्व ह स्तो म म म हा रा जा धि रा ज श्री ह र्ष स्य

[हर्षानें एका गांवाचें दान ब्राह्मणांना दिल्याचा ताम्रपट लखनौ म्युझियममध्यें उपलब्ध आहे. त्यांतील हीं अक्षरें श्रीहर्षाची स्वाक्षरी असावी असा तर्क आहे.]

१२. **विद्येची प्रगति :**—हर्षाच्या काळीं हिंदुस्थानांत विद्येची अत्यंत प्रगति झालेली होती. त्या काळांत ह्युएनत्संगासारखे परदेशचे अनेक लोक विद्यार्जनासाठीं येथें येत. हर्ष आपल्या संपत्तीचा चौथा हिस्सा विद्येच्या उत्तेजनासाठीं राखून ठेवीत असे. आधुनिक सुधारलेलीं राष्ट्रेंही शिक्षणावर एवढा खर्च करूं शकत नाहींत. बुद्धिमान् वर्गांत संन्यस्त वृत्तीनें राहण्याची सर्वसाधारण प्रवृत्ति असे व ते आपला काल सामा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यतः अध्ययन, अध्यापन इत्यादि कृत्यांत घालवीत असत. एकट्या ह्युएनत्संगानें आपल्या सफरींत पांच हजार विहार पाहिले व त्यांतील बौद्ध साधूंची त्यानें दिलेली संख्या दोन लाखांवर आहे ! ह्याखेरीज इतर धर्मपंथांचे साधू वेगळेच. नालंदा, कनोज, प्रयाग, गया इत्यादि ठिकाणचीं विद्यापीठें विद्यार्थ्यांनीं गजबजलेलीं असत. त्या सर्वांत नालंदाची ख्याति फार मोठी आहे. हर्षाच्या उदयापूर्वीं पांचव्या शतकापासून या विद्यापीठाचें कार्य जोरांत चालू होतें. याची इमारत सहा मजली टोलेजंग असून त्यांत दहा हजार विद्यार्थ्यांची सोय होऊं शके. असल्या विश्वविद्यालयांत फक्त प्रबुद्ध विद्यार्थ्यांचाच प्रवेश होई. प्रारंभींच्या प्रवेशपरीक्षेंत सामान्य विद्यार्थी पास होणें मुष्किल, इतकी ती परीक्षा कठिण असे. नालंदा येथें दररोज निरनिराळ्या शंभर विषयांवर प्रवचनें होत. त्या काळीं नालंदा हें आंतरराष्ट्रीय विद्येचें केंद्र बनलें होतें; व मध्यआशिया, चीन, कोरिया वगैरे दूरदूरच्या देशांतील विद्यार्थी तेथें बौद्धधर्माच्या अभ्यासास येत व त्याचा आपल्या देशांत प्रसार करीत. बौद्ध धर्माच्या अभ्यासाखेरीज वेदविद्या, हेतुविद्या (तर्कशास्त्र), शब्दविद्या, सांख्य, योग, न्याय इत्यादि शास्त्रें अशीं त्या विद्यामंदिरास विविध दालनें होतीं व कोणासही आपल्या आवडीच्या विषयांत प्रावीण्य मिळविण्याची संधि मिळे. विद्यार्थी व गुरु हे एकत्र राहात असून त्यांची सर्व सोय त्या ठिकाणीं होत असे. या विद्यापीठाला शंभर गांवांचें उत्पन्न लावून दिलें होतें. शीलभद्र हा विद्यापीठाचा कुलगुरु होता. ह्याशिवाय विद्येच्या उन्नतीचें आणखी एक कारण असें कीं, तत्कालीन राजे विद्वान् पंडितांस आपल्या पदरीं बाळगणें हें भूषण मानीत. हर्षाच्या पदरीं बाणभट्ट, हरदत्त, जयसेन इत्यादि विद्वान् होते. एकदां जयसेनाच्या विद्वत्तेवर खुष होऊन हर्षानें त्यास ओरिसा प्रांतांतील ऐंशी गांवें इनाम देऊं केलीं. परंतु त्या निःस्वार्थी पंडितानें तें दान घेतलें नाहीं ! स्वतः हर्ष संस्कृतज्ञ असून त्याचें 'नागानंद' हें नाटक प्रसिद्ध आहे; आणि 'रत्नावलि' व 'प्रियदर्शिका' हे दोन्ही ग्रंथही बहुधा त्याचेच असावेत

१३. **राज्यकारभार** :—तथापि धर्मप्रसाराच्या उत्साहांत हर्षानें राज्यकारभाराकडे दुर्लक्ष केलें नाहीं. शिकारी, लष्करी टेहळणी, सरकारी तपासणी, तीर्थयात्रा इत्यादि निमित्तांनीं हिंडून त्यानें आपल्या राज्याची बारकाईनें पाहणी केली होती. हर्षकालीन मंत्रिपरिषद महत्त्वाचीं कामें जबाबदारीनें पार पाडी असें दिसतें. कारण कनोजची गादी रिकामी झाल्यावर त्यावर हर्षानें बसावें हा ठराव तेथील मंत्रिपरिषदेनेंच केला. जुने सरकारी कागद व्यवस्थित राहावे म्हणून हर्षानें एक स्वतंत्र दप्तर-खातें निर्माण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें. हर्षाचें सैन्यबल पायदळ, घोडदळ, रथ व हत्ती असें चतुरंग होतें. हर्ष-कालीन कायदे कडक असत, परंतु त्यांची अंमलबजावणी सौम्य तऱ्हेनें होई. इतकें होतें तरी हर्षाच्या काळीं राज्यांत लुटारूंचा उपद्रव होत असे, असें बाणभट्ट व ह्युएनत्संग यांनीं लिहिलेल्या वर्णनावरून दिसून येतें.

१४. **समाजस्थिति** :––हर्षकालीन समाजस्थितींत अनेक गुणदोष आढळून येतात. सती जाणें मोठेपणाचें समजलें जाई. पुनर्विवाहास आडकाठी नसली तरी तो शिष्टसंमत नव्हता. बालविवाह प्रचलित झाला होता. बौद्ध धर्मांत पुष्कळ प्रौढ स्त्रिया पुढें जोगिणी होऊं लागल्या. तो प्रकार टाळण्या-साठीं बालविवाह अंमलांत आला असला पाहिजे असें एक अनुमान आहे. राज्यश्रीच्या वर्णनावरून तत्कालीन स्त्रिया शिक्षणांत मागसलेल्या नसा-व्यात असें दिसतें. कारण ती तुरुंगांतून एकटी पळून जाण्याइतकी धीट होती व कनोज येथील धर्मपरिषदेंतील वादविवाद तिनें हर्षाजवळ बसून लक्षपूर्वक ऐकला. त्या वेळीं तिनें पडदा पाळला नाहीं. परंतु प्रतिष्ठित क्षत्रिय राजस्त्रिया पडदानशीन असत. हें पडद्याचें बंड पुढें मुसलमानी अंमलांत फार वाढलें. हर्षानें आपली मुलगी वलभी ही क्षत्रिय राजा ध्रुव-सेन यास दिली. हर्षाचें घराणें वैश्यवर्णी होतें. तेव्हां असले विषमवर्णी विवाह मनुस्मृतीनंतरच्या कालांतही क्वचित् होत असत असें दिसतें. परंतु हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सर्वसंपन्न राजघराण्यांतील चालीरीतींवरून तत्कालीन सर्वसाधारण चालीरीतीबद्दल अनुमान काढणें धोक्याचें होईल. उलट, त्या काळीं वर्णभेद व जातिभेद अधिकाधिक दृढ होत चालले असें म्हणणें अधिक बरोबर होईल. मूर्तिपूजा सर्वत्र प्रचारांत आलेली होती. समुद्रपर्यटन प्रचारांत होतें. जावा–सुमात्रा बेटांशीं दळणवळण चालू होतें. बौद्ध धर्माचा तेथें आधींच प्रसार झालेला होता. तत्कालीन स्त्रीपुरुषांचे पोषाख साधे असून त्यांस शिवण्याची आवश्यकता नसे. पुरुष धोतर नेसून, अंगावर डाव्या काखेखालून उपरणें घेत, उजवा खांदा उघडा असे. स्त्रिया खांद्यापासून खालचें सर्व शरीर झांकेल असा लांब झगा घालीत. थोरामोठ्यांचे पोषाख फार मौल्यवान् असत व त्यांवर जरीचें काम केलेलें असे.

१५. **साम्राज्याचा अस्त** :––हर्ष इ. स. ६४७ सालीं मृत्यु पावला. त्याच्यासारखा ऐहिक वैभवाविषयीं विरक्त असा राजा दुसरा कोणी झाला नाहीं. राज्यवर्धनाच्या मृत्यूनंतर त्यास राज्य नकोसें झालें. मोगलाई-तील व उत्तर पेशवाईंतील गादीच्या भांडणाबद्दलचे तंटे पाहून राज्य-वैभवाचा वीट येणें हें सामान्य नव्हे असें वाटूं लागतें. असो. हर्षाच्या मृत्यूनंतर लौकरच त्याचें राज्य त्याच्या बहिणीच्या वंशाकडे म्हणजे वर्मं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घराण्याकडे गेलें परंतु साम्राज्य टिकून राहिलें नाहीं. ठिकठिकाणचे राजे स्वतंत्र रीतीनें राज्य करूं लागले. हर्ष हा बौद्ध धर्मास उत्तेजन देणारा शेवटचा राजा होय. पण त्याच्या उत्तेजनानें बौद्ध धर्मास लागलेली उतरती कळा थांबली नाहीं. ह्यापुढील दीडशें वर्षांत भारतांत बौद्ध धर्माची पूर्ण पीछेहाट होऊन वैदिक धर्माची स्थापना झाली.

१६. **संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन** :—परंतु ह्या धार्मिक स्थित्यंतराकडे लक्ष देण्यापूर्वी गुप्तांच्या व हर्षांच्या काळांत झालेल्या बौद्धिक प्रगतीचें समालोचन करणें जरूर आहे. पराक्रमी राजांच्या कारकीर्दीत देशाची सर्वंच बाजूंनीं उन्नति होत असते. बुद्ध व अशोक यांच्या वेळीं संस्कृत भाषा मागें पडली होती. गुप्तांच्या काळापासून तीस पुनः उत्तेजन मिळालें व पुढील तीनशें वर्षांच्या सुवर्णयुगांत अनेक नामांकित संस्कृत लेखक व पंडित होऊन गेले. त्यांनीं महाभारताचें पुनरुज्जीवन केलें. मत्स्यपुराण, वायुपुराण, स्कंदपुराण इत्यादि अठरा पुराणांना उजळा दिला तत्त्वज्ञान व भौतिक शास्त्रें यांचा अभ्यास केला व अशा रीतीनें परकीयांच्या सांस्कृतिक वर्चस्वाची झापड झुगारून देण्यांत यश मिळविलें. महाभारताच्या आश्रयानें भारतीयांनीं पुनः पुनः आपल्या संस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्याची ही परंपरा जवळ जवळ वर्तमान काळापर्यंत येऊन पोहोंचते. असो. गुप्तकालीन वाङ्मयांत भारतीय संस्कृतीचें ऐनजिनसी स्वरूप प्रकट झालें आहे.

१७. **कालिदास** :—प्रसिद्ध कविकुलगुरु कालिदास हा त्या काळचें प्रतीक होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा विक्रमादित्याच्या पदरीं असावा. रघुवंश, मेघदूत व शाकुंतल हे कालिदासाचे प्रसिद्ध ग्रंथ होत. त्यांपैकीं शाकुंतल नाटकानें तर प्रख्यात जर्मन पंडित गएटे यास वेड लाविलें ! शाकुंतलच्या चौथ्या अंकांत शकुंतला सासरीं जाण्यास निघाली असतां आपल्या पित्याकडे, कण्वाकडे, निरोप घेण्यास आली. त्या वेळीं दोघांचाही कंठ दाटून आल्यामुळें तोंडांतून शब्द फुटेना. शेवटीं कण्वानें मन आवरून थोडक्या, प्रेमळ व अर्थपूर्ण शब्दांत तिला निरोप दिला ! हा प्रसंग इतका सुंदर आहे कीं, प्रत्येक संस्कृतज्ञानें त्याची गोडी चाखल्याशिवाय राहूं नये. मनुष्यस्वभावाचें मार्मिक चित्र, समर्पक उपमा, सूक्ष्म अवलोकन आणि प्रसाद हे गुण कालिदासाच्या ग्रंथांतून चांगले पहावयास सांपडतात. जगांतील उच्च वाङ्मयामध्यें कालिदासाच्या ग्रंथास बरेंच उच्च स्थान मिळेल यांत मुळींच शंका नाहीं.

१८. **इतर कवी व नाटककार** :—कालिदासाखेरीज मुद्राराक्षस या नटाकाचा कर्ता विशाखदत्त याच काळांत होऊन गेला. हर्षाच्या पदरीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असलेल्या बाणानें हर्षचरिताखेरीज 'कादंबरी' नांवाचा उपमा व अलंकार ह्यांनीं खचलेला व लांब लांब संस्कृत समासांनीं युक्त असा ग्रंथ लिहिलेला आहे. 'दशकुमारचरित' या ग्रंथाचा लेखक दंडिन्, व नीति, वैराग्य व शृंगार ह्या शतकांचा कर्ता भर्तृहरि हाही इसवी सनाच्या सातव्या शतकांत होऊन गेला. नीति व वैराग्य या शतकांत सामान्य नीतितत्त्वें उत्कृष्ट श्लोकांत सहज पटतील अशा दृष्टान्तांनीं सांगितलेलीं आहेत व आज तीं आबालवृद्धांच्या तोंडीं आहेतच. ह्याच काळांत विष्णुशर्मा यानें पंचतंत्र नांवाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे प्राचीन इसापनीतीच होय. यापुढील काळांत म्हणजे आठव्या शतकांत भवभूति हा लेखक होऊन गेला. ह्यानें 'उत्तररामचरितम्' हें नाटक लिहिलें आहे. ह्या नाटकांतील करुणरस हृदयस्पर्शी आहे. ह्याशिवाय भवभूतीनें 'मालतीमाधव' व 'महावीरचरितम्' हे ग्रंथ लिहिले आहेत. भवभूति हा वऱ्हाडचा राहणारा असून तो कनोजचा राजा यशोवर्मन याच्या पदरीं होता. पुढें काश्मीरच्या ललितादित्यानें यशोवर्म्याचा पराभव केल्यावर भवभूतीस आपल्या दरबारीं नेलें. ह्या काळांतील हा बहुधा शेवटचाच ग्रंथकार होय.

१९. **शास्त्रीय प्रगति** :—कवी व नाटककारांप्रमाणेंच उत्तम शास्त्रीय ग्रंथांचे लेखक ह्या काळांत होऊन गेले. ज्योतिषशास्त्रांत पारंगत असलेला आर्यभट्ट हा इ. स. ४७६ सालीं पाटलीपुत्र येथें जन्मला. पृथ्वी आपल्या आंसाभोंवतीं फिरते हें प्रथम ह्यानें शोधून काढलें. ग्रहण लागण्याचीं कारणें ह्याच्या ग्रंथांत पहावयास सांपडतात. वराहमिहिर हा दुसरा ग्रंथकार इ. स. ५०५ सालीं उज्जयिनी येथें जन्मला. ह्यानें पंचसिद्धान्तिका व बृहत्संहिता हे ग्रंथ लिहिले आहेत. बृहत्संहिता हा प्राचीन ज्ञानकोशच होय. ब्रह्मगुप्त हा प्रसिद्ध गणिती इ. स. ६२८ च्या सुमारास होऊन गेला. वर्तुळांकित चौकोनाच्या समोरच्या कोनांची बेरीज दोन काटकोनांबरोबर असते हा सिद्धान्त त्यानें शोधून काढला. अमरकोशाचा कर्ता अमरसिंह व वैद्यशास्त्रनिपुण धन्वंतरी हे विक्रमादित्याच्या नवरत्नांपैकीं होत असें म्हणतात. गुप्त व हर्षकालीन ही प्रगति पाहून इंग्लंडच्या इतिहासांतील एलिझाबेथ किंवा व्हिक्टोरिया राणी यांच्या कारकीर्दीची आठवण होते. हिंदुस्थानच्या इतिहासांतील पुढील कोणताही काल याच्यापुढें सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीनें फिका पडतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

२०. **मूर्तिपूजा व भक्तिमार्ग** :—बौद्धिक प्रगतीचें समालोचन केल्यावर धार्मिक स्थित्यंतराकडे लक्ष देणें जरूर आहे. आज प्रसिद्ध असलेल्या वायुपुराण, पद्मपुराण इत्यादि अठरा पुराणांचें आजचें स्वरूप त्यांस मुख्यतः गुप्त व हर्ष कालांतच प्राप्त झालें हें वर सांगितलेंच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या पुराणांतून निरनिराळ्या देवतांचें महत्त्व वर्णिलें आहे. वेदकालीं इंद्र, वरुण इत्यादि सृष्टिदेवतांची प्रार्थना होत असे व ह्या कालांत तिचें मूर्तिपूजेंत रूपांतर झालें. निराकार देवाच्या जागीं साकार देव आला. शंकर, विष्णु त्याचे रामकृष्णादि अवतार, तसेंच गणपति व मारुति ह्यांचें पूजन सुरू झालें. पुढें पुढें मूर्तिपूजेचें बंड फार वाढून निरनिराळ्या देवतांच्या भोळ्या परंतु भाविक भक्तांमध्यें मोठे वाद माजले व समाजांत त्यामुळें तंटे उत्पन्न झाले. तसेंच मूळ उद्देशाचा लोप होऊन देवाच्या पूजेपेक्षां देवाचा थाटच जास्त वाढूं लागला. ह्या भोळ्या भक्तांचे देव जेवणखाण करीत, झोंप घेत, इतकेंच नव्हे, तर क्वचित् आजारीही पडत! अशा पद्धतीनें देवतांचें पूजन करणारा जनसमाज दिवसेंदिवस मनानें कुढा व बुद्धीनें कमकुवत बनत चालला. हें सर्व जरी खरे असलें तरी समाजांत ज्यांनीं मूर्तिपूजा सुरू केली त्यांना त्याबद्दल दोष देतां येत नाहीं. धर्माचा प्रसार हिंदुस्थानभर झाल्यामुळें फार प्राचीन काळीं आर्यांस पसंत पडलेलें धर्माचें बुद्धिगम्य स्वरूप टिकून राहणें शक्य नव्हतें. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें आर्य व मिश्रजाती यांच्यामधील उच्चनीच भाव कमी होत होता. या वेळीं मूळ धर्मांतही फेरफार करणें अवश्य होतें. बुद्धपूर्व आर्यधर्म व बुद्धोत्तर हिंदुधर्म यांचें तात्त्विक स्वरूप एकच ठेवून त्या-बरोबरच बहुजन समाजास रुचेल व पचेल असा भक्तिमार्ग व मूर्ति-पूजा यांचा धर्मांत समावेश करणें आवश्यक होतें. म्हणूनच देवालयें स्थापन करणें, उत्सव करणें, पवित्र क्षेत्रें स्थापन करून तीर्थयात्रांचें महत्त्व वाढविणें हे प्रकार सुरू झाले. भक्तिमार्गाच्या प्रसारामुळें यज्ञ-यागादि कृत्याचें महत्त्व कमी होऊन अनन्यभावानें भक्ति केली असतां कोणासही परमेश्वर प्राप्त होतो हें तत्त्व रूढ झालें व या सर्व कारणां-मुळें हिंदु धर्माचें केवळ बुद्धिगम्य, क्लिष्ट व कर्मठ स्वरूप जाऊन त्यास सामान्यजनसुलभ स्वरूप प्राप्त झालें. हिंदु धर्मांत इतके फरक केल्याबरोबर बौद्ध धर्मांतील पूर्वीचा आकर्षकपणा अर्थातच कमी झाला.

२१. **समालोचन**:—पराक्रमी राजांनीं साम्राज्य स्थापन करावें व त्याच्या मृत्यूनंतर लहान लहान राज्यें स्वतंत्र व्हावीत हा यूरोपच्या इति-हासांत दिसून येणारा क्रम हिंदुस्थानच्या इतिहासांतही पाहावयास सांप-डतो. परंतु ज्या हूणांनीं त्या कालांत सर्व यूरोपभर धुमाकूळ घातला त्यांचा हल्ला येथें एकजुटीनें परतविला गेला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. सुवर्णयुगाच्या ह्या तीनशें वर्षांत हिंदुस्थानांत दोन मोठीं साम्राज्यें झालीं; कालिदास, भर्तृहरीसारखे कवी निपजले; आर्यभट्ट, वराहमिहिर यांच्यासारखे पंडित होऊन गेले; हिंदु धर्माचें स्वरूप सामान्य जनांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुलभ झालें; बौद्ध धर्म मागें पडला व हिंदु धर्म पुढें आला. ह्या पुढील काळांत बौद्ध धर्माचा पूर्ण पाडाव होऊन आद्यशंकराचार्यांनीं वैदिक धर्माची सर्वत्र स्थापना केली. परंतु राजकीय दृष्टया विचार करतां सातव्या शतकांत हर्षाच्या मृत्यूनंतर कित्येक शतकें भारतांत नांव घेण्याजोगें साम्राज्य उदयास आलें नाहीं. अनेक राज्यें उदयास आलीं व विलय पावलीं. त्यांची आपापसांत चुरस व युद्धें चालूं असत. यामुळें भारताच्या वायव्य सरहद्दीपलीकडून येणाऱ्या मुसलमानांना येथें वर्चस्व स्थापन करतां आलें. राजकीय दृष्टया विचार करतां हर्षाच्या मृत्यूनंतरच्या काळांत भारतीय इतिहासांत कांहीं शौर्याचे व रोमांचकारी प्रसंग असले तरी एकंदरींत हा काळ यादवीनें भरलेला आहे हें नमूद करणें भाग आहे.

प्रश्न

१. गुप्तकालास हिंदुस्थानांतील सुवर्णयुग कां म्हणतात ? २. हिंदुस्थानांत प्राचीन काळीं होऊन गेलेल्या पांच प्रसिद्ध पंडितांची व कवींची माहिती देऊन प्रत्येकाचे विशेष सांगा. ३. हर्षाच्या स्वाऱ्यांची व राज्यकारभाराची हकीकत सांगून त्यांचें वैशिष्टय सांगा. ४. टिपणें लिहा :— (१) हर्षकालीन बौद्धिक प्रगति, (२) हिंदी नेपोलियन समुद्रगुप्त, (३) फाहिएन, ह्युएनत्संग, (४) विक्रमादित्य, (५) कालिदास.

अभ्यास

(१) कालिदास, बाणभट्ट, भर्तृहरि यांच्या लेखनाचा परिचय संस्कृत शिक्षकांकडून करून घ्या. (२) नालंदा, तक्षशिला, वलभी (काठेवाड), काशी, कांची, मदुरा इ. भारतांतील एकोणीस ठिकाणच्या विश्वविद्यालयांची माहिती 'प्राचीन भारतीय विद्यापीठें' ले. ना. गो. तवकर या ग्रंथांत वाचा. (३) 'हर्ष आपल्या सव राज्याचें दान करून राज्यश्रीजवळ पांघरावयास भगवें वस्त्र मागून घेत आहे' या प्रसंगाचें चित्र काढा. (४) वाचा : स्वाध्याय मालेंतील नालंदा, पाटलीपुत्र व राजा हर्ष या पुस्तिका.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

नालंदा विद्यापीठाचें वैभव

ह्युएनत्संग म्हणतो "या सुचरित लोकांचें जीवन स्वाभाविकच व्रती, संयमी व नियमनिष्ठ आहे. या गोष्टीचा एकच पुरावा म्हणजे या मठाच्या सातशें शतकांच्या दीर्घ आयुष्यांत एकही शिस्तभंग करणारा भिक्षु येथें निघाला नाहीं. भारतांतील सर्व लोक या मठांतील भिक्षूंना मानतात व अनुसरतात. निरनिराळ्या धर्मविषयांवरील चर्चेला दिवस पुरा पडत नाहीं. प्रातःकालापासून सायंकालापर्यंत येथें धर्मचर्चेचा अखंड वाग्यज्ञ सुरू असतो. लहानथोर एकमेकांना मोकळ्या मनानें मदत करतात. जे त्रिपिटकांतील प्रश्नांवर चर्चा करूं शकत नाहींत त्यांना येथें कमी लेखलें जातें व लज्जेनें ते आपलें तोंड लपवितात. याच कारणासाठीं वादविवादांत शीघ्र नांव मिळवूं इच्छिणारे निरनिराळ्या देशांतील असंख्य विद्वान् या विद्यापीठांत येतात व आपल्या शंकांचें समाधान करून घेतल्यानंतर आपल्या पांडित्याच्या अनंत जलधारांनीं भारताची बौद्धिकभूमि समृद्ध करतात. या देशांत या मठाची कीर्ति इतकी पसरलेली आहे व तो इतकी मान्यता पावला आहे कीं, पुष्कळ लोक आपण नालंदाचे विद्यार्थी आहोंत असा बहाणा करून ते जनतेपासून मान मिळवितात."



नालंदा विद्यापीठांतील वसतिगृहांचे अवशेष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १० वा

उत्तरेकडील छोटीं राज्यें : राजपुतांचा उदय

(इ. स. ६४७ ते इ. स. ११९९)

१. कालाचें स्वरूप :—प्राचीन भारताच्या शेवटच्या कालविभागांत म्हणजे सम्राट् हर्षानंतरच्या कालांत दोन गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत. पहिली राजपुतांच्या लहान मोठ्या राज्यांचा उदय, व दुसरी श्रीमच्छंकराचार्य यांच्या नेतृत्वाखालीं झालेली वैदिक धर्माची पुन: स्थापना. शंकराचार्यांसारख्या धर्मसंस्थापकांनीं हिंदु धर्माचें बीं रुजत घातलें व राजपुतांसारख्या प्रसंगीं प्राणाचीही पर्वा न करणाऱ्या वीरांकडून त्याचें रक्षण झालें. म्हणूनच हिंदु धर्म मुसलमानांच्या एक हजार वर्षांच्या तडाख्यांतून बचावला असें म्हणण्यास हरकत नाहीं. राजपुतांचा उदय व वैदिक धर्माची स्थापना ह्या दोन्ही गोष्टी आठव्या शतकाच्या उत्तरार्धांतील होत. तत्पूर्वीच्या शंभर वर्षांत होऊन गेलेल्या प्रमुख राजांचा प्रथम विचार करणें जरूर आहे.

२. वर्म घराणें :—हर्षाच्या मृत्यूनंतर कनोजचें राज्य हें मूळ त्याच्या बहिणीचेंच असल्यामुळें वर्म घराण्याकडे आलें. आठव्या शतकाच्या प्रारंभीं या घराण्यांत यशोवर्मा नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें इ. स. ७३१ त चीनकडे एक शिष्टमंडळ पाठविलें होतें. यशोवर्म्याच्या काळीं काश्मीरचे कर्कोटक राजे व दक्षिणेकडील चालुक्य राजे फार प्रबळ असून त्यांच्या कनोजवर अनेक स्वाऱ्या झाल्या, कारण त्या काळीं कनोज* शहरास मोंगलाईंतील दिल्लीप्रमाणें मान होता. इ. स. ७४० त काश्मीरचा राजा ललितादित्य यशोवर्म्यावर चाल करून गेला व त्यानें त्यास ठार मारलें. आणि त्याच्या पदरचा भवभूति हा नाटककार आपल्याबरोबर तो काश्मीरला घेऊन गेला.

---

*हर्षकालापासून पुढें सुमारें पांचशें वर्षें उत्तर हिंदुस्थानांत कनोजला विशेष महत्त्व होतें. इ. स. पू पांचव्या शतकापासून इसवी सनाच्या चौथ्या शतकापर्यंत सुमारें आठशें वर्षें पाटलीपुत्र या शहरास भारतीय राजधानीचें महत्त्व होतें. पुढें मुसलमानांच्या काळीं दिल्लीस महत्त्व आलें; नंतर मोंगलांनीं आग्रा येथें वस्ती केली. राज्यविस्ताराच्या मध्यवर्ती व सोईस्कर ठिकाणीं राजधानीचें स्थलांतर होत जातें. कित्येकदां नद्यांच्या प्रवाहांचें वळेण बदलल्यानेंही राजधानीची जागा बदलली जाते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यशोवर्म्यानंतर आठव्या शतकाचे अखेरीपर्यंत वर्म घराण्याचा कनोजवर अंमल होता. त्यानंतर कांहीं काळ तेथें पालांचें वर्चस्व होतें.

३. **वर्म घराण्याचा शेवट** :—हे पाल राजे बंगाल्यांतील होत. यांचा मूळ पुरुष गोपाळ यानें इ. स. ७५० त बंगाल्यांत राज्य स्थापन केलें. त्याचा मुलगा धर्मपाल मोठा पराक्रमी निघाला. पश्चिमेस गांधार देशापर्यंत त्याचा मोठा वचक होता. यानें इ. स. ८१० त कनोजच्या वर्म घराण्यांतील शेवटच्या पुरुषास पदच्युत करून तेथें आपला एक नामधारी राजा बसविला. नवव्या शतकांतील कनोजच्या नामधारी साम्राज्यसत्तेचे हे हाल पाहून अठराव्या शतकांतील दिल्लीच्या बादशाहांची आठवण होते. पालांचें कनोजवरील वर्चस्व फार दिवस टिकलें नाहीं. या वेळीं मारवाडांत प्रतीहार नांवाचें गुर्जर घराणें उदयास येत होतें. त्यांच्यांतील नागभट्ट यानें इ. स. ८१६ सालीं पालांच्या प्रतिनिधीस पदच्युत केलें व तो स्वतःच कनोजचा अधिपति बनला प्रतीहारांची गणना राजपुतांत केली जाते. त्याची व इतर राजपूत राजांची हकीकत देण्यापूर्वी राजपूत हे कोण आणि कोठले तें पाहूं.

४. **राजपुतांचा उदय** :—इसवी सनाच्या आठव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतच्या नऊशें वर्षांच्या भारताच्या इतिहासांत राजपुतांनीं फार चिरस्मरणीय कामगिरी करून ठेविली आहे. राजपुतांचा उदय व मुसलमानांचें हिंदुस्थानांत आगमन ह्या दोन्ही गोष्टी जवळजवळ समकालीनच आहेत. ज्या ज्या वेळीं मुसलमान आले त्या त्या वेळीं त्यांच्याशीं राजपुतांस लढावें लागलें. हा राजपूत-मुसलमानांचा झगडा सतराव्या शतकापर्यंत चालला व तोच पुढें अठराव्या शतकांत मराठ्यांनीं पुरा केला. ह्या झगड्यांत सर्व राजपूत अखेरपर्यंत यशस्वी व स्वतंत्र राहिले नाहींत हें खरें; परंतु चिवटपणानें व आपल्या शौर्यानें येणाऱ्या हल्ल्यांस त्यांनीं तोंड दिलें व आपलें धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य जगविण्याची पराकाष्ठा केली यांत मुळींच शंका नाहीं.

५. **राजपुतांची उत्पत्ति** :—राजपुतांच्या उत्पत्तीबद्दल वाद आहे. व्हिन्सेंट स्मिथ, डॉ. भांडारकर, रमेशचंद्र दत्त वगैरे विद्वान् इतिहासकार असें प्रतिपादन करतात कीं, राजपूत हे बाहेरून आलेल्या शक, युएच्चि, हूण इ. लोकांचे वंशज होत. कालांतरानें ह्या परकीय वंशांनीं हिंदु धर्माचा स्वीकार केला व ते एतद्देशीय हिंदूंपासून वेगळे राहिले. त्यांच्यांतील लढवय्येपणामुळें ते हिंदूंतील क्षत्रियांत सामील झाले. ह्या मतास आणखी एका कारणानें पुष्टि मिळालेली आहे. तें असें कीं, बाराव्या शतकांत पृथ्वीराजाच्या पदरीं चंदभाट नांवाचा एक भाट होऊन गेला. त्यानें 'पृथ्वीराजरासो' नामक एक काव्य लिहिलें असून त्यांत राजपुतांची उत्पत्ति देतांना असें लिहिलें आहे कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'म्लेंच्छांनीं पृथ्वीला त्रस्त केलें तेव्हां वसिष्ठानें अग्नींतून एकामागून एक चार वीर पुरुष निर्माण केले.' तेच राजपुतांचे पूर्वज होत. ह्यांतील दंत-कथेचा भाग सोडला तर असें दिसतें कीं, राजपूत हे अग्नीनें पावन करून घेतलेल्या परकीय लोकांपैकीं म्हणजे शक-हूणांपैकीं असावेत. परंतु कै. चिंतामणराव वैद्य यांच्या मतें राजपुतांच्या उत्पत्तीची ही मीमांसा चुकीची आहे. कारण तत्कालीन राजपूत स्वतःस सूर्यवंशीय किंवा चंद्रवंशीय मानीत व ते आपली परंपरा अतिप्राचीन कालाच्या राम-कृष्णापर्यंत नेऊन भिडवीत, ही गोष्ट नवव्या व दहाव्या शतकांत कोरल्या गेलेल्या शिलालेखांवरून सिद्ध होते. राजपुतांच्या उत्पत्तीविषयीं चर्चा करतांना बाराव्या शतकांतील कल्पनाप्रचुर काव्यापेक्षां नवव्या व दहाव्या शतकांतील शिलालेखावर भरंवसा ठेवणें अधिक युक्त होय. दुसरें असें कीं, ह्या काळांत वर्णावर्णांत विवाह होत असत हें जरी खरें आहे तरी, शककुशाणांसारख्या परकीय लोकांचा क्षत्रिय वर्णांत एकदम प्रवेश कसा झाला व त्यांना मूळ क्षत्रियांहूनही कालांतरानें श्रेष्ठ स्थान कां प्राप्त झालें, या प्रश्नाचा तेवढ्यानें बरोबर उलगडा होत नाहीं. ह्याशिवाय आणखी अप्रत्यक्ष पुरावे असे कीं, वायव्येकडून आलेले परकीय हे काश्मीर, पंजाब व राजपुताना एवढ्या देशभर पसरले; परंतु राजपूत मात्र अरवली व विंध्य पर्वताजवळच्या डोंगराळ मुलखांतच प्रथम प्रसिद्धीस आले हें निर्विवाद होय. ह्याशिवाय सर्व राजपुतांच्या शरीराची व मनाची घडण त्यांच्यांतील सारखेपणा व त्यांच्या चालीरीतींचा उच्चपणा पाहून ते निरनिराळ्या परकीय स्वाऱ्या करणाऱ्यांचे वंशज असावेत असें वाटत नाहीं. मग राजपूत हे इतर हिंदूंपासून भिन्न कां व त्यांच्या उत्पत्तीची मीमांसा काय असा प्रश्न राहतोच. त्याचें उत्तर असें कीं, बौद्धधर्माचा झपाट्यानें प्रसार होत असतां अनेकांनीं तो धर्म स्वीकारला व त्यानंतर वर्णसंकर सुरू झाला. या वावटळींतून कांहीं थोड्या क्षत्रिय घराण्यांनीं आपली परंपरा जतन करून ठेवण्याकरितां स्थलांतर करून अरवली व विंध्य पर्वतांचा आश्रय केला. बौद्धधर्माची लाट ओसरल्यावर बुद्धपूर्वकालांतील क्षत्रिय वर्णसंकरामुळें स्वतःस ओळखीनासे झाले. त्यांतील पुष्कळ आपणास क्षत्रिय म्हणवीत, परंतु त्यांचें क्षत्रियत्व शुद्ध स्वरूपाचें नव्हतें. डोंगराळ प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या लोकांचें शुद्धत्व मात्र कायम होतें व ते आपणास बुद्धोत्तरकालीन क्षत्रियांहून निराळे ओळखण्याकरितां राजपूत (राजपुत्र) असें म्हणूं लागले.*

*मराठींत सामान्यतः रजपूत शब्द प्रचारांत आहे, पण 'राजपूत' हा शब्द बरोबर होय. आधुनिक इतिहासलेखकांनीं हा शब्द वापरण्यास सुरवात केली आहे. (श्री. ह. वा. देशपांडेकृत 'राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास' हें पुस्तक पाहा.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. राजपूतांचे स्वभावविशेष :—राजपूत हे अतिशय शूर असत व धारातीर्थी पतन पावणें हें मोक्षप्रद आहे असें समजत. त्यांच्यापैकीं बहुतेक जण शंकराचे उपासक असत. उदेपुरानजीक भगवान एकलिंगजीचें देवालय आहे तें यांचें पवित्र ठिकाण असे. राजपूत हे जसे शूर तसेच ते मानी व खुनशीही असत. एखाद्या कारणावरून वैर सुरू झालें म्हणजे तें कित्येक वेळां पिढ्यान् पिढ्या चाले. याच कारणामुळें राजपुतांत कायमची एकी कधींही झाली नाहीं व त्यांची साम्राज्यसत्ता उदयास आली नाहीं. ते मोठे दिलदार व एकवचनी असत. एकवार विश्वास व आश्वासन दिल्यावर ते प्रसंगीं शत्रूंचेंही रक्षण करीत. ह्या त्यांच्या दिलदारपणाचा फायदा अनेक विश्वासघातकी शत्रूंनीं घेतलेला आहे असें इतिहासांत सांपडतें. राजपुतांच्या स्त्रियाही मोठ्या शूर असत. रणांत पराभव पावून परत आलेल्या नवऱ्याला त्या परत लढाईस जाण्यास सांगत व प्रसंगीं त्याचा प्रवेश होऊं नये म्हणून तटाचे दरवाजेही लावून घेत. युद्धांत जय मिळण्याची आशा सुटल्यावर जगण्यापेक्षां जीवावर उदार होऊन रणांगणावर जाण्यासाठीं राजपूत केशरी पोषाख घालून सज्ज होत व त्यांच्या स्त्रिया पुढील दुर्दशा टाळण्यासाठीं धैर्यानें अग्नींत उड्या टाकीत. या प्रकारास 'जोहार' म्हणतात. राजपुतांतील एका दोषाचा उल्लेख करणें जरूर आहे. त्यांच्यापैकीं बऱ्याच जणांस अफूचें व्यसन असे. परंतु तें प्रमाणाबाहेर गेल्यामुळें राज्याचें नुकसान झालें असें इतिहासावरून दिसून येत नाहीं. राजपुतान्यांत अफूचें मोठें पीक निघतें, तेव्हां आधुनिक भारतांतील चहाच्या किंवा तपकिरीच्या व्यसनाप्रमाणें तें शिष्टमान्य व्यसन असावें.

७. राजपुतांचीं घराणीं :—राजपुतांचीं चार राजघराणीं ह्या काळांत उदयास आलीं. तीं चितोडचें गुहिलोत, सांबरचें चाहमान, कनोजचें प्रतीहार* व धारचें परमार हीं होत. हींच घराणीं थोड्याफार फरकानें आजपर्यंत राजपुतान्यांत राज्य करीत आहेत. इतकी प्राचीन पूर्वपरंपरा असलेलीं राजघराणीं आज पृथ्वीच्या पाठीवर क्वचितच सांपडतील.

८. कनोजचे प्रतीहार :—प्रतीहार किंवा प्रतिहर हे मूळचे गुर्जर किंवा गुजर होत. हे हूणांचे पाठोपाठ वायव्येकडून भारतांत आले. पंजाबांत अजूनही एका जिल्ह्यास गुजरात हें नांव आहे. हे लोक अहमदाबाद ते सुरत या भागांत वास्तव्य करूं लागल्यावर त्यास गुजराथ हें नांव पडलें. पूर्वी त्या भागास 'लाट' ही संज्ञा होती असें हर्षचरित्रावरून कळतें. प्रतीहारांचा हा

*प्रतीहार म्हणजे द्वारपाल; लक्ष्मण हा रामाचा द्वारपाल होता. त्याच्यापासून हा वंश निघाला असें ते लोक मानतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्वेतिहास लक्षांत घेतां ते शुद्ध राजपूत वंशीय नसावेत असें वाटतें. प्रतीहार घराण्याचा मूळ पुरुष नागभट्ट मारवाडांत इ. स. ७२५ सालीं उदयास आला. त्याची राजधानी मंडोर हें शहर असावें. त्याच्या कुलांत ककुस्थ व वत्स हे राजे होऊन गेले. कनोजचें राज्य काबीज करण्याचा त्यांनीं शिकस्तीचा प्रयत्न केला. शेवटीं इ. स. ८१६ सालीं वत्स राजाचा मुलगा नागभट्ट यानें वर्म घराण्यांतील शेवटच्या पुरुषास बाजूस सारून आपण तेथें राज्य करण्यास प्रारंभ केला व साम्राज्यसत्ता हातीं घेतली. नागभट्ट इ. स. ८२५ त मृत्यु पावल्यावर पंधरा वर्षांनीं त्याच्याच वंशांतील मिहिर ऊर्फ भोजराजा गादीवर बसला. याची सत्ता पश्चिम ते पूर्व समुद्रापर्यंत व उत्तरेस कनोजपासून दक्षिणेस विंध्य पर्वतापर्यंत मानली जात असे. बंगालच्या तत्कालीन राजाचा यानें पराभव केला. परंतु दक्षिणेकडील मालखेडच्या राष्ट्रकुटांचा मात्र ह्याच्या हातून पाडाव झाला नाहीं. हे राष्ट्रकूट व सिंधचे अरब एकमेकांशीं सख्य राखून प्रतीहारांस विरोध करीत. भोज इ. स. ८९० सालीं मृत्यु पावला व त्याचा मुलगा महेंद्रपाल ऊर्फ निर्भयराज त्यांच्या गादीवर बसला. त्यानें काठेवाड काबीज करून अरब व राष्ट्रकूट हें जूग फोडलें. 'कर्पूरमंजरी' या प्राकृत काव्याचा लेखक राजशेखर हा त्याच्या पदरीं असे. महेंद्रपाल इ. स. ९०८ त मृत्यु पावला. त्याच्या मागून इ. स. ९१६ मध्यें राष्ट्रकूटांचा तिसरा इंद्र यानें कनोजच्या राजाचा पराभव केला. पुढें इ. स. १०२० पर्यंत कनोजच्या गादीवर अनेक राजे झाले. परंतु महेंद्रपालनंतर कनोजच्या हिंदु राज्यास कायमची उतरती कळा लागली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

इ. स. १०२० चे सुमारास प्रतीहारांच्या राज्यांतून पुढील राज्यें फुटून स्वतंत्र झालेलीं आढळतात.–(१) गुजराथचें चालुक्य, (२) माळव्याचें परमार, (३) सांबरचें चाहमान, (४) मथुरेचें यादव, (५) दिल्लीचें तोरमान, (६) बुंदेलखंडचें चंदेल्ल. इ. स. ९९७ पासून मुसलमानांच्या स्वाऱ्यांस सुरुवात झाली त्यांचें वर्णन पुढें येईलच. अकराव्या व बाराव्या शतकांत कनोजवर गढवाल घराण्यांतील राजे राज्य करूं लागले. पृथ्वीराजाशीं वैर करणारा प्रसिद्ध जयचंद याच घराण्यांतील होय. पृथ्वीराजाचा शेवट झाल्यावर महमुदानें स्वारी करून त्यास ठार मारलें. त्याच्यामागून गढवाल घराण्याचा कनोजवरील अंमल तेराव्या शतकांत बाल्बनच्या सुलतानीपर्यंत टिकून होता.

९. आणखी लहानमोठीं हिंदु राज्यें :–कनोजचें राज्य नांवाला मात्र साम्राज्य असे. ह्या कालांत भारतांत साम्राज्य असें स्थापन झालेंच नाहीं. किंबहुना भारताच्या प्राचीन इतिहासांत एकछत्री अंमल असा फारच थोडा वेळ टिकलेला आहे. साम्राज्यसत्ता दुर्बल झाल्याबरोबर मांडलिक राजे पुनः स्वतंत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत. राजपुतान्यांत प्रतीहारांशिवाय वर सांगितलेलीं गुहिलोत, चाहमान, व परमार, बंगालमधील पाल व सेन, दक्षिणेंतील चालुक्य व राष्ट्रकूट, कांचीचें पल्लव इ. अनेक हिंदु राजघराणीं त्या काळीं हिंदुस्थानांत राज्य करीत होतीं. इतकेंच काय पण अफगाणिस्थानांतही त्या वेळीं हिंदु राजे राज्य करीत. त्यांचा गझनीच्या महमुदानें शेवट केला. त्यांचीं कारणपरत्वें आपापसांत युद्धें होत. परंतु युद्धानंतर अधिराज्य कबूल करावयास लावून मांडलिक राजाकडून खंडणी घेण्यापलीकडे दुसरा उद्देश नसल्यानें या युद्धाचा विशेष चिरस्थायी परिणाम होत नसे. किंबहुना लढवय्यांचें क्षात्रतेज कायम राहण्यास तें एक प्रकारें साधन म्हणून उपयोगी पडे. ह्या विविध राज्यांची संगतवार हकीकत उपलब्ध नाहीं. परंतु आहे ती हकीकत थोडक्यांत देणें इष्ट आहे :–

(१) **धारचे परमार**––परमार किंवा पवार ह्या घराण्याचा मूळ पुरुष कृष्णराज; यानें इ. स ९१४ त कनोजचा अंमल झुगारून देऊन स्वतंत्र राज्य स्थापिलें. ह्या घराण्यांत इ. स. १०१८–१०६० पर्यंत भोज[1] नांवाचा प्रसिद्ध राजा होऊन गेला. भोजानें आपल्या कारकीर्दीत गुजराथचा चालुक्य राजा भीम, कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर व पूर्वेकडील इंद्ररथ यांचा पराभव केला. भोजाचा जैन सेनापति कुलचंद याचें त्यास या कामीं फार मोठें साह्य झालें. भोजाच्या एकसारख्या विजयामुळें चिडून जाऊन सभोंवतालच्या चालुक्य व चेदी राजांनीं ऐक्य करून भोजाचा पराभव केला. तेव्हापासून परमार घराण्यास उतरती कळा लागली.

भोज हा स्वतः पंडित असून विद्वानांस आश्रय देत असे. याचीं वर्णनें संस्कृत ग्रंथांतून सांपडतात. परंतु त्यांत दंतकथेचा बराच अंश असतो. धार येथें त्यानें विद्यापीठाची स्थापना केली. महत्त्वाचे ग्रंथ दगडांवर कोरवून त्या दगडांनीं या विद्यापीठाची इमारत त्यानें सजविलेली होती. पुढें मुसलमानांनीं या इमारतीची मशीद करून ग्रंथरचनेच्या शिला उलटचा फिरवून तेथें फरसबंदी केली.[2] अजून हें ठिकाण भोजशाला या नांवानें प्रसिद्ध असून तेथील नष्टप्राय झालेल्या ग्रंथांचें पुनरुज्जीवन हल्लीं सुरू आहे. उपाध्याय मदन कृत 'पारिजात मंजरी नाटक' अशा रीतीनें उपलब्ध झालें आहे. खगोल, ज्योतिष, अलंकार, स्थापत्य, व्याकरण, योग, पशुविद्या अशा भिन्नभिन्न शास्त्रांवरील तेवीसवर ग्रंथ भोज राजाच्या नांवावर मोडतात.

---

१. भोज याच नांवाच्या प्रतीहार राजाशीं याचा घोटाळा होऊं देऊं नये.
२. प्रा. आर्. डी. बानर्जीकृत प्रीहिस्टॉरिक एन्शंट हिंदु इंडिया, पृ. २४४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते त्यानें लिहिले असें मानण्यापेक्षां त्याच्या पदरच्या पंडितांनीं त्याच्या नांवावर प्रसिद्ध केले असें म्हणणें योग्य होईल.

(२) बुंदेलखंडाचे चंदेल्ल :—चंदेल्ल हे राजपूत होत. ह्यांनीं नवव्या शतकाच्या प्रारंभीं प्रतीहारांचा अंमल झुगारून देऊन स्वतंत्र राज्य स्थापिलें. चंदेल्ल राजांनीं मुसलमानी हल्ल्यांस तोंड देण्याकरितां कनोजच्या राजास वेळोवेळीं मदत केली. अकराव्या शतकांत तेथें कीर्तिवर्मा नांवाचा राजा होऊन गेला. प्रबोध-चंद्रोदय नांवाचें नाटक याच्याच कारकीर्दीत लिहिलें गेलें व त्याचा तेथें प्रयोगही झाला असें वर्णन आढळतें. पृथ्वीराजानें व पुढें मुसलमानांनीं त्यांच्यावर वारंवार स्वाऱ्या केल्या. परंतु त्यांनीं आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें. सोळाव्या शतकांत अकबरावरोबर बुंदेलखंडाची राणी दुर्गावती मोठ्या शौर्यानें लढली. बुंदेलखंडाची राजधानी खाजुराहो येथें जैनांचा पहिला तीर्थंकर याचें व शंकराचीं सुंदर देवालयें आहेत. बुंदेलखंडांत मोठमोठे तलाव फार सुंदर आहेत.

(३) बंगालचे पाल व सेन :—यांचा उल्लेख वर आलेलाच आहे. पाल राजपूत वंशाचे नव्हत. इ. स. ७५० त त्यांचा बंगालवर अंमल सुरू झाला. त्यांच्यांतील धर्मपाल नांवाच्या राजानें आपल्या राज्याचें साम्राज्य बनविलें, गुर्जरांचा पराभव केला व बनारसपासून ब्रह्मपुत्रा नदीपर्यंत आपलें वर्चस्व स्थापिलें. पाल राजे बौद्धधर्मीय असत. धर्मपालाचा मुलगा देवपाल यानें अनेक बौद्ध विहार व मठ यांचे जीर्णोद्धार केले, बुद्धगयेच्या देवालयाची दुरुस्ती केली व नालंदाच्या विद्यापीठास साहय केलें. हूणांनीं तक्षशिलेचें विद्यापीठ उध्वस्त केल्यावर नालंदा हेंच विद्येचें केंद्र बनलें. जावाच्या बौद्ध राजानें त्याजकडे शिष्टमंडळ पाठविलें होतें. बंगालबाहेर सर्व भारतांत हिंदु किंवा जैन धर्मांचा जारीनें प्रसार चालू असतां बंगाल्यांत बौद्ध धर्मास पालांचा चांगलाच आश्रय मिळाला यांत शंका नाहीं.

देवपालानंतर पालांच्या राज्यास उतरती कळा लागली. दहाव्या शतकाचे मध्यावर होऊन गेलेल्या महीपाल राजानें पुनः घडी सावरण्याचा प्रयत्न केला व त्यांत त्यास बरेंच यशही आलें. इ. स. १०२० चे सुमारास तंजावरच्या राजेंद्र चोल राजानें ओरिसा प्रांत काबीज करून पूर्व बंगालचा दक्षिण भाग काबीज केला. परंतु महीपालानें त्यास मोठ्या शौर्यानें थोपवून धरलें. यामुळें बंगाल चोलांच्या अधिराज्याखालीं जाण्याचें संकट टळलें.

पालांचा बंगालवरील अंमल इ. स. ११९९ पर्यंत टिकला. त्यांच्यांतील शेवटचा राजा मदनपाल यास विजयसेन यानें बाजूस सारून बंगालवर सेनांचा अंमल सुरू केला. सेन हे मुंबई इलाख्याच्या कानडी जिल्ह्यांतून तिकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेले असावेत. ते स्वतःस 'कर्नाटक क्षत्रिय' म्हणवीत. त्यांनीं बौद्ध धर्मास बाजूस सारून हिंदु धर्मास उत्तेजन दिलें. प्रारंभीं पालांचे व सेनांचे शरीर-संबंध होत. परंतु आपलें उच्च कुलोत्पन्न राखण्यासाठीं सेनांनीं कुलीनांचे स्वतंत्र गट निर्माण केले, व बंगाल्यांतील अर्वाचीन जातिभेदाचा पाया घातला. विजयसेनाचा नातू लक्ष्मणसेन याच्या कारकीर्दींत कनोजचे गढवाल व बंगालचे सेन यांचीं एकसारखीं युद्धें चालू असत व त्या दोन राज्यांच्या सीमेवर असणारा बिहार प्रांत कधीं एकाच्या तर कधीं दुसऱ्याच्या ताब्यांत असे. लक्ष्मणसेनानें इ. स. १११९ सालीं 'लक्ष्मण संवत्सर' नांवाचा एक नवीन संवत्सर आपल्या नांवानें सुरू केला. त्यानें वैष्णव धर्मास उत्तेजन दिलें. लक्ष्मणसेन इ. स. ११७० पूर्वीं केव्हां तरी मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर सेन वंशांत विशेष नांव घेण्याजोगे राजे झाले नाहींत. बिहार प्रांत व उत्तर बंगाल हे हलके हलके मुसलमानांच्या ताब्यांत गेले, तरी दक्षिण बंगाल्यांतील सेनांचा अंमल चौदाव्या शतकापर्यंत टिकून होता.

या पाल व सेन राजांखेरीज पूर्व बंगाल्यांत यादव या क्षत्रिय घराण्यानें राज्य केलें. कलिंग ऊर्फ ओरिसा प्रांतांत सेनांच्या काळीं गंग राजांचें वर्चस्व होतें. त्यांच्यांतील अनंतवर्म छोडगंग यानें आपलें आरमार सज-विलें व बंगालमध्यें सेनांना पालांचें वर्चस्व झुगारून देण्यास मदत केली. गंग राजांनीं भुवनेश्वरचें प्रसिद्ध देवालय बांधलें. ओरिसाची शिल्पकला भारतांतील दुसऱ्या कोणत्याही शिल्पकलेहून वेगळी असून तिचा भव्यपणा नजरेंत भरण्याजोगा आहे.

(४) **गुजराथचे चालुक्य** :—यांची राजधानी अनहिलपाटण किंवा अनहिलवाडा होय. आज हें शहर पाटण या नांवानें प्रसिद्ध आहे. या घराण्याचा मूळ पुरुष मूळराज यानें इ. स. ९६१ त हें राज्य स्थापन केलें. यानें काठेवाड जिंकून तेथील प्रभासक्षेत्र यात्रेकरूंस खुलें केलें. मूळराज शैव होता. त्यानें राजधानींत अनेक शिवालयें बांधविलीं. उत्तर भारतांतून औदीच्य व कनोजी ब्राह्मण बोलावून त्यांस आश्रय दिला. मूळराज इ. स. ९९६ त मरण पावला. त्यानें आपल्या कारकीर्दींत भडोच, सुरतपर्यंत आपला अंमल बसविला. मूळराजानंतर भीम नांवाच्या राजाच्या कारकीर्दींत गझनीच्या महमुदानें सोरटी सोमनाथवर स्वारी केली; तेव्हां भीमास त्याचें रक्षण करतां आलें नाहीं. परंतु महमुदाच्या स्वारीचा भीमाच्या राज्यावर विशेष परिणाम झाला नाहीं. महमूद गेल्यावर भीम पुनः अनहिलवाडा येथें राज्य करूं लागला. अबू येथील प्रसिद्ध जैन देवालय त्यानेंच बांधविलें. भीम इ. स. १०६४ त मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा कर्ण गादीवर आला. त्यानें आजच्या अहमदाबाद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नजीक कर्णावती शहर वसविलें व तेथें राजधानी स्थापिली. त्याचा मुलगा सिद्धराज जयसिंह हा इ. स. १०९४ त गादीवर आला. त्यानें माळवा प्रांत जिंकून घेतल्यावर त्यास चंदेल्ल राजांशीं दोन हात करण्याचा प्रसंग आला. प्रसिद्ध जैन विद्वान् हेमचंद्रसूरि किंवा हेमाचार्य हा त्याचे पदरीं होता. हेमचंद्राचा जन्म धंधुका येथें इ. स. १०८८ त झाला. तरुण वयांतच त्यानें संन्यास घेऊन धर्म व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. सिद्धराजानंतर गादीवर आलेल्या कुमारपालाचे कारकीर्दींत हेमचंद्र हा त्याचा मुख्य प्रधान झाला. तो इ. स. ११७२ त ८४ वर्षांचा होऊन मृत्यु पावला.

इ. स. ११७४ त कुमारपाल मृत्यु पावल्यावर या राज्यास उतरती कळा लागली. इ. स. ११७८ त घूरी सुलतानांनीं गुजराथवर पहिली स्वारी केली. तरी या राजपूत राजांचा गुजराथवरील अंमल पुढील शंभर वर्षें टिकला. इ. स. १२९७ त अलाउद्दीन खिलजीनें गुजराथवर स्वारी केली, तेव्हां तेथील राजा कर्ण पळून गेला. त्याची बायको कमलदेवी ही अलाउद्दीनाची पट्टराणी झाली. यानंतर कर्ण आपली मुलगी देवलदेवी हिला अलाउद्दीनाच्या तडाख्यांतून वांचविण्यासाठीं सातपुड्याच्या डोंगरांतून वणवण हिंडत असतां देवगिरीच्या शंकरदेवानें मागणी घातली होती. तिकडे ती स्वसंरक्षणार्थ पळून जात असतां मलिक काफूरनें तिला वेरूळनजीक पकडलें व अलाउद्दीनाकडे धरून नेलें. आपल्या मुलीला धरून आणण्यासाठीं कमलदेवीनेंच अलाउद्दीनाचें मन वळविलें असें म्हणतात. चालुक्य राजांचा गुजराथेंत तीनशें वर्षांवर अंमल होता. या राज्यासंबंधीं बरीच हकीकत अर्धमागवी भाषेंत लिहिलेल्या अनेक जैन ग्रंथांतून उपलब्ध होते. राजपूत राजांमध्यें जैन धर्मास विशेष उत्तेजन देणारे राजे गुजराथचे चालुक्य हेच होत. अर्वाचीन 'सोळंखी' हा चालुक्य शब्दाचा अपभ्रंश होय.

(५) **चेदीचें कलचूरी घराणें** :—चेदी ऊर्फ मध्यप्रांत यावर नवव्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत कलचूरी हें राजपूत घराणें राज्य करीत होतें. या घराण्याचा मूळ पुरुष कोकल्ल यानें जबलपूर जिल्ह्यांत डांभाळ किंवा डाहळ येथें राज्य स्थापिलें. कोकल्लाचा नातू युवराज यानें दहाव्या शतकांत आपल्या राज्यांत अनेक शैव संन्याशांना आश्रय दिला व शंकराचीं देवळें बांधविलीं. अकराव्या शतकांत या घराण्यांत गांगेय नांवाचा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. यानें उत्तरेस काश्मीर व बिहार प्रांत जिंकून घेतले व स्वतः अलाहाबाद येथें राहूं लागला. गांगेयानें 'विक्रमादित्य' हें नांव धारण करून आपल्या नांवाचें सोन्याचें नाणें पाडलें. गांगेय इ. स. १०४१ त मृत्यु पावल्यावर त्याचा मुलगा कर्ण हा गादीवर बसला. त्यानें तीस वर्षें राज्य केलें. कनोजच्या प्रतीहारांची बहुतेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्ता संपुष्टांत आणली. पश्चिमेकडे गुजराथच्या भीमराजाचा पराभव केला. दक्षिणेस तंजावरचा चोलराजा राजेंद्रदेव व मदुरेचे पाण्डय राजे यांना आपलें अधिराज्य कबूल करावयास लावलें. अशा रीतीनें दिग्विजय केल्यावर कर्णानें इ. स. १०५२ मध्यें स्वतःस फिरून राज्याभिषेक करून घेतला. पूर्व पश्चिम बंगाल ते पंजाब व उत्तर-दक्षिण हिमालय ते नर्मदा, एवढा प्रदेश कांहीं काळ त्याच्या अधिराज्याखालीं आला. पण वृद्धापकाळांत त्याच्या राज्यास उतरती कळा लागली. अखेर कल्याणीच्या सोमेश्वर चालुक्यानें त्यास लढाईंत ठार मारलें असें बिल्हण कवीनें म्हटलें आहे. कर्ण हा उत्तर हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापनेचा यत्न करणारा शेवटचा राजपूत राजा होय. दुर्दैवानें त्यास यश आलें नाहीं. मध्यप्रांतांत कलचूरी घराण्याचा अंमल इ. स. ११९५ पर्यंत चालू असल्याचा संदर्भ लागतो.

१०. **राजपुतांचें कार्य :**—वर ठिकठिकाणच्या राजपूत घराण्यांची त्रोटक हकीकत दिली आहे. त्यावरून राजपूत राज्यांचें स्वरूप लक्षांत येईल. खरें म्हटलें तर सर्व राजपुतांचें ऐक्य घडवून आणण्याचें दुर्घट कार्य कोणासच साधलें नाहीं. अव्वलपासून अखेरपर्यन्त राजपूत राजे आपापसांत लढत राहिले. पाठीशीं मुसलमान येऊन उभे राहिले तरी आपण काय करतों याचें त्यांना भान राहिलें नाहीं. हें सर्व खरें असलें तरी दहाव्या, अकराव्या व बाराव्या शतकांत राजपुतांनीं उत्तर हिंदुस्थानांत स्वतंत्र राज्यें स्थापन केलीं, राखलीं व वाढवलीं. अनेक सुंदर देवालयें बांधून आपली शिवोपासना गौरविली. मानीपणा, सौन्दर्य, ऐश्वर्याचा डौल, उच्च कुलाचा अभिमान, वागणुकींतील इमानीपणा, स्त्रियांचें शुद्ध चारित्र्य व स्वार्थत्याग या सर्व गुणांनीं राजपुतांचा या काळांतील इतिहास रोमहर्षक प्रसंगांनीं इतका भरलेला आहे कीं, ते स्फूर्तिदायक प्रसंग तत्कालीन भाटांनीं आपल्या काव्यांतून वर्णिले आहेत. हिंदी व गुर्जर स्त्रिया आजही घरोघर या प्रसंगांसंबंधींचीं गीतें गाऊन पराक्रमी पूर्वजांची आठवण जिवंत ठेवीत आहेत. सतराव्या व अठराव्या शतकांच्या घडामोडींसंबंधीं जसा मराठ्यांना अभिमान वाटतो तसा राजपुतांना व गुर्जरांना या तीन शतकांतील घडामोडींसंबंधीं साहजिकच वाटत असतो. तें कांहींही असो, १० ते १२ या तीन शतकांच्या इतिहासाचा अभ्यास केल्यावर असें वाटतें कीं, हिंदुस्थानचा या काळाचा इतिहास लिहितांना परकीय व स्वकीय लेखकांकडून या राज्यांच्या हकीकतींना गौणत्व देऊन आजपर्यंन्त मुसलमानी स्वाऱ्यांच्या हकीकतींना अवास्तव महत्त्व दिलें जात असे. खरें म्हटलें तर, या काळांत इस्लामी स्वाऱ्यांनीं सरहद्दीवर व क्वचित् देशांत गडबड उडाली असली तरी तेराव्या शतकांत गुलाम घरा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ष्याची स्थापना होईपर्यंत उत्तर हिंदुस्थानवर राजपूत संस्कृतीचें अखंड वर्चस्व होतें यांत शंका नाहीं.

दक्षिणेकडील स्वतंत्र हिंदु राज्यांची हकीकत पुढें दिली आहे. याशिवाय सिंधचे राजे, चितोडचे गुहिलोत व सांबरचे चाहमान यांची हकीकत त्याच्या पुढील भागांत दिली आहे. कारण त्यांचा साक्षात् मुसलमानाशीं जो झगडा सुरू झाला त्याचें वर्णन देण्यापूर्वी मुसलमान हे कोण व कोठले हें सांगणें जरूर आहे.

प्रश्न

१. राजपुतांच्या उत्पत्तीसंबंधीं तुम्हास काय माहिती आहे? त्यांच्या स्वभावविशेषाची माहिती द्या. २. राजपुतांच्या उदयाचा हिंदुस्थानवर काय परिणाम झाला? ३. टिपणें लिहा:--परमार, भोज, हेमचंद्रसूरि, गुजराथचे चालुक्य, बंगालचे पाल.

अभ्यास

(१) श्री. ह. वा. देशपांडेकृत (अ) राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास (आ) राजपूत संस्कृति, हीं पुस्तकें वाचा. (२) कै. चिं. वि. वैद्यकृत मध्ययुगीन भारत, भाग ३ रा वाचा. (३) कै. ह. ना. आपटेकृत रूपनगरची राजकन्या या कादंबरींत राजपूत जीवनाचें चित्र पहावयास सांपडतें. (४) राजपुतांच्या आख्यायिका व दंतकथा जमा करा. शाळेंतील विद्यार्थ्यांनीं अशा गोष्टींचा हस्तलिखित संग्रह करून ठेवण्यासारखा आहे.

माहितीसाठीं

(१) राजपूत वीर पत्नी आपल्या पतीच्या हातीं उत्साहानें रणकंकन बांधीत असल्याचें दृश्य कवींनीं पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे.

कंकणबंधन रणचढण पुत्र बधाई चाव ।
तीन दिहाडा त्याग रा कांई रंक कांई राव ॥

(२) अगदीं साधारण राजपूत मनुष्यही स्वाभिमानाच्या रक्षणार्थ प्रसंगीं प्राण देण्यास मागेंपुढें पहात नाहीं ही गोष्ट पुढील गीतांत वर्णिलेली आहे; हें गीत आजही राजपुतान्यांत घरोघर गायिलें जातें.

घर जातां ध्रम पलटतां, त्रिया पड़ँता ताव ।
ए तीनुहि दिन मरण रा, कहा रंक कहा राव।

--जगदीशसिंह गुहिलोतकृत
राजपूतानेका इतिहास पृ. ४ व ५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ११ वा

वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन

१. **कुमारीलभट्ट** :—आठव्या शतकांत राजपुतांचा उदय कसा झाला तें सांगितल्यावर त्याच सुमारास भारताच्या धार्मिक स्थितींत मोठी क्रांति घडवून आणणाऱ्या थोर पुरुषांची हकीकत दिली पाहिजे. हे पुरुष म्हणजे कुमारीलभट्ट व शंकराचार्य हे होत. कुमारीलभट्ट इ. स. ७०० च्या सुमारास होऊन गेले. हे उत्तर भारताचे रहिवासी असावेत असा कै. वैद्य यांचा तर्क आहे. कुमारीलभट्टांची चरित्रविषयक माहिती उपलब्ध नाहीं. बौद्ध मताचा पाडाव व वैदिक मताची स्थापना हें कुमारीलभट्टाचें मुख्य कार्य होय. बौद्ध धर्माचा प्रसार झाल्यापासून लोकांत वेदांविषयीं अनादर पसरलेला होता. त्याचें निराकरण कुमारीलभट्टांनीं केलें व त्यामुळें वेदास पूर्वीचें वंदनीय स्थान प्राप्त झालें. कुमारीलभट्ट हे कर्मयोगी असून त्यांनीं अग्निहोत्र व हिंसायुक्त यज्ञादि कर्में यांचा पुरस्कार केला. संन्यासमार्ग तर त्यांस अगदींच पसंत नव्हता. वैदिक यज्ञविधीचें तंत्र संभाळून तें यथासांग केल्यास यजमानास त्याचें फळ मिळालेंच पाहिजे. यज्ञ व त्याचें फळ यांत अभेद्य कार्यकारणभाव आहे, त्यांत दैवी कृपेचा प्रश्नच उद्भवत नाहीं, असें कुमारीलभट्टांचें मत होतें. कुमारीलभट्टांची ही तंत्रमीमांसा शबर सूत्रें व त्यावरील गुप्त-पूर्वकालीन जैमिनीची टीका यांच्यावर आधारलेली होती. कुमारील-भट्टाचे पूर्वी सहाव्या शतकांत होऊन गेलेल्या प्रभाकरानें हीच तंत्रमीमांसा प्रतिपादिली. यज्ञ व फळ एतद्विषयक कार्यकारणभावाच्या अपरिहार्यतेवर भर देणाऱ्यास 'मीमांसक' असें म्हणतात. मीमांसकांचें हें परमेश्वरनिरपेक्ष कार्यकारणभावाचें विवेचन पाहून टीकाकारांनीं ते निरीश्वरवादी आहेत असा त्यांच्यावर आरोप केला, परंतु कुमारीलभट्टानें त्याचा साफ इन्कार केला आहे. या आरोप-प्रत्यारोपांतील सत्यसंशोधन हा तात्त्विक चर्चेचा प्रश्न आहे. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतां बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें लोकांत अहिंसा व संन्यास या गोष्टी लोकप्रिय झाल्यामुळें आणि कुमारील-भट्टांच्या मागून आलेल्या शंकराचार्यांच्या खंडनपर टीकेमुळें कुमारीलभट्टांच्या मीमांसक मताचा लौकरच पाडाव झाला. मात्र त्यांनीं केलेलें वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन त्यांच्यानंतरही अबाधित राहिलें.

२. **शंकराचार्य** :—केरळ (मलबार) प्रांतांत पूर्णानदीचे काठीं कालटी ग्रामीं इ. स. ७८८ सालीं एका नंबुद्री ब्राह्मणाच्या कुलांत शंकराचार्यांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जन्म झाला. त्यांना अवघें बत्तीस वर्षांचें आयुष्य लाभलें. लहानपणींच वडील निवर्तल्यामुळें त्यांची जोपासना त्यांची आई आर्यांबा हिनें केली. पुढें आर्यांबानें त्यांच्या लग्नाचा विचार केला असतां तो न पटून कशीबशी आईची परवानगी घेऊन ते घराबाहेर पडले व गुरूचा शोध करूं लागले. कांहीं दिवसांनीं विंध्याद्रीच्या आसपास त्यांची व गोविंद पूज्यपादाचार्य याची गांठ पडली. त्यांनीं त्यांस उपदेश देऊन संन्यासदीक्षा दिली. पुढें कांहीं वर्षें अध्ययन केल्यावर काशी येथें जाऊन त्यांनीं तेथील पंडितांशीं वाद करून त्यांस आपल्या विद्वत्तेनें चकित केलें, व त्यांना वादांत जिंकलें. ह्यामुळें त्यांची महती फार वाढली. लौकरच त्यांनीं प्रस्थानत्रयीवर* आपलें भाष्य लिहिलें. तेंच सुप्रसिद्ध शांकरभाष्य होय. या भाष्यामुळें जुन्या वैदिक संस्कृतीची परंपरा पुनरुज्जीवित होऊन तिचा भारतीय जीवनांतील धागा अखंड राहिला. हा ग्रंथ लिहून झाल्यावर त्यांनीं सर्व भारतभर संचार केला, व ठिकठिकाणच्या पंडितांस जिंकलें. त्यांत कुमारीलभट्टांचा शिष्य मंडनमिश्र याच्याशीं त्यांचा वाद झाला. हा वाद म्हणजे कर्ममार्ग व संन्यासमार्ग यांच्या पुरस्कर्त्यांमधील वाद होय. ह्यांतही शंकराचार्यांस विजय मिळाला. ह्या वादासंबंधीं विशेष हा कीं, मंडनमिश्राची पत्नी सरस्वती ही त्या वादांत पंच होती. ह्यावरून त्या कालच्या स्त्रियांच्या विद्वत्तेविषयीं व सामाजिक दर्जाविषयीं अनुमान होतें. यानंतर शंकराचार्यांनीं आसाम, उज्जयिनी, काश्मीर इत्यादि बऱ्याच ठिकाणीं प्रवास करून तेथील पंडितांस वादांत जिंकलें, व आपल्या तत्त्वज्ञानाचा झंझावाताप्रमाणें धूमधडाक्यानें प्रचार केला. काश्मीरांत शारदांबेचें देवालय आहे, त्यासंबंधीं अशी आख्यायिका होती कीं, जो जगांतील सर्व पंडितांस जिंकील त्याच्याकडून त्या देवालयाचें द्वार उघडलें जाईल. शंकराचार्यांनीं हें द्वार उघडलें. ग्रंथ लिहून झाल्यानंतर व चारी दिशांस हिंडून पंडितांस वादांत जिंकून स्वतःचें मत प्रस्थापित केल्यानंतर, त्यांनीं आपलें कार्य अखंड चालू राहावें म्हणून भारताच्या चारही भागांत उत्तरेस बदरीकेदार, दक्षिणेस शृंगेरी, पश्चिमेस


शंकराचार्य

*उपनिषदें, गीता व वेदान्त सूत्रें यांस 'प्रस्थानत्रयी' असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदु धर्म व बौध्द धर्म यांचा चढउतार



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्वारका व पूर्वेस जगन्नाथपुरी इतक्या ठिकाणीं शांकरतत्त्वज्ञानाचीं पीठें स्थापन केलीं. इतक्या लहान वयांत एवढी विधायक कामगिरी आटोपून वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी शंकराचार्य जे हिमालयांत बदरीकेदाराकडे गेले ते फिरून परत आले नाहींत.

३. **शंकराचार्यांचें कार्य** :—बौद्ध धर्माचा पाडाव झाल्यावर भरतखंडाच्या चारही कोपऱ्यांत वैदिक धर्माची ध्वजा लावणारा पुरुष शंकराचार्य होय. शंकराचार्यांसारखा वादनिपुण, उद्योगशील व बुद्धिमान् पुरुष आजपर्यंत झाला नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्यासंबंधीं कै. चिंतामणराव वैद्य यांचे पुढील उद्गार चिंतनीय आहेत. "त्यांनीं वेदांच्या आधारानेंच आणि वेदांतसूत्रांच्या पायावर आपलें नवीन तत्त्वज्ञान उपदेशिलें आणि संन्यासाचा पुरस्कार व अग्निहोत्राविषयीं अनादर जो लोकांना प्रिय होता तोच प्रतिपादन केला. याशिवाय शिव, विष्णु, देवी यांच्या पूजेसही अग्रस्थान नसलें तरी अनुमति दिली. अशा रीतीनें शंकराचार्यांनीं एक प्रकारें बौद्ध लोकांच्या जुन्या वृत्तीकडे वळलेल्या लोकमतासच दुजोरा दिला. मात्र वेदांविषयीं अपूज्यता व वर्णाश्रमधर्माविषयीं अनादर हीं जीं दोन बौद्ध मतें लोकांनाही अप्रिय होतीं तीं त्यांनीं खोडून काढलीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बौद्ध धर्मांतील अहिंसा मताकडील लोकांची आवड पाहून तीस मान देऊन, पण कुमारीलभट्टानें स्थापिलेल्या वेदप्रामाण्यच्या पायावर शंकराचार्यांनीं हल्लींची हिंदु धर्माची विस्तृत, मनोहर, व भक्कम इमारत उभारली यांत शंका नाहीं."

४. **बौद्ध धर्माचा लोप** :—शंकराचार्यांच्या या उद्योगामुळें हिंदु धर्म मुसलमानी धर्माचे पुढील एक हजार वर्षांचे तडाखे सहन करूनही अभंग राहिला. बौद्ध धर्म मात्र हिंदुस्थानांतून हद्दपार झाल्यासारखा झाला. पण बौद्ध धर्म अदृश्य होण्याचें कारण त्याचा पराभव झाला हें नव्हे; तर बौद्ध धर्माचें अवतारकार्य संपलें हें होय. आचारांची कृत्रिमता, सामाजिक विषमता व अकारण हिंसा यांचा लोप व्हावा म्हणून बौद्ध धर्माचा उदय झाला. शुद्धाचरण व संन्यास हे लोकप्रिय व्हावेत म्हणून बौद्ध धर्म उदय पावला. धर्माचें क्लिष्ट स्वरूप जाऊन त्यास लोकप्रिय स्वरूप प्राप्त व्हावें म्हणून बौद्ध धर्माचा अवतार झाला. इसवी सनापूर्वीच्या पांचव्या शतकापासून इसवी सनाच्या सहाव्या सातव्या शतकांपर्यंत हें कार्य त्यानें झपाट्यानें केलें. बौद्ध धर्माचीं टिकून राहण्याजोगीं तत्त्वें समाजांत दृढमूल झालीं. नवीन आलेल्या वैदिक धर्मानें त्यांचा अंगीकार करून तीं आत्मसात् केलीं. अशा रीतीनें बौद्ध धर्माचा लोप झाला, परंतु बौद्ध तत्त्वें समाजांत अढळ राहिलीं. दुसरें असें कीं, बौद्ध धर्माची अहिंसेची शिकवण राजपूत स्वभावास न पटल्यामुळें सातव्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शतकानंतर त्या धर्माचा पुरस्कार करणारा कोणी उरला नाहीं. निरीश्वरवादी बौद्ध धर्मापेक्षां ईश्वरवादी धर्मांची शिकवण येथील लोकांस अधिक पटणारी व रुचणारी होती. कालांतरानें बौद्ध भिक्षुभिक्षुणींत ऐश्वर्य व विषय यांची आवड उत्पन्न झाली व त्यांच्या अनैतिक आचरणामुळें सातव्या शतकानंतर भारतांत बौद्ध धर्म कायमचा मागें पडला.

प्रश्न

१. शंकराचार्यांचें चरित्र व हिंदुधर्मविषयक कामगिरी सांगा.
२. मीमांसक म्हणजे काय ?

अभ्यास

(१) जगांतील घडामोडींत उत्पत्ति, स्थिति व लय हा स्वाभाविक क्रम आहे. या दृष्टीनें बौद्ध धर्माचा उदय, विकास व अवनति यांचें निरीक्षण करा. जगांत लोप पावतें तें सर्वच वाईट असतें असें नाहीं.

(२) शंकराचार्य–मंडनमिश्र वादांत मंडनमिश्राची स्त्री पंच होते हा प्रसंग जगांतील बौद्धिक वादांच्या इतिहासांत संस्मरणीय आहे. स्त्रीचा बौद्धिक दर्जा, तिचा निःपक्षपातीपणा, उभय पक्षांनीं तिजसंबंधीं दाखविलेला संपूर्ण विश्वास, तत्कालीन समाजांतील बौद्धिक सहिष्णुतेचें वातावरण हीं सर्व एकाहून एक उदात्त अशीं आहेत यांत शंका नाहीं. खरोखर या प्रसंगाचें चित्र काढून ठेवण्यासारखें आहे.

माहितीसाठीं

शंकराचार्यांनीं आपलें सुप्रसिद्ध शांकरभाष्य लिहून आठव्या शतकापर्यंत आणून पोहोचविलेली वैदिक परंपरा तेराव्या शतकांत ज्ञानेश्वरांनीं व विसाव्या शतकांत टिळक व अरविंद घोष यांनीं या देशांत पुनरुज्जीवित केली. सारांश, भारतीयांचें आध्यात्मिक जीवन गीता ग्रंथावरील टीका प्रतिटीकांतून व्यक्त होत आहे. मात्र कुणाही एका टीकाकाराला संपूर्ण प्रमाण मानण्याचा प्रघात नसल्यामुळें धर्मग्रंथ एक ठेवूनही सांप्रदायिकाचा संकुचितपणा वैदिकधर्माच्या अनुयायांत आलेला नाहीं हा या धर्माचा विशेष होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १२ वा

दक्षिणेकडील राज्यें : चालुक्य, राष्ट्रकूट, चोल इ.

(इसवी सनाच्या सातव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत)

१. **उत्तर व दक्षिण भारताचा परस्परांशीं संबंध** :—प्राचीन भारताची हकीकत देतांना नर्मदेच्या दक्षिणेकडील राज्यांचा क्वचितच उल्लेख करण्याचा प्रसंग येतो. याचें कारण असें कीं, उत्तर व दक्षिण भारतावर एकछत्री राज्य फारच क्वचित् राहिलें. उत्तरेकडील दिग्विजयी राजे विंध्याद्रीचे उत्तरेस वर्चस्व स्थापन करून दक्षिणेकडे येत किंवा दक्षिणेकडील राजे महत्त्वाकांक्षा धरून उत्तरेकडील राजांशीं सामना करीत, तेवढ्यापुरता उत्तर व दक्षिण भारताचा संबंध येत असे. दिग्विजयी राजांच्या मृत्यूनंतर लौकरच दक्षिण व उत्तर भारतांतील राज्यें अलग होत असत. इसवी सनापूर्वीं तिसऱ्या शतकांत मौर्यांनीं दक्षिणेंत आपला अंमल बसविला. इसवी सनाच्या प्रारंभींच्या दोन तीन शतकांत दक्षिणेंतील आंध्रांनीं उत्तरेस मगधांचें राज्य बळकाविलें व इसवी सनाच्या चौथ्या शतकांत गुप्त वंशांतील समुद्रगुप्तानें पुन्हां एकवार मौर्यांचें अनुकरण केलें. आणि सातव्या शतकांत हर्षानें आणखी एकवार दक्षिणेकडे राज्य वाढविण्याचा यत्न करून पाहिला. हे दोनतीन शतकांतून एकाद्या वेळीं येणारे उत्तर व दक्षिण भारताचे संबंध सोडून दिले तर उत्तर-दक्षिण राज्यांचे वृत्तांत परस्परांपासून अलग अलग राहातात. खेरीज, इतिहास-लेखकांनीं आजपर्यंत भारताचा इतिहास लिहितांना दक्षिणेकडील वृत्तांतास पुरेसें महत्त्व दिलेलें नाहीं. खरें पाहिलें तर दक्षिणेकडील राज्यें कोणत्याही दृष्टीनें उत्तरेकडील राज्यांहून कमी महत्त्वाचीं नाहींत. म्हणून प्रस्तुत पांचशें वर्षांच्या काळांत उत्तरेप्रमाणेंच दक्षिणेकडेही जीं लहान लहान स्वतंत्र राज्यें होतीं त्यांचें त्रोटक वर्णन या भागांत दिलें आहे.

२. **दक्षिणेंतील हिंदु राज्यें** :—दक्षिणेकडील राज्यांचे दोन विभाग पडतात. एक उत्तरेस नर्मदा व दक्षिणेस तुंगभद्रा या नद्यांच्या प्रदेशामधील म्हणजे सामान्यतः महाराष्ट्रांतील राज्यें व दुसरा तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील राज्यें. नर्मदा व तुंगभद्रा या नद्यांमधील प्रदेशांत इसवी सनापूर्वींच्या तिसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या पांचव्या शतकापर्यंत आंध्रांनीं राज्य केलें. परंतु ह्या सातशें वर्षांच्या काळांत आंध्रांचें एवढ्या मोठ्या प्रदेशावर एकसारखें राज्य होतें असें दिसत नाहीं. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंध्रांचें अधिराज्य मोडकळीस येऊन त्या जागीं या प्रदेशांत लहान लहान राज्यें निर्माण झालीं. सहाव्या शतकांत चालुक्यांचा उदय झाला. आठव्या शतकांत राष्ट्रकूट पुढें आले. दहाव्या शतकांत पुन: चालुक्यांनीं आपलें राज्य स्थापन केलें. बाराव्या शतकांत यादव व होयसळ हे उदयास आले व चौदाव्या शतकाच्या प्रारंभापासून जी मुसलमानी अंमलास सुरुवात झाली त्याचा अठराव्या शतकांत शेवट झाला.

महाराष्ट्रांतील राज्यें

३. चालुक्य राजे :—आंध्रांची हकीकत मागें पृ. ९८-९९ वर आलेलीच आहे. इसवी सनाच्या सहाव्या शतकांत चालुक्य हें राजपूत घराणें उदयास आलें. यांची राजधानी विजापुराजवळ वातापी ऊर्फ बदामी हें शहर होतें. चालुक्यांचा राजा पहिला पुलकेशी यानें नर्मदा ते तुंगभद्रा या प्रांतांत अधिराज्य स्थापून अश्वमेध यज्ञ केला. त्याचा मुलगा कीर्तिवर्मा यानें कोंकणच्या मौर्य राजांपासून गोव्यानजीकचा प्रदेश हिरावून घेतला. हा प्रदेश त्या काळीं रैवतद्वीप या नांवानें ख्यात होता. कीर्तिवर्म्याचा मुलगा दुसरा पुलकेशी यानें इ. स. ६०९ ते इ. स. ६४२ पर्यंत राज्य केलें. त्यानें तलकडच्या गंग घराण्यांतील राजकन्येशीं लग्न केलें. पुढें उत्तर कोंकण जिंकून त्यांची पुरी (घारापुरी) ही राजधानी आपल्या ताब्यांत घेतली. येथून पुढें दिग्विजय करीत पुलकेशी उत्तरेस मही नदीपर्यंत गेला. तिकडील लाट, गुर्जर व मालव राजे त्यास शरण आले. पुढें उत्तरेकडील सम्राट् हर्ष ह्याच्यावर चाल करून आला असतां यानें हर्षाचा पराभव केला (इ. स. ६२०). यानंतरच्या काळांत त्यानें पूर्वेकडील कलिंग व पिष्टपूर हे प्रांत जिंकून घेतले, व तेथें आपला भाऊ विष्णुवर्धन यास राज्य करण्यास पाठवून दिलें. पूर्वेकडील वेंगीचें चालुक्य घराणें म्हणतात त्याची सुरुवात या विष्णुवर्धनापासून होते. असो. यानंतर पुलकेशीनें स्वतःस 'परमेश्वर' असा बहुमानार्थी किताब धारण केला. पुलकेशीचें राज्य अतिशय भरभराटींत असून त्यानें इराणपर्यंत आपले वकील धाडले होते असा उल्लेख सांपडतो. पुलकेशी आदिकरून चालुक्य राजे हिंदुधर्मी असून वराह हें त्यांचें ध्वजचिन्ह असे. त्यांच्या राज्यांत बौद्ध धर्माचा प्रसार फारच कमी प्रमाणावर होता. प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्यूएनत्संग हा पुलकेशीच्या दरबारीं येऊन गेला. त्यानें या राज्याचें व येथील लोकांचें वर्णन लिहून ठेविलें आहे तें वाचण्यालायक आहे (पृ. ११४). इ. स. ६४२ सालीं कांची (चोल प्रांताचें मुख्य शहर कांजीवरम्) येथील नृसिंहवर्मा नांवाच्या पल्लव राज्यकर्त्यानें पुलकेशीवर स्वारी करून त्याचा पराभव केला. परंतु पुढें इ. स. ६५५ त पुलकेशीच्या मुलानें पल्लव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजावर स्वारी करून बापाच्या पराभवाचा सूड उगविला. तो स्वतःस विक्रमादित्य म्हणवी. पल्लवांखेरीज त्यानें चोल, पांड्य व केरळ राजांचाही पराभव केला. यानंतर चालुक्यांचें राज्य इ. स. ७५३ पर्यंत चाललें. या सालीं चालुक्यांचा वेरूळ येथील मांडलिक दंतिदुर्ग राष्ट्रकूट यानें त्यांचा शेवटचा राजा दुसरा कीर्तिवर्मा याचा अंमल झुगारून देऊन चालुक्यांच्या सत्तेचा शवट केला. तेव्हांपासून महाराष्ट्रांत राष्ट्रकूटांचा उदय झाला.

चालुक्य राजे सुसंस्कृत असून त्यांनीं शिल्पकलेस उत्तेजन दिलें. अजंठा व एलेफंटा येथील चित्रकला व कोरीव लेणीं यांच्या राजवटींत तयार झालीं. जवळ जवळ दोन शतकें पश्चिम किनाऱ्यावरील परदेशी व्यापारावर यांचें प्रभुत्व असे. यावरून दर्यावर्दी कौशल्याची परंपरा शिवाजीच्या उदया-पूर्वी एक हजार वर्षें महाराष्ट्रांत विद्यमान असल्याचें दिसून येतें.

४. राष्ट्रकूट :—राष्ट्रकूट यांनीं इ. स. ७५३ पासून इ. स. ९८३ पर्यंत महाराष्ट्रावर राज्य केलें. राष्ट्रकूट हे यादव कुळांतील होत असें मानतात. ते स्वतःस रट्ट किंवा रठ्ठ म्हणवितात. त्यावरून महारठ्ठ किंवा 'मराठे' हा शब्द निघाला असावा असें कांहींचें मत आहे. राष्ट्रकूट शिवोपासक असत. त्यांची राजधानी मालखेड ही होती. राष्ट्रकूट वारंवार उत्तर भारतावर स्वाऱ्या करीत असत. दंतिदुर्गाच्यानंतर राज्यावर आलेला पहिला कृष्ण यानें इ. स. ७५६ पासून बहुधा इ. स. ७७३ पर्यंत राज्य केलें. त्यानें कोंकणांत शिलाहारांची मांडलिक सत्ता स्थापन केली. दक्षिणेस गंग घराण्याचा श्रीपुरुष याच्यावर स्वारी केली (इ. स. ७६८), व पूर्वेस सैन्य पाठवून वेंगीच्या चालुक्यांचाही पराभव केला. वेरूळ येथें शिल्पकलेसाठीं प्रसिद्ध असलेलें कैलासमंदिर यानेंच बांधलें. यानंतर अमोघवर्ष ऊर्फ बल्लाळ ऊर्फ वल्लभराय हा राजा तेथें इ. स. ८१५ ते ८७७ पर्यंत राज्य करीत होता. सिंध प्रांतावरील अरब राज्यकर्त्यांशीं हा स्नेहभावानें राही. याच्या कार-कीर्दींत सुलेमान हा अरबस्तानांतील व्यापारी येथें येऊन गेला. त्यानें राष्ट्र-कूटांचें राज्य जगांतील चार मोठ्या राज्यांपैकीं एक होतें असें लिहून ठेविलें आहे. अमोघवर्षावर जिनसेन नांवाच्या जैन साधूची छाप पडून त्यानें जैन धर्माचा स्वीकार केला. दिगंबरपंथी जैनास त्याचा मोठा आश्रय असे. 'जयधवल' नांवाचा जैन तत्त्वज्ञानावरील ग्रंथ त्याच्या कारकीर्दींत रचला गेला. स्वतः अमोघवर्षानें रत्नमालिका नांवाचें एक छोटें पुस्तक लिहिलें असून त्याचें तिबेटी भाषेंत झालेलें भाषांतर उपलब्ध आहे. अमोघ-वर्षानंतरचे राजे जैनधर्मी असल्याचें दिसत नाहीं.

राष्ट्रकूटांचा इ. स. ९८२ त पाडाव झाल्यावर महाराष्ट्राचीं शकलें झालीं. कोंकण प्रांतांत शिलाहारांचीं दोन राज्यें स्वतंत्र झालीं. एक उत्तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



वेरूळ येथील कैलास मंदिर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोंकणचें ठाणें किंवा 'स्थानक' मुक्कामीं व दुसरें दक्षिण कोंकणचे रत्नागिरी येथें. यांखेरीज शिलाहारांची तिसरी शाखा कन्हाटक किंवा कन्हाड येथें स्थापन झाली. दक्षिणेस हनगळ व गोवें प्रांतीं कदंबांनींही दोन स्वतंत्र राज्यें स्थापिलीं.

५. दुसरे चालुक्य राजे :—इ. स. ९८२ नंतर दुसरें चालुक्य घराणें उदयास आलें. यांचा पूर्वीच्या चालुक्य घराण्याशीं कांहीं संबंध नाहीं. ह्यांचें मुख्य शहर कल्याणी हें होतें. चालुक्य व चोल यांच्यांत वारंवार युद्धप्रसंग होत असत. यांच्यांतील विक्रमादित्य राजानें इ. स. १०७६ ते ११२७ पर्यंत राज्य केलें. यानें जयकेशी नांवाच्या राजाचा पराभव केला. कन्हाटक अथवा कन्हाड येथील राजकन्या चंद्रलेखा इजबरोबर त्यानें लग्न केलें. गौड व कामरूपचे राजे यांच्याशीं तो स्नेहभावानें राहात असे. यानें दक्षिणेचे होयसळ, पांड्य व गोव्याचे कदंब राजे त्याजवर एकदम चाल करून आले असतां त्यांचा पराभव केला. त्याच्या कारकीर्दीत प्रजेस सौख्य झालें. तो विष्णूचा भक्त होता. काश्मीरचा पंडित बिल्हण यास दक्षिणेंत विक्रमादित्याच्या दरबारीं आश्रय मिळाला. 'मिताक्षरी' या हिंदु कायद्याचा लेखक विज्ञानेश्वर याच्याच पदरीं होता. विक्रमादित्यानंतर चालुक्यांची सत्ता इ. स. ११९० पर्यंत कशीबशी टिकली. दुसऱ्या चालुक्यानंतर देवगिरीचे यादव व द्वारसमुद्र (म्हैसूर) येथील होयसळ ऊर्फ बल्लाळ हे एकाच वेळीं उदयास आले.

६. लिंगायत धर्माचा उदय :—चालुक्यांची सत्ता संपुष्टांत येत असतां कर्नाटकांत लिंगायत धर्माचा उदय झाला. लिंगायत हे शिवोपासक आहेत. ते शिवाची पूजा करितात. ह्यांना वीरशैव असेंही म्हणतात. बसव नांवाचा एक ब्राह्मण चालुक्यांचा प्रधान होऊन गेला. त्यानें इ.स. ११६०त या धर्माचा पुरस्कार केला. हे वेदास मानीत नाहींत. लिंगसंप्रदाय स्वीकारल्यास प्राण्यास पुनर्जन्माचा फेरा चुकवितां येतो असें हे मानतात. विधवाविवाह ह्यांस संमत आहे. जातिभेद मोडण्याच्या हेतूनें या धर्माचा उदय झाला. पण त्याचा प्रसार मर्यादित राहिल्यानें हा हेतु साध्य झाला नाहीं.

७. देवगिरीचे यादव :—बाराव्या शतकांत हें घराणें प्रसिद्धीस येण्यापूर्वी हे चालुक्यांचे मांडलिक म्हणून राहात. ते आपणांस कृष्णाचे वंशज मानीत. यादव हे इतिहासांत मराठे म्हणून ओळखले जातात. या यादवांनीं व दक्षिणेकडील होयसळांनीं चालुक्यांचें राज्य बुडविण्याची खटपट केली व दोघांसही यश आलें. होयसळांच्या वीर बल्लाळानें चालुक्यांचा अंमल झुगारून आपलें राज्य स्थापन केलें. त्याच्या पाठोपाठ इ. स. ११८७ सालीं भिल्लम यादवानें चालुक्यांचा पूर्ण पराभव करून स्वतंत्र राज्य स्थापन केलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व देवगिरी हें शहर आपली राजधानी केली. भिल्लम इ. स. ११९१ त मरण पावला. नंतर इ. स. १२१० मध्यें त्याचा नातू सिंघण हा गादीवर बसला. सिंघण हा यादवांचा सर्वांत पराक्रमी व विद्येचा पुरस्कर्ता राजा होय. याच्या कारकीर्दींत यादवांच्या राज्याचा उत्तरेस गुजराथपासून दक्षिणेस कोल्हापूरपर्यंत विस्तार झाला. त्यानें गुजराथच्या राजावर दोन स्वाऱ्या केल्या व दक्षिणेकडील शिलाहार व कदंब राजांचाही पराभव केला. सिंघण इ. स. १२४६ त मृत्यु पावला.

सिंघणानंतर त्याचा नातू कृष्ण (इ. स. १२४७–१२६०) व कृष्णाचा भाऊ महादेव (इ. स. १२६०–१२७२) यांनीं देवगिरीचें राज्य केलें. पंढरपूरच्या विठोबाचें देऊळ या महादेवाच्या कारकीर्दींत बांधलें गेलें. महादेवानंतर कृष्णाचा मुलगा रामदेव हा राज्यावर आला. रामदेवरावाच्या कारकीर्दींत इ. स. १२९४ सालीं दिल्लीचा सुलतान अलाउद्दीन खिलजी यानें देवगिरीवर स्वारी केली व त्यानंतर त्याचा सेनापति मलिक काफूर यानें इ. स. १३०७ व १३०९ या सालीं आणखी दोन स्वाऱ्या करून रामदेवाचा पराभव केला. इ. स. १३१८ त अलाउद्दिनाचा मुलगा मुबारक यानें देवगिरीच्या राज्याचा शेवट केला.

८. **तत्कालीन पंडित व ग्रंथकार** :—यादवांच्या कारकीर्दींत पुष्कळ कवी व पंडित उदयास आले. प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य हा इ. स. ११५० च्या सुमारास होऊन गेला. ह्यानें सिद्धांतशिरोमणी या नांवाचा ज्योतिःशास्त्रविषयक ग्रंथ लिहिला आहे. ह्याचा दुसरा ग्रंथ लीलावती असून त्यांत बीजगणिताचें स्पष्टीकरण केलें आहे. ह्या भास्कराचार्यांचा नातू चांगदेव हा सिंघण राजाच्या पदरीं ज्योतिषी होता. चांगदेवानें आपल्या आजाच्या ग्रंथांचें अध्ययन व्हावें म्हणून चाळिसगांव तालुक्यांत पाटण येथें एक मठ स्थापन केला. ह्याच सिंघण राजाच्या कारकीर्दींत शारङ्गधर यानें संगीत शास्त्रावर ‘संगीत रत्नाकर’ नांवाचा ग्रंथ तयार केला. रामदेवरावाचा मंत्री हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत याचें नांव फार प्रसिद्ध आहे. हेमाद्रि हा वत्स गोत्री विद्वान् ब्राह्मण होता. ह्यानें ‘ चतुर्वर्ग चिंतामणी ’ नांवाचा धर्मग्रंथ तयार केला. त्यांतील व्रतखंड व शेवटचें परिशेष खंड हीं प्रकरणें धर्माचरणाच्या बाबतींत आजदेखील प्रमाणभूत मानलीं जातात. हेमाडपंतानें मोडी लिपि शोधून काढली. ती त्यानें लंकेहून आणली असें म्हणतात. महाराष्ट्रांत एकखांबी तंबूच्या आकाराचीं अनेक देवळें आहेत. तीं हेमाडपंती पद्धतीनें बांधलेलीं आहेत. हेमाडपंताच्या आश्रयाला बोपदेव नांवाचा वैष्णव ब्राह्मण असे. त्यानें ‘मुक्ताफळ’ व ‘हरिलीला’ हे ग्रंथ लिहिले आहेत. वैद्यक ग्रंथाचा प्रसिद्ध लेखक वाग्भट हा हेमाद्रीचा समकालीन होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. ज्ञानेश्वर :--परंतु ह्या सर्वांपेक्षां 'ज्ञानेश्वर' ह्या संतकवीचा प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे. ज्ञानेश्वर हा पैठणजवळच्या आपेगांवचे कुलकर्णी विठ्ठलपंत यांचा मुलगा. ज्ञानेश्वरास निवृत्ति, सोपान व मुक्ताबाई हीं भावडें होतीं. ही मंडळीही भगवद्भक्त असून ह्यांचे अभंग सर्वांच्या परिचयाचे आहेत. ज्ञानेश्वरानें भावार्थदीपिका नांवाचा जो ग्रंथ लिहिला, तिलाच ज्ञानेश्वरी असें म्हणतात. या ग्रंथांत भगवद्गीतेवर विस्तृत टीका आहे. ज्ञानेश्वरी हा मराठी भाषेतील सर्वांत प्राचीन मोठा ग्रंथ होय. धर्मग्रंथ होईल तितके संस्कृतांत लिहावयाचे ही पूर्वापार पद्धत मोडून प्राकृत जनांना धर्माचें ज्ञान व्हावें म्हणून त्यानें मुद्दाम " माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें । परि अमृतातेंही पैजंसीं जिंके । ऐसीं अक्षरेंचि रसिकें । मेळवीन ॥ " ही प्रतिज्ञा करून ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला व "सकलांचें दुरित जावो । विश्व स्वधर्मसूर्यें लाहो । जें जें वांछील तें तें पाओ । प्राणिजात ॥ " ह्या आशीर्वादपूर्वक वचनानें ग्रंथाचा शेवट केला. 'शके बारागेंबारोत्तरी' म्हणजे इ. स. १२९० त ग्रंथ समाप्त झाला असें ज्ञानेश्वरानें म्हटलें आहे.


ज्ञानेश्वर

१०. महानुभाव पंथ :—ज्ञानेश्वराबरोबरच चक्रधर आदिकरून महानुभाव पंथी लोकांनीं तेराव्या शतकाच्या प्रारंभीं मराठींत ग्रंथरचना केली, परंतु त्यांची ग्रंथरचना गुप्त लिपींत असल्यानें ती बऱ्याच कालपर्यंत अज्ञात होती. हल्लीं तिचें स्वरूप उघडकीस आलें असून त्यावरून महानुभावी ग्रंथांचा विद्वानांनीं अभ्यास चालविला आहे. वेदप्रामाण्य व चातुर्वर्ण्य यांना विरोध म्हणून सामान्य जनतेंत धर्मजागृति करण्यासाठीं या पंथाचा उदय झाला. म्हणून ते वर्णाश्रमधर्मीयांच्या कडक विरोधास पात्र झाले. या विरोधास भिऊन महानुभावांनी प्रच्छन्नतेचा मार्ग स्वीकारला व आपल्या ग्रंथासाठीं सांकेतिक लिपीचा आश्रय केला. यामुळें महानुभाव पंथाचा प्रसार मर्यादित राहिला. याच्या उलट वारकरी पंथाच्या लोकांनीं विरोधाचे आघात सोसले व ते संत पदवीस पात्र झाले.

११. होयसळ राजे :—हे देवगिरीच्या यादवांबरोबर उदयास आले. हेही प्रथम चालुक्यांचे मांडलिक होते. यांच्यांतील विष्णुवर्धन हा चालुक्यांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंमल झुगारून दक्षिणेकडे स्वतंत्र झाला. त्यानें चोलांचा नृसिंहवर्मा याचा पराभव केला. नंतरच्या काळांत त्यानें कोइमतूर, कांची, मदुरा इत्यादि ठिकाणांवर स्वाऱ्या करून बरेंच द्रव्य संपादन केलें. त्याची पत्नी शांतलदेवी हिनें श्रवणबेळगोळा येथें जैन मंदिर उभारलें. होयसळांचें बेलूर व श्रवणबेळगोळा या भागांतील शिल्प आपल्या वैशिष्टयानें प्रसिद्ध आहे.

त्यांचा शेवटचा राजा तिसरा वीरबल्लाळ हा इ. स. १३१० ते इ. स. १३३९ या काळांत होऊन गेला. याच्या कारकीर्दींत द्वारसमुद्रावर मुसलमान सेनापति मलिक काफूर याची धाड आली. तेव्हां वीरवल्लाळानें त्याचें स्वामित्व कबूल करून आपलें राज्य कसेंबसें वांचविलें. पुढें मलिक काफूरची पाठ फिरतांच तो सावरासावर करूं लागला व त्यांत त्यास बरेंच यशही आलें. त्याचा सहकारी यादवकुलीन संगम व संगमाचे पांच मुलगे यांनीं पुढें विजयनगर साम्राज्याचा पाया घातला. खुद्द वीरवल्लाळवर मात्र मदुरेच्या मुसलमान सुलतानानें इ. स. १३३९ त स्वारी करून त्याचा हृदयद्रावक अंत केला.

चालुक्यांची साम्राज्यसत्ता आपणांकडे यावी म्हणून ह्या दोन यादव घराण्यांत वारंवार युद्धें होत. परंतु सामान्यत: उत्तरेकडील प्रदेशांत देवगिरीचे यादव व दक्षिणेकडील प्रदेशांत होयसळ हे प्रबळ असत. होयसळांची राजधानी म्हैसूर प्रांतांत द्वारसमुद्र (हल्लींचें हळेबीड) येथें होती.

१२. **रामानुजम्** :—होयसळांच्या कारकीर्दींत बाराव्या शतकांत प्रसिद्ध वैष्णव रामानुजम् हा उदयास आला. होयसळांचा प्रथम जैन धर्माकडे कल असे; परंतु रामानुजम् यानें त्यांस वैष्णव पंथाकडे वळविलें. रामानुजम् हा चोलांच्या राज्यांतील श्रीरंगम् येथील मूळचा रहिवासी. शंकराचार्यांच्या मताशीं याचा मोठा विरोध होता. शंकराचार्य अद्वैती असत व रामानुजम् हा विशिष्टाद्वैती होता. अद्वैतवाद्यांचें म्हणणें असें कीं, सर्वत्र ब्रह्म भरलेलें असून ब्रह्म व सृष्टि हीं वस्तुत: दोन नव्हेत. तीं मायेमुळें वेगवेगळीं भासतात; या मायेचा निरास करणें अत्यंत आवश्यक आहे. विशिष्टाद्वैतवादी म्हणतात कीं ब्रह्म, जीवात्मा व जडसृष्टि हीं सर्व सनातन व अविभाज्य असलीं तरी ब्रह्माचा जीवात्म्याशीं व त्या उभयतांचा जडसृष्टीशीं जो संबंध आहे त्यांतील फरक लक्षांत घेणें जरूर आहे. रामानुजानें उपनिषदांवर टीका लिहून शंकराचार्यांच्या मतावर निर्भीड टीका केली आहे.

१३. **मध्वाचार्य** (इ. स. १११९ ते इ. स. १२७८) :—याच काळांतील आणखी एक टीकाकार मध्वाचार्य होय. हा दक्षिण कानडा जिल्ह्यांत उडपी येथें जन्मास आला. याचें मूळ नांव वासुदेव. तो स्वत:स 'आनंदतीर्थ' म्हणवितो. यानेंही उपनिषदांवर व वेदान्तसूत्रावर टीका लिहिली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा द्वैती होता. ब्रह्म व सृष्टि यांचा निर्माता व निर्मित वस्तु असा परस्परांशीं संबंध असल्यानें तीं दोन्ही भिन्न आहेत असें याचें प्रतिपादन आहे. भारताच्या दक्षिण भागांत या माध्वमताचे पुष्कळ अनुयायी आहेत. मध्वाच्यामागून आलेल्या जयतीर्थ व व्यासतीर्थ या उभयतांनीं द्वैत मताचा जोरानें प्रचार केला.

तामीळ राज्यें

तुंगभद्रेच्या दक्षिणेकडे तीन राज्यें प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें चोल, चेर व पांडच. त्यांची संक्षिप्त हकीकत पुढीलप्रमाणें :—

१४. दर्यावर्दी चोलराज्य :—पूर्वकिनाऱ्यावर उत्तरेस वेलूरपासून दक्षिणेस पदुकोटपर्यंतच्या प्रदेशास 'चोल' असें म्हणतात. या प्रांतावर इसवी सनाच्या पहिल्या शतकांत शातवाहन राजे राज्य करीत. चोलांचा कापडाचा व्यापार मोठा भरभराटींत असून त्यांचीं जहाजें ब्रह्मदेश, मलायापर्यंत जात असत.

१५. पल्लव राजे :—इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत तेथें पल्लव राजे उदयास आले. त्यांचें मुख्य शहर कांची हें होतें. चौथ्या शतकांत उत्तरेकडील समुद्रगुप्त हा येथपर्यंत येऊन स्वारी करून गेला. सातव्या शतकाच्या प्रारंभीं चालुक्यांनीं स्वारी करून त्यांचा 'वेंगी' (गोदावरीच्या मुखाजवळचा प्रदेश) प्रांत काबीज केला. त्यानंतर ह्युएनत्संग हा पल्लवांच्या दरबारीं येऊन गेला. पल्लव–चालुक्यांचीं एकमेकांशीं जीं युद्धें होत त्यांचा उल्लेख वर आलेलाच आहे. नृसिंहवर्मा हा त्यांचा प्रमुख राजा होय. त्यानें वर सांगितल्याप्रमाणें पुलकेशीचा पराभव केल्यावर पूर्वकिनाऱ्यावर महाबलिपुरम् (मद्रासचे दक्षिणेस) येथें आरमार उभारून सीलोनवर दोन स्वाऱ्या केल्या व तेथील राज्य जिंकून घेतलें. प्रारंभीं पल्लवांमध्यें जैन धर्माचें वर्चस्व फार होतें, नंतर ते हिंदुधर्मी बनले. कांची येथील वैकुंठ पेरुमलचें देवालय पल्लव राजांनीं बांधलें.

१६. चोल राजे :—पल्लवांचें राज्य इ. स. ९०७ सालीं संपल्यावर चोलांनीं राज्य करण्यास सुरुवात केली. त्यांचें मुख्य शहर तंजावर हें होतें. त्यांचींही दुसऱ्या चालुक्यांशीं वारंवार युद्धें होत. चोलांचें राज्य हें द्राविड संस्कृतीचें केन्द्र होय. चोल राजांत पहिला राजराज हा नांव घेण्यासारखा पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें इ. स. ९८५–१०१२ पर्यंत राज्य केलें. त्यानें केरळ (मलबार) येथील सत्ताधीशांचा समुद्रावर पराभव केला व मदुरेचे पांडच व म्हैसूरचे गंग यांना जिंकून आपलें राज्य उत्तरेस कलिंगपासून दक्षिणेस सीलोनपर्यंत वाढविलें; इतकेंच नव्हे तर पश्चिमेकडे सत्याश्रय पुलकेशीचाही युद्धांत पराजय केला. यानंतरच्या काळांत त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदी महासागरांत मलायाकडील प्रदेशावर स्वारी केली. परंतु तेथील दिग्विजयाचें काम पुरें होण्यापूर्वींच तो मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राजेन्द्र यानें इ. स. १०१२ ते १०४२ पर्यंत राज्य केलें. हाही आपल्या बापाप्रमाणेंच फार पराक्रमी होता. चालुक्यांशीं सतत चाललेल्या युद्धांत विजयाचें पारडें चोलांचे बाजूनें निश्चितपणें झुकविण्यास हा कारणीभूत झाला. यानें आपलें आरमार पाठवून ब्रह्मी किनाऱ्यावरील मलाया व अर्कीपिलागो हे प्रदेश काबीज केले, पश्चिम किनाऱ्यावरील लक्षद्वीप (लखदीव) व मालद्वीप (मालदीव) हीं बेटें ताब्यांत आणलीं व बंगालच्या उपसागरांतील निकोबार बेटांचा कबजा मिळविला. भारताच्या आग्नेयीस जावा बेटांत शैलेंद्र घराण्याचें राज्य होतें. त्या घराण्याचा राजा 'संग्रामविजयोत्तुंगवर्म' याचा राजेंद्रानें पराभव केला, त्याजपासून सुमात्रा बेट जिंकून घेतलें; व अशा रीतीनें आपल्या बापाचें नाविक दिग्विजयाचें कार्य पुरें केलें.

१७. उत्तर-दक्षिण भारताची तुलना:--ही पराक्रमी चोल राजांची परंपरा अशीच पुढें चालू राहिली व त्या परंपरेंत राजराज राजेन्द्र, वीर-राजेंद्र हींच नांवें आलटून पालटून पुन: पुन: येतात व त्यांचीं चालुक्य व पांड्य राजांशीं युद्धें झाल्याचा वृत्तान्त आढळतो. राजपूत राजांची आपा-पसांत व सरहद्दीवरील राज्यांशीं एकसारखीं युद्धें चालू असत, त्यांतलाच हा प्रकार दिसतो. मात्र राजपुताना लवकरच जो मुसलमानांशीं प्राणपणानें झगडा करावा लागला तसा प्रसंग दक्षिणेकडील राज्यांवर इसवी सनाच्या तेराव्या शतकाचे अखेरीपर्यंत आला नाहीं. राजपूत शौर्याचे रोमांचकारी प्रसंग इतिहासांतून वर्णिलेले आढळतात. तसे दक्षिणेंतील युद्धांतून आढळत नाहींत. कदाचित् दाक्षिणात्य सत्ताधीशांना कोणी वीररसप्रधान लेखन कर-णारा इतिहासकार लाभला नसेल. कोणीं सांगावें? मात्र राजपुतांच्या मानानें या राज्यांतून व्यापाराची भरभराट, दर्यावर्दीपणाकडे प्रवृत्ति, विशाल भारतांतील साम्राज्यविस्तार व शिल्पकलेच्या उत्कर्षाची आजतागायत साक्ष देत रहाणाऱ्या भव्य मंदिरांची उभारणी या गोष्टी विशेषत्वानें प्रकट होतात हें लक्षांत घेणें जरूर आहे. असो.

१८. अखेरचा चोलराजा कुलोत्तुंग:--वर उल्लेखिलेल्या राजेन्द्राच्या मृत्यूनंतर कित्येक वर्षांनीं त्याचा नातू--मुलीचा मुलगा--इ. स. १०७० मध्यें गादीवर बसला. त्याचेंही नांव राजेन्द्र असेंच होतें. परंतु त्यानें कुलोत्तुंग हें अभिधान धारण केलें व इतिहासांत तो पहिला कुलोत्तुंग म्हणून प्रसिद्ध आहे. यानें बौद्धधर्मीयांस विशेष उत्तेजन दिलें. त्याच्या कार-कीर्दीत म्हैसूर भागांत अनेक बौद्ध मंदिरें बांधल्याचा व नेगापट्टम् येथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन बौद्ध मंदिरांना त्यानें देणगी दिल्याचा उल्लेख आढळतो. प्रसिद्ध वैष्णव सुधारक रामानुजम् हा याचा समकालीन व चोल राज्यांतील रहिवासी होय. परंतु कुलोत्तुंगाच्या भीतीनें तो चोलांचें राज्य सोडून उत्तरेस गेला. कुलोत्तुंग इ. स. १११८ त मृत्यु पावला. त्याच्यामागून राज्यास उतरती कळा लागली. तरी चोल घराणें इ. स. १२६७ पर्यंत चालू असल्याचें आढळून येतें. बहुधा होयसळांनीं त्यांच्या सत्तेचा शेवट केला.

१९. चेर :—पश्चिमेस मलबार किनाऱ्यावर मंगळूरपासून दक्षिणेकडील प्रदेशास 'चेर' म्हणतात. तेथील राजे फारसे प्रसिद्ध नाहींत. हा प्रांत बहुधा चोलांच्या ताब्यांत असे.

२०. पांड्य :—वेल्लार नदीच्या दक्षिणेस पदुकोटापासून केप कामोरीनपर्यंतचा जो प्रदेश आहे त्यास 'पांड्य' असें म्हणतात. या प्रदेशावर बराच काळपर्यंत चोलांचा अंमल असे. इ. स. ११९० सालीं जातवर्म कुलशेखर नांवाचा राजा या प्रदेशावर स्वतंत्रपणें राज्य करूं लागला. तेथील राजांस पांड्य राजे असें म्हणतात. त्यांची राजधानी मदुरा. हे प्रथम जैनधर्मी होते. पुढें त्यांनीं हिंदु धर्माचा स्वीकार केल्यावर जैनांचा फार छळ केला. मार्को पोलो नांवाचा व्हेनीशियन प्रवासी इ. स. १२८८ त इकडे आला होता. त्यानें पांड्यांचें राज्य भरभराटींत असल्याचें लिहून ठेविलें आहे. सुमारें अर्धशतकपर्यंत यांनीं स्वातंत्र्य उपभोगल्यावर द्वारसमुद्र येथील होयसळांनीं तेथें अधिराज्य स्थापन केलें व पांड्य हे त्यांचे मांडलिक बनले. चौदाव्या शतकाचे प्रारंभीं मुसलमानांची धाड दक्षिणेंत आली तेव्हां होयसळ व पांड्य हे सारखेच रगडले गेले. मदुरेचे पांड्य राजे मुसलमानास शरण गेले. होयसळ मात्र अत्यंत शौर्यानें लढले, व त्यामुळें मुसलमानांना या भागांतून लवकरच पाय मागें घ्यावा लागला. या घटनेनंतर मदुरेचे पांड्य हे त्याच सुमारास स्थापन झालेल्या विजयनगरच्या साम्राज्याचा एक भाग होऊन बसले.

२१. **विकेन्द्रित राज्यपद्धति** :—आठव्या व नवव्या शतकांतील उपलब्ध झालेल्या तामिळ कोरीव लेखांवरून दक्षिणेकडील राज्यपद्धतीची माहिती मिळते. दर गांवीं बहुधा तीन प्रकारच्या सभा असत. 'उर' ही सर्व लोकांची ग्रामसभा होय. ही गांवचा कारभार, करपट्टी, पाणी पुरवठा, रस्ते दुरुस्ती अशा हरएक कामांकडे लक्ष देत असे. 'नगरम्' ही वाणी व्यापाऱ्यांची सभा होय व 'सभा' ही ब्राह्मण जमीनदारांची संस्था होय. धार्मिक प्रश्नांचा निर्णय बहुधा या सभेकडे येत असला पाहिजे. या सर्व सभा गांवचा अंतर्गत कारभार बऱ्याच अंशीं स्वयंपूर्णतेनें पहात. परंतु त्यांच्यावर राज्याच्या अधिकाऱ्यांची देखरेख असे व ते गांवास वेळोवेळीं भेटी देत तेव्हां गांवचे अधिकारी त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामांत सहकार्य करीत. गांवांच्या समुदायास कुर्रम् म्हणत. अनेक कुर्रमांच्या एक प्रदेशास 'नाडु' ही संज्ञा होती. नाडु म्हणजे जिल्हा. अनेक नाडूंचा मिळून एक 'विषय' व अनेक विषयांचा एक प्रांत अशी तत्कालीन देशविभागांची रचना होती. प्रांतावरील अधिकारावर बहुधा वयांत आलेल्या राजपुत्रांची नेमणूक होई. जमिनीची पहाणी करणें व तत्संबंधींचें दप्तर संभाळून ठेवणें यासंबंधींचे उल्लेख तत्कालीन लेखांत आढळून येतात. कुलोत्तुंगाच्या पायाची लांबी हें चोलांच्या राज्यांत जमिनीचें क्षेत्रफळ मोजण्याचें परिमाण होतें अशी माहिती मिळते. नद्यांस बांध घालून पाणी अडविणें, कालवे काढणें हीं कामें त्या काळीं लोकांच्या सरावांतील होतीं. या कामांत सरकारपेक्षां त्या त्या प्रदेशांतील लोक पुढाकार घेत, वर्गणी करीत, पट्टी बसवीत व हरएक कामें पार पाडीत. उत्तरेस चालुक्यांपासून ते दक्षिणेस पांड्यांपर्यंत सर्वत्र राज्यरचना एकाच सांच्याची होती असें नाहीं. तसेंच सातव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंत या राज्यरचनेंत बदल झाला नसेल हेंही अशक्य आहे. परंतु एकंदर विचार करतां दक्षिणेंतील राज्यरचना ही उत्तरेच्या मानानें अधिक विकेन्द्रित होती व राजघराण्यांच्या युद्धांचा जनतेच्या रहाणीवर व दिनचर्येवर तेथें फारसा परिणाम झाला नाहीं. उत्तर भारतांतील जनतेच्या जीवनांत वायव्येकडून येणाऱ्या रानटांच्या टोळधाडीमुळें म्हणा किंवा युद्धानुकूल राज्यरचनेमुळें म्हणा, त्या मानानें अधिक उलथापालथी झाल्या व त्यामुळें तेथील लोकांस पुरेसें स्वास्थ्य लाभलें नाहीं यांत शंका नाहीं.

प्रश्न

१. भारताचा नकाशा काढून या कालांतील दक्षिणेंतील राज्यांच्या राजधान्या दाखवा. २. टीपा लिहा—ज्ञानेश्वर, भास्कराचार्य, लिंगायत धर्म. ३. उत्तर व दक्षिण भारतांतील घडामोडींचें तुलनात्मक विवेचन करा.

अभ्यास

(१) प्रा. शं. वा. दांडेकरकृत ज्ञानेश्वर चरित्र वाचा. प्रा. अ. स. आळतेकरकृत राष्ट्रकूटांचा इतिहास (इंग्रजी) वाचा. (२) दक्षिणेंतील राज्यांतून उदयास आलेल्या ग्रंथकारांचें व त्यांच्या ग्रंथांचें टिपण करा. (३) तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील पल्लव, चोल इत्यादि राज्यांच्या अधिकृत माहितीसाठीं प्रा. नीळकंठशास्त्री यांचा 'Cholas' हा ग्रंथ व त्यांचा हिंदुस्थानचा इतिहास भा. १ ला हीं पुस्तकें वाचलीं पाहिजेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

राजेन्द्र चोलाचा कालवा

राजेंद्र चोल यानें चोलपुराजवळ एक सोळा मैल लांबीचा पक्क्या बांधणीचा कालवा बांधला. गझनीच्या सुलतान महंमुदाच्या पदरीं असलेला विद्वान् व तत्त्वज्ञानी अल्बिरुनी यानें त्यानंतर सुमारें १०० वर्षांनीं हा कालवा पाहिला. त्यानें त्याबद्दल तहकीक्-इ-हिंद या आपल्या ग्रंथांत पुढील उद्गार काढले आहेत—

........" या कालव्यासारखीं कामें पाहिलीं म्हणजे आमचे लोक आश्चर्यानें थक्क होतात. अशा (प्रचंड) कामांचें नुसतें वर्णन करा असें म्हटल्यास तेंही त्यांस येणार नाहीं, मग प्रत्यक्ष अशीं कामें करणें तर अशक्यच होय......"

भाग १३ वा

युरोपांतील अंधारयुगाचीं हजार वर्षें

(इ. स. ४७६ ते इ. स. १४५३)

१. पूर्व-पश्चिमेचा संयोग :—भारतांत उत्तरेस राजपुतांचा व दक्षिणेंत चालुक्य, राष्ट्रकूट, चोल, इत्यादि घराण्यांचा अंमल चालू असतां, व त्याबरोबरच शंकराचार्यांच्या प्रभावी नेतृत्वाखालीं अखिल भारतांत वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन होत असतां युरोप मध्यकालीन अंधारयुगांतून पुढें जात होतें; व पश्चिम आशियांत इस्लामधर्म उदयास येऊन त्या योगानें तेथील जनतेंत नवचैतन्य खेळूं लागलें होतें. भारतीय इतिहासाच्या अभ्यासकास या दोन्ही घडामोडींची माहिती असणें अवश्य आहे. कारण मध्ययुगांतून बाहेर पडलेल्या युरोपनें पंधराव्या शतकाच्या अखेरीस भारतास धडक मारली व तेव्हांपासून जो एकसारखा पूर्व-पश्चिमेचा संघर्ष सुरू झाला तो आज विसाव्या शतकांतही चालू असून नुकतीच कोठें पूर्व-पश्चिम सहकाराची—समान भूमिकेवरील सहकाराची—आशा करण्यास जागा असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तसेंच पश्चिम आशियांत उदयास आलेल्या इस्लामनें तेथील लोकांत जें नवचैतन्य उत्पन्न केलें त्याचा प्रभाव एके काळीं पश्चिमेस स्पेनपासून पूर्वेस चीनपर्यंत पृथ्वीच्या पूर्वगोलार्धाच्या मध्यभागास जाणवला. भारतांतही आठव्या शतकांत त्याचें आगमन झालें व त्यायोगें भारताच्या इतिहासास वेगळें वळण लागलें. यासाठीं युरोप व आशिया खंडांतील या दोन्ही समकालीन घडामोडींचें थोडक्यांत समालोचन करणें अवश्य आहे. प्रस्तुत भागांत युरोपांतील मध्ययुगाची हकीकत दिली असून इस्लामच्या उदयाची माहिती पुढें योग्य स्थळीं देण्यांत येईल.

२. युरोपचें अंधारयुग :—इसवी सनाच्या पांचव्या शतकांत गॉथ, व्हेंडॉल व हूण लोकांच्या रानटी टोळ्यांनीं रोमन साम्राज्याचा विध्वंस केला (पृ. ८९). तेव्हांपासूनच्या उण्या पुऱ्या हजार वर्षांच्या कालास युरोपच्या इतिहासास 'मध्ययुग' ही संज्ञा आहे. या काळास युरोपियन इतिहासकार अंधारयुग असेंही म्हणतात; याचें कारण असें कीं, युरोपांत सुधारलेलें रोमन साम्राज्य लयास जाऊन त्या जागीं संस्कृतीनें मागासलेल्या विविध टोळ्यांचा प्रादेशिक अंमल सुरू झाला. ज्यांना ग्रीक तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ यांनीं आपापल्या ज्ञानाच्या शाखांतून केलेली प्रगति समजण्याची देखील कुवत नाहीं असे लोक सत्ताधारी बनले. रोमकालीन विविध सामाजिक संस्था, व्यापक सामुदायिक जीवन, कायद्याचें अधिष्ठान व रोमन साम्राज्यांतून सूचित होणारी विश्वसाम्राज्याची कल्पना हीं सर्व धुळीस मिळालीं. मानवी प्रगतीचीं चक्रें जणूं उलटीं फिरूं लागलीं. जीवनांतील सुरक्षितपणा नाहींसा झाला, अस्वस्थता वाढली व या अस्वस्थतेच्या पोटीं भय उत्पन्न झालें.

३. सरंजामशाही :—अशा अस्वस्थतेच्या काळांत व्यक्तींचें जीवन स्थैर्याचा व सुरक्षितपणाचा शोध घेत असतां युरोपांत सरंजामशाहीचा उदय झाला. सरंजामशाही म्हणजे जमीनदारीवर आधारलेली समाजरचना होय. या समाजरचनेंत समाजांतील व्यक्तीव्यक्तींचा परस्परांशीं संबंध जमिनीच्या वांटपांतून निश्चित होतो. समाजांतील अगदीं खालच्या थरावर असलेले भूदास हे जमिनीचा मालक बदलल्याबरोबर आपल्या नव्या मालकासाठीं राबूं लागत. अशी समाजरचना निर्माण होण्याचें कारण उघड आहे. ज्यांना व्यक्तिशः रानटी लोकांच्या टोळधाडीपासून जीवन सुरक्षित वाटत नव्हतें, त्यांनीं कुणा सामर्थ्यवानास आपलें स्वातंत्र्य विकून सुरक्षिततेचा आश्रय केला व ते त्याच्या जमिनीवर काम करूं लागले. रानटी टोळ्यांचे नायकही आपल्या ताब्यांतील प्रदेश आपल्या प्रमुख सरदारांस वांटून देत. ते सरदार आपल्या ताब्यांतील प्रदेश आपल्या साहाय्यकांत विभागीत व ते साहाय्यकही आपल्या हाताखालच्या लोकां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबत तसेंच वर्तन करीत. अशा रीतीनें तळच्या थरापासून वरपर्यंत सर्व समाजरचना तयार झाली. प्रत्येक व्यक्तीनें आपलें पोट भरण्यासाठीं दिलेल्या जमिनीवर राबून शिवाय ठराविक दिवशीं आपल्या वरिष्ठाचेंही काम करावें. अंगांत कुवत असेल त्याप्रमाणें ढाल-तलवार घेऊन त्याच्या पलटणींत सामील व्हावें. घरीं आपल्या मुली-बाळींचीं लग्नकार्यें वरिष्ठांच्या सल्ल्यानें व त्यास मोठेपणा देऊन ठरवावीं व वरिष्ठांचे घरीं लग्नकार्य निघाल्यास त्यास ऐपतीप्रमाणें आहेर करावा. किंबहुना वरिष्ठाचा मुलगा एखाद्या दंगलींत कैद झाल्यास त्याला सोडवून आणण्यासाठीं वर्गणी करून खंडणी भरावी अशी ही समाजरचना होती. या समाजरचनेंत कांहीं जमीनदार निर्दय व स्वार्थी असतील, पण कित्येक निःसंशय आपल्या हाताखालच्या कुळास कुटुंबाप्रमाणें वागवीत व आपल्या घरीं कांहीं गोडधोड झालें तर त्यांत आपल्या कुळाचा वांटा काढून ठेवण्यास चुकत नसत. सारांश, जमीनदार हा नुसता जमिनीचा मालक नसे; तर त्या टापूंत तेवढ्यापुरता तो कुटुंबप्रमुख बने. तत्कालीन सरदार दुर्बलांचें रक्षण करणें व अनाथ स्त्रीस संकटांतून सोडविणें हें आपलें कर्तव्य मानीत व प्रसंगीं त्यासाठीं जीव धोक्यांत घालण्यास कचरत नसत.

४. **भारतीय समाजरचना** :—केवळ युरोपांतच काय, पण जगाच्या इतिहासांत जेथें जेथें जुनीं साम्राज्यें धुळीस मिळालीं तेथें तेथें अशी सरंजामशाही समाजरचना उत्पन्न झाली असें कित्येकांचें म्हणणें आहे. भारतही या नियमास अपवाद नाहीं. हर्षाचें साम्राज्य मोडकळीस आल्यावर भारतांत जीं अनेक छोटीं राज्यें उत्पन्न झालीं त्यांचें वळण सरंजामशाहीसारखेंच होतें. विशेषतः राजपुतांतील मानीपणा, डौल व आपसांतील सदासर्वकाळ चालणारीं युद्धें वाचणारांस युरोपांतील सरंजामशाहीची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. पण युरोपांतील सरंजामशाही व भारतीय समाजरचना यांतील साम्यविरोध हा खरोखर अधिक सूक्ष्म अभ्यासाचा प्रश्न आहे. भारतांतील जहागीरदारी व युरोपांतील सरंजामशाही यांत जसें साम्य तसा फरकही आहे. खरें म्हटलें तर युरोपांतील सरंजामशाहीचा वरपासून खालपर्यंतचा राखीव घडीबंदपणा भारतांतील जहागीरदार पद्धतींत आढळत नाहीं. खेरीज, साम्राज्याची उभारणी व विध्वंस यांचा चक्रनेमिक्रम भारताच्या इतिहासांत अनेकवार दिसून येतो हें मौर्य, आंध्र, गुप्त व हर्ष यांच्या साम्राज्यांच्या उदयास्तांवरून आपल्या निदर्शनास येतें. युरोपच्या इतिहासांत रोमन साम्राज्याच्या पूर्वीं व नंतर असा कांहीं प्रकार दिसत नाहीं. हर्षोत्तर कालांत साम्राज्याचीं शकलें झालीं म्हणून सरंजामशाहीचा उदय झाला असें म्हणावयाचें तर, मौर्योत्तर व गुप्तोत्तर कालींही असाच सरंजामशाहीचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदय झाला किंवा नाहीं या प्रश्नाचें निश्चित उत्तर देतां आलें पाहिजे. सारांश, वरवरच्या साम्यदर्शनानें अनुकूल वा प्रतिकूल सिद्धान्त बांधण्याची घाई करण्याचें कारण नाहीं. मात्र युरोपीय सरंजामशाही समाजरचनेंतील कुटुंबवत्सलता भारतांतील जहागीरदारींत व वतनदारींतही निःसंशय दिसून येते यांत संशय नाहीं.

५. प्रभावी धर्मसंघटना :—धर्मसंघटनेचें वर्चस्व हें मध्ययुगीन युरोपियन समाजरचनेचें दुसरें लक्षण होय. रोमन सम्राट् कॉन्स्टंटाईन यानें इसवी सनाच्या चौथ्या शतकांत ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. रोमन साम्राज्याचा विध्वंस करणारे रानटी लोकही हलके हलके त्याच धर्माचे अनुयायी बनले व पुढील काळांत युरोपांत एवढी प्रबल ख्रिस्ती धर्मसंघटना उदयास आली कीं, तिच्या प्रभावापुढें मध्ययुगीन राजे चळचळां कांपत असत. रोमचा धर्मगुरु हा त्या संघटनेचा मुख्य होय. निरनिराळ्या देशांतील आर्चबिशप, बिशप इत्यादि लहानमोठे धर्मगुरु त्याच्या सल्ल्यानें नेमले जात. पोपचा हुकूम ही एक धर्माज्ञा असल्यामुळें तिला सर्वत्र मोठा मान मिळत असे. युरोपच्या चारी कोपऱ्यांतील देशांतून रोमच्या पोपकडे देणग्या-दक्षिणेच्या रूपानें पैशाचा ओघ वाहूं लागला. या बिशप आर्चबिशपांची नेमणूक हा नुसता वशिलेबाजीचा प्रकार नव्हता. युरोपांत ठिकठिकाणीं मठ स्थापन होऊन तेथें भावी धर्मगुरूंना धर्माचें, साध्या राहणीचें व सामुदायिक जीवनाचें शिक्षण मिळे व अशा मठांतून तयार झालेले लोक ठिकठिकाणीं धर्मगुरु नेमले जात. रोमन साम्राज्याच्या अधःपातानंतर विद्येची अवनति चालूच राहिली. अशा वेळीं या शिकल्यासवरलेल्या धर्मगुरूंना समाजांत मोठें वर्चस्व प्राप्त झालें. ख्रिस्ती धर्मांत मरणोत्तर जीवनाची कल्पना महत्त्वाची असे. या जीवनाचें ज्ञान फक्त धर्मगुरूंसच असे. यामुळें मोक्षदात्या धर्मगुरूचें त्या काळीं समाजावर असाधारण वर्चस्व असल्यास नवल तें कोणतें ?

६. धर्मसत्ता व राज्यसत्ता यांचा संघर्ष :—कालांतरानें या धर्मगुरूंनीं आपली साधी राहणी सोडून ते चैन करूं लागले. भाविक ख्रिश्चन लोकांनीं धर्मादाय म्हणून दिलेला पैसा रोमच्या पोपचा भव्य प्रासाद बांधण्यासाठीं खर्ची पडूं लागला. इंग्लंड, फरान्स इत्यादि देशांच्या राजकीय सत्ताधीशांस आपल्या राज्यांतून सुवर्णनदीचा ओघ एकसारखा रोमकडे वहातो हें बरें वाटेना. पोप व बिशप यांच्या विलासमग्नतेमुळें भाविकांच्या मनावरील त्यांची पूर्वीची पकड ढिली झाली. अखेरीस हें भांडण निकरास येऊन राजसत्तेनें धर्मसत्ता झुगारून देण्याचें ठरविलें. फरान्सच्या राजानें तर कांहीं काल रोमच्या पोपचें वर्चस्व अजिबात नाकारून आपण दुसऱ्याच एका पोपची स्थापना केली !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. **धर्मयुद्धांस सुरुवात** :—पोप व त्याचे अनुयायी यांनीं या हल्ल्यांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं लोकांचें लक्ष दुसऱ्याच एका प्रश्नाकडे वळविलें. त्या काळीं पश्चिम आशियांत इस्लामचा उदय होऊन महंमदी धर्मीयांनीं पॅलेस्टाईनमधील ख्रिस्ती लोकांचें पवित्र ठिकाण जरुशलेम आपल्या ताब्यांत घेतलें होतें. हें धर्मक्षेत्र परत मिळविण्यासाठीं सर्व ख्रिस्ती लोकांनीं एक होऊन तेथील इस्लामधर्मीयांवर स्वाऱ्या केल्या पाहिजेत अशी तत्कालीन ख्रिस्ती धर्मगुरूंनीं हाक दिली. या धर्मयुद्धांत जे सामील होतील त्यांचीं पापें नष्ट होतील व त्यांना मुक्तता मिळेल असें धर्मगुरूंनीं सांगितलें. याचा बराच परिणाम होऊन युरोपमध्यें धर्मयुद्धार्थ मोठें चैतन्य निर्माण झालें. इसवी सनाच्या दहाव्या, अकराव्या व बाराव्या शतकांत युरोपांतील ठिकठिकाणचे अनेक राजे आपसांतील मतभेद विसरून समरभूमीवर एकत्र झाले. त्यांना सामान्य अनुयायीही मिळाले व त्यांनीं जरुशलेमच्या प्राप्त्यर्थ पॅलेस्टाईनवर अनेक स्वाऱ्या केल्या. ख्रिस्त्यांचा क्रूस व इस्लामचा चांद यांची ही लढत तीन शतकें चालून अखेर ख्रिस्त्यांस त्यांत म्हणण्यासारखें यश मिळालें नाहीं; कारण धर्मयुद्धासाठीं एकत्र जमणारे लोक कित्येकदां आपसांतच भांडत! इतकेंच नव्हे तर कित्येकदां आपल्या प्रतिपक्षास नामोहरम करण्यासाठीं इस्लामधर्मीयांचेंच साहच घेत! शेवटीं बाराव्या शतकाचे अखेरीस कांहीं एक निकाल न लागतां या धर्मयुद्धांचा शेवट झाला.

८. **सरंजामशाहीस धक्का** :—पण या धर्मयुद्धांचे युरोपच्या जीवनावर महत्त्वाचे परिणाम झाले. धर्माकरितां लढण्यास उद्युक्त झालेल्या अनेक सरंजामदारांनीं आपल्या इस्टेटी विकल्या. कोणी त्यांत इतके कर्जबाजारी झाले कीं त्यांतून ते कधींच बाहेर निघाले नाहींत. सरंजामदाराच्या छत्राखालीं भूदास म्हणून गुलामाप्रमाणें राबणाऱ्या लोकांस आपल्या जीवनाचा कंटाळा येऊन तेहि धर्मयुद्धांत सामील झाले. कित्येकजण आपल्या धन्यास सोडून पळून जाऊन शहरांतून जीवनासाठीं नवे उद्योगधंदे करूं लागले. या सर्व कारणांनीं मध्ययुगांत उदयास आलेली सरंजामशाही मोडकळीस आली.

९. **तिमिरयुगाचा शेवट** :—याखेरीज या धर्मयुद्धांचा आणखीही एक महत्त्वाचा परिणाम झाला. या काळांत जरुशलेमवर झालेल्या स्वाऱ्यांच्या निमित्तानें युरोपियन लोक युरोप-आशियाच्या सीमेवर येऊन ठेपले. पूर्व-पश्चिमेचा संयोग झाला. स्वाऱ्यांबरोबर अनेक व्यापारी व यात्रेकरू जरुशलेमला जात. त्या काळीं अरबी लोकांचा हिंदुस्थानशीं व्यापार चालू असे. युरोपांतील इटली देशांतील व्हेनिस व जिनोव्हा येथील लोक व्यापारांत अग्रेसर होते. त्यांची व अरब लोकांची पॅलेस्टाइनच्या सीमारेषेवर गांठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पडली. परस्परांची देवघेव व दळणवळण सुरू झालें; व अशा रीतीनें एक-मेकांत धार्मिक मतभेद व भांडणें चालू असतांनाच परस्परांतील व्यापार व्यवहारांची वृद्धि झाली. पूर्वेकडे नवा मुलूख पाहून आलेल्या युरोपियन व्यापारी लोकांना नवी दृष्टि प्राप्त झाली. ग्रीस व अॅलेक्झांड्रिया येथील अनेक विद्वान् लोक चांद-क्रूसाच्या संघर्षास व प्राणघातक लढायांस कंटाळून पश्चिमेस युरोपांत स्वस्थतेनें राहण्यासाठीं जागा शोध लागले. अर्थातच त्यांच्याबरोबर त्यांच्या विद्येचा व शास्त्रांचाहि पश्चिम युरोपांत सर्वत्र प्रसार झाला. यायोगें पूर्वीचें तिमिर-युग मावळून हलके हलके तेथें ज्ञानाचा व स्वतंत्र बुद्धीचा प्रकाश पडूं लागला. इसवी सनाच्या तेराव्या चौदाव्या शतकांत युरोपांत प्रथमच बुद्धिवाद प्रतिपादन करणारांत रॉजर बेकन व इरॅसमस हीं नांवें प्रमुख आहेत. परंतु त्या सर्वांहून पंधराव्या शतकाचे अखेरी अखेरीस जन्मास आलेल्या मार्टिन ल्यूथरनें (इ. स. १४८३–१५४६) जुन्या धर्मकल्पनांस व परंपरागत समजुतींस एवढा जबरदस्त धक्का दिला कीं, तेणेंकरून पोपचें अप्रतिहत धर्मगुरुत्व कोलमडून पडलें व युरोपांत नव्या युगाचा अवतार झाला.

प्रभावी धर्मसुधारक मार्टिन ल्यूथर

१०. नव्या जगाचा शोध :—इ. स. १४५३ सालीं इस्लामधर्मीय तुर्क लोकांनीं आक्रमक धोरणाचा स्वीकार करून कॉन्स्टॅन्टिनोपल शहर काबीज केलें व नजीकच्या मुलुखावर आपलें राजकीय व धार्मिक वर्चस्व स्थापन केलें. इतकेंच नव्हे तर व्हेनिस व जिनोआ येथील व्यापारी भूमध्य समुद्रांतून अरब लोकांशीं व त्यांच्या मध्यस्थीनें हिंदुस्थानशीं जो व्यापार करीत त्यांतहि त्यांनीं आपल्या वर्चस्वामुळें विघ्न उत्पन्न केलें. या सर्वांचा असा परिणाम झाला कीं ग्रीस, अलेक्झांड्रिया भागांतील बहुतेक विद्वानांनीं आपल्या घराचा त्याग करून ते पश्चिम युरोपांत गेले व त्यांनीं आपल्या ज्ञानानें युरोपांतील नवयुगाच्या उदयास मदत केली. याखेरीज हिंदुस्थानशीं व्यापार करण्याची धडपड करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं भूमध्य समद्रमार्गें व्यापाराचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मार्ग बंद झाला हें पाहून पश्चिमेस व दक्षिणेस अटलांटिक महासागरांतून हिंदुस्थानचा शोध घेण्यास सुरुवात केली. या धाडशी उद्योगांत ज्यांनीं पुढाकार घेतला त्यांच्यापैकीं कोलंबसास थेट पश्चिमेकडे जात असतां अमेरिका खंडाचा शोध लागला (इ. स. १४९२); व वास्को-दि-गामा हा पोर्तुगीज खलाशी आफ्रिकेच्या दक्षिण टोंकास वळसा घालून पूर्वेकडे येत असतां अखेरीस इ. स. १४९८ त कालिकत बंदरांत येऊन दाखल झाला. फार प्राचीन काळीं युरोप व भारत यांचे एकमेकांशीं तुरळक साक्षात् संबंध आले असतील हें खरें; परंतु वास्को-दि-गामाचें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांत झालेलें आगमन हा अर्वाचीन काळांतील पूर्व-पश्चिमेचा पहिला साक्षात् संबंध होय.

अमेरिकेचा शोध लावणारा कोलंबस

११. अर्वाचीन युगाचा उदय :—युरोपांत बुद्धिवादाचा उदय, मार्टिन ल्यूथरची अंध-धर्मसत्तेविरुद्ध घोषणा, अमेरिका खंडाचा शोध, वास्को-दि-गामाचें समुद्रमार्गे हिंदुस्थानांत झालेलें आगमन व त्याच्या पाठोपाठ युरोपांतील दर्यावर्दी लोकांनीं व्यापारांत मिळविलेलें वर्चस्व या सर्व कारणांनीं युरोपांतील मध्ययुगाचा—अंधार युगाचा—शेवट झाला. सरंजामदार मागें पडले, व्यापारी पुढें आले, भोळी धर्मसत्ता कोलमडून पडली व शास्त्र-युगाचा अवतार झाला. या काळांत भूमध्य समुद्राच्या आंवतींभोंवतीं जी मानवी जीवनाची तलख हालचाल पूर्वीपासून चालू होती. ती मागें पडून अटलांटिक महासागराच्या सीमेवरील स्पेन, पोर्तुगाल, इंग्लंड, फ्रान्ससारखीं राष्ट्रें व्यापार-वसाहतींच्या चढाओढींत एकमेकांशीं स्पर्धा करण्यास पुढें आलीं. हा सर्व अर्वाचीन काळचा भाग असल्यामुळें त्याची हकीकत पुढें योग्य ठिकाणीं दिली जाईल.

१२. युरोप व भारत : तुलनात्मक समालोचन :—युरोपांतील मध्ययुगाची ही त्रोटक हकीकत वाचणारांस भारत व युरोप येथील घडामोडींतील फरक लक्षांत येईल. भारतांतील धर्मसत्ता व राजसत्ता यांच्यांत युरोपांतल्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



कोलंबस व वास्को-दि-गामाचे मार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कधींच संघर्ष झाला नाहीं. शंकराचार्यांनीं व त्यांच्यानंतरच्या अनुयायांनीं ऐहिक वैभवाची तमा बाळगली नाहीं. त्याचप्रमाणें युरोपांतल्या ख्रिस्ती अनुयायां-प्रमाणें धर्मगुरूंची प्रभावी संघटनाही केली नाहीं. नुसतीं पीठें स्थापन केलीं. भारतांत ऐहिक व पारलौकिक जीवनाचे प्रवाह समांतर व एकमेकांशीं संघर्ष न होतां वाहात राहिले; तर युरोपांत राजकीय व धार्मिक संघटनांत संघर्ष उत्पन्न झाला. इस्लामचे अनुयायी युरोपांत ख्रिस्ती लोकांशीं व भारतांत हिंदूंशीं लढले; परंतु युरोपांत धर्मयुद्धाचा सामाजिक जीवनावर परिणाम होऊन सरंजामशाही खिळखिळी झाली तसें भारतांत झालें नाहीं. जेथें इस्लामचें वर्चस्व स्थापन झालें तेथें इस्लामी किंवा हिंदु-मुसलमान मिश्र अशी इस्लाम पूर्व-कालीन समाजरचना चालूच राहिली. इस्लामच्या आगमनानें या समाजरचनेस धक्का पोहोंचला नाहीं, शास्त्रयुग अवतरलें नाहीं व व्यापारास म्हणण्यासारखी संधि मिळाली नाहीं. उलट इस्लामच्या स्वाऱ्यांमुळें भारतीयांचें आपल्या धर्मावरील प्रेम अधिकच कसास लागलें व त्याच्या आधारानें या देशांत जें भक्तिमार्गी समतावादी चैतन्य वाढीस लागलें, त्यामुळें भारताच्या इतिहासास वेगळेंच वळण लागलें. ते कांहींही असो, युरोपप्रमाणें या देशांत बुद्धिवादाचा व व्यापारी वर्चस्वाचा उदय झाला नाहीं येवढें मात्र खरें !

प्रश्न

१. सरंजामशाही म्हणजे काय? २. भारतांत युरोपप्रमाणें सरंजामशाही उत्पन्न झाली असें म्हणतां येईल काय? ३. ख्रिश्चन धर्मसंघटना व शंकराचार्यांची धर्मसंघटना यांतील साम्यविरोध सांगा. ४. मध्ययुगास 'अंधारयुग' कां म्हणतात?

अभ्यास

कोलंबस, वास्को–दि–गामा इत्यादींचे जलपर्यटनाचे मार्ग नकाशा-वर पहा.

माहितीसाठीं

सरंजामी पद्धतीचा उगम

मध्ययुगीन सरंजामशाही पद्धतीच्या समाजरचनेंत सामान्य लोक, शेत-करी व कारागीर वर्ग जुलूम जबरदस्तीपासून स्वतःचा बचाव करून घेण्यासाठीं एखाद्या प्रबळ सरदाराच्या पदरीं लष्करी नोकरी पतकरीत व आपल्या मिळकतींतील कांहीं अंश त्यास देण्यासाठीं राखून ठेवीत. याच्या मोबदल्यांत प्रबळ सरदार त्यांच्या संरक्षणाची हमी घेत. स्वतःचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वतःच्या आश्रितांचें व जमीनजुमल्याचें रक्षण व्हावें म्हणून एखाद्या किल्ल्याचा आश्रय घेऊन त्याची तटबंदी करीत व आश्रितांस चांगलें



युरोपांतील मध्ययुगीन किल्ला

(याचें भारतांतील किल्ल्याशीं असलेलें साम्य तेव्हांच लक्षांत येतें.)

लष्करी शिक्षण देत. एवढयानेंही पुरेशी शाश्वती न वाटल्यास ते आपल्या या सर्व लवाजम्यासह आपणाहून आणखी प्रबळ अशा सरदाराचा किंवा खुद्द राजाचाच अशा सारख्या अटींवर आश्रय घेत. जगभर बहुतेक ठिकाणीं सरंजामशाही पद्धति अशा पद्धतीनें उदयास आली व आज मोडकळीस आलेले बहुतेक किल्ले अशा संकटाच्या प्रसंगीं बांधले गेले. अलीकडल्या काळांत वसाहत झालेले अमेरिका, ऑस्ट्रिया यांसारखे देश सोडल्यास बाकी इतर सर्वत्र प्रबळ साम्राज्य मोडकळीस आल्यावर निर्माण झालेल्या अस्वस्थतेच्या काळांत सरंजामशाहीचा प्रकार कमी अधिक प्रमाणांत प्रादुर्भूत झालेला दृष्टीस पडतो.

—पीअर्सकृत 'फुटप्रिंटस ऑन दि सँडस ऑफ टाईम'
(वालुकामय कालपथावरील मानवी पाऊलें.) पृ. १०८–१०९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १४ वा

भारताचा बाह्य जगांतील विस्तार

(इ. स. पू. तिसरें शतक ते इ. स. चें चौदावें शतक)

१. **विशाल भारत** :—बाराव्या भागांत राजेन्द्र चोलानें समुद्रमार्गानें स्वारी करून सुमात्रा बेटावर आपलें वर्चस्व स्थापन केल्याचा उल्लेख आला आहे. परंतु परवां परवांपर्यंत सर्वसामान्य समजूत अशी होती कीं, हिंदुधर्मांत परदेशगमन व समुद्रपर्यटन या गोष्टी निषिद्ध असल्यानें या देशांतील लोकांनीं बाहेर जाऊन कांहीं सांस्कृतिक व राजकीय दिग्विजय संपादन केलेले नसावेत. समुद्रगमन हें खरोखर धर्माज्ञेविरुद्ध असो वा नसो, एकोणिसाव्या शतकांत लोकांची तशी समजूत होती हें मात्र खरें आहे. परंतु प्राचीन काळापासून म्हणजे इसवी सनाच्या पूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून ते इसवी सनाच्या चौदाव्या शतकापर्यंत उत्तरेस खोतानच्या प्रदेशापासून ते आग्नेयेस जावासुमात्रा-पर्यंत खुष्कीच्या व जलमार्गांनीं भारताचा बाह्य जगाशीं राजकीय, व्यापारी व सांस्कृतिक संबंध होता, यासंबंधींचे निर्विवाद पुरावे सांपडले आहेत. जावानजीकच्या बाली बेटांत तर भारतीय संस्कृति आजही तग धरून आहे. भारतीयांचा बाह्य जगाशीं कशा प्रकारचा संबंध होता हें जाणण्याकडे विद्वा-नांचें अलीकडेच लक्ष लागलें आहे. जसजसें संशोधन होत जाईल तसतसा या विषयावर अधिक प्रकाश पडेल. भारताच्या सीमेपलीकडील भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचें वर्णन करितांना 'विशाल भारत' हा सुंदर शब्द हिंदी लेखक वापरतात. तो अर्थवाहक व समर्पक असल्यानें आपणही त्याचा उप-योग करण्यास हरकत नाहीं.

२. **भारत-युरोप संबंध** :—फार प्राचीन काळापासून भारत व युरोप यांच्यांत इराणचें आखात व तांबडा समुद्र या मार्गांनीं व्यापार व्यवहार होत असे. भारतांतील मलमलीस रोमन साम्राज्यांत फार जोराची मागणी होती. या मागणीमुळें रोमच्या संपत्तीचा ओघ भारताकडे वाहूं लागला याबद्दल प्लीनी या रोमन इतिहासकारानें चिंता व्यक्त केली आहे. अलीकडे झालेल्या संशोधनांत कांहीं तत्कालीन रोमन नाणीं उपलब्ध झालीं आहेत, त्यावरून या विधानास दुजोरा मिळतो. रोमन साम्राज्यापूर्वींही ग्रीक लोकांना डाक्का येथील मलमल गँजेटिका या नांवानें माहीत होती. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत इजिप्तमध्यें राहाणारा एक ग्रीक खलाशी तांबडा समुद्र, अरबी समुद्र या मार्गानें भारतांत आला. त्याचें प्रवासवृत्त 'पेरिप्लुस' या नांवानें प्रसिद्ध आहे, त्यावरूनही तत्कालीन भारताची बरीच माहिती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपलब्ध होते. इसवी सनापूर्वीच्या पहिल्या शतकांत पांड्य राजांनीं रोमन सम्राट् ऑगस्टस याजकडे आपला वकील पाठविला होता. पुढें इसवी सनाच्या चौथ्या शतकांत हिंदी वकिलाती रोमन सम्राट् कॉन्स्टंटाईन याच्या दरबारीं पाठविल्या असल्याचा पुरावा सांपडतो. तसेंच या शतकांत युफ्रेटिस नदीचे कांठीं हिंदूंचीं बरीच देवालयें होतीं, तीं ख्रिस्ती धर्मगुरु सेंट ग्रेगरी यानें इ. स. ३०४ मध्यें उध्वस्त केलीं अशी माहिती मिळते.

३. उत्तर प्रदेशांतील विस्तार :—भारताच्या उत्तरेस अशोकाचा मुलगा कुणाल यानें चीनच्या पश्चिमेकडील कोपऱ्यांत खोतान येथें इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकांत आपली एक वसाहत स्थापन केल्याचें नमूद आहे. यानंतरच्या काळांत इसवी सनाचे प्रारंभीं काश्गर, खोतान, शानशान या भागांत बौद्ध धर्माचा झपाट्यानें प्रसार झाला. त्या वेळीं तेथें ब्राह्मी व खरोष्ठी लिपींत लेखन होत असे. उच्च अध्ययनासाठीं या ठिकाणीं संस्कृत भाषेचा उपयोग केला जात असे असें फाहिएननें म्हटलें आहे. या भागांत ठिकठिकाणीं बुद्धाचे मठ असून तेथें भारतांतून व विशेषत: काश्मीरांतून पंडित बोलावले जात. खोतान भागांतील गोमती-विहार हें एके काळीं बौद्ध ग्रंथांच्या अध्ययनाचें मोठें प्रसिद्ध केन्द्र होतें. हिंदी वैद्यक ग्रंथांचीं तिकडील भाषांतून झालेलीं भाषांतरेंही अलीकडे उपलब्ध होत आहेत. फाहिएन म्हणतो कीं गोमती विहार येथें ३००० बौद्ध भिक्षु होते. तेथील मठांतील लोकांचें जीवन व रथजत्रेसारखे उत्सवप्रसंग यांचीं वर्णनें फाहिएनच्या लेखनांतून वाचावयास सांपडतात. खोतानच्या उत्तरेस कुची भागांत बुद्धाचे स्तूप सांपडतात. तेथील राजांचीं नांवें सुवर्णपुष्प, हरिपुष्प अशीं संस्कृतप्रचुर होतीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यापुढील काळांत बौद्धधर्माचा सर्व चीनभर प्रसार झाला. तिबेट हें तर पूर्वीपासूनच बौद्धधर्माचें केन्द्र होतें. तिबेटी भिक्षु नालंदा येथें बौद्ध धर्मग्रंथाच्या अध्ययनासाठीं येत. तत्कालीन शेंकडो संस्कृत ग्रंथांचीं तिबेटी भाषेंत भाषांतरें झालेलीं आहेत.

४. पूर्वेकडील चंपाचें राज्य :—भारताच्या वायव्येस तांबड्या समुद्रापासून ईशान्येस चीनपर्यंतच्या प्रदेशांतील विशाल भारताच्या खाणाखुणांचें येथवर त्रोटक वर्णन झालें. भारताच्या पूर्वेस व आग्नेयेस मलाया, कांबोडिया व जावा-सुमात्रा या भागांत भारतीयांनीं नुसता संस्कृतीचा प्रसारच नव्हे तर आपला राजकीय अंमलही प्रस्थापित केला. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत अलेक्झांड्रिया येथें राहणाऱ्या टॉलेमी नांवाच्या अभ्यासकानें तत्कालीन जगाचें भौगोलिक ज्ञान मिळविलें व जगाचा नकाशा काढण्याचा प्रयत्न केला. त्यानें जावा बेटांतील प्रसिद्ध व्यापारी केन्द्रांचीं जीं नांवें दिलेलीं आहेत तीं संस्कृत वळणाचीं आहेत. जावा हें पूर्वीं 'यवद्वीप' या नांवानें प्रसिद्ध होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याखेरीज जातक या बौद्ध धर्मग्रंथांत 'माझी संपत्ति शिल्लक आहे तोंपर्यंत मी एक जहाज घेऊन सुवर्ण देशास जाऊन तेथून धन आणीन' असें वाक्य आहे. त्यांतील सुवर्णदेश म्हणजे सुमात्रा बेट असावे असा विद्वानांचा तर्क आहे. या व अशासारख्या इतस्ततः विखुरलेल्या उल्लेखावरून पूर्वेकडील बेटांशीं फार प्राचीन काळापासून भारताचा व्यापारी संबंध होता हें निर्विवाद आहे. सयामच्या पलीकडे आज इंडोचायना या नांवानें प्रसिद्ध असलेल्या भागांत चंपा व कंबुज किंवा कंबुद्वीप (हल्लींचें कांबोडिया) अशा भारतीयांच्या दोन वसाहती होत्या. चंपा येथील अकराव्या शतकांतील राजांचीं नांवें जय-परमेश्वर, महादेव, ईश्वरमूर्ति, रुद्रवर्मन्, हरिहरवर्मन्, इंद्रवर्मन् अशीं भारतीय व संस्कृत वळणाचीं आहेत. इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत हें राज्य मंगोलांच्या टोळधाडीस बळी पडलें.

५. **कौंडिण्याचा पराक्रम** :—कंबुज येथें इसवी सनाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत, सोमा नांवाची नागकन्या राज्य करीत होती. तिजवर कौंडिण्यानें जलमार्गानें स्वारी करून तो प्रदेश जिंकून घेतला व तिला आपली पट्टराणी केलें. तेव्हांपासून तेथें संस्कृतीचा प्रसार झाला व लोक वस्त्र-प्रावरणें वापरून राहूं लागले असा उल्लेख आहे. हा कौंडिण्य वर्णानें ब्राह्मण होता. पण त्यानें कंबुजवर स्वारी केली ती भारतांतून केली कीं काय ? असा प्रश्न श्री. पणिक्कर यांनीं आपल्या 'ए सर्व्हे ऑफ इंडियन हिस्ट्री' या पुस्तकांत उपस्थित केला असून त्याचें निश्चित उत्तर दिलेलें नाहीं. पण तिसऱ्या शतकांत एक चिनी वकील कंबुजला गेला होता, त्याच्या म्हणण्याप्रमाणें कौंडिण्य हा मलायांतून तिकडे स्वारीवर गेला असावा. तें साधार मानल्यास मलायांतील हिंदु संस्कृतीच्या प्रसाराचें प्राचीनत्व सहज लक्षांत येतें. असो. कंबुजला चिनी लोक फूनान असें म्हणतात. सहाव्या शतकांत हा देश अत्यंत भरभराटीस पोहोंचला होता. जयवर्मन्, यशोवर्मन्, सूर्यवर्मन् अशीं तत्कालीन तेथील प्रसिद्ध राजांचीं नांवें नमूद आहेत. प्राचीन संस्कृत कोरीव लेखांच्या संशोधनानें या राजांची अधिकाधिक माहिती उपलब्ध होत आहे. कंबुज देशांत अङ्गकोरवट नांवाचें शिवाचें एक प्रचंड देवालय आहे. या मंदिरास एकावर एक गच्चीचे मजले असून दर मजल्यावर बांधकामाभोंवतीं सुशोभित गॅलरी आहे. असे एकावर एक तीन मजले असून, त्यावर जिन्यानें चढून गेले म्हणजे मनुष्य मुख्य मंदिरासमोर येऊन पोहोंचतो. या मंदिराची उंची जमिनीपासून २१३ फूट आहे व मंदिराच्या भोंवतालचा तट दोनतृतीयांश मैल लांब व अर्धा मैल रुंद एवढा आहे. यशोधरपुर ही कंबुजची राजधानी यशोवर्म्यानें स्थापन केली व तेथें त्यानें अशाच भव्य इमारती व तलाव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बांधले. यशोधरपुर याच्या सर्वांगीण भव्यतेवरून तत्कालीन मोठमोठ्या शहरांत त्याची गणना होत असली पाहिजे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

६. **मलायांतील शैलेन्द्रांचा अंमल** :—मलाया द्वीपकल्पांत शैलेन्द्र घराण्याचें राज्य इसवी संनाच्या आठव्या शतकांत स्थापन झालें. जावा, सुमात्रा, बाली-बोर्निओ येथपर्यंत या घराण्याचा अंमल पसरलेला होता. त्या काळीं तेथें व्यापाराच्या निमित्तानें येऊन गेलेल्या अरबांनीं तेथील वैभवाचें वर्णन केलें आहे. राजास 'महाराज' या पदवीनें संबोधीत. हा महाराज तेथील तलावांत रोज एक सोन्याची वीट टाकीत होता अशी दंतकथा प्रचलित आहे. तीवरून तेथें सुवर्णाची रेलचेल असली पाहिजे एवढा तर्क वहातो. शैलेन्द्र राजे महायान पंथी होते. कुमारघोष हा बौद्ध भिक्षु शैलेन्द्राचा गुरु होता. जावा बेटांतील बोरोबुदूर येथील स्तूप शैलेन्द्रांनीं बांधला. या इमारतींत एकावर एक नऊ गच्च्या असून शेवटच्या मजल्यावर घंटेच्या आकाराचा स्तूप आहे. एकएका मजल्यावर असलेल्या भोंवतालच्या गॅलऱ्यांतून भिंतीवर बौद्ध भिक्षूंच्या जीवनांतील विविध प्रसंग कोरलेले आहेत. या सर्व बांधकामाचा भव्यपणा व तपशीलाचा सूक्ष्मपणा सहज मनांत भरण्यासारखा आहे. यामुळेंच बोरोबुदूर येथील शोभिवंत शिल्पकला ही जगांतील आठवें आश्चर्य म्हणून समजलें जातें. या शिल्पकलेचें वळण निश्चितपणें भारतीय असलें तरी हीं मंदिरें खुद्द भारतांतील शिल्पकलेसही मागें टाकतील असें डॉ. मुजुमदार यांचें म्हणणें आहे.

शैलेन्द्रांनीं अकराव्या शतकापर्यंत मलायांत राज्य केलें. पुढें त्यांच्यावर बाराव्या भागांत सांगितल्याप्रमाणें राजेंद्र चोलानें आरमारी स्वारी केली व तेथें आपला अंमल बसविला. परंतु सुमारें एक शतकानंतर शैलेन्द्र फिरून स्वतंत्र झाले. अखेरीस तेराव्या शतकांत त्यांचें राज्य मोडकळीस आलें.

७. **जावा बेटावरील भारतीयांचें वर्चस्व** :—शैलेन्द्रांचा अस्त होत असतां जावा बेटांत आणखी एक राजघराणें उदयास येत होतें. शैलेन्द्रांचा जावा बेटावरील अंमल इसवी सनाच्या नवव्या शतकापर्यंत होता. पुढें जावा स्वतंत्र झालें. इसवी सनाच्या तेराव्या शतकांत विजय राजानें तेथें आपला अंमल बसवून मजपहित येथें आपली राजधानी स्थापिली. पुढील शतकांत मजपहित राज्याची बरीच वाढ होऊन त्यांचा अंमल बहुतेक मलाया द्वीपकल्पावर पसरला. सोळाव्या शतकांत तेथें इस्लामचें वर्चस्व झालें तेव्हां तेथील राजघराणें तेथून बाली बेटाच्या आश्रयास गेलें व तेथें त्यांनीं आपल्या संस्कृतीचें रक्षण केलें. आजमितीस बाली बेटाखेरीज मलायांत इतर सर्वत्र इस्लामी संस्कृतीचें वर्चस्व आहे. तरीपण आजमितीसही जावा बेटांत हिंदु संस्कृतीचे अवशेष पहावयास सांपडतील. शेकडों हिंदु देवालयें भग्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थितींत असलेलीं तेथें आढळून येतील. रामायण व महाभारत या महाकाव्यांतील प्रसंगाची छाप तेथील साहित्यावर पडलेली दिसून येते. लोक धर्मानें मुसलमान असले, तरी त्यांचीं नांवें अजूनही हिंदु वळणाचीं आहेत.

८. **विशाल भारताचें समालोचन :**—भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचें वर दिलेलें त्रोटक वर्णन वाचून जिज्ञासा अतृप्त राहते. पश्चिमेस युफ्रेटिस नदीच्या कांठीं एके काळीं हिंदु देवालयें होतीं. उत्तरेस काश्गर, खोतान येथें बौद्ध संस्कृतीचा प्रसार होता. तिबेटाचा नालंदाशीं घनिष्ठ संबंध होता. पूर्वेस इंडोचायनांतील चंपा व कंबुज येथील राज्यें, मलाया द्वीपकल्पांतील शैलेन्द्रांचें राज्य व जावा सुमात्रा येथील विजयाचा अंमल या सर्वांवर भारतीय संस्कृतीची छाप होती. इसवी सनाच्या प्रारंभापासून तहत अकराव्या बाराव्या शतकापर्यंत हजार बाराशें वर्षांच्या काळांतील विशाल भारताची ही हकीकत स्फूर्तिदायक आहे. उगवत्या सूर्याचे किरण अर्धवर्तुलाकार पसरलेले असतात असें चित्र काढतात, त्याप्रमाणें भारतांतील मगध प्रदेशाच्या केन्द्रस्थानावरून वायव्येस युफ्रेटिसपासून पूर्वेस व आग्नेयेस जावा सुमात्रापर्यंतच्या प्रदेशांत भारतीय संस्कृतीचीं किरणें अर्धवर्तुलाकार सर्वत्र प्रकाश पाडतांना दिसतील व त्यावरून केवळ वैदिक कालांतच नव्हे, तर नंतर इसवी सनाच्या पहिल्या दहा शतकांतही भारताचा इतिहास अभ्यासकास नवी दृष्टि प्राप्त करून देणारा आहे हें लक्षांत येतें. अद्याप या विषयाकडे अभ्यासकांचें जावें तेवढें लक्ष गेलेलें नाहीं. भारतीय संस्कृतीचा भारताबाहेरील लोक स्वीकार करीत असतील ही कल्पनाच लोकास संभवनीय वाटत नसे. पारतंत्र्याच्या काळांत ऐतिहासिक संशोधनांतही आत्मविश्वासाचा अभाव दिसून यावा त्याचें हें चिन्ह होय. येथून काळ पालटलेला असल्यानें अभ्यासक ताज्या दमानें व नव्या दृष्टीनें इतिहासाच्या या अज्ञात भागावर जसजसा प्रकाश टाकतील तसतसा प्राचीन भारताकडे पाहण्याचा खुद्द भारतीयांचा व बाहेरील जगताचा दृष्टिकोन बदलेल यांत शंका नाहीं.

प्रश्न

१. विशाल भारत म्हणजे काय ? प्राचीन काळीं त्याचें स्वरूप कसें होतें ? २. जावा बेटांतील भारतीय संस्कृतीची माहिती द्या. ३. टिपणें लिहा :—शैलेंद्र साम्राज्य, बोरोबुदूर, रोम-भारत संबंध.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(१) युफ्रेटिस, खोतान, काश्गर, तिबेट, मलाया, चंपा, कंबुज, जावा, सुमात्रा, बाली हे प्रदेश नकाशावर काळजीपूर्वक पहा. (२) स्वतःस इ. सनाच्या चौथ्या शतकांतील भारताचे रहिवासी समजा आणि 'स्वदेशाचें वैभव' यावर ३० ओळी लिहा. मुद्दे : १. राज्यव्यवस्था; २. वाङ्मय व कला; ३. परदेशांत भारतीयांचें वर्चस्व इ.

माहितीसाठीं

कुमारजीवाचें चरित्र

[चौथ्या शतकापासून चीन आणि भारत यांची देवाणघेवाण वाढली. फाहिएन, युवानच्वांग, इत्सिंग यांसारखे चिनी भिक्षू येथें आले; त्याचप्रमाणें कुमारजीव, गुणवर्मा यांसारखे विद्वान भारतांतून चीनमध्यें गेले. यांपैकीं कुमारजीवाचें चरित्र पुढें दिलें आहे.]

इसवी सनाच्या चौथ्या शतकांत कुमारयान हा तरुण वयांतच धर्मबुद्धीनें प्रेरित होऊन भारतांतून उत्तरेकडे प्रवास करीत करीत कुची येथें आला. तेथें त्यास राजगुरूचें पद प्राप्त झालें. पुढें त्यानें राजाच्या बहिणीशीं लग्न केलें. तिचें नांव जीवा असें होतें. त्यांना पुत्र झाला, त्याचें नांव कुमारजीव. कुमारजीव सात वर्षांचा झाला असतांना आईनें भिक्षुणी होण्याचें ठरविलें व ती आपल्या पुत्रासह काश्मीर येथें आली. तेथें कुमारजीवानें बौद्धग्रंथाचा अभ्यास केला. परत जात असतांना त्यानें काश्गर येथें चारही वेदांचें अध्ययन केलें. पुढें यारकंद येथें महायान पंथाशीं त्याचा परिचय झाला. शेवटीं तो कुची येथील भव्य राजमठांत राहून लोकांना बौद्ध ग्रंथांच्या अध्ययनांत मार्गदर्शन करीत असे. इ. स. ३८३ त कुचीवर झालेल्या चीनच्या स्वारींत कुमारजीव बंदिवान झाला. इ. स. ४०१ मध्यें चीनच्या राजानें धर्मग्रंथाचें भाषांतर करण्यासाठीं एक मोठें खातें उघडून त्यावर त्याची नेमणूक केली. इ. स. ४१२ पर्यंत त्यानें सुमारें १०० धर्मग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. त्या सालीं तो मृत्यु पावला. त्याची शिष्यशाखा फार मोठी होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १५ वा

जागृत आशियाची तोंडओळख

(इसवी सनाचें सहावें शतक ते तेरावें शतक)

१. **मुसलमान** :—जगाच्या इतिहासांत मुसलमान लोकांचें महत्त्व फार आहे. एके काळीं त्यांनीं पश्चिमेस पोर्तुगालपासून पूर्वेस चीनपर्यंतचें यूरोप व आशिया खंड व्यापिलें होतें. मोठमोठीं राज्यें व साम्राज्यें ह्यांना त्यांचा सारखाच दरारा होता. राज्यविस्ताराबरोबर त्यांनीं आपला व्यापारही वाढविला व एके काळीं यूरोप व आशिया यांच्यामधील खुष्कीचा व्यापार यांच्या मध्यस्थीनें चालत असे. इसवी सनाच्या सोळाव्या शतकांत युरोपांत ख्रिस्ती राष्ट्रांचा उदय झाल्यापासून तेथून त्यांची हलके हलके पीछेहाट होत गेली ; व सतराव्या शतकांत भारतांत हिंदूंनीं उचल केल्यामुळें तेथेंही त्यांच्या वर्चस्वास ओहोटी लागली. परंतु आजदेखील युरोपांत त्यांचा पाय खंबीरपणें रोवला गेला आहे. इ. स. १४५३ सालीं तुर्कांनीं काबीज केलेलें कॉन्स्टँटिनोपल आजही त्यांच्या ताब्यांत आहे. पाकिस्तानांत आज त्यांचें स्वतंत्र राज्य स्थापन झालें असून भारतांतही ते हिंदूंइतकेच स्थायिक झालेले आहेत. कडवेपणा व धर्माभिमान ह्या बाबतींत ते बहुधा कोणासच हार जावयाचे नाहींत. ह्या त्यांच्या गुणांमुळें त्यांच्या अंगीं जो चिवटपणा आला आहे, त्यानेंच त्यांचा आजपावेतों टिकाव लागलेला आहे. पश्चिमेस यूरोपांतील तुर्कस्थानापासून पूर्वेस भारतापर्यंतच्या प्रदेशांत हल्लीं मुसलमानांचीं अनेक स्वतंत्र राष्ट्रें आहेत. पृथ्वीवर त्यांची लोकसंख्या जवळजवळ तीस कोटी असून त्यांतील साडेनऊ कोट भारत व पाकिस्तान यांत आहेत. यांतील बरीच मोठी संख्या धर्मांतर केलेल्या लोकांची आहे.

२. **मुसलमानांच्या स्वारीचा विशेष** :—मुसलमान हे प्रथम भारतांत आठव्या शतकाच्या प्रारंभीं आले. त्यांच्यांत व त्यांच्यापूर्वीं भारतांत आलेल्या परकीय लोकांत मुख्य फरक असा कीं, पूर्वीं आलेले शकहूणादि लोक कालांतरानें स्थायिक होऊन हिंदुसंस्कृतीचा स्वीकार करून आत्मसात् झाले. पण मुसलमान येतांना आपला स्वतःचा धर्म व संस्कृति बरोबर घेऊन आले व राज्यविस्तारापेक्षांही धर्मप्रसाराचा हेतु पोटीं धरून त्यांनीं येथें आगमन केलें. पुढील हजार वर्षांच्या हिंदुमुसलमानांच्या झगडचांत राजकीय व धार्मिक अशीं दोन्ही कारणें त्याच्या बुडाशीं होतीं. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां मुसलमानांशीं झगडा हा परकीयांबरोबर झालेला पहिला झगडा होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. मुहंमद पैगंबर :—मुहंमद पैगंबर हा मुसलमानी धर्माचा मूळ संस्थापक अरबस्थानांत मक्का येथें इ. स. ५७० सालीं जन्मला. त्याचा बाप तेथील 'काबा' नांवाच्या पवित्र देवळाचा पुजारी असे. तो मुहंमदाच्या जन्माआधीं मृत्यु पावल्यानें चुलत्यानें त्याचा सांभाळ केला. वयांत आल्यावर तो इतर अरब लोकांप्रमाणेंच व्यापार करूं लागला. वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत त्याच्या चरित्रावरून तो धर्मसंस्थापक होईल असें कोणासही वाटलें नसेल. त्या काळीं अरबस्थानांत मूर्तिपूजेचें बंड फार वाढलें होतें व तेथें राहणाऱ्या यहुदी लोकांतही धार्मिक बाबतींत अनेक तंटे उत्पन्न झाले होते. त्याच्या घराण्यांत 'काबा'ची नित्य पूजा होई. तो या गोष्टींचा वारंवार विचार करूं लागला. शेवटीं मूर्तिपूजेविरुद्ध त्याचें मत पक्कें बनलें व तो त्याप्रमाणें लोकांस उपदेश करूं लागला. पिढयान् पिढया मूर्तिपूजा करणारांस मुहंमदाचे हे विचार एकदम कसे रुचावेत? अर्थातच ते त्याचा प्रथम निषेध करूं लागले; नंतर छळ करूं लागले. परंतु छळामुळें तो दबला नाहीं. उलट आपल्या मनास पटलेलीं तत्त्वें तो लोकांस धिटाईनें सांगूं लागला. परमेश्वरानें आपणांस शुद्ध तत्त्वाचा प्रसार करण्याची प्रेरणा केली आहे असें त्यास वाटूं लागलें व ईश्वराचा प्रेषित म्हणून तो आपलें कार्य करूं लागला. प्रथम त्यास कोणीच अनुयायी मिळेनात, परंतु तो तेवढयानें डगमगला नाहीं. शेवटीं लोकांनीं त्यास ठार मारण्याचा बेत केला; तेव्हां स्वतःच्या बचावाकरितां त्यास इ. स. ६२२ सालीं मदिनेस पळून * जाणें भाग पडलें! मदिना येथें त्यानें आपल्या तत्त्वाचा उपदेश करण्यास सुरुवात केली. लौकरच तेथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें व तेथील बेबंदशाही मोडून टाकली. यापुढें त्यानें मोठ्या उत्साहानें धर्माचा प्रसार करण्यास सुरुवात केली. या कार्यांत जगल्यास धर्मप्रसाराचें पुण्य मिळेल व मृत्यु आल्यास मोक्षप्राप्ति होईल असें तो आपल्या अनुयायांस शिकवूं लागला. ह्यामुळें मुसलमानांत लष्करी वारें शिरलें व त्याच्या धर्माचा झपाट्यानें प्रसार झाला. लौकरच त्यानें तलवारीच्या जोरावर मक्का शहर काबीज केलें व तेथील काबाचें देऊळ उध्वस्त केलें. तेव्हांपासून मक्का हें मुसलमानी धर्माचें पवित्र ठिकाण बनलें. पुढील काळांत त्यानें आपला अंमल अरबस्थानभर बसविला. अशा रीतीनें धर्मस्थापना व राज्यस्थापना करून मुहंमद इ. स. ६३२ सालीं वयाच्या ६२ व्या वर्षी मरण पावला.

---

*अरबी भाषेंत पळणें ह्यास 'हिजरा' असा प्रतिशब्द आहे. त्यावरून येथपासून सुरू झालेल्या सनास 'हिजरी सन' असें म्हणतात. हा मुसलमानी राष्ट्रांत प्रचलित आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. **धर्माचीं तत्त्वें** :—ईश्वर एक आहे व मुहंमद हा त्याचा प्रेषित आहे असें मुसलमान लोक मानतात. मुसलमानी धर्माचें स्वरूप अगदीं साधें व सामान्य जनांस समजेल असें आहे. हिंदु धर्मग्रंथांतून दिसून येणारे तात्त्विक वादविवाद मुसलमानी ग्रंथांतून फारसे आढळत नाहींत. मूर्तिपूजा व पुनर्जन्म ह्यांवर त्यांचा विश्वास नाहीं. शुद्धाचरण, दानधर्म व उपवास ह्यांनीं मुक्ति मिळते असें हे मानतात. मक्का हें यांचें पवित्र क्षेत्र आहे. येथें दरसाल अनेक यात्रेकरू जमतात. यांच्या धर्मग्रंथास 'कुराण' असें म्हणतात. या ग्रंथावर मुसलमानांचा दृढ विश्वास आहे. कुराणांत पवित्र धार्मिक तत्त्वांप्रमाणेंच इतरही तत्त्वांचा समावेश केलेला आहे. इतर लोक मुसलमानी धर्म स्वीकारीपर्यंत किंवा ते खंडणी देण्याचें कबूल करीपर्यंत त्यांच्याशीं लढत राहावें अशी कुराणाची आज्ञा आहे. ह्या आज्ञांवरून आपल्या धर्माचा प्रसार कसा होईल इकडे मुख्यतः मुहंमदाची दृष्टि होती असें स्पष्ट दिसतें.

५. **शिया व सुन्नी** :—मुहंमदाच्या मृत्यूनंतर त्याचा पहिला शिष्य अबूबकर हा खलिफा म्हणून निवडला गेला. ह्याच्याकडे मुहंमदाप्रमाणेंच राजकीय व धार्मिक पुढारीपण होतें. खलिफा म्हणजे गादीचा वारस; यावरून मुसलमानांच्या धर्मगुरूस खलिफा असें म्हणूं लागले. अबूबकरनंतर आणखी तीन खलिफा वर सांगितल्याप्रमाणें निवडले गेले. त्यानंतर मुसलमानांत दोन पंथ उत्पन्न झाले. ते शिया व सुन्नी हे होत. खलिफाचा अधिकार मुहंमदाच्या वंशजाकडे राहावा असें म्हणणारे ते शिया व तो अधिकार धर्मसभांनीं निवडून दिलेल्या इतर कोणासही असावा असें म्हणणारे ते सुन्नी होत. या दोन पक्षांत तंटे होऊन मुहंमदाचा नातू हुसेन मारला गेला. त्याचा दुसरा नातू हसन आधींच मृत्यु पावला होता. त्यांची आठवण म्हणून भारतांतील मुसलमान बाबरच्या वेळेपासून ताबूत करीत असतात. भारताबाहेर ही चाल नाहीं. या दोन पंथांखेरीज मुसलमानांत हिंदूंच्याप्रमाणें अधिक भेद नाहींत. भारतांत तीन प्रकारांनीं मुसलमानांची संख्या वाढत गेली. एक बाहेरून येथें आलेले, दुसरे धर्मांतर केलेले व तिसरे जन्मानें मुसलमान असलेले. मुसलमानी धर्मांत वर्णाचा उच्चनीच भाव नसल्याकारणानें हिंदूंतील कनिष्ठ जातींतील बऱ्याच जणांनीं धर्मांतर केल्याचें आढळतें. भारतांतील बहुतेक मुसलमान सुन्नी पंथी आहेत.

६. **इस्लामची युरोपांतील प्रगति** :—शिया व सुन्नी यांच्या मतभेदामुळें किंवा प्रसंगीं होणाऱ्या भांडणामुळें मुसलमानांची प्रगति थांबली नाहीं. त्यांनीं आपली राजधानी मक्केच्या वाळवंटांतील प्रदेशांतून उत्तरेस एशियामायनरमधील दमास्कस येथें आणिली व तेथून पूर्व-पश्चिमेस आपल्या राज्याचा व धर्माचा विस्तार केला. इ. स. ७११ त त्यांची सिंधवर स्वारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली व पश्चिमेस उत्तर आफ्रिकेच्या किनाऱ्यानें जाऊन त्यांनीं जिब्राल्टरची सामुद्रधुनी ओलांडली व तेथून ते उत्तरेस फ्रान्सपर्यंत पोंहोचले. तेव्हां इ. स. ७३२ सालीं चार्ल्स मार्टेल यानें त्यांना मागें हटविलें व युरोपखंड इस्लामच्या आक्रमणापासून वांचविलें. यापुढील काळांत मुसलमानांनीं जिंकलेल्या प्रदेशांत स्थिर होऊन विद्येची उपासना व व्यापारवृद्धि केली. कार्डोव्हा (स्पेन), कैरो (इजिप्त) व बगदाद हीं त्या काळीं विद्योपासनेचीं केंद्रें होतीं. पैकीं कार्डोव्हा येथील विद्यापीठांत तर युरोपांतील धर्मगुरूही अभ्यासासाठीं येत; कारण तेथें ग्रीक व लॅटिन (रोमन) ग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास होत असे.

७. **बगदादचें वैभव** :—आठव्या शतकांत दमास्कसचें वैभव मागें पडून बगदाद हें मुसलमानांच्या राजधानीचें ठिकाण बनलें. इस्लामी संस्कृतीचें खरें वैभव बगदाद येथें या काळांत पहावयास सांपडतें. तेथें इ. स. ७८६–८०९ सालीं हरून-अल-रशीद नांवाचा खलिफा होऊन गेला. त्यानें राज्यकारभारांत अनेक सुधारणा केल्या. तो खरोखर साधु पुरुष होता. तो नेमानें मक्केच्या यात्रा करी व वेष पालटून प्रजेंत हिंडून गरिबांस दानधर्म करी. अनेक विद्वानांस व धर्मगुरूंस त्याचा मोठा आश्रय असे. त्याच्या न्यायीपणाची कीर्ति सर्वत्र पसरली. अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी या सुप्रसिद्ध मनोरंजक ग्रंथांत याच हरूनचा उल्लेख आलेला आहे. या काळांतील मुसलमानांनीं विद्या व कला यांची उपासना केली. दूरदूरच्या प्रदेशांस जोडणारे रस्ते तयार करून व्यापाराचा मार्ग सुलभ केला. अनेक भव्य इमारती बांधल्या. चांद, घुमट व मनोरे हे इस्लामी शिल्पाचे विशेष होत. त्याचे नमुने उत्तर भारतांत सर्वत्र पहावयास सांपडतात. बुखारा शहरीं अविसेन्ना नांवाचा एक इसम इ. स. ९८०–१०३७ या काळांत होऊन गेला. त्यानें युनानी वैद्यकाचा पाया घातला. गणित व पदार्थविज्ञानशास्त्र यांतही मुसलमानांची बरीच प्रगति झाली होती. रुबाया या प्रसिद्ध प्रेमकाव्याचा लेखक उमरखैय्याम हा अकराव्या शतकाचे अखेरीस होऊन गेला. तो जसा साहित्यिक तसा उत्तम गणितीही होता.

सुमारें दोन शतकें बगदादचें वैभव टिकून होतें. पुढें कालांतरानें तेथें राज्यकारभारापेक्षां धर्मचर्चेस अधिक महत्त्व आलें व बगदादचें राजकीय वैभव कमी झालें. इसवी सनाच्या बाराव्या शतकांत क्षीण व हतबल खिलाफतीवर चंगीझखान या मंगोलाची धाड आली व त्याच्यामागून आलेला त्याचा मुलगा ओगदाईखान यानें तर खुद्द खलिफासच ठार मारलें.

८. **चंगीझखानाची धाड** :—चंगीझखान व ओगदाईखान हे पितापुत्र म्हणजे जगाच्या इतिहासांतील एक बडें धुमाकूळ घालणारें प्रकरण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंगीझखान हा मंगोलांच्या टोळीचा नायक. मंगोल हे सैबेरियांतून दक्षिणेस तार्तरीच्या प्रदेशांतून चीनमध्यें घुसले व त्या प्रदेशावर स्वारी करून तेथें राज्य करणाऱ्या किन घराण्याचा पराभव केला व तेथें आपला अंमल प्रस्थापित केला (इ. स. १२४४). लवकरच चंगीझखानानें पूर्वेस पेकिनपासून पश्चिमेस कास्पियन समुद्रापर्यंत व त्याच्याही पलीकडे रशियांतील नीपर नदीपर्यंत आपल्या राज्याची सरहद्द वाढविली. चंगीझखानास धर्म असा माहीतच नव्हता. त्यानें आपल्या स्वाऱ्यांतून वीस वर्षांत १ कोट ४० लाख माणसांचे बळी घेतले ! यानें बायबलची होळी केली व कुराण घोड्याच्या पायाखालीं तुडविलें ! ! जगाच्या इतिहासांत रानटी टोळ्यांनीं सुसंस्कृत राज्यांचा विध्वंस केल्याचीं अनेक उदाहरणें आहेत; पण विध्वंसक पराक्रमांत चंगीझखानाची सर बहुधा कोणासच यावयाची नाहीं. तो. इ. स. १२२७ मृत्यु पावला. त्याचा मुलगा ओगदाईखान हा बापास बरें म्हणविणारा होता. बापानें जिंकलेला मुलूख पुरेसा न वाटून ही स्वारी युद्धाची आघाडी उत्तर दक्षिण ४०० मैल पसरून मुलुख पादाक्रांत करीत करीत पश्चिमेकडे थेट पोलंडपर्यंत आली. कोणीच त्यास सामना देण्यास धजेना ! अशा स्थितींत कंटाळून कीं काय, यानें परत पूर्वेकडे चीनचा रस्ता धरला. ओगदाईखान इ. स. १२४१ त मृत्यु पावला. त्याच्या मागून इ. स. १२६० मध्यें कुब्लाईखान हा मंगोल साम्राज्याचा प्रमुख बनला.

९. **व्हेनिशियन प्रवासी मार्को पोलो :**—चंगीझखानाच्या मानानें कुब्लाईखान कमी क्रूर व सापेक्षतः शांत स्वभावाचा होता. त्यानें फक्त चीन व मंगोलियाचें राज्य स्वतःकडे ठेवून इराण व आशियामायनरच्या प्रदेशाचा कारभार आपल्या भावाकडे सोंपविला. पेकिंग हें शहर आपली राजधानी केली. व्हेनिस येथें व्यापार करणारे दोन व्यापारी निकोलो पोलो व मॅफिओ पोलो हे बुखाराच्या मार्गानें त्याच्या दरबारीं आले. तेव्हां त्यानें त्यांना सन्मानानें वागविलें व स्वदेशीं जाऊन रोम येथून कांहीं ख्रिस्ती धर्मोपदेशक आपल्या राज्यांत धाडण्याची त्यांना आज्ञा केली. त्या वेळीं रोममध्यें राज्यसत्ता व धर्मसत्ता यांच्या भांडणामुळें एकच गोंधळ माजून राहिला होता; तेव्हां पोलो बंधूंचें म्हणणें ऐकण्यास कोणीच तयार होईना. मोठ्या कष्टानें दोघे धर्मगुरु तयार झाले, पण ते अर्ध्या प्रवासांतून वाटेच्या दगदगीनें कंटाळून परत आले. परंतु त्यांच्याबरोबर निघालेला निकोलोचा मुलगा मार्को पोलो यानें साडेतीन वर्षें प्रवास करून तैग्रिस, युफ्रेटिस, पामीरचे डोंगर व मंगोलिया या मार्गानें अखेर तो पेकिंगला पोहोंचला. तेथें तो वीस वर्षें राहिला. या काळांत मार्को पोलो यानें कुब्लाईखानाचा विश्वास संपादन करून मोठमोठीं अधिकाराचीं कामें केलीं. पुढें त्यास चीनमध्यें राहण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंटाळा येऊन तो परत जाण्याची परवानगी मागूं लागला. पण कुब्लाईखान त्यास परत जाऊं देईना. अखेरीस एक मंगोल राजकन्या इराणच्या राजपुत्राशीं विवाह करण्यासाठीं इराणला जाण्यास निघाली असतां तिला सोबत म्हणून मार्को पोलो यास तिजबरोबर पाठविण्यांत आलें व अशा रीतीनें मार्कोची चीनमधून सुटका झाली. समुद्रमार्ग हा खुष्कीच्या मार्गापेक्षां अधिक सुरक्षित वाटून ते सर्व समुद्रमार्गें निघाले व जावा, सुमात्रा, सीलोन या मार्गानें पुढें जाऊं लागले. मार्को पोलो हा इ. स. १२८८ त भारतांत पांड्यांच्या दरबारीं येऊन गेल्याची माहिती मिळते. येथून तो इराणला गेला व मंगोल राजकन्या इराणच्या शहाच्या स्वाधीन करून तिचा मोठ्या प्रेमानें निरोप घेऊन, निघाल्यापासून पंचवीस वर्षांनीं इ. स. १२९५ सालीं व्हेनिस येथें येऊन पोहोंचला. तेथें त्यास कोणीच ओळखीना व घरांत घेईना ! हा दाढीवाला लांब झगा घातलेला व डोकीस वस्त्र गुंडाळलेला वृद्ध पुरुष कोण अशी सर्वांस पंचाईत पडली. अखेरीस त्यानें आपल्या-जवळचीं रत्नें त्यांना दाखविलीं व त्यांच्या लोभानें म्हणा अगर इतर कोणत्या तरी कारणानें म्हणा त्याची ओळख पटून तो व्हेनिस येथें राहूं लागला. थोड्याच दिवसांत व्हेनिस व जिनोआ यांच्यामध्यें युद्ध झालें. त्यांत मार्को पोलो पकडला जाऊन तो कैदेंत पडला. तेथें त्यानें आपलें प्रवासवृत्त लिहून काढलें तें आज जगभर प्रसिद्ध आहे. अमेरिका खंडाचा शोध लावणारा प्रसिद्ध कोलंबस यास प्रवासाचें वेड लावणारा हा मार्को पोलोचाच ग्रंथ

पंचवीस वर्षांनंतर पोलो घरीं परत आला; त्याला कोणीच ओळखीना !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होय. तो वाचून कोलंबसास समुद्रमार्गे भारताला जाण्याची कल्पना सुचली असें म्हणतात.

१०. **तुर्क-मंगोलांची युति** :—जगाच्या इतिहासांत या मंगोलांच्या टोळधाडीस गॉथ, व्हँडॉल, हूण किंवा शक कुशाण यांच्या टोळधाडीहून अधिक महत्त्व नाहीं. पण सहाव्या शतकांत उदयास आलेले मुसलमान व बाराव्या शतकांत पराक्रम गाजविणारे मंगोल यांची भारताच्या इतिहासांत चमत्कारिक तऱ्हेनें युति झालेली आहे; कारण मोगल किंवा मुघल साम्राज्याचा प्रसिद्ध संस्थापक बाबर हा आईकडून चंगीझखानाच्या वंशांतील व बापाकडून समर्कंदचा तुर्की बादशाह तैमूरलंग यांच्या वंशांतील होय. बाबरचें चित्र लक्षपूर्वक पहाणारांस त्याची उभट चेहेरेपट्टी व बारीक व अपांग नेत्र हे त्याच्या तुर्क-मंगोल मिश्रणाची साक्ष पटवतील. इ. स. १४५३ त युरोपांतील कॉन्स्टँटिनोपल शहर काबीज करून जगाच्या इतिहासास वेगळें वळण लावणारे तुर्क ते हेच होत.

११. **खिलाफत** :—सोळाव्या शतकांत खलिफाचा अधिकार तुर्कस्थानच्या सुलतानाकडे आला. गेल्या महायुद्धांत तुर्कस्थाननें जर्मनीचा पक्ष घेतला व शेवटीं जर्मनीचा पराभव झाला तेव्हां तुर्कस्थानचा सुलतान कायम राहावा म्हणून सर्व मुसलमानांनीं जोराची खटपट केली. कारण खलिफा या नात्यानें तो सर्व मुसलमानांचा धर्मगुरु होता. ह्या वावटळींतून त्याची सुटका होते न होते तोंच तरुण तुर्कांनीं त्यास पदच्युत केलें व खलिफाची गादी नामशेष केली.

प्रश्न

१. मुसलमानी धर्माचीं तत्त्वें सांगा. २. प्राचीन काळांत भारतांत आलेल्या शकहूणांपेक्षां मुसलमान लोकांच्या आगमनाचें वैशिष्ट्य कोणतें ? ३. बगदादच्या इस्लामी संस्कृतीची माहिती द्या. ४. टीपा लिहा—शिया व सुन्नी, खिलाफत. ५. चंगीझखान व ओगदाईखान यांच्या स्वाऱ्यांचें वर्णन द्या. ६ मार्को पोलोचा जीवनवृत्तान्त सांगा.

अभ्यास

(१) मुहंमद पैगंबर (लेखक सय्यद अमीनसाहेब) हें चरित्र वाचा. (२)'जगांतील रानटी टोळयांची सुसंस्कृत साम्राज्यावर धाड' या विषयावर निबंध लिहा. (३) मार्को पोलो आपल्या प्रवासाच्या गमती आपल्या बांधवांना सांगत आहे अशी कल्पना करून कथानक तयार करा. यासाठीं 'भूगोलावरील साहसी प्रवासी' (ले. मोडक) हें पुस्तक वाचा. (५) मार्को पोलोचे चीनला येण्याजाण्याचे मार्ग नकाशावर पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

मार्को पोलो व भारत

मार्को पोलोच्या प्रवासवृत्तांतून भारतांतील तत्कालीन लोकस्थिती-संबंधीं पुष्कळच माहिती मिळते. येथील लोकांचा पोषाख, अंगावरचे दागिने, धार्मिक आचार व व्यापार व्यवहार यांवर उपयुक्त प्रकाश पडतो. कारो-मांडेल किनाऱ्यावरील व्यापारी जीवनाबद्दल तो म्हणतो,

''येथील लोकांस व्यापाराचें बाळकडूच दिसतें. आईबाप आपल्या मुलांना अगदीं लहान वयांतच थोडे पैसे देऊन बाजारांत पाठवितात. तेथें मुलें सारा दिवसभर खरेदीविक्री करून जे कांहीं पदार्थ घरीं आणीत ते त्यांची आई त्यांना शिजवून वाढी. बापाच्या कपर्दिकेसही शिवायचें नाहीं असा त्यांचा निश्चय असे. मोत्यांच्या मोसमांत समुद्रकिनाऱ्यावर जाऊन तेथील कोळ्या-पासून मोती विकत घ्यायचे व ते मोठ्या व्यापाऱ्यांना विकायचे हा त्यांचा नित्यक्रम असे; व त्यांत त्यांना व्यापाऱ्यांशीं घासाघीस घालण्याची संवय लागलेली होती. अशा रीतीनें अगदीं लहानपणींच ते व्यापार करण्यांत निष्णात होते.''

—हॅवेलकृत 'हिस्ट्री ऑफ आर्यन रूल इन् इंडिया' पृ. ३६०

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १६ वा

राजपूत-मुसलमानांच्या चकमकी

(इ. स. ७११ ते इ. स. १२०५)

१. **महंमद कासीमची सिंधवर स्वारी** :—मागील भागांत मुसलमानां-संबंधीं प्रास्ताविक माहिती सांगितल्यावर, ते भारतांत प्रथम केव्हां आले तें सांगणें जरूर आहे. इ. स. ७११ सालीं महंमद कासीमनें हिंदुस्थानवर पहिली स्वारी केली हें मागें सांगितलेंच आहे. पण त्यापूर्वी सातव्या शतकांत मुसलमान व्यापारी दक्षिणेंत समुद्रमार्गानें मंगळूर येथें येत असत असें दिसतें. महंमद कासीमची स्वारी होण्याचें कारण असें झालें कीं, कांहीं मुसलमान यात्रेकरू हे सिंहलद्वीपाहून मक्केकडे जात असतां वादळामुळें सिंधचे किनाऱ्यास लागले व तेथें किनाऱ्यावरील लोकांनीं त्यांस लुटलें. त्या वेळीं सिंध प्रांतावर चच घराण्यांतील दाहर नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याजकडे खलिफानें दाद मागितली व नुकसानभरपाईची मागणी केली. तेव्हां दाहरनें टाळाटाळीचें उत्तर पाठविलें. तें पाहून खलिफानें महंमद कासीम यास सिंधच्या स्वारीवर पाठविलें. दाहर राजा मोठा शूर होता, परंतु त्यानें बेफिकीरीनें युद्धाची योग्य तयारी केली नाहीं. तसेंच बौद्ध धर्माच्या वर्चस्वामुळें व अहिंसा तत्त्वाच्या प्रसारामुळें सामान्य जनताही युद्धविन्मुख होती. स्वतः दाहर व इतर क्षत्रिय लोक सिंधु नदीचे कांठीं ब्राह्मणाबाद येथें मोठ्या शौर्यानें लढले, परंतु कांहीं देशबुडव्या लोकांच्या फितुरीमुळें महंमद कासीमला दाहरच्या सर्व हालचालींची बित्तंबातमी मिळे. त्यामुळें त्याचा नाइलाज झाला. महंमद कासीमजवळचीं भडिमार यंत्रें दाहरजवळच्या शस्त्रास्त्रांपेक्षां भयंकर होतीं. ऐन युद्धांत दाहर हत्तीवर बसला होता त्यामुळें प्रतिपक्षानें नेमकें शरसंधान करून त्याचा वध केला व सेनापतीच्या मृत्यूबरोबर फौज कच खाऊन मागें फिरली. पराभूत झालेल्या लोकांची कासीमनें क्रूरपणें कत्तल केली. लुटीचा ठराविक हिस्सा खलिफाकडे पाठवून बाकीचा आपण स्वतः व आपल्या शिपायांत वांटून घेतला. सिंध प्रांत खालसा केला. दाहरच्या बायकामुलांस त्यानें आपले दासदासी केलें. दाहरच्या मुली त्यानें लुटीचा वांटा म्हणून खलिफाकडे पाठविल्या. पुढें त्यांनींच खलिफाचें मन महंमद कासीमविरुद्ध कलुषित करून त्याचा भयंकर रीतीनें शेवट करविला.

२. **पराजयाचीं कारणें** :—महंमद कासीमची स्वारी ही हिंदु-मुसलमानांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिली चकमक होय. . ह्यांत नमूद केलेलीं हिंदूंच्या पराभवाचीं कारणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. लढवय्या हिंदूंत व्यक्तिशः धैर्यशौर्यादि गुणांचा अभाव नव्हता. परंतु सामान्य जनतेची बेफिकीर वृत्ति, पुढाऱ्यांचा बेसावधपणा, लोकांतील फितुरी, जुनीं शस्त्रें, यांनीं हिंदूंचा मोड झाला. धर्मवेडामुळें मुसलमान बेभान बनत व लुटीच्या आशेमुळें त्यास अवसान चढे. शत्रूंतील फितुरीमुळें त्यांचा फायदा होई व हिंदूंच्या अवसानघातकीपणामुळें त्यास विजय मिळे. युद्ध सुरू झाल्याबरोबर दाहरच्या चाकरीस असलेल्या मुसलमानांनीं कासीमबरोबर लढण्याचें नाकारलें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

३. **बाप्पा रावळचा पराक्रम** :—सिंध प्रांत काबीज झाल्यावर अरब मुलतानकडे वळले. ही मुसलमानांची लाट अशीच पुढें धडकत जाऊन कोठवर भिडली असती तें सांगवत नाहीं. सिंध प्रांत तर त्यांच्या ताब्यांत आलाच होता. अशा वेळीं जर शूर राजपुतांनीं त्यांस तोंड दिलें नसतें, तर मुसलमानांची सत्ता भारतांत तेराव्या शतकांत रुजण्याऐवजीं ती याच वेळीं आठव्या शतकांत दृढमूल झाली असती. सारांश, येणाऱ्या गुलामगिरीला पांचशें वर्षेंपर्यंत थोपवून धरण्याचें श्रेय राजपुतांस आहे. मुलतान सर झाल्यावर अरबांनीं राजपुतान्याकडे मोर्चा फिरविला. ज्यांना अरबस्थानांतील वाळवंटांत फिरण्याची संवय ते राजपुतान्यांतील वाळवंटास काय डरतात ? त्यांनीं थेट मेवाडची राजधानी चितोड या शहरावर स्वारी केली. त्या वेळीं चितोडच्या राजाच्या पदरीं बाप्पा रावळ नांवाचा शूर सेनापति होता. त्यानें मोठ्या शौर्यानें अरबांचा पराभव केला व त्यांस परतवून लाविलें. पुढें इ. स. ७३० सालीं बाप्पा हा चितोडच्या गादीचा मालक झाला. तेव्हांपासून तो इ. स. ७६३ पर्यंत राज्य करीत होता. बाप्पा हा श्रीरामचंद्रापासून ऐंशीवा पुरुष होय. तो शिवोपासक होता. त्याच्यामागून गुहिल नांवाचा राजा झाला, म्हणून या घराण्यास 'गुहिलोत' असें नांव पडलें. बाप्पा रावळचे वंशज चितोड येथें आजतागायत राज्य करीत आहेत. त्यांनीं वेळोवेळीं मुसलमानी हल्ल्यांस तोंड दिलें आहे. राणा संग, राणा प्रतापसिंह हे याच घराण्यांतले. शिवाजी हाही याच घराण्यांतील होय असें समजतात. मानीपणांत हें घराणें इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. इतका कुलीन, प्राचीन व पूर्वपरंपरा रक्षण करणारा राजवंश पृथ्वीच्या पाठीवर क्वचितच आढळेल.

४. **भारतांत आलेले मुसलमान** :—सिंधवरील स्वारीनंतर अरब भारतांत आले नाहींत. ह्यानंतरच्या काळांत आलेल्या मुसलमानांत मुख्यतः तुर्क, अफगाण व मोगल लोकांचा भरणा होता. अरब हे मुसलमान होत. इस्लामी संस्कृतीचें खरें स्वरूप अरबी लोकांत दृष्टीस पडतें. तुर्क व मंगोल लोकांनीं त्या संस्कृतीचा मागाहून स्वीकार केला. आर्यसंस्कृति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानभर पसरली त्याप्रमाणें इस्लामी धर्म व संस्कृति मध्यआशिया व पूर्व युरोपभर पसरली असें म्हणतां येईल. मंगोल व मोगल हे एक नव्हत. मंगोलियांत राहणारे मंगोलियन किंवा मंगोल होत. त्यांनीं चौदाव्या शतकांत इस्लामी धर्माचा स्वीकार केला व त्यानंतर तुर्क व मंगोलियन लोकांचें मिश्रण झालें, ते मोगल होत. त्यांना 'मुघल' असेंही म्हणतात.

५. **गझनीचे मुसलमान राजे**:—कासीमच्या स्वारीचा हिंदुस्थानच्या इतिहासावर विशेष चिरस्थायी परिणाम झाला नाहीं. मात्र सिंध प्रांत तेव्हांपासून मुसलमानी अंमलाखालीं गेला. त्यानंतरच्या दोनअडीचशें वर्षांच्या काळांत हिंदुमुसलमानांमध्यें चकमक झाल्याचा दाखला नाहीं. दहाव्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांचा हल्ला काबूल-पेशावरच्या दिशेनें आला. मध्यआशियांत त्या वेळीं बुखाऱ्याचे सामानी बादशाह फार प्रबळ होते. त्यांच्या पदरीं असलेल्या अलप्तगीन नांवाच्या सरदारानें गझनीचें राज्य कमाविलें. अलप्तगीन इ. स. ९७५ त मृत्यु पावल्यावर त्याच्या पश्चात् त्याचा गुलाम सबुक्तगीन हा तेथें राज्य करूं लागला. त्यानें हलके हलके सामानी बादशाहांचें मांडलिकपण झुगारून देऊन आपलें राज्य वाढविण्यास सुरुवात केली व त्यामुळें पूर्वेकडील हिंदू राजांशीं त्याचा सामना सुरू झाला. काबल हें त्या वेळीं पंजाबांत मोडत होतें व त्या प्रांतावर जयपाळ नांवाचा ब्राह्मण राजा राज्य करीत होता. त्याची राजधानी वहिंड येथें होती. लढाईस सुरुवात जयपाळाकडून झाली. सबुक्तगीन प्रबळ होत चालला हें पाहून जयपाळानें अनेक दोस्त राजांचें साह्य घेऊन त्याजवर स्वारी केली. पण त्यांत जयपाळाचा पराभव झाला. पुढें सबुक्तगिनानें जयपाळावर स्वारी केली व त्याचा दुसऱ्यांदा पराभव केला. या दोन्ही लढाया इ. स. ९८० च्या सुमारास जलालाबादेनजीक झाल्या असाव्यात. ह्या लढायांमुळें काबल येथून हिंदूंचा पाय उठल्यासारखा झाला. सबुक्तगीन इ. स. ९९७ त मृत्यु पावला.

६. **सुलतान महमूद**:—सबुक्तगिनाच्या पश्चात् त्याचें राज्य त्याचा मुलगा महमूद याजकडे गेलें. सामानी राज्याचा संबंध उघडपणें तोडून टाकला हें दर्शविण्याकरितां तो स्वतःस सुलतान महमूद म्हणवीत असे. तो इ. स. ९६७ च्या सुमारास जन्मला. बापाबरोबर युद्धांत राहून त्यास लढाईचें उत्कृष्ट शिक्षण मिळालें होतें. धर्मवेड व राज्यविस्ताराची हाव यांत तो कोणास हार जाण्यासारखा नव्हता. त्यानें इ. स. १००१ पासून १०३० पर्यंत हिंदुस्थानवर सतरा स्वाऱ्या केल्या. पहिल्या स्वारींत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१००१ सालीं) त्यानें पेशावरच्या मैदानांत जयपाळचा पूर्ण पराभव केला व सिंधूच्या पश्चिमेकडील सर्व मुलूख खालसा केला. त्यानें सरहद्दीवरील डोंगराळ मुलुखांतील सर्व नाक्यांचीं मजबूत ठाणीं आपल्या ताब्यांत घेतलीं. जिंकलेल्या प्रदेशांत लढवय्या लोकांची कत्तल करणें, बाकीच्यांस बंदिवान करणें व मुसलमानी धर्माची दीक्षा देणें हा प्रकार एकसारखा सुरू होता. ह्या धर्म-प्रसारामुळें त्या काळीं अफगाणिस्थानांत असलेली पुष्कळ हिंदू प्रजा मुसलमान बनली. गझनीच्या वायव्येस असलेला घूर प्रांत महमुदानें जिंकून घेतला व तेथील हिंदूंस मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. हेच मुसलमान लोक दोन शतकांनंतर शहाबुद्दीन घूरीच्या हाताखालीं भारतावर स्वाऱ्या करण्यास उद्युक्त झाले ही गोष्ट चिंतनीय आहे. असो.

सुलतान महमूद

७. **मुलतानवर स्वारी** :—लागोपाठ तीन वेळां पराभव झाल्यामुळें मानी जयपाळास अतिशय वाईट वाटलें व त्यानें आत्महत्या केली. त्याच्यामागून त्याचा मुलगा अनंगपाळ हा गादीवर बसला. पेशावरच्या लढाईनंतर महमुदानें भाटियाच्या राज्यावर दुसरी स्वारी केली. भाटिया हें ठिकाण सिंधु व सतलज ह्यांच्या दरम्यान कोठें तरी असावें. त्यासंबंधीं निश्चित अनुमान होत नाहीं. तिसरी स्वारी मुलतानवर झाली. मुलतानकडे जाण्यास अनंगपाळच्या राज्यांतून जाण्याखेरीज दुसरी वाट नव्हती. अनंगपाळानें महमुदास स्वारीकरितां वाट देण्याचें नाकारलें. तेव्हां महमुदानें प्रथम अनंग-पाळचा पराभव करून नंतर मुलतानची वाट धरली व तें शहर काबीज केलें.

८. **अनंगपाळचा पराक्रम** :—चौथी स्वारी इ. स. १००८ मध्यें अटक-जवळच्या मैदानांत झाली. हिच्याकरितां अनंगपाळानें अनेक हिंदू राजे एकत्र जमवून मोठी तयारी केली होती. युद्ध फार निकराचें झालें. दोन प्रहरपर्यंत हिंदूंचा जय होता. त्या दिवसापुरती लढाई थांबवावी म्हणून योजना करण्याकरितां महमूद युद्धाच्या धुमश्चक्रींतून बाहेर पडला. पण विधिघटना निराळी होती. अनंगपाळ ज्या हत्तीवर बसला होता तो हत्ती जळत्या बाणांच्या मारामुळें भडकला व तोंड फिरवून पळूं लागला. हें पाहून हिंदूंस वाटलें कीं, आपला राजा भिऊन माघार घेत आहे. त्याबरोबर त्यांनीं कच खाल्ली व त्यांच्यांत एकच गोंधळ उडाला. ह्याचा महमुदानें फायदे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन कांहीं ताज्या दमाचे लोक बरोबर घेऊन जोराचा हल्ला केला व हिंदूंचा पूर्ण पराजय केला. ह्या पराजयानंतर हिंदूंनीं पुनः महमुदाशीं समुदायानें लढाई केली नाहीं. पुढील वर्षी महमुदानें अनंगपाळावर आणखी एक स्वारी केली. तींत तो मारला गेला; व त्याचा मुलगा त्रिलोचनपाल ह्यानें महमुदाचें मांडलिकत्व पत्करलें. यानंतर लौकरच काबूलप्रमाणें पंजाबही गझनीच्या सुलतानांच्या ताब्यांत गेला.



सोरटी सोमनाथाचें मंदिर

९. **किरकोळ स्वाऱ्या** :—ह्यापुढील काळांत महमुदानें ठाणेश्वर व मथुरा ह्या शहरांवर स्वाऱ्या करून तीं शहरें लुटलीं. मथुरा हें त्या काळींही हिंदूंचें पवित्र क्षेत्र होतें व त्या प्रांतावर कनोजच्या प्रतीहार राजांचा अंमल होता. त्यांचा मोड करावा म्हणून महमुदानें इ. स. १०१९ त खुद्द कनोजवरही स्वारी केली व तें राज्य पादाक्रांत केलें. इ. स. १०२३ त महमुदानें दक्षिणेकडे उतरून ग्वाल्हेर, कलिंजर येथील राजांस आपलें स्वामित्व कबूल करावयास लाविलें.

१०. **सोमनाथावरील प्रसिद्ध स्वारी** :—महमुदाची शेवटची स्वारी काठेवाड प्रांतांतील सोमनाथाच्या देवालयावर झाली. त्या वेळीं गुजराथची राजधानी अनहिलवाडा हें शहर असून तेथें चालुक्य राजा भीम राज्य करीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. सोमनाथाची मूर्ति ही अखिल भारतांत पवित्र म्हणून समजली जात असे. विशेषतः चंद्रग्रहणाच्या रात्रीं तेथें फार लोक जात. त्या देवालयाला दहा हजार गांवें इनाम दिलेलीं होतीं असें म्हणतात. इतर देवांनीं महमुदाच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार योग्य तऱ्हेनें केला नाहीं म्हणून तो रुष्ट झाला असा प्रवाद महमुदानें ऐकला. तेव्हां त्यानें खुद्द सोमनाथावरच स्वारी करण्याचा निश्चय केला. इ. स. १०२४त महमूद मुलतान, अजमीर या वाटेनें अनहिलवाडा येथें आला; तें पाहून भीम राजा तेथून पळून गेला. एकसारख्या मिळालेल्या विजयामुळें महमुदाचा भारतांत अतोनात दरारा बसलेला होता व त्यामुळें पुढें पुढें भारतांतील राजे महमुदाशीं लढाई न करितां शरण येत किंवा पळून जात असें वर्णन आढळतें. भीम पळून गेल्यावर हिंदूंनीं शेवटपर्यंत देवालयाच्या बचावाची योग्य तयारी केली नाहीं. सोमनाथ आपलें रक्षण करण्यास समर्थ आहे असा त्यांस भरंवसा असावा. ह्या भरंवशाचा अर्थातच कांहीं उपयोग झाला नाहीं. आयत्या वेळीं देवालयाच्या संरक्षणार्थ देवालयाचे पुजारी व इतर लोक जिवावर उदार होऊन लढले. सुमारें पन्नास हजारांहून अधिक लोक मृत्युमुखीं पडले, परंतु युद्धाच्या निकालावर त्याचा कांहींही परिणाम झाला नाहीं. हिंदूंचा पूर्ण पराजय झाला. महमुदानें सोमनाथाची मूर्ति फोडून तिचे तुकडे तुकडे केले व तेथील अगणित लुट घेऊन तो परत निघाला. वाटेंत माळव्याचा राजा परमारदेव त्याच्याशीं लढण्यास सज्ज होता; म्हणून महमूद वाट बदलून सिंधच्या वाटेनें वाळवंटांतून मुलतानकडे निघून गेला. वाटेनें जातांना त्याचे फार हाल झाले. 'सोमनाथाच्या मूर्तीच्या पोटांत रत्नें होतीं, तसेंच हिंदू वाटाड्यानें सूड घेण्याच्या बुद्धीनें महमुदास वाळवंटांतून नेलें,' वगैरे दंतकथा कै. चिंतामणराव वैद्य यांच्या मतें निराधार आहेत.

११. **महमुदाची योग्यता** :—वर दिलेल्या स्वाऱ्यांच्या वर्णनावरून महमुदाची खरी योग्यता ठरविणें चुकीचें होईल. परराज्यांत लुटालूट करणारा हा सुलतान स्वतःच्या राज्यांत न्यायानें व दयाळूपणानें राज्य करीत असे. भारतांतून त्यानें अनेक कुशल कारागीर बरोबर नेऊन आपल्या राजधानीचें महत्त्व वाढविलें. सबुक्तगिनाच्या वेळीं गझनी हें सामानी बादशाहाच्या वर्चस्वाखालचें लहानसें मांडलिकी राज्य होतें. त्याचें त्यानें मोठें स्वतंत्र राज्य बनविलें. स्वाऱ्या करतांना त्यानें बायकामुलांची कत्तल केल्याचें वर्णन आढळून येत नाहीं व तो स्वतः अनीतीनें वागत असल्याचेंही दिसत नाहीं. भारतांतील प्रदेश जिंकतांना निव्वळ लुटालूट करण्याचें धोरण त्यानें ठेविलें असें दिसत नाहीं. त्यानें प्रथम काबूल व नंतर पंजाब हे प्रांत जिंकून तेथें पाय पक्का रोवून मग पुढील प्रदेश काबीज करण्यास सुरुवात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. प्रथम स्वारी व लुटालूट, नंतर मांडलिकी राज्य व नंतर खालसा हा त्याच्या दिग्विजयाचा क्रम होता. धर्मवेड व राज्यविस्ताराचा लोभ मात्र त्यास जबर होता. ह्यामुळें जगाच्या इतिहासांत नेपोलियनसारख्या महत्त्वाकांक्षी पुरुषाशीं त्याची तुलना करणें शक्य असलें, तरी शिवाजीसारख्या उच्च हेतूनें प्रेरित झालेल्या विभूतीबरोबर त्याची तुलना करीत बसणें योग्य नाहीं. तो इ. स. १०३० सालीं मृत्यु पावला.

१२. **शहाबुद्दीन घूरी** :—कासीमच्या स्वारीप्रमाणेंच महमुदाच्या स्वाऱ्यांचाही भारताच्या इतिहासावर चिरस्थायी असा परिणाम झाला नाहीं. काबूल व पंजाब हे प्रांत मात्र सिंधप्रमाणें मुसलमानांच्या ताब्यांतील म्हणून गणले जाऊं लागले व काबूल तर भारताचा एक भाग होता हेंदेखील आज आपण विसरून गेलों आहों. या पुढील काळांत लाहोर हें ठिकाण भारत व गझनीच्या साम्राज्याच्या सरहद्दीचें ठाणें बनलें. यापुढील दोनशें वर्षांच्या काळांत भारतावर मुसलमानांच्या स्वाऱ्या झाल्या नाहींत. गझनीचें साम्राज्य महमुदाच्या मृत्यूनंतर लौकरच कर्त्या पुरुषांच्या अभावामुळें मोडकळीस आलें. गझनीच्या वायव्येस असलेल्या घूर प्रांतांतील राजघराणें बाराव्या शतकांत गझनीच्या सुलतानाची सत्ता झुगारून देऊन स्वतंत्र बनलें व त्यांच्यापैकीं महंमद घूरी हा इ. स. ११७२ त गझनीचा राजा झाला. त्याचा भाऊ घियासुद्दीन हा त्याच वेळीं घूर प्रांतावर राज्य करीत असे. महंमद घूरीस 'शहाबुद्दीन'—धर्माचा प्रज्वलित तारा—असा किताब होता. सुलतान महमुदानंतर त्याच्याप्रमाणें भारतावर एकामागून एक लागोपाठ स्वाऱ्या करणारा पुरुष हाच होय. मात्र महमुदाप्रमाणें शहाबुद्दीनाच्या स्वाऱ्या धर्माभिमानानें प्रेरित होऊन झालेल्या दिसत नाहींत. राज्यविस्तार हा एकच हेतु त्याच्या मुळाशीं होता. इ. स. ११९१ पर्यंत त्यानें मुलतान, पेशावर, लाहोर इत्यादि ठिकाणचे गझनीच्या साम्राज्याचे मुसलमान सुभेदार जिंकले व नंतर तो राजपुतांकडे वळला.

शहाबुद्दीन घूरी

१३. **पृथ्वीराज चव्हाण** :—भारतांत त्या वेळीं नेहमीप्रमाणें अनेक लहान लहान राजपूत राज्यें स्वतंत्रपणें राज्य करीत होतीं. त्यांपैकीं अजमीर व दिल्लीचे अधिपति चाहमान ऊर्फ चव्हाण व कनोजचे राठोड हे प्रमुख समजले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जात व भारतांतील साम्राज्यसत्तेचा मान आपणाकडे असावा म्हणून त्यांच्यामध्यें आपआपसांत चुरस असे. पृथ्वीराजाचें चाहमान घराणें मूळ अजमीरचें असून तें सांबर सरोवरालगतच्या प्रदेशांत राज्य करीत होतें.

पृथ्वीराज चव्हाण

पृथ्वीराज हा पंजाबच्या अनंगपाळाचा नातू—मुलीचा मुलगा—म्हणून म्हणतात तें खरें नाहीं. दिल्लीचें राज्य पृथ्वीराजाचा पूर्वज वीसलदेव ह्यानें कनोजच्या राठोड वंशापासून हिरावून घेतलें. तेव्हांपासून चाहमान व राठोड वंशांत चुरस चालू होती. पृथ्वीराजाच्या वेळीं ही चुरस वाढण्यास आणखी एक गोष्ट कारणीभूत झाली. ती अशी कीं, कनोजच्या गादीवर असलेल्या जयचंद राठोडनें आपली मुलगी संयोगिता हिचें स्वयंवर माडलें व त्या वेळीं सर्व राजपूत राजांस निमंत्रणें देऊन पृथ्वीराजाचा अपमान करावा म्हणून त्यास मात्र बोलाविलें नाहीं. सभागृहाच्या द्वाराशीं द्वारपाल म्हणूंन त्याचा एक लांकडी पुतळा मात्र उभा केला. योग्य वेळीं संयोगिता ही हातांत माळ घेऊन सभागृहांत आली ; पण आश्चर्य हें कीं, तिनें दुसऱ्या कोणासही माळ न घालतां त्या पुतळ्यासच माळ घातली. दूरदर्शी पृथ्वीराज त्या वेळीं गुप्त वेशानें तेथें होताच. त्यानें तो प्रकार पाहून संयोगितेचें हरण केलें. जयचंदास हा अपमान सहन झाला नाहीं हें सांगणें नकोच. ही अद्‌भुत कथा फारशी विश्वसनीय नाहीं असें मानण्याचा कांहीं विद्वानांचा कल आहे. तरी पण संयोगितेचें पृथ्वीराजानें हरण केलें ही मुद्याची गोष्ट बहुतेकांस मान्य आहे. पृथ्वीराजाच्या पदरीं चंदभाट नांवाचा कवि होता. त्यानें 'पृथ्वीराज रासो '* नांवाचें काव्य केलें असून त्यांत पृथ्वीराजाच्या पराक्रमाचें रसाळ वर्णन केलेलें आहे. त्यांतील कांहीं विधानें अतिशयोक्तिपूर्ण असल्यानें ऐतिहासिक सत्याचा निर्णय करतांना इतर पुराव्यांच्या साह्यानें तीं नीट पारखून घेतलीं पाहिजेत. असो.

१४. **शहाबुद्दिनाचा पराजय** :—शहाबुद्दीन चाल करून येत आहे हें एकून पृथ्वीराजानें त्यास तोंड देण्याची जय्यत तयारी केली. अनेक राजपूत राजे एकत्र जमविले व त्यांच्या संयुक्त फौजांनीं शहाबुद्दिनाशीं निकराचा

* रासो म्हणजे राजाचें (पद्यमय) चरित्र.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामना दिला. दोन्ही सैन्यांची गांठ इ. स. ११९१ मध्यें स्थानेश्वरच्या दक्षिणेस तेरा मैलांवर तरायन येथें पडली. ह्या वेळीं युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत शहाबुद्दीन कांहीं काळ त्याच्या सैन्यास दिसेनासा होऊन तो मारला गेला अशी त्यांची समजूत झाली व तें बेशिस्तपणें पळूं लागलें, त्यामुळें हिंदूंस जय मिळाला. पुढारी दिसेनासा झाल्यामुळें हिंदू व मुसलमान दोन्ही फौजांत गोंधळ उडतो. एकतंत्री राज्यपद्धतीच्या संवयीमुळें सैनिक लोक हे नेहमीं राजाकरितां लढतात, राज्याकरितां लढत नाहींत हें सिद्ध झालें. लढाईंत शहाबुद्दीन हा पृथ्वीराजाच्या हातीं सांपडला. पण पृथ्वीराजानें खंडणी घेऊन उदार मनानें त्यास सोडून दिलें. कित्येकांच्या मतें शहाबुद्दीन हा कुणाच्याच हातीं न सांपडतां सपशेल निसटून गेला.

१५. **पराजयाचा सूड (इ. स. ११९२) :**—पुढील सालीं या पराभवाचा पूर्ण वचपा काढावा असें ठरवून शहाबुद्दीन पुनः पृथ्वीराजावर चाल करून आला. पृथ्वीराजाच्या दुर्दैवानें ह्या वेळीं जयचंदाच्या फितुरीमुळें राजपुतांत फूट पडलेली होती, तरीदेखील शहाबुद्दिनाबरोबर लढण्यासाठीं पृथ्वीराजानें राजपूत राजांना एकत्र जमविलें. जयचंद व त्याचे साथीदार मात्र वेगळे राहून मजा पाहात बसले. दोन्ही सैन्यांची गांठ स्थानेश्वरानजीक जवळजवळ पूर्वीच्याच ठिकाणीं पडली. मोठें शिकस्तीचें युद्ध होऊन त्यांत पृथ्वीराजाचा पराभव झाला व तो शत्रूच्या हातीं सांपडला. शहाबुद्दिनानें त्यास ठार मारिलें. विजयानंतर शहाबुद्दिनानें अजमीरवर चाल करून तेथील हजारों लोकांची कत्तल केली. अशा रीतीनें बाराव्या शतकांतील हिंदूंच्या साम्राज्यसत्तेचा मोड झाला.

१६. **किरकोळ स्वाऱ्या :**—शहाबुद्दिनाच्या स्वाऱ्या मात्र एवढ्यानें संपल्या नाहींत. इ. स. ११९४ सालीं त्यानें कनोजवर स्वारी करून फितूर जयचंदाच पाडाव केला व त्यास त्याच्या कृत्याबद्दल चांगलें बक्षिस दिलें. पुढील स्वारींत शहाबुद्दिनानें गुजराथची राजधानी अनहिलवाडा व बुंदेलखंडांतील काल्पी व कालिंजर हीं शहरें काबीज केलीं. जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था पाहण्याकरितां त्यानें दिल्ली येथें आपला गुलाम कुतुबुद्दीन यास ठेवून दिलें. शहाबुद्दिनाच्या बख्तियार खिलजी नांवाच्या दुसऱ्या एका सरदारानें अयोध्या व बिहार हे प्रांत जिंकून लौकरच बंगालची तत्कालीन राजधानी गौड ऊर्फ लखनौती हेंही शहर ताब्यांत घेतलें व तेथील हिंदू सत्तेचा शेवट केला. इ. स. १२०५ सालीं शहाबुद्दीन घूरी हा सिंधुकांठीं गक्कर लोकांचें बंड मोडण्यांत गुंतला असतां त्याचा विश्वासघातानें खून झाला. शहाबुद्दिनानें जिंकलेल्या देशांत नेमलेल्या सुभेदारांच्या कर्तृत्वामुळें त्या वेळेपासून मुसलमानांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाय हिंदुस्थानांत पक्का रोवला गेला व तेराव्या शतकापासून पुढें एकोणिसाव्या शतकापर्यंत दिल्लीवर मुसलमानी राजांचा अंमल चालू राहिला.

१७. **हिंदूंच्या पराजयाची मीमांसा** :—महंमद कासीम, सुलतान महमूद व महंमद घूरी ह्यांच्या स्वाऱ्यांचें वर लिहिलेलें वर्णन वाचून भारताच्या इतिहासास निराळेंच वळण लागल्याचें लक्षांत येतें. फार प्राचीन काळापासून मुसलमानांच्या आगमनापर्यंत हिंदूंनीं स्वातंत्र्याचा उपभोग घेतला. परंतु तेव्हांपासून भारतास परकीय अंमलाचें जें ग्रहण लागलें तें मध्यंतरींचा अल्पकालखेरीज करून अगदीं कालपरवांपर्यंत सुटलें नव्हतें. म्हणून या वेळीं हिंदूंच्या पराभवाचीं कारणें समजून घेणें हें फार अगत्याचें आहे.

(१) **राष्ट्रीय भावनेचा अभाव** :—ज्या चातुर्वर्ण्याच्या पायावर प्राचीन हिंदुसमाजाची उभारणी झाली त्यांतील श्रमविभागणीच्या तत्त्वामुळें राज्यकर्ते व प्रजा हीं तुल्य, समबल व परस्परावलंबी असत व एकमेकांचें एकमेकांवर नियंत्रण असे. बाहेरून दिसण्यांत राजाचा अधिकार जरी अनियंत्रित असे, तरी ऋषिप्रणीत कांहीं अलिखित तत्त्वांचें उल्लंघन करण्यास कोणीच धजत नसे. नंतरच्या काळांत संस्कृतीचें हें सतेज स्वरूप कायम राहिलें नाहीं हें आपण पाहिलें आहे. हीन व राज्य करण्यास नालायक लोक समाजांत सामील झाले व त्यामुळें प्रजेचें क्षत्रिय राजांवरील नियंत्रण सैल होत गेलें. राज्यकर्ते हे बहुजनसमाजापेक्षां श्रेष्ठ असावयाचेच अशी कल्पना बळावत जाऊन तिचें पर्यवसान 'नाविष्णुः पृथिवीपतिः' हें तत्त्व मान्य होण्यांत झालें. राजाच्या हाताखालचे लोक राज्यापेक्षां राजाकरितां लढत. सारांश, राष्ट्रीय भावनेचा—राज्याबद्दल वाटणाऱ्या आपलेपणाच्या भावनेचा—लोप झाला.

(२) **विस्कटलेला जनसमाज** :—बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें चातुर्वर्ण्याचें स्वरूप आणखी विस्कळित झालें. आपण क्षत्रिय आहोंत व आपलें अमुक कार्य आहे ही भावना कांहीं थोड्या लोकांखेरीज इतरांच्या मनांतून नष्ट झाली. राज्य कोणीं करावें ह्याचा विधिनिषेध राहिला नाहीं. बौद्धकाळांत वैश्य, शूद्र, ब्राह्मण सर्व प्रकारचे राजे झाले. एक राजपूत वगळले असतां देशांतील खरा क्षत्रिय वर्ग बहुजनसमाजांत मिसळून गेला. हिंदू धर्माचें पुनरुज्जीवन झालें. परंतु चातुर्वर्ण्याची घडी पुनः नीट बसली नाहीं. उलट धंद्यानें उत्पन्न होणारीं जातिबंधनें अधिकाधिक दृढ होऊन समाजांत अनेक तट पडले. राष्ट्ररक्षणाचा भार मूठभर राजपुतांवर पडला. चातुर्वर्ण्य गेलें, परंतु इतर समाजांत दृढमूल झालेलें समतेचें तत्त्वही प्रस्थापित झालें नाहीं. ना चातुर्वर्ण्य, ना समता अशा स्थितींत हिंदुसमाज चातुर्वर्ण्याचें विकृत स्वरूप जो जातिभेद त्यानें जखडून गेलेल्या अगतिक स्थितींत आजवर उभा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(३) **अहिंसा** :—बौद्ध धर्मानें अहिंसा तत्त्व बळावलें व बहुजनसमाज त्यामुळें युद्धविन्मुख झाला ही गोष्ट खोटी नव्हे. कारण एरव्हीं महंमद कासीम यास बौद्धधर्मीय वैश्यवर्ग आपण होऊन शरण गेलाच नसता. कांहीं बौद्ध राजे पराक्रमी निघाले हें खरें, परंतु त्यांच्या पराक्रमांत बौद्धधर्माच्या परिपालनापेक्षां उल्लंघनाचीच छटा अधिक दिसते. राष्ट्रांतील क्षात्रतेज नष्ट होऊं न देण्यास अहिंसातत्त्वाचा अतिरेक होतां कामा नये.

(४) **ऐहिक ऐश्वर्याविषयींचें औदासीन्य** :—शंकराचार्यांच्या संन्यासमार्गाच्या प्रतिपादनानें संसार असार आहे, देह नश्वर आहे, इहलोकींचें ऐश्वर्य क्षणभंगूर आहे या कल्पना दृढमूल झाल्यानें राष्ट्रावर एक प्रकारची उदासीनता आली. राजे कोणी कां असेनात, स्वतःस आपला धर्म परिपालन करावयास मिळाला म्हणजे पुरे ही भावना दृढ झाली. एकंदरींत अहिंसाप्रधान बौद्ध धर्माचा व संन्यासप्रधान नवीन हिंदुधर्माचा राजकीय प्रगतीवर सारखाच अनिष्ट परिणाम झाला असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

(५) **कांहीं किरकोळ कारणें** :—राजपुतांमध्यें साम्राज्याची कल्पना डोळ्यांपुढें ठेवून संघटना घडवून आणणारा कार्यकर्ता कोणी निपजला नाहीं. त्यांच्यांतील कांहीं प्रमुख सामंतवर्ती बनण्याचा यत्न करीत. परंतु स्वसंरक्षणार्थ सर्वांचा एक मध्यवर्ती संघ कधींच तयार झाला नाहीं. तात्पुरत्या प्रसंगापुरते ते एकत्र होत, पण मुलींच्या लग्नावरून झालेलीं क्षुद्र भांडणें, आपआपसांतील मत्सर व दुही, ह्या सर्व कारणांमुळें त्यांच्यांत खरी एकी कधींच झाली नाहीं. त्यांची लढण्याची पद्धतही निर्दोष नसे. ते शूर असत; परंतु आपल्या शौर्याचा त्यांनीं तारतम्यानें उपयोग केला नाहीं. नेहमींच धारातीर्थी पतन पावण्यापेक्षां कित्येक वेळां परत फिरणेंही श्रेयस्कर ठरतें ही गोष्ट त्यांनीं लक्षांत घेतली नाहीं.

हा झाला हिंदूंच्या दृष्टीनें विचार. मुसलमानांच्या दृष्टीनें विचार करतां त्यांना हिंदूंवर विजय कां मिळाला याचीं कारणें स्पष्ट आहेत. थंड हवेंत व डोंगराळ प्रदेशांत राहणारे मुसलमान उत्तर भारताच्या मैदानावरील उष्ण हवेंत राहणाऱ्या हिंदूंपेक्षां अधिक राकट व सामर्थ्यवान असत. तसेंच ते इस्लामी धर्माचा प्रसार करण्याच्या धर्मभावनेनें प्रेरित होऊन आले होते. मारीन तर गाझी होईन व मेलों तर स्वर्गप्राप्ति होईल ह्या निश्चयानें बेभान होऊन ते लढले. शिवाय वायव्येकडून एकवार उत्तर भारताच्या मैदानावर उतरल्यावर त्यांना पराभव झाल्यास पाठीवर शत्रू घेऊन परत जाणें फारच बिकट होतें, तेव्हां ते मारीन किंवा मरेन ह्या निश्चयानें लढले असल्यास नवल नाहीं. आणखीही एक गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. ती ही कीं, मुसलमान साऱ्या जगभर वणवण हिंडले. नाना प्रकारचे देश त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिले. नवीन नवीन लढण्याच्या पद्धती त्यांनीं उचलल्या. याच्या उलट हिंदूंच्या ठराविक युद्धपद्धतींत कधींच फरक पडला नव्हता. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदूंनीं परदेशांत कधींच प्रवास न केल्यामुळें स्वतःचे व स्वतःच्या लढण्याच्या पद्धतीचे गुणदोष कळण्याची त्यांना कधींच संधि मिळाली नाहीं, म्हणून हिंदूंचा पराभव झाला. संस्कृतीनें कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ असो, लढाईच्या वेळीं ज्याचें शस्त्र अधिक प्रभावी तो विजयी व्हावयाचा हें ठरलेलें आहे.

१८. **समारोप** :—हिंदूंच्या पराभवाची मीमांसा अशी अनेक प्रकारांनीं होण्यासारखी असली तरी त्यांनीं मुसलमानांशीं निकराचा सामना केला यांत शंका नाहीं. ह्यापुढील पांचशें वर्षांच्या काळांतही हिंदूंनीं पराभवानें खचून न जातां मुसलमानांना वेळोवेळीं तोंड दिलें. राजपूत, विजयनगरचे राजे व मराठे ह्यांची सर्व शक्ति मुसलमानांशीं लढून स्वत्व कायम ठेवण्यांत खर्च झाली. पराभव झाला तरी तेवढ्यानें निराश न होतां लढत राहणें हें आपलें जिवंतपणाचें लक्षण त्यांनीं जगाच्या निदर्शनास आणून दिलें.

१९. **प्राचीन कालखंडाची समाप्ति** :—भारताच्या इतिहासांतील प्राचीन काल ह्या द्वितीय कालखंडाची या ठिकाणीं समाप्ति झाली. येथून पुढें मध्यकालास सुरुवात होते. प्राचीन काल हा भारताच्या इतिहासांतील अत्यंत उज्ज्वल कालखंड होय. या कालांत हिंदु धर्माचा झेंडा सर्व देशभर रोविला गेला. परकीय लोकांची डाळ शिजली नाहीं. चंद्रगुप्त, अशोक, हर्ष यांच्यासारखे मोठमोठे पराक्रमी राजे होऊन गेले. त्यांनीं मोठमोठीं साम्राज्यें स्थापिलीं. कौंडिण्यासारखे दर्यावर्दी, कालिदास, भवभूतीसारखे थोर कवी, भास्कराचार्य, हेमाडपंत यांच्यासारखे विख्यात पंडित व चाणक्यासारखे मुत्सद्दी पुरुष जन्मास येऊन ही भूमि कर्त्या पुरुषांस जन्म देणारी आहे असें सिद्ध झालें. येथून पुढें अंमळ थारेपालट होतो. परकीयांच्या एकामागून एक स्वाऱ्या येतात. त्यामुळें एतद्देशीय हिंदु व मुसलमान राजांचा मोड होतो व नवीन लोक राज्य करूं लागतात व पुनः ते त्यांच्यामागून येणाऱ्या परकीयांच्या हल्ल्याला बळी पडतात, असा क्रम दिसून येतो. मधून मधून राजपूत, मराठे, शीख यांच्यासारख्या भारतांतील लोकांत जागृति उत्पन्न होऊन ते परकीयांच्या आक्रमणशील शक्तीस आळा घालण्याचा जोराचा यत्न करतात. इतिहासाच्या अभ्यासकास यशाच्या गुणगानाप्रमाणें अपयशाचें वर्णनही उद्बोधक होत असतें. तेव्हां प्राचीन कालाच्या इतिहासाप्रमाणेंच पुढील इतिहासाकडे लक्षपूर्वक पाहणें जरूर आहे.

२०. **विद्यार्थ्यांस सूचना** :— अतिप्राचीन व प्राचीन भारताच्या इतिहासाचें येथवर दिलेलें वर्णन वाचीत असतां कालाच्या अनिश्चितपणावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व अनेक राजे व राजवंश यांच्या नांवनिशीवर विद्यार्थ्यांस वारंवार अडखळल्यासारखें होतें. परंतु या विषयाचा अधिक बारकाईनें अभ्यास करणारास देखील कांहीं प्रश्न सुटल्यासारखे वाटले तरी, सामान्यतः प्राचीन भारताच्या इतिहासाची रूपरेषा अर्वाचीन काळच्या इतिहासाच्या रूपरेषेप्रमाणें त्यांच्याही डोळ्यांपुढें स्पष्ट उभी राहात नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. चालून आलेल्या वाटेवर मागें वळून दृष्टिक्षेप करतांना अगदीं जवळचा मार्ग स्पष्ट दिसतो व दूरदूरचा अंधुक दिसतो त्यापैकींच हा प्रकार आहे. परंतु विद्यार्थ्यांनीं यामुळें गांगरून न जातां आपल्या अभ्यासाचा मुख्य भर वेदपूर्वकालीन मोहेंजोदारो संस्कृति; वेद, उपनिषदें, महाभारत, रामायण इत्यादि ग्रंथांचें महत्त्व; बौद्ध, जैन, इत्यादि धर्मांचा उदय; शिकंदरची स्वारी; शंकराचार्यांची कामगिरी, चंद्रगुप्त, अशोक, हर्ष, शालिवाहन, बाप्पा रावळ यांसारख्या सम्राटांचीं ठळक कृत्यें; विशाल भारताचें दर्शन; राजपूत-मुसलमानांच्या झगडयाचें स्वरूप; प्राचीन राज्यपद्धति, व सामाजिक व धार्मिक स्थित्यंतराचें समालोचन इत्यादि गोष्टींवर दिल्यास प्राचीन इतिहासाचें मर्म लक्षांत येईल; व या गोष्टींचा ठसा त्यांच्या मनावर उमटल्यास बारीकसारीक घडामोडींचा विस्तार त्यांच्या दृष्टिआड झाला तरी चालण्यासारखें आहे.

प्रश्न

१. या पुस्तकाच्या प्रास्ताविक भागांत पृ. २८ वर म्हटलें आहे कीं, 'वायव्येकडे मात्र हिंदुस्थानची सरहद्द असावी तितकी निश्चित नाहीं' या वाक्याचें सोदाहरण स्पष्टीकरण करा. २. बाप्पा रावळनें कोणती कामगिरी बजावली? ३. गझनीच्या महमुदाचे भारतावर स्वारी करण्यांत कोणते हेतू होते? त्याच्या प्रमुख स्वाऱ्यांची हकीकत द्या. ४. 'महंमद घूरीच्या स्वारीपासून भारताच्या इतिहासास निराळें वळण लागतें.' या विधानाची चर्चा करा. ५. 'पुढारी दिसेनासा झाल्यामुळें हिंदु व मुसलमान दोन्ही फौजांत गोंधळ उडतो.' आपल्या देशांतील अशा तऱ्हेच्या कांहीं लढायांचा उल्लेख करून एक लहान निबंध लिहा. ६. दहाव्या व अकराव्या शतकांतील हिंदु-मुसलमानांच्या झगडयांतील हिंदूंच्या पराजयाची कारणमीमांसा द्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(१). 'ऐन युद्धांत दाहर हत्तीवर बसला होता. त्यामुळें प्रतिपक्षानें नेमकें शरसंधान करून त्याचा वध केला.' असा प्रकार भारतांतील लढायांत केव्हां केव्हां झाला? (२) हिंदुसाम्राज्यरूपी एक वृक्ष आहे अशी कल्पना करा. हिंदूंनीं स्वतःच्या दुर्बलतेमुळें त्यावर कोणते घाव घालून हा वृक्ष नेस्तनावूत केला? रेखाचित्र काढा. (३) श्री. रॉयकृत 'इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य' भाषांतर श्री. नखातेकृत, हें पुस्तक वाचा. 'आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष' ले. श्री. महादेवशास्त्री दिवेकर, हें पुस्तक वाचा. (४) जयचंदानें आपला एक अधिकारी घूरीकडे पाठवून पृथ्वीराजाविरुद्ध मदतीची याचना केली; या प्रसंगीं घूरी व अधिकारी यांमध्यें झालेला संवाद कल्पनेनें लिहा.

साहितीसाठीं

महमुदाच्या नाण्यावर नागरी लिपि

[गझनीच्या सुलतान महमुदानें भारतांतील प्रजेसाठीं जें नाणें पाडलें होतें त्यावर नागरी लिपींत आणि संस्कृत भाषेंत पुढील मजकूर दिला होता]*

" अव्यक्तमेकं मुहम्मद अवतार, नृपति महमूद अयं टंको महमुदपुरे घटे हतो, जिनायन संवत---"

याचा अर्थ पुढीलप्रमाणें :—

'एक अव्यक्त (ला इलाह इल्लिलाह), अवतार मुहम्मूद (मूहम्मद रसूल इल्लाह) राजा महमूद याच्याकडून हें नाणें महमूदपूर (लाहोर) च्या टांकसाळींत पाडलें गेलें. जिन हजरत यांच्या आयना (पलायन) चा हिजरी संवत.....'

----

* पं. जयचंद विद्यालंकार यांच्या इतिहास प्रवेश पुस्तकांत पृष्ठ २१६ वर हें अवतरण दिलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग १७ वा

प्राचीन भारतीय संस्कृतीचें स्वरूप

१. **व्यापकपणा** :—हा विषय विवेचनास अवघड आहे, कारण भारताचा इतिहास म्हणजे एका खंडप्राय देशाचा इतिहास होय. ग्रेट ब्रिटनसारखे ११ देश यांत सामावतील एवढा त्याचा आकार आहे. व आज भारताची लोकसंख्या ग्रेट ब्रिटनच्या लोकसंख्येच्या सातपट आहे. प्राचीन काळीं हें प्रमाण केवढें होतें हें सांगण्यास प्रमाणें उपलब्ध नाहींत. पण दोन्ही देशाच्या लोकसंख्येचें सापेक्ष प्रमाण फारसें बदललें नाहीं कारण दोनशें वर्षांपूर्वी ग्रेट ब्रिटनची लोकसंख्या ८० लक्ष असतांना भारताची लोकसंख्या १० ते १५ कोट होती असा अंदाज आहे. ज्या प्राचीन काळांत भारतांत एकसारखे बाहेरून लोक येत होते त्या काळीं ग्रेट ब्रिटनमध्यें परकीयांची मोठ्या प्रमाणावर आवक होण्यास कांहींच आकर्षक कारणें नव्हतीं ही गोष्ट विचारांत घेतली तर, इसवी सनाचे प्रारंभीं भरतखंडाची लोकसंख्या ग्रेट ब्रिटनच्या केवळ ७ पटीनेंच नव्हे तर १० पटीनेंही मोठी होती असा तर्क केल्यास तो चुकीचा ठरणार नाहीं. चिमुकल्या आकाराच्या व लोकसंख्येच्या देशाचा संगतवार इतिहास जसा ऐतिहासिक समालोचक दृष्टीच्या टापूंत मावूं शकतो तसा मोठ्या देशाचा इतिहास चटकन् आवाक्यांत आणून त्यांतील सुसूत्र सुसंगतपणा मांडून दाखविणें कठीण जातें.

क्षेत्रफळाप्रमाणें कालाचाही व्यापकपणा तसाच अवाढव्य आहे. प्राचीन भारताचा इतिहास म्हणजे इ. स. पू. ३००० ते इ. स. १२०५ म्हणजे उण्यापुऱ्या चारहजार वर्षांचा इतिहास होय. या काळापुढें मध्यकालीन सहाशें वर्षें (इ. स. १२०६ ते इ. स. १८१८) व अर्वाचीन कालांतील एकशेंबत्तीस वर्षें (इ. स. १८१८ ते इ. स. १९५०) हे काल किती तरी लहान. या विस्तृत प्राचीन कालांतील घडामोडी तितक्याच विविध स्थित्यंतरांनीं भरलेल्या आहेत. वर्तमानकालीन इतिहासलेखकाला संशोधनाच्या दुर्बिणीनेंही मागील काळ स्पष्ट दिसत नसल्यामुळें, त्या कालाचें वर्णन सावधपणानें करावें लागतें व त्यांत मतभेदास वाव राहातो. यामुळें प्राचीन भारताचें वर्णन करणारास मतभेद व अज्ञान या दोन मुद्यांवर पदोपदीं अडखळावें लागतें. उदाहरणार्थ, चातुर्वर्ण्यांतून जातिभेद कसा उत्पन्न झाला, महाभारताचा काल कोणता, निरनिराळ्या शास्त्रांत पारंगतता मिळविणारे विद्वान् भारतांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इसवी सनाच्या सातव्या आठव्या शतकापर्यंत उत्पन्न होत असतां भारतांत शास्त्रीय ज्ञानांत मागासलेपणा कां उत्पन्न झाला, अशासारख्या प्रश्नांचीं उत्तरें किती तरी विविध प्रकारांनीं देतां येतील; त्यांतील सत्य कोणतें तें कोणीं सांगावें ?

२. **समावेशक संस्कृति** :--जिला 'भारतीय संस्कृति' हें व्यापक नांव देतां येईल अशी संमिश्र संस्कृति प्राचीन भारताच्या अखेरअखेरच्या काळांतच तयार झाली. भारत देशाचा इतिहास वाचणारास या देशांतील वंशांची विविधता प्रत्ययास येईल. फार प्राचीन काळीं द्राविड, नंतर आर्य, नंतर शक, नंतर कुशाण, नंतर हूण या सर्व लोकांनीं एकामागून एक येऊन येथें कायम वस्ती केली व ते भारतीय समाजांत समाविष्ट झाले. आपण आज कित्येक वेळां आपणांस अभिमानानें आर्य म्हणवितों. याचा अर्थ कित्येक आर्य संस्थांचें श्रेष्ठत्व भारतीय समाजानें मान्य करून त्या आपल्याशा केल्या व आपणांस आर्यत्वाचा म्हणजे त्या समाजरक्षक व संवर्धक प्राचीन संस्थांचा अभिमान वाटतो. हा आपल्या आर्यत्वाच्या अभिमानाचा खरा अर्थ आहे. तसें म्हटलें तर शुद्ध आर्यवंशत्व मुद्दाम हुडकूनच काढावें लागेल, इतकें या चार हजार वर्षांच्या काळांत रक्तारक्ताचें संमिश्रण झालेलें आहे. भारतीय लोकसमूहांचे प्रसिद्ध अभ्यासक मि. रिस्ले यांच्या मतें महाराष्ट्र भागांत सिथियन-द्राविडियन, बंगाल भागांत द्राविड-मंगोलियन, उत्तर भारतांत आर्य-सिथियन, मध्यभागांत आर्य-द्राविडियन अशीं लोकसमूहांचीं मिश्रणें आहेत. हें संमिश्रण केवळ रक्तारक्तांचेंच नाहीं, तर भिन्न भिन्न चालीरीती व भिन्न देवतांच्या पूजा, भिन्न भिन्न पोषाख, भिन्न भिन्न भाषा हीं सर्व भारतीय संस्कृतींत समाविष्ट झालेलीं दृष्टीस पडतात. या समावेशक वृत्तीमुळें भारतीय समाजांत कोणत्याही प्रकारचा कडवेपणा किंवा आग्रही वृत्ति दिसून येत नाहीं. मतस्वातंत्र्यासाठीं किंवा धर्मस्वातंत्र्यासाठीं युरोपांत करावा लागणारा झगडा भारतांत करण्याची कधींच जरूर पडली नाहीं.

३. **धर्माचें श्रेष्ठत्व** :--ज्या संस्थांबद्दल आपणांस प्रेम वाटतें व ज्या संस्थांच्या समानत्वामुळें या भिन्नत्वांतून भारतीय संस्कृतीचें ऐनजिनसी एकत्व खोल दृष्टीनें पाहणारास दिसून येतें, अशा संस्था कोणत्या याचा विचार करूं गेलें तर, पहिल्या प्रथम धर्माचें श्रेष्ठत्व मनांत भरतें. बंगाल्यांत दुर्गा, महाराष्ट्रांत विठ्ठल, राजपुतान्यांत एकलिंगजी, अयोध्या प्रांतांत श्रीरामचंद्र, मथुरेंत कृष्ण, दक्षिण भारतांत भिन्न भिन्न नांवाखालीं शंकर, अशी प्रांताप्रांतांतून पूजेची देवता भिन्न असली तरी परमेश्वरचरणीं लीन होण्याची तत्परता सर्वत्र सारखीच आहे. देवास गोड पदार्थाचा नैवेद्य करावा, देवाच्या यात्रेचे दिवस सणासारखे पाळावे, त्या दिवशीं उत्कृष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोषाख घालावे, सामाजिक समारंभाचे व खेळाचे प्रसंग देवाच्या उत्सवाशीं संलग्न करावे, देवालयाच्या निर्मितीसाठीं गांवांतील किंवा प्रांतांतील उत्कृष्ट कारागिरी व कौशल्य हीं खर्ची घालावीं, अशी ही देवप्रधान वृत्ति भारतीय समाजांत तीन हजार वर्षांत दृढमूल झालेली दृष्टीस पडते. या वृत्तीच्या इष्टानिष्टतेबद्दल दोन्ही बाजूंनीं अर्थातच् पुष्कळ म्हणतां येण्यासारखें आहे. अनुकूल बाजूनें असें म्हणतां येईल कीं, ही संन्यस्त वृत्ति मनुष्यास पाशवी स्वार्थापासून वर उचलून मनुष्यत्व प्राप्त करून देते. प्रतिकूल बाजूनें असें म्हणतां येईल कीं, ऐहिक उत्कर्षास या वृत्तीमुळें मिळालेला दुय्यमपणा अखेर जीवनकलहांत भारतास मागें टाकण्यास कारणीभूत झालेला आहे. तें कसेंही असो. हिंदूंचें जीवन त्यांच्या धर्मध्वजाभोंवतीं वेष्टिलेलें आढळतें. प्राचीन उत्कृष्ट देवालयें हीं शिल्पकलेचे नमूनें म्हणून जशीं दाखवितां येतात, तशीं तीं प्राचीन काळीं धर्मचर्चेचीं व धर्मप्रचाराचीं केंद्रें असत; अतिथिअभ्यागताचीं निवासस्थानें असत; शास्त्रीपंडितांची पाठशालाही तेथें एकाद्या ओवरींत शालेय शिक्षणाचें काम करी व ऐन बाणीच्या प्रसंगीं हीं बळकट देवळें जुन्या बळकट किल्ल्याप्रमाणें किंवा वाड्याप्रमाणें लढवितां येत व वेळप्रसंगीं तेथून निसटून जाण्यास देवळाच्या गाभाऱ्यांत भुयारेंही असत.

४. **भक्तिमार्गाची लोकप्रियता** :—वर वर्णन केलेली भक्तिप्रधानवृत्ति भागवत धर्माच्या रूपानें प्रकट झाली. त्यास वैष्णवधर्म असेंही म्हणतात. इ. स. पूर्वीच्या पहिल्या शतकांत भारताच्या सीमेवरील ग्रीक लोकांत त्याचा प्रसार झाला. हेलिओडोरसनें तर भेलसा येथें गरुडध्वज उभारून आपल्या विष्णुभक्तीचें स्वरूप प्रकट केलें. कोठें कोठें कृष्णभक्ति पहावयास सांपडते. कुशाणांचा राजा दुसरा कॅडफिसेस हा शिवभक्त होता. याप्रमाणें उपास्यदैवत भिन्न असलें तरी भक्तीचें स्वरूप सर्वत्र सारखेंच. भक्तिमार्ग याप्रमाणें अतिशय जुना असला तरी गुप्तोत्तर कालांत शैववैष्णवांनीं शिव व विष्णु यांच्या भक्तीस आवाहन करून भक्तिमार्गाचा विजय केला. तेव्हांपासून भक्तिमार्गाची जनमनावरील पकड कायम आहे. भक्तिमार्गाची शिकवण सामान्य मनुष्यास समजण्याजोगी आहे हें तिच्या लोकप्रियतेचें कारण होय. संसारांतील विविध तापांनीं पोळलेल्यास परमेश्वरभक्ति हें विसाव्याचें साधन असल्यानें ही शिकवण अंतःकरणास जाऊन भिडते. भक्तिमार्गास कसल्याही साधनांचें अवडंबर लागत नाहीं म्हणून हा मार्ग सर्वांच्या आटोक्यांतील होय. शीतोष्ण प्रदेशांत, तसेंच कडक थंडींत अथवा उन्हाळ्यांत भक्तिमार्गाचें आचरण करण्याची अडचण नाहीं, भक्तिमार्ग चुकलेल्याकडे क्षमाशील वृत्तीनें पहाणारा, शुद्धाचरणावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भर देणारा मानवतेचें समानत्व मान्य करणारा असा असल्यानें त्यानें अखेर बौद्ध धर्मावर मात केली. विविधतेनें भरलेल्या भारतावर भक्तिमार्गानें समत्वबुद्धीचें व समानतेचें पांघरूण घातलें. भारताच्या उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत भाषा, वंश, चालीरीती या सर्वांच्या भिन्नत्वास न जुमानतां या देशांतील ऐनजिनसी एकता टिकवून ठेवण्याचें बरेंच श्रेय या पंथास आहे. शंकराचार्यांचें अद्वैत, रामानुजांचें विशिष्टाद्वैत व मध्वाचें द्वैत यांच्या तत्त्वज्ञानांत भेद आहे, परंतु सर्वच भक्तिमार्गाचा पुरस्कार करतात. भारतांतील तात्त्विक विविधतेंत दिसून येणारें हें मतैक्य अपूर्व असेंच आहे.

५. **समष्टिश्रेष्ठत्व** :—समष्टिश्रेष्ठत्व हें भारतीय संस्कृतीचें दुसरें लक्षण होय. समाजाकरितां व्यक्ति आहे, व्यक्तीकरतां समाज नव्हे ही दृष्टि प्राचीन समाजनियंत्रणांत प्रामुख्यानें दिसून येते. म्हणूनच समाज जगविण्या-साठीं प्राचीन हिंदुधर्मशास्त्रांत अनेक अपवाद सांगितले असले तरी ते अपवाद व्यक्तीला आपल्या स्वैर आचरणाच्या समर्थनासाठीं कधींच पुढें करतां यावयाचे नाहींत. 'न देवचरितं चरेत्' अशी जी प्राचीन हिंदु लोकांची समजूत आहे, तिचें मर्म हेंच आहे. हिंदुधर्मग्रंथांत पांच पांडवांना वरणारी द्रौपदी आहे; अनेक स्त्रियांशीं लग्न करणारा कृष्ण आहे; एक-पत्नीव्रताबद्दल स्तवनास पात्र झालेला राम आहे; पित्राज्ञा पालनासाठीं मातेचा शिरच्छेद करणारा परशुराम आहे; दिलेलें वचन पाळणारा हरिश्चंद्र आहे; भगवंताचें वचन (प्रतिज्ञा) मोडावयास लावणारा अर्जुन आहे; हिरण्यकश्यपूला वचन देऊन पुन: त्याला शब्दांत पकडून ठार मारणारा नारसिंह आहे. दुटप्पी बोलल्याबद्दल स्वर्गाचा दरवाजा कांहीं काल बंद झालेला युधिष्ठिर आहे. ही विविधता व विसंगति पाहून समाजनियमन करणारा धर्म तरी कोणता असें कोणी विचारील तर त्यास उत्तर हेंच कीं, समाज जगविण्यासाठीं अवलंबिलेले अपवाद हे व्यक्तिधर्म होऊं शकत नाहींत. कुटुंब, जाति, ग्राम, देश इत्यादि समाजसंस्थांच्या नियमांतून व्यक्त झालेला तो व्यक्तिधर्म होय. व्यक्तीनें त्या त्या संस्थाचे ते ते नियम पाळले पाहिजेत.

हें समष्टिश्रेष्ठत्व कुटुंब, जाति, ग्राम किंवा राज्य या सर्वांच्या नियंत्रणांत कसें दिसून येतें तें आपण क्रमवार पाहूं.

६. **संयुक्त कुटुंबपद्धति** :—या कुटुंबपद्धतींत कुटुंबाचा मुख्य एक. त्याच्या आज्ञेंत सर्वांनीं वागलें पाहिजे. या पद्धतीनें लहान मुलांस शिकण्याची संधि मिळते. तरुणांस द्रव्यार्जनास सुरुवात करण्यापूर्वीं कांहीं स्वतंत्र साधनाचे प्रयोग करून पाहण्यास सांपडतात. भिन्न प्रकृतीच्या व्यक्तींची एकमेकांशीं घसट वाढून सामुदायिक रीतीनें वागण्याची संवय लागते. शरीरानें किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



राजपूत चित्रकलेचा नमुना : संगीतांतील रागमालेचें दर्शन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अजंठा : इ. स. चें सहावें शतक बुद्ध प्रवचन करीत आहे. श्रोते उत्सुकतेनें श्रवण करीत आहेत. श्रोत्यांच्या मुद्रेवरील भाव लक्षपूर्वक पहाण्यासारखा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्धीनें पंगु बनलेल्यास सार्वजनिक दानधर्माकडे तोंड वेंगाडून बघावें लागत नाहीं. वृद्ध आईबापांस विलायतेंतील प्रकाराप्रमाणें ओल्डएज पेन्शनवर अवलंबून रहावें लागत नाहीं. एकमेकांच्या वैयक्तिक अडीअडचणी दुसऱ्याच्या मदतीनें पार पाडतां येतात. सामुदायिक जीवनामुळें खर्चांत बचत होते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तीव्यक्तींच्या स्वार्थाहून व्यापक, परंतु अमूर्त अशा कुटुंबहितासाठीं काम करण्याची संवय ही सार्वजनिक कार्याची पूर्वतयारीच होय. या वृत्तीनें कुटुंबापासून गांव, गांवापासून देश व देशापासून देव अशा अधिकाधिक व्यापक व अमूर्त ध्येयासाठीं देहदंड सोसण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. या संयुक्त कुटुंबपद्धतीचे कांहीं तोटेही आहेत. सामुदायिक कुटुंबांत कित्येक वेळां आइतखाऊ रिकामटेकडया लोकांची गर्दी होते, भांडाभांडीस सुरुवात होते, एकटया मिळवत्या इसमास जीव नकोसा होतो. त्यालाही वैयक्तिक स्वार्थाचें आकर्षण नसल्यानें पुष्कळ वेळां अधिक अंग मोडून काम करावेसें वाटत नाहीं. सामान्यतः मनुष्यास वैयक्तिक मोठेपणाची लालूच आकर्षक असते. तीच त्यास धाडसास प्रवृत्त करते. याच धाडसी वृत्तींतून कित्येकदां व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीचा मार्ग निघत असतो. एकंदरींत संयुक्त कुटुंबपद्धति समाजस्थैर्यास पोषक असली तरी व्यक्तित्वाच्या विकासांतून समाजाची प्रगति साध्य करण्याचे दृष्टीनें ती उपयुक्त ठरत नाहीं.

७. **ग्रामपंचायत** :—ग्रामपंचायत किंवा लोकसभा ही समष्टिश्रेष्ठत्वाचें दुसरें उदाहरण होय. याचें वर्णन मागें आलेलेंच असल्यानें त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. गांवपंचायत ही राज्यकारभाराचें प्राथमिक शिक्षण देणारी शाळा, छोटेसें टुमदार लोकसत्ताक राज्य, व्यक्तिमात्रांत असलेल्या थोडयाबहुत सार्वजनिक वृत्तीचा उपयोग करून घेण्याचें साधन, यांत्रिक नियमबद्ध राज्यपद्धतीचा मानवी मृदुतेनें अमल करण्याची संधि, असें ग्रामपंचायतीचें अनेक प्रकारांनीं गौरवून वर्णन करतां येईल. या योगानें लोकांना ज्यांत समजतें व ज्यांत आपलेपणा वाटतो अशा कारभारांत लोकांना काम करण्याची संधि मिळून मध्यवर्ती सत्तेला मध्यवर्ती प्रश्नाकडे अधिक लक्ष पुरविण्यास वेळ राहातो. याच्या उलट वशिलेबाजी, वजनदार व्यक्तींचें प्रस्थ यांमुळें गांवकीचा कारभार बिघडतो; व गांवपंचास प्रत्यक्ष लाभ नफा नसल्यानें त्या कामाबद्दल चालढकलही होते. साकल्यानें बोलावयाचें तर गांवपंचायतीचे हे दोष काढून टाकून तिचा आजच्या काळांतही उपयोग करून घेण्याजोगी ती संस्था आहे यांत शंका नाहीं.

८. **जातिभेद** :—जातिभेद ही हिंदूंची वैशिष्टयदर्शक संस्था आहे. याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्थ जातिभेदावांचून हिंदुत्व राहूं शकत नाहीं असा नव्हे. पण हिंदु समाजाबाहेर अशा रीतीनें समाजाचें नियमबद्ध वर्गीकरण झालेलें एरव्हीं कोठेंही दिसणार नाहीं. मूळ चातुर्वर्ण्यांतून कालाच्या ओघांत नेमका जातिभेद कसा निर्माण झाला तें सांगतां येत नाहीं; पण हिंदु समाजांतील जातिभेदाच्या मुळाशीं प्रो. पुणतांबेकर यांचे मतें मुख्यतः चार प्रकार आहेत. (१) वंशभेद, उदा०, आर्य, द्राविड, सिथियन वगैरे, किंवा त्यांचीं कमीअधिक मिश्रणें (२) धर्म किंवा पंथभेद, उदा०, लिंगायत, शैव, वैष्णव इ० (३) वृत्ति किंवा व्यवसायभेद, उदा०, ब्राह्मण, शिंपी, सोनार इ० (४) स्थानभेद, उदा० कोंकणी, गुजराथी, बंगाली, परदेशी इ०. या चार प्रकारांतून विविध मिश्रणानें हिंदु समाजांत ४००० जाती उत्पन्न झाल्या आहेत. त्यांपैकीं १४४७ जाती तर बेटीबंद आहेत. आपापल्या जातीसंबंधानें सामान्य हिंदु मनुष्यास विलक्षण आपलेपणा वाटतो. एरव्हीं केव्हांही कमीपणा न पतकरणारा मनुष्य जातीनें पावन करून घ्यावें म्हणून प्रायश्चित्त घेण्यास तयार होतो. जातिभेदामुळें व्यक्तिमात्रास व्यवसाय शोधण्याची दगदग नाहींशी झाली, समाजांतील त्याचें स्थान निश्चित झालें; अनेक क्रांत्या आल्या, उलथापालथ झाली, जुनीं राज्यें नामशेष झालीं, नवीं निर्माण झालीं, तरी समाजाचा घडीबंदपणा कायम राहिला. मिसर, बाबिलोनिया, इराण यांसारखीं प्राचीन राष्ट्रें स्मृतिशेष झालीं असतां हिंदुसमाज टिकवून ठेवण्याचें श्रेय जातिभेदास आहे. पण या जातिभेदापासून समाजाचे अनेक तोटेही झाले आहेत. व्यक्तिमात्रांचें समाजांतील स्थान जन्मानें निश्चित झाल्यानें समाजांत कृत्रिम उच्चनीच भाव उत्पन्न झाला. प्रत्येकास आपल्या लायकीप्रमाणें व्यवसाय करण्याची मुभा राहिली नाहीं. कर्तबगाराची कुचंबणा व कर्तृत्वशून्याची उठाठेव यानें समाजांत बिघाड उत्पन्न झाला. शिंप्यांची किंवा सोनारांची संख्या समाजांत त्या व्यवसायाच्या आवश्यकतेनें मर्यादित होण्याऐवजीं जन्मानें मर्यादित झाली. जातीचें नीचत्व कायम ठेवून धार्मिक मोक्षाचें शिखर गांठण्याचें साधन संतांनीं निर्माण केलें. पण जातीचें नीचत्व कायम ठेवून ऐहिक जीवनाचें उच्च शिखर गांठणें मात्र अशक्य झालें. या दृष्टीनें विचार करतां पूर्वी जातिभेदानें काय फायदे झाले असतील ते असोत, आज हिंदु संस्कृतीच्या या विशिष्ट लक्षणांत क्रांतिकारक बदल त्वरेनें घडवून आणणें अत्यंत अवश्य आहे यांत शंका नाहीं.

९. राजनीति :—प्राचीन राजनीतिविषयक कल्पनाही समष्टिश्रेष्ठत्वाच्या निदर्शक आहेत. प्राचीन इतिहासांतील राजे विशिष्ट घराण्यांतील व वंशपरंपरेनें गादीवर आलेले दिसतात. पण तेवढ्यावरून हिंदुस्थानांत अनियंत्रित एकतंत्री राज्यपद्धति प्रचलित होती असें म्हणतां येणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाभारतांत राजाच्या उत्पत्तीबद्दल विचार सांगतांना असें म्हटलें आहे कीं, राजाच्या अभावीं समाजांत अराजक माजतें, बळी तो कान पिळी ठरतो, आणि लहरी आपलाच अधिकार चालवितो. तसें न व्हावें म्हणून राजा हवा; व त्यानें धर्मानें राज्य केलें पाहिजे. येथें धर्म या शब्दाचा अर्थ समाजाची धारणा करणारा, सुरळीत टिकवून धरणारा, असा आहे. धर्म देईल त्यापेक्षां राजास अधिक हक्क नाहींत. अधर्मानें राज्य करणारा राजा मंत्रिमंडळाकडून शासनास पात्र होतो. राजानें शत्रूस जिंकण्यापूर्वीं प्रथम स्वतःस जिंकावें (महाभारत राजधर्म अनुशासन पर्व, अध्याय ६४, श्लोक ४). प्रजेचें कल्याण साधण्यांतच त्याचें कल्याण आहे (कौटिल्याचें अर्थशास्त्र, अध्याय १९); समाजांतील नीति व धर्म यांस देवासमान मानून त्यांचें उल्लंघन मी करणार नाहीं अशी राजानें कायावाचामनेंकरून शपथ घ्यावयाची असते (महाभारत शांतिपर्व). सारांश, पाटील जसा गांवचा कारभारी तसा राजा हा देशाचा कारभारी. पाटील गांवाचा, गांव पाटलाचें नव्हे, तसा राजा देशाचा, देश राजाचा नव्हे. ही भारतीय संस्कृतीच्या राजधर्मांतील गृहीत कल्पना आहे. आतां इतकें मात्र खरें कीं, भारतांत प्राचीन काळीं कांहीं चांगल्या राजांप्रमाणें या कल्पनांचा दुरुपयोग करून अधिकार गाजविणारे राजेही होऊन गेले व अशा राजांना खडसाविणाऱ्या किंवा दंड करणाऱ्या 'शापादपि शरादपि' अशा तेजस्वी ऋषींची परंपरा मागें पडून प्रधान व मंत्री राजाच्या इच्छेची अंमलबजावणी करूं लागले. प्राचीन भारतांत ब्रिटिश पार्लमेंटप्रमाणें लोकनियुक्त सभा व तिचा व्यवस्थित कारभार होता असें मात्र दिसत नाहीं. पण तेवढ्यावरून हिंदी राज्यसंस्था हिणकस ठरत नाहींत. कोणत्याही संस्थेचें हित तिच्या अंतर्गत गुणाप्रमाणें ती चालविणाऱ्या व्यक्तींच्या कर्तृत्वावर अवलंबून असतें. ब्रिटिश पार्लमेंटचें यश त्या पार्लमेंटांत काम करणाऱ्या लोकांच्या समजूतदारपणावर व धाडसावर अवलंबून आहे. स्टुअर्ट राजांना तडफेनें तोंड देण्यास पिम-हॅम्पडनसारखे लोक पुढें आले नसते किंवा बदलता काळ ओळखून पार्लमेंटमध्यें एकामागून एक सुधारणा बिलें पास करण्याची तत्परता ब्रिटिशांनीं दाखविली नसती तर पार्लमेंटचें यश कोठून टिकून राहिलें असतें ? भारतासारख्या देशांत हूणांनीं व तुर्क अफगाणांनीं—सुसंस्कृत अरबांनीं नव्हे—जो गोंधळ घातला तसा ब्रिटिश बेटांत घातला गेला असता तर लोकसभेची परंपरा कशी शाबूत राहिली असती हा प्रश्नच आहे.

१०. **युरोप भारताची तुलना** :—चंद्रगुप्त मौर्यापासून पृथ्वीराज चव्हाणापर्यंत एकंदर दीडहजार वर्षांचा काळ होतो. या काळांत युरोपांत कोणकोणतीं स्थित्यंतरें झालीं तें पाहणें मनोरंजक होईल. प्राचीन आर्यांच्या प्रमाणें अनेक शास्त्रें व विद्या यांत पारंगत असलेल्या ग्रीकांच्या संस्कृतीचा ठेवा मॅसिडोनियाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजा अलेक्झांडर यास मिळाला. त्यानें साम्राज्यही कमावलें; पण या संस्कृतीचा व ज्ञानाचा प्रसार त्या साम्राज्यांत होऊं शकला नाहीं. कारण त्याच्या मृत्यूनंतर लवकरच त्याच्या साम्राज्याचीं शकलें झालीं. ग्रीकांचा ज्ञानदीप अलेक्झांड्रिया शहरीं तेवत राहिला, पण 'घनांधकारांत दिवा जसा चनों' तशी त्याची स्थिति होती. पुढें रोमन साम्राज्य झालें तें गुप्तांच्या सुवर्णकालापर्यंत टिकून होतें. हा काळ आशिया व यूरोप या दोन्ही खंडांत सारखाच दैदीप्यमान होता. मात्र रोमन साम्राज्यांतील गुलामांची दुःस्थिति, ग्लॅडिएटर्सचे खेळ व पाँपे सीझर वगैरे सारख्यांचीं असूयायुक्त भाषणें यांचें साम्य वा प्रतिबिंब गुप्तकालीन भारतांत आढळून येत नाहीं. पुढें युरोपांत अराजक झालें. गॉथ, व्हँडॉल, स्लॉव्ह या टोळ्यांनीं धुडगूस घातला तसा भारतांतही हूणांनीं धुडगूस घातला. गॉथ, व्हँडॉल, स्लॉव्ह वगैरे रानटी लोक ख्रिस्तीधर्माच्या सोज्वळ उपदेशास वश झाले तसे भारतांत आलेले शक, कुशान, हूण हिंदुधर्मांत समाविष्ट झाले. फ्रॅंक, गॉथ, बर्गंडियन यांचीं आजच्या फरान्स, इटली, जर्मनी या देशांतून स्वतंत्र राष्ट्रें उदय पावलीं तसें भारतांत, चौहान, गुहिलोत, परमार, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, चोल, पाण्डय यांचीं राज्यें निर्माण झालीं. आणि युरोपांत सेंटबेनेडिक्टानें ख्रिस्ती-धर्मसंघटना केली, तसेंच भारतांत शंकराचार्यांनीं वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें.

११. महत्त्वाचा फरक :—परंतु उभयतांच्या धर्मसंघटनेंत केवढें तरी अंतर होतें! युरोपांत जोझस व सेंट पॉलचें तत्त्वज्ञान, सेंटबेनेडिक्टानें धर्मगुरु तयार करण्यासाठीं नियोजलेली मठसंघटना, सेंट ऑगस्टाईनसारखे प्रचारक, पोपसारख्या धर्मगुरूंच्या आज्ञा व त्यांची देशोदेशीं आर्चबिशप व बिशप यांचे मार्फत होणारी अंमलबजावणी हीं सर्व एकमेकांशीं इतकी संबद्ध होतीं कीं, या संघटनेविरुद्ध जाण्यास राजे चळचळा कापत. या संघटनेनें काढलेल्या धर्मस्वाऱ्या (क्रूसेड) साठीं धनिक द्रव्यांच्या राशी ओतीत आणि जवान हे वारकरी व धारकरी बनण्यास सिद्ध होत. ग्रीक विद्या व शास्त्रें यांचें अध्ययन या ख्रिस्ती मठांत चालू राहिलें. संस्कृति सतेज राहण्यास नुसत्या व्यक्ति तेजस्वी असून भागत नाहीं, तिला टिकविणारी संघटनाही लागत असते. शंकराचार्यांचें वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन व राजपुतांचा उदय या दोन्ही गोष्टी बऱ्याच अंशीं समकालीन असल्या तरी त्यांचा एकमेकांशीं कांहींच संबंध नव्हता. राजपूत पराक्रमांत पक्के असले तरी संघटना निर्माण करण्यांत त्यांना कच्चे म्हटल्याखेरीज राहवत नाहीं. धार्मिक संघटना नसली तरी राजकीय हेतूसाठीं एकत्रीकरण (फेडरेशन) राजपुतांनीं केलें नाहीं. शिवाजीच्या अनुयायांच्या राज्यांत शिंदे होळकर गायकवाड इत्यादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठे सरदारांत जितपत सैल सहकार्य होतें तितपतचें सहकार्यही राजपुतांत उत्पन्न झालें नाहीं. देश किंवा राष्ट्रकल्पनेचा उदय होण्यापूर्वी देवाधर्माचें रक्षण करण्याच्या कल्पनेनेंच मनुष्यास देहदंड सोसण्यास प्रवृत्त केलें आहे. या प्रवृत्तीस युरोपांत मिळाली त्याप्रमाणें भारतांतही संघटनेची जोड मिळती तर मुसलमानांच्या हल्ल्यापासून जसा यूरोपचा बचाव झाला, तसा भारताचाही कदाचित् होऊं शकला असता, कोणीं सांगावें ? कदाचित् म्हणण्याचें कारण असें कीं, यूरोपला मुसलमानांपैकीं अरबांसारख्या सुसंस्कृत लोकांशीं झगडावें लागलें, तर भारताची अफगाण, मंगोलियन् या त्या मानानें रानटी असलेल्या लोकांशीं प्राचीन कालच्या अखेरीस गांठ पडली होती. अरब–युरोपियनांचा परस्परांतील झगडा संपल्यावर यूरोपांतील कित्येक ख्रिस्ती धर्मगुरु स्पेनमधील कार्डोव्हा येथील अरबी विश्वविद्यालयांत शिकून तयार झाले. भारतांत उभय जमातींच्या परस्पर सहवासाचा असा फायदा होऊं शकला नाहीं. हिंदु जातींचा कोट करून त्यांत स्वतःस कोंडून बसले व मुसलमानांस देश काबीज करण्यापलीकडे कांहीं करतां आलें नाहीं. पुढें कित्येक शतकांच्या सहवासानंतर मात्र हिंदु संतांनीं मुसलमानांतील बंधुभावाची शिकवण उचलली. उभय खंडांतील दीड हजार वर्षांच्या इतिहासाचें तुलनात्मक समालोचन व भारताला आलेल्या मागासलेपणाची मीमांसा ही अशा प्रकारची आहे.

१२. **संस्कृतीचें व्यापक स्वरूप** :—प्राचीन भारतीय संस्कृतीला प्राणभूत असणाऱ्या धर्म व समाजसंस्था यांचें येथपर्यंत विवेचन झालें, पण संस्कृतीचें स्वरूप याहून व्यापक असतें. किंबहुना पशुत्वापासून देवत्वाकडे नेऊन पोहोंचविणाऱ्या व समाजसंवर्धक अशा मानवी शक्तींचा विकास करणाऱ्या सर्व गोष्टींचा संस्कृतींत समावेश होतो. या दृष्टीनें विचार करतांना, भारतीयांचें वाङ्मय, करमणुकीचे प्रकार, शिल्पकला, नृत्यगायनादि ललितकला, तत्त्वज्ञान, दैनंदिन राहणी, पोषाख व खाद्य पदार्थ, कायदे, नौकानयन व युद्धशास्त्र, देवघेवीचे व्यवहार, गणित, ज्योतिष व वैद्यक इत्यादि शास्त्रें या सर्वांच्या प्रगतीचा आढावा काढला तरच संस्कृतीचें वर्णन पुरें झालें असें म्हणतां येईल. म्हणजे प्रत्येक शास्त्राच्या उगमाची कल्पना, प्रगतीचा आढावा व त्या शास्त्राची यूरोपांतील प्रगतीशीं तुलना अशा पद्धतीनें हें विवेचन केलें पाहिजे. पण यासाठीं जशी माहिती उपलब्ध असावी तशी नसल्यानें संस्कृतीच्या कांहीं अंगांचें त्रोटक विवेचन देऊन हा विषय पुरा करतों.

१३. **विद्योपासना** :—रामायण महाभारतादि महाकाव्यें, कालिदास, भवभूति यांच्यासारखे नाटककार, अठरा पुराणें व शंकराचार्यादिकांचीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाष्यें, तसेंच तक्षशिला व नालंदा या विद्यापीठांतून चालू असलेली विद्योपासना यासंबंधींची माहिती मागें योग्य स्थळीं आलेलीच आहे. भारतांत प्राचीन काळीं एकूण एकोणीस विद्यापीठें होतीं व तीं भारताच्या चारही दिशांस विखुरलेलीं होतीं. वायव्येस तक्षशिला, मगध राज्यांत नालंदा, पूर्वेस बंगाल्यांत उदन्तपुरी, दक्षिणेस मदुरा व पश्चिमेस काठेवाडांत वलभी हीं नांवें उदाहरणादाखल सांगतां येतील. प्रत्येक विद्यापीठाचा कांहींना कांहीं विशेष होता. तक्षशिलेंत शिल्प, वैद्यक व युद्धकला यांचा अभ्यास होई. नालंदास धर्मग्रंथांचा अभ्यास होई, गुणशीला विद्यापीठांत (गुणशीला हें राजगृह येथें होतें) स्त्रियांच्या ६४ कलांचा अभ्यास चालू होता. कुंडिनपुर (वैशालीनजीक) येथें व्यायामशास्त्राचें शिक्षण मिळे, आणि मदुरेस नृत्यकला उत्कर्षास पोहोंचली होती. या सर्वांची थोडक्यांत माहिती श्री. तवकर यांनीं आपल्या 'प्राचीन भारतीय विद्यापीठें' या पुस्तकांत दिली आहे ती जिज्ञासूंनीं पहावी.

१४. **चित्रकला** :—सौंदर्यदर्शन हें कलेचें ध्येय आहे. भारतीय चित्रकला फार प्राचीन आहे. 'स्वर्गांतून सात कारागीर पृथ्वीवर अवतीर्ण झाले, ते दिवसां गात गात आपलीं कामें करतात ' असें ऋग्वेदांत वर्णन आहे. (ऋग्वेद ४।१६।३) या सात कारागिरांत चित्रकार, शिल्पकार, नर्तक, कवि, गायक, वास्तुकार व वाद्यवादक यांचा समावेश होतो. मैत्र्युपनिषदांत 'चित्रें काढलेल्या भिंतीप्रमाणें हें सर्व मिथ्या मनोरम आहे.' असें उपमादर्शक वाक्य आहे. कालिदासानें रघुवंश व शाकुंतल नाटकांत चित्रकारांच्या कौशल्याचा गौरव केला आहे. राजवाड्यांतील भिंतीवरील हत्तीचें चित्र पाहून खरोखरीचा सिंह त्यावर चाल करून गेला असें रघुवंशांत वर्णन आहे. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत तयार झालेल्या वात्स्यायनाच्या कामसूत्रें या ग्रंथांत चित्रकलेचीं रूपभेद, प्रमाण, भाव, लावण्ययोजन, सादृश्य, वर्णिकाभंग अशीं सहा अंगें सांगितलीं आहेत. भारतीय चित्रकलेचें ध्येय सृष्टीचें हुबेहूब अनुकरण करणें हें नसून, एकादा देखावा पाहून मनुष्याच्या अंतःकरणांत ज्या भावना उद्भूत होतात त्या भावना व्यक्त करणें हें होय. भारतीय चित्रकार आपले भाव छाया, प्रकाश व रंगसंमिश्रण यांच्या साहाय्यानें व्यक्त करण्याऐवजीं रेखांच्या वळणांनीं ते ते भाव सूचित करतात. उदाहरणार्थ, आई आपल्या तान्हया मुलाला घेऊन खेळवीत आहे हें चित्र काढतांना भारतीय चित्रकार त्या स्त्रीच्या सौंदर्याकडे किंवा मुलाच्या बाळसेदारपणाकडे लक्ष देण्याऐवजीं मातेच्या अंतःकरणांतील वात्सल्य तिच्या नेत्रावाटें कसें व्यक्त होईल व मूल त्यानें कसें संतुष्ट झालें आहे हें दाखविण्याचा यत्न करील. चित्र पाहणाराचें लक्ष वत्सलभाव दर्शनाकडेच केंद्रीभूत व्हावें म्हणून स्त्रीचें सौंदर्य व मुलाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाळसेदारपणा यास चित्रकार सहेतुक दुय्यमपणा देईल; व अशा प्रकारचें चित्र रंगरंगोटीच्या साहाय्यानें काढण्याऐवजीं चेहऱ्याच्या व अंगलटीच्या रेषा त्या भावानुरूप काढण्याकडे तो विशेष लक्ष देईल. भारतीय चित्रकलेचे बौद्ध, राजपूत, उत्तरेकडील व दक्षिणेकडील असे विविध प्रकार आहेत. उदाहरणार्थ, अजंठा येथील चित्रकला बौद्ध वळणाची व दक्षिणेकडील पोषाख व चालीरीतींची निदर्शक आहे. तर कृष्ण-गोपींचीं किंवा रागमालेचीं चित्रें हीं बव्हंशीं राजपूत वळणाचीं आहेत. (पृ. १९२)

१५. **शिल्पकला व स्थापत्य** :—भव्यपणा व प्रमाणशीरपणा हें भारतीय शिल्पकलेचें लक्षण म्हणून सांगतां येईल. जुन्या पद्धतीचे वाडे, कार्ल्याचीं कोरीव लेणीं किंवा दौलताबादचा यादवकालीन किल्ला पाहणाराच्या मनावर त्यांचा साधेपणा, भव्यपणा व बळकटी यांचा परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. हिंदु देवालयांचीं गोपुरें उंचच उंच व निमुळतीं करण्याचा उद्देश काय असावा तें सांगणें कठीण आहे. पण गोपुरांची रचना कैलास-पर्वताच्या धर्तीवर केली असल्याचें कित्येक सांगतात. तळच्या रुंद घेरापासून निमुळती होत जाणारी गोपुरांची रचना स्थूलापासून सूक्ष्माकडे व मूर्तापासून अमूर्ताकडे पाहणाराचें चित्त वळविते असें त्याचें स्पष्टीकरण देतां येईल.

१६. **किरकोळ** :—चित्रकला व शिल्पकला यांखेरीज नृत्यगायन व वाद्य या कलांत तसेंच वैद्यकासारख्या शास्त्रांतही भारतीयांचें वैशिष्ट्य आहे, नाहीं असें नाहीं. तसेंच बुद्धिबळें, फासे, द्यूत, कुस्ती हे भारतीयांचे बैठे व मर्दानी खेळ; झिम्मा, फुगडी, गरबा हे स्त्रियांचे खेळ; गौरीपूजन, नवरात्र, दिवाळी यांसारखे स्त्रीपुरुषांचे सण; धनुर्विद्या, मृगया इत्यादींचा शोक व त्यांतील भारतीयांचें कौशल्य या सर्वांचें स्वरूप समजावून घेतल्याखेरीज भारतीय संस्कृतीचें व्यापक स्वरूप समजलें असें कधींच म्हणतां यावयाचें नाहीं. पण या विषयाचें ओझरतें दर्शन विद्यार्थीवर्गास घडविण्यापुरतें वरवरचें ज्ञान देखील प्रस्तुत लेखकास या विषयासंबंधीं नाहीं; म्हणून या सर्व अंगांकडे अंगुलीनिर्देश करून मुलांची जिज्ञासा वाढविण्यापलीकडे त्यास अधिक कांहींही करतां येत नाहीं याचें वाईट वाटतें.

१७. **समारोप** :—उच्च संस्कृतीचे वारस म्हणून आपण या देशांत जन्मास आलों याचा आपणांस अभिमान वाटला पाहिजे. परंतु 'सांगे वडिलांची कीर्ति' तो कोण, तेंही समर्थांनीं आपणांस तीनशें वर्षांपूर्वीं सांगून ठेविलें आहे. प्राचीन भारतीय साम्राज्याचा इतिहास भारतीयांच्या अंतःकरणांत हा मराठी, हा मद्रासी, हा बंगाली, हा राजपूत अशा प्रकारचा प्रांतिक परकेपणा नाहींसा करील व या प्रांतिक विविधतेच्या मुळाशीं असलेलें ऐक्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनास पटवून देईल. निव्वळ मराठ्यांचा इतिहास माहीत असणाऱ्या महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या मनांत उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांतील राजपुत-चालुक्य-पल्लवांचे पराक्रम त्या त्या लोकांसंबंधीं आपलेपणा उत्पन्न करतील. प्राचीन भारताचा काल एवढा उज्ज्वल असतांना भारताच्या इतिहासांत एकदां १२ व्या शतकावर पडदा पडला म्हणजे तेव्हांपासून सात आठ शतकें भारतीयांचे डोकें वर काढण्याचे प्रयत्न अयशस्वी किंवा अल्पकाल यशस्वी झाले हें पाहून आपलें कोठें चुकलें याचा विचार मनांत उत्पन्न झाला पाहिजे. प्राचीन कालचीं साधनें आतां बदललीं आहेत. स्थलकालाच्या अंतराची अडचण राहिली नाहीं. अशा स्थितींत प्रांतीय विविधतेच्या बुडाशीं असलेल्या अमूर्त ऐक्यास मूर्त किंवा व्यक्त स्वरूप देणें अधिक हिताचें ठरेल. प्राचीन भारताचा इतिहास आपणांस असें दर्शवितो कीं, भारतीयांत पराक्रम आहे, बुद्धि आहे, त्याग आहे, पण संघटना नाहीं. संघटनेच्या अभावीं घडी विस्कटली व आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीबद्दलच्या गाढ अज्ञानामुळें आपल्या वैशिष्ट्यावर नवीन विचारांचें कलम बेमालूमपणानें लावण्याचें कोगास साधलें नाहीं. प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासकास हें वैशिष्टच कळेल व भावी भारताच्या पुनर्घटनेंत तो डोळसपणानें भाग घेईल अशी आशा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट १ लें : प्राचीन व अर्वाचीन नांवें

अंग—प. बंगाल, मोंगीर व भागलपूर जिल्हे, राजधानी चंपा, भागलपूरजवळ.
अपरांत—उत्तर कोंकण, राजधानी शूर्पारक (सोपारा) ठाणें जिल्हा
अचिरावती—शाक्य प्रांताच्या पश्चिमेकडील नदी.
अवन्ती—माळवा.
असिक्नी—चिनाब, चंद्रभागा.
अमरावती—गंतूर जिल्ह्यांत कृष्णा नदीवरील एक गांव.
आंध्र—कृष्णा व गोदावरी या नद्यांमधील प्रदेश.
आर्यावर्त—उत्तर हिंदुस्थान.
इंद्रप्रस्थ—दिल्लीनजीक आहे.
कलिंग—महानदी व गोदावरी या नद्यांचे मुखाजवळचा मधला प्रदेश, ओरिसा.
कर्णावती—अहमदाबाद.
कपिलवस्तु—शाक्यांची राजधानी.
कोंगुदेश—सालेम, कोईमतूर.
कामरूप—आसाम.
कुरु—गंगा व यमुना या नद्यांमधील वरच्या भागांत राहणाऱ्या लोकांचे वंश.
कौशांबी—वत्स प्रांताची राजधानी.
कंपिल्य—अयोध्येच्या उत्तरेकडील प्रदेश.
कान्यकुब्ज—कनोज.
कांची—कांजीवरम्.
कुशनगर—कसिया, (बुद्धाच्या मृत्यूचें ठिकाण) गोरखपूर नजीक.
कोसल—अयोध्या.
खाजुराहो—बुंदेलखंडाची राजधानी.
गांधार—कंदाहार.
गौड—बंगाल.
गुर्जर—गुजराथ.
चर्मण्वती—चंबळा.
चेदी—मध्यप्रांत.
चेर—केरळ, मलबार.
चोल—कारोमांडेल.
डांभाळ ऊर्फ डाहाळ—चेदीची राजधानी.
तक्षशिला—विश्वविद्यालयाचें ठिकाण. वायव्य सरहद्दीवरील प्रांतांत आहे.
तोसाली—कलिंग प्रांतांत आहे.
दक्षिणापथ—नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेश.
दंडकारण्य—विंध्याद्रि व गोदावरीच्या मधील डोंगराळ प्रदेश.
धनकटक—कृष्णानदीच्या मुखाशीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नालंदा—हर्षकालीन प्रसिद्ध विश्वविद्यालयाचें ठिकाण. मगधांत आहे.
निषध—विंध्याद्रीचे दक्षिणेकडील प्रांत.
पल्लव—(कांजीवरम्)
पांचाल—गंगा व यमुना यांच्या दुआबांतील खालच्या भागाचा प्रदेश.
पांड्य—पदुकोटपासून केप कामोरीनपर्यंतचा प्रदेश.
प्रतिष्ठान—पैठण.
पुरुषपुर—पेशावर.
पाटलिपुत्र—पाटणा.
पायोष्णी—तापी.
भृगुकच्छ—भडोच.
मगध—पाटणाच्या भोंवतालचा प्रदेश.
मरु—राजपुताना.
मत्स्य—जयपूर व भरतपूरचा प्रदेश.
मिथिला—विदेहाची राजधानी.
मंडोर—प्रतीहारांची राजधानी.
रोहिणी—शाक्य प्रांताच्या पूर्वेकडील नदी.
लाट—गुजराथचा पूर्वभाग.
वलभी—काठेवाड.
वातापी—बदामी.
वंग—पूर्व बंगाल.
विदेह—मगधाच्या पूर्वेकडील प्रांत, उत्तर बहार.
वेंगी—गोदावरीच्या मुखाजवळचा प्रदेश.
वैशाली—मुज्फरपूर जिल्हा.
वत्स—प्रयागप्रांत.
विदर्भ—वऱ्हाड.
वितस्ता—झेलम.
शूरसेन—मथुरा जिल्ह्यांत आहे.
शतद्रू—सतलज.
श्रावस्ती—कोसलांचें मुख्य शहर.
शाकल—सियालकोट.
शाक्य—नेपाळच्या दक्षिणेकडील तराई.
सौराष्ट्र—काठेवाड.
सरस्वती—हल्लीं गुप्त झालेल्या पंजाबांतील नदीचें नांव
(अर्थ—सरोवरें असलेली नदी.)
हस्तिनापूर—दिल्लीनजीक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट १ लें : भारतांतील प्रमुख राजवंश व राजे

अतिप्राचीन युग (इ. स. पू. २००० ते इ. स. ३२१)

मगधांचें राज्य

शिशुनागवंश इ. स. पू. ६४२–४१३
- १ बिंबिसार इ. स. पू. ५८२–५४ (राजधानी राजगृह)
- २ अजातशत्रु इ. स. पू. ५५४–५२७
- ३ दर्शक इ. स. पू. ५२७–५०३
- ४ उदय (राजधानी पाटलीपुत्र)

नंदवंश इ. स. पू. ४१३–३२१

प्राचीन काळ (इ. स. पू. ३२१ ते इ. स. १२०५)

मौर्य इ. स. पू. ३२१–१८५
- १ चंद्रगुप्त इ. स. पू. ३२१–२९८
- २ बिंदुसार इ. स. पू. २९८–२७३
- ३ अशोक इ. स. पू. २७३–२३२

शुंग घराणें इ. स. पू. १८५– ७३
- पुष्यमित्र इ. स. पू. १८१–१४९

कण्व घराणें इ. स. पू. ७३ – २७

आंध्र घराणें इ. स. पू. २७–इ. सनाचें तिसरें शतक

(दक्षिणेंत त्यांचा अंमल इ. स. पू. तिसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या पांचव्या शतकापर्यंत होता.)
- १ गौतमीपुत्र शालिवाहन इ. स. १०६–१३०
- पुलमायी शालिवाहन इ. स. १३०–१५८

सिंधचे पार्थियन राजे इसवी सनापूर्वी दुसरें शतक ते इसवी सनाचें दुसरें शतक.

पुरुषपूर (पेशावर) चें कुशान घराणें

इ. स. च्या पहिल्या शतकापासून इ. स. २२० पर्यंत
- सम्राट् कनिष्क इ. स. १२०–१६२

गुप्त घराणें इ. स. ३२०–६००
- १ पहिला चंद्रगुप्त इ. स. ३२०–३३०
- २ समुद्रगुप्त इ. स. ३३०–३७५
- ३ दुसरा चंद्रगुप्त (विक्रमादित्य) इ. स. ३७५–४१३
- ४ कुमारगुप्त इ. स. ४१३–४५५
- ५ स्कंदगुप्त इ. स. ४५५–४८०

शक राजे इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून ते पांचव्या शतकापयत.
- रुद्रदामन इ. सनाचें दुसरें शतक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्धन घराणें	इ. स. ५८३–७०० (अजमासें)
१ प्रभाकरवर्धन	इ. स. ५८३–६०६ (राजधानी स्थानेश्वर)
२ हर्ष	इ. स. ६०६– ४७ (राजधानी कनोज)
वर्म घराणें	अजमासें आठवें शतक ते इ. स. ८१०
यशोवर्मा	मृत्यु इ. स. ७४०
पाल घराणें	इ. स. ८१०–१६
	बंगाल्यांत इ. स. ७५०–११९९
गोपाल	इ. स. ७५०
धर्मपाल	इ. स. ८१०
देवपाल	
महीपाल	इ. स. १०२०
सेन घराणें (बंगाल)	बारावें शतक
कनोजचे प्रतीहार	इ. स. ७२५–१०२०
नागभट्ट	इ. स. ७२५
ककुस्थ	
वत्स	
दुसरा नागभट्ट	इ. स. ८२५
भोज	इ. स. ८२५–८९०
महेंद्रपाल	इ. स. ८९०–९०८
उत्तरेकडील राजघराणीं—	
राठोड घराणें	अकरावें व बारावें शतक
धारचे परमार	दहावें शतक ते अकरावें शतक
कृष्णराज	इ. स. ९१४
भोज	इ. स. १०१८–१०६०
बुंदेलचे चंदेल्ल	नववें शतक ते सोळावें शतक
कीर्तिवर्मा	अकराव्या शतकाचा मध्यभाग
चितोडचे गुहिलोत	आठवें शतक ते विसावें शतक
बाप्पा रावळ	इ. स. ७३०–७६३
सांबरचे चाहमान ऊर्फ चव्हाण (राजधानी अजमीर व दिल्ली)	इ. सनाचें बारावें शतक.
पृथ्वीराज चव्हाण मृत्यु	इ. स. ११९३
गुजरायचे चावडा	आठवें व नववें शतक
गुजराथचे चालुक्य (सोळंखी)	इ. स. ९६१–१२९७
मूळराज	इ. स. ९६१–९९६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भीम	इ. स. ९९६–१०६४
कर्ण	इ. स. १०६४–१०९४
कुमारपाल मृत्यु	इ. स. ११७४
चेदीचे कलचूरी	नववें शतक ते अकरावें शतक.
कोकल्ल	
युवराज	
गांगेय मृत्यु	इ. स. १०४१
कर्ण	इ. स. १०५२
दक्षिणेंतील राजघराणीं—	
वातापीचे चालुक्य	सहावें शतक ते इ. स. ७५३
दुसरा पुलकेशी	इ. स. ६०९–६४२
मालखेडचे राष्ट्रकूट	इ. स. ७५३–९८३
अमोघवर्ष	इ. स. ८१५–८७७
कल्याणीचे चालुक्य	इ. स. ९८२–११९०
विक्रमादित्य	इ. स. १०७६–११२७
देवगिरीचे यादव	इ. स. ११८७–१३१८
भिल्लम	इ. स. ११८७–११९१
सिंघण	इ. स. १२१०–१२४६
कृष्ण	इ. स. १२४७–१२६०
महादेव	इ. स. १२६०–१२७२
रामदेव	इ. स. १२७२–
द्वारसमुद्राचे होयसळ	इ. स. ११९०–१३२६
विष्णुवर्धन वीरबल्लाळ–	इ. स. १३१०–१३३९

चोल (पूर्व किनारा) **चे पल्लव** इसवी सनाचें तिसरें शतक ते इ. स. ९०७ (मुख्य शहर कांची ऊर्फ कांजीवरम्)

तंजावरचे चोल	इ. स. ९०७–१२६७
राजराज (पहिला)	इ. स. ९८५–१०१२
राजेंद्र पहिला	इ. स. १०१२–४२
राजेन्द्र (तिसरा) ऊर्फ कुलोत्तुंग	इ. स. १०७०–१११८

चेर (पश्चिम किनारा) राजे प्रसिद्ध नाहींत.

पांड्य (पदुकोट ते केप कामोरीन) बारावें व तेरावें शतक (मुख्य शहर मदुरा)

जातवर्मकुलशेखर	इ. स. ११९०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिशिष्ट ३ रें

सनावली

इसवी सनापूर्वी—

२००० आर्यांची सप्तसिंधुकांठीं वसाहत

५६३ गौतमबुद्धाचा जन्म.

५४० महावीर वर्धमानाचा जन्म

४८३ गौतमबुद्धाचा मृत्यु.

४६८ महावीर वर्धमानाचा मृत्यु

४१३ शिशुनाग घराण्याचा अंत व नंद घराण्याची स्थापना.

३२९ अलेक्झांडरची पहिली स्वारी

३२७ अलेक्झांडरची दुसरी स्वारी.

३२६ पौरव-अलेक्झांडर युद्ध.

३२५ अलेक्झांडरचें स्वदेशीं प्रयाण.

३२३ अलेक्झांडरचा मृत्यु.

३२१ चंद्रगुप्ताची मगध देशावर स्वारी : नंदांना धुळीस मिळवून राज्यपद प्राप्ति.

३१५ चंद्रगुप्ताची उत्तर भारतांत साम्राज्य स्थापना.

२९८ चंद्रगुप्ताचा मृत्यु व बिंदुसारचें राज्यारोहण.

२७३ अशोकाचें राज्यारोहण.

२६९ अशोकास राज्याभिषेक.

२६२ अशोकाची कलिंगवर स्वारी

२३२ अशोकाचा मृत्यु.

२२० आंध्र राज्याची स्थापना

१९० बॅक्ट्रियाचा ग्रीक राजा डेमिट्रियस याची स्वारी : मौर्य घराण्याचा शेवट.

१८५ शुंग घराण्याची स्थापना.

१२० शकांची बॅक्ट्रियावर स्वारी

७३ कण्व घराण्याची स्थापना व शुंग घराण्याचा अंत.

५७ विक्रम संवताला सुरुवात.

२७ कण्व घराण्याचा शेवट.

इसवी सनानंतर—

२५ कुशाणांची स्वारी व मिनॅंडरच्या राज्यवंशाचा शेवट.

७८ शालिवाहन शकास प्रारंभ.

१०६ गौतमीपुत्र शालिवाहन गादीवर आला.

१२० कनिष्क कुशाणांच्या गादीवर आला.

१३० पुलुमायी शालिवाहन गादीवर आला.

१५८ पुलुमायी शालिवाहनाचा मृत्यु.

१६२ कनिष्काचा मृत्यु.

३२० पहिला चंद्रगुप्त पाटलीपुत्राचे गादीवर बसला व गुप्त घराण्याची स्थापना केली.

३३० समुद्रगुप्त गादीवर बसला.

३७५ समुद्रगुप्ताचा मृत्यु व विक्रमादित्याचें राज्यारोहण.

४१३ विक्रमादित्याचा मृत्यु व कुमारगुप्ताचें राज्यारोहण.

४५५ कुमारगुप्ताचा मृत्यु व स्कंदगुप्ताचें राज्यारोहण.

४८० स्कंदगुप्ताचा मृत्यु.

४९९ तोरमान हूणाकडून गुप्तांचा उज्जयिनी येथें पराभव.

५२८ मिहिराकुल हूणाचा कोरूर येथें यशोधर्म्याकडून पराभव.

६०६ हर्षवर्धन गादीवर आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६४७ हर्षवर्धनाचा मृत्यु.
७११ मुहंमद कासीमची भारतावर पहिली स्वारी.
७१७ पारशी भारतांत आले
७३० बाप्पा रावळ चितोडचे गादीवर आला.
७५० पाल घराण्याची स्थापना.
७५७ राष्ट्रकूट घराण्याची स्थापना
७८८ आद्य शंकराचार्यांचा जन्म.
८१० वर्म घराण्याचा शेवट.
८१६ पालांना हुसकून नागभट्ट गादीवर आला.
८२५ नागभट्टाचा मृत्यु.
८४० भोजराजा गादीवर आला.
८९० भोजराजाचा मृत्यु.
९१४ परमार घराण्याची स्थापना.
९६१ चालुक्य घराण्याची स्थापना.
९६७ सुलतान महमुदाचा जन्म.
९८२ राष्ट्रकूट घराण्याचा शेवट.
९८२ दुसऱ्या चालुक्य घराण्याची स्थापना.
१००१ महंमूद गझनवीची भारतावर पहिली स्वारी.
१०२० प्रतीहार राज्याचीं शकलें झालीं.
१०२४ सोरटी सोमनाथवर गझनीच्या महंमुदाची स्वारी.
१०३० महंमुद गझनवीचा मृत्यु.
११६० लिंगायत धर्माची स्थापना.
११७२ शहाबुद्दीन घूरी राज्यावर आला.
११७८ घूरी राजाची गुजराथवर पहिली स्वारी.
११९१ तरायनची लढाई—पृथ्वी-राजाचा जय.
११९२ स्थानेश्वरची लढाई-पृथ्वीराजाचा पराजय.
१२०५ शहाबुद्दीन घूरीचा खून.
१२९४ अलाउद्दीन खिलजीची देवगिरीवर स्वारी.
१३०७ मलिककाफूरची देवगिरीवर पहिली स्वारी.
१३०९ मलिककाफूरची देवगिरीवर दुसरी स्वारी.
१३१८ मुबारक खिलजीची देवगिरीवर स्वारी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जग व भारत : समकालीन घडामोडी

इ. स. पूर्वी ६०० ते इ. स. १२००

जग	इ. स. पूर्वी		भारत
पायथॅगोरस : पृथ्वीचें गोलत्व सिद्ध करणारा तत्त्वज्ञानी.	५८२	५६३	गौतम बुद्धाचा जन्म
		४८३	गौतम बुद्धाचा मृत्यु
ग्रीस व पर्शियामधील थर्मॉपिलीचें युद्ध	४८०		
सॉक्रेटिसाचा अंत	३९९	३२७	शिकंदराची स्वारी
चीनचा प्रचंड तट बांधणारा शी वांग टी राजा	२४६	३२१	मौर्य साम्राज्य
		२७३	अशोकास राज्याभिषेक
हिंदू राज्य सयामांत स्थापन	९५	५७	विक्रम संवतास प्रारंभ
	इ. स. नंतर		
येशू ख्रिस्ताचा वध	३०	७८	शालिवाहन शकास प्रारंभ
रोमन बादशाहीचा उत्कर्षकाल	११७	१२०	कनिष्क गादीवर बसला
चीनमध्ये ब्लॉक प्रिंटिंग माहीत होतें	१७५	१५८	शालिवाहनाचा मृत्यु
		३२०	गुप्तांचें साम्राज्य
चिनी मातीचीं भांडीं	२६२	३७५	चंद्रगुप्त दुसरा
चीनांतून कोरियांत बौद्ध धर्माचा प्रवेश	३७२	३९९–४१४	फाहिएनचा प्रवास
		५ वें शतक	कालिदास
मुहंमद पैगंबराचा जन्म	५७०	६०६	हर्षास राज्यप्राप्ति
इंग्लंडांत ख्रिस्ती धर्माचा प्रवेश	५९९	७११	महंमद कासीमची स्वारी
मुहंमदाचा मृत्यु	६३२	७३०	बाप्पा रावळ चक्रवर्ती
चार्लस मार्टेलकडून मुसलमानांचा पराभव	७३२	८२०	आद्य शंकराचार्यांचा काल
हरून अल् रशीद : बगदादचा खलिफा	७८६	१०२४	गझनीच्या महमुदाची सोमनाथावर स्वारी
इंग्लंडांत आल्फ्रेड राजा	८७१	१०६०	धारचा परमार भोज; धार येथें विद्यापीठाची स्थापना
इंग्लंडांत कॅन्यूट राजा	१०१६		
पहिला विल्यम इंग्लंडचा राजा	१०६६	११६०	लिंगायत धर्माची स्थापना
धर्मयुद्धास सुरुवात	१०९५	११९२	महंमद घूरी व पृथ्वीराज यांची लढाई
होकायंत्राचा शोध	१२००		
मग्ना चार्टा	१२१५		
चंगीझखानाचा मृत्यु	१२२७	१२८८	मार्को पोलो (भारतांत)

अभ्यास :—जगांतील व हिंदुस्थानांतील या समकालीन घडामोडींचा विद्यार्थ्यांकडून आलेख तयार करावा. दर इंचास २०० वर्षें या प्रमाणांत ९ इंची पट्टीवर डाव्या-उजव्या बाजूस तीं तीं वृत्तें लिहावीत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारताचा सांस्कृतिक इतिहास

भाग दुसरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंड ३ रा

मध्ययुग

(इ. स. १२०५ ते इ. स. १८१८)

मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून मराठेशाहीच्या अखेरीपर्यंत

भाग १८ वा

सुलतानशाहीचा उदय

(इ. स. १२०५ ते इ. स. १३१६)

१. **मध्ययुगाचें स्वरूप :**—शहाबुद्दीन घूरीनें पृथ्वीराजाचा पराभव केल्यापासून भारतीय इतिहासास वेगळें वळण लागतें. बाराव्या शतकाच्या अखेरीपासून पुढील सहाशें वर्षांच्या काळांत भारतानें सुलतानशाही, विजयनगरचें हिंदु साम्राज्य, मोगल बादशाही व मराठेशाही अशा चार राजवटींचे चढउतार पाहिले. हिंदु-मुसलमानांचा संघर्ष व सहवास हा या काळांतील कथानकाचा मुख्य धागा होय. भारतीय संस्कृतीस या काळांत परकीयांच्या आग्रही धर्मवेडाविरुद्ध प्राणपणानें झुंज खेळावी लागली. अखेर सहिष्णुतेनें धर्मांधतेवर मात केली. मुसलमानांच्या आगमनानें भारतीयांच्या समाजरचनेवर फार महत्त्वाचे परिणाम झाले; किंबहुना इस्लामच्या सहवासानें भारतीय संस्कृतीचें मूळचें स्वरूपही पालटलें यांत शंका नाहीं. याप्रमाणें उभयतांच्या परस्पर संबंधांत आंदोलन चालू असतां सोळाव्या शतकांत येथें पाश्चिमात्य व्यापाऱ्यांचें आगमन झालें व त्यांनीं हिंदु व मुसलमान या दोघांवरही मात करून जो विजय संपादन केला तो नुसता लष्करी व राजकीय स्वरूपाचाच नसून बौद्धिक, आर्थिक, शास्त्रीय असा सर्वांगीण स्वरूपाचा होता. प्रखर बुद्धिवाद, व्यवस्थित व्यापारी संघटना, शिस्त व शास्त्रीय शोध या चतुष्टयानें जणूं पाश्चिमात्यांच्या रूपानें भारतांत प्रवेश केला. प्रथम ते व्यापारी आक्रमक म्हणून आले व नंतर येथें राजकीय वर्चस्व संपादन केलें. परंतु त्यांच्या सहवासानें अखेर या देशांतील मध्ययुगीन राजवटीचा, धर्मकल्पनेचा व समाजरचनेचा हलके हलके ऱ्हास होऊन एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं भारतास स्वतःच्या प्राचीन संस्कृतीची ओळख पटत चालली व भारतांत आधुनिक युगास सुरुवात झाली. 'आधुनिक युगाचें आगमन' ही जगाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतिहासांत सर्वत्र घडून आलेली घटना आहे; पण कोठें ती सोळाव्या शतकांत घडून आली, तर कोठें त्यासाठीं एकोणिसावें शतक उजाडलें. अजूनही सर्वत्र हें युग अवतरलें असें म्हणतां येत नाहीं. असो. भारतीय इतिहासाच्या या तिसऱ्या खंडांत वर सांगितलेल्या चार राजवटींचें समालोचन करून त्यांचे भारतीय जीवनावर घडून आलेले परिणाम लक्षांत घ्यावयाचे. प्रस्तुत भागांत शहाबुद्दिनाचा दिल्ली येथील प्रतिनिधि जो कुतुबुद्दीन त्यानें स्थापन केलेल्या सुलतानशाहीचें स्वरूप कसें होतें हें पहाणें जरूर आहे.

२. गुलाम वंशाची स्थापना :—कुतुबुद्दीन हा शहाबुद्दिनाचा गुलाम होता म्हणून मागें सांगितलेंच आहे. 'गुलाम' शब्दाचा आपण सामान्यत: समजतों तो अर्थ येथें घेतां कामा नये. मुसलमानांत गुलाम राखण्याची चाल होती. परंतु त्यांना फारच चांगल्या रीतीनें वागविलें जात असे व कित्येक वेळां राजपुत्रांपेक्षां गुलामच जास्त कर्तबगार निपजत. यामुळें या काळच्या मुसलमानी अंमलांत आपणांस अनेकदां दृष्टीस पडतें कीं, कर्तबगार गुलाम ऐदी राजपुत्रास बाजूस सारून किंवा नामधारीपणानें सिंहासनावर ठेवून सत्ताधीश बनले आहेत. एकंदरींत मुसलमानांमधील गुलाम ही संस्था हीन स्थितींत जन्मलेल्या मनुष्यास आपल्या अंगच्या कर्तबगारीनें उच्च स्थितीप्रत नेण्यास फारच उपयोगी होती यांत शंका नाहीं.

३. कुतुबुद्दीन ऐबक :—कुतुबुद्दिनाखेरीज शहाबुद्दिनाचे आणखी तीन गुलाम तीन ठिकाणीं सुभेदार म्हणून होते, व शहाबुद्दीन इ. स. १२०५ मध्यें मरण पावल्यावर ते सर्व आपआपल्यापरी स्वतंत्र झाले. कुतुबुद्दिनाची मुख्य कामगिरी म्हणजे दिल्लीपासून गुजराथपर्यंतच्या प्रदेशांत मुसलमानी सत्ता कायम स्थापणें ही होय व ती त्यानें शहाबुद्दीन जिवंत असतांनाच बहुतेक तडीस नेलेली होती. शहाबुद्दीन मरण पावल्यावर त्यानें सुलतान ही पदवी धारण केली. कुतुबुद्दिनास आपल्या अंगच्या दातृत्वामुळें लखबक्ष ही पदवी मिळालेली होती. तो कलाकौशल्याचा मोठा भोक्ता होता. दिल्ली येथील जुम्मामशीद व कुतुबमिनार नांवाचा मनोरा यांची उभारणी त्यानें सुरू केली, व ती पुढें इल्तमशनें पुरी केली असावी असें मानतात. कुतुबमिनार* अडीचशें फूट उंच असून त्याच्यावर कुराणांतील वाक्यें कोरलेलीं आहेत. ह्या इमारतीस व मनोऱ्यास लागलेले दगड त्यानें हिंदूंचीं देवळें फोडून आणले. तो इ. स. १२१०त मरण पावला. कुतुबुद्दीन जातीनें तुर्क होता.

*हा मिनार त्यानें बांधला कीं, तत्पूर्वी कोण्या हिंदू राजानें आधीं बांधलेला होता व त्यांत कुतुबुद्दिनानें कांहीं फेरफार केले, याबद्दल इतिहास संशोधकांत वाद आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. **सुलताना रेझिया** :—कुतुबुद्दिनाच्या मागून त्याच्या मुलास बाजूस सारून त्याचा गुलाम शमसुद्दीन इल्तमश हा गादीवर बसला. त्याच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षांनीं त्याची मुलगी 'सुलताना रेझिया' ही राज्यकारभार पाहूं लागली. ती कर्तबगार होती व मर्दानी पोषाक करून राज्यकारभार करण्याकरितां दरबारांत बसत असे. परंतु तत्कालीन मुसलमान सरदारांस एका स्त्रीनें राज्यकारभार करावा ही कल्पनाच सहन होईना! व त्यांनीं बंड उभारलें. लोकांचा रोष शमविण्याकरितां या धोरणी स्त्रीनें त्या सरदारांपैकीं एका मुख्याबरोबर लग्न लाविलें व कारभार पाहूं लागली, परंतु तरीही लोकांचें समाधान झालें नाहीं. खुद्द तिचा भाऊ तिजविरुद्ध उठला. त्यानें तिच्या नवऱ्यास ठार केलें व तिला कारभारावरून दूर केलें (इ. स. १२३९).

५. **बाल्बन** :—तिच्या मागून कांहीं वर्षांनीं सर्व सत्ता बाल्बनच्या हातीं गेली. हाही इल्तमशचा गुलामच होता. हातांत कारभार येतांच त्यानें चुकार व ऐदी सरदारांस लष्करी कामगिरीवर वेठीस धरलें. हे सरदार इनामी जमिनीचा उपभोग घेत, पण लष्करी नोकरीची टाळाटाळ करीत. बाल्बननें त्यांना कह्यांत आणलें. तसेंच दरबारांतील चैनबाजीस आळा घालून तेथें वागण्याचे नियम ठरवून दिले व त्यांची कडक अंमलबजावणी केली. या योगानें बाल्बनचा राज्यांत सर्वत्र दरारा बसला. सुलतान म्हणजे आपल्यांतलाच कोणी एक आहे अशी जी या काळांतील मुसलमान सरदारांची समजूत होती तिला त्यानें धक्का दिला व बादशाह हा सर्वश्रेष्ठ आहे असें प्रस्थापित केलें.

६. **स्वाऱ्या व योग्यता** :—बाल्बनचा कारभार मोठा कडक होता. त्यानें आपल्या बरोबरीच्या तुर्की सरदारांस पूर्णपणें दाबांत ठेविलें. तो स्वभावानें क्रूर असून हिंदूंचा कट्टा द्वेष्टा होता. त्यांचा त्यानें अत्यंत छळ केला. इ. स. १२८२ सालीं बंगाल्यांत तुघ्रलखान नांवाच्या त्याच्या सरदारानें बंड केलें, तेव्हां बाल्बननें त्याजवर स्वारी करून त्यास ठार केलें. नंतर त्यानें तुघ्रलखानास सामील होणाऱ्या लोकांची चौकशी सुरू केली, हजारों लोकांस ठार मारून रक्ताचे पाट वाहविले. तसेंच त्यानें वायव्येकडून येणाऱ्या मोंगलांच्या टोळधाडीचाही बंदोबस्त केला. बाल्बन इ. स. १२८६ त मृत्यु पावला. बाल्बन हा विद्वानांचा चाहता होता. त्यानें स्वत: तीस हजार फारसी कवनांचा संग्रह केला आहे. तो हयात असतांना त्याचा सर्व राज्यांत चांगलाच दरारा होता; परंतु त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या घराण्यांत राज्य फार दिवस टिकलें नाहीं.

७. **गुलामवंशाचा शेवट** :—बाल्बनचा नातू कैकूबाद हा गादीवर बसला, परंतु तो विलासमग्न होता; त्यामुळें राज्यांत अव्यवस्था माजली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १२८८त जलालुद्दीन खिलजी नांवाच्या एका सरदारानें कैकूबादास व त्याच्या मुलास ठार मारून दिल्लीचें राज्य बळकाविलें. याप्रमाणें गुलाम वंशाचा शेवट झाला.

८. अलाउद्दीन खिलजी (इ. स. १२९६–१३१६) :—जलालुद्दीन खिलजी हा जन्मानें तुर्क परंतु वळणानें अफगाण होता. अफगाण लोकांस पठाण असेंही म्हणतात. दिल्लीच्या तख्तावर या घराण्याचा अंमल फक्त तीस वर्षें टिकला. त्यांच्यांतील सर्वांत कर्तबगार पुरुष जलालुद्दिनाचा पुतण्या अलाउद्दीन हा होय. त्याच्या कारकीर्दींत मुसलमानांचा अंमल दक्षिणेस मदुरेपर्यंत व पूर्वेस वरंगळपर्यंत पसरला होता. इ. स. १२९४ त त्यानें बुंदेलखंड व माळवा या प्रांतांत उत्पन्न झालेलीं बंडें मोडून काढिलीं. विंध्याद्रीच्या दक्षिणेकडील प्रदेशाची व तेथील वैभवाची कीर्ति तो फार दिवस ऐकून होता. तेव्हां दिग्विजय करण्यास प्रथम तिकडे जावें, असें त्याच्या मनानें घेतलें. मुलूखगिरी करण्याच्या हेतूनें दक्षिणेंत पाऊल टाकणारा हाच पहिला मुसलमान सरदार होय. निघतांना त्यानें आपल्या चुलत्यासही हा बेत कळूं दिला नाहीं. इ. स. १२९४ त विंध्याद्रीच्या आसपासचा सातशें मैलांचा मुलूख ओलांडून तो दक्षिणेंत देवगिरीच्या राज्यांत आला व त्यावर अचानक हल्ला केला. तेथील राजा रामदेवराव याची कांहींच तयारी नसल्यामुळें तो अगदीं घाबरून गेला व त्याचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां अलाउद्दिनानें त्याजपासून दरसाल खंडणी पाठविण्याचें कबूल करून घेतलें व तो परत दिल्लीस आला. यानंतर त्यानें दरबारच्या अनेक सरदारांस लांच देऊन फितविलें व एक दिवस आपल्या चुलत्यास दगलबाजीनें ठार मारलें व आपण दिल्लीचें तक्त बळकाविलें (इ. स. १२९६).

अलाउद्दीन खिलजी

९. अलाउद्दिनाच्या स्वाऱ्या :—अलाउद्दिनास मुख्यत: दोन शत्रू होते. एक वायव्येकडून एकसारख्या स्वाऱ्या करणारे मोंगल व दुसरे संधि सांपडतांच आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित करणारे राजपूत हे होत. ह्यांपैकीं मोंगलांचा पहिला हल्ला इ. स. १२९७ त आला. तो त्यानें परतवून लाविला. यानंतर इ. स. १२९८ त त्यानें गुजराथवर स्वारी केली व तेथील राजाचा पराभव करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता काठेवाडांत शिरला व सोरटी सोमनाथाच्या देवालयांत जाऊन त्या ठिकाणीं नवीन बसविलेली मूर्ति आपल्याबरोबर आणून त्यानें तिचा सिंहासनाच्या पायरीप्रमाणें उपयोग केला.

१०. त्याचे शेखमहंमदी बेत :—अशा रीतीनें कारकीर्दीच्या प्रारंभींच त्यास एकामागून एक विजय मिळत गेल्यामुळें त्याचे डोळे धुंद झाले व तो मोठमोठे बेत करूं लागला. त्यास क्षणांत वाटे कीं, आपण एक निराळाच धर्म स्थापन करून प्रतिपैगंबर व्हावें, तर दुसऱ्या क्षणांत त्यास वाटे कीं, पैगंबर होण्यापेक्षां सैन्य घेऊन जग जिंकण्यास निघावें व प्रतिअलेक्झांडर व्हावें. ह्या काळांत पाडलेल्या कांहीं नाण्यांवर त्यानें आपल्या नांवापुढें 'दुसरा अलेक्झांडर' अशी पदवी कोरलेलीही आहे. परंतु लौकरच एका निर्भीड मुसलमान गृहस्थाच्या सल्ल्यावरून त्यानें आपले हे दोन्ही बेत रद्द केले. त्या गृहस्थानें अलाउद्दिनास चक्क सांगितलें कीं, "धर्मस्थापना करणें हें तुझें काम नव्हे आणि तूं जग जिंकण्याची हांव बाळगतोस त्यापेक्षां तुझ्या अगदीं जवळच्या राजपूत राजांना तूं कां जिंकीत नाहींस ? व मोंगलांच्या हल्ल्यांचा अजिबात बंदोबस्त कां करीत नाहींस ?" लहरी सुलतान ह्या निर्भीड बोलण्यानें चिडतो कीं काय अशी त्या गृहस्थास मोठी धास्ती पडली होती, परंतु अलाउद्दिनानें त्याच्या बोलण्याचा राग न मानतां उलट त्यास बक्षीस दिलें.

११. पद्मिनीचा लोभ :—इ. स. १३०० त अलाउद्दिनानें राजपुतांना जिंकण्याचा बेत ठरवून चितोडवर स्वारी केली. कारण चितोडचे राजे हे बाप्पा रावळचे वंशज राजपुतान्यांत प्रमुख असून त्यांचा मोड झाला म्हणजे सर्वांना दरारा बसेल असें त्यास वाटलें. चितोड येथें लक्ष्मणसिंग राज्य करीत होता. त्याचा चुलता भीमसिंग याची बायको पद्मिनी ही फार सुस्वरूप होती, तिचाही लोभ अलाउद्दिनास होताच. चितोडवर त्यानें दोन स्वाऱ्या केल्या. त्यांपैकीं पहिल्या स्वारीचे वेळीं अलाउद्दिनानें दगलबाजी करून भीमसिंगास कैद केलें व पद्मिनी मिळाल्याशिवाय त्याची सुटका होणार नाहीं असें कळविलें. तेव्हां पद्मिनीनें एक युक्ति योजिली व स्वतः येण्यास कबूल असल्याचें सुलतानास कळविलें. पद्मिनीचा लवाजमा म्हणून बुरखा घेतलेल्या अनेक पालख्या भोयांबरोबर पाठविण्यांत आल्या. वास्तविक त्यांत पद्मिनीही नव्हती व दासीही नव्हत्या. प्रत्येक पालखींत शूर हत्यारबंद शिपाई होते; व भोईही हत्यारबंद राजपूत होते. त्यांनीं अलाउद्दिनाच्या गोटांत शिरून आयत्या वेळीं एकच गोंधळ उडवून दिला व भीमसिंगास मुक्त केलें. या प्रकारामुळें अलाउद्दिनास तेथून कशीबशी सुटका करून घेणें भाग पडलें. पण पुढील वर्षीं म्हणजे इ. स. १३०४ सालीं त्यानें मोठ्या तयारीनिशीं चितोडवर स्वारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. ह्या वेळीं चितोड जिंकलें जाणार असें पाहतांच सर्व राजपूत स्त्रियांनीं पुढील बेअब्रू टाळण्याकरितां खुषीनें अग्नींत उड्या टाकल्या. ह्या कृत्यास 'जोहार' असें म्हणतात. अशा रीतीनें प्राणांची आहुति देऊन अब्रूचें रक्षण करणाऱ्या राजपूत स्त्रिया यावच्चंद्रदिवाकरौ भारताच्या इतिहासांत आदरणीय राहतील यांत शंका नाहीं. अलाउद्दिनानें त्या वेळीं चितोड काबीज केलें. परंतु त्याच्या मृत्यूपूर्वींच इ. स. १३१३ सालीं हमीर नांवाच्या शूर राजपूत सरदारानें चितोडास पुन्हां स्वातंत्र्य मिळवून दिलें.

१२. त्याच्या सुधारणा :—इ. स. १३०३ सालीं मोंगल लोकांचा दुसरा हल्ला आला व या वेळीं तर त्यांनीं थेट दिल्लीपर्यंत चाल केली. पण सुदैवानें मोंगल वावटळीप्रमाणें जसे एकाएकीं आले तसेच परतही गेले. परंतु ह्यावरून त्यानें धडा घेतला व मोंगलांशीं तोंड देण्याची तयारी केली. त्यानें लाहोरनजीक दीपलपूरच्या किल्ल्याला तटबंदी केली, एक मोठें खडें सैन्य उभारलें व त्यांतील शिपायांचे पगार ठरवून दिले. तेवढ्या पगारांत शिपायांस नीट राहतां यावें म्हणून त्यानें राजधानींतील बाजारभावही ठरवून टाकले व बाहेर कांहींही दर असला तरी राजधानींत गहूं, बाजरी, तांदूळ वगैरे जिन्नस ठराविक दरानें च मिळाले पाहिजेत असा निर्बंध घातला व बाजारांत जिनसांची वाण पडूं नये म्हणून त्यानें ठिकठिकाणचा वसूल धान्याच्या रूपानें घेण्याचा प्रघात पाडला. याशिवाय वजनामापांचीं प्रमाणें ठरवून दिलीं व त्यांचा नीट अंमल होतो कीं नाहीं हें पाहण्यास सरकारी अंमलदारांची योजना केली. अलाउद्दिनाच्या कडव्या शासनपद्धतीमुळें राजधानींत बाजारभाव कायम राहिले असतील. परंतु कोणत्याही जिनसांचे बाजारभाव मागणी व पुरवठा यांच्या प्रमाणावर अवलंबून असल्यामुळें सरते शेवटीं असल्या बाबतींत सरकारी हुकुमांचा शब्दशः अंमल होणें कठिण आहे. पण तें कसेंही असलें तरी अलाउद्दिनाचे हुकूम तेवढ्यापुरते अंमलांत आले, व त्याचें सैन्यही उत्तम प्रकारें तयार झालें. इ. स. १३०५ मध्यें मोंगलांनीं पुनः स्वारी केली. तेव्हां अलाउद्दिनाच्या सैन्यानें त्यांना पिटाळून लाविलें. इतकेंच नव्हे तर दिल्ली येथें जे कित्येक मोंगल लोक मुसलमानी धर्म स्वीकारून 'मोंगलपुरा' नांवाच्या विभागांत राहात होते, त्यांच्यावरही अलाउद्दिनानें हत्यार उपसलें, हजारों मोंगलांचा वध केला व त्यांच्या हाडांचा व रक्ताचा दिल्लीची तटबंदी बांधण्यास उपयोग केला !

१३. मलिक काफूरच्या दक्षिणेंतील स्वाऱ्या :—मोंगलांचा व राजपुतांचा याप्रमाणें बंदोबस्त चालू असतां अलाउद्दिनानें आपला विश्वासू सरदार मलिक काफूर यास दक्षिणेकडे स्वारीवर पाठविलें. कारण देवगिरीचा राजा रामदेवराव यानें अलीकडे खंडणी पाठविण्याचें बंद केलें होतें. काफूरनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १३०८ मध्यें त्याजवर स्वारी करून त्यास कैद केलें व दिल्लीस पाठविलें. अलाउद्दिनानें त्यास सन्मानानें वागविलें व त्याजपासून खंडणी देण्याचें कबूल करून घेऊन त्याचें देवगिरीचें राज्य त्यास पुनः परत दिलें. इ. स. १३०९ मध्यें काफूरनें पूर्व किनाऱ्यावर तेलंगण प्रांतावर स्वारी केली व वरंगळचा किल्ला सर केला. तेव्हां तेथील राजानेंही दिल्लीच्या सुलतानाचें आधिपत्य कबूल करून त्यास खंडणी देण्याचें कबूल केलें. पुढील वर्षी काफूरनें दक्षिणेंत आणखी एक स्वारी करून देवगिरीच्या दक्षिणेकडील होयसळांच्या राज्यावर स्वारी केली व त्यांची द्वारसमुद्र ही राजधानी काबीज केली. पुढें त्यानें मदुरेपर्यंतचा मुलूख काबीज करून ठिकठिकाणीं आपले अधिकारी नेमले व शेवटीं कारोमांडेल किनाऱ्यावर एका मशिदीची स्थापना करून आपण दिल्लीस परत गेला. जातांना त्यानें बरोबर ६१२ हत्ती, २०,००० घोडे व पुष्कळ सोनें लूट म्हणून नेलें असें म्हणतात.

१४. अलाउद्दिनाची योग्यता :—अलाउद्दीन हा जुलमी परंतु कर्तबगार इसम होता यांत शंका नाहीं. आपल्या राज्याचा बंदोबस्त ठेवण्यास त्यानें अनेक कडक उपाय योजिले. त्यानें लेखणीच्या एका फटकाऱ्यानें सरदारांच्या जहागिरी जप्त केल्या व त्यांच्या बंडखोर वृत्तीचें मूळ खणून काढलें. त्याचें असें मत होतें कीं, हिंदु लोक हे आपल्या पोटापाण्याच्या उद्योगांत अगदीं चोवीस तास गढून गेल्याशिवाय त्यांचीं राज्याविरुद्ध कारस्थानें थांबावयाचीं नाहींत, तेव्हां त्यांना करांच्या ओझ्याखालीं पिळून काढून जेमतेम पोटापुरतें शिल्लक ठेविलें पाहिजे. ह्या हेतूनें त्यानें घरांवर, दुभत्या गायींम्हशींवर व कपड्यालत्त्यांवर कर बसविले. भारताच्या इतिहासांत अलाउद्दीन हा निरक्षर, क्रूर व धर्मवेडा, परंतु शूर, धाडशी व कर्तबगार पुरुष होऊन गेला. त्याच्या धर्मवेडेपणाबद्दल त्यास व्यक्तिशः जबाबदार धरण्यापेक्षां तत्कालीन मुसलमानांची आकुंचित दृष्टीच विशेष कारणीभूत आहे, असें म्हणावें लागतें. पुढील काळांतील धर्मवेड्या व जुलमी मुसलमान बादशाहां-संबंधानेंही हेंच म्हणणें लागू पडेल. कारण एखादा मुसलमान सुलतान हिंदूंचा पक्षपाती आहे असें दिसतांच तो मुसलमान सरदारांस अप्रिय होत असे व ज्यांच्या बळावर राज्य करावयाचें त्यांना नाखूष ठेवून चालत नसे.

१५. खिलजी घराण्याचा शेवट :—अलाउद्दीन इ. स. १३१६ त मृत्यु पावला; त्याच्या मृत्यूनंतर बेबंदशाही सुरू झाली. अलाउद्दिनाचा कर्तबगार सरदार मलिक काफूर यानें या बेबंदशाहीस आळा घालण्याचा यत्न केला. पण तो दरबारांत अत्यंत अप्रिय होता व लवकरच त्याचा खून झाला. नंतर झालेल्या घालमेलींत कोणी एक हिंदु अंत्यज खुस्रूखान या नांवानें पुढें आला. तो प्रथम अलाउद्दिनाचा मुलगा मुबारकशाह याचा मोठा आवडता होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु मुबारकशाह विलासी व क्रूर निघाल्यामुळें खुस्रूखानानें त्यास ठार मारिलें व आपणच गादीवर बसला. पण नवीन आलेला सुलतान जुन्याहून बरा म्हणविणारा होता. त्यानें मुसलमानांचा छळ करण्यास सुरवात केली. त्यानें ठिकठिकाणीं मशिदींतून मूर्तींची स्थापना केली व आपण जणूं हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन करतों असा आव आणला. परंतु हें कार्य यशस्वी करण्यास लागणारी नैतिक उंची व सामाजिक प्रतिष्ठा या दोन्हीही त्यास नसल्यानें त्याच्याविरुद्ध प्रतिक्रिया सुरू झाली. त्यांत पंजाबचा सुभेदार घियासुद्दिन तुघ्लुख यास इस्लामची अप्रतिष्ठा सहन न होऊन त्यानें दिल्लीवर चाल केली व खुस्रूखानाचा शेवट केला. या वेळीं खिलजी घराण्याचा कोणी वंशज शिल्लक उरला नाहीं हें पाहून दरबारी मंडळींनीं त्यालाच सुलतान म्हणून आपली मान्यता दिली. अशा रीतीनें खिलजी घराण्याचा शेवट झाला.

प्रश्न

१. बाल्बनच्या सुधारणा सांगा. २. 'अलाउद्दीन जुलमी परंतु कर्तबगार इसम होता' या वाक्याचें स्पष्टीकरण करा. ३. टीपा लिहा – १. कुतुबमिनार, २. सुलताना रझिया.

अभ्यास

(१) गुलाम संस्थेचे गुणदोष सांगा. (२) जोहार म्हणजे काय ? राजपुतांनीं जोहार केल्याचे २–३ प्रसंग सांगा. अशा प्रसंगीं मराठे कसे वागले असते ? (३) बाल्बन व अलाउद्दीन यांची माहिती वाचून 'सुलतानांचीं कर्तव्यें' यासंबंधीं त्यांच्या काय कल्पना दिसतात याचें विवेचन करा.

माहितीसाठीं

अलाउद्दिनाचें गुप्त पोलिस खातें

नंतर अलाउद्दिनानें गुप्त पोलिसांचें सर्वत्र असें जाळें पसरलें कीं, लोकांनीं चांगलें अगर वाईट कांहीं केलें तरी तें त्यास तेव्हांच समजे. सरदार-दरकदारांच्या घरांत काय चाललें आहे याचीही माहिती त्यास मिळे, व त्याबरहुकूम तो त्यांना जाब विचारी. हा ससेमिरा इतका कडक होता कीं मनसबदारांना आपल्या घरांत एकमेकांकडे खुणा करून बोलण्याचा प्रसंग येई. रात्रंदिवस त्यांना आपल्यावरील गुप्त पहाऱ्याची दहशत वाटे. सार्वजनिक ठिकाणीं ज्या गोष्टी घडत त्याबद्दल तर ताबडतोब चौकशी होऊन शिक्षा केली जाई.

—झियाउद्दीन बर्नी,
(चौदाव्या शतकांतील दरबारी लेखक.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भौगोलिक टिपण

पूर्वीच्या काळीं युद्धांतून एक एक प्रांत जिंकतांना वाटेवरचीं व त्या त्या प्रांतांतील महत्त्वाचीं ठिकाणें सर करावीं लागत. पंजाबांत दीपलपूर, दिल्ली व राजपुताना यांचे मध्यें रतनभोर, बुंदेलखंडांत कलिंजर, माळव्यांत मांडवगड, गुजराथेंत चंपानेर, राजपुताना-बुंदेलखंड यांचे दरम्यान चंदेरी, जोनपूर, बिहार यांचेमध्यें चुनार, बिहार-बंगाल यांचे मध्यें राजमहाल, माळवा-खानदेशचे दरम्यान अशिरगड, दक्षिणचें नाक म्हणून दौलताबाद अशीं महत्त्वाचीं ठिकाणें एकदां नकाशावर पाहून ठेवण्यासारखीं आहेत. कारण लढाई करणारे राजे बदलले तरी, लढायांचें तंत्र बदलत नाहीं तोंपर्यंत त्याच त्याच जागीं पुनः पुनः युद्धें होतात.

भाग १९ वा

सुलतानशाहीचा शेवट

१. महंमद तुघ्लख :—खिलजींच्या मागून दिल्लीच्या गादीवर येणाऱ्या सुलतानांत घियासुद्दीन तुघ्लुखाचा मुलगा मुहंमद तुघ्लुख याचें नांव फार प्रसिद्ध आहे. पण ह्या प्रसिद्धीचें कारण मात्र त्याच्या अंगच्या कर्तबगारीपेक्षां त्याच्या स्वभावांतील विचित्रपणाच होय. इंग्लंडच्या इतिहासांतील पहिल्या जेम्सप्रमाणें तो पुस्तकी विद्येंत फार प्रवीण होता. अरबी व फारशी भाषा त्यास अवगत होत्या. ग्रीक तत्त्वज्ञान किंवा गणित ह्यांसारख्या गहन शास्त्रीय विषयांतदेखील त्याचा प्रवेश असे. वर्तनानें तो शुद्ध व कडक असे. दातृत्वाबद्दल त्याची फार प्रसिद्धि होती. दारूस तर तो स्पर्शदेखील करीत नसे. उलट जेम्सप्रमाणें तो भित्रा नव्हता. लढाईंत सेनानायकाचें काम तो चांगलें करी व त्याचें शौर्यही कसास लागलें होतें. इतकें असूनही त्यानें कित्येक वेळां केलेल्या योजना व हुकूम इतके विचित्र होते कीं, त्यावरून त्याच्या मेंदूस कांहीं तरी विकारच झाला असला पाहिजे असा बळकट संशय येतो. थोडक्यांत सांगावयाचें तर त्याच्या कल्पना फार उच्च होत्या, त्याचे हेतू फार चांगले होते, परंतु त्याच्या उच्च कल्पनांस व सद्धेतूंस व्यावहारिक शहाणपणाची जोड न मिळाल्यामुळें त्याच्या योजनेंत प्रमाणशीरपणा राहिला नाहीं व एखाद्या दुराग्रही पढतमूर्खाप्रमाणें त्याची गत झाली व त्यामुळेंच त्यानें स्वतःचा व सुदैवानें वांटचास आलेल्या एवढ्या मोठ्या साम्राज्याचा नाश करून घेतला!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. त्याचे अवाढव्य बेत :—तो राज्यावर आल्याबरोबर त्यास मोंगलांच्या स्वारीस तोंड द्यावें लागलें. इ. स. १३२७ त ते थेट दिल्लीपर्यंत चाल करून आले. परंतु मुहंमद तुघ्लुखानें त्यांना तोंड देण्याऐवजीं त्यांस भरपूर खंडणी देऊन परत लाविलें. यानंतर इराणच्या शहावर स्वारी करण्याचा त्यानें बेत केला व एक वर्षभर जय्यत सैन्य तयार केलें. परंतु पुढें स्वारीच्या खर्चाकरितां पैसे शिल्लक नसल्यामुळें त्या फौजेस रजा द्यावी लागली. इ. स. १३३७ सालीं त्यानें तिबेटावर स्वारी करण्याचा बेत केला व त्याप्रमाणें आपला भाचा खुस्रू मलिक याच्या हाताखालीं एक लाख फौज नेपाळमधून रवाना केली. डोंगराळ मुलूख व कडक थंडी यांमुळें त्या सैन्याचे फार हाल झाले. शेवटीं तिबेटी फौजेबरोबर युद्ध होऊन त्यांत खुस्रू मलिकच्या फौजेचा पराभव होऊन ती परत फिरली. वाटेंत पुन: तिचे इतके हाल झाले कीं, त्या एक लाख फौजेपैकीं सारे दहा लोक राजधानीस परत आले !

३. राजधानीचें स्थलांतर :—आतां एक नवीनच कल्पना त्याच्या डोक्यांत उद्भवली. दक्षिणेकडे वारंवार बंडें होतात हें पाहून त्यानें आपली राजधानी दिल्लीहून दौलताबादेस न्यावयाचें ठरविलें. ह्या त्याच्या योजनेंत गैर असें कांहींच नव्हतें. ज्या दिशेनें राज्याचा अधिक विस्तार होत जाईल त्या दिशेनें राजधानीचें स्थलांतर करणें हें आवश्यक असतें. इ. स. १९११ सालीं इंग्रज सरकारनें कलकत्त्याहून दिल्लीस राजधानी नेली व औरंगजेबानें इ. स. १६८७ मध्यें दक्षिणच्या स्वारीकरितां औरंगाबाद येथें कायमचा तळ दिला व तेथें तो आपला दरबारही भरवीत असे. परंतु राजधानीचें स्थलांतर करण्याची मुहंमदाची रीत कांहीं विलक्षण होती. त्यानें दिल्लींतील झाडून सर्व लोकांस आपलीं घरेंदारें सोडून, आपली मालमत्ता व मुलेंबाळें घेऊन सातशें मैलांचा व चाळीस दिवसांचा प्रवास करून दौलताबादेस चलण्याचा हुकूम केला ! वास्तविक राजधानी हलवावयाची तर फक्त सरकारी कचेरी हलविली म्हणजे झालें. नव्या राजधानीकडे कालांतरानें तिचें वैभवही आपोआप येतें; त्याकरितां मुद्दाम प्रयत्न करावा लागत नाहीं, ही साधी गोष्टही ह्या अतिशहाण्याच्या लक्षांत आली नाहीं. नव्या ठिकाणीं काहीं केल्या त्याचा जम नीट बसेना. दिल्लीहून आलेले लोक आपल्या घरीं जाण्यासाठीं हळहळूं लागले. शेवटीं मुहंमुदास आपली चूक कळून आली, त्याबरोबर त्यानें सर्वांस पुन: दिल्लीस चलण्याचा हुकूम दिला.

४. नाण्यांचा गोंधळ :—त्याच्या हातून घडलेल्या आणखी एका विचित्रपणाचें वर्णन करून त्याची कारकीर्द संपवितों. लोकांना चलनी नाण्यांचा तुटवडा पडतो हें पाहून त्यानें तांब्याचीं नाणीं सोन्याच्या नाण्याच्या किंमतीनें चलन म्हणून वापरलीं जावींत व सरकारी खजिन्यांतही तीं त्याच दरानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वीकारलीं जातील असें जाहीर केलें. ह्या त्याच्या योजनेंतही कांहीं चूक नव्हती. चीनमध्यें कागदी नोटा त्या काळीं चालत असत, त्यावरून त्यास ही कल्पना सुचली असावी. आजही कागदी नोटा रोजच्या व्यवहारांत बिनधोक चलन म्हणून वापरल्या जातात, तर मुहंमद तुघ्लुखाच्या वेळीं तांब्याचें नाणें सोन्याच्या नाण्याच्या किंमतीनें कां चालूं नये? पण आज कागदी नोटा बिनहरकत चालतात याचें कारण त्या सरकारासच काढतां येतात व सरकार त्या वाटेल तशा न काढतां कांहीं ठराविक प्रमाणांत काढीत असतें. मुहंमद तुघ्लुखानें तांब्याचीं नाणीं पाडण्यास इतरांस मनाई केली नाहीं. मग काय, प्रत्येक सोनारानें आपल्या घरीं टांकसाळच चालविली व लोक खुशाल तांब्याच्या आपल्या नाण्यानें व्यवहार करूं लागले व सरकारदेणें देऊं लागले. परदेशचे व्यापारी तांब्याचीं नाणीं देऊन सोन्याची नाणीं घेऊन गेले. देशांत तांब्याच्या नाण्यांची गर्दी झाली. पुढें पुढें परदेशच्या व्यापाऱ्यांना त्यांच्या मालाबद्दल किंमत द्यावी लागली तेव्हां सोन्याची टंचाई भासली. नाण्यांच्या बाबतींत एकच गोंधळ झाला व लोक सोन्यासाठीं एकसारखे ओरड करूं लागले. तेव्हां मुहंमदानें हुकूम सोडला कीं, वाटेल त्यानें खजिन्यांत तांब्याचें चलन द्यावें व त्याच्याबद्दल सोन्याचें घेऊन जावें. हा हुकूम होतांच लोक आपलीं तांब्याचीं नाणीं घेऊन सरकारी खजिन्याकडे धांव घेऊं लागले. खजिन्यांत तांब्याच्या नाण्यांचे ढीगच्या ढीग झाले, तरी लोकांची मागणी पुरी होईना. शेवटीं मुहंमदानें कांहीं दिवसांनीं तो हुकूम परत घेतला !

५. मुहंमदचा मृत्यु :—तुफान समुद्रांत लोटलेल्या जहाजास हेलकावे बसावेत, तसें महंमदाच्या कारकीर्दीत बसून सर्व प्रजा अगदीं खळीस आली. ठिकठिकाणीं बंडें झालीं व दूरदूरचे प्रांत स्वतंत्र झाले. इ. स. १३४६ त दक्षिणेंत बहमनी राज्याची स्थापना झाली. त्याच्या अगोदर इ. स. १३३६ सालीं कृष्णानदीच्या दक्षिणेस विजयनगरचें हिंदु राज्य स्थापन झालें होतें. बंगाल इ. स. १३३९ त पूर्ण स्वतंत्र झाला. इ. स. १३५१ त मुहंमद ठठ्ठा येथें मरण पावला.

६. इब्नबतूता :—त्याच्या कारकीर्दीत इब्नबतूता हा आफ्रिकन प्रवासी इ. स. १३५० त मुहंमदाच्या दरबारीं आला. मुहंमद परकीय प्रवाशांस फारच आदरातिथ्यानें वागवीत असे. इब्नबतूता दिल्लीस सात वर्षें होता. तेथें मुहंमदानें त्यास न्यायाधीशाचें काम सांगितलें. पुढे दिल्लीस राहणें न आवडून त्यानें मोठ्या युक्तीनें आपली सुटका करून घेतली व चीनला दिल्लीच्या सुलतानाचा वकील म्हणून जाण्यास निघाला. वाटेंत त्याच्या जहाजांची दाणादाण होऊन तीं कालिकतजवळ किनाऱ्याला लागलीं, तेथून तो स्वदेशीं परत गेला. त्यानें लिहून ठेवलेली हकीकत मात्र विश्वसनीय आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. फिरूज तुघ्लख (इ. स. १३५१–१३८८) :—मुहंमदाच्या मृत्यूनंतर त्याच्या चुलतभावास सरदारांनीं सुलतान म्हणून पसंत केलें. तो शांतताप्रिय असल्यानें त्याच्या सदतीस वर्षांच्या कारकीर्दींत फारच थोडीं युद्धें झालीं. राज्यावर आल्याबरोबर त्यानें मुहंमदाच्या कारकीर्दींत ज्यांचें नुकसान झालें त्यांना बोलावून आणून त्यांची भरपाई करून दिली. शेतकरी कर्जाखालीं बुडून गेले हें पाहून फिरूजनें जाहीर रीतीनें त्यांचे कर्जरोखे फाडून टाकले. त्याच्या ह्या कृत्यांमुळें तो लोकांस फार प्रिय झाला. याखेरीज पडीत जमिनी लागवडीस आणिल्या व त्यांचें उत्पन्न धार्मिक बाबींकडे लावून दिलें. दिल्लीच्या भोंवतीं बगीचे लावून शहराची शोभा वाढविली व उत्पन्नही वाढविलें. त्याचप्रमाणें त्यानें सतलज व यमुना या नद्यांचे कालवे काढून शेतीस पाणी पुरविलें. त्यांपैकीं यमुना नदीचा कालवा दोनशें मैल लांब असून तो आजही चांगल्या स्थितींत आहे. ह्या पाण्यावरही त्यानें कर बसवून राज्याचें उत्पन्न वाढविलें. त्याच्या राज्याचा वसूल एकंदर सहा कोटी पंचायशी लक्ष रुपये होता. त्यास इमारती बांधण्याचा मोठा शोक असे. दिल्लीनजीक त्यानें फिरूझाबाद नांवाचें एक शहर वसविलें व बंगालच्या स्वारीहून परत येतांना त्यानें आपल्या भावाच्या स्मरणार्थ जोनपूर नांवाचें शहर बसविण्यास प्रारंभ केला. खुद्द दिल्ली शहरांत त्यानें फत्तेबाद व हिसर फिरोझ नांवाच्या इमारती बांधल्या व आपल्या विश्रांतीचें व विलासाचें ठिकाण म्हणून त्यानें दिल्लीपासून दहा मैलांवर यमुनेच्या कांठीं दुसरा राजवाडा बांधला. ह्याशिवाय त्यानें पुष्कळ किल्ले, धर्मशाळा व पूल बांधले; मात्र त्यानें रस्ते तयार केल्याचा उल्लेख नाहीं. वास्तविक दळणवळणाकरितां त्या काळीं रस्त्यांचीच विशेष जरुरी होती.

८. फिरूजचीं दुष्कृत्यें :—ह्या सर्व चांगल्या गोष्टी त्यानें केल्या, परंतु तीन कारणांमुळें त्याच्या राज्यांत दोष उत्पन्न झाले. त्यानें सरकारी कामगारांस आपल्या कामाबद्दल पगार देण्याऐवजीं जहागिरी दिल्या. हे कामगार जहागीर देणाऱ्या फिरोजशीं कृतज्ञ राहिले खरे; परंतु पुढें ते डोईजड झाले. दुसरें, फिरोजला गुलाम बाळगण्याचा फार नाद होता. दूरदूरचे प्रांताधिकारी भेटीस येत तेव्हां ते फिरूजला गुलाम नजर करीत, तेव्हां तो खूष होई व त्यांनीं पाठवावयाच्या वार्षिक खंडणीऐवजीं कांहीं गुलाम पाठविल्यास ठराविक प्रमाणावर खंडणींत सूट मिळे. त्यानें बाळगिलेल्या गुलामांची संख्या एक लक्ष, ऐंशी हजार होती. यामुळें गुलामांचें एक वडें खातेंच उत्पन्न करणें जरूर झालें. तिसरी गोष्ट अशी कीं, स्वतः हिंदु आईच्या पोटीं येऊन हिंदूंवर त्याची इतर सुलतानांइतकीच वक्रदृष्टि होती. हिंदूंवर अलाउद्दिनाच्या वेळेपासून जिझिया कर होताच व जाहीर रीतीनें मूर्तिपूजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा गुन्हा मानला जाई! एकदां एका ब्राह्मणानें आपल्या घरीं देवाचा उत्सव केला. त्याचा देव नवसास पावतो अशा समजुतीनें पुष्कळ मुसलमानही त्याच्या नादीं लागले होते. फिरूजला हें वर्तमान समजतांच त्यानें त्या ब्राह्मणाला त्याच्या त्या मूर्तीसह जाळून टाकलें! फिरूज इ. स. १३८८ त मरण पावला.

९. **तुघ्लुख घराण्याचा शेवट**:—फिरूझच्या मृत्यूनंतर राज्यांत अंदाधुंदी सुरू झाली, अनेक घोटाळे माजले व ते एवढ्या थरास पोहोंचले कीं, एकाच वेळीं दिल्लींत फिरुझशहाचे दोन नातू महमूदशाह व नसरतशाह शहराच्या दोन टोंकांस राज्य करूं लागले. अशा स्थितींत राज्य कसें टिकणार? याच सुमारास मध्य आशियांतील समर्कंदचा सुलतान तैमूरलंग याची धाड भारतावर आली. तैमूरलंग हा तुर्क असून चंगीझखानाप्रमाणेंच स्वाऱ्या करून मुलूख बेचिराख करण्यांत फार प्रसिद्ध होता. मात्र चंगीझखानापेक्षां तो जास्त सुसंस्कृत असून त्यानें स्वतः लिहिलेलें आत्मचरित्र व राजनीतीवर लिहिलेला ग्रंथ उपलब्ध आहे. तो इ. स. १३३६ त जन्मला. एका लढाईंत तो पायानें लंगडा झाल्यामुळें त्यास 'लंग' हें टोपण नांव मिळालें. इ. स. १३६९ त तो समर्कंदचा राजा झाला व नंतरच्या काळांत त्यानें पश्चिमेस तुर्कस्थानपासून आग्नेयीस अफगाणिस्थानपर्यंतचा प्रदेश काबीज केला व नंतर त्याची दृष्टि भारताकडे वळली.

१०. **तैमूरलंगाची स्वारी**:—"भारतावर स्वारी करण्याचा माझा उद्देश काफर लोकांना ठार मारावें, त्यांच्या मूर्तींचा विध्वंस करावा, त्यांना इस्लामी धर्माची दीक्षा द्यावी व अल्लाच्या दरबारात 'गाझी' हें पद मिळवावें असा आहे," असें त्यानें आपल्या चरित्रांत लिहिलें आहे. प्रथम त्यानें आपला नातू पीरमहंमद हा काबूल येथें होता, त्यास पुढें पाठविलें. त्यानें इ. स. १३९७ त भारतांत येऊन मुलतान शहर काबीज केलें. नंतर तैमूरलंगानें अटकजवळ सिंधू नदी ओलांडली. तेथें पीरमहंमद त्यास येऊन मिळाला. अटक ओलांडल्यावर तैमूर तसाच पूर्वेकडे निघाला व वाटेंत दीपलपूर, भटनेर हे किल्ले काबीज करीत थेट पानपतावर येऊन पोहोंचला. त्याजबरोबर एकंदर नव्वद हजार सैन्य होतें. पानपतवर त्यास कोणीं विरोध केला नाहीं, म्हणून तो तसाच पुढें येऊन दिल्लीच्या मैदानांत तळ देऊन बसला. ती बातमी ऐकून महमूदशहा व त्याचा वजीर इक्बलखान हे दोघे सैन्य घेऊन आले. परंतु त्यांचें सैन्य तैमूरच्या मानानें कमीं होतें. तैमूरचे लोक महमूदशहाच्या सैन्यांतील हत्ती पाहून घाबरून गेले, परंतु तैमूरनें त्यांचा बंदोबस्त केला. योग्य वेळीं लढाईस सुरुवात झाली. परंतु भारतांतील मुसलमानांत पूर्वींचें पाणी राहिलें नव्हतें. उत्तर भारतांतील उष्ण हवेमुळें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐश्वर्योपभोगामुळें ते कमकुवत बनले होते. तसेंच हत्तीवरून लढण्याची थाटाची पद्धतही त्यांनीं उचललेली होती. हत्तीचे इतर कांहींही फायदे असले तरी हत्तीवर बसलेल्या मनुष्यावर शत्रूस नेमकें शरसंधान करतां येतें हा फार मोठा तोटा आहे. या पद्धतीमुळें शिकंदरानें पौरसचा, गज्नीच्या महमुदानें अनंगपाळाचा, महंमद घूरीनें पृथ्वीराजाचा, तैमूरनें महंमुदाचा, बाबरानें इब्राहिम लोदीचा व शेवटीं इ. स. १७६१ त अहमदशहा अबदालीनें भाऊसाहेबांचा पराभव केलेला आहे. मुसलमान शौर्यानें लढले, परंतु त्यांचा पराभव झाला. पुढें तैमूर दिल्लींत शिरला. त्याचें लष्कर हें विजयामुळें बेभान होऊन दिल्लींत भयंकर लुटालूट करीत सुटलें. त्यास आवरणें तैमूरच्या हातीं राहिलें नाहीं व त्यामुळें लक्षावधि लोक प्राणास मुकले. हें झाल्यावर तैमूर मीरत व हरद्वारकडे वळला. वाटेंत त्यानें ठिकठिकाणीं मूर्तींचा विध्वंस केला. हरद्वारास त्यानें कत्तलीची कमाल केली व तेथून तो शिवालिक पहाड, नागरकोट, जम्मू ह्या उत्तरेच्या मार्गानें परत जाण्यास निघाला. समरकंदकडे बंडाळी माजल्याचें वर्तमान आल्यामुळें त्यास घाईनें परत जावें लागलें, म्हणून त्यानें फारशी लूट बरोबर नेली नाहीं.

११. सय्यद व लोदी :—तैमूरच्या स्वारीनंतर दिल्लीच्या गादीवर अनेक सुलतान आले व गेले. सय्यद घराण्यानें इ. स. १४१२–१४५० पर्यंत कारभार हांकला व नंतर लोदी या अफगाण घराण्याचा अंमल सुरू झाला. त्यांच्यापैकीं सिकंदरशाह लोदी (इ. स. १४८८ ते इ. स. १५१७) यानें बरीच सावरासावर केली. त्यानें जोनपूरच्या पूर्वेकडे बिहार प्रांतावर आपला अंमल बसविला व बंगालच्या सुलतानांशीं सख्य जोडलें. लौकरच धोलपूर, चंदेरी, ग्वाल्हेर येथील राजांनीं त्याचें स्वामित्व कबूल केलें. अशा रीतीनें पश्चिमेस पंजाबपासून ते पूर्वेस बंगालपर्यंतच्या प्रदेशावर सिकंदर लोदीनें आपला अंमल बसविला. सिकंदरानें आपल्या राज्यांत अनेक सुधारणा केल्या. लोकांच्या संरक्षणार्थ त्यानें पोलिसखात्याची व्यवस्था ठेविली. घोड्याचें टपाल ठेवलें व रस्ते तयार केले. त्याच्या कारकीर्दींत जिनसांची फारच स्वस्ताई होती. तो स्वतः विद्वान्, दयाळू व परोपकारी होता. हिंदूंच्या बाबतींत मात्र इतर सुलतानांप्रमाणेंच त्याची करडी नजर कायम होती. त्यानें हिंदूंच्या यात्रा बंद केल्या व पर्वणीच्या दिवशीं नदीतीर्थांत स्नानें करण्याची मनाई केली. सिकंदर इ. स. १५१७ त मरण पावला. त्याच्या कारकीर्दींत इ. स. १५०५ सालीं जुलैच्या ५ व्या तारखेस आग्रा येथें एक मोठा धरणीकंप झाला व त्याचे धक्के इराणपर्यंत पोहोंचले!

१२. इब्राहिम लोदी (इ.स. १५१७–१५२६) :—सिकंदरच्या मागून त्याचा मुलगा इब्राहिम लोदी हा गादीवर बसला, परंतु तो लौकरच अप्रिय झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याचें कारण असें कीं, तो आपल्या पदरच्या सरदारांस अत्यंत कडक रीतीनें व अपमानास्पद पद्धतीनें वागवी. अफगाण लोकांस हें वागणें बिलकूल सहन होणारें नव्हतें. कारण गादीवर बसणाऱ्या सुलतानाची पसंती बहुश: त्यांचेकडून होत असल्यानें ते त्यास आपल्या बरोबरीचा समजतात. लवकरच मोठमोठे अफगाण सरदार इब्राहिमविरुद्ध बंड करून उठले. पूर्वेस जोनपूर, बिहार प्रांतांत दर्याखान लोहानी स्वतंत्र झाला व पश्चिमेस दौलतखान लोदीनें पंजाबांत आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केलें. इतकेंच नव्हे तर त्यानें काबूलच्या तख्तावर राज्य करणारा बाबर यास मदतीस बोलावून इब्राहिम लोदीस पदच्युत करण्याचा बेत केला. बाबरनें त्याप्रमाणें येऊन भारतावर स्वारी केली व पानपत येथें इब्राहिमचा पराभव करून त्यास ठार मारलें. परंतु त्यानंतर काबुलास परत जाण्याऐवजीं त्यानेंच दिल्लीचें तख्त बळकाविलें.

प्रश्न

१. 'सुलतानशाही' कां संपुष्टांत आली तें सांगा. २. मुहंमद तुघ्लुख याच्या विक्षिप्तपणाच्या ठळक बाबी सांगून त्यामुळें त्याच्या राज्यावर काय परिणाम झाला तो स्पष्ट करा. ३. फिरूज तुघ्लुखानें अनेक चांगल्या गोष्टी केल्या, तरीही त्याच्या राज्यांत दोष उत्पन्न झाले. असें कां झालें तें स्पष्ट करा.

अभ्यास

(१) 'पंजाबच्या सुभेदारानें वारंवार दिल्लीच्या तख्तावरील राज्यक्रांत्या केल्याचें दिसून येईल' याचा अर्थ उदाहरणें देऊन विशद करा.
(२) मुहंमदानें राजधानी बदलली या प्रसंगांत तुम्ही सांपडला असतां तर तुमच्या मनांत काय विचार आले असते तें लिहा.

माहितीसाठीं

मातृभक्त मुहंमद तुघ्लुख

सुलतानाची आई 'मलिका–इ–दुनिया' 'जगाची मालकीण' या नांवानें ओळखली जाते. ती फार उदार असून प्रवाशांसाठीं तिनें सरायाही बांधलेल्या आहेत. ती आंधळी आहे. तिचा पुत्र तिचा मोठा आदरसन्मान करतो. दरवर्षीं ती त्याच्याबरोबर कोठेंतरी प्रवासास जाते. ती त्याच्याकडे जेव्हां येई, तेव्हां ती पालखींत असतांनाच सुलतान आपल्या सिंहासनावरून खालीं उतरून सामोरा जाऊन तिचें स्वागत करी व तिच्या चरणांवर डोकें ठेवी.

—इब्नबतूता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २० वा

सुलतानशाही काळांतील स्वतंत्र राज्यें

१. छोटया राज्यांचा उदय :—अलाउद्दिनानें दिल्लीच्या सुलतानशाहीस साम्राज्याचें स्वरूप दिलें. परंतु मुहम्मद तुघ्लुखानें केलेल्या विचित्र प्रयोगांमुळें हें साम्राज्य टिकून राहण्याचा संभव नाहींसा झाला व भारतांत पुन: लहान लहान प्रादेशिक राज्यांचें राजकारण सुरू झालें. मौर्य, गुप्त व हर्ष यांचीं साम्राज्यें मोडकळीस आल्यावर जशीं अनेक छोटीं छोटीं राज्यें भारतांत सर्वत्र उदयास आलीं किंवा पूर्वीं अस्तित्वांत असलेल्यांनीं डोकें वर काढलें तसा प्रकार याही वेळीं झाला. भारताच्या इतिहासांत साम्राज्योत्तर छोटया राज्यांचा उद्‌भव अनेक वेळां झालेला पहावयास सांपडतो. विसाव्या शतकांत दळणवळणाचीं साधनें विपुल झाल्यामुळें, ब्रिटिश अंमलाखालीं भारतीय एकतेची प्रखर जाणीव वाढीस लागल्यानें व संयुक्त राज्यघटनेंत शक्य असलेल्या अंतर्गत स्वातंत्र्यामुळें व सर्वांच्या सहकार्यामुळें यापुढें या घटनेची पुनरावृत्ति होण्याचा संभव नि:संशय कमी झालेला आहे. असो. इ. स. १२०६ ते १५२६ या तीनशें वर्षांच्या काळांत उत्तरेंत राजपूत राजांनीं मुसलमानांशीं पुन: पुन: लढून आपलें स्वातंत्र्य टिकविलें. इतर सर्वत्र गुजराथ, माळवा, बंगाल इत्यादि भागांत निरनिराळया मुसलमान घराण्यांचा अंमल चालू होता. दक्षिणेस नर्मदा ते तुंगभद्रा या प्रदेशांत बहमनी राज्य व तुंगभद्रेच्या दक्षिण भागांत विजयनगरचें हिंदु राज्य यांचा उद्‌भव झाला. या सर्वांची हकीकत या भागांत दिली आहे.

स्वातंत्र्य-रक्षक राजपूत राज्यें

२. चितोड (इ. स. १३१३–१५४१) :—राजपुतान्यांत या काळांत नैर्ऋत्येस चितोड (मेवाड), पश्चिमेस जोधपूर (मारवाड) व ईशान्येस अंबेर (जयपूर) हीं राज्यें प्रमुख होतीं. या सर्वांत परकीयांशीं झगडतांना चितोडनें आपला मानी बाणा वाटेल त्या परिस्थितींत कायम ठेविला. अलाउद्दिनानें पद्मिनीच्या लोभानें चितोडवर स्वारी केली हें मागें सांगितलेंच आहे. पुढें इ. स. १३१३ त लक्ष्मणसिंहाचा पुतण्या हमीर यानें सर्व राजपुतांची एकी करून अलाउद्दिनाच्या फौजेचा पराभव केला व चितोड येथें पुन: आपली सत्ता स्थापिली. त्यानें राजपुतांची मध्यवर्ती सत्ता निर्माण करण्याचा यत्न केला परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. यानंतरच्या काळांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



चितोडचा कीर्तिस्तंभ

राजपुतांनीं राजपुतान्याबाहेरही पराक्रम गाजविला असा पुरावा आहे; कारण हमीराचा नातु लक्षसिंह यानें काशी, प्रयाग व गया हीं क्षेत्रें मुसलमानांच्या हातून सोडविल्याचा उल्लेख अरवलीच्या डोंगरांतील कुंभलगडच्या शिलालेखांत आहे.

३. राणा कुंभ :—इ. स. १४३३ मध्यें राणा कुंभ हा चितोडचा राजा झाला. त्यानें आपल्या राज्याची बरीच वाढ केली. माळव्याचा सुलतान महमूद खिलजी याचा सारंगपूरजवळ त्यानें मोठा पराभव केला. गुजराथचा सुलतान कुतुबुद्दीन यानें कुंभलगडावर स्वारी केली, पण त्यासही शेवटीं राण्याशीं तह करावा लागला. असे लढे नेहमीं चालत, पण राणा कुंभाचा पराभव असा कोठेंच झाला नाहीं. राणा कुंभ शिल्पशास्त्रज्ञ होता. मेवाडमध्यें असलेल्या एकूण ८४ किल्ल्यांपैकीं ३२ त्याचे वेळीं बांधले गेले. मंदिरें व तळींही त्यानें बांधलीं. अबूच्या पहाडावरील यात्रेकरूंवरील कर त्यानें बंद केला. त्यानें माळव्याच्या सुलतानाचा जो पराभव केला त्याचें स्मारक म्हणून चितोडगडावर एक विशाल व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कौशल्यपूर्ण कीर्तिस्तंभ बांधला (इ. स. १४४०). युद्धतत्परतेप्रमाणें त्याचा विद्याव्यासंगही सर्वश्रुत आहे. चण्डीशतक व गीतगोविंद यांवर त्यानें स्वत: टीका लिहिल्या. संगीतराज, संगीतमीमांसा असे संगीतग्रंथही त्यानें लिहिले; निदान ते त्याच्या नांवावर मोडतात. मुसलमान सुलतान त्यास 'हिंदु-सुरत्राण' अगर 'हिंदु बादशाह' असें म्हणत. म्हातारपणीं त्याच्या या जबर व्यासंगाचें रूपांतर तंद्री लागण्यांत झालें व तो कांहींसा वेडसर बनला. अशाच स्थितींत असतां उदयसिंग नांवाच्या त्याच्या मुलानें त्याचा खून केला* (इ. स. १४६८). उदयचें हें अघोर कृत्य राजपुतांस आवडलें नाहीं व त्याला लौकरच राज्य सोडावें लागलें (इ. स १४७४). त्याच्या मागून त्याचा भाऊ रायमल्ल गादीवर आला.

राणा संग

४. राणा संग (इ.स.१५०९–३०) :– राणा संग्रामसिंह अथवा संग हा याचाच पुत्र होय. सर्व हिंदु राज्याचा एकछत्री अंमल प्रस्थापित करण्या-साठीं झगडणारा हा शेवटचा राजपूत वीर होय. यास महाराणा संग्रामसिंह असें म्हणतात. यानें माळव्याच्या सुलतानाचा पराभव करून रतनभोर, गागरोन, काल्पी, भिलसा व चंदेरी हे भाग आपल्या राज्यास जोडले. दिल्लीचा सुलतान इब्राहीम लोदी याचाही त्यानें खातोली येथें पराभव

* अलीकडे राजपुतान्यांतील शिलालेखांच्या संशोधनानें राणा कुंभाची अधिकाधिक माहिती मिळत आहे. राजपुतांतील राजांपैकीं राणा संग (१५०९–३०) हा विशेष पराक्रमी होता हें खरें, पण तो इतिहासज्ञांस सर्वांत अधिक माहीत होण्याचें कारण म्हणजे बाबरच्या आत्मचरित्रांतील त्याचा विस्तृत उल्लेख होय. पुरेशा साधनसामग्रीच्या अभावीं पराक्रम व प्रसिद्धि यांत इतिहासलेखकास नेहमींच प्रमाणशीरपणा राखतां येतो असें नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून त्याच्या एका शहाजाद्यास पकडून नेलें होतें (इ. स. १५१७). परंतु पुढें त्याजपासून दंड घेऊन त्यास सोडून दिलें. अशा प्रकारचा दिलदार परंतु बेसावध उदारपणा त्यानें पुढेंही दाखविला व शेवटीं तोच त्यास बाधक ठरला. राणा संग इ. स. १५३० त मृत्यु पावला. त्यानंतरच्या काळांत राणा प्रतापचा अकबराशीं झालेला सामना हा भारताच्या इतिहासांतील वीरोदात्त प्रसंगांनीं भरलेला असा एक भाग आहे. परंतु अखेर संघटित सत्ते-पुढें वैयक्तिक शौर्य लटकें पडलें, व राजपुतांना मोगलांपुढें हार खावी लागली. चितोडप्रमाणें जोधपूर व जयपूर येथें असलेल्या राजपूत राजांनीं प्रसंगोपात्त मोगलांशीं झगडून, तर कधीं त्यांचेपुढें मान वांकवून आपलें रक्षण केलें.

उत्तरेकडील मुसलमानी राज्यें

५. **जोनपूर** (इ. स. १३९४–१४७७) :—जोनपूर हें शहर फिरूज तुघ्लुखानें आपल्या भावाच्या स्मरणार्थ गोमतीचे कांठीं बसविलें. इ. स. १३९४ च्या सुमारास दिल्लीच्या सुलतानानें ख्वाजाजहान नांवाचा सरदार जोनपूर येथें सुभेदार म्हणून पाठविला. तो पुढें लौकरच स्वतंत्र झाला व पश्चिमेस कनोजपासून पूर्वेस बिहारपर्यंतच्या प्रदेशावर राज्य करूं लागला. जोनपूर इ. स. १४७७ पर्यंत स्वतंत्र होतें; येथील राजघराण्यास 'शर्की' म्हणजे पूर्वेकडील राजघराणें म्हणतात. शर्की सुलतान इमारतीचे फार शोकी असत; त्यांनीं बांधलेली 'लाल दरवाजा' नांवाचीं मशीद व जामी मशीद ह्या फार पाहण्यालायक आहेत.

६. **बंगाल** (इ. स. १३४७–१५७६):—इ. स. १३४७ त फक्रुद्दीन नामक सरदारानें बंड करून बंगाल प्रांतावरील दिल्लीच्या सुलतानाचा अंमल झुगारून दिला. तेव्हांपासून इ. स. १५७६ पर्यंत येथें अफगाण सुलतान स्वतंत्रपणें राज्य करीत होते. इ. स. १५७६ त मोगल बादशाह अकबर यानें तेथील शेवटचा सुलतान दाउदखान याचा पराभव करून त्यास ठार मारलें व तो प्रांत मोगल साम्राज्यास जोडला. इ. स. १४९३ ते १५१२ पर्यंत तेथें हुसेनशाह नांवाचा एक नांव घेण्यासारखा बादशाह झाला. तो अत्यंत न्यायी होता. बंगाली वाङ्मयास त्यानें उत्तेजन दिलें. जोनपूरप्रमाणेंच बंगाल्यांतही हिंदु जमीनदारांचें वर्चस्व फार होतें. ह्या जमीनदारांच्या आश्रया-खालील तेथील हिंदु जनता एकंदरीनें राज्यकर्त्यांबाबत उदासीन राहिली. चौदाव्या शतकांत बंगालमध्यें कृत्तिवास नांवाचा कवि होऊन गेला. यानें वाल्मीकि रामायणाचें रूपांतर केलें व तें बंगालमध्यें अजूनही फार लोकप्रिय आहे. असेंच पुढें महाभारताचेंही रूपांतर झालें. महाराष्ट्रांत त्या काळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्ञानेश्वरादि साधुसंतांनीं धर्मिक वाङमय देशी भाषेंत आणण्याचें जें महत्कार्य केलें तेंच या कवींनीं बंगाल्यांत घडवून आणलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

७. काश्मीर (इ. स. १३०६–१५८६) :—मध्यकालांत ह्या प्रांताचा भारताच्या इतिहासाशीं फारसा संबंध आलेला नाहीं. बाराव्या शतकांत तेथें कल्हण नांवाचा पंडित होऊन गेला. त्यानें लिहिलेला 'राजतरंगिणी' नांवाचा ऐतिहासिक ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत तेथें स्वतंत्र हिंदु राज्य होतें. त्या वेळीं सेनदेव नांवाचा राजा राज्य करीत असतां त्याच्या पदरीं शहामीर किंवा मिर्झा नांवाचा कोणी मुसलमान होता. तो आपल्या अंगच्या कर्तबगारीनें चढत चढत मुख्य प्रधान झाला व सेनदेवाच्या मृत्यूनंतर त्यानें आपणच तख्त बळकाविलें व शमसुद्दीन ही पदवी धारण केली. तेथील राजा झैन-उल-अबिद्दीन (इ. स. १४१७–६७) यानें हिंदूंशीं उदारपणाचें धोरण स्वीकारलें. संस्कृत व अरबी भाषांत ग्रंथरचना करण्यास त्यानें उत्तेजन दिलें. इ. स. १५८६ त अकबरानें तो प्रांत जिंकून घेतल्यावर येथील स्वतंत्र राजघराण्याचा शेवट झाला.

८. माळवा (इ. स. १४०१–१४३१) :—उत्तरेस चंबळा, दक्षिणेस नर्मदा, पश्चिमेस गुजराथ व पूर्वेस बुंदेलखंड अशा रीतीनें मर्यादित अशा या प्रदेशास माळवा हें नांव आहे. येथें इ. स. १४०१ सालीं दिलावरखान नांवाचा महंमद घूरीच्या वंशांतील एक सुभेदार होता. त्यानें तैमुरलंगाच्या स्वारीमुळें उत्पन्न झालेली अस्वस्थता पाहून स्वातंत्र्य पुकारलें व तेव्हांपासून तेथें स्वतंत्र मुसलमानी अंमल चालू झाला. मुसलमानांनीं धार व उज्जयिनी ह्या पूर्वीच्या राजधान्या सोडून दिल्या व मांडवगड हा किल्ला आपल्या राजधानीचें ठिकाण केलें. त्या वेळीं माळव्याच्या सरहद्दीवर सर्व बाजूंनीं स्वतंत्र राज्यें होतीं व तो काळही अस्वस्थतेचा होता. यामुळें माळव्याच्या सुलतानांस एकसारखीं युद्धें करावीं लागत. येथील राज्यकर्त्यांत महमूद खिलजी (इ. स. १४३६–१४६९) हा एक नांव घेण्यासारखा राजा होऊन गेला. इ. स. १५६४ त अकबरानें तो प्रांत आपल्या राज्यास जोडला.

९. गुजराथ (इ. स. १३९१–१५३१) :—गुजराथ प्रांताचें प्राचीन काळीं फार महत्त्व होतें. जमीन सुपीक असून व्यापार भरभराटींत होता. उत्तर भारताचा परदेशाशीं व्यापार खंबायतच्या आखातांतून चालत असे. गुजराथचें आरमार फार मोठें असून तेथील जहाजें समुद्रांतून दूरवर प्रवास करीत. हल्लीं मुंबईमुळें खंबायतचें महत्त्व कमी झालें आहे. पूर्वीं तशी स्थिति नव्हती. गुजराथेंत पूर्वींपासून सोळंकी अथवा चालुक्य वंशाचे राजे राज्य करीत असत. राजपुतान्यांतील वाळवंटें व अरवलीचा डोंगराळ प्रदेश मध्यें असल्यामुळें दिल्लीच्या सुलतानांस गुजराथ आपल्या ताब्यांत ठेवणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जड जाई. अलाउद्दिनाच्या कारकीर्दीत हा प्रांत प्रथम मुसलमानी अंमलाखालीं गेला. पुढें इ. स. १३९१ त झफरखान नांवाच्या दिल्लीच्या सुभेदारानें दिल्लीचा अंमल झुगारून देऊन आपली सत्ता वाढविण्यास सुरुवात केली. त्याच्या नंतर इ. स. १४११ त अहमदशाह हा गादीवर बसला. यानेंच अहमदाबाद हें शहर वसविलें. हें शहर फार सुंदर असून तेथील इमारती पाहण्यासारख्या आहेत. ह्यापूर्वी अनहिलवाडा हें गुजराथचें राजधानीचें ठिकाण होतें. अहमदशाहानंतर त्याचा नातू महमूद बेगडा यानें इ. स. १४५९ ते १५११ पर्यंत राज्य केलें. त्याच्या कारकीर्दीत गुजराथची एकसारखी भरभराट होत गेली. महमुदानें बडोद्याच्या उत्तरेचा चंपानेर व काठेवाडांतील जुनागड असे दोन बळकट किल्ले काबीज केले म्हणून त्याचें नांव बेगडा पडलें असें म्हणतात. गुजराथचें राज्य ह्या वेळीं माळव्यापासून पश्चिमेस समुद्रापर्यंत व उत्तरेस अरवलीपासून दक्षिणेस दमणपर्यंत पसरलें होतें. इ. स. १५०७ मध्यें त्यास पोर्तुगीजांशीं लढणें भाग पडलें. मुंबईच्या दक्षिणेस चौलजवळ लढाई झाली. तींत पोर्तुगीजांचा पूर्ण पराभव झाला व त्यांचीं कांहीं जहाजें बुडालीं. परंतु पुढें दोन वर्षांनीं इ. स. १५०९ सालीं पोर्तुगीजांनीं फिरून यत्न केला व त्या वेळीं मात्र त्यांना दीवजवळ गुजराथच्या आरमाराविरुद्ध विजय मिळाला. परंतु दीव हें ठाणें इ. स. १५३५ पर्यंत पोर्तुगीजांस मिळालें नाहीं. महमूद बेगड्यासंबंधीं पुष्कळ चमत्कारिक गोष्टी सांगतात. त्याचा आहार फार मोठा होता. त्याच्या मिशा लांब होत्या. दाढी पोटापर्यंत वाढलेली होती, व त्याच्या अंगांत विष इतकें भिनलें होतें कीं, माशी त्याच्या अंगावर बसली असतां ती मरत असे असें सांगतात!

महमूद बेगड्यानंतर इ. स. १५२६ त बहादूरशाह गादीवर बसला. त्यानें गुजराथची सत्ता आणखी वाढविली. इ. स. १५३७ त त्याचा खून झाला. तेथून पुढें इ. स. १५७२ पर्यंत गुजराथेंत किरकोळ राजे झाले. इ. स. १५७२ सालीं अकबरानें तो प्रांत जिंकून घेतला.

दक्षिणेकडील राज्यें

(१) बहमनी राज्य इ. स. १३४६–इ. स. १५२६

१०. बहमनी राज्याची स्थापना :—अलाउद्दिनाच्या स्वारीपासून यादवांच्या सत्तेचा शेवट होऊन देवगिरीस मुसलमान सुभेदार राज्य करूं लागले. मुहंमद तुघ्लुखानें देवगिरीस राजधानी नेण्याचा बेत करून तिचें नांव दौलताबाद असें ठेविलें; परंतु तो बेत फसल्यावर त्यानें हसन ऊर्फ झफरखान यास दक्षिणेच्या बंदोबस्ताकरितां नेमिलें. इ. स. १३४६ सालीं त्यानें आपलें स्वातंत्र्य पुकारलें व आपली राजधानी दौलताबादेहून बरीच दूर दक्षिणेस गुलबर्गा येथें नेली. झफरखान उत्तरेंत असतां गंगु नांवाच्या ब्राह्मणाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पदरीं गुलाम होता. त्या वेळीं तो मोठ्या इमानीपणानें वागला. तेव्हां गंगूनें त्याची पत्रिका पाहून भविष्य वर्तविलें कीं, 'तूं पुढें राजा होशील'. हें आपल्या पूर्वीच्या धन्याचें वचन खरें झालेलें पाहून कृतज्ञतेनें त्यानें आपल्या राज्यास बहमनी* राज्य असें नांव दिलें. झफरखान स्वतःस अलाउद्दीन हसन गंगू बहमनी असें म्हणवीत असे. तो इ. स. १३५७ त मरण पावला. इ. स. १३९६ त बहमनी राज्यांत भयंकर दुष्काळ पडला. त्यास 'दुर्गादेवीचा दुष्काळ' म्हणतात. तो बारा वर्षे टिकला असें वर्णन आहे.

११. विजयनगरशीं युद्ध :—झफरखानानंतर एकामागून एक असे अनेक बादशाह गादीवर बसले. त्यांच्यांतील अहमदशाह (इ. स. १४२२–३४) हा फार पराक्रमी निघाला. ह्यानें पूर्वीची राजधानी बदलून बीदर ही नवीन राजधानी स्थापिली व वरंगळच्या राजांशीं युद्धें करून तें राज्य जवळजवळ संपुष्टांत आणिलें (इ. स. १४२५). याच सुमारास विजयनगरचें हिंदु राज्य भरभराटीस येत होतें. तेथील राजांनीं युद्ध करून बहमनी राज्याचा विस्तार तुंगभद्रेच्या दक्षिणेस कधींही होऊं दिला नाहीं. तुंगभद्रा ही दोन्ही राज्यांची सरहद्द असल्यामुळें कृष्णा व तुंगभद्रा या दुआबांतील रायचूर, मुद्गल, अदोनी, सोलापूर वगैरे ठिकाणीं एकसारखीं युद्धें होत व विजयाचें पारडें कधीं या बाजूस तर कधीं त्या बाजूस झुकत असे.

१२. महमूद गावान :—इ. स. १४५८ ते ६१ पर्यंत हुमायून नांवाचा बादशाह होऊन गेला. तो फार क्रूर होता. परंतु त्यास महमूद गावान नांवाचा फार थोर प्रधान लाभला व त्यानेंच बहमनी राज्याच्या उत्तर कालांत त्या राज्याचें रक्षण केलें. महमूद गावान मूळ इराणांतील असून तेथील राजांशीं त्याचा फार जवळचा संबंध होता. परंतु हाच संबंध आपल्या जिवास पुढें-मागें घातक होईल अशी त्यास भीति वाटत होती. विशेषतः याच कारणामुळें त्यानें भारताचा मार्ग सुधारला व बहमनी राज्यांत चढत चढत मुख्य प्रधानाच्या जागेपर्यंत आला. त्यानें कोल्हापूरच्या बाजूस जाऊन तिकडील खेळणा ऊर्फ विशाळगड हा किल्ला काबीज केला. तेथून घाट ओलांडून कोंकणपट्टी आपल्या ताब्यांत घेतली व तेथील राजा शंकरराय याचा पराभव केला. त्या काळीं भारतांतील मुसलमान परदेशी मुसलमानांचा द्वेष करीत. त्याप्रमाणें महमूद गावान हा बहमनी राज्यांतील सरदारांच्या रोषास पात्र झाला व शेवटीं त्यांनीं त्या वेळचा बादशाह महमुदशाह ह्यास गावानाविरुद्ध चिथविलें व त्यास ठार मारविलें (इ. स. १४८१). मरतां मरतां तो म्हणाला,

* इराणांतील बहमनी वंशाशीं आपला संबंध आहे असें त्यास वाटल्यामुळें त्यानें स्वतःस 'बहमनी' हें नांव जोडलें असें व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'मजसारख्या वृद्ध मनुष्यास मृत्यू येणें कांहीं वाईट नाहीं. परंतु मजबरोबरच राज्याचाही नाश होईल हें मात्र मला दिसतें'. त्याच्या मृत्यूनंतर बहमनी राज्यास उतरती कळा लागली. महमूद गावान हा साधुवृत्तीनें राहणारा होता. सायंकाळच्या वेळीं वेष पालटून तो आपल्या पैशाच्या पिशवींतून फकीरांस दान करीत असे व म्हणत असे कीं, 'हें तुला राजानें दिलें आहे तें घे व त्यास आशीर्वाद दे.' त्याच्या अंगीं एकच दोष होता. त्यानें मुसलमानी धर्माच्या अभिमानानें हिंदूंचा छळ केला. पण त्या काळाचा साकल्यानें विचार केला तर त्यांत कांहीं अपूर्व होतें असें म्हणतां येत नाहीं.

१३. बहमनी राज्याचें स्वरूप:—बहमनी राज्याचा विस्तार उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस सह्याद्रि, दक्षिणेस तुंगभद्रा व पूर्वेस तेलंगण एवढा होता. रशियन प्रवासी 'निकिटिन' हा इ. स. १४७० च्या सुमारास बीदर येथें आला होता. त्यानें बहमनी राज्याचें त्या वेळचें वर्णन लिहून ठेविलें आहे. उत्तरेकडील मुसलमान दक्षिणेंत येऊन राज्य करूं लागण्यापूर्वींच कित्येक वर्षे समुद्रमार्गानें मुसलमान लोक तेथें व्यापार वगैरेच्या निमित्तानें येत असत. त्या काळीं चौल, दाभोळ, गोवा वगैरे बंदरें व्यापाराकरितां प्रसिद्ध होतीं. तेथून इजिप्त, अरबस्थान वगैरे देशांशीं भारताचा मोठा व्यापार चालत असे. दक्षिणेंतील सुलतानांचें धर्मवेड उत्तरेंतील सुलतानांहून कमी नव्हतें. तरी एकंदरींत दक्षिणेंतील मुसलमानांना उत्तरेकडील मुसलमानांप्रमाणें बाहेरून वायव्येकडून येणाऱ्या कडव्या मुसलमानांचें पाठबळ नव्हतें म्हणून त्यांस हिंदूंवर अधिक विसंबून राहावें लागत असे. यामुळें म्हणा किंवा अन्य कांहीं कारणानें म्हणा, दक्षिणेकडील हिंदु-मुसलमानांचे संबंध सापेक्षतः अधिक सलोख्याचे असत. बहमनी राज्यकर्त्यांत कोणी कर्तबगार पुरुष झाला नाहीं व कित्येक तर निःसंशय दुर्बलच होते. परंतु त्याचा फायदा घेऊन स्थानिक लोकांनीं स्वतःच्या सत्तेच्या पुनरुज्जीवनार्थ उठाव केल्याचें किंवा विजयनगरकडून येणाऱ्या लाटेचा फायदा करून घेतल्याचें दिसत नाहीं. स्वतःच्या राजकीय स्थितीबद्दलच्या वाढत्या औदासीन्याचें हें लक्षण होय. राज्यकर्ते कसेही असले तरी सर्वसाधारण जनता शांततेचा उपभोग घेत होती असें निकिटिनच्या वर्णनावरून म्हणण्यास हरकत नाहीं. इ. स. १४८० पासून बहमनी राज्याचे तुकडे पडण्यास सुरुवात झाली व इ. स. १५२६ पर्यंत विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही व बेदरची बरीदशाही अशीं पांच स्वतंत्र मुसलमानी राज्यें अस्तित्वांत आलीं. दक्षिणेंतील पुष्कळसे मुसलमान बहमनी राज्यांत धर्मांतर झालेल्या लोकांचे वंशज आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) विजयनगरचें हिंदु साम्राज्य : इ. स. १३३६–१६७४

१४. विद्यारण्य :—अलाउद्दिनाचा सरदार मलिक काफूर याच्या स्वाऱ्यांमुळें मुसलमानांची सत्ता दक्षिणेपर्यंत जाऊन पोहोंचली व तेथें असलेल्या अनेक हिंदु राज्यांचा विध्वंस झाला. दक्षिणेस शृंगेरी येथें श्रीशंकराचार्यांचा मठ होता, त्यासही मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें उपद्रव पोहोंचला. तेव्हां मुसलमानी सत्तेची लाट परतवून लावावी अशी हिंदु लोकांत जोराची भावना उत्पन्न झाली. ही मनोभूमिका तयार करण्याचें बरेंचसें श्रेय त्या वेळचे शृंगेरीचे शंकराचार्य विद्यारण्य ह्यांस दिलें पाहिजे. विद्यारण्य मोठा संस्कृत पंडित होता. त्यानें संस्कृत भाषेंत अनेक ग्रंथ लिहिले. त्यांमध्यें 'सर्वदर्शनसंग्रह' व पंचदशी हे दोन ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. परंतु विद्यारण्य केवळ धर्मशास्त्रज्ञ नव्हता. त्यास त्या वेळचें राजकारणही कळत होतें. मुसलमानांची दक्षिणेकडे एकसारखी पसरणारी लाट थोपवून न धरल्यास अखिल भारत यवनमय होईल व मग हिंदूंचें धर्मशास्त्र पुस्तकांतल्या पुस्तकांतच राहून जाईल हें जाणून तो थोर पुरुष लोकजागृतीच्या कार्यास लागला.

१५. विजयनगरची स्थापना :—इ. स. १३२३ सालीं मुसलमानांनीं वरंगळच्या राज्यावर स्वारी करून तेथील राज्य उध्वस्त केलें; तेव्हां तेथें राहून निभाव लागणार नाहीं असें पाहून संगमाचे पुत्र हरिहर व बुक्क अनेक हिंदु लोकांबरोबर कर्नाटकांत आनेगुंदीच्या राज्यांत आले. आनेगुंदीचें राज्य तुंगभद्रेच्या उत्तरेस आहे व त्याच राज्याच्या सरहद्दींत शृंगेरीचा मठ होता. हरिहर आनेगुंदीच्या राज्यांत आला तेव्हांपासून त्याच्याही मनांत हिंदु राज्याच्या पुनरुज्जीवनाचे विचार एकसारखे घोळत होते. लौकरच हरिहरबंधूंच्या अंतःकरणांत शृंगेरी पीठस्थ शंकराचार्यांबद्दल पूज्यभाव उत्पन्न झाला व यापुढें त्या उभयतांचें साहचर्य परस्परांस व राज्यवृद्धीस पोषक झालें. हरिहर हा फार कर्तबगार होता. तो आपल्या अंगच्या हुषारीनें आनेगुंदीच्या राज्याचा प्रधान झाला. परंतु हें राज्य फार दिवस टिकलें नाहीं. इ. स. १३३४ सालीं आनेगुंदीच्या राजानें मुहंमद तुघ्लुखाच्या बंडखोर पुतण्यास आश्रय दिला. यामुळें मुहंमदास राग येऊन त्यानें आनेगुंदीवर स्वारी केली व तें राज्य काबीज करून तेथें आपला अधिकारी नेमला. हें पाहून हरिहर व विद्यारण्य यांनीं नवीन ठिकाणीं राजधानी स्थापन करण्याचा विचार केला. आनेगुंदीसमोर तुंगभद्रेच्या दक्षिणेस एक बळकट जागा पाहून त्या जागीं विजयनगरची स्थापना केली. ह्या शहराच्या तिन्ही बाजूंनीं टेकड्या व चौथ्या बाजूस खोल नदी असल्यामुळें ह्या शहरास एक प्रकारें स्वाभाविकच तटबंदी झाली होती. हेंच शहर हरिहरानें आपली राजधानी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें. हिंदु लोकांत विद्यारण्याचें चांगलेंच वजन असल्यामुळें राज्यस्थापनेचें कार्य सुलभ झालें व मुहंमद तुघ्लुखानंतरचे दिल्लीचे सुलतान दुबळे निघाल्यामुळें मुसलमानांकडून प्रारंभींच विरोध झाला नाहीं. इ. स. १३२६ सालीं म्हणजे बहमनी राज्य सुरू होण्याच्या अगोदर दहा वर्षें विजयनगरचें राज्य सुरू झालें. विद्यारण्यही* आपलें कार्य झालें असें पाहून हरिहर याजवर सर्व कारभार सोंपवून निघून गेला. विद्यारण्याची ही निरिच्छ बुद्धि त्याच्या कर्तबगारीस अधिकच शोभा देते!

१६. **दुसरा देवराय** (इ. स. १४२१–४८) :—हरिहर व बुक्क हे पहिले राजे झाले. इ. स. १३७४ सालीं बुक्कानें चीनच्या राजाकडे शिष्टमंडळ पाठविल्याचा उल्लेख सांपडतो. हरिहर-बुक्कानंतर जे राजे झाले, त्यांचीं व बहमनी राजांचीं क्षुल्लक कारणांवरून अनेक वेळां युद्धें होत व कित्येक वेळां हिंदु राजांच्या पदरीं अपयशाचा वांटाही येत असे. परंतु ऐश्वर्यानें व विस्तारानें विजयनगरचें राज्य फार मोठें असल्यानें त्या पराभवांचा चिरकालिक असा कांहींच परिणाम झाला नाहीं. फक्त त्यांच्या राज्याची उत्तरेकडील वाढ खुंटली एवढाच काय तो परिणाम झाला असें म्हणतां येईल. इ. स. १४२१ ते १५२९ पर्यंत विजयनगरच्या राज्याची चढती कमान होती. इ. स. १४२१ ते ४८ पर्यंत दुसरा देवराय नांवाचा एक राजा होऊन गेला. त्यानें हिंदूंना मुसलमानी युद्धकलेची माहिती करून देण्याकरितां कांहीं मुसलमान लोक आपल्या चाकरीस ठेवले. परंतु ते इतके कडवे होते कीं, हिंदु राजा काफर म्हणून ते त्यास मुजरादेखील करीत नसत; म्हणून देवराय ती अडचण काढून टाकण्याकरितां आपल्या जवळच कुराणाची प्रत घेऊन बसे व मग ते त्यास मुजरा करीत. असल्या चढेल लोकांच्या धर्माभिमानाचें कौतुक करावें, कीं अशाही लोकांपासून त्यांची युद्धकला हस्तगत करणाऱ्या देवरायाची तारीफ करावी हा प्रश्नच आहे!

१७. **कृष्णदेवराय** (इ. स. १५०९–२९) :—विजयनगरचें राज्य एका घराण्यांत एकसारखें चाललें नाहीं. त्या काळीं इतरत्र दिसून येणारा क्रम येथेंही घडून आला. साळुव घराण्यांतील नरसिंह हा चंद्रगिरीचा राजा होता. त्यानें पूर्वीच्या संगम घराण्यास बाजूस सारून आपण गादी बळकाविली

* विद्यारण्य व विद्यातीर्थ या दोन व्यक्ती असून विद्यारण्य हे विद्यातीर्थाचे शिष्य होत, व विद्यातीर्थ हे हरिहराचे समकालीन होत, असें अलीकडील संशोधकांचें म्हणणें आहे. विद्यातीर्थांस 'विद्याशंकर' असेंही दुसरें नांव आढळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(इ. स. १४८६). साळुव घराण्याचा अंमल इ. स. १५०५ पर्यंत टिकला व त्या सालीं तेथील एका तुळुव घराण्यांतील पुरुषानें विजयनगरचें राज्य वळकाविलें. या तुळुव घराण्यांत कृष्णदेवराय हा फार पराक्रमी राजा होऊन गेला. यानें इ. स. १५०९–२९ पर्यंत राज्य केलें. उत्तरेस राजपूत राणा संग व मोगल बादशाह बाबर याचा हा समकालीन होय. बहमनी राज्य या वेळेस मोडकळीस येत चाललें होतें. कृष्णदेवरायानें आदिलशाहाशीं युद्ध करून रायचूर दुआब आपल्या ताब्यांत घेतला व पुढें तर खुद्द गुलबर्गा शहरही काबीज केलें. त्यानें ओरिसाच्या गजपतीशीं अनेक युद्धें केलीं व पश्चिमेस फोंड्यावर स्वारी करून पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्याचा यत्न केला. कृष्णदेवराय स्वतः वैष्णवधर्मी असून त्यानें इतर धर्मीयांस सहिष्णुतेनें वागविलें. त्याचें खाजगी आचरणही कित्ता घेण्यासारखें होतें. त्यानें अनेक संस्कृत, तेलुगु, तामीळ व कन्नड ग्रंथकारांना आश्रय दिला. तेलुगु रामायणाची कर्ती कुमार मल्लम्मा हिचा कृष्णदेवरायनें सन्मान केला. त्यानें स्वतः लिहिलेला 'आमुक्तमाल्यदा' हा तेलुगु ग्रंथ प्रसिद्ध आहे. कृष्णदेवराय शिल्पाचा भोक्ता होता. विजयनगर येथील हजाराराम मंदिर त्यानेंच बांधलें. यांखेरीज शेंकडो गड व कोट, मंदिरें व गोपुरें, मठ व धर्मशाळा यांची त्याच्या कारकीर्दींत उभारणी झाली.

कृष्णदेवराय

१८. **राक्षसतागडीची लढाई** (इ. स. १५६५) :—त्याच्यानंतर त्याचा भाऊ अच्युतराय हा गादीवर बसला; परंतु सर्व सत्ता दिवाण तिम्म याच्या हातांत होती. अच्युतराय इ. स. १५४२ त मृत्यु पावल्यावर त्याचा पुतण्या सदाशिवराय हा गादीवर बसला; परंतु सर्व सत्ता पूर्वीच्या दिवाणाचे तीन मुलगे तिरुमल, रामराजा व वेंकटाद्रि यांच्या हातीं होती. त्यांचें विजापूरच्या आदिलशाहाशीं संगनमत होऊन दोघांनीं मिळून निजामशाहीवर चाल केली. परंतु या लढाईंत रामराजानें आपल्या साह्यकर्त्यांशीं फार चढाईचें वर्तन केलें, व लढाईनंतर तो मुसलमान राजांच्या वकिलांनाही सभ्यपणें वागवीनासा झाला. तेव्हां विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडें व बीदर येथील मुसलमान राजांना आपआपलीं भांडणें बाजूस ठेवून हिंदु राज्याचा शेवट केला पाहिजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें वाटूं लागलें व आपआपलीं सैन्यें एकत्र करून ते विजयनगरच्या रोखानें निघाले. रामराजानें तिरुमल व वेंकटाद्रि यांच्या हाताखालीं फौजा तयार करून तो त्यांना तोंड देण्याकरितां निघाला. विजयनगरच्या लोकांनीं आजपर्यंत अनेक वेळां मुसलमानांशीं दोन हात केले असल्यामुळें त्यांना या लढाईची कांहींच धास्ती वाटली नाहीं. दोन्ही सैन्यांची गांठ तालिकोटपासून २५ मैलांवर कृष्णेच्या कांठीं रक्कसगी व तंगडगी या दोन गांवांजवळ पडली, म्हणून या लढाईस राक्षसतागडीची लढाई असें म्हणतात. प्रत्यक्ष लढाई चालू असता रामराजा फारच बेसावधपणें वागला व त्यामुळें तो शत्रूच्या हातीं सांपडला. शत्रूच्या फौजेनें त्यास मारून त्याचें शिर विजयनगरच्या फौजेस दाखवितांच तिचा धीर खचला. हिंदूंचा पूर्ण पराभव झाला.

१९. **विजयनगरचा अंत**:—या पराजयांतून हिंदूंचें डोकें वर निघालें नाहीं. इ. स. १५६७ त तिरुमलनें पेनुकोंड्यास स्वतंत्र राज्य स्थापन केलें. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा श्रीरंग हा गादीवर बसला. परंतु मुसलमानांनीं स्वारी करून पेनुकोंडाही काबीज केला (इ. स. १५७९); तेव्हां राजधानीचें पुनः स्थलांतर होऊन तो चंद्रगिरी येथें आली. चंद्रगिरीचा शेवटचा राजा श्रीरंग याचें पुढें सतराव्या शतकांत म्हैसूरच्या राजाशीं भांडण झालें व त्या भांडणांतच चंद्रगिरीच्या राजवंशाचा म्हणजे परंपरेनें विजयनगरच्या हिंदु राज्याचा अस्त झाला (इ. स. १६७४).*

२०. **विजयनगरचें वैभव**:—इटालियन प्रवासी निकोलो दि कोंती हा इ. स. १४८७ सालीं देवरायाच्या दरबारीं गेला होता व अब्दुर रझ्झाक हा तुर्की पुरुष तैमूरलंगाच्या मुलाकडून कालिकतच्या झामोरीनकडे आला असतां तोही इ. स. १४४३ सालीं विजयनगरास येऊन गेला. याशिवाय पंधराव्या शतकाच्या शेवटीं पोर्तुगीज लोकही विजयनगरच्या दरबारीं येऊन गेले. या प्रवाशांनीं विजयनगरचीं वर्णनें लिहून ठेविलीं आहेत, त्यांवरून तेथील वैभवाची साक्ष पटते. त्या कालीं हिंदु कलाकौशल्याच्या निदर्शक अशा अनेक इमारती हिंदु राजांनीं बांधिल्या. परंतु मुसलमानांच्या विध्वंसापुढें त्यांतील फारसें कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. तुंगभद्रा नदीस धरण बांधून कालवे काढलेले होते. इ. स. १४०६ सालीं बहमनी सुलतान फिरूज व देवरायाची मुलगी यांचें लग्न झालें. त्या वेळीं राजधानींतील सहा मैल रस्ता भरजरीच्या वस्त्रांनीं आच्छादित केला होता. राजधानीभोंवतीं सात तट असून अगदीं मध्यावर

* याच वर्षीं महाराष्ट्रांत रायगड येथें शिवाजीनें स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. मावळत्या विजयनगरचा व उगवत्या मराठी राज्याचा सांधेजोड ध्यानांत घेण्याजोगा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजवाडा व खजिना असे. कृष्णरायाच्या वेळीं विजयनगरच्या राज्यांत सात लक्ष पायदळ, बावीस हजार घोडेस्वार व सुमारें ५५१ हत्ती होते असें वर्णन आढळतें. एकंदर राज्याचे दोनशें विभाग असून त्यांवर अधिकारी नेमलेले असत. इ. स. १३८७ सालीं विद्यारण्याचा भाऊ सायणाचार्य यानें वेदांवर भाष्य लिहिलें.



श्रीविरूपाक्ष किंवा पंपापति देवालय, विजयनगर

(भा. इ सं. मंडळ, पुणें यांचे कृपेनें)

२१. **विजयनगरचें कार्य :**—चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं मुसलमान लोक दक्षिणेंत राज्यकर्ते बनले. परंतु त्याच शतकाच्या मध्यावर हिंदूंनीं एकत्र होऊन आपल्या धर्माचें रक्षण करण्यासाठीं राज्य स्थापन केलें व तें दोन शतकें टिकून राहिलें. याचें कारण मलिक काफूरच्या स्वाऱ्यांनीं हिंदूंना धर्मरक्षणाचें महत्त्व उमजलें हें होय. विजयनगरचें राज्य नसतें तर मुसलमानी सत्तेची लाट अप्रतिहत दक्षिणेपर्यंत पोहोंचून उत्तरेप्रमाणें दक्षिणही मुसलमानमय झाली असती. या दृष्टीनें विजयनगरच्या राज्याकडे पाहिलें म्हणजे त्याचें कार्य कोणतें तें लक्षांत येतें. मोठमोठीं राज्यें व साम्राज्यें यांच्यामागें कर्तृत्ववान् व्यक्ती उभ्या असतात. ह्या व्यक्ती कांहीं एका विशिष्ट ध्येयाकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तळमळत असतात. त्या ध्येयाची सिद्धि हें त्या राष्ट्राचें कार्य. विजयनगर हिंदुत्वाच्या रक्षणाकरितां उभें राहिलें, लढलें व स्मृतिशेष झालें. पण एवढ्यानें विजयनगरचें कार्य संपलें असें नाहीं. फादर हेरास म्हणतात, 'हें राज्य केवळ हिंदुधर्माच्या रक्षणाकरितां स्थापन झालें नसून हिंदुधर्माशीं सदृश अशा अनेक पंथांचें रक्षण करून लोकांना शांततेचा लाभ व धार्मिक स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां स्थापन झालें होतें. अशा रीतीनें राजकीय गुलामगिरीपासून मुक्तता व धार्मिक स्वातंत्र्याचा बचाव ही विजयनगर साम्राज्याची द्विविध कामगिरी होय.' या काळांत प्राचीन संस्कृत विद्येच्या रक्षणाचें व विकासाचें श्रेय विजयनगरासच दिलें पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें तर संस्कृतिसंरक्षणाच्या कार्यांत विजयनगरास राजपुतांपेक्षांही वरचें स्थान द्यावें लागेल. खेरीज, मध्यवर्ती एकछत्री राज्याची स्थापना, फंदफितुरीचा अभाव, व्यापारधंद्यास उत्तेजन व शास्त्रीय राज्यपद्धति या दृष्टींनीं पाहूं गेलें तर राजपुतांपेक्षां विजयनगरचे राजेच उजवे ठरतील. एका वाक्यांत म्हणावयाचें तर राजपुतांचा इतिहास स्फूर्तिदायक व रोमांचकारी आहे, तर विजयनगरची कामगिरी भरीव व बोधप्रद आहे.

२२. **संधिकालांतील पाळेगार** :—विजयनगरच्या विनाशानंतर हिंदुत्वाच्या रक्षणाचें कार्य कांहीं काळ मागें पडलें. तंजावर, मदुरा वगैरे ठिकाणीं लहान लहान हिंदु राज्यें जीव धरून होतीं. ह्यांपैकीं पुष्कळांस 'पाळेगार' म्हणत असत. शेवटीं चवदाव्या शतकांत हरिहर व विद्यारण्य यांनीं जें कार्य केलें तेंच सतराव्या शतकांत शिवाजी व रामदास यांनीं केलें व हिंदु राज्याची विस्कटलेली घडी पुनः नीट बसविली. तोंपर्यंत निरनिराळे मराठे सरदार मुसलमानांच्या पदरीं राहून आपल्या शौर्याचें जतन करून होते. अशा पुरुषांतच शिवाजीचा बाप शहाजी याची गणना होते.

प्रश्न

१. भारताचा नकाशा काढून त्यांत सुलतानशाहीनंतर अस्तित्वांत असलेल्या स्वतंत्र राज्यांच्या राजधान्या दाखवा. २. टिपणें लिहा.—राणा कुंभ, राणा संग, महमूद बेगडा. ३. बहमनी राज्याचा संस्थापक कोण होता तें सांगून त्या राज्यांतील प्रजेच्या सामान्य स्थितीसंबंधीं काय माहिती मिळते तें सांगा. ४. टिपणें लिहा.—राजतरंगिणी, हुसेनशाह, विद्यारण्य, कृष्णदेवराय, राक्षसतागडीची लढाई. ५. राजपूत व विजयनगरचे राजे यांनीं मुसलमानांचा प्रतिकार करण्याचे जे यत्न केले त्यांचें तुलनात्मक विवेचन करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

(१) वाचा :—'विजयनगर सम्राट् कृष्णदेवराय' —ले. ग. ह. खरे. 'विजयनगरस्मारकग्रंथ' या पुस्तकांतील चित्रें अवश्य पाहा.
(२) दक्षिणेंतील हिंदु मुसलमानांचे संबंध या विषयावर टिपण लिहा.
(३) 'मोठमोठीं राज्यें व साम्राज्यें यांच्या मागें कर्तृत्ववान् व्यक्ती उभ्या असतात; ह्या व्यक्ती कांहीं एका विशिष्ट ध्येयाकरितां तळमळत असतात, त्या ध्येयाची सिद्धि हें त्या राष्ट्राचें कार्य' या वाक्यावर निबंध लिहा.

माहितीसाठीं

राणा संगाबद्दल बाबरचे उद्गार

बाबर आत्मचरित्रांत लिहितो, "स्वतःचें शौर्य व लष्कराचें सामर्थ्य यांमुळें राणा संगाची सत्ता बरीच प्रबळ झाली होती. त्याची शक्ति एवढी मोठी होती कीं, माळवा, गुजराथ किंवा दिल्ली येथील सुलतान एकट्याच्या बळावर त्याचा पराभव करूं शकत नव्हते."

विजयनगरांतील नागरिकांचें स्वातंत्र्य

दुआर्ते बार्बोस या पोर्तुगीज प्रवाशानें सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं कांहीं वर्षें मलबारांत काढलीं तेव्हां तो विजयनगरला येऊन गेला. तो लिहितो "(विजयनगरांतील) मार्गांतून सर्व राष्ट्रांच्या व सर्व धर्मांच्या असंख्य लोकांचा घोळका झालेला दृष्टीस पडतो. अनेक मूर व्यापारी व बनिये व देशांतील अत्यंत सधन उच्चवर्णीय लोक यांच्या खेरीज आणखी ज्यांना येथें व्यापार करणें व राहणें शक्य आहे असे असंख्यात लोक तेथें गोळा होतात आणि अतिशय मोकळेपणानें व सुरक्षित रीतीनें राहतात. कोणापासूनहीं त्यांना कसलाही उपद्रव होत नाहीं; किंवा ते कोठून आले, ते कोणता पंथ पाळतात, कीं ते मूर वा ख्रिस्ती वा उच्चवर्णीय (हिंदु) आहेत यांपैकींहीं कांहीं कोणी विचारीत नाहीं. ... .सर्वांच्याच संबंधांत कडक न्याय व सत्य पाळण्यांत येतें."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २१ वा

सुलतानशाही काळांतील भारताचें स्वरूप

१. अवशिष्ट हिंदु राज्यें :—येथवर इ. स. १२०५ ते इ. स. १५२६ पर्यंतच्या कालांतील राजकीय घडामोडींचें वर्णन झालें. इ. स. १५२६ पर्यंत मुसलमानी अंमल सुरू होऊन तीनशें वर्षांहून अधिक काळ लोटला. म्हणजे हा काळ शिवाजीपासून आजपर्यंतच्या काळा इतका मोठा होय. तेव्हां ह्या दीर्घ काळांत मुसलमानी अंमलाचे हिंदुस्थानवर काय परिणाम झाले, तें पहाणें जरूर आहे.* जवळजवळ सव्वातीनशें वर्षांच्या काळांत एकछत्री नसला तरी फुटकळपणें मुसलमानी अंमल सर्व देशभर पसरला. परंतु अद्यापही तग धरून होतीं अशा हिंदू राज्यांचे तीन भाग पडतात. (१) हिमालयाच्या उतरणीवरील डोंगराळ प्रदेश, (२) राजपुताना, (३) विजयनगरचें राज्य व त्यानंतर तेथें झालेले हिंदू पाळेगार. परंतु हे भाग सोडून दिले तर बाकी सर्व ठिकाणीं मुसलमानी सुलतानांचा अंमल सुरू झाला होता.

२. राजकीय औदासीन्य :—ह्या प्रदेशांतील मुसलमानांच्या राजकीय सत्तेचा विचार करतां असें दिसतें कीं, त्यांच्या सत्तेचीं पाळेंमुळें हिंदु समाजांत खोलवर गेलेलीं नव्हतीं. राजधानीच्या ठिकाणीं किंवा मोठमोठ्या शहरीं काझी, कोतवाल वगैरे मुसलमान अधिकारी दृष्टीस पडत; परंतु बहुजनसमाज खेड्यापाड्यांतून राहात असे. तेथें मुसलमानी अंमलाचा शिरकाव झाला नाहीं. प्राचीन काळची ग्रामव्यवस्था त्या कालींही भारतांत कायम होती व खेड्यांतील लोक पाटलामार्फत सरकार देणें देऊन आपआपल्या खेड्यांतील स्वराज्याचा कारभार पाहण्यांत दंग असत. बंगालसारख्या ठिकाणीं ग्रामव्यवस्थेखेरीज ठिकठिकाणीं जमीनदार असत व मुसलमानी अधिकाऱ्यांचा

---

* 'मुसलमानी अंमल' असा शब्द आपण स्थूल मानानें वापरतों. परंतु 'इंग्रजी अंमल' किंवा 'मराठी अंमल' या शब्दांहून तो भिन्न आहे. मुसलमान हा धर्मसूचक शब्द आहे, देशसूचक नव्हे. या काळांतील मुसलमान राज्यकर्ते तुर्क व अफगाण होते. आजचे ख्रिस्ती इंग्रज व जर्मन यांत जसा राजकीय विरोध असणें शक्य आहे तसा त्या कालीं तुर्क-अफगाणांत होता; इतकेंच नव्हे तर, निरनिराळीं तुर्कघराणींही एकमेकांत भांडत. असें असलें तरी सर्व मुसलमानांतील धर्माभिमानाचा विशेष लक्षांत घेतां 'मुसलमानी अंमल' हा शब्दप्रयोग समर्थनीय ठरतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या जमीनदारांखेरीज इतरांशीं क्वचितच संबंध येत असे. बहुजनसमाजाचें राजकीय औदासीन्य मुसलमानी अंमलांत वाढत गेलें व रयतेच्या सामाजिक व राजकीय जीवनाची फारकत झाली.

३. राज्यकर्त्यांचें स्थान :—भारतांत 'सुलतानशाही' काळांत राज्याच्या वारसाचे नियम निश्चित नव्हते. असलेच तर ते कोणी पाळीत नव्हते. दरबारांतील बरोबरीच्या लष्करी सरदारांची मान्यता मिळाली म्हणजे कोणानेंही गादीवरील स्थान निश्चित होई. आणि त्यांतून तो पूर्वीच्या राजाचा मुलगा किंवा नातलग असला तर त्यास मान्यता मिळणें सुलभ जात असे. पण सुलतानी अमदानींत बेबंदशाही झाल्याबरोबर कोणीही प्रबळ सरदार पुढें येतो व पूर्वीच्या दुर्बळ हक्कदारास ठार मारून आपण स्वतः तक्त बळकावितो व लोक बहुधा त्याचा अंमल बिनतक्रार मान्य करितात असाही प्रकार वारंवार दृष्टीस पडतो. गुलामाचें खिलजींनीं व खिलजींचें तुघ्लुखांनीं केलेलें उच्चाटन हीं या प्रकारचीं उदाहरणें होत. पुढें पानपतावर इब्राहिम लोदीचा बाबरनें पराभव केला. तेव्हां सुलतानशाहीचा शेवट होऊन मोगलांचा 'बादशाही' अंमल सुरू झाला. बादशाही अमलांत राज्याचा वारसा निश्चित होतांना लष्करी सरदारांच्या संमतीचा प्रश्न नसे. कारण राज्यकर्ता हा आपल्यांतलाच एक आहे अशी कल्पना बादशाहींत रूढ नव्हती. बादशाह हा गादीचा मालक व लष्करी सरदार हे त्याचे ताबेदार असा त्यांचा संबंध असे. तरीसुद्धां सुलतानशाहीप्रमाणेंच बादशाहींतही युद्धें उद्भवलींच. याचें कारण बाप म्हातारा झाल्याबरोबरच राजपुत्रांत हमखास कारस्थानें सुरू होत. वयांत आलेला मुलगा बापाला प्रतिस्पर्ध्याप्रमाणेंच वाटे व त्याच्यापासून दगा होणें कसें टळेल याची तो काळजी घेई. अलाउद्दिनानें आपल्या चुलत्यास दग्यानें ठार मारिलें असें म्हणतात. त्याच प्रकाराची पुढें मोगलाईतही पुनरावृत्ति झाली. भारतीय मुसलमानांच्या इतिहासांत हा प्रकार इतका सर्वसाधारण आहे कीं त्यास अपवाद असणारा सदाचरणी राजपुत्र मुद्दाम हुडकून काढावा लागेल. असो.

४. राज्यकारभाराचें स्थूल स्वरूप :—वझीर हा राज्यांतील सर्वांत मोठा अधिकारी असे. राज्यकारभाराचें काम निरनिराळ्या खात्यांत विभागलें होतें. दिवाण-इ-इन्शा (पत्रव्यवहार खातें), दिवाण-इ-खैरात (दानधर्म खातें), दिवाण-इ-बंदगान (गुलाम खातें) याखेरीज अर्ज खातें, लष्करी खातें, वसूल खातें अशीं खातीं असत. बक्षी हा सैन्याचा पगार देणारा अधिकारी होता. राज्यांतील लष्करी सरदारांचे : खान, अमीर व मलिक असे तीन वर्ग होते. सुलतानांचें खास मित्रमंडळ राज्याचें सर्व धोरण आखीत असे. या मंडळास मजलिस-इ-खल्वत हें नांव होतें. यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या खान, अमीर व मलिक यांचाच फक्त अंतर्भाव होत असे. सारांश, सुलतान-शाही ही दुसरी लष्करशाहीच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. वसुलाच्या बाबी मुख्यत: पांच प्रकारच्या होत्या. (१) खिराज–जमीन महसूल, (२) खालसा—इनाम जमिनीचें उत्पन्न, (३) खाम—लढाईंतील लूट, (४) आबवाब—घरपट्टी, वनचराई इत्यादि प्रकारच्या पट्ट्या, (५) जिझिया—मुसलमान नसलेल्यांनीं धर्मपालनार्थ बादशहाची अनुमति मिळावी म्हणून त्यास दिलेली पट्टी. राज्यांतील मुख्य न्यायाधिशास सदर-उस्-सुदूर असें म्हणत. त्याजकडे सर्व राज्यांतून अपिलें येत. प्रमुख शहरीं काझी हा न्यायाधिकारी असे. याखेरीज स्थानिक पंचायती असत. हिंदु-हिंदूंतील फिर्यादींचा निकाल पंचायती करीत; परंतु मुसलमान पक्षकार असलेल्या फिर्यादी काझीकडे जात व कुराणावर आधारलेल्या कायद्याप्रमाणें त्या वादाचा निवाडा होत असे. प्रमुख शहरीं गुन्ह्याचा बंदोबस्त करण्यासाठीं कोतवाल हा अधिकारी असे. याचा सर्व ठिकाणीं मोठा दरारा होता. राज्याचें साम्राज्यांत रूपांतर झाल्यावर प्रांतिक सुभेदाऱ्या उत्पन्न झाल्या. अला-उद्दिनाच्या साम्राज्याचे एकूण २३ सुभे होते.

५. आर्थिक स्वरूप :—मुसलमानी राज्यकर्त्यांनीं भारतांत जें कायमचें वास्तव्य केलें त्याचा एक अप्रत्यक्ष फायदा असा झाला कीं, त्यामुळें येथील संपत्तीचा ओघ परदेशीं जाण्याचें कारण राहिलें नाहीं. परदेशचे मुसलमान ह्या देशांत येऊन अधिकाराच्या जागा पटकावीत हें खरें; परंतु ते आल्यावर त्यांना परत जाण्याचा ओढा नसल्यानें त्यांना पगाराच्या रूपानें मिळणारी संपत्ति देशांतल्या देशांतच खर्च होई. तसेंच येथील राज्यकर्त्यांस स्वत:चें असें व्यापारी धोरण कांहीं नसल्यामुळें येथील उद्योगधंदे परदेशच्या चढाओढीमुळें नाश पावले नाहींत. मुसलमानी अंमलांत हिंदुस्थानचा परदेशी व्यापार पूर्वीप्रमाणेंच सुरळीत चालू होता. भारतांतील कापड, साखर, मसाल्याचे जिन्नस वगैरे पदार्थ ह्या काळांतही युरोपचे बाजारांत विकले जात. किंबहुना मुसलमान राज्यकर्त्यांच्या विलासी वृत्तीमुळें येथील कलाकौशल्यास उत्तेजनच मिळालें.

६. उद्देशाची विफलता :—मुसलमान येथें आले ते मुख्यत: सर्व भारतभर इस्लामी धर्माचा प्रसार करण्याच्या हेतूनें आले व याकरितां त्यांनीं खटपटही जोराची केली. अनेकांनीं कत्तली केल्या, शहारे आणण्याजोगीं अनेक कृत्यें केलीं, देवळें पाडलीं, मशिदी स्थापन केल्या, हिंदू देवतांची सार्वजनिक रीतीनें पूजा करण्याची मनाई केली, हिंदूंवर जिझिया कर लादला, बळजबरीनें मुसलमान केलें; एकंदरींत हिंदूंना जीवन कष्टमय करण्याची शिकस्त केली. परंतु इतकें असूनही मुसलमानांचें हें कार्य फारसें यशस्वी झालें नाहीं. उलट हिंदु लोक आपल्या धर्मास अधिकच चिकटून राहिले. इतकेंच नव्हे तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वधर्मरक्षणासाठीं आपलीं जातीय बंधनें अधिकच संकुचित व दृढ केलीं ! चौदाव्या शतकांत बंगालमध्यें मदनपाल राजासाठीं लिहिलेली मदनपारिजात ही स्मृति ह्या गोष्टीची साक्ष देईल. एकंदरींत इसापनीतींतील वारा आणि सूर्य यांची अशी गोष्ट आहे कीं, सोसाट्याचा वारा सुटल्याबरोबर प्रवाशानें आपला कोट आपल्या अंगांभोंवतीं अधिकच गुंडाळला, तशी हिंदूंची गोष्ट झाली. शिवाय भारतांत आलेले राज्यकर्ते प्रगतिप्रिय होते, असेंही म्हणतां यावयाचें नाहीं. कुराण हा त्यांचा धर्म व हेंच त्यांचें ब्रीदवाक्य. कुराण हें राज्यांतील सर्व कायद्याचा आधार. सार्वभौम सत्ता या कायद्याची. सुलतानानें फक्त कुराणाला धरून कायद्यांचा अर्थ करावयाचा. प्रबळ सुलतानानेंही याचें उल्लंघन करावयाचें नाहीं अशी त्यांची ठाम समजूत होती. कुराण हें मुसलमानांस धार्मिक दृष्टया वंद्य असणें योग्य आहे. परंतु त्यांतील तत्त्वें पुढें ठेवून सदासर्वकाळ राज्य करणें हें केव्हांही श्रेयस्कर होणार नाहीं. यांच्या सांस्कृतिक दृष्टया हीनतेचें आणखी एक प्रमाण म्हणजे त्यांचे अत्याचार होत. त्यांची बाधा सजीव मनुष्यास तर झालीच, परंतु निर्जीव पण हिंदूंच्या कला-कौशल्याची साक्ष पटविणाऱ्या अनेक इमारतींनाही झाली. विजयनगरच्या बाजूच्या अनेक पडक्या इमारती ह्याची साक्ष देतील.

७. बाटविलेल्या हिंदूंची स्थिति :—ह्या अत्याचारांनीं ज्यांना त्यांनीं मुसलमानी धर्माची दीक्षा दिली, त्यांची दशा वघण्यासारखी होती. मुसलमानी धर्म स्वीकारल्यामुळें ते येथील हिंदु परंपरेला मुकले. पण इस्लामी परंपरेचें शुद्ध स्वरूपही त्यांस पाहावयास सांपडलें नाहीं. कारण त्यांचे मुख्य ग्रंथ फारशींत, त्यांचें पवित्र ठिकाण कधीं न पाहिलेल्या अरबस्थानांत व त्यांचा धर्मग्रंथ अरबस्थानांतील एका विशिष्ट परिस्थितींत लिहिला गेलेला. फारशी भाषा येथील हिंदुमुसलमानांस अवगत नसे. ह्या तीनशें वर्षांत फारशीचें बरेंच मिश्रण असलेली अशी 'उर्दू' भाषा उदयास आली. परंतु ती जवळजवळ हिंदीसारखीच असून फक्त तिची लिपि मात्र फारशी आहे. एवंच नवीन हिंदी मुसलमान हिंदुपरंपरेला मुकले व फारशी परंपरेचें त्यांना ज्ञान झालें नाहीं. 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी त्यांची स्थिति झाली.

८. प्रजेकडे दुर्लक्ष :—सव्वातीनशें वर्षांच्या काळांत मुसलमान राज्य-कर्त्यांनीं या देशाकरितां काय केलें असें विचारल्यास, त्यांना समाधानकारक उत्तर देतां येईलसें वाटत नाहीं. कारण बहुसंख्य अशा हिंदु प्रजेचें आपण कांहीं लागतों अशी भावनाच त्यांच्याजवळ नव्हती. जमिनीची पाहणी व मोजणी-मापणी हें मूलभूत कार्य एकट्या महंमद तुघ्लुखानें मात्र हातीं घेतलें. परंतु त्याजकडून तें तडीस गेलें नाहीं. पुढील काळांतील मोगल राज्यकर्ते त्यांच्या-पेक्षां निःसंशय अधिक सुधारलेले होते. साम्राज्य जिंकण्याची प्रेरणा त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काळांतील मुसलमानांजवळ खास होती; पण तें दृढ पायावर स्थिर करण्याकरितां लागणारी दूरदृष्टि व संघटना यांचा त्यांच्याजवळ पूर्ण अभाव होता. एवढें मोठें साम्राज्य प्रांताधिकाऱ्यांच्या राजनिष्ठेवांचून दुसऱ्या कोणत्याही बंधनांनीं निगडित नव्हतें. प्रबळ सुलतानाचा दरारा असे तोंवर ठीक; सुलतान दुर्बल झाले कीं, सुभेदार स्वतंत्र होण्याचा मार्ग धरीत.

९. **मुसलमानांतील समता व बंधुभाव** :—वर मुसलमानांतील अनेक वैगुण्यें दर्शविलीं, पण भारतावर अंमल बसविण्यांत यशस्वी झालेल्या मुसलमानांचे गुणही लक्षांत घेतले पाहिजेत. त्यांच्या धर्मांतील एक उच्च तत्त्व कित्ता घेण्याजोगें होतें; व तें म्हणजे मनुष्यमात्राचा समान दर्जा हें होय. मुसलमानी समाजांत उच्चनीच भाव नाहीं. कोणी पिढीजात मुसलमान असो, कीं काल मुसलमानीधर्माची दीक्षा घेतलेला असो, अवघे त्यांच्या दृष्टीनें सारखेच. या तत्त्वामुळें त्यांच्या धर्माला हिंदूंच्या खालच्या वर्गांतून पुष्कळ अनुयायी मिळाले. मनुष्यमात्राच्या समानतेचें तत्त्व अद्यापही हिंदु समाजांत रुजलें नाहीं, हें हिंदु समाजाचें मोठेंच वैगुण्य होय.

१०. **शिल्पकलेचे नमुने** :—या तीनशें वर्षांच्या काळांत ठिकठिकाणच्या सुलतानांनीं हा देश भव्य इमारतींनी समृद्ध केला. दिल्ली, जोनपूर, गुजराथ, काश्मीर, बंगाल, गुलबर्गा या प्रत्येक ठिकाणीं या काळांतील उत्कृष्ट शिल्पकलेचे अवशेष आजही पहावयास सांपडतात. मुसलमानांना मूर्तिपूजेचें वावडें असल्यानें त्यांनीं अजंठा , वेरूळ येथल्याप्रमाणें माणसाच्या मूर्ति केल्या नाहींत; पण शिल्पकलेची ही एक बाजू सोडली तर त्यांनीं बांधलेल्या इमारतींचा भव्यपणा व कलाकुसर हीं दोन्हीही नजरेंत भरण्यासारखीं आहेत. या काळांतील इस्लामी शिल्पकला ही बाह्य इस्लामी जगतांतील शिल्पकलेची निव्वळ नक्कल आहे असें म्हणतात तें खरें नव्हे. तसेंच इस्लामी शिल्पकला ही हिंदू शिल्पकलेचें अनुकरण होय हेंही म्हणणें चुकीचें आहे. मुसलमानी राज्यकर्त्यांच्या शिल्पविषयक कल्पना या क्वचित् भारताबाहेरून आल्या असल्या तरी त्या अखेर एतद्देशीय कारागिरांच्या हातून व एतद्देशीय सामुग्रीनेंच सत्यसृष्टींत येणार अशी स्थिति असल्यानें या शिल्पकलेंतील भारतीय व्यक्तित्व लक्षांत येण्यासारखें आहे. कित्येक ठिकाणच्या इमारतींत भारतीय व इस्लामी कल्पनांचा व रचनांचा मिलाफ झालेला आहे. अनेक ठिकाणीं पूर्वींच्या देवळांच्या थोड्या फरकानें मशिदी बनल्या. एखाद्या मशिदीच्या मध्यभागीं असलेला भव्य दिवाणखाना, मध्यें खांबांच्या दोन रांगा, त्यामुळें निर्माण झालेलीं बाजूंचीं दोन पाखी, हीं हिंदु व मुसलमान या उभयतांच्या इमारतींत सारखींच सांपडतील; पण ठिकठिकाणच्या अर्धवर्तुळाकार कमानी, मशिदीच्या शिखरावरील डौलदार अर्धगोल किंवा घुमट, त्यावर क्वचित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झळकणारा चांद, आणि मशिदीच्या चारही बाजूंस असलेले मनोरे हे इस्लामी शिल्पाचे विशेष होत. कित्येक ठिकाणीं वरच्या मजल्याला पुढें आलेली लहानशी गच्ची व कठडा असतो व त्याला खालीं नक्षीदार आधार दिलेला असतो हें शिल्प एतद्देशीय राजपूत पद्धतीचें होय. मुसलमानांनीं बांधलेल्या इमारतींत हे सर्व प्रकार स्थानिक भेदपरत्वें कमीअधिक प्रमाणांत पहावयास सांपडतात. दिल्ली येथील कुतुबमिनार, जोनपूरची अतालदेवी मशीद, बंगाल्यांतील आदीना मशीद व अहमदाबादची जामी मशीद या इमारतींचें शिल्प तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करण्यासारखें आहे.

११. समारोप :—एकंदरींत विचार करतांना तत्कालीन हिंदु समाज राजकीय बाबतींत उदासीन होता. राजाश्रयामुळें त्याचे उद्योगधंदे भरभराटींत होते. तो ग्राम संस्था करून रहात असे. त्याच्यामध्यें उच्चनीच भाव उत्पन्न करणारीं जातिबंधनें दृढ होतीं, व धार्मिक आचारविचारांचें त्यास मोठें महत्त्व वाटे. तत्कालीन मुसलमान शूर, धर्माभिमानी व समताप्रिय होते. त्यांचें शिल्प उच्च प्रतीचें होतें, त्यांची राज्यपद्धति लष्करी वळणाची होती तिच्यावर धार्मिक भेदभावाचा पूर्ण पगडा बसलेला होता आणि त्यांच्यांत उच्च राजकीय दृष्टि उत्पन्न झालेली नव्हती.

प्रश्न

१. इ. स. १२०६–१५२६ या काळांतील मुसलमानी रियासतींतील (अ) शिल्पकला व बांधकाम (आ) धर्मसमजुती व (इ) लोकस्थिति याबाबत थोडक्यांत हकीकत लिहा. २. हिंदुस्थानांत राज्य स्थापन करण्यांत या कालांतील तुर्क-अफगाणांचें काय उद्दिष्ट होतें ? तें कितपत सफल झालें त्याची कारणमीमांसा द्या. ३. अलेक्झांडर व तैमूर यांच्या स्वाऱ्यांतील साम्य व विरोध दाखवा.

अभ्यास

(१) खालील वाक्यांचा संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. (अ) "माझा उद्देश काफर लोकांना ठार मारावें, त्यांच्या मूर्तींचा विध्वंस करावा, त्यांना इस्लामी धर्माची दीक्षा द्यावी...व 'गाझी' हें पद मिळवावें असा आहे." (आ) "धर्मसंस्थापना करणें हें तुझें काम नव्हे." (ई) "मजसारख्या वृद्ध मनुष्यास मृत्यु येणें कांहीं वाईट नाहीं, पण मजबरोबर राज्याचाही नाश होईल....."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २२ वा

मायबोलींतून झालेली धर्मजागृति

(इसवी सनाचें तेरावें शतक ते सोळावें शतक)

१. संतांचा उदय :—मध्ययुगीन कालांत झालेला संतांचा उदय व त्यांची कामगिरी हा भारताच्या इतिहासांतील एक शांतरस-प्रधान व बहु.वंशीं लोकस्थितिनिदर्शक असा भाग आहे. येथें लढाया, जुलूम व जबरदस्ती नाहीं, तह व करारनामे नाहींत, आणि कपट व कारस्थानेंही नाहींत. राजे व सरंजामी सरदार हे लढायांत अगर विलासांत मग्न असतां संत हे शांतपणें अधिक परिणामकारक कार्य करीत होते. ते भारताच्या सर्व भागांत व समाजाच्या सर्व थरांतून उदयास आले. ते भिन्न भाषा बोलत, पण त्यांची शिकवण एकच होती. या शिकवणुकीचे तत्कालीन भारतीय समाजावर झालेले परिणाम लक्षांत घेण्यापूर्वी त्यांचा नांवनिशीवार अल्पसा परिचय करून देणें इष्ट आहे.

२. पांडित्य व भक्ति :—अकराव्या शतकांत उदयास आलेला रामानुज व बाराव्याच्या अखेरीस उदय पावलेला मध्व, तसेंच त्याच काळांतील लिंगायत धर्म-प्रसारक बसव यांचा परिचय पूर्वी येऊन गेलेला आहे. तसेंच तेराव्या शतकांतील महानुभाव पंथाचा प्रणेता चक्रधर व भागवतधर्माची ज्योत महाराष्ट्रांत प्रकाशित करणारा ज्ञानेश्वर यांचें वर्णन दिलें असल्यामुळें येथें त्याची पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. ज्ञानेश्वराच्या काळापासून एकट्या महाराष्ट्रांतच नव्हे, तर इतर सर्वत्र विद्वत्ताप्रचुर तात्त्विक चर्चेपेक्षां भक्तिरसप्रधान प्रवचनाची व सगुण परमेश्वराच्या गुणसंकीर्तनाची परंपरा अधिक जोरानें पुढें आली.

३. नामदेव :—अशा गुणसंकीर्तन करणारांत नामदेवाचें नांव प्रमुख आहे हा ज्ञानदेवाचा समकालीन. जन्मसाल इ स. १२७०. पंढरपूरचा रहाणारा जातीनें शिंपी. ज्ञानेश्वरांची कीर्ति कानीं येऊन तो आळंदीस गेला व तेथून तो सर्व मंडळीसमवेत द्वारका, काशी, इत्यादि ठिकाणीं तीर्थयात्रेस गेला. ज्ञानदेवाच्या समाधिकालानंतर नामदेव फिरून उत्तरेस गेला व तेथें त्यानें भागवत धर्माचा प्रसार केला. पंजाबांतही त्याचें वास्तव्य होतें. शीखांच्या ग्रंथसाहेबांत याच्या कांहीं पदांचा समावेश केलेला आढळतो. तो इ. स. १३५० मध्यें समाधिस्थ झाला. बहुजनसमाजांत उभें राहून टाळ-वीणा हातांत घेऊन कथा करावी हा कीर्तनाचा संप्रदाय यानेंच सुरू केला असें म्हणतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. रामानंद :—हा अलाउद्दिनाचा समकालीन. अलाउद्दिनाची व त्याच्या सरदारांची धर्मप्रसारार्थ जाळपोळ चालू असतां रामानंद आपलें धर्मप्रचाराचें कार्य शांतपणें करीत होता. जे जे विष्णुभक्त असतील ते कोणत्याही वर्णाचे असोत त्यांना परमेश्वर प्राप्त होईल अशी त्याची शिकवण असे. 'जाति पाँति पुछै नहि कोई। हरिको भजै सो हरिका होई।। कोणी जातपात विचारीत बसूं नका, जो हरीला भजेल तो हरि बनेल' असें तो म्हणे. या शिकवणीबद्दल सनातनी लोकांनीं त्यास विरोध केला; तेव्हां त्यानें आपला असा वेगळाच पंथ सुरू केला. या पंथांतील लोकांनीं हिंदी भाषेचा उपयोग करून सर्वत्र जागृति उत्पन्न केली व समतेची शिकवण पसरविली.

कबीर

५. कबीर :—हा रामानंदाच्या परंपरेंतील त्याचा शिष्य. जातीनें मुसलमान. धंद्यानें कोष्टी. इ. स. १३९८ च्या सुमारास होऊन गेला. यानें हिंदु-मुसलमान यांच्यांत ऐक्य-भाव उत्पन्न करण्याचा यत्न केला. राम व रहिम एकच आहे असें तो म्हणे. आजही तो सर्वांस सारखाच पूज्य आहे. कबीराचे सुंदर दोहे भारतांत आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. तुकारामाच्या अभंगांत ज्याप्रमाणें शेवटच्या ओळींत 'तुका म्हणे' हे शब्द येतात तसें कबीराच्या दोहयांत 'कहत कबीरा सुन भई साधु' हा चरण वारंवार येतो.

६. चैतन्य :—इ. स. १४८६ सालीं बंगाल प्रांतांत नुदिया येथें चैतन्य याचा जन्म झाला. त्याचा थोरला भाऊ संस्कृत विद्येच्या शिकवणुकीनें परमार्थपर बनला व त्यानें घरदार सोडलें, हें पाहून चैतन्याच्या आईबापांनीं चैतन्यास पाठशाळेंत पाठविलेंच नाहीं; तेव्हां तो दिवसभर उनाडक्या करूं लागला. त्याची बुद्धि कुशाग्र होती. यामुळें लवकरच विद्यासंपादन करून तो मोठा पंडित बनला व वादांत अनेकांचा पराभव करूं लागला. अशा रीतीनें हिंडत असतां ईश्वरपुरी या वैष्णव साधूची व त्याची भेट झाली. याचा असा परिणाम झाला कीं, वादविवादांतील विजयापेक्षां परमेश्वरनामाच्या गुणसंकीर्तनाकडे त्याचें चित्त लागलें व त्यानें कृष्णलीलेचा अगाध महिमा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रवचनास हजारों लोक येत. तत्कालीन मुसलमान राज्यकर्त्यांसही त्याच्याबद्दल सद्भाव उत्पन्न झाला. चैतन्य तार्थ-यात्रा करीत दक्षिणेंतून मद्रास इलाख्यांतून व विजापुराहून पूर्णनगर (पुणें) येथें येऊन गेलेला होता असा पुरावा आहे.

७. नानक :—कबीरानंतर महत्त्वाचा पुरुष नानक होय. इ. स. १४६९ सालीं पंजाबांत रावी नदीच्या कांठीं जन्मला. त्याचाही उद्देश कबीराप्रमाणेंच हिंदु-मुसलमानांची एकी घडवून आणावी असा होता व त्यानें त्या पद्धतीवर एक पंथही काढला. परंतु त्या योगानें हिंदु-मुसलमानांची एकी साध्य होण्याऐवजीं त्यानें स्थापन केलेला शीख पंथ पुढें दोन्ही धर्मांहून निराळा झाला. ईश्वर एक आहे. तो सत्कृत्यें केल्यानें प्रसन्न होतो. मनुष्यांनीं एकमेकांशीं सहिष्णुतेचें वर्तन करावें व जुटीनें रहावें, मूर्तिपूजा करूं नये अशी नानकाची शिकवण असे. तो इ. स. १५३८त मृत्यु पावला.

नानक

त्याच्या अनुयायांस शिष्य (शीख) असें म्हणतात. भारताच्या अर्वाचीन इतिहासांत शीखांस महत्त्वाचें स्थान आहे; त्यांची हकीकत पुढें येईलच.

८ नरसी मेथा :—(इ. स. १४१५–८१) हा गुजराथेंतील प्रसिद्ध भगवद्भक्त कवि. जुनागड येथें राहणारा. जातीनें ब्राह्मण. साधूंच्या संगतींत भजन करण्यांत त्याचा वेळ जात असे. हा अस्पृश्यांतही मिळून मिसळून वागे आणि कित्येकदां स्त्रियांच्या वेषांतही नाचे. परमेश्वरभक्तींत स्त्रीपुरुष हा भेद नाहीं हें दाखविण्याचा त्याचा उद्देश होता. पण लोकांस त्याचें हें करणें रुचलें नाहीं. कृष्णभक्ति हें त्याचें ध्येय होतें व त्यांत तो सदा निमग्न असे. त्याच्यावर पुष्कळ संकटें आलीं. पण त्याची शांति ढळली नाहीं. 'भलुं थयुं भांगी जंजाळ । सुखे भजीशुं श्री गोपाळ'। (संसाराचीं बंधनें तुटलीं हें बरें झालें; आतां मी एकचित्तानें गोपाळाचें भजन करीन) असें तो म्हणे. त्याची कविता अतिशय रसाळ आहे.

९. मीराबाई :—राजपुतान्याची भगवद्भक्त कवयित्री मीराबाई सर्वत्र महशूर आहे. 'मीराके प्रभु गिरिधर नागर। चरणकमल हारि रे'। मीरेचा प्रभु पर्वत उचलून धरणारा भगवान कृष्ण याचे चरणकमल सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भय हरण करण्यास समर्थ आहेत, असें ती विश्वासानें अनेक पद्यांतून सांगते. ही राणा संगाची सून होय. ही चारचौघांत उघड भजन करीत असे. राजघराण्यांतील पडदानशीन स्त्रीनें असें वागणें तत्कालीन लोकांस रुचलें नाहीं व तिचा छळ झाला. अखेरीस ती राज्य-वैभवाचा सर्व त्याग करून द्वारकेस जाऊन राहिली. ती इ. स. १५४६ त मृत्यु पावली.

१०. एकनाथ :—हा पैठणचा राहणारा. इ.स. १५३३ चे सुमारास जन्मला. देवगिरी येथें वास्तव्य करणारे जनार्दनस्वामी हे याचे गुरु. यानें तीर्थयात्रा केली. भागवत ग्रंथावर मराठींत टीका लिहिली. 'संस्कृतवाणी देवें केली। प्राकृत काय चोरापासोन झाली ?।' अशा प्रकारचा प्राकृत भाषेच्या अभिमानानें खडा सवाल टाकणारा एकनाथच होय. यानें पितरांच्या श्राद्धदिनीं महारास जेवूं घातलें. अंगावर थुंकणाऱ्या यवनावर उलटून न रागवतां तो शांतपणें वागला व पुन: पुन: स्नान करून आला. अशा रीतीनें त्यानें समाजांतील कंटकांचें हृदय-परिवर्तन घडविण्याचा आपल्या शक्तीप्रमाणें यत्न केला. ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार करण्याचें काम यानेंच पुरें केलें. हा इ. स. १५९९ स समाधिस्थ झाला. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम ही महाराष्ट्रांतील भक्तिमार्गी परंपरा आजपर्यंत अव्याहत चालू आहे.

११. तुलसीदास :—यानें वाल्मीकि रामायणास हिंदी पेहराव चढविला. तुळशीदासकृत 'रामचरितमानस' (अर्थात् तुलसी रामायण) हें अत्यंत लोकप्रिय असून आजपर्यंत या रामायणाच्या लक्षावधि प्रति खपलेल्या आहेत. गरीबाच्या झोंपडीपासून श्रीमंताच्या महालापर्यंत यानें सारखाच प्रवेश केला आहे. तुलसीदास हा इ. स. १५३१ त जन्मला. संसारांतील एका प्रसंगावरून विरक्त होऊन तुलसीदास काशीस गेला व नंतर तेथून २० वर्षें तीर्थयात्रा करीत होता. अयोध्या प्रांतांत याचें बरेच दिवस वास्तव्य होतें. तुलसीदासाएवढा दुसरा कोणी लोकप्रिय कवि भारतांत मध्ययुगांत झालेला नाहीं. तो इ. स. १६२२ त मृत्यु पावला.

१२. सूरदास :—हा इ. स. १४८२ त जन्मला. हा दिल्ली प्रांतांत रहाणारा. यानें श्रीमद्भागवतावर अनेक पद्यें रचिलीं व तीं तो स्वतःच्या सुस्वर आवाजांत गात फिरत असे. तो जन्मत: अन्ध होता असें म्हणतात, तें खरें नसावें. तुळशीदासानें रामचरित्र लोकप्रिय करण्यांत जी कामगिरी बजाविली तीच सूरदासानें कृष्णचरित्राबाबत बजावली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा इ. स. १५६० मध्यें मृत्यु पावला.

१३. नृसिंहसरस्वती :—सरस्वती गंगाधरानें गुरुचरित्रनामक ग्रंथ लिहिला आहे. तो महाराष्ट्रांत दत्तभक्तांकडून आजही भक्तिपूर्वक वाचला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जातो. या ग्रंथांत मुख्यत: नृसिंहसरस्वतीचें चरित्र आहे. हा इ. स. १४०८ मध्यें वऱ्हाडांत जन्मास आला. तीर्थयात्रा केल्यावर यानें गाणगापूर येथें वास्तव्य केलें व तेथें विरक्त स्थितींत राहून धर्मजागृतीचें कार्य केलें. त्याच्या प्रसादानें रोग बरे होतात अशी भाविकांची श्रद्धा होती. तत्कालीन बेदरचा मुसलमान बादशाह ही कीर्ति ऐकून त्याचा भक्त बनला. यानें आपल्या वर्तनानें खऱ्या संन्यासाश्रमाचा धडा घालून दिला. हा इ. स. १४५८ त अंतर्धान पावला.

१४. कानडी संत :—वरील संतमालिकेंतील बहुतेक संत उत्तर हिंदुस्थानांतील आहेत. कन्नड, तामीळ व तेलगु प्रदेशांतील भगवद्भक्तांची प्रस्तुत लेखकास पुरेशी माहिती नाहीं. कृष्णदेवरायाच्या कारकीर्दींत व्यासराय स्वामी होऊन गेले. ते मध्वसांप्रदायी होते. त्याचा शिष्य कनकदास हा इ. स. १५५० च्या सुमारास होऊन गेला. त्याचीं कानडी भाषेंतील भक्तिपर पद्यें तुकारामाच्या अभंगाप्रमाणें कर्नाटकांत आजही घरोघरीं गायिलीं जातात. तळ्यांतील पाण्यावर तरंगणाऱ्या फुलांप्रमाणें याची गीतें कर्नाटकस्थ जनतेनें झेलून धरलेलीं आहेत. याचाच समकालीन पुरंदरदास हा विठ्ठलभक्त पंढरपूर येथें वास्तव्य करीत असे. कनकदास, पुरंदरदास इत्यादि भगवद्भक्तांचा समूह कर्नाटकांत दासकूट या नांवानें परिचित आहे.

१५. संतांचें कार्य :—तेराव्या शतकाचे अखेरीपासून सतराव्या शतकाचे प्रारंभापर्यंतच्या सुमारें साडेतीनशें वर्षांच्या काळांतील उदयास आलेल्या या संतांच्या शिकवणुकीचा नीट विचार झाला पाहिजे. पहिली गोष्ट यांपैकीं बहुतेकांनीं संस्कृत भाषा सोडून जानपद भाषेचा अंगिकार केला व तिच्यांतून धर्मग्रंथांतील माहिती गोरगरीबांच्या झोंपड्यांपर्यंत त्यांच्या साध्यासुध्या भाषेंत पोहोंचविली. यामुळें धर्माचें ज्ञान थोड्यांची खास मिरास राहिली नाहीं. बहुजनसमाजांत त्याचा प्रसार झाला. यायोगें देशी भाषांच्या घडणीस मोठें उत्तेजन मिळालें. मराठी, गुजराथी, बंगाली इत्यादि प्रांतिक भाषा या बऱ्याच प्राचीन असल्या तरी त्यांना घाटदार स्वरूप याच काळांत प्राप्त झालें. दुसरें असें कीं, संतांनीं आपल्या तत्त्वांचा प्रसार करतांना विद्वत्तेचें अवडंबर माजविण्यापेक्षां अंत:करणाच्या लीनतेवर व चारित्र्याच्या शुद्धतेवर भर दिला. चिन्त्य विषयाशीं तद्रूप झाल्यामुळें उपनिषदांतील गहन वाक्यांचा अर्थ त्यांच्या तोंडून सोप्या जानपद भाषेंत व्यक्त झाला व तीं वाक्यें जनतेच्या तोंडीं खेळत राहिलीं. संत हे स्वत:च्या संसाराबद्दल उदासीन असले, तरी त्यांनी संसाराचा त्याग करण्याची शिकवण दिली नाहीं. पण प्रपंचीं उदासीन राहण्याचा मात्र उपदेश केला. सगुण भक्तीवर भर देत असतां व विविध उपास्यांचा आधार घेत असतां परमेश्वर एक आहे याबद्दलची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाणीव त्यांच्या लेखनांतून दिसून येते. वारी व तीर्थयात्रा या गोष्टी या काळांत अतिशय लोकप्रिय झाल्या. संत राजकारणांत पडले नाहींत, पण राजकीय क्षेत्रांत मधून मधून अपयशाचे तडाखे सहन करावे लागत असतां समाजाची हिम्मत खचूं न देण्याची व समाजाची वृत्ति धैर्यनिष्ठ ठेवण्याचें अतिशय अवघड कार्य संतांनीं केलें. " काय मानु मी या संतांचे उपकार ?" असें भावी पिढ्यांनीं म्हणत रहावें अशी ही कामगिरी आहे यांत शंका नाहीं. या व अशा प्रकारच्या शिकवणुकीमुळेंच उत्तर भारतांत गंगा–यमुनेच्या दुआबांत व संयुक्त प्रांतांत पांचशें वर्षांच्या सतत मुसलमानी अंमला-नंतरही बहुसंख्य प्रजा हिंदु राहिली. तिला धर्मांतर केल्यास ऐहिक उन्नतीचें केवढें तरी आकर्षण होतें. एखादा मलिक काफूर धर्मांतरानें क्षणांत प्याद्याचा फर्जी होई! पण या सर्व आकर्षणास न जुमानतां हिंदु समाज आपल्या धर्मास चिकटून राहिला.

१६. समारोप :––सारांश, इस्लामी धर्मीयांच्या सहवासानें व त्यांचें उदा-हरण पाहून भारतीय समाजानें आपल्या धर्मसंघटनेंत जरूर तो फेरफार केला. मागें बौद्ध धर्माच्या संघातामुळें मूळच्या हिंदु धर्मांत फेरफार झाले, तद्वतच कांहींसा हा प्रकार होय. याखेरीज जातिबंधनें अधिक दृढ करून, धर्मांतराच्या पापांचें भय दाखवून, स्पृश्यास्पृश्यविचारांत अधिकाधिक सोंवळेपणा आणून व धर्माचरणांत व्रतवैकल्याचें महत्त्व गाऊन कर्मठपणाचा पुरस्कार करणाराही एक पंथ होता. अशा लोकांत देवगिरीच्या हेमाद्रि पंडिताची गणना होते. परंतु या पंथाचा प्रभाव टिकून राहिला नाहीं. संतांनीं प्रचारिलेलीं समता, बंधुभाव व गूढवाद, हीं तत्त्वें इस्लाम धर्मांतील सुफीपंथीयांच्या तत्त्वांशीं जुळ-णारीं असल्यामुळें व उभय धर्मांतील तत्त्वांना व देवतांना पूज्य मानणारे कबीरासारखे महात्मे निघाल्यामुळें एकमेकांपासून दूर असणारे हे दोन समाज एकमेकांस अधिकाधिक ओळखूं लागले. यासंबंधींची अधिक माहिती पुढें आणखी एका भागांत दिलेली आढळेल. परंतु येथें इतकें सांगणें पुरें आहे कीं, देशाच्या बऱ्याच मोठ्या भागांत मुसलमानांचें राजकीय वर्चस्व राहिलें तरी येथील शेतकरी हिंदु, कारागीर हिंदु, व्यापारी हिंदु असा सर्व प्रकार असल्यामुळें मुसलमानांच्या चढाईचा पहिला भर ओसरल्यावर उभय समाजांस पिढ्यान् पिढ्याच्या स्थिर जीवनासाठीं आवश्यक अशी व्यावहारिक तडजोड, भाषेचें माध्यम, तत्त्वज्ञानाची बैठक व रहाण्या-वावरण्याच्या चालीरीती यांचा शोध घ्यावा लागला. नर्मदेच्या उत्तरेस––विशेषतः संयुक्त प्रांतांत—या समेटाचें प्रतिबिंब लोकांच्या राहणींत, पोषाखांत, चालीरीतींत, इमारतींत व त्यांच्या भाषेंत आजही पहावयास सांपडतें. सोळाव्या शतकांतील केवळ हिंदुसमाजा-पुरतेंच सांगावयाचें तर युरोपांत धर्मसत्तेला पवित्र न्यायालयें स्थापून व गुन्हे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गारांस, कडक शासनें देऊन जें कार्य करतां आलें नाहीं, तें कार्य भारतीय संतांनीं मेणाहून मऊ राहून यशस्वी रीतीनें करून दाखविलें यांत शंका नाहीं.

प्रश्न :—१. संतांनीं केलेल्या लोकजागृतीचें वर्णन करा. २. त्रोटक माहिती लिहा :—मीराबाई, नामदेव, कबीर, चैतन्य.

अभ्यास :—१. भक्तिमार्गप्रदीप (संपादक—कै. पांगारकर) २. 'दैनिक स्वाध्याय' (संपादक—ह. भ. प. प्रा. शं. वा. दांडेकर), यांसारख्या संग्रहांतून साधूसंतांची शिकवण दर्शविणारीं अनेक मराठी—हिंदी पदें आहेत त्यांतील कांहीं वाचा.

माहितीसाठीं

कन्नड कवि कनकदास देवास आळवून म्हणतो:—

हे भगवंता !

तुझें हें शरीर, तुझाचि हा जीव । सुखदुःखाचे भोग, कारण तूझें ।।
तुझिया गुणें, श्रवणें ऐकणें । वेदविधि कथा, त्यांची गोडी ।।
कोण तुझ्याविण, देई तें सामर्थ्य । सौंदर्य स्वरूप, पहाण्याचें ।।
पुष्पाचा परिमळ, कस्तूरी सुवास । तयामाजि धुंद, तुझिया नादें ।।
स्वादिष्ट मधुर, भोजनाची गोडी । जिव्हा अनुभवी, तुझिया गुणें ।।

(अनुवादित)

वेंदूर नगरींतील (विजापूर येथील) यवनराजा

गुरुचरित्र हा ग्रंथ इ. स. १५५८ च्या सुमारास सरस्वती गंगाधरानें लिहिला. यांत इ. स. १४०८–१४५८ या काळांत होऊन गेलेल्या स्वामी नृसिंह-सरस्वतीचें चरित्र आहे. त्यांत विजापूरचा यवनराजा स्वामींचा भक्त होता असें जें वर्णन आहे तें अगदींच निराधार नाहीं. कारण विजापूरच्या पडकोटांत श्रीगुरुपादुकांचें देवालय अद्याप शाबूत आहे. या ग्रंथांतील पुढील ओंव्या वाचनीय आहेत. गुरुप्रभावानें मुसलमान राजाही उत्तर देतो कीं 'सर्वत्र देव असे एकची'.

मंदमती द्विजजाती । देखा पाषाण पूजा करिती ।
समस्तांतें देव म्हणती । काष्ठ वृक्ष पाषाणासी ।।
ऐसे यवनपुरोहित । रावापुढें सांगती हित ।
ऐकोनि राजा उत्तर देत । कोपें करोनि परियेसा ।।
समस्त सृष्टि ईश्वराची । स्थावर जंगम रचिली साची ।
सर्वत्र देव असे एकची । तर्कभेद असंख्य ।।
या कारणें ज्ञानवंती । करूं नये निंदास्तुति ।
असती नानापरी जाती । आपुले रहाटीं रहाटती ।।

—गुरुचरित्र अध्याय ५०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २३ वा

युरोपियन व्यापाऱ्यांचें भारतांत आगमन

१. पूर्व-पश्चिमेचा संबंध :—दिल्लीस इब्राहीम लोदी राज्य करीत होता. काबूल येथें राज्य करणाऱ्या बाबरच्या मनांत त्यावर स्वारी करण्याचे विचार घोळत होते. चितोडचा राणा संग हा राजपुतांची एकी करून दिल्ली येथें आपली साम्राज्यसत्ता कशी स्थापन करावी याचा विचार करीत होता. दक्षिणेस बहमनी व विजयनगरचे राजे एकमेकांस टकरा देत होते; आणि विजयनगरचा भाग्यशाली कृष्णदेवराय विद्वानांना व पंडितांना आश्रय देऊन हिंदु धर्माचें व संस्कृतीचें संवर्धन करीत होता. अशा वेळीं इ. स. १४९८ त पहिला युरोपियन प्रवासी वास्को-दि-गामा पांच हजार मैलांचा समुद्र ओलांडून भारतांत आला (पृ. १५७ पहा). हा पूर्व-पश्चिमेचा साक्षात् संबंध भारतीय जीवनांत अत्यंत क्रांतिकारक ठरलेला आहे. भारतांत पहिला युरोपियन ख्रिश्चन केव्हां आला याबद्दल वाद आहे. इसवी सनापूर्वी पहिल्या दुसऱ्या शतकांत ग्रीक राजांचा वकील हेलिओडोरस या देशांत आला व त्यानें येथें राहून वैष्णव धर्माची दीक्षा घेतली हें आपणांस निश्चित माहीत आहे (पृ. ९४). त्यानंतर इसवी सनाच्या पहिल्या शतकांत सेंट थॉमस (पृ. ९७) हा ख्रिश्चन मिशनरी बलुचिस्थान, सिंध वगैरे भागांत आला व नंतर स्वदेशीं परत जाऊन पुन: तो दक्षिणेंत मद्रासकडे आला. कारण मद्रासनजीक मैलापूर येथें सेंट थॉमसची समाधि असून त्यावर इ. स. ६८ असें वर्ष घातलेलें आहे. परंतु ख्रिश्चन लोकांचें धर्मप्रसारार्थ झालेलें आगमन पुढें परंपरेनें किती वर्षें चालू राहिलें हें सांगतां येत नाहीं, व त्याचा भारतीय जीवनावर म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं. परंतु पंधराव्या शतकांत व्यापाराचे निमित्तानें झालेलें युरोपियनांचें आगमन मात्र भारताच्या इतिहासांत क्रांतिकारक ठरलें आहे.

२. प्राचीन व्यापारी :—इंग्रज भारतांत प्रथम आले नाहींत फार प्राचीन काळापासून भारत व युरोप यांच्यामध्यें व्यापार चालू आहे. इटली देशांतील व्हेनिस व जिनोआ वगैरे नगरराज्यें पूर्वी व्यापाराकरितां प्रसिद्ध होतीं. तेथील व्यापारी तुर्कस्थान, एशियामायनर, इराण या मार्गानें जमिनीवरून येऊन पुढें इराणच्या आखातांतून जलमार्गानें भारतांत येत. हा प्रकार निर्वेध रीतीनें चालत असतां **इ. स. १४५३ त मुसलमानांनीं** कॉन्स्टॅन्टिनोपल हें शहर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काबीज केलें व इटलीच्या पूर्वेपासून इराणपर्यंतचा बहुतेक प्रदेश त्यांनीं आपल्या अंमलाखालीं आणला. त्यामुळें व्हेनिस, जिनोआ येथील व्यापाऱ्यांना आतां पूर्वीच्या मार्गानें व्यापार करतां येईना. कारण तुर्क लोक त्यांस अडथळा करूं लागले. हा व्यापाराचा मार्ग खुंटल्यानें व्हेनिस, जिनोआ वगैरे शहरांचें महत्त्व कमी झालें; परंतु त्या काळीं भारत व युरोप यांजमधील व्यापार फार महत्त्वाचा होता. कारण कापड, साखर, मसाल्याचे जिन्नस हे सर्व पदार्थ भारतांतूनच युरोपास मिळत असत. तेव्हां बंद पडलेला व्यापार सुरू करण्याकरितां पूर्वेकडे जाण्याचे मार्ग शोधून काढण्याची खटपट सुरू झाली. जमिनीवरील मार्ग बंद झाल्यामुळें समुद्रांतून मार्ग शोधून काढण्याकडे लोकांचें लक्ष वेधलें. पोर्तुगाल, स्पेन वगैरे अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील राष्ट्रांनीं या कामांत पुढाकार घेतला. याच सुमारास पृथ्वी गोल आहे असा शोध लागला. तेव्हां अटलांटिक महासागरांतून थेट पश्चिमेकडे गेल्यास हिंदुस्थान लागेल अशी सर्वांची कल्पना झाली. या कल्पनेस अनुसरून कोलंबस स्पेनहून निघाला असतां त्यास इ. स. १४९२ त अमेरिका खंड सांपडलें. याच सुमारास पोर्तुगीज लोक आफ्रिकेच्या दक्षिण टोंकास वळसा घालून भारताकडे येण्याचा यत्न करूं लागले व लौकरच त्यांच्या यत्नास यश आलें. इ. स. १४९८ मध्यें वास्को-दि-गामा हा पहिला पोर्तुगीज गृहस्थ पश्चिम किनाऱ्यावर मलबार प्रांतांत कालिकत येथें उतरला.

३. **पोर्तुगीज** :—मलबार प्रांताच्या पश्चिमेस समुद्र व पूर्वेस सह्याद्रीची ओळ आहे. ह्यामुळें तो प्रांत इतर प्रांतांपासून थोडा अलग आहे. कालिकत येथें हिंदु राजा राज्य करीत होता. त्यास सामुरी (झामोरीन) म्हणत असत. याच्या राज्यांत अरब लोकांचा व्यापार मोठ्या भरभराटींत होता. सामुरीनें गामास व्यापार करण्याची परवानगी दिली. परंतु अरबांच्या विरोधामुळें पोर्तुगीजांचा जम बसेना. कोचीनचा राजा व सामुरी यांच्यामध्यें वांकडें होतें. व तेथील लोक मुसलमान व्यापाऱ्यांचा द्वेष करीत. कोचीनच्या राजानें पोर्तुगीजांस आपल्या राज्यांत व्यापार करण्याची परवानगी दिली. पोर्तुगीजांनींही कोचीनच्या राजास सामुरीबरोबर लढण्याच्या कामीं पुष्कळ मदत केली. पुढें पोर्तुगीज लोक हे व्यापारांत मुसलमानांना प्रतिपक्षी झाले. हें पाहून इजिप्त येथील मुसलमान राजे एकत्र होऊन त्यांनीं आपलें आरमार पोर्तुगीजांवर धाडलें व पोर्तुगीजांचा चौल येथें इ. स. १५०९ मध्यें पराभव केला. परंतु पुढच्याच वर्षीं पोर्तुगीजांनीं स्वदेशाहून मोठें आरमार आणविलें व मागील वर्षाच्या पराभवाचा सूड उगविला.

४. **अल्बुकर्क** :—इ. स. १५०९त आल्फान्सो अल्बुकर्क नांवाच्या इसमाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इकडे गव्हर्नर म्हणून नेमणूक झाली. हा मोठा धोरणी व दूरदृष्टि असे. याच्या मनांत येथें केवळ व्यापारच करावयाचा असें नसून जमल्यास येथें राज्यही स्थापावें असें होतें व याकरितां त्यानें आपल्या लोकांस येथील लोकांशीं लग्नव्यवहार करण्यास उत्तेजन दिलें. इ. स. १५१० त त्यानें विजापूरच्या सुलतानापासून गोवें हा प्रांत जिंकून घेतला व तो आजमितीसही पोर्तुगीजांच्या ताब्यांत आहे. तेथें त्यानें पोर्तुगीज व एतद्देशीय फौज ठेवून दिली. अशा रीतीनें उत्तरेस बाबराचें राज्य स्थापन होण्याच्या अगोदर पाश्चिमात्यांचा व्यापाराच्या निमित्तानें या देशांत शिरकाव झालेला होता.

अल्बुकर्क

५. पोर्तुगीजांचा पाडाव :—सुमारें एक शतकभर पोर्तुगीजांची भरभराट होती; नंतर त्यांची सत्ता कमी होऊं लागली. यास अनेक कारणें आहेत. इ. स. १५८० त स्पेननें चिमुकल्या पोर्तुगालवर स्वारी करून तो देश आपल्या ताब्यांत आणला. यामुळें पोर्तुगीजांचा जोम पुढें टिकला नाहीं. दुसरें असें कीं, ज्या विजयनगरच्या साम्राज्याशीं पोर्तुगीजांचा मोठा व्यापार चालत असे तें इ. स. १५६५ नंतर उतरणीस लागलें व तेथील व्यापारधंदा मंदावला. पोर्तुगीज लोकांचे भारतांत येण्याचे अनेक हेतू होते. प्रथम ते व्यापार करावयास आले, नंतर त्यांनीं राज्यस्थापनेचा रोख धरला व पुढें धर्मप्रसारही करूं लागले, व या कामांत तर त्यांनीं जुलमाची कमाल केली. यामुळें येथील लोकांस त्यांचा तिटकारा आला तसेंच याच सुमारास डच व इंग्रज लोकांनीं आपापल्या व्यापाराच्या कंपन्या काढून इकडे व्यापार करण्यास सुरुवात केली व पोर्तुगीज वसाहतींबरोबरही त्यांचा झगडा सुरू झाला. इ. स. १६१२ त इंग्रजांनीं भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर सुवाली येथें पोर्तुगीजांचा पराभव केला यामुळें पोर्तुगीजांचें वर्चस्व दिवसेंदिवस नाहींसें होऊं लागलें. याचा परिणाम असा झाला कीं, त्यांचा सर्व व्यापार बसत जाऊन शेवटीं त्यांच्या ताब्यांत दीव, दमण व गोवें एवढींच ठाणीं राहिलीं. त्यांनीं बाटविलेल्या हिंदु लोकांची संख्या मात्र फार मोठी आहे.

६. डच लोकांची हकीकत :—भारतीय इतिहासाच्या दृष्टीनें डच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांची हकीकत विशेष महत्त्वाची नाहीं त्यांनीं सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून म्हणजे इ. स. १६०० पासून पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्यास सुरुवात केली. पोर्तुगीजांपासून पूर्वेकडील मलाक्का, सुमात्रा इत्यादि मसाल्याचीं बेटें काबीज करून घेतलीं. खुद्द या देशांतील त्यांचा व्यापार बेताबाताचाच असे. शिवाय व्यापार करण्यापलीकडे त्यांनीं दुसरें कोणतेंच धोरण ठेविलें नाहीं; पूर्वेकडील बेटांत मात्र ते दुसऱ्या कोणाचाही शिरकाव होऊं देत नव्हते. इंग्रजांनीं तेथें शिरण्याचा प्रयत्न केला, तेव्हां डच लोकांनीं इ. स. १६२३ त इंग्रज व्यापाऱ्यांची अंबोयना येथें कत्तल केली. तेव्हांपासून इंग्रजांनीं पूर्वेकडील बेटांतून काढता पाय घेतला. इ. स. १६५२ सालीं इंग्लंडचा नायक क्रॉम्वेल यानें डच लोकांचा पराभव केला. तेव्हांपासून त्यांच्या सत्तेस उतरती कळा लागली. पूर्वेकडील बेटें मात्र अद्यापि त्यांच्या ताब्यांत आहेत.

७. **इंग्रजांचें आगमन** :—स्पेन व पोर्तुगीज या देशांचा विरोध टाळण्याकरितां उत्तरेकडच्या बाजूनें पश्चिमेस जाण्याचा मार्ग इंग्रज प्रथम शोधूं लागले. त्यांत त्यास यश आलें नाहीं. तेव्हां पोर्तुगीज व डच यांच्याप्रमाणें भारताशीं व्यापार करण्यासाठीं इ. स. १६०० सालीं इंग्लंडांत ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. एलिझाबेथ राणीनें या कंपनीला पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याचा पूर्ण मक्ता दिला. इ. स. १६०८ मध्यें कॅप्टन हॉकिन्स हा पहिला इंग्रज गृहस्थ जहांगीरच्या दरबारीं व्यापाराची परवानगी मागण्यास गेला; परंतु पोर्तुगीजांचें जहांगीरच्या दरबारीं वर्चस्व असल्यानें अडचण उत्पन्न झाली. पुढें पोर्तुगीजांनीं जहांगीरच्या दरबाराशीं दांडगाईचें वर्तन आरंभिलें व बादशाहाचें एक जहाज लुटलें, तेव्हां जहांगीरास पोर्तुगीजांचा फार राग आला. इ. स. १६१२ त इंग्रज आरमारानें पोर्तुगीजांचा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पराभव केला. तेव्हां पोर्तुगीजांस शह देण्यास इंग्रज बरे आहेत असें जहांगीरास वाटूं लागलें. इ. स. १६१५ त खुद्द जेम्सनें सर टॉमस रो यास

सर टॉमस रो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडचा वकील म्हणून जहांगीरच्या दरबारीं नजराणा देऊन पाठविलें. त्यास जरी हव्या होत्या तेवढ्या सवलती मिळाल्या नाहींत, तरी त्याच्या वशिल्यानें कंपनीस भारताच्या किनाऱ्यावर व्यापार करण्याची परवानगी मिळाली. शिवाय इंग्रज व्यापाऱ्यांसंबंधीं येथील लोकांचें चांगलें मत झालें. सर टॉमस रो इ. स. १६१९ त परत गेला. 'व्यापाराखेरीज इतर कोणत्याही भानगडींत पडूं नका' असें त्यानें जातांना आपल्या लोकांस बजावून सांगितलें होतें.

८. **पूर्वपश्चिम किनाऱ्यावरील वखारी** :—यानंतर पुढील शंभर वर्षांत कंपनीनें किनाऱ्याकिनाऱ्याला धरून व्यापार वाढविण्याकरितां ठिकठिकाणीं वसाहती स्थापन केल्या. इ. स. १६१२ त पोर्तुगीजांचा पराभव झाल्यावर सुरत येथील वसाहत कायम झाली. पुढील शंभर वर्षांत हेंच इंग्रजांचें मुख्य ठिकाण राहिलें. इ. स. १६४० त फरान्सिस डे या गृहस्थानें पूर्वकिनाऱ्यावर फोर्ट सेंट जॉर्ज नांवाचा किल्ला बांधला. तेथेंच पुढें मद्रास शहराचा विस्तार झाला व इ. स. १६५० त बंगाल्यांत हुगळी येथें वखार स्थापन केली इ. स. १६६१ सालीं पोर्तुगालच्या राजानें इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस यास आपली मुलगी दिली, तेव्हां मुंबई बेट आंदण दिलें. तें त्यानें इ. स. १६६७ त दरसाल १० पौंड भाड्यानें कंपनीस देऊन टाकलें. इ. स. १६६४ व इ. स. १६७० या दोन सालीं शिवाजीनें सुरतेवर स्वारी केली व वेळोवेळीं मोगल व मराठे यांच्या भांडणाचा कंपनीच्या व्यापारास उपद्रव पोहोंचूं लागला. शेवटीं इ. स. १६८७ सालीं इंग्रजांनीं सुरतेचें ठाणें मुंबईस आणलें. या काळांत कंपनीनें केवळ व्यापाराखेरीज दुसरा उद्योग केला नाहीं. परंतु इंग्लंडच्या सरकारापासून फौज बाळगणें, नाणीं पाडणें, न्यायनिवाडे करणें असले राजकीय स्वरूपाचे सर्व हक्क मिळविले व त्यांचा भारतांत स्वत:पुरता राजरोस उपयोग केला.

९. **दि युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी** :—इ. स. १६८९ ते १७०७ हीं वर्षें कंपनीच्या इतिहासांत अनेक दृष्टींनीं कठिण होतीं. दक्षिण भारतांतील बेबंदशाही अधिकच वाढून कंपनीला शांततेच्या मार्गानें निर्वेधपणें व्यापार करणें अशक्य झालें. निदान आत्मसंरक्षणापुरता तरी चढाईच्या लष्करी धोरणाचा पुरस्कार करावा असें तिला वाटूं लागलें. इकडे इंग्लंडमध्यें मोठी राज्यक्रांति होऊन राजाचें वर्चस्व कमी झालें व लोकसत्ता प्रबळ झाली. गेल्या शतकांत इंग्लंडांत कंपनीला राजाचा व राजाला कंपनीचा मोठा आधार असे. राजा कंपनीस हक्क व सवलती देई व कंपनी राजास पैसे देई. इ. स. १६८९ त इंग्लंडमध्यें रक्तशून्य क्रांति झाली, राजाची सत्ता

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कमी झाली व लोकसभेस वर्चस्व प्राप्त झालें. त्याबरोबर कंपनीस असलेला राजाचा आधार नाहींसा झाला. ईस्ट इंडिया कंपनीस व्यापारांत पुष्कळ फायदा होतो हें पुष्कळांच्या डोळयांत सलत होतें. त्यांनीं कंपनीचा पूर्वकडील व्यापाराचा मक्ता काढून घेऊन तो व्यापार सर्वांस खुला करून घेण्याची खटपट चालविली व त्यांच्या खटपटीस यश येऊन दुसरी एक कंपनी निघाली; परंतु आपसांतच चढाओढ करण्यांत त्यांना लौकरच तोटा दिसूं लागला. कंपन्यांच्या जिनसा येथें चढाओढीमुळें स्वस्त दरानें विकल्या जात व येथील जिनसांची त्याच चढाओढीमुळें किंमत चढूं लागली यामुळें फायद्याचें मान उतरलें. तेव्हां दोन्ही कंपन्यांनीं मिळतें घेण्याचें ठरविलें व शेवटीं इ. स. १७०७ मध्यें दोन्ही कंपन्या एक झाल्या. या कंपनीस 'दि युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी' हें नांव मिळालें.

१०. **फ्रेंच लोकांची हकीकत** :—फरान्सनें इतर देशांपेक्षां या चढाओढींत उशिरा भाग घेतला. फ्रान्सचा राजा चौदावा लुई याच्या कारकीर्दींत इ. स. १६६० सालीं फरेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. फरेंच कंपनीस प्रथमपासूनच राजाश्रय होता. यामुळें इंग्रजांच्या मागून येऊनही त्यांची लौकरच भरभराट झाली. त्यांनींही सुरत, मच्छलीपट्टण वगैरे ठिकाणीं वसाहती स्थापन केल्या. परंतु त्यांचें सर्वांत महत्त्वाचें ठिकाण मद्रासच्या दक्षिणेस पाँडेचरी येथें इ. स. १६७४ त मार्टिन यानें स्थापन केलें. बंगाल्यांत इ. स. १६९०–९३ पर्यंत हुगळी नदीवर चंद्रनगर येथें वखार स्थापन केली. इ. स. १७२१ त फरेंचांनीं आफ्रिकेच्या पूर्वेस मॉरिशस व बुर्बोन हीं दोन बेटें काबीज केलीं व पुढें लवकरच पश्चिम किनाऱ्यावरील माहीम व पूर्व किनाऱ्यावरील कारिकल हीं ठाणीं ताब्यांत घेतलीं. परंतु इंग्रज व फ्रेंच या दोन राष्ट्रांच्या कंपन्यांपैकीं इंग्रजांच्या कंपनीचा व्यापार मोठा होता.

११. **शेवट** :—प्रथमप्रथम पाश्चिमात्य व्यापारी हे किनारा सोडून फारसे दूर जात नसत, यामुळें कांहीं वेळां एकादें प्रकरण साधलें तर बरेंच झालें, पण अंगलट आलें तर पळून जावें असें त्यांचें धोरण असे. कारण समुद्रांत त्यांचा दूरवर पाठलाग करण्यास कोणी धजत नसत. मोंगलांचें आरमाराकडे फारसें लक्ष कधींच नव्हतें. साधारणपणें मक्केचे यात्रेकरू येण्याजाण्याची सोय झाली म्हणजे झालें एवढीच दृष्टि असे. 'परसांतलें दार साधारण जितक्या बंदोबस्तानें आपण राखतों तितक्याच बंदोबस्तानें' किनाऱ्यावरील मुलूख ताब्यांत ठेवण्याकडे मोगलांचें लक्ष होतें. भारत व युरोप यांच्यामधील व्यापारासंबंधींचें दळणवळण फार पूर्वींपासून होतें, तेव्हां इतर व्यापारी लोकांप्रमाणेंच हेही, असा सर्वांचा समज होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कालांतरानें हेच व्यापारी राज्याच्या उलाढाली करूं लागले व हलके हलके यांच्यांतील इंग्रज सर्वसत्ताधीश बनले. आजपर्यंतचे भारत जिकणारे लोक वायव्येकडून जमिनीवरून आले. इंग्रज पश्चिमेकडून पाण्यांतून आले. आजपर्यंतच्या जेत्यांचा देश जिंकण्याचा प्रथमपासूनच रोख होता, परंतु इंग्रज प्रथम केवळ व्यापाराच्या उद्देशानें आले. आजपर्यंतच्या जेत्यांनीं भारतावर आपलें केवळ लष्करी वर्चस्व स्थापन केलें. इंग्रजांनीं आपल्या विद्या, कला व संस्कृति यांचेंही वर्चस्व स्थापन केलें. भारतांत येणाऱ्या इंग्रज व्यापाऱ्यांस आपल्या वंशजास तागडी फेकून देऊन राजदंड धारण करण्याचा प्रसंग येईल असें स्वप्नींही आलें नसेल. मग भारतांतील लोकांस आजचे व्यापारी उद्यांचे राज्यकर्ते बनतील याची काय कल्पना येणार ?

प्रश्न

१. आपल्या देशांत समुद्रांतून कोण कोण परकीय लोक आले ? पोर्तुगीजांचा पाडाव कां झाला ? २. भारताचा नकाशा काढून त्यांत १७ व्या शतकांतील युरोपियनांच्या वखारींचीं ठिकाणें दाखवा. ३. ईस्ट इंडिया कंपनीची १७ व्या शतकांत क्रमानें कसकशी वाढ झाली तें लिहा. ४. भारतांत आलेल्या परकीय राज्यकर्त्यांमध्यें इंग्रजी राज्यकर्त्यांच्या आगमनाचें वैशिष्टच कोणतें ?

अभ्यास

(१) विचार करा व अर्थ स्पष्ट करा.—(अ) 'व्यापाराखेरीज इतर कोणत्याही भानगडींत पडूं नका'—सर टॉमस रो. (आ) 'हिंदुस्थानांतील लोकांस आजचे व्यापारी उद्यांचे राज्यकर्ते बनतील याची काय कल्पना येणार ?' (२) श्री. रामचंद्रपंत अमात्य कृत 'राजनीति" यांतील 'टोपीकर' व्यापाऱ्यांबद्दलचें पांचवें प्रकरण वाचा.

माहितीसाठीं

ई. इं. कंपनीस राजकीय धोरणाची आवश्यकता

[इ. स. १६८८ मध्यें सुरतेचा गव्हर्नर सर जोशिया चाइल्ड याच्या प्रेरणेनें पुढील महत्त्वाचा ठराव पास करून इंग्लंडांत कंपनीच्या मुख्य कचेरीकडे पाठविण्यांत आला. हा चाइल्ड त्या काळांत कंपनीच्या हिंदुस्थानांतील व्यवहाराबाबत दीर्घ विचार करणारा सूत्रचालकच होता असें दिसतें.]

आमचें असें ठाम मत आहे कीं, "व्यापाराइतकीच आमच्या ताब्यां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तील प्रदेशांतून वसुलाची वाढ करण्याची आम्हीं काळजी घेतली पाहिजे. कारण व्यापारास अनेक अपघात झाले असतां उत्पन्नांत जो खंड पडेल तो या वसुलानें भरून येईल व आम्हांस त्यामुळें सैन्य खडें ठेवतां येईल. या धोरणामुळेंच आम्हांस हिंदुस्थानांत राष्ट्र म्हणून जगतां येईल. याच्या अभावीं आम्ही इंग्रज लोक म्हणजे (इंग्लंडच्या) राजाच्या सनदेनें परवाना मिळालेले व एकत्र झालेले लुडबुडे ठरूं. जेथें कुणी आम्हांस आडवीत नाहीं तेथें आम्हीं वाटल्यास व्यापार करावा अशी आमची स्थिति होईल. ही परिस्थिति इकडील आमच्या डच व्यापारी बंधूंस पक्की माहीत असल्या-कारणानें ते आपल्या मायदेशाशीं पत्रव्यवहार करतांना व्यापाराबाबत जेथें एक ओळ लिहितील तेथें आणखी दहा ओळी राजकीय अंमल, लष्करी धोरण, वसुलाची वाढ व चढाईची तरतूद याबद्दल लिहीत असतात."

—इल्बर्ट पृ. २३

भाग २४ वा

मोगल राज्याची स्थापना

(इ. स. १५२६ ते इ स. १५५६)

१. **मोगलांचा अंमल** :—बाबराच्या आगमनापासून मुसलमानांनीं स्थापि-लेल्या दुसऱ्या साम्राज्यास सुरुवात झाली. येथपासूनच भारताच्या इतिहासां-तील आधुनिक कालाचा प्रारंभ झाला असें मानण्याचा कित्येकांचा प्रघात आहे. याचें कारण गुलाम, खिलजी किंवा तुघ्लुख या मुसलमान राज्यकर्त्यांहून मोगलांचा अंमल जास्त सुधारलेला, व्यवस्थित व दीर्घकालीन होता. गेल्या तीनशें वर्षांच्या मुसलमानी अंमलाखालीं भारताच्या राज्यव्यवस्थेस विस्कळीतपणा आलेला होता. मोगलांच्या अंमलाखालीं भारताच्या, विशेषत: उत्तर भारताच्या, राज्यव्यवस्थेस विशेष व्यवस्थित स्वरूप आलें व ह्या राज्य-व्यवस्थेचे कित्येक अवशेष ब्रिटिश अमदानींतही टिकून होते.

२. **बाबराचें घराणें** :—मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबर हा मध्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आशियांत ऑक्सस किंवा आमुदारिया नदीच्या उत्तरेस असलेल्या फरघाना प्रांतांत इ. स. १४८३ त जन्मला. बाबर हा तैमूरलंगाच्या नातवाचा नातू. याची आई चंगीझ-खानाच्या वंशांतील होती. अशा रीतीनें तो बापाच्या बाजूनें तुर्क व आईच्या बाजूनें मोंगल होता. त्यास तैमूरलंगाचें समर्कंदचें राज्य जिंकण्याची फार इच्छा होती. पण ती अखेर सफल झाली नाहीं. इ. स. १५०४ मध्यें त्यानें काबूल जिंकलें, पण त्याच्या जीवनास स्थैर्य लाभलें नाहीं. आयुष्याचे अनेक उतरचढ अनुभवीत तो अनुकूल संधीची वाट पहात होता. शेवटीं इब्राहिम लोदीच्या काळीं उत्तर भारतांत चालू असलेल्या गडबडीचा फायदा घेऊन तो भारतांत

बाबर

आला व प्रथम पंजाबवर नीट अंमल बसवून नंतर पानिपतच्या मैदानावर* इब्राहिम लोदीस तोंड देण्यास सिद्ध झाला (२० एप्रिल १५२६).

३. **पानिपतचा संग्राम :**—बाबरनें आपला तोफखाना अर्धवर्तुळाकार उभा करून तो कातडयाच्या दोरानें जोडून टाकला; व मागें आपली सेना उभी केली. ह्याशिवाय त्यानें ऐन वेळेकरितां शिलकी फौज मागें ठेविली होती. बाबराच्या फौजेच्या उजव्या बाजूस पानिपतचें खेडेगांव होतें व डाव्या बाजूला त्यानें सुरक्षिततेसाठीं खंदक खणले होते. अशा प्रकारें सर्व सिद्धता झाल्यावर २१ तारखेस सकाळीं लढाईस सुरुवात झाली. आरंभीं तोफखान्याच्या धूमधडाक्यानें शत्रूचे हत्ती बुजले. नंतर बाबराच्या सैन्याची उजवी व डावी फळी पुढें सरकत सरकत तिनें इब्राहिमच्या सैन्याची पिछाडी

*पानिपतचें रणांगण भारताच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. कौरव पांडवांचें ज्या ठिकाणीं युद्ध झालें तें कुरुक्षेत्र व पृथ्वीराजाचा ज्या ठिकाणीं पराभव झाला तें स्थानेश्वर येथून फार दूर नाहीं. ह्याच ठिकाणीं पुढें इ. स. १५५६ त अकबरास जय मिळाला व अफगाण राज्याची इतिश्री झाली, व मोगलांचा अंमल कायम झाला. येथेंच १७६१ त अब्दाली व सदाशिवरावभाऊ यांचा सामना होऊन मराठ्यांच्या विजयपरंपरेस आळा बसला. भौगोलिक दृष्ट्या पाहिलें तर पंजाबच्या सहा नद्या ओलांडल्यावर लागणारें हें पहिलेंच मैदान असल्यामुळें दिल्लीच्या राजांचें परक्यांशीं पानपत किंवा त्याच्या आसपास युद्ध होणें साहजिक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांठली. अशा रीतीनें इब्राहिमची फौज वेष्टिली गेली असतां, पुढून तोफांचा मारा चालू होता. तेव्हां तिचा चोहोंकडून कोंडमारा झाला. इतक्यांत बाबराची शिलकी फौज ताज्या दमानें चाल करून आली व तिनें आधींच घाबरलेल्या शत्रूचा पुरता मोड केला. दुपारीं लढाई संपली. इब्राहिम मारला गेला. बाबर पूर्ण विजयी झाला.

४. **राणा संगाशीं युद्ध** :—यानंतर लगेच बाबराला दुसरीकडे लक्ष द्यावें लागलें. चितोडचा राणा संग यानें राजपुतांचा मोठा जमाव करून बाबराशीं लढाईची तयारी केली. इतरांप्रमाणें संगाचीही अशी कल्पना होती कीं, बाबर इब्राहिमवर स्वारी करून परत जाईल, व अशा रीतीनें अफगाणांचा परस्पर पाडाव झाल्यावर दिल्लीस राजपुतांचें साम्राज्य स्थापन करणें सोपें जाईल. परंतु बाबरानें येथें राहण्याचा निश्चय कायम केल्यानें संगाला ही सोन्यासारखी संधि वांया गेली असें वाटलें व तो बाबरावर चाल करून गेला. राणा संग हा मोठा पराक्रमी होता. त्याच्या शरीरावर लढाईच्या ऐंशी जखमा असून त्याचा एक डोळा गेलेला होता व एक हात तुटलेला होता. इतर सर्व राजपूत राजे त्याच्या झेंड्याखालीं जमा झाले. बाबरनें ह्या हल्ल्यास तोंड देण्याचा निश्चय केला. दोन्ही सैन्यांची गांठ फत्तेपूर सिक्रीजवळ कानव्हा येथें इ. स. १५२७ त पडली. बाबराला राजपुतांशीं तोंड देण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. प्रारंभीं त्यानें शत्रूवर पाठविलेल्या टोळ्या पराभूत पावून परत आल्या. तेव्हां त्याचें चित्त जयाबद्दल साशंक झालें. इतक्यांत एका मूर्ख ज्योतिषानें त्यास सांगितलें कीं तुझा पराभव होईल. त्याच्या भविष्याचा तिरस्कार करण्याइतका बाबर नास्तिक नव्हता. परंतु संकटानें खचून जाणें हें बाबराला ठाऊकच नव्हतें. त्यानें आपल्या सैन्यांत उत्साह उत्पन्न करण्याकरितां असें जाहीर केलें कीं, ही नेहमींची मुलुखगिरी करण्याची लढाई नसून जिहाद (धर्मयुद्ध) होय. ह्यांत प्रत्येकानें मारीन किंवा मरेन असा निश्चय केला पाहिजे. मनुष्यमात्रास मरण चुकत नाहीं तर या धर्मयुद्धांत मेलेलें काय वाईट ? बाबर इतकें बोलून थांबला नाहीं; तर त्यानें शिपायांसमोर उभें राहून दारूला न शिवण्याची शपथ घेतली व दारूचीं भांडीं ओतून दिलीं. ह्या कृत्यांनीं सैनिकांत नवें चैतन्य उत्पन्न झालें, व ते निश्चयानें शत्रूस तोंड देण्यास सिद्ध झाले. ऐन युद्धांत बाबरच्या तुर्की तोफांनीं बरीच कामगिरी बजावली. राजपुतांच्या शस्त्रांपेक्षां त्या प्रभावी ठरल्या. राजपूत शौर्यानें लढले, परंतु आघाडीस व पिछाडीस दोन्हींकडून हल्ले झाल्यामुळें त्यांचा इलाज चालेना. खुद्द संगास अनेक जखमा होऊन तो मोठ्या शिकस्तीनें निसटला व राजपुतांचा पूर्ण पराजय झाला. यानंतर बाबरनें पूर्वेस चाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून चुनार हस्तगत केलें व घोग्रा नदीवर अफगाणांचा पुरा मोड केला (इ. स. १५२९). ही त्याची शेवटची लढाई होय. पुढील वर्षी बाबर मृत्यु पावला (इ. स. १५३०).

५. **आत्मचरित्र** :—बाबरानें आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे. तें त्याच्या सुसंस्कृत मनाची साक्ष पटवितें. लेनपूल म्हणतो कीं, 'बाबरानें स्थापिलेलें साम्राज्य नष्ट झालें तरी बाबराचें आत्मचरित्र उत्कृष्ट वाङ्मयाचा नमुना म्हणून लोक तें आजही वाचून त्याची वाहवा करतात.' आणि तें खरोखरच त्या योग्यतेचें आहे. त्यांत निव्वळ शिपाईगिरीच्या शर्थीचीं वर्णनें नाहींत. त्यांत बाबर जन्मभूमीपासून दूर आला म्हणून हळहळत आहे; आपल्या स्नेहमंडळींत बसून मजा मारीत आहे; आपल्या मायदेशाचीं कलिंगडें भारतांत मिळत नाहींत म्हणून तो खिन्न झाला आहे; एकाद्या फारशी कवनाचे चरण घोळून त्यावर चिंतन करीत आहे; आपल्या पुत्राच्या आगमनानें आपलें अंतःकरण कसें हर्षोत्फुल्ल झालें आहे तेंही तो सांगत आहे; सारांश, मनुष्यस्वभावाचे विकार, विचार ह्यांचें क्षणोक्षणीचे हेलकावे आपणांस त्यांत पहावयास मिळतात. एकाद्या बादशाहानें लिहिलेलें इतकें उत्तम आत्मचरित्र जगांतील वाङ्मयांत पहावयास सांपडणार नाहीं.

६. **हुमायून** (इ. स. १५३०–४० व इ. स. १५५५–५६) :—बाबरच्या मृत्यूनंतर त्याचा वडील मुलगा हुमायून इ. स. १५३० मध्यें गादीवर बसला. हुमायून या शब्दाचा अर्थ 'सुदैवी.' परंतु त्याजवर आलेल्या संकटांचा विचार करतां त्याच्याइतका दुर्दैवी बादशहा सांपडणें कठिण ! बाबरानें जिंकलेल्या प्रदेशांत अद्याप मोगलांचा अंमल नीट बसलेला नव्हता. ठिकठिकाणचे बंडखोर अफगाण मिळालेल्या संधीची वाट पाहात होते. राजपुतांचा पराभव झाला तरी ते निराश झाले नव्हते. गुजराथचा सुलतान बहादूरशाह यानें माळवा प्रांत जिंकला व पुढें त्यास दिल्लीचें तख्त मिळविण्याची महत्त्वाकांक्षा होती. अशा रीतीनें प्रत्येक जण संधि साधण्यास टपून बसला असतां, हुमायुनास अत्यंत सावधपणानें व तडफदारपणानें ह्या सर्वांचा बंदोबस्त करणें जरूर होतें. परंतु तसें करण्याऐवजीं त्यानें ढिलाईनें सर्व कारभार करून स्वतःवर संकटें ओढवून घेतलीं.

७. **बहादूरशहावर स्वारी** :—प्रथम तो पूर्वेकडील अफगाणांकडे वळला. जोनपूर व बिहार ह्यांच्या सरहद्दीवरील नाक्याचा चुनार किल्ला शेरखान नामक सरदार बळकावून बसला होता. हुमायुनानें इ. स. १५३१ त चुनारवर चाल केली. शेरखानाचा त्याच्यापुढें टिकाव लागला नाहीं, म्हणून तो त्यास शरण गेला; तेव्हां हुमायुनानें त्यास क्षमा केली व तो किल्ला फिरून त्याच्याकडे ठेवून दिला. यानंतर हुमायून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिणेस बहादूरशाहाकडे वळला. तेव्हां बहादूरशाहानें फौजेची जमवाजमव करून मांडवगड या बळकट किल्ल्याचा आश्रय केला, परंतु हुमायुनानें तो सर केला. तेथून बहादूरशाह गुजराथेंतील चंपानेर किल्ल्याकडे पळाला. हुमायुनानें तेथेंही त्याचा पाठलाग करून गुजराथभर आपला अंमल बसविला व अहमदाबाद येथें आपला भाऊ मिर्झा अस्करी यास ठेवून आग्र्याकडे परतला. परंतु त्याची पाठ वळते न वळते तोंच बहादूरशाहानें अस्करीस पळवून लाविलें व पुन: गुजराथेंत आपला अंमल बसविला. इतकेंच नव्हे तर माळवाही सर केला. एका वर्षांत गुजराथ हुमायुनाच्या ताब्यांत आला व गेलाही ! हुमायुनाच्या दुर्दैवानें याच वेळीं शेरखान आपली तयारी करून बिहार प्रांतांत आपलें पूर्ण वर्चस्व स्थापन करून चुनार येथें हुमायुनास तोंड देण्यास सज्ज झाला. अशा रीतीनें पांच वर्षे युद्धांत घालवून फलप्राप्ति शून्य अशी हुमायुनाची स्थिति झाली.

८. शेरखानाशीं युद्ध व वनवास :—आतां तो शेरखानास तोंड देण्यास निघाला. प्रथम चुनार काबीज करून त्यानें गंगेच्या कांठानें बिहार व बंगालमध्यें प्रवेश केला. शेरशाहा त्यास अंगावर घेत घेत मागें जात होता; अखेर हुमायून दिल्लीपासून पांच सहाशें मैल दूर आला. या वेळीं पावसाळा डोक्यावर आला हें पाहून शेरशाहानें मधलें दळणवळण तोडून टाकलें व त्यास कोंडींत गांठलें; तरीही न डगमगतां हुमायून परत फिरला. परंतु इ. स. १५३९ बक्सारनजीक चौसा येथें त्याचा पूर्ण पराभव झाला. पुढील वर्षी हुमायुनानें फिरून यत्न करून पाहिला, पण त्यास यश आलें नाहीं. अखेर त्यास राजधानीचा त्याग करून देशोदेशीं साहयाचनेसाठीं भटकावें लागलें. सिंध. मारवाड, पंजाब, अफगाणिस्थान इत्यादि मार्गे तो इराणांत गेला. कोणी त्यास साह्य करीना. अखेर इराणचा शहा तहामस्प यानें शिया पंथ स्वीकारण्याच्या अटीवर मदत देण्याचें कबूल केलें. सुनी धर्माभिमानी हुमायुनास तें मरणप्राय वाटलें ! पण करतो काय ? अखेर त्यानें शिया पंथ स्वीकारला व शहाच्या सैन्याच्या मदतीनें त्यानें इ. स. १५४५ त काबूलचें राज्य जिंकलें. दिल्लीचें राज्य प्राप्त होण्यास त्यास आणखी दहा वर्षे वाट पहावी लागली. इ. स. १५५५ त त्यानें पंजाबांत सरहिंद येथें शेरशाहाच्या वंशजाचा पराभव करून पुन: राज्य प्राप्त करून घेतलें. पुढील वर्षी तो मृत्यु पावला. अंगांत गुण असून हुमायून दुर्दैवी होता; कारण त्याचा ढिला व विलासी स्वभाव सर्व गुणांस पुरून उरणारा होता.

९. शेरखानाचें पूर्वचरित्र :—चौसाच्या लढाईंत हुमायुनाचा पराभव करून अफगाणी रियासतीचें पुनरुज्जीवन करणारा पुरुष शेरखान होय. हा मूळ घूर प्रांतावर राज्य करणाऱ्या सूर वंशांतील होता. ह्याचें पूर्वीचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांव फरीद. तो मोठा झाल्यावर बिहारचा सुलतान महंमद लोहानी याच्या पदरीं राहिला. तेथें एके प्रसंगीं वाघानें महंमदावर हल्ला केला असतां फरीदनें वाघास ठार मारलें व बादशाहाचे प्राण वांचविले. तेव्हां त्यास 'शेरखान' हें नांव प्राप्त झालें. परंतु लोहानीच्या दरबारीं त्याचा जम फार दिवस टिकला नाहीं. तेथून तो दिल्लीस बाबराच्या पदरीं राहिला. ह्याच वेळीं त्यास मोगलांचा स्वभाव, त्यांची लढण्याची पद्धत, त्यांची राज्यव्यवस्था ह्यासंबंधींचें ज्ञान होऊन त्यानें अफगाणी अंमलाचें पुनरुज्जीवन करणें शक्य आहे, परंतु बाबर असेतों हा हेतु साध्य होणें कठिण अशी मनाशीं खूणगांठ बांधली. मोगलांच्या दरबारीं सुमारें पंधरा महिने काढल्यावर तो फिरून बिहार प्रांतांत आला. पुढील सहा वर्षांत बिहार प्रांतांत आपलें वर्चस्व बसविलें; चुनारचा किल्ला हस्तगत केला व सुराजगड येथें बंगालच्या सुलतानाचा पराभव करून तेथेंही आपलें वर्चस्व स्थापन केलें (इ. स. १५३५–३६). इतकें झाल्यावर तो वर सांगितल्याप्रमाणें हुमायुनास तोंड देण्यास सिद्ध झाला.

१०. **राज्यस्थापना** :—हुमायुनाचा पराभव करून त्यास देशोधडीस पाठविल्यावर शेरखानानें दिल्ली येथें आपला अंमल प्रस्थापित केला. परंतु त्यास उसंत खाण्यास फुरसत नव्हती. पुढील पांच वर्षांत त्यानें पंजाबचा सुभेदार हैबतखान, बंगालमधील खिजरखान, माळव्याचा मल्लूखान व जोधपूर (राजपुताना)चा मालदेव यांचा पराभव केला व उत्तर भारतांत आपला संपूर्ण अंमल बसवीत आणला. अखेर याच उद्योगांत तो कलिंजर येथें दारूचा स्फोट होऊन मृत्यु पावला (इ. स. १५४५). शेरशाह नुसता लढवय्या होता असे नाहीं. मिळविलेलें टिकवून ठेवण्यास अनुरूप अशी राज्यपद्धतीही त्यानें निर्माण केली.

११. **राज्यव्यवस्था** :—राज्याचीं सर्व अधिकार-सूत्रें राजाच्या हातांत केंद्रीभूत व्हावींत व प्रबल प्रांताधिकाऱ्यांना शिरजोर होऊं देऊं नये, ह्या दृष्टीनें त्यानें आपल्या राज्याची व्यवस्था केली. सामान्यतः राज्याचे सुभा, सरकार, महाल किंवा परगणा व खेडेगांव असे एकाहून एक लहान विभाग असत. त्यांपैकीं सुभा हा मोठा विभाग शेरखानानें काढून टाकला. त्यामुळें प्रांताधिकारी प्रबळ होण्याची धास्तीच राहिली नाहीं. प्रत्येक सरकारावर एक शिक्केदार, एक मुनसफ, एक पोतदार (खजिनदार) व दोन कारकून असत. शिक्केदाराकडे प्रांताच्या संरक्षणाची जबाबदारी असे व मुनसफ हा सर्वसाधारण देखरेख ठेवी. वसुलाचें काम त्याजकडे नसे, वसुलाच्या कामाकरितां वरिष्ठ सरकारकडून परस्पर अधिकारी नेमले जात. ठिकठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी असे. कारण त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक मुख्य सूत्र असें होतें कीं, राज्यांतील पुष्कळसे गुन्हे सरकारी अंमलदारांनीं तिकडे कानाडोळा केल्यामुळें घडतात. तेव्हां गांवांत चोरी झाल्यास तेथल्या मुकादमानें चोरी पकडून दिली पाहिजे किंवा चोरीचा माग पुढील गांवापर्यंत लावून दाखविला पाहिजे; व शेवटीं चोर न सांपडल्यास त्या चोरीमुळें झालेलें नुकसान ज्या खेडेगांवापर्यंत चोराचा माग लागला असेल त्या खेडेगांवास भरून द्यावें लागे. फौजदारी गुन्ह्यांत चौकशी शिक्केदार करी व वसुलाच्या तंटयांतील न्यायनिवाडा करण्याचें काम मुनसफाकडे असे.

१२. लष्कर :—लष्कराची सुधारणा करतांना त्यांचें मुख्य लक्ष सरंजामी पद्धति मोडण्याकडे होतें. सरंजामी पद्धतीमुळें फौजेंतील शिपाई मुख्य राजाशीं राजनिष्ठ राहण्याऐवजीं आपल्या नजीकच्या अंमलदाराच्या तंत्रानें चालतात. तेव्हां शेरशाहानें सैन्याच्या भरतीचें काम लहानसहान अंमलदारांवर न सोंपवितां स्वत:कडेच घेतलें व त्यांचा पगार, भत्ता, बढती वगैरे सर्व स्वत: ठरवून दिलें; तसेंच सैन्यांतील घोडयांना डाग देऊन त्यांना नंबर देण्याचीही व्यवस्था त्यानें केली. यामुळें सैन्यांतील अंमलदारास खोटीच खोगीरभरती दाखवून घोडयांचा खर्च पदरांत पाडण्याचा मार्ग बंद झाला. या सर्व सुधारणांमुळें त्याचा सर्व सैन्यावर वचक बसला. सैन्याच्या हालचालीमुळें शेतकऱ्यांना त्रास होऊं नये याबद्दल तो फार काळजी घेई.

१३. वसूल :—वसुलाच्या खात्यांतही त्यानें सुधारणा केली. वसूल गोळा करण्यांत खर्च होऊं नये म्हणून त्यानें शेतकऱ्यास सारा एकदम सरकारी तिजोरींत भरण्यास उत्तेजन दिलें. जमीनदारांचें बंड मोडून टाकावें व सरकारचा थेट रयतेशीं संबंध यावा या हेतूनें त्यानें शेतकऱ्यांच्या जमिनीची वर्गवारी करून, मोजणीमापणी करून व उत्पन्नाचा सरासरी अंदाज काढून त्याचा एकचतुर्थांश इतका सारा ठरवून टाकला व तो देण्याबद्दल शेतकऱ्यांकडून कबुली लिहून घेऊन त्यास सरकारतर्फे एक पट्टा देण्यांत आला. साऱ्याची आकारणी करतांना ती उदारपणानें व सवलतीनें करावयाची; पण त्याची वसुली करतांना मात्र ती कडकपणानें करावयाची असें त्याचें धोरण असे.

१४. इतर सुधारणा :—१८० ग्रेन वजनाचें व १७५ ग्रेन शुद्ध चांदी असलेलें रुपया हें नाणें त्यानें सुरू केलें व नाण्यांचा पुरवठा व्हावा म्हणून ठिकठिकाणीं टांकसाळी उघडल्या. त्यानें बांधलेल्या इमारतींत किंवा केलेल्या सुधारणांत कलाकौशल्यापेक्षां लोकहित व लोकहितापेक्षांही राज्याचा सुरक्षितपणा हा हेतु साध्य करण्याकडे त्याचें अधिक लक्ष होतें. नित्य आपल्या राज्यांतून उत्तम सडका बांधल्या. त्यांपैकीं एक पूर्वेस डाक्क्यापासून पश्चिमेस सिंधु नदीपर्यन्त, दुसरी उत्तर-दक्षिण आग्रा ते बऱ्हाणपूर, तिसरी आग्रा ते जोधपूर व चौथी लाहोर ते मुलतान या मुख्य होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या रस्त्यांवर त्यानें ठिकठिकाणीं विहिरी खणल्या व धर्मशाळा स्थापन केल्या. बातमी पोहोंचविण्याकरितां टपालखातें सुरू केलें. या सर्व सुधारणांनीं लोकांचीं जशी सोय झाली तसेंच लष्कराची हालचाल करणें फार सुलभ झालें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण शेरशाहाचा खरा उद्देश तोच होता. ह्याशिवाय सर्व राज्यभर त्यानें गुप्त पोलिसांचें जाळें पसरून ठेविलें होतें.

१५. **योग्यता** :—वरील विविध कामगिरीवरून त्याची योग्यता कळून येईल. अफगाणी अंमलाचें पुनरुज्जीवन करणें हें त्याच्या कामगिरीचें सार होय. त्याचे वंशज त्याच्याप्रमाणेंच कर्तबगार निघते तर हिंदुस्थानच्या इतिहासांत बाबराची स्वारी तैमूरलंगाच्या किंवा नादीरशहाच्या स्वारीप्रमाणें नमूद झाली असती. न्याय देण्याच्या कामांत तो अत्यंत कठोरपणानें वागे. स्वतः भाविक मुसलमान असूनही त्यानें हिंदूंवर जुलूम केला नाहीं. ज्यानें त्यानें आपला धर्म पाळावा व राज्यकारभारांत धर्माचें वर्चस्व होऊं देऊं नये असें त्याचें धोरण होतें. हिंदूंना व मुसलमानांना आपले धर्म सांभाळून राज्यकारभारांत 'धर्मनिर्विशेष' अशी राष्ट्रीय दृष्टि ठेवतां येईल हें त्यानें आपल्या वागणुकीनें सिद्ध केलें. ह्या दृष्टीनें पाहिलें तर शेरशहा अकबराहूनही श्रेष्ठ ठरतो. अशा प्रकारच्या धार्मिक सहिष्णुतेचा तत्कालीन युरोपच्या इतिहासांत देखील अभाव होता.

१६. **सूर वंशाचा शेवट** :—शेरशहाच्या मृत्यूनंतर त्याच्या सरदारांनीं त्याचा धाकटा भाऊ जलालखान हा अधिक कर्तृत्ववान् आहे हें पाहून थोरल्या मुलास बाजूस सारून जलालखान यास गादीचा वारस नेमलें. तो इस्लामशाह हें नांव धारण करून गादीवर बसला. त्यानें इ. स. १५५३पर्यन्त राज्य केलें. त्याच्या मृत्यूनंतर पुढील दोन वर्षांत एकामागून एक तीन सुलतान गादीवर बसले; पण ते कर्तृत्वहीन होते. काबूल येथें हुमायून अनुकूल संधीची वाट पहात होता. तो दिल्ली येथें चाललेले घोटाळे पाहून पंजाबांत शिरला व सरहिन्द येथें शेवटचा सूर राजा शिकंदर याचा पराभव करून त्यानें आपलें गेलेलें तख्त पंधरा वर्षांनीं परत मिळविलें (इ. स. १५५५).

प्रश्न

१. बाबरच्या वेळीं भारताची परिस्थिति कशा प्रकारची होती ? मोगलसत्ता स्थापन करतांना त्यांस कोणत्या अडचणी आल्या, व त्यानें त्यांचें कसें निवारण केलें ? २. 'शेरशाहाची सेनापति आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यकर्ता या दोन्ही दृष्टींनीं फार मोठी योग्यता होती ' हें विधान सोदाहरण स्पष्ट करा. ३. एक एक महत्त्वपूर्ण वाक्य लिहा--बाबरचें आत्मचरित्र, चुनार, रोहटक, पानिपत.

अभ्यास



(१) बाजूचें चित्र पाहा. या रूपकावरून राणा संग व हिंदु समाज यांत कोणत्या उणीवा आढळून येतात तें स्पष्ट करा. या दोषामुळें राणा संगाचा पराभव झाला काय ? (२) शोधपूर्वक टीपा लिहा–(अ) जिहाद व (आ) गाझी.

माहितीसाठीं

राज्याच्या उन्नतीचें मूळ शेतकरी होत

शेतकरी आणि अधिकारी जमल्यावर शेरशाह शेतकऱ्यांना उद्देशून म्हणाला, " तुमच्या ज्या कांहीं तक्रारी असतील त्या तुम्ही नेहमीं माझ्या पुढें मांडा. मी तुमच्यावर कोणाकडूनही जुलूम होऊं देणार नाहीं. " शेतकरी लोक गेल्यावर शेरशाह आपल्या अधिकाऱ्यांना म्हणाला, " राज्याच्या उन्नतीचें मूळ शेतकरी होत. मीं त्यांना उत्तेजन देऊन परत पाठविलें आहे. शेतकऱ्यांवर कोणी जुलूमजबरदस्ती करतो कीं काय यावर माझें लक्ष राहील. कारण अधिकाऱ्यांच्या बेकायदा वागणुकीपासून राज्यकर्ता जर बिचाऱ्या शेतकऱ्यांचें रक्षण करूं शकत नसेल तर त्यानें त्याच्याकडून सारा वसूल करणें म्हणजे शुद्ध जुलूम होय."

[तारीख-इ-शेरशाही : इलियट अँड डौसन व्हॉ. ४, पृष्ठ ३०१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २५ वा

मोगल सम्राट् अकबर

(इ. स. १५५६ ते इ. स. १६०५)

१. **अकबर** :—हुमायून वनवासांत भटकत असतां त्याचें हमीदा नांवाच्या स्त्रीवर प्रेम जडलें व त्यानें तिच्याशीं लग्न केलें. त्यानंतर इ. स. १५४२ सालीं उमरकोट येथें ती प्रसूत होऊन तिला जो पुत्र झाला तोच मोगल सम्राट् अकबर होय. याची ५० वर्षांची कारकीर्द भारताच्या इतिहासांत विविध राजकीय, सामाजिक व धार्मिक आन्दोलनांनीं भरलेली आहे.

२. **पानिपतची दुसरी लढाई** :—हुमायून मेला तेव्हां अकबर फक्त चौदा वर्षांचा होता. हुमायुनच्या पदरीं बहरामखान नांवाचा एक विश्वासू सरदार होता. त्यानें अकबरास या प्रसंगीं मोठें साहृय केलें. दिल्ली येथें राहणें सुरक्षित नव्हतें. तेव्हां दिल्लीचें रक्षण करण्याचें काम तारदीबेग याजकडे सोंपवून बहरामखान अकबरास घेऊन लाहोर येथें गेला. त्याच्या मागें आदिलशाह सूरचा हिंदु सरदार हिमू बंगालमध्यें मोठी फौज घेऊन आला व त्यानें आग्रा व दिल्ली काबीज करून तारदीबेग यास हांकून लावलें व आपण स्वतः विक्रमाजित ह्या नांवानें राज्य करूं लागला. लौकरच त्यानें बहरामखान व अकबर ह्यांस हांकून लावण्याकरितां लाहोरकडे चाल केली. अफगाण व राजपूत लोक त्यास साहृय होते. अशा स्थितींत बहरामखानानें हिमूवर चाल करून जाण्याची तयारी केली. दोघांची गांठ ता. १५ नोव्हेंबर १५५६ रोजीं पानिपत येथें पडली. याच पानिपतवर तीस वर्षांपूर्वी बाबरनें इब्राहिम लोदीविरुद्ध—मोगलांनीं अफगाणांविरुद्ध—जय मिळविला होता. लढाई सुरू झाल्यावर बराच वेळ हिमूचा जय होणार असा रंग दिसत होता. परंतु ऐन वेळीं शत्रूच्या गोटांतून एक तीर येऊन हिमूच्या डोळ्यांत घुसला. त्यामुळें हिमू घायाळ होऊन पडला. पुढारी पडला हें पाहतांच सैन्यांत एकच गोंधळ माजला व शेवटीं अकबरास जय मिळाला.

३. **अकबराचें धोरण** :—राज्यावर आल्यावर पहिलीं कांहीं वर्षें तो बहरामखान वगैरेंच्या तंत्रानें वागत असे. परंतु इ. स. १५६२ पासून तो स्वतः आपलें धोरण आंखूं लागला. प्रथम माळव्यावर आपला अंमल बसवून नंतर इ. स. १५६२ त तो राजपुतांकडे वळला व जोधपूरच्या मालदेव राजाचा पराभव केला. परंतु राजपुतांशीं त्याचें धोरण एकंदरींत सामो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पचाराचें असे. याचें कारण असें कीं, त्याला मुख्यतः राहणें शक्य. एक अफगाण व दुसरे राजपूत. पैकीं अफगाणांवर विसंबून शत्रू असत नाहीं हें त्यास माहीत होतें म्हणून त्यानें राजपुतांचा विश्वास संपादन करण्याचा यत्न केला. तो इतका यशस्वी झाला कीं, पुढें राजपूत हे मुसलमानांशीं लढतांना त्यास उपयोगीं पडलेच; परंतु खुद्द राजपुतांबरोबरच्या युद्धांत देखील त्यांनीं अकबरास दगा दिला नाहीं. राजपुतांशीं उदार धोरण ठेवण्यांत त्याचा हाच एक केवळ हेतु होता असें नाहीं. त्यांत त्याची दूरदृष्टीही होती. हिंदुस्थानांत मुसलमानी राज्याची इमारत भक्कम पायावर उभारावयाची असल्यास राजपुतांचीं व इतर हिंदूंचीं मनें न दुखवितां त्यांच्या संतुष्टपणाच्या विस्तृत पायावर ती उभारली पाहिजे ही गोष्ट शेरशाहा-प्रमाणें त्याच्याही लक्षांत आली; व अलाउद्दीन खिलजीच्या काळापासून या वेळपर्यंत चालत आलेलें हिंदूंचा छळ करण्याचें मुसलमानी राजांचें सर्वसामान्य धोरण त्यानें बदलून टाकिलें; त्यानें हिंदूंच्या यात्रेवरील कर काढून टाकला. जझियासारखे जुलमी व अपमानास्पद कर बंद केले व लढाईंत सांपडलेल्या हिंदूंस गुलाम करून नेण्याची पद्धत मोडून टाकिली. ह्या त्याच्या अनेक कृत्यांबद्दल तो दोन्ही दृष्टींनीं स्तुतीस पात्र आहे. एक तर अनेक वर्षें चालत आलेले हे कर बंद करतांना त्यानें मुसलमानांच्या नापसंतीला न जुमानण्याचें मोठें धैर्य दाखविलें व राज्याच्या उत्पन्नाच्या ह्या बाबी बंद करतांना त्यास त्रास पडला तरी तो त्यानें सहन केला. त्यांच्या उत्पन्नाच्या लोभाला बळी पडून ते कर बंद करण्याची त्यानें दिरंगाई केली नाहीं.

अकबर

अकबर इतकेंच करून थांबला नाहीं. तो या बाबतींत शेरशाहाच्याही पुढें गेला. राजपूत घराण्यांशीं कायमचें सख्य घडवून आणण्याच्या उद्देशानें त्यानें त्यांच्याशीं शरीरसंबंधही सुरू केला. जयपूरचा राजा बिहारमल्ल हा त्यास सर्वांच्या आधीं अनुकूल झाला. त्यानें आपली मुलगी अकबरास दिली. तिलाच पुढें सलीम नांवाचा मुलगा झाला. बिहारमल्लाचा मुलग भगवानदास ह्यास अकबरानें मोठ्या अधिकाराची जागा दिली. पुढें इ. स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५७३ त जोधपूरच्या मालदेवाचा मुलगा उदयसिंह यानें अकबरास शरण जाऊन त्याचें अधिराज्य कबूल केलें व आपली बहीण जोधबाई ही अकबरास दिली. भगवानदासानें आपली मुलगी मानबाई सलीम ह्यास दिली. तिचाच मुलगा खुस्रू होय. भगवानदासाचा पुतण्या मानसिंह हा अकबराच्या पदरीं फार नामांकित वजनदार सरदार होता. ह्या शरीरसंबंधांबद्दल इतकें मात्र म्हटलें पाहिजे कीं, राजपुतांच्या दृष्टीनें हे सर्व संबंध मोठ्या आपखुषीनें झाले असतील असें म्हणवत नाहीं. कारण त्यांनीं आपल्या मुली मुसलमानांस दिल्या, तरी त्यांच्या मुली आपल्या घराण्यांत घेतल्या नाहींत. मोगल राजांचें अधिराज्य कबूल करण्यापुरता हा एक नाइलाज म्हणून जुलमाचा रामराम असला पाहिजे. हें खरें असलें तरी अशा प्रकारच्या शरीरसंबंधामुळें कांहीं राजपूत घराण्यांस दिल्लीच्या बादशाहासंबंधीं आपलेपणा वाटूं लागला व दिल्लीच्या सिंहासनाशीं राजनिष्ठ असा एक शूर राजपुतांचा वर्ग निर्माण करण्याचा अकबराचा हेतु साध्य झाला यांत संशय नाहीं. एकवार शरीर-संबंध झाल्यावर अकबर आपल्या राण्यांस आपापल्या हिंदु देवतांची पूजा करण्यास मुभा देई व त्यांना आपापल्या चालीरीती पाळण्यास पूर्ण अवसर मिळे. अकबरानें पुढें अनेक धार्मिक सुधारणा केल्या, त्यांत त्याच्या पदरचा अबूल फजल ह्याचें त्यास साह्य होतें. परंतु राजपुतांशीं वर सांगितलेलें उदार धोरण आंखण्याचें श्रेय सर्वस्वीं त्याला एकट्यालाच आहे.

४. **चितोडचा वेढा** :—जयपूर व जोधपूर येथील राजे अकबरास शरण आल्याचें वर सांगितलेंच आहे. राजपुतान्यांतील तिसरें महत्त्वाचें संस्थान चितोड हें होय. तेथील राजे मात्र सामान्य उपायांनीं शरण येईनात. तेव्हां अकबरानें चितोडला वेढा घालण्याचें ठरविलें. वेढ्याचें काम चालू असतां एक दिवस अकबरानें किल्ल्याच्या तटावर राठोडचा प्रमुख जयमल्ल ह्यास पाहिलें. तेव्हां त्यानें आपल्या संग्राम नांवाच्या बंदुकीनें अचूक नेम धरून त्यास ठार मारिलें. इकडे त्याचे सरदार तोडरमल्ल व कासीमखान यांनीं सुरुंग लावून तटास खिंडार पाडलें होतें. तेव्हां राजपुतांचा धीर खचला. त्यांच्या बायकामुलांनीं जोहार केला व ते एकजात केशरी पोषाख करून लढण्यास सिद्ध झाले. पट्टा नांवाचा तरुण राजपूत त्यांचा पुढारी झाला. एकाहून एक वीर जिवावर उदार होऊन धारातीर्थीं पतन पावले. त्यांत पट्टाही पडला. त्या लढाईंत अकबरानें तीस हजार राजपुतांची कत्तल केली (इ. स. १५६७). पुढें अकबरानें जय-मल्ल व पट्टा ह्यांच्या सन्मानार्थ आग्रा येथें किल्ल्याच्या दरवाजावर त्यांचे दोन पुतळे उभे केले.

५. **राणा प्रतापसिंह** :—अकबरानें चितोड काबीज केलें, परंतु उदयसिंह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अद्याप अरवलीच्या डोंगरांत मुक्तच होता. त्याच्याभोंवतीं इतर राजपूत जमा झाले. चितोड पडलें हें ऐकून उदयसिंहास फार दुःख झालें व त्यांतच तो मृत्यु पावला (इ. स. १५७२). त्याच्या मृत्यूनंतर त्याचा शूर व मानी पुत्र राणा प्रतापसिंह ह्यानें अरवलीच्या डोंगरांत आपली राजधानी स्थापन करून तीस आपल्या बापाच्या स्मरणार्थ उदेपूर असें नांव दिलें. तेथें राहून तो आपले गेलेले प्रांत परत मिळवूं लागला. अनेक राजपुतांनीं आपल्या मुली मुसलमानांस दिल्या ह्याची त्यास फार चीड येत असे व अशा घराण्यांशीं शरीरसंबंध करावयाचा नाहीं असा त्यानें विचार केला. लौकरच प्रतापसिंहाचें उदेपूर हें स्वतंत्र राजपुतांच्या जमावाचें केंद्र बनलें. बरेच दिवस युद्धाची तयारी चालू होती. अखेर इ. स. १५७६ सालीं हळदीघाट येथें मोठें निकराचें युद्ध झालें. मोगलांचें सैन्य फारच मोठें होतें. प्रतापसिंहास अनेक जखमा झाल्या. तेव्हां तो आपला आवडता घोडा चित्तक याच्यावर स्वार होऊन युद्धाच्या गर्दीतून निसटला; मोगलांनीं त्याचा पाठलाग केला, परंतु तो त्यांच्या हातीं लागला नाहीं. धांवण्याच्या श्रमामुळें चित्तकानें वाटेंतच प्राण सोडला. युद्धांतील पराजयामुळें प्रतापसिंहास फार वाईट वाटलें. तो इ. स. १५९७ त मृत्यु पावला. मृत्युसमयीं चितोड व अजमीर ह्यांखेरीज राजपुतान्यांतील सर्व प्रदेश फिरून त्यानें स्वतंत्र केला व मरते समयीं चितोड काबीज करण्याचें वचन आपल्या सरदारांपासून घेऊन त्यानें प्राण सोडला. राणा प्रतापचें शौर्य व मानीपणा पाहून अकबरानेंही त्याच्या स्तुतिपर उद्गार काढले. राणा प्रतापसारखीं नररत्नें हिंदुस्थानच्या इतिहासांत यावच्चंद्रदिवाकरौ भूषणभूत राहतील यांत शंकाच नाहीं.

राणा प्रतापसिंह

६. गुजराथ व बंगालवर अंमल :—राजपुताना व माळवा ह्या ठिकाणीं आपला अंमल बसविल्यावर इ. स. १५७२ त त्यानें गुजराथवर स्वारी केली व तेथील सुलतान मुजफरशहा ह्यास कैद केलें. ह्या वेळेपासून थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत गुजराथ मराटचांवडे येईपर्यंत तो मोगलांच्या ताब्यांत होता. पुढील वर्षी त्यानें बंगालवर स्वारी केली. तुकरोई येथें मोठी लढाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन त्यांत दाउदखानचा पराभव झाला (इ. स. १५७५). पुढील वर्षी अकबराच्या सैन्यानें दाउदखानास राजमहालाच्या खिडींत गांठून ठार मारिलें (इ. स. १५७६). या युद्धानें बंगाल मोगलांच्या ताब्यांत आला व तो इंग्रजी अमलापर्यंत त्यांच्याच ताब्यांत होता.

७. **कलाकौशल्याचीं कामें** :—अकबराचें प्रथम वास्तव्य आग्रा येथें असे. त्याची सिक्री येथील साधु शेख सलीम ह्याच्यावर फार भक्ति होती. त्यामुळें दिवसेंदिवस सिक्री येथें राहणेंच त्यास अधिक आवडूं लागलें. तेथें त्यानें भव्य इमारती बांधण्यास सुरुवात केली व त्याकरितां ठिकठिकाणाहून कुशल कारागीर आणविले. त्यांचीं कामें चालू असतां अकबर वारंवार त्यांना सूचना देई व त्यांबरहुकूम कामें करण्यास सांगत असे. त्यामुळें तेथील सर्व इमारतींवर अकबराच्या मनाचा ठसा उमटलेला पाहावयास मिळतो. अकबराच्या मनाची ठेवण कांहींशीं तात्त्विक व गूढ विचारांत रममाण होणारी असल्यामुळें त्यानें बांधविलेल्या इमारतीचा भव्यपणा पाहणाऱ्यांच्या मनाला गंभीर विचारांना प्रवृत्त करतो. अकबराला चित्रकलेची फार आवड असे. अकबरानें सिक्री येथें पुष्कळ चित्रें काढून घेतलीं व तेथें भारतांतल्या शिल्पकलेचें व चित्रकलेचें प्रदर्शन व्हावें ह्याबद्दल बिलकुल कसूर केली नाहीं. इ. स. १५७० पासून पुढील बारा वर्षें त्याचा बहुतेक काल येथेंच जाऊं लागला. इ. स. १५७५ त गुजराथच्या स्वारीहून आल्यानंतर तेथील विजयाच्या स्मरणार्थ त्यानें एक भव्य दरवाजा उभा केला. त्यास बुलंद दरवाजा हें नांव आहे. सिक्रीचें जुनें नांव मागें पडून फत्तेपूर सिक्री हें नांव उपयोगांत येऊं लागलें. सिक्री येथील बहुतेक इमारती तांबडचा संगमरवरी दगडाच्या आहेत.

८. **धार्मिक धोरण** :—फत्तेपूरच्या राजवाडयांत धार्मिक चर्चेकरितां एक खास दिवाणखाना राखून ठेवण्यांत आला होता. त्या ठिकाणीं दर गुरुवारीं रात्रीं धार्मिक विषयावर वादविवाद होत असत व अकबर ते ऐकत असे. इ. स. १५७३ त शेख मुबारक नांवाच्या मौलवीची व त्याची गांठ पडली. त्यानें अकबरास मुसलमानांचा धर्मगुरु होण्याची सल्ला दिली व अकबर त्यासंबंधीं विचार करूं लागला. पुढें शेख मुबारकचे मुलगे फैजी व अबुल फजल यांची व अकबराची ओळख झाली. तेव्हांपासून अकबराचें मन विशेष रीतीनें धार्मिक विचारांत गुंतूं लागलें, व त्याच्या विचारांतील तारुण्याची खळबळ कमी होऊन त्यांत मध्यम वयांतील स्थिरता उत्पन्न झाली. अबुल फजल हा त्यास राज्यकारभारांत उपयोगी पडत असे व इतर ठिकाणींही तो त्याचा अगदीं उजवा हात असे. गुरुवारच्या वादविवादांत वारंवार दोन्ही बाजूंना आडवे तिडवे प्रश्न विचारण्यांत अबुल फजल हाच प्रमुख असे. प्रथम प्रथम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे वाद मुसलमानी धर्माच्या निरनिराळ्या पक्षांतून चालत असत. त्या वेळीं पुष्कळ वेळां मौलवी वाद करतां करतां वर्दळीवर येत व एकमेकांस शिव्याही देत. तीं भांडणें ऐकून अकबराच्या मनाचें समाधान होण्याऐवजीं जास्तच गोंधळ उत्पन्न झाला. त्यानें पुष्कळ विचार केला व आपल्या शंकांचें समाधान करणारा कोणी भेटेल कां म्हणून पाहिलें; परंतु व्यर्थ. धार्मिक बाबतींत उत्पन्न झालेले वादग्रस्त प्रश्न कोणीं सोडवावयाचे ह्याचा त्यास उलगडा होईना. शेवटीं त्यानें तो अधिकार राजा या नात्यानें स्वत:कडेच घेतला व एक दिवस फत्तेपूर येथील मशिदींत जाऊन बेधडक स्वत:च खुद्बा पढण्यास सुरुवात केली. मुसलमानी धर्मांतील वादग्रस्त प्रश्नांवर निकाल देण्याचा अधिकार बादशाहासच आहे असा त्यानें जाहीरनामा काढून त्यावर पुष्कळ मौलवींच्या जबरदस्तीनें सह्या घेतल्या; व इंग्लंडच्या इतिहासांतील आठव्या हेन्रीचें अनुकरण केलें. तसेंच मुसलमान एकमेकांस भेटले म्हणजे त्यांनीं एकमेकांस सलाम करण्याऐवजीं 'अल्ला हो अकबर' असें म्हणण्याचा प्रघात सुरू केला. अल्ला हो अकबर ह्याचे दोन अर्थ होतात. एक अल्ला म्हणजे देव हा अकबर म्हणजे सर्वशक्तिमान् आहे असा, व दुसरा अर्थ 'अकबर हा देव आहे' हा होय. अशा रीतीनें व्यंग्यार्थानें आपणच देव आहोंत असें त्यानें सुचविलें.

९. **त्याचा नवा धर्म** :—परंतु नुसतें मुसलमान लोकांचें धर्मगुरुत्व मिळवून त्याचें समाधान झालें नाहीं. येशू ख्रिस्त, महंमद पैगंबर ह्यांच्या-प्रमाणें आपण धर्मसंस्थापक व्हावें असें त्याच्या मनानें घेतलें व त्याप्रमाणें सर्व धर्मांतील त्याला वाटलीं तीं उत्कृष्ट तत्त्वें एकत्र करून त्यानें 'दिने इलाही' नांवाचा एक स्वतंत्र धर्म स्थापन केला. अबुल फजल हा त्याचा मुख्य अधिकारी बनला व कित्येक दरबारी मंडळींनीं वेळ मारून नेण्या-पुरता त्या धर्माचा स्वीकारही केला. परंतु एकंदरींत त्या धर्माचा विशेष प्रसार झाला नाहीं. अकबर हा कांहीं गौतम बुद्ध, पैगंबर, ख्रिस्त किंवा शंकराचार्य ह्यांच्याप्रमाणें आपल्या नवीन धर्मासाठीं तळमळणारा व वेळ पडल्यास त्याकरितां राज्यावर व जिवावरही पाणी सोडणारा धर्मसंस्थापक नव्हता. साम्राज्यसत्ता हिंदुस्थानांत दृढ करण्याचें ध्येय मात्र त्याच्या डोळ्यां-पुढून कधींच हललें नाहीं. या दृष्टीनें विचार केल्यास अकबरानें स्थापिलेलें साम्राज्य टिकून राहिलें, पण त्यानें स्थापिलेला धर्म त्याच्याबरोबर नष्ट कां झाला तें कळून येईल.

१०. **सर्वांगीण सुधारणा** :—ही धार्मिक प्रश्नाबद्दल चर्चा चालू असतां अकबरानें दुसऱ्या महत्त्वाच्या सामाजिक सुधारणाही अंमलांत आणल्या. मद्यपान व जुगार या व्यसनांस त्यानें आळा घातला. त्या काळांत हिंदु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समाजांत सक्तीच्या सतीचा प्रचार होता. अकबरानें तो कायद्यानें बंद केला. तसेंच त्यानें सक्तीचे विवाह बंद करण्याची खटपट केली व प्रत्येक लग्नास वधूवरांची व ते लहान असल्यास त्यांच्या आईबापांची संमति असल्या-शिवाय ते कायदेशीर होणार नाहींत असें जाहीर केलें. याखेरीज त्यानें चांद्रमानावर आधारलेली मुसलमानी कालगणना बंद करून शास्त्रीय काल-गणना सुरू केली. एक मोठें भाषांतर खातें सुरू करून ठिकठिकाणच्या महत्त्वाच्या शास्त्रीय ग्रंथांचीं भाषांतरें करविण्याचा उपक्रम केला. सक्तीचें धर्मांतर बंद केलें व सरकारी नोकऱ्या पात्रतेप्रमाणें देण्याचें धोरण अंगि-कारलें. सारांश, त्याच्या नूतन धर्मस्थापनेच्या हेतूबद्दल अभ्यासकांत मत-भेद असला, तरी त्यानें केलेल्या इतर सुधारणा व्यक्तिस्वातंत्र्य, शास्त्रीय दृष्टि व मानव्याचें हित या त्रयीवर आधारलेल्या होत्या व आज विसाव्या शत-कांतही त्यांचा उदारपणा वाखाणण्यासारखा आहे यांत बिलकुल शंका नाहीं.

११. चांदबिबीचा पराक्रम:—इ. स. १५९५ पासून त्याच्या कार-कीर्दीच्या उत्तर भागास सुरुवात झाली. मध्यंतरींच्या काळांत त्याच्या सर-दारांनीं ठिकठिकाणीं स्वाऱ्या करून काबूल, काश्मीर, कंदाहार, सिंध, बलुचिस्थान व ओरिसा हे प्रांत त्याच्या राज्यास जोडले. अशा रीतीनें उत्तर भारत काबीज केल्यावर त्याची नजर दक्षिणेकडे वळली. इ. स. १५९६ त त्याचा पुत्र मुराद यानें अहमदनगरवर हल्ला केला. त्या वेळीं अहमदनगरच्या राज्यांत चांदबिबी नांवाची शूर स्त्री प्रमुख होती. मुराद चालून आला तेव्हां तिनें स्वत: मर्दानी पोषाख चढवून किल्ल्याच्या रक्षणाची तयारी केली व तटावर पहारा करूं लागली. मोगलांनीं किल्ल्याच्या तटाखालीं सुरुंग लावून तटास खिंडार पाडलें, परंतु तिनें न डगमगतां खिंडाराशीं उभें राहून मोगलांशीं असा निकराचा सामना दिला कीं, मुराद यास परत जाणें भाग पडलें. दुसऱ्या दिवशीं मुराद हल्ला कर-ण्याच्या विचारानें जातो तों चांदबिबीनें रातोरात खिंडार बांधून काढल्याचें त्याच्या दृष्टीस पडलें. शेवटीं युद्धास कंटाळून त्यानें तहाचें बोलणें लावलें. अहमदनगरच्या दुर्दैवानें चांदबिबीविरुद्ध दरबारांत कारस्थानें होऊं लागलीं व


चांदबिबी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिचें पूर्वीचें वजन राहिलें नाहीं. तेव्हां इ. स. १५९७ त मोगलांनीं निजामशाहीवर फिरून हल्ला केला व तिच्या फौजेचा पराभव केला. यानंतर मोगल सैन्यानें खुद्द अहमदनगरास वेढा घालून तें शहर काबीज केलें. चांदबिबीचा यापूर्वींच दरबारी कारस्थानांत खून झालेला होता. यानंतर अकबरानें अशिरगडचा किल्ला लांच देऊन ताब्यांत घेतला व खानदेश प्रांतही खालसा केला.

१२. अकबराचा मृत्यु व योग्यता :—इ. स. १६०४ च्या सप्टेंबरांत अकबर आजारी पडला तेव्हां त्याची शुश्रूषा करण्याचें एकीकडेच राहून दरबारी मंडळींत पुढील व्यवस्थेबद्दल कारस्थानें सुरू झालीं. यामुळें त्यास फार वाईट वाटलें. शेवटीं तो १७ ऑक्टोबर इ. स. १६०५ रोजीं मृत्यु पावला. त्याचा अंत्यविधि अगदीं साधा व घाईघाईनें उरकण्यांत आला. 'पृथ्वीवरील थोर राजकर्त्यांत त्याची गणना केली पाहिजे' असें रिसायतकार सरदेसाई म्हणतात तें सत्य आहे. बाप वनवासी असतां त्याचा जन्म झाला. त्याचें शिक्षण वगैरे कांहीं झालें नव्हतें. त्यास शेवटपर्यंत लिहितांवाचतां येत नव्हतें. परंतु त्याची बुद्धि कुशाग्र, चौफेर, शोधक व कल्पक होती. शिल्पकलेंत, तोफा नीट करण्यांत, राज्यव्यवस्था लावण्यांत, धार्मिक चर्चा करण्यांत व लढाई चालविण्यांत अशा प्रत्येक बाबतींत तो स्वत: विचार करीत असे. बंदुकीच्या नळ्या वारंवार फुटत, तेव्हां अकबरानें गोळी सुटतांना ती गरगर फिरत जावी ह्या हेतूनें नळ्यांच्या आंतल्या बाजूस स्क्रूप्रमाणें वळसे पाडण्यास सांगितलें. याचप्रमाणें एका काडीनें सोळा तोफा उडविण्याची सोयही त्यानेंच केली. कित्येक वेळां तो विचित्र प्रयोग करून पाही. मनुष्यास उपजत धर्माचें ज्ञान असतें किंवा नाहीं हें पाहण्याकरितां त्यानें सुमारें वीस मुलें जन्मल्याबरोबर एकांतवासांत ठेविलीं व तीन वर्षें वाढविलीं. त्यांतील कांहीं मृत्युमुखीं पडलीं व बाकीचीं मुकीं निघालीं.

१३. त्याच्या यशाचें मर्म :—त्याच्या स्वभावाचें व गुणांचें आणखी पुष्कळ वर्णन देतां येईल. त्याच्या विविध उद्योगाकडे पाहिल्यास तो शेरशाहापेक्षां पुष्कळच श्रेष्ठ ठरतो. तसेंच राजकीय दृष्टचा साम्राज्य कमावून तें चिरस्थायी करण्याचे त्याचे मुत्सद्देगिरीचे यत्न पाहिले म्हणजे त्याचा खरा मोठेपणा नजरेस येतो. भारतावर राज्य करतांना केवळ अल्पसंख्याक राज्यकर्त्यांकडे लक्ष देऊन भागणार नाहीं; बहुसंख्य हिंदूंस योग्य तें महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे व त्यांच्यावर जुलमी कर लादून त्यांना असंतुष्ट ठेवून चालणार नाहीं, ही मुसलमानी वळणास सर्वस्वी अपरिचित व अप्रिय अशी कल्पना त्यानें नजरेसमोर ठेवली व तिच्या विस्तृत व भक्कम पायावर भारतीय साम्राज्याची प्रचंड इमारत उभारली. ही गोष्ट तो अलौकिक बुद्धीचा पुरुष होता हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. परंतु या सर्वांपेक्षां त्याच्या यशाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खरें मर्म त्यानें काळाचीं पावलें ओळखून आपलें धोरण आखलें यांत आहे. वंश, धर्म व पंथ या बाबतींत विविधतेनें भरलेल्या भारतांतील समाजास संघर्ष टाळून सहवासाचें व सहकार्याचें अधिष्ठान हवें होतें. तें त्यानें सर्व धर्मांचा समन्वय करून साध्य करण्याचा प्रयत्न केला. तो यशस्वी झाला नाहीं, हा भाग निराळा. त्यास नुसतें राज्याचा मालक व्हावयाचें नव्हतें, तर लोकांच्या गरजांतून भासमान होणाऱ्या लोकांच्या अमूर्त आकांक्षांना व्यक्त स्वरूप देण्याचा त्याचा यत्न होता. हेतु हा कीं, सर्वांनीं म्हणावें कीं 'होय. आम्हाला हेंच हवें होतें.' अकबरास अशा प्रकारचें लोकनायकत्व हवें होतें असें त्याच्या उद्योगावरून दिसून येतें. नवभारताची निर्मिति करण्याचा अकबराचा यत्न हा यशस्वी झाला असता तर पुढील काळांत झालेलीं हिंदु मुसलमानांचीं युद्धें टळलीं असतीं व भारताच्या इतिहासास निराळेंच वळण लागलें असतें. त्या काळीं कर्तबगार म्हणून मिरवणाऱ्यांना देखील अकबराची ही व्यापक दृष्टि आलेली नव्हती. त्याच्या मृत्यूनंतर हलके हलके इस्लाम धर्मप्रधान राज्याचें धोरण अंमलांत येऊं लागलें व औरंगजेबाच्या काळीं तर तें कळसासच पोहोंचलें.

१४. **राज्यव्यवस्था** :—अकबरानें सुरू केलेली राज्यव्यवस्था ही त्याच्या कुशाग्र बुद्धीचें द्योतक होय. देशी संस्थानांतील राज्यव्यवस्थेकडे पाहिलें किंवा ब्रिटिश मुलुखांतील जमीनमहसुलांच्या पद्धतीकडे पाहिलें तर त्यांचें मूळ बऱ्याच अंशीं अकबरानें घालून दिलेल्या व्यवस्थेंत सांपडतें. सर्व सत्ता बादशहाच्या हातीं असून त्याच्यावर दुसऱ्या कोणाचेंही नियंत्रण नव्हतें. त्याच्या हाताखालचे निरनिराळ्या खात्यांचे अधिकारी त्याच्या संमतीनें सर्व कारभार करीत.

१. वकील किंवा मुख्य प्रधान—हा सर्वांत श्रेष्ठ असे. त्याच्या खालोखाल पुढील अधिकारी असत :
२. वझीर किंवा दिवाण—फडणविसाचें काम पाहणारा,
३. बक्षी—नोकरांचा व फौजेंतील शिपायांचा पगार देणारा,
४. सदर—धर्मखातें सांभाळणारा,
५. काझी—न्यायखात्यावर देखरेख करणारा,
६. कोतवाल—पोलिसखात्याचा मुख्य,
७. वाकनीस—दप्तरखात्याचा मुख्य.

हे सर्व अधिकारी लष्करी अंमलदारही असत. प्रत्येक प्रांतांतूनही प्रांतिक अधिकाऱ्यांच्या हाताखालीं वर सांगितलेले अधिकारी असत व ते त्या त्या खात्यांतून तयार होऊन येत. म्हणजे प्रांताचा बक्षी हा राजधानीच्या बक्षीच्या हाताखालीं शिक्षण संपादून येत असे. पुढें मराठी राज्यांत नाना फडणविसानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीच पद्धत अंमलांत आणली. अकबराच्या राज्याचे एकंदर १५ सुभे होते. परंतु त्याची सर्वांत महत्वाची सुधारणा म्हणजे सरंजामी पद्धतीचा मोड ही होय. त्यानें सरंजामदारांच्या जहागिरी खालसा करून त्या बादशाही जमिनींत समाविष्ट केल्या; व मनसबदारांचा एक नवीन वर्ग निर्माण केला. त्यांना लष्करी कामाशिवाय दुसरें काम नसे. दहा शिपायांपासून दहा हजार शिपायांच्या मुख्यापर्यंत असे मनसबदारांचे ३३ वर्ग असत; व ह्या जात नेमणुकाखेरीज एखाद्या मनसबदारानें व्यक्तिशः पराक्रम केल्यास त्यास जादा स्वार नेमणूकही मिळत असे. अशा रीतीनें जहागीरदार व लष्करी अंमलदार यांची त्यानें फारकत केली.

१५. **नवरत्नांचा दरबार** :—अकबराच्या पदरीं पुष्कळ विद्वान् माणसें असत. त्यांना नवरत्नांचा दरबार अशी संज्ञा आहे. त्यांत अबुल फजल, तोडरमल, मानसिंह, बिरबल अशीं नांवें आढळतात. पैकीं बिरबल व बादशाह यांच्या चतुर गोष्टी लोकवाङ्मयांत प्रसिद्ध आहेत. परंतु त्या बहुतेक काल्पनिक आहेत. बिरबल हा मूळ जयपूरचा राजा भगवानदास ह्याच्या पदरीं होता व नंतर तो अकबराकडे आला. त्याचें मूळ नांव महेशदास. तो उत्तम गवई, कवि, गोष्टी सांगणारा व चतुर संभाषण करणारा होता. त्याला अकबरानें कलिंजरची जहागीर दिली होती. तो इ. स. १५८६त मृत्यु पावला.

प्रश्न

१. हिंदुस्थानचा नकाशा काढून त्यांत अकबराचें साम्राज्य दाखवा. २. धर्म, राज्यव्यवस्था व राज्यविस्तार याबाबत अकबराचें धोरण स्पष्ट करा. ३. टीपा लिहा :—(१) हिमू (२) राजा तोडरमल (३) मानसिंह (४) अबुल फजल (५) दिने इलाही (६) बिरबल.

अभ्यास

(१) 'अकबरानें साम्राज्य कमावलें, इतकेंच नव्हे तर त्या साम्राज्याची इमारत विस्तृत व भक्कम पायावर उभारली' चर्चा करा. (२) माहिती लिहा :—१. 'अल्ला हो अकबर' २. सर्व धर्म समन्वयाची दृष्टि ३. राणा प्रतापाचें श्रेष्ठत्व. ३. वाचा : हिंदुस्थानचा साधनरूप इतिहास या पुस्तकांतून 'धर्म जिज्ञासू अकबर' पृ. १२०–१२७.

माहितीसाठीं

सांपत्तिक स्थिति

अकबराच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दींत एकंदर तीन दुष्काळ पडले. एक इ. स. १५५६ त, दुसरा १५७६ त व तिसरा इ. स. १५९५ त. त्यांपैकीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १५७६ तील दुष्काळ फार कडक होता. ह्या दुष्काळांच्या उल्लेखास पुष्कळ जण फार महत्त्व देतात. परंतु पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत तीन दुष्काळ फार नव्हेत. अगदीं अलीकडे इ. स. १८५० ते १९०० ह्या पन्नास वर्षांत एकंदर ३४ दुष्काळ पडल्याचें नमूद आहे. त्या वेळची भारताची लोकसंख्या अदमासें १० कोटी म्हणजे आजच्या तृतीयांशानेंही नव्हती व लागवडीस आणण्याजोगी पुष्कळ जमीन पडीक राहात असे. तेव्हां दुष्काळ वारंवार पडण्याचें कारण नव्हतें. बाजारभाव पुढील प्रमाणें असत. गहूं दर रुपयास ९७ शेर, बाजरी १३८ शेर व तांदुळ ५५ शेर असत. हे दर पुष्कळ स्वस्ताईचे आहे. चैनीच्या वस्तू मात्र मर्यादित मागणी असल्यामुळें स्वस्त देणें परवडत नसे. काश्मीरच्या शाली, आग्याचे गालीचे व डाक्याची मलमल हीं त्या काळीं प्रख्यात असत. अकबरानें आपल्या कारकीर्दींत 'तवारिख' म्हणजे रोजची दिनचर्या लिहून ठेवण्याचा प्रघात सुरू केला होता, त्यावरून वरील माहिती मिळते.

भाग २६ वा

मोगल बादशाहीची अखेर

(इ. स. १६०५ ते १७०७)

१. जहांगीर (इ. स. १६०५ ते इ. स. १६२७):—अकबराच्या मृत्यूनंतर सलीम गादीवर बसला, तेव्हां दरबारी मंडळींनीं त्याजकडून दोन बाबतींत वचन घेतलें. एक त्याच्याविरुद्ध कटांत सामील झालेल्यांस त्यानें शिक्षा करूं नये व दुसरें त्यानें मुसलमानी धर्म पाळावा. ह्या अटींवरून दरबारचे मुसलमान अकबराच्या धार्मिक धोरणाला किती कंटाळले होते तें दिसून येतें. सलीम हा धार्मिक बाबतींत कांहींसा उदासीनपणें वागे. ईश्वरावर त्याची निष्ठा असे. परंतु एका विशिष्ट धर्माचा त्यास अभिमान नव्हता. तथापि दरबारचें राजकारण लक्षांत घेऊन मुसलमानांना दुखवूं नये एवढ्यापुरतें तो मुसलमानी धर्माचें आचरण करी. राज्यावर येतांच त्यानें नुरुद्दीन महंमद जहांगीर म्हणजे 'धर्मोद्धारक व जगज्जेता' असें नांव धारण केलें. परंतु तें पोकळच ठरलें. मुसलमानी धर्माचा उद्धार करण्याजोगें त्यानें कांहीं केलें नाहीं व अकबरानें मिळविला त्याहून फारसा अधिक मुलूखही त्यानें मिळविला नाहीं. उलट कंदाहार प्रांत त्याच्या ताब्यांतून कायमचा गेला.

२. खुस्रूचें बंड :—जहांगीर गादीवर बसल्यावर त्याचा मुलगा खुस्रू यानें बापाविरुद्ध पंजाबांत बंड उभारलें. जहांगिरानेंही मुलगा म्हणून त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुळींच गय केली नाहीं. त्याच्या साथीदारांचें बंड क्रूरपणानें मोडून टाकलें; व त्याचे डोळे शिवून त्यास कैदेंत टाकलें. पुढें इ. स. १६२१त त्याचा धाकटा भाऊ खुर्रम् ऊर्फ 'शहाजहान' यानें त्याचा खून करविला असें म्हणतात.

३. **नूरजहान** :—इ. स. १६११ त जहांगीरच्या आयुष्यांत क्रांति करणारी एक गोष्ट घडून आली. ती म्हणजे नूरजहानशीं त्याचें लग्न होय. नूरजहान ही घ्यासबेग नांवाच्या इराणांतील इसमाची मुलगी. तिचें मूळ नांव मेहरुन्निसा. जहांगीरनें तिला आपली पट्टराणी केलें. लौकरच तिनें जहांगिरावर आपलें एवढें वजन बसविलें कीं, जहांगीर सर्वस्वीं तिच्या तंत्रानें वागूं लागला. त्यानें तिला 'नूरजहान' (जगांतील ज्योत) हें नांव दिलें. नूरजहानचें वय त्या वेळीं चौतीस वर्षांचें होतें. तिची शरीरप्रकृति उत्तम होती. ती घोड्यावर बसण्यांत व नेम मारण्यांत पटाईत असे. तिला पर्शियन भाषेचें चांगलें ज्ञान होतें व त्यांत ती कवनें करी. ती अतिशय धार्मिक असून तिनें अनेक गरीब मुलींचीं लग्नें लावून दिलीं. तिला विलासाचा मोठा शोक होता. राजवाड्यांतील

नूरजहान

दरबारी पद्धतींत तिनें सुधारणा घडवून आणली. गुलाबी अत्तर तिनेंच इराणांतून हिंदुस्थानांत प्रथम आणविलें असें म्हणतात.

४. **कारकीर्दीचें समालोचन** :—जहांगीरच्या एकवीस वर्षांच्या कारकीर्दींत त्यानें नवीन साध्य केलें असें फार थोडें आहे. नाहीं म्हणावयास त्यानें चितोडचा राणा अमरसिंह व त्याचा पुत्र कर्ण यांचा पराभव करून त्यांच्याशीं सख्य जोडलें व राजपूत विरोधाचें एक महत्त्वाचें केन्द्र सामर्थ्य व सामोपचार यांचा योग्य उपयोग करून मोडून काढलें ही एक महत्त्वाची गोष्ट केली यांत शंका नाहीं. एरव्हीं जहांगीरचा कर्तबगार मुलगा खुर्रम् व त्याची स्त्री नूरजहान या दोघां महत्त्वाकांक्षी व्यक्तींचे खटके व त्यांच्यामुळें उद्भवलेलीं युद्धें यांनीं त्याची कारकीर्द भरलेली आहे. दक्षिणेंत निजामशाहीशींही त्याचीं युद्धें झालीं, पण एकंदरींत राज्यकारभारावर त्याचा विशेष परिणाम झाला नाहीं. अकबरानें घालून दिलेली सुसूत्र राज्यकारभाराची घडी 'मागील अंकावरून' पुढें चालू राहावी तसें झालें. तो इ. स. १६२७ त मृत्यु पावला. नूरजहाननें जहांगिराचा धाकटा मुलगा शहर्यार यास आपली पहिल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लग्नाची मुलगी दिली होती व तो गादीवर यावा अशी तिची खटपट होती. पण खुर्रम् आपल्या कर्तृत्वामुळें दरबारी मंडळींत लोकप्रिय असल्यानें नूरजहानचें कारस्थान यशस्वी झालें नाहीं. अखेर खुर्रम् ऊर्फ शहाजहान गादीवर आला.

५. **मोगल बादशाहीचा सुवर्णकाळ** :—शहाजहानची एकतीस वर्षांची कारकीर्द (इ. स. १६२७ ते इ. स. १६५८) एकंदरींत शांततेची व भरभराटीची गेली, म्हणून या कालास 'मोगल बादशाहीचा सुवर्णकाळ' असें म्हणण्याचा प्रघात आहे. कारकीर्दीच्या आरंभीं व अखेर दक्षिणेकडे झालेलीं युद्धें व मध्यंतरीं कंदाहारसारखे सरहद्दीवरील प्रदेश परत घेण्यासाठीं त्यानें केलेलीं अयशस्वी युद्धें सोडून दिल्यास या काळांत युद्ध झालें नाहीं. कोणीही मोगल साम्राज्यावर आपण होऊन चढाई करण्यास आला नाहीं. शहाजहानासही युद्धाची दगदग नको असे. तो मोठा विलासी असून त्यास इमारती बांधण्याचा व कलाकौशल्याचा मोठा शोक असे. इ. स. १६३१ सालीं शहाजहानची आवडती राणी आर्जुमंद् बानू ऊर्फ मुम्ताज मेहेल ही मृत्यु पावली. तिच्या मृत्यूनें शोकाकुल झालेल्या शहाजहाननें तिच्यावरील प्रीतीचें प्रतीक म्हणून तिचें एक सुंदर स्मारक करावयाचें ठरविलें. तीच जगप्रसिद्ध ताजमहाल ही इमारत होय.

६. **ताजमहाल** :—ताजमहालइतकी सुंदर इमारत साऱ्या पृथ्वीवर दुसरी आढळणार नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. ही इमारत यमुनेच्या कांठीं असून ती तयार करण्यास वीस हजार मनुष्यें बावीस वर्षें खपत होतीं असें म्हणतात. 'स्वप्नसृष्टीचें संगमरवरी प्रतीक' असें ताजमहालचें कोणीं वर्णन केलें आहे. ताजमहालच्या निर्मितीसाठीं बगदादचे वळणदार हस्ताक्षरी, बुखाऱ्याचे रंगीत संगमरवरी फुलांच्या वळणदार वेलबुट्टया कोरून बसविणारे कारागीर, कॉन्स्टॅन्टिनोपल येथील डेरेदार घुमट तयार करणारे व समकंदचे झोकबाज इस्लामी चांद बनविणारे असे विविध कारागीर आणविलेले होते. ताजमहालचें मानचित्र



ताजमहाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तयार करण्यापूर्वी हिंदी व युरोपियन कारागिरांकडून नमुने मागविले होते. पण अखेरचा नमुना उस्ताद इसा यानें तयार केला व त्याप्रमाणें सर्व काम झालें. तत्कालीन जगप्रसिद्ध कुशल इंजिनियरांची कल्पकता व मध्य आशियांतील इस्लामी कारागिरांची कुशलता ही भारतीय कारागिरांनीं कशी नाजुक व सफाईदार रीतीनें सत्यसृष्टींत आणली हें ताजमहालमध्यें पहावयास सांपडतें. ताजमहालचें सौंदर्य कशांत आहे हें कदाचित् सांगतां येणार नाहीं. बारकाईनें पाहिलें तर एकादा चोखंदळ ताजमहालमध्यें दोषही दाखवून देईल; परंतु जो शब्दानें वर्णन करतां येत नसेल किंवा बोटानें दाखवितां येणार नसेल, परंतु मनाला मात्र होत असतो असा रमणीय आल्हाद ताजमहाल पाहणाराच्या मनांत उत्पन्न होतो यांत संशय नाहीं. रात्रींच्या वेळीं चांदण्यांत तर त्याची शोभा अवर्णनीय दिसते. शहाजहानचें मुम्ताजवर फार प्रेम होतें आणि ताजमहाल हें तिच्या प्रेमाचें संगमरवरी प्रतीक आहे, ही गोड कल्पना ताजमहालच्या सौंदर्यांत अधिकच भर टाकते. सौंदर्याची अनित्यता लक्षांत येऊन नियतीस रडूं आलें, तेव्हां तिच्या गालावर ओघळलेला अश्रूचा थेंब म्हणजेच ताजमहालची इमारत होय, असें कवींनीं याचें वर्णन केलें आहे.

७. '**पृथ्वीवरील नन्दनवन**' :—ताजमहालखेरीज मयूरासन, मोती मशीद, दिवाण–इ–आम व दिवाण–इ–खास अशा अनेक इमारती त्यानें बांधल्या व त्यास वीस कोटींहून अधिक रुपये म्हणजे राज्याच्या एका वर्षाच्या वसुलाहून थोडा अधिकच इतका खर्च लागला. दिल्ली येथील दिवाण–इ–आम (सर्वांनीं भेटावयाची जागा) व दिवाण–इ–खास (निवडक लोकांच्या संमेलनासाठीं) हे दोन दिवाणखाने इतके सुंदर आहेत कीं, दिवाण–इ–खासच्या भिंतीवर 'अगर फिर्दौस रुइ झमीन अस्त, हमीन अस्त उ हमीन अस्त उ हमीन अस्त' (पृथ्वीवर सौख्याचें नंदनवन कोठें असेल तर तें येथेंच आहे, इतरत्र नाहीं) या कोरलेल्या काव्यपंक्ति सार्थ वाटतात यांत शंका नाहीं.

८. **शहाजहानची योग्यता** :—इतक्या इमारती बांधून, इतके खर्चाचे समारंभ करून व सरहद्दीवरील लढायांत पाण्यासारखा पैसा ओतूनही त्यानें शेवटीं सुमारें वीस कोट रुपये शिल्लक ठेविले होते. मोगलाईंत वारसावरील कराचें उत्पन्न फार मोठें असे. सर्व राज्यांतील अपीलांचा विचार करण्यास बादशाहास आठवड्यांतून फक्त एकच दिवस पुरे. ह्यावरून लोकांत भांडणतंटे कमी असावेत असें अनुमान निघतें. शहाजहान हा राजपूत आईचा मुलगा; परंतु अकबर-जहांगिराची धार्मिक बाबतींतील सहिष्णुता त्याच्या अंगीं नव्हती. उलट त्याच्या अंगीं औरंगजेबाचा कडवेपणाही नव्हता. अकबराच्या धार्मिक सहिष्णुतेपासून औरंगजेबाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडवेपणापर्यंत हें धार्मिक धोरणाचें संक्रमण मध्यंतरींच्या कारकीर्दीत एकसारखें चालू होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रसंगीं तो क्रूरपणानें वागत असला तरी त्याचा एकंदर कल सौम्यपणाकडेच अधिक होता. सारांश, शहाजहान हा वैभवशाली, विलासी, सौम्य परंतु समयज्ञ असा बादशाह होऊन गेला.

९. **शहाजहानची कैद** :—त्याच्या कारकीर्दीचा शेवट अतिशय दुःखमय झाला. इ. स. १६५८ त तो आजारी पडला असतां औरंगजेब हा त्याचा मुलगा आपली दक्षिणची सुभेदारी सोडून मोठ्या वेगानें उत्तरेस आला. शहाजहानचा थोरला मुलगा दारा हा त्यास तोंड देण्यास आला. भावाभावांत युद्ध झालें. दाराचा पराजय झाला. औरंगजेबानें आग्र्यास येऊन आपल्या बापास दग्यानें कैद केलें. यापुढील दीडदोन वर्षांत औरंगजेबानें आपले इतर भाऊ—दारा, मुराद, सुजा यांची व त्यांच्या मुलांचीही या ना त्या प्रकारें वाट लावून, आपण दिल्ली येथें गादीवर बसला. भारताच्या इतिहासांत भावाभावांत गादीच्या हक्कासाठीं झालेलें एवढें हिडीस युद्ध क्वचितच सांपडेल. वृद्ध, आजारी व परतंत्र शहाजहान पुढें आठ वर्षें जिवंत होता. यमुनेच्या कांठीं आग्र्याच्या किल्ल्यावर कैदेंत, समोर ताजमहालची इमारत पहात, जुन्या आठवणी काढीत, अश्रु गाळीत दिवस कंठण्याचें दुर्दैव त्याच्या नशिबीं आलें ! औरंगजेबास त्याची कधीं खंत वाटली नाहीं. अखेर शहाजहान इ. स. १६६६ सालीं मृत्यु पावला.

१०. **औरंगजेब** (इ. स. १६५८ ते इ. स. १७०७) :—तीन भाऊ व बाप यांची वाट लावून औरंगजेब 'आलमगीर' हें नांव धारण करून आपल्या वयाच्या ४० व्या वर्षीं गादीवर बसला. त्याची कारकीर्द अकबराच्या कारकीर्दीएवढी मोठी झाली. परंतु अकबरानें जेवढ्या काळांत मोगल साम्राज्यास भव्य स्वरूप आणलें, तेवढ्याच काळांत औरंगजेबानें मोगल साम्राज्याच्या विनाशाची पूर्वतयारी करून ठेविली. त्यानें आपली सबंध अर्ध शतकाची कारकीर्द इस्लामी धर्माचा हिंदुस्थानांत प्रसार व्हावा याकरितां अविश्रांत खटपट करण्यांत घालविली व या एका उद्देशाकरितां त्यानें इतका अट्टाहास धरला कीं, त्यामुळें सर्व राज्य खिळखिळें झालें तरी त्यानें त्याची पर्वा केली नाहीं. हिंदुस्थानांतील मोगलांचें साम्राज्य नष्ट होण्यास अनेक लहानमोठीं कारणें झालीं असतील, पण औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाची राजकारणावर झालेली जबरदस्ती हें त्यांतील एक महत्त्वाचें कारण होय.

११. **कारकीर्दीचे विभाग** :—त्याच्या कारकीर्दीचे दोन भाग पडतात. पहिला इ. स. १६५८ ते १६८१ पर्यंत व दुसरा १६८१ ते १७०७. पहिल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भागांत तो नेहमीं उत्तर हिंदुस्थानांत राहात असे. या काळांत त्यानें कित्येक किरकोळ बंडें मोडलीं; वायव्य सरहद्दीचा बंदोबस्त केला; आसाम, आराकान यांसारख्या दूरच्या प्रांतांवर स्वाऱ्या पाठविल्या व राजपुतांशीं युद्ध केलें. इ. स. १६८१ सालीं राजपुतांच्या युद्धांतून दक्षिणेंतील युद्ध उपस्थित झालें, तेव्हां तो दक्षिणेकडे निघाला तो पुनः उत्तरेस गेला नाहीं. ह्या सव्वीस वर्षांच्या मुदतींत उत्तरेकडील सरदारांवरील त्याचा दाब नाहींसा झाला; राजधानीचें वैभव नाहींसें झालें व उत्तर हिंदुस्थानांतील कोटयवधि रुपयांचा वसूल दक्षिणेंतील स्वाऱ्यांकरितां खर्च होऊन उत्तर हिंदुस्थान हीन दशेप्रत पोहोंचलें.

१२. जिझिया :—हिंदूंना चीड आणणारें व अकबराच्या दूरदर्शी धोरणावर सर्वस्वीं बोळा फिरविणारें त्याचें कृत्य म्हणजे जिझिया कराची अंमलबजावणी होय. इ. स. १६७९ त त्यानें मुसलमानांखेरीज इतर सर्वांवर हा कर लादला. अकबरानें इ. स. १५७९ त पूर्ण विचाराअंतीं हा कर काढून टाकला होता; व त्याच्या नंतर आलेल्या जहांगीर व शहाजहान यांनाही त्याची जरुरी भासली नव्हती. औरंगजेबानें सरकारचें उत्पन्न वाढवावें ह्या हेतूनें जिझिया कर लादलेला नव्हता. मुसलमानांखेरीज इतर सर्व हे काफर आहेत व त्यांना इस्लामी धर्माची दीक्षा देणें हें आवश्यक होय; परंतु त्यावांचून जर त्यांना जगणें असेल तर दंड म्हणून प्रत्येक मुसलमानेतरानें हा कर दिला पाहिजे असें या कराचें स्वरूप होतें. गुलाम, स्त्रिया, चौदा वर्षांखालील मुलें व सरकारी नोकर यांस हा कर माफ असे. इतर सर्व गरीब श्रीमंतांना तो दर डोईस सारख्याच दरानें द्यावा लागत असे. एकंदरींत हा कर अपमानास्पद व जाचक होता. ह्याविरुद्ध तक्रार करण्यासाठीं एके दिवशीं राजवाडयाभोंवतीं मोठा घोळका जमला. परंतु औरंगजेबानें उन्मत्तपणानें त्यांच्यामधून आपला हत्ती घालून लोकांस चिरडलें व गर्दी मोडून टाकली. अनेकांनीं औरंगजेबास या विरुद्ध सांगून पाहिलें, परंतु त्यानें हा कर गोळा करण्याच्या बाबतींत आपला हट्ट सोडला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यानें हिंदूंस इतर बाबतींतही हीन लेखण्याचें धोरण अंमलांत आणलें. औरंगजेबाच्या या वर्तनामुळें हिंदूंना दरबारांत, व्यापारांत, समाजांत, जावें तेथें दुय्यम दर्जा प्राप्त झाला. ह्यामुळें हिंदूंचीं मनें कायमचीं असंतुष्ट झालीं.

१३. राजपुतांशीं युद्ध (इ. स. १६७८) :—राजपुतान्यांतील प्रमुख संस्थानिक मोगलांचें वर्चस्व कबूल करून आपला कारभार पाहात होते. जसवंतसिंग, जयसिंग ह्यांच्यासारखे कित्येक जण मोगलांची चाकरी करीत होते. असें असतां औरंगजेबानें त्यांचें राजपुतान्यांतून उच्चाटन करण्याचा महंमद कासीमच्या वेळेपासून आजतागायत कोणासही साध्य न झालेला बेत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रचला. जोधपूरचा राजा जसवंतसिंग हा राजपुतांत प्रमुख असे. त्यानें एक-वार औरंगजेबास फसविलें होतें. त्याचा सूड घेण्याकरितां औरंगजेबानें त्याला वायव्य सरहद्दीवर स्वारीकरितां पाठवून दिलें व त्याच्या मुलास दरबारांत बोलावून विषारी पोषाख देऊन ठार मारिलें. लौकरच जसवंत-सिंग हा इ. स. १६७८ त वारला. किंवा टॉड म्हणतो त्याप्रमाणें औरंगजेबानें त्यास गुप्तपणें विष घालून ठार मारिलें. जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर त्याची गरोदर स्त्री प्रसूत होऊन तीस अजितसिंह नांवाचा मुलगा झाला. औरंग-जबानें त्यास शिक्षण देण्याकरितां व पुढें इस्लामी धर्माची दीक्षा देण्याकरितां आपल्या दरबारीं ठेवून घेतलें. तेव्हां राजपूत चवताळून उठले. अजितसिंहास त्याच्या दुर्गादास नांवाच्या विश्वासू सरदारानें पाहातां पाहातां पळवून नेलें.

१४. **अकबराचें बंड** :—औरंगजेबाचा मुलगा अकबर ह्यास पहिल्या अकबराप्रमाणें मोठा होण्याची महत्त्वाकांक्षा होती व म्हणून पहिल्यापासून त्याचा कल थोडाबहुत राजपुतांकडेच असे. त्यानें दुर्गादासाबरोबर खलबत करून ता. १ जानेवारी १६८१ रोजीं औरंगजेबाविरुद्ध बंडाचें निशाण उभारलें. तो उघडपणे राजपुतांस मिळाला व अजमीराकडे औरंगजेबावर चाल करून जाण्यास निघाला; परंतु औरंगजेबापुढें त्याचें कांहींच चाललें नाहीं. आपल्या हातून अकबराचें रक्षण होत नाहीं असें पाहून दुर्गादासानें त्याला चोरवाटांनीं दक्षिणेंत नेऊन संभाजीच्या आश्रयास ठेवलें. त्यामुळें राजपुतान्यांतील युद्ध अर्धवट सोडून, किंवा कसेंबसें मंपवून, औरंगजेबास अकबराच्या बंदोबस्तासाठीं दक्षिणेंत जावें लागलें (इ. स. १६८१).

१५. **दक्षिणची जंगी स्वारी** :—या वेळीं मराठ्यांची सत्ता उत्तरेस सुरतपासून दक्षिणेस गोव्यापर्यंतचा तळ-कोंकणाचा प्रांत व किल्ले त्र्यंबक-पासून किल्ले पन्हाळगडपर्यंतचा देशावरील मुलुख व्यापून राहिली होती; व आदिलशाही व कुतुबशाही या दोन शाहयांशीं जरी प्रथम त्यांचें वैर होतें, तरी अखेरीस त्या सर्वांत जूट उत्पन्न झाली होती. अशा वेळीं औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी केली. ही दक्षिणची स्वारी मोठ्या थाटाची होती. मोगलांची छावणी म्हणजे एक हलतें शहर असे. पुढील मुक्कामीं पूर्ण तयारी झाली म्हणजे मागील मुक्कामावरून स्वारी पुढें जाई. स्वारी-बरोबर व्यापारी, बाजारबुणगे मिळून पांच लक्ष लोक होते. कुदळी, फावडीं घेतलेले हजारों लोक सर्वांपुढें रस्ता साफ करीत जात होते. त्यांच्या पाठीमागें बादशहाचा प्रचंड तोफखाना व घोडेस्वार चालत; मध्यें अनेक उंट, हत्ती व घोडे असून त्यांजवर बादशहाचें जडजवाहीर, खजिना, सरकारी कामाचीं दप्तरें, खाण्याचे व इतर जिन्नस, कपडेलत्ते, पिण्याकरितां गंगाजळ व आणखी अनेक प्रकारचें सामान भरलेलें असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्यामागें खुद्द बादशहाची स्वारी व जनानखाना येई. सर्वांच्या मागून लढाऊ पायदळ येत असे. ह्या अवजड व्यापामुळें कूच करण्याच्या वेळीं अतिशय अव्यवस्था माजे व एकाएकीं लढाईचा प्रसंग आल्यास पुढें होण्यास कोणीच तयार नसे. विशेषत: डोंगराळ व अपरिचित अशा प्रदेशांत लढण्यास तें सैन्य अगदीं निरुपयोगी होतें. ही स्वारी इ. स. १६८१–१७०० पर्यंत २६ वर्षें चालूच होती व मोगल फौजेंतील एक पिढी लष्कराच्या छावणींत लहानाची मोठी झाली. घरेंदारें सोडून आलेले लोक कंटाळून गेले; परंतु बादशहाच्या धाकामुळें ते आपलीं कामें निमुटपणें करीत.

१६. मराठ्यांची तयारी :—याच्या उलट प्रकार ज्यांच्याविरुद्ध मोगलांना लढावयाचें असे त्या मराठ्यांचा असे. त्यांना थाट बिलकूल माहीत नव्हता. मराठे शिपाई लहान बांध्याचे, चपळ, भूक व तहान सोसण्यास कंटक, आणि शत्रूवर चालून जाण्यास केव्हांही तयार असत. मराठे स्वारांचा सगळा संसार त्यांच्या लहान घोड्यावर मावत असे. सरदाराशिवाय इतरांना तंबू नसत. स्वारींत असतां प्रत्येक शिपाई जमिनीला भाला टोंचून व घोड्याचा लगाम हातांत धरून उघड्यावर निजे. यास्तव शत्रूची चाहूल लागतांच तो चटकन् पळून जात असे. ऐन संधि आल्याखेरीज ते शत्रूवर हल्ला करीत नसत व शत्रूचें बळ आपल्या आवाक्याबाहेर आहे असें पाहिल्याबरोबर ते दाही दिशांना फुटून जात. अशा शत्रूबरोबर लढाई करणें म्हणजे वाऱ्याबरोबर युद्ध करण्यासारखें होतें. पहिलीं तीन वर्षें युद्ध करून म्हणण्यासारखी कांहींच प्रगति झालीं नाहीं, हें पाहून औरंगजेब तर इतका चिडून गेला कीं, त्यानें रागारागानें डोक्यावरची टोपी जमिनीवर आपटली व मराठ्यांचा बंदोबस्त केल्याशिवाय ती घालणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली ! शिवाजीनें नुकतेंच स्थापन केलेलें स्वातंत्र्य त्याच्यामागें जगविण्याची पराकाष्ठा केली पाहिजे ह्या भावनेनें प्रत्येक मराठा सरदार वागत होता व त्यामुळें मराठे शिपायांस स्फुरण चढलें होतें.

१७. मुसलमानी शाह्यांचा शेवट :—पहिलीं चार वर्षें त्यानें मराठ्यांशीं झुंज केल्यावर इ. स. १६८६–८७ सालीं त्यानें विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही यांच्यावर निकराचे हल्ले चढविले व अखेर या दोन्ही शाह्यांचा अंत केला. तिकडील काम आटोपल्यावर औरंगजेबानें संभाजीकडे लक्ष पुरविलें. इ. स. १६८९ त त्याचा सरदार मुकर्रबखान ह्यानें संभाजीस संगमेश्वरीं अचानकपणें पकडलें व औरंगजेबापुढें आणलें. औरंगजेबानें त्याचा क्रूरपणें वध केला. पुढें त्यानें मराठ्यांची राजधानी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रायगड ही वेढा घालून सर केली व संभाजीची बायको येसूबाई व पुत्र शिवाजी ह्यांस कैद केलें (इ. स. १६९०).

१८. **बादशहाचा पराभव** :—परंतु ही विजयपरंपरा क्षणिक होती. संभाजीच्या क्रूर वधामुळें मराठ्यांचीं मनें बिथरलीं व ते त्याचे दोष विसरून गेले. त्यांनीं संभाजीच्या वधाचा सूड घेण्याचा निश्चय केला. विजापूर व गोवळकोंड्याचीं राज्यें बुडविल्यामुळें उत्तरेस जुन्नरपासून दक्षिणेस जिंजीपर्यंत भटकण्यास मराठ्यांस मुलूख मोकळा सांपडला व बादशाह भीमेच्या कांठीं आला कीं, त्यांनीं कर्नाटकांत धुमाकूळ घालावा व तो विजापुराकडे गेला कीं त्यांनीं मोगलांचे नगर, सोलापूर प्रांत उजाड पाडावे, असा क्रम चालविला. बादशाहाची छावणी औरंगाबाद, ब्रह्मपुरी, गलगलें इत्यादि मुक्कामीं एकसारखी हालूं लागली. बादशाहानें एकामागें एक मराठ्यांचे किल्ले काबीज करीत यावें, व मराठ्यांनीं ते एकसारखे परत घ्यावे हा क्रम चालला. शेवटीं औरंगजेब अगदीं टेकीस आला. तो इ. स. १७०७ मध्यें मृत्यु पावला.

१९. **औरंगजेबाची योग्यता** :—औरंगजेब हा मोगल साम्राज्यांतील शेवटला पराक्रमी बादशाह होय. त्याचा कोणावर विश्वास नसल्यामुळें तो राज्याचीं सर्व सूत्रें आपल्या ताब्यांत ठेवी. अशा एकतंत्री अधिकाराखालीं कर्तबगार मनुष्यें काम करण्यास सहसा येत नाहींत. खुशामत्ये व दुय्यम दर्जाचे लोक येतात. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल राज्य मोडकळीस आलें याचें कारण कर्तबगार पुरुषांचा अभाव हेंही एक आहे व ह्या अभावास औरंगजेबाचा एकतंत्री कारभारच कारणीभूत झाला. त्याच्या कारकीर्दींत झालेलें धर्माचें राजकारणावरील वर्चस्व तर सर्व अनर्थाचें मूळ होय. काफर लोकांना मारण्याकरितां जिहाद पुकारणें व त्यांना लुटणें ह्या गोष्टी इस्लामी धर्माच्या विरुद्ध नाहींत असें तो मानी. वास्तविक या वेळीं मुसलमानांना भारतांत येऊन चारशेंहून अधिक वर्षांचा काल लोटला होता. अशा वेळीं उभय समाजांची परस्परांस अधिकाधिक ओळख पटत चालली होती. काळाचा ओघ अशा रीतीनें दोन समाजांत स्थिर स्वरूपाचे संबंध निर्माण करण्याकडे वहात चालला असतां, तें न ओळखून त्यानें इस्लामचें राजकीय वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला. अकबरास काळाचीं पावलें ओळखतां आलीं व जनतेच्या अमूर्त गरजेस त्यानें मूर्त स्वरूप दिलें किंवा देण्याचा यत्न केला. औरंगजेबानें काळाचा ओघ ओळखला नाहीं, किंवा ओळखूनही कांहीं एक नवीन समाजरचना भारतांत निर्माण करण्याचा त्यानें यत्न केला त्यांत त्यास यश आलें नाहीं यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

शहाजहानाच्या कारकीर्दीस 'मोगल बादशाहीचा सुवर्णकाळ' असे कां म्हणतात? २. टीपा लिहा :—(१) शहाजहाननें बांधलेल्या इमारती, (२) राजपुत्र दारा, (३) ताजमहाल, (४) औरंगजेब व राजपूत यांचे संबंध. ३. चर्चा करा :— 'अंगांत नांवाजण्याजोगे उत्तम गुण असूनही औरंगजेब मोगल साम्राज्य खिळखिळें करण्यास कारणीभूत झाला.'

अभ्यास

(१) म्हातारपणीं कैदेंत असतां शहाजहाननें आत्मचरित्र लिहिलें असतें तर त्यांत कोणत्या प्रसंगांचा उल्लेख केला असता? अशा ३–४ प्रसंगांचें भावनापूर्ण भाषेंत (शहाजहान लिहितो असें समजून), वर्णन करा. (२) शेरशाह, अकबर, समुद्रगुप्त, अशोक, शिवाजी, औरंगजेब यांच्या धार्मिक धोरणांची तुलना करा.

माहितीसाठीं

राजपुत्र अकबरचा इषारा

अकबर आपल्या पित्यास (औरंगजेबास) लिहितो, "आपल्या राज्यकारभारांत प्रधानांना अधिकार नाहीं, सरदारांवर विश्वास नाहीं, सैनिकांच्या नशिबीं दारिद्र्य, लेखक रिकामटेकडे, व्यापारी साधनहीन आणि शेतकरी पायीं तुडविला जात आहे. . . . . . बऱ्हाणपूर हें शहर सृष्टिसुंदरीच्या गालावरील तिळाप्रमाणें शोभिवंत दिसे. तें आतां उध्वस्त झालेलें आहे. . . . हिंदू जातीवर दोन संकटें कोसळलीं आहेत—शहरांतून जिझिया कराची आकारणी हें एक, आणि खेड्यांतून शत्रूचा जुलूम हें दुसरें संकट. तुम्हांला राजनैतिक साहय देण्याचें काम आतां विणकरी, शिंपी, साबणविके इ. हलक्या दर्जाच्या लोकांच्या हातीं आलेलें आहे."

—प्रा. शर्माकृत क्रेसंट इन इंडिया,
पृ. ५९६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २३ वा

मोगल अंमलाखालील भारत

१. **मोगलांची कामगिरी** :—मोगलांचा अंमल त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या मुसलमानी अंमलापेक्षां जास्त सुधारलेला होता. अकबर व जहांगीर यांनीं धार्मिक बाबतींत सहिष्णुतेचें धोरण ठेवून राज्याचा पाया पक्का केला. व्यक्तीचा धर्म कोणताही असो, राज्यकारभारांत तो बाजूस ठेवून राज्याच्या हिताकडे लक्ष पुरवावयाचें ही धर्मनिरपेक्ष अशी राष्ट्रीय दृष्टि उत्पन्न करण्याचें श्रेय मोगलांस दिलें पाहिजे. राज्य जिंकल्यावर तें टिकवून धरण्यास अवश्य अशी राज्यव्यवस्थाही त्यांनीं निर्माण केलेली होती. तिचें संक्षिप्त वर्णन अकबराच्या विभागांत दिलेलें आहे. याखेरीज जमिनीच्या पाहणीसारखीं चिरकालीन महत्त्वाचीं कामेंही त्यांनीं केलेलीं आहेत. मोगल राजसत्ता ही अनियंत्रित राजसत्ता होती. वसूल गोळा करणें, न्याय देणें व सर्व प्रकारच्या शत्रूंपासून प्रजेचें रक्षण करणें ह्यांखेरीज राजाचीं आणखी कांहीं कामें आहेत अशी त्या काळीं हिंदुस्थानांत व युरोपांतही कल्पना नव्हती. तेव्हां मोगलांनीं प्रजेच्या शिक्षणासाठीं किंवा अन्य तऱ्हेच्या हितासाठीं कांहीं यत्न केले नाहींत म्हणून त्यांस दोष देणें योग्य होणार नाहीं. मोगल राज्यकर्त्यांनीं कलाकौशल्यास विशेष उत्तेजन दिलें. परंतु तसें करण्याचें सहेतुक धोरण त्यांनीं स्वीकारलें असें म्हणण्यापेक्षां त्यांच्या सुसंस्कृत आवडीमुळें कलाकौशल्यास उत्तेजन मिळालें असेंच म्हणणें जास्त सयुक्तिक होईल.

२. **लोकस्थिति** :—अबुल फजलनें लिहिलेल्या ऐने अकबरीवरून तत्कालीन लोकांची स्थिति कशी होती हें दिसून येईल. "बंगालमध्यें चोवीस जिल्हे असून त्यांचा दीड कोट रुपये वसूल येत असे. तेथील जमीनदार कायस्थ असत. ते आपल्या हद्दींत शांततेचें रक्षण करीत व सरकारच्या उपयोगाकरितां थोडें सैन्यही बाळगीत. घोरघाट जिल्ह्यांत उत्तम रेशीम तयार होत असे. सोनारगांव मलमलीकरितां प्रसिद्ध होतें. चितगांव हें मोठें बंदर होतें. खाण्याचा मुख्य जिन्नस तांदूळ असे व सालोसाल पीक उत्तम येई. लोकवस्ती दाट होती. व्यापार व उद्योग भरभराटींत होते. गुजराथेंत उत्तम चितारी, शिल्पकाम करणारे, कलाबतूचीं व जरीचीं कामें करणारे कारागीर असत. खंबायतच्या बंदरांतून मोठा व्यापार चालत असे व दूरदूरच्या देशांतले व्यापारी तेथें जमा होत."* परदेशांतून हिंदुस्थानांत येणारे व्यापारी

---

*सर रमेशचंद्र दत्त यांच्या सिव्हिलिझेशन ऑफ इंडिया, पान ११८वरून.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रारंभीं भारतांत आपले जिन्नस विकण्याकरितां येत नसून येथील कापड, साखर व मसाल्याचे जिन्नस तिकडे नेण्याकरितां मुख्यत: येत असत. लेकी नांवाच्या इंग्लंडच्या इतिहासकारानें लिहून ठेविलें आहे कीं, सतराव्या शतकाच्या अखेरीस भारतांतील स्वस्त व तलम कापड इंग्लंडमध्यें इतक्या मोठ्या प्रमाणावर खपूं लागलें कीं, त्यामुळें इंग्लंडमधील लोंकरीचा धंदा बसला. तेव्हां इ. स. १७०० त व १७२१ त कापडाच्या आयातीवर निर्बंधक असे कायदे इंग्लिश पार्लमेंटला पास करावे लागले. तरीदेखील अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत भारतांतून इंग्लंडकडे होणारी कापडाची निर्यात थांबली नाहीं.

३. **प्रांताचा कारभार** :—प्रांताचा कारभार करण्यास मुख्यत: तीन कारभारी असत. सुभेदार हा मुख्य व त्याच्या मदतीस वसुलाचें काम पाहण्यास दिवाण व लष्करी अधिकारी फौजदार हे असत. ह्यांखेरीज न्याय देणारा काझी व पोलिसखात्याचा मुख्य कोतवाल हेही मदतीस असत. हे अधिकारी राजधानीपासून दूर असल्यानें प्रसंगोपात्त त्यांना प्रजेवर जुलूम करण्याची संधि मिळे हें खरें; परंतु त्या काळीं युरोपांतदेखील शेतकऱ्यांची व सामान्य प्रजेची स्थिति ह्याहून अधिक स्पृहणीय नव्हती. उलट भारतांतील ग्रामव्यवस्थेमुळें बहुजनसमाजाचा अधिकाऱ्यांशीं क्वचित् संबंध येई व त्यांच्या जुलुमाची झळ त्यांना तितकी लागत नसे.

४. **भिन्न संस्कृति** :—इ. स. ७११ सालीं महंमद कासीम भारतांत आल्यापासून इ.स.१८०३मध्यें नामधारी मोगल बादशाहीचा शेवट होईपर्यंतच्या उण्यापुऱ्या अकराशें वर्षांत भारतांत मुसलमानांची संख्या वाढत गेली. कांहीं मुसलमान बाहेरून आले, कांहीं धर्मांतरानें मुसलमान झाले व व्हिन्सेन्ट स्मिथच्या म्हणण्याप्रमाणें त्यांची लोकसंख्याही झपाट्यानें वाढे. एवढा दीर्घकाल कायम वस्ती करून राहिलेले व येथील सुखदुःखांशीं समरस झालेले लोक एतद्देशीयच समजले पाहिजेत. मूळचे हिंदु व मुसलमान समाज एकमेकांशीं संस्कृतीनें अगदीं भिन्न असतां त्यांच्या सहवासाचे व आघातप्रत्याघातांचे चिरस्थायी बरेवाईट परिणाम काय काय झाले तें पाहणें तौलनिक इतिहासाच्या विद्यार्थ्यांस मोठें मनोरंजक आहे.

५. **भाषेचा पूल** :—दोन भिन्न राहणीचीं व भिन्न भाषा बोलणारीं अशीं बिऱ्हाडें एकत्र राहावयास आलीं कीं, मोठीं माणसें एकमेकांपासून दूर राहतील पण मुलें दूर राहणार नाहींत. तीं एकत्र येतील, खेळण्याचा प्रयत्न करतील व त्यासाठीं बालमनास समजेल अशी भाषाही बनवून घेतील. मोठ्या माणसांचीं शिवाशिवीवरून भांडणें होतील, पण मुलांनीं भांडून अलग राहणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वाभाविक नाहीं. मुसलमान बादशाह हिंदु राजांशीं लढण्यास आले. पुढें दोन्ही समाज या देशांत कायम वस्ती करूं लागले. त्याबरोबर उभय समाजांतील बालमनाचीं निरुपद्रवीं माणसें परस्परांबद्दलची उत्सुकता व सहकार्याची अपेक्षा दाखवूं लागलीं. या अपेक्षेचा पहिला दृश्य परिणाम म्हणजे उत्तरेंतील काश्मिरी पंडितांनीं व कायस्थ लोकांनीं पर्शियन भाषा आत्मसात् केली; व इंग्रजी अमलांत ज्याप्रमाणें कित्येक हिंदी लोक आपल्या इंग्रजीवरील प्रभुत्वानें इंग्रजांसही प्रसंगीं चकित करून टाकीत, तद्वत् या पंडितांनीं पर्शियन भाषेवर प्रभुत्व मिळविलें. सामान्य लोक एतद्देशीय हिंदी व परदेशी पर्शियन यांचें मिश्रण करून बोलूं लागले. अशा रीतीनें उर्दू भाषेचा उदय झाला. कायम वस्ती करून राहणाऱ्या दोन भिन्न समाजांच्या एकमेकांशीं होणाऱ्या सहकार्यासाठीं हा भाषेचा पूल तयार झाला व त्या पुलावरून स्त्रीपुरुष, आबालवृद्ध, गरीब-श्रीमंत, शिव्या देणारे व शिष्ट भाषा बोलणारे, पंडित—अपंडित, गिऱ्हाईक-व्यापारी, द्वैती-अद्वैती एकमेकांशीं दळणवळण करूं लागले. हिंदु धर्मांत देव एक आहे ही कल्पना जुनी खरी, पण बहुजनसमाजास तरी त्या कल्पनेची तात्त्विक चर्चेपुरतीच आठवण राही. एरव्हीं तेहतीस कोटी देवांचे उपासक आपापल्या सांप्रदायाचा महिमा गात आपापला गट वेगळा करून राहात. पण मुसलमानांच्या एकेश्वरी पंथानें अनेकत्वांतून एकत्व पाहण्याच्या वृत्तीस जोरानें चालना दिली; इतकी कीं कित्येक थोर साधु राम व रहिम, काबा व कैलास, कुराण व पुराण यांकडे अभिन्नत्वानें पाहूं लागले व सच्छील कर्मांत श्रेष्ठ दर्जाचें बीज आहे असें सांगूं लागले. देवाच्या एकत्वाप्रमाणें मानवी समतेचें तत्त्वदेखील हिंदुसमाजांत परमार्थाच्या प्रांतांत बद्धमूल होण्यास इस्लामचा सहवास बहुवंशीं कारणीभूत झाला हें कबूल केलें पाहिजे.

६. **व्यवहारांतील देवघेव** :—तत्वज्ञानांतून व्यवहारांत उतरल्यावरही मुसलमानांच्या सहवासाचा स्थायी परिणाम ठिकठिकाणीं दिसून येईल, संस्कृत अनुष्टुभ किंवा मराठी ओंवी यांच्या जोडीला उर्दू गझल येऊन बसलें. व आधुनिक मराठी कवींनीं तर त्यास मराठी पेहरावही दिला. हिंदु गायनांत मुसलमानी ख्याल-कवाली या चीजांनीं प्रवेश केला, तर याच्या उलट मुसलमानी गायनांत हिंदु ध्रुवपद शिरलें. याखेरीज फकिराचे दोहे व रामदासी मनाचे श्लोक हे दाराशीं ललकार करण्यासाठीं किंवा साद घालण्यासाठीं उपयोगी पडण्याच्या दृष्टीनें एकमेकांशीं किती तरी सदृश आहेत.

वाद्याचे बाबतींत सरस्वतीच्या वीण्यास ताऊस व दिलरुब्याची जोड लाभली. निर्दोष वीणा तयार करण्याची कला मुसलमानांनीं संपादन केली. काश्मिरी बागेंत मुसलमानी इराणी गुलाबाचे ताटवे शोभूं लागले व हिंदु धर्माभिमानी या गुलाबांनीं आपापल्या देवांची पूजा करूं लागले. नूरजहाननें शोध लाव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेल्या गुलाबी अत्तराचा सुवास भारतांत घरोघर दरवळूं लागला. स्त्रिया डोळ्यांत काजळावरोबर सुरमा घालूं लागल्या व साडीच्या आंत विजार घालण्याची चाल कांहीं उच्च जातींत रूढ झाली. उभय समाजांतील ह्या सर्व तात्त्विक व व्यावहारिक देवघेवीस अनुकूल अशी राजकीय संघटना निर्माण करण्याचा अकबराचा यत्न होता; तो साध्य झाला नाहीं. असो.

मुसलमानी राज्यपद्धति, जमीनमहसुलाची पद्धत वगैरेसंबंधींचें विवेचन ठिकठिकाणीं आलेंच आहे. शिवाजीची राज्यकल्पना अस्सल हिंदु पद्धतीची असली तरी उत्तरोत्तर मराठी राज्यास स्वस्थता न मिळाल्यानें शिवाजीच्या राज्यपद्धतीचीं तत्त्वें दृढमूल होण्याऐवजीं मराठी राज्यांतही मोगल सुभेदारी, दिवाणी, फौजदारी किंवा कोतवाली किंवा जमीनदारी यांची नक्कल सुपरिचित म्हणून सहजीं रूढ झाली. मुसलमानी इमारती हे मुसलमानी कलाविलासाचे उत्कृष्ट नमुने आहेत. त्यांच्या मशिदीवरील गोलघुमट ही अरबस्थानच्या विस्तीर्ण वाळवंटांत चहूं बाजूंस आकाश क्षितिजास टेंकलें असतांना दिसणाऱ्या विस्तीर्ण गोलघुमटाची अल्पकृतीच होय. अशा प्रकारचा घुमट असलेल्या कितीतरी कलाकौशल्यपूर्ण इमारती हिंदुमुसलमान शिल्पशास्त्रज्ञांनीं भारतांत उभारलेल्या आहेत.

७. **संत व कवि** :—तेराव्या शतकापासून देशी भाषांतून प्रचार करणाऱ्या संतांची सुरू झालेली परंपरा मोगल अंमलांतही अबाधित राहिली. उत्तर भारतांतील या काळांतील प्रसिद्ध संत कवि तुळसीदास होय. त्याची माहिती मागें आलीच आहे. हिंदुधर्मीयांत शिव, विष्णु यांच्या उपासकांचे शैव व वैष्णव असे दोन पंथ आपलें कार्य करीत होते. उत्तर भारतांत श्रीकृष्णाची पूजा फार लोकप्रिय झाली. महाराष्ट्रांत विठोबाचें दैवत परमपूज्य मानलें जाऊं लागलें. महाराष्ट्रांत सोळाव्या शतकांत एकनाथ व श्रीधर आणि सतराव्या शतकांत तुकाराम व रामदास यांचा उदय झाला. ह्या संतांच्या कामगिरीचा मराठ्यांच्या उदयाशीं निकट संबंध आहे. बंगालमध्यें चैतन्यानें स्थापन केलेली वैष्णव परंपरा अखंड चालू राहिली. ह्याखेरीज अकबरानें ख्रिश्चन धर्माची माहिती होण्याकरितां गोव्याहून ख्रिस्ती धर्मोपदेशक बोलाविले होते.

८. **शीखांचा उदय** :—याच काळांत पंजाबांत शीख पंथाचा उदय झाला. शीखांचा धर्मसंस्थापक गुरु नानक याची माहिती पूर्वी येऊन गेलेली आहे. नानकाच्या मागून शीखांचे एकामागून एक दहा धर्मगुरु झाले. प्रथम प्रथम स्वमतप्रसाराखेरीज त्यांचा दुसरा हेतु नव्हता. अकबरानें इ. स. १५७७ त त्यांच्या चौथ्या गुरूला अमृतसरजवळची जागा बक्षीस दिली व शीखांचें तेंच पवित्र स्थान झालें. पांचवा गुरु अर्जुन याच्या सांगण्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शीखांचें धर्मपुस्तक 'आदिग्रंथ' हा रचण्यांत आला. अकबरानंतर शीखांच्या छळास सुरुवात झाली. अर्जुनानें जहांगिराविरुद्ध खुश्रूस मदत केली, म्हणून जहांगिरानें त्यास ठार मारिलें. परंतु जहांगिरानें शीखांचा धार्मिक बाबतींत छळ केला नाहीं. येथून पुढें शीख लोक कमरेस तरवार बांधून राहूं लागले. कारण स्वधर्मसंरक्षणार्थ त्यांस कित्येक वेळां मुसलमान राज्यकर्त्यांशीं लढणें भाग पडे. आठवा गुरु तेजबहादूर ह्यास त्याचे अनुयायी 'सच्चा पादशाह' असें म्हणत, यावरून औरंगजेबानें त्याचा अनन्वित छळ केला; तरीही तेजबहादूर धर्मत्याग करण्यास तयार झाला नाहीं. हें पाहून शेवटीं त्यानें त्याचा वध करविला (इ. स. १६७५).

९. **गुरु गोविंद** :—त्याचे मागून गुरु गोविंद (१६७५–१७०८) हा शीखांचा नववा गुरु झाला. यानें शीख लोकांत विलक्षण चैतन्य उत्पन्न केलें. शीख लोक इतरांपासून ओळखिले जावेत म्हणून त्यानें नियम केला कीं, प्रत्येक शीखानें क-कारयुक्त पांच वस्तू वापराव्यात. त्या केंस, कंगवा, कडें, कछ (लांडी विजार) व किरपाण (लहान तलवार) ह्या होत. नवीन अनुयायानें शीख धर्माचा स्वीकार करतांना त्यास पुढील विधि करावा लागे ; पहिल्यानें खडीसाखर पाण्यांत टाकावयाची, नंतर तें पाणी तरवारीनें ढवळावयाचें, शीख धर्मांतील कांहीं मंत्र म्हणावयाचे व शेवटीं त्या अनुयायानें त्यांतील कांहीं पाणी प्यावयाचें व कांहीं डोक्यावर शिंपडून घ्यावयाचें व 'वा गुरुजी का खालसा' म्हणजे 'गुरुजीच्या पवित्र ग्रंथाचा जयजयकार असो' अशी आरोळी मारावयाची; या विधीस 'पाहूल' म्हणतात. 'आपण वीराचे बच्चे आहोंत' ही भावना शीखांत जागृत ठेवण्यासाठीं प्रत्येकानें आपल्या नांवापुढें 'सिंह' किंवा 'सिंग' असें पद जोडावें असें त्यानें सांगितलें. या त्याच्या उपदेशामुळें शीखांत जूट उत्पन्न झाली व त्यांच्यांत क्षात्रतेजाचें वारें खेळूं लागलें. गोविंदसिंगाच्या व बादशहाच्या सैन्यांच्या वारंवार झटापटी होत. त्यामुळें गोविंदसिंगास रानोमाळ भटकावें लागे. औरंगजेबानें त्याच्या दोन मुलांस पकडून सरहिंद येथें जिवंत पुरलें; परंतु ह्या धर्मच्छळामुळें शीखांचा नाश झाला नाहीं. औरंगजेबास ज्याप्रमाणें दक्षिणेंत मराठ्यांपुढें हात टेकावे लागले, त्याप्रमाणेंच त्याची दशा शीखांपुढेंही झाली. गोविंदसिंग हा दक्षिणेंत आला असतां नांदेड येथें अफगाणाकडून मारला गेला. दरसाल तेथें त्याच्या स्मरणार्थ यात्रा भरते.

१०. **शीखांच्या सत्तेची वाढ** :—गोविंदसिंगानंतर दुसऱ्या कोणा धर्मगुरूची योजना न होतां आदिग्रंथासच गुरुत्व प्राप्त झालें व बंदा नांवाचा इसम त्यांचा नायक झाला. यानें पंजाबांत मुसलमानांचा भयंकर सूड घेतला. सरहिंद येथील मशिदी जमीनदोस्त केल्या. मुसलमान त्याच्या भयानें धर्म

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडूं लागले. हें पाहून बहादुरशाहानें शीखांचा पाठलाग केला. मोठ्या मोगली सैन्यापुढें त्यांचें कांही चाललें नाहीं व ते दऱ्याखोऱ्यांच्या आश्रयास पळून गेले ! बंदाही त्याचे हातून निसटला. परंतु शीखांची ही पीछेहाट तात्पुरतीच होती. इ. स. १७०७ ते ६१ पर्यंतच्या काळांत दिल्लीचे बादशाह दुर्बल होत चालले होते व त्यांना पंजाबाकडे लक्ष देण्यास फारसें फावलें नाहीं. ह्या काळांत तेथें शीखांचीं ठिकठिकाणीं लहान लहान संस्थानें उत्पन्न झालीं व ते राजकीय व लष्करी दृष्ट्या प्रबळ होत चालले.



मोगलकालीन प्रवासाचें वाहन

११. **पाश्चिमात्य प्रवासी** :—मोगल अंमलांत अनेक पाश्चिमात्य प्रवासी येथें येऊन गेले त्यांपैकीं कांहींची माहिती येथें थोडक्यांत दिलेली आहे:—

(१) **मंडेलस्लो**—हा जर्मन प्रवासी इराणच्या मार्गानें इ. स. १६२९ त हिंदुस्थानांत आला. तो प्रथम भडोच येथें उतरला. तेथील विणकऱ्यांचा धंदा जोरांत चालत असलेला त्यानें पाहिला. तेथून तो अहमदाबाद, आग्रा, लाहोर व विजापूर इत्यादि ठिकाणीं गेला. त्या सर्व ठिकाणचीं विश्वसनीय वर्णनें त्यानें लिहून ठेविलीं आहेत. 'आग्रा शहरांतील रस्ते फार रुंद असून, तेथील व्यापार फार भरभराटींत होता. पूर्वेकडील सर्व देशांचा आग्रा शहराशीं संबंध येत असे. आग्रा शहरांतील आयात मालावर व निर्यात मालावर शेंकडा दहा टक्के जकात असे.' इत्यादि विधानें त्याच्या लेखांत सांपडतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) **टॅव्हर्नियर**—हा फरेंच व्यापारी इ. स. १६४१ त भारतांत आला. तो रत्नें व जवाहीर यांचा व्यापार करीत असे. त्याच्या ग्रंथांतून व्यापारासंबंधीं विशेष माहिती मिळते. 'शहाजहान आपल्या प्रजेवर मुलाप्रमाणें प्रेम करून राज्य करी' असें यानें म्हटलें आहे.

(३) **बर्नियर**—हा फरेंच प्रवासी इ. स. १६५५ त भारतांत आला. त्यानें मोगल दरबारच्या वैभवाचें व प्रवास करीत असतां पाहिलेल्या देशस्थितीचें वर्णन लिहून ठेविलें आहे. तो म्हणतो, " बंगालमधून प्रवास करीत असतां जें सृष्टिसौंदर्य माझ्या दृष्टीस पडलें तें एकसारखें पाहूनही माझे डोळे तृप्त झाले नाहींत. " सर्व प्रकारचें कापसाचें व रेशमी कापड मोठ्या प्रमाणावर तयार झालेलें पाहून त्यास आश्चर्य वाटलें. त्या काळीं डच, इंग्रज व पोर्तुगीज प्रवासी तें यूरोपखंडांत विकण्यास नेत असत, ह्याचाही त्यानें उल्लेख केला आहे.

(४) **मॅनरिक**—हा इ. स. १६४० त भारतांत आला. यानें डाका शहराची वस्ती दोन लाख होती असें लिहिलें आहे. त्यानें लाहोरपासून मुलतानपर्यंत पंजाबांतून प्रवास केला. वाटेंतील अनेक खेडीं व धर्मशाळा पाहिल्या. गहूं, भात, भाजीपाला इत्यादि पिकें पाहून त्यास आनंद झाला. मुलतानचा इराण मध्य-आशियाशीं मोठा व्यापार चालत असे असें त्यानें लिहिलें आहे. इंग्रज प्रवासी हॉकिन्स व रो ह्यांचे उल्लेख मागें आलेच आहेत. ह्या प्रवाशांच्या हकीकती पूर्वग्रहदूषित नसल्यामुळें निःपक्षपाती असूं शकतील हें खरें; परंतु त्यांना लोकस्थितीची बरोबर जाणीव नसल्यानें त्यांचा प्रथमदर्शनीं झालेला ग्रह वस्तुस्थितीस धरूनच असेल असें नाहीं. म्हणून ऐतिहासिक माहिती जमा करतांना यांच्या ग्रंथांस अवास्तव महत्त्व देऊन चालणार नाहीं.

१२. मोगलाईच्या ऱ्हासाचीं कारणें :—याचें विवेचन ठिकठिकाणीं आलेंच आहे; परंतु त्याचें समालोचन करणें जरूरीचें आहे. (१) दक्षिण देश जिंकण्याच्या भरांत उत्तरेस वारंवार उत्पन्न होणाऱ्या राजपुतांच्या बंडांचा मोगलांच्या हातून वेळींच बंदोबस्त झाला नाहीं व स्वाऱ्यांत निष्कारण बराच पैसा खर्च पडून कांहींच साध्य झालें नाहीं. कर्तबगार राजपुत्रांच्या पराक्रमास राजधानीपासून दूर असें क्षेत्र खुलें करून देण्याच्या कामीं दक्षिणचा उपयोग झाला. दक्षिण जिकावयाचें ध्येय डोळ्यांपुढें नसतें तर, शहाजहान–औरंगजेबासारख्या राजपुत्रांनीं आपल्या बापाच्या हयातींतच राजधानींत धिंगाणा घातला असता ही गोष्ट खरी आहे. परंतु उत्तर भारताचा पक्का बंदोबस्त आधीं करणें जरूरीचें होतें यांत शंका नाहीं. मराठ्यांनीं दक्षिणेचा पुरता बंदोबस्त न करतां उत्तरेंत स्वाऱ्या केल्या व मोगलांनीं उत्तरेचें कार्य अर्धवट टाकून दक्षिणेवर स्वारी केली अशी दोघांनीं एकाच स्वरूपाची चूक केली. (२) औरंगजेबाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धार्मिक धोरण हें मोगलांच्या नाशाचें मुख्य कारण होय. त्यामुळें (अ) राजपुतांचीं मनें दुखावलीं व त्यांचा अकबरानें राज्यास मिळविलेला आधार नाहींसा झाला. (आ) धर्मप्रधान अनियंत्रित सत्तेमुळें मुसलमानांस तेवढा वेळ बरें वाटलें असेल, परंतु बहुसंख्य हिंदूंना जिणें अपमानाचें झालें व त्यांच्या कर्तृत्वास वाव राहिला नाहीं. 'जिहाद' पुकारण्याच्या धोरणामुळें त्यांना आपल्या जीविताची शाश्वती वाटेनाशी झाली. (इ) मुसलमान हे स्वतःस हिंदूपेक्षां श्रेष्ठ मानूं लागले व पुढें पुढें ऐदी व विलासी बनत चालल्यानें त्यांच्यांत पहिलें पाणी व कर्तृत्वशक्ति राहिली नाहीं. (ई) कुराण-प्रामाण्यावर भिस्त ठेवून वागल्यामुळें प्रगतीस वाव राहिला नाहीं. कारण कुराण हा हिंदुस्थानाहून सर्वस्वीं भिन्न अशा परिस्थितींत रचिलेला ग्रंथ सर्वकाळ प्रमाणभूत राहणें शक्य नव्हतें. (३) सर्वच कामें आपण स्वतः पाहावयाचीं असा औरंगजेबाचा हट्ट असल्यामुळें त्याच्या हाताखालीं कर्तबगार मनुष्यास पुढें येण्यास मुळींच वाव राहिला नाहीं. त्याच्या भोंवतीं मोगल दरबारांत खुशामत्ये, दुय्यम दर्जाचे व स्वार्थसाधु अशा लोकांचा भरणा झाला व दरबारांतील कर्तबगार पुरुषांच्या परंपरेस खंड पडला. तसेंच औरंगजेबाच्या पुत्रानंतर पुढील राजपुत्र जनानखान्यांत वाढले व त्यामुळें तेही कर्तृत्वहीन निपजले. (४) पर्शियन भाषेपासून भिन्न अशा उर्दू भाषेचा भारतांतील मुसलमानांत फैलाव झाल्यामुळें हिंदुस्थानांतील मुसलमानांना त्यांच्या खऱ्या संस्कृतीचा परिचय झाला नाहीं. (५) मैदानी लढायांत मोगलांनीं कितीही शौर्य दाखविलें, तरी किल्ले लढविण्याच्या कामांत ते कुचकामाचे असत; हें कंदाहार, अशिरगड, गोवळकोंडा वगैरे किल्ले जिंकतांना त्यांची जी तारांबळ उडाली व त्यांना कपटाचा आश्रय करावा लागला त्यावरून सिद्ध होतें. डोंगराळ प्रदेशांत काटकपणानें वागून लढाई देण्याचेंही त्यांच्याच्यानें होत नसे. (६) मोगलांचें आरमार त्यांच्या व्यापाराचें रक्षण करण्यापुरतेंही प्रबळ नव्हतें. पोर्तुगीज व इंग्रज यांचें आरमार त्यांच्याहून चांगलें असे. (७) नादीरशाह, अबदाली यांच्या स्वाऱ्यांमुळें मोगल बादशाही खिळखिळी होऊन गेली.

सारांश, धर्मप्रधान, प्रगतिशून्य, अनियंत्रित राज्यपद्धतीमुळें बहुजन समाजास राज्याबद्दल प्रेम राहिलें नाहीं. मुसलमान राज्यकर्ते ऐदी बनले. दरबारी लोक खुशामत्ये बनले व राजपुत्र कर्तृत्वहीन निपजले. अगोदर राज्यकर्त्यांच्या ऱ्हासास सुरुवात होते; नंतर राज्यकर्ते व प्रजा ह्यांच्या-मधील बंधन ढिलें होतें व नंतर राज्यें नाश पावतात हा इतिहासाचा क्रम मोगलाईच्या ऱ्हासास बरोबर लागू पडतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न

१. 'मुसलमानी अंमलाचे भारतीय जीवनावर परिणाम' या विषयावर निबंध लिहा. मुद्दे:—पोषाख, धर्म, भाषा, काव्य, गायन, रहाणी, बांधकाम. २. गुरु गोविंदसिंगाच्या नेतृत्वाखालीं शीखांनीं मोगलांशीं केलेल्या झगड्याची त्रोटक हकीकत द्या. ३. मोगलांच्या सत्तेच्या नाशाचीं कारणें सांगा.

अभ्यास

(१) मोगल बादशाही व सुलतानशाही यांच्या अंमलांची तुलना करा.
(२) मोगल सत्तेच्या चढउताराचा आलेख काढा.

माहितीसाठीं

मोहिमांतून अंतर व वेळ मोजण्याची मोगलांची पद्धति

पहाटें तीन वाजतां सैन्याचें गमन सुरू झालें. प्रथम तोफखाना हलला; तो नेहमींच आरंभीं हलवला जाई....सकाळीं घोडेस्वार, पायदळ निघण्यास मोकळे असे.

....राज्याचें दप्तर बरोबर नेलें जाई, कारण, नोंदलेले कागद आणि नोंदणी पुस्तकें आदि अस्सल कागदपत्र दरबारच्या बरोबर असावे लागत. या कामासाठीं ८० उंट, ३० हत्ती आणि २० गाडे लागत.

....याशिवाय हातांत दोर घेऊन मुक्कामांतील अंतर मोजणारे पादचारी लोक बरोबर असत. पहिला मनुष्य हातांत दोर घेऊन पुढें चालू लागे. चालू लागण्यापूर्वीं तो त्या जागेवर खूण करी; मागील मनुष्य त्या जागेवर येऊन पोहोंचला कीं तो ओरडे, मग पुढील मनुष्य पुढच्या जागीं खूण करून 'दोन' असें मोजी. अशा रीतीनें तीन, चार..करीत सर्व मार्ग हे (लोक) मोजत. आणखी एक पादचारी मनुष्य हें (मोजमाप) लिहून ठेवी. 'किती अंतर चाललों.' असें बादशाहानें विचारलें तर ते ताबडतोब सांगत.

....त्याचप्रमाणें आणखी एक मनुष्य पायीं चालत जाई; त्याच्याजवळ तासदर्शक कांच (hour glass) असे; तो वेळ मोजी आणि काशाच्या तासावर लांकडानें ठोकून किती तास झाले याची माहिती देई.

—निकोलो मनूची (मोगल कथा)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २८ वा

मराठी राज्याचा उदय

(इ. स. १६३० ते इ. स. १७०७)

१. **महाराष्ट्राची ओळख** :—सोळाव्या शतकाचे अखेरीस सर्व-धर्म-समानतेच्या व्यापक अधिष्ठानावर नवभारताची निर्मिति करण्याचा अकबराचा उत्तरेंतील प्रयोग अयशस्वी झाल्यावर दक्षिणेंत शिवाजीच्या नेतृत्वाखालीं मराठ्यांचा उदय झाला. पश्चिमेस दमणपासून कारवारपर्यंतचा समुद्रकिनारा, उत्तरेस दमणपासून जवळ जवळ थेट समोर अशी नागपूरच्याही पलीकडे जाणारी सरळ रेषा व पूर्वेस कारवार ते नागपूरपलीकडे जाणारी वाकडीतिकडी रेषा ह्या महाराष्ट्राच्या मर्यादा होत. महाराष्ट्राचा 'महारट्ट' या नांवानें उल्लेख इसवी सन ५०० च्या सुमारास आढळतो. चालुक्यांचा सत्याश्रय पुलकेशी यानें दिलेल्या दानपत्रांत महाराष्ट्र हा तिभंगलेला असून त्यांत नव्याण्णव हजार गांवें आहेत असें म्हटलें आहे. हे तीन भाग म्हणजे अश्मक (वऱ्हाड खानदेश), कुंतल (कृष्णेच्या कांठचा प्रदेश) व अपरान्त (कोंकण) हे बहुधा असावेत. महाराष्ट्र शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल वाद आहे. फार प्राचीन काळापासून येथें रट्ट लोक राहात. त्यांच्या नांवावरून या देशास रट्ट किंवा महारट्ट हें नांव पडलें असावें असें डॉ. भांडारकरांचें मत आहे व त्यास थोडाफार ऐतिहासिक पुराव्यांचा पाठिंबा आहे. मराठे लोक हे शक व द्राविड या वंशांचें मिश्रण होत असें रिस्ले याचें मत आहे. ते स्वतः आपणांस क्षत्रियांचे—विशेषतः राजपुतांचे—वंशज म्हणवितात व शिवाजी भोसल्याची वंशावळी तर चौदाव्या शतकांतील चितोडच्या हमीरापासून सुसंगत मांडलेली आढळते. आठव्या शतकांतील चिनी प्रवासी ह्युएनत्संग याचे मराठ्यांच्या स्वभावासंबंधाचे उद्गार मागें दिलेलेच आहेत. मराठे मूळचे कोणीही असोत, मुसलमानांचें आगमन होण्यापूर्वी कित्येक शतकें मराठ्यांचीं नामवंत कुळें महाराष्ट्रांत वसाहत करून देशमुखीचीं वतनें निर्माण करून व आपापल्या ऐपतीपुरतें सैन्यही बाळगून राहात असत हें निर्विवाद आहे.

२. **मराठ्यांचा उदय** :—सतराव्या शतकांत मराठ्यांचा उदय होण्यास मुख्यतः दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. दक्षिणेंत बहमनी राज्याचे तुकडे झाल्यावर येथील निजामशाही व आदिलशाही राज्यांत एतद्देशीय मुसलमान आणि परस्थ मुसलमान यांचे पक्ष आपापसांत भांडत असत. त्यांतील एतद्देशीय मुसलमानांस मराठे देशमुखांचें साह्य होई. दिवसेंदिवस एतद्देशीय मुसलमानांचा पक्ष वरचढ होत चालला, तसें मराठे सरदारांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महत्त्व चढलें. चाळके (चालुक्य), चव्हाण (चौहान), पवार (परमार), शेलार (शिलाहार), शिंदे (सिंद), जाधव (यादव), कदम (कदंब), मोरे (मौर्य) यांच्याखेरीज भोसले, घोरपडे, माने इत्यादि आडनांवाचे सरदार या ना त्या शाह्यांच्या पदरीं प्रबळ असल्याचे उल्लेख आढळतात. अशा रीतीनें मुसलमानी राज्यांच्या टोपणाखालीं मराठ्यांना राज्यकारभार चालविण्याची, सैन्यें बाळगून मोहिमा करण्याची व किल्ले लढविण्याची संधि मिळालेली होती. सारांश, स्वतंत्र मराठी राज्य स्थापन करण्यास लागणारीं लष्करी व राजकीय साधनें तयार होतीं.

३. **संतांची कामगिरी** :—मराठ्यांच्या उदयास दुसरी अनुकूल गोष्ट म्हणजे तत्कालीन सन्तानीं केलेली धर्मजागृति होय. पंढरीचा विठोबा* हें त्यांचें आद्य दैवत. पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनास जाण्यापूर्वी शंकराचें दर्शन करण्याची चाल आहे. यावरून शैव व वैष्णव यांच्यांत ऐक्य करून देण्याचाही यत्न झाला असावा असें अनुमान निघतें. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ इत्यादिकांनीं घालून दिलेली भागवत धर्माची परंपरा, तुकारामादि भगवद्भक्तांनीं चालू ठेविली. मनुष्य कोणत्याही जातींत जन्मास येवो, परमेश्वराची अनन्य भावानें भक्ति केल्यास तो उद्धरून जातो हें भागवत धर्माचें सार होय. अशा प्रकारच्या प्रतिपादनास पुष्कळांनीं विरोध केला. मंबाजी बुवासारख्या ब्राह्मणांनीं वेदांचे व श्रुतींचे अर्थ तुकोबाच्या अभंगांत उमटतात व शूद्रांकडून त्यांचा उच्चार होतो म्हणून तक्रार केली; परंतु त्यांचें तेज न पडून अभंग हे नांवाप्रमाणेंच अ–भंगच राहिले. ह्या भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारे संत त्या काळीं अनेक जातींत उत्पन्न झाले. चोखोबा हा महार होता. सांवता माळी होता. गोरा कुंभार होता. रोहिदास चांभार होता. नरहरि सोनार होता. तुकाराम शूद्र वाणी होता. हिंदु धर्मावरील भक्तीचीं पाळेंमुळें हिंदुमात्राच्या अंतःकरणांत खोल नेऊन रुजविण्याचें आणि जाति व वर्ण यांचा उच्चनीच भाव बाजूस ठेवून निःस्वार्थपणें एकत्र येण्याची बुद्धि उत्पन्न करण्याचें काम भागवत धर्मानेंच केलें यांत शंका नाहीं.

४. **समर्थांचें कार्य** :—ह्या सर्व संतांची शिकवणूक निवृत्तिपर असल्यामुळें हें व्यंग काढून टाकण्याकरितांच कीं काय, समर्थ रामदास स्वामींचा उदय झाला व त्यांनीं महाराष्ट्र धर्माची स्थापना

* विठ्ठल किंवा विठोबा हा शब्द विष्णु (विठु) या शब्दास 'ल' किंवा 'ब' हा आपुलकीचा भाव दर्शविणारा प्रत्यय लावून झालेला शब्द होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. "म्लेंछ दुर्जन उदंड। बहुता दिसांचें माजलें बंड।" हें पाहून व "तीर्थक्षेत्रें मोडिलीं। ब्राह्मण स्थानें भ्रष्ट झालीं। सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥" ही स्थिति लक्षांत घेऊन, "मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा।" ह्या वचनांचा समर्थांनीं पुरस्कार केला. संत व समर्थ ह्यांच्या उपदेशाची जोड लाभल्यामुळें 'स्वराज्यस्थापनेची तीव्र आकांक्षा व ती सिद्धीस नेण्यास लागणारें लष्करी सामर्थ्य' हीं दोन्ही एकाच वेळीं महाराष्ट्रांत तयार झालीं व तिचा उपयोग करून घेणारा शिवाजीसारखा चौफेर पुढारीही महाराष्ट्रांत त्याच वेळीं उत्पन्न झाला.


रामदास

५. **शहाजीचें चरित्र** :—स्वराज्य संस्थापक शिवाजी हा भोसले घराण्यांत जन्मास आला. भोसले घराण्यांतील पुरुष भीमेच्या कांठीं हिंगणी, बेरडी, देऊळगांव वगैरे गांवांच्या पाटिलक्या करून राहूं लागले. त्यांच्या कुलांत इ. स. १५५० सालीं मालोजींचा जन्म झाला. मालोजीनें आपली जहागीर वाढवून तो मातबर सरदार बनला. मालोजीच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र शहाजी हा जहागिरीची व्यवस्था पाहूं लागला. शहाजी १४–१५ वर्षांचा झाला, तेव्हां निजामशाहाच्या पदरचा दुसरा सरदार लखूजी जाधवराव याची मुलगी जिजाबाई* हिच्याशीं त्याचें लग्न झालें. शिवाजी हा त्यांचा पुत्र.

शहाजी निजामशाहाच्या पदरीं मोठा सरदार होता. उत्तरेकडून मोगल व दक्षिणेकडून विजापूरचा आदिलशाह हे दोघेही निजामशाहीचे लचके तोडीत असतां शहाजीनें निजामशाही जगविण्याची पराकाष्ठा केली. पुढें इ. स. १६३६ त निजामशाही संपुष्टांत आल्यावर शहाजीनें आदिलशाहाच्या पदरीं नोकरी पतकरली व तेथें बंगलूरची जहागीर संपादन करून कर्नाटकांतील

*रंगपंचमीच्या सणाची मनोरंजक हकीकत नवीन पुराव्यांवरून विश्वसनीय ठरत नाहीं. शहाजीच्या लग्नसमयीं मालोजी जिवंत नव्हता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाळेगार आपल्या ताब्यांत आणले. हे पाळेगार म्हणजे विजयनगरच्या राज्याचे छोटे छा[illegible]च होत. जिंकलेल्या प्रदेशांत त्यानें वसुलाची उत्तम व्यवस्था लावून दिली. यापुढें आदिलशाहास शहाजीच्या पराक्रमाचा आनंद वाटण्याऐवजीं उलट त्याच्या वाढत्या सामर्थ्याची भीति वाटूं लागली. शिवाय ह्याच वेळीं पुणें प्रांतांतील शिवाजीचे पराक्रम आदिलशाहाच्या कानीं आले. तेव्हां त्यास शहाजीची फूस असली पाहिजे, असा कयास बांधून आदिलशाहानें शहाजीस दग्यानें कैद केलें. त्यांतून त्याची शिवाजीच्या कर्तृत्वामुळें लवकरच सुटका झाली. पुढील आयुष्यांत शहाजी नांवाला आदिलशाहाचें स्वामित्व पतकरून जवळ जवळ स्वतंत्रपणें कर्नाटकांत राहूं लागला. शहाजीस शिवाजीची स्वातंत्र्याची दृष्टि नसली तरी केवळ कर्तृत्वाच्या दृष्टीनें पाहिलें तर शहाजी शिवाजीहून कमी नव्हता हें त्याच्या बहुविध उद्योगांवरून लक्षांत येईल.

६. शिवाजीचा उदय :—निजामशाहीच्या रक्षणासाठीं शहाजीच्या मोगलांशीं झटापटी चालू असतां इ. स. १६३० सालीं शिवाजीचा जन्म झाला. त्याचीं पहिलीं बारा वर्षें बापाबरोबर प्रथम महाराष्ट्रांत व नंतर कर्नाटकांत गेलीं. बंगलूर येथें राहात असतां तो 'लिपिग्रहणयोग्य' झाला असें पाहून त्यास मुळाक्षरें शिकविण्यांत आलीं. त्या लहान वयांतच शिवाजीची आई जिजाबाई हिनें शिवाजीस रामायण–महाभारतांतील वीरांच्या कथा सांगितल्या. त्यांचा शिवाजीच्या मनावर योग्य परिणाम होऊन त्याच्या अंगीं दृढ स्वधर्मनिष्ठा बाणली व आपण धर्मरक्षण करण्यास झटलें पाहिजे ही भावना त्याच्या मनांत उत्पन्न झाली.

७. 'मऱ्हाष्ट' राज्याची कल्पना* :—शिवाजी बारा वर्षांचा झाला, तेव्हां शहाजीनें त्याची पुणें प्रांतीं आपल्या जहागिरीवर रवानगी केली व बरोबर त्याची आई जिजाबाई व आपला 'शहाणा व चौकस' कारभारी दादाजी कोंडदेव मलठणकर यास पाठवून दिलें. शिवाजीनें दादाजीच्या हाताखालीं राज्यकारभाराचें शिक्षण घेऊन जहागिरीच्या मुलुखांत व्यवस्थित वसुलाची पद्धति घालून दिली, न्यायनिवाड्यांत तो लक्ष घालूं लागला व अशा रीतीनें व्यवस्थित राज्यपद्धतीच्या आधारावर त्यानें प्रजेच्या जीवनांत स्थैर्य उत्पन्न केलें. यामुळें लोकांस तो आवडूं लागला. शिवाजीच्याही लक्षांत आलें कीं स्वतंत्र राज्यसत्ता निर्माण करण्यास येथें वाव आहे. उत्तरेस दिल्लीचे बादशाह व दक्षिणेस विजापूरचे आदिलशाह या दोघांचीं सत्ताकेंद्रें पुणें भागापासून दूर, पुनः मावळचा मुलूख डोंगराळ, दळणवळणाचीं चांगलीं साधनें नाहींत,

---

* 'मऱ्हाष्ट राज्य' हा शब्द समकालीन लेखनांत आढळतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजूस कोंकणपट्टी, कोंकणच्या पश्चिमेस समुद्रकिनारा व पूर्वेस सह्याद्रीचा डोंगराळ मुलूख दोन्हीही दळणवळणास दुःसाध्य, कोंकणचा मुलूख सुपीक, पाऊस भरपूर, यामुळें पीक निश्चित, व एकवार तेथें सत्ता स्थापन झाल्यास वसूल गोळा होण्याची शंका नाहीं, या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन शिवाजीनें समुद्रवलयांकित कोंकणपट्टी, सह्याद्रीचा घाटमाथा व मावळ येथून राज्यस्थापनेस प्रारंभ केला. प्रथम त्यानें तेथील लोकांचीं मनें वश केलीं. त्यांना आपल्या मनांत काय आहे तें समजावून सांगितलें व ठिकठिकाणच्या देशमुखांस वश करून घेऊन मऱ्हाष्ट राज्याच्या कल्पनेचा प्रसार केला.

ब्रिटिश म्यूझियम संग्रह : इ. स. १७०७ पूर्वी
शिवाजी

ऑक्झेंडेन म्हणतो, "शिवाजीचा चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानानें वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब, बांकदार व जरासें खालीं आलेलें, दाढी कापून हनुवटीचे खालीं टोकदार केलेली, मिशी बारीक असून मुद्रेंत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात." एस्कालिएट म्हणतो, "शिवाजीची मूर्ति मध्यम उंचीची व रेखीव बांध्याची आणि चपळ आहे. तो बोलतांना दर वेळीं जणूं कांहीं मंदस्मित करतो आहेसें वाटतें. दृष्टि फार तीक्ष्ण व भेदक आहे."

८. **प्रतापगडचें युद्ध** :—परंतु त्याचा हा बेत जावळीच्या चंद्रराव मोऱ्यास रुचला नाहीं. तो विजापूरकरांस सामील झाला. तेव्हां शिवाजीनें त्याचें पारिपत्य केलें. शिवाजीचे हे उद्योग बळावत चालले हें पाहून आदिलशाहानें अफझलखान नामक सरदारास शिवाजीवर पाठविलें. "शिवाजीशीं वरपांगीं नरमाईचें बोलणें करून त्यास जिवंत कैद करून आणावें किंवा ठार मारावें." असा अफझलखानास विजापूर दरबारचा हुकूम होता. ठरल्याप्रमाणें खान उत्तरेस निघाला. वाईस येऊन पोहोंचल्यावर खानानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाजीस किल्ले देऊन शरण येण्यास निरोप पाठविला. तो ऐकून शिवाजीनें उलट निरोप पाठविला कीं 'आपण जावळीस याल तर बरें होईल, आपण मागत आहां ते किल्ले मी देतों. आपण येथें याल तर माझी तलवार मी आपणापुढें करीन' (शिवभारत). हा शिवाजीचा निरोप ऐकून खान जावळीकडे निघाला. जावळीसारख्या मुख्य रस्त्यापासून दूर अशा शिवाजीच्या मुलुखांत आपण होऊन तो गेला ही खानानें मोठी चूक केली. असो. अफझलखानाची व शिवाजीची भेट प्रतापगडच्या किल्ल्यावर तारीख १० नोव्हेंबर इ. स. १६५९ रोजीं गुरुवारीं तिसरे प्रहरीं झाली. प्रत्यक्ष भेटीच्या प्रसंगीं महालांत दोघेही सडेच होते. त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणें हात पसरून छातीस छाती लावून भेट घेण्याची वेळ आली. खान हा उंच असल्यामुळें शिवाजीचें शिर त्याच्या खांद्याजवळ आलें, तें त्यानें डाव्या बगलेंत दाबून धरलें व आपलें हत्यार शिवाजीच्या कुशींत खुपसण्याचा यत्न केला. परंतु शिवाजीच्या अंगांत चिलखत असल्यानें तो फुकट गेला. हा दगा पाहून शिवाजीनें प्रसंगावधान राखून आपल्या तरवारीचें टोंक खानाच्या पोटांत खुपसलें. खानानें अंगांत फक्त झिरझिरीत सदरा घातला असल्यानें त्या तरवारीचें टोंक पाठीपर्यंत गेलें. त्याबरोबर खान 'दगा' म्हणून मोठ्यानें ओरडला. परंतु शिवाजीनें लागलीच आणखी एक वार करून खानास यमसदनास पाठविलें व तावडतोब सूचना देऊन आपल्या सैन्यास खानाच्या सैन्यावर तुटून पडण्याची आज्ञा केली. त्याबरोबर खानाच्या फौजेंत एकच गोंधळ उडून प्रत्येक जण जीव बचावण्यासाठीं वाट फुटेल तिकडे पळूं लागला. या लढाईंत विजापूरच्या पक्षाकडील तीन चार हजार लोक ठार झाले असावेत. खानानें येतांना बरोबर पस्तीस हजार फौज आणली होती. एवढ्या मोठ्या तयारीनिशीं आलेल्या सरदाराशीं तोंड देण्याचा शिवाजीवर हा पहिलाच प्रसंग; त्यांतून तो यशस्वी होऊन बाहेर पडल्याचें वृत्त सर्वत्र पसरतांच एकएकजण शिवाजीकडे जरा निराळ्याच दृष्टीनें पाहूं लागले. यानंतर पुढील दोन-तीन वर्षांत शिवाजीनें विजापूरकरांच्या रुस्तुमजमा, सिद्दीजौहर वगैरे सरदारांचाही पराभव करून त्यांस परत पाठविलें. इतक्यांत उत्तरेकडून मोगलांचा शाइस्तखान नामक सरदार दक्षिणेंत आला. तेव्हां विजापूरच्या आदिलशाहानें शिवाजीचें मावळ व कोंकण भागांतील स्वातंत्र्य मान्य करून त्याच्याशीं तह केला. अशा रीतीनें आपल्या बापाच्या जहागिरीची व्यवस्था पहाणारा शिवाजी प्रथम बंडखोर बनला व यश मिळवीत मिळवीत त्यानें प्रतिपक्षास आपलें स्वातंत्र्य मान्य करावयास लाविलें.

९. **शाइस्तखान** :—जवळजवळ दोन वर्षें (इ. स. १६६१–६३) शाइस्त-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खान पुण्यांत होता. तेवढ्यांत शिवाजीनें राजापूर येथें इंग्रजांच्या वखारीवर हल्ला करून खंडणी वसूल केली. कारण त्यांनीं सिद्दी जौहराला दारूगोळा पुरविला होता. तेथून परत आल्यावर शिवाजीनें एक धाडशी बेत मनाशीं ठरविला. ता. ५ एप्रिल १६६३ रोजीं तो निवडक लोक बरोबर घेऊन पुण्याकडे निघाला व मोगल शिपायांनीं ओळखूं नये म्हणून त्याचे लोक फुटून लग्नाचे मिरवणुकींत सामील झाले व गांवांत शिरले. खान शिवाजीच्या वाड्यांत राहात होता. रात्रीच्या सुमारास मागील बाजूनें भिंत पाडून शिवाजी वाड्यांत शिरला व थेट खानाच्या महालांत जाऊन उभा राहिला. खान त्यास पाहतांच घाबरून जनानखान्यांत शिरला. इतक्यांत एका चाणाक्ष स्त्रीनें दिवे मालविले; त्याबरोबर खान खिडकींतून निसटला. पण शिवाजीनें तरवारीनें त्याचीं बोटें छाटलीं. त्याचा मुलगा मात्र मारला गेला. ह्यापुढें मोगल सैन्य सावध होऊन आपला पाठलाग करूं लागेल हें शिवाजीस माहीत होतें. त्यास चुकविण्याकरितां शिवाजीनें आगाऊ योजना करून ठेविली होती. त्यानें कात्रजच्या घाटांत बैलांच्या शिंगांस पोत बांधून उजेड करविला व आपण अंधारांत सिंहगडच्या वाटेनें निघून गेला. तेव्हां मोगली सैन्य शिवाजीस पकडण्याकरितां कात्रजच्या दिशेनें धांव घेऊं लागलें. सकाळ उजाडेपर्यंत आपण रस्ता चुकलों हें मोगलांस कळलें नाहीं. आपली चूक लक्षांत आल्यावर सकाळीं मोगल सिंहगडाकडे गेले. तेव्हां शिवाजीनें गडावरून तोफांचा मारा केला. त्यामुळें मोगली सैन्यास धीर न निघून तें परत फिरलें. शाइस्तखान तर जीव बचावण्यासाठीं औरंगाबादेस निघून गेला. शाइस्तखान हा खुद्द औरंगजेबाचा मामा व मोगलांचा बडा सरदार. त्याचा शिवाजीनें पराभव केला, हें पाहून सबंध भारतभर शिवाजी हा ज्याच्या त्याच्या तोंडीं बोलण्याचा विषय झाला.

१०. पुरंदरचा वेढा :—इ. स. १६६५ च्या प्रारंभीं औरंगजेबानें जयसिंग व दिलेरखान ह्या सरदारांस शिवाजीवर पाठविलें. जयसिंग हा वृद्ध व अनुभवी सेनापति मोगलांच्या पदरीं इ. स. १६१७ पासून होता. त्यानें मोहिमेचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेऊन काम चालविलें व पुरंदरास वेढा घातला. दिलेरखानही त्याच्याच बरोबर होता. मराठ्यांचा या वेळीं निभाव लागणें शक्य नव्हतें. कारण जयसिंगानें सर्व बाजूंनीं अगदीं नाकेबंदी केलेली होती. ही स्थिति पाहून शिवाजी विचार करून जयसिंगाच्या भेटीस गेला व त्यानें "तेवीस किल्ले मोगलांच्या हवालीं करतों, फक्त बारा किल्ले मजकडे ठेवावे; ते संभाळून मी मोगलांना विजापूरच्या सुलतानाशीं लढण्यास मदत करीन" अशा प्रकारचें बोलणें लाविलें. जयसिंगास हा तह सर्व दृष्टींनीं फायदेशीर वाटत होता. कारण त्यामुळें डोंगराळ मुलुखांत लढाई चालविण्याचा त्याचा खटाटोप वांचला आणि शिवाजी व विजापूरकर यांच्यांत भांडण लावून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिल्यामुळें ते मोगलांविरुद्ध एक होण्याची धास्ती राहिली नाहीं. तेव्हां जयसिंगानें तहाच्या या अटी एकदम मान्य केल्या.

११. शिवाजीस आग्रा येथें कैद :—यानंतर जयसिंगानें आग्र्यास बादशहाची समक्ष भेट घेण्याबिषयीं शिवाजीचें मन वळविलें. शिवाजीलाही एकवार उत्तरेकडील स्थिति प्रत्यक्ष पाहण्याची उत्कंठा होती. तेव्हां त्यानें त्याचें म्हणणें मान्य केलें. मात्र स्वतःच्या सुरक्षितपणाची जयसिंगापासून हमी घेतली. ठरल्याप्रमाणें शिवाजी आपला पुत्र संभाजी ह्यास बरोबर घेऊन आग्र्यास निघाला (इ. स. १६६६). ता. १५ मे रोजीं चांद्रमानाप्रमाणें औरंगजेबाच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दरबार होता. तेव्हां शिवाजीची बादशाहाशीं भेट झाली. शिवाजीनें बादशाहापुढें नजराणा ठेवून त्यास सलाम केला. तेव्हां बादशाहानें त्यास तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत उभें केलें. हा प्रकार पाहतांच शिवाजीस संताप आला व त्यानें मोठमोठ्यानें बोलणें सुरू केलें कीं, 'हा अपमान सहन करून घेण्यास मी येथें आलों नाहीं !' पुढें तर त्याचा संताप अनावर होऊन तो बेशुद्ध पडला. ती स्थिति पाहतांच दरबारांत गडबड झाली. तेव्हां दरबार घाईघाईनें बरखास्त झाला व बादशाहानें शिवाजीस कैदेंत टाकलें.

१२. युक्तीनें सुटका :—शिवाजीनें खुद्द आग्र्यासारख्या बादशाही कडेकोट बंदोबस्ताच्या शहरांतून आपली सुटका कशी करून घेतली ती हकीकत कादंबरीप्रमाणें अद्भुत आहे. त्यानें आपल्याबरोबर आणलेलें सैन्य दक्षिणेंत पाठवून देण्याची परवानगी मागितली. बादशाहानें ती मोठ्या खुषीनें दिली. पुढें त्यानें अगदीं शरण आल्याचें दाखवून दरबारच्या सरदारांस व ब्राह्मणांस मेवामिठाईचे पेटारे नजराणे म्हणून तो पाठवूं लागला. प्रथम प्रथम पहारेकरी ते तपाशीत असत; पण त्यांत मिठाईच असते ह्याची खात्री पटल्यावर ते तिकडे दुर्लक्ष करूं लागले. नंतर शिवाजीनें आजारी असल्याचें सोंग केलें व ठराविक दिवशीं एका पेटाऱ्यांत आपण व दुसऱ्या पेटाऱ्यांत संभाजीस बसवून आपल्या बिछान्यावर हिरोजी फर्जंद यास पांघरूण घेऊन निजवून ठेविले व आपण तेथून निसटला ! थोड्या वेळानें हिरोजीही पहारेकऱ्यास 'महाराज निजले आहेत, गडबड करूं नका' असें बजावून निघून गेला. पेटारे आग्र्याबाहेर आल्यावर तेथें दोन घोडे तयार होते. त्यांवर बसून शिवाजी व संभाजी दोघेही पसार झाले. शिवाजी सुमारें १० महिने आपल्या राज्याच्या बाहेर होता. परंतु त्या काळांत त्याच्या लोकांनीं योग्य बंदोबस्त ठेविला होता. राजमाता जिजाबाई व पेशवे मोरोपंत पिंगळे हे मोठ्या हुषारीनें सर्वांवर देखरेख ठेवीत होते.

१३. सिंहगडावर स्वारी :—आतां आपले गेलेले चोवीस किल्ले मोगलापासून परत मिळविण्याच्या उद्योगास तो झपाट्यानें लागला (इ. स. १६७०).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या सर्व किल्ल्यांत कोंडाणा ऊर्फ सिंहगड* किल्ला फार महत्त्वाचा व जिंकण्यास अवघड असा होता. तेथें उदयभानु नांवाचा राजपूत सरदार त्याची राखण करीत असे. हा किल्ला जिंकण्याच्या कामगिरीवर तानाजी मालुसरे ह्याची नेमणूक झाली. तो, शेलारमामा व त्याचा भाऊ सूर्याजी यांस घेऊन, निवडक मावळ्यांसह तिकडे निघाला. माघ वद्य नवमीच्या रात्रीं किल्ल्याच्या अवघड बाजूनें आपण घोरपड लावून दोरानें वर चढला व दुसऱ्या बाजूनें शेलारमामास व सूर्याजीस कल्याण दरवाजानें वर येण्यास सांगितलें. मावळे तटावर चढतांच गडबड उडाली व लढाईची एकच घुमश्चक्री झाली. खुद्द तानाजी व उदयभान यांचें निकराचें द्वंद्वयुद्ध होऊन दोघेही गतप्राण झाले. एवढ्या अवकाशांत सूर्याजी कल्याण दरवाजानें वर येऊन पोहोंचला. तानाजी पडला हें पाहतांच मावळे धीर खचून पळूं लागले. सूर्याजीनें वीरश्रीयुक्त भाषण करून त्यांस मागें फिरविलें व शेवटीं राजपुतांचा मोड करून गड सर केला.

१४. **राज्याभिषेक** :—सिंहगडच्या युद्धानंतर शिवाजीनें बागलाणांत साल्हेर येथें मोगलांचा जंगी पराभव केला. आतां त्यास कोणी शत्रु उरला नाहीं. आदिलशाहानें त्याच्या स्वातंत्र्यास आधींच मान्यता दिली होती व आतां मोगलांसही त्यानें नामोहरम केलें. तेव्हां यापुढें त्यानें राज्याभिषेक-समारंभ करून राज्यस्थापनेची घोषणा केली. प्रतिपक्षास तें एक प्रकारें आव्हानच होतें. त्यानें केलेल्या लढायांच्या बुडाशीं केवळ लूट करण्याचा हेतु नसून स्वतंत्र राज्यस्थापनेचा हेतु आहे व त्याचें राज्य हें कायद्यावर आधारलेलें राज्य आहे या गोष्टी राज्याभिषेकामुळें आयत्याच सिद्ध झाल्या. राज्याभिषेक समारंभास त्यानें काशीहून गागाभट्ट नांवाचा पंडित बोलावून आणला व राज्याभिषेक विधि समजावून घेण्यासाठीं त्यानें जयपूरच्या राजाकडे आपला प्रतिनिधि पाठविला. या सर्व कृत्यांत त्याची भारतीय दृष्टि लक्षांत येते.

१५. **दक्षिणेंत एकजुटीचा यत्न** :—राज्याभिषेक आटोपल्यावर शिवाजी दक्षिणेकडे वळला. तिकडे तंजावरच्या बाजूस त्याचा सावत्रभाऊ एकोजी आपल्या बापाच्या जहागिरीची व्यवस्था पहात होता. खेरीज त्यानें नवीन मुलूखही जिंकला होता. शिवाजीनें वाटेंत प्रथम हैद्राबाद येथें कुतुबशाहाशीं सख्य जोडलें व तेथून तो पूर्वकर्नाटकाकडे निघाला. या स्वारींत त्यानें वेलोर, जिंजी वगैरे ठिकाणें काबीज केलीं. तेथून पश्चिमेकडे येऊन बंगलूरच्या आसपासचा मुलूख जिंकला व एकोजीजवळ आपल्या बापाच्या

* तानाजीसारखा 'सिंह' पडून गड सर झाला म्हणून त्यास 'सिंहगड' हें नांव पडलें अशी आख्यायिका आहे ती खरी नाहीं. कारण कोंडाण्यास सिंहगड हें नांव इ. स. १६७० च्या पूर्वीच्या कागदपत्रांतही सांपडतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जहागिरीचा अर्धा वांटा मागितला. अखेर एकोजीस खुषी-नाखुषीनें तो द्यावा लागला. इतक्या दूरवर जिंकलेल्या प्रदेशांतही वसुलाची पद्धत घालून राज्यकारभाराची घडी बसवून देण्यासाठीं त्यानें बरोबर माणसें नेलीं होतीं. त्यांचें तेथील प्रजेशीं वर्तन पाहून तत्कालीन पॉंडिचरीच्या फ्रेंच वसाहतवाल्यांनीं प्रशंसेचे उद्‌गार काढले आहेत. पुढें शिवाजीच्या मृत्यूनंतर औरंगजेबाची मोठी स्वारी दक्षिणेंत आली असतां राजारामास याच मुलुखानें हात दिला. असो. दक्षिणेंतून परत येत असतां मोगलांचा सरदार दिलेरखान हा आदिलशाहीवर हल्ला करीत असल्याचें शिवाजीस समजलें. तेव्हां शिवाजी आदिलशाहाच्या मदतीस धांवून गेला व त्यानें दिलेरखानास पिटाळून लाविलें. अशा रीतीनें या चार पांच वर्षांच्या काळांत शिवाजी नुसतें स्वतःचें स्वतंत्र राज्य स्थापून स्वस्थ न राहातां त्यानें दख्खनच्या सत्ताधीशांची एकजूट घडवून आणली व थेट जिंजी–तंजावरापर्यंत जाऊन तिकडे संकटप्रसंगीं उपयोगीं पडतील अशीं निवाऱ्याचीं ठिकाणें निर्माण केलीं. तो इ. स.१६८० च्या एप्रिल महिन्यांत (चैत्र शु. १५ स) मृत्यु पावला.

१६. शिवाजीची राज्यव्यवस्था :—राज्याचा मुख्य आधार वसूल. तो प्रजेवर जुलूम न होतां पद्धतशीर रीतीनें गोळा करण्यांत शिवाजी दक्ष होता. यामुळें प्रजेस जीवन सुरक्षित वाटूं लागलें. तत्कालीन शेतीप्रधान अर्थव्यवस्थेंत जमिनीचा सारा ही वसुलाची मुख्य बाब होती. राज्यांच्या संरक्षणाची मदार एका बाजूस किल्ले व दुसऱ्या बाजूस आरमार यांवर होती. किल्ल्याचें संरक्षण, तेथील सामुग्रीची तरतूद व हिशेबाची चोख व्यवस्था या बाबतींत त्यानें नियम घालून दिले. समुद्रकिनाऱ्याच्या रक्षणासाठीं गुराबा, तरांडीं, तारवें, गलबतें, शिबाडे, पगार अशीं नाना जातींचीं जहाजें त्यानें बांधलीं. सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग अशा जलदुर्गांची (जंजिऱ्यांची) तटबंदी केली व त्यांवर लायक अधिकाऱ्यांची नेमणूक केली. तत्कालीन हेटकरी, मावळे, भंडारी वगैरे लोकांना आपल्या अंगचे गुण प्रकट करण्यास व धाडसाचीं कामें करण्यास संधि मिळाली. प्रजेस आपल्या अंगच्या गुणांचा विकास करून देशाचें संरक्षण व संवर्धन करण्यासाठीं उपयोग करण्याची संधि मिळणें हें स्वराज्याचें लक्षण शिवाजीच्या राज्यांत अनेक अंगांनीं प्रकट झालें. राज्यकारभारासाठीं त्यानें प्रसिद्ध अष्टप्रधान पद्धति अमलांत आणली. १. पंतप्रधान (पेशवा), २. पंत अमात्य (वसूल व हिशेब), ३. पंतसचिव (दप्तरखातें), ४. मंत्री (खाजगी कारभारी), ५. सेनापति (संरक्षण), ६. सुमंत (परराष्ट्र व्यवहार), ७. न्यायाधीश (न्याय), ८. पंडितराव (धर्मखातें). हे अधिकारी शिवाजीच्या मार्गदर्शनाप्रमाणें आपापल्या खात्याचा कारभार करीत व सर्व जण राजास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारखेच जबाबदार असत. एक पंडितराव सोडून बाकी सर्वांस लष्करी अनुभव असे. सर्वांस पगार असे. कुणासही होता होईतों वंशपरंपरेची जहागीर न देण्याबद्दल शिवाजीचा मोठा कटाक्ष असे. तसेंच वसूल गोळा करतांना त्यानें राज्यांतील देशमुख–देशपांडे यांच्यासारख्या जुन्या वतनदारांवर विसंबून न राहतां स्वतःचे कमाविसदार, महालकरी, सुभेदार असे पगारी अधिकारी नेमले. ह्यामुळें देशमुखांच्या सरंजामी शिरजोरीस वाव राहिला नाहीं. एकंदरींत शिवाजीनें नवीन स्वतंत्र राज्य निर्माण करतांना जुन्या राजवटीचे दोष काढून टाकून तत्कालीन आर्थिक समाजरचनेस अनुकूल अशी राज्यपद्धति निर्माण केली.

१७. शिवाजीची योग्यता :—पण शिवाजीची योग्यता नुसत्या लढायांतील विजय व राज्यपद्धतीचा चोखपणा यांवर अवलंबून नाहीं. मुसलमान या देशांत येऊन चारशें वर्षें होऊन गेलीं. त्यांच्या राज्यकर्त्यांनीं धर्म व राजकारण यांची गल्लत केली. एका अकबराखेरीज करून कोणासही नवभारताची निर्मिति कशी व्हावी याचा विचार सुचला नाहीं हें लक्षांत घेऊन मुसलमानी वर्चस्व झुगारून देऊन स्वतंत्र राज्य स्थापन करावयाचें हा निश्चित विचार त्याच्या मनांत आला व त्यानें तो अखेर कृतींत आणला. शिवाजीनें स्थापन केलें तें राज्य हें नुसतें भोसल्यांचें राज्य नव्हे; तें मऱ्हाष्ट राज्य होय. पूर्वीं चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादि घराण्यांचीं राज्यें झालीं, परंतु त्याच्या राज्यास लोकांच्या आपलेपणाच्या भावनेवर प्रादेशिक अधिष्ठान प्राप्त झालें. याच आधारावर तो प्रथम दक्षिणेंत एकजूट निर्माण करून, अधिकाधिक व्यापक ध्येयें साध्य करण्याच्या मार्गावर होता असें त्याच्या हालचालींवरून दिसून येतें. परंतु तो मृत्यु पावल्यानें त्याचें कार्य अपुरें राहिलें. शिवाजी वर्तनानें सद्‌गुणी, धर्माचरणी व संयमशील असे. यामुळें त्याच्या व्यक्तिमत्वाची तत्कालीन लोकांवर छाप पडत असे. स्वतःच्या महत्त्वाकांक्षेसाठीं परक्यांचें स्वातंत्र्य हरण करून स्वतः दिग्विजयी म्हणून गाजणाऱ्या शिकंदर, ज्यूलियस सीझर, नेपोलियन इत्यादि पुरुषांची, स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या शिवाजीशीं तुलना करतां येणार नाहीं. शिवाजीची तुलना करतांना 'स्वातंत्र्यार्थ खटपट करणाऱ्या पवित्र महापुरुषांचाच तेवढा प्रवेश होणें योग्य आहे' असें कै. राजवाडे म्हणतात तें अगदीं बरोबर आहे. मुत्सद्दीपणा, शौर्य व शुद्धाचरण या तिन्ही गुणांचा मधुर संगम शिवाजीप्रमाणें इतरांत क्वचितच पाहावयास सांपडतो. या गुणांनीं त्यानें स्वतःस अलौकिकत्व प्राप्त करून दिलें, आपल्या पिढींतील लोकांस भाग्याचा दिवस दाखविला व पुढील पिढ्यांना आशेचा आधार व संतत स्फूर्तीचा ठेवा प्राप्त करून दिला यांत शंका नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. औरंगजेबाची स्वारी :—शिवाजी मृत्यु पावला त्या सुमारास औरंगजेबाचें उत्तरेस राजपुतांशीं युद्ध चालू होतें. त्यांत त्याचा बंडखोर पुत्र अकबर दुर्गादासाच्या आधारानें पळून दक्षिणेंत संभाजीच्या आश्रयास आला होता. हें पाहून औरंगजेब दक्षिणेकडे वळला. यामुळें आपल्या आयुष्याचीं अखेरचीं २६ वर्षें त्यानें दक्षिणेंत काढलीं. संभाजीनें औरंगजेबाशीं लढण्यांत आपल्या अंगचें शौर्य व धाडस हे गुण प्रकट केले. परंतु शिवाजीचें उर्वरित कार्य समजून घेऊन तें पुढें चालू ठेवण्याचें कर्तृत्व त्याच्या अंगीं नव्हतें. यामुळें औरंगजेबास विजापूरची आदिलशाही व गोवळकोंडचाची कुतुबशाही संपूर्ण नष्ट करण्यांत यश आलें; इतकेंच नव्हे तर खुद्द संभाजीही इ. स. १६८९ त त्याचे हातीं सांपडला. त्यास त्यानें हालहाल करून मारलें. मराठ्यांचा राजधानीचा किल्ला रायगड हाही औरंगजेबानें सर केला व संभाजीची बायको येसूबाई व पुत्र शिवाजी यांस बंदिवान केलें.

१९. स्वातंत्र्य युद्ध :—इ. स. १६८९–१७०७ या अठरा वर्षांत मराठ्यांनीं औरंगजेबाशीं चालू ठेवलेलें स्वातंत्र्य युद्ध हें भारताच्या इतिहासांतील एक उज्ज्वल प्रकरण आहे व यांतील कित्येक प्रसंग कादंबरीप्रमाणें अद्भुत आहेत. एकीकडे सर्व साधनांनीं सामर्थ्यशाली व अनुभवी सेनानायक असा मोगल बादशाह व दुसऱ्या बाजूस आपल्या स्वातंत्र्यासाठीं प्राणपणाला लावून लढणारे मराठे यांची ती झुंज होती. संभाजीच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ राजाराम हा गादीवर बसला; पण गादी कोठें होती ? रायगडास मोगलांचा वेढा बसलेला पाहातांच राजारामानें आपल्या विश्वासू अनुयायांसह थेट जिंजीस प्रयाण केलें व तेथून मोगलाशीं प्रतिकार चालू ठेवला. रायगड ते जिंजी या सात आठशें मैलांच्या टापूंत संताजी घोरपडे व धनाजी जाधव या दोन धुरीण सेनापतींच्या नेतृत्वाखालीं मराठी सैन्याच्या तुकड्या सर्व मुलुखभर विजेच्या वेगानें संचार करीत होत्या. त्यांनीं बादशाही फौजेचा पाठपुरावा केला. यामुळें बादशाहास अगदीं सळो कीं पळो होऊन गेलें. जिंजीस मोगल सैन्यानें वेढा घातला, पण तो सात वर्षें रेंगाळत राहिला. अखेर जिंजी सर झाली; पण राजाराम तेथून निसटला, तो थेट महाराष्ट्रांत आला व सातारा येथें मराठ्यांच्या राजधानीची स्थापना केली. यानंतर थोड्याच दिवसांत राजाराम सिंहगडीं मृत्यु पावला (इ. स. १७००).

२०. ताराबाईचें शौर्य :—राजारामाच्या मृत्यूनंतर त्याची बायको ताराबाई हिनें तितक्याच तडफेनें मोगल फौजेशीं युद्ध चालू ठेवलें. ' रामराणी भद्रकाली । रणरंगीं क्रुद्ध झाली । प्रलयाची वेळ आली । मुगल हो सांभाळा । असें तिच्या उद्योगाचें वर्णन एका समकालीन कवीनें केलें आहे. पदरच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक सरदारांस उत्तेजनपर पत्रें लिहून व प्रसंगीं जहागिरीचें आमिषही दाखवून, नुसतें महाराष्ट्राचें रक्षण काय, पण दिल्लीचेंही राज्य आवाक्यांत आणण्याची तिची महत्त्वाकांक्षा होती! या तेजस्वी प्रतिकारापुढें वृद्ध औरंगजेब अगदीं नामोहरम झाला व इ. स. १७०७ मध्यें तो अहमदनगर येथें मोठ्या निराशेंत मृत्यु पावला. मराठ्यांचें स्वातंत्र्य मृत्यूच्या मगरमिठींतून बचावलें!

प्रश्न

१. शिवाजीच्या लष्करी धोरणाचें, कौशल्याचें व व्यवस्थेचें सोदाहरण विवेचन करा. २. मराठे व औरंगजेब यांच्या परस्परसंबंधाचें समालोचन करा. ३. टीपा लिहा—(१) शिवाजीचा राज्याभिषेक, (२) अष्टप्रधान पद्धति, (३) शिवाजीचें आरमार, (४) शिवाजीचें धर्मविषयक धोरण, (५) राजाराम. (६) ताराबाई.



अभ्यास

(१) वाचा—'उषःकाल' व 'केवळ स्वराज्यासाठीं' ले.—ह. ना. आपटे (२) शिवभारतांतील अफझलखान शिवाजी युद्धाचें वर्णन (अध्याय २१) संस्कृत शिक्षकांकडून समजावून घ्या. (३) पुढील भाषणें किंवा संवाद कल्पनेनें लिहा—(अ) जयसिंग–शिवाजी पुरंदरावर. (आ) तानाजी–शिवाजी सिंहगड स्वारीस जातांना. (इ) राजाराम–रामचंद्र पंत अमात्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(जिंजीकडे जाण्यास निघतांना). (४) पृष्ठ ३०३ वरील चित्र कोणत्या ऐतिहासिक घटनेचें आहे? त्याचा अर्थ स्पष्ट करा.

शिवपूर्वकालीन अस्मानी सुलतानी

[श्रीसमर्थ रामदास त्या वेळच्या देशस्थितीचें पुढीलप्रमाणें वर्णन करतात.]

पदार्थ मात्र तितुका गेला। नुसता देशचि उरला।
येणेकरितां वहुताला। संकट जाले ॥ १ ॥
लोकें स्थानभ्रष्ट जालीं। कितेक तेथेंचि मेलीं।
उरलीं तें मराया आलीं। गांवावरी ॥ २ ॥
माणसा खावया धान्य नाहीं। आंथरूण पांघरूण तेंहि नाहीं।
घर कराया सामग्री नाहीं। काये करिती ॥ ३ ॥
पुढें आला प्रजन्य काळ। धान्य महर्ग दुःकाळ।
शाकार नाहीं भळभळ। रिचवे पाणी ॥ ४ ॥
कितेक अनाचारी पडिलीं। कितेक यातिभ्रष्ट जालीं।
कितेक ते आक्रंदलीं मुलेंबाळें ॥ ५ ॥
कितेक विषें घेतलीं। कितेक जळीं वुडालीं।
जाळिलीं ना पुरिलीं। किती येक ॥ ६ ॥
ऐसें जालें वर्तमान। पुढेंहि अवघा अनमान।
सदा दुश्चीत अवघे जन। उद्वेगरूपी ॥ ७ ॥
कांहींच पाहतां धड नाहीं। विचार सुचेना कांहीं।
अखंड चिंतेच्या प्रवाहीं। पडिले लोक ॥ ८ ॥
येक म्हणती कोठें जावें। येक म्हणती काये करावे।
विदेशा जाउनि काय खावे। वेच नाहीं ॥ ९ ॥
तथापि मार्गची चालेना। भिक्षा मागतां मिळेना।
अवघे भिकारी च जना। काये म्हणावें ॥१०॥
प्राणीमात्र जाले दुखी। पाहतां कोण्ही नाहीं सुखी।
कठिण काळे वोळखी। धरिनात कोण्ही ॥११॥

---रामदास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग २९ वा

मराठी साम्राज्याचा उदयास्त

(इ. स. १७०७ ते इ. स. १८४८)

१. अपमृत्यु टळला :—अठरा वर्षांच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर मराठ्यांचें स्वातंत्र्य मृत्यूच्या मगरमिठींतून वांचलें व आजारांतून मनुष्य बरा झाल्यावर केव्हां केव्हां झपाट्यानें टवटवीत होतो तसें नंतरच्या काळांत मराठी राज्याचें थोड्याच काळांत साम्राज्य बनलें. या साम्राज्यास अनुरूप अशी नवी घडी बसविण्यांत यश येण्यापूर्वींच मराठ्यांना इंग्रजांशीं सामना द्यावा लागला व त्यांत मराठी साम्राज्याचा कसा अंत झाला ही हकीकत या भागांत द्यावयाची आहे.

२. आपसांत यादवी :—औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र बहादुरशाह यानें औरंगजेबाच्या कैदेंत असलेला संभाजीचा मुलगा शिवाजी (यास शाहू हें नांव पडलें) याची मुक्तता केली व मोगलसत्तेविरुद्ध लढणार नाहीं असें त्याजपासून वचन घेतलें. शाहू दक्षिणेंत मराठी राज्याचा अधिपति म्हणून आला. तेव्हां प्रश्न पडला कीं राज्य कोणाचें ? शाहूचें ? कीं ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांचें ? या प्रश्नावर तत्कालीन मराठ्यांत एकमत झालें नाहीं. शाहू व ताराबाई यांच्यांतील हा झगडा इ. स. १७१४ पर्यंत चालून त्यांत अखेर शाहूचा विजय झाला. या विजयास जो पुरुष मुख्यतः कारणीभूत झाला त्यांचें नांव बाळाजी विश्वनाथ भट होय. यापुढें ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी कोल्हापुरांत राहूं लागलीं. राजारामाची दुसरी बायको राजसबाई व तिचा मुलगा संभाजी यांना बाळाजीनें आपल्या बाजूस वश करून घेतलें व त्याच्या मदतीनें बाळाजीनें ताराबाईचा पराभव घडवून आणला. शाहूनें बाळाजीची कर्तबगारी लक्षांत घेऊन त्याची आपल्या पंतप्रधानाच्या जागेवर नेमणूक केली.

३. सय्यद बंधूंस साह्य :—परंतु हें प्रकरण एवढ्यावर संपणारें नव्हतें. दिल्लीच्या बादशाहानें या वेळीं निजाम-उल्-मुल्क यास दक्षिणचा सुभेदार म्हणून पाठविलें. त्यानें सातार्‍यास शाहू व कोल्हापुरास संभाजी असे मराठी राज्याचे दोन वारसदार पाहून त्यांच्यांत भांडण लावून दिलें. या भांडणाचा एकदाचा शेवट केला पाहिजे, तसेंच शाहूची आई येसूबाई दिल्लीस बादशाहाच्या कैदेंत होती तिला सोडवून आणावें हाही हेतु बाळाजीच्या मनांत होता. याच सुमारास दिल्ली येथें बादशाह फर्रुक्सिअर व त्याचे दोन कर्ते वजीर, जे सय्यदबंधू या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहेत, यांच्यांत भांडण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागलें होतें. बादशाह त्यांच्या मदतीनें गादीवर बसून पुनः त्यांच्यावरच उलटला होता. तेव्हां बादशाहाची खोड मोडण्यासाठीं सय्यदबंधूंना कुणाची-तरी मदत हवी होती. ती त्यांनीं बाळाजीजवळ मागतांच बाळाजीनें सय्यद बंधूचें म्हणणें मान्य केलें व कराराप्रमाणें मराठे सय्यदबंधूबरोबर दिल्लीस गले. सय्यदबंधूंनीं फर्रुक्सिअर यास ठार मारून व आणखी दोघांस बाजूस सारून रोशन अख्तार ऊर्फ महंमदशाह यास गादीवर बसविलें. सय्यदबंधूंनीं मराठ्यांचें ऋण चांगल्या प्रकारें फेडलें व येसूबाईची मुक्तता केली. शाहूस मराठी राज्याचा वारस म्हणून मान्यता दिली. याखेरीज दक्षिणच्या सहा सुभ्यांवर मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखीचे हक्क दिले. याचा अर्थ, पुणें–सातारा–कोल्हापूर या भागांतील मराठ्यांच्या स्वतंत्र राज्यास मान्यता देऊन शिवाय नर्मदेच्या दक्षिणेकडील मोगलांचे जे सहा सुभे होते त्यांच्या रक्षणाची जबाबदारी मराठ्यांवर टाकली व त्याच्या खर्चासाठीं तेथील वसुलाच्या एकंदर चौथा हिस्सा (चौथाई) मराठ्यांना द्यावयाचा असें ठरलें. खेरीज सरदेशमुखीचा (एकंदर वसुलाचा दहावा हिस्सा) हक्कही मराठ्यांस मिळाला.

४. राज्यविस्ताराच्या मार्गावर :—यामुळें शाहूचें आसन स्थिर झालें, राजसबाईचा पक्ष मागें पडला. दिल्लीस जाऊन आल्यानें मराठ्यांच्या कर्तृत्वास उत्तरेंत वाव आहे हें बाळाजीच्या लक्षांत आलें व त्यानें ठिकठिकाणीं मराठे सरदारांची नेमणूक केली. गुजराथेंत खंडेराव दाभाडे, वऱ्हाडांत परसोजी भोसले, माळव्यांत उदाजी पवार, कर्नाटकांत फत्तेसिंग भोसले, कोंकणांत कान्होजी आंगरे, निरा व वारणा या नद्यांचे प्रदेशांत प्रतिनिधि अशा निरनिराळ्या सरदारांच्या नेमणुकी झाल्या. प्रत्येक सरदारानें नेमून दिलेल्या आपापल्या प्रदेशांत पराक्रम करावे, वसूल घ्यावा व त्याचा हिस्सा छत्रपतीस द्यावा असा करार ठरला.

५. बाजीराव :—(इ. स. १७२०–४०) या व्यवस्थेंतूनच पुढें मराठ्यांचें साम्राज्य निर्माण करण्याचें काम बाळाजी विश्वनाथाचा मुलगा बाजीराव यानें केलें. बाळाजी इ. स. १७२० त मृत्यु पावल्यावर शाहूनें त्याची योग्यता पाहून त्याची पेशवे पदावर नेमणूक केली. बाजीरावास चिमाजीआप्पा नांवाचा धाकटा भाऊ होता. पुढील वीस वर्षभर बाजी-चिमाजीची जोडी सबंध उत्तर हिंदुस्थानभर विजेच्या लखलखीप्रमाणें चमकत फिरत होती. या वेळीं शाहूच्या दरबारीं श्रीपतराव प्रतिनिधि होते. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, उत्तरेस मुलुखगिरी करण्यास धांव घेण्यापूर्वी अगोदर दक्षिणेंत मराठ्यांची सत्ता निरंकुश करावी. याबद्दल छत्रपतींच्या दरबारीं एकदां वाद चालू असतां बाजीरावानें उत्तर दिलें कीं, 'मोगल सत्तेचें मूळ दिल्लींत आहे. अयोध्येचा वजीर, बंगालचा नबाब, हैद्राबादचा निजाम या सर्व वृक्षाच्या फांद्या आहेत. मूळच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपटून टाकलें म्हणजे फांद्या आपोआपच खालीं येतील.' बखरींत वर्णन केलेली ही आख्यायिका कितपत खरी असेल ती असो; परंतु बाजीरावाच्या सर्व हालचाली या धोरणानें चालू होत्या. प्रथम त्यानें शाहू व संभाजी यांच्यांत पुन: वाद उत्पन्न झाला असतां त्यांचें सख्य करून दिलें. निजामानें मराठ्यांत वाद उत्पन्न केला, हें पाहून त्याचा पालखेड येथें त्यानें पराभव केला. उत्तरेंत बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल यानें मोगलांचा सुभेदार महंमदखान बंगष याच्या विरुद्ध स्वत:चा बचाव करण्यासाठीं बाजीरावाची मदत मागितली असतां बाजीराव तिकडे धांवून गेला व जैतपूरच्या लढाईंत महंमदखानाचा मोड करून त्यानें छत्रसालास वांचविलें. अशा रीतीनें मराठ्यांचा भगवा झेंडा बुंदेलखंडांत चमकला. याच सुमारास बाजीरावाचा भाऊ चिमाजीआप्पा यानें माळव्याचा मोगल सुभेदार गिरधरबहाद्दर याचा सारंगपूरच्या लढाईंत पराभव केला. अशा रीतीनें माळवा व बुंदेलखंड अशी मराठ्यांची वर्चस्व मिळविलेल्या प्रदेशाची सांखळी निर्माण झाली. गुजराथेंतही याप्रमाणें खट-पट चालू होती. परंतु तेथील सरदार त्रिंबकराव दाभाडे हा निजामाच्या चिथावणीनें बाजीरावास त्रास देऊं लागला. तेव्हां बाजीरावानें इ. स. १७२९ सालीं डभईच्या लढाईंत त्यास ठार केलें. यापुढें गुजराथेंत दाभाडे मागें पडून तेथें गायकवाड पुढें आले.


बाजीराव

६. शिंदे-होळकरांचा उदय :—माळव्यांत धार येथें पवार होतेच; पण त्यांच्या-खेरीज त्यानें स्वत:चे असे दोन विश्वासू सरदार नेमले. ते मल्हारराव होळ-कर व राणोजी शिंदे हे होत. मल्हारराव धनगराचा मुलगा व राणोजी हा प्रारंभीं बाजीरावाजवळ हुजऱ्या म्हणून काम करीत असे. पण बाजीरावानें त्याच्या अंगचे गुण ध्यानीं घेऊन वर चढविलें. यापुढें मल्हारराव इंदूर येथें व राणोजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उज्जयिनीस राहूं लागला. उत्तर मराठेशाहीचा इतिहास या शिंदे-होळकरांच्या पराक्रमानें भरलेला आहे.

७. **राजपुतांशीं सख्य** :—याप्रमाणें बाजीराव माळव्यांत वर्चस्व स्थापन करीत असतां राजपुतान्यांतील उदेपूर व जयपूर येथील राजांचें बाजीरावाच्या पराक्रमांकडे लक्ष होतें. बाजीरावाचे पराक्रम ऐकून त्यांना हर्ष झाला. बाजीराव लवकरच जयपूर येथें सवाई जयसिंगास भेटला असतां उभयतांचें मित्रत्वाचें बोलणें झालें. पुढें, बाजीरावाची आई राधाबाई ही इ. स. १७३४ त काशीयात्रेस निघाली असतां राजपुतान्यांतून पुढें गेली; तेव्हां उदेपूर व जयपूर येथील राण्यांनीं तिचा मोठा सन्मान केला. इतकेंच नव्हे तर एके काळीं बाजीरावाशीं लढणारा महंमदखान बंगष या वेळीं अलाहाबादेस सुभेदार होता. त्याला बाजीरावानें आपल्या मातुश्रीच्या काशीयात्रेच्या व्यवस्थेबद्दल लिहिलें असतां त्यास जबाब म्हणून महंमदखान लिहितो, "रायाहीं आम्हांस स्मरण करून पत्र लिहिलें व आमचे भरंवशावर पाठविलें तर त्यांची मातुश्री व आमची दोन नाहींत*." बाजीरावाचा उत्तरेंत कसा बस बसत चालला होता याचें राधाबाईची काशीयात्रा हें एक उत्तम उदाहरण आहे. उदेपूर–जयपूरचे राजे व बाजीराव हे सर्व एकमेकांस भेटले असतां त्यांचीं काय खलबतें झालीं असतील याची कल्पनाच केली पाहिजे.

८. **भोपाळचा संग्राम** :—बाजीरावाचें हें वाढतें वजन पाहून निजामाच्या पोटांत दुखूं लागलें. बाजीराव असाच पुढें उत्तरेस गेल्यास दिल्लीस जबरदस्त होऊन बसेल व बादशाहास तो आपल्या काबूंत आणील असें वाटून निजाम बाजीरावाचा बंदोबस्त करण्यासाठीं म्हणून उत्तरेंत आला. तेव्हां बाजीराव क्षणमात्र विलंब न करतां त्याच्यावर चालून गेला व त्याचा भोपाळ येथें संपूर्ण पराभव केला (इ. स. १७३७). भोपाळच्या विजयामुळें उभ्या हिंदुस्थानांत बाजीरावास कोणी प्रतिस्पर्धी उरला नाहीं. मराठ्यांची सत्ता यापुढें भारतांत साम्राज्यसत्ता होणार असा रंग दिसूं लागला.

९. **नादिरशाहाची स्वारी** :—इतक्यांत इराणचा बादशाह नादिरशाह भारतावर स्वारी करून आला. पंजाब आक्रमण करून त्यानें पानिपतनजीक कर्नाळ येथें मोगल फौजेचा पराभव केला. बाजीराव त्या वेळीं दक्षिणेंत होता. नंतर नादिरशाहानें थेट दिल्लीवर चाल केली. तेथें कांहीं निमित्त होऊन नादिरशाहा संतप्त झाला व त्यानें राजधानीची दुर्दशा केली व सुमारें वीस हजार लोकांची कत्तल केली. अखेर बादशाह डोळ्यांत आंसवें आणून हात जोडून शरण आला तेव्हां नादिरशाहानें कत्तल थांबविली.

*पेशवे दप्तर खं. ३० ले. १३४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इराणांत परत जातांना त्यानें प्रसिद्ध मयूरासन आपल्या बरोबर नेलें. त्यानें नेलेल्या एकंदर लुटीचा आंकडा सुमारें ७० कोट रुपयांचा होता.

१०. **बाजीरावाचा मृत्यु** :—हें वर्तमान दक्षिणेंत बाजीरावास समजतांच बाजीराव उत्तरेस निघाला. पण दिल्लीस पोंचण्यापूर्वींच तो नर्मदेच्या कांठीं रावेर येथें मृत्यु पावला (इ. स. १७४०). त्या वेळीं तो अवघा ४० वर्षांचा होता. त्याचा भाऊ चिमाजी यानें या काळांत कोंकणांत सिद्दी व पोर्तुगीज यांचा पराभव केला होता व वसईचा किल्ला मोठ्या शर्थीनें पोर्तुगीजांपासून जिंकून घेतला (इ. स. १७३९).

११. **दिल्ली दरवाजा** :—वर बाजीरावाच्या पराक्रमाचें त्रोटक वर्णन दिलें आहे. त्यावरून त्याचें धोरण लक्षांत येईल. पुण्यास बाजीरावानें जो शनवारवाडा बांधला त्याच्या उत्तरेकडील दरवाजास 'दिल्ली दरवाजा' हें नांव आहे. बाजीरावाचें मनोगत या नांवानें उत्तम प्रकारें व्यक्त होतें.



शनवारवाडा-दिल्ली दरवाजा

१२. **उत्तर हिंदुस्थानांत विस्तार** :—बाजीरावाच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा बाळाजी बाजीराव यास शाहूनें प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. यास नानासाहेब म्हणत. याच्या कारकीर्दींत पेशव्यांनीं माळव्याच्या चौथाई हक्काची सनद पक्की केली. नागपूरचा रघूजी भोसले हा पेशव्यास न जुमानतां स्वतंत्र मोहिम करीत होता त्यास पायबंद घातला. यापूर्वींच भोसल्यानें बंगाल प्रांतावर एकावर एक स्वाऱ्या करून तेथील नवाबास हैराण केलें होतें. या पराक्रमामुळें ओरिसा प्रांत मराठ्यांच्या कक्षेंत आला. एवढ्यावर न थांबतां मराठ्यांचे सरदार शिंदे व होळकर यांनीं दिल्ली येथें वजिराशीं संगनमत करून दक्षिणेस नर्मदेपासून उत्तरेस पंजाबांत अटक नदीपर्यंतच्या प्रदेशांतून चौथाई गोळा करण्याचा हक्क बादशाहाकडून कबूल करून घेतला (इ. स. १७५०). याच्या आदल्या वर्षीं इ. स. १७४९त शाहू मृत्यु पावला व त्याच्या सूचनेप्रमाणें ताराबाईचा नातु रामराजा हा छत्रपति झाला. परंतु मराठ्यांची सर्व कर्तुमकर्तुम् सत्ता नानासाहेबांच्या हातीं आली. पेशवे हे पुण्यास रहात असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यापुढें मराठ्यांचीं धोरणें येथून आंखलीं जाऊं लागलीं व साताऱ्याचें महत्त्व कमी होऊन पुण्याचें राजकीय महत्त्व वाढलें.

१३. मराठमंडळ:—पहिल्या बाजीरावानें उत्तरेकडे मराठी राज्य वाढवितांना राणोजी शिंदे, मल्हारराव होळकर इत्यादि सरदारांना हाताशीं धरलें व त्यांच्याकडे जिंकलेल्यां प्रांताचा कारभार दिला. त्याचे अगोदर नागपूरचे बाजूस रघूजी भोसले मराठी राज्य वाढविण्याचें व रक्षिण्याचें काम करीत होता. उत्तर पेशवाईच्या काळांत दक्षिणेकडे पटवर्धन घराणें हें काम पाहूं लागलें. हे सर्व सरदार आपल्या मुलुखांत आपल्या मनाप्रमाणें कारभार पाहात. तेथील वसूल गोळा करणें, न्याय देणें हीं कामें त्यांच्या मर्जीनें चालत. त्यांचे हिशेब तपासण्याचा अधिकार छत्रपतीकडे होता; या सरदारांना आपल्या वसुलांतील ठराविक हिस्सा छत्रपतींना द्यावा लागे व युद्धप्रसंगीं सैन्य घेऊन साह्य करावें लागे. त्यांच्यावर छत्रपतीचा ताबा असे. सामान्यपणें शाहूच्या आज्ञेंत हे सरदार वागत. शाहूच्या मृत्यूनंतर आपल्या मनासारखें वागण्याची वृत्ति त्यांच्यांत अधिक प्रमाणांत दिसूं लागली. यामुळें मराठी राज्य एकछत्री असलें तरी एकसूत्री राहिलें नाहीं. या घराण्यांचे संस्थापक जितके राजनिष्ठ राहिले तितके नंतरचे राहिले नाहींत. पण त्यांना वंशपरंपरा हे अधिकार मिळाले असल्यानें छत्रपति किंवा पेशवे कांहीं करूं शकले नाहींत. अशा स्थितींत व्यक्तिगत स्वार्थ किंवा आपसांतील द्वेष बळावून मुख्य उद्देशाकडे या सरदारांचे दुर्लक्ष होत असे. माधवरावासारखा समर्थ व धोरणी पेशवा त्यांना कामास जुपूं शकला; पण इतर वेळीं जो तो आपल्यापुरतें पाही. दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं या प्रकाराचा कळस झाला व मराठा राजमंडळ कोसळून पडलें ! ब्रिटिश राजवटींत त्यांतील कांहीं जण संस्थानिक म्हणून नांदले.

१४. आपसांतील वैराग्नि :—शाहूच्या मृत्युनंतर पेशवे प्रमुख बनले ही घटना मराठमंडळाचें स्वरूप बदलून टाकण्यास करणीभूत झाली. पूर्वी पेशवे हे अष्टप्रधानांपैकीं एक असत. आतां ते इतरांहून श्रेष्ठ झाले व शाहूनें त्यास मान्यता दिली याचें इतर सरदारांस मोठें वैषम्य वाटलें; परंतु पेशव्यांनीं आपलें वर्चस्व पराक्रमानें संपादन केलें व राखलें होतें. इतर सरदार त्यांच्या मानानें नि:संशय कमी कर्तृत्ववान होते असा प्रकार होता. तरी सुद्धां नानासाहेबानें स्वत:स मिळालेल्या या वर्चस्वाचा संयमानें उपयोग करावयास हवा होता. दुर्दैवानें तसें मात्र त्याच्या हातून घडलें नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्या ठिकाणीं आपलें वर्चस्व स्थापन झालें नसेल, तेथील गृहकलहाचा फायदा घेऊन व कधीं कधीं शत्रुपक्षाची मदत घेऊनही स्वकीय विरोधकांचा मोड करण्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आत्मघातकी धोरण त्यानें अंगिकारिलें. विजयदुर्गच्या तुळाजी आंग्र्याचा याच पद्धतीनें त्यानें इंग्रजांची मदत घेऊन मोड केला व आंग्र्यांची म्हणजे पर्यायानें मराठ्यांचीच आरमारी सत्ता कमकुवत केली. उत्तरेस शिंदे व होळकर यांनींही बाजीरावानें घालून दिलेलें सख्यत्वाचें धोरण पुढें चालू ठेवण्याऐवजीं नानासाहेबाचा कित्ता गिरविला व जयपूर–जोधपूर येथील गृहकलहाचा फायदा घेऊन तेथें मोहिमा केल्या. अर्थातच राजपुतांचा मराठ्यांबद्दल एकेवेळीं जो अनुकूल ग्रह होता तो पुढें कायम राहिला नाहीं हें सांगणें नकोच. एवढ्यानें भागलें नाहीं म्हणूनच कीं काय शिंदे व होळकर यांची आपसांत चुरस वाढली. इतकेंच नव्हे तर मल्हारराव होळकरासारख्यास तर पेशव्याच्या वर्चस्वाचेंच वैषम्य वाटूं लागलें.

१५. **अहमदशाह अबदालीची स्वारी** :––या सर्व फुटीरपणाचे दुष्ट परिणाम ताबडतोब दिसून आले नाहींत. मराठ्यांची फौज दमदार असल्यानें ते जातील तेथें विजय संपादन करीत होते. नानासाहेबाचा चुलतभाऊ सदाशिवराव यानें कर्नाटकांत स्वाऱ्या करून तेथें विजय संपादन केला व उदगीरच्या लढाईंत निजामचा पराभव केला. नानासाहेबाचा धाकटा भाऊ राघोबा यानें एकामागें एक दोन स्वाऱ्या करून अटकेपार मराठ्यांचा भगवा झेंडा फडकविला व दिल्लीच्या बादशाहास स्वतःच्या हातचें बाहुलें करून ठेवलें. अर्थातच या सर्वांविरुद्ध उत्तर भारतांत फार जोरानें प्रतिक्रिया सुरू झाली. अयोध्येचा वजीर, दिल्लीचा गाजिउद्दीन, रोहिले, पठाण हे सर्व एक होऊन त्यांनीं काबूल येथें राज्य करीत असलेल्या अहमदशाह अबदालीस साहचास बोलाविलें. यापूर्वी तो एक दोन वेळ भारतावर स्वारी करण्यास येऊन गेलेला होता. यावेळीं अबदाली इ. स. १७५९ त सिंध प्रांतांत येऊन तेथून पंजाबांत आला व लाहोर काबीज करून तेथून तो नजीब व अयोध्येचा वजिर यांच्याशीं संगनमत करण्यासाठीं अंतर्वेदींत गंगा व यमुना यांमधील प्रदेशांत शिरला. त्यास विरोध करण्यासाठीं दत्ताजी शिंदे वेगानें दिल्लीस आला असतां, दत्ताजी व अबदाली यांचें यमुनेच्या घाटावर युद्ध झालें. त्यांत दत्ताजी पडला (इ. स. १७६०); व मराठ्यांच्या एकसारख्या होत असलेल्या विजयास पराभवाचा पहिला हादरा बसला.

१६. **पानिपत** :––दत्ताजी पडल्याची बातमी दक्षिणेंत येऊन पोहोंचतांच स्वारीची तयारी झाली. या स्वारीवर सदाशिवराव भाऊची नेमणूक झाली. त्यानें मोठ्या वेगानें चाल करून १ ऑगस्ट १७६० ला दिल्ली काबीज केली व तसाच सत्तर मैलांवर उत्तरेस जाऊन कुंजपुरा हें ठिकाण त्यानें काबीज केलें. हेतु हा कीं, अबदालीचा अंतर्वेदींतून परत पंजाबांत जाण्याचा मार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोखून धरावा, आपण स्वतःच अंतर्वेदींत त्याच्या अंगावर चालून जावें व दत्ताजीच्या वधाचा पुरेपूर बदला घ्यावा. पण दुर्दैवानें हें घडून आलें नाहीं. स्वतः अबदालीनें बागपतनजीक यमुना नदी ओलांडून तो पश्चिम तीरावर आला व दिल्ली आणि कुंजपुरा यांच्यामध्यें उभा राहून त्यानें भाऊचें दिल्लीशीं असलेलें दळणवळण तोडून टाकलें! (नोव्हेंबर १७६०) येथून पुढें दोन महिने भाऊ व अबदालीचीं सैन्यें पानिपतनजीक एकमेकांसमोर एकमेकांच्या हालचालीचा ठाव घेत बसलीं. त्यांत अबदालीस यमुनेच्या पलीकडील तीरावरून वजिराकडून दाणासामग्री व मदत पोहोंचत होती; पण भाऊसाहेबाचें दिल्लीशीं दळणवळण तुटल्यानें त्यास फाके पडत होते. शेवटीं गोष्ट निकरावर आली व १४ जानेवारी १७६१ रोजीं भाऊ व अबदाली यांच्या सैन्यांत जें निकराचें युद्ध झालें त्यांत मराठ्यांचा सपशेल पराभव झाला. भाऊ मृत्युमुखीं पडला व मराठ्यांच्या फौजेची बरीच मोठी कत्तल झाली. या लढाईंतून मल्हारराव होळकर वगैरे जे सरदार वेळींच जीव बचावून निघून गेले तेवढेच वांचले. पानिपतच्या पराभवाचें वर्तमान नानासाहेबास कळलें व त्यास मोठा धक्का बसला. नंतर तो थोडक्याच दिवसांत मृत्यु पावला (इ. स. १७६१).

१७. थोरले माधवराव (इ. स. १७६१–७२) :—पानिपतच्या युद्धाचे परिणाम फार दूरवर झाले. मराठ्यांना आपली घडी बसविण्यास व सत्ता सांवरून धरण्यास फारच प्रयास पडले. तरी नानासाहेबाच्या मागून पेशवाईपदावर आलेला त्याचा मुलगा थोरला माधवराव यानें तें कार्य बऱ्याच यशस्वी रीतीनें पार पाडलें. या कामीं त्याचा चुलता राघोबा यानें त्यास मदत करण्याऐवजीं पेशवाई-अधिकारांत वांटा मागण्यास सुरुवात केली. पण माधवरावानें मोठ्या युक्तीनें आपल्या स्वकीय-शत्रूस काबूंत ठेवलें व इ. स. १७६३ त निजामाचा राक्षसभुवन येथें पराभव केला. दक्षिणेंत

थोरले माधवराव

म्हैसूरच्या राज्यांत हैदर नांवाचा शिपाई सैन्यांत प्रबळ होत होत मोठ्या अधिकारावर आला व अखेर तेथील हिंदु राजा चिक्क कृष्णराय यास पदच्युत करून आपणच गादी बळकावली. मराठ्यांना पानिपतच्या धक्क्यामुळें हैदरच्या या पुंडाईकडे लक्ष देण्यास फावलें नव्हतें. आतां माधवरावानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिकडे लक्ष पुरवून दक्षिणेंत सैन्य पाठविलें, हैदरअल्लीचा पराभव केला व त्यास तुंगभद्रेच्या दक्षिणेस हांकून दिलें. याखेरीज त्यानें उत्तरेंत दोन स्वाऱ्या पाठवून मराठ्यांची सत्ता फिरून दिल्ली येथें प्रस्थापित केली. इतकेंच नव्हे तर, दिल्लीचा बादशाह पानिपतोत्तर काळांत इतके दिवस अलाहाबादचे बाजूस राहात असे; तो मराठ्यांचा आधार घेऊन दिल्ली येथें राहूं लागला. परंतु याच सुमारास माधवराव आजारी पडल्यानें उत्तरेंतील कार्य अर्धवट राहिलें. माधवराव इ. स. १७७२ त मृत्यु पावला. तेव्हां तो अवघा २८ वर्षांचा होता. इतक्या लहान वयांत विस्कटलेली घडी पुनः सांवरण्याचें कर्तृत्व करून दाखविणाऱ्या माधवरावाची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे.

हैदर

१८. सदोष सरंजामी पद्धति :—हें सर्व खरें असलें तरी, पेशव्यांच्या आक्रमक धोरणामुळें मराठे सरदारांत जी फुटीर वृत्ति बळावली होती तिचें बीज या काळांत नष्ट झालें नाहीं. माधवरावाच्या धाकानें सर्व गप्प बसले खरे, परंतु राज्याचे आधारस्तंभ असणाऱ्या सर्व मराठे सरदारांना एकत्र बोलावून मराठी राज्याची घडी बसविण्याबाबत विचारविनिमय करून सुरळीत अंतर्व्यवस्था निर्माण करावी, यांतलें त्याला कांहीं साध्य झालें नाहीं. युद्धखर्चासाठीं पैसा गोळा करण्याची पद्धत सदोष असल्यामुळें जो तो मराठा सरदार आपल्या जहागिरीच्या मुलुखाच्या सुरक्षिततेकडें पाही व मध्यवर्ती सत्तेला मनोभावें मदत करण्याऐवजीं अंग राखून काम करी. इतकेंच नव्हे तर, यापुढील काळांत कर्तबगार सरदारांस मराठमंडळांत आपण प्रमुख व्हावें व शक्य तर पुण्याचीं सूत्रेंही आपल्या हातीं असावीं असें मनांतून वाटत असे. साताऱ्चे छत्रपती मागें पडून पेशवे जसे पुढें आले, तसेंच त्यांना मागें सारून शक्य तर आपण प्रामुख्य संपादन करावें ही ईर्ष्या बळावली. यांतच मराठेशाहीच्या नाशाचें बीज आहे. असो.

१९. नारायणरावाचा खून :—थोरल्या माधवरावाच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ नारायणराव हा पेशवा झाला. परंतु त्याचा थोड्याच दिवसांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खून झाला. हें कृत्य नारायणरावाचा चुलता राघोबा व त्याची कारस्थानी पत्नी आनंदीबाई यांच्या चिथावणीनें झालें. नारायणरावास मारावें असा त्यांचा बेत नसला तरी नारायणरावास पकडण्याच्या कटांत राघोबाचा निःसंशय हात होता. नारायणरावाचा खून झाल्यामुळें पेशवाईंतील लोक राघोबाविरुद्ध खवळले. तेव्हां राघोबा पळून इंग्रजांकडे गेला. त्याच्यामागें नाना फडणवीस, सखाराम बापू वगैरेंनीं बारभाई मंडळ स्थापन केलें. नारायणरावाच्या मृत्यूनंतर लवकरच त्याची पत्नी प्रसूत झाली व तिला जो मुलगा झाला त्याचें नांव सवाई माधवराव असें ठेवून त्याच्या नांवानें पेशवाईची ग्वाही फिरविली.

२०. **इंग्रजांचा पराभव** :—इकडे राघोबानें इंग्रजांची मदत मिळवून तो पुण्यावर चाल करून आला. परंतु वडगांव मुक्कामीं इंग्रजी फौजेचा पराभव होऊन तीस परत फिरावें लागलें. यानंतर फिरून एकवार इंग्रजी व मराठी फौजांचा सामना झाला. नाना फडणविसानें उत्तरेस महादजी शिंदे, नागपूरचा जानोजी भोसले, हैद्राबादचा निजाम व दक्षिणेंत श्रीरंगपट्टण येथील हैदर यांचा एक संघ घडवून आणून इंग्रजी सैन्यास तोंड दिलें. अखेर हें युद्ध इंग्रजांस आवरेना, तेव्हां महादजीच्या मध्यस्थीनें इंग्रज-मराठ्यांत साल्बाई येथें तह घडून आला (इ.स. १७८३). वास्तविक नाना फडणविसाच्या मनांत तह करावयाचा नव्हता. कारण या वेळीं इंग्रजांस पुरतें जेरीस आणणें शक्य होतें. पण हैदर मृत्यु पावला, निजाम व भोसले यांनीं त्याच्या आधींच युद्धांतून अंग काढून घेतलें, तेव्हां नानानें तह मान्य केला. इंग्रजांस राघोबाचा पक्ष सोडावा लागला.

महादजी

२१. **महादजीचा पराक्रम** :—यापुढील दहा वर्षांत उत्तरेंत महादजी शिंदे यानें आपलें वर्चस्व बसविलें. त्यास राजपुतांनीं विरोध केला; पण तो त्यानें मोडून काढला. जनरल डिबॉइन या युरोपियन लष्करी अंमलदारास नोकरीस ठेवून त्यानें अद्ययावत् सैन्य तयार केलें. आग्रा येथें दारुगोळ्याचा कारखाना काढला. उत्कृष्ट सेनानी तयार करून त्यांची ठिकठिकाणीं नेमणूक केली. यानंतर लवकरच महादजी हा दिल्लीच्या बादशाहाचा कर्तुमकर्तुम् अधिकारी बनला. त्यास वकील-इ-मुत्लक हा अधिकार बादशाहानें दिला; पण त्यानें तो स्वतःसाठीं न घेतां आपला धनी जो पेशवा त्याच्यासाठीं राखून ठेवून,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अहिल्याबाई

आपण पेशव्यांतर्फे तेथील अधिकार चालवूं लागला. याप्रमाणें हिंदुस्थानांत मराठ्यांची सत्ता कळसास पोहोंचली असतां इ. स. १७९४ त महादजी मृत्यु पावला. त्याच्या पुढील वर्षी इंदूर येथें मोठ्या कर्तबगारीनें कारभार करणारी अहिल्याबाई होळकर ही मृत्यु पावली. अहिल्याबाई ही मोठी साध्वी, दानधर्मशील व स्वाभिमानी स्त्री होती. तिची कीर्ति त्या वेळीं भारतखंडभर पसरली होती. म्हैसूरच्या हैदरचा मुलगा टिपू सुलतान हाही तिला पूज्य मानीत असे.

२२. नाना फडणविसाचा मृत्यु (१८००) :—इ. स. १७९५ त पेशवा सवाई माधवराव यानें वायूच्या भ्रमांत शनवारवाड्यांत वरच्या मजल्यावरून खालीं कारंज्यावर उडी मारली व त्यांत त्याचा शेवटीं अंत झाला. त्याच्या मृत्यूनें कुणास पेशवा करावें असा प्रश्न येऊन पडला. राघोबादादाचा मुलगा बाजीराव हा सवाई माधवरावाच्या वयाचा होता. त्यास नाना फडणविसानें कैदेंत ठेवलें होतें. कारण तो बापाप्रमाणेंच कारस्थान करील अशी भीति होती. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर बरीच भवति न भवति होऊन अखेर त्यासच पेशवा करावयाचें ठरलें. बाजीरावाच्या अंगीं कर्तृत्व नव्हतें. त्यानें नानाच्या विरुद्ध कारस्थानें करून त्यास कैदेंत टाकलें. पुढें त्याची सुटका केली. अशा स्थितींत नाना फडणवीस मृत्यु पावला (इ. स. १८००). त्याच्या मृत्यूनंतर पेशवाईंत कोणी शहाणा मुत्सद्दी उरला नाहीं. मराठेशाही उघडी पडली.

नाना फडणवीस

२३. इंग्रजांशीं दुसरें युद्ध :—नानाच्या मृत्यूनें बाजीरावास निरंकुश सत्ता प्राप्त झाली. त्यानें महादजीचा वारस दौलतराव शिंदे यास हाताशीं धरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होळकरावर सूड उगवण्याची तयारी केली. विठूजी होळकरास हत्तीच्या पायीं देऊन ठार मारलें. हें वृत्त उत्तरेस यशवंतराव होळकरास कळतांच तो पुण्यावर चाल करून आला व त्यानें दौलतराव शिंदे व पेशवे यांच्या फौजेचा पराभव केला. तें पाहून बाजीराव पळून वसईस इंग्रजांकडे मदतीची याचना करण्यासाठीं गेला. अशा रीतीनें त्यानें आपल्या बापाचें अनुकरण केलें! इंग्रजांनीं बाजीराव सदैव आपल्या संरक्षणाखालीं राहील व आपल्या तंत्रानें चालेल अशा प्रकारचा त्याच्याशीं करार करून घेतला. खरें म्हटलें तर मराठ्यांचें स्वातंत्र्य या वसईच्या तहानें नष्ट झालें. कै. वासुदेवशास्त्री खरे म्हणतात त्याप्रमाणें 'मराठ्यांच्या स्वातंत्र्यसौभाग्याचा कुंकुमतिलक तिच्याच त्या नादान पोरानें त्या तहाच्या चिठोऱ्यानें पुसून टाकला' (३१ डिसेंबर १८०२). या तहाप्रमाणें गव्हर्नर जनरलचा भाऊ सर आर्थर वेलस्ली यानें बाजीरावास पुण्याच्या गादीवर आणून बसविलें व शिंदे-होळकरादि मराठे सरदारांस कळविलें कीं, ज्या अर्थीं पेशवा हा मराठमंडळांत प्रमुख आहे, त्या अर्थीं त्यानें केलेला तह तुम्हां सर्वांवर बंधनकारक आहे. या सरदारांनीं वेलस्लीचें हें म्हणणें मान्य केलें नाहीं. अशा रीतीनें मराठ्यांचें इंग्रजांशीं दुसरें युद्ध उद्भवलें. दुर्दैवानें याही वेळीं मराठे सरदारांत एकजूट झाली नाहीं. शिंदे व भोसले यांचा सर आर्थर वेलस्ली यानें असई येथें पराभव केला. कारण शिंद्याच्या पदरच्या युरोपियन अधिकाऱ्यांस इंग्रजांशीं युद्धप्रसंग नको म्हणून त्यांनीं आपल्या अधिकारांचे राजिनामे दिले; व यामुळें शिंद्याचें कवाइती सैन्य आपली कामगिरी बजावूं शकलें नाहीं. पुढें भोसल्याचा आडगांव येथें पुनः पराभव झाला. उत्तरेस जनरल लेकनें लासवारी येथें शिंद्याचा पराभव केला. अशा रीतीनें शिंदे व भोसले यांच्याशीं इंग्रजांचें युद्ध संपल्यावर होळकर युद्धास सज्ज झाला. त्यानें कांहीं काळ इंग्रजास दमविलें. उत्तरेस जाऊन शीखांशीं संगनमत करण्याचा त्यानें यत्न केला. पण तें जमलें नाहीं. अखेर त्याचाही दीग येथें पराभव झाला. अशा रीतीनें प्रमुख मराठे सरदारांची इतिश्री झाली. यापुढें हे तिघे हतबल स्थितींत आपापल्या संस्थानांचा कारभार पाहूं लागले (इ. स. १८०५).

२४. **मराठेशाहीचा शेवट**:—यापुढील बारा वर्षें बाजीरावानें पुण्याची पेशवाई भोगली. या काळांत तो इंग्रजी सत्तेच्या जाचांतून मुक्त होण्याची गुप्त खटपट करीत होता; पण त्यांत त्यानें पुरेशी सावधगिरी बाळगली नाहीं. यामुळें पुण्याच्या दरबारीं असलेला रेसिडेंट एल्फिन्स्टन यास बाजीरावाचीं कारस्थानें कळत. अखेर बाजीराव पेशवा व गायकवाड या उभयतांचा देण्याघेण्याच्या व्यवहारावरून वाद निघाला असतां तो तोडण्यासाठीं गंगाधरशास्त्री पटवर्धन बडोद्याहून पुणें दरबारीं आला. गायकवाड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हेही इंग्रजाचे संरक्षित असल्यानें या वादांत इंग्रजांनीं मध्यस्थाची भूमिका घेऊन शास्त्री याच्या संरक्षणाची हमी घेतलेली होती. पुढें गंगाधरशास्त्री याचा पंढरपूर येथें खून झाला. त्याबद्दल एल्फिन्स्टननें बाजीरावास जबाबदार धरलें. अखेर या वादांतून इंग्रजांशीं तिसरें युद्ध उद्‌भवलें. या युद्धांत पुण्यास पेशवे, नागपुरास भोसले व इंदुरास होळकर हे सामील झाले. शिंदे अलिप्त राहिला. सातारचे छत्रपती यांस इंग्रजांनीं आपल्या पाठीशीं घातलें व त्यांच्याकडून बाजीराव हा इंग्रजांशीं लढण्यांत तो छत्रपतीशीं बंडखोर होऊन लढत आहे असा जाहीरनामा काढविला. त्याचा त्या वेळीं बराच परिणाम झाला. या प्रसंगीं झालेल्या युद्धांत होळकरचा महीदपूर येथें व भोसले याचा सिताबर्डी येथें पराभव झाला. पेशव्यांच्या फौजेचा खडकी, कोरेगांव व अष्टें येथें पराभव झाला. खडकीच्या लढाईनंतर १७ नोव्हेंबर १८१७ रोजीं इंग्रजांचें निशाण शनवारवाड्यावर फडकूं लागलें. अष्ट्याच्या लढाईंत बाजीरावाचा स्वामिभक्त शूर सेनानी बापू गोखले हा लढतां लढतां मृत्यु पावला. बाजीरावाच्या पराभवानंतर पेशव्याचें राज्य खालसा झालें व होळकर आणि भोसले हे इंग्रजांचे मांडलिक बनले. बाजीरावास दरसाल आठ लक्षांची नेमणूक झाली. ती घेऊन ब्रह्मावर्त (कानपूरनजीक विठुर) येथें तो दानधर्म व जपजाप्य करीत राहिला. याच सुमारास फरान्सचा बादशाह नेपोलियन याचा इंग्रज सैन्यानें पाडाव केल्यावर त्यास सेंट हेलेना या बेटावर ठेविलें होतें. बाजीराव व नेपोलियन एकाच सत्तेचे समकालीन कैदी होते. पण दोघांच्या स्वभावांत फरक होता. नेपोलियन आपल्या बन्धनकालांत अतिशय स्वाभिमानानें वागला. याच्या उलट बाजीरावास स्वतःचें एवढें राज्य गेल्याबद्दल मोठी खंत वाटल्याचा पुरावा उपलब्ध नाहीं.

२५. सातारचें राज्य खालसा :—पेशवाई खालसा झाल्यावर सातारचा छत्रपति प्रतापसिंह व इंग्रज यांचे बरेच खटके उडाले. शेवटीं इंग्रजांनीं त्यास अधिकारावरून दूर केलें (इ. स. १८३९) व त्याचा भाऊ शहाजी यास गादीवर बसविलें. तो इ. स. १८४८ त मरण पावला. त्यास पुत्रसंतान नव्हतें, हें पाहून इंग्रजांनीं सातारचें संस्थानही खालसा केलें. अशा रीतीनें स्वतंत्र मराठी सत्तेचा शेवटचा धागा नष्ट झाला.

२६. ऐतिहासिक मीमांसा :—मराठ्यांच्या सत्तेच्या उत्कर्षापकर्षाचें हें थांवतें वर्णन वाचणारास त्यांचा पराभव कां झाला तें सहज लक्षांत येईल. शिवाजीनें निर्माण केलेल्या अष्टप्रधान पद्धतींत असलेला समतोलपणा छत्रपतीच्या कर्तेपणावर अवलंबून होता. पेशव्यांच्या मानानें शाहू कर्ता नसल्यानें पेशव्यास महत्त्व प्राप्त झालें. त्यांनीं मराठे राजमंडळाची घटना कायम ठेवण्याऐवजीं स्वतः इतरांहून प्रबळ होण्याचा यत्न केला. त्यासाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसंगीं परकीय शत्रूचीही मदत घेतली. पुढें पेशव्याच्या हाताखालच्या सरदारांनीं पेशवाईवर तोच डाव उलटविण्याचा यत्न केला. यामुळें मराठेशाही टिकून राहण्याजोगी दृढ संघटना कधींच निर्माण झाली नाहीं. पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर लवकरच मराठेशाहींत फुटीरपणा दिसून येऊं लागला व तोच अखेर बाधक ठरला. त्यांचे प्रतिपक्षी इंग्रज हे आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज होते, त्यांच्यांत राष्ट्रीय दृष्टि होती व ते एका व्यापारी कंपनीचे हस्तक असल्यामुळें त्यांच्या सर्व वागण्या–वावरण्यांत हिशेबीपणा दिसून येत असे. या सर्व कारणांनीं इंग्रजांची एकजूट व मराठ्यांची सर्वत्र फूट दिसून आली. याखेरीज उत्तर मराठेशाहीच्या काळांत मराठे एखाद्या ध्येयानें प्रेरित असल्याचें दिसून येत नाहीं. शिवाजीनें यावनी सत्तेविरुद्ध उभे राहून, इस्लामी धर्माधिष्ठित राजसत्तेचा मोड करून, उदार धार्मिक धोरणाचें असें मराठ्यांचें राज्य स्थापन केलें. इतकेंच नव्हे तर औरंगजेबास तोंड देण्यास दक्षिणेंत एकजूट उत्पन्न केली. बाजीरावाचे काळीं तो व सवाई जयसिंग यांस, एक होऊन दिल्ली येथील आपलें गेलेलें वैभव पुन: प्राप्त करून घेण्याचीं स्वप्नें पडूं लागलीं. पण बाजीरावाच्या मृत्यूनंतर बहुतेक मराठे सरदार आपल्या स्वत:च्या फायद्यावर नजर ठेवून वागूं लागले. यामुळें त्यांना राजपूत व बुंदेले यांच्यामध्यें आपलेपणाची भावना निर्माण करतां आली नाहीं. उलट राजपुतांत रुजलेली आपुलकीची भावना मराठ्यांनीं पैशाच्या लोभानें परस्परांविरुद्ध पक्षास बेछूट सैन्य पुरवून, साह्य करून घालवून टाकली. राष्ट्रास काय किंवा मनुष्यास काय, उच्च ध्येयाच्या ओढीनें स्वार्थावर विजय संपादन करतां येतो. तें नाहींसें झालेल्या समाजाची हलके हलके अवनति होत जाते. दुसरें असें कीं, स्वत: लष्करी दृष्ट्या समर्थ असून मराठ्यांनीं बादशाही सत्तेचा उगाच बागुलबोवा केला. शाहूला मोगल बादशाहीबद्दल आदर वाटे व पहिल्या तिघा पेशव्यांनीं शाहूच्या शब्दाबाहेर पाऊल टाकलें नाहीं. यामुळें अयोध्येचे वजीर, बंगालचे नबाब, किंबहुना लहानशा सुरतेचे नबाबही सर्वच जण मोगल बादशाहीचे हस्तक म्हणून वावरत असल्यानें मराठ्यांना त्यांच्यावर आक्रमण करतांना कोणतेंही सयुक्तिक कारण दाखवितां आलें नाहीं. मोगल बादशाहीचा दबदबा वेळींच मागें सारला असता, तर प्रादेशिक राजमंडळावर आधारलेली भारताची पुनर्घटना करण्याचें ध्येय मराठ्यांना साध्य करतां आलें असतें. असो.

२७. **विधायक कामगिरी** :—इतिहासाच्या अभ्यासकानें एखाद्या सत्तेच्या विनाशाची मीमांसा करणें जसें युक्त आहे तसें एखादें राज्य जगलें कसें हेंही पाहिलें पाहिजे. शिवाजीनें इ. स. १६७४ त स्वत:स राज्याभिषेक केला. तेव्हांपासून इ. स. १७९५ त सवाई माधवरावाच्या मृत्यूपर्यंत शंभर-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सव्वाशें वर्षे मराठी राज्य चांगलें टिकून राहिलें. तसें पाहिलें तर मोगलांचें साम्राज्य इ. स. १५५६ ते १७२० पर्यंत टिकलें व नुकतेंच होऊन गेलेलें सुधारलेल्या इंग्रजांचें राज्यही इ. स. १७६५ ते १९४७ पर्यंतच टिकलें. या दृष्टीनें पाहिलें तर मराठी राज्य अल्पायु असलें तरी इतर राज्य-सत्तांशीं तुलनीय ठरतें. या शंभर–सव्वाशें वर्षांत मराठ्यांनीं सारावसुलीची पद्धत घालून दिली, न्यायनिवाड्याची संघटना निर्माण केली, विद्येस व शास्त्रास दक्षिणा देऊन उत्तेजन दिलें, कूट सामाजिक प्रश्न उत्पन्न झाले असतां शास्त्री-पंडितांचा आधार घेऊन त्यावर बरावाईट निर्णय दिला व व मोगल बादशाहांप्रमाणें विलासांत दंग न राहातां आपलें कर्तव्य करीत साधेपणानें राहिले. त्यांचें चित्त राज्याच्या कारभाराकडे व परमेश्वराकडे असे. पुणें–सातार्‍याहून सालोसाल हजारों माणसें स्वार्‍यांस जात. अशा वेळीं गोंधळ न होतां ते सर्व कार्यक्रम यशस्वी रीतीनें पार पडत. अहल्याबाई होळकर या साध्वी स्त्रीनें इ. स.. १७६६–१७९५ अशीं २९ वर्षें माळव्यावर आपला सद्‌गुणी अंमल बसविला व राजपूत प्रजेकडून प्रशंसा संपादन केली. इतिहासाच्या अभ्यासकानें गतकालीन समाजाचें विधायक कर्तृत्व नीट पारखून पाहिलें पाहिजे. तरवारीचे खणखणाट व लढाईंतील विजय यांचा आवाज मोठा होतो व तें दृश्य मनांत भरतें. शांततेचे विजय व जनतेच्या कल्याणाची कामगिरी यांचा तसा आवाज होत नाहीं; पण एवढ्यावरून इतिहासाच्या या महत्त्वाच्या अंगाकडे आपलें दुर्लक्ष होतां कामा नये.

प्रश्न

१. ‘ शिवाजीनें स्थापलेल्या स्वराज्याचें साम्राज्यांत रूपांतर करण्याचें काम पहिल्या बाजीरावानें केलें.’ चर्चा करा. २. छत्रपति शाहूच्या मृत्यूनंतर मराठेमंडळांत पेशवे प्रमुख झाले या घटनेचे राज्यावर काय परिणाम झाले तें लिहा. ३. माधवराव पेशव्यास सर्व पेशव्यांत श्रेष्ठ समजतात, तें कां ? ४. टीपा लिहा :—(१) शिंदे–होळकर. (२) महादजी शिंदे व नाना फडणवीस.

अभ्यास

(१) सरंजामी पद्धति मराठ्यांनीं कां अमलांत आणली ? तिचे आर्थिक व लष्करी दृष्ट्या काय परिणाम झाले ? (२) हिंदुस्थानचा नकाशा काढून त्यांत पहिल्या बाजीरावाच्या वेळीं पुण्याहून भारतांत ज्या ठिकाणीं स्वार्‍या झाल्या त्यांच्या दिशा बाणांनीं दाखवा. (३) वाचा :—१. थोरले माधवराव (स्वा. माला) ले. प्रा. पोतदार, २. देवी अहिल्याबाई (ले. मुक्ताबाई लेले).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

पेशव्यांकडे मराठाराजमंडळाचें प्रमुखत्व

छत्रपति थोरले शाहू यांनीं स्वहस्तें पुढीलप्रमाणें लेख लिहिला :

श्री राजमान्य राजश्री बाळाजी प्रधान पंडित यांस आज्ञा—'तुम्हीं फौज धरणें. सर्वांस आज्ञा केली. त्याच्या (रघूजी भोसले) दैवीं (राज्यावर वसणें) नाहीं. महाराजास दुखणें झाले (आहे) बरें होत नाहीं. राज्यकारभार चालला पाहिजे, तरी पुढें वंश (रामराजा यांस गादीवर) बसविणें. कोल्हापूरचें न करणें. चिटणीसास सर्व सांगितलें आहे, तसें करणें. वंश होईल त्याच्या आज्ञेंत चालून **राजमंडळ** चालविणें. चिटणीस स्वामीचे विश्वासू; त्याच्या तुमच्या विचारें राज्य राखणें. वंश होईल तो तुमची चालमेल करणार नाहीं. सूज्ञ असा. —महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास पृ. १६८

मराठेशाहीचा विकास

जगाच्या रहाटींत मराठ्यांच्या वैभवानें जे झोके खाल्ले त्याचें चित्र.



यांच काळांतील इंग्लंडच्या वैभवाचें चित्र कसें असेल ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३० वा

मराठी राज्याचें सांस्कृतिक स्वरूप

१. **मराठ्यांचें राज्य** :—शिवाजीनें स्थापन केलेलें राज्य हें इतरांच्या राज्याहून वेगळें होतें. चालुक्य राजांनीं स्थापन केलें, तें चालुक्याचें राज्य; यादव राजांनीं स्थापन केलें, तें यादवांचें राज्य. पण शिवाजीनें स्थापन केलें, तें शिवाजी भोसल्याचें राज्य नव्हे; तर तें मराठ्यांचें राज्य होय. मावळांतील लोकांनीं 'अवघियांनीं एका जागा जमून हिंमत धरून मऱ्हाष्ट राज्य स्थापन करावे ऐसा मनसवा केला' याचा अर्थ त्या वेळच्या मराठ्यांनीं धाडस करून एकत्र जमून मराठ्यांचें राज्य स्थापन करण्याचा बेत केला व शिवाजी 'मराठे लोकांचें बरें करावें' यासाठीं झटला. त्याचा उद्देश नुसतें भोंसल्यांचें राज्य स्थापन करण्याचा नव्हता.

२. **मराठी राज्याचे आधार** :—साधारणत: इ. स. १६६० पासून इ. स. १८१८ पर्यंत म्हणजे दीडशें वर्षें मराठी राज्य चालू होतें. कोणीं विचारलें कीं तें 'कशाच्या जोरावर चालू होतें?' तर त्याचें उत्तर असें आहे :—

[अ] **'हर हर महादेव'** ही मराठ्यांची रणगर्जना होय. ही गर्जना करीत मराठ्यांनीं भरतखंडांत अटक, कटक, तंजावरपर्यंत प्रवास केला. 'हर हर महादेव' याचा अर्थ प्राण पणाला लावून पराक्रम करणें. जिवावर उदार झाल्याखेरीज महत्कार्य सिद्धीस जात नाहीं.

[आ] **'जय जय रघुवीर समर्थ'** या शब्दांत समर्थ रामदासांनीं निजलेल्या मराठ्यांना हांक मारली व उभें महाराष्ट्र खडबडून जागें झालें. काम करतांना माणसें आपलें खरें हित कोणतें, तात्पुरता फायदा कोणता याचा विचार करीत नाहींत. अशा लोकांस समर्थांनीं सावध रहा व विचारानें चाला असा संदेश दिला. समर्थ म्हणतात,

मुख्य यत्न विचाराचा, त्यावरी बोलणें बरें ।
चालणें नित्य नेमाचें, नीति न्याय चुकों नये ।।

[इ] **'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल'** असा घोष करून मराठे वारकरी देवदर्शनासाठीं बारीला उभे रहातात. तासन् तास उभे राहिले तरी धक्काबुकी करीत नाहींत. आपली पाळी येईल तोंवर वाट पहावी, बारी सोडूं नये, धक्काबुक्की करूं नये, असें वागलें म्हणजे तो दीनांचा दयाळू परमेश्वर भेट देईल असा विश्वास बाळगावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्याला फार वाटतें कीं, सर्व कांहीं चटपट व्हावें व आपल्याला हवें तें मिळावें. पण जग कांहीं आपल्या एकट्याचें नाहीं. सर्वांचें आहे. दम धरावा, सोशिकपणा अंगीं असावा व सर्वांशीं प्रेमानें वागावें ही शिकवण मराठी साधुसंतांची आहे. 'हर हर महादेव', 'जयजय रघुवीर समर्थ' व 'पुंडलिक वरदा हरि विठ्ठल' या तीन प्रकारच्या जयघोषांत मराठी संस्कृतीचें सार सांठविलें आहे. मराठी राज्य टिकलें तें मुख्यतः वर सांगितलेल्या तीन गुणांवर.

३. **गांवकीचा कारभार** :—दीडशें वर्षें चालू असलेल्या मराठी राज्यांत लोकांचा कारभार 'गांव-पंचायत' चालवीत असे. पंचायत म्हणजे पंचांनीं केलेला कारभार. पंच म्हणजे पांचच नव्हे. गांव-पंचायतींत कधीं तीन, तर कधीं पांच, तर कधीं सात वडील माणसें असत. पाटील, कुळकर्णी व वेसकर हे गांवाचे मुख्य अधिकारी. पाटलानें बंदोबस्त राखावा, कुलकर्ण्यानें वसूल गोळा करावा व वेसकरानें गांवाची वेस म्हणजे हद्द सांभाळावी, बाहेरच्या चोराचिलटास येऊं देऊं नये, अशीं कामें वाटून दिलेलीं असत. या घडीबंदपणामुळें गांवच्या कारभारांत बाहेरच्यांचें बोट शिरकायला जागा नसे. मराठींत म्हण आहे कीं, 'गांव करी तें राव न करी.'

४. **लष्कर व आरमार** :—मराठी अमलांत प्रारंभीं किल्ल्यांचें महत्त्व फार होतें व ते लढविण्यास फौज ठेवलेली असे. कोंकणचे हेटकरी व देशावरचे मावळे यांचा पायदळांत मुख्यतः भरणा होता. पुढें पेशवाईंत चौथाईच्या मिषानें स्वराज्याचें साम्राज्यांत रूपांतर होऊं लागल्यावर पायदळाचें महत्त्व उत्तरोत्तर कमी होऊन घोडेस्वारांचें महत्त्व वाढत गेलें. घोडेस्वारांत शिलेदार व बारगीर असे दोन भेद असत. शिलेदारांचीं घोडीं व हत्यारें स्वतःचीं असत. बारगिरांस घोडीं व हत्यारें सरकारांतून मिळत. बारगीर हे सरकारवर अवलंबून असल्यामुळें ते जास्त भरंवशाचे असत. परंतु बारगीर ठेवणें खर्चाचें असल्यामुळें मराठे अगदीं जरुरीपुरतेच बारगीर बाळगीत. घोडेस्वार गनिमी काव्यानें लढण्यांत फार पटाईत असत व आपल्यापेक्षां बळानें भारी शत्रूसही हे दाद देत नसत. मराठेशाहीच्या उत्तरकाळांत मराठ्यांनीं पाश्चिमात्यांच्या कवायती फौजेची पद्धत उचलली; व तोफखान्याचें महत्त्व वाढलें, तसतसें किल्ल्यांचें महत्त्व उत्तरोत्तर कमी होऊन त्यांचा राजकीय कैदी ठेवण्याकरितां तुरुंगासारखा उपयोग होऊं लागला. घोडस्वारांचें महत्त्व कमी होऊन पायदळाचें महत्त्व वाढलें. मराठ्यांचा स्वभाव शिस्तप्रिय नसल्यानें पुढें पुढें या पायदळांत परकीय अरब, पुरभय्ये वगैरेंचा समावेश झाला. यामुळें सैन्याचें राष्ट्रीयत्व कमी झालें व पदरीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठेवलेल्या पगारी फौजेची वाढ झाली. एकंदरींत नवी उचललेली कवायती फौजेची पद्धत मराठ्यांना मानवली नाहीं.

मराठी आरमाराचा मुख्य उद्देश कोंकणकिनारा ताब्यांत ठेवून परकीयांपासून संरक्षण करणें व किनाऱ्यावरील व्यापार सुरळीत चालूं देणें एवढाच होता. शिवाजी महाराजांनीं आरमाराचें महत्त्व ओळखलें होतें. नंतरच्या काळांत आंग्रे हे पुढें आले. सिद्दी, फिरंगी (पोर्तुगीज), इंग्रज व मोगल या सर्वांवर त्यांनीं आपला वचक बसविला व त्यांचा अनेक जलयुद्धांत पराभव केला. मराठ्यांच्या आरमारांत चाळीसपासून पन्नासपर्यंत लहानमोठीं जहाजें असत. रत्नागिरी व अंजनवेल येथें जहाजें बांधण्याचें काम होत असे.

५. **वसुलाची व्यवस्था** :—खेडेगांव हें सर्व राज्यव्यवस्थेचें मुख्य घटक होतें. तेथें पाटील हा सरकारचा नोकर व गांवकऱ्यांचा प्रतिनिधि अशीं दोन्ही दर्जांचीं कामें करी. महार हा खेडेगांवच्या पोलिसांचें काम करीत असे; व याशिवाय प्रत्येक खेड्यांत बारा बलुतीं असत. त्यांचीं नांवें—सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट व मुसलमान मुल्ला (मुलाणा). प्रांताप्रांतांतून यांच्यांत फरक होई व त्यांची संख्या कधीं कधीं बारांहून कमीअधिक होत असे. खेडेगांवांत ग्रामसंस्था असे व त्यांत पांच पंच प्रमुख असत. हे अनेक वेळां आपसांतील तंट्यांचा निकाल करीत. सरकारचाही कल एकंदरींत ग्रामव्यवस्थेंत शक्य तोंवर ढवळाढवळ करावयाची नाहीं असा असे. जमिनीचा सारा, मागील वसुलाचा अंदाज पाहून त्या मानानें त्याची आकारणी होई व तींत सहसा फरक होत नसे; त्यास तनखा म्हणत. परंतु पुढेंपुढें प्रांतांत शांतता नांदूं लागल्यावर रयतेनें जमिनींत बरीच सुधारणा केली. तेव्हां सदाशिवरावभाऊनें 'कमाल' वसूल म्हणून एक पद्धत घालून दिली. दर वर्षीं तनखा गोळा करावयाचा; परंतु एखाद्या वर्षीं सरकारनें जरूर पडल्यास ' कमाल ' वसूल घ्यावयाचा. दुष्काळामुळें किंवा स्वारीमुळें नासाडी झाली असल्यास यांत सूट मिळत असे. जमिनीवरील वसुलाशिवाय इतर कर थोडे असत. त्यांत महारमहारकी, इनामपट्टी, विहिरहुंडा, मोहतर्फा (बाजारावरील कर), वटछप्पन्नी (वजनावरील कर), घरपट्टी वगैरे प्रमुख आहेत. याशिवाय वनचराई, गुन्हेगारी, बकरेपट्टी, म्हैसपट्टी, देवस्थान हींही नांवें ठिकठिकाणीं आढळतात.

पांच-सहा खेड्यांचा समूह मिळून 'तर्फ' होई व त्यावर शेखदार म्हणून अंमलदार असे. तर्फांहून मोठा विभाग म्हणजे परगणा किंवा महाल होय. यावर मामलेदार प्रमुख असे. पूर्वीं मुसलमानी अंमलांत देशमुख व देशपांडे हे वतनदार अधिकारी खेडेगांवांतील पाटील-कुलकर्ण्यांप्रमाणें महा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लाची व्यवस्था पहात असत. परंतु शिवाजीनें या वतनदारांचें महत्त्व कमी करण्याकरितां म्हणून पगारी मामलेदार नेमले व त्यांवर दाब राहावा म्हणून देशमुखांस देखरेखीचें काम दिलें. अशा रीतीनें वतनदार लोकांना शिरजोर होऊं न देतां त्यांचा त्यानें मान राखिला. महालापेक्षां मोठा विभाग सुभा होय. यावर सुभेदार मुख्य असे. दक्षिणेंतील मराठी राज्याचे पेशवाईत १५ सुभे व २७४ महाल होते. मामलेदाराप्रमाणेंच सुभेदाराच्या मदतीस दिवाण, फडणवीस वगैरे अनेक मदतनीस असत.

६. **न्यायव्यवस्था** :—न्यायखात्याचे फौजदारी व दिवाणी असे दोन विभाग पडतात. दिवाणी फिर्यादींचा निकाल करण्याचें काम खेडेगांवांतील पंचांकडे असे. पंच फुकट काम करीत. पंच निवडून येणें बहुमानाचें समजत असत. जातीच्या तंटयांत त्या जातीचेच पंच असत. पंचांच्या निकालास 'निवाडपत्र' व जातीच्या निकालास 'गोतमहजर' असें म्हणत. दोन गृहस्थांमध्यें तंटा उत्पन्न झाल्यास ते तो पाटलास कळवीत. तो प्रथम मध्यस्थांमार्फत तंटा मिटविण्याचा यत्न करी व तें शक्य न झाल्यास गांवसभा बोलावून दोन्ही पक्षांस पसंत असे पंच नेमण्यांत येत. हे पंच दोन्ही पक्षांकडून 'पंचांचा निकाल मान्य करूं' असें लिहून घेत. त्यास 'राजीनामा' म्हणत. नंतर वादी व प्रतिवादी आपलें म्हणणें सांगत. वकिलाची जरुरी लागत नसे. नंतर साक्षीदारांचे पुरावे घेत. सांगितलेल्या हकीकतीस प्रत्यक्ष पुरावा नसल्यास दिव्य करून दाखवावें लागे. त्यानंतर पंच थोडक्यांत खटल्याच्या बाबी लिहून काढीत. यास 'सारांश' म्हणत व त्यावर कायद्यांत सांगितल्याप्रमाणें निकाल व शिक्षा देत. सर्व खटल्यांचे निकाल पेशव्यांच्या नांवानें होत. शिक्षेची अंमलबजावणी करणें मामलेदाराच्या हातांत असे.

७. **वरिष्ठ सरकार** :—वरिष्ठ सरकारचें सर्व लक्ष सामान्यतः परराष्ट्रीय राजकारण व स्वकीय सरदारांशीं घडून येणारे संबंध यांकडे असे. रयतेच्या रोजच्या दिनक्रमांत शक्य तोंवर ढवळाढवळ करावयाची नाहीं, या धोरणामुळें रयत टपाल, शिक्षण, वाहतूक, व्यापार वगैरे बाबतींत सरकारवर अवलंबून राहात नसे. सरकारासही राज्य चालविण्यास हल्लींप्रमाणें मोठा खर्च लागत नसे व त्यामुळें करांचें ओझें हल्लींहून निःसंशय हलकें होतें. परंतु जहागिरीच्या रूपानें बऱ्याच मोठ्या प्रदेशांची वांटणी झाल्यामुळें मध्यवर्ती सरकारची स्थिति हलाखीची असे.

८. **धर्मस्थिति** :—मराठ्यांचें राज्य जेथें जेथें पसरलें, तेथें तेथें त्यांनी मंदिरांचा आणि तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार केला, घाट आणि धर्मशाळा बांधल्या. उज्जयिनीचें महाकाळेश्वर मंदिर, काशीचें विश्वनाथमंदिर, वेरूळचें घृष्णेश्वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंदिर, पुण्याचा बेलबाग आणि पर्वती हीं तत्कालीन धर्मभक्तीचीं आणि कलाकौशल्याचीं उदाहरणें होत. वेदविद्येच्या व गुणीजनांच्या रक्षणासाठीं प्रतिवर्षी पेशवे शास्त्रीपंडितांना पुण्यास दक्षिणा वांटीत. अनुष्ठानांसाठीं व देवपूजेसाठीं इनामेंही देत. छत्रपति किंवा पेशवे हे साधुसंतांचा सन्मान करीत. तुळजाभवानी, कोल्हापूरची देवी, महादेव किंवा खंडोबा या क्षात्र-दैवतांचे भक्त त्या काळीं फार होते. विठ्ठलभक्तीचा महिमा चालू होताच; पण हे सर्व देव एकच आहेत याची जाणीव सर्वांनाच होती. मराठ्यांनीं परधर्मीयांना ते केवळ परधर्मीय म्हणून कधींच छळलें नाहीं. खडर्याच्या तहांत पुढील कलम आहे "हिंदु-मुसलमान ईश्वराचे घरचे, दोन्ही धर्म चालत असतां मुसलमानानें हिंदूंचे जाग्यास उपद्रव करावा हे बेमुनसफी;[१] हिंदूनें आजतागाईत मुसलमानीचे जागे पीर, पैगंबर यासी दुसरी गोष्ट समजण्यांत आणली नाहीं तेव्हां मुसलमानानें हिंदूंचें धर्मास खलश[२] करूं नये. आपले चालीनें धर्मावरी कायम असावें; परस्परें मुजाहीम नसावें[३]" फकिरांना व मशिदींनाही इनामें दिलीं जात. कोंकणांत ख्रिस्ती देवळांनाही साहाय्य मिळे. सैन्यांत ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वांना प्रवेश असे. या वेळीं अस्पृश्य, स्पृश्यांच्या शेजारीं आपला तंबू ठोकून राहात. सर्व जातींना नशीब काढण्यास वाव मिळे. जातीभेद असला तरी राजकारणांत त्याला थारा नव्हता. परधर्मांत गेलेल्यांना शुद्ध करून घेतलें जाई.

९. **शिक्षण**:—त्या काळीं पंतोजीच्या खाजगी शाळेंत लिहिणें-वाचणें शिकवीत. शास्त्री-पंडितांच्या वेदपाठशाळा असत. त्यांतून धर्मशास्त्राचे ग्रंथ शिकवीत. त्यांच्या विद्वत्तेनुसार प्रवचनकार, कीर्तनकार यांना पेशवे आणि इतर सरदारही दानधर्म करीत आणि प्रसंगीं जमीनजुमला इनाम देत. वेद-विद्या ब्राह्मणच शिकूं शकत; परंतु युद्धविद्या सर्वांसच शिकतां येई. या विद्येच्याही शाळा नसत. तालमींतून दंड, बैठका आणि कसरत शिकण्यास मिळे. गांवांतील श्रीमंतांच्या आश्रयानें घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, नेम मारणें, तलवार चालविणें, या कला तरुणांस अवगत होत. त्या काळीं शस्त्र वापरण्यास परवानगी होती. संरक्षणासाठीं हीं शस्त्रें जवळ बाळगावीं लागत आणि त्यांचा उपयोग शिकावा लागे. जंबिया, बिचवा, वाघनखें, लाठी, हीं शस्त्रें सर्रास वापरलीं जात. तेराव्या वर्षी मराठे तरुण युद्धास जात,* त्यांतील कित्येकांचा

१ अन्यायाचें. २ पीडा. ३ अडथळा करूं नये.

* 'पानिपता 'वर विश्वासरावाचें वय १६–१७ असेल व जनकोजी शिंदे २० च्या आंत होता. भाऊसाहेब राज्यकारभारांत १३व्या वर्षी पडले. शिवाजी-महाराजांनीं १६व्या वर्षी तोरणा ताब्यांत घेतला. रघूजी भोसले १२ व्या वर्षी चलत्याबरोबर स्वारीस जाई. (कै. राजवाडे, साधनखंड १ च्या आधारें)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सावकारी, भिक्षुकी किंवा शेती हा मुख्य धंदा आणि शिपाईगिरी हा जोड-धंदा असे. या औतवाल्यांतून पुढें नामांकित राऊत निघत व शास्त्रपठण करणाऱ्या वैदिकांतून शूर सैनिक निर्माण होत. मग मात्र 'सैनिकी' हा त्यांचा नित्याचा व्यवसाय होई.

१०. **वाङमय** :—एकनाथ-तुकाराम-रामदास यांच्यानंतर संतांची ग्रंथ-लेखनाची परंपरा थोड्या प्रमाणांत चालू होती. त्यांपैकीं महिपतीचा 'भक्तिविजय' व श्रीधराचा 'पांडवप्रताप' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पेशवाईंत मोरोपंतांसारखा आर्या रचणारा प्रसिद्ध कवि होऊन गेला. त्याचें आर्याभारत शब्दांच्या चमत्कृतींनीं आणि विविध कल्पनांनीं नटलेलें आहे. वीररसाच्या प्रसंगावर पोवाड्यांची रचना करण्यांत गोंधळी आणि शाहीर भूषण मानीत. या क्षेत्रांत रामजोशी, सगनभाऊ, होनाजी बाळ यांनीं नांव मिळविलें. लोकांत क्षात्रतेज पसरविण्यास या पोवाड्यांचा फार उपयोग झाला.* बख-रीच्या रूपानें गद्यलेखन या काळांत सुरू झालें. राजपुत्रांना व सरदारांना या बखरी (ऐतिहासिक कथा) ऐकविल्या जात. शिवाजी, शाहू, पेशवे, भाऊसाहेब यांच्या पराक्रमांचीं वर्णनें त्यांत आहेत. रामचंद्रपंत अमात्यांचा 'राजनीति' हा नांव घेण्याजोगा गद्य ग्रंथ आहे. या काळांत आपल्याकडे छपाईची कला आलेली नव्हती. त्यामुळें सुवाच्य अक्षरांत हातानें लिहून ग्रंथांच्या प्रती करून घ्याव्या लागत. त्यास खर्च आणि वेळ लागे. त्यामुळें त्यांचा प्रसार थोडा होई. सरकारी आणि खाजगी पत्रव्यवहार मोडी लिपींतून चाले. अशीं हजारों पत्रें आतां प्रसिद्ध झालीं आहेत. या पत्रव्यवहारांत त्या काळच्या लोकांचें अंतरंग उघड झालेलें आहे. पत्रांतील लेखकांची स्फूर्ति, कळकळ व स्वामिकार्याबद्दल आदर पाहून आजही मन उचंबळून जातें.

११. **स्त्रियांची स्थिति** :—कुटुंबांतील माणसांवर देखरेख करणें, मुलांचें संगोपन करणें आणि त्यांना वळण लावणें ही जबाबदारी स्त्रियांवर असे. राजमाता जिजाबाई आणि पहिल्या बाजीरावाची आई राधाबाई, ह्यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. तो काळच धामधुमीचा असल्यानें घोड्यावर बसणें, शस्त्रांचा उपयोग करणें, धाडसानें प्रवास करणें, या गोष्टी स्त्रिया निर्भयतेनें करीत. सगुणाबाई निंबाळकर, आऊबाई डफळे, अनुबाई घोरपडे हीं अशीं उदाहरणें होत. रणांगणावरही उमाबाई दाभाडे, झांशीवाली लक्ष्मीबाई या स्त्रियांनीं पराक्रम दाखविला आहे. स्त्रियांचें शिक्षण म्हणजे सामान्यतः कथा-प्रवचनें ऐकून बहुश्रुत होणें हेंच होतें.

* पोवाडे ही एक अस्सल मराठी चीज आहे. मराठा शाहीर डफ-तुणतुण्यावर पोवाडे म्हणत आहे व खेड्याचे लोक ते ऐकतांना रंगून गेले आहेत असा प्रकार अजूनही खेड्यांच्या बाजारपेठांत पहावयास सांपडतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. शेती-व्यापार उद्योग :—लोकांचा मुख्य धंदा शेतीचा. प्राचीन काळापासून या विद्येंत आपले लोक सुधारलेले आहेत. ज्वारी, बाजरी, गहूं, नाचणी, तांदूळ आणि इतर धान्यें ते पिकवीत. लोकांचें मुख्य अन्न वरील जिन्नस होत. सर जॉन मालकम् नांवाचा इंग्रज अधिकारी म्हणतो, "कृष्णाकांठच्या प्रदेशाप्रमाणें शेती किंवा व्यापाराची भरभराट सर्व हिंदुस्थानांत इतरत्र मला आढळली नाहीं. महाराष्ट्र देशाइतका धनधान्यांनीं समृद्ध प्रदेश मीं कधींच पाहिला नाहीं." (इ. स. १८०३). दुसरा धंदा कोष्टयाचा. तें धोतरजोडे, लुगडीं, फेटे, विणीत असत. अंगरखा, कुडतें, अंगडें, हीं वस्त्रें त्यापासून तयार केलीं जात. कापड तलम निघत असे. पांघरण्यासाठीं घोंगडया आणि पासोडया केल्या जात. सोलापूर, नागपूर, महेश्वर या पेठा नांवाजलेल्या होत्या. चांगल्या वस्तू करणाराला सरकारांतून बक्षिस दिलें जाई. सुतार-लोहारांना खेडयांत आणि लष्करांत दुरुस्तीचें पुष्कळ काम मिळे. शस्त्रांचे कारखाने मात्र मोठया प्रमाणांत आपल्याकडे सुरू झाले नव्हते. सावकारीचा धंदा जोरांत चाले.

१३. आहार आणि राहणी :—आहारांत तांदूळ थोडा वापरला जाई. भुरी साखर व गूळ येथें होई. दूध, तूप व दुधाचे पदार्थ मुबलक प्रमाणांत मिळत. मध्यम स्थितींतील माणसांच्या घरीं दूध देणारीं जनावरें असत. विडा आणि तंबाखू खाण्याचा सर्वत्र प्रघात होता. आज जसें भेटीस गेलें कीं चहा दिला जातो, तसें त्या वेळीं पानतमाखूचें असे. सामान्य जनता भाकर-कांदा-हुरडा यांवर निर्वाह करी. संयुक्त कुटुंबपद्धति असे. पंचवीस—तीस माणसें एका घरीं सहज असत. सर्व वडिलांच्या आज्ञेंत राहात. कोणाच्याही घरीं एखादें घोडें व हत्यार असावयाचेंच. ग्रामपंचायती खेडयाचा कारभार करीत; सरकार त्यांचा मान राखी. यामुळें राजकीय उलाढालीच्या प्रसंगीं थोडा त्रास झाला तरी गांवकऱ्यांचें नेहमींचें जीवन सुखाचें आणि एकोप्याचें असे. खुद्द गांवांतच दुही झाल्यास भाग निराळा.

१४. दळणवळण :—एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जाण्यास पायवाटा असत. नद्यांवर कांहीं ठिकाणीं दगडाच्या फरशीचे पूल असत. पावसाळयांत होडयांचा उपयोग करीत. शहरांतील रस्ते अरुंद असत. पायीं, घोडयावर, मेण्यांतून किंवा डोल्यांतून प्रवास करीत. काशी-रामेश्वरची यात्रा पायीं करण्यांत भूषण मानलें जाई. एकटेंदुकटें जाण्यापेक्षां संघशः प्रवासास जात. व्यापारी मालाची ने-आण बैलांच्या आणि घोडयांच्या पाठीवरून करीत. हा धंदा करणारास लमाण म्हणत. डोंगरांतूनही वाहतूक होई. या रस्त्यावर-सुद्धां जकात घेतली जाई. सरकारी परवानगीनें नाणें पाडण्यासाठीं खाजगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टांकसाळी असत. तांब्याचीं, सोन्याचीं आणि चांदीचीं नाणीं चालत. नाण्यांवर आणि मापांवर सरकारी शिक्का असे.

१५. **करमणूक** :—कुस्त्यांचे फड, व बैलांच्या आणि कोंबडयांच्या झुंजी पाहण्यास लोक जात. कसरतीचे प्रयोग, लाठी, दांडपट्टा, बोथाटीचे खेळ, हुतुतु, खोखो खेळणें या आवडत्या करमणुकी असत. सरदारादिकांकडे हत्ती, घोडे ह्यांचे खेळ होत; वाघांची शिकारही ते हौसेनें करीत. दसरा, होळी, रंगपंचमी, गणेशोत्सव हे उत्सव थाटानें साजरे होत. उत्सवप्रसंगीं गवयाचें गाणें आणि शाहिरांचे पोवाडे असावयाचे. नर्तकींचा नाच आणि तमाशेही केले जात. खेडेगांवांतील उरुसांत तर तमाशा आणि ललित हेच करमणुकीचे कार्यक्रम असावयाचे.

प्रश्न

१. मराठी राज्यांतील लोकवस्तीचें वर्णन करा. २. टीपा लिहा :—(१) हरहर महादेव, (२) सारावसुलीची पद्धति, (३) घोडेस्वारांचें सैन्यांतील महत्त्व, (४) मराठेशाहींतील शिक्षण.

अभ्यास

(१) मराठेशाहीवरील पुढील कठिण प्रसंगांचीं उदाहरणें द्या :—१. जबरदस्त पराभव झाला, २. दुहीचें भूत माजलें, ३. थोर ध्येय सुटून स्वार्थ बळावत चालला, ४. कर्त्या पुरुषाच्या जिवावर बेतली. ५. आकस्मिक मृत्यु. ६. मुत्सद्देगिरी कमी पडल्यानें प्रतिपक्षाचा डाव साधला. ७. कर्ता मूर्ख म्हणून बेबंदशाही माजली. ८. शौर्यास मुत्सद्देगिरीची किंवा मुत्सद्देगिरीस शौर्याची जोड मिळाली नाहीं. (२) मराठेशाहींतील पुढील आनंदाचे प्रसंग सांगा :—१. सोन्याचा दिवस दिसला, २. मोठ्या लढाईंत यश आलें. ३. कारस्थान यशस्वी झालें, ४. मराठेशाहीची अनेक वेळां विफळ झालेली आकांक्षा सफळ झाली.

२२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३१ वा

भारतांत इंग्रजी सत्तेची स्थापना

(इ. स. १७०७ ते इ. स. १८०५)

१. **चढाईस प्रारंभ** :—सोळाव्या शतकांत मोगलांच्याही पूर्वी कांहीं वर्षें पाश्चिमात्य व्यापारी हिंदुस्थानांत आले. परंतु जोंपर्यंत मोगली राज्य जोमांत होतें तोंपर्यंत पाश्चिमात्यांना व्यापारापेक्षां अधिक कांहीं करतां आलें नाहीं. सतराव्या शतकाच्या अखेरीस ही स्थिति पालटली. मोगल बादशाही खिळखिळी झाली. अशा स्थितींत इंग्रज व फरेंच व्यापाऱ्यांनीं किनाऱ्यावर आपली सत्ता थोडीबहुत वाढविण्यास आरंभ केला.

२. **पहिलें युद्ध** (इ. स. १७४४–४८) :—हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर इंग्रज–फरेंचांचीं ठाणीं शेजारीं शेजारीं होतीं. दोघांचीही व्यापाराच्या बाबतींत मोठी चुरस होती. आपला पाय किनाऱ्यावर कायम व स्थिर राहावा येवढ्यापुरतें दोघेही कर्नाटकच्या राजकारणांत पडत असत. असें असतां दोघांचें केव्हांतरी युद्ध होणें अपरिहार्य होतें. परंतु त्यांच्या झगड्याची प्रत्यक्ष सुरुवात येथील घडामोडीवर अवलंबून नव्हती. कारण युरोपांत इंग्लंड व फरान्स हीं राष्ट्रें एकमेकांशीं लढत नसतांना त्यांच्या येथील कंपन्यांस मनांत असूनही उघड वैर मांडतां येत नसे. पाँडिचरीचा फरेंच गव्हर्नर डुप्ले हा मोठा हुषार व धोरणी असून त्यानें कर्नाटकच्या नबाबाशीं आगाऊच वळणें बांधून ठेवलीं होतीं. इंग्रजांना हिंदुस्थानांतून अजिबात हांकून द्यावें असा त्यानें विचार केला. याच सुमारास इंग्रजांचें व फरेंचांचें युरोपांत युद्ध सुरू झालें. तेव्हां फरेंचांनीं इ. स. १७४६ त लाबरडोने नांवाचा फरेंच सरदार मोठ्या तयारीनिशीं हिंदुस्थानांत पाठविला. त्यानें मोठ्या

डुप्ले

झपाट्यानें मद्रास काबीज केलें, व लौकरच फोर्ट सेंट डेव्हिडशिवाय बाकीचीं सर्व ठाणीं फरेंचांच्या ताब्यांत आलीं. शेवटीं इ. स. १७४८ त युरोपांत या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन्ही राष्ट्रांत तह झाला व त्याबरोबर हिंदुस्थानांतही त्यांना युद्ध थांबविणें भाग पडलें. या युद्धांत हिंदुस्थानांत फरेंचांची एकंदरींत सरशी झाली.

३. **दुहेरी वारसाचें युद्ध** (इ. स. १७४८–१७५३) :—युद्ध थांबलें, पण युद्धेच्छा कोठें थांबली होती ? डुप्ले हा मोठमोठे बेत करूं लागला. कारण फरेंचांना आपल्या कर्तबगारीचा नुकताच अंदाज लागलेला होता. इंग्रजांशीं युद्ध चालू असतां फरेंचांनीं आपल्या मुलुखांत लढाई सुरू केली, याबद्दल कर्नाटकच्या नबाबास फार राग आला व त्यानें आपल्या मुलाच्या हाताखालीं दहा हजार फौज फरेंचांविरुद्ध पाठवून दिली. पण डुप्लेच्या एका लहानशा कवाइती फौजेनें तोफखान्याच्या साह्यानें त्या फौजेचा धुव्वा उडवून दिला. हिंदी व युरोपियन फौजांतील ही पहिली लढाई होय (इ. स. १७४६). याप्रमाणें हिंदुस्थानांत तरी इ. स. १७४८ सालीं फरेंचाचा सर्वत्र विजय होता. तेव्हां त्यांनीं याहून मोठें राजकारण हातीं घेतलें. हैद्राबादचा निजाम व अर्काट (कर्नाटक) चा नबाब यांच्या गादीसाठीं तेथील वारसांत भांडणें उपस्थित झालीं होतीं. त्याचा डुप्ले यानें फायदा घेऊन अर्काटच्या गादीसाठीं चंदासाहेब व अन्वरुद्दीन यांपैकीं डुप्लेनें चंदासाहेबास हाताशीं धरलें व हैद्राबादच्या गादीसाठीं नासिरजंगाविरुद्ध मुज्फरजंगाची बाजू घेतली. प्रथम फरेंचांनीं मुज्फरजंग व चंदासाहेब यांस बरोबर घेऊन कर्नाटकचा नबाब अन्वरुद्दीन याच्याशीं अंबूर येथें लढाई केली (इ. स. १७४९). तींत अन्वरुद्दीन मारला गेला व त्याचा मुलगा महंमदअल्ली हा पळून त्रिचनापल्लीस गेला. तेव्हां चंदासाहेब हा अर्काटचा नबाब बनला. पुढें हें विजयी सैन्य निजाम नासिरजंग याच्याविरुद्ध चाल करून जाणार, इतक्यांत नासिरजंग याचा खून झाला. यामुळें मुज्फरजंगास निजामाची जागा सहजच मिळाली. झालें. डुप्लेचे व फरेंचांचे बेत जवळजवळ सफळ झाले. चंदासाहेब हा अर्काटचा नबाब झाला व मुज्फरजंग हा निजाम बनला. इतक्यांत मुज्फरजंग इ. स. १७५१ त मारला गेला. परंतु त्यामुळें फरेंचांनीं हातीं घेतलेलें राजकारण बिघडलें नाहीं. नासिरजंगाचा धाकटा भाऊ सलाबतजंग यानें फरेंचांचा जोर ओळखून त्यांच्याच मदतीनें गादी मिळविली. नवीन बनलेल्या निजामानें फरेंच कंपनीस पाँडिचरीजवळील कांहीं गांवें इनाम दिलीं व डुप्ले यास कृष्णानदीच्या दक्षिणेकडील संपूर्ण प्रदेशाचा नबाब असा भपकेदार किताब दिला. निजामाच्या संरक्षणास बुसी नांवाचा एक कर्तबगार सरदार त्यानें ठेवून दिला व निजामानें त्यास सैन्याच्या खर्चाबद्दल आपला उत्तर सरकार प्रांत तोडून दिला.

४. **आणीबाणीचा प्रसंग** :—इंग्रजांना हा प्रसंग मोठा आणीबाणीचा होता. या संकटांतून निभावण्यास त्यांना एकच मार्ग होता; तो म्हणजे महंमद-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अल्ली त्रिचनापल्लीस पळून गेला होता, त्याचा पक्ष घेऊन चंदासाहेबास म्हणजेच पर्यायानें फरेंचांस विरोध करावयाचा. तोच मार्ग त्यांनीं स्वीकारला. त्रिचनापल्लीस फरेंचांनीं व चंदासाहेबानें याच वेळीं वेढा घातलेला होता, तो कसा उठवावा याची कोणास कल्पना येईना. या प्रसंगीं सैन्यांत रॉबर्ट क्लाईव्ह नांवाचा शिपाई होता. त्यानें असें सुचविलें कीं, जर या वेळीं चंदासाहेबाची राजधानी अर्काट या शहरावर हल्ला केला, तर चंदासाहेबाचें व फरेंचांचें लक्ष त्रिचनापल्लीहून तिकडे लागेल व शेवटीं त्यांना वेढा उठवणें भाग पडेल. क्लाईव्हनें स्वतःच ही युक्ति अंमलांत आणण्यास परवानगी विचारली व मद्रासच्या गव्हर्नरानें ती दिलीही. क्लाईव्ह लौकरच फक्त ५०० स्वारांनिशीं निघाला व अर्काटवर हल्ला करून तें शहर त्यानें काबीज केलें (इ. स. १७५१). त्याच्या कल्पनेप्रमाणें त्रिचनापल्लीहून चंदासाहेब कांहीं फौज घेऊन लागलीच धांवत आला व त्यानें अर्काटला वेढा घातला, परंतु पन्नास दिवसपर्यंत क्लाईव्हनें मोठ्या शौर्यानें टिकाव धरला. शेवटीं चंदासाहेब वेढा उठवून निघून गेला. लौकरच क्लाईव्ह व लॉरेन्स यांनीं त्रिचनापल्लीचा वेढा उठविला, महंमदअल्लीस सोडविला व त्यास नबाबाच्या गादीवर बसविलें. हें पाहून चंदासाहेब तंजावरच्या राजाच्या स्वाधीन झाला. तेथें त्याचा खून झाला. आतां पारडें फिरलें ! कारण महंमदअल्लीस कर्नाटकचा नबाब म्हणून राहण्यास कोणीच प्रतिस्पर्धी उरला नाहीं (इ. स. १७५३). हीं व्यापारी कंपन्यांचीं युद्धें युरोपांत पसंत पडलीं नाहींत. फरेंचांनीं आपला गव्हर्नर डुप्ले यास परत बोलावलें व पुढें इ. स. १७६३ सालीं तो मोठ्या गरीबींत मरण पावला. दक्षिण हिंदुस्थानच्या राजकारणांत पाऊल टाकून तेथें कांहीं काळ आपल्या कर्तृत्वानें चमकणारा असा हा पुरुष होता. हा महत्त्वाकांक्षी होता व याच्या बेतास फरेंच सरकारकडून पाठबळ मिळणें शक्य झालें असतें तर भावी इतिहासाचें स्वरूप बरेंच बदललें असतें यांत शंका नाहीं. फरेंच सरकारनें डुप्लेच्या जागीं गोदेहूची योजना केली. त्यानें आल्याबरोबर तह केला. त्या तहान्वयें दोन्ही कंपन्यांनीं देशी संस्थानिकांच्या भानगडींत पडूं नये असें ठरलें.

५. **तिसरें युद्ध** :—इ. स. १७५६ सालीं युरोपांत इंग्लंड व फरान्स यांच्यामध्यें युद्ध सुरू झालें. त्याबरोबर फरेंच सरकारनें काउन्ट लालीबरोबर मोठें आरमार देऊन त्यास भारतांत पाठविलें. लालीनें प्रथम मोठ्या सपाटच्यानें फोर्ट सेंट डेव्हिडवर हल्ला करून तो किल्ला काबीज केला व नंतर मद्रासवर हल्ला केला, परंतु तें शहर त्याला काबीज करतां आलें नाहीं. पुढें इंग्रज व फरेंच यांची इ. स. १७६० त वांदिवाश येथें गांठ पडली व इंग्लिश सेनापति सर आयर कूट यानें लालीचा पूर्ण पराभव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. तो पाँडिचरीस पळून गेला. परंतु कूटनें तेथेंही त्याचा पाठलाग केला व इ. स. १७६१ जानेवारीच्या १६ व्या तारखेस म्हणजे पानिपतच्या प्रसिद्ध लढाईनंतर दोनच दिवसांनीं तेंही ठिकाण काबीज केलें.

इ. स. १७६३ सालीं इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें तह झाला. त्या तहान्वयें सर्व भारतांत फ्रेंचांच्या ताब्यांत बंगालकडे चंद्रनगर व पूर्व किनाऱ्यावर पांडिचरी हीं फक्त दोनच ठाणीं राहिलीं व इंग्रज-फ्रेंचांमधील प्रत्यक्ष झगडा येथें पूर्ण झाला. युद्ध संपल्यावर लाली फ्रान्समध्यें परत आला. तेथें त्याची चौकशी होऊन त्यास फ्रेंचांनीं फांशीं दिलें. लाली हा उतावळा व तापट स्वभावाचा होता; त्याच्यामुळें फ्रेंचांचें बरेंच बस्तान बिघडलें हें खरें, परंतु त्यास त्यांनीं फांशीं दिलें हें मात्र अत्यंत गैर झालें यांत शंका नाहीं.

६. फ्रेंचांच्या अपयशाचीं कारणें :—फ्रेंचांचें यशापयश हें भारतांत डुप्ले यानें रचलेल्या कारस्थानांवर व शिपायांच्या शौर्यावर अवलंबून नव्हतें. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची उभारणी प्रथमपासूनच चुकीच्या तत्त्वांवर झालेली होती. ती राजाचे आश्रयाखालीं निघाली, राजाच्या महत्त्वाकांक्षेनें तिची जोपासना झाली व शेवटीं त्याच्या दुर्लक्षामुळें तिच्या मुळास कीड लागली. पुढें फ्रेंच कंपनीचा व्यापार उत्तम रीतीनें भरभराटींत आल्यावर तिला राजाश्रयाची जरुरी लागली नसती. परंतु फ्रेंचांनीं तेवढयांतच राजकारणांत हात घातला व एकदां लढाई सुरू झाल्यावर तर त्यांच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी कधींच झाली नाहीं. याच्या उलट इंग्रजांचें सर्व लक्ष व्यापाराकडे असल्यानें येथील राजकारणाकडे देखील ते नफ्यातोटयाच्या दृष्टीनें पाहात असत व आंतबट्टयाचा व्यवहार कधींच करीत नसत. यामुळें त्यांना स्वतःच्या पायावर उभें राहून जरुरीपुरतीच आपल्या देशाची मदत घेतां आली. तसेंच स्वदेशापासून इतक्या अंतरावर चाललेल्या युद्धांत ज्याचें आरमार श्रेष्ठ तोच शेवटीं विजयी व्हावयाचा हें ठरलेलें होतें आणि इंग्रजांचें आरमार फ्रेंचांच्या आरमारापेक्षां सरस होतें. तिसरें कारण असें कीं, फ्रेंचांनीं एकाच वेळीं पुष्कळ गोष्टी साधण्याचा यत्न केला. त्यांना अमेरिकेंतील वसाहतीचें साम्राज्य हवें होतें. भारतांतील व्यापार ताब्यांत हवा होता व युरोपांतही इतर राष्ट्रांस आपणांहून बलिष्ठ होऊं द्यावयाचें नव्हतें. याच्या उलट इंग्रजांनीं आपलें बळ पाण्यांत आहे हें ओळखून, त्याच्या जोरावर त्यांनीं फक्त अमेरिका व भारत येथें जोराचा यत्न केला. युरोपांतील विजयाची त्यांनीं कधींच क्षिति बाळगली नाहीं. याशिवाय क्लाइव्ह हा स्वतःच लढवय्या असल्यानें त्यास स्वतःचे बेत सिद्धीस नेतां आले; उलट डुप्लेला [illegible] आपल्या सेनापतीवर अवलंबून राहावें लागे. तसेंच कर्नाटकांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेवटचा सामना सुरू होण्यापूर्वीच बंगाल्यांत इंग्रजांना नीट तळ देऊन राहण्यास जागा झाली. ह्या गोष्टीही लक्षांत ठेवल्या पाहिजेत

७. बंगाल्यांतील उद्योग :—इंग्रज-फरेंचाचें कर्नाटकांत युद्ध चालू असतां इंग्रज बंगालमध्यें आपल्या राज्याचा पाया घालीत होते. अलिवर्दीखान हा बंगालचा नबाब इ. स. १७५६ त मृत्यु पावल्यावर त्याचा नातू सिराज उद्दौला हा गादीवर आला. परंतु तत्पूर्वींच इतर प्रतिस्पर्ध्यांचीं कारस्थानें चालू होतीं, त्यांत इंग्रजांनीं भाग घेतला व त्यांच्या साथीदारास आश्रय दिला. कृष्णदास हा व्यापारी अशा साथीदारांपैकींच होय. खेरीज इंग्रजांनीं आपल्या वखारीभोंवतीं मजबूत तटबंदीही केली. सिराज उद्दौल्यानें गादीवर येतांच आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा मोड केला व इंग्रजांसही त्यांच्या कृत्याचा जाब विचारला. त्यावर समाधानकारक उत्तर न आल्यानें सिराज उद्दौला चिडला व कलकत्त्यावर चाल करून गेला. तेव्हां बहुतेक इंग्रज अधिकारी गर्दीनें तेथून पळून हुगळी नदीपार समुद्रांत कांहीं अंतरावर नांगर टाकून राहिले. इकडे सिराजनें राहिलेल्याशीं लढाई करून तेथें आपला अंमल बसविला. या वेळीं रात्र झाल्यानें सिराजच्या अधिकाऱ्यांनीं उरलेल्या इंग्रजास तेथें असलेल्या एका खोलींत कोंडून ठेवलें. काळीं उठून पहातात तों यांतील कांहीं लढाईंतील जखमामुळें व गुदमरून गेल्यानें मृत्युमुखीं पडले. हा प्रकार इंग्रजी इतिहासांत 'कलकत्त्याची अंधार कोठडी' या नांवानें प्रसिद्ध आहे. या ठिकाणीं एकूण १४६ लोक कोंडले व त्यांतील फक्त २३ जिवंत राहिले असें हॉल्वेलचें वर्णन आहे परंतु तें अतिशयोक्तिपूर्ण आहे. समकालीन सिअर-उल्-मुताखरीन नांवाच्या ग्रंथांत या प्रकाराचा उल्लेख नाहीं. या ग्रंथाचा लेखक सय्यद गुलाम हुसेनखान हा इंग्रज पक्षपाती आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. असो.

८. प्लासीची लढाई :—या पराभवाचा वचपा भरून काढण्यासाठीं क्लाईव्ह धांवून आला. तो इंग्लंडमधून थोरला विल्यम पिट यास भेटून बरोबर आरमारी अधिकारी घेऊन मोठ्या तयारीनिशीं आला व इ. स. १७५६ त भारतांत पोहोंचला. प्रथम त्यानें पश्चिम किनाऱ्यावर तुळाजी आंग्रे याचें आरमार बुडविण्यास नानासाहेबास साहच केलें व तेथून तो थेट बंगाल्यांत आला व थोड्याच काळांत त्यानें कलकत्ता काबीज करून सिराज उद्दौल्याशीं हवा तसा तह करून घेतला. या वेळीं सिराजच्या दरबारीं कारस्थानें चालू असल्यानें त्याला इंग्रजांस नीट तोंड देतां आलें नाहीं. याच सुमारास इंग्लंडांत फरेंचांशीं युद्ध उद्भवलें व क्लाईव्हनें फरेंचांच्या चंद्रनगरवर हल्ला करण्याचें ठरविलें. सिराजची सहानुभूति फरेंचांकडे होती. तेव्हां प्रथम सिराजला बंगालच्या नबाबाच्या गादीवरून पदच्युत करावें असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्लाईव्हनें घाट घातला. त्याचा सेनापति मीरजाफर यास या कारस्थानांत गोवून घेतलें, कलकत्त्याचे बडे व्यापारीही त्यास सामील झाले. यानंतर क्लाईव्ह व सिराज यांच्यामध्यें २३ जून १७५७ रोजीं जी लढाई झाली तीच प्रसिद्ध प्लासीची लढाई होय. या लढाईंत मीरजाफर आयत्या वेळीं कुणाच्याच बाजूनें लढला नाहीं. पण क्लाईव्ह हा विजयी झाला. या लढाईंत इंग्रजांचे फक्त २३ लोक मारले गेले. यानंतर सिराज पळून गेला, तिकडे त्याचा खून झाला. मीरजाफर हा इंग्रजाच्या कृपेनें बंगालचा नबाब झाला. अशा रीतीनें बंगाल्यांत मोठी राज्यक्रांति होऊन इंग्रजी सत्तेचा पाया घातला गेला.

९. कंपनीचे लोभी अधिकारी :—नवीन नबाब बनलेल्या मीरजाफरास ई. इं. कंपनीच्या लोभी अधिकाऱ्यांच्या वाढत्या मागण्या पुऱ्या करतां येईनात. शेवटीं इ. स. १७६० मध्यें त्यांनीं मीर जाफरला काढून त्याच्या जागीं मीर कासीम यास नबाब केलें. नवीन नबाब झालेला कासीम मोठा धूर्त होता. प्रथम त्यानें आपली राजधानी मुर्शिदाबादेहून मोंगीर येथें नेली. हें ठिकाण कलकत्त्याहून तीनशें मैलांवर आहे. तेथें त्यानें काळजीपूर्वक कारभार करण्यास सुरुवात केली. काटकसर करून कंपनीचें कर्ज देऊन टाकिलें व नंतर तो व्यापाराकडे लक्ष देऊं लागला. कंपनीचे नोकर खाजगी व्यापार करीत व त्यासही जकातीची माफी मागत. देशांतील व्यापाऱ्यांस ही जकात पडत असल्यानें त्यांचा व्यापार चालेना, याबद्दल त्यानें तक्रार केली; परंतु त्याचें कांहींच चाललें नाहीं. तेव्हां मीर कासीमनें आपल्या राज्यांत सर्वच देशी व विदेशी व्यापाऱ्यांस जकात माफ केली. पण कंपनीचे चालक म्हणाले कीं, अशा रीतीनें जकातीची माफी देण्याचा नबाबास अधिकार नाहीं ! इतकेंच नव्हे तर, पाटणा येथें मिस्टर एलिस यानें नबाबाच्या अधिकाऱ्यांस तुरुंगांत ठेवलें. पुढें मीर कासीमवर इंग्रजांची फौज चालून आली व त्या लढाईंत मीर कासीमचा पराभव झाला. तेव्हां मीर कासीमनें रागानें आपल्या ताब्यांत असलेल्या सर्व इंग्रजांची कत्तल केली. तींत एलिस मारला गेला. इतकें झाल्यावर मीर कासीम पळून गेला. तो बादशाह शहाअलम व वजीर सुजाउद्दौला यांचेसह इंग्रजांवर चाल करून आला. त्यांस मेजर मन्रोनें तोंड दिलें. बक्सार येथें मोठी लढाई झाली. तींत नबाब, वजीर व बादशाह यांचा संपूर्ण पराभव झाला (इ. स. १७६४).

१०. दुहेरी राज्यव्यवस्था :—बक्सारची लढाई ही इंग्रजांच्या भारतांतील राज्यस्थापनेच्या उद्योगांतील महत्त्वाची घटना होय. या युद्धानें इंग्रज बंगालचे राज्यकर्ते बनले. यापुढील राज्यकारभाराची व्यवस्था लावण्याचें काम क्लाईव्ह याजकडे आलें. त्यानें इ. स. १७६५ त शहाअलम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बादशाहाजवळून कंपनीच्या नांवानें बंगालच्या दिवाणीचा अधिकार घेतला यापुढें कंपनीचे अधिकारी डेप्युटी नबाबाकडून प्रांताचा वसूल गोळा करीत; व सैन्य ठेवून प्रांताचें रक्षण करीत. एरव्हीं इतर सर्व कामें कंपनीनें नबाबाकडे सोंपविलीं व कंपनीचे अधिकारी त्यास दरसाल वसूलांतून ठराविक रक्कम देत असत. ह्या व्यवस्थेस 'दुहेरी राज्यव्यवस्था' असें म्हणतात.

११. **दुहेरी राज्यव्यवस्थेचे दुष्परिणाम :**—क्लाईव्हनें केलेली व्यवस्था कंपनीच्या दृष्टीनें कितीही फायदेशीर असली, तरी तिचे बंगालवर फार वाईट परिणाम झाले. कंपनी प्रांताचा वसूल करी व कराराप्रमाणें २६ लक्ष रुपये बादशाहास देई. नबाबास राज्यकारभार चालविण्यास प्रथम ५३ लक्ष रुपये देण्याचें ठरलें होतें. परंतु ते कंपनीनें कमी करीत करीत इ. स. १७६९ त ३२ लक्षांवर आणले. नबाबानें याबद्दल तक्रार केली. परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कंपनीचे नोकर वसूल गोळा करतांना जुलूम करीत. याबद्दल लोक नबाबाच्या कोर्टांत तक्रार करीत. परंतु कंपनीचे नोकर त्या कोर्टास जुमानीत नसत. कंपनीस स्वतःच्या खर्चाबद्दल अजमासें ६० लक्ष रुपये लागत. हा खर्च वजा जातां दरसाल एक कोटीच्या वर रक्कम कंपनीस राज्यकारभाराबद्दल निव्वळ फायदा म्हणून उरत असे. या फायद्यांतून कंपनीच्या भागिदारांस भारी व्याज दिलें जात असे व विलायत सरकारनेंही कंपनीनें सरकारास दरसाल ४०,००० पौंड (१ पौं. = १० रु.) द्यावे असा ठराव इ. स. १७६७ त पास केला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इ. स. १७६५ ते ७२ पर्यंतचा बंगालचा राज्यकारभार व्यापारी दृष्टीनें चालविला जात असे.

१२. **व्यापार व उद्योगधंदे :**—कंपनीच्या नोकरांचा खाजगी व्यापार बंद झाला नव्हता. कंपनीच्या नोकरांस मीठ, सुपारी, तंबाखू अशा जिनसा विकण्याचे मक्ते दिले होते. त्यामुळें ते जिन्नस फार महाग झाले. बंगाल्यांत या काळीं रेशमाचें उंची कापड तयार होत असे. कंपनीनें रेशमाच्या निपजेस उत्तेजन दिलें. परंतु विणकऱ्यांना येथें कापड तयार करण्यास अनेक मार्गांनीं प्रतिबंध केला. अशा रीतीनें कच्चा माल येथें उत्पन्न करून त्याचा इंग्लंडांत पक्का माल बनवावा व मग तो येथें आणून विकावा हें धोरण कंपनीनें अंमलांत आणलें. यामुळें थोडक्याच काळांत देशांतील उद्योगधंदे नष्ट होऊं लागले.

या सर्व गोष्टींचा परिणाम फार भयंकर झाला. इ. स. १७६९ सालीं बंगाल्यांत पाऊस कमी पडला व पुढें भयंकर दुष्काळ पडला. बंगालची एक-तृतीयांश लोकसंख्या त्या दुष्काळांत मेली; पण कंपनीचा वसूल मात्र कमी झाला नाहीं. तिनें दुष्काळाच्या सालीं ५ टक्के सूट दिली व पुढील सालीं १० टक्के वाढ केली ! मिळून कंपनीनें थोडा जास्तच वसूल केला. गरीबीमुळें लोकांत अगदीं त्राण उरलें नाहीं. मग लोक कंपनीचे जिन्नस कोठून घेणार ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कंपनीच्या व्यापारावर याचा तेव्हांच परिणाम झाला व कंपनीस नुकसान येऊं लागलें. शेवटीं विलायत सरकारनें कंपनीस मदत केली नाहीं तर कंपनीचें दिवाळें निघेल अशी वेळ आली.

१३. वॉरन हेस्टिंग्जचें धोरण :—दुहेरी राज्यव्यवस्थेमुळें बंगालमध्यें जी अव्यवस्था माजली तिच्यांतून मार्ग काढणारा पुरुष वॉरन हेस्टिंग्ज होय. इ. स. १७७२ च्या एप्रिल महिन्यांत याची बंगालच्या गव्हर्नराच्या जागेवर नेमणूक झाली. हेस्टिंग्जचें कार्य फार कठिण होतें. कारण बंगालमध्यें त्या वेळीं माजलेल्या अस्वस्थतेच्या बुडाशीं कंपनीचें व्यापारी धोरण हें एकच मुख्य कारण होतें व तें नाहींसें करणें त्याच्या हातांत नव्हतें. त्यानें क्लाईव्हची दुहेरी राज्यव्यवस्था हलके हलके नाहींशी केली. डेप्युटी नबाब काढून टाकून त्यांच्याऐवजीं इंग्रज कलेक्टर्स वसुलाच्या कामावर नेमले. नबाबाचे बहुतेक अधिकार काढून घेतले आणि फिर्यादींची चौकशी करण्यासाठीं सदर दिवाणी अदालत व सदर निजामी (फौजदारी) अदालत नांवाचीं अपील कोर्टें स्थापन केलीं. अशा रीतीनें त्यानें दुहेरी राज्यव्यवस्थेचा शेवट केला. परंतु पैशाच्या लोभानें त्यानें रयतेकडून वसूल गोळा करण्याचें काम मक्त्यानें दिलें. यामुळें रयतेची लूट चालूच राहिली.

१४. रेग्युलेटिंग ॲक्ट (इ. स. १७७३):—बंगालमधील अपकृत्यांची विलायतेंत पार्लमेंटांत चौकशी होऊन 'रेग्युलेटिंग ॲक्ट' पास झाला. या कायद्यानें मुंबई, मद्रास व बंगाल या सर्व ठिकाणचें धोरण सुसूत्र रहावें म्हणून गव्हर्नर जनरलची नेमणूक झाली आणि बंगालचा गव्हर्नर हाच गव्हर्नर जनरल असावा असें ठरलें. त्याला मदत करण्यासाठीं एक चार जणांचें कार्यकारी मंडळ नेमण्यांत आलें. या कार्यकारी मंडळानें जरूर ते कायदेही करावयाचे, पण ते वरिष्ठ कोर्टास पसंत असले पाहिजेत असा निर्बंध होता. कंपनीच्या जुलमाविरुद्ध रयतेस न्याय मिळवून देण्यासाठीं एका वरिष्ठ कोर्टाची स्थापना झाली. या कायद्यान्वयें निर्माण केलेली गव्हर्नर जनरलची जागा वॉरन हेस्टिंग्ज यास देण्यांत आली.

१५. हेस्टिंग्जचें कर्तृत्व :—हेस्टिंग्ज राज्यकारभार करीत असतां त्याच्या मार्गांत फार अडचणी आल्या. मुंबईच्या गव्हर्नरनें राघोबाचा पक्ष घेऊन मराठ्यांशीं युद्ध ओढवून घेतलें व मद्रासच्या गव्हर्नरनें हैदरशीं युद्धप्रसंग आणला. भारतांतील या दोन सत्ताधीशांशीं लढून कंपनीची सत्ता टिकवून धरणें हें मोठें कठीण काम होतें. याच वेळीं इंग्लंड हे अमेरिकन वसाहतवाल्यांशीं लढण्यांत गुंतलेलें होतें. या युद्धांत इंग्लंडचा पराभव होऊन अमेरिकेनें स्वातंत्र्य संपादन केलें. अशा स्थितींत हेस्टिंग्जला इंग्लंडहून कांहीं मदत मिळण्याची आशा नव्हती. येथें कार्यकारी मंडळावर नेमले गेलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचे सहकारी सभासद त्यास साहृय करण्याऐवजीं त्याचा पिच्छा पुरवीत राहिले. या सर्व कारणांनीं त्यास राज्यकारभाराची घडी बसविण्यास उसंत मिळाली नाहीं. नित्य चालू असलेल्या युद्धास पैसा उभा करण्यासाठीं त्यास अनेक भलीबुरीं कामें करावीं लागलीं. त्यानें काशीचा राजा चेतसिंग व अयोध्येच्या बेगमा यांच्याकडून कित्येक लक्ष रुपये उकळले. याचा विलायतेंत फार गवगवा झाला. व्यापारी कंपनी राज्य करण्यास लायक नाहीं. तिच्या हातून राज्यकारभार काढून घ्यावा अशी ओरड सुरू झाली. शेवटीं 'पिट्स इंडिया ॲक्ट' पास होऊन 'बोर्ड ऑफ कंट्रोल' नांवाचें एक सहा जणांचें मंडळ विलायत सरकारनें नेमलें. त्याच्या हातीं कंपनीच्या सर्व राजकीय कारभाराची देखरेख सोंपविण्यांत आली. या कायद्यानें हेस्टिंग्ज हा राज्यकारभारापुरता विलायत सरकारचा नोकर बनला. यापुढें अधिकारावर राहण्यांत हशील नाहीं हें लक्षांत घेऊन त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला. हेस्टिंग्ज विलायतेंत गेल्यावर त्याच्या कारभाराची कसून चौकशी झाली. त्याच्या जुलुमी कृत्यांमुळें त्याजविरुद्ध वातावरण फार खवळलें होतें; पण एकंदरींत त्यानें कठीण प्रसंगांतून इंग्रजांचें भारतांतील राज्य वांचविलें हें लक्षांत घेऊन तो दोषमुक्त झाला. हेस्टिंग्ज पुढें इ. स. १८१८ त मृत्यु पावला. वयाच्या १७ व्या वर्षी कारकुनाच्या जागेवर काम करण्यास आलेल्या हेस्टिंग्जनें या देशांत ३५ वर्षे राहून त्या काळांत चढत चढत तो गव्हर्नर जनरल बनला. भारतांतील इंग्रजी सत्तेचा पाया घालण्याचें श्रेय बहुतेक इतिहासकार त्यासच देतात, तें योग्यच आहे.

१६. **लॉर्ड कॉर्नवॉलीस** :—हेस्टिंग्जच्या मागून गव्हर्नर जनरलच्या जागीं आलेल्या लॉर्ड कॉर्नवॉलीसनें हेस्टिंग्जचें राज्यकारभाराची घडी बसविण्याचें कार्य हातीं घेतलें. त्यानें सर्व प्रांतांचे लहान लहान विभाग (जिल्हा) पाडून तो विभाग एकएका कलेक्टराचे हातीं दिला; परंतु त्यानें कलेक्टरास मुलकी (वसुली) दाव्याची चौकशी करण्याचा अधिकार दिला नाहीं. कारण हा अधिकार कलेक्टराच्या हातीं असल्यावर कलेक्टराचे नोकर व रयत यांच्यांत भांडण उपस्थित झाल्यास या भांडणांत कलेक्टरला आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांची बाजू लवकरच पटण्याचा संभव असतो; म्हणून कॉर्नवॉलीसचें असें करणें यथायोग्य होतें. न्यायाच्या पद्धतींत सुधारणा व्हावी म्हणून त्यानें सर्व प्रांतभर दिवाणी व फौजदारी कोर्टें स्थापन केलीं. मात्र खर्चाची बचत व्हावी म्हणून त्यानें दिवाणी कोर्टाच्या जज्जासच मॅजिस्ट्रेटचे अधिकार देऊन फौजदारी गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार दिला. दूरदूरच्या लोकांस अपील करण्यास सुलभ जावें म्हणून त्यानें कलकत्ता, डाक्का, मुर्शिदाबाद व पाटणा येथें प्रांतिक अपील कोर्टें स्थापन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलीं. त्यांवर सदर अदालत हें वरिष्ठ कोर्ट होतें व त्याच्याही वर गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिलकडे फेर अपील करण्याची त्यानें मोकळीक ठेवली. एकंदरींत कॉर्नवॉलीसनें ब्रिटिश राजसत्तेच्या अन्तर्गत राज्यव्यवस्थेचा पाया घातला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१७. **कायमधाऱ्याची पद्धत** :—त्यानें केलेली सर्वांत महत्त्वाची सुधारणा 'कायमधाऱ्याची जमीनदारी' यासंबंधींची होय. या पद्धतीनें जमीनदार आपल्या जमिनीचे वंशपरंपरागत मालक झाले. जमीनदारांनीं रयतेपासून सारा गोळा करावा व सरकारचें नियमित देणें द्यावें अशी पद्धत सुरू झाली. सरकारचें देणें एकदां कायमचें ठरून गेल्यामुळें साहजिकच जमीनदार शेतीकडे विशेष लक्ष देतो व त्यास आपली जमीन सोन्याच्या तुकड्याप्रमाणें मोलाची वाटते. ह्यामुळें अप्रत्यक्षपणें शेतीसही उत्तेजन मिळतें. परंतु या पद्धतीमुळें बंगालमध्यें जमिनीचा वसूल वाढविण्याचा मार्ग खुंटला. जमीनदारांची पुढें पुढें फारच चैन झाली. पण सरकारला राज्यकारभारासाठीं पैसा उभा करण्यास अन्य मार्ग शोधावे लागले. खेरीज या योजनेचा खरा फायदा जमीनदारांसच मिळाला. जमीन करणाऱ्या शेतकऱ्यास या कायमधाऱ्याचा लाभ झाला नाहीं. याबाबत पुढें इ. स. १८५९ मध्यें टेनन्सीचें (कुळाच्या सरंक्षणाचे) कायदे करण्यांत आले, तरी जमीनदारांचें प्रस्थ कमी झालें नाहीं. एकंदरींत राज्यकारभाराची वाढती गरज लक्षांत घेतां सारा कायम करणें इष्ट नव्हे; व या कायमपणाचा फायदा फक्त जमीनदारांसच मिळत राहणें हें तर त्याहूनही इष्ट नव्हे. लॉर्ड कॉर्नवॉलीसला सर्व व्यवस्था त्वरेनें लावून राज्यास स्थिर असा वसूल मिळवून द्यावयाचा होता, या दृष्टीनें त्यानें जें घाईघाईनें केलें त्याचें समर्थन करतां येईल. एरवीं जमीनदारी कायमधाऱ्याची पद्धति ही अशास्त्रीय व सदोष आहे यांत शंका नाहीं.

१८. **टिपूशीं युद्ध** :—कॉर्नवॉलीस अधिकारावर असतां इंग्रजांचें म्हैसूरच्या टिपूशीं युद्ध उद्भवलें. हैदरच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू यानें एक-दोन लढायांत इंग्रजांचा पराभव करून तें युद्ध आटोपतें घेतलें व आपण श्रीरंगपट्टणच्या गादीवर बसला (इ. स. १७८३). टिपू म्हणजे अठराव्या शतकांतील प्रति-औरंगजेब होय. इस्लामी धर्मस्थापनेची त्यास महत्त्वाकांक्षा होती. तो स्वतःच्या राज्यांत शांतता राखीत असे. त्यामुळें प्रजा सुखांत होती. तो स्वतः मोठा कल्पक असून वजनें मापें, व कालमापन वगैरे बाबतींत त्यानें इस्लामी संस्कृतीस अनुसरून अनेक फेरफार केले. टिपू हा उत्तम सेनानायक होता, व म्हणूनच त्यानें आपल्या अनेक शत्रूंना मोठ्या शौर्यानें तोंड दिलें. हैदर व टिपू ही जोडी शिवाजीप्रमाणें सतराव्या शतकाच्या पूर्वार्धांत उत्पन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली असती तर कदाचित त्यांस चिरस्थायी सत्ता स्थापन करतां आली असती. टिपू हा महत्त्वाकांक्षी होता. तेव्हां त्यानें राज्यांतील सत्ता आपल्या हातीं आल्याबरोबर आपला मुलुख वाढविण्यास सुरुवात केली. त्याच्या राज्याची सरहद्द इंग्रज, मराठे व निजाम यांच्या राज्यांस लागून असल्या-मुळें त्याचा या त्रिवर्गाशीं खटका उडणें अपरिहार्य होतें. हें पाहून कॉर्न-वॉलीसनें मोठ्या दूरदर्शीपणानें इंग्रज, मराठे व निजाम यांची जूट घड-वून आणली व टिपूशीं इ. स. १७९०–९२ या दोन वर्षांत युद्ध करून त्यास अगदीं जेरीस आणलें. नंतर झालेल्या तहांत टिपूनें आपलें अर्धें राज्य दिलें; तें वरील त्रिवर्गानें वांटून घेतलें. वास्तविक कॉर्नवॉलीसला टिपूची सत्ता समूळ नष्ट करावयाची होती; पण मराठ्यांनीं ओळखलें कीं टिपूची सत्ता नष्ट झाल्यास इंग्रज फार भारी होतील. म्हणून त्यांनीं तहासाठीं आग्रह धरला व तो घडवून आणला.

१९. **तटस्थपणाचें धोरण** :—कॉर्नवॉलीस इ स. १७९३ त विलायतेस गेला व त्याच्या जागीं सर जॉन शोअर हा गव्हर्नर जनरल झाला. या वेळीं भारतांत इंग्रजी सत्तेचा पाया घातला गेलेला होता. यापुढें इंग्र-जांनीं आक्रमक धोरण स्वीकारून प्रतिस्पर्ध्यांना हलके हलके आपल्या ताब्यांत आणावें व अशा रीतीनें आपल्या राज्याचें साम्राज्य बनवावें, कीं कंपनीच्या व्यापारी दृष्टीवर भर देऊन होतां होईतों युद्ध टाळून तटस्थ राहावें असा प्रश्न उत्पन्न झाला होता. सर जॉन शोअर हा तटस्थतावादी होता; पण त्याच्या प्रतिपक्षाचें म्हणणें असें कीं आपण तटस्थ राहिलों तरी मराठे, फ्रेंच वगैरे आपले प्रतिपक्षी तटस्थ राहणार नाहींत. ते आपल्या गप्प बसण्याचा फायदा घेऊन वरचढ होतील व त्यामुळें कदाचित् आपल्या राजकीय व व्यापारी अस्तित्वावरच गदा येईल. सर जॉन शोअरच्या जागीं इ. स. १७९८ त आलेला लॉर्ड वेलस्ली यास हा विचार पटला व त्यानें भारताच्या इंग्रजी सत्तेची पहिल्या प्रतीची साम्राज्यसत्ता बनविण्याचें ध्येय डोळ्यापुढें ठेवलें.

२०. **तैनाती फौजेची पद्धत** :—हें ध्येय साध्य करण्याकरितां त्यानें तैनाती फौजेची पद्धत अंमलांत आणण्याचें ठरविलें. त्याच्या अटी पुढील प्रमाणें होत्या :—(१) देशी संस्थानिकांनीं स्वतःच्या संरक्षणार्थ ब्रिटिशांची फौज आपल्या पदरीं बाळगावी, (२) तिचा खर्च भागेल एवढ्या वसुलाचा प्रांत ब्रिटिशांस तोडून द्यावा (३) ब्रिटिशांचा रेसिडेंट त्यांचे दरबारीं राहावा, (४) इंग्रजांच्या मध्यस्थीशिवाय दुसऱ्या कोणत्याही सत्तेशीं युद्ध किंवा तह करूं नये, (५) इतर संस्थानिकांबरोबर उत्पन्न झालेले वाद इंग्र-जांच्या मध्यस्थीनें तोडावेत, (६) इंग्रजांशिवाय इतर युरोपियन राष्ट्रांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांस संस्थानिकांनीं आश्रय देऊं नये. या अटी इतक्या स्पष्ट आहेत कीं, त्यांवर निराळी टीका करण्याचें कारण नाहीं. वेलस्लीची तैनाती फौजेची पद्धत व मराठ्यांची चौथाईसरदेशमुखीची पद्धत यांत तत्त्वतः फरक नाहीं. मराठे बादशाही मुलुखाच्या संरक्षणार्थ चौथाई मागत व वेलस्लीनें मुलुख तोडून मागितला. साम्राज्यसत्ता प्रस्थापित करूं पाहणारीं राष्ट्रें असलें कोणतें तरी तत्त्व पुढें करतात व आपली सत्ता वाढवितात. खुद्द देशी संस्थानिकांच्या दृष्टीनें या अटींचा अर्थ हाच कीं, त्यांनीं बिनमोल स्वातंत्र्याची किंमत देऊन बेगडी सुरक्षितपणाचा उपभोग घ्यावा. बेगडी म्हणण्याचें कारण असें कीं, एकदां संस्थानिकावरील आपल्या संस्थानचें रक्षण करण्याची जबाबदारी नाहींशी झाली म्हणजे तो बेफिकीर बनतो व राज्यांत अव्यवस्था माजते. ही अव्यवस्था मोडण्यास जास्त बंदोबस्त करावा लागतो. त्याकरितां तैनाती फौजेची तात जास्त घट्ट बसते व त्यामुळें तो संस्थानिक अधिकच बेफिकीर बनतो. अशा रीतीनें तैनाती फौजेमुळें बेफिकीरी, बेफिकीरीमुळें अव्यवस्था व अव्यवस्थेमुळें वाढती तैनाती फौज अशी चढत्या श्रेणीची परंपरा सुरू होते.

२१. **साम्राज्याची उभारणी** :—तैनाती तत्त्वाचा अंमल त्यानें प्रथम निजामवर केला व त्यास आपल्या कक्षेंत आणलें. या वेळीं फरान्सचा बादशहा नेपोलियन युरोपांत दिग्विजय गाजवीत इजिप्तपर्यंत आलेला होता व त्याचा भारतांतील सत्ताधिशाशीं, विशेषतः टिपूशीं पत्रव्यवहार सुरू होता. हें पाहून वेलस्लीनें विलंब न लावतां टिपूशीं युद्ध सुरू करून त्याचा सपशेल पराभव केला. या युद्धांत टिपू मारला गेला. त्यावर वेलस्लीनें म्हैसूरच्या गादीचा जुना हिंदु राजा कृष्णराज यास त्याचें राज्य देऊन बाकीचा मुलूख खालसा केला. इतकें होतें तों, इंग्रजांना मराठ्यांशीं युद्ध करण्याची संधि आली. कारण दुसरा बाजीराव आपल्या पायानें वाट चालत इंग्रजांकडे वसईस त्यांची मदत मागण्यासाठीं आला. इंग्रजांनीं त्यास तैनाती तहानें बांधून घेतलें. यानंतरच्या धडामोडींत इंग्रज मराठ्यांचें युद्ध झालें. त्यांत पेशवा, शिंदे, भोसले, होळकर या सर्वांचा पराभव झाला. अशा रीतीनें भारतांतील सर्व प्रतिस्पर्धी सत्ताधीशांस नामोहरम करून वेलस्लीनें भारतांतील ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला.

२२. **समालोचन** :—व्यापारी कंपनीच्या स्थापनेपासून प्रारंभ करून इंग्रज साम्राज्यसत्तेच्या स्थितीप्रत कसे येऊन पोहोंचले याचें धावतें समालोचन वर दिलें आहे. या सर्व उद्योगांत त्यांचा पद्धतशीरपणा व राष्ट्रीय दृष्टि दिसून येतात. मराठ्यांनीं आपली सत्ता कशी वाढविली याची तुलना केल्यास इंग्रजांचा पद्धतशीरपणा लक्षांत येईल. जिंकलेल्या प्रदेशांची व्यवस्था लावल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर पुढें पाऊल टाकावें, एकदां पुढें पाऊल टाकल्यावर बाजू अंगावर आल्यास चूक कोणाची यावर वाद करीत न बसतां सर्वांनीं एकजुटीनें आलेलें संकट दूर करावयाचें हें इंग्रजांचें धोरण, त्यांचें मराठ्यांशीं जें पहिलें युद्ध झालें त्यांत दिसून येतें. तेव्हां मुंबईकर व कलकत्तेकर इंग्रज एकमेकांशीं भांडते तर इंग्रजी सत्ता टिकून राहिली नसती. खेरीज एकवार संधि आल्यावर तिचा संपूर्ण उपयोग करून घेण्याचें महत्त्व लॉर्ड वेलस्लीनें ओळखलें. मराठ्यांच्या दरबारांत भांडणें होतीं. टिपूबद्दल कोणाही सत्तेस सहानुभूति वाटत नव्हती. निजाम तर कमकुवत झालाच होता. अशा वेळीं घाई करून एकएका प्रतिपक्षास त्यानें नामोहरम करून आपल्याकक्षेंत आणलें, ही गोष्ट वेलस्लीच्या कर्तृत्वाची साक्ष पटविणारी आहे यांत शंका नाहीं.

प्रश्न

१. भारतांत वर्चस्व मिळविण्यांत इंग्रजांना यश कां आलें? फरेंचांना अपयश कां आलें याची मीमांसा करा. २. प्लासी व वांदिवाश येथील लढायांचें महत्त्व काय? ३. टीपा लिहा :—(१) क्लाईव्ह व डुप्ले यांची तुलना, (२) दुहेरी राज्यव्यवस्था, (३) रेग्युलेटिंग अॅक्ट, (४) कायमधाऱ्याची पद्धति, ४. हेस्टिंग्ज व वेलस्ली यांचें कर्तृत्व वर्णन करा.

अभ्यास

(१) अर्काटला वेढा घालण्याची योजना रॉबर्ट क्लाईव्ह मद्रासच्या गव्हर्नरास सांगत आहे, ही मध्यवर्ती कल्पना घेऊन क्लाईव्हचें मद्रासच्या गव्हर्नराशीं झालेलें संभाषण लिहा. (२) सोबतचें चित्र हा मोगल साम्राज्यरूपी प्रचंड वृक्ष आहे, १८ व्या शतकांत हा जीर्ण झाला असतां त्यास कोणीं कोणीं पोखरलें व त्याचा भाग व्यापून टाकला तें लिहा. उदा. १७४३ त मराठ्यांनीं माळवा घेतला. अशा रीतीनें मराठे, मुसलमान सुभेदार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व इंग्रज यांच्या आक्रमणांचा उल्लेख करा. (३) हेस्टिंग्ज चौकशी कमिटींत तुम्ही सभासद असतां तर त्यास कोणते प्रश्न विचारले असते ?

माहितीसाठीं

राज्य वाढविण्याची संधि

कर्नल क्लाईव्हनें इंग्लंडचा मुख्य प्रधान वुइल्यम् पिट् यास इ. स. १७५९ सालीं लिहिलेल्या पत्रांतील उतारा :—

इंग्रजी सैन्याला (प्लासी येथें) मिळालेल्या विजयामुळें येथें जी क्रान्ति घडून आली आहे.......त्याकडे इंग्लंडांतील जनतेचें बरेंच लक्ष वेधलें आहे असें दिसतें.......संधि मिळतांच आपलें राज्य आणखी वाढविण्यासाठीं जास्त सैन्य पाठविण्याबद्दल व खूप मोठें सैन्य खडें ठेवण्याबद्दल मीं वारंवार लिहिलें आहेच.......अशा तऱ्हेची संधि लवकरच आपणाला मिळणार आहे.

......हल्लींच्या कोणाही एका राज्यकर्त्याबद्दल येथील रहिवाशांना विशेष प्रेम वाटत नाहीं. सध्यांच्या राज्यव्यवस्थेखालीं त्यांना जीवाची व मालमत्तेची सुरक्षितता वाटत नाहीं व असें एकतंत्री राज्य जाऊन त्या जागीं सौम्य पद्धतीचें (इंग्रजी) राज्य आलें तर त्यांना आनंदच वाटेल. इंग्रजी सैन्य थोडेसें आलें तरी पुरे आहे. कारण येथील काळ्या पलटणींना येथील राज्यकर्त्यांकडून मिळणाऱ्या पगारापेक्षां आम्ही जास्त पगार देतों व जास्त चांगल्या तऱ्हेनें वागवितों, यामुळें वाटेल तितके काळे सैनिक आम्हांस सहज मिळूं शकतात.

तुमचा अत्यंत नम्र सेवक
रॉबर्ट क्लाईव्ह

(कीथ: स्पीचेस अॅन्ड डॉक्युमेन्टस् ऑन इन्डियन पॉलिसी, भाग १ ला, पृ. १३.)

२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्ययुग

तेराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत

समकालीन घडामोडी

जग	भारत
मॅग्नाचार्टावर जॉनची सही १२१५	१२०६ गुलाम घराण्याची स्थापना
केंब्रिज विद्यापीठाची स्थापना १२३१	१२३० कुतुबमिनारचें काम पूर्ण
मार्को पोलो, व्हेनिशियन प्रवासी चीनकडे निघाला १२७१	१२७५ ज्ञानेश्वराचा जन्म
रॉजर बेकन या प्रयोगवादी शास्त्रज्ञाचा मृत्यु १२९३	१३०४ चितोडचा जोहार : चितोड जिंकलें
ब्रिटिश पार्लमेंटची पहिली बैठक १२९५	१३३६ विजयनगर राज्याची स्थापना
बंदुकीच्या दारूचा शोध १३२६	१३४७ झफरखानानें बहमनी राज्य स्थापिलें
जोन ऑफ आर्कला जाळलें १४३१	१३९८ तैमूरची भारतावर स्वारी
जॉन गटेनबर्गनें जर्मनींत छापण्याच्या कलेचा शोध लावला १४३६	१४१९–६९ राणा कुंभ
तुर्कांनीं कॉन्स्टॅन्टिनोपल घेतलें १४५३	१४६९ गुरु नानक जन्म, मृत्यु (१५३८)
दुर्बिणीचा शोध लावणारा कोपर्निकस १४७३ ते १५४३	१४८१ महमूद गावान (बहमनी राज्य) याचा वध
अमेरिकेचा शोध लावणारा कोलंबस १४९२	१४९८ वास्को-द-गामा कालिकतास आला
इंग्लंडांत धर्ममठांचा विध्वंस १५३६	१५०९ विजयनगरच्या गादीवर कृष्णदेवराय
मार्टिन ल्यूथरचा मृत्यु १५४६	१५२६ पानिपतची पहिली लढाई; इब्राहीम लोदीचा बाबरानें पराभव केला.
पृथ्वीचें गोलत्व सिद्ध करणारा गॅलिलिओ १५६४–१६४२	१५२८–९८ एकनाथ
शेक्सपिअरचा जन्म १५६४	१५४२ अकबराचा जन्म
ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना १६००	१५५६ पानिपतची दुसरी लढाई
	१५६१–८९ संगीतसम्राट् तानसेन
	१५६२ अकबरानें जिझिया कर बंद केला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जग

व्हर्जिनीया वसाहत	१६०६–१६०७
बायबलचें इंग्रजी भाषांतर	१६११
युरोपियनांस जपानांत येण्यास बंदी	१६३८
गुरुत्वाकर्षणाचा शोधक न्यूटन याचा जन्म	१६४२
इंग्लंडचा राजा चार्लस पहिला यास फांशी	१६४९
भर्तृहरीच्या शतकांचें हॉलंडांत भाषांतर : युरोपांत गेलेला पहिला संस्कृत ग्रंथ	१६५१
बॉइल्स लॉ	१६५४
कवि मिल्टनचा मृत्यु	१६७४
हेबियस कॉर्पस ॲक्ट	१६७९
इंग्लंडांत रक्तहीन राज्यक्रांति	१६८९
बँक ऑफ इंग्लंडची स्थापना	१६९४
हिंदी तलम कापडाच्या आयातीवर इंग्लिश पार्लमेंटनें नियंत्रण घातलें	१७००
पीटर दि ग्रेटनें सेंट पीटर्सबर्गची समुद्रकांठीं स्थापना केली.	१७०३
डेफो, रॉबिन्सन क्रूसो लिहितो	१७११
इंग्लंडांत संयुक्त प्रधान मंडळाची पद्धति सुरू	१७२१
धांवत्या धोटयाचा शोध	१७३३
कार्ल सेल हा स्वीडिश शास्त्रज्ञ हवेंतील ऑक्सिजनची श्वासोश्वासास जरूर असल्याचा शोध लावतो. इ. स.	१७४२–४८.
जेन्नर गोस्तन देवीची युक्ति काढतो.	१७४९–१८२३

भारत

१५६५	विजयनगर साम्राज्याचा अस्त
१५७६	हळदीघाटाचें युद्ध
१६१६	पंजाबमध्यें प्लेग
१६३०	शिवाजीचा जन्म
१६३६	निजामशाहीचा शेवट
१६६८	हिंदूंचीं देवळें पाडण्याचा हुकूम
१६७४	शिवाजीस राज्याभिषेक
१६७९	जिझिया कर पुन्हा सुरू
१६८६	आदिलशाही नष्ट
१६८७	कुतुबशाही नष्ट
१७०८	गुरु गोविंदसिंगाचा खून
१७१४	पेशवाईचा उदय
१७१९	मराठयांना दक्षिणेंतील चौथाईची सनद
१७३७	बाजीरावाची दिल्लीवर स्वारी
१७३९	नादीरशहाची स्वारी
१७४९	युरोपियन व हिंदी फौजेचा अंबूर येथें पहिला सामना-हिंदी लोकांचा पराभव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जग

एन्सायक्लोपेडिया ब्रिटानिकाचें काम सुरू १७५१
सप्तवार्षिक युद्ध १७५६–६३
(इंग्रजांचा अमेरिका व हिंदुस्थानांत विजय)
हारग्रेव्हजनें स्पिनिंग जेनीचा शोध लावला. १७६४
आर्कराईटनें वॉटर फरेम तयार केली. १७६८
वॅटनें वाफेचें इंजिन तयार केलें. १७६९
ॲडम स्मिथचा 'वेल्थ ऑफ नेशन्स' हा अर्थशास्त्रा-वरील पहिला ग्रंथ १७७६
अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा १७७६
स्पिनिंग म्यूलचा शोध १७७९
स्टीम बोटीचा शोध १७८०
फरेंच राज्यक्रांति १७८९
धुराच्या दिव्याचा शोध १७९०
सर मायकेल फॅरडे, डायने-मोचा संशोधक १७९१–१८६७
नेपोलियनचा उदय १७९३
वेंटस्वर्थ ते क्रायडनपर्यंत तिकिटें देऊन प्रवासी नेणारी पहिली आगगाडी १८०३
डेन्मार्कमध्यें गुलामगिरी बंद १८०२
ट्राफलगारची लढाई, फरेंचांचा पराभव १८०५

भारत

१७५१ अर्काटचा वेढा
१७५७ प्लासीची लढाई
१७५८ अटकेवर भगवा झेंडा
१७६० हैदरचा उदय
१७६० वांदिवाशची लढाई
१७६१ पानिपतचें तिसरें युद्ध
१७६४ बक्सारची लढाई
ब्रिटिशांचा बंगाल्यांत विजय
१७७१ मराठे दिल्लीस बादशहास गादीवर बसवितात
१७७२ मद्रासला मुद्रणकला
१७७३ रेग्युलेटिंग ॲक्ट
१७७४ ब्राह्मो समाजाचा संस्थापक राजा राम मोहन रॉय याचा जन्म
१७७६–८२ इंग्रजांशीं मराठ्यांचें युद्ध
१७७९ वडगांवास इंग्रजांचा पराभव
१७८०–१८३९ रणजितसिंग
१७८२ हैदरचा मृत्यु
१७८४ पिट्स इंडिया बिल
१७९२ टिपूवरील त्रिवर्गाची मोहीम
१७९३ कायमधाऱ्याची पद्धति
१७९५ अहिल्याबाई होळकरचा मृत्यु, खडर्याची लढाई
१७९९ टिपूचा पराभव व मृत्यु
१८०० नाना फडणविसाचा मृत्यु
१८०२ वसईचा तह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खंड ४ था

अर्वाचीन युग

(इ. स. १८१८ ते इ. स. १९५०)

भाग ३२ वा

ब्रिटिश साम्राज्यसत्तेची वाढ

(इ. स. १८१८ ते इ. स. १८५८)

१. कालविभाग:—इ. स. १८०५ मध्यें लॉर्ड वेलस्लीनें भारतांतील प्रतिस्पर्धी सत्तांचा पराभव करून ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला व त्याच्यामागून आलेल्या मार्क्विस ऑफ हेस्टिंग्ज यानें इ. स. १८१७-१८ त मराठ्यांचा पुन: एकवार पराभव केला, पेशव्याचें राज्य खालसा केलें व उरलेल्या शिंदे होळकरादि मराठे सरदारांस संस्थानिकांच्या दर्जाप्रत आणून सोडलें. अशा रीतीनें उत्तरेस सतलजपासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत व पूर्वेस बंगालपासून पश्चिमेस राजपुतान्यापर्यंतच्या सर्व प्रदेशांत ब्रिटिशांची साम्राज्यसत्ता स्थिर झाली हें जाणून राजपुतान्यांतील अनेक लहानमोठ्या संस्थानिकांनीं याच सुमारास त्यांच्याशीं आपले मांडलिकी करार करून घेतले. येथपासून ते इ. स. १९४७ त इंग्रजांनीं भारतांतून निर्गमन केलें तेथपर्यंतच्या उण्यापुऱ्या १३० वर्षांचे पुढील कालविभाग पडतात.

(१) इ. स. १८१८–१८५८. साम्राज्याची वाढ. या काळांत सरहद्दीवरील युद्धें, राज्यकारभारविषयक सुधारणा व भारतीय जनतेच्या जागृतीचीं पूर्वचिन्हें या गोष्टी विशेष महत्त्वाच्या होत.

(२) इ. स. १८५८–१९१७. ब्रिटिशांचा बादशाही अंमल. या काळांतील ब्रिटिशांचें आर्थिक आक्रमक धोरण, देशांतील बौद्धिक जागृति व राजकीय असंतोषाचा परिस्फोट हे विषय महत्त्वाचे आहेत.

(३) इ. स. १९१७–१९४७. स्वराज्याची प्रभात. या काळांत लोकशाहीचा उदय, राज्यकर्त्यांच्या आक्रमक आर्थिक धोरणास विरोध, आणि साम्राज्य सत्तेस सत्याग्रही आव्हान, हे विषय महत्त्वाचे आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. भारताचा कायापालट :—इ. स. १९४७ नंतरच्या काळांत स्वतंत्र भारताची घटना तयार होऊन, त्या घटनेप्रमाणें मनुष्यमात्रास मताधिकार या समतेच्या तत्त्वावर भारतांत पूर्णांशानें लोकशाही अस्तित्वांत आणण्याचा प्रयोग चालू आहे. या १३० वर्षांच्या काळास 'आधुनिक युग' म्हणण्याचें कारण इंग्रजी अंमलांत जसा भारताचा आर्थिक व सामाजिक कायापालट झाला तसा पूर्वीच्या मोगल किंवा मराठी अमदानींत झाला नाहीं. भौतिक शास्त्रें, औद्योगिक क्रांति, लोकशाहीचा उदय, एकराष्ट्रीयत्वाची जाणीव व बौद्धिक जागृति या सर्व कारणांनीं भारतीय समाज अगदीं खालच्या थरापासून ढवळला गेला. आणि अद्याप हें मन्वंतर चालूच आहे. इ. स. १९४७ त भारतास प्राप्त झालेलें स्वातंत्र्य हें या मन्वंतराचा एक महत्त्वाचा भाग होय. मात्र हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं वर सांगितलेलीं मन्वंतराचीं कारणें प्रथम युरोपांत उदय पावलीं व इंग्रजी अंमलाच्या साम्राज्यशाही माध्यमांतून त्यांचे पडसाद भारतांत उमटले. प्रकाशाचे किरण पाण्यांतून गेल्यावर त्यांचें वक्रीभवन होतें, तसा कांहीं प्रकार झाला असल्यास त्याचा विचार करणें ही स्वतंत्र भारताची जबाबदारी आहे. असो.

प्रस्तुत भागांत इ. स. १८१८ ते इ. स. १८५८ या काळांत ब्रिटिश साम्राज्य सत्तेची वाढ कशी झाली तें सांगावयाचें.

३. फरेंच आक्रमणास पायबंद :—लॉर्ड वेलस्ली इ. स. १८०५ त परत गेला तेव्हां नेपोलियनशीं चालू असलेलें युद्ध संपलें नव्हतें; हें लक्षांत घेऊन फरेंचांच्या आशियांतील विस्तारास पायबंद घालण्याची दक्षता घेणें जरूर होतें. हें काम लॉर्ड मिंटो यानें केलें. त्यानें पंजाब, अफगाणिस्थान व इराण या देशांत आपल्या वकिलाती पाठवून तेथील सत्ताधीशांशीं सख्यत्व जोडलें व ब्रिटिश हालचालीची कक्षा इराणच्या आखातापर्यंत पोहोंचविली. एवढ्यावरच न थांबतां त्यानें नेपोलियनशीं चालू असलेल्या युद्धाचा फायदा घेऊन आफ्रिकेच्या पूर्वेकडील फरेंचांचीं मॉरिशस व बुर्बोन हीं बेटें आणि दक्षिणेकडील केप ऑफ् गुडहोप हीं ठिकाणें काबीज केलीं; व पूर्वेकडील जावा बेटावरही स्वारी केली. अशा रीतीनें लॉर्ड मिंटोनें आशिया खंडांतील इंग्रजांच्या व्यापक हितसंबंधांचें मोठ्या दूरदृष्टीनें रक्षण केलें. इ. स. १८१५ त नेपोलियनशीं युद्ध संपल्यावर इंग्रजांना एका केप ऑफ गुडहोप्‌खेरीज बाकीचे प्रदेश ज्याचे त्यास परत द्यावे लागले. परंतु लॉर्ड मिंटोच्या उद्योगामुळें भारतांतील इंग्रजी सत्तेस आशियाई दृष्टि प्राप्त झाली यांत शंका नाहीं.

४. नेपाळशीं युद्ध :—भारताच्या समुद्रवलयांकित दक्षिण सरहद्दीपर्यंत इंग्रजांचा अंमल यापूर्वीच पोहोंचलेला होता. यापुढील चाळीस वर्षांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रजी सत्तेनें पश्चिमेस कराचीपासून आग्नयेस सिंगापूरपर्यंत सिंध, पंजाब, नेपाळ, ब्रह्मदेश इत्यादि सरहद्दींवरील प्रदेशांवर संधि साधून आक्रमण केलें व तेथें आपला अंमल प्रस्थापित केला. मार्क्विस ऑफ हेस्टिंग्जच्या कारकीर्दींत इ. स. १८१४ त सरहद्दीवरील तंट्यावरून नेपाळशीं युद्ध उद्‌भवलें. त्यांत नेपाळच्या राजाचा पराभव होऊन त्याजपासून इंग्रजांनीं गढवाल व कुमाऊन हे प्रांत घेतले* व नेपाळमध्यें ब्रिटिश रेसिडेंटची स्थापना केली. यापुढें इंग्रजांचे नेपाळशीं संबंध सदैव सलोख्याचे राहिले. त्यांनीं नेपाळच्या अंतर्गत कारभारांत ढवळाढवळ केली नाहीं व आक्रमक दृष्टि ठेवली नाहीं; आणि नेपाळांतील गुरखे लोक इंग्रजी सैन्यांत मोठ्या प्रमाणावर दाखल होऊन त्यांनीं इंग्रजी सत्तेस बळकटी आणली.

५. ब्रह्मदेश :—इ. स. १८२४–२५ त इंग्रजांना ब्रह्मदेशावर स्वारी करण्याची संधि प्राप्त झाली. या वेळीं लॉर्ड ॲम्हर्स्ट हा गव्हर्नर जनरल होता. युद्ध सरहद्दीवरील आक्रमणांतून उद्‌भवलें. ब्रह्मदेशच्या राजानें आसाम प्रांत काबीज केला, व बंगाल आणि आसाम हे प्रांत एकमेकांस लागून असल्यानें ब्रह्मी फौजनें आसामांतून इंग्रजी प्रदेशावर स्वाऱ्या केल्यानें युद्ध उद्‌भवलें. इंग्रजांनीं इरावतीच्या मुखांतून ब्रह्मदेशांत प्रवेश करून ब्रह्मी सत्तेचा पराभव केला. नंतर झालेल्या तहांत ब्रह्मदेशच्या राजापासून इंग्रजांनीं आसाम, आराकान व तेनासरीम (नकाशा पृ. ३५२ पहा.) हे प्रांत ताब्यांत घेतले.

यानंतर इ. स. १८५२ सालीं लॉर्ड डलहौसी गव्हर्नर जनरल असतांना ब्रह्मी लोकांशीं दुसरें युद्ध उद्‌भवलें. त्याचें कारण ब्रह्मदेशांत व्यापार करणाऱ्या इंग्रजांचे तेथील राजसत्तेशीं नित्य तंटे होत व इंग्रज व्यापारी त्याबद्दल दाद मागण्यासाठीं गव्हर्नर जनरलकडे धांव घेत. अशाच एका प्रसंगीं लॉर्ड डलहौसीनें लॅंबर्ट या लष्करी अधिकाऱ्यास त्याजबरोबर लष्करी साहित्य देऊन वाटाघाटी करण्यास पाठविलें आणि वाटाघाटीस सुरुवात होण्यापूर्वींच युद्धास सुरुवात झाली. याही युद्धांत ब्रह्मी राजाचा पराभव झाला. तेव्हां इंग्रजांनीं ब्रह्मदेशाचा इरावतीच्या मुखाजवळचा पेगूप्रांत खालसा केला. यामुळें ब्रह्मी सत्तेस समुद्रकिनाऱ्याची वाट बंद झाली. कलकत्त्यापासून ते सिंगापूरपर्यंतचा सलग समुद्रकिनारा इंग्रजांच्या ताब्यांत आला.

इ. स. १८७८ त लॉर्ड डफरीन हा गव्हर्नर जनरल असतांना इंग्रजांचें ब्रह्मी लोकांशीं तिसरें युद्ध उद्‌भवलें. त्यालाही कारण इंग्रज व्यापाऱ्यांचें ब्रह्मी सत्तेशीं भांडण. रंगून येथें इंग्रज व्यापाऱ्यांनीं सभा भरवून असा विनंतिपर ठराव पास केला कीं, भारतांतील इंग्रज सत्तेनें ब्रह्मदेश खालसा

*याच मुलखांत हल्लींचें सिमला हें थंड हवेचें ठिकाण आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावा; तसें झाल्यास चीनशीं व्यापार करण्याचा मार्ग इंग्रज व्यापाऱ्यांस मोकळा होईल. असो. इंग्रज व्यापाऱ्यांनीं सागाच्या निर्यातीवरील जकात चुकविल्यामुळें प्रकरण वर्दळीवर आलें. नंतर झालेल्या युद्धांत ब्रह्मदेशच्या थीबा राजाचा पराभव झाला. इंग्रजांनीं ब्रह्मदेश खालसा केला; व थीबा राजास रत्नागिरीस आणून कैदेंत ठेवलें. तेथें तो इ. स. १९१६ त मृत्यु पावला.

६. अफगाण युद्ध :—वर ब्रह्मदेशाची व पूर्वसरहद्दीवरील युद्धाची हकीकत सांगत असतांना कालाचा अतिक्रम झाला. भारताच्या वायव्य सरहद्दीवरील अफगाणिस्थानशीं इंग्रज राजवटींत एकूण तीन युद्धें झालीं व या युद्धांतून इंग्रजांचें आक्रमक धोरण स्पष्ट दिसून आलें. तीन युद्धांपासून इंग्रजी सत्तेस लभ्यांश असा कांहींच झाला नाहीं. उलट सर्वतोपरी नामुष्कीच पतकरावी लागली.

७. पहिलें युद्ध :—इ. स. १८३९ त लॉर्ड ऑक्लंडच्या वेळीं हें युद्ध उद्भवलें. याचें मुख्य कारण रशियन आक्रमणाचा अवास्तव बागुलबोवा. रशियानें इराणशीं मित्रत्वाचे संबंध जोडले हें कळल्याबरोबर इंग्रजांस वाटलें कीं, अफगाणिस्थानचा अमीर दोस्त महंमद यानें आपल्या तंत्रानें चालावें. दोस्त महंमद या गोष्टीस तयारही होता, पण त्यास पंजाबच्या रणजितसिंगाविरुद्ध इंग्रजांची मदत हवी होती. ती इंग्रज देईनात. इंग्रजांची भारतांतील सत्ता पंजाबच्या सरहद्दीवर आलेली होती. तेथून रशिया कमींत कमी आठशें मैल दूर होता. इतक्या दूर अंतरावर वाटेंतील प्रदेश डोंगराळ असतांना व मध्यंतरीं रणजितसिंगासारखे सत्ताधीश असतांना इंग्रजांना रशियाचा बागुलबोवा वाटण्याचें कांहीं एक कारण नव्हतें. पण इंग्रजांनीं एकवार मनानें घेतलें कीं, दोस्त महंमदास पदच्युत करून आपल्या पक्षाच्या शहा सुजास अफगाणिस्थानच्या गादीवर बसवावयाचें व रशियास शह द्यावयाचा. या इंग्रजांच्या बेतांत पंजाबचा सिंह रणजितसिंग सामील झाला; पण तो मोठा सावध होता. तो म्हणाला 'मी इंग्रज फौजेस मदत करीन, पण त्यांची फौज माझ्या मुलुखांतून साफ जाऊं देणार नाहीं' ! पण इंग्रज तेवढ्यानें अडले नाहींत. त्यांनीं राजपुताना, सिंधचें रेताड वाळवंट यांतून सिंधु नदी ओलांडून बलुचिस्तान मार्गे (नकाशा पृ. ३५५ पहा) अफगाणिस्थानांत प्रवेश करावयाचें ठरविलें. या बाबतींत सिंध प्रांतांतून जात असतां तेथील अमिरास काय वाटेल याचीही इंग्रजांनीं पर्वा केली नाहीं. वास्तविक या वेळीं रशियन वकील इराणांतून परत गेल्यानें रशियन बागुलबोवांची तादृश भीतीही उरली नव्हती. पण इंग्रजांनीं एकदां ठरविलें तें ठरविलें. या सर्वस्वी आक्रमक व अविचारीपणाच्या स्वारीचा खर्च

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्तानच्या तिजोरींतून होणार होता व स्वारीची जबरदस्ती त्या वेळचा इंग्लंडचा परराष्ट्रीय प्रधान पामर्स्टन यानें केली. इंग्रजी साम्राज्य-सत्तेचा विचारीपणाचा तोल जात असल्याचें यावेळीं स्पष्ट दिसून आलें.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. इंग्रजांनीं आपल्या लष्करी सत्तेच्या जोरावर शहा सुजास काबूलच्या गादीवर बसविलें. पण थोड्याच काळांत तेथें देशभर बंडाळी माजली. शहा सुजा पळून गेला. इंग्रजांच्या निवासस्थानावर चहूंकडून हल्ले होऊं लागले. तेव्हां इंग्रज घाईघाईनें तेथून परतले. परंतु वाटेंत थंडीनें त्या सर्वांचे इतके हाल झाले कीं, एकूण ४५०० शिपाई व १२००० अनुयायी यांच्यापैकीं एकटा डॉ.ब्रायडन मात्र ही दुःखकारक हकीकत सांगण्यास जलालाबादेस इंग्रजांच्या छावणीपर्यंत येऊन पोहोंचला ! यानंतरच्या काळांत इंग्रजांनीं पुनः अफगाणिस्थानवर सैन्य पाठवून या अपयशाचा सूड घेतला. पण अखेर ज्या दोस्त महंमदास त्यांनीं काढून टाकावयाचें ठरविलें त्यासच अमीर म्हणून मान्यता देऊन इंग्रजांना तेथून काढता पाय घ्यावा लागला (इ. स. १८४२).

८. **दुसरें अफगाण युद्ध** (इ. स. १८७८–८१) :––सुमारें चाळीस वर्षांनंतर पुनः दुसरें अफगाण युद्ध जवळजवळ याच कारणांनीं उद्भवून इतिहासाची पुनरावृत्ति झाली. याचें कारण, पिढी बदलली तरी जुनी साम्राज्यवादी आक्रमकवृत्ति ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं सोडली नाहीं. तोच रशियाचा बागुलबोवा, तोच इंग्रज वकील अफगाणिस्थानवर लादण्याचा प्रयत्न, तोच पदस्थ अमीर शेरअल्ली यास पदच्युत करून आपल्या हुकुमतीखालचा याकूबखान यास सिंहासनावर बसविण्याचा उद्योग, तीच देशभर बंडाळी, तीच प्राणहानि, तेंच अपयश, तोच सूड घेऊन अब्रू बचावण्याचा प्रयत्न, सर्व कांहीं तेंच ! मानवी जीवनांत इतिहासाची अशी पुनरावृत्ति क्वचितच झाली असेल. तत्कालीन उदारमतवादी ग्लॅडस्टननें या सर्व प्रकरणाविरुद्ध आपल्या राष्ट्रास वेळींच इषारा दिला होता; पण तो परिणामकारक ठरला नाहीं.

९. **सावधगिरीची तटस्थ वृत्ति** :––दोन युद्धांच्या अनुभवानंतर इंग्रजांनीं वायव्य सरहद्दीबाबत आपलें धोरण बदललें. अफगाणिस्थानच्या पदस्थ अमीरास मान्यता द्यावयाची; अफगाणिस्थान व हिंदुस्थान यांच्या सरहद्दीवर असणाऱ्या वहाबी व आफ्रिडी टोळ्यांशीं सख्यत्वाचें धोरण ठेवून तो प्रदेश आपल्या हुकुमतींत ठेवावयाचा आणि तेथें तटबंदी करावयाची; काश्मीरच्या पश्चिमेकडील खुर्रमघाट, पंजाबच्या पश्चिमेकडील खैबरघाट, बलुचिस्थानांतील बोलनघाट या तीनही महत्त्वाच्या वाटांवर लष्करी साहित्य सज्ज ठेवावयाचें, हें ब्रिटिशांचें वायव्य सरहद्दीवरील धोरणाचें पुढील चाळीस वर्षें मुख्य सूत्र होतें. इ. स. १९०१ सालीं लॉर्ड कर्झननें पंजाबच्या वायव्य सरहद्दीवरील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलुखाची पट्टी वेगळी काढून तिला 'वायव्य सरहद्दीवरील प्रांत' असें नांव दिलें व तो चीफ कमिशनरच्या हातीं दिला. या योगानें तो प्रांत खास मध्यवर्ती सरकारच्या कक्षेखालीं आला. या काळांत चित्रळ, स्वाट, वजिरिस्थान, गिल्जिट वगैरे भागांत मधून मधून शांततेचा भंग झाला; पण तो प्रासंगिक होता. एकंदरींत हें सावधगिरीच्या तटस्थ वृत्तीचें धोरण पूर्वीच्या साम्राज्यवादी आक्रमक धोरणापेक्षां कमी खर्चाचें व यशस्वी ठरलें यांत शंका नाहीं.

१०. **तिसरें युद्ध** (इ. स. १९२०) :—तिसरें अफगाण युद्ध इंग्रज राज्यकर्त्यांच्या आक्रमक धोरणांतून उद्भवलें नाहीं. पहिलें महायुद्ध इ. स. १९१४ ते इ. स. १९१८ या काळांत झालें. त्या वेळीं अफगाणिस्थानचा अमीर तटस्थ होता. पण तेथील जनता इंग्रजांशीं लढण्यास उत्सुक असली पाहिजे असा कयास होतो. कारण तेथील लोकांनीं इ. स. १९१९ सालीं अमिराचा खून केला व नंतर थोड्याच दिवसांत अफगाण सैन्य भारतावर चाल करून आलें. हें युद्ध तीन आंठवडे चाललें; पण त्यांत अफगाणांचा पुरा पराभव झाला. युद्धानंतरही इंग्रजांनीं अनुभवानें यशस्वी ठरलेलें सावध तटस्थ वृत्तीचें धोरण बदललें नाहीं ही गोष्ट प्रशंसनीय होय.

११. **विद्यमान् वायव्य सरहद्द** :—इ. स. १९४७ सालीं भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान असे दोन देश झाले. यामुळें भारताची वायव्य सरहद्द खैबरघाट सोडून रावी नदीपर्यंत अलीकडे आली. पंजाबचे पूर्व पंजाब व पश्चिम पंजाब असे दोन भाग झाले. सध्यांची भारताची वायव्य सरहद्द ही कच्छचें रण, जोधपूर बिकानेरच्या पश्चिमेकडील राजपुतान्याचें रेताड वाळवंट, व रावी नदी यांनीं निश्चित झाली आहे. काश्मीर भारतांत सामील झालें असलें तरी तेथील सीमारेषा अद्याप अनिश्चित आहे.

१२. **सिंध प्रांतावर आक्रमण** (इ. स. १८४३) :—भारताच्या सरहद्दीवरील एकएका सत्तेशीं इंग्रजांनीं जीं युद्धें केलीं त्यांचें सुसूत्र वर्णन देत असतां इतर समकालीन घडामोडींबाबत कालाची संगति संभाळतां येत नाहीं. पण एका प्रकरणाची सर्व हकीकत एकत्र दिल्यानें धोरणाचा धागा लक्षांत यतो. असो. इ. स. १८४२ त झालेलें अफगाण युद्ध ही इंग्रजांच्या हातून अविचारीपणानें घडून आलेली चूक असेल, तर सिंध काबीज करण्याचा इंग्रजांचा यत्न हा शुद्ध गुन्हा होय. 'आम्ही सिंध काबीज करणें हें नैतिक दृष्ट्या समर्थनीय नाहीं; पण आम्ही तें करणार आहोंत' असें सिंध आक्रमण करणाऱ्या सर चार्लस नेपियरनें स्वतःच म्हटलें आहे. इ. स. १८३१ मध्यें इंग्रजांनीं सिंधु नदींतून व्यापारी मालाची ने आण करण्याचा हक्क सिंधांतील अमिरांकडून मिळविला. त्या वेळीं इंग्रजांनीं लष्करी माल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिंधू नदींतून नेऊं नये अशी सावधगिरीची अट सिंधच्या अमिरानें घातली. ती इंग्रजांनीं कबूल केली. इ. स. १८३९ सालीं अफगाण युद्ध उद्भवलें, तेव्हां इंग्रजांनीं ती चक्क धाब्यावर बसविली. तरीही सिंधचा अमीर इंग्रजांशीं मित्रत्वानें राहिला. पुढें अफगाण युद्धाचा शेवट झाल्यावर इंग्रजांनीं सिंधच्या अमिरावर कांहीं आरोप ठेवले व त्यांची चौकशी करण्यास सर चार्लस नेपियर यास पाठविलें. त्यानें चौकशीचा नुसता फार्स केला. आरोपाचे कागदही अमिरास दाखविले नाहींत. शेवटीं सिंधच्या अमिरानें मांडलिक संस्थानिकाचा दर्जा स्वीकारावा अशा अर्थाचा करार त्याजपुढें सहीसाठीं ठेवला. अमिरानें सही केली. पण सिंधमधील बलुची लोक युद्धास उभे राहिले. मियानी व हैद्राबाद येथें दोन लढाया झाल्या. त्यांत इंग्रजांना जय मिळाला आणि इंग्रजांनीं सिंध प्रांत खालसा केला. या अपूर्व कामगिरीबद्दल ब्रिटिश पार्लमेंटनें सर चार्लस नेपियरची प्रशंसा केली व त्यास ७०००० पौंडांचें बक्षिस मिळालें. वॉरन हेस्टिंग्जनें अयोध्येच्या बेगमांपासून पैसे उकळल्याबद्दल त्याची निर्भीड चौकशी करणाऱ्या बर्क शेरिडनची परंपरा मागें पडली ! आक्रमक वृत्तीमुळें ब्रिटिश समाजांतील न्यायी सदसद्विवेक बुद्धि कांहीं काल दडपली गेल्याचें दुःखदायक दृश्य इतिहासास पहावयास मिळालें !

१२. **पंजाबचा सिंह रणजितसिंग** :—सिंध प्रांतानंतर इंग्रजांनीं पंजाब कसा खालसा केला तें सांगण्याच्या अगोदर पंजाबांतील कर्तृत्ववान शीख पुरुष रणजितसिंग याची माहिती सांगणें जरूर आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत शीखांनीं पंजाब प्रांत अबदालीच्या हातून सोडविला व तेथें आपलीं लहान लहान राज्यें स्थापन केलीं. यांस 'खालसा' असें म्हणतात. रणजितसिंगानें या सर्वांचें एकीकरण करून लाहोर येथें शीखांचें प्रबळ राज्य स्थापन केलें. रणजितसिंगानें इ. स. १७९९ पासून इ. स. १८३९ पर्यंत राज्य केलें. एवढ्या काळांत त्यानें पश्चिमेस अटकपासून पूर्वेस सतलज नदीपर्यंतचा प्रदेश आपल्या ताब्यांत आणला. इंग्रजांच्या जागरूकतेमुळें त्यास अधिक आक्रमण करतां आलें नाहीं. इंग्रजांशीं विरोध करावयाचा नाहीं, पण त्यांना आपल्या हद्दींत बोट शिरकविण्यास जागा द्यावयाची नाहीं असें त्याचें धोरण असे. यानें अॅलर्ड या फ्रेंच लष्करी तज्ज्ञास चाकरीस ठेवून आपल्या सैन्यास उत्कृष्ट कवाईती पद्धतीचें शिक्षण दिलें, दारूगोळ्याचा कारखानाही काढला; पण हें करीत असतांना त्यानें परकीय लष्करी तज्ज्ञांस आपल्या डोक्यावर बसूं दिलें नाहीं. लेहानसिंग या शीख सरदारास सर्व सैन्याचा मुख्य नेमलें आणि सर्व फौज त्याच्या हाताखालीं तयार झाली. पाश्चिमात्यांची विद्या संपादन करतांना रणजितसिंगानें दाखविलेली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही सावधगिरी ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. रणजितसिंग हा शीखांचा प्रमुख असला तरी आपल्या राज्यांत धर्माचें प्रस्थ माजूं द्यावयाचें नाहीं असें त्याचें धोरण असे. पंजाबच्या संरक्षणासाठीं येतील त्या सर्वांची एकजूट करावयाची अशा प्रकारची धर्मनिर्विशेष राष्ट्रीय दृष्टि त्यास होती. रणजितसिंगाचा आपल्या हाताखालच्या सरदारांवर विलक्षण दरारा असे. दरबारांत तो मोठ्या थाटानें वागे. घोड्यावर बसण्याचा त्यास शोक असे. एकंदरींत रणजितसिंग हा भारतांतील ब्रिटिश अंमलापूर्वीचा शेवटचा पराक्रमी राजा होऊन गेला. त्यास आधुनिक दृष्टि असल्यानें भारतांतील मध्ययुग व अर्वाचीन युग यांच्या सीमारेषेवरील तो एक दुवा होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

रणजितसिंग

१४. **पहिलें शीख युद्ध** :—रणजितसिंगाच्या मृत्यूनंतर बऱ्याच उलाढाली होऊन इ. स. १८४२ सालीं त्याचा अल्पवयी दासीपुत्र धुलीपसिंग हा गादीवर आला. यामुळें राज्यकारभारांत ढिलाई उत्पन्न होऊन लष्करी अधिकारी तेथें डोईजड होण्याचा प्रयत्न करूं लागले. धुलीपसिंगाची आई मोठी हुषार होती. तिनें ओळखलें कीं, या लष्करास कोठें तरी कामगिरीवर गुंतविल्याशिवाय त्यांची राज्यकारभारांतील लुडबूड थांबावयाची नाहीं. याच सुमारास इंग्रज लोक सिंध प्रांत काबीज करून पंजाबशीं युद्ध करण्याची तयारी करीत होते. त्यांनीं सिंधू नदीच्या मुखांतून उत्तरेकडे येऊन सतलज नदींत होड्या व युद्धोपयोगी सामान आणून ठेवलें होतें. तेव्हां आतां पुढील युद्धप्रसंग आपणाशींच होणार हें राणीनें ओळखलें व शीख सैन्यास ब्रिटिश फौजेवर हल्ला करण्याची सूचना केली. ब्रिटिशांचा पराभव झाला तर बरेंच; पण तो न झाल्यास निदान स्वतःच्या सैन्याची खोड मोडेल असा तिचा दुहेरी विचार होता. राणीच्या हुकुमाप्रमाणें शीख सैन्यानें इ. स. १८४५ च्या डिसेंबरांत सतलज नदी ओलांडली व युद्धास प्रारंभ झाला. या युद्धांत मुडकी, फिरोजशहा, आलिवाल व सोब्रान अशा चार ठिकाणीं भयंकर लढाया झाल्या. शीख सैन्य मोठ्या शौर्यानें लढलें. ब्रिटिशांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लष्करी ज्ञान व सामर्थ्य कसास लागलें. तरी एकंदरींत शीखांचा पराभव झाला. सर्व युद्ध प्रारंभापासून ५४ दिवसांत संपलें. या युद्धानें बियास व सतलज या नद्यांमधील प्रदेश इंग्रजांस मिळाला. युद्धाची दीड कोट रुपये खंडणी उभारण्यासाठीं शीखांनीं काश्मीर प्रांत गुलाबसिंगास विकला. शीखांचें सैन्य मर्यादित झालें व धुलीपसिंग वयांत येईपर्यंत इंग्रज रेसिडेंटानें लाहोरास राहावें असें ठरलें.

१५. दुसरें शीख युद्ध :—युद्धांतील अपयशामुळें शीखांनीं ही व्यवस्था कशी-बशी मान्य केली असली तरी त्यांना ती पसंत नव्हती. त्यांनीं कारस्थानास सुर-वात केली. अशाच एका प्रसंगीं मुलतानचा सुभेदार मूळराज यानें बंडाचा झेन्डा उभारला व शीख सैन्य त्यास सामील झालें. या प्रसंगीं सुरू झालेल्या युद्धांत चिलियनवाला व गुजरात येथें दोन लढाया झाल्या (इ.स.१८४८–४९). चिलियनवाला येथील लढाईंत जयापजयाचा निकाल लागला नाहीं; तरी गुजरातची लढाई इंग्रजांनीं जिंकली व हें युद्ध समाप्त झालें. युद्धोत्तर इंग्रजांनीं पंजाब प्रांत खालसा केला व तेथें सर जॉन लॉरेन्स याची नेमणूक केली.

शीख सैन्य आधुनिक दृष्टया शस्त्रास्त्रानें सज्ज होतें. त्यांच्यांत शौर्याची वाण नव्हती. परंतु त्याचे अधिकारी दुटप्पीपणानें वागत. यामुळें शीखांचें शौर्य कारणीं लागलें नाहीं. भारतांतील ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांत त्यांचीं शीखांशीं झालेलीं युद्धें हीं अतिशय तीव्र स्वरूपाचीं होतीं, असें इंग्रज इतिहासकारांनीं लिहून ठेविलें आहे.

१६. अन्तर्गत आक्रमण :—येथपर्यंत नेपाळ, ब्रह्मदेश, अफगाणिस्थान, सिंध व पंजाब येथील सत्ताधिशांशीं इंग्रजांनीं केलेल्या युद्धांचें वर्णन झालें. या युद्धा-मुळें पश्चिमेस कराचीपासून ते आग्नेयेस सिंगापूरपर्यंत भारताच्या उत्तरेकडील अर्धवर्तुळाकार सरहद्द सलगपणें भारताच्या ताब्यांत आली. इ. स. १८१८ ते १८५८ या चाळीस वर्षांच्या काळांत इंग्रजांचें सरहद्दीवरील आक्रमण चालू असतांना अंतर्गत संस्थानेंही या ना त्या निमित्तानें खालसा करण्याचा किंवा संस्थानिकांस आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा त्यांचा उपक्रम चालू होता. या चाळीस वर्षांत होऊन गेलेल्या प्रत्येक गव्हर्नर जनरलानें ब्रिटिशांच्या ताब्यांतील मुलुखांत भर घातली आहे. त्यास कोणीही अपवाद नाहीं. लॉर्ड ॲम्हर्स्टनंतर इ. स. १८२८–१८३५ या काळांत लॉर्ड वुइल्यम् बेंटिक हा गव्हर्नर जनरल होऊन गेला. तो मोठा सुधारणावादी म्हणून प्रसिद्ध आहे. पण त्यानेंही बंगालच्या पूर्वेकडील काचर व सिल्हट हीं दोन राज्यें व म्हैसूर-च्या नैर्ऋत्येकडील कूर्गचें राज्य हीं खालसा केलीं आणि म्हैसूरचा राजा जुलमी निघाला या कारणावरून त्या राज्याचा कारभार आपल्या हातीं घेतला, पण संस्थान मात्र खालसा केलें नाहीं. इ. स. १८४३ ते १८४४ या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काळांत लॉर्ड एलनबरो यानें ग्वाल्हेरशीं युद्ध उपस्थित करून शिंद्यांस मांडलिक दर्जावर आणून ठेविलें. याच सुमारास इंग्रजांनीं सिंध व पंजाब हे प्रदेश कसे खालसा केले तें वर सांगितलेंच आहे.

१७. दत्तक वारस नामंजूर :—इ. स. १८४८ ते १८५६ या काळांत होऊन गेलेला गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यानें तर भारतांतील मुलुख ब्रिटिश राज्यास जोडण्याचा सपाटा चालविला. ब्रह्मी लोकांशीं दुसरें युद्ध व शीखांशीं दुसरें युद्ध हीं याच्याच काळांत झालीं. याखेरीज त्यानें तैनाती फौजेच्या खर्चाची बाकी थकल्याच्या निमित्तावरून वऱ्हाड प्रांताचा कारभार आपणाकडे घेतला. अयोध्येचा वजीर राज्यांतील तालुकदारांचा छळ करीत असे, या निमित्तानें त्याचेंही राज्य खालसा केलें. याखेरीज लॉर्ड डलहौसीनें संस्थानिकांचीं राज्यें खालसा करण्यासाठीं एक नवीनच निमित्त शोधून काढलें. राज्याचा वारस निपुत्रिक मरण पावल्यास हिंदु संस्थानांत त्या जागीं दत्तक वारस येई व इंग्रज सरकार आतांपर्यंत अशा दत्तक वारसाकडे संस्थानचा कारभार सोपविण्यास हरकत घेत नसे. परंतु लॉर्ड-डलहौसीनें दत्तक वारस नामंजूर करण्याचें धोरण ठरविलें. या धोरणाप्रमाणें त्यानें सातारा व झांशी हीं संस्थानें खालसा केलीं. जैतपूर, संबळपूर, तंजावर, नागपूर हीं राज्यें अशाच कारणावरून खालसा केलीं. आणि कर्नाटकच्या नबाबाची नेमणूक बंद केली. नागपूर व वऱ्हाड हे प्रदेश इंग्रजी अंमलाखालीं आल्यानें तेथील कापसाची निर्यात इंग्लंडकडे निर्वेध होऊं लागली व मुंबई ते कलकत्त्यापर्यंतचा रस्ता सलग ब्रिटिश अंमलाखालील मुलुखांतून तयार झाला. भारतांत ब्रिटिश अंमल सर्वत्र सुसूत्र बसवावा आणि दळणवळणांचीं आधुनिक साधनें या देशांत आणून त्या अंमलास बळकटी आणावी असें लॉर्ड डलहौसीचें धोरण होतें. म्हणून त्यास संस्थानिक हे एक प्रकारें अडगळीप्रमाणें वाटत. परंतु राज्यें खालसा करण्याचा वेग फार झाला. अयोध्येचा वझीर व हैद्राबादचा निजाम यांच्यासारख्या इंग्रजांशीं कधींही विरोध न करणाऱ्या संस्थानिकांचे मुलूख खालसा झाले. तसेंच दुसऱ्या बाजीरावाशीं युद्ध उद्भवलें असतां ज्या साताऱ्याच्या छत्रपतींना इंग्रजांनीं आपल्या बाजूस ओढून घेतलें त्यांचें राज्य पुढें काम झाल्यावर दत्तकाच्या निमित्तानें खालसा झालें. या सर्व कारणांनीं लोकांचीं मनें साशंक झालीं. जुन्या वैभवाची स्मृति मनास चटके देऊं लागली व राज्यकर्त्यांच्या ढवळाढवळीच्या धोरणाबद्दल लोकांत असंतोष पसरला. त्याचेंच पर्यवसान इ. स. १८५७ सालच्या क्षोभांत प्रकट झालें.

प्रश्न

१. ब्रिटिशांनीं पूर्व सरहद्द निर्वेध करण्यासाठीं केलेल्या यत्नांची त्रोटक हकीकत द्या. २. अफगाणिस्थानांत इंग्रजांचे हितसंबंध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काय होते ? त्यासाठीं त्यांनीं किती युद्धें केलीं ? इंग्रजांनीं स्वीकारलेल्या चढाईच्या धोरणाचे काय परिणाम झाले ? ३. टीपा लिहा :—(१) सिंधवरील चढाई (२) दत्तक वारस नामंजूर (३) इंग्रजांनीं पंजाब जिंकला.

अभ्यास

(१) वाचा :—ज्ञानकोशांतून नेपाळ व ब्रह्मदेश यांचा ऐतिहासिक परिचय; शीखांचा स्फूर्तिदायक इतिहास (ले. शं. पु. जोशी). (२) मुसलमान, मराठे. शीख, हे शूर हिंदी लोक पाश्चिमात्य सत्तेपुढें कां पराभूत झाले ? शूर राजपुतांनीं त्यांना कां सहाय्य केलें नाहीं ? या प्रश्नांची चर्चा करा.

माहितीसाठीं

अफगाणिस्थानसंबंधीं चुकीचें धोरण

[गव्हर्नर जनरल लॉर्ड लिटन यानें अफगाणिस्थानशीं युद्ध पुकारलें (नोव्हें. २; १८७८). यासंबंधीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें चर्चा झाली. त्या वेळीं पार्लमेंटमधील विरोधी पक्षाचा पुढारी ग्लॅड्स्टन यानें पुढील भाषण करून सरकारला इषारा दिला होता].

" ... अफगाणिस्थानशीं इ. स. १८३८ मध्यें युद्ध करण्याची आपण चूक केली. चुकणें हा मनुष्यस्वभाव आहे, व तें एकवेळ क्षम्यही आहे; परंतु कसलेंच समर्थनीय कारण नसतांना आपण पुन: पूर्वींच्याच प्रकरणीं तशीच चूक केली आहे.....तज्ज्ञांचा सल्ला आपल्याविरुद्ध असतांना आणि कल्पनेस सुचणारे व शक्य ते सर्व तऱ्हेचे इषारे आपणांस मिळाले असतांना या चुकीचा पुनरावृत्ति होत आहे. अशी एक म्हण आहे कीं 'इतिहासाची पुनरावृत्ति होते', पण आजच्या व पूर्वींच्या युद्धप्रसंगाइतकी ऐतिहासिक घडामोडीची पुनरावृत्ति क्वचितच आढळते.

"...ईश्वर करो आणि संकट टळो. ईश्वर करो आणि इ. स. १८४१ मध्यें आमच्या सैनिकांवर जें अरिष्ट आलें त्याची पुनरावृत्ति न होवो."

—पी. इ. रॉबर्टसकृत 'हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया,' पृष्ठ ४४१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३३ वा

भारतीय मन्वन्तराचीं पूर्वचिन्हें

(इ. स. १८१८—इ. स. १८५८)

१. भारताच्या बाजारपेठेवर नजर :—एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत इंग्रज एकीकडे आपल्या राज्याची सरहद्द वाढवीत असतां व अंतर्गत संस्थानें खालसा करीत असतां, जिकलेल्या प्रदेशांत राज्यकारभाराची घडी नीट बसविण्याकडे त्यांचें दुर्लक्ष झालें नाहीं. प्रारंभीं ईस्ट इंडिया कंपनीस व्यापाराचा मक्ता व राज्याचा कारभार हीं दोन्हीं तंत्रें सांभाळावीं लागत. यामुळें राज्यकारभारांतही त्यांची नफ्यातोटयाची व्यापारी दृष्टि असे. यापुढील काळांत ईस्ट इंडिया कंपनीस मिळालेल्या भारतीय व्यापाराच्या मक्त्याविरुद्ध इंग्लंडमध्यें मोठा असंतोष निर्माण झाला. कारण इंग्रजी कारखान्यांतून यांत्रिक साधनांनीं माल मोठ्या प्रमाणावर बाहेर पडत असतां भारताची बाजारपेठ ईस्ट इंडिया कंपनीच्या मक्तेदारीमुळें अडून राहिलेली होती. याविरुद्ध तक्रार होऊन इ. स. १८१३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेची फेरतपासणी होत असतां कंपनीचा व्यापाराचा मक्ता रद्द करण्यांत आला. फक्त कंपनीला चीनशीं व्यापार करण्याचा व भारतांतून चहाचें उत्पादन करून तो ब्रिटिश बाजारांत खपविण्याचा जो मक्ता होता तेवढा मात्र कायम ठेवण्यांत आला. पुढें वीस वर्षांनीं म्हणजे इ. स. १८३३ सालीं कंपनीच्या सनदेची नियमाप्रमाणें पुन: फेरतपासणी झाली. त्या वेळीं इंग्लंडमध्यें पहिला सुधारणा कायदा पास होऊन व्यापारीवर्गाचा पार्लमेंटांत प्रवेश झाला होता. या पार्लमेंटनें ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापारी मक्ता संपूर्णपणें नष्ट केला व भारताची बाजारपेठ सर्व ब्रिटिश कारखानदारांस खुली केली. याचा ब्रिटिश कारखानदारांस निर्विवाद फायदा झाला. परंतु यंत्रानें उत्पन्न केलेल्या स्वस्त मालाच्या आयातीमुळें भारतांतील उद्योगधंदे डबघाईस आले, व ज्याचा ज्याचा धंदा नाहींसा झाला तो तो शेती करण्यासाठीं धांव घेऊं लागला. या सर्व कारणांनीं भारतांत घडून आलेलें आर्थिक स्थित्यंतर—दुर्दशा—पुढील भागांत वर्णन करण्यांत येईल.

२. ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट :—ईस्ट इंडिया कंपनीचा मक्ता नाहींसा झाल्यानें तिनें व्यापारांतून आपलें अंग काढून घेतलें. कंपनीच्या भागीदारास मिळावयाचें १०॥ टक्के व्याज भारताच्या वसुलांतून द्यावें असा निर्णय झाला. यामुळें भारतास दरसाल ६३०००० पौंड द्यावे लागत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १८५३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभारांत आणखी बदल झाला. या वेळीं भारतांत इंग्रज सरकारचा जवळजवळ एकछत्री अंमल प्रस्थापित झाला होता. एवढ्या मोठ्या प्रदेशाचा कारभार कंपनीच्या मध्यस्थीनें व्हावा ही गोष्ट पुष्कळांस पसंत नव्हती. कंपनीचें ऐतिहासिक कालांतील कार्य मोठें असलें तरी वर्तमानकालांतील तिची उपयुक्तता संपली आहे असें पुष्कळांचें म्हणणें होतें, तें बरोबर होतें. परंतु इ. स. १८५३ सालीं कंपनीची इतिश्री होण्याऐवजीं तिच्या डायरेक्टरांची संख्या २४ ची १८ करण्यांत आली व त्या अठरांत सहा सभासद ब्रिटिश सरकारनें नेमले. अशा रीतीनें कंपनीचा कारभार कांहीं दिवस चालल्यानंतर इ. स. १८५७ सालीं झालेल्या क्षोभाचें निमित्त लक्षांत घेऊन पार्लमेंटनें कंपनीच्या कारभाराचा शेवट केला. अशा रीतीनें इ. स. १६०० सालीं स्थापन झालेली ही व्यापारी कंपनी अनेक स्थित्यंतरांतून मोठें साम्राज्य कमावून अंतर्धान पावली.

३. **राज्यकारभारांत सुसूत्रता** :—जसजसें कंपनीचें व्यापारी अंग कमी होत चाललें, तसतसें भारतांतील राज्यकारभारविषयक धोरण निश्चित करण्याकडे व अंतर्गत राज्याची घडी बसविण्याकडे येथील राज्यकर्त्यांचें विशेष लक्ष लागूं लागलें. लॉर्ड कॉर्नवॉलीसपासून ते लॉर्ड डलहौसीच्या कालापर्यंत ज्या अनेक राज्यकारभारविषयक सुधारणा झाल्या त्यामळें येथील राज्यकारभारास घडीबंद स्वरूप प्राप्त झालें. इ. स. १७७४ सालीं पास झालेल्या रेग्युलेटिंग ॲक्टामुळें सर्व कार्यकारी सत्ता गव्हर्नर जनरलच्या हातीं आली. यानंतर इ. स. १८३३ सालीं भारतांतील कायदे करण्याचा सर्व हक्क गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाकडे सोपविण्यांत आला व त्यासाठीं लॉर्ड मेकॉले या प्रसिद्ध कायदेपंडिताची नेमणूक झाली. त्यानें या देशांत चालूं असलेल्या दिवाणी व फौजदारी कायद्यांचा अभ्यास करून सर्व कायद्यांत सुसूत्रता आणण्यास प्रारंभ केला. अशा रीतीनें कायदे करण्याची सत्ता केंद्रीभूत झाली व कायद्यांत सुसूत्रता आली. भारतासारख्या एवढ्या मोठ्या प्रदेशावर जबाबदार रीतीनें राज्य करण्यास लायक अधिकारी लागत. यासाठीं इ. स. १८५३ पासून विलायतेंत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा सुरू झाली व तींत पास होणाऱ्या उमेदवारांची येथें योग्य जागांवर नेमणूक होऊं लागली. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा सुरूं झाल्याकारणानें सर्व नोकरवर्गाच्या कारभारांत एक छापाचें वळण निर्माण झालें. अशा रीतीनें राज्यकारभाराचें केंद्रीकरण, कायदे करण्याच्या अधिकाराचें केंद्रीकरण, सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा व सर्व खात्यांची नियमबद्ध रचना या चार कारणांमुळें विलायतेहून पांच हजार मैलांवरून भारतासारख्या [illegible] देशाचा कारभार एकसूत्रीपणानें चालविणारें राज्ययंत्र इंग्रजांनीं निर्माण केलें. वरिष्ठ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारच्या गव्हर्नर जनरलपासून ते खेडेगांवच्या पोलिस पाटलापर्यंत वरिष्ठ कनिष्ठांचे एकमेकांशीं संबंध अगदीं नियमबद्ध असे होते. यामुळें कोठेंही नियमांचें उल्लंघन झाल्यास यंत्रांत बिघाड होई व वरिष्ठ त्याची दखल घेत.

४. **कर्तृत्ववान् अधिकारी** :––एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत भारताच्या राज्यकारभारांत अतिशय लक्ष घालून काम करणारे अनेक अधिकारी येऊन गेले व त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें राज्यकारभारास उच्च प्रतीचा दर्जा आणून दिला. अशा कर्तृत्ववान् पुरुषांत मुंबईचा एल्फिन्स्टन, मद्रासचा मन्रो, मध्यभारतांतील सर जॉन मालकम्, राजपुतान्यांतील सर चार्लस् मेटकाफ, आग्रा–अयोध्या प्रांतांतील रॉबर्ट बर्ड व पंजाब प्रांतांतील लॉरेन्स बन्धू हे विशेष महत्त्वाचे होत. मुंबई प्रांतांत एल्फिन्स्टननें महत्त्वाची कामगिरी बजाविली. येथील न्याय व वसूलपद्धतीचा काळजीपूर्वक अभ्यास करून जमीनमहसुलाच्या रयतवारी पद्धतीचा पाया घातला. मुंबईंत ज्या प्रकारचें कार्य एल्फिन्स्टननें केलें त्याच प्रकारचें कार्य मन्रोनें मद्रासमध्यें केलें. ह्या दोन्ही प्रांतांत स्थापन झालेली रयतवारी पद्धति या मुलुखांतील परंपरेस धरूनच होती. भारतावर राज्य करीत असतां इंग्रजी राज्यपद्धतीच्या कल्पना येथें गृहीत धरण्यापेक्षां, एतद्देशीय परंपरेच्या पायावर ब्रिटिश राज्य उभारावें ही विधायक दृष्टि या अधिकाऱ्यांनीं स्वीकारली. याच तत्त्वांस अनुसरून पुढील काळांत मध्यप्रांतांत मालगुजारी, आग्रा–अयोध्या प्रांतांत तालुकदारी व पंजाबांत महालवारी अशा त्या त्या प्रांतास अनुरूप जमीनमहसुलाच्या पद्धती निर्माण झाल्या. यासंबंधीचा तपशील येथें देण्याची आवश्यकता नाहीं.

५. **सामाजिक सुधारणेस प्रारंभ** :—केवळ वसूल व न्यायव्यवस्था एवढ्यावरच न थांबतां येथील राज्यकर्त्यांनीं या देशांतील अनेक अनिष्ट चालीरीतींस आळा घालावयाचें धोरण अंमलात आणलें. या सर्वांत लॉर्ड वुइल्यम् बेंटिकनें इ. स. १८२९ सालीं सतीची चाल कायद्यानें बंद केली ही महत्त्वाची सुधारणा होय. कायद्यानें सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या मार्गावरचें हें पहिलेंच पाऊल होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कामीं बेंटिकनें मोठ्या सावधगिरीनें लोकमत अजमावून व या काळांत इंग्रजी शिकलेल्या हिंदी लोकांस हाताशीं धरून ही सुधारणा घडवून आणली. पुढें इ. स. १८५६ सालीं विधवा विवाहास मान्यता देण्याचा कायदा पास झाला. कायद्यानें सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या मार्गावरील हें पुढलें पाऊल होय. याखेरीज भारतांतील विविध जातींच्या लोकांस सरकारी नोकऱ्या देतांना जातिधर्मविषयक पक्षपात केला जाणार नाहीं अशा प्रकारची घोषणाही इ. स. १८३३ सालीं करण्यांत आली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. **राजा राम मोहन रॉय** :—एल्फिन्स्टन, मन्रो, बेंटिक यांच्यासारखे राज्यकर्ते या देशांत सुधारणेच्या मार्गावर पाऊल टाकीत असतां त्या वेळीं जागृत होत चाललेल्या प्रमुख हिंदी लोकांचें त्यास फार साहाय्य झालें. अशा लोकांत राजा राम मोहन रॉय हा प्रमुख आहे. याची योग्यता अद्याप मराठी वाचकांस पूर्णपणें कळली नाहीं. त्यानें प्रथम वेदांचें देशी भाषेंत (बंगालींत) भाषांतर केलें. उच्च शिक्षणासाठीं हिंदु कॉलेजची स्थापना केली. तिबेटांत जाऊन धर्माचा तौलनिक अभ्यास केला. इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला. सतीविरुद्ध मोहीम केली. विधवा विवाहाची, स्त्रियांस शिक्षण देण्याची व स्त्रियांना वारसा हक्क देण्यासाठीं हिंदु कोड बदलण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. बहुपत्नीकत्वास विरोध केला. मुद्रण स्वातंत्र्याचा आग्रह धरला. ज्यूरींतील वर्णभेदाचा निषेध केला. सनदशीर चळवळीचा पाया घातला. व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही यांचा उच्चैर्घोष केला. जमीनदारी जुलुमाविरुद्ध रयतेची वकिली केली व सरकारच्या करपद्धतींत समतेच्या तत्त्वांवर सुधारणा करण्याचा आग्रह धरला. सारांश, भूतदया, स्वातंत्र्याची आकांक्षा व शास्त्रीय दृष्टि या त्रयीच्या आधारावर भव्य व मनोहारी " **नवभारताचा निर्माता** " हें अभिधान त्यास सार्थकतेनें लागू पडतें. राजा राम मोहन रॉय यांचें कार्य असें विविध तऱ्हेचें आहे. पुढील काळांत भिन्न भिन्न प्रांतांत उत्पन्न झालेल्या विविध चळवळी बीजरूपानें याच्या कार्यांत दृष्टीस पडतात. एकीकडे इंग्रज राज्यकर्त्यांच्या प्रागतिक उद्योगास पाठिंबा देऊन व दुसरीकडे त्यांना राज्यकारभारविषयक धोरणाचें मार्गदर्शन करून, तसेंच प्रजेंतील असंतोषास सनदशीर दिशा दाखवून यानें या क्रांतिकालांत भारतास योग्य मार्गदर्शन केलें. असा हा थोर पुरुष विलायतेंत मोगल बादशहाच्या हक्काची वकिली करण्यास गेला असतां इ. स. १८३३ सालीं ब्रिस्टल येथें मरण पावला. महाराष्ट्रांत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेलेले न्या. महादेव गोविंद रानडे यांचें कार्य जवळजवळ त्याच्यासारखेंच बहुविध होतें असें म्हणतां येईल.

राजा राम मोहन रॉय

७. **इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार** :—हिंदुस्थानसरकारचें शिक्षणविषयक धोरण याच काळांत निश्चित झालें. लॉर्ड वुइल्यम बेंटिक हा गव्हर्नर जनरल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतांना विलायतेंत व भारतांत हिंदी लोकांस कशा प्रकारचें शिक्षण द्यावें या विषयावर मोठा कडाक्याचा वाद झाला. एका बाजूचें म्हणणें असें कीं, एतद्देशीय संस्कृत विद्यांच्या अभ्यासास उत्तेजन द्यावें. या काळांत कित्येक इंग्रज पंडितांनीं संस्कृतचा अभ्यास करून भगवद्गीतेचें भाषांतर केलें होतें. सर वुइल्यम जोन्सनें शाकुंतलचें इंग्रजींत भाषांतर केलें, तें गएटे या जर्मन पंडितास इतकें आवडलें कीं तो तें डोक्यावर घेऊन नाचूं लागला ! असो. या सर्व पौर्वात्य विद्येच्या पुरस्कर्त्यांनीं आपली बाजू जोरानें पुढें मांडली. परंतु त्यांस लॉर्ड मेकॉलेनें जोराचा विरोध केला. तो म्हणाला, "हिंदी लोकांस इंग्रजी विद्येचें शिक्षण देऊन त्यांच्यांत नवी दृष्टि निर्माण करणें हें आवश्यक आहे. या योगानें कदाचित् भविष्यकाळांत भारतांतील जनता जागृत होऊन ते लोक आपल्या विरुद्ध बंड करून उठतील असा संभव आहे. असा दिवस कधीं उजाडेल कीं नाहीं तें मला माहीत नाहीं. पण तो उजाडल्यास मी तो ब्रिटिश साम्राज्याच्या इतिहासांत सोन्याचा दिवस असें मानीन." लॉर्ड मेकॉलेच्या मतास भारतांत राजा राम मोहन रॉयसारख्या लोकांनीं पाठिंबा दिला. इंग्रजी शिक्षणाची तरफदारी आणखी एका कारणानें बळकट झाली. भारतांतील ब्रिटिशांचा कारभार करण्यास इंग्रजी शिक्षण घेतलेल्या अनेक हिंदी लोकांचें साह्य आवश्यक होतें. या सर्व कारणांमुळें शेवटीं इंग्रजी शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांचा विजय झाला.

८. **वुडचा खलिता** :—वर सांगितल्याप्रमाणें भारतांतील लोकांस इंग्रजी शिक्षण देऊन त्यांबरोबरच भौतिक शास्त्रांचाही परिचय करून दिल्यास ते लोक आपल्या देशबांधवांस त्या विद्येचा परिचय करून देतील व अशा रीतीनें हें शिक्षणप्रसाराचें लोण चढत्या वाढत्या श्रेणीनें समाजांतील खालच्या थरापर्यंत पसरत जाईल अशी लॉर्ड मेकॉलेची अपेक्षा होती. परंतु इंग्रजी विद्येचा प्रसार पाझरत पाझरत जनतेपर्यंत पोहोंचेल ही लॉर्ड मेकॉलेची अपेक्षा फारशी सफल झाली नाहीं. हें पाहून भारत सरकारचें शिक्षणविषयक धोरण व्यापक दृष्टीनें आंखून देणारा असा एक खलिता सर चार्लस वुडनें इ. स. १८५४ सालीं तयार केला. त्या खलित्यानुसार प्रत्येक प्रांतांत शिक्षणखात्याची स्थापना व्हावी, भारतांत उच्च शिक्षणाच्या नियंत्रणासाठीं विद्यापीठें स्थापन करावींत, उच्च इंग्रजी शिक्षणासाठीं कॉलेजांची संख्या वाढवावी व त्याबरोबरच दुय्यम शिक्षणासाठीं हायस्कुलें स्थापन करावीं, शिक्षणपद्धतीचें ज्ञान होण्यासाठीं ट्रेनिंग कॉलेजें स्थापन करावींत, स्त्रियांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवावें व सामान्य जनतेंत शिक्षणाचा प्रसार होण्यासाठीं मातृभाषेंतून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळांसही उत्तेजन द्यावें, शिक्षणविषयक खाजगी यत्नास सरकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मदत द्यावी व तत्संबंधींचे नियम तयार करावेत असा सर चार्लस वुडच्या खलित्याचा मथितार्थ होता. या खलित्यांतील दिग्दर्शनाप्रमाणें पुढील काळांत शिक्षणाची उभारणी झाली.

९. सामाजिक स्थित्यंतर :—परंतु इंग्रजी विद्येचा प्रसार वुडच्या खलित्याबांचून अडून राहिलेला नव्हता. लोकांस इंग्रजी विद्येचें विलक्षण आकर्षण उत्पन्न झालें होतें. एके काळीं सरकार संस्कृत विद्येच्या प्रसारास उत्तेजन देत असतां बंगालमध्यें राजा राम मोहन रॉय यानें इंग्रजी शिक्षणाचा उपक्रम केला व तोच अतिशय लोकप्रिय झाला. या इंग्रजी शिक्षणामुळें, इंग्रजी अंमलामुळें व एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत हिंदुस्थानांत जे ख्रिस्ती मिशनरी आले,* त्यांच्या सहवासामुळें भारतांतील समाजावर अनेक महत्त्वाचे परिणाम घडून आले. पहिला परिणाम धर्मावर झाला. ख्रिस्ती धर्माच्या परिचयानें आपल्या धर्मांत जरूर ते फेरफार केले पाहिजेत असें येथील विद्वान लोकांस वाटूं लागलें व याच धोरणावर बंगालमध्यें ब्राह्मो समाजाची स्थापना झाली. राजा राम मोहन रॉय हा त्या पंथाचा आद्य पुरस्कर्ता होता. पंजाबांत दयानंद सरस्वतींनीं स्थापन केलेला आर्यसमाज व मुंबईंत कै. डॉ. भांडारकर व न्या. मू. रानडेप्रभृतींनीं वाढविलेला प्रार्थनासमाज हे या प्रवृत्तीचे निदर्शक होत. पाश्चिमात्य सुधारणेच्या पहिल्या पहिल्या थाटानें इंग्रजी शिकलेल्या लोकांचे डोळे दिपून गेले. इंग्रजीबद्दल अभिमान व स्वभाषेची अनास्था अशी अवस्था उत्पन्न झाली. थोडक्याच काळांत इतिहास, भूगोल वगैरेचा परिचय झाल्यामुळें आपल्या स्वतःच्या पूर्वजांस मूर्ख म्हणणारे लोक निघूं लागले.

* ख्रिस्ती मिशनरी लोकांस पूर्वी हिंदुस्थानांत स्थायिक होण्यास प्रतिबंध असे. कारण या देशांत धार्मिक बाबतींत ढवळाढवळ करावयाची नाहीं असा धडा पोर्तुगीजांच्या उदाहरणावरून इंग्रजांनीं घेतला होता. परंतु देशांत ब्रिटिश अंमल स्थिरावला हें पाहून इंग्रजांनीं इ. स. १८१३ पासून मिशनरी लोकांना येथें स्थायिक होण्यास परवानगी दिली. त्याबरोबर येथें मिशनरी संस्था झपाट्यानें वाढल्या व त्यांनीं एकीकडे आपल्या धर्माचा प्रसार करीत असतां दुसरीकडे शाळा, कॉलेजें व धर्मार्थ रुग्णालयें स्थापन केलीं. छापखानेही काढले. आपल्या धर्मग्रंथांचीं देशी भाषेंत भाषांतरें केलीं. अशा रीतीनें समाजांत मोठें मन्वन्तर घडवून आणलें. कित्येक ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं आपल्या धर्माच्या प्रसारार्थ योजलेले मार्ग आक्षेपार्ह होते हें खरें असलें, तरी मिशनऱ्यांनीं मानवधर्मास आवाहन करून केलेलें संघटित कार्य उच्च प्रतीचें व अनुकरणीय होतें यांत संशय नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिल्या पिढींत अल्पविद्याप्रतिष्ठित लोकांस मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या मिळाल्या व सरकारदरबारीं व समाजांत त्यांना बराच मान मिळाला. इंग्रजांनीं धार्मिक शिक्षण देण्याच्या बाबतींत तटस्थ वृत्ति स्वीकारल्यामुळें तें शाळांतून अजिबात बंद झालें व दिवसेंदिवस नवशिक्षितांचा स्वधर्मविरील विश्वास उडत जाऊन ते नास्तिक बनत चालले.

१०. आधुनिक सुधारणा :—इंग्रजी शिक्षणाच्या साहाय्यानें हें नवीन मन्वन्तर घडून येत असतां त्याबरोबरच लॉर्ड डलहौसीच्या उद्योगप्रियतेमुळें या देशांत अनेक आधुनिक सुधारणांस प्रारंभ झाला. त्या काळीं विलायतेंतील उद्योगधंदेवाल्यांस कच्चा माल व खनिज वस्तू यांची अत्यंत जरुरी होती. ती गरज लक्षांत घेऊन म्हणा, अगर अन्य कारणानें म्हणा लॉर्ड डलहौसीनें भारताची औद्योगिक पाहणी करण्यास प्रारंभ केला. दगडी कोळसा व लोखंड यांसारखे खनिज पदार्थ कोठें सांपडतील, कापूस, चहा कोठें उत्पन्न होईल, अरण्यांत कोणकोणत्या वस्तू उपलब्ध होतील याची त्यानें बारकाईनें तपासणी केली. भारताची सर्व प्रकारें माहिती देणारा नकाशा तयार करण्यास त्यानेंच सुरुवात केली. तसेंच जुनीं कलाकौशल्याचीं कामें जीर्ण होऊं नयेत म्हणून तीं दुरुस्त करून त्यांचें रक्षण करण्याचें ठरविलें व देशाच्या निरनिराळ्या भागांतील दळणवळण वाढावें म्हणून रस्ते तयार करण्यासाठीं लॉर्ड डलहौसीनें पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटची (सार्वजनिक बांधकाम खातें) स्थापन केली. या पूर्वीच्या काळांत हें खातें लष्करी खात्याची एक शाखा म्हणून चालविलें जात होतें व तें लष्करास उपयुक्त अशा रस्त्यांचीच तेवढी काळजी घेई. लॉर्ड डलहौसीनें हें खातें लष्करापासून वेगळें काढल्यानें लोकांच्या सामुदायिक जीवनास आवश्यक असे रस्ते तयार करण्याकडे लक्ष देणें शक्य झालें.

लॉर्ड डलहौसी

११. कालवे :—या वाहतुकीच्या साधनांप्रमाणेंच पाटबंधाऱ्यांचा विस्तार करण्याचीही लॉर्ड डलहौसीनें व त्याच्या पूर्वीच्या लॉर्ड हार्डिंज यानें काळजी घेतली. या काळांत गंगा नदींतून खणून काढलेला एक कालवा ५२५ मैल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लांब आहे व तो कित्येक ठिकाणीं १७० फूट रुंद असल्यानें शेतकीप्रमाणेंच बोटीनें सामानाची वहातूक करण्यासही त्याचा उपयोग होतो. वास्तविक या देशांतील नद्यांचे प्रवाह असे आहेत कीं, मनांत आणल्यास उत्तरेस गंगा नदीपासून दक्षिणेस कावेरीनदीपर्यन्त निरनिराळ्या नद्यांचे प्रवाह एकमेकांस कालव्यानें जोडतां येतील व बनारस येथून निघणारी होडी त्रिचनापल्लीपर्यंत पाण्यांतून पोहोचूं शकेल. किंबहुना देशभर अशा प्रकारें कालव्यांचा विस्तार करण्याची योजना सर आर्थर कॉटन यानें आंखलीही होती. परंतु पुढें दिवसेंदिवस वाहतुकीसाठीं रेल्वेची वाढ करण्याकडे इंग्रज भांडवलवाल्यांचें लक्ष लागलें व त्यांना चढाओढ नको म्हणून कालव्याच्या वाहतुकीचा विस्तार मागें पडला. हें सर्व खरें असलें तरी फिरुज तुघ्लुखाच्या काळानंतर भारतांत कालव्यांचा विस्तार करण्याकडे लक्ष देण्याचें श्रेय एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील ब्रिटिश राज्यकर्त्यांसच देणें युक्त आहे.

१२. रेल्वे, टपाल, तारायंत्र इ० :—लॉर्ड डलहौसीनें केलेली सर्वांत मोठी सुधारणा रेल्वेची उभारणी ही होय. पहिली रेल्वे लाइन इ. स. १८५३ सालीं मुंबईहून ठाण्यापर्यंत झाली. ब्रिटिश उद्योगपतींना आपल्या भांडवलावर सहा टक्के व्याज देण्याचें कबूल करून व रेल्वेपासून नुकसान आल्यास त्याचीही भरपाई करण्याचें आश्वासन देऊन त्यांच्यामार्फत या देशांत रेल्वेच्या प्रसाराचा उपक्रम झाला. या व्यवहारांत विलायतेंतील भांडवलवाल्यांस भरमसाट सवलती मिळाल्या हें खरें असलें तरी या देशांतील उद्योगपति अशा प्रकारचें धाडस अंगावर घेतील अशी त्या वेळीं स्थिति नव्हती हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आज हिंदुस्थानांत सर्व भागांत मिळून एकंदर ५०००० मैल लांबीची रेल्वे आहे. रेल्वेच्या स्थापनेमुळें हिंदुस्थानांत फार महत्त्वाचे परिणाम झाले आहेत. देशांतील शांततेचें रक्षण व्हावें म्हणून हिंदुस्थानांतील वाटेल त्या भागांत सैन्याची नेआण करण्याची सोय झाली आहे. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या भागांशीं झपाट्यानें दळणवळण वाढल्या कारणानें एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्यास हें साधन फार उपयोगी आहे. तसेंच एखाद्या प्रांतांत दुष्काळ पडल्यास त्या ठिकाणीं रेल्वेच्या साहाय्यानें दूरवरची धान्यसामग्री आणून पोहोंचवितां येते व त्यामुळें दुष्काळाचें रौद्र स्वरूप सौम्य होतें; परंतु त्याबरोबर दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, सर्व रेल्वेचा संबंध हिंदुस्थानच्या बंदराकडे असल्यानें परदेशाहून येणारा माल हिंदुस्थानांत दूरवर पोहोंचूं शकतो व यंत्राच्या साहाय्यानें परदेशीं तयार झालेले जिन्नस हिंदुस्थानांत येऊं लागल्यानें हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांस यामुळें धक्का पोंहोचला.

या रेल्वेखेरीज लॉर्ड डलहौसीनें भारतांत सर्वत्र अर्धा आण्याचें पोस्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्ड पाठविण्याची सोय केली व हल्लींच्या टपालखात्याचा पाया घातला. त्याचप्रमाणें तारायंत्र सुरू करण्याची योजनाही त्यानेंच केली. पहिल्या प्रथम कलकत्ता या राजधानीच्या शहरापासून आग्र्यापर्यंत तारेची योजना करून तिचा संबंध वायव्य सरहद्दीवरील पेशावरापर्यंत लौकरच नेऊन भिडविला. यापुढील काळांत ब्रिटिश सरकारनें रेल्वे व तारायंत्र यांचा प्रसार करण्यांत लष्करी धोरणास अग्रस्थान दिलें. भारतांतील रेल्वेचा नकाशा वरवर पाहणाऱ्याच्याही लक्षांत येईल कीं, देशाच्या वायव्य सरहद्दीवर रेल्वेचें जाळें बारकाईनें विणलें जात असतां देशाच्या अंतर्गत भागांतील कित्येक ठिकाणें रेल्वेपासून शंभर शंभर मैल दूर राहिलेलीं आहेत.

१३. **सुधारणांचें समालोचन** :—एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं केलेल्या विविध सुधारणांचें त्रोटक वर्णन वर दिलें आहे. या सुधारणांनीं साम्राज्याची सुरक्षितता वाढली व तें इंग्लंडसारख्या दूर अंतरावरील देशांतून व्यवस्थित चालवितां येण्यास मोठें साह्य झालें. विलायतेंतील भांडवलास या सुधारणांमुळें वाव मिळाला, तेथील यांत्रिक मालास गिऱ्हाइक मिळालें व या सुधारणांनीं येथील जनतेचाही बराच फायदा झाला. राज्यकारभाराची नियमबद्ध आंखणी, कायद्याची सुसूत्रता, जमीनमहसुलाची प्रांताप्रांतांतून तपशीलवार व्यवस्था, समाजांतील अनिष्ट चालीरीतींचें कायद्यानें निर्मूलन, इंग्रजी शिक्षणाचा आग्रह व पाश्चिमात्य सुधारणांचा प्रसार या सर्व गोष्टी साकल्यानें लक्षांत घेतल्यास तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांचें कर्तृत्व अजमावतां येईल. या काळांतील ब्रिटिश राज्यकर्त्यांची पिढी निःसंशय मेहनती होती व ते लोक जनतेंत मिसळत. त्यांच्या चालीरीती व इतिहास समजावून घेत व पुस्तकरूपानें तें सर्व ज्ञान लिहून काढीत. ग्रँट डफचा मराठ्यांचा इतिहास, टॉडची राजस्थानकथा, सर जॉन मालकमचा मध्य भारताचा इतिहास, विल्कसचा म्हैसूरचा इतिहास हे ग्रंथ अशा उद्योगांतून निर्माण झाले. येथून पुढील काळांत इंग्रजांचें राज्य या देशांत स्थिर झाल्यावर भारतांत येणारे इंग्रज अधिकारी हिंदी जनतेशीं मिसळून वागत नसत. ते दूर शहराबाहेर राहूं लागले. यामुळें राज्यकर्ते व प्रजा यांच्यांतील संबंध दुरावत चालले.

१४. **तत्कालीन जनतेवर परिणाम** :—आज शंभर वर्षांनंतर या सर्व गोष्टींचें शांतपणें ऐतिहासिक समालोचन करतां येणें शक्य असलें, तरी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या आक्रमक धोरणामुळें व विविध पाश्चिमात्य सुधारणांमुळें तत्कालीन जनतेवर विलक्षण परिणाम झाला. लॉर्ड डलहौसीच्या कारकार्दीत अवघ्या आठ वर्षांत हिंदुस्थानच्या नकाशाचा रंग पाहतां पाहतां पालटला; जुनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्थानें नष्ट झालीं; शिपायांस रोजगार राहिला नाहीं; सरदार, जमीनदार, शास्त्री, मौलवी यांस प्रतिष्ठा उरली नाहीं. जुन्या राजवटींतील इनामांच्या चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिशननें वीस हजार इनामांची तपासणी केली व इनामदारांस आपल्या शिक्क्याच्या सनदा दिल्या. याच वेळीं या देशांत इंग्रजी शिक्षणाचा व ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला. गांवोगांवीं उंच शिखरें असलेलीं ख्रिस्ती देवळें उभारलीं गेलीं. कधीं कुणास शक्य वाटणार नाहीं अशा वेगानें आगगाड्या धांवूं लागल्या. पत्रें एकमेकांस पोहोंचूं लागलीं व क्षणार्धांत तारायंत्राच्या साहाय्यानें एका ठिकाणचा संदेश दुसरीकडे पोहोचूं लागला. यामुळें सबंध भारतांत विलक्षण चलविचल निर्माण झाली. हें आहे तरी काय व हे लोक आहेत तरी कोण याचा अज्ञानी लोकांस मोठा अचंबा वाटूं लागला व हें सर्व जाणतेपणानें आकलन करण्याचें तत्कालीन समाजास सामर्थ्य नसल्यानें अनेक भोळ्या समजुती व दुर्ग्रह समाजांत प्रसृत झाले. याच सुमारास देश एका महत्त्वाच्या आर्थिक स्थित्यंतरांतून जात होता. परदेशी मालाच्या आयातीमुळें देशी उद्योगधंदे नष्ट झाले व आज ठिकठिकाणीं दिसणाऱ्या गिरण्या व कारखाने यांस अद्याप सुरुवात व्हावयाची होती. पहिली कापडाची गिरणी या देशांत १८५१ सालीं स्थापन झाली, परंतु नंतर कित्येक वर्षें उद्योगधंद्याचा प्रसार मर्यादितच राहिला. या काळांत माजलेल्या बेकारीमुळें देशांत हलाखीची स्थिति उत्पन्न झालेली होती. याच सुमारास सर्वत्र पैशाच्या देवघेवीनें खरेदीविक्रीचे व्यवहार सुरू झाले. पूर्वीप्रमाणें मालाची प्रत्यक्ष अदलाबदल सोइस्कर राहिली नाहीं. यामुळें बाजारांत पैशाची चणचण झाली व पदार्थांच्या किंमती उतरल्या. सर्व आर्थिक व्यवहार हे जेव्हां पैशाच्या देवघेवीनें प्रथम चालू होतात तेव्हां सर्वत्र बहुधा अशीच स्थिति आढळते. पदार्थांच्या किंमती उतरल्यामुळें मालाला भाव नाहीं अशी स्थिति उत्पन्न झाली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर उद्‌भवलेली आर्थिक मंदी व तज्जन्य निराशा हें तत्कालीन असंतोषाचें एक महत्त्वाचें कारण होय.

१५. **असंतोषाचीं कारणें** :—पण या सर्वांपेक्षांही अयोध्या प्रांत खालसा झाल्यावर तेथील जमीनदारांच्या हक्कांची जी कसून चौकशी झाली त्यामुळें तेथील भागांत असंतोषानें मूळ धरलें. अनेक खालसा झालेल्या संस्थानांतील सैनिक आतां काम नसल्यामुळें रिकामे हिंडूं लागले. "कंपनीके अमलमें रोजगार नहीं" असे उद्‌गार त्यांच्या तोंडून निघत. धंदे बुडाल्यानें झालेल्या बेकारींत या लष्करी बेकारीनें भर घातली व ज्यांचीं संस्थानें नष्ट झालीं त्या संस्थानिकांनीं नवीन प्रस्थापित होत चाललेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्रिटिश राजवटीस फिरून एकवार जोराचा प्रतिकार करण्याचें ठरविलें. या सर्वांचा परिणाम म्हणजेच १८५७ त देशांत उद्‌भवलेला लोकक्षोभ होय.

१६. बंडाचा उद्‌भव :—या क्षोभास शिपायांच्या बंडानें सुरुवात झाली व हें बंड काडतुसांच्या प्रकरणावरून उद्‌भवलें. हें प्रकरण असें कीं, कलकत्त्या-नजीक डमडम येथें काडतुसें तयार करण्याचा कारखाना होता. तेथें तयार होणाऱ्या काडतुसासाठीं डुकराच्या व गाईच्या चरबीचा उपयोग करण्यांत येत असे, या गोष्टीचा बराच गवगवा झाला. एवढ्यांत सैन्यांतील ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं काडतुसांचीं टोंकें तोडण्यासाठीं चाकू देण्याऐवजीं तीं दांतानें तोडावींत असें सुचविलें. या सूचनेच्या बुडाशीं इंग्रज लोकांचा इस्लामी व हिंदु-धर्मावर हल्ला करण्याचा प्रच्छन्न हेतु आहे असा समज सैन्यांत पसरत चालला व ही असंतोषाची आग एका छावणींतून दुसऱ्या छावणीकडे वेगानें पसरत चालली. शेवटीं १८५७ च्या एप्रिल महिन्यांत मीरत येथें नव्वद शिपायांच्या एका तुकडीनें काडतुसांस स्पर्शही करण्याचें नाकारलें. त्याबरोबर त्यांस कोर्ट-मार्शल होऊन कडक शिक्षा फर्माविल्या गेल्या. सर्व शिपायांच्या डोळ्यांदेखत त्यांचे लष्करी पोषाख काढून घेऊन त्यांना कैद्यांचा पोषाख दिला. याच शिपायांनीं इंग्रजांसाठीं पंजाबांत व ब्रह्मदेशांत शौर्य गाजविलें व रक्त सांडलें होतें. त्यांची अशी दुर्दशा व्हावी व त्यांच्या धार्मिक भावनांची यत्किंचितही पर्वा असूं नये हें पाहून सैन्यांतील क्षोभ पराकोटीस पोहों-चला; व १० मे १८५७ रोजीं मीरत येथें शिपायांच्या क्षोभाचा भडका उडाला.

१७. उठावणीचें स्वरूप :—मीरतचे शिपाई वाटेंत जाळपोळ करीत व सांप-डेल त्या गोऱ्या अधिकाऱ्याची कत्तल करीत दिल्लीस निघाले. त्यांनीं दिल्ली सर करून तेथील वृद्ध बादशहाची सिंहासनावर स्थापना केली व मोगल बादशाही प्रस्थापित झाल्याची घोषणा केली. ही वेळ एकंदरींत बंडाची उठावणी करणाऱ्या हिंदी सैनिकांस फार अनुकूल होती. कारण बरेंच मोठें गोरें सैन्य पंजाबांत व ब्रह्मदेशांत नवीन जिंकलेल्या प्रदेशावर अंमल बसविण्यासाठीं गुंतलें होतें. दिल्लीस झालेल्या उठावणीचा लखनौ येथील जमीनदारांनीं व कानपूर येथें राहात असलेल्या बाजीरावाचा पुत्र धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब यानें पुरता फायदा घेतला. धोंडोपंत हा बाजी-रावाचा दत्तक पुत्र होता, म्हणून इंग्रजांनीं त्याची नेमणूक बंद केली होती. त्याचप्रमाणें झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या दत्तक पुत्रास इंग्रजांनीं नामंजुरी देऊन झांशीचें संस्थान खालसा करावयाचें ठरविलें होतें. तेव्हां झांशीची राणीही या यत्नांत सामील झाली. या सर्व कारणांनीं बंडाचें स्वरूप पालटलें आणि तें नुसतें शिपायांचें बंड राहिलें नाहीं. उत्तरेस मीरत-पासून दक्षिणेस झांशीपर्यन्त व पश्चिमेस दिल्लीपासून ते पूर्वेस अलाहा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्राद पर्यन्तच्या प्रदेशांत सर्वत्र उठावणी झाली. इंग्रजी राज्य इ. स. १७५७ त प्लासीच्या लढाईमुळें स्थापन झालें. तें फक्त १००वर्षेंच टिकणार असा प्रवाद सर्वत्र पसरला. २३ जून हा प्लासीच्या लढाईचा दिवस. या दिवशीं बंडवाले भारत इंग्रजांच्या अंमलांखालून स्वतंत्र करण्यासाठीं प्राणपणानें लढले. दुर्दैवानें त्यांच्या शौर्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. १८५७ च्या सप्टेंबर महिन्यांत इंग्रजांनीं पुन्हां दिल्ली काबीज केली व १८५८ च्या मे पर्यन्त ठिकठिकाणीं उत्पन्न झालेला प्रतिकार इंग्रजांनीं मोडून काढला. झांशीची राणी लक्ष्मीबाई इंग्रजांशीं अत्यंत शौर्यानें लढतां लढतां ग्वाल्हेरनजीक रणांगणीं पडली. तिच्या शौर्याची इंग्रज लोकांनींही प्रांजळपणें स्तुति केली आहे. भारताच्या इतिहासांत झांशीची राणी लक्ष्मीबाई ही देशाचें विगत स्वातंत्र्य पुन्हां प्राप्त करून घेण्यासाठीं शेवटचा यत्न करणारी व त्यासाठीं आत्मबलिदान करणारी शूर स्त्री होय.

राणी लक्ष्मीबाई

१८. उठावणीच्या अपयशाचीं कारणें :—वर वर्णन केलेला सार्वत्रिक उठावणीचा प्रसंग इंग्रजी सत्तेस खरोखर मोठा आणीबाणीचा होता. परंतु त्यांनीं त्यास मोठ्या धैर्यानें तोंड दिलें. दिल्ली येथें दारूगोळ्याचा मोठा सांठा इंग्रजांच्या ताब्यांत होता. तो बंडवाल्या शिपायांच्या ताब्यांत जाणार असें दिसूं लागतांच, तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं स्वतःचे प्राण धोक्यांत घालून त्याचा भडका उडवून दिला. दिल्ली येथील क्षोभाची बातमी तारेनें पंजाबांत पोहोंचतांच, सर जॉन लॉरेन्सनें त्वरेनें इंग्रजी सैन्याची तुकडी दिल्लीकडे पाठविली. इंग्रजी सैन्यांतील गुरख्यांच्या व शीखांच्या पलटणी इंग्रजांशीं राजनिष्ठ राहिल्या. निजाम, शिंदे वगैरे महत्त्वाचे बडे संस्थानिक अनुकूल संधि असतांही या बंडांत सामील झाले नाहींत. या सर्व कारणांमुळें इंग्रजांस जय मिळाला. शिपायांच्या हालचालींतही सुसूत्रता नव्हती. उठावणीस सिद्ध झालेले शिपाई एका पुढाऱ्याच्या मार्गदर्शनाखालीं व्यवस्थित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिकार करते, तर कदाचित् यापेक्षां निराळा बनाव दिसून आला असता. परंतु हेंही नमूद केलें पाहिजे कीं, उत्तर भारतांत दिल्ली, कानपूर, लखनौच्या प्रदेशांत उत्पन्न झालेल्या प्रतिकाराचे पडसाद सर्व देशभर उमटले नाहींत. जुनें राज्य गेलें व इंग्रजी अंमल सुरू झाला याबद्दल ज्यांची सत्ता गेली त्यांना दुःख वाटत असलें व सामान्य जनतेस त्या दुःखाबद्दल सहानुभूति व हळहळही वाटत असली, तरी लोक त्यांस सक्रिय पाठिंबा देण्यास तयार नव्हते हें खरें आहे. मग त्याचीं कारणें कांहींही असोत.

१९. **ऐतिहासिक मीमांसा** :—इ. स. १८५७ च्या क्षोभाचें वरील विवेचन वाचणारांस त्याचें स्वरूप कळून येईल. या उठावास कुणी शिपायांचें बंड म्हणतात, तर कुणी राज्यक्रान्तीचा यत्न म्हणतात, तर कुणी ब्रिटिश राजवटींतील भारतीय स्वातंत्र्याचें पहिलें युद्ध असें त्यास स्फूर्तिदायक नांव देऊन त्या क्षोभाचा गौरव करतात. इ. स. १८५७ च्या क्षोभांत सामील झालेले अनेक शिपाई व राणी लक्ष्मीबाईसारख्या स्त्रिया हे केवळ स्वतःच्या फायद्यासाठीं प्रतिकारास उद्युक्त झालेले नव्हते. अर्थात् तें नुसतें शिपायांचें बंडही नव्हे व नुसता गेलेलें राज्य परत मिळविण्याचा यत्नही नव्हे. ब्रिटिश सैन्याकडून राणी लक्ष्मीबाईचा मोठ्या वेगानें पाठलाग होत असतां एके ठिकाणीं ती दमून तृषाक्रांत होऊन पाणी पिण्यासाठीं थांबली. तो प्रसंग मोठा हृदयस्पर्शी होता. त्या वेळीं ती समोर असलेल्या गृहस्थांस म्हणाली कीं, 'मी अर्धा शेर तांदुळाची धनीण, मजला विधवा धर्म सोडून हा उद्योग करण्याची कांहीं जरुरी नव्हती. परंतु हिंदुधर्माचा अभिमान धरून या कर्मास प्रवृत्त झालें व याजकरितां वित्ताची, जीविताची आशा सोडली !' झांशीच्या राणीच्या उद्गारांप्रमाणेंच अनेकांचे विचार असले पाहिजेत, हें लक्षांत घेतां 'गेलेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचा शेवटचा अयशस्वी यत्न' असें या उठावणीचें इतिहासकारास वर्णन करावें लागेल.

२०. **कंपनीची इतिश्री** :—इ. स. १८५७ सालीं भारतांत उद्भवलेल्या क्षोभामुळें ब्रिटिश प्रधानमंडळानें कंपनीच्या कारभाराचा शेवट करण्याचें ठरविलें. वास्तविक भारतांतील राजकीय घडामोडी व येथें झालेली प्रत्येक लढाई ही ब्रिटिश प्रधानमंडळाच्या अनुमतीनें झालेलीं असल्यामुळें या क्षोभाची प्रत्यक्ष जबाबदारी कंपनीवर नव्हती; हें ब्रिटिश प्रधानमंडळालाही मान्य होतें. परंतु एवढ्या मोठ्या खंडप्राय देशाचा कारभार एके काळीं स्थापन झालेल्या जुनाट व्यापारी कंपनीच्या माध्यमांतून करावयाचा या गोष्टीची इष्टता उरली नव्हती. ईस्ट इंडिया कंपनीचें ऐतिहासिक कार्य संपलें होतें; हें लक्षांत घेऊन ब्रिटिश प्रधानमंडळानें ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट केला व भारताचा राज्यकारभार या वेळेपासून इंग्रज सरकारच्या नांवें सुरूं झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १७८४त पिट्स इंडिया ॲक्टान्वयें स्थापन झालेलें बोर्ड ऑफ् कंट्रोल व त्याचा अध्यक्ष याच्या अधिकाराचा शेवट होऊन त्या जागीं सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया (भारतमंत्री) या अधिकाऱ्याची ब्रिटिश कॅबिनेटमध्यें नेमणूक झाली. त्यानें भारताचा सर्व राज्यकारभार पहावयाचा, गव्हर्नर जनरलास वेळोवेळीं सूचना द्यावयाच्या व गव्हर्नर जनरलनें सर्वस्वीं भारतमंत्र्याच्या तंत्रानें चालावयाचें अशी पुनर्घटना झाली. या भारतमंत्र्याच्या मदतीसाठीं एक पंधरा जणांचें इंडिया कौन्सिल (भारतमंत्री-मंडळ) स्थापन झालें. या कौन्सिलचें मत भारतमंत्र्यावर कोणत्याही प्रकारें बंधनकारक नसे. परंतु या कौन्सिलमध्यें भारतांत नोकरी केल्याचा अनुभव असलेले अनेक सभासद असल्यानें त्यांच्या अनुभवाचा भारतमंत्र्यास उपयोग होई. कंपनीच्या अंमलाचा शेवट झाल्यावर तिच्या भागीदारांस भांडवलाच्या दर भागागणिक दुप्पट पैसे भारताच्या तिजोरींतून देण्यांत आले. ही रक्कम एकूण १२० लक्ष पौंडांची होती. ही रक्कम भारत सरकारच्या नांवें कर्जरूपानें उभारण्यांत आली व अशा रीतीनें भारताच्या राष्ट्रीय कर्जास प्रारंभ झाला.

इ. स. १८५८ पासून भारताच्या गव्हर्नर जनरलला 'व्हाइसरॉय' (राजप्रतिनिधि) असा किताब मिळाला. लॉर्ड कॅनिंग हा भारताचा पहिला व्हाइसरॉय होय.

२१ व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा :—१८५७ च्या असंतोषाची आग विझत आली हें पाहून ता. १ नोव्हेंबर १८५८ रोजीं अलाहाबाद येथें दरबार भरवून राणीचा जाहीरनामा वाचून दाखविण्यांत आला. सर्वांचीं मनें शांत व्हावीं म्हणून तो काढण्यांत आलेला होता. त्यांत दिलेलीं वचनें विशेष महत्त्वाचीं आहेत. जाहीरनाम्याचा सारांश असा :—'ईस्ट इंडिया कंपनीनें आतांपर्यंत चालविलेला भारतावर राज्य करण्याचा अधिकार आज आम्हीं आपल्या हातीं घेतला आहे. ईस्ट इंडिया कंपनीनें देशी संस्थानिकांशीं जे करारमदार केले असतील ते आम्ही विश्वासानें पाळूं व देशी संस्थानिकांस त्यांच्या पूर्वींच्या इभ्रतीनें वागविलें जाईल. धर्माच्या कामांत कोणावरही सक्ति केली जाणार नाहीं. हिंदी लोकांचें आपल्या जमिनीवरील प्रेम लक्षांत घेऊन त्यांच्या जमिनी वंशपरंपरा त्यांजकडे ठेवल्या जातील व सरकारी नोकरी देतांना काळा-गोरा असा भेद न करतां प्रत्येकास ज्याच्या त्याच्या पात्रतेप्रमाणें जागा दिली जाईल.' हा राणीच्या जाहीरनाम्याचा सारांश वाचणाराच्या लक्षांत येईल कीं त्यांत वतनाच्या सुरक्षितपणाबद्दल, संस्थानिकांचे पूर्वपरंपरागत हक्क रक्षिले जातील याबद्दल, प्रजेशीं वागतांना भेदभाव होणार नाहीं याबद्दल व धार्मिक तटस्थतेबद्दल आश्वासनें आहेत. पण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

तीन सत्तांचे समकालीन उत्कर्षापकर्ष

(इ स १५२६ ते १८५८)



Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांत प्रजेस कोणतेही राजकीय हक्क दिलेले नाहींत. राणीचा जाहीरनामा हा सुराज्याचा, पण अनियंत्रित राज्याचा जाहीरनामा होय. ती जबाबदारीच्या हक्काची सनद नव्हे. म्हणून राणीच्या जाहीरनाम्याची इंग्लंडच्या इतिहासांतील मॅग्ना चार्टाशीं (जॉन राजानें आपल्या सरदारांस दिलेली मोठी सनद) तुलना होऊं शकत नाहीं.

२२. पुढील धोरण:—इ. स. १८५७ च्या असंतोषापासून इंग्रज राज्यकर्त्यांनीं धडा घेतला. त्यांनीं संस्थानें खालसा करण्याचें धोरण सोडून दिलें. संस्थानिकांनीं दत्तक घेतल्यास त्यास ते मंजुरी देऊं लागले. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं संस्थानिकानें बंड केलें, तरी त्यास पदच्युत करून त्याचा नंजीकचा वारस संस्थानिक नेमावयाचा. आणि एखाद्या वेळीं त्याच्या राज्यांत बंड झालें, तरी तें मोडून काढून संस्थानिकास आपलें निरुपद्रवी वैभव भोगूं द्यावयाचें, धार्मिक बाबतींत तटस्थ व उदासीन राहावयाचें व पाश्चिमात्य सुधारणांचा शिरकाव लोकांस रुचेल व पचेल इतक्या बेतानें करावयाचा, असें त्यांनीं ठरविलें. हे तीन धडे त्यांना इ. स. १८५८ पासून पुढील साठ वर्षांत राज्य करतांना फार उपयोगीं पडले हें सांगावयास नकोच.

प्रश्न

१. १८५७ च्या असंतोषाचीं कारणें व परिणाम सांगा. २. टीपा लिहा:—(१) वुडचा खलिता (२) राजा राम मोहन रॉय (३) ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट (४) लॉर्ड डलहौसीच्या सुधारणा.

अभ्यास

(१) वाचा: विष्णुभट गोडसे वरसईकर लिखित 'माझा प्रवास.' (२) 'इंग्रजांनीं भारतीयांना इंग्रजी शिक्षण दिलें' ही गोष्ट चांगली झाली का वाईट झाली यावर चर्चा करा.

माहितीसाठीं

ग्वालेरचा रेसिडेंट मॅकफर्सन याचें बंडासंबंधीं मत

आग्रा २८, फेब्रुवारी १८५८

" टाईम्समध्यें कोणी एकजण लिहितो, कीं अयोध्या, बुंदेलखंड या प्रांतांप्रमाणें बंगाल प्रांतांतही लोकांच्या जमिनीवरील हक्कांवर आम्हीं गदा आणली असती, तर लखनौ-कानपूरच्या लढाया लढण्यापेक्षां हॅवेलॉक याला कलकत्त्या-

२५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पासूनच सुरुवात करावी लागली असती ! म्हणजे सारा देशच आमच्यावर उलटला असता ! हें मत अगदीं बरोबर आहे असें मला वाटतें. लोकांप्रमाणें बंगालच्या फौजेंतही असंतोष पसरला म्हणून सैन्यानें बंड केलें असें समजू नका. लोकांत आधींचा सार्वत्रिक असंतोष नसता तर केवळ नुसत्या काडतुसांच्या ठिणगीमुळें आग पेटली नसती. पण या वादग्रस्त विषयाला अंत नाहीं; त्याला हजार कारणें आहेत. आणि दरएक कारण आपापल्या पुरतें खरें असलें तरी सैन्यांत, समाजांत, किंबहुना हरएक ठिकाणीं आमच्याबद्दल अप्रीति व असंतोष नसता तर बंड झालेंच नसतें. आणि याही असंतोषाला कारण म्हणजे लोकांचे आम्ही बुडविलेले जमीनदारी हक्क, माफी हक्क वगैरे होत.''

भाग ३४ वा

सनदशीर चळवळीस प्रारंभ

(इ. स. १८५८ ते इ. स. १८९९)

१. **कालखंड** :--सत्तावन सालच्या धामधुमीनंतरच्या पहिल्या अठरा वर्षांत (इ. स. १८५८–७६) सहानुभूतीच्या धोरणास अनुसरून भारताचा राज्यकारभार झाला. नुकत्याच होऊन गेलेल्या क्षोभाची आठवण बुजावी या हेतूनें तें धोरण स्वीकारण्यांत आलें असावें. परराष्ट्रांशीं तटस्थ वृत्तीचें धोरण राखून शक्य तोंवर लढाई टाळावयाची, भारताच्या अंतर्गत कारभारांत सुधारणा करावयाची व संस्थानिकांशीं सामोपचाराचें वर्तन ठेवावयाचें हीं सहानुभूतीच्या धोरणाचीं मुख्य लक्षणें होत. इ. स. १८७६ नंतर पुढें कांहीं वर्षें भारत सरकारचें धोरण इंग्लंडमधील बदलत्या प्रधानमंडळाच्या धोरणाला अनुसरून बदलत होतें; परंतु इ. स. १८८५ पासून पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत भारत सरकारनें एकसारखा साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. महायुद्धाच्या घटनेमुळें इंग्रजांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला व २० ऑगस्ट १९१७ रोजीं भारतमंत्र्यानें भारतांत जबाबदार राज्यपद्धतीची स्थापना करण्याचें आश्वासन दिलें.

२. **राष्ट्रीय चळवळीचा उदय** :—इ. स. १८५८ पासून ते १९१७ पर्यंतच्या काळांत ब्रिटिश सरकार भारतांत कांहीं राज्यकारभारविषयक सुधारणा करीत असतां आर्थिक बाबतींत भारतापेक्षां इंग्लंडच्या हितास अनुकूल अशा प्रकारचें धोरण अमलांत आणीत होतें. तसेंच त्यांनीं उच्च

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरकारी नोकऱ्यांतही लायक हिंदी लोकांचा उदारपणें प्रवेश होऊं दिला नाहीं. भारतांतील धनिकांनीं आपल्या कर्तृत्वानें उभारलेल्या गिरण्यांना व कारखान्यांना उत्तेजन देण्याऐवजीं त्यांस अप्रत्यक्षपणें विरोध केला. यामुळें भारतांत ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणाबद्दल असंतोष उत्पन्न झाला. शेतीवर उपजीविका करणारांची संख्या वाढत चालल्यामुळें देशांत वारंवार दुष्काळ पडूं लागले. सावकाराचा पेच वाढला. यामुळें खेड्यांतही असंतोष होता. या असंतोषास इंग्रजी शिक्षण मिळालेल्या सुशिक्षितांनीं वाचा फोडली. कारण ब्रिटिश राजवटींतील हे दोष प्रथम त्यांच्या हलके हलके लक्षांत येऊं लागले. देशभर दळणवळणाचीं साधनें निर्माण झाल्यामुळें व सर्वत्र एकाच नमुन्याची राज्यपद्धति अस्तित्वांत आल्यामुळें तिच्याविरुद्ध आसेतुहिमाचल सारखीच प्रतिक्रिया चालू झाली व तिनें राष्ट्रीय स्वरूप धारण केलें. भारत हें पूर्वी एके काळीं एक राष्ट्र असो वा नसो, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत उभें भरतखंड एकमुखानें बोलूं लागलें. बोलण्याच्या स्वरूपांत मनुष्यस्वभावानुरूप सौम्य तीव्रपणाचा काय फरक असेल तेवढाच. नवीन प्रस्थापित झालेल्या ब्रिटिश राजवटीविरुद्ध झगडा करतांना पूर्वीप्रमाणें लढाया व रक्तपात करून तें ध्येय साध्य करणें हें अशक्य व अनिष्टही आहे, जनतेंत जागृति निर्माण करीत कायद्याच्या चौकटींत राहून सनदशीर चळवळ करावी, या योगानें एकीकडे लोकांचें शिक्षण व दुसरीकडे सरकारविरुद्ध झगडा हा समांतर चालू राहील, अशा प्रकारचे विचार तत्कालीन विचारवंतांच्या डोक्यांत आले.* व त्यासाठीं इ. स. १८८५ सालीं राष्ट्रीय सभा स्थापन करून तिच्या द्वारें आपलें ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न केला. तो भाग पुढें सांगण्यांत येईल. प्रस्तुत भागांत या साठ वर्षांत घडून आलेल्या महत्त्वाच्या राज्यकारभारविषयक सुधारणांचें समालोचन करावयाचें.

३. विद्यापीठांची स्थापना :—भारताचा पहिला गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय लॉर्ड कॅनिंग यानें इ. स. १८५७ च्या क्षोभानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठीं सौम्यतेचें धोरण स्वीकारलें. इ. स. १८५७ ची धामधूम चालू असतांच मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणीं विद्यापीठांची स्थापना झाली व सर चार्लस वुडनें केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी होण्यास प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या स्थापनेमुळें दुय्यम शिक्षणा-

* कित्येकांच्या डोक्यांत अत्याचारी विचारही आले. इ. स. १८७९ सालीं महाराष्ट्रांत उद्भवलेलें 'वासुदेव बळवंताचें बंड' याचेंच उदाहरण होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तील गोंधळ कमी होऊन त्यास व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें व सर्वत्र प्रवेश परीक्षेचा कार्यक्रम एकच झाल्यामुळें ती प्रवेशपरीक्षा पास होणारास एक विवक्षित दर्जा प्राप्त झाला. भारताच्या राजकीय हक्कांकरितां झगडणारे बहुतेक सुशिक्षित विद्यापीठांतून बाहेर पडले. या दृष्टीनें विचार करतां विद्यापीठाच्या स्थापनेस भारताच्या इतिहासांत फार महत्त्व आहे.

४. **हायकोर्टाची स्थापना** :—लॉर्ड कॅनिंग व्हाइसरॉय असतां न्यायखात्याची पुनर्घटना झाली. रेग्युलेटिंग ॲक्टनें स्थापन झालेलें वरिष्ठ कोर्ट व हेस्टिंग्जनें स्थापन केलेलें अदालत कोर्ट यांच्या अधिकारमर्यादेचा प्रश्न बारंवार उपस्थित होत असे. हा गोंधळ काढून टाकण्यासाठीं इ. स. १८३० सालीं मुंबई, मद्रास व कलकत्ता या तीन ठिकाणीं प्रांतानिहाय एकेका हायकोर्टाची स्थापना झाली. या हायकोर्टाकडे प्रांतांतील खालच्या कोर्टांतून अपिलें येत. परंतु सर्व हायकोर्टांचा दर्जा सारखाच. त्यांच्या निकालावर विलायतेंत फक्त प्रीव्ही कौन्सिलकडे अपील करतां येत असे. इ.स. १९५० सालीं भारतास स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर दिल्ली येथील फेडरल कोर्टास अखिल भारतीय वरिष्ठ कोर्टाचा दर्जा प्राप्त झाला आहे.

५. **कायदेमंडळांची वाढ** :— लॉर्ड कॅनिंगनें घडवून आणलेली महत्त्वाची सुधारणा कायदेमंडळासंबंधीची होती. भारतांतील सनदशीर प्रगतीचें मोजमाप कायदेमंडळांत झालेल्या सुधारणांनीं चांगलें लक्षांत येतें. इ. स १८३३ सालीं भारतांत कायदेमंत्र्याची प्रथमच नेमणूक झाली. पुढें इ. स. १८५३ सालीं कलकत्ता येथील कार्यकारी मंडळाच्या मदतीस मुंबई व मद्रासचे कांहीं जादा प्रतिनिधी देऊन त्या मंडळाकडे कायदे करण्याचा अधिकार सोंपविण्यांत आला. या कायदेमंडळांत इ. स. १८६१ सालीं महत्त्वाचे बदल घडून आले. सबंध भारतासाठीं आतांपर्यंत एकच कायदेमंडळ होतें. त्याऐवजीं मुंबई व मद्रास इलाख्यांतून प्रांतिक कायदेमंडळांची स्थापना झाली, व कलकत्ता येथील वरिष्ठ कायदेमंडळांत कार्यकारी मंडळाच्या पांच सभासदांखेरीज आणखी बारा जादा सभासद नेमावयाचें ठरलें. या बारांपैकीं सहा सरकारी व सहा बिनसरकारी असावयाचे असा संकेत होता. अशा रीतीनें कायदेमंडळांत प्रथमच बिनसरकारी सभासदांचा प्रवेश झाला. मात्र या कायदेमंडळांस हल्लींच्या कायदेमंडळाप्रमाणें सरकारास प्रश्न विचारण्याची किंवा अंदाजपत्रकावर टीका वगैरे करण्याची परवानगी नव्हती हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

६. **आणखी कांहीं सुधारणा** : –यांखेरीज लॉर्ड कॅनिंगनें बंगाल व आसाममधील शेतकऱ्यांचें जमीनदारांपासून रक्षण करण्यासाठीं टेनन्सी ॲक्ट (कूळसंरक्षण कायदा) पास केला. या कायद्यान्वयें जमीनदारांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या हाताखालच्या शेतकऱ्यांपासून घ्यावयाची रवकम कांहीं विवक्षित कारणांवाचून वाढवूं नये असें ठरवून दिलें. या कायद्यामुळें लॉर्ड कॉर्नवॉलीसनें निर्माण केलेल्या कायम जमीनदारी पद्धतींतील एक महत्त्वाचा दोष कांहींसा सौम्य झाला. तरी पण आसाम प्रांतांत निळीची लागवड करणारे युरोपियन मळेवाले शेती करणाऱ्या मजुरांवर जो जुलूम करीत त्यांत यामुळें फरक पडूं शकला नाहीं. या कुळसंरक्षणाच्या कायद्याखेरीज लॉर्ड कॅनिगनें बंडाचा पुनरुद्भव होऊं नये म्हणून लष्करांत सावधगिरीचे फेरफार केले. इ. स. १८५७ सालीं देशांत युरोपियन सैनिकांची संख्या थोडी असल्यानें देशी सैनिकांस बंड करण्यास फावलें, ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यानें गोरें सैन्य वाढवून युरोपियन व हिंदी सैनिकांचें प्रमाण उत्तर भारतांत १ : २ व दक्षिणेस १ : ३ असें निश्चित केलें. याखेरीज तोफखान्याची सर्व व्यवस्था युरोपियनांच्या हातीं ठेवली.

७. लॉर्ड मेयोच्या सुधारणा :—लॉर्ड कॅनिगच्या कारभाराचें समालोचन करणारास त्याचें सावधगिरीचें, सामोपचाराचें व सुधारणावादी धोरण लक्षांत येईल. त्याच्यानंतर झालेल्या सर जॉन लॉरेन्स, लॉर्ड मेयो प्रभृति गव्हर्नर जनरलांनीं याच धोरणावर भारताचा राज्यकारभार चालविला. सर जॉन लॉरेन्सनें अफगाणिस्थानाच्या अमीराशीं सामोपचाराचें धोरण ठेविलें. लॉर्ड मेयोनें प्रांतिक सरकारांस, आर्थिक स्वायत्तता देण्याच्या मार्गावर पहिलें पाऊल टाकलें. त्या वेळीं हिंदुस्थानांत वसूल गोळा करण्याचें व खर्चासाठीं तो सर्व प्रांतिक सरकारांस वांटून देण्याचें हें सर्व काम वरिष्ठ सरकार करीत असे. भारताच्या कानाकोपऱ्यांतून होईल तो वसूल कलकत्त्याच्या खजिन्यांत जमा व्हावा व प्रांतिक सरकारांस लागणारा खर्चाचा पैसा त्यांनीं दरसाल वरिष्ठ सरकारकडून मागणी करून घ्यावा अशी त्या वेळीं जमाखर्चाची पद्धति असे. या पद्धतीमुळें प्रांतिक सरकारांस कसलेंही स्वातंत्र्य नसे. लॉर्ड मेयोनें या पद्धतींत थोडी सुधारणा केली. त्यानें निरनिराळ्या प्रांतिक सरकारांस मिळून दरसाल ४ कोटी ६८ लक्ष रुपये वांटून द्यावयाचे व तेवढ्यांत प्रांतिक सरकारांनीं कांहीं किरकोळ खात्यांची व्यवस्था आपापल्यापरी स्वतंत्रतेनें पाहावयाची; अशा रीतीनें प्रांतिक सरकार कारभार करीत असतां त्यांच्या खर्चांत कांहीं बचत झाल्यास वरिष्ठ सरकारनें तिच्यावर हक्क सांगावयाचा नाहीं; दर पांच वर्षांनीं या योजनेची फेरतपासणी करावयाची व तींत इष्ट ते फेरफार करावयाचे अशी योजना अंमलांत आणली.

८. विकेन्द्रीकरणाचें महत्त्व :—लॉर्ड मेयोनें केलेली ही सुधारणा विकेन्द्रीकरणाचें पहिलें पाऊल म्हणून महत्त्वाची समजली जाते. ब्रिटिशांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतावरील अंमल पांच हजार मैलांवरून चालवावयाचा असल्यानें खेडे-गांवच्या पोलीस पाटलापासून सर्व सत्ता गव्हर्नर जनरलच्या हातीं केन्द्रीभूत करावी असें सरकारचें धोरण असे. यामुळें हिंदी राज्यरचनेस यांत्रिकपणा प्राप्त झाला. लॉर्ड मेयोच्या सुधारणांनीं आर्थिक व्यवस्थेंत प्रांतिक सरकारास थोडेंबहुत स्वातंत्र्य प्राप्त झालें. या योगानें जनतेस कांहीं हक्क प्राप्त झाले नाहींत हें खरें; परंतु प्रांतिक सरकारास लोकांच्या गरजेनुरूप सहानुभूतीचें धोरण आंखण्यास त्यामुळें वाव राहिला हें या सुधारणेचें महत्त्व होय. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सर रमेशचंद्र दत्त यांसारखे अर्थशास्त्रज्ञ आर्थिक विकेन्द्रीकरणाचा जो मोठ्या आग्रहानें पुरस्कार करीत, त्याचें कारण हेंच होय. लॉर्ड मेयोने केलेल्या इतर सुधारणाही महत्त्वाच्या आहेत. जमिनीच्या साऱ्याशिवाय त्या वेळेस सरकारास दुसरें महत्त्वाचें उत्पन्न नव्हतें व दुष्काळ पडल्याबरोबर सारावसुलींत तूट येई. लॉर्ड मेयोनें यासाठीं प्राप्तीवरील करांत वाढ केली व मिठावर कर बसविला. अशा रीतीनें भारतसरकारच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी झाली. पण मिठावरील करावें ओझें गरीबांवर पडत असल्यानें तो आक्षेपार्ह होता व त्याविरुद्ध पुष्कळ ओरड झाली. याखेरीज महत्त्वाच्या शहरीं नगरपालिका स्थापन करून त्यांत अल्प प्रमाणांत प्रतिष्ठित नागरिकांना संधि देण्यासही यानेंच सुरवात केली.

९. आयात जकातींस विरोध :—लॉर्ड मेयोनंतर लॉर्ड नॉर्थब्रुकनें त्याचेंच धोरण पुढें चालविलें. परंतु या काळांत भारतांतील आयात मालावर असलेली जकात काढून टाका अशा प्रकारचें विलायत सरकारचें भारतसरकारच्या मागें टुमणें असे. इ. स. १८६० सालीं सर्व आयात मालावर शेंकडा १० टक्के जकात होती. ती १८६४ सालीं ७½ टक्के करण्यांत आली व इ. स. १८७१ सालीं कापडाच्या आयातीवरील जकात तर ७½ टक्के वरून ५ टक्के वर आली. परंतु तेवढ्यानेंही विलायत सरकारचें, विशेषतः लँकेशायरच्या गिरणीवाल्यांचें समाधान झालें नाहीं. इ. स. १८७४ त उदारमतवादी ग्लॅडस्टनचा पराभव झाला व त्याच्या जागीं डिझरेलीच्या नेतृत्वाखालीं साम्राज्यवादी प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें. त्याबरोबर इ. स. १८५८ पासून चालू असलेल्या सहानभूतीच्या धोरणाचा शेवट झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. लँकेशायरवाल्यांनीं स्टेट सेक्रेटरीकडून भारत सरकारास कळविलें कीं, राहिलेली ५ टक्के जकातही काढून टाका. भारतांत त्या वेळीं नुकत्याच कापडाच्या गिरण्या निघूं लागल्या होत्या व तेथें कापसाचें कापड विणण्याचा धंदा नुकताच कोठें पाय धरूं लागला होता. अशा वेळीं परकीय मालावरील जकात कमी केल्यास देशी गिरण्यांस धक्का बसेल अशी मोठी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भीति होती. लॉर्ड नॉर्थब्रुकनें जकाती कमी करण्याविरुद्ध पुष्कळ सांगून पाहिलें. परंतु विलायत सरकारनें शेवटीं आपला हेका चालविला. हें पाहून लॉर्ड नॉर्थब्रुकनें शेवटीं प्रकृतीच्या अस्वास्थ्याचें निमित्त करून राजीनामा दिला (इ. स. १८७६).

१०. दुष्काळप्रतिबंधक व निवारक उपाय :—लॉर्ड नॉर्थब्रुकनंतर आलेल्या लॉर्ड लिटनला भारतांतील वारंवार पडणाऱ्या दुष्काळाकडे तांतडीनें लक्ष द्यावें लागलें. इ. स. १८७६–७७ सालीं दक्षिणेंत फार मोठा दुष्काळ पडला. त्यांत एकाच वर्षांत ५० लक्ष मनुष्यें मृत्यु पावलीं. मागील अनेक वर्षांच्या अनुभवावरून दुष्काळ ही सरासरीनें दर पांच वर्षांनीं नक्की येणारी आपत्ति आहे असें दिसून आलें; तेव्हां तिजकरतां एकादी कायम स्वरूपाची योजना करण्याचें लॉर्ड लिटननें ठरविलें. दुष्काळाकरितां दरसालच्या अंदाजपत्रकांत दीड कोटीची रक्कम खर्चीं घालून ठेवावयाची व तिचा विनियोग (१) मागील दुष्काळांत झालेलें कर्ज निवारण्यास, (२) चालू असलेल्या दुष्काळांत मदत करण्यास किंवा दुष्काळप्रतिबंधक अशा रेल्वे, कालवे यांची वाढ करण्यास करावयाचा असें ठरलें. हे प्रतिबंधक उपाय झाले. याखेरीज पुढील निवारक उपाय त्या वेळीं मंजूर झाले. एकाद्या प्रांतांत दुष्काळ जाहीर झाल्याबरोबर ठराविक नियमाप्रमाणें सरकारी साऱ्याची सूट द्यावयाची. बेकार झालेल्या शेतकऱ्यांकरितां रिलीफ कामें सुरू करावयाचीं व रोगराई वाढूं नये म्हणून तेथें मोफत दवाखानेही काढावयाचे.

११. दुष्काळांचें कारण :—या सर्व उपायांनीं भारत सरकारच्या दुष्काळविषयक धोरणांत पद्धतशीरपणा उत्पन्न झाला हें खरें असलें तरी तेवढ्यानें लोकांच्या आर्थिक स्थितींत सुधारणा होणें शक्य नव्हतें. स्वस्त यांत्रिक मालाच्या खुल्या आयातीमुळें या देशांतील जुने उद्योगधंदे बसले व नवे निर्माण होण्याच्या आड अनेक विघ्नें आलीं. या सर्व कारणांनीं उत्पन्न झालेली बेकारी ही या दुष्काळाच्या मुळाशीं होती. कर्जदार कुळावरील सावकारांचा जुलूम हेंही त्यांच्या दुःखाचें एक कारण होतें. या जुलुमास आळा घालण्यासाठीं कांहीं कायदे झाले. १८७९ सालीं दक्षिणेंत 'शेतकरी संरक्षण कायदा' हा यांपैकींच होय. परंतु हे उपाय पुरेसे नव्हते. उद्योगधंद्यांची वाढ होऊन देशांतील संपत्तीची वाढ झाल्याखेरीज दुष्काळास पायबंद घालणें कठिण होतें. दुसरें असें कीं, ब्रिटिश अमलांत शांततेच्या काळांत लोकसंख्येची वाढ झाली व शेतीजमिनीचे अधिकाअधिक तुकडे झाले. अल्प प्रमाणावर होणारी शेती फायदेशीर होईना. परंतु मोठ्या प्रमाणावर शेती करून जमिनीचें उत्पादन वाढविण्याच्या मार्गांत तुकड्यांमुळें मोठाच अडथळा आला. गेल्या पाऊणशें वर्षांत या बाबतींत कांहीं सुधारणा व कायदे झाले असले तरी वाढत्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकसंख्येचा शेतीजमिनीवरील भार व तुकड्यातुकड्यामुळें होणारी अनुत्पादक शेती हीं या देशांतील आर्थिक विपत्तीचीं कारणें अजूनही दूर होऊं शकलीं नाहींत.

१२. साम्राज्यवादी धोरण :—लॉर्ड लिटन हा साम्राज्यवादी व्हाइसरॉय होता. त्या वेळीं विलायतेंत लॉर्ड डिझरेली हा साम्राज्यवादी मुख्य प्रधान होता. यांनीं अफगाणिस्थानच्या अमिराशीं चढाईचें धोरण ठेवलें व इंग्लंडच्या राणीस 'भारताची महाराज्ञी' असा किताब देण्याचा ठराव पास करून घेतला. या काळांत भारतांत देशी भाषांतून नुकतींच कोठें वर्तमानपत्रें निघूं लागलीं होतीं व तीं प्रसंगीं सरकारच्या धोरणावर टीका करीत; हें पाहून लॉर्ड लिटननें या वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालणारा कायदा केला. प्रचलित सरकारविषयीं अप्रीति उत्पन्न करणारे किंवा जातीजातींत वैमनस्य वाढविणारे असे लेख प्रसिद्ध करणार नाहीं असें वृत्तपत्रकारांनीं लिहून द्यावें किंवा लेखांचीं प्रुफें छापण्यापूर्वीं सरकारी अधिकाऱ्यांस दाखवावीं अशी अट घातली. याबद्दल लोकांनीं पुष्कळ गवगवा केला. तेव्हां पुढील उदारमतवादी गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यानें इ. स. १८८२ त हा मुद्रण-स्वातंत्र्यप्रतिबंधक कायदा रद्द केला.

१३. रिपन (इ. स. १८८०–८४) :—एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील भारताच्या इतिहासांत लॉर्ड रिपन या लोकप्रिय गव्हर्नर जनरलचें स्थान फार महत्त्वाचें आहे. त्याला स्थानिक स्वराज्याचा संस्थापक म्हणतात. भारतांत आल्याबरोबर त्यानें अफगाण युद्धाचा शेवट केला व म्हैसूर संस्थानच्या वारसदारास त्याचें संस्थान परत दिलें. या संस्थानचा कारभार इ. स. १८३१ सालीं बेंटिकनें आपल्या हातीं घेतला होता; तेव्हांपासून पन्नास वर्षांनंतर पुन: म्हैसूर हें संस्थान झालें. मुद्रणस्वातंत्र्यावर गदा आणणारा कायदा त्यानें रद्द केल्याचें वर सांगितलेंच आहे. भारताच्या आयात मालावरील जकाती रद्द करण्याचें त्याचें धोरण मात्र त्या वेळीं भारताच्या आर्थिक हितास धरून नव्हतें. परंतु तत्कालीन ब्रिटिश मुत्सद्दी खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते होते व लॉर्ड रिपन हा त्यांपैकीं एक होता. यामुळें त्यानें खुल्या व्यापाराचा पुरस्कार करून आयात मालावरील बऱ्याच जकाती रद्द केल्या. एवढी बाब सोडून दिली तर लॉर्ड रिपननें दुसऱ्या पुष्कळ चांगल्या गोष्टी केल्या. इ. स. १८८२ त त्यानें हंटर कमिशन नेमून हिंदुस्थानांतील शिक्षणाच्या प्रगतीचा आढावा घेतला व खाजगी प्रयत्नानें निघणाऱ्या शिक्षण-संस्थांना उत्तेजन द्यावें असें ठरविलें. शिक्षणावरील सरकारी नियंत्रण कमी करून खाजगी संस्थांना उत्तेजन देण्याचें हें धोरण पुढें कर्झन-शाहीपर्यंत चालू होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. इल्बर्ट बिल :– परंतु ह्या सर्वांपेक्षां इ. स. १८८३ सालीं पुढें आलेलें 'इल्बर्ट बिल' हें फार महत्त्वाचें आहे. सर कोर्टनें इल्बर्ट यानें असें बिल पुढें आणलें कीं, हिंदी मॅजिस्ट्रेटास किंवा सेशन्स जज्जास युरोपियन गुन्हेगारांची चौकशी करण्याचा आजपर्यंत प्रतिबंध होता तो नाहींसा करावा. याविरुद्ध येथील युरोपियन लोकांनीं एवढा गवगवा केला कीं, काळचा मनुष्यानें गोऱ्याची चौकशी करणें म्हणजे आमची इभ्रत जाते असें ते म्हणूं लागले. कित्येकांनीं व्हाइसरॉयचा उघड अपमान केला. उलट हिंदी पुढाऱ्यांनीं या बिलास उचलून धरलें व त्यांतील समतेच्या तत्त्वाची स्तुति केली. शेवटीं युरोपियनांच्या चळवळीचा परिणाम होऊन असें ठरलें कीं, युरोपियन गुन्हेगारास हिंदी जज्जापुढें उभें राहावें लागल्यास त्यास आपल्या जातीच्या लोकांची ज्यूरी मागण्याचा हक्क असावा. त्या वेळीं हिंदी लोकांस मात्र युरोपियन जज्जांविरुद्ध असा हक्क नव्हता. अशा रीतीनें समतेचें तत्त्व धाब्यावर बसविलें गेलें ! *

१५. स्थानिक स्वराज्य :–स्थानिक स्वराज्याची स्थापना हें रिपनचें सर्वांत महत्त्वाचें कार्य होय. आरोग्यरक्षण, पाणीपुरवठा, रस्तेदुरुस्ती करणें, दिवे लावणें व प्राथमिक शिक्षण देणें हीं कामें करण्यासाठीं ज्या संस्था इ. स. १८८४ त अस्तित्वांत आल्या त्यांना 'स्थानिक स्वराज्य संस्था' म्हणतात. लोकांना आपला कारभार पाहण्याचें शिक्षण मिळावें या हेतूनें लॉर्ड रिपननें यांची स्थापना केली. इंग्रजी शिक्षण घेऊन तयार झालेल्या नव्या पिढीस राज्यकारभाराची जबाबदारी दिवसेंदिवस अधिकाधिक घेण्याची इच्छा व पात्रता आहे हें लक्षांत घेऊन लॉर्ड रिपननें सुरुवात म्हणून स्थानिक स्वराज्याचा पाया घातला. प्रत्येक जिल्ह्याकरितां डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, तालुक्याकरितां तालुका लोकलबोर्ड, व शहराकरितां म्युनिसिपालिटी अशा संस्था स्थापन करण्यांत आल्या. त्यांतील बरेचसे सभासद लोकांनीं निवडलेले असावयाचे असें ठरलें होतें. यानंतरच्या काळांत अलीकडे या कायद्यांत पुष्कळच सुधारणा होऊन स्थानिक स्वराज्य इ. स. १९३७ पासून पूर्णपणें लोकप्रतिनिधींच्या हातीं आलें आहे.

१६. उदार धोरणाचा शेवट :––लॉर्ड रिपनच्या या सर्व कृत्यांमुळें त्याची चहूंकडे वाहवा झाली व तो जातांना लोकांनीं त्यास मानपत्रे दिलीं. लॉर्ड रिपननें उदार धोरण स्वीकारलें, त्या वेळीं इंग्लंडमध्यें ग्लॅडस्टन हा उदारमतवादी मुख्य प्रधान होता, व त्याचें त्यास पाठबळ होतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. डिझरेली व लिटन यांच्या साम्राज्यवादी धोरणानंतर ग्लॅडस्टन-रिपनचा

* अलीकडे हे सर्व वर्णभेद रद्द झालेले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदारमतवादीपणा कांहीं दिवस चालला. इ. स. १८८५ त ग्लॅडस्टनचा पराभव झाला. तेव्हांपासून पुढें वीस वर्षें इंग्लंडांत हुजूर पक्षाचें वर्चस्व होतें; व भारतांत त्याचा प्रतिध्वनि म्हणून साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब झाला. हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यांत सुएझमार्गें दळणवळण इ. स. १८६९ पासून सुरू झालें व यामुळें या दोन देशांमधील प्रवास तीन आठवड्यांत होऊं लागला. इ. स. १८७२ त हे दोन देश तारायंत्रानें जोडले गेले. यामुळें भारतमंत्र्यास व विलायत सरकारास गव्हर्नर जनरलला वेळोवेळीं सूचना देणें सुलभ झालें. अशा रीतीनें लंडनच्या राजधानींतून हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें नियंत्रित करतां येऊं लागलीं. अर्थातच या सर्व नव्या सुधारणांची साम्राज्यशाहीस मोठी मदत झाली.

१७. **राष्ट्रीय सभेची स्थापना** :—इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळें या देशांतील सुशिक्षितांत होत चाललेली जागृति दिवसेंदिवस वाढतच चालली. इल्बर्ट बिलाविरुद्ध युरोपियनांनीं केलेल्या चळवळीवरून हिंदी लोकांनीं धडा घेतला. त्यांच्या असें लक्षांत आलें कीं, सरकारनें केलेलें एखादें कृत्य लोकांस नापसंत असल्यास त्यांनीं संघटित होऊन त्या कृत्याविरुद्ध आपलें मत सनदशीरपणें म्हणजे कायदेशीरपणें एकसारखें व्यक्त केल्यास व त्यासाठीं सभा भरविणें, ठराव पास करणें व शिष्टमंडळें पाठविणें इत्यादि प्रकारांचा अवलंब केल्यास अखेर सरकार लोकमतास अल्पांशानें कां होईना मान देतें. युरोपियन लोकमतास मान देणारें सरकार हिंदी लोकमतास सहजासहजीं बधणारें नव्हतें, ही गोष्ट हिंदी पुढाऱ्यांच्या लक्षांत आली नव्हती असें नाहीं. तरी विद्यमान परिस्थितीच्या मर्यादेंत राष्ट्रीय जागृतीचा तोच एक मार्ग आहे, हें लक्षांत घेऊन हिंदी पुढाऱ्यांनीं इ. स. १८८५ सालीं राष्ट्रीय सभेची स्थापना केली. तेव्हांपासून सालोसाल हिंदुस्थानांतील निरनिराळ्या गांवीं राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें भरून अनेक ठराव पास होऊं लागले.

१८. **कायदे कौन्सिलांची वाढ** :—जनतेंतील ही जागृति लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें वरिष्ठ व प्रांतिक कायदेमंडळांची वाढ करणारा एक कायदा इ. स. १८९२ सालीं पास केला. या कायद्यान्वयें वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील जादा सभासदांची संख्या १६ पर्यंत वाढविण्यांत आली व प्रांतिक कायदे कौन्सिलांत २० पर्यंत जादा सभासद नेमावे असें ठरलें. वरिष्ठ कायदे कौन्सिलांत प्रांतिक कायदे कौन्सिलांच्या बिनसरकारी सभासदांनीं निवडलेले दहा प्रतिनिधी घेण्यांत आले व प्रांतिक कायदे कौन्सिलांत म्युनिसिपालिटचा, लोकलबोर्डें, युनिव्हर्सिटचा अशांसारख्या सरकारमान्य संस्थांनीं शिफारशी करून पाठविलेले प्रतिनिधी घेण्यांत आले. तरी अजून सर्व कायदेमंडळांतून सरकारच्या हातीं हुकुमी बहुमत होतें. सभासदांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रश्न विचारण्यास व वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा करण्यास परवानगी दिलेली होती. ह्या स्थितींत इ. स. १९०९ पर्यंत बदल झाला नाहीं. या काळांत हिंदुस्थानांतील कायदे कौन्सिलांचे ठराव सरकारवर मुळींच बंधन-कारक नसत व कौन्सिलचा केवळ सल्लागार मंडळाप्रमाणें उपयोग होत असे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

१९. **सिव्हिल सर्व्हिस** :—याच सुमारास पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या शिफारसीनुसार इ. स. १८९१ सालीं महत्त्वाचे फेरफार करण्यांत आले. सरकारी नोकरांचे इंपीरियल सर्व्हिस, प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिस व सबॉर्डिनेट सर्व्हिस असे तीन वर्ग केले. यांपैकीं इंपीरियल सर्व्हिसमधील जागा इंडियन सिव्हिल सर्व्हिस (आय्. सी. एस्.) ची परीक्षा पास झालेल्यांसच मिळा-वयाच्या; सबॉर्डिनेट सर्व्हिसमध्यें लायकीप्रमाणें प्रवेश व्हावयाचा व प्रॉव्हि-न्शियल सर्व्हिसमध्यें सबॉर्डिनेट सर्व्हिसमधील अनुभवी लोक व कांहीं आय्. सी. एस्. नेमावयाचे. या वर्गवारीमुळें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतील नोकरवर्गाची व्यवस्था नीट झाली; पण हिंदी लोकांचा या नोकऱ्यांतून मोठ्या प्रमाणावर प्रवेश झाला नाहीं. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षा त्या काळीं इंग्लंडमध्यें होत असे व त्या परीक्षेस बसणाराचें वय बावीस ते चोवीसच्या दरम्यानचें असलें पाहिजे या अटींमुळें फारच थोडे हिंदी लोक या विलाय-तेंतील चढाओढीच्या परीक्षेंत यशस्वी होत. प्रॉव्हिन्शिअल सर्व्हिसमधील जागांवर खालच्या अनुभवी नोकरांची नेमणूक करण्यांतही सरकारनें सढळ-पणा दाखविला नाहीं. अशा स्थितींत वरिष्ठ नोकऱ्यांचे हिंदीकरण कसें व्हावें ?

२०. **हिंदुस्थानचे पितामह दादाभाई नौरोजी** :—या अडचणींतून वाट काढण्याचा प्रयत्न हिंदुस्थानचे पितामह दादाभाई नौरोजी यांनीं केला. त्यांनीं इंग्लंडमध्यें जाऊन ब्रिटिश पार्लमेंटांत प्रवेश करून घेतला व तेथें असा ठराव आणला कीं, 'इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा नुसती इंग्लंडमध्येंच न होतां ती इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत एकाच वेळीं घेण्यांत यावी.' या योगानें हिंदी तरुणांस आय्. सी. एस्. च्या परीक्षेस बसणें स्वस्त व सुलभ होणार होतें. हा ठराव हाऊस ऑफ कॉमन्समध्यें दादाभाईंनीं इतक्या मुद्देसूद रीतीनें मांडला कीं, त्यायोगें इंग्लंडचें लक्ष हिंदी प्रश्नाकडे वेधलें गेलें. पार्ल-मेंटांत चार्ल्स ब्रॅडलॉ, केर हार्डी यांच्यासारख्या सभासदांनीं हिंदी प्रश्नांची बाजू उचलून धरली. पार्लमेंटांत दादाभाई नौरोजींचा ठराव पास झाला. परंतु भारतमंत्र्यानें तो अव्यवहार्य आहे असें ठरवून अमलांत आणण्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाळाटाळ केली. यापुढील काळांत आणखी एक दोन वेळां सरकारनें पब्लिक सर्व्हिस कमिशनें नेमलीं व त्या कमिशननें कांहीं शिफारशीही केल्या. परंतु वरिष्ठ नोकऱ्या युरोपियनांऐवजीं हिंदी मनुष्यास देण्याबाबत इंग्रजांनीं कधींच जरूर तो उदारपणा दाखविला नाहीं. हिंदी लोकांस वरिष्ठ नोकऱ्यांतून प्रवेश न मिळाल्यामुळें त्यांची कशी कुचंबणा व निराशा होते यासंबंधींचे कळकळीचे विचार ना. गोखले यांनीं विलायतेंतील वेल्बी कमिशनपुढें बोलून दाखविले. परंतु या नेमस्त स्पष्टोक्तीचाही फारसा उपयोग झाला नाहीं.



दादाभाई नौरोजी

२१. प्लेगचा उद्भव :—एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत हिंदुस्थानवर आणखी एक संकट आलें. इ. स. १८९६ सालीं दक्षिणेंत तीव्र दुष्काळ पडला. ही दुष्काळाची आपत्ति लोकांच्या व सरकारच्या कमी-अधिक परिचयाची झाली होती. परंतु त्याच्या जोडीस इ. स. १८९६ सालीं प्लेगचा प्रादुर्भाव झाला. हा रोग फारच भयंकर होता. चीनमधून त्या काळीं आलेल्या जहाजावर धान्याच्या पोत्याबरोबर प्लेगनें दूषित झालेले उंदीर आले, त्यामुळें मुंबईत प्रथम प्लेगचा प्रादुर्भाव झाला असें म्हणतात. तें कसेंहि असो. येथें सुरू झालेला प्लेग कदाचित् युरोपांत प्रसृत होईल या भीतीनें सरकारनें अतिशय कडक उपाय योजिले. प्लेग उत्पन्न झाल्या-बरोबरच त्याचें निर्मूलन करावें असा सरकारचा हेतु होता. प्लेगनें दूषित झालेलें घर साफ धुऊन काढावयाचें, लागलेल्या इसमास सरकारी इस्पितळांत पोहोंचवावयाचें व बाकीच्यांना दूर क्वारंटाईनमध्यें राहण्याची सक्ति करून नंतर प्लेगचा प्रसार नसेल तेथें पाठवावयाचें असा प्रकार सुरू झाला. प्रथम प्रथम इनॉक्युलेशनचा उपाय यशस्वी नव्हता; अशा वेळींही कांहीं जणांवर सक्ति करण्यांत आली व घरांची पाहणी करण्याकरितां सरकारनें लष्करी शिपायांची मदत घेतली. लष्करी शिपाई बऱ्याच ठिकाणीं आडदांडपणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वागले. याचा हिंदी वर्तमानपत्रकारांनीं गवगवा केला व सरकारवर कडक टीकेची झोड उठविली. इ. स. १८९७ त प्लेगच्या बंदोबस्ताकरितां नेमलेल्या रँडसाहेबांचा पुण्यास खून झाला व इ. स. १८९८ त मुंबईस दंग्याचा प्रादुर्भाव झाला. त्याबरोबर सरकारनें देशी वर्तमानपत्रांच्या संपादकांस कडक शिक्षा केल्या व त्यांच्यावरचें नियंत्रण अधिकच दृढ केलें. अशा रीतीनें १९ व्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानांत एकच अस्वस्थता उत्पन्न झालेली होती. दुष्काळ व प्लेग यांमुळें लोक हवालदिल झाले होते, राष्ट्रीय सभेच्या दर-सालच्या बैठकीमुळें देशांत जागृति उत्पन्न झालेली होती व सरकारी दडपशाही-मुळें असंतोष उत्पन्न झालेला होता.

प्रश्न

१. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत राज्यकारभारांत इंग्रजांनीं केलेल्या सुधारणांची माहिती सांगा. २. टीपा लिहा :—(१) सिव्हिल सर्व्हिस, (२) प्लेगचा प्रारंभ व सरकारी धोरण, (३) राष्ट्रीय सभेची स्थापना.

अभ्यास

(१) वाचा :—दादाभाई नौरोजींचें एकादें चरित्र. (२) छोटीं भाषणें तयार करा. विषय :—१ आयात कराची आकारणी, २. इल्बर्ट बिल, ३. लॉर्ड मेयोनें केलेलें आर्थिक विकेंद्रीकरण.

माहितीसाठीं

दादाभाईंचीं दोन भाषणें

(लंडन येथें ईस्ट इंडियन असोसिएशनपुढें दि. २ मे १८६७ रोजीं दादाभाईंनी एक भाषण केलें आहे व त्यांनींच ३९ वर्षानंतर इ. १९०६ मध्यें कलकत्ता येथें जें भाषण केलें तें अशीं दोन्हीं भाषणें पुढें दिलीं आहेत. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणामुळें भारतांतील संतोषाचें असंतोषांत कसें रूपांतर झालें तें यावरून दिसून येईल.)

लंडन येथील १८६७ मधील भाषण:—

"ब्रिटिश राज्य येण्यापूर्वीं हिंदुस्थानांत मारामाऱ्या, कलह व गोंधळ चालू होता. आतां ब्रिटिश राज्यापासून कसे फायदे झाले तें पहा : देशांत कायदा आणि सुव्यवस्था सर्वत्र नांदत आहे. मालमत्ता सुरक्षित आहे. अधिकारी वर्ग अगदीं कार्यक्षम आहे. सर्व व्यवहारांत न्यायाचें महत्त्व मानण्यांत येत आहे. विद्यापीठांची स्थापना झाल्या-पासून आपली प्रगतीच आहे, अंधःकार नाहींसा होत आहे, रेल्वे, कालवे,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व रस्ते यांमुळें वाहतूक नीट होऊन व्यापारवृद्धि होत आहे. त्याच-प्रमाणें नवीन जागृति होत आहे."

कलकत्ता येथील राष्ट्रसभेचें अधिवेशन इ. स. १९०६. अध्यक्षीय भाषण :

"एकी करा, चिकाटी धरा आणि स्वराज्य मिळवा. यामुळें दारिद्र्य, दुष्काळ आणि प्लेग यांना बळी पडणारे आणि अर्धपोटीं राहणारे असंख्य लोक यांचें रक्षण होऊं शकेल आणि जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांत भारताला त्याचें पूर्वीचें मानाचें स्थान प्राप्त होईल.... स्वराज्य हाच मुख्य उपाय; त्यावर आपल्या आकांक्षा, सामर्थ्य आणि कीर्ति अवलंबून आहे."

भाग ३५ वा

सनदशीर चळवळीस प्रारंभ (पुढें चालू)

(इ. स. १८९९ ते इ. स. १९२०)

१. **लॉर्ड कर्झन** :—एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारतांत उत्पन्न झालेल्या अस्वस्थतेच्या काळांत लॉर्ड कर्झन हा हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला (इ. स. १८९९). तो डलहौसी व लिटन यांच्याप्रमाणें साम्राज्यवादी असून त्या दोघांप्रमाणेंच तोही लोकांमध्यें असंतोष पसरविण्यास कारण झाला. तो कर्तबगार असून त्यास कामाचा मोठा उरक असे. निरनिराळ्या खात्यांतील दोष हुडकून काढण्यास कमिशनें नेमावयाचीं व त्यांनीं केलेल्या शिफारशींस अनुसरून फेरफार करून ते दोष नाहींसे करावयाचे, हा त्याचा क्रम एकसारखा चालू होता. ह्यामुळें त्याच्या कारकीर्दींत प्लेग, दुष्काळ, पोलिस, चलनी नाणें, शिक्षण इत्यादि प्रश्नांवर कमिशनांची एकच गर्दी उसळलेली दिसते. लोकांच्या हातीं सत्ता देऊन त्यांना अनुभव घेऊं देण्यापेक्षां प्रत्येक

कर्झन

गोष्टीवर सरकारी नियंत्रण घालून सर्वत्र एकसूत्रीपणा राखावयाचा हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचें धोरण होतें व एकवार एक विवक्षित धोरण ठरल्यानंतर मग कांहीं झालें तरी तें बदलावयाचें नाहीं असा त्याचा निश्चय असे. हेंच त्याचें धोरण त्याची अप्रियता वाढविण्यास मुख्यतः कारणीभूत झालें.

२. **परराष्ट्रीय धोरण** :—वायव्य सरहद्दीच्या प्रश्नासंबंधीं त्यानें ठेविलेल्या धोरणाचें वर्णन मागें आलेंच आहे. याशिवाय त्यानें इराणच्या आखातांत इंग्रजांचें वर्चस्व स्थापन केलें. त्यानें तिबेटलाही सर फ्रॅन्सिस यंग हजबंड याच्या हाताखालीं एक शिष्टमंडळ धाडलें. परंतु रशिया व चीन या दोन राष्ट्रांनीं इंग्लंडच्या या उद्योगाविरुद्ध तक्रार केल्यामुळें शेवटीं लॉर्ड कर्झनला हें मिशन परत बोलवावें लागलें. या मिशनमुळें लॉर्ड कर्झनला प्रत्यक्ष लाभ कांहींही झाला नाहीं. व्हिन्सेन्ट स्मिथ यासंबंधीं आपल्या इतिहासांत उपरोधानें लिहितो कीं, "यंगहजबंडचें हें शिष्टमंडळ तिबेटचें बरेंच भौगोलिक ज्ञान मिळवून हिंदुस्थानांत परत आलें."

३. **देशी संस्थानें** :—लॉर्ड कर्झन यास दरबारसमारंभांची फार मोठी आवड होती. त्यानें इ. स. १९०३ च्या जानेवारीच्या १ तारखेस दिल्ली येथें एक मोठा दरबार भरविला व सर्व संस्थानिकांस निमंत्रण करून, त्यांना उद्देशून एक मोठें भाषण केलें. संस्थानिकांच्या मुलांस लष्करी शिक्षण मिळावें म्हणून 'इंपीरियल कॅडेट कोअर'ची स्थापना केली. याशिवाय संस्थानिकांशीं आपले संबंध दृढतर व्हावेत, म्हणून तो वारंवार त्यांच्या भेटीस जात असे. इ. स. १९०२ मध्यें तो स्वतः निजामाच्या दरबारीं गेला व त्याची एकान्तांत गांठ घेऊन वऱ्हाड प्रांताचा आपल्याजोगा निकाल करून घेतला.

४. **देशांतील घडामोडी** :—इ. स. १९०० सालीं पुनः या देशांत मोठा दुष्काळ पडला. प्लेगचें मानही एकसारखें वाढतच होतें व इ. स. १९०३ सालापर्यंत एकंदर ९ लक्ष मनुष्यें या रोगास बळी पडलीं. तेव्हां लॉर्ड कर्झननें प्लेग कमिशन बसवून त्याची चौकशी केली व आरंभींचे सक्तीचे उपाय बरेच सौम्य झाले. व्यापाराला उत्तेजन मिळावें म्हणून त्यानें 'व्यापार व उद्योगधंदे' असें एक निराळें खातें तयार केलें व रेल्वेची वाढ करावयाचें ठरविलें. इ. स. १९०० सालच्या दुष्काळानंतर त्या प्रश्नासंबंधीं एक कमिशन नेमलें होतें. त्या कमिशनपासून विशेष कांहीं निष्पन्न झालें नाहीं. तरी त्या प्रसंगीं रमेशचंद्र दत्त व लॉर्ड कर्झन यांच्यामध्यें जमीनमहसुलासंबंधीं मोठा वाद उत्पन्न झाला व सरकारदेणें जबरदस्त असल्यामुळें वारंवार दुष्काळ पडतो असें रमेशबाबूंनीं प्रतिपादन केलें. त्या वेळीं लॉर्ड कर्झन यांनीं स्वतः मेहनत करून ह्या त्यांच्या आक्षेपास उत्तरें दिलीं. त्याबरोबरच कालव्यांची वाढ करण्याची विस्तृत योजना आंखून त्यासाठीं जरूर तो कायदा पास करून घेतला. शेतकऱ्यांना मदत करण्याकरितां सहकारी पतपेढ्या स्थापन करण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तेजन दिलें. याशिवाय 'पुराणवस्तु संरक्षणाचा कायदा' करून त्यानें जुन्या इतिहासप्रसिद्ध ठिकाणांची डागडुजी करण्याची व्यवस्था केली. याप्रमाणें लॉर्ड कर्झननें आपल्या कारकीर्दींत अनेक कामें हातीं घेऊन त्यांची तड लाविली. ह्यांत त्याची कर्तबगारी दिसून येते यांत शंका नाहीं.

५. **युनिव्हर्सिटीचा कायदा** :—परंतु त्यानें शिक्षणाच्या बाबतींत स्वीकारलेलें धोरण बरेंच प्रतिगामी स्वरूपाचें होतें यांत शंका नाहीं. लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत हंटर कमिशन नेमलें जाऊन खाजगी शिक्षणक्रमास उत्तेजन देण्याचें धोरण ठरलें होतें. त्या धोरणास अनुसरून मध्यम व उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था सुशिक्षित लोक हिंदुस्थानांत झपाट्यानें काढूं लागले. दिवसेंदिवस देशामध्यें पदवीधरांची संख्या वाढूं लागली. खाजगी संस्थांस उत्तेजन देण्याचें हें धोरण पुढें येथवर गेलें कीं, एके काळीं सरकार स्वतःचीं शाळा-कॉलेजें लोकांच्या हातीं देण्यास तयार झालें होतें. परंतु वाढत्या शिक्षणाबरोबर देशांत जागृति, चळवळ व असंतोष जास्त वाढूं लागला. हें कर्झनसारख्या चाणाक्ष मुत्सद्द्याच्या लक्षांत आल्याबरोबर त्यानें इ. स. १९०४ सालीं युनिव्हर्सिटी कमिशन नेमलें. त्यांत एकही हिंदी सभासद नव्हता. त्या कमिशनच्या शिफारशींस अनुसरून त्यानें युनिव्हर्सिटी सेनेटमध्यें शेंकडा ऐशीं सभासद सरकारनियुक्त नेमण्याचें ठरवून युनिव्हर्सिटी म्हणजे जवळ जवळ एक सरकारी खातें करून टाकलें. त्याचप्रमाणें खाजगी शाळा व क्रमिक पुस्तकें यांजवर करडी नजर ठेवून शाळांना सढळ हातानें सरकारमान्यता देण्याचें पूर्वीचें धोरण सोडून दिलें. ह्या त्याच्या कृत्यांमुळें देशांतील सुशिक्षितांत असंतोष माजला.

६. **बंगालची फाळणी** :—परंतु लोकक्षोभाला कारणीभूत झालेलें त्याचें सर्वांत मोठें कृत्य म्हणजे बंगालची फाळणी हें होय. बंगालची लोकसंख्या त्या वेळीं ७८० लक्ष होती. एवढ्या मोठ्या प्रांताची व्यवस्था लेफ्टनंट गव्हर्नरच्या हातून नीट होत नाहीं, म्हणून पूर्वबंगाल व आसाम एकत्र करून त्यांचा एक निराळा प्रांत तयार करावा व त्याची राजधानी डाक्का ही असावी व पश्चिम बंगालची राजधानी पूर्वीप्रमाणें कलकत्ता हीच राहावी, अशी योजना त्यानें १९०५ च्या ऑक्टोबरपासून अमलांत आणण्याचें जाहीर केलें. बंगाली लोकांस हें कृत्य सर्वस्वीं नापसंत होतें. कारण नवीन पूर्वबंगाल व आसाम ह्या प्रांतांतील ३ कोटी लोकसंख्येपैकीं सुमारें १ कोटि ८० लक्ष मुसलमान व बाकीचे हिंदु होते. पूर्वी बंगाल्यांत सर्व बंगाली हिंदु एकत्र होते व त्यांच्यांत राष्ट्रीय जागृतीचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. तेव्हां नवीन केलेली ही योजना केवळ राज्यकारभाराच्या सोयीकरतां नसून राष्ट्रीय दृष्ट्या जागृत झालेल्या लोकांस फोडून अल्पसंख्याक करून टाकण्याचा हा डाव आहे असें लोकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाटलें. तेव्हां लोकांनीं अभूतपूर्व चळवळ केली, दोन हजारांवर सभा भरवल्या. पूर्वबंगालमधून सत्तर हजार सह्यांचा अर्ज पाठविला व इंग्रजी मालावर बहिष्कार टाकण्याची मोहीम जोरानें सुरू झाली. परंतु लॉर्ड कर्झननें बंगालची फाळणी वज्रलेप आहे, तींत फरक होणार नाहीं असें ठासून सांगितलें. त्यामुळें तर चळवळीस अधिकच जोर आला. लोकांचा असंतोष कांहीं केल्या कमी झाला नाहीं. शेवटीं इ. स. १९११ सालीं बादशाह पंचम जॉर्ज हिंदुस्थानांत आले, त्या वेळीं त्यांनीं बंगालची फाळणी रद्द झाल्याचें आपल्या मुखानें जाहीर केलें. सरकारशीं झगडून हिंदी लोकांनीं मिळविलेला हा पहिला विजय होय.

७. **कर्झन व किचनेर** :—याखेरीज लॉर्ड कर्झनचा तत्कालीन हिंदुस्थानचा सेनापति लॉर्ड किचनेर याच्याशीं मोठा वाद झाला. हिंदुस्थानांतील संरक्षण-विषयक प्रश्नाचें धोरण ठरविण्याचा अधिकार सेनापतीस असला पाहिजे व यासाठीं सेनापतीस हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळांत अधिकार-परत्वें हक्कानें जागा मिळाली पाहिजे असा लॉर्ड किचनेर याचा आग्रह होता. परंतु असें केल्यास हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलला सेनापतीच्या लष्करी धोरणावर व त्यासाठीं होणाऱ्या खर्चावर कांहींही नियंत्रण ठेवतां येणार नाहीं हें बरें नव्हे असें वाटून लॉर्ड कर्झननें किचनेरच्या मतास विरोध केला. अखेर हा कर्झन-किचनेर वाद भारतमंत्र्याकडे गेला असतां त्यानें किचनेरच्या बाजूनें निकाल दिला. हा अपमान सहन न होऊन लॉर्ड कर्झननें आपल्या जागेचा राजीनामा दिला (इ. स. १९०५). लष्करी धोरणाची एकंदर राज्यकारभारावर जबरदस्ती होऊं नये व लष्करी अधिकाऱ्यानें राज्यप्रमुखाच्या तंत्रानेंच चालणें इष्ट आहे या गोष्टी लक्षांत घेतां कर्झनचेंच म्हणणें देशाच्या हिताचें होतें.

वरील उद्योगावरून लॉर्ड कर्झनची योग्यता कळून येईल. कर्तबगार पण साम्राज्यवादी आणि साम्राज्यवादी म्हणून हिंदुस्थानांतील राजकीय असंतुष्टता वाढविण्यास कारणीभूत झालेला असें इतिहासकारास त्याचें वर्णन करावें लागेल.

८. **विसाव्या शतकाचा प्रारंभ** :—लॉर्ड कर्झनच्या मागून त्याच्या जागीं लॉर्ड मिंटोची नेमणूक झाली व त्याच सुमारास विलायतेंत हुजूरपक्षाच्या प्रधानमंडळाचा पराभव होऊन उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ झाला. तेव्हां लॉर्ड मोर्ले याची भारतमंत्र्याच्या अधिकारपदावर नेमणूक झाली. लॉर्ड मोर्ले हा इंग्लंडांत उत्तम लेखक व उदार धोरणाचा पुरस्कर्ता म्हणून प्रसिद्ध होता. जवळजवळ वीस वर्षांनंतर उदारमतवादी पक्ष अधिकारारूढ

२६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्यामुळें साम्राज्यवादी धोरणाचा शेवट होऊन वीस वर्षांपूर्वीं ग्लॅडस्टन-रिपन या जोडीनें हिंदुस्थानशीं जसें उदार धोरण स्वीकारलें तसें धोरण नवा अधिकारारूढ पक्षही स्वीकारील अशी बरीच आशा होती. त्याचप्रमाणें इ. स. १९०४ सालीं रशिया व जपान यांच्यांत युद्ध होऊन जपान या आशियांतील चिमुकल्या राष्ट्रानें युरोपांतील एका प्रबळ राष्ट्राचा पराभव केला. या कृत्यामुळें आशिया खंडांत नवीं जागृतीचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. आतांपर्यंत युरोपियन राष्ट्रांनीं आशियांतील देश पादाक्रान्त करावेत असा क्रम होता; तो जपाननें बदलला व आशियांतील राष्ट्रें युरोपांतील राष्ट्रांवर सरशी करूं शकतात हें सिद्ध केलें. हें पाहून हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीस अधिकच जोर आला. याप्रमाणें विसाव्या शतकाच्या प्रारंभीं शिक्षणाच्या प्रसारामुळें सुशिक्षितांच्या अंतःकरणांत महत्त्वाकांक्षेचा उदय झाला. कर्झनच्या प्रतिगामी धोरणामुळें ती दबून न जातां तिचें जोरदार चळवळींत रूपांतर झालें. जपानच्या विजयामुळें लोकांना स्फुरण चढलें व उदारपक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें पुष्कळांना आशा उत्पन्न झाली.

९. **राजकीय पक्ष**:—हिंदुस्थानांतील सुशिक्षितांत या वेळीं दोन पक्ष उत्पन्न झाले. दोन्ही पक्ष सनदशीर पद्धतीनें म्हणजे कायद्याचें उल्लंघन न करतां चळवळ करणारे होते व दोघांसही लोकप्रतिनिधींना जबाबदार अशी राज्यपद्धति स्थापन होणें इष्ट वाटत होतें. त्यांतील तरुण 'राष्ट्रीय' पक्षाचें मत असें कीं, वीस वर्षें सरकारकडे मागण्या मागून व अर्ज करून ज्या अर्थीं कांहीं हक्क प्राप्त झाले नाहींत, त्या अर्थीं एकीकडे मागण्या मागण्याचा क्रम चालू असतां दुसरीकडे देशांत जागृति उत्पन्न करून आपल्या मागणीस जोरदार पाठबळ उत्पन्न करावें विलायतच्या मालावर बहिष्कार घालून तेथील लोकांस येथील असंतोषाची आंच लावावी. परंतु 'नेमस्त' व जुन्या पक्षाचें म्हणणें असें कीं, राष्ट्रीय सभा सुरू झाल्यापासून उदारपक्ष

लो. टिळक

प्रथमच अधिकारारूढ झाला आहे. तेव्हां विरोधक चळवळीनें त्या पक्षाचा मार्ग बिकट न करतां सलोख्यास व सहकारितेस तयार होऊन सामोपचाराच्या वाटाघाटीनें जें काय कमजास्त मिळेल तें घ्यावें. कारण हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशांत क्रमाक्रमानेंच जबाबदारीचें स्वराज्य स्थापन होईल; एकदम होणार नाहीं. लो. टिळक व लाला लजपतराय हे त्या वेळीं तरुण राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख पुढारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असून नेमस्त पक्षाचें धुरीणत्व ना. गोखले, सुरेंद्रनाथ बानर्जी व फिरोजशहा मेथा यांच्याकडे असे. याबरोबर तिसराही एक पंथ देशांत होता. तो म्हणजे बंगालच्या फाळणीमुळें व दडपशाहीच्या धोरणामुळें निराश होऊन त्रस्त झालेल्या क्रान्तिकारकांचा. त्यांच्या यत्नामुळें बंगाल व महाराष्ट्र या प्रांतांतून कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांचे खून झाले (इ. स. १९०९); व ठिकठिकाणीं गुप्त कट होऊं लागले. सत्तावन सालच्या लढ्यापासून कधीं झाली नाहीं एवढी अस्वस्थता त्या वेळीं हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली होती.

ना. गोखले

१०. मोर्ले-मिंटो सुधारणा :—ह्या परिस्थितीला मोर्ले व मिंटो यांनीं मोठ्या युक्तीनें तोंड दिलें. चळवळीचा जोर लक्षांत घेऊन या वेळीं कांहीं तरी सुधारणेचे हक्क दिले पाहिजेत, असें सरकारच्या लक्षांत आलें. नेमस्त, राष्ट्रीय व क्रान्तिकारक यांच्यापैकीं नेमस्त लोक थोडेबहुत हक्क दिले असतां संतुष्ट होतील असें सरकारास वाटलें व बरीच वाटाघाट करून शेवटीं इ. स. १९०९ मध्यें कायदे कौन्सिलांची वाढ करणारा कायदा पास केला. या कायद्यान्वयें वरिष्ठ कायदे कौन्सिलांतील सभासदांची संख्या ६० पर्यंत वाढविली व प्रांतिक कायदे कौन्सिलांतील जादा सभासदांची संख्या पूर्वींहून दुप्पट करण्यांत आली. प्रांतिक कायदे कौन्सिलांत बिनसरकारी सभासदांचें (सरकारनियुक्त बिनसरकारी व निवडून आलेले बिनसरकारी मिळून) बहुमत झालें, निवडणुकीचें तत्त्व सरकारनें मान्य केलें. मुसलमानांना, बंगालच्या जमीनदारांना व अशा कित्येक महत्त्वाच्या अल्पसंख्यांक वर्गांकरितां वेगळे प्रतिनिधी राखून ठेवण्यांत आले. बिनसरकारी सभासदांस ठराव आणून ते मतास घालण्याचा हक्क मिळाला. वार्षिक अंदाजपत्रकावर कलमवार चर्चा करण्याची संधि मिळाली व फेरप्रश्न विचारण्याची परवानगी मिळाली. इ. स. १९०७ सालीं ठिकठिकाणच्या कार्यकारी मंडळांतून हिंदी सभासद नेमण्याचें ठरलें. त्याप्रमाणें इंडिया कौन्सिलांत दोन, वरिष्ठ कार्यकारी मंडळांत एक व प्रांतिक कार्यकारी मंडळांत प्रत्येकीं एक असे हिंदी सभासद नेमले. यामुळें सरकारच्या अगदीं गुप्त खलबतांत देखील हिंदी लोकांचा प्रवेश झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सुधारणांमुळें कांहीं नेमस्तांचें थोडेंबहुत समाधान झालें. परंतु कायदे कौन्सिलची हुकमत कार्यकारी मंडळावर चालत नसल्यामुळें लोकांना सरकारी कृत्यांवर टीका करण्याखेरीज कांहींच हक्क प्राप्त झाला नाहीं: उलट अल्पसंख्यांकांना वेगळे प्रतिनिधी दिल्यानें जातवार निवडणुकीचें तत्त्व सरकारनें कबूल केल्यासारखें झालें व यामुळें पुढें राष्ट्रीय हितसंबंधांस विरोध येईल अशी पुष्कळांस साधार भीति वाटली.

११. **दडपशाहीचे कायदे** :—इकडे हे हक्क देण्याची वाटाघाट चालू असतां सरकार क्रान्तिकारकांस कडक शिक्षा देऊन त्यांचा बंदोबस्त करीत होतें. राष्ट्रीय तरुणांच्या चळवळीस विरोध करण्याकरितां सरकारनें कडक कायदे पास केले.—(१) सभाबंदीचा कायदा करून मॅजिस्ट्रेटच्या परवानगीशिवाय सभा भरवूं नये असें ठरविलें. (२) राजद्रोहाच्या कायद्यांत दुरुस्त्या करून त्याची मर्यादा वाढविली. (३) वर्तमानपत्रांवर नियंत्रण घालणारा कायदा करून वर्तमानपत्रकारांकडून भराभर जामीन घेतले व कित्येक वर्तमानपत्रकारांस राजद्रोहाच्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा दिल्या. (४) समित्यांचा कायदा करून राष्ट्रीय शिक्षणाकरितां काढलेल्या शाळांना गैरकायदा संस्था ठरवून टाकलें. या सर्व कायद्यांच्या साह्यानें धरपकडीचें सत्र लॉर्ड मिंटोच्या सर्व कारकीर्दभर चालू होतें. ह्या सर्वांचा परिणाम होऊन इ. स. १९११ च्या सुमारास देशांतील बरीचशी चळवळ थंड पडली.

१२. **लॉर्ड हार्डिंज** :—इ. स. १९१० सालीं लॉर्ड मिंटो विलायतेस परत गेला व त्याच्या जागीं लॉर्ड हार्डिंज हिंदुस्थानांत आले. त्या वेळीं देशांतील चळवळ अद्याप पूर्णपणें थांबलेली नव्हती. दिल्ली येथें लॉर्ड हार्डिंज यांची हत्तीवरून मिरवणूक चालू असतां कोणी अराजकानें त्यांच्यावर बाँब फेंकल्यामुळें त्यांना जखम झाली व त्यांच्यामागें असलेला हुजऱ्या मरण पावला. परंतु लॉर्ड हार्डिंज यांनीं या अनुचित प्रकाराचा मनावर कांहीं परिणाम न होऊं देतां शांतपणें व सहानुभूतीनें राज्यकारभार चालविला. त्यांच्या धोरणामुळें कर्झनशाहीचा शेवट होऊन उदार धोरणाची सुरुवात झाली असें लोकांस वाटूं लागलें. त्यांच्या कारकीर्दींत दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा प्रश्न उद्भवला. महायुद्ध उपस्थित झालें. त्यांत तुर्कांनीं जर्मनांची बाजू घेतली. तेव्हां हिंदी मुसलमानांची मोठी नाजूक स्थिति झाली. परंतु या सर्व नाजूक व कठिण परिस्थितींत त्यांनीं हिंदी लोकांचा विश्वास संपादन केला, व शेवटीं तर ते इतके लोकप्रिय झाले कीं, त्यांच्या कारकीर्दीची इ. स. १९१५ सालीं पंचवार्षिक मुदत भरली त्या वेळीं महायुद्धाच्या समाप्तीपर्यंत त्यांची मुदत वाढवावी असा लोकांनीं अर्ज केला. उदार धोरण व लोकप्रियता या बाबतींत लॉर्ड हार्डिंज यांना लॉर्ड रिपन याच्या बरोबरीचें स्थान द्यावें लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. **दिल्ली दरबार** :—हिंदुस्थानांत सहानुभूतीचें व शांततेचें वातावरण निर्माण करण्याकरितां बादशाह पांचवे जॉर्ज हे इ. स. १९११ च्या डिसेंबरांत हिंदुस्थानांत आले. त्या वेळीं दिल्ली येथें मोठा समारंभ झाला. सर्व हिंदुस्थानांतील संस्थानिक त्या वेळीं हजर होते. त्यांना व हिंदुस्थानांतील प्रजाजनांना उद्देशून बादशाहांनीं जाहीर भाषण केलें व त्याच भाषणांत 'दिल्ली ही हिंदुस्थानची राजधानी झाली व बंगालची फाळणी रद्द झाली' अशा दोन महत्त्वाच्या गोष्टी जाहीर केल्या. एकंदरींत बादशाहांच्या आगमनामुळें हिंदुस्थानांतील अस्वस्थ वातावरण शांत होण्यास बरीच मदत झाली. दिल्ली ही राजधानी भारतांतील राजकीय परंपरेस धरून आहे. कारण इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर वगैरे जुन्या राजधान्या व खिलजी, तुघ्लुख वगैरे सुलतानांच्या राजधानीचीं ठिकाणें या प्रदेशाच्या आसमंतांत आहेत. मराठ्यांच्या काळींही सर्वांस दिल्लीचें विलक्षण आकर्षण होतें. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां दिल्ली ही राजधानी केल्याचा लोकांच्या मनावर अनुकूल परिणाम झाला यांत शंका नाहीं.

१४. **दक्षिण आफ्रिका** :—इ. स. १९१३ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा प्रश्न उद्भवला. दक्षिण आफ्रिकेंत नाताळ, ट्रान्सवाल या प्रांतांतून इंग्रज, बोअर या लोकांनीं वसाहत केलेली असून तेथील जमिनीची मशागत व मळ्यांची लागवड करण्यास ते हिंदुस्थानांतून मुदतबंदीनें मजूर नेत असत. प्रथम प्रथम कराराची मुदत पुरी झाल्यावर हिंदी लोक तेथेंच राहूं लागले व स्वतंत्रपणें उदरनिर्वाह करूं लागले. परंतु वसाहतवाल्यांस हें सहन न होऊन त्यांनीं तेथून हिंदी लोकांचें उच्चाटन करण्याचा यत्न चालविला व सर्व आशियांतील लोकांविरुद्ध कडक कायदे केले. ते त्यांना आगगाड्यांतीं प्रवास करूं देईनात, सार्वजनिक ठिकाणीं बंदी करूं लागले व त्यांच्यावर तीन पौण्डाची डोईपट्टी लादली. पुढें इ. स. १९१३ सालीं ख्रिश्चन पद्धतीशिवाय इतर पद्धतीनें झालेल्या विवाहांना मान्यता देण्याचें त्यांनीं नाकारलें. हा जुलूम पाहून तेथील रहिवाशांनीं निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ चालविली. जोहान्सबर्ग येथें बॅरिस्टरीचा व्यवसाय करीत असलेले बॅ. गांधी (महात्मा गांधी) हे त्यांचे पुढारी बनले. चळवळींत स्त्रियांनींही भाग घेतला. हिंदुस्थानांत ना. गोखले यांनीं मुदतबंदीची पद्धत बंद करण्याविषयींचें बिल आणून तें पास करून घेतलें व स्वतः शिष्टाई करण्याकरितां दक्षिण आफ्रिकेंत गेले. या वेळीं लॉर्ड हार्डिंज यांनीं मद्रास येथें जोरदार भाषण करून हिंदी लोकांचा कैवार घेतला व वसाहतवाल्यांच्या अन्याय्य कृत्यांचा निषेध केला. या सर्वांचा थोडाबहुत उपयोग होऊन डोईपट्टी रद्द झाली व विवाहनोंदणीच्या कायद्यांत दुरुस्ती झाली. अजून हें भांडण संपलेलें नाहीं.

१५. **देशांतील घडामोडी** :—इ. स. १९१३ सालीं देशांत एकच वावटळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्पन्न होऊन अनेक बँकांनीं एकामागून एक दिवाळीं काढलीं. त्या सर्वांत चुनीलाल सरैय्यां यांनीं चालविलेली स्पीसी बँक ही प्रमुख होय. चुनीलाल सरैय्या हे हिंदुस्थानांतील धाडशी व्यापारी असून त्यांनीं जगांतील चांदीची पैदास आपण विकत घेण्याचा यत्न केला. अशा रीतीनें चांदीच्या बाजारावर हुकमत मिळविल्यावर नफा मिळवावयाचा असा त्यांचा विचार होता. दुर्दैवानें त्यांचा अंदाज चुकला. तेव्हां त्या धक्क्यानें ते मृत्यु पावले व त्यांच्यामागें स्पीसी बँकेचें दिवाळें निघालें. या वेळीं सरकारनें हिंदी बँकांना कांहीं साह्य दिलें नाहीं. इ. स. १९१५ मध्यें लॉर्ड हार्डिंज यांनीं बनारस हिंदु युनिव्हर्सिटीचा पाया घातला. ही युनिव्हर्सिटी उभारण्यास मुख्यतः पंडित मदन मोहन मालवीय यांचे श्रम कारणीभूत झाले. सरकारनें स्थापन केलेल्या युनिव्हर्सिटींतून धार्मिक शिक्षणाची सोय नाहीं. तेव्हां या विश्वविद्यालयांत हिंदु संस्कृतीचा विशेष अभ्यास व्हावा या हेतूनें ह्या विश्वविद्यालयाची स्थापना झाली.*

१६. **महायुद्ध :**—इ. स. १९१४ सालीं जुलैच्या २६ तारखेस युरोपांत महायुद्ध सुरू झालें, हें युद्ध इ. स. १९१८ मध्यें संपलें. युद्धाच्या सुरुवातीसच जर्मनीनें मोठ्या धडाडीनें बेल्जम उध्वस्त करून फरान्सचा बराच भाग व्यापून टाकला व आतां पॅरिसही पडतें कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. अशा वेळेला हिंदुस्थानांतून त्वरेनें हिंदी फौज रवाना झाली व मार्न नदीवर दोस्त राष्ट्रांचें जर्मनांशीं जें निकराचें युद्ध झालें त्यांत हिंदी सैनिक शौर्यानें लढले. ऑक्टोबर महिन्यांत तुर्कस्थाननें जर्मनीची बाजू घेतली, तेव्हां युद्धाचें क्षेत्र वाढलें. तेव्हां पूर्वेकडे मेसापोटेमियांतील रणक्षेत्रावर बहुतेक हिंदी फौजाच काम करूं लागल्या.

१७. **मॉंटेग्यूचा जाहीरनामा :**—महायुद्धाच्या सुरुवातीमुळें हिंदुस्थानांत जागृति उत्पन्न झाली. चारपांच वर्षें शांत असलेली राजकीय चळवळ पुनः जोरानें सुरू झाली. महायुद्धानंतर हिंदुस्थानला कांहीं राजकीय हक्क मिळणार हें पाहून हिंदी पुढाऱ्यांनीं आपापल्या जबाबदारीच्या मागण्या तयार केल्या. इ. स. १९१६ सालीं लखनौ येथें राष्ट्रीय सभा होऊन तींत राष्ट्रीय व नेमस्त पक्ष एक झाले व सर्वांनीं आपली मागणी तयार केली. मुसलमानांनींही हिंदु लोकांच्या हातांत हात घालून चळवळ करण्यास सुरुवात केली व त्यांच्या मुस्लीम लीगनें राष्ट्रीय सभेचे ठराव पास केले. ह्या सर्वांचा योग्य परिणाम होऊन ता. २० ऑगस्ट १९१७ रोजीं सेक्रेटरी ऑफ स्टेट मि. मॉंटेग्यू यांनीं हिंदुस्थानांत क्रमाक्रमानें जबाबदारीची राज्यपद्धति प्रस्थापित करण्यांत येईल असें जाहीर आश्वासन दिलें.

* इ. स. १९२० सालीं सर सय्यद अहंमद यांच्या यत्नानें मुसलमानांनीं अलीगढ विश्वविद्यालयाची स्थापना केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. **आणीबाणीचा प्रसंग** :—तो प्रसंगच मोठा आणीबाणीचा होता. इंग्लंड युद्धाच्या धुमश्चक्रींत होतें, वसाहतींनीं तापल्या तव्यावर पोळी भाजून घ्यावी, त्याप्रमाणें इंग्लंडला एकीकडे मदत करीत असतां साम्राज्यांत आपलें स्थान अधिकाधिक महत्त्वाचें करून घेण्याची निकड लावलेली होती. आयर्लंडमध्यें तर उघड उघड बंड होऊन तें मोडावें लागलें होतें. रशियन राज्यक्रान्ति होऊन झारशाही उलथून पडली व तेथें कांहीं काळ झोटिंगशाही व नंतर लोकशाही सुरू झाली. अमेरिका युद्धांत पडलें. राष्ट्राराष्ट्रांचें स्वातंत्र्य निर्वेध राहावें म्हणून अमेरिकेनें युद्धांत उडी घेतली हें सर्वत्र महशूर होतें. इंग्लंड तर लहान लहान राष्ट्रांचें स्वातंत्र्य अबाधित राहावें म्हणून युद्धांत पडल्याचें सर्वत्र बोललें जात होतें. इंग्लंडमध्यें प्रधानमंडळांत उलथापालथ होऊन सर्वपक्षीयांचें राष्ट्रीय प्रधानमंडळ बनविण्यांत आलें होतें. इकडे हिंदुस्थानांत महायुद्धाच्या आरंभीं राजनिष्ठेची एकच लाट उसळली. हिंदुस्थाननें आपलें सैन्य व संपत्ति साम्राज्याच्या सेवेसाठीं पुढें केली व वर सांगितल्याप्रमाणें फरान्सच्या रणक्षेत्रावर ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं संयुक्त फौजांची होणारी पीछेहाट थोपवून धरण्यास हिंदी फौजांनीं साह्य केलें. काळ्यागोऱ्यांचें रक्त एकाच कारणासाठीं सांडलें. जित व जेते, काळा व गोरा, इंग्रज व हिंदी या भेदाची तीव्रता रणक्षेत्रावर सौम्य झाली व हिंदुस्थानकडे पाहण्याचा दृष्टिकोन इंग्लंडनें बदलला पाहिजे असें कांहीं उदारमतवादी इंग्रजांस वाटू लागलें. असो.

१९. **नवीन सुधारणा कायदा** :—या जाहीरनाम्यास अनुसरून नवी सुधारणांची योजना करण्यासाठीं लोकमत अजमावावें म्हणून इ. स. १९१८ सालीं मॉंटेग्यू हे हिंदुस्थानांत आले, त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड (लॉर्ड हार्डिंज हे इ. स. १९१६ च्या मार्चांत विलायतेस परत गेले.) यांच्यासह ठिकठिकाणीं हिंडून त्यांनीं हिंदी पुढाऱ्यांशीं चर्चा केली व सुधारणा बिल तयार केलें. त्यांतील बहुतेक बाबी मान्य होऊन इ. स. १९२० सालीं मॉंटेग्यू व चेम्सफर्ड यांनीं सुचविलेल्या योजनेवर आधारलेला सुधारणा कायदा हिंदुस्थानास लागू झाला.

२०. **नवीन हक्कांचें स्वरूप** :—ह्या कायद्यानें फार महत्त्वाचे फेरफार झाले. वरिष्ठ कायदेमंडळांत लोकनियुक्त प्रतिनिधींचें बहुमत उत्पन्न झालें. इतर देशांतल्याप्रमाणें वरिष्ठ कायदेमंडळाला दुहेरी स्वरूप आलें. मतदानाचा हक्क विस्तृत करण्यांत आला. अप्रत्यक्ष निवडणुकीची पद्धत जाऊन प्रत्यक्ष निवडणुकीस सुरुवात झाली. प्रांतांतून द्विदल राज्यपद्धति अस्तित्वांत आली. म्हणजे प्रांतिक खात्यांपैकीं कांहीं खात्यांची व्यवस्था पूर्वीप्रमाणें कार्यकारी सभासदांनीं पाहावी; परंतु बाकीच्या खात्यांची व्यवस्था

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांतिक कायदे कौन्सिलांत ज्या पक्षाचें बहुमत असेल त्यांपैकीं दिवाण नेमून त्यांनीं पाहावी व ते ते दिवाण कायदेकौन्सिलास जबाबदार राहावे असें ठरलें. ह्या पद्धतीप्रमाणें शिक्षण, आरोग्य, स्थानिक स्वराज्य, शेतकी व अबकारी या खात्यांची व्यवस्था दिवाणांच्याकडे आली. त्यांना 'सोपीव खातीं' असें म्हणत व सरकारकडे असलेल्या खात्यांना 'राखीव खातीं' असें म्हणत. जमीनमहसूल, न्याय, पोलिस, तुरुंग हीं खातीं राखीव ठेवण्यांत आलीं. सनदशीर चळवळीच्या पद्धतीनें स्वराज्याच्या मार्गावर हिंदुस्थाननें टाकलेलें हें पहिलें पाऊल होय.

प्रश्न

१. 'लॉर्ड कर्झन कर्तबगार असूनही हिंदुस्थानांतील असंतोष वाढविण्यास कारणीभूत झाला.'— हें विधान सिद्ध करा. २. टीपा लिहा.—(१) मोर्ले मिंटो सुधारणा, (२) वंगभंग, (३) दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोक.

अभ्यास

(१) चिंतन करा: लॉर्ड कर्झननें केलेल्या बंगालच्या फाळणीस विरोध झाला, परंतु लॉर्ड माउंटबॅटन्च्या वेळेस बंगालच्या फाळणीस लोकांनीं मान्यता दिली. (२) राजकीय पक्ष म्हणजे काय ? लोकशाहींत त्याची काय आवश्यकता आहे याची माहिती मिळवा. (३) जुन्या व नव्या हिंदी राजकीय पक्षांची माहिती मिळवा.

माहितीसाठीं

भारतमंत्र्यांचा जाहीरनामा

"ब्रिटिश सरकारचें असें धोरण आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांचें राज्यकारभाराशीं अधिकाधिक सहकार्य साधावें व या देशांतील स्वयंशासित संस्थांची क्रमाक्रमानें वाढ करीत जावी. हेतु हा कीं, त्यामुळें हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीचा उदय होण्याची तयारी व्हावी व हिंदुस्थान हें ब्रिटिश साम्राज्यांतील एकजीव घटक बनून राहावें.

"ही वाढ क्रमाक्रमानेंच करतां येईल असें ब्रिटिश सरकारचें मत आहे; व ज्या ब्रिटिश पार्लमेन्टवर हिंदुस्थानच्या शांततेची व सुरक्षिततेची जबाबदारी आहे त्या पार्लमेंटलाच ही वाढ कसकशी करावी हें ठरवितां येईल.

हें ध्येय साध्य करण्यास हिंदुस्थानांतील सर्व पक्षांच्या लोकांनीं तत्परतेनें साह्य करावें. कारण त्यांच्या साह्यावरच ह्या धोरणाचें यशापयश मुख्यत्वेंकरून अवलंबून आहे."

—२० ऑगस्ट १९१७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३६ वा

यांत्रिक युगाचा उदय व औद्योगिक क्रान्ति

१. **इंग्लंडच्या यशाचें रहस्य** :—ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यस्थापनेस इ. स. १७५७ च्या प्लासीच्या युद्धानें प्रारंभ झाला असें मानण्याची प्रथा आहे. १८५७ पर्यंत सारा भारत इंग्रजांच्या ताब्यांत आला. इंग्लंडांत या शतकांत यांत्रिक युग अस्तित्वांत आलें. हे यांत्रिक कारखाने उभारण्याकरितां इंग्लंडच्या लोकांस त्यांनीं बंगालमधून नेलेली लूट भांडवल म्हणून उपयोगी पडली असें कनिंगहॅमचें मत आहे व कारखान्यांतून माल तयार झाल्यावर तो विकतां येण्यास भारताच्या बाजाराचे दरवाजे इंग्लंडला खुले सांपडले. राज्यप्रसार व औद्योगिक क्रान्ति एकाच कालखंडांत होणें हा योग एकमेकांस पूरक झाला यांत शंका नाहीं. इ. स. १७५० पूर्वीं इंग्लंडांतही 'घरगुती धंदे' चालू असत. कापसाचें सूत कातणें किंवा लोंकरीचें कापड विणणें हा धंदा तेथील लोक हातानें करीत असत. अशा रीतीनें अठराव्या शतकापर्यंत मध्ययुगीन अवस्थेंत असलेल्या इंग्लंडमध्यें हें यंत्रयुग कसें अवतरलें व औद्योगिक क्रान्ति कशी घडून आली हें समजून घेणें आवश्यक आहे.

२. **व्यापाराची वाढ** :—युरोप-आशिया या दोन खंडांमध्यें व्यापार फार प्राचीन काळापासून चालत असे. इ. स. १४५३ सालीं तुर्कांनीं कॉन्स्टॅन्टि-नोपल शहर काबीज केल्यामुळें युरोपांतील लोकांनीं आफ्रिकेस वळसा घालून भारतास येण्याचा कसा यशस्वी प्रयत्न केला तें सांगितलेंच आहे (पृ. १५७). हे यत्न मुख्यतः पोर्तुगाल, इंग्लंड, हॉलंड या देशांनीं केले. पुढें त्यांनीं भारताशीं व्यापार करण्यासाठीं आपापल्या देशांत व्यापारी कंप-न्यांची स्थापना केली. इ. स. १६०० सालीं इंग्लंडांत ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली तो या उद्योगांतील उपक्रम होय. याच काळांत इंग्लंड, फरान्स, स्पेन इत्यादि देशांनीं अटलांटिक महासागर ओलांडून उत्तर व दक्षिण अमेरिकेंत वसाहती स्थापन केल्या व त्यांच्याशीं त्यांचा व्यापार सुरू झाला. अशा रीतीनें सोळाव्या शतकाच्या अखेरीस व्यापारास सर्वत्र उत्तेजन मिळालें.

३. **त्याचा उत्पादनावर परिणाम** :—व्यापारामुळें पदार्थांची मागणी वाढली व वाढत्या मागणीमुळें पदार्थांचें उत्पादन वाढविण्याची योजना करावी लागली. पूर्वीं इंग्लंडमध्यें फिरते व्यापारी या गांवाहून त्या गांवीं व कारा-गिराच्या घरोघर जाऊन माल गोळा करून आणीत. एवढ्यानें भागेना, म्हणून व्यापाऱ्यांनीं सर्व कारागिरांस आपल्या घरीं एकत्र आणून त्यांना कच्चा माल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व हत्यारें वगैरे उत्पादनाचीं साधनें पुरवून रोजंदारीच्या पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू केलें. अशा रीतीनें मोठ्या कारखान्यांचा जन्म झाला. यापुढें कारागिरांचें स्वातंत्र्य कमी झालें. तो मजूर बनला; पण त्याबरोबरच अनेक मजूर एकत्र आल्यानें मजुरांची संघटनाही त्यांतून पुढें निर्माण झाली.

४. **यांत्रिक शोधास उत्तेजन** :—मालाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्यावर त्यांत श्रमविभाग आला. त्यामुळें उत्पादनांचा वेग व त्यांतील कसब वाढलें. मजुरानें नित्य तीच एक गोष्ट करावयाची असल्यानें त्यासाठीं कांहीं यांत्रिक युक्ति शोधण्याकडे त्याचें लक्ष लागलें. थोड्या वेळांत पुष्कळ उत्पादन झालें म्हणजे उत्पादनाचा खर्च कमी होतो व त्यामुळें नफ्याचें प्रमाण वाढतें. या दृष्टीनें कारखान्याच्या मालकांनीं उत्पादनाचें सामर्थ्य व वेग वाढविणाऱ्या यांत्रिक शोधांस उत्तेजन दिलें. अशा रीतीनें वसाहतींमुळें व्यापार, व्यापारामुळें उत्पादनास उत्तेजन, त्यामुळें उत्पादनाचें केन्द्रीकरण, त्यामुळें श्रमविभाग, त्यामुळें वाढतें कसब व यांत्रिक शोधास उत्तेजन मिळत गेलें. वसाहती स्थापन करून आरमाराच्या सामर्थ्यावर त्यांच्याशीं दळणवळण वाढविण्यांत व त्रिखंडांत व्यापार सुरू करण्यांत इंग्लंड अग्रेसर असल्यानें इंग्लंडांतच प्रथम यांत्रिक युगाचा व औद्योगिक क्रान्तीचा उदय झाला.

५. **कापड उत्पादनांत क्रान्ति** :—इ. स. १७६६ मध्यें लँकेशायरमधील हारग्रीव्हज नांवाच्या कारागिरानें सूत कांतण्याचें यंत्र तयार केलें. या यंत्रावर एकच मनुष्य अनेक चात्या एकदम चालवूं शके व ८ माणसें काढतील इतकें सूत तो एकटा काढूं लागला. इ. स. १७६९ त आर्कराइट यानें यांत आणखी सुधारणा केली. त्यानें आपल्या कारखान्यांत अशीं यंत्रें पाणचक्कीवर चालविण्यास सुरुवात केली व त्यावरील सूत मजबूत निघण्याचीही त्यानें योजना केली. यापुढें सूत इतकें निघूं लागलें कीं विणकऱ्यांना सूत स्वस्त व पाहिजे तितकें मिळूं लागलें. १७८५ त कार्टराइटनें यंत्रशक्तीनें चालणारा माग शोधून काढला. यामुळें थोड्या माणसांच्या साह्यानें पुष्कळ कापड तयार होऊं लागलें.

६. **बाष्पशक्तीचा शोध** :—याच काळांत खनिज द्रव्यापासून लोखंड तयार करण्यास दगडी कोळशाचा उपयोग होऊं शकतो असा शोध लागला. इंग्लंड हें दगडी कोळशाचें आगर असल्यानें तेथें लोखंड तयार करण्याचा धंदा भरभराटीस आला. जेम्स वॅट या यंत्रज्ञानें बाष्पशक्तीनें चालणाऱ्या यंत्रांत फार मोठी सुधारणा केली. यापूर्वीं वाफेच्या इंजिनाचा उपयोग खाणींतील पाणी वर काढण्यासाठीं करीत असत; परंतु १७९० नंतर सूत काढण्याचीं व कांहीं वर्षांनीं कापड विणण्याचीं यंत्रें बाष्पशक्तीवर सुरू झालीं. आतां गरजेपेक्षां उत्पादन अधिक होऊं लागलें. तयार माल वाहून नेण्यास कालव्यांचा उपयोग करीत व जहाजांतून तो परदेशांत पाठविला जाई. या वेळीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



हारग्रीव्हचा चरखा



यंत्रानें विणणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यू कॅसल गांवाजवळ जॉर्ज स्टीफन्सन नांवाचा मुलगा एका खाणींत आपल्या बापाच्या हाताखालीं काम करीत असे. त्यानें बाष्पशक्तीच्या जोरावर खाणींतील कोळसा गाडीनें वर ओढून घेण्याची युक्ति शोधून काढली. या गाड्यांसाठीं रूळ वसविल्यास गाड्या वर ओढून घेणें सोपें जाईल हें त्याच्या लक्षांत आलें. याच यंत्राच्या सारखीं यंत्रें गाडीला जोडून लोहमार्ग तयार



स्टीफन्सनचें रॉकेट

करून त्या मार्गावरून माल व प्रवासी यांची वाहतूक करणारी पहिली आगगाडी इ. स. १८२५ त तयार झाली व तिनें स्टॉक्टन ते डार्लिंग्टनपर्यंत प्रवास केला. स्टीफन्सनच्या एंजिनाचें नांव 'रॉकेट' असें होतें. इ. स. १८३० सालीं मँचेस्टर ते लिव्हरपूल या मार्गावर लोखंडी रस्ते तयार झाले. पुढील कांहीं वर्षांत देशभर लोहमार्गाचें जाळें पसरलें.

७. आगबोटी व इतर शोध :—परदेशांतून माल जहाजांतून न्यावा लागे. हीं जहाजें पूर्वीं शिडांत वारा भरून त्याच्या जोरावर व वल्हीं मारून चालत. इ. स. १८०२ मध्यें आगबोटीचा शोध लागला व अटलांटिक महासागर तरून जाणारी पहिली आगबोट इ. स. १८१९ त अमेरिकेहून इंग्लंडला आली. या पुढील २०–२५ वर्षांत समुद्रावरील वाहतूक सर्रास आगबोटीनें सुरू झाली. विजेच्या द्वारां बातमी पाठविण्याचा शोध १८४६ त लागला. कापडाच्या धंद्यांत ज्याप्रमाणें हारग्रीव्ह, आर्कराइट यांच्या शोधानें क्रान्ति झाली त्याप्रमाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आगगाड्या–आगबोटी–तारायंत्रें यांच्या शोधामुळें दुर्गम डोंगर, अरण्यें, व महासागर थोड्या वेळांत ओलांडणें शक्य झालें. इ. स. १८६९ त सुएझच्या कालव्यावरून वाहतूक सुरू केल्यानें पूर्वेकडील देश इंग्लंडच्या अधिक जवळ आले. कारण आफ्रिकेला वळसा घालण्यांतील काळ व श्रम त्यामुळें वांचले.

८. **औद्योगिक क्रान्तीचे परिणाम** :——या औद्योगिक क्रान्तीनें मनुष्याचें जीवन सुखी झालें असें आज दिसतें; पण औद्योगिक क्रान्तीच्या सुरुवातीस म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं इंग्लंडांत लोकांचे फार हाल झाले. एकतर यंत्रानें मालाचें उत्पादन झाल्यामुळें एक माणूस अनेक माणसांचें काम करूं लागला व त्यामुळें बाकीच्यांवर बेकारीचा प्रसंग आला. यंत्रानें उत्पादन झाल्यावर पदार्थ स्वस्त होतो, स्वस्ताईनें मालाची मागणी वाढते, मागणी वाढल्यानें उत्पादन वाढतें व वाढत्या उत्पादनास जास्त माणसें लागतात. अशा रीतीनें एकदां बेकार झालेलीं माणसें पुनः कामांत गुंतलीं जातात. हें सर्व तात्त्विक दृष्ट्या व तार्किक दृष्ट्या खरें असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत सर्वच बेकारी एकदम दूर होते असें नाहीं. बेकारीमुळें कामाचे तास वाढले, मजुरीचे दर कमी झाले व बेकार माणसांना पोसण्यासाठीं सरकारनें जो गरिबांचा कायदा केला त्यामुळें रयतेवर कराचा बोजा जास्त वाढला. तसेंच यांत्रिक उत्पादनास कोळसा व लोखंड यांची आवश्यकता असल्यानें ते जिन्नस जेथें विपुल तेथें उत्पादनकेन्द्रें वाढूं लागलीं. इंग्लंडचा उत्तर व पश्चिम भाग लोखंड व कोळसा इत्यादींनीं जसा समृद्ध आहे तसा पूर्व-दक्षिण भाग नाहीं. यामुळें त्या भागांत कारखाने वाढून लोकवस्ती तिकडे जाऊं लागली. तसेंच जेथें कारखाने मोठ्या प्रमाणावर होते तेथें नजीकच्या खेड्याचे लोक साहजिकच काम मिळवण्यासाठीं धांव घेत. त्यामुळें कित्येक खेडीं ओस पडून शहरची वस्ती दाट झाली व तेथें राहण्यास घरें पुरेनात. घरांच्या चाळी झाल्या. माणसें खुराड्यांत राहूं लागलीं व त्यांचें जीवन खूप काम, कमी वेतन, पुष्कळ कर व घाणेरड्या जागेंत वस्ती यामुळें नकोसें झालें. किती लहान वयाच्या मुलांना कारखान्यांत किती वेळ कामाला लावावें याला कांहीं मर्यादाच नव्हती. आठ आठ वर्षांचीं मुलें चौदा चौदा तास काम करीत. सर्वत्र चढाओढीचें वर्चस्व असल्यानें शरीराचे अवयव बधिर होईपर्यंत वेगानें काम करून किंवा मजुरांकडून करवून घेऊन व त्यास कमी मजुरी देऊन माल स्वस्त करून प्रतिपक्षावर मात करावयाची अशी यांत्रिक युगानें मानवी जीवनांत उत्पादनाची शर्यत उत्पन्न केली. त्यांत कांहीं थोड्या भांडवलवाल्यांस सुख झालें असलें तरी गरिबांच्या दुःखास पारावार राहिला नाहीं. या सर्व दगदगीच्या जीवनाचें करुणरसपूर्ण चित्र चार्ल्स डिकन्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या इंग्लिश कादंबरीकारानें डेव्हिड कॉपरफील्ड या कादंबरींत फार चटकदार रीतीनें रंगविलें आहे.

९. **खुल्या व्यापाराचा आग्रह** :—पण दुःखपरंपरेची चक्रापत्ति एवढ्यानें संपली नाहीं. मजुरांची मजुरी कमी झाल्यामुळें त्यांची पदार्थ विकत घेण्याची शक्ति कमी झाली. उलट नफ्यामुळें भांडवलदारांच्या हातीं पैसा खेळूं लागला. हाच पैसा इंग्रज भांडवलदारांनीं हिंदुस्थानांत बंगालमध्यें पाटाच्या धंद्यांत, आसामांत चहाच्या मळ्यांत व या देशांत सर्वत्र आगगाड्या सुरू करण्यासाठीं गुंतविण्यांत आला; घरच्या बाजारांत खपवून उरणारा माल विकण्यासाठीं बाहेरच्या बाजारपेठेची आवश्यकता उत्पन्न झाली. हिंदुस्थानशीं खुला व्यापार करण्याची व इंग्लिश माल येथील बाजारांत खपविण्याची जी धडपड एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांनीं चालविली होती त्याचें कारण हेंच होय.

१०. **त्याचा भारतावर परिणाम** :—याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. म्हणजे हिंदुस्थानांतून विलायतेला कापड जात होतें, तें आतां विलायतेंत तयार झालेलें कापड हिंदुस्थानांत येऊं लागलें. यंत्रांनीं मोठ्या प्रमाणावर तयार झालेल्या मालाबरोबर हिंदुस्थानांतील मालास टक्कर देतां येईना व चाकू, कातऱ्या, कापड, असे विलायतेचे हरएक जिन्नस हिंदुस्थानांत जोरानें खपूं लागले. या सर्व प्रकारास रेल्वेच्या प्रसारामुळें अधिकच मदत झाली. परदेशचा पक्का माल हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांपर्यंत पोहोंचला व तेथील कच्चा माल किनाऱ्याकडे आणून परदेशी पाठविण्याची सोय झाली. खेडेगांवचें स्वावलंबित्व नष्ट झालें. तेथील कारागिरीचे धंदे परदेशी वस्तूंच्या आयातीमुळें साफ बुडाले व त्या त्या धंद्यांवर चरितार्थ चालविणाऱ्या लोकांचे चरितार्थाचें साधन नाहींसें होऊन ते निरुपाय झाल्यामुळें शेतकीवर उदरनिर्वाह करूं लागले. परंतु शेतकीवरही सर्वांचें कसें भागणार हा प्रश्न होताच. अठराव्या शतकाच्या शेवटीं व एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश कसा बनला याचा थोडक्यांत इतिहास हा असा आहे.

११. **इंग्लंडमधील जीवन** :—औद्योगिक क्रान्तीमुळें इंग्लंडांत निर्माण झालेल्या दुःखमय समाजजीवनांत हळके हळके सुधारणा होत गेली. कोणीं भूतदयेनें प्रेरित होऊन याविरुद्ध हांकाटी चालविली. रॉबर्ट ओवेन यानें स्पर्धा नको सहकार्य हवें असा आग्रह धरला व उत्पादनांतील चढाओढीस मर्यादा घालण्याचा यत्न केला. उत्तरोत्तर 'फॅक्टरी ॲक्टस्' पास होऊन कायद्यानें मजुरांच्या कामाचे तास मर्यादित केले. इतकेंच नव्हे तर पुढें पुढें मजुरांना वृद्धपणीं पेन्शन देण्याची योजना विसाव्या शतकाच्या प्रारंभीं लॉइड जॉर्जनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. या सर्व गोष्टींत इंग्लंडला यश आलें व भांडवलशाही तेथें जाचक झाली नाहीं याचें मुख्य कारण इंग्रजी मालाला सर्व ब्रिटिश साम्राज्यभर गिऱ्हाइक मिळालें, भांडवलास वाव मिळाला व इंग्रज कामगारास साम्राज्यभर भारी पगाराच्या जागा मिळून सर्वत्र कर्तृत्वास वाव मिळाला हें होय. औद्योगिक क्रान्ति व राजकीय साम्राज्य यांची परस्परास पोषक युती इंग्लंडला सबंध एकोणिसाव्या शतकांत व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मोठी उपकारक झाली.

१२. **भारतांतील नवी राजवट** :—भारतांत मात्र एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत वर सांगितलेला अवनतीचा क्रम थोड्याबहुत फरकानें तसाच चालू राहिला. हिंदुस्थानांतील बहुतेक राज्यें खालसा झाल्यामुळें राजे लोक व त्यांच्या भोवतालचे सरदार हा समाजांतील वर्ग कमी झाला व त्यांच्या-मुळें येथील कारागिरांस मिळणारें उत्तेजन कमी झालें. नवीन राज्यकर्त्यांची आवड निराळी; त्यांच्या आवडीचे जिन्नस त्यांच्या देशांतून त्यांना सहज मिळत. त्याचप्रमाणें इंग्रजी शिकलेल्या लोकांचा जो नवीन सुशिक्षित वर्ग उत्पन्न झाला त्यासही इंग्रजी वळण लागलें असल्यामुळें देशी कारागिरांस त्यांच्यापासून उत्तेजन मिळेल असा संभव नव्हता. सारांश, देशांतील कच्च्या मालाची निर्यात व परदेशच्या पक्क्या मालाची आयात हा क्रम चालू राहिला व शेतीवर पोट भरणाऱ्यांची संख्या एकसारखी वाढूं लागली.

१३. **शेतकऱ्यांचे हाल** :—नवीन स्थापन झालेल्या इंग्रजी राज्यांत जमिनीचा सारा निश्चित झाला. तो पैशाच्या रूपानें वसूल होत असे. पूर्वी साऱ्याचें मान पीकपाण्याच्या कमीजास्तपणावर कमीजास्त होई. आतां तशी स्थिति राहिली नाहीं. सारा वेळेवर भरण्यासाठीं रोकडीची गरज भासूं लागली. त्यासाठीं ठरल्यावेळीं येईल त्या किंमतीस पीक विकावें लागे; किंवा शेतकरी सावकारापासून कर्ज घेऊन सरकारदेणें भागवीत असे. रोखीच्या जरुरीमुळें ज्या पिकांना रोख किंमत अधिक येईल त्यांचें उत्पादन शेतकरी करूं लागला. पूर्वी खेडेगांवचा शेतकरी आपल्या गांवासाठीं धान्य उत्पन्न करी. आतां गांवाची पर्वा न करतां रोकड हातीं येण्यासाठीं शेतकरी रोखीच्या पिकांचें उत्पादन करूं लागला. परदेशांतून होणाऱ्या कच्च्या मालाच्या मागणीमुळें या प्रकारास आणखी उत्तेजन मिळालें. पूर्वी शेतकरी कर्जबाजारी झाल्यास गांवपंचायती त्याची कांहीं मुदत धरून सावकारास भीड घालीत. परंतु ब्रिटिश रियासतींत सरकारी कोर्टांत अशा प्रकारचा लवचिकपणा नव्हता. यामुळें सावकारास त्याचा पैसा व्याजासकट वसूल करून मिळे. नाहींतर शेतकऱ्याची जमीन त्याच्या ताब्यांत येई. अशा रीतीनें नवी सारापद्धति व नवीं न्यायकोर्टें हीं तात्त्विक दृष्ट्या कदाचित्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्दोष असलीं, तरी त्यांचा शेतकरी जीवनावर अनिष्ट परिणाम झाला. खडेगांवाचा संघटितपणा नाहींसा झाला व पूर्वीच्या ग्रामसंस्था नष्ट झाल्या.

१४. **खुल्या व्यापाराचें तत्व** :—इंग्लंडखेरीज इतर देशांनींही हिंदुस्थानशीं व्यापार करून येथील कच्च्या मालाची निर्यात व पक्क्या मालाची आयात करण्याचा क्रम चालू ठेवला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत युरोपांतील जर्मनी, फरान्स, ऑस्ट्रिया यांसारखीं राष्ट्रें व आशियांतील जपानसारखीं राष्ट्रें इंग्लंडच्या मानानें त्यांची झालेली पीछेहाट भरून काढण्याच्या मार्गांत होतीं व त्या त्या देशाच्या सरकारनें तेथील लोकांस हरएक उपायांनीं उत्तेजन दिलें व त्यामुळें त्यांचे उद्योगधंदे उदयास आले, तेव्हां तीं राष्ट्रें हिंदुस्थानशीं व्यापार करूं लागलीं. हिंदी उद्योगधंद्यांच्या बाबतींत १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत सरकारनें पूर्ण तटस्थ वृत्ति सोडली नाहीं व व्यापाराकरितां सर्वांसच हिंदुस्थानचे दरवाजे खुले करून ठेवले होते. ही तटस्थ वृत्ति व हा खुला दरवाजा परकीय देशांस हिंदुस्थानचें गिऱ्हाईक काबीज करण्याला मोठा उपयोगी पडला. जर्मनीनें हिंदुस्थानचा निळीचा व्यापार बसविला. कांच व काडयाच्या पेटचा ऑस्ट्रिया व जपानमधून येऊं लागल्या व बेल्जममधून कागद आला. यंत्रें पुरविण्याच्या बाबतींत प्रथम इंग्लंड अग्रेसर होतें; परंतु पुढें तेंही स्थान जर्मनीनें पटकावलें व कापडाच्या बाबतींत इंग्लंडच्या बरोबरीनें जपाननें चढाओढ चालविली. अशी ही पहिल्या महायुद्धाच्या अखेरीपर्यंतची भारतीय आर्थिक संक्रमणाची हकीकत आहे.

१५. **जपानचा उदय** :—या नवीन यांत्रिक युगाशीं समरस होऊन पाश्चात्य राष्ट्रांची बरोबरी करणारा आशिया खंडांतील पहिला देश जपान होय. हिंदुस्थान व जपान यांचा संबंध फार प्राचीन काळीं आला. कनिष्काच्या वेळीं बौद्ध धर्माचा प्रसार या देशांत झाला. कित्येक शतकें तेथें परकीयांना येण्यासही बंदी होती. इ. स. १८६८ मध्यें तेथें मुत्सीहीतो याची राजवट सुरू झाली. त्याच्या कारकीर्दींत जपान देशांत क्रान्ति होण्यास प्रारंभ झाला. इंग्रजांकडून आगगाडचा व तारायंत्रें त्यांनीं उभारून घेतलीं. फ्रेंचांकडून अद्ययावत् सैन्य शिकवून घेतलें. एवढचावरच न थांबतां जपानी लोक परदेशांत जाऊन या विद्या शिकून आले. जहाजाची बांधणी, मोटारी तयार करणें, रासायनिक द्रव्यें करणें या विद्या शिकण्यासाठीं जपानी तरुण इंग्लंड, अमेरिका, जर्मनी इत्यादि देशांतून गेले व कोणतीही नवी वस्तु पाहिली कीं त्याची हुबेहूब नक्कल कमी किंमतींत करून देण्याबाबत जपाननें आघाडी मारली जपानमध्यें कापड व यांत्रिक मालाचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर व स्वस्त होऊं लागलें. त्यासाठीं त्यांनाही बाजारपेठ शोधावी लागली व जवळच्या चीन-मांचुरियावर जपानची नजर गेली. या प्रगतीच्या काळांत रशिया व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जपानचें युद्ध उद्भवलें व त्यांत रशियाचा जपाननें पोर्ट आर्थर येथें मोठा पराभव केला (१९०४). यामुळें पौर्वात्य राष्ट्रांना आनंदीआनंद झाला. आपल्या देशांत जपानच्या अभिनंदनार्थ लोकांनीं सभाही भरविल्या. आपण नाहीं तरी आपल्या खंडांतील एका राष्ट्रानें युरोपांतील देशाचा पराभव केला ह्याचें भारतीयांना कौतुक वाटलें. जपाननें या रीतीनें जी यांत्रिक व राजकीय प्रगति केली तिचा राष्ट्रजागृतीच्या दृष्टीनें भारतीयांवर फार अनुकूल परिणाम झाला.

१६. **भारतांत स्वदेशी चळवळ** :—भारतामध्यें इ. स. १९०६ सालीं या जागृतीला कॉंग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनांत वाचा फुटली. इंग्लंड हें व्यापारी राष्ट्र आहे. त्याला वठणीवर आणावयाचें तर तेथून येणाऱ्या जिनसांवर बहिष्कार घालावा व स्वदेशी वस्तू वापराव्या असा विचार उत्पन्न झाला. स्वदेशांत झालेली वस्तु महाग असली किंवा कमी दर्जाची असली तरी ती घ्यावी अशा शपथा या काळांत अनेक युवकांनीं घेतल्या. या चळवळीनें स्वदेशी उद्योगधंद्यास उत्तेजन मिळालें. भारतांत कापडाच्या गिरण्या निघालेल्याच होत्या. त्यांतून निघालेलें ओबडधोबड कापड लोक स्वदेशीच्या अभिमानानें घेऊं लागले. इंग्लंडच्या स्वस्त व सुबक मालापुढें या गिरण्यांचा टिकाव लागला नसता; पण स्वदेशी चळवळीनें या धंद्याला साह्य केलें. याच कालांत पैसाफंडाच्या साह्यानें हिंदुस्थानांतील कांचेचा धंदा ऊर्जित दशेस आला, त्याचाही उल्लेख केला पाहिजे.

१७. **ऊर्जितावस्थेचीं चिन्हें** :—इंग्लंडांतून मालाची आयात होत असतां कांहीं गोष्टी भारतास अनुकूल झाल्या. एकतर कापसासारखा आवश्यक माल अमेरिका किंवा भारत यांच्याकडूनच इंग्लंडला घ्यावा लागे, यामुळें कच्च्या मालाला जगाच्या बाजारांत जोराची मागणी आली; त्यास चांगली किंमत येऊं लागली व ती निपज करण्याकरितां पुष्कळ लोकांची जरूर लागूं लागली. तसेंच मुंबईच्या गुजराथी लोकांनीं विलायतची यंत्रसामग्री येथें मागवून गिरण्या उभारल्या. पहिली कापडाची गिरणी इ. स. १८५१ त निघाली व तेव्हांपासून मुंबईचा कापडाचा धंदा नांवारूपास येऊं लागला. तरीसुद्धां सरकारनें इंग्लिश व्यापाऱ्यांच्या तक्रारींकडे लक्ष देऊन आयात मालावरील जकात कशी काढून टाकली तें मागें सांगितलेंच आहे. ह्या प्रकारामुळें नांवारूपास येत चाललेला कापडाचा धंदाही खुल्या व्यापाराच्या नांवावर बुडाला असता, परंतु मुंबईच्या व्यापारी वर्गाच्या हिंमतीमुळें व स्वदेशी चळवळीमुळें तो टिकून राहिला. आज देशांत ४०० च्यावर कापडाच्या गिरण्या आहेत. त्यांत एकंदर पांच लक्षांवर लोक काम करीत आहेत व त्यांतून ४८० कोटींच्यावर कापड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघतें. याखेरीज सुमारें २०० कोट वार कापड हातमागावर तयार होतें. हिंदी कापडास आज शेजारच्या देशांतून बरीच मागणी आहे.

१८. **संरक्षक जकातीचें धोरण** :—नुसत्या स्वदेशी चळवळीनें कापडाचा धंदा ऊर्जितावस्थेस आला हें खरें नाहीं. गेल्या महायुद्धांत जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे देशांतील जिन्नस येण्याचें बंद झाल्याबरोबर जी महागाई झाली तीमुळें सरकारचें लक्ष उद्योगधंद्यांच्या प्रश्नाकडे लागलें; तरीही प्रथम खुल्या व्यापाराचें तत्त्व न सोडतां सरकारनें उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याचा यत्न केला. परंतु तो व्यर्थ जाणार हें जवळजवळ निश्चित होतें. कारण हिंदुस्थानांत नवीन अस्तित्वांत येणाऱ्या उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळण्यास व परदेशच्या मालाशीं टक्कर देण्याजोगें सामर्थ्य येण्यास त्यांस प्रथम संरक्षण देणें जरूर होतें व त्यासाठीं परदेशच्या मालावर जकात लादणें हा एकच उपाय होता. इ. स. १९२२ सालीं यासंबंधीं विचार करण्याकरितां नेमलेल्या कमिशननेंही तीच शिफारस केली. शेवटीं हिंदी लोकमतास मान देण्यासाठीं सरकारनें खुल्या व्यापाराचें धोरण सोडून देऊन संरक्षक धोरणाचा अंगीकार केला. तसेंच सरकारास जरूर लागणारा माल शक्य तोंवर हिंदी कारागिरांकडून घ्यावा असें सरकारनें ठरविलें. विलायतेंत भारतातर्फे स्वतंत्र हायकमिशनरची नेमणक झाली व प्रांतांप्रांतांतून औद्योगिक खात्यांची स्थापना झाली. या सर्वांचा दृश्य परिणाम म्हणजे गेल्या वीस वर्षांत देशांत पोलाद, सीमेंट, साखर ह्यांचे अनेक कारखाने निघाले व कापडाचा धंदाही जपानी चढाओढींतून बचावला.

१९. **टाटांची कामगिरी** :—भारताच्या अर्वाचीन औद्योगिक इतिहासांत सर जमशेटजी टाटा यांचें स्थान फार मोठें आहे. इ. स. १८३९ त त्यांचा गुजराथेंत नवसारी येथें जन्म झाला. मोठेपणीं ते व्यापारासाठीं मुंबईंत आले व प्रथम त्यांनीं कापडाच्या धंद्यांतच लक्ष घातलें. हिंदी गिरण्यांतून लांब धाग्याचें सूत निघत नसे, हें पाहून त्यांनीं नागपूर शहरीं आपल्या गिरणींत लांब धागा निघण्यास अनुकूल अशी हवामानाची व्यवस्था केली व तींत यश मिळविलें. त्यांचें पोलादाच्या धंद्याकडे लक्ष होतें व त्यासाठीं त्यांनीं तयारीही चालविली होती, पण ती पुरी होण्यापूर्वींच ते इ. स. १९०४ सालीं वारले. पण त्यांच्या मुलांनीं बंगाल प्रांतांत साकची येथें पोलादाचा कारखाना काढला. साकचीस आज जमशेदपूर हें नांव आहे. नवीन निघालेला हा पोलादाचा कारखाना परदेशी व्यापाऱ्यांच्या चढाओढींत टिकला असता कीं नाहीं याची शंका आहे. पण गेल्या महायुद्धांत परदेशाहून माल येईना, व सरकारास पोलादी माल लागूं लागला. तेव्हां या धंद्यास बरे दिवस आले. पुढें महायुद्ध संपल्यावर वर सांगितल्याप्रमाणें सरकारनें संरक्षक जकातीचें धोरण स्वीकारलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व इ. स. १९२४ सालीं परदेशी पोलादाच्या आयातीवर ३३ टक्के जकात बसविली. टाटांच्या कारखान्यांत मोठे लोखंडी पत्रे, तुळया, रूळ, नांगर वगैरे हरएक प्रकारचे जिन्नस तयार होतात. याच काळांत महाराष्ट्रांत श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनीं लोखंडी मालाचा कारखाना काढला. तोही आज नांवारूपास आलेला आहे. टाटा कंपनीनें याखेरीज खंडाळ्या-नजीक सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पाणी अडवून त्याच्या साह्यानें खोपोलीस वीज उत्पन्न करण्याची योजना आखून ती यशस्वी केली आहे. या विजेवर हल्लीं मुंबईच्या गिरण्या चालतात. याखेरीज टाटांनीं मुंबईचें ताजमहाल हॉटेल श्रीमंत लोकांसाठीं आदर्श पद्धतीनें चालविलें असून, खोबरेल तेल आणि साबण वगैरेचे कारखानेही काढले आहेत.

२०. **पाटाच्या गिरण्या** :—पाटाची निपज जगांत बंगालखेरीज इतरत्र कोठेंच होत नाहीं. कलकत्त्यास पहिली गोणपाट तयार करण्याची गिरणी इ. स. १८५४ त निघाली. आज या देशांत सुमारें ९९ गिरण्या असून त्यांत अडीच लक्ष लोक काम करीत आहेत. इंग्रजी राज्याचा आरंभ बंगाल्यांत झाल्यामुळें तेथें त्यांचें बस्तान बसलें व त्यामुळें तेथें पाटाच्या गिरण्या युरोपियन भांडवलवाल्यांनीं काढल्या व चालविल्या. या धंद्यांतील उत्पादक संघटित असल्यामुळें मालाच्या मागणीप्रमाणें उत्पादन कमजास्त करून ते धंदा व्यवस्थित रीतीनें चालवितात.

२१. **साखरेचें उत्पादन** :—इ. स. १९२८–२९ पर्यंत या देशांत साखरेचें फारसें उत्पादन होत नसे व परदेशांतून सुमारें १८ कोट रुपयांची साखर येई. इ. स. १९३२–३३ सालीं साखरेच्या धंद्यास प्रथम संरक्षण मिळालें; तेव्हां-पासून साखरेच्या कारखानदारांनीं पुढील पांच सहा वर्षांत साखरेचें उत्पादन दीड लक्ष टनावरून साडेदहा लक्ष टनांपर्यंत आणून ठेवलें. गेल्या महायुद्धांत तर बाहेरच्या साखरेची आयात होणें शक्य नसल्यानें या धंद्यांस आयतेंच आणखी संरक्षण मिळालें. सध्या बिहार व मुंबई प्रांतांत हे कारखाने चालू आहेत. साखरेचा धंदा आतां या देशांत स्थिर झाला असून ती वाजवी किंमतीनें गिऱ्हाइकांस पुरेशा प्रमाणांत कशी मिळेल हा आतां महत्त्वाचा प्रश्न आहे.

२२. **मोठ्या धंद्यांचें समालोचन** :—वर निर्दिष्ट केलेल्या धंद्यांखेरीज कांच, कागद, सीमेन्ट इत्यादि वस्तूंचें उत्पादन या देशांत मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे. आतां भारत हा पूर्वीप्रमाणें नुसता कच्च्या मालाचें उत्पादन करणारा देश राहिलेला नाहीं. हरएक पक्क्या मालाचें येथें उत्पादन होतें. ही स्थिति बदलण्याचें एक कारण संरक्षक जकाती होत. पण त्याखेरीज दोन जागतिक महायुद्धांचा या देशांतील उत्पादनास फायदा झाला यांत शंका नाहीं. महायुद्धामुळें परदेशी मालाची आयात बंद होई व येथील सरकारास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मालाची गरज लागे, यामुळें येथील उत्पादनाचा बस बसत गेला. आतां येथील उद्योगपती अनुभविक व कसलेले असून त्यांना आलेल्या संधीचा फायदा घेतां येतो. पूर्वी ब्रिटिश अमलांत संरक्षक धोरण अंमलांत आल्यावरही इंग्लंडच्या हितास अनुसरून सरकार चलनविषयक धोरणांत कांहीं फरक करी व अप्रत्यक्षपणें धंद्यास पुरेसें संरक्षण मिळूं देत नसे. तसा कांहीं प्रकार आतां स्वातंत्र्यकालांत राहिलेला नाहीं. यापुढें भारतांत हिंदी कारागीर शिकून तयार व्हावे आणि त्यांनीं नुसता पक्का माल तयार करण्यापेक्षां रासायनिक द्रव्यांचें व यंत्रांचें उत्पादन करावें या गोष्टींकडे धंदेवाल्यांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे.

२३. **मजुरांची संघटना** :—इतर सुधारलेल्या देशांतील सरकारांप्रमाणें येथील सरकारनेंही मजुरांचे कामाचे तास, स्त्रिया व मुलें यांस आवश्यक असणाऱ्या सवलती यासंबंधींचे नियम केले असून कारखान्यावरील निर्बंधांची अंमलबजावणी होते कीं नाहीं हें पाहण्यासाठीं फॅक्टरी इन्स्पेक्टर्स नेमले आहेत. मजुर वर्गही या देशांत संघटित झाला आहे. पहिली मजुरांची संघटना इ. स. १८८१ त नारायण लोखंडे यानें मुंबईंत केली. परंतु इ. स. १९१८ पर्यंत मजुरांच्या संघटना बहुधा सामाजिक कार्यकर्त्यांकडून चालविल्या जात. इ. स. १९२० नंतरच्या काळांत पदार्थांच्या किंमती चढल्या, त्या प्रमाणांत मजुरीचे दर वाढले नाहींत म्हणून मजुरांनीं आपली संघटना करून संपाचें शस्त्र उगारलें. पुढें राजकीय घटनेनें मजूरसंस्थांस कायदेमंडळांत जागा मिळाल्यानें त्यांचें महत्त्व वाढलें. आज देशांत सुमारें दोनशेंवर मजूर संघटना आहेत. मजूर मालकांत तंटा होऊन मजुरांनीं संपावर जाण्यापेक्षां मजूर मालकांचें एकमेकांशीं सामोपचाराचें बोलणें होऊन संपाचा प्रसंगच होतां होईतों येऊं देऊं नये असें एका पक्षाचें म्हणणें असून दुसऱ्या पक्षास त्यांचें म्हणणें मान्य नाहीं. कारखान्यांची मालकी खाजगी स्वरूपाची असेपर्यंत मजुरांच्या पदरांत त्यांच्या श्रमाचें पुरें श्रेय पडणार नाहीं असें त्या पक्षाचें म्हणणें आहे. मजुरांच्या पुढाऱ्यांत श्री. नारायण मल्हार जोशी हे सर्वांच्या आदरास पात्र असलेले असे गृहस्थ आहेत.

२४. **ग्रामीण धंदे** :—वर या देशांतील मोठ्या धंद्यांची माहिती दिली आहे. पण त्या सर्वांत मिळून या देशांतील फारतर ३ टक्के लोक गुंतले असतील ! या देशांतील सुमारें ८१९ टक्के लोकवस्ती छोट्या धंद्यांवर अवलंबून आहे. भारतासारख्या शिक्षणानें मागासलेल्या खंडप्राय देशांत लोकवस्तीची उलथापालथ टाळावयाची असेल व पाश्चिमात्यांना आलेले दुःखद जीवनाचे कटु अनुभव टाळावयाचे असतील तर, या देशांतील ग्रामीण धंद्यांची वाढ करावी असें एका पक्षाचें मत आहे. महात्मा गांधी हे त्या पक्षाचे प्रमुख पुरस्कर्ते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होते. आजही त्यांची विचारसरणी असलेले अनेक लोक आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं शक्य तेथें यंत्रापेक्षां हातानें उत्पादन करण्यास उत्तेजन देणारी आर्थिक संघटना, व नुसती आर्थिक संघटनाच नव्हे तर समाजरचना घडवून आणावी. या दृष्टीनें खादीच्या उत्पादनास सरकार उत्तेजन देत आहे; व मुलांस हस्तव्यवसायाची गोडी लागावी म्हणून शिक्षणांतही सूतकताईचा विषय ठेवलेला आहे. यापुढें या देशांत विद्यमान मोठमोठे उद्योगधंदे सरकारच्या व समाजाच्या मालकीचे होऊन त्या प्रकारचा समाजसत्तावाद उत्पन्न होणार, कीं अल्प प्रमाणावर काम करणारीं उत्पादन केन्द्रें निघून तीं सहकारी तत्त्वावर काम करणार, कीं खाजगी भांडवलवाल्यांसाठीं उत्पादनाचें एखादें क्षेत्र राखून ठेवण्यांत येऊन त्यांना उत्तेजन देण्यांत येणार याबद्दल वाद चालू आहेत. बहुधा या तीनही दृष्टींनीं देशांत उत्पादनाचे प्रयोग चालू राहून जागतिक परिस्थितींत बदल होईल त्यास अनुसरून येथील आर्थिक संघटना व समाजरचना बदलत जाईल असा संभव दिसतो. जगांत युद्धांचा संभव नाहींसा झाला नाहीं तोंपर्यंत मोठमोठ्या यांत्रिक कारखान्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं; ही गोष्ट छोट्या धंद्यांच्या पुरस्कर्त्यांनाही पटत असल्यामुळें सध्यां औद्योगिक उत्पादनाबाबत एका तत्त्वनिष्ठेपेक्षां मिश्र स्वरूपाच्या आर्थिक धोरणाचा अवलंब केला जात आहे.

प्रश्न

१. औद्योगिक क्रान्ति म्हणजे काय ? यांत्रिक युगानें वहातुकीच्या साधनांत काय फरक झाले ? औद्योगिक क्रान्तीचे परिणाम सांगा. २. इंग्लंडांतील औद्योगिक क्रान्तीचे तत्कालीन भारतावर काय परिणाम झाले ते सांगा. टीपा लिहा :--(१) जपानांतील जागृति. (२) स्वदेशी चळवळ. (३) मजुरांच्या संघटना. (४) भारतांतील घरगुती धंदे. ३. १९ व २० या शतकांत भारतांत जे मोठे उद्योगधंदे वाढीला लागले त्यांचें त्रोटक वृत्त लिहा.

अभ्यास

(१) वाचा :--स्वातंत्र्याचा उषःकाल (ऑक्सफर्ड प्रकाशन) भाग २१ ते २४. (२) खुला व्यापार व संरक्षित व्यापार म्हणजे काय ? दोहोंचे फायदेतोटे सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

मँचेस्टरची वाढ

मँचेस्टर इंग्लंडमधील सर्वांत मोठें गांव म्हणतां येईल. इ.स.१७७१ मध्यें या स्थानाची रेखीव पहाणी करण्यांत आली. त्यावरून असें सांगतां येतें कीं, त्या वेळीं या गांवांत लोकवस्ती १३,७८६ होती. इ. स. १७८८ च्या नाताळांत मँचेस्टर व सालफर्ड मिळून ५०,००० वस्ती होती. इ. स. १७९१ मध्यें २,९६० ना बाप्तिस्मा देण्यांत आला व २२८६ ना मूठमाती दिली गेली. यावरून अंदाजानें तेथील लोकसंख्या ६५,००० ते ७४,००० होते. ही वाढ आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं. वस्तुतः मँचेस्टर हें बरोही नव्हे किंवा येथें कॉर्पोरेशनही नाहीं. फक्त एक पोलिस येथील सर्व व्यवस्था पाहतो; परंतु उत्तरेकडील अंतर्गत भागांत याच्याइतकें व्यापारांत पुढारलेलें गांव नाहीं. रंगविण्याच्या व कापडावर नकशी काम करणाऱ्या यंत्रांचा शोध लागल्यापासून विविध प्रकारचें कापड 'मँचेस्टर कापड' या नांवानें निघूं लागलें, यामुळें मँचेस्टर गांव व त्याच्या सभोंवतालचा कित्येक मैलांचा प्रदेश उद्योगप्रधान व समृद्ध झाला असून लोकांनीं गजबजून गेला आहे.

भाग ३७ वा

आधुनिक लोकशाहीचा विकास

१. **लोकशाहीचें स्वरूप** :—भारताच्या इतिहासांतील आधुनिक काळाचा इतिहास वाचणाराच्या लक्षांत आलेंच असेल कीं त्या इतिहासांत लोकशाही स्थापन करण्याच्या यत्नास फार महत्त्व आलें आहे. एकोणिसाव्या शतकांत आपलें गेलेलें स्वातंत्र्य पुन्हां परत मिळवावें ही उचित आकांक्षा लोकांच्या मनांत उत्पन्न झाली. परंतु त्यांच्या हेंही लक्षांत आलें कीं, स्वातंत्र्य मिळविणें म्हणजे मोगलाईचें किंवा मराठेशाहीचें पुनरुज्जीवन करणें नव्हे. या देशास मिळणारें स्वातंत्र्य मराठे, राजपूत, गुजराथी, बंगाली आदि करून सर्व लोकांचें आहे. हें स्वातंत्र्याचें नवें लोकशाही स्वरूप अस्तित्वांत आणण्याचा त्यांनीं यत्न केला. आतां राजांची राजशाही गेली व उमरावशाहीही नष्ट होणार. व्यक्तिमात्राच्या गुणविकासास निर्भयतेनें वाव देणारी व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तद्वारां समाजाचें कल्याण साधणारी अशी अवस्था म्हणजे स्वातंत्र्य होय. अशा प्रकारचें स्वातंत्र्य ज्या राजकीय घटनेंत अनुभविण्यास मिळेल तिला लोकशाही ' म्हणावें.

२. **विविध देशांतील यत्न** :--जगाच्या इतिहासांत गेलीं कित्येक शतकें ठिकठिकाणीं तेथील जनतेनें लोकशाही स्थापन करण्याचे प्रयत्न केले व एकाच्या उदाहरणावरून दुसरे शहाणे होत होत लोकशाहीस विसाव्या शतकांतील आजचें स्वरूप प्राप्त झालें आहे. मागील भागांत २० ऑगस्ट १९१७ रोजीं भारतमंत्र्याच्या घोषणेंतील जबाबदार राज्यपद्धतीचा उल्लेख आलेला आहे. लोकांच्या प्रतिनिधींनी सरकारवर नियंत्रण करून लोकांच्या हितासाठीं चालविलेला कारभार हें लोकशाहीचें आजचें स्वरूप आहे. या स्वरूपाचा पुढें आणखी विकास होत जाणार आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठीं मनुष्य-मात्रास आर्थिक समानता प्राप्त झाली पाहिजे व मनुष्यमात्रांत बंधुत्व नांदून त्यांची सामुदायिक यत्न करण्याची संवयही वाढीस लागली पाहिजे. या गोष्टी विसाव्या शतकांत सर्वांच्या लक्षांत आल्या असून त्या दृष्टीनें मान-वाची धडपड चालू आहे. प्रस्तुत भागांत इतिहासकाळांतील झालेल्यां अनेक प्रयोगांनीं लोकशाहीचा विकास कसा झाला हें पाहावयाचें आहे.

३. **इंग्लंडचें उदाहरण** :--अशा प्रकारच्या लोकशाहीचा म्हणजे प्राति-निधिक व जबाबदार लोकशाहीचा विकास इंग्लंडमध्यें झाला. भारतांत वेदकालीं सभा व समिति या संस्था असल्याचा उल्लेख मागें आलाच आहे (पृ. ४४) ; परंतु विद्यमान काळीं भारतांत स्थापन होत असलेली लोकशाही ही वेदकालीन समितीचा विकास असण्यापेक्षां इंग्लंडांतील लोकशाहीच्या कलमानें येथें मूळ धरलें व तिचाच येथें वृक्ष झाला हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून होईल. इंग्लंडांत इ. स. १२०० ते १७०० पर्यंत तेथील लोकांनीं राजसत्तेशीं झगडा करून देशाचा राज्यकारभार लोकप्रतिनिधींच्या हातीं आणला. अठराव्या शतकापासून पुढील काळांत वेळोवेळीं इष्ट त्या सुधारणा घडवून आणून वयांत आलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार देण्यांत येऊन इंग्रजांनीं लोकशाही पूर्णत्वास नेली. जगाच्या इतिहासांत इंग्लिश लोकांनीं प्रथमच हें यश मिळविलें असल्यानें इंग्लंडांतील पार्लमेंटला 'जगांतील लोकसभांची जननी ' असें म्हणण्यांत येतें.

४. **विटॅनचें कार्य** :--इंग्लंडांत फार प्राचीन काळीं वसाहत केलेल्या अँग्लो-सॅक्सन टोळ्यांमध्यें लोकराज्याचीं बीजें आढळतात. त्यांचा राजा हा सर्वाधिकारी नसे. तो आपला कारभार ' विटॅन ' म्हणजे शहाण्या लोकांची सभा इचा सल्ला घेऊन करी. या सभेंत त्या प्रदेशांतील धर्मगुरु, प्रमुख सरदार व जमीनदार हक्कानें येऊन त्या वेळीं बसत. निवडणुकांची पद्धत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हती. राजा मृत्यु पावल्यावर त्याच्या जागीं गादीवर दुसरा राजा नेमण्याचें काम या सभेकडे असे. पुष्कळ वेळां राजघराण्यांतील जवळच्याच पुरुषाची निवड केली जाई, व नंतर त्याची नेमणूक करण्याचा विधि होई. खेडेगांवांतील न्यायनिवाडे करण्यास ग्रामसभा (टाऊनमूट) असत. अनेक गांवांचा कारभार करणाऱ्या सभेस 'हंड्रेडमूट' हें नांव होतें व त्याहीपेक्षां मोठ्या प्रदेशाचा कारभार पहाणाऱ्या संस्थेस 'काउंटीमूट' म्हणत. या सभांतून तेथील प्रतिष्ठित लोक न्याय देण्यास बसत असत. आज इंग्लंड देश हा अनेक काउंट्यांमध्यें विभागलेला आहे. त्याचें मूळ हें आठव्या शतकाइतकें जुनें आहे.

५. **मॅग्ना चार्टा** :—इ. स. १०६६ मध्यें फरान्समधील नॉर्मन्डी प्रांताचा मुख्य वुइल्यम यानें इंग्लंड जिंकलें. तेव्हांपासून त्यानें विटॅनच्या ऐवजीं आपल्या मुख्य सरदारांच्या सभेचा म्हणजे ग्रेट कौन्सिलचा सल्ला घेण्यास सुरुवात केली. तीच पद्धति पुढील राजांनीं चालविली. जॉन नांवाचा राजा इ. स. ११९९ त इंग्लंडच्या गादीवर होता. तो मोठा जुलमी होता. त्यानें फरान्सशीं युद्ध केलें, पोपशीं भांडण चालविलें, व या प्रीत्यर्थ लागणारा पैसा लोकांवर जुलमी कर बसवून व तुरुंगाचें भय दाखवून वसूल करण्याचें काम चालविलें. या वेळीं स्टीफन लँगटन याच्या पुढारीपणाखालीं सभा भरवून लोकांनीं निश्चय केला कीं "जर राजानें आपल्या मागण्या अमान्य केल्या तर त्याच्याशीं युद्ध करावयाचें व लेखी करारानें त्यानें आपल्या मागण्या मान्य करीपर्यंत तें चालवावयाचें." जॉननें 'साम-दामा' चे अनेक यत्न केले; पण ते जमेनात. तेव्हां शेवटीं 'रनीमीड'च्या मैदानावर त्यानें करारपत्रावर सही केली. या करारास मॅग्ना चार्टा किंवा मोठी सनद असें म्हणतात. त्यांत ४९ कलमें आहेत. यापुढें गादीवर येणाऱ्या राजाकडून या सनदेस मधून मधून मान्यता घेण्यांत येई. या सनदेंतील मुख्य कलमें अशीं :—(१) आरोपीस त्याच्या समान दर्जाच्या लोकांकडून व रूढ कायद्यांप्रमाणें चौकशी करून गुन्हा सिद्ध झाल्याखेरीज तुरुंगांत घातलें जाणार नाहीं. (२) न्याय देण्याच्या कामीं लांच घेतली जाणार नाहीं. (३) युद्धाच्या वेळीं किंवा इतर कामांसाठीं पैशांची मागणी करतांना राजानें ग्रेट कौन्सिल बोलावून त्याची मान्यता घेतली पाहिजे या अटी घालून तेवढ्यावरच न थांबतां, राजाकडून या कलमांचें उल्लंघन होणार नाहीं याबद्दल दक्षता ठेवण्यासाठीं पंचवीस जणांची एक कमिटी नेमण्यांत आली (इ. स. १२१५).

६. **पार्लमेंटची स्थापना** :—जॉननंतर आलेला राजा तिसरा हेन्री हा पैशाची मागणी करण्यासाठीं 'ग्रेट कौन्सिल' बोलावी. त्या वेळीं बड्या सरदारांबरोबरच छोट्या जमीनदारांना सभेस बोलाविण्याची पद्धति त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाडली. या सभेस 'पार्लमेंट' असें नांव पडलें. १२५८ मध्यें ऑक्सफर्ड येथें भरलेल्या पार्लमेंटनें कर्जबाजारी हेन्रीच्या पैशाच्या मागण्या धुडकावल्या व त्यास राज्यकारभारास नालायक ठरवून पंधरा सरदारांकडे कारभार सोंपविला. या प्रकरणीं हेन्री व सरदार यांत युद्ध होऊन सरदारांचा विजय झाला. प्रमुख पुढारी सायमन डी मॉंटफर्ट यानें १२६५ मध्यें भरविलेल्या पार्लमेंटांत धर्मगुरु, बडे सरदार, छोटे जमीनदार त्याचप्रमाणें शहरांतर्फे निवडक प्रतिनिधि बोलाविले. लोकांच्या प्रतिनिधींना प्रथमच या सभेंत बसण्याचा मान मिळाला, म्हणून सायमनला लोकसभेचा जनक (फादर ऑफ दि हाऊस ऑफ कॉमन्स) म्हणतात. नंतरच्या एडवर्ड नांवाच्या राजानें १२९५ मधील पार्लमेंटच्या सभेसाठीं सामान्य लोकांच्या प्रतिनिधींची निवड होईल अशी योजना केली. हळूहळू प्रतिष्ठित धर्मगुरु व बडे सरदार यांना सभेस व्यक्तिशः निमंत्रण असल्यामुळें ते एकत्र झाले, व छोटया जमीनदारांचे व शहरांचे प्रतिनिधि हे सामान्य लोक त्यांच्यापासून वेगळे होऊन दोघेहि एकमेकांपासून निराळे व आपापल्या गटांत बसूं लागले. अशा रीतीनें उमराव सभा (House of Lords) आणि लोकसभा (House of Commons) यांचा उदय झाला. (इ.स. १३३१). पैशाची मागणी राजा करी, तेव्हां हे प्रतिनिधि आपल्या अडचणी दूर करण्याची मागणी करीत व त्या अटीवरच राजास कारभार चालविण्यास जरूर तो पैसा मंजूर होत असे.

७. **पहिला चार्ल्स** :—लोकमताची पर्वा न करतां राज्य करणाऱ्या राजांमध्यें पहिला चार्ल्स प्रसिद्ध होय. जॉनसारखा तोही लोकांना सतावूं लागला. तेव्हां त्याजकडून पार्लमेंटनें हक्क संरक्षणाचा अर्ज (Petition of Right) मंजूर करून घेऊन मगच त्यास युद्धासाठीं पैसे दिले. पार्लमेंटच्या संमतीशिवाय कर बसविणार नाहीं व विनाचौकशी कोणासही तुरुंगांत टाकणार नाहीं, हें मागणें या अर्जानें राजानें मान्य केलें. परंतु चार्ल्सनें त्याप्रमाणें प्रत्यक्षांत आचरण केलें नाहीं. पार्लमेंट न बोलावितां कर बसवून राज्यकारभार चालूं ठेवला व आपलीं धार्मिक मतें प्रजेवर जबरदस्तीनें लादलीं. आपल्या मताला विरोध करणाऱ्या पार्लमेंटच्या सभासदांना सभेंत जाऊन पकडण्याचाही त्यानें यत्न केला. अखेर या पुढाऱ्यांनीं पार्लमेंटतर्फे सैन्य उभें केलें. इंग्लंडांत राजा व पार्लमेंट यांमध्यें यादवी युद्ध झालें. अखेरीस राजाचा पराभव करून 'देशद्रोह' केल्याबद्दल त्यांस फांशी देण्यांत आलें (इ. स. १६४९) !

८. **रक्तशून्य राज्यक्रांति** :—त्यानंतर ११ वर्षें राजावांचूनच राज्य करण्याचा प्रयत्न इंग्रजांनीं केला, तो जनतेस मानवला नाहीं. दुसऱ्या चार्ल्सच्या वेळेस पार्लमेंटनें आपल्या अधिकाराची उजळणी करून घेतली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्या चार्ल्सनेंही पार्लमेंटचे अधिकार डावलण्याचा यत्न केला पण तो यशस्वी झाला नाहीं. या काळांत पार्लमेंटनें (हेबियस कॉर्पस अॅक्ट) 'व्यक्तिस्वातंत्र्याचा कायदा' राजाकडून मान्य करून घेतला. कैद झालेल्या माणसानें न्यायाधिशाकडे एकदम अर्ज करून चौकशीची मागणी करतांच, न्यायाधिशानें तुरुंगाधिकाऱ्यांना नोटिस काढली पाहिजे कीं 'कच्याचें आरोपपत्रक त्वरित हजर करा व चौकशीं चालूं करा.' अशा वेळीं आरोपपत्रक तयार नसेल तर त्या कैद्यास मुक्त करणें भाग पडे. यापुढें चार्ल्सनें कसेंबसें पार्लमेंटशीं जमवून घेतलें. पण त्याच्यानंतर गादीवर आलेल्या दुसऱ्या जेम्सनें स्वतःचा कॅथॉलिक पंथ प्रजेवर लादण्याचा व कॅथॉलिकांना विशेष सवलती देण्याचा अट्टाहास केला. त्याला सिंहासनावरून काढून त्याची प्रॉटेस्टंट मुलगी मेरी व तिचा पति वुइल्यम यांना राजपद देण्याचें पार्लमेंटच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें. हें कळतांच दुसरा जेम्स घाबरटपणें फरान्समध्यें पळून गेला. यामुळें युद्ध न होतांच वुइल्यम् राजपदावर येऊं शकला (इ. स. १६८९). लोकांनीं मागितलेले अधिकार देऊनच तो गादीवर आला. त्यानें बोलाविलेल्या पार्लमेंटनें या सर्व अधिकारांचा एक कायदा केला, त्यासच 'बिल ऑफ राइटस्' म्हणतात. ही अधिकारक्रांति इ. स. १६८९ मध्यें झाली, हिलाच 'रक्तशून्य राज्यक्रांति' (ब्लडलेस रेव्होल्यूशन) म्हणतात. भारतांत या काळांत शिवाजीनें मराठ्यांचें राज्य स्थापन केलें व त्यांचें औरंगजेबाशीं स्वातंत्र्ययुद्ध सुरू होतें.

९. **बिल ऑफ राइटस्** :--इ. स. १६८९ त पास झालेल्या बिल ऑफ राइटस् या कायद्यांत पुढील मुख्य कलमें आहेत. १. पार्लमेंटनें केलेला कायदा तिच्या संमतीखेरीज राजास तहकूब करतां येणार नाहीं. २. एकाद्या कायद्यापासून कोणाही व्यक्तीस सूट देण्याचा राजाला अधिकार नाहीं. ३. पार्लमेंटच्या मान्यतेखेरीज राजानें प्रजेवर कर बसविणें हें बेकायदेशीर आहे. ४. पार्लमेंटच्या मान्यतेखेरीज शांततेच्या काळांत राजानें खडी फौज ठेवणें बेकायदेशीर आहे. ५. पार्लमेंटांतील भाषणाबद्दल सभासदावर खटले भरतां येणार नाहींत. ६. कॅथॉलिकांशीं विवाहबद्ध होणाऱ्या व्यक्तीस इंग्लंडचें राज्यपद मिळणार नाहीं.

अशा रीतीनें कर बसविणें, कायदा करणें व राजा कोण असावा हेंही ठरविण्याचे अधिकार पार्लमेंटचे आहेत असें या कायद्यानें ठरलें. तिसऱ्या वुइल्यमनें तें मान्य केलें. प्रसिद्ध मुत्सद्दी थोरला विल्यम् पिट यानें म्हटल्याप्रमाणें खरोखरच मॅग्नाचार्टा, पिटिशन ऑफ राइट आणि बिल ऑफ राइट्स हे तीन कायदे म्हणजे इंग्लंडच्या राज्यघटनेचें बायबलच होय. वुइल्यमनंतर राज्यावर आलेल्या राजांनीं या सर्व कायद्यांना मान दिला, इतकेंच नव्हे तर पहिल्या जॉर्ज राजाच्या वेळेपासून कारभाराचा मुख्य भार मुख्य प्रधानावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोंपविण्याची प्रथा रूढ झाली. असा पहिला मुख्य प्रधान वॉल्पोल हा होय. यानंतर इ. स. १७६० ते १८२० या काळांत तिसऱ्या जॉर्ज राजानें पार्लमेंटचे अधिकार तात्त्विक दृष्टचा मान्य करून प्रत्यक्ष व्यवहारांत राजाच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा खूप प्रयत्न केला. यामुळें राजा व पार्लमेंट यांच्या झटापटींत एकसारखीं प्रधानमंडळें बदलूं लागलीं. कोणासही सुरळीत धोरण आंखून काम करतां येईना. या चंचल अवस्थेंतून अमेरिकनांशीं युद्ध निर्माण झालें.

१०. **अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध** :—ब्रिटिश पार्लमेंटनें स्वदेशांत राजावर अधिकार गाजविला, पण असाच अधिकार उत्तर अमेरिकेंतील इंग्रजांना देण्याची टाळाटाळ केली. वस्तुतः अमेरिकेंत इंग्रजांनींच वसाहती केल्या होत्या व त्यांतील कित्येक लोक हे जेम्स, चार्ल्स, यांच्या धार्मिक जांचाला कंटाळून तेथें गेले होते. त्यांचे वंशज हे आपल्या पूर्वजांसारखेच स्वातंत्र्यप्रिय होते. त्या वसाहतींनीं इंग्लंडचा तावा मान्य केला होता, परंतु तिसऱ्या जॉर्जच्या वेळेस वसाहतींच्या अंतर्गत स्वातंत्र्यावर ब्रिटिशांनीं आक्रमण सुरू केलें. 'ज्या पार्लमेंटमध्यें आमचे प्रतिनिधि नाहींत, त्यांना आमच्यावर कर लादण्याचा अधिकार नाहीं' असें वसाहतवाले म्हणूं लागले. हें म्हणणें न जुमानतां इंग्रज सरकारनें चहावर जकात बसविली. तेव्हां रागावून बोस्टन बंदरांतील चहानें भरलेल्या तीन गलबतांवरील १८ हजार पौंड चहा अमेरिकनांनीं समुद्रांत फेंकून दिला. झालें, येथून प्रकरण हातघाईवर येऊं लागलें (इ. स. १७७४). तिसऱ्या जॉर्जचें म्हणणें होतें कीं, आमचा कर बसविण्याचा अधिकार अमेरिकनांनीं मानलाच पाहिजे. या वृत्तीमुळें समेटाचे यत्न फसले. अमेरिकनांनीं आपलें सैन्य उभारलें व बोस्टनजवळ युद्ध सुरू झालें (इ. स. १७७५). अमेरिकन सेनापति जॉर्ज वॉशिंग्टन होता. वसाहतवाल्यांनीं फिलाडेल्फिया येथें परिषद भरविली (४ जुलै १७७६) व 'आम्ही स्वतंत्र आहोंत व तसें असण्याचा आम्हास हक्क आहे' अशी घोषणा


वॉशिंग्टन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून ग्रेट ब्रिटनचा राजकीय संबंध तोडला. ४ जुलै हा अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन त्या देशांत आजही मोठ्या उत्साहानें पाळला जातो. असो. या घोषणेनंतर झालेल्या युद्धांत इंग्लंडचा पराभव झाला आणि इंग्लंडनें अमेरिकेच्या स्वातंत्र्यास इ. स. १७८३ मध्यें मान्यता दिली. अमेरिकेच्या या लढ्याच्या वेळेस भारतांत मराठे–इंग्रज युद्ध चालू होतें, त्यामुळें इंग्रज सैन्य या देशांत गुंतून राहिलें. अशा रीतीनें अप्रत्यक्षपणें अमेरिकेला भारताचें साहाय्य झालें असें म्हणतां येईल.

११. **स्वातंत्र्याचा जाहीरनामा** :—आधुनिक काळांत राजसत्तेवरोबर लोकांनीं जे झगडे केले त्यांत अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाचें र महत्त्व आहे. अमेरिकेच्या जाहीरनाम्यांत लोकांच्या हक्कांचें चांगलें विवरण आहे; स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणतो :

" पुढील सिद्धांत स्वयंसिद्ध आहेत असें आमचें मत आहे— जन्मतः सर्व माणसांना समान दर्जा असतो; व त्यांना कांहीं हक्क प्राप्त झालेले असतात. त्यांचा त्याग करून मानवाला जगणें शक्य नाहीं. या हक्कांची पूर्तता करून घेण्यासाठीं योग्य सरकारची स्थापना करणें व त्या सरकारला लोकांच्या संमतीनें कारभार करण्यास सांगणें हे मानवाचे जन्मसिद्ध अधिकार आहेत. ज्यावेळीं शासनसंस्था या उद्देशास विघातक होतात,तेव्हां आपल्याला हितकारक अशा तऱ्हेची अशी नवी संघटना करणें, जुन्यांत फरक करणें, किंवा ते नष्ट करणें हा त्या लोकांचा हक्क आहे. या सिद्धान्तानुसार ग्रेट ब्रिटनच्या सरकारशीं असलेले सरकारी संबंध आम्ही नष्ट करीत आहोंत. " अशा रीतीनें प्रस्थापित अन्यायी सरकार बदलण्याचा अधिकार लोकांचा आहे हें तत्त्व जगभर घोषित झालें. मानवाच्या स्वातंत्र्य.मिळविण्याच्या मार्गावरील ' अमेरिकेचें स्वातंत्र्य युद्ध ' हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आजही अशा लोकशाहीसाठीं अमेरिकन राष्ट्र लढा देण्यास सिद्ध आहे असें वारंवार घोषित केलें जात आहे.

१२. **फरेंच राज्यक्रान्ति** :—अमेरिका इंग्लंड यांच्या युद्धांत अमेरिकेला जय मिळण्याचें एक कारण म्हणजे फरान्सनें केलेली मदत होय. या लढ्यांतून परतलेल्या फरेंच सैनिकांनीं पाहिलें कीं 'राजाविरहित राज्य' अमेरिकेंत सुरू झालें आहे. फरेंचांना शेजारच्या ब्रिटिश राष्ट्रांतील राजावर लोकांनीं घातलेलीं नियंत्रणें माहीत झालीं होतीं. पण फरान्समध्यें मात्र त्यांचे राजे त्यांच्यावर जुलूम करीत होते. या वेळचा बादशाह १६ वा लुई हा कर्जबाजारी झाला होता. देशांतील प्रजेंत राजकीय, सामाजिक, सांपत्तिक अशी सर्व प्रकारची विषमता बोकाळलेली होती. धर्मगुरूंना कर द्यावे लागत नसत. सरदारांना काम न करतां सरकारदरबारीं मान व वरिष्ठ नोकऱ्या मिळत. त्यांच्या ताब्यांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्वांत अधिक जमीन असे. कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना कोणीच विचारीत नसे; पण सर्वांत मोठें करांचें ओझें कष्ट करणाऱ्या शेवटच्या वर्गावर असे. 'ही असमता अनैसर्गिक आहे' असा विचार व्हॉल्टेअर, रूसो इ. फ्रेंच तत्त्वज्ञान्यांनीं नुकताच लोकांपुढें मांडला होता. लोकांचीं दुःखें परमावधीस



बास्तिलच्या तुरुंगावर हल्ला.

पोहोंचल्यामुळें त्यांनीं लोकसभा बोलावण्याची मागणी केली. अशी लोकसभा फ्रान्समध्यें गेल्या १७५ वर्षांत भरली नव्हती. अखेर लुईनें लोकसभा बोलावली. त्या सभेस आलेले धर्मगुरु, सरदार व सामान्य लोक हे तीन निरनिराळ्या सभांमध्यें बसले. परंतु सामान्य लोकांच्या पुढाऱ्यांनीं हट्ट धरला कीं, असा भेद न करतां सर्वांनीं एकत्रच बसलें पाहिजे. राजानें मोठ्या नाखुषीनें ही योजना मान्य केली. अशा रीतीनें पुनः सभा भरावयाची, पण तेवढ्यांत लोकांना असें आढळलें कीं राजानें सैन्याची तयारी केली असून बॅस्टिलच्या तुरुंगांत व पॅरिस शहरावर त्या सैन्याकडून गोळीबार होणार आहे. यामुळें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांचा क्रोध अनावर झाला. त्यांच्या टोळक्यांनीं 'बॅस्टिल'वर हल्ला केला, तुरुंग फोडला व तेथील कैद्यांची मुक्तता केली. यानंतर जिकडे तिकडे एकच दंगल सुरू झाली. राजाला हें कळतांच तो म्हणाला, 'लोकांनीं बंड केलेलें दिसतें'. त्याचा सरदार उत्तरला, 'नाहीं महाराज, हें नुसतें बंड नव्हे; ही क्रान्ति सुरू झाली आहे.' त्या सरदाराचें वाक्य खरें ठरलें. कांहीं दिवसांनीं स्टेट्स जनरल या राष्ट्रमहासभेनें मानवी हक्कांची घोषणा केली व त्यानुसार राज्यघटना करण्याचें ठरविलें (इ. स. १७८९). यानंतर कित्येक वर्षें अस्वस्थतेचीं गेलीं. राजा पळून गेला. त्याला जर्मनी, ऑस्ट्रिया इत्यादि देशांतील राज्यकर्त्यांनीं साहच केलें. तेव्हां स्वतंत्र फरान्सनें राजास पकडून जिवें मारलें व त्या सर्वांशीं युद्ध केलें. या युद्धांतच नेपोलियन नांवाचा पुरुष फरेंच राज्याचा मुख्य झाला; पण त्यानेंच लोकशाही नष्ट करून अखेर आपलें साम्राज्य प्रस्थापित केलें. (इ. स. १८०२). यापुढे एकोणिसाव्या शतकांत कांहीं वर्षें एकदां राजा व पुनः लोक यांच्या हातांत आळीपाळीनें सत्ता जाण्याचे प्रकार झाल्यानंतर इ. स. १८७० मध्यें फरान्समध्यें लोकशाही गणराज्य (Republic) स्थिरावलें.

१३. या घटनेचें महत्त्व :—अशा रीतीनें फरेंचांनीं इंग्लंडप्रमाणें अनियंत्रित राजाच्या हातांतील सत्ता आपल्या हातीं आणली व अमेरिकेप्रमाणें राजास अजिबात काढून टाकून गणराज्यही स्थापन केलें; इतकेंच नव्हे तर सरदारांना व धर्मगुरूंना असलेल्या सवलती नष्ट केल्या, सामाजिक समता स्थापिली, धर्मगुरूंचें वर्चस्व नाहींसें केलें व 'एकमेकां करूं साह्य । अवघे धरूं सुपंथ ॥' असा बंधुभाव देशांत उत्पन्न व्हावा यासाठीं खटपट केली. या सत्कार्यांत खोडा घालणाऱ्या परकीय राजसत्तांना त्यांनीं विरोध केला व स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तीन तत्त्वांचें निशाण सर्व युरोपभर फडकविण्याची आकांक्षा धरली. हें सर्व त्यांना साध्य होऊं शकलें नाहीं हें खरें असलें तरी फरेंच राज्यक्रान्तीनें आवाहन केलेलीं हीं तीन तत्त्वें जगांत कोठेंही जुलमी सत्तेखालीं रगडल्या जाणाऱ्या मानवाला प्रतिकाराची स्फूर्ति देत राहतील यांत शंका नाहीं.

१४. इंग्लंडांत पार्लमेंट सुधारणेचा कायदा :—फरान्समध्यें रक्तपातानंतर लोकशाही आली आणि इंग्लंडांत शांततेच्या मार्गानें लोकपक्षाचा विजय झाला; तरी इंग्लंडमध्यें लोकशाहीचें ध्येय संपूर्णपणें साध्य झालें नाहीं. इ. स. १६८८ नंतर इंग्लंडांत राजाचें महत्त्व संपलें; पण पार्लमेंटांतील सत्ताधारी सरदारांचें व श्रीमंतांचें महत्त्व कायम होतें व तें वाढलेंही. पार्लमेंट सत्ताधारी झाली; पण या पार्लमेंटमध्यें प्रतिनिधि असत ते श्रीमंतांचेच! इ. स. १४८५ मध्यें ज्यांना प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार होता, त्यांच्याच घरा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ण्यांत तो या वेळपर्यंत चालत राहिला. १९ व्या शतकाच्या प्रारंभीं एका गांवाला तर एकच मतदार होता. तोच निवडणुकीस उभा राही आणि निवडून येई! १८ व्या शतकांतील औद्योगिक क्रान्तीनंतर शेतीचें महत्त्व कमी होऊन उद्योगधंद्यांचें महत्त्व वाढलें, पण त्या उद्योगधंद्यांत महत्त्वाचीं कामें करणाऱ्या कारागिरांना आणि कारखानदार, व्यापारी किंवा कामकरी यांना पार्लमेंटांत प्रवेश नव्हता. यामुळें देशांत असंतोष पसरूं लागला. त्या वेळीं इंग्लंडचें नेपोलियनशीं युद्ध चालू असल्यामुळें तत्कालीन सरकारनें या मागण्यांकडे दुर्लक्ष केलें; परंतु इ. स. १८१५ त हें युद्ध थांबलें, तेव्हां लोकांनीं सभा भरवून त्यांतून सुधारणांची मागणी मांडण्यास प्रारंभ केला. तत्कालीन प्रधान-मंडळानें दडपशाहीचे कायदे केले. पण व्हिग पक्षाचा पुढारी लॉर्ड ग्रे यानें सुधारणा पक्षाचें पुढारीपण स्वीकारलें व या मुद्द्यावरच निवडणुकी लढवून तो मुख्य प्रधान झाला. त्यानें इ. स. १८३२ त पहिला सुधारणा कायदा पास केला. या कायद्यानें वस्ती नसलेल्या शहरांच्या जागा कमी करून बर्मिंगहॅम, मँचेस्टर अशा नवोदित शहरांना त्या जागा दिल्या. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ४० शिलिंग वार्षिक सारा असलेला जमिनीचा मालक, ५० पौंड खंड भरणारा व शहरांत १० पौंड वार्षिक पट्टी भरणारा घराचा मालक यांनीं प्रतिनिधि निवडावेत असें ठरविण्यांत आलें. पूर्वीं पार्लमेंटांत बड्या जमीनदारांचें वर्चस्व होतें, आतां दुकानदार व उद्योगधंदेवाले पुढें सरसावले. याप्रमाणें हक्क असलेल्या मतदारांनीं निवडलेली पार्लमेंट इ. स. १८३३ पासून काम करूं लागली. तिनें गुलामगिरी बंद केली, शिक्षण देणें* हें काम सरकारचें आहे असें ठरविलें, नगरपालिकांची घटना सुधारली, आणि मजुरांच्या हिताचे कांहीं कायदे केले.

१५. चार्टिस्टांची चळवळ :—परंतु मजुरांना असें आढळून आलें कीं, हे व्यापारधंदेवाल्यांचे प्रतिनिधि आपल्या हिताकडे लक्ष देत नाहींत. यामुळें त्यांची दुःस्थिति सुधारण्याचें काम पार्लमेंट करीत नाहीं. तेव्हां त्यांनीं पुनः सुधारणेची चळवळ सुरू केली. दंगल करण्याचा प्रकार केला, पण सरकारनें खंबीर धोरण ठेवून शांतता राखली. ज्यांनीं ही चळवळ केली त्यांना 'चार्टिस्ट' असें म्हणतात. कारण त्यांनीं 'हक्कांची सनद' करून ती पार्लमेंटनें मान्य करावी असे अर्ज सबंध देशांतून ठिकठिकाणाहून केले होते (इ. स. १८३८). त्यांची मुख्य मागणी अशी होती कीं, जर प्रत्येक नागरिकानें मरणाची भीति न बाळगतां स्वदेशरक्षणार्थ युद्धांत आलेंच पाहिजे, तर मग त्याच

---

* याच काळांत भारतांतील ग. ज. बेंटिंक यानें भारतांत शिक्षणविषयक धोरण निश्चित केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न्यायानें राज्यकारभारांतही प्रत्येक नागरिकाला मताचा अधिकार मिळालाच पाहिजे. त्या काळीं या चार्टिस्टांचीं मतें लोकांना वेडगळ वाटलीं; पण आज यांतील वहुतेक सर्वमान्य झालीं आहेत. दरवर्षी पार्लमेंट बरखास्त करून फेर निवडणूक करावी अशासारखीं त्यांचीं मतें मात्र अव्यवहार्य होतीं.



ग्लॅडस्टन

१६. **ग्लॅडस्टनचे यत्न** :—पुढें कांहीं वर्षांनीं ग्लॅडस्टन नांवाचा 'उदारमतवादी' पुरुष इंग्लंडचा मुख्य प्रधान झाला. त्यानें सुधारणा कायदा करून पार्लमेंट अधिक प्रातिनिधिक करण्याचा केलेला यत्न फसला. तथापि पुढील वर्षी कॉन्झर्व्हेटिव्ह सरकारला सुधारणा कायदा पास करावा लागला. या कायद्यानें खेड्यांतील वार्षिक दहा पौंड खंड भरणाऱ्या गरीब शेतकऱ्यास व शहरांत दहा पौंड वार्षिक भाडें देणाऱ्या कामकऱ्यास व सर्व घरमालकांस मताचा अधिकार मिळाला. याप्रमाणें १८६८ त नवी पार्लमेंट निवडून आली. तिनें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. मुख्य प्रधान ग्लॅडस्टन म्हणे कीं, 'आम्ही आमच्या मालकांना (म्हणजे मतदारांना) सुशिक्षित केलें पाहिजे.' मतें देतांना तीं गुप्तपणें बॅलट पद्धतीनें देण्याचा कायदाही त्यानेंच केला. इ. स. १८८४ मध्यें ग्लॅडस्टन दुसऱ्यांदा मुख्य प्रधान झाला. त्या वेळीं त्यानें सुधारणांचा तिसरा कायदा पास केला. या बिलानें शहरांत त्याचप्रमाणें परगण्यांतील प्रत्येक घरमालकास व कांहीं भाडेकऱ्यांसही मतदानाचा हक्क मिळाला. यामुळें मतदानाचा हक्क खेड्यांतील मजुरांपर्यंत येऊन पोहोंचला. याच वेळीं आयर्लंडला स्वराज्य देण्याचा ग्लॅडस्टननें यत्न चालविला होता.

१७. **लॉर्डांचे हक्क कमी झाले** :—मताधिकार विस्तृत होत चालला, तसतसा उमराव सभा (हाऊस ऑफ लॉर्डस्) व लोकसभा (हाऊस ऑफ कॉमन्स) यांच्या विचारांत फरक पडूं लागला. उमराव सभेंत वंशपरंपरा लॉर्ड बसत. त्यांचे विचार व सामान्य लोकांनीं निवडून दिलेले प्रतिनिधि यांचे विचार जमणें कठिण झालें व या दोन सभांत तंटे होऊं लागले. एकदां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्लंडांतील लोकसत्तेची वाढ

(१७१४-१९४०)



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर (इ. स. १९०९) लॉर्डांनीं बजेटच नापास केलें! वाद चिघळला व इ. स. १९११ त कायदा होऊन पैशाचें बिल नामंजूर करण्याचा अधिकार लॉर्डांस नाहीं, व इतर बिलांबाबतही दोन वर्षेपर्यंत तो लांबविण्याखेरीज जादा अधिकार लॉर्डांना नाहीं असें ठरविलें. हा कायदा पास करतांना लॉर्ड सभा आढेवेढे घेऊं लागली, तेव्हां जरूर तेवढे नवे लॉर्ड राजामार्फत पदव्या देऊन तयार करण्याची धमकी मुख्य प्रधान ॲस्क्विथ यानें दिली. कारण लोकसभेच्या मताविरुद्ध जाण्याची राजाची छाती नव्हती. तेव्हां निरुपायानें उमरावसभेनें हें बिल मान्य केलें. या कायद्यानें कॉमन्स सभा म्हणजे लोकांची सभा ही सर्वश्रेष्ठ ठरली. लोकशाहीच्या विकासांत हा महत्त्वाचा टप्पा इंग्लंडनें गांठला.

१८. **इंग्लंडचीं दोन धोरणें** :—स्वदेशांत अशी प्रगति करणाऱ्या ब्रिटिश सरकारनें भारतांत मात्र लोकांच्या हातांत सत्ता न देण्याचें धोरण ठेवलें. इ.-स. १९०९ सालीं विलायत सरकारनें भारताला 'मोर्ले-मिंटो सुधारणा' रूपानें दिलेल्या सुधारणांत वरिष्ठ कायदे मंडळांत सरकारी सभासदांचें बहुमत होतें व प्रांतिक कायदेमंडळांतून सरकारनें नेमलेल्या लोकांची बहुसंख्या होती; परंतु त्यांतही जातवारी निर्माण करून लोकशाहीचा प्रयोग दूषित करून ठेविला, आणि या कायदेमंडळास सरकारवर नियंत्रण करण्याचा कांहीं हक्क नव्हता. घरीं लोकशाही व बाहेर साम्राज्यशाही असें बरेच दिवस इंग्लंडचें दुटप्पी धोरण होतें.

१९. **पुढील सुधारणा** :—इ. स. १२१५ मधील मॅग्ना चार्टापासून प्रारंभ करून इ. स. १८०० पर्यंत ब्रिटिशांनीं राजाची सत्ता पार्लमेंटच्या हातांत आणली. पुढील शतकांत या पार्लमेंटमध्यें मध्यमवर्ग व मजुरवर्ग यांना आपले प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार देऊन व लॉर्ड सभेचे अधिकार कमी करून खरी लोकशाही वाढीस लावली. यानंतर अजून आणखी दोन टप्पे पुढें जाणें अवश्य होतें, त्यांतील एक टप्पा इ. स. १९१८ चा चौथा पार्लमेंट सुधारणा कायदा करून इंग्रजांनीं गांठला. या कायद्यानें मनुष्यास मतदानाचा हक्क प्राप्त होण्यास प्राप्तीची अट नको असें ठरवून प्रत्येक प्रौढ पुरुषाला मताचा अधिकार देण्यांत आला. पण स्त्रियांना या काळपर्यंत मताधिकार नव्हता. इ. स. १८७० पासून त्यांची चळवळ चालू होती. त्यांत मिसेस पँखर्स्ट या बाईनें पुढाकार घेतला होता, पण तिला विशेषसें यश आलें नाहीं. पहिल्या महायुद्धांत स्त्रियांनीं केलेली कामगिरी पाहून इ. स. १९१८ च्या कायद्यानें तीस वर्षांवरील स्त्रियांना मताधिकार मिळाला. पुढें इ. स. १९२८ पासून आतां पुरुषांप्रमाणें प्रौढ स्त्रियांनाही मताचा अधिकार मिळाला आहे. अशा रीतीनें इंग्लंडांतील लोकशाही पूर्ण झाली. या मतदारांनीं निवडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलेल्या प्रतिनिधींत ज्यांचें बहुमत असेल अशा पक्षाचा पुढारी इंग्लंडचा मुख्य प्रधान असतो व त्याच्याच सल्ल्यानुसार इंग्लंडचा राजा वागतो. मुख्य प्रधानाला सल्ला देण्यापलीकडे राजास कांहीं अधिकार नाहींत. इ. स. १९३६ मध्यें राजा झालेल्या आठव्या एडवर्डनें तत्कालीन प्रधानमंडळाशीं त्याच्या विवाहाच्या प्रश्नाबाबतचें धोरण न पटल्यानें त्यागपत्र दिलें व लोकमताला मान देऊन इंग्लंडमध्यें लोकशाही नांदते हें दाखवून दिलें.

२०. **भारतांतील लोकशाही घटना** :—भारतांत इ. स. १९४७ पासून स्वातंत्र्य प्रस्थापित झालें आहे. १९४७ च्या घटनेनें वयांत आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांस मताधिकार प्राप्त झाला आहे. जगाची प्रगति होत असल्यानें एके ठिकाणचा अनुभव दुसरीकडे जमेस धरून नव्या घटना होत असतात. या दृष्टीनें हा देश स्वतंत्र झाल्याबरोबर घटनाकारांनीं एकदम मनुष्यमात्रास मताधिकार दिला हें योग्यच झालें. पण या हक्कामुळें भारतीयांची जबाबदारी वाढली आहे. इंग्लंडमधील लोकांनीं शेंदीडशें वर्षे झगडून जें मिळविलें तें येथें इ. स. १९४७ च्या कायद्यानें प्रस्थापित झालें. भारतासारख्या विविधतेनें भरलेल्या देशांत त्याचा जबाबदारीनें व जागृत राहून उपयोग करणें व व्यक्तिमात्राच्या गुणविकासास निर्भयतेनें वाव देणारी व तद्द्वारा समाजाचें कल्याण साधणारी लोकशाही निर्माण करणें हे या पिढीचें कर्तव्य आहे.

प्रश्न

१. लोकशाही म्हणजे काय? तिची आवश्यकता कां वाटते? इंग्लंडनें यासाठीं कोणते कायदे केले? त्यांचीं नांवें सांगा. २. महत्त्व सांगा.—मॅग्ना चार्टा, अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा, पार्लमेंट सुधारणेचा चौथा कायदा, फ्रेंच राज्यक्रान्तीचें महत्त्व.

अभ्यास

(१) वाचा :—फ्रेंच राज्यक्रांति (स्वाध्यायमाला), ओगलेकृत अमेरिका भा. १, ओतुरकरकृत सोपपत्तिक शासनपद्धतीमधून मानवी हक्कांसंबंधीं भाग ६ वा (पृ. ५२ ते ५७). (२) इंग्लंडांतील लोकशाहीच्या विकासाचा येथें दिलेला आलेख दुप्पट प्रमाण घेऊन तुम्ही काढा. प्रत्येक सनाचें महत्त्व सांगा.

माहितीसाठीं

पार्लमेंटकडे चार्टिस्टांच्या मागण्या

माननीय लोकसभेच्या सदस्यांच्या चरणीं :—

आम्ही ज्या देशांत राहतों त्या देशांतील व्यापारी साहसी, उद्योगी व व्यवहारकुशल असून मजूरवर्गही दीर्घोद्योगी म्हणून नांवाजलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें असतां आम्ही मात्र व्यक्तिगत व सामुदायिक दुःखानें पोळले जात आहोंत. १८३२ च्या सुधारणा कायद्यानें ही गांजणूक थांबेल ही लोकनायकांची अपेक्षा व्यर्थ ठरली आहे. सैन्यभरतीच्या वेळीं गरीब-श्रीमंत असा भेद केला जात नाहीं, मग कायदा करण्याच्या वेळींही आमचें म्हणणें ऐकलें गेलें पाहिजे. नागरिकांचीं कर्तव्यें आम्ही आचरणांत आणतों, तेव्हां आम्हांस नागरिकांचे हक्कही मिळाले पाहिजेत. म्हणून (निवडणुकींत) सार्वत्रिक मताधिकार द्या. या वेळीं श्रीमंतांकडून लांचलुचपत होऊं नये व बलवानांकडून त्रास होऊं नये म्हणून गुप्तमतदान पाहिजे. प्रतिनिधि आणि मतदार यांचे संबंध अगदीं जवळचे असावे. प्रतिनिधि लोकांच्या विश्वासास नेहमीं पात्र असावे. याकरितां निवडणुकी वारंवार व्हाव्यात. म्हणून आमचें मागणें आहे कीं, पार्लमेंटच्या निवडणुकी वार्षिक पाहिजेत. सध्यांच्या निर्बंधामुळें गरिबांच्या अडचणी न कळणारे असे प्रतिनिधि निवडून येतात. कळकळीनें काम करणाऱ्या प्रतिनिधींचीं कर्तव्यें अनेक व त्रासदायक असतात. हें कार्य त्यांनीं फुकट करावें हें न्याय्य नाहीं, तर्कसंमत नाहीं किंवा सुरक्षित नाहीं. म्हणून भावी निवडणुकीनंतर अशा प्रतिनिधींना सरकारी खजिन्यांतून योग्य वेतन दिलें जावें असें आमचें मागणें आहे. तसेंच प्रतिनिधि म्हणून निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारांना मालमत्ता धारण करण्याची जी अट आहे ती रद्द करावी.

—गांजलेले देशबांधव.

भाग ३८ वा

विसाव्या शतकांतील

साम्राज्यवाद व लोकशाही यांचें द्वंद्व

१. दोन महायुद्धांचा काळ :—२५ जून १९१४ रोजीं ऑस्ट्रिया हंगेरीचा राजपुत्र फर्डिनंड याचा सर्व्हियांतील एका विद्यार्थ्यानें खून केल्याचें निमित्त होऊन युरोपांतील शांततेचा भंग झाला. इ. स. १८१५ त वॉटर्लूच्या लढाईंत नेपोलियनचा पराभव झाल्यापासून युरोपांत महायुद्ध झालें नव्हतें. या शंभर वर्षांत ग्रीसच्या स्वातंत्र्याचें युद्ध किंवा क्रिमियांतील युद्ध अशीं किरकोळ युद्धें झालीं. परंतु १९१४ सालीं सुरू झालेल्या युद्धास 'महायुद्ध' असें अन्वर्थक नांव प्राप्त झालें आहे. पहिलें महायुद्ध इ. स. १९१८ सालीं संपलें. दुसरें [illegible] युद्ध [illegible] तशाच कारणानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरू होऊन इतिहासाची पुनरावृत्ति झाली. पहिल्या महायुद्धानंतर 'राष्ट्रसंघ' नांवाची शांतता प्रस्थापन करणारी संघटना निर्माण झाली. तशीच दुसरें महायुद्ध इ. स. १९४५ सालीं संपल्यावर 'संयुक्त राष्ट्रसमिति' नांवाची संघटना निर्माण झाली आहे व तिच्या सभा होऊन त्यांतून आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चर्चा होत आहे. महायुद्ध व शांततेच्या योजना यांची विसाव्या शतकांत दुवार झालेली पुनरावृत्ति यापुढें कोणत्या दिशेनें वहात जाणार हें सांगवत नाहीं. युद्ध कोणासच नको आहे; पण स्वार्थ कोणासच सुटत नाहीं अशी विद्यमान स्थिति आहे. प्रस्तुत भागांत पहिल्या महायुद्धाची पार्श्वभूमि सांगून दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांतील जागतिक घडामोडींचें समालोचन करावयाचें आहे.

२. साम्राज्यस्पर्धा :—राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारी चढाओढ व साम्राज्य मिळविण्याची स्पर्धा हें पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाचें मुख्य कारण होय. औद्योगिक क्रांतीमुळें इंग्लंडनें उद्योगधंद्यांच्या उन्नतींत आघाडी मारली व त्याच सुमारास साम्राज्याची बाजारपेठ हातीं आल्यामुळें इंग्लंडला ती उन्नति बराच काळ टिकवून धरतां आली, याचा युरोपियन राष्ट्रांस मत्सर वाटणें साहजिकच होतें. या राष्ट्रांपैकीं फरान्सनें नेपोलियनच्या काळांत इजिप्तवर स्वारी करून भारताकडे येण्याचा प्रयत्न केला; परंतु तो अयशस्वी झाला. यापुढील काळांत फरान्सनें इंग्लंडशीं आपली स्पर्धा सोडून देऊन जें सलोख्याचें धोरण स्वीकारलें तें आजतागायत कायम आहे. इंग्लंडशीं स्पर्धा करूं पहाणारें दुसरें राष्ट्र रशिया होय. रशियाच्या आरमाराची वाढ होऊं नये म्हणून काळ्या समुद्रांत कोणत्याच राष्ट्राच्या युद्धनौका येऊं नयेत व तो तटस्थ सागर समजावा अशा प्रकारचा आग्रह इंग्लंडसारख्या राष्ट्रांनीं धरला. याच्या विरुद्ध, रशियानें तुर्कस्थानचा इस्लामी सुलतान त्याच्या ताब्यांतील बाल्कन प्रदेशांत ख्रिस्ती प्रजेवर जुलूम करतो, त्या अर्थीं त्या सुलतानाला युरोपच्या ख्रिस्ती जगांतून बाडबिछाडासकट हांकून द्यावें असा दावा रशियानें मांडला. पण त्याचा अंतःस्थ हेतु निःसंशय काळ्या समुद्रांतून भूमध्य समुद्रांत वाट काढतां यावी व त्या योगानें पूर्वेकडील व्यापारांत व जागतिक साम्राज्यांत आपल्यालाही हिस्सा असावा असा होता. ही आकांक्षा सफल करण्यासाठीं भारताच्या वायव्येस अफगाणिस्थान व इराण या राष्ट्रांशीं स्नेहसंबंध जोडण्याचा रशियानें यत्न केला. हिंदुस्थानच्या अर्वाचीनइतिहासांत जीं दोन अफगाणयुद्धें झालीं त्यांचें मूळ कारण रशियन बागुलबोवाची इंग्लंडला वाटणारी भीतीच होय. विसाव्या शतकांत रशियांतील झारशाही कोलमडून तेथें कामकऱ्यांचें लोकराज्य स्थापन झालें आहे. तरी आजही इंग्लंड व रशिया हें द्वंद्व संपलेलें नाहीं. रशियानें प्रसृत केलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तत्त्वज्ञानाचा चीन, ब्रह्मदेश, जावा–सुमात्रा या भागांत फैलाव झाला असून त्यानें भारताचें पूर्वेकडील द्वार ठोठावलें आहे.

३. **जर्मनीचा उदय** :—युरोपांत इंग्लंडशीं स्पर्धा करणारें तिसरें राष्ट्र जर्मनी हें होय. एकोणिसाव्या शतकांत निरनिराळ्या जर्मन संस्थानांनीं प्रशियाच्या नेतृत्वाखालीं आपली संघटना केली. इ. स. १८७८च्या सुमारास तेथें प्रिन्स बिस्मार्क या कर्तृत्ववान मुत्सद्द्याचा उदय झाला. त्यानें इ. स. १८६६ सालीं ऑस्ट्रियाचा पराभव केला व इ. स. १८७१ सालीं फरान्सवर जय मिळविला. याच काळांत उत्तरेस डेन्मार्कशीं कुरापत काढून डेन्मार्क व जर्मनी या देशांच्या दरम्यान असलेले स्लेस्विग व हॉलस्टीन हे दोन प्रदेश जर्मनीस जोडले. एवढ्यावरच न थांबतां त्यानें स्लेस्विग व हॉल्स्टीन या प्रदेशांस जोडणारी अरुंद जमिनीची पट्टी फोडून काढून कील कालवा तयार केला. या योगानें बाल्टिक समुद्राचें पाणी उत्तर समुद्रास मिळालें व जर्मन राष्ट्राचीं आरमारी जहाजें बाल्टिक समुद्राकडून उत्तर समुद्राकडे निर्वेध ये–जा करूं लागलीं. पूर्वींच्या काळीं जर्मन जहाजांना डेन्मार्कच्या उत्तरेस वळसा घालून उत्तर समुद्रांत यावें लागे. या भागांत समुद्राचें पाणी वारंवार गोठत असल्यामुळें तो मार्ग दळणवळणास सोयीचा नव्हता. कीलचा कालवा तयार झाल्यानें जर्मनीच्या आरमारी प्रगतींतील एक मोठा अडथळा नाहींसा झाला व जर्मनीचें आरमार इंग्लंडशीं स्पर्धा करण्यास सिद्ध झालें.

४. **तुर्कस्थानशीं मैत्री** :—जर्मनी नुसत्या आरमारी संघटनेवरच थांबला नाहीं. त्यानें ऑस्ट्रियाशीं मैत्री जोडलेलीच होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस व विसाव्या शतकाचे प्रारंभीं जर्मनीनें तुर्कस्थानला पाठिंबा दिला, जर्मन लष्करी तज्ज्ञ तुर्की सेना शिकवून सज्ज करूं लागले. याखेरीज जर्मनींतील हॅम्बर्गपासून रेल्वे बांधीत ती थेट तुर्कस्थानची राजधानी कॉन्स्टॅंटिनोपल येथपर्यंत न्यावी व पुढें तुर्कस्थानांतून बगदादपर्यंत रेल्वे वाढवीत नेऊन त्यामार्गें इराणचें आखात गांठावें व अशा रीतीनें पूर्वेकडील व्यापारांत आपण भाग घ्यावा अशी जर्मनीनें आकांक्षा धरली. हॅंबुर्ग-कॉन्स्टॅंटिनोपल-बगदाद रेल्वेची ही योजना विसाव्या शतकांत बाल्कन राष्ट्रांत झालेल्या अनेक घडामोडींमुळें यशस्वी होत आली. या मार्गांत फक्त सर्व्हियाचा अडथळा होता. तो दूर झाल्यास जर्मनीचा हिंदुस्थानशीं थेट व्यापार करण्याचा मार्ग मोकळा होईल हें उघड होतें. अशा रीतीनें उत्तरेस कील कालव्याची योजना करून व दक्षिण पूर्व भागांत तुर्काशीं मैत्री जमवून जर्मनीनें इंग्लंडशीं स्पर्धा आरंभिली. या काळांत जर्मनीनें शास्त्रीय संशोधनांत प्रगति केली, शिक्षणांत सुधारणा केली, उद्योगधंद्यांची वाढ केली व लष्करी सेना अद्ययावत् केली. यांत्रिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामर्थ्यावर जर्मनीमध्यें तयार होणाऱ्या मालास बाहेरची बाजारपेठ मिळविण्याची जर्मनीची धडपड चालू होती.

५. **दोन गट** :—जर्मनीच्या या उद्योगाचें नीट स्वरूप लक्षांत घेतल्यास युरोपांत विसाव्या शतकाच्या प्रारंभीं दोन दोस्तसंघ कसे निर्माण झाले तें लक्षांत येईल. इ. स. १८७१ त जर्मनीनें फरान्सचा पाडाव केल्यानें व फरान्सचे आल्सेस लॉरेन सारखे प्रदेश त्याजपासून हिरावून घेतल्यानें फरान्स जर्मनीविरुद्ध जळफळत होता. तुर्कस्थानला लष्करी पाठिंबा देऊन त्याचें युरोपांतील स्थान टिकविण्यास साह्य केल्यानें रशियाचा जर्मनीवर राग होता. आणि आरमारी सामर्थ्य वाढवून व पूर्वेकडे येण्याचा मार्ग निर्माण करून इंग्लंड व जर्मनी यांच्यांत वैराग्नि, निदान स्पर्धाग्नि, धुमसत होता. अशा वेळीं इंग्लंड, फरान्स व रशिया यांनीं आपसांतील वाद बाजूस ठेवून एक त्रिवर्गांचा मित्रसंघ तयार केला. या कामीं इंग्लंडच्या सातव्या एडवर्डचें फार साह्य झालें. जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्यांत गट्टी झालेलीच होती. इटली नाममात्र जर्मनीच्या बाजूस राहून संधिसाधुपणाचें राजकारण खेळत होता; व तुर्कस्थाननें जर्मनीशीं सख्य जोडलें होतें. अशा स्थितींत वर सांगितल्याप्रमाणें ऑस्ट्रियन राजपुत्राच्या खुनाच्या ठिणगीनें २८ जुलै १९१४ रोजीं पहिल्या महायुद्धाचा युरोपांतील दोन दोस्तसंघांत भडका उडाला.

६. **महायुद्धाची अपूर्वता** :—जगाच्या इतिहासांत हें महायुद्ध अनेक दृष्टींनीं अपूर्व असें होतें. या युद्धांत एका बाजूस सात व दुसऱ्या बाजूस चार अशीं अकरा राष्ट्रें सामील झालीं होतीं. एवढें मोठें युद्ध पूर्वीं कधींच झालें नव्हतें. हें युद्ध त्रिखंडांत झालें. जमिनीवरून, पाण्यांतून, पाण्याखालून व तसेंच हवेंतूनही हें युद्ध चालूं होतें. हें सर्वंकष अशा स्वरूपाचें होतें. युद्धमान राष्ट्रें परस्परांचा आर्थिक कोंडमारा करण्यास सज्ज असल्यामुळें व खुल्या समुद्रावरून जाणारीं कोणतींही जहाजें पाणबुड्यांच्या सामर्थ्यावर बुडविण्याचा सर्रास उद्योग चालूं असल्यानें लढाऊ व बिनलढाऊ असा लोकवस्तींतील भेद यापुढें शिल्लकच राहिला नाहीं. या अकरा राष्ट्रांतील सर्व लोकवस्ती आपली सर्व शक्ति पणास लावून लढाई चालवीत होतीं. या युद्धांत स्त्रियांचें फार मोठ्या प्रमाणावर साह्य झालें. एक प्रत्यक्ष रणांगणावर हजर होण्याखेरीज बाकीच्या सर्व जीवन व विध्वंसनाच्या क्षेत्रांत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीनें काम करूं लागल्या. या महायुद्धानें इंग्लंडवर मोठा आणीबाणीचा प्रसंग आला. इंग्लंडचें जीवन बाहेरून होणाऱ्या मालाच्या आयातीवर अवलंबून असल्यामुळें व माल भरून आणणारीं जहाजें केव्हां पाणबुडीच्या भक्ष्यस्थानीं पडतील याचा नेम नसल्यामुळें मोठा कठीण प्रसंग उत्पन्न झाला. यापुढील काळांत इंग्लंडनें आपलें आर्थिक धोरण बदलून शेतकीकडे विशेष लक्ष दिलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व देशांतील धान्यनिर्मितीची वाढ केली. हिंदुस्थानसारख्या दूरच्या देशावर नुसत्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर राज्य करून भागणार नाहीं, हिंदी लोकांच्या आकांक्षांस थोडाबहुत मान दिला पाहिजे असें इंग्लंडला वाटूं लागलें. संकटप्रसंगीं रणांगणावर काळागोरा हा भेद नाहींसा होऊन गोऱ्या लोकांचा श्रेष्ठपणाचा गंड नाहींसा झाला. इंग्लंडच्या शेजारीं असलेल्या आयर्लंडनें महायुद्धाची संधि साधून एवढी दंगल माजविली कीं अखेर महायुद्ध संपल्यावर इ. स. १९२२ सालीं आयर्लंडला होमरूल देणें भाग पडलें. युद्ध ऐन निकरावर आलें असतां रशियांतील झारशाही कोलमडली व तेथें कामकरी लोकराज्य प्रस्थापित झालें व त्यानें इंग्लंड व फरान्स यांना न विचारतां जर्मनीशीं स्वतंत्र तह केला. आतां इंग्लंड व फरान्स यांच्या मदतीस न धांवल्यास जर्मनीचा जय होणार हें पाहून अमेरिकेनें युद्धांत उडी घेतली व इंग्लंड, फरान्स आदि संयुक्त राष्ट्रांस हरएक प्रकारें साह्य करून त्यांना विजय प्राप्त करून दिला. ११ नोव्हेंबर १९१८ रोजीं युद्ध संपलें. युद्धोत्तर कालांत अमेरिकेचा प्रेसिडेन्ट विल्सन यानें जागतिक शांततेसाठीं एक राष्ट्रसंघाची योजना आंखली व त्यामार्फत जागतिक पुनर्घटनेचें कार्य सुरू केलें. याच कार्यांत इंग्लंड व फरान्स या राष्ट्रांचे अमेरिकेशीं वारंवार मतभेद होऊं लागल्यामुळें व अमेरिकेनें युरोपियन राष्ट्रांच्या भांडणापासून अलिप्त राहावें असें लोकमत त्या देशांत प्रबळ झाल्यानें अमेरिकेनें राष्ट्रसंघांतून आपलें अंग काढून घेतलें.

७. **छोटया राष्ट्रांचा उदय** :—इकडे युद्धांत विजयी झालेल्या राष्ट्रांनीं युरोपच्या पुनर्घटनेस प्रारंभ केला. प्रें. विल्सननें जागतिक पुनर्घटनेसाठीं स्वयंनिर्णयाचें तत्त्व घालून दिलें होतें. या तत्त्वाचा उपयोग करून विजयी दोस्त राष्ट्रांनीं युरोपच्या नकाशावर फिनलंड, लटेव्हिया, इस्थोनिया, हंगेरी अशीं बारीक बारीक राष्ट्रें निर्माण केलीं. या छोटया राष्ट्रांच्या अस्तित्वामुळें बडया राष्ट्रांना कसलेंच भय नव्हतें. अशा रीतीनें स्वयंनिर्णयाच्या नांवाखालीं बडया राष्ट्रांचा स्वार्थ सिद्ध झाला. जर्मनी व ऑस्ट्रिया येथील लोकांना स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागू केलें असतें तर कदाचित् तीं दोन राष्ट्रें तेव्हांच एक झालीं असतीं. परंतु तसें कांहीं न करतां जर्मनी व ऑस्ट्रिया यांना एकमेकांपासून अलग ठेवण्यांत आलें. युरोपांत छोटया राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागू करण्यांत येत असतां या ना त्या सबबीवर भारतास त्याच्या कक्षेंतून वगळलें. मध्यपूर्वेत इराक, सौदी अरेबिया, लेबॅनॉन इत्यादि अनेक प्रदेशांत कुणाचा अंमल असावा हें निश्चित नसल्यानें व तीं राज्यें तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालीं जाऊं नयेत म्हणून, इंग्लंड–फरान्स यांनीं ते प्रदेश आपल्या संरक्षणाखालीं घेतले व अशा रीतीनें आपली व्यापारी संघटना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

य बळ वाढविलें. अशा रीतीनें राष्ट्रसंघाच्या नांवाखालीं युद्धांत विजयी झालेलीं इंग्लंड, फरान्स, आदिकरून राष्ट्रें जगाच्या नकाशांत आपणांस सोयिस्कर असे फेरफार करूं लागलीं.

८. जर्मनीवर युद्धखंडणी :—एवढचानें पुरें झालें नाहीं असें वाटून विजयी राष्ट्रांनीं जर्मनी आदिकरून पराभूत राष्ट्रांवर त्यांना कधींच देववणार नाहीं अशी खंडणी लादली वं ती वसूल करण्यासाठीं फरान्सनें जर्मनीचा खनिज पदार्थांनीं समृद्ध असा ऱ्हूर प्रांत सक्तीनें ताब्यांत घेतला. अशा रीतीनें स्वयंशासनाच्या तत्त्वावर, जागतिक पुनर्घटनेच्या नांवाखालीं पराभूत राष्ट्रांना खच्ची करून टाकण्याचें कार्य विजयी राष्ट्रांनीं मन:पूत चालूं ठेवलें.

९. आर्थिक मंदी :—या राष्ट्रीय संकटास दृढनिश्चयानें तोंड देण्याचें जर्मन राष्ट्रानें ठरविलें. इ. स. १९१८ ते १९३७ या काळांत जर्मनीनें प्रबळ लष्करी संघटना निर्माण केली. इकडे इंग्लंड, फरान्स आदिकरून विजयी राष्ट्रांत जर्मनीपासून वसूल केलेल्या खंडणीमुळें आर्थिक मंदी उत्पन्न झाली. कारण जर्मनी आपली खंडणी संयुक्त राष्ट्रास मालाच्या रूपानें देत असल्यामुळें तो माल उत्पन्न करणाऱ्या इंग्रज–फरेंच लोकांना काम नाहींसें झालें. अमेरिका ही सर्वच युद्धमान दोस्त राष्ट्रांची सावकार असल्यानें सोन्याचा सांठा अमेरिकेमध्यें केन्द्रीभूत होऊं लागला. यामुळें इतर राष्ट्राच्या बँकांतून सोन्याची गंगाजळी आटली व त्यामुळें तेथें तीव्र आर्थिक मंदी निर्माण झाली. तत्पूर्वी जर्मनीनेंही आपल्या नाण्याचें अवमूल्यन करून युरोपांतील आर्थिक आपत्तींत भर घातली. हे आर्थिक प्रश्न संयुक्त राष्ट्रांस कधींच यशस्वी रीतीनें सोडवितां आले नाहींत. शेवटीं जर्मनीपासून खंडणी घेण्याचा प्रश्न कांहीं काळानंतर आपोआपच मागें पडला.

१०. हिटलरचा उदय :—जर्मन आपत्तीच्या काळांत त्या राष्ट्राला उन्नतीची आशा दाखविणारा व तेथें प्रबळ लष्करी संघटना निर्माण करणारा पुरुष हिटलर हा होय. त्यानें लष्करी संघटना केल्याखेरीज आपलें राष्ट्र उन्नतीस चढणार नाहीं असें आपल्या राष्ट्रास शिकविलें, व लष्करी सामर्थ्याची जय्यत तयारी सुरू केली. या लष्करी उत्पादनामुळें जर्मनींत कामकऱ्यांना काम मिळूं लागलें, बेकारी नाहींशी झाली व कांहीं काळ आर्थिक भरभराट झाली. हिटलरच्या अनुयायांस 'नाझी' असें म्हणत. या नाझी संघटनेसच 'फॅसिझम' असें नांव आहे. लष्करशाहीवर आधारलेल्या आर्थिक व राजकीय संघटनेस फॅसिझम असें म्हणतात. इंग्लंड व फरान्स या राष्ट्रांनीं निर्माण केलेल्या साम्राज्यशाहीस तोंड देण्यास फॅसिझमचा उदय झाला. देशांतील राष्ट्राभिमानानें प्रेरित झालेल्या मध्यम वर्गानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यास जोराचा पाठिंबा दिला. या फॅसिझमच्या संघटनेखालीं कामगारवर्ग कावाडकष्टानें रगडला जात होता. पण देशास आज ना उद्यां बरे दिवस येतील या भावनेवर तो जगत होता. जर्मनींतील नाझी संघटनेप्रमाणें इटलींत मुसोलिनीच्या नेतृत्वाखालीं व स्पेनमध्यें फरॅन्कोच्या नेतृत्वाखालीं प्रबळ लष्करी संघटना उदय पावत होत्या. विसाव्या शतकांतील १९३० ते १९४० या दशकांत जगांतील जनतेस हिटलर, मुसोलिनी व फरँको यांच्या कार्याबद्दल विलक्षण आकर्षण वाटत होतें.

११. रशियन राज्यक्रान्ति:—इंग्लंड, फरान्स आदिकरून दोस्त राष्ट्रें आर्थिक मंदीच्या विपत्तींतून जात असतां व जर्मनींत लष्करी तयारी चालू असतां रशियांत आर्थिक संघटनेवर आधारलेली एक नवी समाजरचना उदय पावत होती. तिचें स्वरूप लक्षांत येण्यास रशियांत विसाव्या शतकांत झालेल्या क्रांतिकारक घडामोडींचें समालोचन करणें जरूर आहे. एकोणिसाव्या शतकांत झारशाहीच्या जुलमाखालीं शेतकरी वर्ग अतिशय असंतुष्ट स्थितींत दिवस काढीत होता. विसाव्या शतकाचे प्रारंभीं रशियानें मांचुरियावर केलेल्या आक्रमणांतून रूसो-जपानी युद्ध उद्भवलें. या युद्धांत इ. स. १९०४ सालीं पोर्टआर्थरच्या लढाईंत जपाननें रशियावर विजय मिळविला. याच सुमारास रशियांतील शेतकऱ्यांनीं देशांत सर्वत्र उठावणी केली. परंतु झारनें त्यांच्यावर गोळीबार करून त्यांचें बंड मोडून काढलें. यानंतर झारशाहीचा अंमल तसाच चालू राहिला. परंतु पहिल्या महायुद्धांत जर्मनीनें केलेल्या हल्ल्यामुळें देशांत अंतर्गत यादवीस जोर चढला व त्यामुळें झारशाही कोलमडून पडली. १५ मार्च १९१७ रोजीं झारनें आपल्या राज्याचें त्यागपत्र दिलें. यानंतर केरेन्स्की नांवाच्या लोकपक्षीय पुढाऱ्यानें रशियांत लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाकडे सहानुभूतीनें पाहून त्यास साह्य करण्याऐवजीं इंग्लंड, फरान्स आदिकरून दोस्त राष्ट्रें रशियांतील क्रान्तीमुळें भयभीत होऊन त्यास उसंत मिळू देईनात. अखेर केरेन्स्कीच्या जागीं लेनिन हा रशियांतील कामगार संघटनेचा जहाल पुढारी रशियाचा प्रमुख बनला व त्यानें जर्मनीशीं स्वतंत्र तह करून दोस्त राष्ट्रांशीं आपला कांहींएक संबंध नाहीं असें दर्शविलें. यानंतरच्या काळांत रशियांत साम्यवादाच्या (Communism) तत्त्वावर आधारलेली अशी बोल्शेव्हिक संघटना निर्माण झाली. सबंध देशांत प्रत्येक धंदेनिहाय कामकरीवर्गानें आपले संघ (Soviets) बनवून त्यातर्फे तो तो धंदा त्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला व या सर्व सोव्हिएटांचें संघीकरण करून लोकराज्याची प्रस्थापना केली. सर्व धंद्यांत प्रस्थापित झालेले संघ व त्यांच्या एकीकरणानें निर्माण झालेलें गणराज्य या सर्वांचें धोरण एक असावें म्हणून देशांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक मोठा बोल्शेव्हिक पक्ष तयार झाला. बोल्शेव्हिक म्हणजे कामगारवर्गाच्या राजसत्तेचा पुरस्कार करणारा. लेनिन हा त्या पक्षाचा पुढारी होय.

१२. आर्थिक नियोजन :—रशियांत या नव्या समाजरचनेच्या उदयामुळें जिकडे तिकडे सर्वत्र उत्साह निर्माण झाला. लोक आपलेपणानें मन लावून काम करूं लागले. रशियाचा हा प्रयोग यशस्वी होऊं नये म्हणून दोस्त राष्ट्रांनीं त्याच्याशीं असहकारितेचें धोरण ठेविलें. परंतु अखेर रशियांतील आर्थिक संघटनेचा जोर लक्षांत घेऊन इंग्लिश मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज यास रशियाशीं व्यापारी तह करावा लागला. इ. स. १९२४ सालीं लेनिन मरण पावला. त्यानंतर ट्रॉट्स्की व स्टॅलिन यांच्यांत द्वंद्व उत्पन्न झालें. ट्रॉट्स्कीच्या मतें आदर्श साम्यवादाची समाजरचना रशियांत निर्माण करावी असें होतें. परंतु आपला पक्ष प्रबळ करून त्या पक्षाच्या द्वारें देशांतील सर्व सत्ता केन्द्रीभूत करावी व रशियाची आर्थिक उन्नति घडवून आणावी असें स्टॅलिन यास वाटे. अखेर या द्वंद्वांत स्टॅलिनचा विजय झाला व तो १९२८ सालीं अधिकारारूढ झाला. त्यानें तेव्हांपासून एकामागून एक आर्थिक विकासाचे पंचवार्षिक कार्यक्रम हातीं घेऊन व तत्सिद्धचर्थ देशांत अभूतपूर्व उत्साह निर्माण करून ते झपाटचानें तडीस नेले. आर्थिक मंदीचा त्रास सहन करणारीं दोस्त राष्ट्रें व अमेरिकेसारखें श्रीमंत राष्ट्रही या नव्या प्रयोगाकडे पहातच राहिलें, अखेर हें आर्थिक नियोजनाचें तत्त्व सर्वत्र लोकप्रिय झालें व अनेक राष्ट्रें त्याचें अनुकरण करूं लागलीं. गेलीं वीसबावीस वर्षे रशियांत हा आर्थिक संघटनेचा कार्यक्रम चालू असून या काळांत जर्मनीशीं झालेल्या युद्धांत रशियाचें प्रचंड नुकसान झालें तरी त्या राष्ट्रानें पुन्हां आपली आर्थिक घडी बसविली आहे. या सर्व कार्यांत स्टॅलिन हा उभ्या रशियामध्यें हुकुमशहाप्रमाणें वागतो व त्याच्या पक्षाखेरीज इतर कोणत्याही पक्षास पुरेसें स्वातंत्र्य नसल्यानें रशियांत स्टॅलिनचा हा अंमल हुकूमशाही स्वरूपाचा आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे. त्यांत कदाचित् थोडें फार सत्य असलें तरी रशियाच्या या आर्थिक प्रयोगाकडे अभ्यासपूर्ण दृष्टीनें पाहणें अत्यंत आवश्यक आहे. हेंही लक्षांत घेतलें पाहिजे कीं रशियन प्रयोगाचे चिकित्सक अनुकरण अलीकडे माओ-त्से-तुंगनें चीनमध्यें केलेलें असून तोही तेथें अधिकाधिक मान्यता पावत आहे.

१३. दुसरें महायुद्ध :—हिटलरनें आपली लष्करी संघटना प्रबळ करीत करीत हलके हलके आक्रमणास सुरुवात केली. याच सुमारास आल्सेस-लोरेन प्रांताबाबत कराराची मुदत संपल्याची संधी साधून ते प्रांत त्यानें आपल्या ताब्यांत घेतले. नंतर ऑस्ट्रियाशीं ऐक्य घडवून आणलें. झेकोस्लोव्हाकियाच्या सरहद्दीवर सुडेटन जर्मनांची बहुसंख्या असल्याकारणानें तो भागही त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वशाखालीं घातला. अशा रीतीनें हलकें हलकें आक्रमण चालू असतां इंग्लिश मुख्य प्रधान चेंबरलेन यानें म्युनिच येथें हिटलरशीं करार करून एक प्रकारें जर्मनीच्या आक्रमणास नैतिक मान्यता दिली. यानंतर जर्मनीनें पोलंडमधील डॅन्झिग हें जर्मन वस्तीचें बंदर आपल्यास मिळावें म्हणून पोलंडवर स्वारी केली (१ सप्टेंबर १९३९). यामुळें जागतिक शांततेचा भंग होऊन दुसऱ्या महायुद्धास सुरुवात झाली. रशिया व जर्मनी यांचा परस्परांत स्नेहसंबंधाचा करार पूर्वींच झालेला असल्यामुळें पोलंडचा पूर्वेकडील भाग रशियानें ही संधि साधून आपल्या घशाखालीं घातला. या महायुद्धांत इ. स. १९४० च्या जून अखेर जर्मनीनें पोलंड, डेन्मार्क, नॉर्वे, लक्झेम्बर्ग, हॉलंड, बेल्जम व फ्रान्स हीं राष्ट्रें पराभूत व पादाक्रांत केलीं. रशियानेंही लिथुॲनिया, लटेव्हिया, इस्थोनिया या देशांवर अंमल बसविला व फिनलंडचा पराभव केला. इटलीनें जर्मनीच्या विजयानें मोहून त्याच्या बाजूनें युद्धांत उडी घेतली. इ. स. १९४१ च्या मे अखेर जर्मनीनें आग्नेयीकडील सर्व बाल्कन राष्ट्रें आक्रमिलीं व क्रीट जिंकलें. उत्तर आफ्रिकेंत लिबियावर वर्चस्व प्रस्थापित केलें. परंतु जर्मनीचा इंग्लंडवरील स्वारीचा बेत मात्र जागच्या जागींच जिरला. ॲबिसीनिया इटलीपासून लढून फिरून स्वतंत्र झाला. हा वेळपर्यंत जर्मनीच्या चढत्या आक्रमणाविरुद्ध न डगमगतां एकटें इंग्लंड उभ्या युरोपियन जगास तोंड देऊन उभें होतें. सतत बाँबवृष्टीनें तें डगमगलें नाहीं, व आपल्या दोस्तांच्या पराभवानें तें खचलें नाहीं. इंग्लंडमधील या अपूर्व धैर्याचें व चिकाटीचें श्रेय तत्कालीन प्रधान चर्चिल यास दिलें पाहिजे.

१४. महायुद्धाचा शेवट :—इ. स. १९४१ च्या जूनमध्यें लढाईस अकल्पित निराळें वळण लागलें. जर्मनीनें रशियावर चढाई केली व पुढील सहा महिन्यांत रशियानें जिंकलेल्या सर्व प्रदेशांतून त्यास माघार घ्यावयास लावून खुद्द रशियाचा एक हजार मैल लांब व १०० ते ४०० मैल रुंद एवढा प्रदेश आक्रमण केला. ८ डिसें. १९४१ रोजीं जपाननें जर्मनीच्या बाजूनें युद्धांत उडी घेतली, त्याबरोबर अमेरिकेनें आजवरचें साहित्यसाह्याचें व वाढत्या सक्रिय सहानुभूतीचें धोरण बाजूस ठेवून प्रत्यक्ष युद्ध जाहीर केलें. या काळांत जपानचें चीनवरील मँच्युरियांतील आक्रमण पूर्ववत् चालूच होतें. यामुळें चीन हा दोस्तांच्या बाजूस आला. अशा रीतीनें १९४१ मेअखेर एकाकी लढणाऱ्या इंग्लंडच्या जोडीस रशिया, अमेरिका व चीन हीं राष्ट्रें येऊन मिळालीं. याचा परिणाम इ. स. १९४२ त तावडतोब दिसून आला. जर्मनीस स्टॅलिनग्रॅड येथें पराजयाचा पहिला जबरदस्त धक्का बसला व इ. स. १९४३ अखेर जर्मनीचें उत्तर आफ्रिकेंतून उच्चाटन झालें. त्यानंतरच्या काळांत जर्मनीचा पुरा पराभव होऊन १९४५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्या मे महिन्याच्या ७ व्या तारखेस युरोपांतील युद्ध संपलें. जपानशीं चालू असलेलें युद्धही ऑगस्ट १५ ला संपून दुसऱ्या महायुद्धाची परिसमाप्ति झाली.

१५. **संयुक्त राष्ट्रसमिति** :—दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय व्यवहाराचें नियंत्रण करण्यासाठीं, इ. स. १९४५ च्या जूनमध्यें संयुक्त राष्ट्रसमिति स्थापन झाली. आज जगांतील चौपन्न राष्ट्रें तिचे सभासद आहेत. त्यांत बहुतेक प्रमुख राष्ट्रें आलीं. या समितीची एक 'जनरल असेंब्ली' म्हणून विचारविनिमय करणारी सभा आहे. तेथें सर्व निर्णय दोनतृतीयांश बहुमतानें व्हावयाचे असतात. जनरल असेंब्लीची बैठक वर्षांतून फार तर एकादे वेळेस होते. आंतरराष्ट्रीय वादाचे प्रश्न सोडविण्यासाठीं एक अकरा सभासदांचें 'सिक्युरिटी कौन्सिल' (सुरक्षा समिति) आहे. या अकरा सभासदांपैकीं इंग्लंड, अमेरिका, रशिया, फरान्स व चीन या बडया राष्ट्रांचे प्रतिनिधि हे कायम सभासद असून उरलेल्या राष्ट्रांतून सहा प्रतिनिधि निवडून यावयाचे व त्यांची मुदत दोन वर्षें असावी अशी घटना आहे. सिक्युरिटी कौन्सिलपुढें येणाऱ्या प्रश्नांचे दोन वर्ग केले आहेत. एक मामुली प्रश्न व दुसरे महत्त्वाचे प्रश्न. मामुली प्रश्नांचा निर्णय अकरांपैकीं सात या बहुसंख्येनें व्हावयाचा; व दुसऱ्या विशेष महत्त्वाच्या प्रश्नांवर निकाल देतांनाही अकरांपैकीं सात जणांचें बहुमत अवश्य हवें. मात्र या सात जणांत पांचही बडया राष्ट्रांचा समावेश अवश्य हवा. या पांचांपैकीं कोणींही निर्णयास विक्षेप घेतला तर तो निर्णय अमलांत येऊं शकत नाहीं अशी सिक्युरिटी कौन्सिलची घटना आहे. या घटनेचा फायदा घेऊनच रशियानें अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर आपला विरोधी सूर काढून सिक्युरिटी कौन्सिलला आपल्यापुढील प्रश्नांचा निकाल लावणें अशक्य करून टाकलें अशी सोव्हिएट रशियावर टीका करण्यांत येत आहे. तिची युक्तायुक्तता पाहण्याचें हें स्थळ नव्हे. जरूर लागेल त्याप्रमाणें सिक्युरिटी कौन्सिलच्या अनेक बैठकी होतात. या सिक्युरिटी कौन्सिलखेरीज आर्थिक व सामाजिक प्रश्नांवर चर्चा करणारें एक मंडळ 'यूनेस्को' (Unesco), आंतरराष्ट्रीय वाद तोडण्यासाठीं न्यायालय, व आंतरराष्ट्रीय संस्थेनें कांहीं प्रदेशांचा कारभार करण्यासाठीं एक ट्रस्टीशिप कौन्सिल अशा अनेक संस्था आहेत. परंतु त्यांच्या तपशिलांत जाण्याची येथें जरुरी नाहीं. संयुक्त राष्ट्रसमिति कितपत यशस्वी होईल याचें भविष्य वर्तविण्यापेक्षां तिच्या यशाबद्दल विश्वास बाळगून त्यासाठीं यत्न करणें अधिक उपयुक्त होय. असे प्रयत्न क्वचित् कांहीं काल विफल झाले तरी तेवढयानें निराश होण्याचें कारण नाहीं.

१६. **साम्राज्यवाद व लोकशाही** :—विसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत झालेलीं दोन महायुद्धें आक्रमक भांडवलशाही राष्ट्रांच्या साम्राज्यवादी स्पर्धेतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्माण झालीं. इंग्लंड व फरान्सला बाजारपेठ कायम टिकविण्यासाठीं साम्राज्य हवें तसें आपणांसही असलें पाहिजे अशा वृत्तींतून या युद्धांचा जन्म झाला. पण ज्या आशिया खंडांतील राष्ट्रांवर हें आक्रमण होत होतें त्यांच्या विचारांची णींच दखलगिरी घेतली नाहीं. साम्राज्यवाद्यांच्या झुंजींत लोकशाही नामशेष होण्याची धास्ती निर्माण झाली. ह्या युद्धांत विजय मिळविण्यासाठीं देशांत सरकारचें प्रजेवर नियंत्रण झाल्यानें तेथें लोकशाहीची गळचेपी झाली व ज्या राष्ट्रांवर आक्रमण झालें तेथें तर लोकशाहीस वावच नाहीं अशी स्थिति झाली. सारांश, साम्राज्यवाद व लोकशाही या परस्परविरुद्ध गोष्टी असल्याचें सर्वांच्या अनुभवास आलें आहे. आज हीं साम्राज्यवादीं राष्ट्रें आपसांत लढून थकलेलीं दिसतात. जर्मनीचा पराभव झाला व युद्धकर्जाच्या बोजामुळें व वाढत्या क्षीणतेमुळें इंग्लंडचें साम्राज्यही हलकें हलकें अवस्थांतर पावत आहे. अशा वेळीं अनाक्रमणाच्या तत्त्वावर जागतिक पुनर्घटना घडवून आणून लोकशाहीचें सर्वत्र पुनरुज्जीवन करणें ही संयुक्त राष्ट्रसमितीची एकमेव जबाबदारी आहे.

प्रश्न

१. पहिल्या महायुद्धाचीं कारणें सांगा. रणांगणावर न गेलेल्या प्रजाजनांना या युद्धांत कोणते परिणाम भोगावे लागले ? २. 'जर्मनींत हिटलरनें केलेल्या लष्करी संघटनेमुळें दुसरें महायुद्ध उद्‌भवलें' हें म्हणणें कितपत खरें आहे ? ३. टीपा लिहा :—(१) रशियांत साम्यवाद्यांनीं केलेली क्रांति, (२) स्टॅलिन, (३) स्वयंनिर्णयाचें तत्त्व, (४) चर्चिलचें युद्धकालीन धोरण, (५) यूनो.

अभ्यास

(१) वाचा :—स्टॅलिन व हिटलरचीं छोटीं चरित्रें. (२) जगांत आज कोणत्या दोन सिद्धान्तांचा संघर्ष चालू आहे ? प्रत्येक सिद्धान्ताच्या बाजूस असलेल्या पांच देशांचीं नांवें सांगा. आपल्या भारताचें यासंबंधीं काय धोरण आहे ?

———०———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ३९ वा

स्वातंत्र्याचीं आंदोलनें

१. परदेशांतील स्वातंत्र्य-युद्धें व भारत :—परकीय ब्रिटिश राज्यकर्त्यांशीं गेलीं १०० वर्षे झगडा करीत करीत भारतानें स्वातंत्र्य मिळविलें. हा लढा करण्याची व त्यासाठीं प्राण अर्पण करण्याची स्फूर्ति भारताच्या इतिहासांतील राणा प्रताप, शिवाजी महाराज, गुरु गोविंदसिंग आदि पुरुषांपासून आपल्या पूर्वजांस मिळाली. तसेंच १९ व्या शतकांत ज्या इंग्रजांशीं आपला संबंध आला त्यांच्या व इंग्लंडचे शेजारी राष्ट्र जें फ्रान्स त्यांच्या इतिहासांतील राजा-पार्लमेंटचे तंटे, अमेरिका-इंग्लंड युद्ध, फ्रान्सची राज्यक्रान्ति, या घटनांनींही आपणांस मार्गदर्शन झालें. इंग्लंडचें राज्य ज्या काळांत भारतांत स्थिर झालें त्या १९ व्या शतकांतच युरोपांतील ग्रीस, इटली, आयर्लंड, हीं परतंत्र राष्ट्रें आपल्या राज्यकर्त्यांशीं लढून स्वतंत्र झालीं. अर्थातच भारतांतील राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या मनावर तेथील चळवळींचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. इटलींतील पुढारी मॅझिनी याच्या 'तरुण इटली' या गुप्त पक्षाचें अनुकरण आपल्या देशांत 'अभिनव भारत' या क्रान्तिकारक पक्षांत झालें. आयर्लंडांतील पुढाऱ्यांचे तुरुंगांतील आमरण उपवास व ब्रिटिश पार्लमेन्टवर बहिष्कार या चळवळीची कांहींशी छाप असहकारिता किंवा तुरुंगांतील उपोषणें या चळवळीवर पडली. कै. शिवरामपंत परांजपे यांच्या 'काळ' पत्रानें स्वित्झर्लंड, ग्रीस, टायरोल, स्पॅनिश, अमेरिका, इटली या अनेक देशांच्या स्वातंत्र्यकथा इ. स. १९०१ ते १९१० या काळांत महाराष्ट्रास उत्कंठेनें ऐकविल्या. कमीअधिक फरकानें अन्य प्रांतांत असे इतिहास वाचण्याकडे तत्कालीन तरुण पिढीचें लक्ष वेधण्यांत आलें होतें. सारांश, या स्वातंत्र्यकथांनीं भारतीयांचा मनःपिंड तयार झाला. त्यांपैकीं निवडक कथांचें समालोचन या भागांत केलें आहे.

२. इटलीचें एकराष्ट्रीयत्व :—मुसोलिनीच्या नांवावरून आजच्या पिढीला इटलीचें नांव परिचित आहे. हा इटली देश १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत एक राष्ट्र म्हणून ओळखला जात नव्हता. आल्पस् पर्वताच्या पायथ्यापासून सिसिली बेटापर्यंत सलग प्रदेश असूनही तेथें अनेक राज्यें होतीं. कांहीं भाग ऑस्ट्रियाच्या, कांहीं हॅम्बर्ग घराण्याच्या व रोम पोपच्या ताब्यांत तर बाकीच्या प्रदेशांत पीडमाँटसारखीं स्वतंत्र राज्यें अशी स्थिति होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नेपोलियननें हा सर्व सलग प्रदेश एकछत्राखालीं आणला होता; पण त्याच्या पराभवानंतर पूर्वींप्रमाणें त्याचे तुकडे करण्यांत आले. 'आम्ही पीडमाँटचे रहिवासी असो कीं सिसिलीचे असो, इटली हेंच आमचें राष्ट्र आहे.' असा एकराष्ट्रीयत्वाचा संदेश मॅझिनी या देशभक्तानें इटलीस दिला. त्यानें 'तरुण इटली' या गुप्त पक्षाची संघटना करून राजे लोकांस विरोध सुरू केला. त्याच्या पक्षांत पुढें गॅरिबाल्डी हा सेनानी सामिल झाला. या दोघांनाही सरकारनें हद्दपार केलें होतें. परंतु त्या दोघांनीं देशाबाहेर राहूनही इटलियनांत चैतन्य निर्माण केलें. पीडमाँटचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल राष्ट्रीय दृष्टीचा होता. त्यास इटलीचें एकीकरण हवें होतें. त्यानें आपल्या प्रजेस घटनात्मक अधिकार दिले व संधि साधून ऑस्ट्रियाशीं युद्धही केलें. त्याचा मंत्री काव्हूर यानें 'इटलीचें एकीकरण व परकीयांची हकालपट्टी' हें ध्येय डोळ्यापुढें ठेवलें. इंग्लंडमधील राजा असलेली लोकशाही इटलींत निर्माण करण्याचें त्याचें ध्येय होतें. इ. स. १८५४ च्या क्रिमियन युद्धांत व्हिक्टर–इमॅन्युएल इंग्रज-फ्रेंचांना मिळाला. त्यांनीं रशियाचा पराभव केल्यानें त्याचा प्रधानमंत्री काव्हूर याला तहपरिषदेंत मानाचें स्थान मिळालें. अशा रीतीनें इटलीच्या एकीकरणास इंग्रज–फ्रेंचांची सहानुभूति या राजानें मिळविली. फरान्सच्या साहृयानें त्यानें इ. स. १८५८ त ऑस्ट्रियावर हल्ला केला. परदेशस्थ झालेल्या गॅरिबाल्डीला साहृयास बोलाविलें. या युद्धांत ऑस्ट्रियाचा पराभव झाला. या अस्वस्थतेचा फायदा घेऊन कांहीं प्रांतांनीं बंडें केलीं व ते पीडमाँडच्या राज्यांत सामील झाले. इ. स. १८६० मध्यें गॅरिबाल्डीनें स्वयंसैनिकांचें सैन्य उभारून सिसिली व नेपल्सवर हल्ला केला. हीं राज्यें जिंकून त्यानें व्हिक्टरच्या स्वाधीन केलीं. अखेर, १८७० मध्यें रोमही त्यानें जिंकलें. इ. स. १८७२ मध्यें रोममध्यें सर्व इटली राष्ट्राची पार्लमेंट भरली. इंग्लंडप्रमाणें मर्यादित राजसत्तेची लोकशाही व्हिक्टरच्या नेतृत्वाखालीं स्थापण्यांत आली. इटलीच्या एकीकरणाचा मंत्र सांगणारा मॅझिनी, निःस्वार्थीपणें रणांगणावर तलवार गाजविणारा गॅरिबाल्डी, मुत्सद्देगिरीनें परराष्ट्रांचें सहाय्य मिळविणारा काव्हूर व राष्ट्रैक्यावर लक्ष ठेवणारा राजा व्हिक्टर इमॅन्युएल या चौघांचें स्मरण कोणत्याही स्वातंत्र्यप्रिय राष्ट्राला मंगलकारक आहे.

३. **आयर्लंड-इंग्लंडचा संघर्ष** :—इंग्लंडनें स्वतः लोकशाहीचा विकास केला; पण आपल्या साम्राज्यांतील देशांना स्वराज्य देण्यास फार आढेवेढे घेतले हें अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धानें स्पष्ट झालें आहे. १२ व्या शतकापासून ज्या देशास ब्रिटिशांची दडपशाही सोसावी लागली तो देश आयर्लंड होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. ११७१ मध्यें इंग्लंडचा राजा दुसरा हेन्री यानें हें बेट जिंकलें. या बेटांतील भाषा, धर्म, रीतिरिवाज हे इंग्लंडपासून भिन्नच राहिले. आयलँडला इंग्लंडप्रमाणेंच पार्लमेंटसभा होती; पण सातव्या हेन्रीनें त्या सभेकडून दोन कायदे पास करून घेतले. (१) इंग्लंडचे कायदे आयर्लंडास लागू आहेत, (२) व कोणताही कायदा इंग्लंडच्या राजाच्या संमतीवांचून पास होणार नाहीं. या कायद्यानें आयर्लंडचें असलेलें थोडेसें स्वातंत्र्यही नाहींसें झालें ! या कायद्यास 'पॉयोनिंग्जचे कायदे' असें म्हणतात, कारण त्या वेळीं तेथील इंग्रज कारभारी सर एडवर्ड पॉयनिंग्ज होता. एलिझाबेथच्या धर्मसुधारणेच्या काळांत आयरिश प्रजा कॅथॉलिक पंथासच चिकटून राहिली. तिच्या कारकीर्दींत ह्यू ओनील या आयरिश पुढाऱ्यानें अल्स्टर प्रांतांत उभारलेलें बंड सर्व आयर्लंडभर पसरलें. त्याचा उपशम इंग्रजांनीं क्रूरपणें केला व अलस्टरमध्यें जमिनी जप्त करून तेथें इंग्लिश व स्कॉटिश या प्रॉटेस्टंट लोकांच्या वसाहती केल्या. (इ. स. १६११). आजही या प्रांतांत प्रॉटेस्टंटांचें वर्चस्व आहे. पहिल्या चार्लसनंतर इंग्लंडांत लोकसत्ताक राज्य स्थापन झालें. या संधींत चार्लसचा मुलगा कॅथलिक असल्यानें त्यास आयरिशांनीं राजा म्हणून घोषित केलें. पार्लमेंटनें क्रॉम्वेलला तेथें पाठविलें (इ. स. १६४९). त्यानें सहा महिन्यांत रक्तपात करून सगळा देश इंग्रजांच्या सत्तेखालीं आणला. १६८९ च्या राज्यक्रान्तीनंतर आयर्लंडांत पुन: बंडें झालीं, पण इंग्लंडचा नवा राजा वुइल्यम यानें स्वत: आयर्लंडांत जाऊन त्या बंडाचा बीमोड केला. यावेळीं इंग्रजांनीं पिनल कोड नांवाचे कडक कायदे अमलांत आणले. कॅथॉलिकांस पार्लमेंटचा सभासद होण्यास, वकिलीचा धंदा करण्यास व शस्त्रें बाळगण्यास या कायद्यांनीं बंदी करण्यांत आली. प्रॉटेस्टंट–कॅथॉलिक विवाह बेकायदा ठरविला. आयर्लंडमधून गुरें व दूधदुभतें यांची निर्गत करण्यास बंदी केली; कारण इंग्लंडच्या धंद्याला त्याची चढाओढ बाधे. यामुळें तेथील प्रॉटेस्टंटांच्या धंद्यावरही धाड आली व तेही इंग्लंडवर रुष्ट झाले. पॉयोनिंग्ज कायद्यानें आयरिश पार्लमेंटला कांहीं स्वातंत्र्य राहिलें नव्हतेंच; तशांत इ. स. १७१९ पासून आयर्लंडसाठीं कायदे करण्याचा अधिकारच ब्रिटिशांनीं आपल्या हातांत घेतला.

४. **स्वतंत्र आयरिश पार्लमेंट** :—अशा रीतीनें धार्मिक, आर्थिक व राजकीय जाचांत असल्यानें आयर्लंडनें अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची संधि साधून ब्रिटिशविरोधी चळवळीस सुरुवात केली. या वेळीं हेन्री ग्रॅटन हा वक्ता या राष्ट्राचा पुढारी होता. त्यानें राष्ट्रीय दृष्टीनें कॅथॉलिक व प्रॉटेस्टंट यांचें सहकार्य केलें. पुढें खटपट करून धार्मिक छळाचे कांहीं कायदे पार्लमेंटकडून रद्द करविले. त्यानें स्वयंसैनिकांचें सैन्य उभारलें. अखेरीस इंग्लंड-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडून पायोनिग्जचे कायदे व इ. स. १७१९ चा कायदा रद्द करविला व आयरिश पार्लमेंट स्वतंत्र केली. यामुळें आयर्लंडचा व्यापार व उद्योगधंदे यांची पुनः भरभराट सुरू झाली.

५. कॅथॉलिकांना मताचा अधिकार :—अमेरिकन राज्यक्रांतीप्रमाणें फ्रेंच राज्यक्रांतीचाही परिणाम आयर्लंडवर झाला. आयरिशांनीं वुल्फटोन याच्या नेतृत्वाखालीं 'युनायटेड आयरिश मॅन' पक्ष स्थापला. या पक्षाच्या चळवळीनें कॅथॉलिकांस पार्लमेंटच्या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार इंग्रजांनीं दिला, मात्र पार्लमेंटचे सभासद होण्यास त्यांजवर बंदी चालू राहिली. अर्थांतच चळवळचांचें समाधान झालें नाहीं. आयर्लंडांत वुल्फटोननें बंड उभारलें; पण जोर पकडण्यापूर्वींच सरकारनें विरोधकांना पकडून तें मोडून काढलें. या तंटयांतून मार्ग काढण्यासाठीं इंग्लंडचा मुख्य प्रधान पिट यानें आयरिश पार्लमेंट व इंग्लिश पार्लमेंट यांच्या एकीकरणाचा कायदा केला (इ. स. १८००). राजकीय सवलती देण्याचें आमिष दाखवून या कायद्यास पिटनें कॅथॉलिकांची संमति मिळविली होती. दोन्ही पार्लमेंट एक केल्यावर कॅथॉलिकांच्या सवलतीचें बिल पिटनें पार्लमेंटपुढें आणण्याचें ठरविलें; पण त्या वेळचा इंग्लिश राजा तिसरा जॉर्ज यानें ही गोष्ट करण्यास नकार दिल्यानें तें पास होऊं शकलें नाहीं ! यामुळें आयर्लंडांत असंतोष धुमसत राहिला. या असंतोषाला डॅनिअल ओकॉनेल या आयरिश पुढाऱ्यानें वाचा फोडली. कॅथॉलिकांना पार्लमेंटचे सभासद होतां येत नसलें तरी त्यांना अनुकूल सभासद निवडून यावेत म्हणून त्यानें कॅथॉलिक समिति स्थापिली. याचा परिणाम इंग्रजांना जाणवूं लागला. कांहीं वर्षें ही समिति त्यांनीं बेकायदाही ठरविली. इ. स. १८२८ त ओकॉनेल यासच क्लेअर परगण्यांतून पार्लमेंटसाठीं आयरिशांनीं निवडून दिलें. हें बेकायदा होतें; पण त्यास अमान्य करावें तर फारच मोठचा असंतोषास सरकारला तोंड द्यावें लागलें असतें. ब्रिटिशांनीं यासाठीं कॅथॉलिकांवरील निवडणुकींतील व सरकारी नोकऱ्यांतील निर्बंध काढून टाकले. अर्थातच आतां कॅथॉलिक पार्लमेंटचे सभासद होण्यास पात्र ठरले. ओकॉनेलचा हा मोठाच विजय होय.

६. सामाजिक बहिष्कार :—त्याच सुमारास अमेरिकेंत वसाहतींस गेलेल्या आयरिशांनीं न्यू यॉर्क येथें 'फिनियन समिति' स्थापन केली. तिच्या द्वारें इंग्लंड-आयर्लंडांत अत्याचार केले गेले. यामुळें आयर्लंडचा प्रश्न जगापुढें आला. इ.स. १८६९ मध्यें ब्रिटिश सरकारनें आयर्लंडांतील सरकारी प्रॉटेस्टंट धर्मखातें रद्द केलें व त्यासाठीं घेतला जाणारा करही काढून टाकला. आयर्लंडचें धार्मिक दुःख दूर झालें; पण राजकीय अडचण चालू राहिली. आयरिश पुढाऱ्यांनीं देशभर सभा भरवून सनदशीरपणें ब्रिटिशांना विरोध चालविला. पण त्यांनाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुरुंगांत डांबण्यांत आलें. यामुळें आयरिशांचा शांततेच्या मार्गावरील विश्वास उडाला. नंतर 'तरुण आयर्लंड' पक्षानें सशस्त्र बंड केलें; पण त्याचा कडक बंदोबस्त करण्यांत आला. १८७४ त आयर्लंडमधून ब्रिटिश पार्लमेंटांत निवडून आलेल्या बहुसंख्य सभासदांचा नवा पुढारी आयझॅक बट हा होता. पार्लमेंटांत त्यानें आयरिश होमरूलचा ठराव मांडला;- पण त्यांस इंग्रज सभासदांची संमति मिळाली नाहीं. या सदस्यांस चार्लस स्टुअर्ट पार्नेल हा पुढारी पुढें लाभला. त्यानें पार्लमेंटच्या कामांत लांब भाषणें करून, प्रश्न विचारून नियमबद्ध अडथळा सुरू केला. हेतु हा कीं प्रधानमंडळानें आयरिश प्रश्नाकडे लक्ष द्यावें. १८७९ मध्यें त्यानें शेतकी संघ स्थापला. त्या संस्थेनें जमीनदार मालकांविरुद्ध सामाजिक बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू केली. 'कॅप्टन बायकॉट' याविरुद्ध पहिल्यांदा बहिष्कार सुरू झाला, म्हणून बायकॉट या शब्दाचा अर्थच पुढें बहिष्कार असा झाला.

७. **मिळालेलें स्वराज्य तहकूब** :—इ. स. १८८० मध्यें शेतकऱ्यांसाठीं जमिनीची विक्री करण्याचा, ती कसण्याचा व योग्य खंड मिळण्याचा अधिकार ग्लॅडस्टनच्या प्रधानमंडळानें आयर्लंडला दिला. पण एवढ्यानें आयरिश जनता शांत झाली नाहीं. त्यांनीं जमीनदारांना खंड न देण्याचें आंदोलन चालू केलें. या चळवळींत पार्नेल आदि पुढाऱ्यांस तुरुंगांत टाकण्यांत आलें; पण लवकरच त्याची सुटका करण्यांत आली. नंतर डब्लिन येथें मुख्य मंत्री कॅव्हेंडिश व उपमंत्री बर्क यांचे खूनही विरोधकांनीं केले! कारण आयर्लंडचें खरें दुःख, धार्मिक व जमीनविषयक नव्हतें. या सगळ्या दुःखाचा परिहार करण्याची राजकीय सत्ता त्यांस नव्हती हें आयरिशांचें शल्य होतें. पारतंत्र्यांतील सर्व दुःखांवर तोडगा स्वातंत्र्याचा आहे. तें आयर्लंडला पाहिजे होतें. हें मुख्य प्रधान ग्लॅडस्टन यानें ओळखलें व आयर्लंडला स्वराज्य (होमरूल) देण्याचें त्यानें ठरविलें. त्यामुळें त्याच्या लिबरल पक्षांत दुफळी झाली. कारण कांहींना ग्लॅडस्टनचें हें धोरण पसंत नव्हतें! त्याच्या ठरावाला कॉमन्स सभेंत आवश्यक बहुमत मिळालें नाहीं (इ. स. १८६६). पुढील निवडणुकींत याच प्रश्नावर ग्लॅडस्टननें बहुमत मिळविलें. कॉमन्स सभेंत हें बिल पास झालें; पण लॉर्डांनीं विरोध केल्यानें त्याचें कायद्यांत रूपांतर होऊं शकलें नाहीं. इ. स. १९११ च्या कायद्यानें पार्लमेंटमध्यें लॉर्डांचे अधिकार कमी झाले. त्याचा फायदा घेऊन इ. स. १९१४ मध्यें त्या वेळच्या लिबरल प्रधानानें आयर्लंडचें होमरूल बिल पास केलें व ग्लॅडस्टनचें वचन पूर्ण केलें. पण महायुद्ध सुरू झाल्यानें तो कायदा स्थगित करण्यांत आला.

८. **डी. व्हॅलेरावें पुढारीपण** :—आयरिश जनता अस्वस्थच होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेथें सिनफेन (आमचे आम्ही) पक्ष स्थापन झाला. याच पक्षांत प्रसिद्ध पुढारी डी व्हॅलेरा हा होता. या पक्षाच्या निवडून आलेल्या आयर्लंडच्या सभासदांनीं आयर्लंड लोकसत्ताक आहेच असें ठरवून लंडनला न जातां आपली सभा डब्लिनलाच घेतली व तुरुंगांत असलेल्या डी व्हॅलेरास अध्यक्ष निवडलें! त्याची मोठ्या युक्तीनें आयरिशांनीं सुटका करविली. नंतर तो अमेरिकेंत गेला व आयर्लंडचा अध्यक्ष या नात्यानें आपल्या पक्षाच्या प्रचारासाठीं त्यानें पैसा जमविला. मुख्य प्रधान लॉईड जॉर्ज यानें या पक्षाशीं तह केला व इ. स. १९२२ मध्यें आयर्लंडला स्वराज्य देण्यांत आलें. अल्स्टर प्रांत इंग्लंडलाच चिकटून राहिला. नवीन राज्यांत निवडणुकीनंतर नेमस्त पक्षाचा कारभार आयर्लंडांत चालला. इ. स. १९२७ मध्यें डी व्हॅलेराचा पक्ष विरोधी पक्ष म्हणून आयरिश पार्लमेंटांतील कामांत भाग घेऊं लागला. इ. स. १९३२ च्या निवडणुकींत त्याच्या पक्षास बहुमत मिळालें. डी व्हॅलेरा आतां कायदेशीरपणें आयर्लंडचा अध्यक्ष झाला. त्यानें हळूहळू, सभासदांनीं राजनिष्ठेची शपथ घेणें, आयरिश जमिनीचा मोबदला ब्रिटिश सरकारला देणें, ब्रिटिशांचा गव्हर्नर आयर्लंडांत असणें या गोष्टी बंद केल्या. दुसऱ्या महायुद्धांत इंग्लंडला मदत न करतां आयर्लंड देश त्यानें तटस्थ ठेवला! आयर्लंडमधील 'अल्स्टर' भाग इंग्लंडला चिकटून आहे हें दुःख अद्याप आयरिश लोकांच्या मनांत आहे.

९. आठशें वर्षांचा झगडा :—आयर्लंडनें इंग्लंडशीं कित्येक शतकें कधीं शस्त्रबलानें तर कधीं सनदशीरपणें सतत झगडा केला. लोकांनीं चळवळ करावी, कधीं कधीं तिला हिंसात्मक रूप यावें आणि मग ब्रिटिश पार्लमेंटनें कांहीं हक्क या देशास द्यावे या पद्धतीनें आयर्लंड राष्ट्र स्वतंत्र झालें. या आठ शतकांच्या झगड्यांत धीरोदात्त व त्यागी पुढारी आयर्लंडला लाभले. भारतीयांना स्वतःच्या स्वातंत्र्य चळवळींत आवश्यक असणारें मनोधैर्य द्विगुणित होण्यास आयरिश पुढाऱ्यांच्या चरित्रवाचनाचा उपयोग झाला.

१०. चीन–भारत संबंध :—युरोपांतील लढ्याप्रमाणें आशियांतील चीन देशांतील स्वातंत्र्याचा लढा उद्बोधक आहे. कोट्यवधि लोक, विस्तीर्ण प्रदेश आणि प्राचीनता यांत चीनशीं भारताचें साम्य आहे. चीनशीं प्राचीन काळीं भारताचे सांस्कृतिक व व्यापारी संबंध होते. मुसलमानांचें अफगाणिस्थानांत राज्य झाल्यावर पामीरमार्गें चीनशीं चालू असलेलें दळणवळण तुटलें आणि पाश्चिमात्य व्यापाऱ्यांचें १७व्या शतकांत हिंदी महासागरांत प्रभुत्व स्थापन झाल्यापासून समुद्रमार्ग बंद झाला.

११. चीनांत ब्रिटिशांचा प्रवेश :—ईस्ट इंडिया कंपनीचें बस्तान भारतांत चांगलें बसल्यावर ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांतील अफू चीनमध्यें विकून फायदा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळविण्यास सुरुवात केली. अफूमुळें चिनी लोकांची कार्यशक्ति नष्ट होते असें चिनी लोकांस व सरकारास वाटे. त्यांनीं या अफूच्या व्यापारावर निर्बंध घातले. तरीही ब्रिटिशांनीं आयात चालू ठेवली. त्यामुळें संतापून चिन्यांनीं एक हजार पौंड अफू बुडविली. इंग्रजांना याचा राग आला. हें प्रकरण युद्धापर्यंत आलें. त्यांत चीनचा पराभव झाला (इ. स. १८४३). यानंतर चिनी सरकारनें तह केला आणि चिनी बंदरें परकीय व्यापाऱ्यांना खुलीं केलीं. यावेळीं हाँककाँग इंग्रजांस मिळालें. कांहीं वर्षांनीं निमित्त काढून इंग्रज-फ्रेंचांनीं संयुक्तपणें चीन सरकारवर दडपण आणून परकीय व्यापारी व मिशनरी यांनीं चीनांत प्रवेश मिळवून घेतला (इ.स. १८६०). या परकीयांनी चीनची आर्थिक व धार्मिक पिळवणूक चालविली. अशा स्थितींत जपान-चीनच्या चालू असलेल्या युद्धांत चीन पराभूत झाला (इ. स. १८९५). युरोपियन राष्ट्रांनीं ही संधि साधून चीनकडून आणखी व्यापारी सवलती मिळविल्या. रशियानें पोर्टऑर्थर, जर्मनीनें क्यौचाचू, इंग्लंडनें वाहैवी हीं ठाणींही काबीज केलीं.

१२ **बॉक्सर बंड** :—१९ व्या शतकांतील चीनची राजकीय घटना जुन्या पद्धतीची होती. या शतकाच्या अखेरीस मांचू घराणें तेथें राज्य करीत होतें. जुनीं आयुधें व जुन्या कल्पनांनीं चालणारी सरंजामपद्धति तेथें चालू होती. पाश्चिमात्यांच्या आलेल्या धाडीपुढें तिचा टिकाव लागणें कठिण होतें. इ. स. १९१२ मध्यें चीनमध्यें क्रांति झाली व मध्यवर्ती सत्ता ढांसळली. प्रांतोप्रांतींचे सेनानी व सुभेदार स्वतंत्र झाले व किनारा विभागांत तळ दिलेल्या परकीयांशीं संधानें बांधण्यास त्यांनी सुरुवात केली. या संधीचा फायदा परकीयांनीं घेण्यापूर्वीं राष्ट्रीय चळवळीचा तेथें उदय झाला. 'बॉक्सर बंड' म्हणून ओळखली जाणारी चळवळ यांपैकींच होय. हा चिनी देशभक्तांचा एक संघ होता. युरोपियनांनीं विशेषतः मिशनऱ्यांनीं चीन देशांत जी धर्मांतराची चळवळ चालविली ती त्यांस मान्य नव्हती. इतर व्यवहारांत हे मिशनरी लुडबुड करीत तें त्यांना खपत नसे. चिनी लोकांचा अभिमान आणखी एका कारणानें जागृत झाला. इ. स. १८९२ मध्यें अमेरिकेंत चिनी लोकांना उतरण्यास बंदी करणारा कायदा पुकारण्यांत आला. ऑस्ट्रेलियांतही त्यांना स्थायिक होण्यास विरोध होताच. आपल्या देशांत मात्र परकीयांना सर्व सवलती मिळाव्या आणि आपणांस त्यांच्या देशांत जातां येऊं नये हें पाहून चिनी देशभक्तांना दुःख होई. या सगळ्यांचा उद्रेक बॉक्सर बंडांत झाला. (इ. स. १९००). त्यांनीं पेकिंग राजधानींत युरोपियन विभागास वेढा घातला आणि कित्येक युरोपियनांस ठार केलें. देशभर कमीअधिक प्रमाणांत हे प्रकार झाले. पाश्चिमात्यांनीं याचा वचपा काढण्यासाठीं चीनची राजधानी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पेकिन या शहरावर संयुक्त हल्ला केला व चिनी सरकारवर अपमानकारक अटी आणि कोटचवधि रुपयांची खंडणी लादली.

१३. **प्रजासत्ताकाची स्थापना** :—याच वेळीं जपान-रशियाचे संबंध बिघडून त्यांचें युद्ध झालें आणि त्यांत जपानी लोक विजयी झाले (इ. स. १९०५). या घटनेनें चिन्यांचा आत्मविश्वास वाढला. पाश्चिमात्यांचा पराभव जपानी करूं शकतात तर आपणांस तें काय अशक्य आहे ? जपान्यांनीं ज्या पाश्चिमात्य विद्या हस्तगत केल्या त्या आपण करूं या असें त्यांच्या मनानें घेतलें. युरोपियन विद्यांचा अभ्यास सुरू झाला आणि लोकजागृति अधिक होऊं लागली. आपल्या देशांत पाश्चिमात्य देशांप्रमाणें लोकराज्यच स्थापावें असा ध्यास घेणाऱ्या चिनी देशभक्ताचें नांव सन्यत्सेन होय. त्याचा जन्म इ. स. १८६६ मध्यें झाला. बॉक्सर चळवळीच्या वेळींच त्यानें 'चीनला लोकराज्य पाहिजे' हा विचार प्रसृत करण्यास आरंभ केला होता. मांचू घराणें अथवा खरें म्हणजे कोठलेंच राजघराणें चीनमध्यें राज्य न करतां पाश्चात्य पद्धतीच्या लोकतंत्र राज्याची स्थापना व्हावी यासाठीं त्यानें संघटना केली. सैन्य व आरमार यांच्यांत त्यानें हे विचार पेरले. बॉक्सर चळवळ दडपली गेली तरी तेव्हांपासून चीनमध्यें अंतर्गत स्वस्थता नांदली नाहीं. अखेर १० ऑक्टोबर १९११ ला सन्यत्सेनला क्रान्ति करण्यांत यश आलें. दक्षिण व मध्य चीनमध्यें राजसत्ता नष्ट करण्यांत आली. नानकिंग येथें लोकसत्ताक राज्य सुरू होऊन त्याचें अध्यक्षपद डॉ. सन्यत्सेन यांस देण्यांत आलें. पेकिंगमध्यें राजशाही चालू होती; पण आपले दिवस संपले हें ओळखून राजानें लवकरच राज्यत्याग केला. पण चीनचा हा उत्तर भाग प्रजासत्ताकाच्या ताब्यांत येऊं शकला नाहीं. कारण राजघराण्याचा एकसूत्रीपणा जातांच लहान लहान सुभेदारांनीं आपापलीं राज्यें तेथें निर्माण केलीं. सन्यत्सेननें लोकराज्य बळकट करण्याचा यत्न चालविला. इ. स. १९२४ मध्यें रशियाकडून त्यास चांगलें सहाय्य मिळालें; परंतु त्याचा पूर्ण उपयोग होण्यापूर्वींच इ. स. १९२५ मध्यें सन्यत्सेन मरण पावला.

१४. **चिआंग कै शेक व माउत्से तुंग** :—त्याच्या अनुयायांत भिन्न भिन्न विचारांचे लोक होते. ही दुफळी त्याच्या मृत्यूनें उसळून आली. साम्यवादी (कम्युनिस्ट) गटापासून चिआंग-कै-शेक निराळा झाला. त्यानें नानकिंग येथें राष्ट्रीय सरकार स्थापलें व साम्यवाद्यांशीं युद्ध सुरू केलें. इ. स. १९३० चे सुमारास जपानचें चीनवर जोराचें आक्रमण सुरू झालें. त्याला तोंड देण्यास कांहीं काळ हे पक्ष एक झाले. या चीन-जपान युद्धांत चीनबद्दल सद्भावनेचें चिन्ह म्हणून भारतीय राष्ट्रीय सभेनें आपलें एक वैद्यकीय शुश्रूषापथक चीनमध्यें पाठविलें होतें. १० वर्षें युद्ध करून चीननें जपानला पुष्कळ अंशीं अयशस्वी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलें. हें एवढें यश हातीं येतांच चँग-कै-शेकचा पुनः साम्यवाद्यांशीं तंटा सुरू झाला. चँगला अमेरिकेचें पाठबळ मिळत आलें व साम्यवाद्यांना रशियाचें. गेल्या दोन वर्षांपूर्वी शेवटीं साम्यवादी पुढारी माउत्से तुंग यशस्वी झाला. आज चीन त्याच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र झाला असून साम्यवादाच्या तत्त्वांवर तो चीनची आर्थिक व राजकीय घडी बसवीत आहे.

प्रश्न

१. इटलीच्या स्वातंत्र्ययुद्धाचीं वैशिष्टचें सांगा. २. आयर्लंडचें मूळ दुखणें कोणतें ? अद्यापही इंग्लंडविरुद्ध आयर्लंडची कोणती तक्रार शिल्लक आहे ? ३. महत्त्व सांगा :—'बॉक्सर बंड', गॅरीबाल्डीची सिसीलीवर स्वारी व पार्नेलचें नेतृत्व.

अभ्यास

(१) वाचा :—स्वाध्याय मालेंतील इटलीच्या स्वातंत्र्याचें युद्ध. (२) तुम्ही वाचलेल्या स्वातंत्र्यलढ्यांतील कोणता लढा तुम्हांस विशेष स्फूर्तिदायक वाटतो तें सांगा.

भाग ४० वा

भारतीय स्वातंत्र्याचा लढा

१. राष्ट्रीय सभेची स्थापना :—इंग्रजी शिक्षणानें तयार झालेल्या भारतीयांना आपणांस इतर देशांतील लोकांप्रमाणेंच हक्क व अधिकार असावेत असें वाटूं लागलें. इंग्रजी भाषा सर्वत्र प्रचलित झाल्यानें सर्वांस सुलभ रीतीनें विचारविनिमय करतां येऊं लागला. स्वतःच्या देशांत इंग्रज लोकांनीं आपल्या राजाविरुद्ध ज्या रीतीनें चळवळ केली त्याच पद्धतीचें ज्ञान झाल्यानें येथील पुढाऱ्यांनीं त्यांचाच कित्ता गिरविला. या दृष्टीनें विचारविनिमय करतां यावा म्हणून राष्ट्रीय सभा इ. स. १८८५ सालीं लॉर्ड डफरिनच्या कारकीर्दींत स्थापन झाली. त्यापूर्वीं पुण्यास 'सार्वजनिक सभा', मुंबईस 'बॉंबे ॲसोसिएशन', कलकत्त्यास 'ईस्ट इंडिया ॲसोसिएशन' अशा प्रकारच्या संस्था स्थापन झालेल्या होत्या. त्या सरकारकडे वारंवार स्थानिक गाऱ्हाण्यांबद्दल तक्रारी अर्ज करीत असत. परंतु ह्या सर्वांस एकत्र आणण्याचें श्रेय ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम यांसच आहे. म्हणून त्यांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'काँग्रेसचे उत्पादक' असें म्हणतात. याशिवाय बंगालच्या बाजूस सुरेंद्रनाथ बानर्जी व उमेशचंद्र बानर्जी, मुंबईस काशीनाथ त्रिंबक तेलंग, सर फिरोजशहा मेथा व पुण्यास सीतारामपंत चिपळूणकर व कृष्णाजीपंत नूलकर वगैरे मंडळींनीं राष्ट्रीय सभा काढण्यांत प्रमुख भाग घेतला होता. परंतु ह्यूमसाहेबांच्या मदतीनें सर्वांचेंच काम बरेंच सुलभ झालें. कारण त्यांनीं लॉर्ड डफरिन ह्यांस भेटून त्यांची ह्या कार्यास सहानुभूति संपादन केली. पहिली सभा पुण्यास भरणार होती. परंतु आयत्या वेळीं पुण्यास रोगराई उत्पन्न झाल्यामुळें ती मुंबईस भरली. सभेस निरनिराळ्या ठिकाणचे ७२ प्रतिनिधी हजर होते व उमेशचंद्र बानर्जी हे अध्यक्ष होते. त्या वेळीं (१) विलायतेंत व हिंदुस्थानांत एकाच वेळीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा घ्यावी म्हणजे हिंदुस्थानांतील लायक लोकांचा राज्यकारभारांत प्रवेश होणें सुलभ होईल. (२) सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या मदतीला दिलेलें इंडिया कौन्सिल काढून टाकावें, (३) कायदे कौन्सिलांत लोकांचे प्रतिनिधी घ्यावेत, अशा काँग्रेसच्या मुख्य मागण्या होत्या.

२. **प्रतिनिधींची संख्या** :—यानंतर राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें दर वर्षी नाताळांत हिंदुस्थानांतील प्रमुख ठिकाणीं होऊं लागलीं व महत्त्वाचे ठराव पास होऊं लागले. सभेच्या प्रतिनिधींची संख्या एकसारखी वाढत वाढत चौथ्या वर्षी ती हजारावर गेली. पुढील वर्षी राष्ट्रीय सभेंत १,८०० प्रतिनिधी हजर राहिले. परंतु पहिलीं तीस वर्षें राष्ट्रीय सभेस सरासरीनें १,००० प्रतिनिधी हजर असत व हे जाहीर सभांच्या द्वारें निवडले जात. इ. स. १९१५ त प्रतिनिधींचा आंकडा २,००० वर गेला व इ. स. १९२० त नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत १०,००० प्रतिनिधी हजर होते. तेव्हां मात्र प्रतिनिधींची संख्या अफाट फुगलेली पाहून तिला चालकांनीं आळा घातला. यापुढें प्रांतानिहाय नियमित प्रतिनिधी घेण्यांत येऊं लागले व एकंदर संख्या ६,००० वर आणली.

३. **त्रोटक इतिहास** :—राष्ट्रीय सभेच्या इतिहासाचे कांहीं ठळक भाग पडतात. इ. स. १८८५ ते १८९७ पर्यंतचा 'ठराव करण्याचा काळ.' ह्या काळांत राष्ट्रीय सभेचे पुढारी दर वर्षी एकत्र जमून भाषणें करून ठराव पास करीत. परंतु त्यामुळें कांहींही उपयोग होत नाहीं असें पाहिल्यावर राष्ट्रीय सभेनें विलायतेंतील मतदार लोकांपुढें आपलीं गाऱ्हाणीं मांडण्याकरितां शिष्टमंडळें पाठविलीं. सुरेंद्रनाथ बानर्जी, ना. गोखले यांच्यासारखे लोक अनेक वेळां विलायतेस व्याख्यानाकरितां गेले; परंतु त्यामुळेंही कांहीं विशेष उपयोग होईना. उलट इ. स. १८९८ पासून कर्झनचा अंमल सुरू झाल्यामुळें अधिकाधिक दडपशाही सुरू झाली व सरकारचा राष्ट्रीय सभेस उघड उघड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विरोध होऊं लागला. तेव्हां देशांत तरुण पक्ष उदयास आला; व त्यानें 'स्वदेशी व स्वावलंबन' या तत्त्वांचा पुरस्कार केला. म्हणून इ. स. १८९८ ते १९०८ या काळास 'स्वदेशीचा काळ' असें नांव देतां येईल. केवळ अर्ज-विनंत्या करून भागणार नाहीं; तर आपल्या मागण्या मान्य करून घेण्या-साठीं स्वदेशीचा आश्रय करावा, विलायती मालावर बहिष्कार टाकावा म्हणजे विलायतच्या व्यापारावर त्याचा परिणाम होईल व इंग्रजांचें लक्ष आपोआपच हिंदुस्थानच्या मागण्यांकडे वळेल असें या पक्षाचें म्हणणें होतें. लो. टिळक व लाला लजपतराय हे या मार्गाचे पुरस्कर्ते होते. दिवसेंदिवस तरुण राष्ट्रीय पक्ष लोकप्रिय व जोमदार बनला व कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष पितामह दादाभाई नौरोजी यांनीं आपल्या भाषणांत इ. स. १९०६ सालीं 'स्वराज्या'चा उच्चार केला व स्वदेशीच्या तत्त्वास आपला पाठिंबा दिला. इ. स. १९०७ सालीं सुरत येथें या नव्या राष्ट्रीय व जुन्या नेमस्त पक्षाचा खटका उडून सभेंत बखेडा माजला व सभा उधळली गेली. याच वेळीं लॉर्ड कर्झनच्या दडपशाहीमुळें निराश होऊन देशांत क्रान्तिकारकांचा उदय झाला. तेव्हां सरकारनें कडक कायदे करून क्रान्तिकारकांचें उच्चाटन केलें; व तरुण राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांस त्यांच्या जहाल भाषणांबद्दल व लेखांबद्दल शिक्षा केल्यामुळें इ. स. १९०९ ते १४ पर्यंत राष्ट्रीय सभेचें नेतृत्व नेमस्त पक्षाकडे राहिलें व स्वदेशी चळवळीची पहिली लाट ओसरली. इ. स. १९०९–१४ हा तिसरा कालविभाग होय.

४. **होमरूल लीग** :—इ. स. १९१४ सालीं महायुद्ध उपस्थित झालें. त्यांत हिंदुस्थाननें इंग्रज सरकारला मदत केली. हिंदुस्थानास कांहीं राजकीय हक्क दिले पाहिजेत असें सरकारास वाटूं लागलें. तेव्हां राजकीय मागण्या मागण्याकरितां चळवळीची एकच लाट उत्पन्न झाली. लो. टिळकांनीं 'होमरूल लीग' म्हणजे स्वराज्यसंघाची स्थापना करून देशभर लोकजागृती-साठीं दौरे केले. कॉंग्रेसनें केलेल्या ठरावाप्रमाणें नित्य चळवळ करण्याची व्यवस्था त्यावेळीं नव्हती. हें काम होमरूल लीग द्वारें सुरू झालें. मद्रासकडे असाच स्वराज्य संघ ॲनी बेझंट बाईंनीं काढला होता. त्यातर्फे त्या दौऱ्यावर असतांना त्यांना सरकारनें तुरुंगांत डांबलें. पण सर्वत्र निषेधाचे ठराव पास झाल्यानें त्यांची मुक्तता करण्यांत आली. याच सुमारास पूर्वीचे राष्ट्रीय व नेमस्त हे पक्ष एक झाले व सर्वांनीं जबाबदारीच्या स्वराज्याची एकच मागणी केली व ती इ. स. १९१९ सालीं सुधारणा कायदा पास होऊन अल्पांशानें पूर्ण झाली. म्हणून इ. स. १९१४–१९ ह्या काळास 'स्वराज्याच्या चळवळीचा काळ' असें नांव देतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. असहकारितेचा उदय :—यावेळीं सुधारणेच्या योजनेची चर्चा सुरू होती. तथापि सरकारनें रौलट कमिटीच्या शिफारशीवरून जाहीर सभेवर नियंत्रण घालणारे कायदे लोकमताच्या विरोधास न जुमानतां पास करून घेतले. या कायद्याचा निषेध करण्याकरितां अमृतसर येथें जालियनवाला बागेंत भरलेल्या जाहीर सभेवर लष्करी अधिकाऱ्यांनीं गोळीबार करून ती सभा मोडली (इ. स. १९१९). त्यांत अनेक लोक प्राणास मुकले. ह्यामुळें देशांत भयंकर असंतोष उत्पन्न होऊन महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं असहकारितेची चळवळ उत्पन्न झाली. जिकडे तिकडे विद्यार्थ्यांनीं सरकारी व निमसरकारी शाळा सोडल्या व वकिलांनीं वकिली बंद केली. सरकारी बहुमानाच्या पदव्या मिळालेल्यांनीं पदव्यांचा त्याग केला. यावरोबरच खादीचाही चोहोंकडे जोरानें प्रसार झाला.

६. सायमन कमिशनवर बहिष्कार :—असहकारितेची चळवळ इ. स. १९२१ पासून १९२२ च्या मध्यापर्यंत अतिशय जोरांत होती. परंतु त्या चळवळींतील कित्येक कार्यक्रमांची अव्यवहार्यता लक्षांत आल्यामुळें ती चळवळ लवकरच थंडावली. परंतु देशांत उत्पन्न झालेल्या अभूतपूर्व राजकीय जागृतीचें श्रेय असहकारितेच्या चळवळीस दिलें पाहिजे. इ. स. १९२३ पासून चित्तरंजन दास यांच्या नेतृत्वाखालीं कौन्सिलांतील अडवणुकीची चळवळ सुरू झाली. ती इ. स. १९२५ सालीं चित्तरंजन दास मृत्यु पावल्यामुळें मागें पडली. १९२६ पासून देशांत हिंदुमुसलमानांचे दंगे सुरू झाले. हिंदूंनीं संघटन व शुद्धीकरणाची चळवळ सुरू केली व ते परधर्मीयांस हिंदु धर्मांत घेऊं लागले. इ. स. १९२६च्या अखेरीस हिंदुसंघटनेचे पुढारी स्वामी श्रद्धानंद यांचा खून झाला. इ. स. १९२७ च्या अखेरीस सरकारनें सुधारणा कायद्याची फेरतपासणी करण्याकरितां सर जॉन सायमन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पार्लमेंटांतील हुजूर, मजूर व उदार या तिन्ही पक्षांच्या मिळून सात सभासदांचें कमिशन नेमलें. देशांतील प्रमुख पुढाऱ्यांस या कमिशनमध्यें हिंदी प्रतिनिधि नसल्यामुळें त्याची रचना सदोष वाटून त्यांनीं त्यावर बहिष्कार टाकला. ह्या बहिष्कारास न जुमानतां तत्कालीन हुजूर मंत्रिमंडळानें सायमन कमिशनसंबंधींचें आपलें धोरण कायम ठेविलें. ह्यामुळें देशांत तीव्र असंतोष पसरला. हिंदुस्थानांतील प्रमुख राजकीय पक्षांनीं एक होऊन पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमून राष्ट्राच्या मागण्यांचा जो रिपोर्ट तयार केला, त्यास 'नेहरू रिपोर्ट' म्हणतात. पण सरकारनें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. तेव्हां पं. जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं 'स्वातंत्र्यवादी' तरुण पक्ष पुढें आला. याच सुमारास क्रान्तिकारकांना जोर येऊन भगतसिंग या क्रान्तिकारकानें इ. स. १९२९ च्या प्रारंभीं दिल्ली येथील कायदे-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंडळाच्या सभागृहांत सर्व सभासद बसले असतां बॉंब फेंकला. त्यानें कोणास फारशी इजा झाली नाहीं. तेव्हांपासून सरकारच्या पोलिसखात्यानें सर्वत्र कसून चौकशी करून अनेक लोकांस पकडलें. लाहोर येथील राजकीय कैद्यांना हव्या होत्या त्या सवलती न मिळाल्यामुळें त्यांच्यांतील करारी लोकांनीं सत्याग्रह करून अन्नपाणी वर्ज्य केलें. त्यामुळें त्यांच्यांतील जितेंद्रनाथ हा मृत्यु पावला. मरणसमयीं त्याचें वय अवघें २४ वर्षांचें होतें.

७. ऑक्टोबर ३१, १९२९चा जाहीरनामा:—सायमन कमिशनचें चौकशीचें काम संपल्यावर हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन हे ब्रिटिश प्रधान मंडळाशीं खलबत करण्यासाठीं विलायतेस गेले. इ. स. १९२९ त विलायतेंत पंचवार्षिक निवडणूक होऊन पार्लमेंटांतील मजूर पक्षाची सरशी झाली व हुजूर पक्ष मागें पडला. तेव्हां रॅम्से मॅक्डोनल्ड हे इंग्लंडचे मुख्य प्रधान झाले. लॉर्ड आयर्विन हे विलायतेंतील मुत्सद्यांचा विचार घेऊन हिंदुस्थानांत आल्यावर त्यांनीं ऑक्टोबर ३१, १९२९ रोजीं जाहीरनामा काढला. त्यांत हिंदुस्थानांत वसाहतीच्या दर्जाचें स्वराज्य स्थापन करणें हें हिंदुस्थानांत क्रमाक्रमानें होणाऱ्या राजकीय सुधारणेच्या विकासाचें ध्येय आहे असें जाहीर केलें व नवी राज्यघटना सर्वांच्या संमतीनें तयार व्हावी म्हणून एक संयुक्त गोलमेज परिषद बोलावून त्यांत इंग्लंड, हिंदुस्थान व हिंदी संस्थानिक यांचे पुढारी बोलाविले जातील असें आश्वासन दिलें.

८. पहिली गोलमेज परिषद:—या आश्वासनानें जनतेंतील वाढत्या आकांक्षांचें समाधान झालें नाहीं. इ. स. १९३० च्या मार्च महिन्यांत महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं अनत्याचारी कायदेभंगाची मोहीम सुरू होऊन पुढील दहा महिन्यांत ६०,००० लोक तुरुंगांत गेले. हा प्रकार केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासांतील स्वातंत्र्य-संग्रामांत अपूर्व होता. मध्यंतरीं इ. स. १९३० च्या जून महिन्यांत सायमन कमिशनचा निराशाजनक रिपोर्ट दोन हप्त्यांनीं प्रसिद्ध झाला. त्यामुळें लोकांची अधिक तीव्र निराशा झाली. चळवळ बळावली, नेमस्तही कडक विरोधाची भाषा बोलूं लागले. हें चळवळीचें वाढतें प्रमाण पाहून मजूर सरकारनें हिंदी राज्यघटनेबाबत विचारविनिमयासाठीं नोव्हेंबर महिन्यांत विलायतेंत गोलमेज परिषद बोलाविली, व त्या परिषदेला ब्रिटिश

महात्मा गांधी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानांतील प्रमुख लोकांस व संस्थानिकांस पाचारण केलें. राष्ट्रीय सभेनें या परिषदेंत भाग घेतला नाहीं. गोलमेज परिषदेचें अधिवेशन सुमारें दोन महिने चालून जानेवारी १९३१ अखेर खलास झालें. (१) भावी हिंदी राज्यघटना संयुक्त राज्यपद्धतीच्या (Federation) तत्त्वावर तयार करण्यांत यावी. त्यांत संस्थानिकांनीं सामील व्हावें. (२) लष्कर व परराष्ट्रीय व्यवहार यासारखीं साम्राज्याचीं महत्त्वाचीं खातीं खेरीज करून इतर बाबतींत वरिष्ठ सरकारच्या कारभारावर वरिष्ठ कायदेमंडळाचा दाब असावा. (३) अल्पसंख्यांकांचें व प्रस्थापित हितसंबंधाचें रक्षण करण्यासाठीं संरक्षक बंधनें (Safeguards) घालण्याचा सरकारास अधिकार असावा. हीं तीन तत्त्वें सर्वानुमतें मान्य झालीं. हें गोलमेज परिषदेचें अधिवेशन चालू असतां कायदेभंगाची मोहीम चालूच होती. शेवटीं इ. स. १९३१ च्या मार्च महिन्यांत म. गांधी व लॉर्ड आर्यावन यांच्यामध्यें बरीच वाटाघाट होऊन उभयपक्षीं समेट झाला व कायदेभंगाची मोहीम बंद झाली.

९. दुसरी गोलमेज परिषद :—इ. स. १९३१ च्या सप्टेंबर महिन्यांत विलायतेंत दुसरी गोलमेज परिषद भरली. या परिषदेस म. गांधी वगैरे राष्ट्रीय सभेचे पुढारी गेले होते. मध्यंतरीं ब्रिटिश प्रधानमंडळांत बदल झाला. मजूर प्रधानमंडळ जाऊन रॅम्से मॅक्डोनल्ड यांच्या नेतृत्वाखालीं राष्ट्रीय प्रधानमंडळ स्थापन झालें व सर सॅम्युअल होअर हे नवे भारतमंत्री अधिकारारूढ झाले. पुष्कळ संस्थानिकांकडून पहिल्या गोलमेज परिषदेंत झालेल्या निकालास फाटे फोडण्याचा बराच यत्न झाला. फेडरेशनमध्यें सामील होण्याची त्यांची पूर्वीची उत्कंठा कमी झाली. अशा स्थितींत डिसेंबर १९३१ अखेर दुसरी गोलमेज परिषद संपतांना नवें कांहीं न मिळालें तरी पहिल्या गोलमेज परिषदेंत मिळालेलें टिकतें कसें याची काळजी वाटूं लागली. अखेरीस मुख्य प्रधान मि. रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं जाहीर केलें कीं, पहिल्या गोलमेज परिषदेच्या अखेरीस उच्चारलीं गेलेलीं तीन तत्त्वें अबाधित राखण्याचा नव्या राष्ट्रीय सरकारचा निर्धार कायम आहे. मजूर मंत्रिमंडळाच्या अमदानींत मिळालेलीं पहिल्या गोलमेज परिषदेअखेरचीं वचनें राष्ट्रीय मंत्रिमंडळानेंही पाळावयाचें ठरविलें, हा दुसऱ्या गोलमेज परिषदेचा निष्कर्ष होय.

१०. कायदेभंगाची दुसरी मोहीम :—जानेवारी १९३२च्या प्रारंभीं दुसऱ्या गोलमेज परिषदेहून हिंदी प्रतिनिधी हिंदुस्थानांत येतात न येतात तोंच संयुक्त प्रांतांत करबंदीची मोहीम सुरू झाली. बंगाल्यांत दडपशाहीचे वटहुकूम निघाले व अखिल हिंदुस्थानांत कायदेभंगाची लाट प्रसृत होऊं नये म्हणून व्हाइसरॉयांनीं ऑर्डिनन्सेस काढले. यासंबंधीं बोलणें करण्याकरितां म. गांधींनीं व्हाइसरॉयांची भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली असतां तीस नकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळाला. या सर्व गोष्टींमुळें कायदेभंगाच्या मोहिमेनें फिरून जोरानें उचल खाल्ली. जानेवारीच्या पहिल्याच आठवड्यांत महात्मा गांधींना पकडण्यांत आलें व देशांतील बहुतेक काँग्रेस कमिट्या ह्या बेकायदेशीर संस्था ठरवि-ण्यांत आल्या. खुद्द राष्ट्रीय सभेवर मात्र बेकायदेशीरपणाचा शिक्का मारण्यांत आला नाहीं.

११. मुख्य प्रधानांचा जातवारीचा निर्णय :—पहिल्या व दुसऱ्या गोलमेज परिषदेंत जी एक गोष्ट शेवटपर्यंत अनिर्णित राहिली ती म्हणजे कायदे-मंडळांतून कोणत्या जातीस किती प्रतिनिधी असावेत ही होय. शेवटीं मुख्य प्रधानांनीं हा निर्णय करण्याचें कार्य स्वतःकडे घेऊन १६ ऑगस्ट रोजीं कायदेमंडळांतून जातवार प्रतिनिधींची संख्या निश्चित करणारा जाहीर-नामा काढला. त्यांत हल्लींप्रमाणें मुसलमानांस स्वतंत्र प्रतिनिधी दिले होतेच; परंतु हिंदुसमाजांतील अस्पृश्यांसही स्वतंत्र मतदार संघ व प्रतिनिधी दिलेले होते. यामुळें हिंदुसमाजांत निष्कारण फूट पडते ही गोष्ट लक्षांत येऊन म. गांधींनीं त्याबद्दल सत्याग्रह म्हणून सप्टेंबर महिन्यांत प्रायोपवेशन सुरू केलें. ह्यामुळें देशांत अस्पृश्यतानिवारणासंबंधीं अभूतपूर्व जागृति व खळबळ सुरू झाली. अनेक हिंदु पुढाऱ्यांचा झपाट्यानें विचारविनिमय होऊन पुण्यास स्पृश्य व हरिजन पुढाऱ्यांत २४ सप्टेंबर रोजीं एक करार झाला; त्यास २६ सप्टेंबर रोजीं मुख्य प्रधानांची मान्यता मिळाली; व महात्माजींनीं एका व्याधिजर्जर इसमास बरोबर घेऊन त्याच्या समवेत मुसंब्याचा रस घेऊन उपवास सोडला! पुण्यास झालेल्या करारानें स्वतंत्र मतदार संघाचे सर्व दोष नाहींसे झाले नाहींत, तरी संयुक्त मतदार संघाचें तत्त्व अंमलांत आल्यामुळें स्पृश्य व हरिजन यांना एकाच मतदार संघामार्फत एकत्र मतें देण्याची संधि उत्पन्न झाली हा त्यांतील विशेष होय.

१२. संयुक्त कमिटीचा रिपोर्ट :—१९३३ च्या मार्च महिन्यांत तिन्ही गोलमेज परिषदांतील सूचना लक्षांत घेऊन सरकारनें आपल्या शिफारशी सरकारी खलित्यांत ग्रथित करून मांडल्या. त्यासच व्हाईट पेपर अथवा शुभ्र पत्रिका असें म्हणतात. या सूचना पार्लमेंटपुढें बिल स्वरूपानें मांडण्यापूर्वीं पार्लमेंटच्या संयुक्त कमिटीनें त्यावर आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला.

१३. सुधारणा कायदा पास :—बऱ्याच चर्चेनंतर ता. २ ऑगस्ट १९३५ रोजीं हिंदी सुधारणांचें बिल पार्लमेंटांत पास झालें. त्यासच '१९३५ चा गव्हर्मेंट ऑफ् इंडिया अॅक्ट' असें म्हणतात. या कायद्यानें वरिष्ठ सरकारास संयुक्त (Federation) राज्यघटनेचें स्वरूप प्राप्त व्हावें, त्यांत संस्थानिकांचा अंतर्भाव केला जावा, प्रांतिक सरकारांत सर्व खातीं 'सोपीव' (Transferred) बनावीं म्हणजे लोकनियुक्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवाणांच्या ताब्यांत देण्यांत यावीं, फक्त लॉ व ऑर्डर खात्यांपुरते गव्हर्नरला विशेष अधिकार असावे, प्रांतिक कायदेमंडळ बहुतेक ठळक प्रांतांतून वरिष्ठ कायदेमंडळाप्रमाणें दुहेरी स्वरूपाचें असावें, मध्यप्रांतांत मात्र जोड कायदेमंडळ (Upper Chamber) असणार नाहीं, मतदानाचा हक्क एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा १४ किंवा वयांत आलेल्यांपैकीं शेंकडा २७ लोकांना मिळेल इतका विस्तृत करण्यांत यावा असें ठरलें. ता. १ एप्रिल १९३६ पासून सिंध व ओरिसा हे स्वतंत्र प्रांत झाले, व ब्रह्मदेश हिंदुस्थानपासून वेगळा करण्यांत आला.

१९३५ च्या कायद्यानुसार प्रांतिक कायदेमंडळाच्या नव्या निवडणुकी इ. स. १९३७ च्या फेब्रुवारींत होऊन १ एप्रिल १९३७ पासून या कायद्याचा प्रत्यक्ष अंमल प्रांतिक राज्यकारभारांत सुरू झाला. वरिष्ठ सरकारचें स्वरूप पूर्वीप्रमाणेंच ठेवण्यांत आलें. अशा रीतीनें इ. स. १९२७ च्या अखेरीस सुधारणा कायद्याच्या फेरतपासणीसाठीं 'सायमन कमिशन' नेमण्यांत आलें तेव्हांपासून जवळजवळ १० वर्षांचा काळ चर्चेत जाऊन फक्त प्रांतिक राज्यकारभारापुरती नवी घटना ता. १ एप्रिल १९३७ पासून अंमलांत आली.

प्रश्न

१. कॉंग्रेस कां स्थापन झाली ? प्रारंभीं कॉंग्रेस कसले ठराव करी ? जहालांचें राजकारण कॉंग्रेसमध्यें केव्हां सुरू झालें ? २. टिपा लिहा : (१) असहकारितेची चळवळ, (२) १९३०ची कायदेभंगाची मोहीम, (३) सायमन कमिशन.

अभ्यास

१. इ. स. १९२१ किंवा १९३० च्या राष्ट्रीय चळवळींत भाग घेतलेल्या एकाद्या राष्ट्रसेवकाकडून त्यावेळची माहिती मिळवा. २. वाचा :—म. गांधी चरित्र (ले. आपटे गुरुजी).

माहितीसाठीं

असहकारितेचा ठराव : कलकत्ता कॉंग्रेस इ. स. १९२०

" सरकारनें चालविलेलीं न्यायकोर्टें, कायदेमंडळें, सरकारमान्य शाळा तसेंच सरकारनें दिलेल्या पदव्या यांवरच सरकारचें स्थैर्य व इभ्रत आहे, हें बहुवंशीं लक्षांत घेऊन लोकांनीं पुढें सांगितल्याप्रमाणें आचरण करावें.

(१) पदव्यांचा त्याग करावा, (२) स्थानिक स्वराज्य संस्थांतून सरकारनियुक्त जागांचे राजीनामे द्यावेत, (३) सरकारी दरबार-समारंभांस जाऊं नये, (४) सरकारमान्य शाळा कॉलेजांतून आपली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलें काढून घेऊन राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करावी. (५) सरकारी न्यायकचेऱ्यांवर बहिष्कार घालून त्या ठिकाणीं लोकांनीं आपलीं लवादमंडळें निर्माण करावींत. (६) लष्करी, कारकुनी व मजूर वर्गांनीं मेसापोटेमियांत चाललेल्या मोहिमेंत भाग घेण्यासाठीं पुढें येऊं नये. (७) लवकरच होणाऱ्या निवडणुकांवर कॉंग्रेसनिष्ठ मतदारांनीं व उमेदवारांनीं बहिष्कार घालावा, (८) परदेशी मालावर बहिष्कार घालावा.

उपरोक्त असहकारिता ही एक शिस्तीचें व स्वार्थत्यागाचें साधन आहे. या साधनाचें प्रत्येक स्त्री पुरुषानें आचरण करणें जरूर आहे. म्हणून सर्वांनीं स्वदेशी कापड वापरण्यास सुरुवात करावी व देशांतील गिरण्या देशाला पुरेसें कापड निर्मिण्यास समर्थ नसल्यानें घरोघर सूतकताई व हातमागावरील कापड विणण्याचें काम जारीनें सुरू करावें."

या इतिहासप्रसिद्ध ठरावास बाबू विपिनचंद्र पाल व देशबंधू दास यांनीं उपसूचना आणिली होती; परंतु बरीच चर्चा होऊन अखेर म. गांधींचा ठराव पास झाला.

भाग ४१ वा

भारतीय स्वातंत्र्याची सिद्धता

(इ. स. १९३७ ते इ. स. १९५०)

प्रांतिक स्वायत्तता :– इ. स. १९३७ च्या एप्रिल महिन्यांत प्रांतांतून स्वायत्ततेचा अंमल सुरू झाल्यापासून देशांत नवीनच वारें वाहूं लागलें. ११ प्रांतांपैकीं ८ प्रांतांत कॉंग्रेस पक्षास बहुमत मिळालें व सर्वच प्रांतांतून राष्ट्रीय पुनर्घटनेसाठीं कमिट्या व कमिशनांची गर्दी उसळली. शेतकरी कर्जनिवारण, दारूबंदी, सावकारनियंत्रण, औद्योगिक शिक्षण, साक्षरताप्रसार, आर्थिक पंचवार्षिक योजना, असे अनेक विषय प्रांतिक सरकारांचें लक्ष वेधीत होते. या योगानें देशांतील लोकांच्या विधायक कर्तृत्वाची व तळमळीची साक्ष सुधारलेल्या जगास नव्यानें पहावयास मिळाली. प्रांतांतून हा उद्योग सुरू असतां, मध्यवर्ती सरकारांत अखिल भारतीय संयुक्त घटना अंमलांत येण्यासाठीं संस्थानिकांशीं विचारविनिमय सुरू होता.

२. दुसरें महायुद्ध व हिंदुस्थान :– इतक्यांत इ. स. १९३९ च्या सप्टेंबरांत दुसरें महायुद्ध सुरू झालें. त्याचा हिंदी राजकारणावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिणाम होणें अपरिहार्य होतें. इंग्लंड व जर्मनी यांच्या युद्धांत इंग्लंडला साहय करावें असें केवळ नाइलाजानें नव्हे, तर मनापासून, असें हिंदुस्थानांतील कांग्रेस आदिकरून बहुतेक राजकीय पक्षांचें मत होतें. पण हिंदुस्थाननें युद्धांत पडावें तर तें स्वतःच्या मतानें पडावें, इंग्लंड सांगतें म्हणून नव्हे असा कित्येक पक्षांचा आग्रह होता. खेरीज युद्धोत्तर पुनर्घटनेंत स्वयंनिर्णयाचा पुरस्कार व्हावयाचा तर त्याचा विसार म्हणून हिंदुस्थानांत युद्धानंतर अमुक एका मुदतींत वसाहतीच्या स्वराज्याची घटना प्रस्थापित करूं असें आश्वासन मागण्यांत आलें. परंतु तशा प्रकारचें निश्चित आश्वासन न मिळाल्यानें कांग्रेसपक्षीय प्रधानमंडळांनीं इ. स. १९३९ च्या नोव्हेंबर महिन्यांत राजीनामे दिले. तेव्हांपासून मुंबई, मद्रास, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, बिहार, ओरिसा इत्यादि प्रांतांतून गव्हर्नरचा एकतंत्री कारभार सुरू झाला. १९४० सालीं कांग्रेसनें युद्धविरोधी प्रचार करण्यासाठीं भाषणस्वातंत्र्य हवें या मुद्यावर म. गांधींच्या नेतृत्वाखालीं मर्यादित, वैयक्तिक सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली व त्या चळवळींत ३००० निवडक लोक तुरुंगांत गेले. युद्धविरोधी प्रचार होऊं नये म्हणून सरकारनें वटहुकूम काढले व पुढें त्यांसच कायद्याचें स्वरूप दिलें, यासच 'भारत-संरक्षण कायदा' असें म्हणतात. युद्धामुळें अनेक उद्योगधंद्यांस तात्पुरतें उत्तेजन मिळालें व सैन्य, विमान व नाविक दल या सर्वांतून हिंदी तरुणांचा अधिकाधिक प्रवेश झाला.

३. **क्रिप्स-योजना नापसंत** :—इ. स. १९४१ अखेर जपाननें युद्ध सुरू केल्यापासून पहिल्या ५ महिन्यांचे अवधींत मलाया, सिंगापूर, जावा वगैरे पूर्वेकडील बेटें काबीज केलीं, फिलिपाईन्सवर स्वामित्व मिळविलें, ब्रह्मदेश आक्रमण केला, अंदमान घेतलें, सीलोनवर हवाई हल्ला केला व अखेर हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर विजगापट्टण व कोकोनाडा येथें बॉंबफेक केली. युद्ध हिंदुस्थानच्या दाराशींच नव्हे, तर घरांत आलें. शत्रूला परिणामकारक विरोध करण्यास यांत्रिक साहित्याप्रमाणें जनतेच्या हार्दिक पाठिंब्याचीही आवश्यकता आहे, हें लक्षांत घेऊन इ. स. १९४२ च्या मार्च-एप्रिल महिन्यांत सर स्टॅफर्ड क्रिप्स हे हिंदुस्थानांत आले व त्यांनीं युद्धोत्तर कालांत भारत-राज्यसंघास वसाहतीचा दर्जा देणारी घटना देशांतील पुढाऱ्यांपुढें मांडली. परंतु ती सदोष असल्या कारणानें हिंदुस्थानांतील कोणत्याच पक्षास अखेर ती पसंत पडली नाहीं.

४. **'चलेजाव'चें आंदोलन** :—क्रिप्स योजनेच्या वाटाघाटींत हिंदी आकांक्षा सफळ न झाल्यानें सनदशीर चळवळ करणारांची पूर्ण निराशा झाली व देशांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या
स्वदे
पुरेसे
काप

उप
ठरा

स्वा
प्रांत
पुन
दास
पंच
या
सुध
अस
सात

सप्टे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घटनासमितीचें पहिलें अधिवेशन दिल्ली येथें अपूर्व उत्साहांत भरविण्यांत आलें. या अधिवेशनांत मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला नाहीं. घटनासमितींत देशांतील सर्व पक्षांचे प्रतिनिधि येऊन ती पूर्णतया प्रातिनिधिक व्हावी यासाठीं फार प्रयत्न झाले. त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड वॅव्हेल हे कॉंग्रेसपक्षाचे प्रमुख पं. जवाहरलाल नेहरू व मुस्लीमलीगचे पुढारी बॅ. जिना यांना बरोबर घेऊन वाटाघाटीसाठीं विलायतेस गेले तेथें ब्रिटिश मुत्सद्द्यांबरोबर वाटाघाटी झाल्या. परंतु इ. स. १९४७ च्या जानेवारी महिन्यांत जेव्हां घटनासमितीचें दुसरें अधिवेशन भरलें तेव्हां त्यासही मुस्लीम लीगचे प्रतिनिधि हजर राहिले नाहींत. अशा रीतीनें घटना समिति पूर्णतया प्रातिनिधिक करण्याचा यत्न फसला परंतु घटनासमितीचें काम चालूच राहिलें.

मुख्य प्रधान
पं. जवाहरलाल नेहरू

७. **सत्तांतराची तारीख** :—हें काम स्वरूपास येत चाललें असतां १९४७ च्या फेब्रुवारींत इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. ॲटली यांनीं घोषणा केली कीं, इंग्रज जून १९४८ पर्यंत हिंदुस्थानांतील आपली राजकीय सत्ता येथील जबाबदार प्रतिनिधींच्या हातीं देणार; तोंपावेतों अखंड भारताचें केंद्र सरकार तयार न झालें तर ही सत्ता ब्रिटिश हिंदुस्थानापुरती मध्यवर्ती सरकारास किंवा एखाद्या प्रांतास स्वतंत्रपणेंही विभागून द्यावी लागेल; व संस्थानावरील इंग्रजांचें सार्वभौमत्व रद्द होऊन त्यांना त्यांचें पूर्वीचें स्थान प्राप्त होईल. इ. स. १९४८ जूनपर्यंत सत्तांतर करण्यासाठीं आवश्यक त्या त्या गोष्टी पुऱ्या करण्यासाठीं वॅव्हेल यांच्या जागीं लुई माऊन्टबॅटन या लष्करीतज्ज्ञाची नेमणूक करण्यांत आली.

८. **देशाची फाळणी : माऊंटबॅटन यांची योजना** :—जूनच्या ३ तारखेस माऊंटबॅटन यांनीं आपली सत्तांतराची तपशीलवार योजना जाहीर केली. तिचें स्वरूप असें : १९४८ च्या जूनमध्यें इंग्रजांनीं हिंदुस्थानांतून जावें. यासाठीं ता. १५ ऑगस्ट १९४७ पासून हिंदुस्थानांत संक्रमण कालांतील सरकार स्थापन करण्यांत यावें. त्या सरकारास वसाहतीचा (Dominion) दर्जा देण्यांत यावा. हिंदुस्थान होतां होईतों एक रहावा; तें शक्य नसेल तर पंजाब व बंगाल यांची फाळणी व्हावी. पश्चिम पंजाब व पूर्व बंगाल हे मुसलमानांचे बहुसंख्य प्रांत मुसलमानांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बेफिकीर, उतावीळ, वैतागाचें वारें उत्पन्न झालें. याचें प्रत्यंतर ' चले जाव ' (Quit India) चळवळींत दिसून आलें. १९४२ च्या ऑगस्ट महिन्यापासून देशांत हलकल्लोळ उत्पन्न झाला. त्याच्याच पाठोपाठ दडपशाही आली. सनदशीर चळवळ, निराशा, वैताग, दडपशाही, समेट व पुनर्घटना हें राजकीय प्रगतींतील आंदोलनाचें स्वरूप भारतानें यापूर्वी असहकारितेच्या व कायदेभंगाच्या काळांत दोनदां पाहिलें. त्याची पुनरावृत्ति फिरून याही वेळीं झाली. कारण युद्धसमाप्तीनंतर सरकारनें राजबंद्यांची मुक्तता केली. जुनीं कायदेमंडळें बरखास्त करून फेरनिवडणुकी केल्या व इ. स. १९४६ च्या प्रारंभीं सर्वत्र लोकशाही कारभारास सुरुवात झाली.

५. **संपूर्ण स्वातंत्र्यास मान्यता** :—जपानबरोबर चालू असलेलें युद्ध समाप्त झाल्यावर सिंगापूर, मलाया वगैरे भागांत बाबू सुभाषचंद्र बोस यांचे नेतृत्वाखालीं आझाद हिंद सेनेनें हिंदी स्वातंत्र्यार्थ केलेला सशस्त्र क्रांतीचा यत्न उघडकीस आला. त्यांचे पुढारी कॅप्टन शहानवाझखान, धिलन प्रभृतींची चौकशी होऊन त्यांत ते मुक्त झाले. त्यांचा हिंदी जनतेनें सर्वत्र सन्मान केला. यानंतर लौकरच आरमारखात्यांत काम करणाऱ्या हिंदी कामगारांत असंतोष उद्भवला. ठिकठिकाणीं संप होऊं लागले व त्याबरोबरच हिंदुस्थानवर उपासमारीच्या दुष्काळाची सर्वत्र छाया पसरली. या आपत्तीस तोंड दिलें पाहिजे व भावी आंतरराष्ट्रीय कोलाहलांत हिंदुस्थान संतुष्ट, संघटित व प्रतिकारास सुसज्ज असला पाहिजे, त्यासाठीं हिंदी राज्यघटनेचा प्रश्न सोडवून राष्ट्रीय सरकारची स्थापना झाली पाहिजे अशी ब्रिटिश मुत्सद्यांची खात्री पटली व त्यांनीं प्रधानमंडळांतील तीन प्रमुख सभासद : भारतमंत्री मि. पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स व मि. अलेक्झांडर यांचें शिष्टमंडळ एप्रिल महिन्याचे प्रारंभीं हिंदुस्थानांत पाठविलें. त्यांच्या शिष्टाईस म्हणण्यासारखें यश आलें नाहीं. असें असलें तरी हिंदुस्थानचा संपूर्ण स्वातंत्र्याचा हक्क इंग्लंडनें मान्य केला व संधिकालांत राष्ट्रीय मध्यवर्ती सरकार निर्माण करण्याचें निश्चित केलें. या निश्चयानुसार ता. १५-५-१९४६ रोजीं शिष्टमंडळानें एक योजना जाहीर केली.

६. **घटनासमितीचीं अधिवेशनें** :—वरील योजनेंत सुचविल्याप्रमाणें पं. नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं इ. स. १९४६ च्या सप्टेंबर महिन्यांत हंगामी मध्यवर्ती सरकारचें पहिलें प्रधानमंडळ स्थापन झालें. हिंदी स्वातंत्र्याची उद्घोषणा करणारे पंडित जवाहरलाल नेहरू हे त्या सरकारचे मुख्य प्रधान झाले. पुढील महिन्यांत मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींनीं त्यांत प्रवेश केला. त्यानंतर घटनासमितीच्या प्रतिनिधींच्या निवडणुका झाल्या व ता. ९ डिसेंबर रोजीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाकिस्तान हे देश आपापल्या परी स्वतंत्र झाले, तरी वादाचें मुख्य मूळ जो अल्पसंख्यांकांचा प्रश्न तो तसाच शिल्लक राहिला. इतकेंच नव्हे, तर या प्रश्नानें अधिक तीव्र स्वरूप धारण केलें. कारण प्रत्येक देशांतील अल्प संख्यांकास स्वतःच्या भवितव्याबद्दल अधिकच अनिश्चितता वाटूं लागली व त्यांच्यांत घबराट उत्पन्न झाली. पाकिस्तानांतील हिंदु हिंदुस्थानास यावयास निघाले व हिंदच्या मुसलमानांनीं पाकिस्तानची वाट धरली. गेल्या कांहीं महिन्यांत दशलक्षावधी लोकांनीं स्थानांतर केलें. पण एवढयानेंही भागलें नाहीं. अल्पसंख्यांक जमातीविरुद्ध सुप्त असणारी सूडबुद्धि याच वेळीं जागृत होऊन उभय देशांत बहुसंख्याकांनीं अल्पसंख्यांकावर एवढे अनन्वित अत्याचार केले कीं ते ऐकून अंगावर शहारे येतील. या अत्याचारांमुळें भेदरून व गांगरून गेलेले लोक घरेंदारें सोडून व आपापली चीजवस्त जागच्या जागीं टाकून शेजारच्या देशांत सुरक्षिततेसाठीं धांव घेऊं लागले. या निर्वासितांची व्यवस्था लावणें व त्यांना घरदार, उद्योगधंदा पाहून देऊन स्थिर करणें हा प्रश्न मोठा बिकट होऊन बसला आहे. यासच 'निर्वासितांचा प्रश्न' असें म्हणतात.

११. महात्माजींचा वध:—स्वातंत्र्याच्या उदयकालीं देशांवर आलेलीं संकटें एवढयानें संपलीं आहेतसें दिसत नाहीं. हिंदुस्थान व पाकिस्तान या दोन देशांतील देवघेवीचे अनेक प्रश्न परस्पर विचार-विनिमयानें सोडविण्याचें काम चालू असतां हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यसिद्धीसाठीं अहोरात्र तळमळणारे व आपलें जीवित वाहून घेतलेले महात्मा गांधी हे या वादांत अनेक वेळां मार्गदर्शन करीत. महात्माजींचें हें जीवितकार्य अविरत चालू असतां दिल्ली येथें एका माथेफिरूनें शुक्रवार ता. ३० जानेवारी १९४८ रोजीं सायंकाळीं महात्माजी आपल्या नित्याच्या सार्वजनिक प्रार्थनेसाठीं आपल्या निवासस्थानाहून येत असतां त्यांच्यावर अगदीं नजीकच्या अंतरावरून गोळया झाडल्या ! व थोडयाच वेळांत महात्माजी गतप्राण झाले. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचे क्षणीं त्या स्वातंत्र्याच्या शिल्पकारानें जीवितकार्य करीत असतां आपला देह ठेवला !

१२. योग्यता:—आधुनिक भारताच्या इतिहासांत महात्माजींचें स्थान उच्च व अढळ आहे. मॅझिनी हा स्वतंत्र इटलीचा जनक, समर्थ हे महाराष्ट्राचे स्फूर्तिदाते, स्वामी विद्यातीर्थ ही प्राचीन विजयनगर साम्राज्याची अधिष्ठात्री देवता, तसे महात्माजी हे स्वतंत्र भारताचें स्फूर्तिस्थान होत. भारतीय स्वातंत्र्याचा लढा लढवीत असतां महात्माजींनीं शांतीचा, सत्याग्रहाचा व अनत्याचाराचा उपदेश करून भगवान् बुद्ध-येशू ख्रिस्ताप्रमाणें अखिल मानव जातीच्या उद्धाराचा मार्ग दर्शविला. देशाचें स्वातंत्र्य हें महात्माजींच्या मतें साध्य नसून साधनरूप होतें. अखिल मानव जातीचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाकिस्तानांत सामील व्हावे. याखेरीज सिंधचाही त्यांत समावेश होईल. सरहद्दप्रांत व बलुचिस्तान येथील लोकमत अजमावून त्याप्रमाणें त्या प्रांतांनीं स्वतंत्र रहावें किंवा पाकिस्तान वा हिंदुस्थान यांत यावें. आसामांतील सिल्हट हा बहुसंख्य मुसलमानांचा जिल्हा पूर्व बंगालला जोडावा. संस्थानांना ब्रिटिश येथून गेल्यावर सार्वभौमत्वाचा दर्जा प्राप्त होईल. त्यांनीं वाटल्यास स्वतंत्र रहावें किंवा पाकिस्तानांत अगर हिंदुस्थानांत सामील होण्याची तयारी करावी. हिंदुस्थानसाठीं एक व पाकिस्तानसाठीं एक अशा दोन घटना-समित्या पूर्वीच्या पद्धतीनें बनवाव्या व त्यांनीं भावी सरकारसाठीं आपापली घटना बनवावी. असें या फाळणीच्या योजनेचें स्थूल स्वरूप होतें.

९. **स्वातंत्र्याची घोषणा**:—ता. १५ मे १९४६ रोजीं जाहीर केलेली त्रिमंत्री योजना मागें पडून ३ जून १९४७ ची वर सांगितलेली माऊंटबॅटन योजना पुढें आली. त्या योजनेनुसार सरहद्दप्रांत व बलुचिस्तान येथील लोकमत अजमाविण्यांत येऊन ते प्रांत बहुमतानें पाकिस्तानांत सामील झाले. सिल्हट पूर्वबंगालशीं संलग्न झाला. हिंदी स्वातंत्र्यास मान्यता देणाऱ्या कायद्याचें पार्लमेंटांत घाईघाईनें त्रिवार वाचन होऊन त्यास ता. १८ जुलै रोजीं बादशाहाची मान्यता मिळाली. इंग्लंडच्या राजाची हिंदुस्थानचे बादशाह ही पदवी गाळण्यांत आली. पाकिस्तान व हिंदुस्थान या देशांचीं स्वतंत्र सरकारें स्थापन करण्यांत आलीं. ता. १९ जुलै १९४७ रोजीं बारा वाजतां हिंदुस्थानची फाळणी झाल्याचें जाहीर झालें. बॅ. महंमदअल्ली जिना हे पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल झाले. कराची ही पाकिस्तानची राजधानी ठरली. लॉर्ड माऊंटबॅटन हे शेष हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल झाले. ता. १५ ऑगस्ट रोजीं हिंदुस्थानचीं दोन भागांचीं दोन स्वतंत्र सरकारें स्थापन होऊन त्यांना ब्रिटिश डोमिनियन (वसाहती) चा दर्जा प्राप्त झाला. इंग्लंडचें हिंदुस्थानवरील वर्चस्व संपलें! ता. १४–१५ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीं बरोबर १२ वाजतां हिंदुस्थानच्या राजधानींत हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मोठ्या समारंभांत जाहीर झालें. हिंद सरकारचे पहिले गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन व पहिले मुख्य प्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं तिरंगी झेंड्यास वंदन केलें व स्वतंत्र हिंदुस्थानचा तिरंगी झेंडा देशांत सर्वत्र सरकारी इमारतींवर मोठ्या डौलानें फडकूं लागला. एवढा भाग्याचा क्षण या देशांत कित्येक शतकांत उगवला नव्हता. या क्षणाचें साम्य हुडकणारास हिंदुस्थानच्या इतिहासांत कदाचित् अशोकाच्या काळापर्यंत मागें जावें लागेल.

१०. **अत्याचारांचा कहर**:—पण स्वातंत्र्यप्राप्तीचा हा आनंद आजच्या पिढीस दुर्दैवानें निर्भेळ रीतीनें अनुभविण्यास सांपडला नाहीं. हिंदुस्थान व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काराचा शेवट होऊन त्याची जागा स्वतंत्र भारताच्या अध्यक्षानें घेतली. बाबू राजेन्द्रप्रसाद हे भारतीय गणराज्याचे पहिले अध्यक्ष होत. नवीन घटनेनुरूप स्वतंत्र भारताचा संसार आतां नव्यानें सुरू झाला असून त्याच्या हालचालींकडे जगाचें अर्थपूर्ण लक्ष लागून राहिलें आहे. भारतांत गण-राज्य स्थापन झालें तरी तो ब्रिटिश राज्यमंडळांतून फुटून निघालेला नाहीं.

१६. **क्रांतिकालांतील मार्गदर्शन :**—स्वतंत्र भारतापुढील आजचे प्रश्न फार बिकट आहेत. एकतर ज्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं एका शतकाहून अधिक काळपर्यंत देशानें निरनिराळ्या स्वरूपांत झगडा केला त्या लोकशाही स्वातं-त्र्याची अनुभूति जनतेस होऊन तिला कांहीं सुखद जीवनाचा ओलावा प्राप्त झाला पाहिजे. विद्यमान् अस्थिर जगांत 'निर्वैरः सर्व भूतेषु' राहून स्वतःचें स्वातंत्र्य टिकवून धरतां आलें पाहिजे आणि शक्य तर जगास मार्गदर्शक असें कांहीं नवेंच ध्येयमूल्य आपल्या जीवनांतून जगापुढें मांडतां आलें पाहिजे. आज आपण एवढ्या कठिण काळांत आहोंत कीं मिळालेलें स्वातंत्र्य टिकेल कसें याची देशाच्या कल्याणार्थ अहोरात्र झटणाऱ्यांस चिंता पडावी. एकंदरींत विचार करतां हिंदुस्थानांत सध्यां क्रांतियुग वावरत आहे. अनेक जागतिक व आशियाई प्रश्नांशीं या देशाचें भवितव्य निग-डित झालें आहे. या प्रश्नांवर उत्पन्न होणारे वाद तुटण्याऐवजीं विकोपास जाऊन आणखी एक महायुद्ध उपस्थित होतें कीं काय अशी कित्येकांस धास्ती वाटत आहे. अशा वेळीं नवीन जन्मास आलेल्या स्वतंत्र भारताच्या संघराज्यानें महात्माजींनीं दाखवून दिलेला मानव्याच्या हिताचा ध्येयवाद जागृत ठेवून तदनुरोधानें या क्रांतीच्या कालांत आपली पुनर्घटना आत्म-विश्वासानें व निश्चयानें करून घ्यावी अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

प्रश्न

१. इ. स. १८८५ ते १९४७ पर्यंतच्या कॉंग्रेसच्या यशापयशाचा स्थूल आलेख काढा. २. स्वायत्तता म्हणजे काय ? ३. टिपा लिहा. (अ) प्रांतिक स्वायत्तता (आ) संयुक्त राज्यघटना (इ) घटना समिति (ई) देशाची फाळणी झाली.

अभ्यास

(१) बॅ. जिनांच्या नेतृत्वाखालीं मुसलमानांनीं पाकिस्तान कां मागि-तलें ? इंग्रजांनीं ती मागणी कां मान्य केली असावी ? (२) 'प्रभुत्व-संपन्न गणराज्य' भारतांत स्थापन झालें याच्या ४।५ खुणा सांगा. (३) वाचा—स्वाध्यायमालेंतील नवा हिंदुस्थान, डॉ. राजेंद्रप्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, व पं. नेहरू या पुस्तिका.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्धार हें त्यांचें ध्येय होतें. जीविताकडे पाहण्याची त्यांची दृष्टि व्यापक होती. आहारविहार, निसर्गोपचार, आपली राहणी यासंबंधींचे त्यांचे प्रयोग नित्य चालू असून राजकीय स्वातंत्र्याची प्राप्ति हा त्या व्यापक जीवनांतील एक भाग होता. गौतम बुद्धानंतर हिंदुस्थानच्या इतिहासांत एवढा मोठा पुरुष जन्माला आला नाहीं. त्यांनीं घालून दिलेला सत्याचा, अनत्याचाराचा, साधेपणाचा, अपरिग्रहाचा मार्ग हा संतांनीं पुरस्कारिलेला व सनातन असून त्यानेंच विश्वाचें कल्याण होणार आहे.

१३. नवचैतन्य :—महात्माजींच्या मृत्यूनंतरच्या काळांत सामान्य जनतेच्या दृष्टिकोनांत झपाट्यानें व इष्ट असा बदल घडून येत आहे. जातीयतेचें निर्मूलन करावें, कृत्रिम भेद नष्ट करावे व देशाचें नष्टचर्य नाहींसें करावें यासाठीं एकदिलानें कसून प्रयत्न होत आहेत. महात्माजींच्या जीवना-प्रमाणें त्यांचा मृत्यूही जनतेंत चैतन्य उत्पन्न करण्यास कारणीभूत झाला यांत शंका नाहीं.

१४. संस्थानांचें विलिनीकरण :—भारताच्या पुनर्घटनेंत अनेक संस्थानें हिंदुस्थानच्या संघराज्यांत विलीन झालीं आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासास परिचित असलेलीं भोर, औंध, फलटण हीं संस्थानें यापुढें स्वतंत्रपणें दिसणार नाहींत, कारण तीं संघराज्यांत सामील झालीं आहेत. कित्येक लहान लहान संस्थानांनीं एकत्र येऊन आपापले संघ तयार केले आहेत. अशा प्रकारें आतांपर्यंत सौराष्ट्र (काठेवाड), मध्यभारत, त्रावणकोर-कोचीन, पूर्वपंजाब-संस्थानें, राजस्थान, विंध्यप्रदेश व हिमाचलप्रदेश अशीं सात संघराज्यें स्थापन झालीं आहेत. राहिलेल्या संस्थानांतून लोकशाहीचें वारें वाहात असून तेथें जबाबदार राज्यपद्धति झपाट्यानें निर्माण होत आहे. हैद्राबाद संस्थानांत रझाकारांनीं माजविलेली अस्वस्थता मोडून काढण्यासाठीं हिंदची फौज १९४८ च्या सप्टेंबरांत हैद्राबादेंत शिरली व तिनें अवघ्या चार दिवसांत विरोध मोडून काढून सर्वत्र स्थिरस्थावर केलें. आतां तेथेंही जबाबदार राज्यपद्धति सुरू होत आहे. काश्मीरचा प्रश्न अद्याप अनिर्णित आहे.

१५. स्वतंत्र भारताची घटना :—याप्रमाणें संस्थानांचें विलिनीकरण व एकीकरण चालू असतां भारताच्या राजधानींत घटनासमिति नवीन जन्मास आलेल्या स्वतंत्र भारतास अनुरूप अशी घटना तयार करण्याचें काम करीत होती. हें काम करण्यास तिला २ वर्षें ११ महिने १७ दिवस लागले व त्यासाठीं एकूण ६३९६७२९ रु. खर्च झाले. या घटनेप्रमाणें ता. २६ जाने-वारी १९५० रोजीं भारत हें सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य (Sovereign Democratic Republic) बनलें. तेव्हांपासून गव्हर्नर जनरलच्या अधिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला होता. याचा अर्थ धर्मसुधारणा होईपर्यंत सामाजिक किंवा राजकीय सुधारणा नकोत असा नाहीं; पण धर्म हा समाजाचें हृदय आहे असें त्यास वाटे. या त्याच्या मताप्रमाणें त्यानें इ. स. १८२८ सालीं ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. त्याची बुद्धि तर्कप्रधान असल्यामुळें त्याचा ख्रिस्ती व हिंदु धर्मांतील कोणत्याच पौराणिक नवलकथांवर विश्वास नसे. यामुळें त्यास दोन्ही धर्मांचा रोष सहन करावा लागला. मूर्तिपूजा करावयाची नाहीं, एका निर्गुण, निराकार परमेश्वराची प्रार्थना करावयाची, दुसऱ्याच्या धर्माची निंदा करावयाची नाहीं, हीं ब्राह्मोसमाजाचीं मुख्य तत्त्वें आहेत. राजा राममोहन यांचा मूर्तिपूजेस विरोध पाहून कलकत्त्याच्या बिशपनें त्यांना इ. स. १८२१ सालीं ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा उपदेश केला व तसें केल्यास ऐहिक अभ्युदयाचा मार्ग सुलभ होईल असेंही सुचविलें. यावर राजा राममोहन यांनीं ख्रिस्ती धर्म तर स्वीकारला नाहींच; पण आवेशयुक्त वाणीनें त्या बिशपाचा निषेध केला. सारांश, राजा राममोहन यांचा प्रचार अंतःकरणाच्या तळमळीनें चाले. त्यांना कसलेंही प्रलोभन नव्हतें. त्यांनीं स्थापन केलेल्या ब्राह्मोसमाजाचा विस्तार पुढें फार वाढला नसला तरी तेवढ्यावरून राजा राममोहन यांची विचारसरणी चुकीची होती असें म्हणतां येत नाहीं. असो. त्यांच्या पश्चात् ह्या समाजाच्या दोन शाखा झाल्या. केशवचंद्र सेन यांच्या मनावर ख्रिस्ती धर्माचा पगडा बसून त्यांनीं इ. स. १८६५ त आपला पंथ निराळा काढला. तेव्हां मूळ शाखेस 'आदि ब्राह्मोसमाज' हें नांव पडलें. या पंथाचे प्रमुख देवेंद्रनाथ टागोर हे होते. हल्लीं बंगालमधील सुशिक्षितांतून ब्राह्मोसमाजाचे कांहीं अनुयायी दृष्टीस पडतात; परंतु त्यांच्यामध्यें पूर्वीचा उत्साह दृष्टीस पडत नाहीं.

४. प्रार्थनासमाज :—इ. स. १८६७ त मुंबई येथें प्रार्थनासमाजाची स्थापना झाली. ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाज यांच्या तत्त्वांत बरेंच साम्य आहे. ते मूर्तिपूजेच्या विरुद्ध असले तरी ते परमेश्वराला सगुण मानतात. ते भक्तिमार्गी, सगुणोपासक व द्वैतवादी आहेत. त्यांना प्रार्थना आवश्यक वाटते; पण प्रार्थनेनें भौतिक फलाची प्राप्ति होणार नाहीं; प्रार्थना ही फक्त आत्मिक उन्नतीसाठींच केली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष आहे. कै. न्या. रानडे व डॉ. भांडारकर* हे त्याचे प्रमुख आधारस्तंभ होते व त्यांनीं प्रार्थनासमाजाच्या

---

*मराठी वाचकांनीं न्या. मू. रानडे, चंदावरकर, डॉ. भांडारकर वगैरे थोर पुरुषांचीं धार्मिक व्याख्यानें वाचल्यास तत्कालीन सुशिक्षितांच्या अंतःकरणांतील धार्मिक खळबळीचा त्यांस बोध होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाग ४२ वा

आधुनिक भारतांतील

धार्मिक व सामाजिक स्थिति व विचारप्रवाह

१. प्रास्ताविक :—हिंदुस्थानांत इंग्रजी अंमल प्रस्थापित झाल्यापासून हिंदी समाजावर जे अनेक महत्त्वाचे परिणाम झाले त्यांचा विचार करणें अगत्याचें आहे. इंग्रजी राज्यामुळें हिंदुस्थानच्या राजकीय स्थितींतच केवळ बदल झाला असें नसून त्याचा हिंदुस्थानच्या धार्मिक, सामाजिक व औद्योगिक परिस्थितीवरही महत्त्वाचा परिणाम झालेला आहे. त्या सर्वांचें थोडक्यांत समालोचन करणें इष्ट आहे.

(१) धार्मिक जागृति

२. धर्म व पंथ :—इंग्रज प्रथम व्यापाराकरितां हिंदुस्थानांत आले. त्यांच्या पूर्वींच ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं हिंदुस्थानांत धर्मप्रचाराचा यत्न केला. पोर्तुगीजांबरोबर आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं जबरदस्तीनें धर्मांतर करण्याचा सपाटा चालविला. परंतु तो त्यांसच बाधक होऊन पोर्तुगीज राज्याचा पाया हिंदुस्थानांत रुजला नाहीं. तेव्हां मागाहून आलेल्या डच, फरेंच व इंग्रज लोकांनीं मिशनऱ्यांच्या यत्नांशीं आपला संबंध तोडून टाकला. इंग्रजांनीं इ. स. १८१३ पर्यंत मिशनऱ्यांना आपल्या प्रांतांत थारा दिला नाहीं. परंतु पुढें मिशनरी हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार करण्यास झपाट्यानें मदत करूं लागले व त्याबरोबरच त्यांनीं ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें उपदेशिण्यास सुरुवात केली. तेव्हांपासूनच देशामध्यें इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांत धर्मासंबंधीं विचार करणाऱ्या लोकांचा एक वर्ग निघाला. या लोकांनीं ब्राह्मोसमाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, थिऑसफी व रामकृष्ण मिशन अशा निरनिराळ्या संस्था काढून आपापले पंथ निर्माण केले.

३. ब्राह्मोसमाज :—या समाजाचा संस्थापक राजा राममोहन रॉय बंगाल्यांत इ. स. १७७४ सालीं जन्मला. याच्या बहुविध कार्याची माहिती पूर्वीं आलेलीच आहे (पृ. ३६५). बंगालमध्यें नवविचाराचें वारें निर्माण करण्याचें श्रेय यासच आहे. हिंदी समाजांत सर्वांगीण क्रान्ति घडवून आणावयाची आणि ती घडवून आणण्यास प्रथम धर्मविचारांत व आचारांत क्रान्ति झाली पाहिजे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. प्रथम धर्मसुधारणा, नंतर समाजसुधारणा व त्यानंतर राजकीय सुधारणा असा क्रम त्याच्या मनानें निश्चित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. शुद्धिकार्यांत या समाजानें पुढाकार घेतलेला आहे. (१) परधर्मीयांस हिंदुधर्मांत घेणें, (२) धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण करणें व (३) अस्पृश्यांना स्पृश्य करणें अशीं त्रिविध कार्यें आर्यसमाजी करतात. हिंदु धर्माचें मलिन स्वरूप नाहींसें करून त्यास ओजस्वी स्वरूप प्राप्त करून द्यावें अशी यांची महत्त्वाकांक्षा आहे. अर्थातच आर्यसमाजाचे अनुयायी--विशेषतः शुद्धीकरणांत भाग घेतलेले लोक--परधर्मीयांच्या रोषास पात्र झालेले आहेत. आधुनिक काळांत निघालेल्या सर्व पंथांत आर्यसमाजाचें हिंदुसमाजावर विशेष वजन आहे यांत शंका नाहीं.

६. **थिऑसफी** :—या इंग्रजी शब्दाचा अर्थ ईश्वरविषयक ज्ञान असा आहे. थिऑसफीचा अभ्यास करण्याकरितां अमेरिकेंत न्यूयॉर्क शहरीं इ. स. १८७५त मॅडम ब्लॅव्हॅटस्की व कर्नल ऑलकॉट यांनीं सोसायटीची स्थापना केली. जात, धर्म, लिंग, वर्ण हे भेद बाजूस सारून केवळ विश्वबंधुत्वाची भावना मनांत ठेवणें, निरनिराळ्या धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासास उत्तेजन देणें, गूढसृष्टि-नियमांचें संशोधन करणें, अनुभवानें पटतील तेवढ्याच गोष्टींवर विश्वास ठेवणें हीं ह्या सोसायटीचीं मुख्य तत्त्वें आहेत. इ. स. १८७९ सालीं कर्नल ऑलकॉट हे मुंबईस आले, त्या वेळीं त्यांनीं दयानंदांची भेट घेतली. परंतु दयानंदांच्या जयिष्णु हिंदुधर्माचें व ऑलकॉट यांच्या विश्वबंधुत्वाचें पटलें नाहीं. इ. स. १८८२ सालीं कर्नल ऑलकॉट यांनीं मद्रासनजीक अडचार येथें जागा घेतली व आपल्या मताचा प्रसार करण्यास सुरुवात केली. त्यांनीं सीलोन येथें जाऊन तेथेंही आपल्या मताचा प्रचार केला. आजमितीस जगामध्यें या सोसायटीचे सुमारें ४०,००० सभासद आहेत. त्यांत हिंदुस्थानांत ५ हजारांवर आहेत. आर्यसमाजाप्रमाणें थिऑसफिस्टही आपल्या शिक्षणसंस्था चालवीत आहेत. इ. स. १९०७ सालीं मिसेस ॲनी बेझंट या सोसायटीच्या अध्यक्ष निवडून आल्या. त्यांनीं अनेक धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून हिंदु धर्मींतील तत्त्वज्ञान अत्यंत उच्च दर्जाचें आहे असें प्रतिपादिलें आहे. परंतु एकंदरींत थिऑसफीच्या पंथाचा हिंदुजनतेंत मोठ्या प्रमाणावर प्रसार होईल असें दिसत नाहीं.

७. **रामकृष्ण परमहंस यांचा पंथ** :—एकोणिसाव्या शतकांत भारतांत घडून आलेल्या धार्मिक पुनरुज्जीवनांत स्वामी रामकृष्ण परमहंस यांचें स्थान फार मोठें आहे. त्यांचें मूळ नांव गदाधर. इ. स. १८३४ सालीं बंगालमध्यें श्रीकमरपुकुर या गांवीं त्यांचा जन्म झाला. लहानपणा-पासूनच त्यांचा परमेश्वरचिंतनाकडे ओढा असे. लहानपणीं मुलांच्या खेळांत त्यांनीं श्रीकृष्णाच्या विरहानें दुःखी झालेल्या राधेचा वेष घेतला. त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तत्त्वांचा जनतेंत प्रसार व्हावा, म्हणून एकनिष्ठपणें त्याची सेवा केली. परंतु या थोर पुरुषांच्या यत्नास यश आलें असें म्हणतां येणार नाहीं. कारण पुण्या-मुंबईंतील कांहीं तुरळक लोकांखेरीज प्रार्थनासमाजास फारसे अनुयायी नाहींत.

५. आर्यसमाज :––या समाजाचा संस्थापक दयानंद सरस्वती काठेवाडांत मोरवी संस्थानांत इ. स. १८२४ त जन्मला. याचें मूळचें नांव मूळशंकर अंबाशंकर. आपल्या वयाच्या चौदाव्या वर्षी महाशिवरात्रीच्या दिवशीं यानें शंकराच्या पिंडीवर उंदीर खेळतांना पाहिला. तेव्हां मूर्तिपूजेबद्दल त्यास शंका येऊन त्यानें ती आपल्या वडिलांस विचारली; परंतु त्याचे वडील त्यास रागें भरले. तेवढ्यानें हटून न जातां तो या गोष्टीसंबंधानें जास्तच विचार करूं लागला. मूर्तिपूजेवरील त्याचा विश्वास दिवसेंदिवस उडूं लागला. त्याच्या एकविसाव्या वर्षी त्याच्या वडिलांनीं त्याच्या विवाहाचा विचार केला; तेव्हां तो पळून गेला व साऱ्या जन्मांत त्यानें घराला तोंड दाखविलें नाहीं. नंतर त्यानें संन्यास घेऊन आपल्या वयाचीं १८ वर्षे प्रवासांत घालविलीं व मथुरा येथील स्वामी विरजानंद व सरस्वती यांचा उपदेश घेऊन स्वत: दयानंद सरस्वती असें नांव धारण केलें. आपल्या वयाचीं शेवटलीं २० वर्षे त्यांनीं सार्वजनिक कार्यांत घालविलीं. इ. स. १८७५ सालीं त्यानें मुंबईस आर्यसमाजाची स्थापना केली व इ. स. १८७७ त लाहोर येथें त्याची एक शाखा स्थापन केली. पुढें लाहोर हेंच आर्यसमाजाचें मुख्य केंद्र बनलें. मूर्तिपूजा करूं नये, जाती ह्या जन्मावर अवलंबून नसून गुणकर्मांवर अवलंबून आहेत. अस्पृश्यता मानूं नये, वेद हे परमेश्वराचे नि:श्वास आहेत व वेदवचनांवर दृढ विश्वास ठेविला पाहिजे, अशीं या पंथाचीं मुख्य तत्त्वें आहेत. परंतु पुढें दयानंदस्वामी वेदांचा आपल्या मताप्रमाणें अर्थ लावूं लागले व जगांतील सर्वच ज्ञान वेदांत भरलें आहे असें सिद्ध करण्याचा त्यांनीं यत्न केला. दयानंदांनीं ऋग्वेदावर टीका लिहिली आहे. याशिवाय हिंदुस्थानांत त्या काळीं ब्राह्मोसमाज, थिऑसफी वगैरे पंथ उत्पन्न झालेले पाहून या सर्वांचें एकीकरण करावें व सर्वांनीं मिळून हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन करावें असा स्वामींनीं यत्न केला; परंतु तो यशस्वी झाला नाहीं. हें पाहून स्वामींनीं आपल्या पंथांत येण्याकरितां दहा तत्त्वें घालून दिलीं. स्वामीजी इ. स. १८८५ त अजमीर येथें परलोकवासी झाले. त्यांच्या पश्चात् उत्तर हिंदुस्थानांत आर्यसमाजाची जोरानें वाढ झालेली असून त्याचे आज जवळजवळ अडीच लक्ष अनुयायी आहेत. त्यांच्यांत हल्लीं उदारमतवादी व पुराणमतवादी असे दोन पक्ष झाले आहेत. तरी त्यामुळें समाजाची हानि झालेली नाहीं. शिक्षणाचा प्रसार करण्याकरिता त्यांनीं अनेक संस्था स्थापन केल्या. त्यांत पुराणमतवादी पक्षानें स्थापन केलेली गुरुकुल ही संस्था प्रमुख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्म म्हणजे केवळ तर्काला पटणारें असें तत्त्वज्ञान नसून त्यांत श्रद्धेचाही भाग असावा लागतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाज हे पंथ केवळ सुशिक्षितांस आकलन होतील असल्या विचारांनीं भरलेले असल्यामुळें सामान्य जनसमूहांत त्यांचा प्रवेश झाला नाहीं. शिवाय महाराष्ट्रांत संतांची प्रबल परंपरा जिवंत असल्यामुळें तिच्यापुढें नुसत्या तत्त्वज्ञानाची डाळ शिजत नाहीं. आर्यसमाजानें जातिभेदास फांटा देणें व अस्पृश्यता काढून टाकणें या गोष्टींचा आपल्या पंथांत समावेश केल्यानें त्याचा प्रसार फार झाला नाहीं. कारण तसें करण्याची कितीही आवश्यकता असली तरी, सामान्य लोकांस कित्येक शतकांचा संस्कार एकदम दूर करतां आला नाहीं. थिऑसफिस्टांचें विश्वबंधुत्व हिंदुस्थानच्या राष्ट्रीय झगडयांत लोकांना पसंत पडलें नाहीं. भाषेच्या विविधतेमुळें एका प्रांतांतील थोर धर्मसुधारकांची मौलिक शिकवण इतर प्रांतांत प्रसार पावली नाहीं. यामुळें नाना धर्मपंथांची ओळख सुशिक्षितांपुरती मर्यादित राहिली. राजकीय गाऱ्हाण्यांप्रमाणें तत्कालीन धर्मसुधारणेस लोकक्षोभाचें सार्वत्रिक आवाहन नव्हतें. अशा निरनिराळ्या कारणांमुळें जरी प्रत्येक पंथाची वाढ मर्यादित राहिलेली असली, तरी प्रत्येकामुळें हिंदु धर्माची प्रगति होत आहे. विसाव्या शतकांत आज हिंदु धर्मास नवी दृष्टि प्राप्त झालेली असून ते पतितपरावर्तनाच्या उद्योगास झपाट्यानें लागले आहेत व हिंदु धर्माचें पूर्वीचें वर्णप्रधान स्वरूप नाहींसें होऊन, त्यास हलके हलके मानवधर्मप्रधान स्वरूप प्राप्त होत आहे.

(२) समाजसुधारणा

१०. **पाश्चिमात्य व पौर्वात्य समाज** :—इंग्रजी अंमलामुळें दोन भिन्न संस्कृतींत वाढलेल्या समाजांचा एकमेकांशीं निकट परिचय झाला. युरोपियन संस्कृतींत वाढलेल्या लोकांनीं हिंदी सस्कृतींत वाढलेल्या लोकांस जिंकलें, तेव्हां जेत्यांच्या संस्कृतीकडे सानुकरण बुद्धीनें पाहण्याची साहजिकच पुष्कळांस वृद्धि झाली. युरोपियन समाज अठराव्या शतकांत व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वावर वाढला. हिंदुसमाजाची रचना श्रमविभागाच्या तत्त्वावर उभारलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीवर झालेली होती व तिच्यावर कालवशात् जातिभेदाचीं पुटें चढलीं. सध्यां हिंदुसमाज अनेकविध जातींमध्यें विभागून गेला आहे. विद्यमान युरोपियन समाजांत व्यक्तिस्वातंत्र्यास महत्त्व असल्यामुळें स्त्रीपुरुष या दोघांसही स्वतःच्या मर्जीप्रमाणें उन्नति करून घेण्यास मोकळीक आहे. ह्या स्वातंत्र्यामुळें कौटुंबिक बंधनास थोडा धक्काही पोहोंचला असेल. उलट हिंदी समाजांत व्यक्ति हा समाजाचा शेवटचा घटक मानण्यापेक्षां कुटुंब हा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भूमिकेंत ते इतके तन्मय झाले कीं, शेवटीं त्यांस कृष्णचिंतनांत मूर्च्छा आली. रामकृष्णांनीं जातिभेद पाळला नाहीं. धानी नांवाच्या एका लोहार जातीच्या विधवा स्त्रीस त्यांनीं आपली आदिमाता असें मानलें. लहान वयांतच मोठमोठ्या शास्त्री-पंडितांची बुद्धि कुंठित व्हावी असे प्रश्न तो विचारी. पुढें ते कालीचे उपासक झाले. कलकत्त्याच्या उत्तरेस चार मैलांवर दक्षिणेश्वर येथें एक मठ स्थापन करून तेथें ते कालीची नित्य उपासना करूं लागले व त्यांत त्यांचें देहभान हरपत असे. इ. स. १८८६ सालीं ईशचिंतनाच्या तन्द्रींत असतांनाच ते समाधिस्थ झाले. स्वामी रामकृष्णांच्या शिष्यांनीं रामकृष्ण मिशनची स्थापना करून त्यांचें कार्य चालू ठेवलें. सनातन हिंदुधर्माच्या आधारावर व्यापक विश्वधर्माचा संदेश जगाला देणें, वेदान्ताला कर्मप्रवण बनवणें, अद्वैत वेदान्त हा शास्त्रीय प्रगतीनें खोटा ठरूं शकत नाहीं अशी लोकांची खात्री करून देणें, धर्माचरणांत लोकसेवेला प्राधान्य देणें, व धर्माच्या आधारावर राष्ट्रभक्तीची ज्योत पेटवून लोकांत पारतंत्र्याविरुद्ध क्रान्तिकारक वृत्ति फैलावणें असें बहुविध कार्य रामकृष्ण मिशननें केलें आहे.

८. **स्वामी विवेकानंद** :—स्वामी विवेकानंद हे स्वामी रामकृष्णांचे शिष्य. यांचें मूळ नांव नरेंद्र. हे इ. स. १८६३ सालीं जन्मले. आपल्या वयाच्या २० व्या वर्षी यांनीं रामकृष्ण परमहंस यांचें शिष्यत्व पतकरलें व पुढें सुमारें सहा वर्षे त्यांनीं हिमालयांत अज्ञातवासांत घालविलीं. इ. स. १८९३ सालीं ते शिकागो (अमेरिका) येथें 'सर्वधर्मपरिषद' भरली होती तेथें हिंदु धर्माचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले व आपल्या असामान्य वक्तृत्वानें त्यांनीं जमलेल्या प्रतिनिधींच्या मनावर विलक्षण परिणाम केला. यानंतर त्यांनीं अमेरिकेंत व इंग्लंडमध्यें वेदान्ताचा अभ्यास करण्यासाठीं अनेक संस्था स्थापन करून पुष्कळ सभासद मिळविले. हिंदु लोक पाश्चिमात्यांचें अन्ध अनुकरण करतात असें पाहून त्यांना फार वाईट वाटे व ते त्याचा तीव्र निषेध करीत. विवेकानंदांप्रमाणेंच स्वामी रामतीर्थ हेही अमेरिकेंत जाऊन हिंदु धर्मावर व्याख्यानें देऊन आले. विवेकानंद व रामतीर्थ यांसारख्या थोर विभूतींच्या यत्नामुळें जगामध्यें हिंदु धर्मास अभिमानास्पद स्थान मिळालें व परकीयांत हिंदुधर्माबद्दल असलेल्या अनेक विपरीत समजुतींचा निरास झाला.

९. **समारोप** :—ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, थिऑसफी व रामकृष्णांचा पंथ यांच्या वर्णनावरून आपणांमध्यें धर्मविचार निद्रित झालेला नाहीं याची साक्ष पटते. इंग्रजी शिक्षण हें बुद्धिप्रधान असल्यानें प्रत्येक पंथानें आपापल्यापरी हिंदु धर्मांतील भोळसर समजुतींवर हल्ला चढविला व हिंदु धर्मांतील तत्त्वें तर्काच्या कसोटीवर घांसून घेण्यास सुरुवात केली. परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. **विधवाविवाह** :—हिंदुस्थानांत स्त्रियांपैकीं शेंकडा १७ स्त्रिया विधवा आहेत व त्यांच्यापैकीं शेंकडा २८ स्त्रिया ४० वर्षांच्या आंतील आहेत व शेंकडा १५, १५ वर्षांच्या आंतील विधवा आहेत. पुनर्विवाहास हिंदुधर्म शास्त्राची संमति आहे. इ. स. १८५६ सालीं पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा पास झाला. परंतु पुनर्विवाह लावणें हें अद्याप कमी दर्जाचें मानलें जातें. इंग्रजी अंमलांतील पहिल्या पिढीनें ह्या प्रश्नाचा जोराचा पुरस्कार केला. बंगालकडे पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर व महाराष्ट्रांत कै. न्या. रानडे या प्रश्नाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या यत्नानेंच वरील कायदा पास झाला. ह्याच वेळीं सामाजिक प्रश्न सोडविण्यास सरकारची मदत घ्यावी किंवा घेऊं नये

न्यायमूर्ति रानडे

ह्या प्रश्नासंबंधीं कडाक्याचा वादविवाद झाला. एकंदरींत गेल्या २५–३० वर्षांत सरकारी कायदा होऊनही ह्या प्रश्नास मोठें उत्तेजन मिळालें असें म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु हल्लीं पूर्वींहून अधिक पुनर्विवाह होतात व सुशिक्षित बहुजनसमाजाची प्रवृत्ति ह्या प्रश्नाबाबत सहानुभूतीची असते.

१४. **जातिभेद** :—जातीजातींच्या खिचडीमुळें सर्व राष्ट्र अगदीं विभागून गेलें आहे हें सर्वांच्या लक्षांत येतें, परंतु जाती अजिबात नाहींशा कराव्या कीं कांहीं एका मर्यादेपर्यंत थांबावें, तसें असल्यास ती मर्यादा कोणती याचा शास्त्रशुद्ध विचार कुणास नीट मांडतां आलेला नाहीं. मोठमोठ्या जाती मोडण्यापूर्वी पोटजातींतील कृत्रिम बंधनें नष्ट करण्याकडे आज लोकांचें लक्ष अधिक लागलेलें दिसत आहे. प्रत्यक्ष आचरणांत प्रगति फार होत नसली तरी जातिभेद नष्ट झाला पाहिजे अशा प्रकारचें मत समाजांत मान्यता पावत आहे. हलके हलके पोटजाती मोडत मोडत जातीभेद क्रमानें मोडावा हा विचार आतां मागें पडला आहे. पण अजूनही या समाजांत कारकून, शिक्षक, वकील, डॉक्टर या पेशास जी सामाजिक प्रतिष्ठा आहे ती सुतार, शिंपी, लोहार यांना नाहीं. ही समाजाची सदोष दृष्टि नाहींशी झाल्याखेरीज बुद्धिवान् मुलें सुतार किंवा लोहार होण्यास पुढें सरसावणार नाहींत, व कारागिरांना चिकटलेला न्यूनगंड नाहींसा होणार नाहीं.

१५. **अस्पृश्यता निवारण** :—हिंदुस्थानांत महार, मांग, चांभार, ढोर व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घटक मानण्याची प्रवृत्ति असल्यामुळें स्त्रियांस सन्माननीय परंतु परावलंबी स्थान आहे. परंतु गेल्या तीस चाळीस वर्षांतील राजकीय आन्दोलनानें व आर्थिक संक्रमणानें ही स्थिति झपाटचानें पालटत आहे. आज देशाच्या सर्व कार्यक्षेत्रांत स्त्रियांनीं स्थान पटकाविलें आहे. पूर्वींचे भेद लोप पावत असून भारतीय समाजांतील पुढारलेला वर्ग झपाटचानें पाश्चिमात्य समाजरचनेच्या वळणावर जात आहे. हिंदुसमाजाची मूळ रचना कोणत्या पायावर झाली, पुढें तिच्यांत कसकसे फेरफार झाले व सध्यां या समाजांतील नेमकीं दोषस्थळें कोणतीं, वगैरे प्रश्न अत्यंत वादग्रस्त आहेत; व म्हणून केवळ स्थूल मानानें रूपरेषा दर्शविण्यापुरतें वरील वर्णन आहे असें समजावें.

११. **स्त्रीशिक्षण** :—इंग्रजी-अंमलापूर्वीं पुरुष वर्गांतही साक्षरतेचें मान बरेंच कमी होतें व स्त्रियांत तर त्याहून कमी होतें. शिवाजीच्या कालचीं जिजाबाईचीं व पेशव्यांच्या कालचीं गोपिकाबाईचीं पत्रें सांपडतात, परंतु तेवढ्यावरून सामान्य स्त्रीसमाज साक्षर होता असें म्हणतां येणार नाहीं. इंग्रजी अंमलांतील पहिल्या पिढींतील लोकांनीं स्त्रीशिक्षणाचा मोठ्या नेटानें पुरस्कार केला. गेल्या ७५ वर्षांत या प्रश्नाची बरीच प्रगति झाली आहे. आतां स्त्रीशिक्षणाच्या आवश्यकतेसंबंधीं कोणाचें दुमत नाहीं. मात्र अजून महाराष्ट्रांत तरी सुशिक्षित संसारक्षम स्त्रियांची संख्या थोडीच आहे. सुशिक्षित स्त्रियांचें प्रमाण अद्यापही दर हजारीं २९ असें आहे. महाराष्ट्रांत महर्षि आण्णासाहेब (श्री. धोंडो केशव) कर्वे यांनीं स्त्री-शिक्षणाच्या क्षेत्रांत केलेलें कार्य आज अखिल भारतांत आदर्श गणलें जात आहे. महर्षि कर्वे हे इ. स. १८५८ सालीं जन्मले. त्यांनीं पुण्यापासून चार मैलांवर हिंगणें येथें अनाथ बालिकाश्रम स्थापन केला. पुढील काळांत स्त्रियांसाठीं वेगळें विद्यापीठ स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा धरून तीही त्यांनीं तडीस नेली. महाराष्ट्रांतील सुशिक्षित स्त्रीचा धीटपणा, सुधारणावादी दृष्टि व सार्वजनिक कार्याची हौस यांचें स्फूर्तिस्थान महर्षि कर्वे हे आहेत.

१२. **बालविवाह** :—इंग्रजी अंमलापूर्वीं महाराष्ट्रांत फार लहानपणीं लग्नें होत असत व अद्यापही मागासलेल्या जातींतून लग्नें लहानपणीं करण्याची चाल आहे. जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल तसतशी ही चाल मागें पडत जाईल. मुलीचें वय लग्नाचे वेळीं १४ हून कमी असूं नये असा कायदा इ. स. १९२७ सालीं पास झाला, तरी मागासलेल्या समाजांत या कायद्यास धाब्यावर बसवून लग्नें होतातच. कारण एकदां लग्न झाल्यावर लग्न लावणारास दंड होतो पण लग्न बेकायदा ठरत नाहीं. पुढारलेल्या समाजांत मात्र बालविवाह निःसंशय मागें पडला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



आजचें कलकत्ता शहर



जुन्या पद्धतींत बदल करण्याची जरूरी : ट्रॅक्टरनें शेती करण्याचा प्रयोग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भंगी ह्या पांच जाती मुख्यत्वेंकरून अस्पृश्य मानल्या जातात. त्यांची संख्या अजमासें चार कोटी छत्तीस लक्ष आहे. महाराष्ट्रांत अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीचा पहिला मान श्री. जोतिराव फुले यांस आहे. त्यांचा जन्म इ. स. १८२७ त झाला. इ. स. १८४२ त त्यांनीं पुण्यांत पहिली मुलींची शाळा सुरू केली. इ. स. १८६३ मध्यें त्यांनीं बालहत्या प्रतिबंधक गृह काढलें व इ. स. १८६४ त महाराष्ट्रांत पहिलो पुनर्विवाह घडवून आणला. इ. स. १८७३ त त्यांनीं पुण्यास सत्यशोधक समाजाची स्थापना केली. दीनदुबळ्यांबद्दल त्यांचें अंतःकरण तुटत असे. समाजसुधारणेची चळवळ खेड्यापाड्यापर्यंत पोहोंचविण्याचें श्रेय महात्मा जोतिराव फुले यांनाच आहे. ते इ. स. १८९० सालीं वारले. त्यांचें अस्पृश्यता निवारणाचें कार्य नंतर विठ्ठल रामजी शिंदे व प्रा. माटे यांनीं केलें. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत म. गांधींनीं ह्या प्रश्नास चालना दिल्यापासून लोकमत पुष्कळच सुधारलें आहे. सार्वजनिक ठिकाणीं, शाळांतून, पाणवठ्यावर व देवालयांतून त्यांना मज्जाव नसावा ह्याबद्दल जाणत्या लोकांत एकमत आहे. भारतीय घटनेनें कलम १७ मध्यें अस्पृश्यतेच्या कारणावरून कुणासही कमी लेखणें हा गुन्हा असल्याचें सांगितलें आहे. तात्त्विक दृष्टचा हें सर्व सिद्ध असलें, तरी अजून समाज हीं तत्त्वें खुल्या दिलानें आचरणांत आणीत नाहीं. समाजाच्या एका भागास अस्पृश्य लेखणें हा समाजाचा मोठा दोष आहे. तो जितक्या लवकर निघून जाईल तितका देश अधिक उन्नतीस येईल. अस्पृश्यास अस्पृश्य न म्हणतां 'हरिजन' हा नवा शब्द महात्मा गांधींनीं रूढ केला आहे.

१६. **शुद्धीकरण** :—एकवार बाटून परधर्मांत गेलेल्या हिंदूंस स्वधर्मांत यावेंसें वाटल्यास पूर्वी मनाई असे. परंतु आजकाल ह्या बाबतींत लोकमत पालटलें असून अनेक लोक शुद्ध होऊन पुनः हिंदु धर्मांत सामील होत आहेत. इतकेंच नव्हे तर कित्येक परधर्मांत जन्मलेले लोकही हिंदुधर्म स्वीकारीत आहेत. मात्र ह्या लोकांचा हिंदुसमाजव्यवस्थेंत दर्जा कोणता हें अद्याप ठरलेलें नाहीं.

१७. **लोकहितवादी व आगरकर** :—वर सांगितलेल्या महात्मा जोतिराव फुले यांच्याखेरीज महाराष्ट्रांत 'लोकहितवादी' या नांवानें प्रसिद्ध असलेले रावबहादूर गोपाळ हरि देशमुख (इ.स.१८२३–१८९२) हे इंग्रजी अमदानीच्या पहिल्या पिढींत मोठे कर्ते सुधारक होऊन गेले. त्यांनीं जुन्या लोकांच्या धर्मभोळ्या समजुतीवर हल्ला चढविला, इंग्रजांप्रमाणें अधिकाधिक ज्ञान संपादन करावें, निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत व्हावें असा प्रचार केला. संस्कृत मंत्र नुसते पाठ म्हणत न बसतां त्यांचा अर्थ समजून घ्यावा अशा प्रकारचा बुद्धिवाद त्यांनीं समाजांत जागृत केला. लोकहितवादींखेरीज दुसरे महा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राष्ट्रांतील नामांकित सुधारक गोपाळराव आगरकर (इ. स. १८६६–१८९५) हे होत. जुन्या भोळचा धर्मसमजुतींवर कडाडून हल्ला त्यांच्याइतक्या तीव्रतेनें कोणीच केला नसेल. आपल्या तत्त्वांच्या प्रतिपादनासाठीं त्यांनीं 'सुधारक' नांवाचें पत्र काढलें. सोळाव्या शतकांत युरोपांत मार्टिन ल्यूथरनें जें कार्य केलें तशाच प्रकारचें कार्य महाराष्ट्रांत आगरकरांनीं केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्राप्रमाणें इतर प्रांतांतही कर्ते समाजसुधारक होऊन गेले. त्यांच्या कार्याचें स्वरूप साकल्यानें समजून घेणें हें आपलें कर्तव्य होय.

१८. **समारोप** :—इंग्रजी शिक्षणाच्या योगानें या देशांतील समाजावर प्रथम परिणाम कसा झाला याचें विवेचन मागें (पृ. ३६६) केलेलेंच आहे. तेथेंच अनुषंगानें या सामाजिक क्रांतींतील मिशनऱ्यांच्या कार्याचें महत्त्वही सांगितलें. पावसाळ्यांत नदीला प्रथम पूर येतो तेव्हां पाणी गढूळ असतें, तसें भारतीय समाजांत हलके हलके होत असलेल्या क्रांतिसंबंधीं म्हणतां येईल. जुन्या एतद्देशीय गोष्टीबद्दल तुच्छता मागें पडून त्याची जागा आत्मसंशोधनानें घेतली आहे. परकीयांच्या अंध अनुकरणाच्या ऐवजीं चिकित्सा आली आहे. तसेंच जुनें तें सोनें, अशी पुराणप्रियता मागें पडून विचारवंत नव्या मूल्यांचा शोध घेत आहेत व शंकराचार्यांप्रमाणें सॉक्रेटिस व बुद्धाप्रमाणें येशूख्रिस्त यांना पूज्य मानण्याची प्रवृत्ति वाढत आहे. समाजाचें पाऊल व्यक्तिस्वातंत्र्य, समता, उदारमतवादीपणा या दृष्टीनें अधिकाधिक पुढें पडत आहे व त्यामुळें समाजांत क्रांति होत आहे; आणि या क्रांतीच्या यशस्वितेवरच देशाचा चिरकालीन भावी भाग्योदय अवलंबून आहे.

प्रश्न

१. टिपणें लिहा :—(१) ब्राह्मोसमाज व प्रार्थनासमाज यांचीं तत्त्वें, (२) आर्यसमाजाचें वैशिष्टय, (३) 'विवेकानंदांनी धर्मजागृति केली'. (४) रूढी मोडतांना कोणत्या अडचणी येतात? भारतांतील अशा कोणत्या रूढी कायद्यानें बंद करण्यांत आल्या? समाजांत त्याबद्दल काय मत आहे?

अभ्यास

१. वाचा :—(१) विवेकानंद किंवा रामकृष्ण परमहंसांचें चरित्र. (२) अस्पृश्यांचा प्रश्न (ले. श्री. म. माटे), यांतील थोडासा तरी भाग.
२. या धर्मपंथांपैकीं तुम्हांला आवडणाऱ्या पंथाच्या प्रचारकाची भूमिका घेऊन त्या मताच्या पुष्टयर्थ एक छोटें व्याख्यान तयार करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कापड व गोणपाट यांच्या गिरण्या, पोलाद-लोखंडाचे कारखाने, रात्रंदिवस चालणाऱ्या रेल्वे व तदनुषंगिक वर्कशॉप्स, दारूगोळ्यांचे कारखाने, मुद्रण-वृत्तपत्रें आदि धंद्यांत दिवसभर बंदिस्त जागेंत अनेकांना कष्ट करावे लागतात. शेतांतील उघडी हवा शेतकऱ्याखेरीज कोणास मिळणार? या कष्टाचा व शहरी राहणीचा आरोग्यावर परिणाम झालेला आहे. त्याच-बरोबर उपचारासाठीं पाश्चात्य औषधी व रुग्णसाहित्यानें सज्ज असे सरकारी दवाखाने मोठमोठ्या शहरीं काढण्यांत आले आहेत. खाजगी दवाखान्यांतून पाश्चात्य शस्त्रक्रियेंत निष्णात् डॉक्टर शहरांतून रोग्यांना नव्या नव्या शोधांचा लाभ देत आहेत. देवी व प्लेगसारखे रोगही आतां आटो-क्यांत आले आहेत.

३. चालीरीती :—इंग्रजी राज्याच्या प्रारंभकाळांत इंग्रजी शिकलेल्यां-पैकीं अनेकांनीं इंग्रजी पेहराव, भाषा, चालीरीति, खाणें-पिणें यांचा स्वीकार केला; पण १९ व्या शतकाच्या अखेरीस हा मनु पालटला. इंग्रजी पोषाखां-तील उपयुक्त भाग तेवढा राहिला. देशी पोषाखांतील धोतर कायम राहिलें. पेशवाई अंगरखा जाऊन कोट-रुमाल, कोट-टोपी, कोट-पगडी, हा पोषाख आला. अलीकडे टोपी किंवा हॅट न घालण्याची पद्धति सुशिक्षितांत रूढ होऊं पाहात आहे. उत्तर हिंदुस्थानांत सुरवार व शेरवाणीचा प्रचार आहे. मुस्लीम समाजांत तुर्की टोपी घालण्याचा प्रघात अद्याप आहे. इ. स. १९२१ मध्यें सुरू झालेल्या गांधीयुगानें डामडौलाच्या कपड्यांचा मान कमी करून खादीचे कपडे घालणारांना व खादी टोपीला प्रतिष्ठा आणून दिली. रेशमी कपड्यांचा हव्यास व त्यांची आकर्षकता लो. टिळकांच्या स्वदेशी चळवळीनें व म. गांधीजींच्या खादी प्रसारानें नाहींशी केली! या शतकाच्या काळांत भारतांतील स्त्रियांनीं युरोपियन स्त्रियांचा पोषाख स्वीकारला नाहीं, उलट धर्मांतर केल्यावरही भारतीय ख्रिस्ती स्त्रियांत आपला पूर्वींचाच पोषाख कायम ठेव-ण्याची प्रवृत्ति आढळली. अलीकडे महाराष्ट्रांत सकच्छ साडीऐवजीं विकच्छ वस्त्र नेसण्याची प्रवृत्ति खूपच वाढीस लागली आहे; कारण आकारानें लहान व किंमतीनें स्वस्त असते. उत्तर भारत, गुजराथ व दक्षिण भारतांत ही चाल आधींच प्रचारांत होती. मुस्लिम स्त्रियांत गोषा पाळण्याची प्रथा चालू आहे. पुरुषांप्रमाणें सायकलीवर बसून कामास जाण्याची प्रथा शहरी स्त्रियांत वाढत आहे. संयुक्त कुटुंबपद्धति जाऊन विभक्त कुटुंबपद्धति रूढ होत आहे. प्रसंगोपात् पति-पत्नी दोघांनाही पोटासाठीं काम करावें लागत असल्यानें गृहजीवन कठिण झालें आहे. त्यांतच पूर्वींच्या म्हाताऱ्या आजी नातवंडांना गोष्टी सांगण्यास विभक्त घरांत नसल्यानें मुलाबाळांचें संगोपन अडचणीचें होत आहे. शहरांतून स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार वाढत असला तरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माहितीसाठीं

धार्मिक जागृति पाहिजे

" जी गोष्ट व्यक्तीची तीच देशाची. खरी उन्नति व्हावयाची असेल तर प्रथम उन्नत धर्माचा प्रसार झाला पाहिजे. राजकीय हक्क प्राप्त करून घेण्यास राष्ट्रीय सभा भरवा अथवा प्रांतिक सभा भरवा किंवा सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास सामाजिक परिषद भरवा; परंतु जोंपर्यंत धर्मजागृति झाली नाहीं तोंपर्यंत देशास ह्या खटपटींत खरें यश यावयाचें नाहीं. प्रथम आत्म्याचीच उन्नति झाली पाहिजे."

—डॉ. रा. गो. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें पृ. ३४२–४३.

भाग ४३ वा

गेल्या शंभर वर्षांतील लोकजीवन

१. महागाई :—आज भारताची लोकसंख्या सुमारें ३२ कोटी आहे. इतक्या लोकांना पुरेसें अन्न आज आपल्या देशांत निर्माण होऊं शकत नाहीं. जुन्या पद्धतीच्या शेतींत बदल झाल्याशिवाय आणि पावसाच्या अस्थिर सिंचनाऐवजीं कालव्याच्या पाण्याची सोय झाल्याशिवाय पुरेसें अन्न निर्माण होणार नाहीं. त्या दिशेनें स्वतंत्र भारतांत सरकारी यत्न सुरू झाले आहेत. पहिल्या महायुद्धापर्यंत ही अडचण या देशांत भासत नव्हती. आजच्या पिढीला डोळ्यादेखत परिस्थिति पालटलेली दिसत आहे. १५ वर्षांपूर्वीं वनस्पती तुपाला कोणी विचारीत नव्हतें ! रुपयाला ८ शेर दूध ज्यांनीं घेतलें, त्यांना शेरालाच आज रुपया द्यावा लागत आहे. ज्या गांवीं सहस्रभोजनें होत तेथें स्वतःच्या घरच्या लग्नकार्यांत २५ च्यावर माणसांना भोजन घालणें बेकायदा झालें आहे व २५ लोकांच्या भोजनासाठीं धान्य कसें सांठवावें हा प्रश्न उभा राहूं लागला आहे. दुधाच्या ऐवजीं चहापान महाराष्ट्रांत व मद्रासकडे कॉफीपान खेड्यां-पर्यंत पोहोंचलें आहे; पण त्या पेयालाही पुरेशी साखर न मिळतां, गूळ घालून त्यास गोडी आणावी लागत आहे ! उत्तर भारतांत अद्यापही चहापानाचें प्रमाण कमी असून दूधपानाकडेच लोकांचा ओढा आहे.

२. आरोग्य :—गेल्या शंभर वर्षांत उद्योगधंद्यांचें क्षेत्र विस्तृत झालें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैभव कमी झालें आहे. मराठ्यांचें लक्ष टोलेजंग इमारती उठवण्याकडे कधींच गेलें नाहीं. सरकारी कामांसाठीं इंग्रजांनीं डामडौलाच्या इमारती बांधण्यास सुरवात केली. प्रांतोप्रांतीं कायदेमंडळाचीं सभागृहें, नव्या दिल्लीसारख्या नवीन वसविलेल्या शहरांतील इमारती भव्य व प्रेक्षणीय आहेत. इंग्रजी व इंजिनिअरिंग शिकलेल्या लोकांनीं आधुनिक काळांत शहरांतून पूर्ण पाश्चात्य वळणाचे हवाशीर बंगले बांधले. ठेंगणीं दारें, खिडक्या नसलेलीं, पडवी-देव-घराचीं घरें आतां मागें पडलीं आहेत. मातीच्या ऐवजीं चुन्या-विटांचीं, वा सीमेंट काँक्रीटचीं घरें बांधण्याकडे लोकांची प्रवृत्ति आहे. श्रीमंताच्या घरांतील बैठकीची मांडणी टेबलखुर्च्यांची, म्हणजे पाश्चात्य वळणाची झाली आहे. घराप्रमाणें रस्ते बांधण्यांतही फार फरक पडला आहे. निरुंद, काळोखे व फरसबंदी बोळ जाऊन खूप विस्तृत व खडीचे किंवा डांबरी रस्ते शहरांतून होत आहेत. स्वराज्यांत कांहीं खेडेगांवांतही विजेचा शिरकाव होऊं लागला आहे.

६. **शिक्षण** :—लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दींत मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथें सरकारनें विद्यापीठें स्थापलीं व प्रत्येक प्रांतांत 'शिक्षण-विभाग' सुरू केला. त्या वेळीं विद्यापीठांचें मुख्य कार्य म्हणजे प्रवेशपरीक्षा किंवा मॅट्रिकची परीक्षा घेणें, कॉलेजें संलग्न करणें, उच्च शिक्षणाच्या परीक्षा घेऊन बी. ए., एम्. ए. इत्यादि पदव्या देणें हें असे. इ. स. १८५७ मध्यें २७ कॉलेजें निघालीं होतीं. मिशनरी लोकांप्रमाणें आर्यसमाज, थिऑसफिकल सोसायटी या संस्थांनींही कॉलेजें चालविण्यास सुरुवात केली.

७. **विद्यापीठांची वाढ** :—अलीगडच्या सर सय्यद अहमदांनीं मुस्लिम शिक्षण परिषद स्थापून मुसलमानांत इंग्रजी शिक्षणाच्या फैलावास हातभार लावला. भिन्नभिन्न प्रांतांत शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळें अनेक विद्या-पीठांची गरज भासूं लागली. त्याप्रमाणें इ. स. १८८२मध्यें लाहोर व इ. स. १८८७ मध्यें अलाहाबाद येथें युनिव्हर्सिट्या काढण्यांत आल्या. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दींत इ. स. १९०४ मध्यें विद्यापीठांचा नवा कायदा करण्यांत आला. त्यायोगें स्वतः शिक्षण देण्याचा आणि संलग्न कॉलेजांची तपासणी करण्याचा अधिकार विद्यापीठांना मिळाला. यानंतर बनारस, म्हैसूर, पाटणा, हैद्राबाद इत्यादि ठिकाणीं विश्वविद्यालयें सुरू झालीं. अलीकडील तीस वर्षांत नवीन विद्यापीठांच्या स्थापनेस सरकारनें खूप उत्तेजन दिलें. इ. स. १९२७ पर्यंत आणखी पंधरा विद्यापीठें सुरू झालीं. भारतास स्वातंत्र्य मिळा-ल्यावर प्रादेशिक विद्यापीठांचा पसारा सुरू झाला. मुंबई इलाख्यांत पुणें, गुजराथ, कर्नाटक, बडोदें हीं विद्यापीठें स्थापण्यांत आलीं. या विद्या-पीठांच्या संख्येबरोबर स्थापत्य, वैद्यकीय शास्त्र, तत्त्वज्ञान, रसायन, शिक्षणकला इ. शिक्षणाच्या विविध शाखांतही प्रगति झाली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महर्गतेमुळें त्यांना उच्च ज्ञान देणें पालकांना परवडत नाहीं. खेडेगांवांत शिक्षण मोफत व सक्तीचें झाल्यानें आतां कोठें मुली शिकूं लागल्या आहेत.

४. **सामाजिक समता** :—शिक्षणाचा प्रसार जसजसा होत आहे तशा जुन्या रूढी व बंधनें ढिली होत आहेत. अस्पृश्योद्धाराच्या प्रयत्नांचें वर्णन मागें आलें आहे. आतां कायद्यानेंच सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता नष्ट झाली आहे. क्वचित् स्पृश्यांच्या खाजगी घरांतूनही अस्पृश्यतेचें उच्चाटण होत आहे. पूर्वीच्या कडक सोंवळ्या ओवळ्याच्या कल्पना नाहींशा होत आहेत. पुष्कळशा घरांत व सार्वजनिक ठिकाणीं जातीजातींत रोटीबंदी किंवा पंक्तिभेद कमी होण्याच्या मार्गाला लागला आहे. वैवाहिक क्षेत्रांत जातिबंधनें अद्याप कडक आहेत, किंबहुना आंतर्जातीतील विवाहाची प्रथा अद्याप रुजलेली दिसत नाहीं! राजकीय क्षेत्रांतील निवडणुकांत जातवारीचा व धर्माचा इंग्रजांनीं केलेला वडेजाव स्वराज्यांत नष्ट करण्यांत आला आहे, त्याचा सुपरिणाम इतर क्षेत्रांतही दिसूं लागेल अशी आशा उत्पन्न झाली आहे. समाजाच्या सर्व थरांत शिक्षण घेण्याची इच्छा दिसत आहे. ती जशी परिपूर्ण होईल तशी समाजाची उंची वाढेल व समान शैक्षणिक व सांपत्तिक दर्जानुसार समतेचें क्षेत्र वृद्धिंगत होईल.

५. **चित्रकला-शिल्पकला** :—इंग्रजी राज्यांत तलम वस्त्र विणण्याची भारतीय कला नष्ट झाली. देशी राज्यें गेल्यानें जुन्या कलाकौशल्याचा कोणी वाली उरला नाहीं. गायकवाड, निजाम, शिंदे इत्यादींच्या संस्थानांत जुनी चित्रकला, गायनकला, यांना आश्रय होता. मुद्रणकलेप्रमाणें लिथोनें चित्रें छापण्याची कला या देशांत आली. या पद्धतीचा राजा रविवर्म्यानें चांगला उपयोग करून दाखविला; पण त्यासही म्हैसूर दरबारचा आश्रय होता. मुंबई येथील आर्टस्कूलच्या शिक्षणानें या चित्रकलेची विशेष वाढ केलेली दिसत नाहीं. गायनकलेला पं. विष्णु दिगंबर पलुस्करांनीं चांगली चालना दिली. या कलेस अलीकडे समाजांत प्रतिष्ठा मिळूं लागली आहे. इतकेंच काय पण ५० वर्षांपूर्वी अवहेलना केली जाणारी नृत्यकला अलीकडे ऊर्जितावस्थेस येत आहे. उदयशंकराचें नांव या क्षेत्रांत आंतरराष्ट्रीय कीर्तीचें आहे. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध व विसाव्या शतकाचीं २५ वर्षें मराठी नाट्यकलेला भरभराटीचीं गेलीं. बालगंधर्व, गणपतराव जोशी, केशवराव भोसले, दाते आदि नटांनीं चांगलें नांव मिळविलें. बोलपट आल्यानें नाटकांचें आकर्षण अलीकडे कमी होत आहे. हिंदी भाषेंत नाट्यकलेचा पुरा विकास होण्यापूर्वीच बोलपटाचा उदय झाला. बंगाल्यांत चित्रपट कला चांगली विकसित झाली आहे. फोनोग्राफ व रेडिओ यामुळें या क्षेत्रांतील नट-नटींचें संगीत नवीन पिढीच्या मुखांत खेळूं लागलें आहे. मोगल कालानंतर इमारतींचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतिहास, आदि विषयांवरील संस्कृत व इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध होऊं लागलीं. इ. स. १८७५ नंतर स्वतंत्रपणें गद्यलेखन प्रांतीय भाषांतून होऊं लागलें. विसाव्या शतकांत लघुकथा, लघुतम कथा, एकांकी नाटकें, बोलपटकथा इ. वाङ्मयप्रकारांचा सर्वच देशी भाषांत उदय झाला. हायस्कूल व विद्यापीठें यांतून शिक्षणाचें माध्यम इंग्रजी असतांही राष्ट्रीय भावनेनें आपल्या मातृभाषेंत ग्रंथरचना करण्याकडे कांहीं विद्वानांनीं लक्ष दिलें. मराठींत चिपळूणकर-पितापुत्र व हिंदींत आचार्य महावीरप्रसाद द्विवेदी यांचा उल्लेख अशा प्रारंभीच्या विद्वानांत केला पाहिजे. कविता वाङ्मयांतही पूर्वीचे देव-भवतीपर विषय कमी होत जाऊन जीवनाइतके विविध विषय व व्यक्तिगत विचार प्रकट करणारें स्फुट काव्य प्रस्फुटित होऊं लागलें. राजनैतिक, भौतिक, रासायनिक आदि शास्त्रीय विषयांखेरीज अन्य शास्त्रांत आजही भारतीय भाषांत अभिमान वाटण्याजोगी ग्रंथसंपत्ति आहे. बंगाली भाषेंत रवींद्रनाथ टागोरांसारखे महाकवि, मराठींत गडकरी-खाडिलकरांसारखे प्रतिभाशाली नाटककार, सर्व क्षेत्रांत लीलेनें लेखणी चालविणारे निबंधकार केळकर, आधुनिक हिंदींत महाकाव्यें निर्माण करणारे मैथिलशरण गुप्त यांचे ग्रंथ या भाषांना भूषवीत आहेत. गीतारहस्य व ज्ञानकोश हेही मराठीचे वैभव वाढविणारे ग्रंथ आहेत. अलीकडे निघालेल्या प्रादेशिक पीठांतून प्रांतीय भाषा माध्यम झाल्या तर, शास्त्रीय क्षेत्रांतही त्या भाषांचें वाङ्मय विकसित होईल. नागपूर विद्यापीठाचे प्रयत्न या दृष्टीनें आदर्श आहेत. कै. सरोजिनी नायडू या कवियित्री, तत्त्वचिंतक योगी अरविंद घोष, आत्मचरित्र लेखक पं. जवाहरलाल नेहरू, स्फुटलेखक म. गांधी, आदि भारतीयांनीं इंग्रजी भाषेंतही बहुमोल ग्रंथ लिहिले आहेत.

१०. वृत्तपत्र :—एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत देशी भाषेंतील वर्तमानपत्रांचा उदय झाला. मराठींतील पहिलें वृत्तपत्र 'दर्पण' नांवाचें १८३२ त निघालें. परवांपर्यंत चालू असलेलें 'ज्ञानप्रकाश' पत्र इ. स. १८४९ त निघालें होतें. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून राजकीय चळवळीस वृत्तपत्रांचा फार मोठा उपयोग झाला व होत आहे. लो. टिळकांचा केसरी, कै. परांजप्यांचा काळ', म. गांधींचा 'यंग इंडिया' व 'हरिजन', घोषबंधूंची 'अमृतबझार पत्रिका', मद्रासचा 'हिंदु' यांसारख्या पत्रांनीं लोकजागृति केली व तेजस्वी वाङ्मयही निर्माण केलें.

११. विदेशी खेळांची आवड :—इंग्रजी खेळांची विलक्षण आवड शहरांतून अद्याप आहे. पत्ते, कॅरम, टेनिस, हॉकी, फुटबॉल, क्रिकेट यांना गंजिफा, बुद्धिबळें, सोंगट्या, हुतुतू, आट्यापाट्या, यांपेक्षां अधिक मान दिला जातो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. **शिक्षणाची दिशा** :—या शिक्षणाची दिशा व धोरण ठरविण्यासाठीं वेळोवेळीं सरकारनें चौकशी मंडळें नेमलीं. त्यांपैकीं लॉर्ड रिपनच्या वेळचें हंटर कमिशन, लॉर्ड चेम्सफर्डच्या वेळचें सॅडलर कमिशन आणि स्वतंत्र भारताच्या सरकारनें नेमलेलें राधाकृष्णन् कमिशन हीं प्रमुख होत. हंटर कमिशननें प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासंबंधीही शिफारशी केल्या होत्या. या सर्वांच्या सूचनांप्रमाणें शक्य त्या सुधारणा सरकारनें वेळोवेळीं केल्या. खाजगी संस्थांना ग्रँट देण्याचें धोरण आंखल्यानें खर्चाच्या मानानें अधिक प्रमाणांत शिक्षणाचा प्रसार देशांत झाला. तथापि शें. १० टक्क्यांवर जनता साक्षर झाली नाहीं. इंग्रजी राज्य संपतांना बहुतेक प्रांतांत लोकनियुक्त मंत्रिमंडळें झालीं. त्यांनीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचें तत्त्व अमलांत आणलें. स्वतंत्र भारतांत गांधीजींच्या वर्धा-योजनेनुसार हस्तव्यवसायावर भर देणारे नवीन प्रयोग केले जात आहेत. स्त्रीशिक्षणासंबंधीं अन्यत्र लिहिलें आहे. प्रौढांमध्यें साक्षरता प्रसार करण्याचा प्रश्नही सरकारनें हातीं घेतलेला आहे. प्राथमिक शिक्षण मातृभाषेंत देण्याची कल्पना मान्य होत चालली आहे. उच्च शिक्षण इंग्रजींतून कीं हिंदींतून कीं प्रादेशिक भाषांतून द्यावें असा वाद सध्यां चालू आहे. उत्तर प्रदेशांतील विद्यापीठांत 'हिंदी' माध्यम क्रमाक्रमानें होत आहे. नागपूर विद्यापीठांत मराठी वा हिंदी भाषांतून शिक्षण देण्यास आरंभ झाला आहे. वस्तुतः हा प्रश्न सार्वदेशीय असल्यानें एकाच तऱ्हेनें तो सोडविला जाणें इष्ट आहे.

९. **वाङ्मयविकास** :—प्रांतीय भाषांतील गद्याचा उदय एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं झाला. पेशवाईच्या उत्तरार्धांत मराठीमध्यें बखरींच्या रूपानें गद्य प्रकट होऊं लागलें होतें; पण छपाईची सोय झालेली नसल्यानें त्याची वाढ झाली नाहीं. श्रीरामपूर (बंगाल) येथें मिशनरी लोकांनीं इ. स. १८०० त छापखाना काढला आणि हिंदी, बंगाली, मराठी, तेलगू, तामिळ आदि भाषांतून ख्रिस्ती धर्मग्रंथांचीं भाषांतरें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. डॉ. केरी या मिशनऱ्यानें इ. स. १८०५ त 'मराठी भाषेचें व्याकरण' हें स्वतः लिहून पहिलें मराठी छापील पुस्तक प्रकाशित केलें. तें देवनागरी लिपींत छापलें होतें. डॉ. केरीनें अनेक पुस्तकें मराठी व बंगाली भाषेंतच लिहिलीं व प्रकाशित केलीं.

लॉर्ड वेलस्लीनें सनदी नोकरांना देशी भाषा शिकविण्यासाठीं 'कॉलेज ऑफ फोर्ट वुइल्यम' नांवाचें विद्यालय कलकत्त्याला काढलें, तेथील विद्वानांच्या नेतृत्वाखालीं देशी भाषेंत ग्रंथरचना करण्यांत येऊं लागली. देशभर मुद्रणकलेचा जसा प्रचार होऊं लागला तसतसा देशी वाङ्मयाला बहर येऊं लागला. विशेषतः इ. स. १८५० पासून कादंबऱ्या, नाटकें, निबंध,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अर्वाचीन काळ

(इ. स. १८०५ ते १८५८)

जग — महत्त्वाचे सन — भारत

जग

ट्राफलगारची लढाई	१८०५
लामार्कचें क्रांतितत्त्व	१८०९
आयरिश पुढारी डॅनियल ओकानेलचा उदय	१८१०
वॉटर्लूची लढाई	१८१५
इंग्लंडमध्यें यंत्राविरुद्ध दंगे	१८१५
स्टेयास्कोपचा शोध	१८१६
कार्ल मार्क्स	१८१८–१८९५
नेपोलियनचा मृत्यु	१८२१
स्टीफन्सचें पहिलें रॉकेट	१८२९
फ्रान्सची दुसरी राज्यक्रांति	१८३०
क्लोरोफॉर्मचा शोध	१८३१
ब्रि.पार्लमेंटचें १लें रिफॉर्म बिल	१८३२
ब्रिटिश सरकारनें शिक्षणासाठीं प्रथमच ग्रॅन्ट मंजूर केली	१८३२
ब्रि.साम्राज्यांतगुलामगिरीबंद	१८३३
व्हिक्टोरिया इंग्लंडच्या गादीवर आली	१८३७
फोटोग्राफीचा शोध (फ्रान्स)	१८३९
ब्रिटनमध्यें पेनी पोस्टेज सुरू	१८४०
शिवण्याचें यंत्र (होवे, असे.)	१८४६
क्रिमियन युद्ध	१८५४–१८५६
इटाली ऑस्ट्रियाचें जूं झुगारतो.	१८५९

भारत

१८०५	शिंदे, होळकर व जाट यांच्याशीं बरोबरीच्या नात्यानें तह
१८१०	मिशनरी लोक मराठी पुस्तकें छापूं लागले
१८१४	नेपाळशीं युद्ध सुरू
१८१७	पेशवे, होळकर व भोसले यांच्याशीं युद्ध सुरू
१८१८	अष्टयाची लढाई; पेशवाई खालसा
१८२४	आर्यसमाजसंस्थापक दयानंद सरस्वतींचा जन्म.
१८२७	ज्योतिराव फुले यांचा जन्म
१८३६	दादोबा पांडुरंगांचें व्याकरण
१८३९	रणजितसिंगाचा मृत्यु
१८४२	अफगाणिस्तानांत इंग्रजी सैन्याचा नाश
१८४२–१९०१	न्या. रानडे
१८४३	इंग्रजांनीं सिंध काबीज केला
१८४५–४९	इंग्रज शीख युद्धें, पंजाब खालसा
१८४८	सातारा संस्थान खालसा
१८४९	ज्ञानप्रकाश सुरू
१८५०	विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म
१८५१	पहिलें तारायंत्र व पहिली कापडाची गिरणी
१८५२	दुसरें ब्रह्मी युद्ध
१८५३	पहिली रेल्वे. मुंबई ते ठाणें
१८५६	लो. टिळकांचा जन्म
१८५७	सालचा क्षोभ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रिकेटसारखा महागडा खेळ खेळण्यापेक्षां पाहण्याची उत्सुकता विद्यार्थीवर्गांत आजही आहे. बंगालकडे फुटबॉलचें आकर्षण अधिक आहे. कुस्तीपेचांकडील लक्ष विशेष कमी झालें नाहीं, याचें श्रेय आज अस्तंगत झालेल्या संस्थानिकांना आहे. त्यांनीं या पेशास चांगला आश्रय दिला. राष्ट्रीय जागृती-बरोबर देशी खेळांकडे पुढाऱ्यांचें लक्ष जाऊं लागलें आहे.

१२. **वक्तृत्वः**—याखेरीज इंग्रजांच्याप्रमाणें सभा, समाज, कायदे-मंडळें इत्यादींचा प्रसार भारतांत होऊं लागल्यानें इंग्रजी व प्रांतीय भाषांतील वक्तृत्वकला हस्तगत करण्याकडे सुशिक्षितांनीं लक्ष दिलें आहे.

प्रश्न

१. इंग्रजी राजवटींत आपल्या जीवनांत पुढील बाबतींत काय फरक झाले ? (१) भोजन, (२) कपडे लत्ते, (३) अभिवादनपद्धति, (४) करमणुकी, (५) इमारत बांधणी, (६) व्यसनें. २. प्राचीन काळीं विद्यार्थी कोणतें शिक्षण घेत ? इंग्रजी राज्यांत कोणत्या विषयांना महत्त्व आलें ? ३. मुद्रणकलेच्या उदयानें देशी भाषांवर काय परिणाम झाला ?

अभ्यास

(१) वाचा :—स्वाध्यायमालेंतील पुणें विद्यापीठ, वृत्तपत्र कसें चालतें ? नवा हिंदुस्थान, हरिजनांचा प्रश्न या पुस्तिका. (२) सुमारें सत्तरीच्या पुढें गेलेल्या एका गृहस्थास भेटून त्याजकडून ४० वर्षांपूर्वीच्या चालीरीतीबद्दल माहिती मिळवा. यासाठीं 'साधनरूप इतिहासांतील 'पन्नास वर्षांपूर्वीचें पुणें' पृ. ३३१–३३५ हा उतारा वाचा.

माहितीसाठीं

इ. स. १८१४ मधील मराठी भाषेचा नमुना

[श्रीरामपूर येथून प्रसिद्ध झालेल्या 'सिंहासन बत्तीसीं'तील उतारा]

"अवंती पुरीत् राजा विक्रमादीत्य साम्राज्य करीत असे. यके दीवसीं राज्यानें सेवकांस् आज्ञा केली तुम्ही कोणते देशाची कशी चरित्र समक्षून या. चाकर राजाज्ञा पावून अवघे देशात् भ्रमण करून् काश्मीर देशांत् पावलेन्. त्या देशांत धनवान् यके मनुष्याने मोट यक तळ केल आहे परंतु त्यांत पाणी नसे. तदनंतर यके दिवसीं आकाशवाणी झाली उत्तम पुरुष कोण्ही जर आपल शरीर बळी दे तर या तळयांत् पाणी होईल्. नाहीं तर होणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(इ. स. १९२०–१९५०)

जग	महत्त्वाचे सन	महत्त्वाचे सन	भारत
राष्ट्रसंघ स्थापना	१९२०	१९१९	तिसरें अफगाण युद्ध
मुसोलिनी इटालीचा मुख्य		१९२०	लो. टिळकांचा मृत्यु व असह-
प्रधान झाला.	१९२२		कारितेचा जन्म
इंग्लंडांत पहिलें मजूर		१९२०	अलीगढ विद्यापीठ स्थापन
प्रधानमंडळ	१९२४	१९२१	द्विदल राज्यपद्धति सुरु
हिटलरच्या नेतृत्वाखालीं जर्म-		१९२८	रामन्–प्रकाश–शोध
नींत नाझी पक्षाची स्थापना	१९३०		लाला लजपतराय मृत्यु
जागतिक मंदी	१९३१	१९२९	अन्नसत्याग्रहांत जितेंद्रनाथाचा
मँच्युरिया चीनपासून वेगळा कर-			मृत्यु (लाहोर)
ण्याचा यत्न	१९३२	१९३०	कायदेभंगाची पहिली मोहीम
अफगाणिस्थानांत नादीरशाहाचा खून			गोलमेज परिषद
मुलगा झहीरशाहा अमीर	१९३३	१९३१	गांधी-आर्यविन करार
हिटलर सर्वाधिकारी झाला	१९३४	१९३४	जातीय निर्णय, बिहार भूकंप
स्पेनमध्यें जनरल फ्रँकोचें बंड	१९३६	१९३५	राज्यकारभाराचा नवा
इटालीनें अबिसीनिया जिंकला	१९३६		कायदा–प्रांतिक स्वायत्तता
म्युनिच करार	१९३८	१९३५	क्वेट्टा भूकंप
जर्मनीची पोलंडवर स्वारी		१९३७	नवी प्रांतिक राज्यघटना सुरु
दुसरें जागतिक महायुद्ध		१९३७	सावरकर हिंदुमहासभेचे अध्यक्ष
सुरू	१९३९	१९४०	पाकिस्तान चळवळीचा उदय
इटलीनें अल्बेनिया घेतला	१९३९	१९४१	रवीन्द्रनाथ टागोर यांचा मृत्यु
जर्मनीची रशियावर स्वारी	१९४१	१९४२	चँग कै शेकची भेट
जपाननें युद्ध पुकारलें	१९४१	१९४२	'चले जाव' ची घोषणा
दुसऱ्या महायुद्धाचा शेवट	१९४५	१९४३	बंगाल्यांत भीषण दुष्काळ
संयुक्त राष्ट्रसंघाचा		१९४७	आशिया परिषद,
जाहीरनामा	१९४५		–ऑगस्ट १५, हिंदुस्थानास
			स्वातंत्र्यप्राप्ति
		१९४८	महात्मा गांधीचा वध,
			३० जानेवारी
उत्तर–दक्षिण कोरिया युद्ध	१९५०	१९५०	भारतांत सार्वभौम लोकायत्त
इराणीतेलाच्या खाणींचें			गणराज्याची स्थापना;
राष्ट्रीयीकरण	१९५१		वल्लभभाई पटेल यांचा मृत्यु;
			अरविंद घोष यांचा मृत्यु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(इ. स. १८५८–१९२०)

महत्त्वाचे सन

जग	सन
लिंकन अमेरिकेचा अध्यक्ष होतो	१८६०
अमेरिकेंतील यादवी	१८६१–६५
गुलामगिरीचा अंत व लिंकनचा खून	१८६५
डायनामाईटचा शोध नोबेल (स्वीडन) यांनीं लावला ह्याच नोबेल बक्षिसाचा दाता	१८६७
इटाली स्वतंत्र होतो, सुएझ कालव्याचें काम सुरू	१८६९
फ्रँको जर्मन युद्ध	१८७०
जपानांत रेल्वे	१८७२
गुप्त मतदान (Ballot) कायदा	१८७२
शोलस्नें टाईपरायटरचा शोध लावला (अमेरिका)	१८७३
बेलचा टेलीफोनचा शोध	१८७५
कृत्रिम निळीची उत्पत्ति	१८८०
जपानांत नवी राज्यघटना	१८८९
'क्ष' किरणांचा शोध	१८९५
मार्कोनीचा वायरलेस टेलिग्रॅफीचा शोध	१८९६
बोअर युद्ध संपलें	१९०२
रूसो-जपान युद्ध, जपानचा जय	१९०४–५
टॉल्स्टॉयचा मृत्यु	१९१०
युरोपांतील महायुद्ध	१९१४–१८
रशियन राज्यक्रांति	१९१७

सन	भारत
१८५८	राणीचा जाहीरनामा
१८६१	पं. मालवीयजींचा जन्म
१८६९	म. गांधींचा जन्म
१८७५	आर्यसमाजाची स्थापना
१८७७	व्हिक्टोरियानें 'हिंदुस्थानची बादशाहीण' किताब घेतला.
१८७८–८०	दुसरें अफगाण युद्ध
१८८०	केसरी पत्र सुरू
१८८४	स्थानिक स्वराज्याचा कायदा
१८८४	फर्ग्युसन कॉलेजची स्थापना
१८८५	कॉंग्रेसची स्थापना
१८९६	हिंदुस्थानांत प्लेग व भयंकर दुष्काळ
१८९७	लो. टिळक यांस राजद्रोहाबद्दल पहिली शिक्षा.
१९००	श्री. परांजपे रँग्लर झाले.
१९०४	युनिव्हर्सिटीचा कायदा.
१९०५	बंगालची फाळणी. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना
१९०९	मोर्ले–मिंटो सुधारणा
१९१०	भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापना, पुणें
१९११	पंचम जॉर्जची हिंदुस्थानास भेट, बंगालची फाळणी रद्द.
१९१३	रवींद्रनाथ टागोर यांस नोबेल प्राइज मिळालें.
१९१५	हिंदु युनिव्हर्सिटी स्थापना
१९१७	स्वराज्याचें जाहीर वचन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महमूद खिलजी	इ. स. १४३६–१४६९
५ गुजराथचें मुसलमान घराणें	इ. स. १३९१–१५७२
महमूद बेगडा	इ. स. १४५९–१५११
६ राजपुताना–चितोडचे गुहिलोत	चालू
७ ,, जोधपूरचे राठोड	चालू
८ ,, जयपूरचे राजे	चालू

दक्षिणेकडील स्वतंत्र राज्यें

१ बहमनी राज्य	इ. स. १३४७–१५२६
२ विजयनगरचें राज्य	इ. स. १३३६–१६७४

इ. स. १६७४ नंतर लहान लहान हिंदु राज्यें जीव धरून होतीं.

अर्वाचीन काल (इ. स. १५२६ ते आजतागायत)

मोगल रिसायद

१ बादशाह बाबर	इ. स. १५२६–३०	(राजधानी
२ हुमायून	इ. स. १५३०–४०	दिल्ली)
३ शेरशाह	इ. स. १५४०–४५	अफगाण
४ सलीमशाह	इ. स. १५४५–५४	राज्यक्रांती-
५ महंमदशाह	इ. स. १५५४–५६	चा प्रयत्न
६ हुमायून (पुनः)	इ. स. १५५५–५६	
७ अकबर	इ. स. १५५६–१६०५	
८ जहांगीर	इ. स. १६०५–२७	
९ शहाजहान	इ. स. १६२७–५८	
१० औरंगजेब	इ. स. १६५८–१७०७	
११ बहादुरशाहा	इ. स. १७०७–१२	
१२ जहांदरशाह	इ. स. १७१२–१३	
१३ फर्रुखसियर	इ. स. १७१३–१९	
१४ महमदशाह	इ. स. १७१९–४८	
१५ अहमदशाह	इ. स. १७४८–५४	
१६ बादशाह आलमगीर(दुसरा)	इ. स. १७५४–५९	
१७ शहाअलम	इ. स. १७५९–१८०६	
१८ अकबर (दुसरा)	इ. स. १८०६–३७	
१९ बहादुरशाह	इ. स. १८३७–५८	

मराठी रियासत

१ छत्रपति शिवाजी	इ. स. १६४६–८०
२ छत्रपति संभाजी	इ.स. १६८०–८९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतांतील प्रमुख राजवंश व राजघराणीं

मध्यकाल (इ. स. १२०६ ते इ. स. १५२६)

मुसलमानी रियासद

१ गुलाम वंश इ. स. १२०६–८८ (राजधानी दिल्ली)

१ कुतुबुद्दीन ऐबक	इ. स. १२०६–१०
२ शमसुद्दीन अल्तमश	इ. स. १२१०–३५
३ सुलताना रेझिया	इ. स. १२३६–३९
४ बहराम व मसाऊद	इ. स. १२३९–४६
५ नासिरुद्दीन महंमद	इ. स. १२४६–६६
६ बाल्बन	इ. स. १२६६–८६
७ कैकुबाद	इ. स. १२८६–८८

२ खिलजी घराणें इ. स. १२९०–१३२१

१ जलालुद्दीन खिलजी	इ. स. १२९०–९६
२ अलाउद्दीन खिलजी	इ. स. १२९६–१३१६
३ मुबारकशाह	इ. स. १३१६–२१

३ तुघ्लक घराणें इ. स. १३२१–१४१२

१ ग्यासुद्दीन	इ. स. १३२१–२६
२ महंमादशाह	इ. स.. १३२६–५१
३ फिरोजशाह	इ. स. १३५१–८८
४ महंमदशाह	इ. स. १३९०–९४
५ महमदशाह	इ. स. १३९४–१४१२

४ सय्यद घराणें इ. स. १४१४–१४५०

१ खिजरखान	इ. स. १४१४–२७
२ मुबारक	इ. स. १४२७–३५
३ महंमद	इ. स. १४३५–४५
४ अलाउद्दीन	इ. स. १४४५–५०

५ लोदी घराणें इ. स. १४५०–१५२६

१ बहलोलखान	इ. स. १४५०–८८
२ सिकंदर	इ. स. १४८८–१५१७
३ इब्राहीम	इ. स. १५१७–२६

उत्तरेकडील स्वतंत्र राज्यें

१ जोधपूरचें शर्की घराणें	इ. स. १३९४–१४७७
२ बंगालचें मुसलमान घराणें	इ. स. १३४०–१५७६
३ काश्मीरचें मुसलमान घराणें	इ. स. १३२६–१५८६
४ माळव्याचें खिलजी घराणें	इ. स. १४०१–१५३१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(हें संस्थान व हा राजवंश इ. स. १९४८ पर्यंत चालू)

४ इंदूरचें होळकर

१ मल्हारराव मृत्यु १७६६
२ मल्हाररावाची सून अहिल्याबाई इ. स. १७६६–९५
३ तुकोजी इ. स. १७९५–९७
४ यशवंतराव इ. स. १७९७–१८११.

(हें संस्थान व हा राजवंश इ. स. १९४८ पर्यंत चालू)

५ बडोद्याचे गायकवाड

१ दामाजी मृत्यु इ. स. १७२०
२ पुत्र पिलाजी इ. स. १७२०–३२
३ पुत्र दमाजी इ. स. १७३२–६८
४ सयाजी इ. स. १७६८–९२
५ भाऊ गोविंदराव इ. स. १७९२–१८००
६ पुत्र आनंदराव इ. स. १८००–१८१९

(हें संस्थान व हा राजवंश इ. स. १९४८ पर्यंत चालू)

६ नागपूरचे भोंसले

१ परसोजी मृत्यु १७०९
२ कान्होजी मृत्यु १७३०
६ रघोजी मृत्यु १७५५
४ जानोजी मृत्यु १७७३
५ मुधोजी मृत्यु १७८८
६ रघोजी मृत्यु १८१६
७ मुधोजी (आप्पासाहेब)

(पुढें संस्थान व राजवंश इ. स. १८५३ पर्यंत चालू)

ब्रिटिश रियासत

भारताचे गव्हर्नर जनरल

१ वॉरन हेस्टिंग्ज इ. स. १७७४–८५
२ लॉर्ड कॉर्नवॉलीस इ. स. १७८५–९३
३ सर जॉन शोअर इ. स. १७९३–९८
४ लॉर्ड वेलस्ली इ. स. १७९८–१८०५
५ लॉर्ड कॉर्नवॉलीस (पुनः) इ. स. १८०५–मृत्यु
६ सर जॉन बार्लो इ. स. १८०५–०७
७ लॉर्ड मिंटो इ. स. १८०६–१३
८ लॉर्ड हेस्टिंग्ज इ. स. १८१३–२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ छत्रपति राजाराम	इ. स.	१६८९–१७००
४ छत्रपति दुसरा शिवाजी	इ. स.	१७००–१७०८
५ छत्रपति शाहू	इ. स.	१७०८–४९
६ छत्रपति राजाराम	इ. स.	१७४९–७७
७ छत्रपति दुसरा शाहू	इ. स.	१७७७–१८०८
८ छत्रपति प्रतापसिंह	इ. स.	१८०८–३९
९ छत्रपति शहाजी	इ. स.	१८३९–४८

पेशवे

१ बाळाजी विश्वनाथ	इ. स.	१७१३–२०
२ बाजीराव	इ. स.	१७२०–४०
३ बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब	इ. स.	१७४०–६१
४ माधवराव	इ. स.	१७६१–७२
५ नारायणराव	इ. स.	१७७२–७३
६ सवाई माधवराव	इ. स.	१७७४–९५
७ दुसरा बाजीराव	इ. स.	१७९६–१८१८

अर्वाचीन कालांतील लहान लहान राज्यें

१ हैद्राबादचे निजाम

१ निजाम–उल्–मुल्क	इ. स.	१७२४–४८
२ नासिरजंग	इ. स.	१७४८–५०
३ मुज्फरजंग	इ. स.	१७५०–५१
४ सलाबतजंग	इ. स.	१७५१–६३
५ निजामअल्ली	इ. स	१७६३–१८०३

(हें संस्थान आजतागायत चालू आहे)

२ म्हैसूरचे राजे

१ हैदर	इ. स.	१७६०–८२
२ टिपू	इ. स.	१७८२–९९
३ कृष्णराज ओडेयर (हिंदु)	इ. स.	१७९९ पासून पुढें

(हें संस्थान व हा राजवंश चालू आहे)

३ ग्वाल्हेरचे शिंदे

१ राणोजी	मृत्यु	१७४५
२ जयाप्पा	मृत्यु	१७५५
३ दत्ताजी (जयाप्पाचा भाऊ)	मृत्यु	१७६०
४ जनकोजी (जयाप्पाचा मुलगा)	मृत्यु	१७६१
५ महादजी (राणोजीचा दासीपुत्र)	इ. स.	१८६१–९४
६ दौलतराव	इ. स.	१७९४–१८२७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९	लॉर्ड अॅम्हर्स्ट	इ. स. १८२३–२८
१०	लॉर्ड वुइल्यम बेंटिक	इ. स. १८२८–३५
११	सर चार्लस मेटकाफ्	इ. स. १८३५–३६
१२	लॉर्ड ऑक्लंड	इ. स. १८३६–४२
१३	लॉर्ड एलेनबरो	इ. स. १८४२–४४
१४	लॉर्ड हार्डिज	इ. स. १८४४–४८
१५	लॉर्ड डलहौसी	इ. स. १८४८–५६

गव्हर्नर जनरल व व्हाइसरॉय

१६	लॉर्ड कॅनिंग	इ. स. १८५६–६२
१७	लॉर्ड एल्जिन	इ. स. १८६२–६३
१८	लॉर्ड लॉरिन्स	इ. स. १८६४–६९
१९	लॉर्ड मेयो	इ. स. १८६९–७२
२०	लॉर्ड नॉर्थब्रुक	इ. स. १८७२–७६
२१	लॉर्ड लिटन	इ. स. १८७६–८०
२२	लॉर्ड रिपन	इ. स. १८८०–८४
२३	लॉर्ड डफरिन	इ. स. १८८४–८८
२४	लॉर्ड लॅन्सडाऊन	इ. स. १८८८–९४
२५	लॉर्ड एल्जिन (दुसरा)	इ. स. १८९४–९८
२६	लॉर्ड कर्झन	इ. स. १८९८–१९०५
२७	लॉर्ड मिंटो	इ. स. १९०५–१०
२८	लॉर्ड हार्डिज (दुसरा)	इ. स. १९१०–१६
२९	लॉर्ड चेम्सफर्ड	इ. स. १९१६–२१
३०	लॉर्ड रीडींग	इ. स. १९२१–२६
३१	लॉर्ड आर्यविन	इ. स. १९२६–३१
३२	लॉर्ड विलिंग्डन	इ. स. १९३१–३६
३३	लॉर्ड लिन्लिथगो	इ. स. १९३६–४३
३४	लॉर्ड वॅव्हेल	इ. स. १९४३–४७
३५	लॉर्ड मौऊन्टबॅटन	इ. स. १९४७–४८

स्वातंत्र्याच्या घोषणेनंतरचे गव्हर्नर जनरल

३५	लुई माऊंटबॅटन	इ. स. १९४७–४८
३६	श्री. चक्रवर्ती राजगोपालाचार्य	इ. स. १९४८–५०

प्रजासत्ताक भारताचे पहिले अध्यक्ष

१	बाबू राजेन्द्रप्रसाद	इ. स. १९५०—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar